REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

अर्थ एव प्रधानः इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख ६ जानेवारी १९४३ अंक १

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यांपासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जास्त प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY POONA 4

## कायद्याचीं मराठी पुस्तकें

१ इन्‌कम्‌ टॅक्स कायदा (सुधारणांसह) किं. १॥ रु.
२ कर्ज देण्याघेण्याबाबत कायदा किं. २ रु.
३ मृत्युपत्राचा कायदा किं. १। रु.
४ हिंदु स्त्रीधनाचा कायदा किं. १२ आ.
५ विवाहाचा कायदा किं. १२ आ.

याशिवाय मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या "न्याय बोध" मासिकाचे वर्गणीदार व्हा. वा. व. ५ रु. नमुना अंक मागवा.

—न्यायबोध-ऑफिस, महाल नागपूर शहर


# विविध माहिती

### पांच कोटि पुस्तकांची निर्गत

गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमधून एकूण ४० लक्ष पौंड किंमतीच्या पुस्तकांची निर्गत झाली. १९३७ चे मानानें हा आकडा सवापट आहे. पुस्तकांच्या निर्गतीची आकडा ५१/२ कोटि इतका होतो.

### उत्तर आफ्रिकेंतून कच्च्या मालाचा पुरवठा

फ्रेंच उत्तर आफ्रिकेंतील उपलब्ध मौल्यवान कच्च्या मालाची वाटणी ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेमध्यें करण्यांत येत आहे. १९४३ सालीं मात्र ह्या मालाची निर्गत फार मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता नाहीं.

### कोयनेलचा तुटवडा

नफेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांकडील ३ हजार पौंड कोयनेल सरकारनें आपल्या ताब्यांत घ्यावें, हिंदुस्थान सरकारजवळील साठ्यापैकीं कांहीं कोयनेल मिळवावें, त्याची विक्रीची किंमत पौंडास ३५ रुपये ठरवावी, अमेरिकेंतून अटेब्रिनची आयात करावी, तें हाफकिन्स इन्स्टिटयूटमध्यें तयार करण्यासाठी त्यास लागणारीं कच्चीं द्रव्यें मागवावीं, इत्यादि सूचना डॉ. दादाचानजी ह्यांनीं बॉंबे मेडिकल असोसिएशनच्या सभेचे प्रसंगीं मुंबईतील डॉक्टरांतर्फे सरकारास केल्या.

### अमेरिकन सैनिकांचे ब्रिटिश मुलींशीं विवाह

ग्रेट ब्रिटनमधील अमेरिकन सैनिकांस ब्रिटिश मुलींशीं विवाह करावयाचा असल्यास त्यांनीं दोन महिन्यांची अगाऊ नोटीस दिली पाहिजे, असा नियम करण्यांत आला आहे. अशा रीतीनें विवाह करणारांच्या बायकांना अमेरिकन नागरिकत्वाचे हक्क मिळणार नाहींत हें स्पष्ट करण्यांत आलें आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे परवानगीविना विवाह करणाऱ्या सैनिकांस लष्करी कोर्टापुढें उभें करण्यांत येईल.

### स्थलांतर करणार नाहीं

कलकत्त्यावर बरेच बॉंबहल्ले झाले एवढ्यासाठी हिंदुस्थान सरकार आपल्या तेथील कचेऱ्यांचें स्थलांतर करणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

### बॅंकांचें एकत्रिकरण

जपानमधील चार प्रमुख बॅंकांचें एकत्रीकरण होणार आहे, त्यांत सुप्रसिद्ध मिट्सुइ बॅंकहि आहे.

### मुंबई प्रांतांतील मोटारी

मुंबई प्रांतांतील सुमारें २५ हजार मोटारींपैकीं निम्म्या मोटारींस दरमहा ६ गॅलन पेक्षा अधिक पेट्रोल मिळत नाहीं. त्यामुळें, स्वतःची मोटार ठेवण्यापेक्षा भाड्याच्या मोटारींतून जाणें आतां अधिक स्वस्त पडतें. कित्येकांनीं आपल्या मोटारी विकून टाकल्या आहेत.

### अमेरिकन सैनिक बीर कमी पितात

अमेरिकन सैनिक दारू बेतानें पितात हें लष्करी दुकानांतील बीरच्या माफक खपावरून दिसून येतें, असें अमेरिकेच्या युद्ध माहिती खात्यानें प्रसिद्ध केलें आहे.

### शास्त्रज्ञांचें भवितव्य व राजकीय प्रगति

"आपण आपल्या देशाचे मालक बनून आपलें सामाजिक व आर्थिक भवितव्य जोंपर्यंत निश्चित करूं शकत नाहीं, तोंवर मोठ्या प्रमाणावर राष्ट्रसंवर्धक योजना हातीं घेणें आपणांस शक्य होणार नाहीं. आपल्या राजकीय भवितव्यावरच शास्त्रज्ञांचें भवितव्य अवलंबून आहे."—ॲंग्लो बेंगाली इंटरमिजिएट कॉलेजच्या सायन्स विभागाचें उद्घाटन करतेवेळीं हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि, श्री. सरकार, यांनीं वरील उद्गार काढले.

### "युनायटेड नेशन्स" पोस्टाचें तिकीट

अमेरिका १४ जानेवारी रोजीं पोस्टाचें एक नवीन तिकीट काढणार आहे, त्यावर यशनिदर्शक चिन्ह असून "विजयासाठी संयुक्त झालेलीं राष्ट्रें" असा त्यावर मजकूर छापलेला आहे.

### चीनमधील खास हक्क

चीनमध्यें ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्या राष्ट्रांस असलेले खास हक्क त्यांनीं सोडण्यासंबंधीच्या कराराचा मसुदा चीन, ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं मान्य केला आहे. प्रत्यक्ष करारावर सह्या लवकरच होतील.

### कोट्याधीशाचा सहावा घटस्फोट

"माझी सहावी पत्नी, विली बोन, ही घटस्फोट घेण्यासाठी रेनोला जात आहे," असें अमेरिकन कोट्याधीश मि. टॉमी मॅनव्हील ह्यांनीं नुकतेच जाहीर केलें.

### मुंबई प्रांतास कोयनेलचा पुरवठा

मुंबई प्रांतांतील लोकांकरितां प्रांतिक सरकारास मध्यवर्ती सरकारकडून कोयनेलचा थोडासा साठा मिळाला आहे, त्यांतून धमार्थ इस्पितळें व दवाखाने ह्यांस प्रथम कोयनेल दिलें जाईल. नंतर डॉक्टरांस मिळेल. सर्वसाधारण जनतेस कोयनेल पुरवतां येणार नाहीं; लोकांनीं दवाखाने व डॉक्टर लोक ह्यांच्याकडून तें घ्यावें. डॉक्टर लोकांनीं सुपरिंटेंडेंट ऑफ एक्साइज, मुंबई ह्या पत्त्यावर मनिऑर्डरनें ७ रु. ८ आ. पाठविल्यास त्यांस रजिस्टर्ड पोस्टानें २ औंस कोयनेल मिळेल.

### कॅनडांत 'डच' जन्मभूमि

हॉलंडच्या प्रिन्सेस ज्युलिआनाच्या बाळंतपणासाठी ओटावा येथील इस्पितळाचा एक भाग राखून ठेवला आहे. हा भाग "एक्स्ट्रॉ टेरिटोरिअल" समजला जाईल, असें कॅनडाच्या गॅझेटाचे खास अंकांत प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. ह्याचा अर्थ, इस्पितळाचा हा भाग कॅनडाच्या सरकारी नियंत्रणाखालीं नसून तो डच नियंत्रणाखालीं आहे असें तात्पुरतें समजलें जाईल व प्रिन्सेस ज्युलिआनाच्या अपत्याचा डच भूमीवर जन्म झाला असें मानतां येईल.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २ |
| २ अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याबाबत तक्रारी ... | ३ |
| ३ पाश्चात्यांचें अंधानुकरण करूं नका ... | ४ |
| ४ स्फुट विचार ... युद्धाचें गेलें वर्ष-शिक्षण-पद्धतींत सुधारणा—नफा घ्या, नफेबाजी नको—स्तुत्य प्रयत्न—बँबे को. क्वार्टर्ली | ५ |
| ५ शेती-सुधारणा ... | ७ |
| ६ साखरेची नियंत्रित किंमत | ७ |
| ७ स्वस्त कापडासाठी हात-मागांचा उपयोग ... | ७ |



# अर्थ

बुधवार, ता. ६ जानेवारी, १९४३


## अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याबाबत तक्रारी

धान्यपुरवठ्याचा तुटवडा आणि महागाई ह्यांचे विषयींच्या तक्रारी मिटण्याचे ऐवजीं अलीकडे विशेषच वाढल्या आहेत. विशेषतः मुंबई शहराचे बाबतींत परिस्थिति अत्यंत असमाधानकारक असून ती सुधारण्यासाठी तात्काळ परिणामकारक उपाय योजिले जाण्याचें अगत्य वृत्तपत्रांत प्रतिपादलें जात आहे. व्यापारी मंडळांनीं आतां ह्या निकडीच्या प्रश्नास चालना दिली असून मुंबईच्या इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्सनें व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो ह्यांचें खास लक्ष त्याकडे वेधलें आहे. जनतेस अन्नसामुग्रीचा किमान पुरवठा होण्याचें महत्व विशेषतः सध्याच्या युद्ध-परिस्थितींत किती आहे ह्याची जाणीव हिंदुस्थान सरकारास आहे हें त्यांनीं त्यासंबंधांतली व्यवस्था नीट व्हावी म्हणून स्वतंत्र खातें निर्माण केलें आहे ह्यावरून दिसून येत आहे. तथापि अन्नसामुग्रीच्या तजवीजीविषयींचें सरकारी धोरण निश्चित व प्रभावी झालेलें अनुभवास येत नाहीं. एकंदर देश विचारांत घेतां मुख्य धान्यांचा पुरवठा जरूरी इतका आहे असें सांगण्यांत येत आहे. परंतु तांदूळ आणि गहू ह्यांची निर्गत सरकारामार्फत झाली आहे आणि ह्यामुळें ह्या धान्यांची कमतरता पडत आहे, म्हणून ही निर्गत तात्काळ थांबविण्यांत यावी अशा आशयाची तातडीची सूचना करण्यांत आली आहे. एकूण उत्पादनाचे मानानें झालेली व होणारी निर्गत अत्यंत अल्प आहे आणि खरा प्रश्न पुरवठ्याचा नसून धान्याच्या वाटणीचा आहे असा युक्तिवाद दुसऱ्या बाजूनें पुढें मांडला जात आहे. व्यापारी व इतर व्यक्तींनीं खाद्य पदार्थांचा साठा करून ठेवल्यानें त्यांची सामान्य जनतेस कमतरता भासत आहे हा मुद्दाहि प्रस्तुत बाबतींत उपयोगांत आणला जात आहे. मुंबई प्रांतांत तांदूळ आणि गहू ह्यांचा नेहमींच तुटवडा असतो आणि सध्या तो अत्यंत तीव्रतेनें भासत आहे आणि प्रांतिक सरकार हीं धान्यें इतर प्रांतांतून आणण्याची शिकस्त करीत आहे, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. आतां ह्या धान्यांची योग्य वाटणी देशाच्या निरनिराळ्या भागांत होण्याची व्यवस्था करण्याचें कार्य मध्यवर्ती सरकारचें आहे आणि ही जबाबदारी त्यांनीं पार पाडली पाहिजे. त्यासाठी लागणारे नियंत्रणाचे अधिकार त्या सरकारास आहेत आणि त्यांचा उपयोग जरूरीप्रमाणें कडक रीतीनें होणें अगत्याचें आहे. धान्य नफेबाजीच्या हेतूनें विकावयास बाहेर न काढणें किंवा बाजारभाव मर्यादेबाहेर घेणें असल्या गोष्टींचें नियंत्रण होणें इष्ट आहे. त्या कार्यक्रमाचे मार्गांत अडचणी नाहींत असें नाहीं. परंतु खाद्य पुरवठ्याचें महत्त्व एवढें आहे कीं, त्या दूर होण्यासाठी हरएक प्रयत्न झाला पाहिजे. धान्य पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्याची सरकार शिकस्त करीत आहे अशी जनतेची खात्री पटली जाणें अत्यंत आवश्यक झालें आहे. व्हाइसरॉय या निकडीच्या गोष्टीकडे खास लक्ष पुरवतील अशी आशा आहे.

फौजेसाठीं अन्नसामुग्री पुरवावयाची तिला अग्रस्थान दिलें जावें याविषयीं मतभेद होणें शक्य नाहीं. तथापि समाजांतील कामकरी व इतर वर्ग यांस खाद्यपदार्थांचा मर्यादित पण निश्चित पुरवठा होण्याचें महत्त्वहि तितकेंच मोठें आहे हें विसरतां कामा नये. सध्या वृत्तपत्रांत जनतेच्या वतीनें तक्रारी प्रसिद्ध होत आहेत त्यांचा याच दृष्टीनें विचार झाला पाहिजे. हिंदुस्थानांत जरूर असलेल्या धान्यांपैकी फक्त गव्हाची आयात बाहेरून होणें शक्य आहे. मामुली परिस्थितींत ह्या देशांतून गव्हाची निर्गत अल्प प्रमाणांतच होत असे आणि जरुरीच्या प्रसंगीं ऑस्ट्रेलियन गहू इकडे आयात झाल्याचीं उदाहरणें आहेत. सध्या समुद्रमार्गाची वहातुक अडचणीची झाली आहे यांत शंका नाहीं. तरीहि हिंदुस्थानची निकडीची परिस्थिति लक्षांत घेऊन सरकारनें ऑस्ट्रेलियांतून गहू इकडे आणण्याचा शक्य तो प्रयत्न केला पाहिजे अशी सूचना करण्यांत आली आहे, तिची अंमलबजावणी केली जाणें इष्ट आहे. गव्हाची आयात झाल्यास धान्याच्या पुरवठ्याचा प्रश्न सुटण्यास सहाय झाल्यावांचून राहाणार नाहीं. मुंबई सरकारच्या अन्नसामुग्री सल्लागार मंडळाच्या चर्चेचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे त्यावरून मुंबई शहरांत "रेशनिंग" ची व्यवस्था लवकरच चालू केली जाणार आहे असें दिसतें. पुणें शहराच्या बाबतींतहि त्या व्यवस्थेविषयीं चर्चा झालेली आहे. योजनात्मक आणि नियंत्रणात्मक पद्धतीनें खाद्य पदार्थांचा पुरवठा व वाटणी होणें अपरिहार्य झालें आहे असें एकंदर परिस्थिति लक्षांत घेतां वाटावयास लागणें स्वाभाविक आहे. त्या कामीं हिंदुस्थान सरकार, प्रांतिक सरकार, व्यापारी व जनता यांनीं सहकार्य करून अन्न-पुरवठ्याचा प्रश्न सोडविला पाहिजे हें उघड आहे.

मुंबई शहर आणि उपनगर येथें आलेलें व येणारें धान्य तेथून बाहेर नेण्यांत येऊं नये आणि त्याच्या पुरवठ्याचा कमाल उपयोग शहरवासियांस व्हावा ह्या हेतूनें प्रांतिक सरकारनें एक नवीन हुकूम काढला आहे. दहा बंगाली मणांपेक्षां अधिक वजनाची बाजरी कोणाजवळ असेल तर ह्या हुकुमान्वयें त्यास तिचा व्यवहार करतां येणार नाहीं. तांदूळ, ज्वारी व बाजरी एखाद्या रेल्वे स्टेशनवर, बंदरावर किंवा गोदींत उतरलेली असेल तर तें धान्य खास परवान्यावांचून हालवतां येणार नाहीं. दहा बंगाली मणांपेक्षा अधिक बाजरी ज्यांचेजवळ असेल त्यांनीं दर आठवड्यास त्याबाबतची माहिती ठराविक अधिकाऱ्यांस रीतसर कळविली पाहिजे असाहि हुकूम सरकारनें काढला आहे. उपलब्ध असलेल्या धान्याची वाटणी योग्य तऱ्हेनें व्हावी आणि शक्य तितक्या लोकांस तें मिळावें हा वरील हुकुमाचा उद्देश आहे. सरकारी धान्यविक्रीच्या दुकानाचे संबंधांत लोकांचीं गाऱ्हाणीं प्रसिद्ध होत आहेत तिकडेहि लक्ष पुरवून तीं दूर करण्याचा अधिकाऱ्यांनीं अवश्य प्रयत्न करावा.

## पाश्चात्यांचें अंधानुकरण करूं नका

### हवामानाचा विचार करून कपडे वापरा

सिलोनचे गव्हर्नर, सर ॲन्ड्र्यू काल्डकॉट, ह्यांनीं कोलंबो येथील रॉयल कॉलेजच्या वार्षिक बक्षीस समारंभाचे वेळीं कॉलेजच्या विद्यार्थ्यांना उद्देशून उपदेश केला, त्यांतील कांहीं भाग "इंडिपेंडंट" मधून येथें उद्धृत करण्याजोगा आहे. ते म्हणालेः—

"सिगारेट्स, दारू व कपडे ह्यांची आपण मोठ्या प्रमाणावर आयात करतो, त्यांपैकीं बराच मोठा भाग अनवश्यक आहे. युरोपियन पद्धतीच्या कपड्यांच्या जुलमांतून मुक्त व्हा आणि धूम्रपान व दारूपान सोडून द्या. २८ जुलै, १९३८ पासून मी धूम्रपान अजिबात केलेलें नाहीं. ही सवय सोडण्यास सहा महिन्यांचा संयम पुरेसा होतो. मी मलायी व चिनी लोकांत कित्येक वर्षे काढलीं. मलायामधील व हाँगकाँगमधील विधिमंडळांत व तेथील सरकारी समारंभांत तेथील माझे स्थानिक सहकारी आपल्या राष्ट्रीय पोषाकानें हवेंतील उष्णतेस सुखानें तोंड देत असत, परंतु मी मात्र माझ्या गरम व जड राष्ट्रीय पोषाकांत घामानें भिजून जात होतो. मी मलायी व चिनी लोकांचा हेवा करीत असे. येथें सिलोनमध्यें पहावें, तर सिंहली लोकांनीं आपली अवस्था माझ्यासारखीच करून घेतली आहे. थंड हवेंत आवश्यक असलेला पोषाक उष्ण हवेंतहि वापरणें हे निर्बुद्धपणाचें लक्षण आहे. असा पोषाक स्वच्छ नसतो,काटकसरीचा नसतो किंवा तो सुरेखहि दिसत नाहीं. तो नकली मात्र दिसतो. सर्व कचेऱ्यांतून शर्ट व अर्धी विजार एवढे कपडे घालणें पुरे असल्याचें मी आधींच जाहीर केलें आहे. सरकारी समारंभ, मुलाखती, इत्यादींचे वेळीं सिंहली लोकांनीं आपला राष्ट्रीय पोषाक घालण्यास मी हरकत ठेवलेली नाहीं. वयस्क लोक आतां माझ्या सांगण्यावरून आपला विलायती पोषाक टाकून देतील, अशी अर्थातच माझी अपेक्षा नाहीं. परंतु लंकेंतील तरुणांनीं मात्र ह्या कामीं पुढाकार घेतला पाहिजे. अनवश्यक व गैरसोईचे कपडे व पायतणें वापरण्याचें त्यांनीं टाकून दिलें पाहिजे. सिलोनमधील फुटबॉलपटु उघड्या पायांनीं खेळतात; मग दिवसाच्या कामाचें वेळीं त्यांस पायमोजे व बूट कशास लागतात? वहाणा चालणार नाहींत काय?"

### आय. सी. एस. ची परीक्षा

४ जानेवारी रोजीं सुरू होणारी आय. सी. एस. ची परीक्षा आतां १८ जानेवारी रोजीं दिल्ली, लाहोर, अलाहाबाद, मुंबई आणि मद्रास येथें सुरू होईल. कलकत्ता केंद्र रद्द करण्यांत आलें आहे तेथील उमेदवारांनीं परीक्षेसाठीं अलाहाबादला जावयाचें आहे.

### ग्रेट ब्रिटनचें सरकारी उत्पन्न व खर्च

चालू हिशेबी वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत ब्रिटिश सरकारचें उत्पन्न १ अब्ज, ७६३ कोटि पौंड इतकें झालें. म्हणजे गेल्या वर्षाच्या तत्सम उत्पन्नापेक्षा तें ५४३ कोटि पौंड अधिक भरलें. उत्पन्नापेक्षा खर्च २ अब्ज, २९ कोटि पौंड जास्त झाला. उत्पन्नाचे बाजूस कॅनडाच्या सरकारनें दिलेली २२३ कोटि पौंडाची देणगी अंतर्भूत आहे.

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

वरील कंपनीच्या ता. ३१-१२-४२ रोजीं भरलेल्या सभेंत डायरेक्टरांचा रिपोर्ट व ताळेबंद ह्यांस मान्यता मिळून ऑर्डिनरी भागांवर ७½% डिव्हिडंड व २½% बोनस अशी नफ्याची वाटणी मंजूर झाली. कै. वि. न. वर्तक ह्यांचे जागीं डॉ. भडकमकर ह्यांची डायरेक्टर म्हणून निवड झाली व निवृत्त होणारे डायरेक्टर श्री. तांबे, श्री. साळवेकर व डॉ. फाटक ह्यांची फेरनिवड झाली. श्री. जी. एम्. ओक व श्री. जी. डी. आपटे हे पूर्वीचेच ऑडिटर्स हिशेबतपासनिसांचें जागीं नेमण्यांत आले.

### ग्रेट इन्व्हेस्टमेन्ट ट्रस्ट लि.

वरील नांवाची ५० लक्ष रुपये अधिकृत भांडवलाची कंपनी लवकरच नोंदण्यांत येणार आहे. त्यापैकीं निम्में वसूल करण्यांत येईल. ट्रस्ट कंपनीच्या नेहमींच्या कामाबरोबर नवीन उद्योगधंद्यांस हातभार लावण्याचें कार्यहि ही कंपनी करणार आहे.


## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

# स्फुट विचार

## युद्धाचें गेलें वर्ष

बारा महिन्यांचे पूर्वीची आणि आजची युद्धपरिस्थिति ह्यांचें तुलनात्मक दृष्टीनें अवलोकन केलें असतां आशा, उत्तेजन व उत्साह ह्यांस भरपूर जागा उत्पन्न झाली आहे, असें निःसंशय म्हणतां येतें. गेल्या वर्षात प्रारंभीं जपानची पश्चिमेस आणि जर्मनीची पूर्वेकडे झपाट्यानें प्रगति झाल्यामुळें मित्रराष्ट्रांच्या आशावादास धक्का बसला होता, त्या वातावरणाचें पुष्कळसें निराकरण अलिकडच्या कांहीं महिन्यांच्या अवधींत झालें आहे. हिटलरचे ग्रह उच्चीचे आहेत असें वाटावयास लागलें होतें आणि त्याच्या विजयाच्या भरतीचें स्थित्यंतर ओहोटीस लागण्यास फार काळ लोटला पाहिजे अशी कल्पना होण्यास जागा होती. पण त्याचे बेत एकामागून एक फसत आले आहेत. लेनिनग्राड व मॉस्को तर हिटलरच्या दृष्टीस मृगजलच ठरले आहेत. पण त्यास सर्वांत मोठा हिसका कोठें सहन करावा लागला असेल तर तो स्टालिनग्राड येथें व कॉकेशसमध्यें होय. रशियन फौजांनीं जर्मनीची प्रगति ह्या रणांगणांवर थांबवली आहे, इतकेंच नव्हे तर शत्रूवर उलट चढाई करून हिंवाळयाच्या बिकट नैसर्गिक परिस्थितींत त्यास मागें रेटण्यांत अप्रतिम यश मिळवलें आहे. त्याच वेळीं ब्रिटिश फौजेनें रोमेलला शेकडों मैल हांकून देऊन त्याचा सारखा पिच्छा पुरवला आहे. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश वर्चस्व प्रस्थापित होत आलें आहे आणि इटलीच्या प्रमुख बंदरांवर व शहरांवर ब्रिटिश विमानांनीं विध्वंसक हल्ले चढवले आहेत. अलेक्झांड्रिया व कैरो काबीज करण्याचीं सुखस्वप्नें हिटलरला एका काळीं पडत होतीं तीं जिरलीं आहेत आणि इटलीचें आफ्रिकन साम्राज्य पूर्णपणें नष्ट झालें आहे. फ्रान्सच्या आफ्रिकेंतील साम्राज्याची हीच गत आतां होऊं पहात आहे आणि अमेरिका व ब्रिटिश सैन्यानें त्या रणांगणांत जी धडाडी दाखवून ट्युनिशियामध्यें जर्मनीस घेरलें आहे तो पराक्रमहि अनेक दृष्टींनीं अपूर्व असाच झाला आहे. जपानच्या पूर्व आशिया खंडांतील विजयामुळें जर्मनीस कांहीं काळ उत्साह चढल्यासारखें झालें होतें, पण न्यूगिनीमध्यें अमेरिकन व ऑस्ट्रेलियन फौजांनीं शत्रूस हटवलें आहे आणि त्याचा सारखा पाठलाग चालवला आहे. ब्रह्मदेशांत जपानला ब्रिटिश व अमेरिकन विमानांचे वाढते हल्ले सहन करावे लागत आहेत आणि त्याचें लढाऊ सामर्थ्य एकंदरींत बरेंच खालावलेलें दिसत आहे. गेल्या वर्षातील युद्धपरिस्थितीचें सिंहावलोकन केलें असतां ह्या रीतीनें मित्र राष्ट्रांची बाजू अधिक बळकट होत आहे आणि शत्रूच्या नशिबानें उलट खाण्यास निश्चित प्रारंभ केला आहे ह्याविषयीं शंका उरत नाहीं. मनुष्यांची व सामुग्रीची प्रचंड हानि झाली असली तरी हिटलर आपल्या नशिबाची परीक्षा पुन्हां पहाण्यास चालू सालीं आणखी एक जुगारी डाव टाकल्यावांचून रहाणार नाहीं आणि मित्र-राष्ट्रांच्या तटबंदीस दुसरीकडे कोठेंतरी भोक पाडण्याचा प्रयत्न करण्यास चुकणार नाहीं अशी सावधगिरीची सूचना कित्येक निरीक्षक देत आहेत तें योग्यच आहे. तथापि असल्या शत्रुप्रयत्नास तोंड देण्यास मित्र-राष्ट्रांजवळ वाढतें बळ आहे आणि त्याचा त्यांनीं चिकाटीनें उपयोग करावयाचा आहे हा बोध त्या सूचनेपासून घ्यावयाचा आहे. शत्रु हिंदुस्थानला तर अगदीं जवळ असल्यानें जागरुकतेची व निश्चयाची आवश्यकता येथें विशेष आहे हें सांगावयाला नको.

## शिक्षणपद्धतींत सुधारणा

युद्धोत्तर काळांत ब्रिटिश शिक्षण-व्यवस्थेंत कोणत्या सुधारणा होणें इष्ट आहे ह्याविषयीं इंग्लंडमध्यें कॉन्झर्व्हेटिव्ह व कामकरी पक्ष कोणत्या प्रकारच्या योजना आखीत आहेत ह्याचें दिग्दर्शन आम्हीं नुकतेंच केलें आहे आणि हिंदुस्थानांत ह्या विषयाची चर्चा होणें अगत्याचें आहे असें सुचविलें आहे. ह्या बाबतींत इंदूर येथें नुकत्याच भरलेल्या अखिल भारतीय शिक्षण परिषदेंत विचारविनिमय झाल्याचें प्रसिद्ध झालें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. डॉ. बाबासाहेब जयकर आणि प्रा. अमरनाथ ह्यांनीं प्रचलित हिंदी शिक्षण-व्यवस्थेविषयीं असमाधान व्यक्त करून तीमध्यें महत्त्वाच्या सुधारणा होण्याचें अगत्य प्रतिपादलें. देशाच्या परिस्थितीस आणि लोकांच्या आर्थिक, सामाजिक व राष्ट्रीय गरजांस धरून सध्यांचें हिंदी शिक्षण नाहीं ही तक्रार कित्येक वर्षें केली जात आहे. आमच्या शिक्षण-पद्धतींत आमूलाग्र फेरबदल झाल्यावांचून हा प्रश्न सुटावयाचा नाहीं ही भावना दृढ झाली आहे. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानास राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक दृष्टींनीं जगांत योग्य स्थान प्राप्त होण्यास आणि हिंदी लोकांची सर्वांगीण प्रगति होण्यासाठीं अनुकूल परिस्थिति निर्माण होण्यास तरुण पिढीस उपयुक्त व कार्यक्षम नागरिकत्वाचें शिक्षण मिळेल अशी तजवीज झाली पाहिजे. हा प्रश्न आमचीं विश्वविद्यालयें आणि शिक्षण-संस्था ह्यांनीं आणि त्याचबरोबर प्रांतिक सरकारांनीं हातीं घेतला पाहिजे. ह्यांच्या हातांत शिक्षण-व्यवस्थेचीं सूत्रें असल्यानें त्यांसच तो सोडवितां येणार आहे.

## नफा घ्या, नफेबाजी नको

सुरत चेंबर ऑफ कॉमर्सनें सर पुरषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या सन्मानार्थ मेजवानी केली, त्या प्रसंगीं सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं आपल्या भाषणांत व्यापाऱ्यांनीं, विशेषतः दाणेवाल्यांनीं नफेबाजी करूं नये, अशी आग्रहाची विनंति केली. नफा हा तर व्यापाराचा पाया आहे; नफ्याचे अभावीं कोणताच व्यापारी व्यवहार करणार नाहीं, हें खरें असलें तरी, निदान माणुसकीच्या दृष्टीनें तरी व्यापाऱ्यांनीं नफ्यावरच संतुष्ट रहावे, नफेबाजीचे आहारीं जाऊं नये, असें त्यांनीं कळकळीनें सांगितलें. अर्थात्, व्यापारी देवघेवींत माणुसकीची अपेक्षा करणें जरा अव्यवहार्यच आहे, असा सर पुरुषोत्तमदास ह्यांच्या म्हणण्यावर आक्षेप घेतां येण्याजोगा आहे. पैसा मिळवितांना माणुसकी न दाखवितां मिळविलेल्या संपत्तींतूनच थोडाफार धर्मादाय खर्च करण्याची व्यापाऱ्यांची प्रवृत्ति असते. व्यापाऱ्यांनीं ही नेहमींची पद्धत सध्यांच्या विशेष अडचणींच्या प्रसंगीं बाजूस ठेवावी, असा सर पुरुषोत्तमदास ह्यांच्या म्हणण्याचा मतितार्थ आहे. एकाद्या व्यापाऱ्यानेंच केवळ नफेबाजी सोडून भागणार नाहीं, सर्वांनींच त्या कामीं सहकार्य केलें पाहिजे, हें उघड आहे.

### स्तुत्य प्रयत्न

धान्यांच्या नुसत्या किंमती ठरवून आणि त्यांच्या विक्रीच्या यवहारांचें नियंत्रण सरकारनें केल्यानें सध्याच्या खाद्यपदार्थांच्या टंचाईविषयींचा प्रश्न सुटूं शकत नाहीं ही गोष्ट पुष्कळ वेळीं दृष्टि-गाड होत असते. देशाच्या कांहीं भागांत एखाद्या धान्याची गास होत नसून त्याचा पुरवठाच मर्यादित असेल तर तें धान्य क्य तितक्या प्रमाणांत बाहेरून आणल्यावांचून त्याच्या कॅमती यशस्वी रीतीनें नियंत्रित होणार नाहींत. प्रांतिक सरकारनें ख़रीकडून कांहीं धान्य आणण्याची खटपट चालविली आहे ी त्याकरितांच होय. मालाच्या आयातीचें आणि वांटणीचें काम यापाऱ्यांवर सोपवूनहि भागत नाहीं. येथें सरकारचें वजन व मधिकार ह्यांचें महत्त्व असतें. मुंबई प्रांतांत एकंदरीनें तांदुळाचा ोठा तुटवडा आहे हें जाणून प्रांतिक सरकारनें तो दूर करण्याचें ाम स्वतःवर घेतलें आहे, ही समाधानकारक गोष्ट आहे. कुलाबा जेल्ह्यांतला फालतू तांदूळ ठराविक व्यापाऱ्यांचे मार्फत स्वतः रेदी करण्याचें आणि तो प्रांताच्या गरजू भागांत निश्चित किंम-ीनें पुरवण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. प्रांताचे गव्हर्नर सर रोजर म्ले यांनीं धान्याच्या दुर्मिळतेविषयीं आपलें म्हणणें त्यांचेपुढें ांडणाऱ्या मुंबईच्या एका वजनदार शिष्टमंडळास नुकतेंच सांगि-ालें कीं ते स्वतः दिल्ली येथें जाऊन ह्या प्रांतास अधिक धान्य मेळण्याचे संबंधांत मध्यवर्ती सरकारास गळ घालणार आहेत. ेशाच्या निरनिराळ्या भागांत धान्याचे पुरवठ्याचे बाबतींत स्सीखेच चाललेली असतां अशा प्रकारचा प्रयत्न होणें अगत्याचें ोतें आणि तो स्वतः करण्याचें गव्हर्नरांनीं ठरवलें आहे हें सर्वस्वी ्तुत्य आहे. सर रोजर मुंबई प्रांताची स्थिति हिंदुस्थान सरकार-्या नजरेस आणून आपल्या शिष्टाईत यश मिळवतील अशी ाशा आहे.

---

### बॉंबे को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा डिसेंबर १९४२ चा अंक प्रसिद्ध झाला ाहे, त्यामध्यें मि. डब्ल्यू जे. जेंकिन्स यांनीं आपल्या लेखांत ेडेगांवांच्या उन्नतीसाठी सर कस्तूर वाडिया ह्यांनीं निर्माण केलेल्या ्रस्ट फंड व त्यांतून दुष्काळी भागांतील शेती सुधारण्याची चालविलेली खटपट ह्यांची माहिती दिली आहे. शेतीच्या धंद्यांत ाास्त्रीय ज्ञानावर आधारलेल्या सुधारणा घडवून आणणें, शेत-ऱ्यांची सहकारी तत्त्वावर संघटना करणें व देशांतील सामाजिक जीवनाची घडी नीट बसविणें, ह्या तीन गोष्टी शेतकऱ्यांच्या उद्धारासाठीं अत्यंत आवश्यक आहेत, असें त्यांनीं नमूद केलें आहे. श्री. एन्. पी. भागवत ह्यांनीं आपल्या लेखांत, कंझूमर्स ोसायट्यांची वाढ पुनः होऊं लागली आहे त्यासंबंधीं माहिती दिली आहे. व्यापारी वर्गानें सहकारी चळवळीशीं विशेषतः मालाच्या सहकारी तत्त्वावर विक्री करणाऱ्या संस्थाशीं, सहकार्य करून हिंदी आर्थिक प्रगतीस हातभार लावावा, असें श्री. आर. जे. देसाई ह्यांनीं सुचविलें आहे. कंझूमर्स स्टोर्सची प्रगति आणखी सपाट्यानें होणें इष्ट आहे.सहकारी चळवळीचा हा भाग हिंदुस्थानांत ार मागें पडलेला आहे, असें श्री. गिरधरलाल मेहता ह्यांनीं आपल्या लेखांत सांगितलें आहे. थकबाकी ठेवणाऱ्या कर्जदारास जामीन होणाराहि थकबाकीदारच समजावयाचा कीं काय, ह्या प्रश्नाचा ऊहापोह श्री. के. बी. गजेंद्रगडकर ह्यांनीं आपल्या लेखांत केला आहे. उद्योगधंद्यांची सहकारी तत्त्वावर संघटना करून चीन देश जपानी आक्रमणास कसें तोंड देत आहे ह्याची माहिती श्री. ी. वा. काळे ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे. नेहमींचीं उपयुक्त सदरें अंकांत आहेतच.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी**: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा**: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा**: अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स**: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स**: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बॅंक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.


---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ५,८०,७५० |
| वसुल झालेलें भांडवल | : रु. २,९०,३७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४५,००,००० |

### डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. मा. म. गुते |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रावडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

G. L. HALBE,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

### शेती-सुधारणा

शेतीच्या सुधारणेचें काम एवढें विस्तृत आहे कीं तें विविध बाबतींत पद्धतशीरपणानें व चिकाटीनें केल्यावांचून फलद्रूप होणें शक्य नाहीं. त्या कार्याचें स्वरूप काय आहे आणि त्याची प्रगति कशी होत आहे ह्याची कल्पना मुंबई प्रांताच्या खेडगांव सुधारणा खात्याच्या १९४१-४२ सालच्या वृत्तांतावरून दिसून येतें. चांगल्या जातीच्या बियाची वाण शेतकऱ्यांस नेहमी भासत असते आणि ती भागवण्याच्या हेतूनें सुधारणा खात्यानें निरनिराळ्या भागांत योग्य असलेलें बीं तयार करून तें शेतकऱ्यांस पुरवणें हें कार्य व्यवस्थित रीतीनें व योजनात्मक पद्धतीनें वाढत्या प्रमाणांत चालविलें आहे. ह्याशिवाय शेतकऱ्यांस नेहमी महाग पडणारें सुधारलेलें बींहि पुरवलें जात आहे. उदाहरणार्थ, सिमल्याहून बटाट्याचें उंची बियाणें आणवून त्याचे ८८ हजार पौंड नाशिक जिल्ह्यांत पुरवले गेले. त्याचप्रमाणें कानरा जिल्ह्यांत उसाचें व विजापूर जिल्ह्यांत सरकीचें बीं पुरवण्यांत आलें. पावसाच्या पाण्यानें शेतजमीन वहात जाते त्या नाशास आळा घालण्याच्या प्रयत्नांस यश येत चाललें आहे. वृत्तांताच्या सालीं सुमारें १४ लक्ष फूट लांबीचे बांध त्यासाठी घालण्यांत आले आणि त्यायोगें २५ हजार एकर जमिनीचें रक्षण झालें आहे. सुधारलेल्या आउतांचा उपयोग, गुरांची सुधारणा, इत्यादि बाबतींतहि प्रगति चालू आहे. बिनपतीच्या ( कर्जाऊ रकमा देण्याशीं संबंध नसलेल्या ) शेती सहकारी सोसायट्यांची संख्या ३३१ ची ३५२ झाली आहे. सहकारी विक्री सोसायट्या ८९ च्या ९९ झाल्या आहेत. सुरत आणि धारवाड येथील कपास विक्रीच्या सहकारी संस्थांनीं अनुक्रमें करून २४½ व २४ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. खेडेगांवी धंद्यांसाठी, विशेषतः विणकरांसाठी स्थापलेल्या सोसायट्यांचीहि बरीच प्रगति झाली.

---

### साखरेची नियंत्रित किंमत वाढली

उसाच्या किंमतींत व कारखाना चालविण्याच्या खर्चांत वाढ आणि युद्धविषयक विम्याचा बोजा ह्या कारणांमुळें हिंदुस्थान सरकारनें ठरवून दिलेली साखरेची किंमत कारखान्यांस अपुरी पडते, असें गाऱ्हाणें साखर कारखानदारांनीं सरकारपुढें मांडलें होतें. सरकारनें त्यांतील प्रश्नांचा विचार करून, साखरेची विक्रीची किंमत वाढविण्याचें ठरविलें आहे. साखरेचे कारखादारांस मिळावयाची नियंत्रित किंमत दर मणास ( ८२$\frac{२}{७}$ पौंड ) २ रु. ५ आ. ह्याप्रमाणें आतां वाढविण्यांत आली आहे. म्हणजे, ११ रु. ११ आ. ह्या पूर्वीच्या किंमतीऐवजीं ती आतां १४ रु. झाली आहे. किंमतीच्या वरील वाढीस अनुसरून मुंबई प्रांतांतील साखर कारखानदारांस प्रत्येक मणास आतां १२ रुपयांऐवजीं १४ रु. आ. ५ मिळूं लागतील व गिऱ्हाइकांस दाणेदार साखऱ्यास दर शेरास ६¾ आणे व इतर साखऱ्यास ६¼ आणे किंमत पडेल.

---

### स्वस्त कापड काढण्यासाठी हातमागांचा उपयोग

गरिबांसाठी स्वस्त कापड उपलब्ध करून देण्याची योजना हिंदुस्थान सरकारनें आखली आहे. त्या योजनेस अनुसरून धोतरें, शर्टिंग व साड्या अगदीं योग्य किंमतीस मिळूं लागतील. मुंबई प्रांतानें ह्या योजनेस अनुसरून २४ लक्ष वार कापडाची ऑर्डर दिलेली आहे. मद्रास प्रांतांतील विणकऱ्यांस ही योजना बाधक होईल हें लक्षांत घेऊन त्या प्रांताच्या सरकारनें हिंदुस्थान सरकारच्या योजनेंत सामील न होण्याचें ठरविलें आहे. विणकऱ्यांस सूत देऊन त्यांचेकडून पुरेसें कापड काढवून घेण्याची आपली स्वतःची योजना मद्रास सरकारनें आखली आहे व कांहीं गिरण्यांनीं आवश्यक सूत काढण्यास प्रारंभहि केला आहे, असें समजतें.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल् बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द्. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

### ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

५२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख २७ जानेवारी १९४३ अंक ४

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें १.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें.

## कायद्याचीं मराठी पुस्तकें

१ इन्कम् टॅक्स कायदा (सुधारणांसह) किं. १॥ रु.
२ कर्ज देण्याघेण्याबाबत कायदा किं. २ रु.
३ मृत्युपत्राचा कायदा किं. १। रु.
४ हिंदु स्त्रीधनाचा कायदा किं. १२ आ.
५ विवाहाचा कायदा किं. १२ आ.

याशिवाय मराठी मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या "न्याय बोध" मासिकाचे वर्गणीदार व्हा. वा. व. ५ रु. नमुना अंक मागवा.

—न्यायबोध-ऑफिस, महाल, नागपूर शहर


## विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. १० पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. १० पै इतका पडला.

### करमणुकीवर नियंत्रण

काटकसरीस उत्तेजन देण्याचे हेतूनें जर्मनींत सिनेमा व थिएटरें ह्यांच्यावर नियंत्रण बसविण्यांत येणार आहे. लोकांना करमणुकी-चीं रेशन कार्डें देण्यांत येतील, तीं देऊन त्यांना प्रत्येक आठव-ड्यांत दोन चित्रपट अथवा थिएटरमधील एक खेळ एवढ्यांसच जातां येईल.

### दुय्यम नाणीं

पै ते अधेली ह्या आठ वेगवेगळ्या किंमतीच्या दुय्यम नाण्यांचे ऐवजी अर्धा आणा, आणेली, पावली व अधेली अशीं तीन-चारच दुय्यम नाणीं असावींत, अशी सूचना महाराष्ट्र चेंबरनें हिंदुस्थान सरकारास केली आहे.

### प्रिन्सेस ज्यूलिआनास कन्यारत्न झालें

प्रिन्सिस ज्यूलिआना प्रसूत होऊन तिला कन्यारत्न झालें; तिचीं पहिलीं दोन अपत्येंहि कन्याच आहेत. १५५३ सालापासून आतां-पर्यंत ह्या घराण्यांत फक्त १५ च पुत्र जन्मास आलेले आहेत व नेदरलंडवर गेलीं ५० वर्षें स्त्रियांचेंच राज्य आहे.

### पुराची चौकशी

उत्तर सिंधमधील सिंधू नदीच्या पुरांचीं कारणें शोधून काढ-ण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत येणार आहे, तिचे अध्यक्ष एक हायकोर्ट जज्ज रहातील. दोन तज्ज्ञ सभासद म्हणून मि. एटकिन व मि. टेलर ह्यांची नेमणूक होईल. हे दोघेहि सिंधमध्यें इंजिनियर म्हणून कामावर होते व दोघेहि आतां दोन प्रांतांचे मुख्य एंजिनियर आहेत.

### पूर आवरण्यासाठी लष्करी कुमक

सिंधू नदीस पुन्हा पूर आला आहे, तो १॥ महिन्यांत आटो-क्यांत आला नाहीं, तर गेल्या वर्षाच्या दुस्थितीची पुनरावृत्ति होण्याची भीति आहे. फुटलेले बांध दुरुस्त करण्यास लागणारे मजूर पुरेशा प्रमाणांत मिळत नसल्याकारणानें, सिंध सरकारनें लष्करी कामगार त्यासाठी मिळविण्याचा प्रयत्न चालविला आहे.

### द. आफ्रिकेच्या फौजा

दक्षिण आफ्रिकेची फौज आफ्रिका खंडाचे बाहेर युद्धासाठी नेण्याची परवानगी देणारा एक ठराव तेथील असेंब्लीमध्यें फील्ड मार्शल स्मट्स हे मांडणार आहेत.

### शिशुसंगोपनगृहें

युद्धपरिस्थितीमुळें अनेक माता युद्धकार्यांत गुंतल्या आहेत आणि त्यांच्या बालकांच्या संगोपनाची व्यवस्था करण्याची जबा-बदारी इंग्लंडमध्यें तेथील सरकारास घ्यावी लागली आहे. दिवसा माता कामावर गेल्या असतां त्यांच्या बालकांसाठी ७५० संगोपन गृहें चालवण्यांत येत आहेत. आणखी असलीं ७०० गृहें तयार केलीं जात आहेत. शिशुसंगोपनाचें शिक्षण घेतलेल्या पगारदार सेविकांस त्यांमध्यें कामावर नेमण्यांत येतें.

### पोलंडमध्यें सक्तीचें संततिनियमन

जर्मनीमध्यें लोकसंख्या वाढवण्यासाठी नात्सी राज्यकर्ते विवाहांस आणि संततिविस्तारास उत्तेजन देत आहेत. त्याच-बरोबर पोलिश राष्ट्राचें निर्मूलन करण्याच्या उद्देशानें ते सक्तीनें संततिनियंत्रण करीत आहेत. अठ्ठावीस वर्षांच्या आंतील पुरुष आणि पंचवीस वर्षांच्या खालील स्त्रियांस विवाहबद्ध होण्याची मनाई करण्यांत आली आहे. अविवाहित मातांस तुरुंगांत पाठ-वण्यांत येतें.

### कागदाचें दुर्भिक्ष्य

हिंदुस्थानांत युद्धापूर्वी दरसाल २ लक्ष टन कागद खपत असे. त्यापैकी हिंदी गिरण्यांचें उत्पादन १ लक्ष टनहि नाहीं व आतां ४० हजार टनांपेक्षा ज्यास्त कागद बाहेरून येण्याजोगा नाहीं. युद्धापूर्वी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस मिळून सालिना २५ हजार टन कागद लागत असे; आतांची त्यांची मागणी ९० हजार टनांची आहे. सरकारनें हिंदी गिरण्यांचा कागद प्राधान्येंकरून स्वतःसाठी राखून टेवल्यानंतर, सर्वसामान्य जनतेस तिच्या मामुली गरजेच्या ६% इतकाच कागद मिळण्याजोगा आहे.

### मालाचा युद्धविषयक विमा-दुसऱ्या वर्षाचे हिशेब

मालाच्या युद्धविषयक विम्यासंबंधीचे ३० सप्टेंबर १९४२ अखेरच्या वर्षाचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें, कीं त्यावर्षी विम्याच्या हप्त्यांचे स्वरूपांत २ कोटि, ९१$\frac{3}{4}$ लक्ष रुपये जमा झाले. त्यापूर्वीच्या वर्षाची जमा धरून एकूण जमा ३ कोटि, ९७ लक्ष रुपये झाली. क्लेमच्या स्वरूपांत कांहींहि रकम द्यावी लागली नाहीं. सरकारी व्यवस्थेचा व इतर सर्व वजा जातां सप्टेंबर अखेर फंडांत ३ कोटि, ९० लक्ष रुपये शिल्लक आहेत.

### युनिव्हर्सल टॅनिंग कं. लि.

वरील नांवाची विमा कंपनी श्री. डी. एम्. शिंदे ह्यांनीं मुंबई येथें रजिस्टर केली आहे.

### बडोदें संस्थानांतील लिमिटेड कंपन्या

१९४०–४१ मध्यें बडोदें संस्थानांत १५० लिमिटेड कंपन्या होत्या, त्यांपैकी १३२ पब्लिक व १८ खाजगी होत्या. ह्यांपैकी ८७ कंपन्या प्रत्यक्ष बडोद्यांतच नोंदलेल्या होत्या. बडोद्यांत नोंदलेल्या कंपन्यांपैकी २३ कापडाच्या गिरण्यांच्या, ९ रासाय-निक धंद्याच्या व ४ आयुर्विम्याच्या होत्या. बाहेरील कंपन्यां-पैकी ५१ विम्याच्या होत्या. १९४०–४१ मध्यें बडोद्यांत १४ नव्या कंपन्या नोंदल्या गेल्या.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २६ |
| २ धान्य-पुरवठ्याची कार्यक्षम व्यवस्था ... | २७ |
| ३ सहकारविषयक प्रश्नांची चर्चा ... ... | २७ |
| ४ सर जनार्दन मदन ह्यांचा संदेश ... ... | २८ |
| ५ लँड मॉर्गेज बँकांस सरकारी मदत... ... | २८ |
| ६ स्फुट विचार ... | २९ |
| विजापूर जिल्ह्यांत दुष्काळ—एक पैशाचें नवें नाणें—हिंदी खेडेगांवें आणि सहकारी संस्था—संस्था यशस्वी कशा होतील! | |
| ७ इन्स्टिट्यूटचें चालू कार्य | ३० |
| ८ गव्हाचा अधिक पुरवठा होणार ... ... | ३० |
| ९ कागद वांचवा ... | ३१ |
| १० इरिगेशन खात्याचा वृत्तांत | ३१ |



# अर्थ

बुधवार, ता. २७ जानेवारी, १९४३


## धान्य-पुरवठ्याची कार्यक्षम व्यवस्था

अनेक कारणांमुळें सामान्य जनतेस धान्य-पुरवठा होत नसल्यानें गोरगरीब लोक व मध्यम वर्ग ह्यांची हलाखीची स्थिति झाली आहे आणि संघटित व कडक उपायांची योजना सरकारनें केल्यावांचून ह्यासंबंधांतले अवघड प्रश्न सुटणार नाहींत ह्याची खात्री आतां सर्वत्र झाली आहे. सर्व लोकांस त्यांच्या रोजच्या गरजा भागतील अशा बेतानें धान्य मिळालें पाहिजे हें निर्विवाद आहे. प्रत्येक कुटुंबाच्या किमान गरजेप्रमाणें त्यास धान्य मिळावयाचें म्हणजे मालाच्या पुरवठ्याची योग्य व संघटित वाटणी केली जाणें क्रमप्राप्त आहे. आतांपर्यंत या बाबतींत योजले गेलेले उपाय एकांगी व तुटक झाले आणि त्याकारणानें त्यांपासून इष्ट फलप्राप्ती झाली नाहीं असें आतां अनुभवास आलें आहे. धान्यांच्या किंमती ठरवून देणें, ठराविक भावापेक्षा अधिक महागाईनें माल विकण्यास बंदी करणें, धान्याच्या ने-आणीवर नियंत्रण घालणें इत्यादि मार्गांचा अवलंब आतांपर्यंत झालेला आहे. पण धान्य-पुरवठाच तोकडा असल्यास त्याची समाधानकारक वाटणी होऊंच शकत नाहीं ही गोष्ट सरकारच्या नजरेस आणली गेली होती, तथापि तिच्या संबंधांत निश्चित उपाययोजना झाली नव्हती. आतां ह्याबाबतींतहि प्रयत्न होत आहेत.

बाहेरून धान्य आणून स्थानिक पुरवठ्यांत त्याची भर टाकणें ही जशी महत्त्वाची बाब आहे तशीच, व्यापारी व श्रीमान लोक ह्यांच्या जवळील धान्याचा साठा उजेडांत आणून तो लोकांस करून यावयाच्या वाटणींत उपयोगी पडेल अशी व्यवस्था करणें हा आवश्यक उपाय आहे. एकीकडे कायदेशीर रीतीनें ठरवून दिलेल्या दरानें धान्य मिळण्याची गोरगरिबांस विलक्षण अडचण झाली असतां चोरट्या मार्गानें पैसेवाल्या लोकांस अधिक किंमतीनें माल सहज मिळूं शकतो असा अनुभव आल्यानें असले व्यवहार बंद झाल्यावांचून धान्य-पुरवठ्याची कोणतीहि योजना यशस्वी होणें अशक्य आहे ही गोष्ट स्पष्टच झाली. धान्य-पुरवठा अधिकाऱ्यांच्या चौकशींत कित्येक व्यापाऱ्यांनीं मालाचे मोठमोठे साठे दडपून ठेवल्याचें अलीकडे आढळून आलें आहे आणि त्यावरून चोरट्या बाजारांतील व्यवहारांची कल्पना येण्यास मदत झाली आहे.

मुंबईचे गव्हर्नर सर रोजर लम्ले दिल्लीस मुक्काम गेले होते आणि तेथें त्यांनीं ह्या प्रांतांतील धान्याच्या तुटवड्याची अडचणीची परिस्थिति मध्यवर्ती सरकाराच्या अधिकाऱ्यांचे नजरेस आणली. ह्या शिष्टाईचा थोडाबहुत इष्ट परिणाम झाला असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. पुरवठ्याचे मुख्य अधिकारी मि. गोरवाला ह्यांनीं नुकतीच अशी माहिती दिली कीं, पंजाब, सिंध आणि मध्यप्रांत ह्यांच्या सरकारांनीं चाळीस हजार टन इतकें तांदूळ व इतर धान्य मुंबई प्रांतास पुरवण्याचें कबूल केलें आहे. गव्हाचा जरूरी इतका पुरवठा अजून झालेला नाहीं. पण सुमारें दोन हजार टन गहूं मिळण्याची व्यवस्था झाली आहे असेंहि त्यांनीं सांगितलें. ऑस्ट्रेलियन गव्हाची आयात होईल तिच्यापैकीं कांहीं माल मुंबईस मिळूं शकेल असें दिसतें. ह्या रीतीनें मुंबई शहरांत धान्याचा शक्य तेवढा पुरवठा होण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्याबरोबरच त्या पुरवठ्याची वाटणी विषम होणार नाहीं ह्याविषयीं खबरदारी घेतली जात आहे. एक महिन्याच्या गरजेपेक्षा अधिक धान्य कोणत्याहि कुटुंबानें साठवूं नये असा हुकूम मुंबई शहर व उपनगर ह्यांच्या रहिवाशांस उद्देशून काढला आहे, त्याचा हेतु उघड आहे. प्रत्येकाच्या जरूरीइतकेंच धान्य त्यास मिळावें आणि खाद्य पदार्थांची वाटणी समाधानकारक रीतीनें समतेच्या तत्त्वावर व्हावी ह्यासाठीच ह्या बाबतींत नियंत्रणाची म्हणजे रॅशनिंगची व्यवस्था अमलांत आणली जाते. अशा प्रकारची योजना मुंबई शहरांत एप्रिलपासून चालू होण्याचें ठरलें आहे. पुणें शहरांतहि रॅशनिंग अमलांत यावयाचें असून, त्याची पूर्वतयारी चालू झाली आहे. शक्य तेवढें धान्य पुरवण्याची व्यवस्था सरकारनें केली पाहिजे आणि व्यापारी व जनता यांनीं त्या पुरवठ्याच्या संघटित व न्याय्य वाटणींत पूर्ण सहकार्य करणें अगत्याचें आहे.

## सहकारविषयक प्रश्नांची चर्चा

उद्योगधंदे, व्यापार, बँकिंग, चलन इत्यादि आर्थिक प्रश्नांचें विवेचन "अर्था"मध्यें येतें, त्याबरोबरच शेती, ग्रामसुधारणा व सहकारी चळवळीचें कार्य ह्यांविषयींची माहिती त्यांत देण्यांत येत असते हें आमच्या वाचकांस ठाऊकच आहे.. सहकारी संस्था व सहकारी कार्यकर्ते ह्यांस सर्वसाधारण आर्थिक विषयांची चर्चा उपयुक्त असते आणि वाटते यांत शंका नाहीं, आणि त्या दृष्टीनें पाहतां "अर्था"नें त्यांची विशेष सोयच केली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सहकार आणि तदनुषंगिक प्रश्न यांचे विषयींची माहिती सलग रीतीनें आमच्या वाचकांस उपलब्ध व्हावी ह्या हेतूनें प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या अंकांत शक्य तितकी ती एकत्रित करण्याचें आम्हीं ठरविलें असून आजच्या अंकांत ह्या योजनेस प्रारंभ झाला आहे असें दिसून येईल.सध्याच्या कागदाच्या दुर्मिळतेच्या परिस्थितींत स्वतःचें स्वतंत्र नियतकालिक मराठी भाषेत सहकारी संस्थांच्या उपयोगासाठी चालवणें प्रांतिक को-ऑपरेटिव्ह इंस्टिट्यूटला अशक्य झालें असल्याकारणानें "अर्था"चा प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्याचा अंक प्राथमिक पतपेढ्यांस देण्याचें त्या संस्थेनें ठरविलें आहे. या कामीं इंस्टिट्यूटला आणि आम्हाला सहकारी संस्था आणि कार्यकर्ते ह्यांचें पूर्ण सहाय्य मिळेल अशी आशा आहे.

## सर जनार्दन मदन ह्यांचा संदेश

मुंबई इलाख्यांतील सहकारी सोसायट्यांचा रजिस्ट्रार म्हणून सहकारी चळवळीशी असलेला माझा संबंध मीं जून, १९२६ साली अधिकारी या नात्यानें सोडला. सहकारी शिक्षण व प्रचार यांचेकरितां १३ जुलै १९१८ रोजीं स्थापन करण्यांत आलेली मुंबई सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट ही संस्था त्यावेळीं ऊर्जितावस्थेमध्यें असून अतिशय उपयुक्त कामगिरी करीत होती. तिच्या मुख्य कार्यामध्यें नियतकालिकांच्या प्रकाशनास महत्वाचें स्थान असे, आणि विशेष कौतुकाची गोष्ट अशी कीं इन्स्टिट्यूटचें इंग्रजी मुखपत्र ( मुंबई को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली ) तर त्या संस्थेच्या जन्माआधीं एक वर्षभर सुरू झालेलें होतें. त्याचप्रमाणें, जरी नोव्हेंबर १९२० सालीं इन्स्टिट्यूटचें कार्य जास्त पद्धतशीर व विस्तृत प्रमाणावर करण्याकरितां महाराष्ट्र विभाग शाखा स्थापण्यांत आली असली तरी मराठी मासिकांचें प्रकाशन ऑगस्ट १९१९ पासूनच सुरु झालें होतें.

२ प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचा लोकनियुक्त अध्यक्ष या नात्यानें प्रांतांतील सहकारी चळवळीशी माझा निकटचा संबंध नुकताच पुन्हां चालू झाला असतां मला असें दिसून आलें कीं इन्स्टिट्यूटचीं निरनिराळया मातृभाषेंतील सर्व नियतकालिकें १९३९ पासूनच बंद पडलेलीं आहेत. मराठी नियतकालिक तर त्यापूर्वींच किती तरी दिवस बंद पडलें होतें आणि त्याचे ऐवजी एखादें मासिक अगर साप्ताहिक चालू करावें अशी योजना घाटत होती.

३ गेलीं तीन वर्षें इन्स्टिट्यूट ही संस्था सुप्तावस्थेमध्यें होती. ता. १ ऑगस्ट, १९४२ रोजीं तिची जादा साधारण सभा भरून नवीन घटना मंजूर झाली व नवें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें. कार्यकारी मंडळानें ह्या संस्थेच्या कार्याचें पुनरुज्जीवन करण्याकरितां कामास उत्साहानें सुरवात केली. वार्षिक कार्यक्रमामध्यें मुख्यत्वेंकरुन प्रांतांतील तीन्ही देशी भाषांमधील मासिकें नियमितपणें सुरू करणें ही महत्वाची बाब होती व त्याकरितां जरूर ती खर्चाची रक्कम मंजूर करण्यांत आली. त्याप्रमाणें जानेवारी, १९४३ पासून सदर मासिकें निघावयाचीं होतीं, परंतु सरकारी कागद नियंत्रणाचा हुकूम निघाल्यामुळें अनपेक्षित अडचण निर्माण झाली. दुर्दैवानें सदर मासिकांचें पुनः प्रकाशन करण्यास परवानगी मिळाली नाहीं.

४ इलाख्यामध्यें सहकारी चळवळीचा प्रसार करण्याचे कामीं या मासिकांचा अतीशय उपयोग होतो. याकरितां तीं तीन्ही देशी भाषांमध्यें कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत शक्य तेवढ्या लवकर चालू करणें अत्यंत आवश्यक आहे. गेल्या कांहीं वर्षांत सहकारी चळवळीचीं किती तरी स्थित्यंतरें झालीं. त्याची कारणमीमांसा आतां करण्याचें कारण नाहीं. पण कोणासहि एवढें कबूल करावें लागेल कीं सहकारी चळवळ वृद्धिंगत होऊन पूर्णपणें कार्यक्षम व्हावयाची असेल तर त्याकरितां प्रचार कार्य आवश्यक असतें व त्यासाठी नियतकालिकांचें प्रकाशन सुरु करणें जरूरीचें आहे. त्याप्रमाणें अजूनहि तीन भाषांपैकीं दोन भाषांमध्यें मासिकें सुरु करण्याचे प्रयत्न चालू आहेत, आणि मराठी जाणणाऱ्या सहकारी बांधवांकरितां, सहकारी चळवळीचे एक प्रमुख नेते, प्रो. काळे, यांनीं आपल्या 'अर्थ' ह्या साप्ताहिकाचा दरमहा एक अंक मुख्यत्वेंकरून सहकारी चळवळीचीं माहिती व चर्चा ह्यांस वहाण्याचें कबूल केलें आहे. इन्स्टिट्यूटनें सदर अंकाच्या ७५० प्रती त्यांचेकडून घेऊन मराठी विभागांतील प्रमुख सोसायट्यांना देण्याचें ठरविलें आहे. या योजनेप्रमाणें सदर खास सहकारी अंक बुधवार ता. २७ जानेवारी १९४३ रोजीं निघत आहे. याप्रमाणें कागद नियंत्रणामुळें उपस्थित झालेली मोठी अडचण दूर करून सदर हुकुम रद्द होईपर्यंत तरी, प्रो. काळे यांनीं मोठ्या उदारपणें या संस्थेच्या मराठी मासिकाच्या प्रकाशनास जी मदत करण्याचें कबूल केलें आहे त्याबद्दल महाराष्ट्रांतील सर्व सहकारी बंधू त्यांचे आभारी होतील.

५ इन्स्टिट्यूटचें स्वतःचें स्वतंत्र मासिक निघेपर्यंत महाराष्ट्रांतील सहकारी सोसायट्यांशीं आतांपर्यंत दुरावलेला संबंध " अर्थ " द्वारां जोडण्याचा इन्स्टिट्यूट शक्य तो प्रयत्न करील.

## लँड मॉर्गेज बँकांस सरकारी मदत

सहकारी संस्थांस सरकारनें किती सहाय करावें, हा प्रश्न बराच वादग्रस्त आहे. तथापि, लँड मॉर्गेज बँकांची स्थापना व त्यांची वाढ ही मुख्यतः सरकारी मदतीनेंच झालेली आहे. ह्या बँकांस जी मध्यवर्ती प्रांतिक बँक कर्जाऊ देण्यासाठी रकम पुरविते, तिचें भांडवल मुख्यतः सरकारनें ज्यांचें मुद्दल व व्याज ह्यांची हमी घेतलेली आहे अशा डिबेंचर्सचेंच असतें. सरकारी हमीमुळेंच तीन टक्यांसारख्या अल्प व्याजाच्या दरानें प्रांतिक बँकांस पैसे मिळूं शकतात व प्राथमिक बँकांसहि अल्प व्याजानें कर्ज मिळून शेतकऱ्यांसहि स्वल्प दराच्या व्याजानें जमीन-गहाणावर रकमा मिळणें शक्य होतें. लँड मॉर्गेज बँकांनीं आपल्या स्वतःच्या पतीवर पैसे मिळविणें हें ध्येय ह्या दृष्टीनें ठीक असलें, तरी आजच्या परिस्थितींत तें शक्य नाहीं. मद्रास को. सें. लँड मार्गेज बँकेच्या वार्षिक परिषदेचे प्रसंगीं ह्या प्रश्नाची चर्चा झाली. परिषदेचे अध्यक्ष, श्री. टी. ए. रामलिंग चेट्टियर ह्यांनीं आपल्या भाषणांत सरकार हळुहळु लँड मॉर्गेज बँकांच्या सवलती कशा काढून घेत आहे, ह्याचें वर्णन केलें. बँकांची तपासणी व कर्जाच्या अर्जांची छाननी ह्याबाबतच्या सवलती सरकारनें बंद केल्यामुळें तेथील बँकांचा खर्च सहाजीकच वाढला आहे. मुंबई प्रांतांत तपासणीची जी पद्धत आहे ती मद्रास प्रांतांत चालू करावी, असें त्यांनीं सुचविलें. लँड मार्गेज बँकेच्या डिबेंचरांची सरकारी हमी कांहीं वर्षांनीं बंद करण्यांत यावी व मध्यंतरींच्या काळांत बँकेनें आपल्या पायांवर उभें राहण्याची तयारी करावी, असा मद्रास सरकारचा अभिप्राय आहे. ५ कोटीं रुपयांपेक्षां अधिक रकमेची हमी सरकारनें घेऊं नये, असें त्यास रिझर्व्ह बँकेनें सुचविलें आहे. ह्या प्रश्नाचा निकाल आजच लावून न टाकतां सरकारनें हमीसंबंधीं निदान आज निश्चित मत व्यक्त करूं नये, अशी मि. चेट्टियर ह्यांनीं आपल्या भाषणांत सूचना केली. बँकेच्या स्थापनेचा हेतु साध्य होण्यास सरकारी गॅरंटीची आवश्यकता आहे, असें ते म्हणाले. मद्रासच्या गव्हर्नरांचे सल्लागार सर जॉर्ज बोग ह्यांनीं आपल्या भाषणांत, हितसंबंधी लोकांचें मत व विशेषतः बँक आणि शेतकरी ह्यांचा सल्ला घेतल्याखेरीज सरकार आपला अखेरचा निर्णय ठरविणार नाहीं असें सांगितलें.

# स्फुट विचार

## विजापूर जिल्ह्यांत दुष्काळ

विजापूर जिल्ह्याच्या कित्येक भागांत गेलीं तीन वर्षे पाऊस-पाणी वाईट झालें असून यंदा रब्बीचें पीक सर्वस्वी बुडालें. त्या कारणानें ह्या जिल्ह्यांतील एकूण १२१३ खेड्यांपैकीं ८४५ खेड्यांत मुंबई सरकारनें दुष्काळ असल्याचें जाहीर केलें आहे आणि त्याप्रमाणें लोकांस मदत देण्यासाठीं विशेष योजना अमलांत आणली आहे. आदा प्रांतअधिकाऱ्यांची नेमणूक आणि लोकांस वाटण्यासाठीं रकमा मंजूर केल्या आहेत. दुष्काळी कामें चालू करण्यांत आलीं असून शेतीच्या बांधाकरितां अल्प दराच्या व्याजानें शेतकऱ्यांस कर्जे देण्यांत येत आहेत. दहा हजार एकरांत बांध घालण्याविषयींची एक योजना हातीं घेण्यांत येत असून तीस सरकार द्रव्य देणार आहे. पाटबंधाऱ्याचीं आणि खेडेगांवांतील पाण्याच्या पुरवठ्याचीं कामेंहि योजण्यांत येत आहेत. धान्याचा आणि गुरांच्या चाऱ्याचा पुरवठा विजापूर जिल्ह्यास होईल अशी व्यवस्था केली जात आहे. धान्य व चारा ह्यांच्या विहिरीच्या पाण्यावरील पिकांस खास उत्तेजन देण्यासाठीं सरकारनें उत्तेजन व द्रव्यसहाय्य देण्याचें ठरविलें आहे. ह्या प्रकारच्या दुष्काळनिवारणाच्या सरकारच्या योजनांबरोबर संघटित बिनसरकारी मदतीची आवश्यकता आहे हें सांगण्यास नको. ह्या उद्देशानें फंड उभारला जात असून त्यांतून अनाथ व गरजू लोकांच्या दुःखनिवारणाची व्यवस्था होत आहे. त्या फंडास उदार आणि धार्मिक बुद्धीच्या व धनिक नागरिकांनीं सहाय्य देणें अगत्याचें आहे.

## एक पैशाचें नवें नाणें

हलक्या नाण्यांची टंचाई अलीकडे हिंदुस्थानांत सर्वत्र भासत आली आहे, तीमध्यें एक पैशाच्या नाण्याचा तुटवडा विशेषच जाणवला आहे. युद्धपरिस्थितींत सर्वत्र चलनाचा खप देशांत वाढणें स्वाभाविक आहे. चलनी नोटांचें प्रमाण सारखें वाढत आलें आहे आणि त्याच्या मोडीस वाढती मागणी व्यवहारांत आल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. पण त्यांतल्या त्यांत पैशाच्या नाण्याचा तुटवडा झालेला दिसत आहे त्याचें कारण त्यांतील धातूची किंमत वाढून ती एक पैशापेक्षा अधिक होईल ह्या कल्पनेनें नफेबाज लोकांनीं त्याचा केलेला संग्रह हें आहे. हलक्या नाण्यांचे बेकायदा साठे अलीकडे अनेक ठिकाणीं उघडकीस आले आहेत. त्यांतला हेतु नफेबाजीच होय. पैशाच्या नाण्यांच्या दुर्मिळतेवर सरकारनें आतां तोड काढली आहे ती आपल्या टांकसाळींत हलक्या किंमतीचीं व निराळ्या स्वरूपाचीं नवीन नाणीं पाडणें ही होय. ह्या नव्या पैशांत कमी धातू घालण्यांत आली असल्यानें ती वितळवून त्यांचा शुद्ध तांबें म्हणून उपयोग करणारांस कांहींच फायदा होण्यासारखा नाहीं. दुय्यम नाण्यांची अंगची किंमत त्यांच्या दर्शनी किंमतीपेक्षा नेहमींच कमी ठेवण्यांत येते. विशिष्ट परिस्थितींत धातू महागल्यामुळें ह्या नियमास अपवाद होऊं लागल्यास ह्या चलनाची धातुमय किंमत आणखी कमी करणें हाच उपाय आहे. हिंदी दुय्यम नाणीं वितळण्यांत फायदा आहे ही कल्पना भ्रामक आहे असें सरकारनें जाहीर केलें आहे हें त्यासाठींच होय. युद्धपरिस्थिति लक्षांत घेऊन सरकारनें दुय्यम नाण्यांचा पुरवठा लोकांच्या रोजच्या गरजा भागण्यास पुरेसा मिळेल ह्याविषयीं जागरूक राहणें अगत्याचें आहे.

## हिंदी खेडेंगांवें आणि सहकारी संस्था

हिंदुस्थानांतील शेतकरी वर्गाच्या विशिष्ट परिस्थितींत सहकारी चळवळ यशस्वी झालेली नाहीं, ह्यांत आश्चर्य नाहीं; कारण, येथील एकंदर आर्थिक वातावरणच यशास प्रतिकूल आहे असें मत कित्येक हिंदी अर्थशास्त्रज्ञ प्रकट करतांना आढळतात. जगांतील सर्व देशांत लहान शेतकरी, कारागीर व कामगार ह्यांनीं सहकारी संघटनेचा आश्रय करून स्वतःची उन्नति घडवून आणली आहे असा अनुभव असतां हिंदुस्थानांत विपरीत परिस्थिति कां असावी हा प्रश्न येथें उपस्थित होतो. त्यासंबंधांत शिकलेल्या व विद्वान लोकांत माहितीचा अभाव, गैरसमज व चुकीच्या कल्पनाहि पसरलेल्या दिसतात. त्यांचें निराकरण करून हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचें सत्य स्वरूप श्री. वैकुंठराय मेथा यांनीं "इंडिअन जर्नल ऑफ सोशल वर्क" या नियतकालिकाच्या डिसेंबरच्या अंकांत उत्कृष्ट रीतीनें पुढें मांडलें आहे. त्यांच्या सदरहु लेखाचा सारांश खाली दिला आहे:— "हिंदी सहकारी संस्थांचा विचार करतां शेती पतपेढ्यांकडेच लक्ष पुरवून चालणार नाहीं. मुंबई प्रांतांत कपास व गूळ यांच्या विक्रीच्या संस्था, जमिनीचे तुकडे एकत्र करणाऱ्या पंजाबांतल्या सोसायट्या, संयुक्त प्रांतांतील उसाच्या पुरवठ्याबाबतच्या संस्था, बंगालमधील पाणीपुरवठ्याच्या सोसायट्या ह्यासारख्या संघटनेच्या प्रगतीकडेहि पाहणें अगत्याचें आहे. पतपेढ्यांस यावें तसें यश आलेलें नाहीं, त्याचीं कारणें ध्यानांत घेणें आवश्यक आहे."

## संस्था यशस्वी कशा होतील ?

"पतपेढ्यांच्या सभासदांत स्वावलंबन व जबाबदारीची जाणीव उत्पन्न होईल अशी परिस्थिति निर्माण करण्यांत आली नाहीं आणि त्यांच्यामधून उत्साही व कार्यक्षम पुढारी बाहेर आलेले नाहींत. खेडेगांवांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं सरकारनें विशेष प्रयत्न केले नाहींत. त्यामुळें मंदीच्या योगानें शेतीच्या धंदास लागलेला धक्का सहकारी चळवळीस विघातक झाला आहे. हिंदी शेतीमध्येंच जर फायदा रहात नाहीं तर त्यास सहकारी चळवळ कितीशी मदत करूं शकणार ह्याचा विचार होणें इष्ट आहे. ह्यासाठीं ग्रामसुधारणेचें कार्य जोरानें व विस्तृत प्रमाणांत चालविलें गेलें पाहिजे. पतपेढ्यांच्या सभासदांस सहकाराचें व धंद्याचें शिक्षण दिलें जाणें आवश्यक आहे. सहकारी संस्था त्यांच्या चालकांस स्वतंत्रपणानें आणि स्वतःच्या जबाबदारीनें चालवितां आल्या पाहिजेत. त्या संस्था सरकारी सहकारी खात्याचा एक भागच आहेत, ही सामान्य लोकांची कल्पना दूर होईल अशा रीतीनें त्या खात्यानें आपलें धोरण ठेवलें पाहिजे. कर्जाव्यतिरिक्त आपल्या इतर गरजा भागविण्याची व्यवस्था सहकारी संघटनेनें करण्याची तजवीज शेतकऱ्यांस करून मिळेल तसतसें सहकारी चळवळीचें स्वरूप बदलून तें अधिक फलदायी व श्रेयस्कर होईल. मालाची खरेदी-विक्री, संयुक्त शेती, खेडेगांवी धंदे इत्यादि दिशांनीं हिंदी सहकारी चळवळीचा विकास करतां येण्यासारखा आहे. ही चळवळ सध्यां सदोष आहे, त्यावरून सहकाराचें तत्त्व येथील परिस्थितीस मुळांतच गैरलागू आहे असा सिद्धांत काढणें चुकीचें आहे. दोष दूर करून सुधारणेचें कार्य उत्साहानें हातीं घेणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे."

## इन्स्टिट्यूटचें चालू कार्य

'अर्था'च्या दिवाळी अंकांत लिहिल्याप्रमाणें इन्स्टिट्यूटची नवीन घटना मंजूर झाल्यावर १ ऑगस्ट १९४२ रोजीं त्याची विशेष साधारण सभा भरविण्यांत आली. ह्या सभेंत सरकारनें सुचविलेल्या पोटनियमांतील दुरुस्त्या मंजूर करण्यांत आल्या व नवीन एक्झिक्युटिव्ह कमिटीची निवडणूक करण्यांत आली. ह्या कमिटीची पहिली सभा २६ ऑगस्ट रोजीं झाली व सर जनार्दन मदन व श्री. वैकुंठराय मेहता ह्यांना अनुक्रमें अध्यक्ष व ऑनररी सेक्रेटरी म्हणून निवडण्यांत आलें. कमिटीनें चालू वर्षाचा कार्यक्रम आंखला व त्या दिशेनें अंदाजपत्रक तयार केलें. कार्यक्रमापैकीं आजपर्यंत झालेल्या कार्याचा गोषवारा प्रस्तुत लेखांत देत आहों.

### शिक्षण कमिट्या

सरकारी ठरावांत इन्स्टिट्यूटनें शिक्षणाचें कार्य जिल्हा-युनिअन्स संघांच्या शिक्षण-कमिट्यांमार्फत चालवावें असें म्हटलें आहे. परंतु अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, कुलाबा व रत्नागिरी ह्या पांच जिल्ह्यांत युनिअन्स संघ नसल्यामुळें त्यांचेसाठीं स्वतंत्र शिक्षण कमिट्या इन्स्टिट्यूटनें स्थापन कराव्या असें रजिस्ट्रार साहेबांकडून सुचविण्यांत आलें. ह्या शिक्षण-कमिट्यांची घटना एक्झिक्युटिव्ह कमिटीनें तयार करून सरकारकडे पाठविली आहे व तिला लौकरच मान्यता मिळेल अशी अपेक्षा आहे. मुंबई शहरासाठीं अशा प्रकारच्या शिक्षण-कमिटीची घटना तयार करण्यांत आली व ती १४ नोव्हेंबर १९४२ रोजीं मुंबईंतील सोसायट्यांच्या व इन्स्टिट्यूटच्या व्यक्तिशः सभासदांच्या सभेंत स्वीकृत करण्यांत आली.

### सहकारी मासिकें

स्थगित झालेली मराठी, गुजराथी व कानडी सहकारी मासिकें ज्यानुआरी १९४३ पासून सुरू करावीं असें ठरलें. परंतु पेपर कंट्रोल ऑर्डरप्रमाणें नवीन मासिकें काढण्यास सरकारची परवानगी लागते ती न मिळाल्यामुळें हा कार्यक्रम हातीं घेतां आला नाहीं. मराठी वाचकांसाठीं प्रो. काळे ह्यांनीं दर महिन्यास "अर्था"चा शेवटच्या आठवड्याचा अंक "सहकार" विषयासाठीं प्राधान्येंकरून राखून ठेवण्याचें कबूल केल्यामुळें सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांची थोडीफार सोय झाली आहे. अशा प्रकारचा हा "अर्था"चा पहिला अंक आहे.

### सहकार दिन

१९४१ सालीं सहकार-दिन रजिस्ट्रारच्या आदेशानुसार सर्व इलाख्यांत साजरा करण्यांत आला. चालू सालीं इन्स्टिट्यूटचा गाडा पुन्हा मार्गाला लागल्यामुळें इन्स्टिट्यूटनें हा दिन साजरा करावा अशी रजिस्ट्रारकडून सूचना आली. त्याप्रमाणें मुंबईत सहकार-दिन दिवाण बहादुर एच. एल. काजी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं १४ नोव्हेंबर, १९४२ रोजीं साजरा करण्यांत आला. इतर ठिकाणीं सेंट्रल बँका व युनिअन्स संघ ह्यांनीं इन्स्टिट्यूटच्या विनंतीवरून हा दिन साजरा केला.

### शिक्षण वर्ग

सहकारी शिक्षण हें नव्या घटनेप्रमाणें इन्स्टिट्यूटचें मुख्य शिक्षण कार्य असल्यामुळें चालू सालाकरितां शिक्षणवर्गाची योजना एक्झिक्युटिव्ह कमिटीनें मुकर केली. त्या योजनेप्रमाणें हल्ली मुंबईंत अर्बन बँकांच्या नोकरवर्गासाठीं एक महिन्याचा शिक्षणवर्ग चालू आहे. सदर वर्गाचें उद्घाटन इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष सर जनार्दन मदन ह्यांच्या हस्तें २५ ज्यानुआरी रोजीं झालें. इतर प्रकारच्या शिक्षणवर्गासंबंधीं सहकारी खात्याबरोबर पत्रव्यवहार चालू आहे.

### संशोधन मंडळ

सहकारी चळवळींत वेळोवेळीं उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांसंबंधीं संशोधन करणें ह्या बाबीचा इन्स्टिट्यूटच्या उद्देशांतच समावेश करण्यांत आल्यामुळें इन्स्टिट्यूटनें हें कार्य पुढेंमागें हातीं घेतलेंच असतें. परंतु नवीन घटना अमलांत आल्याबरोबरच त्यास रजिस्ट्रारकडून चालना मिळाली. रिझर्व बँकेच्या सूचनेप्रमाणें संशोधनाचें कार्य व्यवस्थितपणें चालण्यासाठीं संशोधन मंडळ स्थापन करणें इन्स्टिट्यूटला शक्य होईल काय अशी पृच्छा करण्यांत आल्यावरून इन्स्टिट्यूटनें ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं, प्रो. काळे, दिवाण बहादुर काजी व प्रो. धनंजयराव गाडगीळ ह्यांची कमिटी नेमली.

### साधारण सभा

इन्स्टिट्यूटची साधारण सभा २८ डिसेंबर १९४२ रोजीं भरविण्यांत आली. चालू सालचे रिपोर्ट व हिशेब व चालू सालचें अंदाजपत्रक मंजूर करण्यांत आल्यावर, पोटनियमांसंबंधीं कांहीं जुजबी दुरुस्त्या मंजूर करण्यांत आल्या.

---

### गव्हाचा अधिक पुरवठा होणार

धान्याची टंचाई आज सर्व हिंदुस्थानभर भासत आहे. त्यांत तांदुळाचा पुरवठा वाढविणें शक्य नसल्यानें त्याची व्यवस्थित वांटणी अपरिहार्य मर्यादेमध्यें व्हावी लागणार आहे. तथापि, गव्हाचा पुरवठा वाढवतां येण्यासारखा असून त्याची वाटणी समाधानकारक रीतीनें करणें शक्य आहे. त्या बाबतींत हिंदुस्थान सरकारनें नवीन एक योजना अमलांत आणली आहे. तिला अनुसरून पंजाबमधला बराचसा गहूं मुंबईसारख्या तुटवड्याच्या प्रांतांस वाटण्यांत येईल. तसेंच ऑस्ट्रेलियामधून गहूं आयात करण्याची व्यवस्था चालू आहे. हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें वाढलेल्या ह्या पुरवठ्याची देशभर वाटणी होईल आणि प्रांतिक सरकारांस त्यांचेकडून गहूं पुरवला जाईल. त्यासाठीं पूर्वी निश्चित केलेले गव्हाचे भाव आतां लागू धरले जाणार नाहींत. पण गहूं व्यापारी दडपून ठेवणार नाहीं ह्याविषयीं खबरदारी घेण्यांत येऊन त्याच्या किंमतीहि चोरट्या बाजारांतील भावाचे मानानें कमी असतील. सट्टेबाजी आणि नफेबाजी ह्यांस वाव मिळणार नाहीं अशी तरतूद त्या नव्या सरकारी योजनेंत आहे. गव्हाच्या घाऊक भावावरचें हिंदुस्थान सरकारचें नियंत्रण दूर करण्यांत आलें आहे आणि स्थानिक अधिकाऱ्यांनीं परिस्थितीचा विचार करून किंमती ठरवावयाच्या आहेत. गव्हाच्या पुरवठ्याच्या नवीन योजनेचा एकूण धान्याच्या परिस्थितीवर अनुकूल परिणाम होईल अशी अपेक्षा आहे.

---

### रेल्वेवर काम करणाऱ्या ब्रिटिश स्त्रिया

इंग्लंडमध्यें रेल्वेवर काम करणारांची संख्या पांच लक्ष आहे. त्यांपैकीं पन्नास हजार स्त्रिया आहेत. रेल्वे नोकर युद्धकामगिरीवर गेल्याकारणानें त्यांची जागा स्त्रियांनीं घेतली आहे आणि त्या हमालांचीं अवजड कामेंहि करतात.

## कागद वांचवा

( ले.–श्री. श्रीधर हरी दातार, ए. सी. आर. ए., डी. कॉम ,
मॅनेजर, सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., इचलकरंजी )

चालू युद्धपरिस्थितीमुळें मोठमोठ्या व्यापारी संस्था व बँका यांना कागदाचा बराच मोठा पेंच येऊन पडला आहे. त्यांत सरकारांतून लोकांचे उपयोगाकरतां मिळणारे कागदावर वरचेवर अधिकाधिक नियंत्रण बसत आहे त्यामुळें कागद कसा व कोणत्या मार्गांनीं मिळेल व मिळालेला कागद कसा व कोणत्या मार्गांनीं कमी लागेल याकडे सर्वांचें लक्ष वेधून राहिलें आहे. याकरतां कागदाच्या काटकसरीचे कांहीं मार्ग खालीं देत आहे.

१ प्रतिदिवशीं येणारे टपालांतील पाकिटें काळजीपूर्वक उघडल्यास अगर आंतील कागदास धोका पोंचणार नाहीं अशा रीतीनें अगदीं कडेला कातरून काढल्यास त्यावर पुन्हा काटकसर चिठी डकवून पुन्हा उपयोगांत आणतां येतात.

२ कच्चे हिशेब करणें वगैरेसारख्या जुजबी कारणांकरतां कागदाचा उपयोग न करतां स्लेटपाटीचा उपयोग केल्यास कागदाची बरीच बचत होईल. जरुरीचे प्रसंगीं मसुदा तयार करणेचा तो पाठकोऱ्या कागदावर करावा.

३ बँकांतील चेक, ड्राफ्ट व व्यापारी हुंड्या वगैरे बरेच ठिकाणीं भव्य आकाराचे आहेत. त्यांचा आकार कमी करून कागदाची बचत बरीच होईल.

४ ऑफिसमध्यें आंतल्या आंत विशेष महत्त्वाची व विश्वस्थ कामें वगळून इतर कामांकरितां चिठ्यांचा उपयोग न करतां ऑफिसचे शिपायाबरोबर निरोप पाठवून काम भागवावें.

५ टिप-कागदाचेऐवजीं मारवाडी पद्धतीनें वाळूचा उपयोग करावा.

६ दोन्ही बाजूनें छापलेले रहीत झालेले जुने कागद रद्दी म्हणून न विकतां त्याचे लिफाफे करून घ्यावे. पत्ता लिहिणेकरतां त्यावर जरूर तितका कोरा कागद चिकटविला तरी चालेल.

७ विशेष महत्त्वाचें व कायम स्वरूपाचें काम वगळून बाकी सर्व पत्रव्यवहाराचा मजकूर सिंगल स्पेसिंग घेऊन टाईप करावा. यामुळें बराच कागद वांचेल.

८ ज्या प्रमाणांत पत्रांतील मजकर असेल त्या मानानें कागद वापरावा. “ मिया वीतभर तर त्याची दाढी हातभर ” असें न व्हावें. दुकानदारांनीं रोकड चिठ्या लहान आकाराच्या करणें जरूर आहे.

९ बरेच फॉर्म असे असतात कीं त्यावर एकाच बाजूनें छापाई केलेली असते व दुसरी बाजू कायमचीच कोरी राहते. दोन्ही बाजूनें मजकूर छापल्यास कागद निमा लागेल.

१० शाळांतून उत्तरपत्रिका दोन्ही बाजूनें लिहिणेची विद्यार्थ्यांना परवानगी द्यावी.

११ समारंभाकरतां केलेल्या पुष्पगुच्छांना कागद वापरणें बंद करावें. तोरणे, फरारे वगैरे करतां कागद वापरूं नये.

१२ बँका व तत्सम सार्वजनिक संस्था यांचे वार्षिक हिशेबाबरोबर बरीच इतर माहिती छापली जाते. तसें न करता तपासणीदाराचे शेऱ्यासह वार्षिक हिशेब छापून प्रसिद्ध करावेत व इतर माहिती संस्थेचे हितसंबंधी यांचे माहितीकरतां ज्या त्या ऑफिसमध्यें ठेवणेंत यावी व विस्तृत अहवाल वगैरे विशेष माहिती सर्वसाधारण सभेचे वेळीं वाचणेंत यावी.

१३ कीर्द, खतावण्या वगैरे सालोसाल बदलणेची बरेच ठिकाणीं वहिवाट आहे. पुस्तकांतील सर्व कागद संपलेशिवाय नवीन पुस्तकें चालू करूं नयेत. कोणत्याहि कामाच्या टिकाऊपणाकडे व महत्त्वाकडे लक्ष देऊन त्या प्रमाणांत हलका अगर भारी कागद कामाच्या योग्यतेप्रमाणें वापरावा.

१४ वर्तमानपत्रांनीं स्थानिक महत्त्वाच्या जाहिराती वगैरे सारखा मजकूर स्थानिक वर्गणीदारांना देणेच्या प्रतींत त्यांचा निराळा भाग करून छापावा. कारण मुंबई अगर पुणें येथील सिनेमागृहांत चालणाऱ्या बोलपटाच्या जाहिरातीचा उपयोग स्थानिक महत्त्वाचा आहे. त्याचा बेळगांव अगर कोल्हापूरचे वाचकवर्गास उपयोग होत नाहीं व त्यांनीं जरी पुण्या-मुंबईस चालूं असलेल्या सिनेमाच्या जाहिराती वाचल्या तरी जाहिरात देणारासहि त्यापासून कांहीं फायदा नाहीं. कागदाचा मात्र विनाकारण व्यय होतो.

१५ किराणा व भुसार मालाचे दुकानदारांनीं शेर, आच्छेर, पावशेर व दहाभार माल मावेल अशा आकाराच्या पिशव्या तयार कराव्या. यामुळें पुढीच्या जवळ जवळ निमा कागद लागतो.

१६ इतकी काटकसर करूनहि कांहीं कागद निरुपयोगी ठरून केरांत जाणारच. तसा तो न टाकतां कागद करणारे कंपनीकडे पाठविल्यास त्याचाहि नवीन कागद करणेकडे उपयोग होतो.

---

### इरिगेशन खात्याचा वृत्तांत

मुंबई प्रांताच्या इरिगेशन खात्याचा १९४१–४२ सालविषयींचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं त्यावर्षीं डेक्कनमध्यें पाऊस चांगला झाला नाहीं आणि शेवटचे पाऊस न पडल्यामुळें रबी पिकांस तलावांतील पाणी पुरवावें लागलें. गुजराथमध्यें पाऊस चांगला पडला, पण कांहीं ठिकाणीं तो पाहिजे तसा झाला नाहीं आणि भाताच्या पिकांची परिस्थिति प्रतिकूल झाली. विजापूर व बेळगांव जिल्हे सोडले तर कर्नाटकांत पावसाचें मान चांगलें होतें. प्रांतांतील इरिगेशनच्या कामांचे दोन वर्ग आहेत. पहिल्यांत तलाव व कालवे यांचीं मोठमोठीं कामें येतात आणि त्यांच्या भांडवली व चालू उत्पन्न–खर्चाचे स्वतंत्र हिशेब ठेवले जातात. हे तलाव व कालवे मुख्यत्वें करून मध्यभागांत असून दुष्काळ निवारणाचें कार्य त्यांनीं यशस्वी रीतीनें पार पाडलें आहे. दुसऱ्या वर्गांत लहान तळीं व पाट येतात. प्रांताच्या दक्षिण भागांत हीं मुख्यत्वें करून आहेत आणि त्यांची संख्या बारा हजार आहे. नाशिक व खानदेश जिल्ह्यांत चारशे बंधारे आहेत. वर सांगितलेल्या पहिल्या वर्गांतल्या कामावर सुमारें पावणे अकरा कोटि रुपयांचें भांडवल गुंतलेलें आहे. अंदाजी वार्षिक उत्पन्न १९४१–४२ मध्यें ४८ लक्ष रुपये होतें आणि वर्षअखेर वसूल न झालेली बाकी १८ लक्ष रुपये होती. त्या कामावरचा चालू खर्च सुमारें १५ लक्ष रुपये होता.

---

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस गेल्या वर्षी, मागील शिलकी नफा धरून, एकूण ५७ लक्ष, ३९० हजार रुपये नफा झाला. भागीदारांस सबंध वर्षाचें ८% डिव्हिडंड व २% बोनस मिळेल.

# हिंदुस्थानांतील सहकारी शेती–संस्थांची प्रगति

गेल्या पसतीस वर्षांत हिंदुस्थानांतील सहकारी शेती संस्थांची प्रगति कशी होत आली; आहे हें खालील आकड्यांवरून दिसून येईल:—

| वर्षे | | सोसायट्यांची संख्या | सभासदांची संख्या |
|---|---|---|---|
| १९०६–०७ ते १९०९–१० | ची सरासरी | १,७१३ | १,०७,६४३ |
| १९१०–११ ते १९१४–१५ | ” ” | १०,८०१ | ४,५९,०९६ |
| १९१५–१६ ते १९१९–२० | ” ” | २५,८७३ | ९,०२,९३० |
| १९२०–२१ ते १९२४–२५ | ” ” | ५१,७१६ | १६,६१,०९८ |
| १९२५–२६ ते १९२९–३० | ” ” | ८३,०९३ | २७,९१,५६२ |
| १९३०–३१ ते १९३४–३५ | ” ” | ९३,१४९ | ३०,६३,६२८ |
| १९३५–३६ ते १९३९–४० | ” ” | १,०१,५०७ | ३४,३७,८७३ |
| १९४०–४१ | ” ” | १,२३,९७६ | ४४,४६,४५२ |

## जमीन गहाणाच्या सहकारी बँका

हिंदुस्थानांतील जमीन गहाणाच्या सहकारी बँकांविषयींची माहिती खाली दिली आहे:—

| प्रांत व संस्थान | संस्थांची संख्या | सभासद | एकूण भांडवल रु. |
|---|---|---|---|
| मद्रास | १२० | ६५,७१२ | ५,३६,८९,४६० |
| मुंबई | १८ | १०,५२३ | ६८,६१,५२९ |
| बंगाल | ५ | २,६२४ | ६,८३,१५३ |
| ओरिसा | १ | ४४२ | १,३६,१५३ |
| संयुक्तप्रांत | ५ | ७७५ | २,००,५८१ |
| पंजाब | १० | ३,८४३ | १२,१३,००२ |
| मध्यप्रांत व बहार | २१ | ६,३०० | १५,९२,८९४ |
| आसाम | ४ | १,७२९ | ४,०९,६२८ |
| अजमीर-मेरवारा | १२ | १,२२९ | ७१,६०६ |
| म्हैसूर | ५३ | ७,३३५ | २९,५८,८६१ |
| बडोदा | २ | २,१९३ | ८,४८,७५० |
| कोचीन | १ | २,४२५ | १७,८३,२१२ |

## प्राथमिक सोसायट्यांस पैसा कोठून मिळतो ?

| | शेती सोसायट्या | बिगर शेती सोसायट्या |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| भाग | ४,१५,३६,२३९ | ६,५८,७६,३९७ |
| रिझर्व्ह फंड | ७,२७,०४,५९१ | २,४३,०५,८८४ |
| ठेवी | | |
| सभासदांच्या | १,२२,९७,१९७ | ९,२९,०७,४२६ |
| बिगर सभासद | १,१५,३०,४३२ | ६,६०,८०,५९५ |
| सोसायट्या | ९,७८,११५ | २४,४४,९६७ |
| प्रांतिक किंवा सेंट्रल बँक | १५,३१,४१,०७५ | १,२२,०९,७८० |
| सरकार | ७ ७८,२०८ | ४७,९०,३०१ |

(Estd. in 1935)

**The Co-operators' Book Depot**

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

*Books on* :—

Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.

Books on all other subjects are also readily supplied.

Agents for the Publications of :

1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

हें पत्र पुणें, पेठ शनिवार घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' शनिवार, घ. नं. १२१।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख ३ फेब्रुवारी १९४३ | अंक ५

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें १.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महेंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## कायद्याचीं मराठी पुस्तकें

१ इन्कम् टॅक्स कायदा (सुधारणांसह) किं. १॥ रु.
२ कर्ज देण्याघेण्याबाबत कायदा किं. २ रु.
३ मृत्युपत्राचा कायदा किं. १। रु.
४ हिंदु स्त्रीधनाचा कायदा किं. १२ आ.
५ विवाहाचा कायदा किं. १२ आ.

याशिवाय मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या "न्याय बोध" मासिकाचे वर्गणीदार व्हा. वा. व. ५ रु. नमुना अंक मागवा.

—न्यायबोध-ऑफिस, महाल, नागपूर शहर


# विविध माहिती

### अमेरिकेंतील कुत्रे

अमेरिकेंतील कुत्र्यांची एकूण संख्या १ कोटि, ५३¾ लक्ष आहे. चार वर्षांखालील मुलें ज्यांच्या घरीं आहेत, अशांच्या अडीचपट लोकांनीं कुत्रे बाळगलेले आहेत.

### सरासरीनें १७४ एकरांचें प्रत्येक शेत

अमेरिकेंतील शेतीचें सरसरी क्षेत्रफळ वाढत चाललें आहे. १९३० मध्यें तें १५७एकर होतें, तें १९४० सालीं १७४ एकरांवर गेलें.

### हिंदुस्थान सरकारचा वाढता खर्च

१९४१-४२ च्या पहिल्या आठमाहींत हिंदुस्थान सरकारचा खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षा ३६⅓ कोटि रुपये ज्यास्त झाला होता. चालू वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत उत्पन्नापेक्षा खर्च ९१⅔ कोटि रुपये अधिक भरला. लष्करी खर्चाचा आकडा ५८¼ कोटीं-वरून १२०¾ कोटींवर गेला. सरकारच्या कर्जामध्यें ह्या आठ महिन्यांत २६⅔ कोटींची भर पडली.

### नाशिक म्युनिसिपॅलिटीचें नवें कर्ज

नाशिक म्युनिसिपॅलिटीनें ४½% व्याजाचें २ लक्ष रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. कर्जाची परतफेड १९७३ मध्यें होईल. कर्ज उभारल्यानंतर दहा वर्षांनीं केव्हांहि सहा महिन्यांची नोटीस देऊन कर्जफेड करण्याचा अधिकार म्युनिसिपॅलिटीस आहे.

### अमेरिकन आगबोटी

चालू वर्षी १ कोटी, ६० लक्ष टनांच्या आगबोटी बांधण्या-इतकें पोलाद अमेरिकेंत उपलब्ध आहे. म्हणजे, दररोज पांच आगबोटी तयार करतां येणें शक्य होईल.

### उत्तर आयर्लंडमध्यें अमेरिकन सैनिक

उत्तर आयर्लंडमध्यें चालू युद्धांत अमेरिकन सैनिक प्रथम उतरले, त्यास एक वर्ष झालें. त्याचा पहिला वार्षिक दिन एका स्मारक दगडाचें उद्घाटन करून साजरा करण्यांत आला. उद्घाटन समारंभ उत्तर आयर्लंडचे गव्हर्नर, ड्यूक ऑफ अॅबर-कॉर्न, ह्यांचे हस्तें झाला.

### ऑस्ट्रेलियन सैनिक

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून डिसेंबर १९४२ अखेर एकूण ५२,१४२ ऑस्ट्रेलियन सैनिक कामास आले. त्याची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| मृत | ६८२३ | युद्धकैदी | ९,०५९ |
| बेपत्ता | २३,८९२ | जखमी | २२,३७१ |

### हुबळी म्युनिसिपॅलिटीचें कर्ज

हुबळी म्युनिसिपॅलिटीनें १९७२–७३ च्या परतफेडीचें २ लक्ष रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे, त्याच्या व्याजाचा दर ४% आहे.

### लँकेशायरच्या गिरण्या

लँकेशायरमधील १०० स्पिनिंगच्या गिरण्यांचें सरासरी डिव्हिडंड गेल्या वर्षी ९.५९% पडलें. त्यापूर्वीच्या वर्षांत तें ९.८% होतें. स्पिनिंग व वीव्हिंग दोन्ही करणाऱ्या १४ गिरण्यांच्या डिव्हिडंडची सरासरी ६.७९% पडली. म्हणजे हें डिव्हिडंड त्यापूर्वी-च्या वर्षापेक्षां १.२९% कमी झालें.

### कस्टम्सचें उत्पन्न

हिंदुस्थान सरकारच्या कस्टम्सच्या उत्पन्नाचे डिसेंबर, १९४२ संबंधींतील आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, त्या महिन्यांत ३ कोटि, २६ लक्ष रुपये जमा झाले. नोव्हेंबर, १९४२ चा तत्सम आकडा २ कोटि, ५१ लक्ष रुपये होता. डिसेंबर, १९४१ मध्यें २ कोटि ९०, लक्ष रुपये जमा झाले होते. डिसेंबर, १९४२ अखेरच्या नऊ महिन्यांतील एकूण उत्पन्न २४ कोटी, ८३ लक्ष, रुपये, झालें. १९४१ च्या तत्सम मुदतींमधील उत्पन्नापेक्षां तें ६ कोटी, ५० लक्ष, रुपयांनीं कमी आहे.

### हैद्राबादमध्यें रुपयावाल्या नोटांची छपाई

हैद्राबाद संस्थानास लागणाऱ्या चलनी नोटांच्या छपाईचें काम आजवर नाशिक येथें होत असे, परंतु तेथें हैद्राबादची मागणी वक्तशीर पुरी होईना म्हणून हैद्राबाद संस्थानानें स्वतःच्या छापखान्यांत आपल्या रुपयावाल्या नोटा काढण्यास प्रारंभ केला आहे. तेथें दररोज १ लक्ष नोटा तयार होतात. मुंबईहून यावयाची यंत्रसामुग्री बसवून झाली म्हणजे उत्पादनांत १०५% ची भर पडेल.

### आमंत्रणास नकार

खाद्य पदार्थांच्या पुरवठ्याबाबत परिस्थिति सुधारल्याखेरीज कोठलेंहि जेवणाचें आमंत्रण न स्वीकारण्याचें, सिंध प्रांताचे गृहमंत्री, मि. गझदर ह्यांनीं ठरविलें आहे.

### हिंदी गव्हाची लागवड

हिंदुस्थानांतील १९४२-४३ च्या गव्हाच्या पिकाची परिस्थिति समाधानकारक आहे, असें सरकारीरीत्या प्रसिद्ध झालें आहे. गेल्या वर्षापेक्षा चालू वर्षी ५% इतकी वाढ लागवडींत झालेली आहे.

### ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च

ग्रेट ब्रिटनचा रोजचा युद्धखर्च सुमारें २१ कोटि रुपये आहे. म्हणजे, तो आतां रोजीं २ कोटींनीं वाढला आहे. चालू वर्षाच्या युद्धखर्चाचा आकडा ७३½ अब्ज रुपये भरेल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३४ | परिषदेंतील विषय–जर्मन अपयश व हानि | |
| २ बँकांच्या खर्चाची प्रमाणबद्ध आकारणी ... | ३५ | ५ हिंदी बँकिंगविषयीं ताजे आंकडे ... ... | ३७ |
| ३ चलनाचा विस्तार व घाऊक बाजारभाव... | ३६ | ६ शिक्षकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न ... ... | ३८ |
| ४ स्फुट विचार ... | ३७ | ७ मद्य ... ... ... | ३८ |
| कासाब्लँकाची परिषद्– | | ८ धान्य-पुरवठ्याचा प्रश्न | ३९ |



# अर्थ

बुधवार, ता. ३ फेब्रुवारी, १९४३


## बँकांच्या खर्चाची ठेवीदारांच्या खात्यांवर प्रमाणबद्ध आकारणी

सध्याच्या युद्धपरिस्थितींत बँकांचे व्यवस्थेचे खर्च बरेच वाढले आहेत. विशेषतः लहान बँकांना ते विशेष जाणवण्यासारखे आहेत. कर्जावरील व्याजाचे दर मात्र उतरतच चाललेले आहेत. ठेवीमध्यें वाढ होत असल्यामुळें, नफ्याचें प्रमाण उतरलें असलें तरी एकूण नफ्याचा आकडा सुधारत आहे, ही बाब उल्लेखनीय आहे. वाढत्या खर्चाचे मानापेक्षा उत्पन्नाचें मान अधिक प्रमाणांत वाढत असलें तरी खर्चाचा बोजा कमी करतां येण्याजोगा असल्यास तो अवश्य कमी केला पाहिजे. लोकांना बँकिंगची संवय लागावी व त्यांस खातें उघडण्यास प्रवृत्त करावें ह्यासाठी बँका प्रयत्न करतात. परंतु खातें ठेवण्यासाठी बँकांस येणारा खर्च प्रमाणबद्ध असेल तरच तो बँकांस परवडण्यासारखा असतो. खात्यावर अगदी थोडी रक्कम शिल्लक ठेऊन त्याची उलाढाल मात्र मोठ्या प्रमाणावर करणें, लहान लहान रकमांचे चेक काढणें, खातीं उघडून तीं लवकरच बंद करणें, इत्यादि व्यवहारांमुळें खातेदारांची सोय होत असली तरी बँकांना ते व्यवहार परवडत नाहींत. ह्याकरितांच व्याजाची रक्कम किमान कांहीं रुपये झाल्याविना बँका ती खातेदारास देत नाहींत, किमान ठेवीचें बंधन घालतात व खातें नीट चालविण्यांत आलें नाहीं तर दर सहामाहीस तें ठेवण्यासाठी खातेदाराकडून चार्ज वसूल करतात. सर्व खात्यांत मिळून शिल्लक रक्कम किती रहाते व बँकेचा खर्च त्या मानानें किती होतो हें बँकेचे अधिकारी वरचेवर तपासून पहातात, परंतु ठेवींच्या प्रत्येक खात्यानें ह्या खर्चाचा किती भाग उचलावा ह्यासंबंधीं काटेतोलपणानें हिशेब नेहमींच केलेला नसतो. व्यवस्थेचा वाढलेला खर्च व कागद आणि स्टेशनरी ह्यांचे किंमतीमध्यें झालेली भरमसाट वाढ, हीं लक्षांत घेतां बँकांनीं ठेवीदार आपलीं खातीं कशीं चालवितात व तीं बँकेच्या एकूण खर्चाचा न्याय्य बोजा उचलतात किंवा नाहीं, हें नीट पाहून त्यांत योग्य ती सुधारणा करण्याची वेळ आलेली आहे. बँकांच्या खात्यांतील वाढत्या देवघेवीमुळें होणारा वाढता खर्च भरून काढण्यासाठी त्यांवर फी कशी बसवितां येते, ह्याचा विचार येथें केला आहे.

ठराविक किमान रकमेपेक्षा सरासरीनें कमी रक्कम खात्यांत राहिली, कीं त्या खात्यावर ठराविक रकमेची फी बसविणें, हा खात्यांवरील चार्जचा अगदीं सोपा प्रकार आहे. किमान रकमेपेक्षा ठेव ज्या रकमेनें लहान असेल, त्या प्रमाणांत ही फी बसवितां येते. बँकेचा खर्च, ठेवीदारांच्या खात्यांत सरासरीनें किती रक्कम शिल्लक रहाते, ह्यापेक्षा त्या खात्यांत उलाढाल किती होते ह्यावर अवलंबून असतो व ही बाब वरील योजनेंत लक्षांत घेतलेली नसते, हें तिचेमधील वैगुण्य आहे. तें दूर करण्यासाठी, किमान सरासरी रकमेपेक्षा ठेव खालीं गेल्यावर फी घेऊन पुनः खात्याच्या उलाढालीचे प्रमाणांत आणखी फी आकारतां येते. चेक किती काढले व किती भरले ही गोष्ट ह्या योजनेंत विचारांत घेतली पाहिजे. खालील तक्त्यांत अशा योजनेचा एक नमुना उदाहरणादाखल दिला आहे:—

| मासिक किमान ठेव | मासिक किमान चार्ज | किती चेक काढण्याची मुभा | ज्यास्त काढलेल्या प्रत्येक चेकबद्दल चार्ज | वसुलीसाठी येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक चेकबद्दल आकार |
|---|---|---|---|---|
| रु. | | | | |
| १ ०ते१०० | ८ आ. | ० | ६ पैसे | ६ पैसे |
| २ १०१ते२०० | ” | ५ | ” | ” |
| ३ २०१ते३०० | ” | १० | ” | ” |
| ४ ३०१ते४०० | ” | १५ | ” | ” |
| ५ ४०१ते५०० | ” | २० | | ” |

६ ५०१ चे पुढें–प्रत्येक १०० रुपयांच्या शिलकेस ५ चेक चार्ज न घेतां काढण्यास परवानगी.

वर प्रथम उल्लेख केलेल्या फीचे पद्धतीपेक्षा ही प्रमाणबद्ध पद्धत अधिक युक्त आहे व अमेरिकेंतील बँका ह्याच पद्धतीचा मुख्यतः अवलंब करितात.

बँकेंतील प्रत्येक खातें बँकेस किफायतशीर ठरतें किंवा नाहीं, हें पाहून त्या प्रमाणांत खात्यावर फी बसविणें अगदीं शास्त्रशुद्ध असलें तरी व्यवहारांत तें किचकट ठरण्याजोगें आहे. ह्या पद्धतींत प्रत्येक खात्यांतील किती रक्कम बँकेस कर्जें, इत्यादींत गुंतवण्यासाठी उपलब्ध होण्याजोगी आहे, वसूल व्हावयाच्या चेक्सची रक्कम किती आहे, बँकेनें रोख रक्कम किती बाळगली पाहिजे, गुंतवलेल्या रकमेवर सरासरी व्याज किती सुटतें, इत्यादि बाबींचा काटेतोल विचार करून प्रत्येक खात्याबाबत बँकेस येणारा खर्च आणि खात्यामुळें बँकेस मिळणारें उत्पन्न ह्यांचा हिशेब करून बँकेला आपला चार्ज ठरवितां येणें शक्य असतें. अर्थात्, ह्या चार्जचा हिशेब करणें बरेंच गुंतागुंतीचें काम आहे. आपल्या इकडे अद्याप अशा तऱ्हेचा उपक्रम करण्यांत आलेला नाहीं. तथापि, बँकांनीं हळूहळू व्याजाचे दर उतरवून व किमान व्याजाच्या रकमेची अट घालून आपले खर्च भागविले जाण्याची थोडीफार व्यवस्था केलेली आहे. बँकांनीं सवलती वाढवाव्यात, अशी एकीकडे मागणी असतांना, वरील प्रकारचे नियम त्यांनीं करणें चमत्कारिक दिसलें, तरी तें अपरिहार्यच होणार आहे.

## परराष्ट्रीय देणीं घेणीं व हिंदी चलन

### प्री. वकील ह्यांचीं तीन भाषणें

१

### हिंदुस्थानांत ब्रिटिश कर्जे उभारा

"ऑगस्ट १९३९ मध्यें चलनाचा विस्तार १७९ कोटि रुपये इतका होता, तो आतां ६०० कोटि रुपयांवर गेला आहे. उत्पादन ह्या प्रमाणांत खास वाढलेलें नाहीं. किंमती चढल्या असून त्या आणखी चढत आहेत. रुपयाची किंमत उतरली असून ती आणखी उतरत आहे. चलनाच्या वाढीमुळें मालाच्या साठवणीस उत्तेजन मिळतें. पंजाबमध्यें व इतरत्र गहूं व इतर धान्यांचा व्यापाऱ्यांनीं केलेला साठा व मुंबई-सारख्या ठिकाणच्या नागरिकांनीं घरांतून साठवून ठेवलेलें धान्य हें त्याचेंच प्रत्यंतर आहे. कृत्रिम तुटवडा हा त्याचा परिणाम होतो, गरिबांचे हाल होतात आणि किंमतींचें व पुरवठ्याचें नियंत्रण करण्याचा प्रयत्न सरकारास सुरू करावा लागतो. नोटांचे स्वरूपांत दररोज एक कोटि रुपयांचें नवें क्रयसाधन सरकारचे हातीं येतें. ह्याचे मोबदल्यांत सरकार खरेदीचे व्यवहार करतें व जुन्या चलनांत नवें चलन मिसळून जाऊन बाजारभाव चढतात. गरीब व मध्यम वर्गांतील लोकांच्या उत्पन्नाची क्रयशक्ति कमी होते व त्यांचेवर अप्रत्यक्ष कराचा हा बोजा पडतो. ही परि-स्थिति सुधारण्याचा उपाय कोणता? सरकार जो माल विकत घेतें, त्याचे मोबदल्यांत त्यास रुपये द्यावे लागतात, परंतु सरकार ब्रिटिश सरकारचे वतीनें बरीच खरेदी करीत असल्यामुळें हिंदुस्थान सरकारचे हातीं पौंडांचें चलन येतें. त्या ऐवजीं, ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं आवश्यक तेवढा माल व सोनें हीं धाडलीं तर फारच उत्तम; परंतु हिंदुस्थानांत कर्जे उभारणें व हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचीं येणीं वर्ग करून टाकणें ह्या गोष्टी सध्याच्या परिस्थितींत शक्य होण्याजोग्या आहेत. हिंदुस्थानानें मागें इंग्लंडमध्यें माल खरेदी केला, तेव्हां इंग्लंडमध्यें कर्जे उभारून मालाची किंमत दिली होती. इंग्लंडनें अमेरिकेचें देणें देण्यासाठीं अशाच रीतीनें डॉलर्स उभे केले होते. ब्रिटिश सर-कारासाठीं हिंदुस्थानांत कर्ज उभारणें, श्रीमंतांवर जादा कर बस-विणें, किंमतींचें व मालपुरवठ्याचें कडक नियंत्रण करणें, इत्यादि बाबतींत सरकारास जनतेचें सहाय्य लागेल, हें उघड आहे."

२

### हिंदुस्थानास अनुकूल व्यापारी करार करतां येण्याचें सामर्थ्य

"हिंदुस्थानचें इंग्लंडांतील येणें युद्धास प्रारंभ झाल्यापासून वाढलें आहे. १९३८–३९ मध्यें हिंदुस्थानाचें तेथील देणें ४६९ कोटि रुपये होतें तें देऊन टाकण्यासाठी मुख्यत: या वाढत्या येण्याचा प्रथम विनियोग करण्यांत आला. रिझर्व बँकेच्या इश्यू खात्यांत पौंडांतील रोखे ठेऊन त्यांचे बदला रुपयांच्या नोटा काढणें हा त्याचा दुसरा उपयोग होय. पौंडांतील रोख्यांचे ऐवजीं रुपयां-तील रोखे निर्माण केल्यामुळें, त्यांचेवरील व्याज हिंदुस्थानांतच दिलें जाईल, हा हिंदुस्थानचा फायदा आहे. ग्रेट ब्रिटनमधील किंमतींचें मान १२२ व हिंदी किंमतींचें मान २३८ आहे; तेव्हां सध्यांचें हुंडणावळीचें व व्यापाराचें नियंत्रण ढिलें केलें तर रुप-याची पौंडांतील किंमत बरीच खालीं उतरेल, हें उघड आहे. इंग्लंडमधील किंमतींचें मान भरमसाट वाढूं न देण्यांत तेथील सर-कार यश मिळवील, असें सध्याच्या अनुभवावरून दिसतें. हिंदु-स्थानांतील सध्याचें चलनविषयक धोरण असेंच चालूं राहिलें तर किंमती वाढत जातील, रुपयाची अंतर्गत किंमत उतरेल, व इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्यांतील किंमतींच्या मानांमधील तफा-वत आणखी वाढेल. युद्धसमाप्तीनंतर नियंत्रणें काढून घेतल्या-वर, रुपयाची बाहेरील किंमत ढासळून जाईल. ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांत कर्जे उभारलीं, तर त्यास आपणांस रुपयांचे स्वरूपांत व्याज द्यावें लागेल व त्यासाठी हिंदुस्थानाकडे माल पाठवावा लागेल. हिंद–ब्रिटिश व्यापारी कराराचे वेळीं, इंग्लंडचें देणें देण्यासाठी हिंदुस्थानास आपला माल इंग्लंमध्यें पाठविणें आवश्यक असतें, ह्या गोष्टीचा फायदा इंग्लंडला आजवर मिळत गेला; ह्यापुढें ब्रिटिशांना हिंदुस्थानचें देणें देण्यासाठी माल पाठवावाच लागेल. ह्या गोष्टीचा फायदा आपणास पुढें घेतां येऊन ह्यापुढील करारांत आपणांस विशेष अनुकूल अटी मिळवितां येतील. ब्रिटिशांनीं आपलें देणें भागविण्यासाठीं योग्य त्या मार्गाचा अवलंब झाल्यास आपले फायदे कोणते, हें येथें निदर्शित केलें आहे."

३

### दिखाऊ चलती व श्रीमंती

"युद्धकाळांत सरकार हेंच प्रमुख गिऱ्हाईक असतें. कारखान-दार व व्यापारी हे सरकारचे केवळ ठेकेदार बनतात. त्यांस किंमत चांगली मिळते. खासगी रीतीनें लोकांस माल विकला, तर त्याहिपेक्षां ज्यास्त भाव मिळतो. कारखानदार व व्यापारी ह्यांस मोठा नफा मिळतो, त्यांपैकीं कांहीं भाग एक्सेस प्रॉफिट टॅक्सच्या स्वरूपांत सरकारकडे परत जातो. तथापि, श्रीमंतांची श्रीमंती वाढतच जाते. अर्थात् ही कागदी स्वरूपाचीच श्रीमंती असते, कारण रुपयाची मालांत व्यक्त होणारी किंमत उतरत गेलेली असते. युद्धविषयक बाबींवर खर्च करण्यास अधिकांत अधिक रकम मिळावी, म्हणून सरकार कर वाढवितें व काटकस-रीस उत्तेजन देतें परंतु कर व कर्जे ह्यांचेपेक्षाहि सरकारचा खर्च वाढला, तर नवीन चलन वाढवून तो खर्च भागविला जातो. हें चलन जुन्या चलनांत मिसळून जाऊन एकूण चलन वाढतें व बाजारभाव चढतात. ही प्रवृत्ति युद्ध संपेपर्यंत चालू राहिली म्हणजे नंतर एकदम प्रतिक्रिया होते, गिरण्या बंद पडतात, बाजारभाव पडतात व बेकारी माजते. सध्यांच्या काळांत कांहीं लोकांची श्रीमंती वाढत आहे, परंतु बहुसंख्य लोकांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. ही कांहीं लोकांची चलतीहि दिखाऊ स्वरूपाची आहे व त्याबाबत सबंद देशाबद्दलचें विधान करतां येत नाहीं."

---

### अमेरिकेच्या युद्धखर्चाचा बोजा

अमेरिकन सरकार सध्या जेवढा खर्च करतें, त्यांपैकीं फक्त २०% खर्च उत्पन्नांतून भागतो आणि बाकीच्या खर्चाचा बोजा कर्जाचे रूपानें पुढें ढकलण्यांत येतो. अमेरिकन सरकारचा मामुली व युद्धविषयक खर्च दररोज दर माणशी १$\frac{३}{४}$ डॉलर इतका पडतो; ग्रेटब्रिटनमध्यें तो १$\frac{१}{१०}$ डालर व कॅनडांत $\frac{१}{१०}$ डॉलर इतकाच येतो. दर माणशीं खर्चाचें प्रमाण ग्रेटब्रिटनमध्यें व कॅनडांत कमी पडत असलें, तरी त्या देशांच्या खर्चापैकीं अनु-क्रमें ४५% व ५५% भाग करांतूनच भागविला जातो; अमेरिकेंत तें प्रमाण केवळ २०% च आहे.

# स्फुट विचार

### कासाब्लँकाची परिषद

उत्तर आफ्रिकेंत कासाब्लँका येथें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल आणि त्यांचे लष्करी तज्ज्ञ यांच्या वाटाघाटी दहा दिवस चालून निरनिराळ्या समरांगणांवर अंगीकारावयाच्या युद्धधोरणाविषयीं योजना आखण्यांत आल्या. अमेरिकेचे प्रेसिडेंट स्वदेश सोडून एका मध्यवर्ती ठिकाणीं मित्र राष्ट्रांच्या प्रतिनिधींशीं युद्धचर्चा करण्यासाठीं गेले हा प्रसंग स्मरणीय गणला गेल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. कासाब्लँकाच्या परिषदेस मॉ. स्टालिन व मा. चांकायशेक हेहि उपस्थित व्हावयाचे, पण रशियांत सध्या चालू असलेल्या सोव्हिएटच्या विजयी परंतु आणीबाणीच्या लढाया आणि चीन व पश्चिम आफ्रिका ह्यांचेमधील मोठें अंतर ह्यांच्यामुळें हा योग जुळूं शकला नाहीं असें सांगण्यांत येत आहे. मित्रराष्ट्रांचे चारी पुढारी कासाब्लँका येथें एकत्र येऊं शकले असते तर ही घटना अपूर्व बनली असती ह्यांत शंका नाहीं. तरीहि प्रे. रूझव्हेल्ट व मि. चर्चिल आणि त्यांचे सल्लागार ह्यांच्या चाललेल्या वाटाघाटींचा वृत्तांत मॉ. स्टालिन ह्यांच्या कानांवर सारखा घालण्यांत येत होता असें प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून १९४३ सालीं कोठें आणि कसें युद्धधोरण अंमलांत आणावयाचें ह्या बाबतींतल्या योजनांत एकसूत्रता उत्पन्न होण्यासंबंधांत दक्षता बाळगण्यांत आली असल्याचें उघड होतें.

---

### परिषदेंतील विषय

चालू सालाच्या प्रारंभास युद्धास निर्णायक स्वरूपाचें व मित्रराष्ट्रांस अनुकूल असें वळण लागलें आहे ह्यांत शंका नाहीं. उत्तर आफ्रिकेंतील फ्रेंच वसाहतींचे बाबतींत राजकीय सत्ता व व्यवस्था ह्यांची घडी कशी बसवली जावी ह्याविषयीं समाधानकारक निर्णय करणें हा कासाब्लँकाच्या परिषदेचा एक महत्त्वाचा विषय असला पाहिजे. उत्तर आणि पश्चिम आफ्रिका ह्यांमधील मोहीम ब्रिटिशांच्या सहायानें पण अमेरिकेच्या नेतृत्वाखालीं चालू झाली आणि आजहि तशीच चालली आहे. स्वातंत्र्यवादी फ्रेंच मुत्सद्दी व सेनानी ह्यांस ह्या मोहिमेंत कोणतें स्थान असावें ह्याविषयीं मध्यंतरी बरीच अनिश्चितता होती आणि इंग्लंडमध्यें त्यासंबंधांत बरीच प्रतिकूल टीकाहि झाली होती. डिगॉल व इतर फ्रेंच पुढारी ह्यांचा समझोता स्वतां घडवून आणण्यांत कासाब्लँकाच्या परीषदेनें यश मिळवलें असलें पाहिजे आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांचीहि उत्तर आफ्रिकेच्या बाबतींत एकवाक्यता तीमध्यें झाली असली पाहिजे. रोमेल मागें हाटत हाटत टयुनिशियामध्यें येऊन पोंहोचला आहे आणि आतां तेथें चिकाटीनें युद्ध होणें अपरिहार्य आहे. आफ्रिकेमधील इटालिअन सत्ता आतां संपली असून टयुनीशियाशिवाय बाकीचा भूमध्य समुद्राचा दक्षिण किनारा मित्रराष्ट्रांच्या सत्तेखालीं आला आहे. ह्या परिस्थितीस हिटलर कसें तोंड देतो हें पहाणें आहे. पेटॉंच्या मंत्रिमंडळाचा अस्त होऊन सबंद फ्रान्स देश जर्मनीच्या हातीं आल्यानें तिकडची परिस्थिति बदलली आहे आणि तिला अनुलक्षून हिटलर कोणते डावपेंच लढवतो ह्यावर पश्चिम रणांगणावरील घडामोडी अवलंबून राहणार आहेत. तथापि युरोपमध्यें दुसरी आघाडी चालू करावयाची किंवा कसें आणि ती कोठें चालू करणें सोईस्कर आहे ह्याहि प्रश्नाचा निर्णय कासाब्लँकाच्या परिषदेंत झाला असला पाहिजे.

### जर्मन अपयश व हानि

लेनिनग्राडपासून खालीं कॉकेशसपर्यंतच्या सबंद पूर्वआघाडीवर रशियन सैन्यानें चढाई करून जर्मनीस मागें रेटण्यांत यश संपादन केलें आहे तें अत्यंत कौतुकास्पद आहे. स्टालिनग्राडची शत्रूच्या कचाट्यांतून पूर्ण मुक्तता झाली आहे आणि तेथें जर्मन फौजा समूळ नष्ट झाल्या आहेत. जर्मनीनें पादाक्रांत केलेलीं महत्त्वाचीं ठिकाणें एकामागून एक रशियन सैन्यें परत घेत आहेत आणि शत्रू भयंकर हानि सोसून सारखा मागें हाटत आहे. रशियाचा हा पराक्रम जर्मनीसहि मान्य केल्यावांचून गत्यंतर राहिलेलें नाहीं. व्होल्गा गेली, डॉन नदीवर रशियन सैन्यानें वर्चस्व मिळवलें आणि रॉस्टॉव्हवर त्याची आतां चाल आहे. हिवाळ्यामध्यें मजबूत ठिकाणांवर विश्रांति घेऊन पुढें स्टालिनग्राडच्या पलीकडे आपण व्होल्गापार होऊं आणि कॉकेशसमधून पूर्वेकडचा मार्ग मोकळा करूं हीं हिटलरचीं सुखस्वप्नें जिरलीं आहेत इतकेंच नव्हे तर आपली पिछेहाट कोठें थांबते ह्याची विवंचना त्यास तूर्त लागली आहे. पूर्वेकडून येणाऱ्या रशियन सैन्याच्या पुरांत जर्मन फौज वहावत चालली आहे आणि तिची पिछेहाट अखेर कोठें थांबते हें सांगणें कठिण आहे. जर्मनीचा ह्या रीतीनें रशियांत बोजवारा झाला आहे. आफ्रिकेंतून इटलीची हकालपट्टी होऊन रोमेलला टयुनिशियांत पळ काढावा लागला आहे आणि भूमध्य समुद्रांत मित्रराष्ट्रांचें बळ वाढून इटली उघडा पडला आहे. ह्या स्थितीचा कमाल फायदा कसा घ्यावा ह्याचा विचार कासाब्लँकाच्या परिषदेंत झाला असला पाहिजे. तीमधील निर्णयास मूर्त स्वरूप कसें दिलें जातें हें लवकरच दिसून येईल. जर्मनी व जर्मनीनें पादाक्रांत केलेले युरोपांतील प्रदेश ह्यांचेवर ब्रिटिश-अमेरिकन विमानांचे हल्ले जोरानें चालू झाले आहेत आणि हिटलर व त्याचे हस्तक ह्यांस जर्मन जनतेची जर्मन अपयश व हानि त्यांचे संबंधांत समजूत काढण्याची पंचाईत पडली आहे. कासाब्लँकाच्या परिषदेनें तर त्यांस मोठाच धक्का दिला आहे.

---

## हिंदी बँकिंगविषयीं ताजे आकडे

### नवीन शेड्यूल्ड बँका

डिसेंबर १९४२ अखेरच्या तिमाहींत खालील दोन बँकांचें नांव शेड्यूल्ड बँकांचे यादींत समाविष्ट करण्यांत आलें:—

१ नॅशनल सेव्हिंग्ज बँक लि., मुंबई.
२ भारत बँक लि., दिल्ली.

### शेड्युल्ड बँकांची संख्या

| | ३१-१२-४२ | ३०-९-४२ | ३१-१२-४१ |
|---|---|---|---|
| एक्सचेंज बँका | १७ | १७ | १७ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ४७ | ४५ | ४५ |

### शेड्यूल्ड बँकांच्या शाखा

| | ३०-९-४२ | ३०-३-४२ | ३०-९-४१ |
|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ३९२ | ३८९ | ३९७ |
| पांच प्रमुख बँका | ३४९ | ३४५ | ३२४ |
| एक्सचेंज बँका | ८५ | ८६ | १०३ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ५९७ | ५८५ | ५९७ |
| एकूण | १,४२३ | १,४०५ | १,४२१ |

## शिक्षकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न

### शंकानिरसन

प्रत्येक सभासदानें सोसायटीमार्फत विमा उतरून तिचे हप्ते सोसायटीनें पगारांतून कापून घ्यावे, व परस्पर विमा कंपनीकडे भरणा करावेत. यामुळें सभासद हप्ते भरील किंवा नाहीं ही शंका सोसायटीचे चालकांस राहाणारच नाहीं.

एखाद्या इसमानें ५०१ चा विमा सोसायटीमार्फत उतरला. वार्षिक हप्ता २४ रु. भरला. त्याला सोसायटीकडून ५०० पर्यंत कर्ज मिळाल्यावर तें दहा वर्षे फेडण्याची अट असल्यावर सरासरी दरमहा मासिक हप्ता ९ रु. ८ आणेच पडेल. पुढें तो कमी होईल. साधारण २ रु. विमा हप्ता, व्याज २॥ रु. कर्ज हप्ता ४ रु वर्गणी १ रु. एकूण ९ रु. ८ आ. कर्ज वसूली होईल. यापुढें ती दरमहा कांहीं अंशांनीं कमीच होणार आहे. जास्तींत जास्त मदतीच्या कर्ज फेडीची सवलत सोसायट्यांनीं ठेवली तर याहून कर्जफेडीचा हप्ता कमी बसेल. तरी कमींत कमी १० वर्षे मुदत व जास्तींत जास्त किती असावी हें सोसायट्यांचे चालकांनीं नियम करून ठरवावें. प्रत्येक सोसायटीची जशी शक्ती असेल त्याप्रमाणें ठरावांत बदल करावा. प्रॉ. फंड ज्यांना नाहीं असेही शिक्षक विमा योजनेचा स्वीकार करतील तर त्यांनाही ही योजना फायदेशीरच आहे. मुख्य प्राधान्य 'विमा' यासच दिलें जाईल. त्याचे जोरावरच ही योजना आहे. फंडाचा उल्लेख केला गेला आहे त्यामुळें कोणाचा गैरसमज होऊ नये म्हणून मुद्दाम खुलासा केला आहे.

तरी सर्व जिल्ह्यांतील सोसायट्यांनीं सदर ठराव येत्या जनरल मिटींगमध्यें पास करून घ्यावा.

एखाद्याचा पूर्वी कोणत्याही विमा कंपनींत विमा उतरला असेल ती पॉलिसी असाईनमेंट करून हप्ते भरण्याची कबूली सोसायटीस देईल तरीही नवीन विमा उतरण्याची जरूरी नसावी. मात्र नवीन योजना, कर्जफेडीचे हप्ते कमी असल्यामुळें सोसायटी-मार्फत आणखी विमा उतरला तरी कोणासच जड जाईल असें वाटत नाहीं.

भिवंडी त्र्यं. गो. साठे

### मध

मधाचा औषधी उपयोग फार पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे, परंतु अन्न ह्या दृष्टीनें त्याचें महत्त्व लोकांस असावें तितकें माहीत नाहीं, असें दिसतें. मधमाशांस कांहीं फुलेंच विशेष पसंत पडतात व त्यांतील मध त्या गोळा करतात. फुलांच्या विविधते-प्रमाणें त्यांच्या मधाचा रंग व वास हींहि वेगवेगळीं असतात. ७ औंस मधाची अन्न ह्या दृष्टीनें २॥ पौंड दूध, ८ संत्रीं किंवा १० अंडीं ह्यांची बरोबरी होते. मधाचे प्रमुख उपयोग खालीलप्रमाणें आहेत :(१) धार्मिक पूजेचे वेळीं, (२) नवीन जन्मास आलेल्या मुलाचे शुद्धीसाठीं, (३) औषधें त्यांत मिसळून देण्यासाठी (४) सारक म्हणून, (५) डोळे धुण्यासाठीं, (६) रक्तशुद्धीसाठीं, (७) जिभेवरील फोड बरे करण्यासाठीं, इ. टायफॉइड, अतिसार इत्यादि रोगांचे जंतु मधामध्यें जगूं शकत नाहींत. मध हें स्वच्छतेच्या दृष्टीनें सर्वांत उत्कृष्ट अन्न आहे. दुधाबरोबर मध घेतल्यास तरतरी वाढते. दमलेला माणूस २ चमचे मध टाकलेलें ग्लासभर पाणी प्याला, तर त्याची शक्ति ताबडतोब परत येते. विशेषतः उन्हाळ्यांत थंड पाण्यांत मध विरघळवून उत्तम सरबत तयार होतें.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ५,८०,७५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,९०,३७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४५,००,००० |

### डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. भा. म. गुते |
| श्री. घों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. द. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

G. L. HALBE,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

## धान्यपुरवठ्याचा प्रश्न

(१)

(प्रो. काळे ह्यांचें मुंबई येथें रेडिओवर झालेलें भाषण, ऑल इंडिया रेडिओच्या अधिकाऱ्यांचे परवानगीनें उद्धृत केलें आहे.)

गेल्या महिन्यांत धान्यपुरवठ्याच्या प्रश्नानें सरकारचें आणि लोकांचें लक्ष जितकें वेधलें तितकें दुसऱ्या कोणत्याही विषयानें क्वचित्च आकर्षिलें असेल. मुंबईसारख्या मोठ्या शहरांत ठराविक किंमतीनें विकणाऱ्या धान्यांच्या सरकारमार्फत चाललेल्या दुकानांस गिऱ्हाइकांच्या झुंडीच्या रोजच्या गरजा भागविणें अशक्य होऊं लागून कामकरी व नोकरवर्गास जरूरीचें धान्य विकत मिळण्याची मारामार पडल्यामुळें चरितार्थ चालविणें अवघड झालें. मध्यम स्थितींतल्या लोकांची परिस्थिति ह्यापेक्षां थोडी बरी असली तरी त्यांसही तांदूळ, बाजरी, ज्वारी मिळणें दुष्कर झालें. सरकारनें मुंबई शहराबाहेर धान्य जाण्यावर निर्बंध घातले आणि बाहेरून माल येण्याविषयीं खटपट केली. परंतु त्यांनीं ठरविलेल्या किंमतीपेक्षां अधिक पैसे देऊन विकत घेणाऱ्या श्रीमान् लोकांस धान्य मिळूं शकतें त्या अनुभवावरून चोरटे खरेदीविक्रीचे व्यवहार करणारांचे "चोर बाजार" चोहोंकडे विखुरलेले असल्याची खात्री पटूं लागली आणि सरकारी नियंत्रण अधिक विस्तृत व कडक झालें पाहिजे अशा सूचना करण्यांत येऊं लागल्या. गहूं तर सर्वस्वीं दुर्मिळच झाला आणि रोट्या करून विकणाऱ्या लोकांनीं आपला धंदा बंद करण्यावांचून स्वतःस गत्यंतर नाहीं असें जाहीर केलें. परंतु त्यांच्या पूर्ण मागणीच्या मानानें शक्यतितकी कणीक पुरवण्याचें आश्वासन सरकाराकडून मिळाल्यामुळें रोटीवाल्यांनीं आपला धंदा चालूं ठेवण्याचें अखेर ठरविलें. हातावरचें पोट असणाऱ्या कामकरी लोकांचा विशेष भरणा असलेल्या लहानमोठ्या शहरांत देशभर मुंबई सारखीच स्थिति अनुभवास आली. ह्या शहरीं आणि मोठ्या गांवांत धान्य बाहेरून यावें लागत असल्यानें त्याचा तुटवडा भासत असल्याचें दिसून येतें.

सबंध हिंदुस्थान देश घेतल्यास तांदूळ व गहूं व बाकीच्या धान्यांचा मामुली पुरवठा एकूण जनतेची नित्याची गरज भागवण्यास समर्थ झाला पाहिजे अशी स्वाभाविक अपेक्षा आहे. मुंबई प्रांतांत विजापूर जिल्हा आणि इतर कांहीं जिल्ह्यांतले थोडे भाग सोडले असतां खरिपाचें पीक चांगलें आलें असल्यानें रब्बीचा हंगाम कांहीं भागांत प्रतिकूल झाला तरी एकंदरीनें धान्याची परिस्थिति असमाधानकारक असूं नये. परंतु मुंबई प्रांत धान्याच्या पुरवठ्याच्या बाबतींत नेहमीच थोडाबहुत परावलंबी असतो आणि त्यास आपली मामुली गरज इतर प्रांतांतून धान्य आणून भागवावी लागते आणि ही बाहेरून होणारी आयात मर्यादित झाल्यानें ह्या प्रांतांत धान्याची चणचण झाली आहे. आपापल्या लोकांच्या हिताचें रक्षण करण्याच्या हेतूनें प्रांतिक व संस्थानी सरकारांनीं धान्यांच्या निर्गतीवर निर्बंध घातले आणि जिल्ह्यांमध्येंही होणारे व्यापारी व्यवहार असेच मर्यादित झाले ह्या कारणानें देशांत किंवा विशिष्ट प्रांतांत उपलब्ध असलेल्या धान्याची जरूरीप्रमाणें वाटणी होण्याच्या मार्गांत अडचणी उपस्थित झाल्या.

ह्या परिस्थितीची चिकित्सा व निदान करतांना कांहीं जणांनीं असें मत प्रकट केलें आहे कीं, सरकारनें धान्यांच्या किंमती ठरवून टाकल्या आणि त्यांच्या नेआणीवर निर्बंध घातले. ह्या योगानें मामुली व्यापारी व्यवहार बंद पडून चोरट्या खरेदी-विक्रीस वाव मिळाला आणि सामान्य जनतेस सरळ रीतीनें माल मिळण्याची पंचाईत झाली. "सरकारी नियंत्रण नसतें तर नेहमींप्रमाणें व्यापाऱ्यांनीं मिळेल तेथून धान्यें खरेदी करून आणलीं असतीं व अशा रीतीनें सामान्य गिऱ्हाइकांची गरज नेहमींप्रमाणें भागली असती. घाऊक व किरकोळ व्यापारी आणि दुकानदार ह्यांस स्वतःच्या पोटापाण्याची काळजी आहेच; आणि युद्धपरिस्थितींतही त्यांनीं आपले व्यवहार चालू ठेवून जनतेची सोय पाहिली असती. नियंत्रणाच्या विरुद्ध मांडण्यांत आलेली ही विचारसरणी सदोष आहे हें लक्षांत येणें अवघड नाहीं. युद्धकाळांत मालाच्या पुरवठ्याचे मामुली मार्ग बंद होतात आणि वहातुकीचीं साधनें नेहमींच्या व्यापारास हवीं तशीं मिळूं शकत नाहींत. लढाऊ उपयोगाच्या जिनसांच्या पुरवठ्यास अग्रस्थान द्यावें लागतें आणि सामान्य जनतेच्या गरजांस दुय्यम महत्त्व प्राप्त होतें. युद्धसामुग्री इतकी विविध असते आणि ती एवढ्या मोठ्या प्रमाणावर लागते कीं, तिचें उत्पादन व पुरवठा ह्यांची व्यवस्था विशिष्ट धोरणानें सरकारास करावी लागते आणि त्या मानानें समाजाची शक्ति लढाऊ गरजांस अनुसरून उपभोगांत आणली जाते. अर्थातच जनतेचें रोजचें जीवन आणि व्यवहार युद्धधोरणानें आखल्या गेलेल्या योजनांस जुळतें करून घेणें प्राप्त होतें. म्हणजेच सरकारचें आर्थिक व्यवहारांचें नियमन व नियंत्रण अपरिहार्य होतें असें झालें. आपलें धोरण अमलांत आणतांना व्यापारीवर्गाच्या व्यवहारपद्धतीचा शक्य तेवढा उपयोग सरकारनें करावा हें आवश्यक व योग्य आहे. खाजगी कारखाने, कंत्राटदार व व्यापारी यांच्या मार्फत लढाऊ सामुग्रीचा पुरवठा सरकार करीतच आहे. त्याच रीतीनें पुरवठा व किंमती ठरवून देऊन सरकारनें देवघेव व्यापारी व दुकानदार ह्यांच्या हातीं ठेवल्यानें जनता व व्यापारीवर्ग ह्यांची सारखीच सोय होण्यासारखी आहे. गोरगरीब व मध्यम स्थितींतली जनता ह्यांचेसाठीं सरकारास स्वतःच्या विद्यमानें चालवलेल्या दुकानांतून नित्याच्या खाद्यपदार्थांचा पुरवठा ठराविक किंमतीनें करावा लागत आहे यावरून मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वानुसार मामुली व्यापार व दुकानदारी युद्धपरिस्थितींत चालू देण्यांत किती धोका आहे हें दिसून येईल. गेल्या महिन्यांत कलकत्ता येथें केलेल्या आपल्या भाषणांत व्हाइसरॉय-लॉर्ड लिन्लिथगो ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें जगांतील सर्व देशांत आज पुरवठा व बाजारभाव यांचें नियंत्रण अपरिहार्य झालें असून ह्या देशांत नियंत्रणाचें क्षेत्र व प्रमाण हीं वाढवणें आवश्यक वाटूं लागलें आहे. ह्याच्याही पुढें जाऊन त्यांनीं असें सुचविलें कीं, कांहीं जरूरीच्या पदार्थांचा पुरवठा आणि वाटणी ह्यांची जबाबदारीहि सरकारला स्वतःच्या शिरावर घ्यावी लागेल.

(अपूर्ण)

---

### पॅसिफिकमधील राष्ट्रांचें संरक्षण

पॅसिफिक महासागरांतील राष्ट्रांचें युद्धसमाप्तीनंतर संरक्षण व्हावें, ह्यासाठीं त्या महासागरांतील महत्वाचीं ठाणीं संयुक्त राष्ट्रांनीं आपल्या हातीं ठेवलीं पाहिजेत, असें अमेरिकेंतील ऑस्ट्रेलियन मिनिस्टर, मि. डिक्सन, ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांताचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 31

जाहिरातींचे दर.

जाहिरात छापण्याबद्दल चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख १० फेब्रुवारी १९४३ अंक ६

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं!!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें १.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यातून निर-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसींमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २
वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

कायद्याचीं मराठी पुस्तकें

१ इनकम् टॅक्स कायदा (सुधारणांसह) किं. १॥ रु.
२ कर्ज देण्याघेण्याबाबत कायदा किं. २ रु.
३ मृत्युपत्राचा कायदा किं. १। रु.
४ हिंदु स्त्रीधनाचा कायदा किं. १२ आ.
५ विवाहाचा कायदा किं. १२ आ.

याशिवाय मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या "न्याय बोध" मासिकाचे वर्गणीदार व्हा. वा. व. ४ रु. नमुना अंक मागवा.

—न्यायबोध-ऑफिस, महाल, नागपूर शहर

## विविध माहिती

### जर्मनी व जपान

जर्मनी हा आपला प्रमुख शत्रू असला, तरी जपान हा अधिक भीतिदायक आहे, असें मत न्यू यॉर्क हेरल्ड ट्रिब्यूननें व्यक्त केलें आहे.

### लिक्विडेशनचें पहिलें ३१०% डिव्हिडंड

बेंगॉल नॉर्थ वेस्टर्न आणि रोहिलखंड कमाउन ह्या रेल्वे सरकारनें स्वतःकडे घेतल्यानंतर त्या कंपन्या गुंडाळण्यांत येत आहेत. लिक्विडेशनमध्यें भागिदारांस मिळावयाचें पाहिलें डिव्हिडंड ३१०% इतकें आहे. लिक्विडेशनचें काम पुरें होण्यास १॥ ते २ वर्षें लागतील व त्यानंतर अखेरचें डिव्हिडंड जाहीर होईल.

### बिकानेरचे महाराज

बिकानेरचे महाराज गेल्या आठवड्यांत मुंबई येथें वयाच्या ६३ व्या वर्षी मृत्यु पावले. गेल्या महायुद्धाचे वेळच्या इंपीरिअल युद्धमंडळाचे ते एक सभासद होते. व्हर्साईच्या तहावर त्यांनीं हिंदुस्थानातर्फे सही केली होती. ते बनारस विश्वविद्यालयाचे एक प्रमुख संस्थापक होते.

### चीनचें भवितव्य

वरील नांवाचें, सुमारें १० हजार शब्दांचें एक पुस्तक मार्शल चँग काय शेक हे लिहित आहेत. आधुनिक चीनचे जनक डॉ. सन यत सेन ह्यांच्या श्राद्धदिनीं, ता. १२ मार्च रोजीं तें प्रसिद्ध होईल.

### करारास संमती

अमेरिकेनें ज्या कराराअन्वयें चीनमधील खास हक्क सोडून दिले त्या करारास प्रेसिडेंट रुझवेल्ट ह्यांनीं अमेरिकन विधिमंडळाची संमती मागितली आहे.

### चीनला अमेरिकेची मदत

"चीनचा आर्थिक निःपात होण्याची वेळ आलेली आहे. परिस्थिति इतकी बिकट आहे कीं चीन व चिनी फौजा ह्यांस युद्धसाहित्य पुरविण्यांत फार कालक्षेप करण्यास अमेरिकेस सवड राहिलेली नाहीं.":–ग्रेट ब्रिटनमधील चिनी वकीलाची पत्नी, मादाम वेलिंग्टन कू ह्यांनीं फिलॅडेल्फिया येथें वरील उद्गार काढले.

### माल्टा

१९ ऑक्टोबर १९४२ अखेर माल्टा बेटावर १,६६० वेळां बॉंब टाकले गेले. शत्रूचीं १०६९ विमानें तेथें नष्ट करण्यांत आलीं. २० सप्टेंबर १९४२ अखेर बॉंब हल्ल्यांत १,३८६ लोक मरण पावले व ६,७०४ इमारतींचा पूर्णपणें अथवा अंशतः नाश झाला.

### चांदी-सोन्याचे भाव

गेल्या आठवड्यांत मुंबईच्या बाजारांत चांदीचा भाव ९९ रुपयांच्या आंत बाहेर सरासरीनें होता. सोन्याचा भाव ६५ रुपयांच्या आसपास राहिला.

### मि. चर्चिल ह्यांचा दहा हजार मैलांचा प्रवास

इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. चर्चिल कासाब्लँका येथील परिषदेसाठी गेल्या महिन्याच्या १२ तारखेस विमानानें प्रवासास निघाले ते कैरो, तुर्कस्थान, सायप्रस, ट्रिपोली इत्यादि ठिकाणांस भेट देऊन गेल्या ७ तारखेस आकाशमार्गानें स्वदेशीं परत आले. त्यांचा एकूण प्रवास दहा हजार मैल झाला.

### मनुष्यप्राण्याची उत्क्रांती

मनुष्यप्राण्याच्या जीवनास सुधारलेलें वळण लागलें, तें त्यास सहा हजार वर्षांमागें प्राप्त झालें. नष्ट झालेल्या ज्या प्राण्यांचे अवशेष सापडतात ते प्राणी पन्नास लक्ष वर्षांमागें अस्तित्वांत होते, पण मर्कटस्वरूपी मनुष्याचा अवतार पाच लक्ष वर्षांमागें झाला.

### इंग्लंडमध्यें कॉंक्रीटचा वाढता उपयोग

लोखंड, पोलाद व लाकूड ह्यांची काटकसर व्हावी म्हणून इंग्लंडमध्यें कॉंक्रीटचा उपयोग वाढत्या प्रमाणांत केला जात आहे. कॉंक्रीट आतां शेतकऱ्यांच्या झोपड्यांपर्यंत गेलें आहे आणि शक्य तेथें तें वापरण्यांत येत आहे.

### मूषक संहार

धान्यपुरवठ्याचा भयंकर शत्रू उंदीर हा प्राणी आहे. त्याच्या नाशासाठीं इंग्लंडमध्यें मोहीम काढण्यांत आली आहे. उंदराच्या एका दांपत्याच्या संततीचा विस्तार एका वर्षांत आठशे प्राण्यांपर्यंत जातो.

### जॉर्ज बादशहा सर्पणाची बचत कशी करतात ?

जॉर्ज बादशहांच्या कुटुंबांतील सर्व लोक, पाहुणे व नोकरवर्ग ह्यांस टबमध्यें स्नान करण्यासाठीं फक्त ५ इंच उंचच पाणी देण्यांत येतें. बकिंगहॅम व विंडसर ह्या दोन्ही राजवाड्यांतील प्रत्येक टबावर पांच इंच उंचीवर काळी अथवा तांबडी पट्टी रंगविलेली आहे व सर्पणाची बचत करण्याची आवश्यकता दर्शविणाऱ्या नोटिसा स्नानगृहांतून लावण्यांत आल्या आहेत. निजण्याच्या खोल्यांत प्रत्येकीं एकच दिव्यास परवानगी आहे व डॉक्टरांनीं सांगितलें तरच शेकोटीसाठीं शेगडी मिळूं शकते. राजवाड्यांतील व्हरांड्यांमधील अनवश्यक दिवे काढून टाकण्यांत आले आहेत. वरील निर्बंध राजेसाहेब व राणीसाहेब ह्यांसहि लागू आहेत.

### जर्मन फौजांची सारखी पिछेहाट

एक हजार मैल लांबीच्या दक्षिण रशियन आघाडीवर स्टालिनच्या सैन्यांनीं जर्मन फौजांस मागें रेटीत नेलें आहे आणि तीं आतां रॉस्टॉव्ह ह्या महत्त्वाच्या मध्यवर्ती शहराचे दरवाजे ठोठावीत आहेत. उभे राहून रशियन सैन्यास तोंड देण्याची हिंमत जर्मन फौजांनीं दाखवलेली नाहीं.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२ |
| २ पत व चलन ह्यांचे संबंधांत बँकांचें कार्य ... ... | ४३ |
| ३ युद्धकाळांतील पैशाचे प्रश्न | ४४ |
| ४ इनकमटॅक्स कायद्याची सुबोध माहिती ... | ४४ |
| ५ स्फुट-विचार मध्यवर्ती अंदाज पत्रकाविषयीं तर्क— श्री. सरकार ह्यांचें स्पष्टीकरण— ग्रेटब्रिटनवरील हवाई हल्ल्यांचे बळी | |
| ६ धान्यपुरवठ्याचा प्रश्न | ४६ |
| ७ चलनाचा विस्तार व घाउक बाजार भाव ... ... | ४७ |
| ८ बँकिंगविषयक एक निवाडा | ४७ |


# अर्थ

बुधवार, ता. १० फेब्रुवारी, १९४३

## पत व चलन ह्यांचे संबंधांत बँकांचें कार्य

आजच्या अंकांत दुसरीकडे आम्हीं प्रो. काळे ह्यांनीं जळगांव येथें पैशाविषयींच्या प्रश्नासंबंधीं दिलेल्या व्याख्यानाचा गोषवारा प्रसिद्ध केला आहे. त्या व्याख्यानांत सामान्य श्रोत्यांस बोध होईल अशा रीतीनें पैशाच्या प्रश्नाचें त्रोटक व सोपें विवेचन येणें स्वाभाविक होतें. तथापि हा सबंध विषय इतका अवघड आणि गुंतागुंतीचा आहे कीं शिकलेल्या व बुद्धिमान लोकांसहि त्याचें यथातथ्य ज्ञान होणें अगत्याचें आहे. पण ह्या ज्ञानाच्या अभावीं जनतेमध्यें अनेक गैरसमज पसरलेले आढळतात. चलनाचा अपुरा पुरवठा हें समाजांतील बहुसंख्य लोकांच्या असमाधानकारक आर्थिक स्थितीचें कारण आहे आणि माल विकत घेण्याच्या साधनांची भरपूर वांटणी झाल्यानेंच तें दूर होईल अशा आशयाची विचारसरणी मेजर डग्लस ह्यांच्या नेतृत्वाखालीं पाश्चात्य देशांत प्रचारात्मक पद्धतीनें पुढें मांडण्यांत येत आहे. विनिमयाचीं साधनें सरकारच्या विद्यमानें वाटली जाण्याची व्यवस्था झाली असतां सध्याच्या आर्थिक अडचणी नाहींशा न होतां त्या आणखी वाढतील हें सूक्ष्म विचारांतीं ध्यानांत येण्यासारखें आहे. शास्त्रीय दृष्टीच्या तज्ज्ञांनींच सामान्य लोकांच्या भ्रममूलक समजुतीमधील दोष दाखविले पाहिजेत आणि राजकर्त्यांनीं शास्त्रशुद्ध आर्थिक पद्धतींचा अवलंब करणें उचित आहे.

चार पांच महिन्यांमागें कँटरबरीचे आर्चबिशप, डॉ. टेंपल, ह्यांनीं आल्बर्ट हॉलमध्यें भरलेल्या एका जाहीर सभेंत भाषण करतांना बँकांच्या हातांत चलन व पत ह्यांचा पुरवठा एकवटला असल्यानें जनतेस त्या अत्यंत जरूरीच्या सोयी हव्यातशा मिळूं शकत नाहींत असें गाऱ्हाणें पुढें मांडलें. समाजांची पुनर्घटना कोणत्या ध्येयानें व तत्त्वानें केली जावी हें सांगण्याचा ख्रिस्ती धर्म संस्थांस अधिकार आहे, एवढेंच नव्हे तर तसें करणें त्यांचें कर्तव्य आहे, हें प्रस्थापित करणें हा त्यांच्या भाषणाचा उद्देश होता. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं व प्रचारकांनीं सामाजिक व आर्थिक स्वरूपाच्या प्रश्नांत हस्तक्षेप करूं नये असें प्रतिपादन करणारांस उत्तर देऊन कित्येक आर्थिक सुधारणा त्यांनीं सुचवल्या. नफ्यासाठीं चाललेली व्यक्तींची धडपड, जमिनीसारख्या मालमत्तेची विषम वाटणी इत्यादि वादग्रस्त प्रश्नांवर त्यांनीं निर्भीड रीतीनें स्वतःचें मत प्रकट केलें. असें करतांना कर्जाच्या स्वरूपांत चलन निर्माण करण्याच्या सध्याच्या ब्रिटिश बँकांच्या अधिकाराचा उल्लेख करून ही सत्ता सरकारच्या हातीं असावी असें डॉ. टेंपल म्हणाले. स्वतः स्वीकारलेल्या ठेवींच्या मर्यादेबाहेर बँकांनीं पत व चलन ह्यांचा विस्तार करतां कामा नये आणि अधिक चलन व पत निर्माण करण्याचें काम सरकारचें असावें असें त्यांनीं प्रतिपादिलें. बँका चलन व पत निर्माण करणारे कारखानेच आहेत ह्या सामान्य समजुतीस त्यांनीं दुजोरा दिला आणि इंग्लंडमध्यें ही बँकिंगच्या महत्त्वाच्या कार्याची सत्ता हाताच्या बोटांवर मोजतां येतील इतक्या संस्थांमध्यें केंद्रित होऊं देणें अनिष्ट आहे, ह्या मताचा त्यांनीं जोरानें पुरस्कार केला.

बँकांनीं स्वीकारलेल्या ठेवींचा पैसा पडून न रहातां त्यांनीं दिलेल्या कर्जांच्या मार्गानें चलनाच्या स्वरूपांत व्यवहारांत खेळतो ह्या दृष्टीनें पहातां ह्या संस्था क्रयशक्ति व पत निर्माण करतात हें खरें आहे. परंतु पत व पैसा उत्पन्न करण्याची ही बँकांची शक्ति अमर्याद नाहीं आणि ती विशिष्ट प्रमाणाबाहेर जाऊं शकत नाहीं. ठेवीदारांनीं त्यांच्या स्वाधीन केलेल्या पैशापेक्षा अधिक पत व चलन बँकांस निर्माण करतां येत नाहीं. सरकारला कागदी चलन स्वतःच्या इच्छेप्रमाणें काढतां येतें आणि तें वापरण्याची सक्ती जनतेवर कायदेशीर रीतीनें करतां येते. बँकांस नोटा काढण्याचा अधिकार नाहीं. लोकांच्याकडून कर्जाऊ घेतलेला पैसा आपल्या गिऱ्हाइकांस वापरावयास देणें एवढेंच कार्य बँका करूं शकतात. प्रसिद्ध ब्रिटिश बँकर, मि. वॉल्टर लीफ, ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें "पत व चलन निर्माण करणारा जर कोणी असेल तर तो बँकेचा ठेवीदार होय; कारण ठेवीदार बँकेंत स्वतःचा पैसा ठाहूं देईल त्या प्रमाणांतच ही संस्था लोकांस कर्जें देऊं शकेल." आर्चबिशप ऑफ कँटरबरी ह्यांचेसारख्या जनतेवर नैतिक वजन असलेल्या धर्माधिकाऱ्यानें बँकिंगच्या व्यवहारांविषयीं भ्रामक विधानें करावीं ह्यासंबंधानें कित्येक ब्रिटिश पत्रांनीं सखेद आश्चर्य प्रकट केलें आहे. समाजाच्या बचतीचा पैसा उद्योगधंदे व व्यापार यांच्या सुरळीत कारभारास उपयोगी करून देणें ही बँकांची कामगिरी आहे आणि ती सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून अधिक कार्यक्षम रीतीनें पार पाडली जाईल असें मानण्यास आधार नाहीं. जनतेच्या विश्वासाच्या पायावर राष्ट्रीय बँकिंगच्या धंद्याची इमारत उभारण्यांत आलेली असते हें येथें ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. बँकांनीं दिलेलीं कर्जें ठेवींच्या स्वरूपांत त्यांचेकडे परत येतात आणि त्यांवर काढण्यांत येणारे चेक चलनाप्रमाणें व्यवहारांत खेळतात. ह्या विनिमयसाधनास बँकांनीं निर्माण केलेलें चलन असें म्हणतात. ह्या चेक्स वगैरे साधनांच्या योगानें सरकारी चलनाची बचत होते. पण बँकांनीं कर्जाच्या स्वरूपांत प्रसृत केलेलें आपलें चलन वाटेल तसें आणि वाटेल तितकें काढतां येत नाहीं आणि ह्या चलनानें जनतेची उत्कृष्ट सोय होते ह्या गोष्टी येथें महत्त्वाच्या असून त्यांचें सत्यस्वरूप लक्षांत आलें पाहिजे. बँकांच्या हातीं चलनाची मक्तेदारी नाहीं.

## युद्धकाळांतील पैशाचे प्रश्न

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

चालू महिन्याच्या पहिल्या तारखेस जळगांव येथील फ्रेंड्स युनिअन ह्या संस्थेच्या विद्यमानें प्रो. काळे ह्यांनीं वाचनालयाच्या दिवाणखान्यांत युद्धकाळांतील पैशाविषयींचे प्रश्न या विषयावर इंग्रजींमध्यें व्याख्यान दिलें. युद्धोत्तर काळांत होणाऱ्या जागतिक पुनर्घटनेच्या दृष्टीनें आणि चालू परिस्थितीस योग्य प्रकारानें तोंड देतां यावें म्हणून प्रत्येक नागरिकास स्वतःच्या भोंवतीं चाललेल्या घडामोडींचें स्थूल मानाचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. फ्रेंडस युनिअन ही संस्था असें ज्ञान सर्वसाधारण लोकांस प्राप्त करून यावें ह्या हेतूनें स्थापन झाली आहे हें अभिनंदनीय आहे असें सांगून प्रो. काळे ह्यांनीं प्रथम चालू युद्धाचा प्रचंड विस्तार, त्याचें सर्वव्यापी स्वरूप व त्याचे होणारे आर्थिक परिणाम ह्यांची नीटशी कल्पना श्रोत्यांस करून दिली. प्रत्येक राष्ट्रास व व्यक्तीस चालू युद्धाचे परिणाम भोगावे लागत आहेत. चारी खंडांत लढाया चालल्या आहेत आणि मामुली व्यापार बंद पडला आहे. राष्ट्रांस स्वतःची शक्ती बचाव व शत्रूंवर चढाई ह्यांत एकवटावी लागली आहे. ह्यामुळें राष्ट्रीय सरकारांस जनतेच्या रोजच्या जीवनाचें नियंत्रण करणें प्राप्त झालें आहे.

युद्धांत राष्ट्रीय सरकारांचा लष्करी खर्च वाढतो आणि तो भागवण्यास लागणारा पैसा कर व कर्जें ह्या दुहेरी मार्गानें उभारावा लागतो. इंग्लंडचा दररोजचा खर्च सतरा कोटी रुपये आहे आणि तेथील सरकारास वर्षाच्या काठीं सहा हजार कोटि रुपये उभारणें प्राप्त झालें आहे. एवढी अवाढव्य रकम सरकारनें कोठून आणावयाची ? लोकांवरील कर वाढवून निम्में आणि त्यांचेकडून कर्ज घेऊन बाकीचे ह्याप्रमाणें हा पैसा उभारला जात आहे. अत्यंत जरूरीचे तेवढे जिन्नस जनतेनें खरेदी करावे आणि बाकीची आपली प्राप्ती सरकारच्या स्वाधीन करावी अशी व्यवस्था इंग्लंडमध्यें आज अस्तित्वांत आहे. म्हणूनच ब्रिटिश सरकारास अल्प व्याजानें कर्ज मिळत आहे. सर्व उत्पादन आणि आयात माल अग्रहक्कानें युद्धासाठी उपयोगांत आणला जात असल्यानें जिनसांचा पुरवठा मर्यादित झाला आहे. त्याच बरोबर युद्धाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाचा पैसा मजूरी, पगार इत्यादि मार्गांनीं लोकांच्या हातीं जात आहे. व्यवहारांत वाढतें चलन खेळत असतां त्यानें विकत घ्यावयाच्या मालाचा पुरवठा मर्यादित झाला आहे. ह्या कारणानें बाजारभाव चढण्याची भीति उत्पन्न होणार. परंतु रेशनिंग चालू करून ब्रिटिश सरकारनें मालाची खरेदीच नियंत्रित केली आहे. सरकारास युद्धखर्चास लागणारा पैसा कागदाचें चलन वाढवून उभा करण्याची युक्ती सोपी आणि बिनखर्चाची वाटते. पण असलें कागदी चलन समाजांत खेळल्यानें महागाई सारखी वाढत रहाते आणि त्यावरचा लोकांचा विश्वास उडतो. गेल्या महायुद्धानंतरच्या काळांत असल्या बिनबुडाच्या फाजील चलनाचा विस्तार (इनफ्लेशन) जर्मनीसारख्या देशांत केला गेला आणि त्याचे दुष्परिणाम तेथील लोकांस भोगावे लागले. ह्यासाठी फाजील चलन व्यवहारांत न खेळूं देण्याची खबरदारी चालू युद्धांत घेतली जात आहे. ह्या देशांतल्या चलन पद्धतीचें स्वरूप विशद करून प्रो. काळे ह्यांनीं अलीकडे हिंदी चलनी नोटांचें प्रमाण किती वाढलें आहे ह्याची माहिती दिली. चलन आणि मालाचा पुरवठा ह्यांची योग्य प्रमाणबद्धता ठेवणें आपल्या देशांत किती अगत्याचें आहे हें व्याख्यात्यांनीं अनेक सोपीं उदाहरणें देऊन स्पष्ट केलें. श्रीमान लोकांवर कर, उत्पादनांत वाढ, पुरवठ्याची नियंत्रित वाटणी, सक्तीची बचत, रोख्यांत गुंतवण, इत्यादि उपायांची आवश्यकता कशी निकडीची आहे ह्याचें विवेचन करून रेशनिंग गोरगरीबांच्या हिताच्या दृष्टीनें अगत्याचें झालें असल्याचें सांगितलें. हिंदुस्थानांत इनफ्लेशनची आपत्ती येऊं न देण्यासाठी सरकार आणि जनता ह्यांनीं शिकस्त केली पाहिजे ह्याविषयीं एकमत होईल ह्यांत शंका नाहीं. धान्य व चलन ह्यांचे बाबतींत नफेबाजी चालली असल्याचीं उदाहरणें अलीकडे उघडकीस आलीं आहेत त्यांवरून सर्वांनीं बोध घेणें अगत्याचें आहे आणि महागाईस तोंड देण्याच्या योजना यशस्वी करण्यास प्रत्येकानें हातभार लावला पाहिजे असें सांगून व्याख्यात्यांनीं आपलें भाषण संपवलें.

## इन्कमटॅक्स कायद्याची सुबोध माहिती

प्रचलित महत्त्वाच्या कायद्यांचें ज्ञान सामान्य जनतेस व्हावें ह्या दृष्टीनें सातारा येथील वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर, बी. ए. (ऑनर्स) एलएल्. बी., ह्यांनीं बरीच छोटीं पुस्तकें लिहिलेलीं आहेत. त्याच योजनेस अनुसरून त्यांनीं लिहिलेलें "इन्कमटॅक्स-प्रवेशिका"* हें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. 'न्यायबोध' मासिकांत तें प्रथम क्रमशः प्रसिद्ध झालें व आतां तें स्वतंत्र रूपानें बाहेर आलें आहे. प्राप्तीवरील कराचा बोजा आतां पूर्वीपेक्षां कितीतरी अधिक लोकांवर पडूं लागला आहे आणि कराच्या संबंधांतील कायद्यांत अलीकडे बराच बदललेला आहे. तथापि, कर भरणारास कायद्याची माहिती क्वचितच असते व तो निष्कारण गोंधळून जातो. कर कोणाला द्यावा लागतो, कर आकारण्याची पद्धत, करास पात्र होणारें उत्पन्न, व्यक्तिशः व जाहीर नोटिसा, इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांचीं कामें, कराची वसुली, गुन्हे व शिक्षा, रजिस्टर्ड फर्म व कंपन्या ह्यांचेवर कराची आकारणी, इत्यादि गोष्टींची तपशीलवार व सुबोध माहिती श्री. गजेंद्रगडकर ह्यांनीं आपल्या पुस्तकाचे पहिल्या भागांत दिली आहे आणि ठिकठिकाणीं उदाहरणें देऊन विषय योग्य रीतीनें समजावून दिला आहे. ह्या भागाच्या अखेरच्या परिशिष्टांत दोन हजार ते सहा हजार उत्पन्नावर एकूण कर किती बसेल व शतमानानें सरासरी कराचा दर काय पडतो, ह्याविषयीं तपशीलवार आकडे दिलेले आहेत. पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत प्राप्तीवरील करांचें पत्रक भरण्यासंबंधीं सामान्य सूचना दिल्या आहेत व भरावयाच्या पत्रकाचा नमुना छापला आहे. इन्कमटॅक्स कायद्याची मराठींत संक्षिप्त व सुबोध माहिती देणें हाच प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश असल्याकारणानें, पत्रक भरतांना येणाऱ्या क्लिष्ट अडचणींच्या तपशीलवार खुलाशाची त्यांत अपेक्षा करतां कामा नये. पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत १९४१ चा २३ वा कायदा, १९४२-४३ सालाचे कर आकारण्याचे नियम, १५०१ ते २००० रु. वरील कर, २००१ ते ५००० रु. वरील कर, लिमिटेड कंपन्यावरील कर आकारणी, स्टँप व कोर्टफी, इत्यादि विषयक माहिती व तक्ते आहेत. शेवटीं, स्टँप व कोर्ट फीसंबंधीं माहिती दिलेली आहे. श्री. गजेंद्रगडकर ह्यांनीं लिहिलेलें पुस्तक व्यापारी, धंदेवाले, मध्यम प्राप्तीचा नोकरवर्ग, फर्मस, लिमिटेड कंपन्या ह्या सर्वांसच उपयुक्त वाटेल. पुस्तकास दि. ब. ना. रा. गुंडील, माजी डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज आणि इनकमटॅक्स ट्रिब्युनलचे सध्याचे सभासद, ह्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे.

* लेः-श्री. के. बा. गजेंद्रगडकर. पृ. सं. ११४ किं. १ रु. ८ आ. प्रकाशक सेंट्रल लॉ हाउस, नागपूर.

## स्फुट विचार

### मध्यवर्ती अंदाजपत्रकाविषयीं तर्क

हिंदुस्थान सरकारचें रेल्वेज बाबतचें आणि सर्वसाधारण जमा-खर्चाचें अंदाजपत्रक मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडलें जाण्याची वेळ जवळ येत चालली असल्यानें त्यांचे बाबतींत जिज्ञासा व तर्क ह्यांचे पडसाद ऐकूं येऊं लागले आहेत. मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नाचे व खर्चाचे धावते आकडे वेळोवेळीं प्रसिद्ध होत असल्यानें अंदाजपत्रकांत तूट येणार आणि ती अंशतः करवाढीनें वे नवीन कर्जांनीं भरून काढावी लागणार हें स्पष्टच आहे. हिंदुस्थान सरकारच्या युद्धखर्चांत झपाट्यानें वाढ होत आली आहे. येथें होणाऱ्या लढाऊ खर्चाचा मोठा हिस्सा साम्राज्य सरकार उचलीत आहे. परंतु ही वांटणी कोणत्या तत्त्वावर होणें योग्य आहे ह्याचा निर्णय काय झाला आहे याचा खुलासा सर जरेमी रेस्मन ह्यांस आपल्या अंदाजपत्रकांवरील भाषणांत करावा लागेल. अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान लीजलेंडचे व्यवहार चालू आहेत त्यांच्या स्वरूपाचा उलगडाहि त्यांच्या भाषणांत व्हावा लागेल. हिंदुस्थानच्या शिलका इंग्लंडमध्यें मोठ्या प्रमाणांत साचत आहेत. त्यांचा योग्य विनियोग कसा केला जाणार आहे ह्याविषयींच्या योजना त्यांस पुढें मांडाव्या लागतील. युद्धाचा अवास्तव खर्च ह्या देशावर लादला जाणार नाहीं, ह्यासंबंधांत लोकमताची खातरजमा व्हावी लागेल. ब्रह्मदेश जपान्यांकडून परत जिंकण्यांत येईल त्याचा खर्च हिंदुस्थानच्या रक्षणखर्चांत दाखल केला न जातां तो साम्राज्य सरकारनें सोसणें न्यायाचें आहे आणि ह्याविषयींचें समाधानकारक आश्वासन फडणवीसांकडून अपेक्षित आहे. चलनी नोटांचा विस्तार देशांत झपाट्यानें चालला आहे आणि त्या लंडनमधील स्टर्लिंग रोख्यांच्या आधारावर काढल्या जात असल्यानें येथील चलनांत पोकळी उत्पन्न होऊन तिच्या योगानें बाजारभाव सारखे चढत जाण्यास मदत होत आहे या टीकेस सर जरेमी ह्यांस योग्य उत्तर द्यावें लागणार आहे. अनेक दृष्टींनीं येत्या सालचें अंदाजपत्रक आणि त्यावरील सरकारच्या फडणविसांचें भाष्य हीं अत्यंत महत्त्वाचीं ठरणार आहेत. नवीन कर सुचविण्यांत येतील त्यांच्या युक्तायुक्ततेची चर्चा महत्त्वाची होईल हें सांगावयास नको.

---

### श्री. सरकार ह्यांचें स्पष्टीकरण

हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री, श्री. नलिनीरंजन सरकार, ह्यांच्या मुंबईच्या मुक्कामांत असोसिएशन ऑफ इंडिअन इंडस्ट्रीज ह्या संस्थेच्या अध्यक्षांनीं त्यांची मुलाखत घेऊन तीमध्यें आपल्या कित्येक अडचणी त्यांचे पुढें मांडल्या. आपल्या कामगारांच्या सोयीसाठीं धान्याचीं दुकानें चालवूं इच्छिणाऱ्या कारखानदारांस त्याबाबतचे सरकारी परवाने मिळत नाहींत. ह्या तक्रारीस उत्तर देतांना श्री. सरकार ह्यांनीं लोकांस आतां माहीत झालेल्या गोष्टींचाच पुनरुच्चार केला. तांदूळ बाहेरून आणणें अशक्य असल्यानें त्या धान्याचा पुरवठा वाढवतां येणार नाहीं, परंतु वहातुकीचीं जहाजें मिळतील त्या मानानें गव्हाची आयात होणार आहे असें त्यांनीं सांगितलें. धान्यांची निर्गत सरकारनें थांबवावी ह्या सूचनेसंबंधानें ते म्हणाले कीं, ही निर्गत अत्यंत अल्प असून ती केवळ सिलोन व इराणचें आस्रात ह्यांचे बाजूस होत आहे. सबंद हिंदुस्थानच्या तीन दिवसांच्या खुराकाइतकीच तांदुळाची निर्गत आहे असेंहि प्रमाण त्यांनीं पुढें मांडलें. जेथें फाजील धान्य आहे तेथून तें ज्या प्रांतांत तुटवडा आहे तेथें पुरवण्याची व्यवस्था हिंदुस्थान सरकार करीत असून त्याच्या पुढची तजवीज प्रांतिक सरकारांनीं करावयाची आहे. हिंदी धंदेवाल्यांस कच्चा माल मिळण्यास अडचण भासत आहे ही गोष्ट श्री. सरकार ह्यांनीं कबूल केली आणि वहातुकीच्या साधनांचा अपुरा पुरवठा हें ह्या परिस्थितीचें मुख्य कारण आहे असें ते म्हणाले. हिंदी चलनाचा होत असलेला विस्तार आणि हिंदी शिलकांची लंडनमध्यें होणारी वाढ ह्या विषयांचा सरकार काळजीपूर्वक विचार करीत आहे असें आश्वासन व्यापारमंत्र्यांनीं दिलें. स्वदेशी धंद्यांच्या उत्कर्षासाठी सरकारनें प्रयत्न केलेला नाहीं, ह्या असोसिएशनच्या टीकेचा त्यांनीं इन्कार केला, पण योग्य वेळीं अधिक जोराचा प्रयत्न व्हावयास पाहिजे होता असें मत त्यांनीं व्यक्त केलें. हिंदुस्थानच्या औद्योगिकरणाचे संवर्धांत सरकारनें जरूर ती दक्षता आणि धडाडी दाखविली नाहीं, ह्या तक्रारीस त्यांनीं अप्रत्यक्ष रीतीनें दुजोरा दिला असा त्याचा अर्थ झाला.

---

### ग्रेट ब्रिटनवरील हवाई हल्ल्यांचे बळी

ग्रेट ब्रिटनवरील हवाई हल्ल्यांमुळें मृत व जखमी झालेल्यांचे सप्टेंबर १९४२ अखेरचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून अशांची संख्या आतां १ लाखावर गेली असल्याचें दिसतें. युद्धास प्रारंभ झाला, तेव्हां हवाई हल्ल्यांची जेवढी भीति वाटत होती, तिचे मानानें ही संख्या अत्यल्पच वाटते. प्रत्यक्ष मनुष्य हानिपेक्षा मालमत्तेचें नुकसानच अधिक गंभीर स्वरूपाचें झालेलें आहे. हवाई हल्ल्यास बळी पडणारे व त्यांचे कुटुंबीय ह्यांस तेथील सरकार आर्थिक मदत करतें. मृत्यू आल्यास मृताचे दफनविधीसाठीं ७½ पौंड देण्यांत येतात व कुटुंबियांस पेन्शन दिलें जातें. ज्यांस स्वावलंबी होण्याचें साधन नाहीं अशा ४० चे वरच्या वयाच्या अथवा मुलें असलेल्या विधवा झालेल्या स्त्रियांस दरमहा २ पौंड पेन्शन मिळतें; इतर विधवांस दरमहा ४ पौंडांचें पेन्शन मिळतें. विधुरांस दरमहा २½ पौंड मिळतात. पहिल्या मुलास २ पौंड व त्यापेक्षा अधिक मुलें असल्यास उतरत्या प्रमाणांत अलाबन्सहि मिळतो. हल्ल्यांत सापडून कायमचे निकामी झालेल्यांनाहि व त्यांच्या कुटुंबियांस प्रत्यक्ष लढाईवर गेलेल्या सैनिकांचे बरोबरीनेंच पेन्शन मिळतें. जखमी झालेल्यापैकी फारच थोडे कायमचे पंगू होतात, असा अनुभव आहे. मोडलेले अवयव दुरुस्त करून जखमी माणसांस पूर्ववत् करण्याचे डॉक्टरी प्रयत्न अतिशय मोठ्या प्रमाणावर करण्यांत येतात. खालील तक्त्यांत हवाई हल्ल्यांस बळी पडलेल्यांचे संबंधीं आकडे दिले आहेतः—

| | मृत | जखमी (इस्पितळांत ठेवून घ्यावे लागलेले) | एकूण बळी |
|---|---|---|---|
| सप्टेंबर १९३९-ते ऑगस्ट १९४० | १,४९४ | १,९८० | ३,४७४ |
| सप्टेंबर-डिसेंबर १९४० | २२,२८२ | २८,५२२ | ५०,८०४ |
| एकूण १९४१ | २०,८६३ | २१,८३९ | ४२,७०२ |
| जानेवारी-सप्टेंबर १९४२ | २,८५९ | ३,५४० | ६,३९९ |

## धान्य पुरवठ्याचा प्रश्न

( प्रो. काळे ह्यांचें मुंबई येथील रेडिओवरून झालेलें भाषण, ऑल इंडिया रेडिओच्या अधिकाऱ्यांचे परवानगीनें उद्‌धृत केलें आहे. )

हिंदुस्थानांत अनेक प्रांत आणि संस्थानें आहेत, त्यांनीं आपापल्या पुरतें नियंत्रण केल्यास धान्यपुरवठ्याच्या राष्ट्रीय धोरणांत एकसूत्रता येणें शक्य नाहीं, आणि नियंत्रणाचे परिणाम प्रतिकूल व घोटाळ्याचे झाल्यावांचून राहणार नाहींत. युद्ध-धोरण सबंध हिंदुस्थानचें जर एक आहे तर धान्यपुरवठ्याच्या योजना प्रांतांप्रांतांत व संस्थानांसंस्थानांत तुटक असून कसें चालेल ? देशाच्या निरनिराळ्या भागांस त्यांच्या धान्याचा योग्य हिस्सा मिळेल अशी व्यवस्था मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या सहाय्यानें करणें अगत्याचें आहे. हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री श्री. सरकार ह्यांनीं या प्रश्नाबाबत अलीकडे कलकत्ता येथें खुलासा केला तो लक्षांत घेण्यासारखा आहे. सरकारी नियंत्रणाचे अभावीं पुरवठा व बाजारभाव ह्यांमध्यें विलक्षण गोंधळ माजला असता, असें म्हणून सध्याच्या नियंत्रण योजनांत सुधारणा होण्याची आवश्यकता असल्याचें त्यांनीं सांगितलें. ह्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट त्यांनीं सांगितली ती ही आहे कीं, जेथें जेथें स्थानिक जरुरीपेक्षां अधिक धान्य असेल तेथून तें त्या धान्याचा तुटवडा असेल अशा भागांत पुरविण्याचें कार्य हिंदुस्थान सरकार स्वतः करील. धान्याची खरेदी आणि विक्री प्रत्यक्ष सरकारच्या वतीनें व्हावयाची असल्यानें आणि तें मालाची वाटणी प्रांतांच्या जरूरीप्रमाणें करणार असल्यामुळें प्रांतांची परस्पर स्पर्धा टळेल आणि "चोरबाजारा" स व नफेबाजीस आळा बसेल. प्रांतांतलें अंतर्गत नियंत्रण अर्थात् प्रांतिक सरकारास करावें लागेल हें उघड आहे; आणि मार्गांतल्या अडचणी दूर सारून ही जबाबदारी त्यांनीं पार पाडिली पाहिजे.

कांहीं व्यापारी व उत्पादक नफेबाजीच्या किंवा पुढें किंमती वाढतील ह्या हेतूनें धान्याचा पुरवठा दाबून बसले आहेत आणि भरमसाट भावानें त्यांचे गुप्त व्यवहार चालतात. ह्या कारणानें सध्याची दुर्मिळता व हलाखी उत्पन्न झाली आहे, आणि या कारवायांवर कडक उपाययोजना होणें अगत्याचें झालें असें सांगण्यांत येत आहे. हे प्रकार मुंबईत बंद पाडण्याच्या उद्देशानें विशिष्ट मर्यादेबाहेर धान्य जवळ बाळगणारांनीं अधिकाऱ्यांस ही गोष्ट कळवली पाहिजे असा हुकूम प्रांतिक सरकारनें काढला आहे. शहराबाहेर धान्य हलवण्याबाबतहि असेच निर्बंध घालण्यांत आले आहेत. धान्याच्या पुरवठ्यांतली विषमता दूर करावयास सरकारला ह्याच्याहि पुढें जावें लागण्याचा संभव आहे. प्रत्येक कुटुंबास लागणारें खाद्यपदार्थांचे प्रमाण निश्चित करून त्या ठराविक हिश्यापेक्षां अधिक माल कोणासहि मिळणार नाहीं अशी व्यवस्था म्हणजे रेशनिंग सरकारला करावें लागणार आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून कुटुंबांची मोजणी करण्याची जरूर पडणार आहे आणि त्यासंबंधांत नवीन कायदा करून त्या बाबतींतले अधिकार सरकारनें स्वतःस घेतले आहेत. कांहीं शहरांत रेशनिंग मर्यादित स्वरूपांत अगोदरच चालू झालें आहे आणि शक्य तेथें ह्या पद्धतीचा विस्तार करावा लागेल.

खाद्यपदार्थांच्या रेल्वेवहातुकीस अग्रस्थान देण्याचें धोरण हिंदुस्थान सरकारनें अंगिकारल्याचें जाहीर झालेंच आहे. उपलब्ध असलेल्या धान्यपुरवठ्याची देशभर वाटणी जरूरीप्रमाणें समदृष्टीनें करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. योग्य भावानें धान्य विकण्याचे आणि दुर्मिळतेस व नफेबाजीस आळा घालण्याचे प्रयत्न चालले आहेत. धान्य दडवून ठेवणें आणि नफेबाजी यांचा बंदोबस्त केला जात आहे आणि रेशनिंगची तयारी चालू आहे. धान्याच्या टंचाईवर शक्य ते सर्व उपाय एकाच वेळीं योजिले गेले पाहिजेत. त्यांमध्यें देशांतल्या धान्यांचा पुरवठा होईल तितका वाढवणें हा एक महत्त्वाचा इलाज आहे. धान्यांचें उत्पादन शक्य तेथें व शक्य तेवढें वाढवण्याचा प्रयत्न झाला आहे आणि होत आहे. पण धान्यांची निर्यात थोपवणें आणि बाहेरून धान्य आणून एकूण पुरवठ्यांत भर घालणें हाहि एक महत्त्वाचा मार्ग सरकारास सुचविण्यांत आला होता. व्यापारी मंडळ्यांनीं या सूचनेवर विशेष जोर दिला होता आणि हिंदुस्थानच्या एकूण धान्याच्या उत्पादनाचे मानानें होणारी निर्यात अल्प असली तरी देशांत खाद्यपदार्थांची टंचाई भासत असतां ती थांबविणें अगत्याचें आहे असें सरकारास सांगण्यांत येत होतें. त्यावर हिंदुस्थान सरकारचा खुलासा प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें समजतें कीं, धान्याची निर्गत मर्यादेंत आणण्यांत आली असून ती सर्वस्वीं बंद करण्याचा सरकारचा विचार आहे. मध्यवर्ती सरकारच्या व्यापारमंत्र्यांनीं अशी माहिती दिली आहे कीं पूर्वी दर महिन्यास अडतीस हजार टन तांदूळ सिलोनला पाठविण्याचें ठरलें होतें, पण ही निर्गत बारा हजार टनांवर आणिली आहे आणि ती फक्त मद्रासेहूनच होत आहे. तथापि, मार्च महिन्यापासून परिस्थितीप्रमाणें ती कमी झालेली निर्गतही थांबविण्यांत येईल. अन्नपुरवठाविषयक सरकारी धोरणाविषयींची अधिक उत्तेजनकारक बाब गव्हाच्या आयातीसंबंधांतील व्यवस्थेची आहे. ऑस्ट्रेलियामध्यें बाहेर पाठवितां येण्याजोगा गहूं आहे आणि त्याच्या आयातीच्या मार्गांत वहातुकीच्या साधनांची अडचण होती ती आतां दूर करण्यांत आली आहे आणि ऑस्ट्रेलियन गहूं हिंदुस्थानच्या बंदरांत उतरला आहे व आणखी उतरण्याचा रंग आहे. देशांतील गव्हाचा साठा वाढवून धान्याची आज जी टंचाई भासत आहे ती दूर होण्याच्या मार्गांत आतां आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. पंजाबमधला कांहीं गहूं इतर प्रांतांच्या उपयोगासाठीं मोकळा होण्यासारखा आहे असें दिसतें. ह्या दोन्ही गोष्टींमुळें गव्हाचे बाबतींत मुंबई प्रांतास बरीच मदत होण्यासारखी आहे. अंतर्गत उत्पादनांत शक्य ती वाढ, गव्हासारख्या धान्याची आयात, धान्याचा निर्गतीस मर्यादा किंवा बंदी, एकसूत्री राष्ट्रीय धोरणानें प्रांतांत व संस्थानांत खाद्यपदार्थांची जरूरीप्रमाणें वाटणी, वहातुकीच्या साधनांच्या ने-आणीस विशेष सवलती, मालाच्या खरेदी-विक्रीचें नियमन, किंमतींवर नियंत्रण, नियंत्रित भावानें विक्रीचीं दुकानें, रेशनिंग इ० उपाय राष्ट्रीय नियंत्रणात्मक योजनेचीं अंगें होत. ही योजना यशस्वी होऊन "घरची आघाडी" मजबूत बनण्यास मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानी अधिकारी, व्यापारी व श्रीमान् लोक व मध्यम स्थितींतली आणि गरीब जनता यांचें शिस्तीचें व पूर्ण सहकार्य व्हावयास हवें. खाद्यपदार्थ पुरवण्याच्या कोणत्याहि योजनेंत गोरगरीबांच्या किमान अन्नविषयक गरजा विशेष आयास न पडतां भागवल्या-

जाण्याची तरतूद केली जाणें अगत्याचें आहे. ह्यासाठी व्यापाऱ्यांची नफेबाजी जशी बंद झाली पाहिजे तशी ऐपतदार लोकांच्या खायपदार्थांच्या फाजील उपयोगासहि कात्री लागली पाहिजे. एकाच हौदांतून निरनिराळे लोक पाणी काढीत असतां कांहीं घटिंगण मंडळींनीं प्रमाणाबाहेर पाणी उपसलें तर इतरांस रिक्त हस्तानें परत जाण्याची पाळी येणार हें सांगावयास नको. रेशनिंगची योजनाही ही आपत्ति टाळण्यासाठीच अमलांत आणण्यांत येत असते. सर्व प्रकारच्या, मेजवान्या, पार्ट्या, उत्सवप्रसंग इ. च्या निमित्तानें लोकांनीं, विशेषतः ऐपतदार लोकांनीं, अन्नावर जादा खर्च न करितां त्यास फाटा द्यावा किंवा निदान त्यांत काटकसर करावी अशा अर्थाच्या सूचना प्रकट रीतीनें करण्यांत येत आहेत, त्या अभिनंदनीय आहेत. अन्न-सामुग्रीविषयक नियंत्रणाच्या कायद्याची कडक अंमलबजावणी सरकारनें करावयाची आहे त्याप्रमाणेंच लोकांनींहि सहकारितेनें व संघशक्तीनें त्या सामुग्रीच्या वाटणीस सहाय करावयाचें आहे.

(समाप्त)

### चलनाचा विस्तार व घाउक बाजारभाव

(लक्ष रुपये)

| | प्रचलित नोटा व रुपये ह्यांच्या संख्येंत वाढ | कलकत्ता इंडेक्स नंबर (जुलै, १९१४ मधील घाऊक-बाजार-भाव=१००) |
|---|---|---|
| १९३८-३९ ... ... | − ९,६२ | ९५ |
| १९३९-४० ... ... | + ५९,५३ | ११५ |
| १९४०-४१ ... ... | + ५२,३४ | ११९ |
| १९४१-४२ ... ... | + १,५९,५८ | १४४ |
| १९४२-४३ ... ... | | |
| एप्रिल ... ... | + ३५,६० | १५७ |
| मे ... ... | + ५५,३३ | १६९ |
| जून ... ... | + ६५,०७ | १८२ |
| जुलै ... ... | + ७०,७२ | १८२ |
| आगष्ट ... ... | + ९४,९६ | १९२ |
| सप्टेंबर ... ... | + १,१५,३२ | १९८ |
| आक्टोबर ... ... | + १,४२,३० | २०९ |
| नोव्हेंबर ... ... | + १,७४,४९ | २२७ |
| डिसेंबर ... ... | + २,१५,६१ | २३८ |

## बँकिंगविषयक एक निवाडा

### इंडियन ह्यूम पाइप कंपनी विरुद्ध त्रावणकोर बँक

इंडियन ह्यूम पाइप कं. लि. चा व्यवहार त्रावणकोर संस्थानांत नागरकाइल येथें व मुंबई येथें चालू होता. त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँकेच्या नागरकाइल शाखेंत कंपनीचें खातें होतें. बँकेची मुंबई येथें शाखा होती, परंतु कंपनीचें तिच्यांत खातें नव्हतें. कंपनीच्या नांवानें इंडियन बँक लि. च्या मुंबई शाखेवर ५ हजार रुपयांचा चेक आला होता, त्याचे पैसे वसूल करून ते बँकेच्या नागरकाइल शाखेंतील कंपनीच्या खात्यांत भरण्यास कंपनीनें बँकेच्या मुंबई शाखेस १४ जून १९३८ रोजीं कळविलें. पैसे वसूल करून ते पाठविण्याचा खर्च (४ रु. ११आ.) कंपनीनें भरला. मुंबई शाखेनें दुसऱ्या दिवशीं चेकचे पैसे वसूल केले, परंतु ते नगरकाइल शाखेकडे पाठविलेच नाहींत. २० जून, १९३८ रोजीं बँकेनें पैसे देण्याचें बंद केलें. बँक लिक्विडेशन-मध्यें गेली, तेव्हां चेकचे पैसे मुंबई शाखेंतच राहिले; ते नगर-काइल शाखेकडे पाठविलेलेच नव्हते. ही रकम बँकेनें ट्रस्ट म्हणून धारण केली, असें समजून ऑफिशिअल लिक्विडेटरांनीं ती कंपनीस द्यावी असा हुकूम करण्यांत यावा, असें कंपनीचें म्हणणें होतें. ज्या कोर्टांत कंपनीचा दावा प्रथम चालला, त्या कोर्टानें कंपनीचें म्हणणें अमान्य केलें. नगरकाइल शाखेकडे पाठविण्यासाठी मुंबई शाखेकडे पैसे दिले ते बँकेनें विशिष्ट कार्यासाठीं स्वीकारले असा अर्थ निघत नाहीं, ह्या मुद्यावर कोर्टाचा निर्णय आधारलेला होता. मद्रास हायकोर्टांत ह्या निर्णयाविरुद्ध अपील करण्यांत आलें.

### मद्रास हायकोर्टाचा निवाडा

"प्रस्तुत प्रकरणांत पैसे देण्याचें बंद करण्यापूर्वी बँकेनें चेकचे पैसे वसूल केलेले होते, परंतु ते नगरकाइलला पाठविले नाहींत. ते तिकडे पाठवण्यापूर्वी त्यावर बँकेस हक्क सांगतां येत नाहीं. शाखा ह्या मुख्य कचेरीच्या एजन्सी समजल्या जात असल्या, तरी कांहीं विशिष्ट बँकिंगच्या व्यवहारांबाबत त्या शाखा स्वतंत्र मानण्यांत येतात. कंपनीच्या दृष्टीनें, बँकेच्या नगरकाइल व मुंबई शाखा ह्या स्वतंत्र संस्थाच ठरतात व कंपनी आणि मुंबई कचेरी ह्यांचेमध्यें बँक व तिचेकडे चालू खातें ठेवणारें गिऱ्हाइक असा संबंध कधींच उपस्थित झाला नव्हता. म्हणून, प्रस्तुत प्रकरणांत बँकेनें धारण केलेले कंपनीचे पैसे एजंट ह्या नात्यानेंच ठेवलें असें समजलें पाहिजे. नागरकाइल शाखेंतील कंपनीच्या खात्यांत रकम जमा झाली असती, तर परिस्थिति भिन्न झाली असती."


## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

### ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामधाम, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## सोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,

Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL .

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख १७ फेब्रुवारी १९४३ अंक ७

महायुद्ध द्वारांशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

नोटीस देण्यांत येते कीं बँकेच्या भागीदारांची आठवी साधारण सभा रविवार, ता. २८ फेब्रुवारी १९४३ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां (नवीन स्टँ. टा.) बँकेचे रजिस्टर्ड ऑफिस, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मी रोड, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

(१) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४२ अखेरचा ताळेबंद, नफातोटापत्रक, आणि डायरेक्टरबोर्डाचा व ऑडिटर्सचा रिपोर्ट यांचा विचार करणें.
* (२) डिव्हिडंड मंजूर करणें.
(३) निवृत्त होणाऱ्या ( फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या ) चार डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.
(४) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.
(५) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

बोर्डाच्या हुकुमावरून

पुणें शहर, ता. २४-१-१९४३ — जी. एल. हळवे, ऑफिशिएटिंग मॅनेजर

वि. सू.—बँकेचीं शेअर्ट्रॅन्स्फर बुकें ता. २६-२-४३ ते ५-३-४३ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

*डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें शुक्रवार, ता. १९ मार्च १९४३ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यांवर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

कायद्याचीं मराठी पुस्तकें
१ इन्कम् टॅक्स कायदा (सुधारणांसह) किं. १॥ रु.
२ कर्ज देण्याघेण्याबाबत कायदा किं. २ रु.
३ मृत्युपत्राचा कायदा किं. १। रु.
४ हिंदु स्त्रीधनाचा कायदा किं. १२ आ.
५ विवाहाचा कायदा किं. १२ आ.
याशिवाय मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या "न्याय बोध" मासिकाचे वर्गणीदार व्हा. वा. व. ५ रु. नमुना अंक मागवा.
—न्यायबोध-ऑफिस, महाल, नागपूर शहर

# विविध माहिती

### शेड्यूल्ड बँकांचे आकडे

शेड्यूल्ड बँकांच्या विषयींची ताजी माहिती प्रसिद्ध झाली आहे तीवरून असें समजतें कीं त्यांच्याकडे एकूण ठेवी ४६६ कोटि रुपयांच्या होत्या आणि त्यांनीं दिलेल्या कर्जाची एकूण बेरीज १०७ कोटि रुपये होती.

### अ. भा. कारखानदार परिषद

अखिल भारतीय कारखानदार परिषदेचें तिसरें अधिवेशन बडोदे येथें सर एम. विश्वेश्वर अया यांचे अध्यक्षतेखालीं भरलें.

### देवकरण नानजी इन्व्हेस्टमेंट कंपनी

मेसर्स देवकरण नानजी ही सुप्रसिद्ध फर्म वरील नांवाची एक इन्व्हेस्टमेंट कंपनी लवकरच स्थापन करणार आहे.

### मागसलेल्या जाती

नलगोंडा जिल्ह्यांतील ५८ जातींचा समावेश निजाम सरकारनें मागसलेल्या जातींत केला आहे; त्यामुळें मागसलेल्या जातींस मिळणाऱ्या सवलतींस ह्या ५८ जाती पात्र झाल्या आहेत. आर्थिक दुःस्थितींत असलेले ख्रिस्ती व मुसलमान ह्यांसही मागसलेल्या जातींसमान समजलें जाईल.

### रबरी बनावटीच्या वस्तू

रोजच्या उपयोगाचे सुमारें ३० हजार जिन्नस आतां रबरापासून बनविण्यांत येतात. युद्धानंतर एक लाखापेक्षा अधिक वस्तू रबरापासून तयार करण्यांत येऊं लागतील. नैसर्गिक रबर पुनः बाजारांत येऊं लागलें, कृत्रिम रबराचें उत्पादन वाढलें व रसायनशास्त्रज्ञांनीं कृत्रिम रबराचे नवे नवे उपयोग शोधून काढले, म्हणजे सहाजिकच रबराच्या बनावटीच्या जिनसांचीहि संख्या वाढेल.

### चलनी नोटा

निजाम सरकारानें इश्यू खात्यास ३० कोटि रुपयेपर्यंत किंमतीच्या चलनी नोटा काढण्याचा अधिकार दिला आहे.

### आगपेट्यांच्या निर्गतीवर नियंत्रण

मुंबई शहर व उपनगर जिल्हा ह्यांतून आगपेट्या बाहेर नेण्यास सरकारी परवाना लागतो. प्रवाशानें आपल्याबरोबर एक डझन आगपेट्या नेण्यास हरकत नाहीं. आगपेट्यांच्या कारखानदारांस परवान्याची आवश्यकता नाहीं.

### चीनमधील ब्रिटिश व अमेरिकन कारखाने

जपानच्या अंकित असलेल्या चिनी मुलुखांतील सुमारें एक हजार ब्रिटिश व अमेरिकन कारखाने, क्लब आणि दुकानें हीं नॅनकिंग सरकारचे ताब्यांत देण्यांत येणार आहेत.

### लाहोर येथें नवी टांकसाळ

कलकत्ता आणि मुंबई येथील टांकसाळी अपुऱ्या वाटूं लागल्यामुळें लाहोर येथें एक नवी टांकसाळ स्थापन करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. तिचें काम जूनमध्यें चालू होईल अशी अपेक्षा आहे.

### दोनशें तेरा कोटि हलक्या नाण्यांचा पुरवठा

आठ आण्यांपासून एक पैसा किंमतीचीं एकूण २१३ कोटि रुपये किंमतीची हलकीं नाणीं हिंदुस्थान सरकारनें युद्धाच्या प्रारंभापासून प्रचलित केलीं आहेत.

### नाणें बाजार

मुंबईच्या नाणें बाजारांत गेल्या आठवड्यामध्यें पैशाचा पुरवठा विपुल होता. साडेतीन टक्के व्याजाच्या प्रॉमिसरी नोटची किंमत ९४ रुपयांवर स्थिर होती. ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ११ पै होता. चांदीचा भाव १०० रुपयांच्या आसपास राहिला आणि सोन्याचा ६५ रु. ४ आण्यांच्या सुमारांत होता.

### रशियनांनीं रोस्टॉव्ह सर केलें

पूर्व आघाडीवरील रॉस्टॉव्ह हें अत्यंत महत्त्वाचें शहर रशियनांनीं जर्मन फौजांस हाकून देऊन सर केलें आहे.

### कॉमर्स क्लब

वेगवेगळया हिंदी व्यापाऱ्यांत व वेळोवेळ हिंदुस्थानांत येणाऱ्या विदेशी व्यापाऱ्यांत सलोखा निर्माण व्हावा ह्या हेतूनें व्यापाऱ्यांचा एक क्लब मुंबई येथें स्थापन करण्यांत आला आहे. धंदा व करमणूक ह्या दोन्हींची क्लबांत सोय होईल.

### पंजाबमधील नवे उद्योगधंदे

पंजाब प्रांताचे फडणवीस, सर मनोहरलाल, ह्यांनीं पंजाब फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीजच्या वार्षिक सभेंत भाषण केलें, त्यांत त्यांनीं कारखानदारांस व व्यापाऱ्यांस थोडासा उपदेश केला. पंजाबांत अनेक नवे धंदे स्थापन झाले असले, तरी उत्पादकांनीं ते स्थापन करते वेळीं दूरदृष्टीनें योजना आखलेल्या दिसत नाहींत, असें ते म्हणाले. त्या प्रांतांत स्थापन होत असलेल्या नव्या बँकांच्या संख्येबद्दल त्यांनीं इषारा दिला.

### सिलोनला तांदुळाची निर्गत

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें एका प्रश्नास उत्तर देतांना, हिंदुस्थान सरकार सिलोनला कांहीं विशिष्ट टन तांदूळ पुरविण्यास बांधलेलें नाहीं असें व्यापार मंत्रि श्री. सरकार, ह्यांनीं सांगितलें. "हिंदुस्थानाची नड भागविल्यानंतरच सिलोनला तांदूळ पाठविण्याचा आहे. सिलोनी सरकार चालू बाजार भावानेंच तांदुळाची खरेदी करतें. १९३९ सालीं हिंदुस्थानांतून सिलोनकडे ९२३/४ हजार टन, १९४० सालीं १०३१/२ हजार टन, १९४१ सालीं १४९ हजार टन व १९४२ सालीं १७६३/४ हजार टन तांदूळ गेला. शक्यतोंवर सिलोनकडे होणारी तांदळाची निर्गत चालू ठेवण्याचें सरकारी धोरण आहे. हिंदुस्थानांतील अन्न-पुरवठ्याची परिस्थिति गंभीर झाली तर निर्गत बंद करण्यांत येईल. सध्या जेवढा तांदूळ सिलोनकडे जातो, तेवढा तांदूळ खाणाऱ्या हिंदुस्थानांतील लोकांस दोन दिवस सुद्धां पुरणार नाहीं" असें सरकारी धोरणाचें श्री. सरकार ह्यांनीं समर्थन केलें.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५० | रशियाचे अपूर्व विजय आणि जर्मनीची त्रेधा– धान्याच्या पुरवठ्याविषयीं चर्चा– गरिबांसाठी स्वस्त कापड– हलक्या नाण्यांचा पुरवठा–हिंदी रेल्वेजचा कारभार | ५४ |
| २ धान्य पुरवठ्याविषयींचें सरकारी धोरण ... | ५१ | ७ आजचा जपान ... | ५५ |
| ३ मालाची किंमत व मालावरील कराची आकारणी ... | ५२ | ८ रेल्वेजचें अंदाजपत्रक | ५५ |
| ४ नाण्यांची चणचण व सरकारी उपाययोजना ... | ५२ | | |
| ५ अन्न-पुरवठा कमी नाहीं | ५३ | | |
| ६ स्फुट-विचार | | | |



# अर्थ

बुधवार, ता. १७ फेब्रुवारी, १९४३


## धान्यपुरवठ्याविषयींचें सरकारी धोरण

प्रस्तुत धान्यपुरवठ्याचा प्रश्न जनतेस इतका जिव्हाळ्याचा झाला आहे कीं त्याविषयींची अधिकृत माहिती आणि सरकारी धोरण ह्यांचेबाबत जनतेस उत्कंठा लागून राहणें स्वाभाविक आहे. ह्या गोष्टीची हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार ह्यांस पूर्ण जाणीव आहे आणि धान्यपुरवठ्याची शक्य तितकी समाधानकारक व्यवस्था करण्याचे त्यांचे प्रयत्न जारीनें चालू आहेत. धान्यपुरवठ्याविषयीं परिस्थिति काय आहे याची अधिकृत माहिती मध्यवर्ती सरकारचे व्यापार मंत्री, श्री. नलिनीरंजन सरकार, यांनीं अन्न–पुरवठा सल्लागार समितीच्या सभेचें उद्घाटन करतांना दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत दिली. तिच्या तपशीलाकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. चालू सालांतल्या धान्याच्या उत्पादनाची परिस्थिति समाधानकारक आहे असें जरी म्हणतां आलें नाहीं तरी ती भीतिदायक किंवा काळजी करण्यासारखी आहे असेंहि मानण्याचें कारण नाहीं, हा श्री. सरकार ह्यांनीं दिलेल्या माहितीचा निष्कर्ष आहे आणि जो कांहीं तुटवडा भासत आहे तो बहुतांशीं कित्येक लोकांनीं धान्य बाहेर न काढतां तें दाबून ठेवलें आहे, त्याचा परिणाम आहे असें त्यांचें म्हणणें आहे.

आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ श्री. सरकार यांनीं त्यांस उपलब्ध असलेली माहिती खालीलप्रमाणें दिली आहे. तांदुळाचें १९४२ मधलें खरीप पीक २५५ लक्ष टन म्हणजे पूर्वीच्यापेक्षां दहा लक्ष टन कमी भरेल. चालू महिना अखेर त्याविषयींची शेवटची माहिती हातीं आली म्हणजे उत्पादन ह्या अंदाजापेक्षां थोडें अधिक भरण्याचा संभव आहे. बाजरी आणि ज्वार ह्यांचें उत्पादन ९२ लक्ष टन होईल आणि तें युद्धापूर्वीच्या आकड्याच्या मानानें थोडें अधिकच भरेल. गहू, हरबरा इत्यादि रब्बीच्या पिकाचा अंदाज अजून उपलब्ध झालेला नाहीं. गेल्या हंगामापेक्षां यंदा १४ लक्ष टन अधिक एकरांत गव्हाची पेरणी झालेली आहे आणि पाऊसपाणी बरें झालें असल्यानें चालू पीक अधिक येईल अशी अपेक्षा आहे. वर नमूद केलेली तांदुळाच्या पिकांतली खोट, १४ लक्ष टन रंगून तांदुळाची बंद झालेली आयात, हिंदुस्थानच्या आसपासच्या देशांची मागणी व सैन्यास लागणारा पुरवठा हीं सगळीं हिशेबांत घेतलीं असतां खरीप पिकांचे बाबतींत २८ लक्ष टन धान्याचा तुटवडा येईल असा हिशेब होतो. अंदाजापेक्षां प्रत्यक्ष उत्पादन अधिक झाल्यास तुटवडा त्यामानानें कमी होऊन तो २५ लक्ष टनांच्या सुमारांत राहील असें म्हणण्यास हरकत नाहीं. गव्हाच्या पिकांत सुधारणा झाली नाहीं आणि हें धान्य मुळींच आयात झालें नाहीं तरी गव्हाचा तुटवडा ३ लक्ष टनांचे वर जाणार नाहीं असा श्री. सरकार यांचा अंदाज आहे. त्यांस अशी आशा आहे कीं, धान्याचा तुटवडा होणारच नाहीं आणि झाला तरी मागें असल्या परिस्थितींतून देश पार पडला तसाच तो सध्याच्या प्रसंगीं पडेल.

हा झाला धान्याच्या उत्पादनाचा अंदाज–पण त्या संबंध प्रश्नासंबंधांतलें हिंदुस्थान सरकारचें धोरण काय आहे? त्याविषयींचा खुलासा व्यापारमंत्र्यांनीं खालीलप्रमाणें केला. (१) धान्यांच्या योग्य पुरवठ्याची [ त्याची आयात धरून ] आणि त्यांच्या प्रांतवार वाटणींची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनें स्वतः-वर घेतली आहे. अधिक पुरवठा असलेल्या प्रांतांचीं सरकारें ह्या बाबतींत त्या सरकारच्या वतीनें काम करतील. तुटवडा असणाऱ्या प्रांतांच्या सरकारांनीं बाहेरून मिळालेल्या धान्याची अंतर्गत वाटणी करण्याची आहे. (२) धान्याच्या खरेदी–विक्रीच्या व्यवस्थेसंबंधानें पुढें काय योजना होणार ह्याची व्यापारी, उत्पादक व जनता ह्यांस वाटणारी अनिश्चितता दूर केली जाईल आणि मामुली व्यापाराच्या पद्धतीनें व्यवहार होतील अशी खबरदारी घेण्यांत येईल (३) धान्याच्या अंतःप्रांतिक वाटणीवर नियंत्रण ठेवण्यांत येईल. आणि प्रांतांस धान्य मिळावयाचें तें त्यांच्या सरकारच्या वतीनें प्राप्त करून घ्यावें लागेल. ह्यासंबंधांत सरकारी नियंत्रणावर विशेष जोर देण्यांत येईल. (४) शिल्लक गहू बाहेर यावा म्हणून त्याच्या किंमतीवरील नियंत्रण काढून घेण्यांत आलें आहे. धान्य मुद्दाम दाबून ठेवणारांचा माल जप्त केला जाईल, पण हें शेतकरी व सामान्य जनता ह्यांस लागू नाहीं. मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांचें पूर्ण सहकार्य होण्यासाठी धान्यपुरवठ्यापुरते प्रांतिक अधिकारी हिंदुस्थान सरकारच्या दिमतींत आहेत असें मानण्यांत येईल. धान्याचा पुरवठा आणि वाटणी ह्याविषयींचें मध्यवर्ती सरकारचें नवें धोरण यशस्वी होण्याकरितां दुसरेहि जरूरीचे उपाय योजले जातील. योजनेचा कारभार एकसूत्री आणि कार्यक्षम व्हावा ह्याविषयीं खबरदारी घेतली जाईल. ही व्यवस्था ठीक आहे. पण धान्याचें उत्पादन वाढवण्याचे शक्य ते सर्व उपाय अवलंबले जाण्याचें महत्त्व येथें ध्यानांत बाळगणें अगत्याचें आहे. मुंबईसारख्या परावलंबी प्रांतांनीं ह्यासंबंधांत आपली शिकस्त केली पाहिजे. ह्या प्रांताच्या गव्हर्नरांचे सल्लागार, मि. नाइट, ह्यांनीं ह्या मुद्यावर परवां केलेल्या आपल्या एका भाषणांत जोर दिला हें योग्य आहे. नवीन ठिकाणीं पिकें लावणें किंवा पिकांची वाढ करणें ह्याकामीं मुंबई सरकार शेतकऱ्यांस सवलती व सहाय देईल असें आश्वासनहि त्यांनीं दिलें.

## मालाची किंमत व प्राप्तीवरील करांची आकारणी

व्यापाऱ्यांचे जवळील शिल्लकी साठा व कारखानदारांचे जवळील शिल्लकी कच्चा माल ह्यांची व्यवहाराचे हिशेबांचे ताळेबंदाचे वेळीं किंमत किती धरावयाची हा एक महत्त्वाचा प्रश्न असतो. ताळेबंदाचे तारखेस मालाची बाजारभावानें होणारी किंमत व मालास पडलेली मूळ किंमत ह्यांपैकी जी रकम लहान असेल, तीच हिशेबांत घेणें युक्त असतें. खरेदीच्या किंमतीपेक्षा बाजारभावानें होणारी किंमत जास्त असेल व ह्या ज्यास्त किंमतीनेंच मालाचें मोल ठरविलें, तर प्रत्यक्ष नफा हातीं येण्यापूर्वीच तो पदरांत पडला असें होईल. मागाहून किंमत उतरण्याचा संभव असतो, तो विचारांत घेणें अवश्यक असतें. मालाचा बाजारभाव जर उतरला असेल तर मात्र उतरलेल्या भावानेंच तो ताळेबंदांत दाखवावा लागतो.

इनकमटॅक्सच्या दृष्टीनें विचार करतांनाहि वरील पद्धतीच श्रेयस्कर असते. प्राप्ती होणें ह्याचा अर्थ कांहींतर प्राप्त झालेलें असणें होय. प्राप्त होण्याची अपेक्षा असणें म्हणजे प्राप्ती होणें नव्हे. अपेक्षित प्राप्ती पुढें झाली नाहीं, तर ती प्राप्ती ह्या सदरांत आज कशी घालतां येईल? प्राप्तीमुळें मनुष्याची आर्थिक शक्ति वाढून त्यास तीवर कर भरण्याची जबाबदारी येते ह्या दृष्टीनें विचार केला असतांना, मालाची किंमत वाढली येवढ्यानें त्यावर प्राप्तीवरील कर बसूं शकत नाहीं. वाढलेल्या किंमतीनें मालाची विक्री होऊन प्रत्यक्ष हातीं नफा आला पाहिजे. एकाद्याजवळ माल शिलक आहे व त्यानें तो, बाजारभाव कितीहि वाढले तरी, विकला नाहीं तर त्यास नफा झाला असें म्हणतां येणार नाहीं. माल विकला तरच नफ्याचा प्रश्न उद्भवेल. माल विकला असता तर किती नफा झाला असता, ह्याची बरोबरी प्रत्यक्ष नफ्याशीं करून चालत नाहीं. मालाची ताळेबंदांतील किंमत ठरवितांना बाजारभावानें होणारी किंमत हिशोबांत धरली तर त्याचा अर्थ शिलक माल विकला आहे व 'अपेक्षित' नफा 'झालेला' दाखविला आहे, असा होईल. ह्या पद्धतीनें एकाद्या कंपनीनें ताळेबंद तयार करून डिव्हिडंड वाटले तर ती पुढें संकटांत येण्याचा संभव आहे. कारण, नफ्याऐवजी तिनें मूळ भांडवलच वाटलें, असा हा व्यवहार होईल. अशा कृत्रिम नफ्यावर इनकमटॅक्सची आकारणी करणेंहि चुकीचें होईल. प्राप्तीवरील कर लादण्याऐवजीं भांडवलावर तो बसविल्यासारखा होईल.एकाद्यास त्याच्या मालास पडलेली मूळ किंमत सांगतां आली नाहीं, तर त्याची बाजारभावाची किंमत गृहीत धरून त्यावर कर बसविणें सयुक्तिक होणार नाहीं. मूळ किंमतीचा अंदाज करूनच कराची आकारणी केली पाहिजे. मालाची प्रत्यक्ष विक्री होईल, तेव्हां खरा फायदा दिसून येईलच व नफ्यावरील आकारणी ज्यास्त झाली असेल तर पुढें नुकसान दाखवितां येईल व पुढील आकारणींत कर बसणार नाहीं असें म्हटल्यास त्यास उत्तर असें आहे, कीं आज निष्कारण भरलेला कर त्यामुळें परत येईलच असें सांगतां येत नाहीं. पुढें नफा झालाच नाहीं, नुकसानच होत गेलें तर आधी चुकीच्या नफ्याबद्दल भरलेला इन्कम टॅक्स परत मिळण्यास साधनच उरत नाहीं. श्री. आर. के. दलाल, बी. कॉम., एफ्. एस्. ए. ए., आर. ए., ह्यांनीं वरील प्रमाणें विवेचन करून, इन्कम टॅक्स आकारणीची बाजवी पद्धतच अंगिकारली पाहिजे अशा सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूनें सूचना द्याव्या असें इंडियन मर्चंट्स चेंबरच्या मासिकाच्या ताज्या अंकांतील आपल्या लेखांत सुचविलें आहे.

## नाण्यांची चणचण व सरकारची उपाययोजना

### हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं सांगितलेली माहिती

" युद्धास प्रारंभ झाल्यापासून जानेवारी, १९४३ अखेर एकूण २१३ कोटि, १० लक्ष दुय्यम नाणीं सरकारनें व्यवहारांत आणलीं. १९४० सालीं ४ कोटि रुपयांचीं नाणीं व्यवहारांतून गडप झालीं; १९४१ सालीं हा आकडा ५ कोटि रुपयांवर गेला व १९४२ च्या पहिल्या ११ महिन्यांत ९½ कोटि रुपयांचीं नाणीं गडप झालीं, मुंबई व कलकत्ता येथील टांकसाळींत नाणीं पाडण्याचें काम २४ तास चालू आहे व तेथें दरमहा १२½ कोटि दुय्यम नाणीं तयार होत आहेत. लाहोर येथें नवी टांकसाळ सरकार उघडणार आहे. ती सुरू झाली म्हणजे दुय्यम नाण्यांच्या मासिक उत्पादनांत ३ कोटि नाण्यांची भर पडेल. अशा रीतीनें दुय्यम नाण्यांची संख्या वाढविण्यांत येत आहे व नाण्यांचा साठा करणारांना शासन करून नाण्यांची चणचण कमी करण्यांत येत आहे. कांहीं दुसऱ्या देशांकरितां हिंदी टांकसाळींत नाणीं पाडण्यांत येतात, त्यांत किफायत चांगली होते. ह्या ऑर्डरी सरकारनें स्वीकारल्या, त्या वेळीं नाण्यांची चणचण पुढें भासेल अशी कल्पना नव्हती. टांकसाळींच्या उत्पादन शक्तीपैकीं एक शतांशाइतकीहि शक्ति ह्या ऑर्डरी पुऱ्या करण्यासाठी उपयोगांत आणली जात नाहीं व हें काम आतां अगदी कमी करण्यांत आलें आहे."

---

## धान्यपुरवठा थोडा कमी असला तरी तो अगदी अपुरा नाहीं

### ना. सरकार ह्यांनीं दिलेले आकडे

" युद्धापूर्वीच्या तीन वर्षांची खरीप तांदुळाच्या पिकाची वार्षिक सरासरी २६५ लक्ष टन आहे. १९४२ चा अंदाज २५५ लक्ष टनांचा आहे. बाजरी व ज्वारी ह्यांच्या वार्षिक उत्पादनाची युद्धपूर्व सरासरी ९१·८७ लक्ष टन आहे; १९४२ चें उत्पादन ९२·६४ लक्ष टन भरेल. रबीच्या पिकांचा अंदाज अद्याप करतां येत नाहीं, तथापि सध्यां गव्हाखालीं गतवर्षीपेक्षा १४ लक्ष एकर अधिक जमीन आहे. वरील सांगितलेली तांदळाच्या उत्पादनांतील घट, ब्रम्हदेशांतून येणाऱ्या तांदळाची वार्षिक १२ लक्ष टनांची बंद पडलेली आयात, कांहीं शेजारच्या देशांस लागणारा तांदूळ व लष्करासाठीं करावी लागणारी तांदळाची तरतूद हीं सर्व लक्षांत घेतां, खरिपाच्या पिकांत २८ लक्ष टनांची तूट पडते. अपेक्षित सुधारणा घडून आल्यास तूटीचा आकडा २५ लक्ष टनांवर येईल. रबीचें पीक नेहेमीपेक्षा अधिक आलें नाहीं व बाहेरून गव्हाची आयात केली नाहीं, तरी ह्या पिकांचे संबंधांतील तूट ३ लक्ष टन गव्हापेक्षा अधिक भरणार नाहीं. गव्हाखालील वाढतें क्षेत्र व पिकाची आजची सुस्थिति ह्यांवरून असें वाटतें, कीं ही तूट भरून येईल. गेल्या दहा वर्षांत अशी तूट एक दोन वर्षे भासलेली होती, तरी आपण त्यांतून विशेष अडचण न भासतां बाहेर पडलेलों आहों. धान्याचा भरमसाठ साठा करणारांचा माल जप्त करणें आवश्यक झालें असलें, तरी प्रत्यक्ष शेतकरी अथवा धान्याचे उपभोक्ते ह्यांस ह्या जप्तीच्या शिक्षेचा उपसर्ग पोचणार नाहीं."

# स्फुट विचार

## रशियाचे अपूर्व विजय आणि जर्मनीची त्रेधा

रशियन सेनानायकांनीं शत्रूविरुद्ध उलट मोहीम चालू करून दक्षिण आघाडीवर त्यास रेटीत रेटीत रॉस्टॉव्हच्या महत्त्वाच्या ठिकाणापर्यंत मागें हटविलें आहे आणि त्याची भयंकर हानी केली आहे. स्टॅलिनग्राडमध्यें रशियनांनीं अतुल पराक्रम करून जर्मन फौजांचा बीमोड केला आणि त्यांस जागजागीं घेरून त्यांचा नाश चालवला आहे. जर्मन फौजेस हें आलेलें विलक्षण अपयश नाझी पुढाऱ्यांस आपल्या लोकांपासून झाकून ठेवणें अशक्य झालें आहे. हिटलरच्या अजिंक्यपणाच्या जर्मनीमधील भ्रामक समजुतीस रशियाच्या दणदणीत विजयानें धक्का दिला आहे. गोबेल्स आणि गोअरिंग ह्या हिटलरच्या प्रभावळींतील पुढाऱ्यांस पूर्वेकडील आघाडीवर जर्मन सैन्याच्या ढडालेल्या धूळधाणीबद्दल आपल्या देशबांधवांचें सांत्वन करणें कठीण झालें आहे. रशियाचें लढाऊ सामर्थ्य कमी लेखून त्या देशाशीं युद्ध पुकारण्याचें धाडस हिटलरनें केलें आणि त्याच्या धोरणास उत्कृष्ट यशहि प्राप्त झालें; पण पुढें दैव आडवें येऊन त्यानें जर्मनीची बाजू सोडली असल्याच्या युक्तिवादावर आपल्या लोकांस नाझी पुढारी झुलवीत आहेत. तथापि, रशियाचे विजय नाझींच्या जिव्हारीं लागले आहेत ह्यांत शंका नाहीं. सैनिक, युद्धसामुग्री व कामगार ह्यांची जुळवाजुळव त्यांनीं चालू केली आहे आणि युद्धतयारीसाठी जनतेनें कमाल स्वार्थत्याग केला पाहिजे असा निर्वाणीचा संदेश ते देत आहेत. मुसोलिनीनें आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्घटना करून कारभाराचीं सर्व सूत्रें स्वतःच्या हातीं घेतलीं आहेत आणि नात्सींचें अनुकरण चालवलें आहे. रानटी बोल्शेव्हिकांपासून युरोपचें रक्षण करण्याचा आपण विडा उचलला आहे असें हिटलर म्हणत आहे. त्याच्यासारखा भलत्या महत्त्वाकांक्षेनें वेडावलेला सर्वाधिकारी सध्याच्या पूर्वेकडील आघाडीवरील भयंकर पराजयानें अधिकच पिसाळून आपल्या सत्तेखालील सर्व युरोप पणास लावील ही गोष्ट मित्रराष्ट्रें जाणून आहेत आणि जर्मनीचा पूर्ण पाडाव होईपर्यंत युद्ध चालू ठेवण्याचा निश्चय त्यांनीं जाहीर केला आहे. हिटलर नवीन डाव टाकण्याची तयारी करीत असला पाहिजे आणि त्याचा प्रतिकार करून त्याच्याविरुद्ध नवीन आघाड्या चालू करण्याची सिद्धता मित्रराष्ट्रांचे मुत्सद्दी करीत आहेत.

---

## धान्याच्या पुरवठ्याविषयीं चर्चा

धान्याची योग्य वाटणी निरनिराळ्या प्रांतांत व्हावी ह्या हेतूनें मध्यवर्ती सरकारच्या अन्नपुरवठा खात्याच्या विद्यमानें जी नवीन योजना अंमलांत आणली गेली आहे, तिच्याविषयीं चर्चा करण्यासाठीं दिल्ली येथें एक अखिल भारतीय परिषद् चालू महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत भरणार आहे. दरम्यान कांहीं दिवसांपूर्वीं दिल्लींत अन्नपुरवठा सल्लागार समितीची दुसरी सभा भरली होती. तीमध्यें धान्याचें उत्पादन वाढवावयाच्या उद्देशानें अलीकडे झालेल्या प्रयत्नांस किती यश आलें ह्याचा विचार होऊन येत्या शेतीच्या हंगामांत ह्या बाबतींत अधिक व्यापक रीतीची व जोराची योजनात्मक खटपट केली जाण्यासंबंधानें चर्चा झाली. नांगरटी खालीं येण्यासारख्या जमिनींत पिकें करण्यास शेतकऱ्यांस उत्तेजन देणें, खराब जमीन सुधारणें, पडीक जमीन पिकांसाठीं तयार करणें इत्यादि धान्याच्या पुरवठ्याच्या वाढीचे उपाय विचारांत घेतलें गेले. भांडवली व चालू खर्चाची तरतूद केली गेल्यास पुष्कळ रिकामी व नाकामी जमीन उपयोगी करतां येणें शक्य असून त्या मार्गानें देशाचा अन्नपुरवठा बराच वाढवितां येणें शक्य आहे यांत शंका नाहीं. एव्हांपासून अशा योजनांची चर्चा होऊन त्यांची रूपरेखा आंखण्यांत येत आहे हें समाधानकारक आहे.

---

## गरीबांसाठीं स्वस्त कापड

गरीबांसाठीं स्वस्त कापड उपलब्ध करून देण्याची योजना आतां पुरी होत आली असून, लवकरच तें कापड लोकांच्या हातीं पडूं शकेल. सध्याच्या योजनेप्रमाणें, धोतरें, साड्या व शर्टिंग हीं प्रत्येकीं तीन प्रकारचीं काढण्यांत येतील व गिरणीमालकांस आणि व्यापाऱ्यांस अगदीं थोडा नफा ठरेल अशा किंमतीस तीं विकण्यांत येतील. सध्याच्या बाजारभावापेक्षा हें कापड सुमारें ४० % स्वस्त पडेल अशी अपेक्षा आहे. स्टँडर्ड क्लॉथच्या उत्पादनाची व वाटणीची व्यवस्था पहाण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें स्टॅण्डर्ड क्लॉथ कमिशनरची नेमणूक केली आहे. कॉटन टेक्स्टाइल ॲडव्हायसरी पॅनेल सरकारास कापडाचें उत्पादन, वहातुक, वाटणी, किंमत, इत्यादि संबंधांत सल्ला देईल. गेल्या नोव्हेंबरमध्यें सरकारनें गिरण्यांस दिलेल्या ऑर्डरप्रमाणें मार्चमध्यें हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या केंद्रांत सुमारें १॥ कोटि वार कापड उपलब्ध होईल. त्याची वाटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली आहे:—आसाम, ४ लक्ष वार; बंगाल, ३० लक्ष वार. मुंबई, २४ लक्ष वार; पंजाब, १९ लक्ष वार; सिंध, ६.७ लक्ष वार; बाकीचें कापड कांहीं संस्थानांच्या वाट्यास जाईल. एप्रिलमध्यें गिरण्यांकडून आणखी तयार कापड मिळूं लागेल. ह्या बेतानें सरकार लवकरच ५ कोटि वार कापडाची गिरण्यांस ऑर्डर देणार आहे. वर्षअखेर, १५ कोटि वार कापड मिळेल अशी अपेक्षा आहे.

---

## हलक्या नाण्यांचा पुरवठा

देशभर हलक्या नाण्यांच्या पुरवठ्याचा तुटवडा तीव्रतेनें भासत असल्यामुळें हा प्रश्न मध्यवर्ती असेंब्लीची बैठक नुकतीच चालू झाली आहे, तीमध्यें उपस्थित केला जाणें स्वाभाविक होतें. तातडीच्या महत्त्वाचा विषय ह्या भूमिकेवर त्याची चर्चा झाली आणि तीमध्यें सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं कांहीं उपयुक्त माहिती दिली. नाणीं साठवण्याची प्रवृत्ति त्यांच्या टंचाईच्या बुडाशीं आहे असें सर्वसामान्य निदान करण्यांत आलें. नाण्यांच्या तुटवड्यास कलकत्त्यास प्रथम प्रारंभ झाला, आणि घाबरटपणाची साथ तेथून देशाच्या इतर भागांत पसरली असें म्हणून सरकारच्या फडणविसांनीं नाण्यांच्या साठवणीचीं कांहीं उदाहरणें दिलीं. दिल्ली येथें लहान नाण्यांस दैनिक मागणी तीन हजार नाणीं अशी होती, ती युद्धकाळांत वीस हजार झाली. रेल्वेजवर मागणी तिप्पट वाढली आणि पोस्ट ऑफिसांमध्यें ती वीसपट झाली. १९४० सालीं चार कोटी रुपये किंमतीचीं हलकीं नाणीं व्यवहारांत जिरलीं. हा आकडा १९४१ मध्यें ५ कोटि झाला आणि १९४२ नोव्हेंबर अखेर साडेनऊ कोटींपर्यंत हा आकडा चढला. मुंबई व कलकत्ता

पेपीठ टांकसाळींत नाणीं पाडण्याचें काम रात्रंदिवस चाललें आहे. आणि त्यांच्यामध्यें दर महिन्यास पाडल्या जाणाऱ्या नाण्यांची संख्या साडेबारा कोटि इतकी भरते. लाहोर येथें टत्र-करच स्थापन व्हावयाच्या नव्या टांकसाळींत आणखी दरमहा तीन कोटि नाणीं पडतील. सरकारपाशीं नाण्यांत असलेल्या धातूंचा भरपूर पुरवठा आहे आणि मागणी पुरी पडेपर्यंत नवींच नाणीं पाडीत आण्याचा त्यांचा निश्चय आहे. एकीकडे इतर देशांच्या उपयोगासाठी हिंदुस्थान सरकार आपल्या टांकसाळींत नाणीं पाडतें आणि ह्या देशांत तर नाण्यांचा तुटवडा आहे ह्या टीकेस उत्तर देतांना सर जेरेमी म्हणाले कीं हा व्यवहार फायद्याचा असतो, पण त्या योगानें हिंदी टांकसाळींची एक टक्क्या-इतकीहि उत्पादन शक्ति कामीं लागत नाहीं आणि तीहि आतां कमी करण्यांत आली आहे अशी माहिती त्यांनीं दिली.

---

## हिंदी रेल्वेजचा १९४१-४२ मधील कारभार

सरकारी मालकीच्या हिंदी रेल्वेजच्या कारभाराचा १९४१-४२ सालाबाबतचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असें दिसतें कीं ह्या राष्ट्रीय व्यवहारांत त्या वर्षी २८ कोटि निव्वळ नफा राहिला. त्यापैकी वीस कोटि रुपये मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींत त्याच्या उत्पन्नाचा हिस्सा म्हणून जमा करण्यांत आले आणि बाकीचे आठ कोटि घसारा फंडांत टाकण्यांत आले. प्रवासी आणि माल ह्यांच्या वाहतुकींत युद्धजन्य परिस्थितीमुळें वाढ झाल्यानें रेल्वेजच्या उत्पन्नांत अधिक वाढावा आला. १९४०-४१ मध्यें वहातुकीचें एकूण उत्पन्न ११७ कोटि रुपये झालें होतें, तें १९४१-४२ सालीं १३५ कोटि पर्यंत वर जाऊन त्यानें उच्चांक गांठला. कारभाराच्या खर्चांत सुमारें ८ कोटि रुपयांची वाढ झाली असली तरी एकुण खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं असलेलें प्रमाण वृत्तांताच्या वर्षी थोडेसें कमीच पडलें. रेल्वे प्रवाशांची संख्या ६२ कोटि होती, ती १९४०-४१ च्या मानानें पांच कोटींनीं अधिक होती. उतारूंच्या प्रवासांचे एकूण मैल २२०१ कोटि भरले आणि हा आकडाहि पूर्वीच्या सालापेक्षा वाढलेला आहे. प्रत्येक उतारूच्या प्रवासाची सरासरी ३५ मैल झाली असून ती पूर्व वर्षाच्या मानानें निश्चित अधिक आहे. मालाच्या वाहतुकीपासून रेल्वेजना मुख्य उत्पन्न होत असतें. ह्या बाबींच्या उत्पन्नाचे आकडे १९४०-४१ आणि १९४१-४२ या सालांत अनुक्रमें करून ८१ व ८९ कोटि रुपये असे होते. म्हणजे त्या बाबतींत एक वर्षांत ८ कोटि रुपयांची वाढ झाली. सर्व हिंदी रेल्वेजमध्यें मिळून ८४८ कोटि रुपयांचें भांडवल गुंतलेलें आहे. ह्यापैकी ७५४ कोटि हिंदुस्थान सरकारच्या रेल्वेजमध्यें आहे आणि बाकीचें सुमारें ९४ कोटि हिंदी संस्थानें, मंडळ्या, इत्यादींच्या मालकीचें आहे. रेल्वेजसाठी लागणारा माल ७१ टक्के इतका ह्या देशांतच खरेदी करण्यांत आला. वरील माहितीवरून रेल्वेज हा केवढ्या राष्ट्रीय महत्त्वाचा धंदा ह्या देशांत आहे याची कल्पना येईल.

---

## म्यूर मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४२ सालीं १ कोटि, ८४ लक्ष रुपयांच्या मालाची विक्री करून १० लक्ष ६८ हजार रुपये निव्वळ नफा मिळविला. भागीदारांस ५०% डिव्हिडंड सुटलें.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स:

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

---

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ५,८०,७५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,९०,३७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४५,००,००० |

### डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. मा. म. गुते |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. व्यं. पुं. वर्दे | मि. फ. दो. पद्मजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

G. L. HALBE,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

## आजचा जपान

[ ब्रह्मदेशावर चाल करून तेथून जपान्यांची हकालपट्टी करण्याचें धोरण संयुक्त राष्ट्रांनीं निश्चित केलें आहे. जपानला मागें रेटून त्याचा पुरा पराभव करण्यास केवळ आरमारी व वैमानिक हल्ले पुरणार नाहींत, जमिनीवरूनच चाल करणें आवश्यक आहे व ती तशी करण्यास हिंदुस्थान हें केंद्र अत्यंत अनुकूल आहे. जपानच्या आजच्या सामर्थ्याचें वर्णन सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्ट ह्या अमेरिकन साप्ताहिकांत आलें आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जपानवरील स्वारींतील अडचणी व त्या संबंधांतील त्यांची योजना ह्यांवर त्या वर्णनामुळें चांगला प्रकाश पडतो. संयुक्त राष्ट्रांनीं जपानचें सामर्थ्य लक्षांत घेऊन त्यावर उपाय योजना आखलेली आहे आणि तीस अनुसरून संयुक्त राष्ट्रांचा विजय होईल, ह्यांत संशय नाहीं. ]

जपानी साम्राज्य आतां सबंध जगांत दुसऱ्या नंबरचें झालें आहे. त्याचें क्षेत्रफळ अमेरिकेएवढें ( अमेरिकेचे अंकित प्रदेश वगळून ) आहे. जपानी साम्राज्याची लोकसंख्या ५० कोटींचेपेक्षां अधिक झाली आहे. जपान हिंदुस्थानास जिंकूं शकलें, तर जगांतील निम्म्यापेक्षां अधिक लोक जपानी सत्तेखालीं जातील. जपाननें चीन व मंगोलिया ह्यांचा १० लक्ष चौरस मैल मुलुख घेतला असून एशियांतील तीन युरोपियन साम्राज्यें त्यानें नष्ट केलीं आहेत व अमेरिकेस पश्चिम पॅसिफिकमधून घालवून दिलें आहे. अमेरिका व रशिया ह्या दोघांकडूनच फक्त जपानवर प्रत्यक्ष स्वारी होण्यास अनुकूल परिस्थिति आहे. सबंध युरोपांत मिळून जर्मनीनें जेवढी पेट्रोलचीं उत्पादन केंद्रें मिळविलीं नाहींत त्यांपेक्षां अधिक केंद्रें जपाननें मिळविलीं आहेत. रबराच्या जागतिक उत्पादनाच्या ९०% रबर व ६०% टिन आतां जपानच्या ताब्यांत आहे. अमेरिका आपल्या आयातींपैकीं ६० % टिन, २० % टंगस्टन ३० % क्रोमियम, १०० % कायनेल इतक्या आयातीस मुकली आहे. युरोपांतील युद्ध दोस्त राष्ट्रांच्या आवाक्यांत येईपर्यंत जपानी राष्ट्रावर प्रत्यक्ष चढाई होण्याची त्यास भीति नाहीं. युद्धविषयक साहित्याचें उत्पादन करण्यास जपानला बरीच फुरसत लाभलेली आहे. जपान व आशिया खंडांतील कोरिया ह्यांस समुद्राखालून जोडणारा बोगदा खोदण्याचें काम चालू आहे, असें समजतें. बँगकॉक, लॅशियो, रंगून, सायगांव, सिंगापूर, ह्यांस जोडणाऱ्या रेल्वेज बांधण्यांत येत आहेत. जपानी बेटें तें बंगालचा उपसागर व जावा येथपर्यंत आगगाड्या जाऊं लागल्या म्हणजे मालवाहू जपानी आगबोटींवरील ताण कमी होईल. सुमात्रा, जाव्हा हीं बेटें परत घेण्याकरितां, जेथून हल्ला चढवितां येईल अशीं केंद्रें तयार केलीं पाहिजेत. हिंदुस्थान हें अशा प्रकारचें महत्त्वाचें केंद्र आहे. जपानची मनुष्य हानि फारच थोडी झालेली आहे व जपाननें जेवढें युद्धसाहित्य खर्च केलें त्यापेक्षां त्यानें अधिक बळकावलें आहे. आतां जपानी नेतृत्वाखालीं कोरिअन, आनमाइट, सयामी, फिलिपिनो, ब्रह्मी व जावानीज सैनिक सुसज्ज तयार आहेत. कोरिअन लोकांस चीनबद्दल सहानुभूति असल्यामुळें त्या सैनिकांचा उपयोग चीनविरुद्ध करणें जपानला आजवर शक्य झालें नाहीं. कोरिअन सैनिक आतां दक्षिण टोकांस जपानच्या वतीनें लढत आहेत. कोरिअन सैनिक व लष्करी अधिकारी ह्यांस कांहीं आर्थिक व राजकीय सवलती देऊन जपाननें त्यांचा दर्जा वाढविला आहे व फिलिपाइन्स आणि मलाया येथें पोलिसांचें काम करण्यासाठीं मंच्युकिओचे सैनिक उपयोगी पडत आहेत. ब्रिटिश व डच वसाहतींतहि जपाननें सैन्यें उभारलीं आहेत. जपानी साम्राज्यांतर्गत देशांतील किमान ५ लक्ष सैनिकांची जपानला मदत होत आहे व तेवढे जपानी सैनिक चढाईच्या कामासाठीं मोकळे झाले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या फौजांकडून घेतलेल्या युद्धसाहित्याचा जपानला दक्षिणेकडील युद्धांत उपयोग होत आहे. सुमारें ५० कोटि लोकांवर सत्ता असलेल्या जपानला मनुष्यबळाची कमतरता बराच काळ तरी भासणार नाहीं. सॉलोमन बेटांत अमेरिकेनें विजय मिळविला आहे, परंतु तीं बेटें अमेरिकेपासून ५ हजार मैल दूर आहेत व तेथून टोकियो आणखी ३½ हजार मैलांवर आहे.

---

### रेल्वेजचें अंदाजपत्रक

मध्यवर्ती कायदे मंडळांत सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं सरकारच्या रेल्वेजचें १९४३-४४ सालाविषयींचें अंदाजपत्रक पुढें मांडतांना दिलेल्या माहितीवरून ह्या धंद्यावर युद्ध-परिस्थितीचा अनुकूल परिणाम होत असलेला स्पष्ट दिसतो. चालू सालअखेर म्हणजे १९४२-४३ मध्यें पूर्वीच्या वर्षीं झालेल्या २८ कोटि रुपयांच्या नफ्यापेक्षां ८ कोटींनीं अधिक फायदा होईल. उत्पन्न १४ कोटि रुपयांनीं वाढलें आहे आणि कारभाराचा खर्च वाढला असला तरी वाढावा उरला आहे. पुढच्या वर्षीं म्हणजे १९४३-४४ मध्यें उत्पन्न-खर्च चालू सालाच्या धर्तीवर होईल ( ३६ कोटि रु. ) असा अंदाज रेल्वेमंत्र्यांनीं केला आहे. सारखा नफा वाढत असल्यानें झीज फंडांतून पूर्वी घेतलेलें सर्व कर्ज फेडून टाकण्यांत आलें आहे आणि मध्यवर्ती तिजोरीचें मागील सर्व देणें मिटलें आहे. येत्या वर्षी वहातुकीच्या दरांत कोणताच वाढावा सुचविण्यांत आलेला नाहीं. हे दर अगोदरच वाढलेले आहेत आणि सरकारास रेल्वेजपासून म्हणजे अप्रत्यक्ष रीतीनें लोकांपासून वाढतें उत्पन्न मिळत आहे. सबब ह्या प्रकाराचा निर्णय केला नसता तरच आश्चर्य वाटलें असतें. हिंदुस्थान सरकारचें सर्वसामान्य अंदाजपत्रक आणि रेल्वेजचें अंदाजपत्रक हीं स्वतंत्र समजलीं जातात आणि रेल्वेजच्या निवळ उत्पन्नाचा विशिष्ट हिस्सा मध्यवर्ती तिजोरीस मिळावा अशी व्यवस्था आज कित्येक वर्षे अमलांत आहे. परिस्थिति बदलली असल्यानें ही जुनी प्रथा बदलली जावी असें सरकारास वाटत आहे. रेल्वेजच्या नफ्यापैकी तीन ते एक ह्या प्रमाणांत रेल्वेज आणि मध्यवर्ती तिजोरी ह्यांचेमध्ये वाटणी व्हावी अशा अर्थाची सूचना असेंब्लीपुढें सरकारतर्फे मांडण्यांत येणार आहे.

---

### लक्ष्मी इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि.

वरील नांवाची कंपनी श्री. सांखळचंद जी. शहा यांनीं मुंबई येथें रजिस्टर केली आहे.

### फलटण शुगर वर्क्स लि.

वरील साखर कंपनीनें ३० सप्टेंबर, १९४२ अखेरच्या वर्षात ४५ लक्ष, ५९ हजारांची साखर विकली. शेतीचा खर्च व कारखान्याचा आणि इतर खर्च अनुक्रमें १५ लक्ष, ८४ हजार व १४ लक्ष २७ हजार रुपये झाला. निवळ नफा ११ लक्ष, ८५ हजार रुपये उरला. भागीदारांस १६% डिव्हिडंड मिळणार आहे.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

(Estd. in 1935)

## The Co-operators' Book Depot

9, BAKEHOUSE LANE, FORT, BOMBAY.

*Books on :—*

Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.

Books on all other subjects are also readily supplied.

Agents for the Publications of :

1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

२६२८६७

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख २४ फेब्रुवारी १९४३ अंक ८

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टरसहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

(Estd. in 1935)
The Co-operators' Book Depot
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
*Books on :—*
Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.
Books on all other subjects are also readily supplied.
Agents for the Publications of :—
1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चात काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## कायद्याचीं मराठी पुस्तकें

१ इन्कम् टॅक्स कायदा (सुधारणांसह) किं. १॥रु.
२ कर्ज देण्याघेण्याबाबत कायदा किं. २ रु.
३ मृत्युपत्राचा कायदा किं. १। रु.
४ हिंदु स्त्रीधनाचा कायदा किं. १२ आ.
५ विवाहाचा कायदा किं. १२ आ.

याशिवाय मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या "न्याय बोध" मासिकाचे वर्गणीदार व्हा. वा. व. ५ रु. नमुना अंक मागवा.

—न्यायबोध-ऑफिस, महाल, नागपूर शहर


# विविध माहिती

### बंगलोरमध्यें रॅशनिंगची योजना

बंगलोरमध्यें गेल्या महिन्यांत चालू करण्यांत आलेली रॅशनिंगची योजना यशस्वी होत असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### सरकारी खात्यांत कागदाची काटकसर

कागदाच्या पुरवठ्याविषयीं मध्यवर्ती असेंब्लींत नुकतीच चर्चा झाली. सरकारी खात्यांत वापरल्या जाणाऱ्या कागदांत साडेसकरा हजार टन वजनाच्या कागदाची काटकसर अगोदरच करण्यांत आली असल्याचें. सरकारच्या वतीनें सांगण्यांत आलें. युद्धाशीं ज्यांचा प्रत्यक्ष संबंध नाहीं अशा खात्यांनीं आपलें लिखाण कमी करावें अशी सूचना आहे.

### ताडपत्रावर निमंत्रणें छापलीं

युद्धपरिस्थितींत रोजच्या उपयोगाच्या अनेक जिनसा दुर्मीळ झाल्या आहेत त्यामुळें आधुनिक पद्धतीच्या ऐवजी जुन्या पद्धतीचे व्यवहार करण्याची लोकांची प्रवृत्ति वाढत आहे. आसाम प्रांतांत सरस्वती पूजेच्या प्रसंगीं कित्येक शाळांमध्यें निमंत्रणपत्रिका ताडपत्रावर छापून पाठवण्यांत आल्या अशी बातमी आली आहे. फाऊंटनपेन व टाक यांच्याऐवजी बोरूच्या लेखण्या कां वापरल्या जाऊं नयेत ?

### रहाणीच्या खर्चाची प्रमाणबद्ध मांडणी

सबंद हिंदुस्थानाकरितां म्हणून जनतेच्या राहणीचा खर्चांत होणारा चढउतार दर्शवणारी प्रमाणबद्ध मांडणीची योजना मध्यवर्ती सरकार तयार करीत आहे. प्रांतिक सरकारांचें सहकार्य ह्या कामांत घेतलें जात आहे.

### कापडाच्या गिरण्यांवर सरकारी ताबा

युद्ध चालू आहे तोंपर्यंत कापडाची दुर्मिळता व महागाई यांचे दृष्टीनें देशांतील सर्व कापड गिरण्या हिंदुस्थान सरकारनें आपल्या ताब्यांत घ्याव्या अशी एक सूचना कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें पुढें मांडण्यांत येणार आहे.

### लाकडी कोळसा व जळाऊ लाकूड

लाकडी कोळसा व जळाऊ लाकूड यांची निर्यात मुंबई प्रांताच्या बाहेर सरकारी परवान्यावांचून केली जाण्यास बंदी झाली असल्याचा हुकूम प्रांतिक सरकारनें काढला आहे.

### पंजाबांत बाजारांमध्यें गहू येऊं लागला

सरकारचें भावनियंत्रण कादून घेतलें गेल्यामुळें पंजाब प्रांतांत लोकांनीं साठवलेला गहू बाहेर निघून बाजारांत येऊं लागला आहे. या रितीनें बाजारांतला पुरवठा वाढूं लागल्याकारणानें पंजाबांत गव्हाचा भाव अलीकडे दर मणास ३ रुपयांपर्यंत उतरला आहे.

### स्वदेशी मिल्सची इस्टेट

स्वदेशी मिल्स कं. लि. ची गिरगांवमधील इस्टेट मि. शापुरजी पालनजी मिस्त्री व मि. फिरोजशहा पालनजी मिस्त्री ह्यांस ४५ लक्ष रुपयांस विकण्याचें कंपनीच्या डायरेक्टरांनीं ठरविलें आहे. खरेदीदारांनीं स्टँप व इतर ड्यूटी भरावयाची आहे.

### नंदुरबार को. परचेस ॲण्ड सेल युनियन

नंदुरबार ( प. खानदेश ) को-ऑपरेटिव्ह परचेस अँड सेल युनियनची एक शाखा खांडबारा येथें नुकतीच उघडण्यांत आली. उद्घाटन प्रसंगीं सुमारें ८०० शेतकरी हजर होते. नवापूर येथेंहि लवकरच शाखा काढण्यांत येणार आहे. नंदुरबार व नवापूर तालुक्यांतील वस्ती मुख्यत: भिल्लांची आहे आणि युनियनचा त्यांना चांगला उपयोग होत आहे.

### गुजराथ रेल्वेज कं. लि.

वरील कंपनीशीं हिंदुस्थान सरकारचा असलेला करार ३१ मार्च, १९४४ रोजीं संपतो त्यावेळीं रेल्वे आपल्या ताब्यांत घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### चेक्सची देवघेव

बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १३-२-४३ अखेर संपलेल्या आठवड्यांत ३३ कोटि, ७८ लक्ष रुपये किंमतीच्या १,३१,२५६ चेक्सची देवघेव झाली.

### मुंबई वॉर गिफ्ट फंड

मुंबई युद्धफंडाचा आकडा १५ फेब्रुवारी अखेर १ कोटि, १२ लक्ष रुपये झाला आहे.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

इंपीरिअल बँकेकडे १९३९ अखेर ८७½ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. १९४० अखेर हा आकडा ९६ कोटींवर गेला. १९४१ अखेर १०९ कोटी रुपयांच्या ठेवी बँकेकडे होत्या आणि १९४२ अखेर ठेवींचा आकडा १६३ कोटींवर गेलेला आहे. आतां हा आकडा १७० कोटी रुपयांचे वर गेला आहे.

### गंधक काटकसरीनें वापरा

हिंदी साखर कारखान्यांस गंधक मोठ्या प्रमाणांवर लागतो. बलुचिस्तानमधून गंधक येऊं लागला परंतु तो चांगल्या दर्जाचा नाहीं. साखर कारखान्यांनीं गंधकाचा उपयोग अत्यंत काटकसरीनें करावा नाहींतर चालू मोसमांत त्याचा तुटवडा पडण्याचा संभव आहे, अशी सूचना हिंदुस्थान सरकारनें साखर कारखान्यांस केली आहे.

### अजमपूर—कोळगांव

नाशिक जिल्ह्यांतील अजमपूर आणि कोळगांव हीं खेडीं आतां एक करण्यांत आलीं असून नव्या खेड्यास कोळगांव असें म्हणण्यांत येईल.

### धुशी—वावी

नाशिक जिल्ह्यांतील निफाड तालुक्यामधील धुशी व वावी हीं खेडीं आतां एक करण्यांत आलीं असून नव्या खेड्यास वावी असें म्हणण्यांत येईल.

## अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... ५८
२ सहकार आणि युद्ध-परिस्थिति ... ... ५९
३ अन्न सल्लागार समितीची सभा ... ... ६०
४ रेल्वे बजेटावरील भाषण ६०
५ स्फुट-विचार
खरीप पिकांविषयींचा शेवटचा अंदाज– धान्य पुरवठा परिस्थिति– सहकारी प्रश्नांचें शास्त्रीय संशोधन– सहकारी आर्थिक संशोधन व इन्स्टिटयूट
६ दूध पुरविणाऱ्या सोसायट्या ६२
७ ऊंस करणारांच्या सोसायटया ... ६२
८ ता.डे.असोसिएशन,जळगांव ६२
९ ट्रेनिंग क्लास ... ६२
१० अजरें येथील धान्य सोसायट्या ... ६३
११ शेतकी मालावर कर्जें ... ६४
१२ प. सा. सहकारी वृत्त ... ६४
१३ पगारदार नोकरांच्या सोसायट्यांकडून घेतलेलें कर्ज ६४

# अर्थ

बुधवार, ता. २४ फेब्रुवारी, १९४३

## सहकार आणि युद्धपरिस्थिति

युद्धजन्य परिस्थितीमुळें सर्व देशांत आर्थिक व्यवहार आणि लोकांची राहणी ह्यांत महत्त्वाचे बदल घडून आले आहेत व येत आहेत, त्यांचा परिणाम राष्ट्रांच्या सामाजिक घटनेवर आणि जनतेच्या चालीरीतींवर कायमचा झाल्यावांचून राहणार नाहीं असें दिसत आहे. इंग्लंडसारख्या देशांत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें कारखान्यांत, शेतीच्या धंद्यांत व इतरत्र जड व अवघड कामें करीत आहेत. शिक्षण व्यवस्थेंत लष्करी पेशाच्या तयारीवर भर दिला जात आहे. व्यापार, उद्योगधंदे, बाजारभाव ह्यांचें सरकार नियंत्रण करीत असल्यानें युद्धापूर्वीचें व्यक्ति-स्वातंत्र्य आणि चढाओढ यांस वाव राहिलेला नाहीं. रॅशनिंगची पद्धति सार्वत्रिक रीतीनें जारी आहे आणि तिचे योगानें खाणेंपिणें, वस्त्रप्रावरण ह्यांची काटकसर होऊन त्यांस नवीन वळण लागत आहे. एका पदार्थाची गरज दुसऱ्यानें भागवावी आणि आलेल्या प्रसंगास तोंड द्यावें असें बहुतेकांचें झालें आहे. युद्ध संपून वैयक्तिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परस्पर संबंध निश्चित केले जाण्याचा प्रसंग येईल तेव्हां पूर्वीच्या आर्थिक घटनेंत महत्त्वाचे फेरबदल घडवून आणण्याची आवश्यकता भासल्यावांचून राहणार नाहीं. युद्धापूर्वीचें अनियंत्रित व्यक्ति-स्वातंत्र्य, नफेबाजी, व्यक्तिस्वार्थाचें प्राबल्य, अमर्याद स्पर्धा ह्यांचें प्राबल्य ह्यापुढें चालू राहणें शक्य नाहीं. जरूर भासली म्हणजे ती भागवण्याची युक्ती सुचते या न्यायानें आज ज्या नव्या व्यवहारपद्धति व रीति-चाली अंमलांत आल्या आहेत त्या आहेत तशाच कायम झाल्या नाहींत तरी त्यांचा छाप नवीन आर्थिक व सामाजिक घटनेवर बसल्यावांचून रहावयाचा नाहीं.

हिंदुस्थानांत वरील प्रकारच्या फेरबदलांचा कमी-अधिक अनुभव येत आहे. धान्य वगैरे नित्याच्या जरूरीच्या जिनसांची दुर्मिळता व महागाई ह्यांचे संबंधांत उद्भवलेल्या अडचणी दूर करण्यासाठी संघशक्तीनें मालाचा पुरवठा व्यक्तींस व्हावा अशी व्यवस्था घडवून आणण्याची प्रवृत्ति मध्यम स्थितींतल्या वर्गांत दिसून येते. सहकारी पद्धतीची मालाची खरेदी आणि वाटणी ह्याविषयींचा प्रचार मध्यम वर्गीय लोकांत कित्येक वर्षे केला गेला असूनहि तो सफळ झालेला नाहीं. गरजांचें विशिष्टत्व आणि संघटित रीतीनें एकत्र व्यवहार करण्याचा कंटाळा हीं कारणें त्या अपयशाच्या मुळाशीं आहेत. पण गरजेच्या तीव्रतेपुढें अनास्था व व्यक्तिमत्व निर्बळ ठरून सहकारी तऱ्हेच्या संस्था काढण्याचें महत्व अनेक लोकांस पटलें असून त्या मार्गानें त्यांनीं पाऊल टाकलें आहे. युद्धकाळांतली गरज संपतांच सहकारी संघटनेचे स्टोअर्स बंद न पडतां ही नवीन चालू झालेली प्रथा मूळ धरून राहिली पाहिजे. युद्धोत्तर काळांत होणाऱ्या पुनर्घटनेंत सहकारी व्यवहार पद्धतीस अधिक जोरच चढणें आवश्यक आहे, एवढेंच नव्हे तर कामकरी वर्गांत ह्या संघटनेचा प्रसार होणें अगत्याचें आहे.

शहरांप्रमाणें खेडेगावांतहि जरूरीच्या मालाची खरेदी अवघड झाली असून तेथेंहि सहकारी खरेदी संस्थांची आवश्यकता तीव्रतेनें भासत आहे. ह्या प्रांतांत शेतकऱ्यांचे खरेदी–विक्रीचे सहकारी संघ आहेत आणि तालुका डेव्हेलपमेंट असोसिएशन्स त्यांच्याच तऱ्हेचें काम करीत आहेत. परंतु त्या संस्थांच्या कार्याची व्याप्ती मर्यादित आहे हें सुप्रसिद्ध आहे. शेतकरी कर्जनिवारणाचा कायदा झाल्यापासून शेतीच्या मालाची सहकारी पद्धतीनें विक्री होण्याची तरतूद विस्तृत प्रमाणांत केली जाण्याची आवश्यकता तीव्रतेनें भासू लागली आणि त्या दिशेनें विशेष प्रयत्न चालू होऊन मल्टीपर्पज सोसायट्या स्थापण्याची चळवळ पद्धतशीरपणानें हातीं घेण्यांत आली. आमच्या शेतीच्या सहकारी संस्था केवळ आपल्या सभासदांस कर्जें देण्याच्या उद्योगासच वाहिल्या असून शेतकऱ्यांच्या इतर गरजा भागवण्याकडे त्या लक्ष पुरवीत नाहींत ही कित्येक वर्षांची जुनी तक्रार आहे. खरेदी–विक्रीचें सहकारी संघटन विस्तृत प्रमाणावर ह्यापूर्वीच झालें असतें तर सध्याच्या युद्धपरिस्थितींत त्यास केवढें महत्त्वाचें कार्य करतां आलें असतें आणि शेतकरी वर्गाच्या अडचणी दूर करण्यास त्यांचें कितीतरी सहाय झालें असतें. धान्याच्या वगैरे पिकांच्या क्षेत्रांचा विस्तार करून अन्नसामुग्रीचा पुरवठा वाढविण्याची खटपट सध्या सरकारच्या सहाय्यानें होत आहे तीमध्यें सहकारी संघटनास पुष्कळ जागा आहे. नवीन जमीन लागवडींत आणणें, पडीक जमिनींत पिकें करणें इत्यादि कामें शेतकऱ्यांच्या उत्पादक सहकारी संघांनीं हातीं घेतल्यास महत्त्वाचें कार्य त्यांचे हातून घडेल. सरकार असल्या कामीं द्रव्यसहाय्य देणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. युद्धासाठीं लागणारें कांहीं जातींचें कापड विणकरांच्या सहकारी संघांमार्फत तयार केलें जात आहे. सहकारी संघटनेच्या ह्या प्रकारच्या योजना युद्धपरिस्थितींत यशस्वी केल्या जाऊन युद्धोत्तर काळांतहि त्या टिकाऊ कशा होतील ह्याचा विचार होणें अगत्याचें आहे. भांडवलशाही आणि हुकूमशाही ह्यांचे दोष टाळून सामान्य आर्थिक स्थितींतल्या जनतेची सांपत्तिक व नैतिक उन्नति घडवून आणण्याचें सामर्थ्य सहकारी संघटनेंत आहे, ह्या कारणानें पुढील शांततेच्या काळांत तिचा विकास होणें अपरिहार्य व आवश्यक आहे हें लक्षांत आणून सहकारी कार्यकर्त्यांनीं आपला कार्यक्रम आखून तो पार पाडावा.

---

## अखिल भारतीय अन्न सल्लागार समितीची दुसरी सभा

अखिल भारतीय अन्न सल्लागार समितीची दुसरी सभा तारीख ८ व ९ फेब्रुवारी रोजीं दिल्ली येथें भरली होती. सदर परिषदेस पुणें येथील रुरल प्रॉडक्टस कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. न. गं. आपटे हे "फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज" या संस्थेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. परिषदेचा उपन्यास करतांना त्यावेळचे अन्नखात्याचे मंत्री श्री. नलिनीरंजन सरकार यांनीं हिंदुस्थानमध्यें धान्य जरी सध्यां कमी दिसत असलें तरी सर्व गोष्टींचा विचार करतां प्रत्यक्ष उत्पादनांत ५% पेक्षा घट नसल्याचें सांगितलें आणि त्यामुळेंच अन्नपुरवठ्या-बाबतची परिस्थिति फारशी भयानक नसल्याचें सांगितलें. याचीं कारणें देतांना पूर्वी अशा प्रकारची तूट अनेकदां आल्याची माहिती दिली. त्यानंतर सरकारनें धान्य खरेदीबाबत चालवि-लेल्या खटपटीचीहि माहिती दिली.

सभेपुढें एकंदर सात विषय होते. त्यांपैकीं चार विषय मामुली स्वरूपाचे होते व तीन विषय विशेष महत्त्वाचे होते. महत्त्वाच्या विषयांमध्यें जास्त धान्य उत्पादन करणें, भावनियंत्रण व शिधा-पद्धति व अन्नसल्लागार समितीचें कार्यक्षेत्र हे तीन विषय होते. इतर विषयांमध्यें लष्करी दुग्धालयांतील खोंडासंबंधीं विचार विनिमय झाला. सदरील खोंडांना जिवंत ठेवावें अगर मारावें या बाबतच्या सूचना सरदार कर्तारसिंग यांनीं कराव्या असें ठरवि-ण्यांत आलें. त्याचप्रमाणें लागणीखालील क्षेत्रासंबंधींची माहिती जमीनदारी पद्धति असलेल्या प्रांतांना जास्त कसोशीनें जम-विण्यास विनंति करावी व त्याबाबत लागणारें द्रव्यसहाय्य त्या त्या प्रांतांना मध्यवर्ती सरकारनें द्यावें असें ठरविण्यांत आलें. लष्कराजवळील साठ्यासंबंधीं माहिती देतांना खात्रीपूर्वक असें सांगण्यांत आलें कीं लष्कराजवळ लोक समजतात त्याप्रमाणें दोन किंवा तीन वर्षांचा साठा मुळींच नसून हा साठा जास्तींत जास्ती कांहीं महिन्यांपेक्षां जास्त मुदतीस पुरण्या इतकाच आहे.

धान्य उत्पादनाबाबत तांदूळ, गहूं व इतर धान्यें जास्त पिक-विण्यासंबंधीं विचार करीत असतांना आळशीखालील क्षेत्र आहे यापेक्षां आणखी कमी करूं नये असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें कपाशीचे भाव वाढल्यामुळें शेतकरी कपाशी जास्त क्षेत्रावर लाव-तील ही भीति उरूं नये म्हणून कपाशीच्या एकूण क्षेत्रावर काय-द्यानें मर्यादा घालण्यांत यावी व धान्याचे योग्य भाव बरेच आगाऊ जाहीर करून ठेवावे; त्याचप्रमाणें खाद्य धान्यें पिक-विणाऱ्या शेतकऱ्यांना शक्य त्या सवलती द्याव्या वगैरे सूचना करणारा "सेंट्रल कॉटन कमिटी"चा ठराव स्वीकृत करण्यांत आला.

जे शेतकरी लागवडीखाली नसलेल्या जमिनींत खाद्य धान्यें पिकवितील त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसें द्यावीं. रेल्वेच्या मालकीच्या जागेंत व सरकारी बंगल्यांतून भाजीपाला लावण्यास प्रोत्साहन देण्यास प्रांतिक सरकारांना विनंति करण्यांत यावी. त्याचप्रमाणें सरकारनें धान्याच्या किंमती आगाऊ ठरवाव्या व पीक निघ-ण्याचे आधीं त्या बरेच दिवस जाहीर कराव्या वगैरे ठराव कर-ण्यांत आले.

भावनियंत्रण व शिधापद्धति यांचा विचार चालू असतां भाव-नियंत्रणांतील दोष श्री. आपटे यांनीं प्रामुख्यानें दाखविले. त्यांत निरनिराळ्या जिल्ह्यांतील नियंत्रणें, अधिकाऱ्यांचीं स्थानिक नियं-त्रणें वगैरेंनीं होणारा घोटाळा व लोकांची उपासमार यासंबंधीं स्वानुभवाची माहिती त्यांनीं दिली.

शिधापद्धतीसंबंधीं बोलतांना श्री. आपटे यांनीं शिधापद्धति म्हणजे कायदेशीर उपासमार होऊं नये असें सुचविलें व स्थानिक समितीची सरकारजवळ असलेल्या साठ्यासंबंधीं खात्री झाल्या शिवाय शिधापद्धति सुरू करूं नये असें सुचविलें. त्यास सभेनें संमति देऊन पुढील ठराव संमत करण्यांत आला.—

(अ) प्रजेला लागणारा किमान आहार देण्याची खात्री असल्याखेरीज शिधापद्धति सुरू करूं नये.

(ब) शिधापद्धति सुरू करण्याचीं मूलतत्त्वें व पद्धति यांमध्यें एकसूत्रीपणा आणण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें आवश्यक तेवढें नियंत्रण ठेवावें.

(क) हिंदुस्थानच्या खाद्यधान्याच्या पुरवठ्याबाबत एक-सूत्रीपणा आणण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें आवश्यक त्या काय-देशीर सत्तेचा उपयोग करावा.

(ड) हिंदुस्थान सरकारनें जनतेचा विश्वास संपादन करणे-साठीं शक्य ते प्रयत्न करावे व विशेषतः लष्कराच्या पुरवठ्या-संबंधीं योग्य व इष्ट वाटणारी वस्तुस्थितिनिदर्शक माहिती सर-कारनें पुरवावी.

(अ) खाद्य धान्य सल्लागार समितीच्या कार्यक्षेत्राचा विचार करतांना ह्या समितीचें कार्य हिंदुस्थान सरकारचें व्यापार खातें व शेतकीखातें यांच्या सहकार्यानें चालावें.

(ब) सभासदांनीं मधून मधून त्यांना सुचणाऱ्या विषया-संबंधीं चिटणीसांकडे माहिती देत जावी. चिटणीसांनीं दर महि-न्याचे १० तारखेपर्यंत कार्य प्रगतीचा आढावा सभासदांकडे पाठवावा.

(क) पुरेसें काम साठतांच सल्लागार समितीची बैठक बोलवावी.

ह्याप्रमाणें दोन दिवस सल्लागार समितीचें काम होऊन तारीख ९ रोजीं संध्याकाळीं सभा संपली.

### रेल्वे बजेटावर सर एडवर्ड बेंथॉल ह्यांचें भाषण

हिंदी रेल्वेजमधील नोकरवर्गांपैकीं शेकडा ९९·७ हिंदी व अँग्लो इंडियन आहेत.

रेल्वे नोकरांपैकीं १ लक्ष, २६ हजार नोकर लष्करांत दाखल झालेले आहेत.

रेल्वे कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान वाढूं नये, ह्यासाठीं त्यांस धान्य व इतर आवश्यक जिनसा योग्य किंमतीस मिळाव्या अशी व्यवस्था करण्यांत येत आहे.

अमेरिकेकडे व ग्रेट ब्रिटनकडे इंजनांच्या पुरवठ्यासाठीं लकडा लावण्यांत आला. जून १९४३ मध्यें ४० मोठीं गुड्स इंजनें अमेरिकेंतून येतील व त्यांचे पाठोपाठ १४५ आणखी इंजनें दाखल होतील.

मीटर गेजचीं गुड्स इंजनेंहि लवकरच येऊन पडतील. इंग्लंड-कडून १२ व अमेरिकेकडून ८० इंजनें येतील अशी अपेक्षा आहे.

# स्फुट विचार

## खरीप पिकांविषयींचा शेवटचा अंदाज

मुंबई प्रांत आणि त्यांत अंतर्भूत असलेलीं संस्थानें ह्यांमध्यें तूर, रागी, कोद्रा बाजरी व खरीप ज्वार ह्यांचा १९४२-४३च्या हंगामांतील उत्पादनाचा शेवटचा अंदाज प्रसिद्ध झाला आहे. खरीप ज्वारचें क्षेत्र ४७ लक्ष एकर होतें तें पूर्वीच्या वर्षा इतकेंच होतें, पण उत्पादन मात्र ५ टक्के वाढून ९ लक्ष टनांच्या सुमारांत होईल. बाजरी ८० लक्ष एकरांत म्हणजे पूर्वीच्या सालाच्या मानानें ३६ टक्के अधिक क्षेत्रांत पेरण्यांत आली होती. दहा वर्षांच्या सरासरीच्या दृष्टीनें पहातां हें क्षेत्र ४७ टक्के अधिक होतें. बाजरीचें उत्पन्न १३ लक्ष टन होईल म्हणजे पूर्वीच्या वर्षीपेक्षा तें ३८ टक्के अधिक भरेल. रागीचें क्षेत्र दहा वर्षांची सरासरी पाहतां मर्यादित होतें आणि त्याचा आकडा ७½ लक्ष एकर असा होता. उत्पादन २½ लक्ष टन होतें. संस्थानांच्या मानानें ब्रिटिश विभागांत ह्या पिकाची परिस्थिति अनुकूल होती. तुरीचें क्षेत्र ४½ लक्ष एकर व पीक १ लक्ष १४ हजार टन भरेल. ब्रिटिश हद्दींत हें पीक गेल्या वर्षीपेक्षा १६ टक्के अधिक आहे. कोद्राचें बहुतेक क्षेत्र ब्रिटिश जिल्ह्यांत असून एकूण क्षेत्रफळ ९ लक्षांचे वर आहे. उत्पादन ८४ हजार टन होईल आणि तें पूर्ववर्षापेक्षा ११ टक्के अधिक भरेल. मक्याच्या पिकाचें क्षेत्र ३½ टक्क्यांनीं कमी असून त्याच्या २ लक्ष एकरांत ४५ हजार टन माल तयार होईल. गेल्या वर्षापेक्षा हा आकडा ३६ टक्के कमी आहे.

## धान्यपुरवठा परिस्थिति

हिंदुस्थान सरकारच्या धान्यपुरवठा खात्याचे जादा चिटणीस, जनरल वुड, ह्यांनीं वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस धान्याच्या परिस्थितीबाबत ताजी माहिती नुकतीच पुरविली आणि तीवरून परिस्थिति सुधारली असल्याविषयींचें आपलें मत प्रकट केलें. (१) खरीप पीक बाजारांत येत आहे तें पूर्ववर्षाच्या मानानें २३ लक्ष टन अधिक आहे आणि रब्बीचीं पिकें उत्कृष्ट स्थितींत असल्याची उत्तेजनकारक बातमी आहे. पिकांचें क्षेत्र वाढविण्याच्या प्रयत्नांस यश आलें असून त्यामुळें धान्याच्या इतर कारणांच्या योगानें होणाऱ्या तुटवड्याची भीति दूर झाली आहे. (२) गव्हाच्या बाजारभावावरील नियंत्रण दूर झाल्यामुळें सरकारच्या प्रतिनिधींस हें धान्य विकत घेणें सोपें झालें आहे. एका आठवड्यांत ५० हजार टन ह्या मार्गानें मिळाले आणि हें धान्य मुंबई वगैरे तुटवड्याच्या प्रांतांस पुरविण्यांत आलें. मुंबईस जानेवारींत ५ हजार टन व फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यांत ४० हजार टन धान्य पुरविण्यांत आलें आहे. (३) किरकोळ विक्रीच्या बाजारांत धान्य येऊं लागलें आहे आणि तें साठवून ठेवण्याच्या प्रवृत्तीस आळा बसला आहे. घाऊक बाजारांत खेडेगांवांतून धान्य येण्यापूर्वीच किरकोळ विक्रीसाठी त्याचा पुरवठा होत आहे. धान्याची निर्गत एकूण उत्पादनाच्या दोन टक्क्यांइतकीहि नाहीं. मग धान्य मुळीं बाहेर पाठवितों कां? ह्या प्रश्नास उत्तर देतांना जनरल वुड म्हणाले कीं ह्या देशाच्या बाहेरील हिंदी लोक ह्या आयातीवर अवलंबून आहेत हें विसरतां कामा नये. धान्यपुरवठ्याच्या योजनांस द्रव्यसहाय्य हिंदुस्थान सरकार देणार आहे आणि त्याविषयींची तरतूद मध्यवर्ती अंदाजपत्रकांत केली जाईल.

## सहकारी प्रश्नांचें शास्त्रीय संशोधन

निरनिराळे आर्थिक उद्देश सहकारी व्यवहारपद्धतीनें साध्य करण्याचे मार्गांत कोणत्या अडचणी येतात, त्या दूर कशा करतां येतील, कोणत्या सहकारी संस्था विशिष्ट विभागांत इष्ट व शक्य आहेत, सहकारी कार्याचे अनुकूल परिणाम कसे व कोठें झाले आहेत, नवीन धोरण सहकारी कार्यांत अंमलांत आणण्याची किती आवश्यकता आहे इत्यादि प्रश्न नेहमीं उद्भवत असतात आणि सहकारी अधिकारी व कार्यकर्ते ह्यांस ते सोडवावे लागतात. पण ह्या प्रश्नांचा विचार शास्त्रीय पद्धतीनें झाल्यावांचून योजलेले व योजावयाचे उपाय परिणामकारक ठरणें शक्य नाहीं हें उघड आहे. ह्याकरितां रिझर्व्ह बँकेनें प्रांतिक सहकारी खात्यांस अशी सूचना केली होती कीं त्यांनीं संशोधनाच्या कार्याची कायमची व्यवस्था आपल्या अधिकाऱ्यांच्या विद्यमानें स्वतंत्र रीतीनें करावी म्हणजे प्रत्यक्ष काम करणाऱ्या अधिकाऱ्यांस स्वतःस महत्त्वाचे प्रश्न पद्धतशीर सोडवून घेतां येतील. नुसती माहिती गोळा करून ती संगतवार लावणें हें ह्या व्यवस्थेचें कार्य नसावें आणि वारंवार उत्पन्न होणाऱ्या धोरणाच्या व कारभाराच्या विषयांची छाननी व्हावी असें त्या बँकेचें म्हणणें होतें. ही सूचना मुंबईच्या सहकारी खात्यानें प्रांतिक इंस्टिट्यूटकडे त्याच्या अभिप्रायासाठी पाठविली आणि इंस्टिट्यूटच्या कार्यकारी समितीनें आपलें म्हणणें सरकारास सादर केलें आहे. संशोधनाविषयींची मूलभूत कल्पना इन्स्टिट्यूटला मान्य आहे हें सांगावयास नको; तिला मूर्त स्वरूप कसें द्यावयाचें हेंच ठरवणें काय तें महत्त्वाचें आहे.

## सहकारी आर्थिक संशोधन व इन्स्टिट्यूट

इन्स्टिट्यूटच्या पुर्नघटनेचा प्रश्न वादविवादाचा विषय होता तेव्हांच त्याच्या प्रतिनिधींनीं संशोधनाचें महत्त्व प्रतिपादून तें कार्य आपलें एक मुख्य उद्दिष्ट आहे हें सरकारनें मान्य करावें असें सुचवलें होतें. सहकारी घटना व पद्धति आणि विशेषतः सहकारी रीतीचे व्यवहार ह्यांची छाननी अर्थशास्त्रीय तत्त्वास धरून झाल्यास वस्तुस्थितीचें योग्य ज्ञान होऊन उपाययोजनाहि उचित ठरणार असल्यानें ह्या बाबतींतलें संशोधनाचें कार्य करण्यास इंस्टिट्यूटला सरकारनें द्रव्यसहाय्य व उत्तेजन द्यावें हा उद्देश त्या सूचनेच्या मुळाशीं होता. प्रांतिक इंस्टिट्यूटच्या उद्देशमालिकेंत आर्थिक संशोधनाचा आतां अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. तथापि हें संशोधन कार्य इंस्टिट्यूटनें स्वतःच्या खास समितीच्या विद्यमानें करावयाचें आहे हें उघड आहे आणि रिझर्व्ह बँकेची शिफारस सहकारी खात्यानें आपली स्वतंत्र संशोधन शाखा चालवण्याविषयींची आहे. संशोधन कार्य दुहेरी रीतीनें स्वतंत्रपणानें चालवण्यांत कांहींच स्वारस्य नसून तें निष्कारण खर्चाचें आहे. तेव्हां सहकारी खात्याचे अधिकारी व इंस्टिट्यूटचे प्रतिनिधी ह्यांनीं संशोधन एकत्र व सहकारानें करणें हेंच श्रेयस्कर आहे ह्यांत संशय नाहीं. प्रत्यक्ष कारभार करणारे खात्यांतले अधिकारी आणि इंस्टिट्यूटचे आर्थिक तज्ज्ञ त्यांच्या संयुक्त समितीकडे संशोधनाचें कार्य सोपवणें हीच व्यवस्था श्रेयस्कर व ग्राह्य दिसते. ह्यासंबंधांतली आपली योजना इंस्टिट्यूटनें सरकारपुढें मांडली आहे, तिला मान्यता मिळून संशोधनाचे कार्यास लवकर प्रारंभ होईल अशी आशा आहे.

## दूध पुरवणाऱ्या मद्रासमधील सोसायट्या

मद्रास प्रांतांत दूध पुरवणाऱ्या सहकारी सोसायट्यांचा विस्तार करण्यांत येत आहे. ह्या सोसायट्यांचे १९४०–४१ सालीं ४,१९९ सभासद होते. दूध पुरवणाऱ्या युनिअन्सचे २९२ सभासद होते. त्यांनीं अनुक्रमानें ६ लक्ष १२ हजार रुपये आणि ५ लक्ष ७७ हजार रुपये इतक्या किंमतींचें दूध तयार केलें किंवा विकत घेतलें. पावसाळ्यांत फाजील दूध रहातें तेव्हां त्याचें लोणी, तूप वगैरे करून विकण्यांत येतें. सोसायट्यांस १९४०–४१ मध्यें ह्या पदार्थांच्या विक्रीचे ६ लक्ष, ४४ हजार रुपये मिळाले आणि त्याचसाठी युनिअन्सची ह्या बाबतींतली प्राप्ती ६ लक्ष, ८८ हजार रुपये होती.

## बिहारमधील ऊंस करणारांच्या सोसायट्या

बिहार प्रांतांत उसाचें पीक मोठ्या प्रमाणांत. शेतकरी लोक करीत असतात, आणि तेथें साखरेचे अनेक कारखाने असून आपला तयार माल ते त्यांस विकतात. उसाचें उत्पादन आणि त्यांची विक्री कार्यक्षम व फायदेशीर व्हावी ह्या हेतूनें बिहारमध्यें त पीक करणारांच्या सहकारी सोसायट्या स्थापन केलेल्या आहेत. १९४० सालीं ऊंस सोसायट्या व त्यांच्या युनिअन्स ह्यांची संख्या अनुक्रमें करून १,४८८ व ३२ अशी होती. १९४१ मध्यें त्यांमध्यें ५९८ आणि १८ अशी वाढ होऊन दोहोंची संख्या अनुक्रमें करून २०८६ व ५० इतकी झाली. १९४१ अखेर एकूण सभासदांची संख्या ४९,१०६ होती. १९४१–४२ मध्यें पूर्वीच्या वर्षांपेक्षां उसाचें पीक कमी होतें ह्या कारणानें सोसायट्यांस कमिशनदाखल ४४,९९० रुपये मिळाले. पूर्वीच्या वर्षी ही कमिशनची रकम १,२२,२७४ रुपये होती. उसाच्या पिकांची सुधारणा व्हावी म्हणून बीं, खत, शेतीचीं चांगलीं साधनें सोसायट्यांस पुरविण्यांत आलीं. सोसायट्यांचें स्वतःचें भांडवल १,४०,००० रुपये होतें आणि युनिअन्सचें १४,४६० रुपये होतें. सोसायट्यांनीं बाहेरून कर्ज घेऊं नयेत असें धोरण सहकारी खात्यानें अंगिकारलें आहे. सोसायट्यांच्या सभासदांच्या सहकारी व धंदेशिक्षणाची व्यवस्था करण्यांत आली आहे. उसाची विक्री आणि सोसायट्यांचा विकास ह्यांचे संबंधांत ऊंस सोसायट्यांचें कार्य मूळ ध्येयाप्रमाणें सर्वस्वी समाधानकारक नसलें तरी त्यांची एकंदर प्रगति आशाजनक आहे असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे.

## तालुका डेव्ह. ॲग्रि. को. असोसिएशन लि., जळगांव

वरील संस्थेची स्थापना १९१० सालीं झाली व ती १९२४ सालीं रजिस्टर झाली. गेलीं १७ वर्षें ती कायम "अ" वर्गांत आहे. असोसिएशनचे १,७९४ सभासद आहेत, त्यांपैकी ४२ सोसायट्या आहेत. असोसिएशनचे पांच ठिकाणीं डेपो असून स्वतःचें गिलिगन कॅटल ब्रीडिंग फॅार्म आहे. फॉर्मांतील जनावरांना अखिल भारतीय पशु–प्रदर्शनांत पहिलीं बक्षिसें मिळालेलीं आहेत. असोसिएशनचें मॉडेल पोल्ट्री फार्महि चांगलें काम करीत आहे. संस्थेच्या उपयुक्त कार्याची माहिती "अर्था"मध्यें वरचेवर आलेलीच आहे. प्रो. काळे ह्यांनीं असोसिएशनला गेल्या महिन्यांत भेट देऊन व प्रत्यक्ष काम पाहून समाधान व्यक्त केलें.

## अर्बन बँक सेक्रेटरीज ट्रेनिंग क्लास

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें मुंबई येथें वरील शिक्षण वर्ग जानेवारी २५ १९४३ रोजीं इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, सर जनार्दन मदन, यांचे हस्तें उघडण्यांत आला. त्यावेळीं चीफ मार्केटिंग ऑफिसर श्री. पाटील, असि. रजिस्ट्रार श्री. भागवत, प्रॉ. लँड मॉर्गेज बँकेचे मॅनेजर श्री. त्रिवेदी वगैरे मंडळी हजर होती. सदर वर्गांत शिक्षण घेण्याकरितां एकूण ३७ विद्यार्थी हजर असून त्यांपैकी २७ मुंबईंतील सोसायट्यांत काम करणारे व १० बाहेरील अर्बन बँकांत काम करणारे आहेत. मुंबईंतील विद्यार्थ्यांमध्यें येथील ई. डी. ससून आणि कंपनीनें आपल्या निरनिराळ्या सहकारी सोसायट्यांतून १५ विद्यार्थी खास पाठविले आहेत. वरील वर्ग सुमारें १ महिना चालू होता व त्यामध्यें एकूण ७३ व्याख्यानें देण्यांत आलीं. व्याख्यात्यांमध्यें दिवाण बहादूर काजी, प्रो. काळे, प्रो. बेरी, प्रो. पटेल, प्रो. घोगडे, प्रो. नागमिया, प्रि. टॅनन, सॉलीसिटर कोठारे, श्री. बी. एन्. गोखले, प्रो. एस्. जी. चितळे, श्री. मुरडेश्वर, श्री. भागवत, असि. रजिस्ट्रार, श्री. त्रिवेदी, श्री. संझगिरी, श्री. चाटी, प्रो. भाथेना, श्री. के. के. देसाई, श्री. एम्. आर. काळे, श्री. सहस्रबुद्धे, श्री. वागळे, श्री. देवधर, श्री. वैकुंठराय मेथा, श्री. वर्दे, श्री. पुरंदरे, प्रो. पालेकर, श्री. बापट व श्री. तळपदे ही मंडळी होती. वर्गांतील विद्यार्थ्यांना अर्बन बँक सेक्रेटरीज परीक्षेस नेमलेल्या विषयांचें शिक्षण देण्यांत आलें. त्यांपैकी कायदा या विषयावर एकूण २०, सहकारी चळवळीवर २२, हिशेबावर १० बँकिंगवर १५ व सेक्रेटरीअल प्रॅक्टीसवर ६ अशीं व्याख्यानें झालीं. ता. २२ फेब्रुवारी रोजीं वर्गसमाप्तीचे दिवशीं दि. ब. काजी यांचें समारोपादाखल व्याख्यान होऊन सर्व विद्यार्थी वर्गास व शिक्षक वर्गास अल्पोपाहार देण्यांत आला.

## भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

वरील बँकेस ३१ डिसेंबर १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ५,८२१ रुपये नफा झाला आहे. त्यांतून रिझर्व्ह फंडांत ११४७ रुपये टाकण्यांत आले. १ जुलै १९४१ ते ३१ डिसेंबर, १९४२ ह्या मुदतीचें ६% क्यु. रिडीमेबल प्रेफरन्स शेअरवरील डिव्हिडंड देण्यासाठी २,१४७ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. ऑर्डिनरी भागांस ३% डिव्हिडंड मिळालें व त्यासाठीं १,७५० रुपये लागले. ५३७ रुपये शिलकी नफा पुढील वर्षाचे हिशेबांत ओढण्यांत आला. बँकेचें खपलेलें भांडवल १,९३,९५० रुपयांचें असून वसूल भांडवल ९७ हजारांचेवर आहे. ताळेबंदाचे दिवशीं ठेवींचा आकडा ३ लक्ष ७९ हजार आहे. बँकेजवळ रोख व इतर बँकांत खात्यांवर १ लक्ष, २५ हजार रुपये असून बँकेनें ६० हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत. कर्जें २ लक्ष, ७ हजारांचीं असून ८३ हजारांच्या हुंड्या तिनें डिस्काउंट केलेल्या आहेत. बँकेच्या डायरेक्टरांचे रिपोर्टांत सुपरवायझिंग डायरेक्टर, श्री. के. बी. साळवेकर, ह्यांच्या कामगिरीबद्दल प्रशंसोद्गार काढलेले आहेत.

## अजरें येथील धान्य सोसायट्या

( ले. श्री. श्रीधर हरी दातार, ए. सी. आर. ए., बी. कॉम.
मॅनेजर, सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. इचलकरंजी )

दुष्काळांत व महागाईचे दिवसांत शेतकरीवर्गास उपयोग व्हावा व त्यांची उपासमार होऊं नये या हेतूनें सुबत्तच्या काळांत कडब्याच्या (फॉडर) व धान्याच्या (ग्रेन) सोसायट्या येथें स्थापन करणेंत आल्या. यापैकीं कडबा-सोसायट्यांचा प्रयोग व्हावा तितका यशस्वी झाला नाहीं. धान्याच्या सोसायट्यांचा प्रयोग मात्र संस्थानांतील अजरें तालुक्यांत यशस्वी झाला आहे. त्याची माहिती हल्लींच्या दुष्काळीं व धान्याच्या महर्गतेच्या काळांत उपयोग आहे असें वाटलेंवरून खालीं देत आहे.

हल्लींप्रमाणेंच सन १९१७-१८ सालींही अवर्षणामुळें व लढाईमुळें धान्याची महर्गता जाहली होती त्यावेळीं लोकांचे बरेच हाल झाले. त्यामुळें त्यानंतरच्या दोन वर्षांत धान्य व कडबा-सोसायट्या स्थापणेंत आल्या. या सोसायट्यांकरतां प्राथमिक भांडवल जमविणेचा मार्ग कोणासही मनोरंजक वाटेल.

अजरें तालुक्यांतील बहुतेक सर्व खेड्यांतील लोक आठवड्यांतून एक दिवस "पाळक" म्हणून पाळतात. या दिवशीं गांवांतील कोणीही मनुष्य कांहींही शेतकाम करीत नाहीं. घर शाकारणें, सारविणें, अगर गांवचे उपयोगाची रस्तादुरुस्ती, गांवास पाणी येण्याचा झरा दुरुस्त करणें साफसूफ करणें वगैरे सारखीं सार्वजनीक उपयोगांचीं कामें करतात. शेतकऱ्यांच्या या सुट्टीच्या दिवसाचा उपयोग करून घेणेंत आला. गांवमदतीनें एक मोठें शेत खंडानें करण्यांत आलें. या शेतांतील कष्ट काम आठवड्याचे सुट्टीचे दिवशीं गांवचे लोकांनीं केलें. त्यामुळें बीं बियाणें आणणें खेरीज इतर खर्च जवळ जवळ कांहींच आला नाहीं म्हटलें तरी चालेल. कर्मधर्मसंयोगानें त्या सालीं पिकेंही चांगलीं आलीं. गांवमदतीनें शेत पिकविल्यानें जमिनीचा खंड व बीं-बियाणें याकरतां लागलेला खर्च वजा जातां बाकी शिल्लक राहिलेलें धान्य गांवचे सर्व लोकांच्या मालकीचें झालें व तें प्राथमिक भांडवल धरून सोसायटी स्थापणेंत आली. त्यानंतर कांहीं सुस्थितींतील लोकांकडून ज्याचे त्याचे परिस्थितीचे मानानें एक पायली पासून एक मणा इतक्या ठेवी घेणेंत आल्या. त्यामुळें धान्याचा गल्ला बराच झाला. ज्यांनीं सोसायटीस अशा प्रकारची मदत केली तें सोसायटीचे आरंभींचे सभासद झाले. यानंतर झालेले सभासदाकडून एक पायली धान्य प्रवेश फी म्हणून घेतलें आहे.

अजरें तालुका कोंकण प्रांतांत मोडतो. येथील शेतकऱ्यांना विशेषत: पावसाळ्यांत—जुलै ते ऑक्टोबर या मुदतींत धान्याची टंचाई भासते. तेव्हां या दिवसांत सोसायटीचें धान्याचा त्यांना फारच उपयोग होतो. ज्या त्या सभासदाचे लायखीप्रमाणें व त्याच्या उत्पादन शक्तिप्रमाणें सोसायटींतून धान्य कर्जाऊ देणेंत येतें. अजरे भागांतील भात, नाचणे, सावें वगैरे पिकें साधारणपणें नोहेंबर ते जानेवारीपर्यंत निघतात. यामुळें दिलेलें कर्ज या दिवसांत परत येते.

कर्जाऊ दिलेल्या धान्याचा व्याजाचा दर पूर्वी 'सवाई' होता. म्हणजे एक मण कर्ज घेतलेस सवा मण परत करावें लागे. त्या वेळीं सोसायटीप्रमाणेच धान्याचा व्यवहार करणारे सावकारांचा व्याजाचा दर दिढीदुपटीचा होता. म्हणजे एक मण कर्जास दीड ते दोन मण धान्य परत करावयाचें. हल्लीं सोसायट्यांकडे धान्यांचा साठा बराच जाहलेनें व्याजाचा दर निमसवाई आहे म्हणजे एक मण धान्य घेतलेस एक मण दोन पायली परत करावें लागते. सावकारी व्याजाचे दर मात्र पूर्वीप्रमाणेंच आहेत. त्यामुळें धान्याच्या सोसायट्यांचा लोकांना फारच उपयोग झाला आहे.

धान्याचा साठा सरकारी गांवचावडींत ठेवून घेणेची संस्थाननें परवानगी दिली आहे. व त्याचे रक्षणाची जबाबदारी गांवचे पाटलावर आहे. या धान्यांत सर्वांचे हितसंबंध असलेनें या धान्याचे सुरक्षिततेवर गांवांतील सर्व लोकांचें लक्ष असतेंच. या सोसायट्यांचे सेक्रेटरींना वर्षांतून जास्तींत जास्त आठदहा दिवस काम करावें लागते. जुलै-ऑगस्ट महिन्यांत धान्याचा कोठा एकदा उघडला कीं एक वेळीं सर्व सभासदांना धान्य देणेंत येतें त्यावेळीं एक दोन दिवस लागतात. पुढें जानेवारी महिन्यांत धान्य वसुलीकरितां चारआठ दिवसांत धान्य वसूल करून पुन्हां कोठा भरला कीं संपलें काम!

कांहीं गांवांत गांवचे जरूरीपेक्षांही जास्त साठा जाहला आहे. त्याची विक्री करून रोकड करणेंत येते. अशा रीतीनें सालोसाल जमलेल्या रकमेंतून मंढोली या पन्नास-पाऊणशें घरांच्या गांवचे लोकांनीं सार्वजनिक उपयोगाकरतां गांवचे शेजारीं एक हजार रुपये खर्च करून विहीर बांधली आहे. अंगमेहनत गांवचे सर्व लोकांनीं विनामूल्य केली. दगड, गवंडी वगैरे करतांच फक्त वरील खर्च आला. या विहीरीमुळें गांवचे लोकांना सर्व वर्ष पुरेल अशा पाण्याची सोय झाली आहे. ही विहीर बांधणेपूर्वी या गांवचे लोकांना उन्हाळ्यांत एक मैलावरून पाणी आणावें लागत असे. सोहाळे गांव थोडें मोठें आहे त्यामुळें येथें धान्याचा गल्लाही बराच साठतो. तो ठेवणेची पंचाईत पडे. म्हणून धान्य ठेवणेकरतां सोसायटीनें स्वत:चे मालकीचे गांव चावडी शेजारींच गोडाऊन बांधलें आहे. इतर कांहीं सोसायट्यांनीं जास्तीच्या धान्याचे पैसे करून बँकेंत ठेवले आहेत त्याचा योग्य वेळीं त्या त्या गांवचे सार्वजनिक कार्यकरतां उपयोग होईलच.

धान्याच्या सोसायट्या अगदी लहान लहान व शेतकीप्रधान खेड्यांतच जास्त यशस्वी होतात व तेथील लोकांना त्याचा उपयोगही बराच होतो असें अनुभवास आलें आहे. गांवची लोकसंख्या थोडी असलेनें अर्थातच तेथील लोकांना एकमेकांबद्दल प्रेम वाटतें. एकजुटीनें कोणतेहि सार्वजनिक उपयोगाचें काम करणें शक्य होते, व सर्वांच्या नफानुकसानीचा प्रश्न असलेनें सर्व लोक आपुलकीच्या भावनेनें काम करतातही. तरी अशा प्रकारचे प्रयोग इतर ठिकाणीं करून पाहण्यासारखे आहेत.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक. व्यवस्थापक

## शेतकी मालावर कर्जे

श्री बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नासिक,चें सर्क्युलर

हंगामाचे वेळीं शेतकऱ्यांस पैशाची जरुरी असल्यामुळें धान्य व शेतीचा इतर तयार माल बाजारांत मोठ्या प्रमाणांत विक्रयासाठी आणावा लागतो. कारण धान्याच्या अगर इतर मालाच्या तारणावर तात्पुरतीं कर्जे घेऊन माल सांठवून ठेवण्याची तरतूद खेडेगांवांत नसते, व त्यामुळें हंगामाच्या सुरवातीपासून उत्पन्न झालेलें धान्य व माल कमी भावांत विकावें लागतें. तसेंच पावसाळ्यांत जेव्हां शेतकरी लोकांस धान्याची जरुरी असते त्यावेळीं, तोच माल जास्त किंमत देऊन परत त्याच खेडेगांवीं आणावा लागतो. त्यामुळें मालाचे वहातुकीचा खर्च वाढून शेतकऱ्यांस जास्त भावानें माल घेणें भाग पडतें. यासाठी पुढच्या हंगामापर्यंत आपापल्या कुटुंबास लागणारें धान्य, बीं व इतर माल प्रत्येक शेतकऱ्यास साठवून ठेवता यावा म्हणून सोसायटीच्या सभासदांकरितां सोसायटीला मालाच्या तारणावर कर्जे देण्याची सोय बँकेनें खालीलप्रमाणें केलेली आहे:—

### कर्जाची योजना

१ प्रत्येक सोसायटीनें आपापल्या सभासदांस मालाच्या तारणावर किती कर्ज लागेल त्याची मागणी बँकेकडे त्या भागाचे इन्स्पेक्टर मार्फत केली पाहिजे.

जर मागणी तातडीची असेल तर दर एक सोसायटीस मे. सिनिअर इन्स्पेक्टर सो॥ हे रु. २००० पर्यंत कर्ज ताबडतोब देऊं शकतील. मात्र सोसायटीनें माल ताब्यांत घेण्याची व बँकेला तारणरोखा करून देण्याची वगैरे अटी पाळल्या पाहिजेत व अशा रितीनें दिलेलें कर्ज सोसायटीचे पोट नियमांत ठरलेल्या बाहेरील कर्जमर्यादेच्या आंत असलें पाहिजे.

२ सोसायटीचा ऑडिट वर्ग 'ड' नसला पाहिजे. परंतु मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांस जर सोसायटीची पंच कमिटी अशा प्रकारचा व्यवहार समाधानकारक रीतीनें करूं शकेल, अशी खात्री वाटली तर 'ड' वर्गातील अशा सोसायटींस देखील असें कर्ज देतां येईल.

३ मालाच्या किंमतीवर ७०% टक्के पर्यंत कर्ज देतां येईल. मात्र त्यापैकीं ३०% टक्के इतकी तरी रक्कम सोसायटीचे कर्जफेडीकडे लावली पाहिजे.

४ गोडाऊन भाडें, विमा व इतर खर्च ज्या त्या मेंबरांस सोसावा लागेल व बँकेच्या इन्स्पेक्टरनें माल साठवण्याची व्यवस्था पाहून पसंत केल्यानंतरच कर्ज देण्यांत येईल.

वरील योजनेचा फायदा आपल्या सर्व मेंबरांस करून घेतां येईल अशी प्रत्येक सोसायटीनें तजवीज करावी.

कर्ज साधारणपणें सहा महिन्यांच्या मुदतीनें देण्यांत येईल व त्याच्यावर व्याजाचा दर ५॥ टक्के आकारण्यांत येईल. जर व्याजाचा दर यापेक्षा थोडा कमी पाहिजे असेल अगर मुदत वाढवून घ्यावयाची असेल अगर इतर कांहीं अटींमध्यें फेरफार करण्याची अवश्यकता वाटत असेल तर त्याबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

## पश्चिम खानदेश सहकारी वृत्त

या जिल्ह्याच्या नंदुरबार व नवापूर तालुक्यांत मुख्यत्वें करून भिल्ल वस्ती जास्त आहे. या दोन तालुक्यांत ता. १-१-४२ पासून कर्ज निवारण कायदा लागू केला आहे. सदरहू नंदुरबार येथें मागील वर्षीच शेतकऱ्यांचा 'सहकारी खरेदी विक्री संघ' स्थापन झाला आहे. या संघाचा कायदा फार दूरच्या लोकांना घेतां येत नाहीं. सबब या संघाच्या शाखा खांडबारा व नवापूर येथें स्थापन कराव्या अशाबद्दल बरेच दिवसापासुन मे. असिस्टंट कलेक्टर साहेब व संघाचे चेअरमन मे. यू. बी. इनामदार यांचेमध्यें पत्रव्यवहार चालू होता. अखेरीस या भागाचे असिस्टंट रजिस्ट्रार मे. पालेकर साहेब यांच्या अनुमतीनें ता. २५।१२।४२ पासून खांडबारा येथें संघाचे चेअरमन मे. यू. बी. इनामदार साहेब यांनीं समक्ष जाऊन शाखा उघडून कामास सुरुवात करून दिली. ता. ३१।१२।४२ रोजीं मे. प्रांतसाहेब व स्पेशल भिल्ल अप्लिफ्ट ऑफिसर यांचे अध्यक्षतेखालीं तालुक्यांतील भिल्ल शेतकरी व स्थानिक व्यापारी यांची सभा झाली. त्या सभेस सुमारें ७०० ते ८०० शेतकरी हजर होते. सभेंत डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर मि. केसकर, संघाचे चेअरमन मि. यू. बी. इनामदार, असि. रूरल डेव्हलपमेंट इन्स्पेक्टर मि. चौधरी वगैरेंचीं कर्जनिवारण कायदा शेतकरी, सहकारी खरेदी-विक्री संघ, दारूबंदी वगैरे विषयांवर भाषणें झालीं, त्यानंतर शेतकरी कर्जदारांना मे. प्रांतसाहेब यांनीं समक्ष चौकशी करून शेतीचे लागवडीसाठी व पोटगीसाठी तगाई कर्जे मंजूर केली.

त्याचप्रमाणें ता. १।१।४३ रोजीं नवापूर येथें नवापूर पेठ्यांतील भिल्ल शेतकरी व स्थानिक व्यापारी यांची सभा वरील कामाकरितां म्हणजे सहकारी खरेदी विक्री संघ स्थापन करणेकरितां झाली. सभेस सुमारें १०० लोक हजर होते. डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर व नंदुरबार को-ऑपरेटिव्ह परचेस अँड सेल युनियनचे चेअरमन मे. यू. बी. इनामदारसाहेब यांचीं भाषणें झालीं. नवापूर येथें अशा तऱ्हेचा संघ स्थापन करण्याचें सर्वानुमतें ठरलें. प्राथमिक भांडवल जमाविण्यासाठी एक कमिटी स्थापन केली.

## पगारदार नोकरांच्या सोसायट्यांकडून घेतलेलें कर्ज

### हप्ता पगारांतून कापणें कायदेशीर

पगारदार नोकरांच्या सहकारी सोसायट्यांचे सभासद, सोसायट्यांकडून कर्ज घेतेवेळीं, पगार वाटणाऱ्या कचेरीस पगारांतून कर्जाचा हप्ता कापून घेऊन तो सोसायटीकडे रवाना करण्याचा अधिकार देणारा कागद लिहून देत असत. कर्जाचा कोणताहि हप्ता अथवा त्यावरील व्याज जोपर्यंत बाकी आहे, तोपर्यंत दिलेला हा अधिकार परत काढून घेतला जाणार नाहीं, असेंहि बंधन त्याच करारान्वयें स्वतःवर ते लादून घेत असत. ही पद्धति कायद्यास धरून नाहीं असें आढळून आलें आहे. म्हणून तिला कायदेशीर स्वरूप तात्काळ देणें आवश्यक झालें. पगारदार नोकरांच्या सहकारी सोसायट्या अत्यंत उपयुक्त कार्य करीत आहेत व त्यांच्या व्यवहाराचा कायदेशीरपणा नाहींसा झाला तर त्यांचें अस्तित्वच टिकणें कठीण जाईल, ह्या उद्देशानें सहकारी कायद्यांत आवश्यक ती सुधारणा मुंबई सरकारनें घडवून आणली आहे. कायद्यामधील ह्या दुरुस्तीस मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांची संमति मिळाली असून गॅझेटांत ती दुरुस्ती जाहीर करण्यांत आली आहे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

.१३१८३

REGISTE ED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख ३ मार्च १९४३ अंक ९

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

(Estd. in 1935)
**The Co-operators' Book Depot**
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
*Books on* :—
Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.
Books on all other subjects are also readily supplied.
Agents for the Publications of:
1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

**N. V. WADNERKAR**
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## कायद्यांची मराठी पुस्तकें

१ इन्कम् टॅक्स कायदा (सुधारणांसह) किं. १॥रु.
२ कर्ज देण्याघेण्याबाबत कायदा किं. २ रु.
३ मृत्युपत्राचा कायदा किं. १। रु.
४ हिंदु स्त्रीधनाचा कायदा किं. १२ आ.
५ विवाहाचा कायदा किं. १२ आ.

याशिवाय मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या "न्याय बोध" मासिकाचे वर्गणीदार व्हा. वा. व. ५ रु. नमुना अंक मागवा.

—न्यायबोध-ऑफिस, महाल, नागपूर शहर


## विविध माहिती

### कोहिनूर मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४२ सालीं ३ कोटि, १८३/४ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री करून भागीदारांस करमाफ ४०% डिव्हिडंड दिलें.

### बँक ऑफ महाराष्ट्र लि.

वरील बँकेची वार्षिक सभा ता. २८ रोजीं भरली होती. तींमध्यें श्री. वर्दे व सोहोनी हे निवृत्त होणारे डायरेक्टर पुनः निवडून आले. श्री. पदमजी ह्यांनीं आपली उमेदवारी परत घेतली असल्याचें कळविल्यानें त्यांच्या व श्री. गुप्ते ह्यांच्या रिकाम्या झालेल्या जागीं श्री. देशमुख व श्री. गोखले हे निवडले गेले. श्री. आपटे व मेसर्स कुलकर्णी आणि सानोलकर ह्यांची ऑडिटर्स म्हणून फेरनिवड झाली. भागीदारांस ४१/२% करमाफ डिव्हिडंड मंजूर झालें.

### अबकारी उत्पन्न

मुंबई सरकारच्या अबकारी उत्पन्नांत १९४१-४२ मध्यें ४८ लक्ष रुपयांची वाढ झाली. एकूण उत्पन्न २ कोटि, ६६ लक्ष रुपये भरलें. सरकारनें दारूबंदीचें धोरण अमळ ढिलें केल्या-कारणानें दारूचा खप वाढला; दारूची आयातही जास्त झाली.

### उत्पन्नापैकीं ३० टक्के कागद उपलब्ध होणार

हिंदी कागदाच्या गिरण्यांच्या उत्पादनापैकीं किमान ५०% तरी बिनसरकारी, विशेषतः शैक्षणिक मागणीसाठी राखून ठेवण्यांत यावें, अशी गिरण्यांची सूचना होती, तिचा विचार करून हिंदुस्थान सरकारनें ३०% कागद बिनसरकारी मागणीसाठी उपलब्ध करण्यास संमति दिली आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ११ पै इतका पडला.

### कलकत्त्यामधील टेलिफोन कंपनी सरकारकडे जाणार

बेंगॉल टेलिफोन कॉर्पोरेशनची कलकत्त्यामधील टेलिफोनची व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें आपल्या स्वतःकडे १ एप्रिलपासून घेण्याचें ठरविलें आहे.

### बंगाल सरकारचें अंदाजपत्रक

बंगाल प्रांतिक सरकारच्या १९४३-४४ च्या अंदाजपत्रकांत १ कोटी, ५३ लक्ष रुपयांची तूट अपेक्षित आहे.

### रबर

हिंदी रबराच्या मळ्यांतून आणखी रबर गोळा करण्याची योजना युनायटेड किंगडम रबर मिशननें सुचविली आहे, ती अंमलांत आल्यास १६ हजारांऐवजी १८१/२ हजार टन रबर दरसाल निघूं शकेल.

### बँक ऑफ बरोडा, लि.

वरील बँकेचें अधिकृत भांडवल २ कोटी, ४० लक्ष रुपयांच्या २ लक्ष, ४० हजार भागांत विभागलेलें आहे. प्रत्येक भाग १०० रुपयांचा आहे. त्यांपैकीं १ कोटी, २० लक्ष रुपयांचे १ लक्ष, २० हजार भाग विक्रीस काढलेले असून ते सर्व खपलेले आहेत. उरलेल्या १ लक्ष, २० हजार भागांपैकीं ८० हजार भाग बँकेनें विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक १०० रुपयांच्या भागाची किंमत १५५ रुपये ठरविण्यांत आलेली आहे. तीन भागांस दोन भाग ह्या प्रमाणांत ते सध्यांच्या भागीदारांस मिळूं शकतील.

### रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गव्हर्नरचा मृत्यु

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर हे आपल्या वयाच्या ५२ व्या वर्षी नुकतेच मरण पावले. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेची पूर्वतयारी त्यांनींच केली व बँकेस १ एप्रिल १९३५ रोजीं प्रारंभ झाल्यावर ते तिचे डेप्युटि गव्हर्नर झाले. १९३७ सालीं त्यास बँकेचे गव्हर्नर नेमण्यांत आलें. ह्या जागेची त्यांची मुदत १९४२ मध्यें संपली, ती पांच वर्षांनीं वाढविण्यांत आली होती.

### कागदाचें दुर्भिक्ष

१९४२ सालासाठी कलकत्ता विश्वविद्यालयाची १३ हजार रिमें इतकी कागदाची मागणी होती, परंतु अद्याप ८,१३९ रिमें तिच्या हातीं आलेलीं नाहींत. ज्या फर्मला विश्वविद्यालयानें ऑर्डर दिली होती, तिनें सरकारी नियंत्रणामुळें कागद पुरवितां येत नाहीं असें कळविलें आहे. विश्वविद्यालयानें हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्यांकडे दाद मागितली आहे.

### गुळाची खरेदी

सिंध सरकारनें स्थानिक गरजेसाठी संयुक्त प्रांताकडून ४ लक्ष मण गूळ विकत घेण्याचें ठरविलें आहे. गूळ तेथें दाखल होऊं लागला आहे.

### पंजाबचा गहूं

"पंजाबांत १५ लक्ष अधिक एकर जमिनींत लागवड झाली आहे, त्यांपैकीं १० लक्ष एकर कालव्याच्या पाण्याखालील आहेत. १० लक्ष हिंदी सैनिकांस दोन वर्षे पुरेल इतकें धान्य त्यांतून निघूं शकेल" असें पंजाबचे प्राइस कंट्रोलर सर वुइल्यम रॉबर्ट्स हे नुकतेच म्हणाले.

### कोयनेलची लागवड

बंगालमध्यें कोयनेलची लागवड वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. सध्यां १ हजार एकरांत त्याची लागवड झालेली असून आणखी एक हजार एकरांत ती होण्याजोगी आहे. लागवड केल्यापासून कोयनेल मिळूं लागण्यास आठ वर्षे लागतात.

### सयामी लोकांना सल्ला

सयाममधील लोकांना आणि सैनिकांना जपानविरुद्ध बंड पुकारण्याचा सल्ला मार्शल चांग-कै-शेक ह्यांनीं आपल्या रेडिओवरील भाषणांत दिला आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ६६ | नियंत्रण ... ... | ६९ |
| २ मध्यवर्ती सरकारचें ... अंदाजपत्रक... ... | ६७ | ५ लाच देण्याचा निष्फळ ... प्रयत्न ... ... | ७० |
| ३ बँक ऑफ महाराष्ट्र लि. | ६८ | ६ मोटार गाड्यांचा विमा... | ७० |
| ४ स्फुट-विचार सोन्याच्या खाणींचा अकाली धंदा– जर्मन सैन्याची पीछेहाट– धान्य पुरवठ्याचें मध्यवर्ती | | ७ ॲसिड, अल्कलीज, खतें व रंग ... ... | ७१ |
| | | ८ उत्पन्नावरील कर ... | ७१ |

अर्थ

बुधवार, ता. ३ मार्च, १९४३

## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

प्रचंड युद्धखर्च, मोठ्या तुटी व वाढते कर ह्या गोष्टी हिंदुस्थान सरकारच्या अंदाज-पत्रकांत येणें अपरिहार्यच झालें आहे. सर जरेमी रेस्मन यांनीं आपलें मध्यवर्ती सरकारचें १९४३–४४ सालचें अंदाजपत्रक असेंब्लीपुढें मांडतांना माहिती दिली तीमध्यें युद्धजन्य सांपत्तिक परिस्थितीचें ठळक चित्र उमटलेलें दिसतें. सरकारच्या खर्चीत युद्धखर्चाचाच मुख्य भाग आहे. १९४२–४३ सालांत ह्या खर्चाचा आंकडा सुमारें १९० कोटि होईल आणि १९४३–४४ मध्यें सुमारें १८३ कोटि रुपये युद्धाप्रीत्यर्थ खर्चले जातील असा अंदाज करण्यांत आला आहे. युद्धखर्च उत्पन्नांतून भागवला जाणें अशक्य असल्यानें १९४२–४३ मध्यें ९४ कोटींची तूट येईल आणि १९४३–४४ सालीं नवीन कर बसवले नाहींत व करवाढ केली नाहीं तर तुटीचा आकडा ६० कोटि रुपये इतका होईल. अंदाजपत्रकाच्या सालीं बिगरलष्करी खर्च ७७ कोटि रुपये होईल आणि त्यांत लष्करी खर्च मिळवला तर एकूण खर्चाची बेरीज २५९ कोटि रुपये होईल. आहेत त्या करांच्या हिशेबानें एकूण उत्पन्न १९९ कोटि रुपये येईल. ह्या दोन आंकड्यांमधील फरका इतकी तूट येणार असल्यानें ती भरून कशी काढावयाची हा प्रश्न फडणीसांपुढें उभा राहिला. जादा करांनीं ती सबंध भरून निघणें अशक्य आहे हें उघड आहे आणि तीमधला कांहीं भाग कर्जाच्या मार्गानें उभा करणें अपरिहार्य आहे. करवाढीनें तुटीचा फक्त तिसरा हिस्सा भरून निघावयाचा आहे.

सर जरेमी ह्यांनीं नवीन कर सुचविले आहेत, त्यांमध्यें हिंदी तंबाखू व वनस्पतिजन्य तूप–तेलासारख्या पदार्थांवरील एक्साइज हे मुख्य आहेत. बाकीचे कर चालू करांच्या वाढीच्या स्वरूपाचे आहेत. युद्धकालांतल्या करांचा बोजा प्रामुख्यानें श्रीमान् लोकांवर पडावा आणि त्या लोकांचा राहणीचा खर्च मर्यादित असावा, असा हेतु असतो. ह्याप्रमाणें प्राप्तीवरील कर, सुपरटॅक्स, कॉर्पोरेशन टॅक्स, एक्सेस प्रॉफिट टॅक्स ह्यांच्यामध्यें वाढ करण्यांत आली आहे. पोस्टाच्या पत्रावर पहिल्या एक तोळा वजनानंतर अर्धा-आण्याचें तिकीट लागत असें, तें एक आणा करण्यांत आलें आहे. कार्डाच्या किंमतींत वाढ केलेली नाहीं. पार्सलें, टेलिफोन ह्यांच्या दरांतहि वाढ झाली आहे. प्राप्तीवरील कराचे बाबतींत पांच हजार रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरील दरांत बदल नाहीं. त्या मर्यादेपुढें क्रमाक्रमानें दर वाढविण्यांत आले आहेत. जादा नफ्यावरील कराचा दर आहे तोच कायम राहील. तो फक्त आणखी एक वर्षाचा घेण्यांत येईल. प्राप्तीवरील कराच्या वाढीमुळें सरकारच्या उत्पन्नांत सात कोटि रुपयांची भर पडेल असा अंदाज आहे. तंबाखूवरील करांचें उत्पन्न दीड कोटि रुपये, पोस्टाच्या वाढलेल्या दरांचें सुमारें सव्वा कोटि रुपये व वनस्पतिजन्य तुपावरील करांचें सुमारें दीड कोटि ह्याप्रमाणें सरकारला सुमारें वीस कोटि रुपये अधिक मिळतील असा अंदाज आहे. कस्टम्सच्या करावर वीस टक्के गेल्यावर्षीं अधिक बसविण्यांत आले होते, तो सर्चार्ज चालू रहावयाचा आहे.

लष्करी खर्चाची वांटणी हिंदुस्थान सरकार आणि ब्रिटिश सरकार ह्यांचेमध्यें होण्याचे बाबतींत पूर्वी योजना ठरली आहे, तीमध्यें कांहीं बदल होणार नाहीं. ह्या प्रश्नाचे बाबतींत हिंदुस्थानच्या दृष्टीनें कांहीं अनुकूल फेरफार होतील अशी असलेली लोकांची अपेक्षा खरी ठरलेली नाहीं. लष्करी खर्चाचा हिशेब खाली दिला आहे त्याप्रमाणें तो होईल.

| | कोटि रुपये. |
|---|---|
| मामुली लष्करी खर्च | ३६·७ |
| महागाईमुळें वाढ | १०·६ |
| युद्धामुळें प्रत्यक्ष खर्च | १२७·० |
| पेन्शन वगैरे | ८·४ |
| एकूण | १८२·८ |

पुढील सालच्या उत्पन्न–खर्चाचे ठोकळ आकडे येणेंप्रमाणें आहेत.:—

| | कोटि रुपये. |
|---|---|
| उत्पन्न | १९९·३ |
| खर्च | २५९·५ |
| तूट | ६०·२ |

### अप्रतिम दानशूरत्व

लॉर्ड नफील्ड ह्या ब्रिटिश कारखानदाराची दानशूरत्वाबद्दल ख्याति आहे. त्यांनीं आजवर कोट्यवधि रुपये निरनिराळ्या सार्वजनिक हिताच्या कार्यासाठी देणग्या म्हणून दिले आहेत. राष्ट्रसंवर्धक कार्यासाठी त्यांनीं नुकतेच १ कोटि पौंड ( १३ कोटि रुपये ) दिले आहेत. आजपर्यंतच्या त्यांनीं दिलेल्या अशा देणग्यांची एकूण रक्कम सुमारें ३५ कोटि रुपये भरते. रॉकफेलर आणि कार्नेजी ह्या अमेरिकन दानशूरांनीं त्यापूर्वी अनुक्रमें करून १६० कोटि आणि ८० कोटि रुपये दिल्याचीं नामांकित उदाहरणें आहेत.

### इंडियन लाइफ इन्शुअरन्स कं. लि., कराची

वरील कंपनीच्या १९४१ अखेरच्या मूल्यमापनांत ११ लक्ष ५२ हजार रुपयांचा वाढावा आढळला. हयातीनंतरच्या व हयातींतील विम्यांस दरसाल दरहजारीं अनुक्रमें २० व १६ रुपये बोनस मिळणार आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्र, लि. पुणें.

### प्रो. काळे ह्यांचें अध्यक्षीय भाषण

बँक ऑफ महाराष्ट्राची आठवी साधारण सभा गेल्या रविवारीं ता. २८ फेब्रुवारीस भरली होती. त्या प्रसंगीं अध्यक्ष ह्या नात्यानें प्रो. काळे ह्यांनीं खालीं दिलेल्या आशयाचें भाषण केलें:—

सर्व जगास व्यापून टाकणाऱ्या चालू युद्धाच्या तिसऱ्या वर्षांत इतर अनेक धंद्यांप्रमाणें हिंदुस्थानांतील बँकिंगच्या धंद्यावर विशेष आर्थिक परिणाम झाले असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. युद्धाशीं प्रत्यक्ष संबंध नसलेल्या धंद्यांत मंदी, जरूरीचे जिन्नस, कच्चा माल व यंत्रसामुग्री ह्यांचा तुटवडा, महागाई, चलनाच्या विस्तार, करांची वाढ, प्राप्तीचा जोवनास अपुरेपणा इत्यादि युद्धजन्य प्रकारांमुळें पैशाची विपुलता होऊन बँकांतील ठेवी झपाट्यानें वाढल्या, व्याजाचे दर उतरले आणि वाढत्या भांडवलाच्या मानानें ह्या संस्थांनीं व्यापार-धंद्यांस दिलेल्या कर्जाचें प्रमाण उतरलेलें आहे. शेड्यूल्ड बँकांचे आकडे पाहिले असतां ठेवींत व सरकारी रोख्यांतील गुंतवणीमध्यें वाढ आणि दिलेल्या कर्जांत उतार या गोष्टी नजरेंत भरतात. पुढचीं दोन तीन वर्षे हिंदी बँकांस असल्याच खडतर परिस्थितीमधून जावें लागणार आहे.

आपल्या बँकेच्या ताळेबंदाकडे नजर फेकली असतां त्यामध्यें वसूल झालेल्या भांडवलांत आणि ठेवींत चांगली वाढ झालेली आढळेल. डिसेंबर महिन्यांत ऐशीं हजार रुपये व पुढच्या दोन महिन्यांत सुमारें सत्तर हजार रुपये एवढ्या किंमतीचे भाग खपले आहेत. एकूण भांडवलाच्या मानानें आज एकूण वसूल झालेलें भाग भांडवल भरपूर होऊन गेलें आहे. निरनिराळे रिझर्व्ह वाढत गेले आहेत, आणि त्यांचे योगानें बँकेस मजबुती आली आहे. रोख्यांतील गुंतवण वाढून त्यांचे मार्गानें पैसा तरता रहाण्यास सहाय्य झालें आहे आणि ठेवीदारांचा पैसा अप्रत्यक्ष रीतीनें सुरक्षितपणें गुंतवला गेला आहे. युद्धजन्य मंदीमुळें दिलेल्या कर्जांत प्रमाणबद्ध विस्तार झालेला नाहीं ही गोष्ट ब्रिटिश व हिंदी बँकांमध्यें आज आढळते तशीच येथें आहे. रोख्यांची मूळ व बाजारी किंमत ह्यांच्या मधला फरक आतां अगदीं अल्प असा झालेला आहे. बँकेजवळील व बँकांतील रोकड शिल्लक भरपूर आहे. युद्धपरिस्थितीमुळें चालू खर्च वाढणें अपरिहार्य आहे हें सांगावयास नकोच. सुरक्षितपणाच्या कोणत्याहि कसोटीस पूर्णपणें उतरेल अशी बँकेची सांपत्तिक स्थिति आहे आणि ती साडेचार टक्के करमाफ डिव्हिडंड देण्यास सर्वस्वी अनुकूल आहे. श्री. गोखले, बँकेचे मॅनेजर, यांनीं उत्कृष्ट काम केलें आहे पण त्यांनीं सुचविलेल्या नोकरीसंबंधीं नवीन अटी बोर्डास अग्राह्य वाटून मान्य न झाल्यानें त्यास त्यांचा राजीनामा नाखुषीनें स्वीकारावा लागला आहे. त्यांच्या कर्तृत्वास आतां अधिक विस्तृत क्षेत्र मिळालें आहे ही समाधानाची गोष्ट आहे, पण ते मॅनेजरच्या जागेवर राहून बँकेच्या पुढील विकासास मदत करते तर तें इष्ट झालें असतें असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. हा प्रामाणिक मतभेदाचा प्रश्न म्हणून सोडून देणें आवश्यक आहे.

बँकेचा अध्यक्ष ह्या नात्यानें हें माझें शेवटचें भाषण असल्यामुळें गेल्या सात वर्षांच्या तिच्या प्रगतीचा त्रोटक आढावा घेणें मला जरूर वाटतें. महाराष्ट्राची उच्च ध्येयानें आणि सर्वमान्य व निर्दोष पद्धतीनें चालविलेली मध्यवर्ती बँक म्हणून मराठा चेंबरच्या मंडळींनीं तिची स्थापना केली. तेव्हां तिच्या कारभारांत वैयक्तिक हितसंबंधांचें ठाणें बसूं नये आणि पगारदार मॅनेजरच्या हातून डायरेक्टर्सनीं काम करून घ्यावें, अशी कल्पना निश्चित झाली. कोणाहि भागीदारास पंचवीसापेक्षा अधिक मतें असूं नयेत व कांहीं मर्यादेच्या पलीकडे डिव्हिडंड गेलें असतां नफ्याचा ठराविक अंश महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या प्रगतीसाठीं योजावा हीं वैशिष्ट्यें मान्य करण्यांत आलीं. भागीदारांचे विश्वस्त म्हणून पहिले डायरेक्टर्स मूळच्या तत्त्वांस व पद्धतीस धरून कारभार करीत आले आहेत आणि त्यांचे परस्पर संबंध विश्वासाचे व पूर्ण सहकार्याचे असे राहिले आहेत. बदललेल्या कल्पना, परिस्थिति व गरजा ह्यांस अनुसरून मूळच्या व आतांपर्यंतच्या पद्धतींत बदल करूं नये असें थोडेंच आहे? तथापि, नव्या बोर्डास माझा असा सल्ला आहे कीं ह्यासंबंधांत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले असतां त्यावर भागीदारांचा स्पष्ट अभिप्राय घेण्यास त्यांनीं कचरूं नये. भागीदार बँकेचे मालक आहेत व त्यांच्या बहुमताप्रमाणेंच डायरेक्टरांनीं आपलें धोरण आखावयाचें आहे. आतांपर्यंत बोर्ड व भागीदार ह्यांचे संबंध जसे मित्रत्वाचे व विश्वासाचे राहिले आहेत तसेच ते पुढेंहि रहातील आणि बोर्डाचा कारभार उच्च तत्त्वांस व सुव्यवस्थेस धरून होईल असा मला विश्वास वाटतो. येत्या दोन तीन वर्षांत विशेष दक्षतेची आवश्यकता आहे. आपल्या हातांतला ताळेबंद सर्वस्वी समाधानकारक असाच आहे आणि बँकेची उत्तरोत्तर प्रगति होत रहावी अशी आपणा सर्वांचीच इच्छा आहे.

---

### आयुर्विमा कायद्यांत दुरुस्ती

इन्शुअरन्स ॲडव्हायसरी कमिटीची सभा मुंबई येथें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकतीच भरली होती. त्या वेळीं खालील गोष्टींचा खुलासा झाला:—

(१) कंपन्यांवर बोनस न देण्याचा निर्बंध घालण्यासंबंधीं सरकारचा कांहींच निर्णय अद्याप झालेला नाहीं.

(२) विमा कंपन्यांनीं हल्लीं व्याजाचे दर उतरले असल्यामुळें आपले हप्ते वाढविणें इष्ट असलें तरी हा कंपन्यांचा अंतर्गत व्यवस्थेचा प्रश्न असल्यामुळें सरकार त्यांत हात घालूं इच्छित नाहीं.

(३) सध्याच्या युद्धपरिस्थितींत विमा कायद्यांत दुरुस्ती करून २७ वें कलम (सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीसंबंधीचें) सुधारण्यास सरकारास सवड नाहीं. तथापि, विमा कायद्याखालील नियम दुरुस्त करून कांहीं भागत असल्यास त्याचा विचार केला जाईल.

---

### श्री. सी. डी. देशमुख

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर जेम्स टेलर हे निवर्तल्यामुळें त्यांची जागा भरून निघेपर्यंत गव्हर्नरचे अधिकार डेप्युटी गव्हर्नर श्री. सी. डी. देशमुख ह्यांस देण्यांत आले आहेत. बँकेच्या सेंट्रल बोर्डाची शिफारस विचारांत घेऊन गव्हर्नर जनरलनें आपल्या कौन्सिलच्या सल्ल्यानें गव्हर्नरची व डेप्युटि गव्हर्नरांची नेमणूक करावयाची असते, परंतु सेंट्रल बोर्डाची शिफारस अमान्य करण्याचा त्यास अधिकार आहे.

# स्फुट विचार

### सोन्याच्या खाणींचा अकाली धंदा

युद्धास ज्यांचा प्रत्यक्ष उपयोग नाहीं आणि सामान्य जनतेच्या रोजच्या गरजा भागविण्यासाठी जे अपरिहार्य नाहींत असे धंदे सध्याच्या लढाऊ निकडीच्या परिस्थितींत चालू देणें क्षम्य नाहीं असें कोणासहि वाटल्यावांचून राहणार नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां सोन्याच्या खाणींतून ही धातू बाहेर काढण्यांत लक्षावधी मजूर गुंतवून ठेवणें समर्थनीय ठरणार नाहीं. लढाऊ सामुग्रीच्या बनावटींत इतर धातूंस विलक्षण मागणी आहे आणि सोनें खाणींतून निघालें नाहीं तर राष्ट्रीय सरकारांचें किंवा जनतेचें अडेल असें थोडेंच आहे? सर्व उत्पादक शक्ति लढाऊ सामुग्रीच्या बनावटीवर एकवटावयाची असतां सोन्याच्या खाणी चालू ठेवणें असमर्थनीय आहे. चैनीच्या वस्तूंचें उत्पादन व पुरवठा सर्व देशांत अत्यंत मर्यादित किंवा बंद करण्यांत आला आहे. मग या नियमास सोनें हा अपवाद कां असावा? हा विचार पटून उशीरानें कां होईना, अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया ह्या राष्ट्रांनीं सोन्याच्या खाणींचा धंदा बंद करण्याचें ठरवलें असून त्यांत गुंतलेल्या कामकऱ्यांचा व यंत्रांचा उपयोग दुसऱ्या धातूंच्या उत्पादनांत करण्यांत यावयाचा आहे. दक्षिण आफ्रिकेचें राष्ट्रीय आर्थिक जीवन सोन्याच्या खाणींच्या धंद्याशीं इतकें संलग्न झालेलें आहे कीं त्या देशांत वरील तीन राष्ट्रांचें अनुकरण केलें जाईल, असें वाटत नाहीं. अमेरिकेनें स्वतः युद्धांत भाग घेण्याचें ठरवलें आणि "लीज-लेंड"च्या मार्गानें मित्र राष्ट्रांस माल पुरवण्याचें धोरण अंगिकारलें तेव्हांच आंतरराष्ट्रीय देवघेवींत सोन्याचें महत्त्व नाहींसें झालें. आर्जेंटिना, स्वीडन, स्वित्झर्लंड इत्यादि देशांत सोन्यास थोडीशी मागणी असली तरी ती पुरवण्यासाठी ह्या धातूंच्या खाणी चालू ठेवाव्या असें म्हणतां येणार नाहीं. सोन्याचें चलन जगांत आज कोठेंच चालू नाहीं, इतकेंच नव्हे तर कागदी चलनाचा झपाट्यानें सर्वत्र प्रसार होत असतां त्यास आधार म्हणून अंशतःहि तें गंगाजळींत ठेवण्याची आवश्यकता कोणत्याच राष्ट्रीय सरकारास भासत नाहीं. युद्ध संपल्यावर जागतिक पुनर्घटनेच्या योजनांत सोन्यास युद्धापूर्वीचें आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधार ह्या नात्याचें महत्त्व पुन्हां प्राप्त होण्याचा संभव नाहीं. तथापि राष्ट्रीय चलनें आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळ ह्यांतून सोन्याचें समूळ उच्चाटन होईल असेंहि मानण्याचें कारण नाहीं. तरीहि युद्ध चालू असतां जमिनींतून सोनें मोठ्या श्रमानें उकरून काढण्याचा उद्योग करणें अनाठायीं आहे, हें निर्विवाद आहे.

---

### जर्मन सैन्याची पीछेहाट

ट्युनीशियामध्यें कॅसरीन खिंड ताब्यांत घेऊन जर्मन सैन्य घुसूं लागलें होतें आणि ह्या चढाईमुळें मित्रराष्ट्रांची परिस्थिति प्रतिकूल बनली होती. परंतु जर्मनींचा हा विजय अल्पकालिक ठरला असून अमेरिकन व ब्रिटिश सैन्यांनीं शत्रूस कॅसरीन खिंडींतून हुसकून लावून त्यास त्वरित पीछेहाट करण्यास लावलें आहे. ह्या लढाईत जर्मनीची फार हानि झाली आहे आणि ट्युनीशियामधील इतर आघाड्यांवर मित्रराष्ट्रांची हळूहळू पण निश्चित प्रगति चालली आहे आणि शत्रूस चिमट्यांत धरण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी होण्याच्या मार्गावर आहे. रशियन आघाडीवर स्टॅलिनच्या सैन्यांनीं विलक्षण विक्रम करून जर्मनीस मागें रेटीत नेण्याचा क्रम अव्याहत चालू ठेवला आहे. मागें हटत जाऊन स्वतःची आघाडी कोठेंतरी स्थिर करण्याचा हिटलरचा आतांपर्यंतचा प्रयत्न अयशस्वी झाला आहे. जर्मनींच्या मनुष्यहानीचे आणि लढाऊ सामुग्रीच्या नाशाविषयींचे आकडे स्टॅलिननें नुकतेच दिले, त्यांवरून हिटलरच्या युद्ध-धोरणास केवढा जबरदस्त धक्का बसला आहे याची कल्पना येते. प्रत्यक्ष जर्मनीवर ब्रिटिश विमानांचे प्रत्यही विस्तृत प्रमाणावर हल्ले चालले आहेत त्यांचे योगानें जर्मनींचें बळ पद्धतशीर रीतीनें खच्ची केलें जात आहे. ह्याप्रकारें जर्मनी चोहोंकडे घेरला जात आहे आणि त्यामुळें हिटलरची मनःस्थिति काय झाली असेल ह्याची कल्पना करतां येण्यासारखी आहे. झेकोस्लोव्हेकियामधील लहान मोठ्या माणसांस लढाऊ कामावर सक्तीनें खेचण्याचा हुकूम त्यानें सोडला आहे. ह्यावरून मनुष्य बळाचा तुटवडा जर्मनीस तीव्रतेनें भासत आहे हें उघड होतें. माणसांची व सामुग्रीची पुनः जमवाजमव करून मित्रराष्ट्रांच्या चढाईस तोंड देणें किती कठीण आहे, ह्याचा अनुभव हिटलर यास लवकरच येईल.

---

### धान्यपुरवठ्याचें मध्यवर्ती नियंत्रण

गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें भरलेल्या अखिल भारतीय धान्य पुरवठा परिषदेंत हिंदुस्थान सरकारच्या प्रमुख धान्यांची खरेदी आणि वाटणी ह्याविषयींच्या योजनेची चर्चा होऊन तिला प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींनीं मान्यता दिली. तांदूळ, गहू, इत्यादि मुख्य धान्यें, ज्यांमध्यें स्थानिक मागणीच्या मानानें उत्पादन अधिक होतें अशा प्रांतांतून हिंदुस्थान सरकारनें स्वतः विकत घेऊन त्यांची वाटणी तुटवड्याच्या प्रांतांमध्यें करावयाची हें मध्यवर्ती धान्यपुरवठा योजनेचें मूलभूत तत्त्व आहे. हिंदुस्थान सरकारनें मोसमांत स्वतः धान्य विकत घेण्यांत हा फायदा आहे कीं एकूण पुरवठ्याचा मोठा भाग त्याच्या ताब्यांत आल्यानें व्यापाऱ्यांच्या नफेबाजीस आळा बसून बाजारभावांचें नियंत्रण त्यास करतां येईल. मोठा घाऊक व्यापारी त्या नात्यानें सरकार बाजारावर स्वतःची छाप बसवूं शकेल. दुसरें असें कीं, प्रांतिक सरकारांनीं धान्याच्या पुरवठ्याचे बाबतींत परस्पर व्यवहार करावयाचें म्हटलें तर ते समाधानकारक रीतीनें होत नाहींत आणि त्यांत प्रमाणबद्धता किंवा एकसूत्रीपणा येत नाहीं. हिंदुस्थान सरकार धान्यवाटणींत मध्यस्थ झाल्यानें ह्या अडचणी टळतात. ज्यांमध्यें धान्याचा मामुली तुटवडा असतो अशा प्रांतांच्या सरकारांनीं मध्यवर्ती सरकारचें नियंत्रण कडक असावें आणि त्याच्यामार्फत धान्याची प्रांतांमध्यें वाटणी व्हावी असा आग्रह धरणें स्वाभाविक आहे. स्थानिक जरूरीपेक्षा अधिक असलेल्या आपल्या धान्यास योग्य भाव मिळावा अशी मागणी इतर प्रांतांनीं करावी हें तितकेंच साहजिक आहे. ह्या दोन बाजूंचा मेळ हिंदुस्थान सरकारासच नीट घालतां येईल. म्हणून त्यांनी त्या संबंधांतली जबाबदारी उचलली आहे हें योग्य आहे.

---

### अमेरिकन युद्धखर्च

जानेवारी, १९४३ मध्यें अमेरिकेनें दररोज सरासरीनें २० कोटी, २० लक्ष डालर्स इतकी रक्कम युद्धाप्रीत्यर्थ खर्च केली. हा आकडा जानेवारी १९४२ च्या तत्सम आकड्यापेक्षा १८५% नीं जास्त आहे.

## लांच देण्याचा निष्फळ प्रयत्न शिक्षेस पात्र होतो काय ?

### नागपूर हायकोर्टाचा निवाडा

मुरलीधरच्या मेहुणीनें आत्महत्या केली. पोलिसांस या आत्म-हत्येची बातमी पोंचली. वैद्यकीय तपासणीसाठीं ( पोस्ट मार्टेम ) पोलिसांनीं तिचें प्रेत अडवून ठेवलें. दुसरे दिवशीं डॉक्टरकडून वैद्यकीय तपासणी होणार होती. डॉक्टरनें चांगला रिपोर्ट लिहिला तर ठीक आहे नाहीं तर आपल्यावर विनाकारण तोहमत येईल असें मुरलीधरला वाटणें साहजिक होतें. स्वतः जाऊन डॉक्टरला लांच देण्याची मुरलीधरला हिम्मत झाली नाहीं, म्हणून त्यानें विठ्ठल नांवाच्या एका इसमाला लांच घेऊन डॉक्टरकडे पाठविलें. विठ्ठलनें ती लांच मचल्यामध्येंच गडप केली. त्याबाबत मुरली-धरनें पोलिसांत रिपोर्ट दिला. त्या रिपोर्टवरून विठ्ठलवर अफरा-तफरीबाबत खटला भरण्यांत आला व त्या खटल्यांत त्याला शिक्षा झाली. त्या खटल्यांत ही सर्व भानगड उघडकीस आली, म्हणून डॉक्टरला लांच देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मुरलीधरवर खटला भरण्यांत आला. डॉक्टरला लांच देण्यांत आली नाहीं, अशा मुद्यावर त्या खटल्यांत मुरलीधरची सुटका झाली. त्या सुटकेविरुद्ध सरकारनें हें अपील केलें होतें.

### निवाडा

लांच देण्यासाठी मुरलीधरनें विठ्ठलला जी रक्कम दिली होती ती रक्कम विठ्ठलनें डॉक्टरला दिली नाहीं हें जरी खरें असलें तरी ती विठ्ठल-जवळ देण्यांत विठ्ठलनें ती डॉक्टरला नेऊन द्यावी असाच मुरली-धरचा उद्देश होता. सबब लांच देण्याचा प्रयत्न मुरलीधरनें केला आहे असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. गुन्हा घडला नाहीं, म्हणून गुन्ह्यास मदत करणारा इसम निर्दोषी ठरत नाहीं. लांच देण्याचे प्रयत्नास मुरलीधरनें मदत केली आहे, सबब आम्ही मुरलीधरला दोषी ठरवितों व २०० रुपये दंडाची शिक्षा देतों.

### सारांश

लांच देणें, लांच देण्याचे कामीं मदत करणें व लांच देण्याचा प्रयत्न करणें हीं सर्व कृत्यें गुन्ह्याचे सदरांत येतात. लांच देण्याचा प्रयत्न निष्फळ झाला असला तरी लांच देण्याचा प्रयत्न करणारा इसम शिक्षेस पात्र असतो. —न्यायबोध

---

### मोटार गाड्यांचा सक्तीनें थर्ड पार्टी विमा

मोटार व्हेइकल्स ॲक्ट १ जुलै, १९३९ रोजीं अमलांत आला. त्या कायद्यांतील आठवें प्रकरण मोटार गाड्यांच्या सक्तीच्या थर्ड पार्टी विम्यासंबंधीचें आहे, व तो भाग १ जुलै, १९४३ पासून अमलांत यावा असें ठरलें होतें. मोटारवाल्यांना ही नवी मोठी सुधारणा स्वीकारण्यास पुरेसा अवधि मिळावा, ह्यासाठी हा चार वर्षांचा अवधि ठेवण्यांत आलेला होता. मध्य-वर्ती व प्रांतिक सरकारांसहि ह्यासंबंधांत नियम करण्यास वेळ पाहिजे होता. सक्तीच्या विम्याची अंमलबजावणी १जुलै, १९४६ पर्यंत तहकूब करण्याची व्यवस्था करणारी कायद्यांत दुरुस्ती आतां करण्यांत येणार आहे. पेट्रोलचें रेशनिंग, मोटारगाड्या युद्धकार्यासाठीं मागणी, नवीन गाड्यांची बंद झालेली आयात इत्यादि कारणांमुळें खासगी गाड्यांची संख्या पुष्कळच कमी झालेली आहे. सरकारासही विम्यासंबंधांत नियम तयार करण्यास सवड मिळालेली नाहीं. १९४६ पर्यंत युद्ध समाप्त होऊन मोटा-रींची वहातूक पूर्ववत् सुरू होईल ह्या अपेक्षेनें थर्ड पार्टी विम्याच्या सक्तीच्या अंमलबजावणीची तारीख पुढें ढकलण्यांत येत आहे.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,४८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,२४,२७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष. श्री. घों. कृ. साठे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. वा. पुं. वर्दे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख.

---

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर, १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड जाहीर झालें. शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअरबाबत द्यावयाच्या २५ रुपयांवर ५ रुपये प्रीमियम पडेल.

G. L. HALBE,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

## ॲसिड, अल्कलीज, खतें व रंग ह्यांचें उत्पादन

### युद्धामुळें मिळालेली चालना

रासायनिक उत्पादनाचें महत्त्व युद्धकाळांत अतिशय आहे. शांततेच्या काळांतीलहि उद्योगधंद्यांचा रासायनिक कारखाने हा पाया आहे. ॲसिडें व अल्कलीज हीं रासायनिक उत्पादनाच्या प्रमुख बाबी आहेत. हिंदुस्थानांत ॲसिडचें (मुख्यतः सल्फ्यूरिक ॲसिड) उत्पादन आजवर फारच थोड्या प्रमाणावर होत असे व अल्कलीजचें (मुख्यतः कॉस्टिक सोडा, सोडा ॲश व ब्लीचिंग पावडर) उत्पादन तर जवळ जवळ होतच नव्हतें. गेल्या सहा वर्षांत ह्यासंबंधांत बरीच प्रगति झालेली आहे. १९३६–३७ च्या सुमारास बऱ्याच नवीन कंपन्या निघाल्या. त्या आतां फलदायी ठरत आहेत. युद्धजन्य मागणीमुळें त्यांस फायदाहि चांगला होऊं लागला आहे. १९३६ व १९३९ ह्यांचे दरम्यान सात नवे कारखाने उभारण्यांत आले व त्यांच्या कामास १९४० व १९४१ ह्यांचे दरम्यान प्रारंभ झाला. ह्या सात कारखान्यांखेरीज आणखीहि कित्येक कारखाने आतां चालू आहेत.

रोहटस इंडस्ट्रीज लि. चा कॉस्टिक सोड्याचा कारखाना वें सोडियम व पोटॅशियम बायक्रोमेट तयार करणारें पायोनियर क्रोमेट वर्क्स, हीं आतां माल तयार करूं लागलीं असून सरकारी मदतीनें आणखीहि कारखाने निघत आहेत. प्रथम सांगितलेले सात कारखाने खालीलप्रमाणें आहेत:—

| कंपनी व स्थापनेचें वर्ष | उत्पादनास प्रारंभ | मालाचे प्रकार |
|---|---|---|
| अल्कली ॲन्ड केमिकल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. १९३७ | एप्रिल १९४० | सोडा ॲश, कॉस्टिक सोडा, क्लोरिन |
| मेतुर केमिकल ॲन्ड इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशन लि. १९३६ | ऑक्टोबर १९४१ | कॉस्टिक सोडा, लिक्विड क्लोरिन, ब्लीचिंग पावडर, हायड्रोजन |
| म्हैसूर केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लि. १९३७ | मे १९४० | सल्फ्यूरिक व इतर ॲसिडें, अमोनिया व इतर सॉल्ट्स |
| म्हैसूर केमिकल मॅन्युफॅक्चरर्स लि. १९३८ | सप्टेंबर १९४० | औद्योगिक व फाइन केमिकल्स |
| टाटा केमिकल्स लि. १९३९ | प्रारंभ झाला नाहीं | सोडा ॲश, कॉस्टिक सोडा व इतर रसायनें. |

सल्फ्यूरिक ॲसिड हा रासायनिक उत्पादनांतील सर्वांत महत्त्वाचा प्रकार आहे. १९३९ सालीं हें ॲसिड करणारे हिंदुस्थानांत सुमारें २० महत्त्वाचे कारखाने होते व त्यांचें वार्षिक उत्पादन ३० हजार टन होतें. हिंदी मागणीस पुरेसें पडण्याजोगें हें उत्पादन नाहीं. इटली व जपान येथून सल्फ्यूरिक ॲसिड मोठ्या प्रमाणांवर येत असे, तें आतां बंद झाल्यामुळें देशी कारखान्यांस तेजी आली आहे. त्यांचें उत्पादनही बरेंच वाढलें आहे.

खतांच्या उत्पादनासाठी सल्फ्यूरिक ॲसिडची आवश्यकता असते व ह्या ॲसिडचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर व स्वस्त होऊं लागला तर खतांचें उत्पादनही वाढूं शकेल. हिंदुस्थानांत अशा खतांचा वार्षिक उठाव ९० हजार टन इतका आहे, परंतु आपल्या कारखान्यांत १९३९ सालीं २० हजार टन सल्फेट ऑफ अमोनिया व २६०० टन सुपर फॉस्फेट एवढ्याचेंच उत्पादन झालें. बाहेरून येणारीं खतें आतां पूर्वीप्रमाणें येऊं शकत नाहींत व मागणी आणखी अंतर्गत उत्पादन ह्यांचेमधील तफावत भरून काढणें आवश्यक झालें आहे.

अल्कलीज (कॉस्टिक सोडा, सोडा ॲश, ब्लीचिंग पावडर, इ.) चें उत्पादन १९४० पर्यंत हिंदुस्थानांत होतच नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. सोडा ॲश, कॉस्टिक सोडा, सोडियम कार्बोनेट, बायकार्बोनेट, इत्यादि मिळून १ लक्ष टन माल दरसाल आपणांस लागतो व तो बहुतेक सर्व बाहेरून येत असे. १९३८-३९ सालीं हिंदुस्थानांत ४५ लक्ष रुपयांच्या कॉस्टिक सोड्याची (२५ हजार टन) व ६१½ लक्ष रुपयांच्या सोडा ॲशची (६९ लक्ष टन) आयात झाली. हिंदी कारखान्यांतील उत्पादन आतां मोठ्या प्रमाणावर सुरू झालें आहे व आपलें त्यासंबंधांतील परावलंबन लवकरच दूर होईल. कॉस्टिक सोडा स्वस्त किंमतीस मिळूं लागल्यास साबण, कागद व कापड ह्यांचें कारखान्यांस सहाय्य होईल व सोडा ॲशच्या उत्पादनामुळें काचेच्या धंद्यास मदत मिळेल.

रंगासाठीहि आपण परदेशांवर अवलंबून आहों. १९३९–४० सालीं त्यांच्या आयातीची किंमत ५ कोटि रु. भरली, ती १९४०–४१ सालीं ६½ कोटि रु. झाली व १९४१–४२ मध्यें ती ७ कोटि रुपयांवर गेली. अलझरीन व कोल टार रंगांपैकीं ९०% रंग जर्मनींतून येत असत ते आतां कांहीं अंशीं अमेरिकेंतून येऊं लागळे आहेत. हिंदुस्थानांत कोकला पुरेशी मागणी नसल्याकारणानें, त्यापासून निघणाऱ्या रंगांचें उत्पादन किफायतशीर होईल अशी आजची परिस्थिति नाहीं.

## प्राप्तीवर कर किती बसणार?

इन्कमटॅक्स (प्रत्येक रुपयावर)

| प्राप्ती (रु.) | मूळ आकारणी | सध्याचा सरचार्ज | सुचविलेला जादा सरचार्ज |
|---|---|---|---|
| २ हजारांखाली | | | |
| पहिले ७५० | — | — | — |
| पुढचे १,२५० | ६ पै | — | — |
| २ हजारांवरील उत्पन्न | | | |
| पहिले १,५०० | — | — | — |
| पुढचे ३,५०० | ९ पै | ६ पै | — |
| पुढचे ५,००० | १५ पै | ९ पै | १ पै |
| पुढचे ५,००० | २४ पै | १४ पै | २ पै |
| उरलेलें एकूण उत्पन्न | ३० पै | १५ पै | ५ पै |
| **सुपर टॅक्स** | | | |
| एकूण उत्पन्नाचे | पै | पै | पै |
| पहिले २५ हजार | — | — | — |
| पुढील १० हजार | १२ | ६ | ६ |
| पुढील २० हजार | २४ | १२ | ६ |
| पुढील ७० हजार | ३६ | १८ | ६ |
| पुढील ७५ हजार | ४८ | २४ | ६ |
| पुढील १५० हजार | ६० | ३० | ६ |
| पुढील १५० हजार | ७२ | ३६ | ६ |
| उरलेलें एकूण उत्पन्न | ८४ | ४२ | ६ |
| **कंपन्यावरील इनकमटॅक्स** | | | |
| एकूण उत्पन्नावर | ३० | १५ | ५ |
| **कॉर्पोरेशन टॅक्स** | | | |
| एकूण उत्पन्नावर | १२ | ६ | ६ |

**जादा नफ्यावरील कर**

आणखी एका वर्षाच्या नफ्यावर त्याची आकारणी होईल.

दर ६६⅔%

'अर्थ' ग्रन्थमाला..
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.
श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर
आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.



मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय
पूना गेस्ट हाऊस
फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ } वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
१८ श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाविलास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १० मार्च १९४३ अंक १०

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

(Estd. in 1935)
The Co-operators' Book Depot
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
*Books on :—*
Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.
Books on all other subjects are also readily supplied.
Agents for the Publications of:
1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महेंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

**टॅक्सींना २ हजार मैल प्रवासापुरतें पेट्रोल**

कॅनडामधील टॅक्सींना दर महिन्यास २ हजार मैल जातां येईल, एवढेंच पेट्रोल यापुढें मिळणार आहे.

**व्हिक्टोरिया आणि एडवर्ड छाप रुपये**

व्हिक्टोरिया व एडवर्ड छाप रुपये आणि अधेल्या रिझर्व्ह बॅंकेनें स्वीकारण्याची अखेरची तारीख ३० एप्रिल १९४३ ही आहे.

**ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. ११ पै व्याज**

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बॅंकेनें हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ११ पै इतका पडला.

**हिंदी आर्थिक परिषद्**

हिंदी आर्थिक परिषदेचें १६ वें वार्षिक अधिवेशन १९, २० व २१ एप्रिल रोजीं डॉ. बी. व्ही. नारायणस्वामी नायडू ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

**काश्मीरची लोकसंख्या**

काश्मीर संस्थानची लोकसंख्या १९३१ सालीं ३६ लक्ष ४६ हजार होती, ती १९४१ सालीं १०·३% वाढून ४० लक्ष २२ हजार झाली. हिंदूंचें प्रमाण २०·१२ % व मुसलमानांचें प्रमाण ७७·११ % आहे. एकूण ६·९ % लोक साक्षर आहेत.

**ग्वालेरमध्यें धान्याच्या पैदाशीची वाढ**

धान्याची पैदास वाढविण्याच्या प्रचारकार्यासाठी ग्वालेर दरबारनें ५० हजार रुपये मंजूर केले आहेत. बटाट्याची लागवडहि वाढविण्यांत येणार आहे.

**नोटांचे फोटो**

जाहिरातीकरितां सुद्धां करन्सी व बॅंक नोटा ह्यांचे फोटो छापण्यास प्रतिबंध करणारें बिल मध्यवर्ती असेंब्लीनें मंजूर केलें आहे.

**तिळाची लागवड**

हिंदुस्थानांतील तिळाची एकूण लागवड ४१ लक्ष ८१ हजार एकर इतकी असून ती गेल्या वर्षापेक्षां ५% अधिक आहे. अपेक्षित उत्पादन ४,५१,००० टन म्हणजे गेल्या वर्षापेक्षां १४% अधिक आहे. एकूण लागवडीपैकीं २५% लागवड संयुक्त प्रांतांत, १६% लागवड मद्रास प्रांतांत, १०·६% लागवड मुंबई प्रांतांत व ९·३% लागवड मध्यप्रांत-वऱ्हाडांत होते.

**टायर-ट्यूब्सच्या विक्रीची किंमत**

हिंदुस्थानांत तयार झालेल्या रबरी धावा व ट्यूब्स ह्यांची विक्री कोणत्या दरानें करावी, हें हिंदुस्थान सरकारनें आपल्या ताज्या गॅझिटांत जाहीर केलें आहे. ह्या नियंत्रित दरापेक्षां अधिक किंमतीनें त्या विकणें बेकायदा आहे.

**युद्धोत्तर प्रश्नांची चर्चा**

युद्धानंतर उपस्थित होणाऱ्या चलनविषयक व आर्थिक प्रश्नांचा विचार संयुक्त राष्ट्रें करीत आहेत. चर्चा अद्याप संपलेली नाहीं.

**निर्वासितांचें नुकसान**

ब्रह्मदेश सोडून आलेल्यांनीं मागें सोडून दिलेल्या मालमत्तेबाबत डिसेंबर १९४२ अखेर हिंदुस्थान सरकारकडे नोंदण्यांत आलेल्या क्लेम्सची रकम ९ कोटि रुपये भरते.

**सोमवारी मुंबईमधील बॅंकांना सुट्टी**

रेशन कार्डें वाटण्यास सोईचें व्हावें म्हणून सोमवार ता. ८ रोजीं मुंबई शहरांत सुट्टी देण्यांत आली होती. त्या दिवशीं बॅंकाहि बंद होत्या.

**रहाणीच्या खर्चाचें मान आणखी वाढलें**

मुंबई शहरांतील रहाणीच्या खर्चाचें मान जून १९३४ मध्यें १०० होतें असें धरल्यास तें १५ फेब्रुवारी अखेर संपलेल्या महिन्यांत २०५ इतकें झालें. त्यापूर्वींच्या महिन्यांत तें २०३ इतकें होतें. खाद्य वस्तूंच्या किंमतीचें मान जून १९३४ मध्यें १०० धरल्यास तें आतां २२३ झालें आहे.


# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ७४ |
| २ रेल्वेज आणि मध्यवर्ती तिजोरी ... ... | ७५ |
| ३ कामगार वर्गाच्या हितसंबंधाचे प्रश्न ... | ७६ |
| ४ स्फुट-विचार मध्यवर्ती अंदाजपत्रकाची चर्चा- आर्थिक पुनर्घटनेसाठी लंडनमध्यें फंड- जर्मनीचा तेलाचा पुरवठा ... | ७७ |
| ५ पोस्ट व तार खात्याचा अहवाल ... ... | ७८ |
| ६ प्रांतांवरील कराची आकारणी ... ... | ७९ |



# अर्थ

बुधवार, ता. १० मार्च, १९४३


## रेल्वेज आणि मध्यवर्ती तिजोरी

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या रेल्वेजच्या वार्षिक उत्पन्नाचा ठराविक भाग मध्यवर्ती तिजोरीस मिळावा ह्याविषयींची एक निश्चित योजना गेलीं अठरा वर्षे अंमलांत आहे. रेल्वेजच्या सांपत्तिक व भांडवली गरजांच्या दृष्टीनें ह्या योजनेचा फेरविचार होण्याची आवश्यकता अनेक वेळीं कित्येकांनीं प्रतिपादिली आहे. ह्या बाबतींत अखेरचा निर्णय होण्यापूर्वी प्रचलित व्यवस्थेंत रेल्वेजच्या सांपत्तिक सोयीसाठी तात्पुरता बदल व्हावा अशा कल्पनेनें सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं एक योजना मध्यवर्ती असेंब्लींत पुढें मांडली तिचा आशय असा:— (१) १९४२-४३ सालासाठी चालू व्यवस्थेस अनुसरून मध्यवर्ती तिजोरीस द्यावयाच्या रकमेशिवाय २ कोटि, ३५ लक्ष रुपये सरकारास मिळावे; (२) एप्रिल १, १९४३ पासून चालू व्यवस्थेंतला मध्यवर्ती सरकारास रेल्वेच्या उत्पन्नापैकीं मिळणाऱ्या हिश्श्याचा भाग लागू केला जावूं नये; (३) १९४३-४४ मध्यें बिनलष्करी रेल्वेजच्या निव्वळ उत्पन्नांतून प्रथम घसाऱ्याच्या निधीमधून घेतलेल्या कर्जाची फेड केली जाईल आणि बाकी राहिलेल्या रकमेपैकीं पंचवीस टक्के रेल्वेजच्या गंगाजळींत टाकण्यांत येईल व पंचाहत्तर टक्के मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींत जमा केली जाईल; (४) त्या पुढच्या काळांत असेंब्लीच्या संमतीनें ह्या योजनेंत फेरबदल केला जाईपर्यंत निव्वळ उत्पन्नाची वाटणी मध्यवर्ती सरकारची तिजोरी व रेल्वेजचा फंड ह्यांचेमध्यें कशी करावयाची ह्याचा निर्णय परिस्थितीप्रमाणें केला जाईल.

सर एडवर्ड बेंथॉल ह्यांच्या वरील आशयाच्या ठरावावर असेंब्लीच्या दोन सभासदांनीं उपसूचना पुढें मांडल्या. नवीन योजनेचा विचार करण्यासाठी असेंब्लीच्या सभासदांची उपसमिति नेमली जावी असें त्यांचें म्हणणें होतें. ही सूचना तात्कालिक व्यवहार्यतेची नाहीं, पण तूर्त आपली मूळ योजना मान्य केली जावी आणि पुढें आपण तिची छाननी करण्यास उपसमिती नेमण्याची व्यवस्था करूं असें आश्वासन सरकारच्या वतीनें देण्यांत आलें आणि येथें वादाचा शेवट झाला.

हिंदी रेल्वेज सरकारच्या म्हणजे हिंदी राष्ट्राच्या मालकीच्या असल्या तरी त्यांचा कारभार धंदेवाईकपणाचा असावा आणि त्यांत होणाऱ्या नफ्यावर रेल्वेजचा उपयोग करणाऱ्या जनतेचा हक्क असावा अशी या प्रश्नाची एक बाजू आहे. घसारा, गंगाजळी, विस्तार व सुधारणा ह्यांसाठी लागणाऱ्या भांडवलाची तरतूद इत्यादि बाबींचा विचार व व्यवस्था हीं स्वतंत्रपणानें व्हावी, त्यांची मध्यवर्ती सरकारच्या तिजोरीशी गुंतागुंत नसावी आणि कर देणाऱ्या नागरिकांचा बोजा हलका करण्याची जबाबदारी रेल्वेजच्या प्राप्तीवर टाकण्यांत येऊं नये असा ह्या पक्षाचा युक्तिवाद आहे. सर्व योग्य खर्च भागून कूस राहील तिचा विनियोग उतारू व व्यापाऱ्यांचा माल यांच्या वहातुकीचे दर कमी करण्याकडे व्हावा, सरकारचें उत्पन्न वाढवण्याकडे होऊं नये असें त्याचें म्हणणें आहे. ह्याच्या उलट दुसऱ्या पक्षाचा कोटिक्रम असा आहे कीं, राष्ट्राच्या मालकीच्या रेल्वेजमध्यें राष्ट्रानें कर्ज काढून भांडवल घातलें आहे आणि त्यांच्या नफ्यांत मर्यादित हिस्सा सरकारी तिजोरीस मिळणें न्याय्य व उचित आहे. पोस्ट ऑफिससारखे उद्योग सरकार करतें त्यावेळीं त्यांतील नफा त्याच्या तिजोरीस मिळतच असतो. ब्रिटिश पोस्ट ऑफिसच्या व्यवहारातून इंग्लंडमधील सरकारास दरवर्षी पंधरा कोटि रुपये निव्वळ नफा उरतो. त्याच पद्धतीनें हिंदुस्थान सरकारास आपल्या रेल्वेजपासून होणाऱ्या नफ्याचा योग्य अंश कां मिळूं नये? असा ह्या पक्षाचा प्रश्न आहे. एका काळीं रेल्वेजच्या उत्पन्न—खर्चाचा अंतर्भाव सरकारच्या एकूण उत्पन्न—खर्चांत होत असे. पुढें हीं दोन अलग करण्यांत आलीं. कित्येक वर्षे रेल्वेज तोटयांत चालत असत आणि त्यांच्या उत्पन्नांत एवढी अनिश्चितता असे कीं, हिंदी अंदाजपत्रक म्हणजे रेल्वेजवर खेळली जाणारी जुगार आहे अशी म्हण प्रचलित झालेली होती. ह्यामुळें रेल्वेजचें अंदाजपत्रक अलग करण्यांत येऊन त्यांची सांपत्तिक व्यवस्था अलग रहावी आणि त्यांनीं दरवर्षी सरकारच्या तिजोरीस ठराविक रक्कम मात्र द्यावी असें ठरलें. मध्यंतरी रेल्वेजना वर्षानुवर्षे तूट येऊं लागली आणि घसारा फंड, गंगाजळी व सरकारी देणें ह्यांची फेड होऊं शकली नाहीं आणि त्या बाबींची बाकी फुगली. अलीकडे सर्व देणें देऊन टाकून रेल्वेज मोकळया झाल्या आहेत म्हणूनच त्यांच्या नफ्याच्या वांटणीचा सबंध प्रश्न पुन्हां उपस्थित झाला आहे. त्याच्या बाबतींत व्हावयाच्या नवीन व्यवस्थेबाबत मतभेद व चर्चा असेंब्लींत होण्याचें रहस्य वरील माहितीवरून ध्यानांत येण्याजोगें आहे. युद्धोत्तर काळांत केल्या जावयाच्या आर्थिक पुनर्घटनेशींहि त्याचा अत्यंत निकट संबंध आहे हें सांगावयास नको. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं आपली नवी योजना असेंब्लीच्या उपसमितीपुढें मांडण्याचें कबूल केलें हें यथोचित झालें असें म्हटलें पाहिजे.

### अपघात न करणारांस बक्षीस

बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रॅमवेज कं. लि. नें आपल्या बसेस व ट्रामगाड्या ह्यांच्या ड्रायव्हरांसाठी एक बक्षीसाची योजना आखली आहे. ज्यांच्यामुळें एकहि अपघात झाला नाहीं अशांना दरवर्षी एक निदर्शक बिल्ला व रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यांत येते. ह्या संबंधांतील पहिल्या वर्षाचा बक्षीस समारंभ गेल्या आठवड्यांत झाला.

## हिंदी कारखान्यांतील कामगार वर्गाच्या हितसंबंधाचे प्रश्न

१

पाटणा विश्वविद्यालयांत बनाईली रीडर ह्या नात्यानें प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं १९४० सालीं विश्वविद्यालयाच्या निमंत्रणावरून व्याख्यानें दिलीं. त्यासाठीं त्यांनीं हिंदी औद्योगिक कामगारांसंबंधींच्या प्रश्नाच्या छाननीची निवड केली. व्याख्यानें देण्यासाठी प्रा. गाडगीळ ह्यांस निमंत्रण आलें त्यावेळीं मुंबई प्रांतांतील गिरणी कामगारांच्या चौकशी समितीचें काम चालू होतें व त्या समितीचे प्रा. गाडगीळ हे एक सभासद होते. हा प्रश्न त्यावेळीं प्रामुख्यानें त्यांचे नजरेत होता व म्हणून व्याख्यानांसाठीहि त्यांनीं त्याच विषयाची निवड केली. हीं व्याख्यानें आतां गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स ह्या संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत

प्रा. गाडगीळ ह्यांनीं आपल्या विवेचनांत कामगारांच्या मजुरीच्या प्रश्नास प्राधान्य दिलें आहे. कामगारास मिळणाऱ्या मजुरीवरच त्याचें अन्न-वस्त्र, बिऱ्हाड, कुटुंब हीं अवलंबून असतात व कामगारास मिळणाऱ्या मजुरीवरच त्याच्या राहणीचें मान अवलंबून असतें, त्या कारणानें कामगारांच्या राहणीवर मजुरीच्या दराचा प्रत्यक्ष निर्णायक स्वरूपाचा परिणाम होत असतो. मजुरी कशी टिकेल व ती कशी वाढेल, हा प्रश्न कामगारांस अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो. ह्या उलट, कामगारांस द्यावयाची मजुरी ही कारखानदारांच्या खर्चातील एक प्रमुख बाब असते. कच्च्या मालाची किंमत, वहातुकीचा खर्च, इत्यादि गोष्टी त्याच्या अधिकाराबाहेरच्या असतात; परंतु मजुरीचे दर कमी करून उत्पादन-खर्चांत बचत करणें त्यास शक्य वाटतें. त्यामुळें मजुरांचें वेतन हें औद्योगिक वांध्यांचें प्रमुख कारण होणें स्वाभाविकच आहे. ह्या संबंधांत मालक व मजूर ह्यांचेमध्यें मतभेद होऊन निर्माण झालेले वांधे एकूण औद्योगिक वांध्यांच्या शेंकडा पन्नास एवढ्या मोठ्या प्रमाणांत आढळतात. मजुरीचे दर काय असावेत व परिस्थिति बदलल्यास ते कसे बदलावेत, हा प्रश्न येथें प्रामुख्यानें उपस्थित होतो.

बाहेरून कोणत्याहि प्रकारें ढवळाढवळ होत नसेल, कारखानदारांमध्यें परस्पर स्पर्धा असेल व कामगारांची एका धंद्यांतून दुसऱ्या धंद्याकडे हालचाल सुलभ असेल तर एकाच प्रकारचें काम करणाऱ्या निरनिराळ्या कामगारांना समान मजुरी मिळेल. हा मजुरीचा दर कामगाराच्या कामामुळें उत्पादनांत ज्या किंमतीची भर पडते त्यावर अवलंबून असतो, व अशा प्रकारें नियंत्रित झालेला मजुरीचा दर हा योग्य दर समजला पाहिजे, असें अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें असतें. सहाजिकच, मजुरीचा दर निश्चित करण्याचा कृत्रिम प्रयत्न ह्या अर्थशास्त्रज्ञांस मान्य होत नाहीं. प्रा. गाडगीळ ह्यांनीं वरील सिद्धांत हिंदी परिस्थितीशी पडताळून पाहिला, तेव्हां असें आढळून आलें कीं सिद्धांतांस आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींचें येथें उत्कटतेनें अस्तित्व दिसून येत असूनहि तो येथें लागू पडत नाहीं. ह्याचा अर्थ असा, कीं मजुरीच्या दरांचें नियंत्रण करण्यास ज्या तात्त्विक मुद्यांवर विरोध करण्यांत येतो त्या मुद्यांस महत्त्व देण्याचें कारणच उरत नाहीं. हिंदी कामगारांच्या मजुरीचे संबंधांतील तीन प्रमुख गोष्टी खालीलप्रमाणें आहेत:– (१) कांहीं प्रकारचें काम करण्याऱ्या मजुरांस फारच कमी मजुरी मिळते. (२) एकाच धंद्यांतील वेगवेगळ्या विभागांतील मजुरांच्या वेतनांत तफावत आढळते. (३) ह्यामुळें कामगारांत असंतोष निर्माण होऊन औद्योगिक वांध्यांस कारण सांपडतें.

कांहीं उद्योगधंद्यांत मजुरीचे दर फारच कमी आहेत, ह्या संबंधींचा विचार करतांना प्रा. गाडगीळ ह्यांनीं प्रथम मजुरीचे दर आणि उपलब्ध कामधंदा ह्यांचेमधील नातें कोणत्या प्रकारचें असतें, ह्याचें विवेचन केलें; व नंतर हिंदुस्थानांतील औद्योगिक मजुरीच्या दरांचें नियंत्रण केलें तर कामधंदाच कमी होईल किंवा काय, ह्या प्रश्नांचा त्यांनीं आपल्या भाषणांत उहापोह केला. हिंदी कामगारांची कार्यक्षमता अत्यंत कनिष्ठ प्रकारची आहे त्या कारणानें मजुरीचे दर वाढल्यास गिरणी-मालक यंत्रसामुग्रीचा उपयोग अधिक प्रमाणांत करण्यास प्रारंभ करण्याचा संभव नाहीं काय? ह्या उलट, कामगाराची राहणी सुधारली, तर त्यांचें कामहि सुधारून वाढत्या मजुरीनें त्यांस कामावर ठेवणें मालकांस परवडणें अशक्य आहे काय? मजुरीचे दर वाढविले तर हिंदी मजूर काम अधिक करून जास्त पैसे मिळविण्याऐवजीं गैरहजर राहून उलट मजुरांचा पुरवठा कमी पाडतात, अशी तक्रार वरचेवर ऐकू येते, परंतु ती वस्तुस्थितिनिदर्शक मानण्याजोग्या पुराव्यावर आधारलेली दिसत नाहीं.

उत्पादन खर्चापैकीं केवढा भाग मजुरीच्या दरानें व्यापलेला आहे, ह्यावर मजुरीचे दर वाढविल्यास धंद्यावर किती परिणाम होईल हें अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. कोळशाच्या खाणीचे धंद्यांतील उत्पादन खर्चाचा बराच मोठा भाग मजुरीचाच असतो. उलट कपास, कापड व ताग ह्यांच्या गिरण्यांच्या उत्पादन खर्चापैकीं एक चतुर्थांश ते एक पंचमांश एवढाच हिस्सा खर्च मजुरीचा असतो. या दोन्ही धंद्यांतील मजुरीचे दर दीर्घ काळ स्थिर राहतात व धंद्यांत तात्कालिक तेजी अथवा मंदी आली तर मजुरीचा दर बदलण्याचा प्रयत्न गिरणी मालक करीत नाहींत.

"Regulation of Wages and other Problems of Industrial Labour in India". प्रा. ध. रा. गाडगीळ, एम. ए., एम. लिट (कॅंटब) ह्यांचीं व्याख्यानें. पृ. सं. ९३. किंमत ५ रु. अथवा १० शिलिंग

### जपानचा युद्धखर्च

जपानी सरकारच्या अंदाजपत्रकांत १३२७ कोटि येन इतक्या खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. जपानच्या इतिहासांत एवढी प्रचंड रक्कम प्रथमच खर्च होत आहे आणि तिच्यावरून युद्धाचा केवढा ताण त्या देशावर पडत आहे हें दिसून येतें.

### रेशमाच्या निर्गतीवर बंधन

रेशमाची परवान्यावाचून निर्गत करण्यास सरकारनें बंदी केल्यामुळें बनारसचा रेशमाचा धंदा बसला आहे. ह्यासंबंधींतील आपल्या अडचणी त्या धंद्यांतील प्रमुखांनीं हिंदुस्थान सरकारचे कानांवर घातल्या सरकारनें प्रत्येक व्यापाऱ्यास ११ पौन्डाचीं २५ पार्सलें निर्गत करण्यास परवानगी दिली. आतां २० पौन्डाचीं ५० पार्सलें पाठविण्यास परवानगी देण्यांत आली आहे. ३१ मार्च अखेरची ही व्यवस्था आहे व तिचा त्यानंतर पुन्हां विचार केला जाईल.

# स्फुट विचार

### मध्यवर्ती अंदाजपत्रकाची चर्चा

दिल्ली येथें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें सर जरेमी रेस्मन ह्यांनीं मांडलेलें अंदाज पत्रकआणि त्यावर केलेलें भाष्य ह्यांची सर्वसाधारण चर्चा गेल्या आठवड्यांत झाली. युद्धखर्चाच्या इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान व्हावयाच्या वाटणीची योजना समाधानकारक नाहीं, तंबाखू व वनस्पति घृत ह्यांवरील नवा कर गरीब जनतेस सोसावा लागणार आहे, चलनाच्या वाढीचा अनिष्ट परिणाम बाजारभावावर होत आहे त्यासंबंधांतील लोकांच्या तक्रारीस फडनविसांनीं दिलेलें उत्तर अपुरें आहे आणि लंडनमध्यें हिंदुस्थानच्या शिलका साचत आहेत, त्यांचा उपयोग युद्धोत्तर काळांत ब्रिटनमधून यंत्रसामुग्री व इतर पक्का माल आणण्यासाठी फंड म्हणून करण्याची कल्पना नापसंत आहे ह्या आशयाची टीका सभासदांनीं केली. सर जरेमी रेस्मन ह्या टीकेस उत्तर देतांना म्हणाले कीं, हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति लक्षांत घेऊनच हिंदुस्थान सरकारनें ह्या देशास शक्य तेवढी अनुकूल अशी युद्धखर्चाची वांटणी निश्चित केलेली आहे आणि साम्राज्य सरकारनें खर्चाची मोठी जबाबदारी स्वतःवर घेतली नसती तर हिंदुस्थानावर स्वसंरक्षणाचा भारी बोजा पडला असता. नवीन करासंबंधानें बोलतांना अर्थमंत्री म्हणाले कीं, असेंब्लीच्या कांहीं सभासदांची अशी कल्पना दिसते कीं, श्रीमान्, मध्यमवर्ग, उद्योगधंदे, गरीब जनता, चैनीच्या वस्तू ह्यांपैकी कोणावरहि बोजा न पडतां सरकारनें आपलें उत्पन्न वाढवावें. वस्तुतः सामान्य जनतेस करांचा शक्य तितका कमी त्रास पोहोंचावा ह्या बेतानें आपण त्यांची योजना आंखली असल्याचें त्यांनीं सांगितलें. लंडनमध्यें हिंदुस्थानच्या शिलका वाढत आहेत त्यांचा विनियोग ह्या देशाचें इंग्लंडमधील कर्ज फेडून टाकण्यांत केलेला आहे. तथापि, ह्या शिलका वाढत गेल्या आहेत आणि पुढें वाढणार आहेत, त्यांचें काय करावयाचें, हा प्रश्न दोन प्रकारांनीं सोडवण्याचा सरकारचा विचार आहे. इंग्लंडमध्यें रहाणाऱ्या हिंदुस्थानच्या माजी नोकरांचीं पेन्शनें दरवर्षी तिकडे पाठवावीं लागतात. ह्या रकमेइतकें ज्यापासून व्याज येईल एवढा फंड लंडन येथील हिंदुस्थानच्या शिलकांतून ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन करावयाचा व त्यामधून पेन्शनें रीतसर भागवलीं जातील अशी कायमची व्यवस्था करावयाची, ही योजना अंमलांत आणण्याचा विचार आहे. सेवानिवृत्त झालेल्या कोणत्याहि सरकारी नोकरांच्या पेन्शनांचें कायमचें संरक्षण करण्याचा हा प्रश्न नसून हिंदुस्थानचे लंडनमधील पैसे अधिकांत अधिक सोयीच्या व्यवस्थेनें उपयोगांत आणण्याची ही योजना असल्यानें तिचेविषयीं कोणीहि निष्कारण शंकाकुशंका काढूं नये असें फडनविसांनीं सुचविलें.

### आर्थिक पुनर्घटनेसाठी लंडनमध्यें फंड

लंडनमध्यें हिंदुस्थानच्या शिलका वाढत आहेत त्या केवळ ह्या देशानें इंग्लंडला पाठवलेल्या मालाच्या किंमतीचें येणें ह्या स्वरूपाच्या नसून इंग्लंड हिंदुस्थानांतल्या युद्ध खर्चाचा बोजा सहन करीत आहे त्यामुळेंहि बऱ्याच अंशीं उत्पन्न झालेल्या आहेत ही गोष्ट सर जरेमी ह्यांनीं असेंब्लीच्या नजरेस आणली. इंग्लंडनें ह्या देशाकडून घेतलेल्या मालाची किंमत रुपयांत किंवा दुसऱ्या मालांत द्यावी, स्टर्लिंगमध्यें हिंदुस्थानच्या खात्यावर लंडनमध्यें ती जमा केली जाऊं नये असें सांगणारांच्या टीकेस उत्तर म्हणून हा मुद्दा त्यांनीं पुढें मांडला. हिंदुस्थाननें येथें होणारा सर्व युद्ध-खर्च स्वतः सोसावयाचा नाहीं आणि इंग्लंडनें तो केल्यास त्याच्या बदल्यांत निघणारें देणें स्टर्लिंगमध्यें लंडन येथें भरूं नये असें म्हणणें सयुक्तिक नाहीं ह्या आशयाचा त्यांचा युक्तिवाद आहे. लंडनमधील हिंदी शिलकांचा शक्य तितका योग्य तात्कालिक विनियोग होऊनहि जो पैसा उरेल त्याचा एक फंडच होईल आणि युद्धोत्तर काळांत आर्थिक पुनर्घटनेसाठी इंग्लंडमधून आणाव्या लागणाऱ्या सामुग्रीच्या खरेदीप्रीत्यर्थ त्याचा उत्कृष्ट उपयोग होईल अशी सर जरेमी ह्यांची कल्पना आहे. युद्धानंतर जरूरीच्या मालाचा जगभर एकदम तुटवडा पडेल अशा प्रसंगीं इंग्लंडमधून उत्पादक सामुग्री आणावी लागेल. तिची व्यवस्था एव्हांपासून आयतीच झाली तर त्यांत वावगें काय आहे ? असा प्रश्न त्यांनीं असेंब्लीस टाकला. लंडनमध्यें जमा झालेल्या फंडामुळें हिंदुस्थानास इंग्लंडमधीलच मालाची खरेदी करावी लागून अमेरिका वगैरे देशांतून माल आणण्यास वाव रहाणार नाहीं, त्याचें काय? असा प्रतिप्रश्न त्यांस विचारला गेला तेव्हां अर्थमंत्र्यांनीं उत्तर दिलें कीं युद्ध संपल्यावर कांहीं काळ सध्यांचीं व्यापारावरील वगैरे नियंत्रणें चालू राहतील त्यामुळें निश्चित खुलासा करणें आज शक्य नाहीं. तथापि, आंतरराष्ट्रीय सहकारितेच्या दृष्टीनें त्या सर्व प्रश्नाकडे पाहाणें आवश्यक आहे असें स्वतःचें मत त्यांनीं व्यक्त केलें. ब्रिटिश मालाच्या खरेदीकडे लंडनमधील हिंदी शिलकांचा उपयोग युद्धोत्तर काळांत केला जावा ह्या योजनेस इंग्लंडांतील धंदेवाल्यांचा अभिप्राय सर्वस्वी अनुकूल आहे असें ब्रिटिश वृत्तपत्रांतील मतप्रदर्शनावरून स्पष्ट होतें. हिंदुस्थानच्या औद्योगिक अभिवृद्धीस लागणारा पैसा लंडनमध्यें तयार करण्यांत ह्या देशाचा फायदा आहे आणि ब्रिटिश धंदेवाल्यांस युद्धोत्तर काळांत आपल्या उद्योगांचा जम पुन्हां बसवतांना हिंदुस्थानांत पाठवावयाच्या मालाची किंमत कशी वसूल करावयाची ह्याविषयींची विवंचना नको, ही सोय आयतीच झाली. सरकारनें योजलेल्या लंडनमधील शिलकेच्या फंडाचा असा दुहेरी उपयोग असल्याचें ब्रिटिश पत्रें सांगत आहेत.

### जर्मनीचा तेलाचा पुरवठा

पेट्रोल व यंत्रांत घालावयाचें तेल ह्यांचें सध्याच्या यांत्रिक युद्धांत किती महत्त्व आहे हें सांगावयास नको. मित्र राष्ट्रांस पेट्रोलचा भरपूर पुरवठा होत आहे आणि त्या पुरवठ्याचीं साधनें त्यांच्या पूर्ण ताब्यांत आहेत. पण जर्मनीस रुमानियाच्या तेलाच्या खाणींवांचून दुसरा पुरवठा कोठून होणार? रशियाच्या कॉकेशियन विहिरींवर हिटलरचा डोळा होता, पण त्या त्याच्या हातीं लागलेल्या नाहींत. जर्मनीच्या पाणबुड्या नावा, विमानें, रणगाडे व चिलखती गाड्या ह्यांस लागणारें तेल अपुरें झाल्यामुळें हिटलरच्या लढाऊ हालचाली थंडावणें अपरिहार्य आहे अशी सामान्य जनतेची समजूत होण्याचा संभव आहे. पण यासंबंधांत वस्तुस्थिति काय आहे ह्याची वास्तववादी कल्पना मि. हॅरोल्ड इके ह्या जबाबदार अमेरिकन अधिकाऱ्यानें दिली आहे तिच्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. शत्रूचें बळ कमी लेखण्यानें गैरसावधपणा उत्पन्न होतो, त्याचें निराकरण व्हावें म्हणून ह्या गृहस्थानें असें सांगितलें आहे कीं, जर्मनीचें कृत्रिम पेट्रोलचें

उत्पादन १९३८ नंतर चारशे टक्क्यांनीं वाढलें आहे आणि चालू वर्षांत त्यांत आणखी भर पडून तें नवीन उच्चांक गांठील. जर्मनीच्या अटलांटिक महासागरांत व इतरत्र चोरून संचार करणाऱ्या पाणबुड्यांचा संहार करण्याची जारीची खटपट इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं चालविली आहे आणि तीमध्यें त्यांस यशहि येत आहे. तथापि तेलाच्या तुटवड्यामुळें जर्मन युद्धसाधनें लंगडीं पडतील ही कल्पना चुकीची आहे ह्याविषयींची मि. क्रि ह्यांनीं दिलेली सूचना लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

---

### हिंदी पोस्ट व तार खात्याचा अहवाल (१९४१-४२)

हिंदी पोस्ट आणि तार खात्याचा १९४१-४२ चा अहवाल दरवर्षी छापण्यांत येतो. तो चालू वर्षी कागदाच्या तुटवड्यामुळें छापण्यांत आलेला नाहीं. तथापि अहवालाचा सारांश प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

पोस्ट खात्यानें १९४१-४२ मध्यें एकूण १२७ कोटि २० लक्ष पत्रें, पार्सलें इत्यादींची वहातूक केली. मनिऑर्डरींची संख्या ८ कोटि ८० लक्ष इतकी भरली. तारांची संख्या २ कोटि, २५ लक्षांवर गेली. टेलिफोन वापरणारांत ७ हजारांची भर पडून त्यांची संख्या १,०१,००० इतकी झाली. काम वाढल्यामुळें खात्यास नफाहि चांगला—३॥ कोटि रुपये—उरला. पोस्टाचे दर वाढल्यामुळें व युद्धजन्य वाढत्या वाहतुकीमुळेंच नफ्याची रक्कम एवढी मोठी झाली. हिंदुस्थानांत परदेशांतील बरेच सैनिक आलेले आहेत, त्यांस पाठविण्यांत आलेल्या पार्सलांमुळें व पूर्वीच्या वर्षीपेक्षां दुप्पट पार्सलें येथून इंग्लंडकडे गेल्यामुळें ह्या खात्यास बरेंच जास्त काम पडलें. डेड लेटर ऑफिसांत पूर्वीच्या वर्षींपेक्षां सवापट अधिक पत्रें येऊन पडलीं. युद्धजन्य कामासाठी आघाडीवर पोस्ट खात्याचे बरेच अधिकारी व नोकर बाहेर गेले आहेत. मलाया व सिंगापूर येथील सर्व नोकर जपान्यांच्या हातीं सांपडले. अंदमान बेटांतील पोर्ट ब्लेअर येथील वायरलेसचें केंद्र २३ मार्च १९४३ अखेर चालू होतें.

---

### तांदुळास स्पर्धा

ब्रह्मदेशांतील व बंगालमधील भाताच्या पिकास स्पर्धा करूं शकेल, एवढ्या मोठ्या प्रमाणावर ब्रिटिश गिनीमध्यें भाताची लागवड वाढविण्याचा पंचवार्षिक कार्यक्रम आखण्यांत येत आहे, त्यावर १० लक्ष डॉलर इतकी रक्कम खर्चण्यांत येईल. अमेरिकेंतून यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे. तिचे साहाय्यानें शेतीचें काम करण्यांत यावयाचें आहे.

---

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या
# सभासदांस विनंती

पुणें सें. को. बँकेची सहामाही चर्चात्मक साधारण सभा रविवार ता. २८ मार्च १९४३ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत ( बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें शहर ) भरणार आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावे अशी विनंति आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
वु. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

---


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ¼% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.


---


# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,४८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,२४,२७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष. श्री. धों. कृ. साठे, श्री. न. ग. पवार, श्री. र्‍यं. वि. रानडे, श्री. वा. पु. वर्दे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड जाहीर झालें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे. व ती रक्कम शेअरचे मागणी बरोबर पाठवावी लागेल.


ग. ल. हळवे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

# प्राप्तीवरील कराची आकारणी

| प्राप्ती | १९३९-४० मूळ दराने कराची रक्कम | % | १९४३-४४. मूळ दराने अधिक सरचार्जने कराची रक्कम | % | १९४३-४४. (सुचविलेला) विमा, प्रॉ. फंड, इत्यादींची तरतूद केल्यावर कर | % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| रु. | रु. | | रु. | | रु. | |
| २,१५० | ३० ८ | १·४ | ५० १३ | २·४ | ४२ ५ | २·० |
| २,५०० | ४६ १४ | १·९ | ७८ २ | ३·१ | ६५ २ | २·६ |
| ३,००० | ७० ५ | २·३ | ११७ ३ | ३·९ | ९७ ११ | ३·३ |
| ३,५०० | ९३ १२ | २·७ | १५६ ४ | ४·५ | १३० ३ | ३·७ |
| ४,००० | ११७ ३ | २·९ | १९५ ५ | ४·९ | १६२ १२ | ४·१ |
| ४,५०० | १४० १० | ३·१ | २३४ ६ | ५·२ | १९५ ५ | ४·३ |
| ५,००० | १६४ १ | ३·३ | २७३ ७ | ५·५ | २२७ १४ | ४·६ |
| ५,५०० | २०३ २ | ३·७ | ३३८ ९ | ६·१ | २८२ २ | ५·१ |
| ६,००० | २४२ ३ | ४·० | ४०३ १० | ६·७ | ३३६ ६ | ५·६ |
| ६,५०० | २८१ ४ | ४·३ | ४६८ १२ | ७·२ | ३९० १० | ६·० |
| ७,००० | ३२० ५ | ४·६ | ५३३ १४ | ७·६ | ४४४ १४ | ६·४ |
| ७,५०० | ३५९ ६ | ४·८ | ५९८ १५ | ८·० | ४९९ २ | ६·७ |
| ८,००० | ३९८ ७ | ५·० | ६६४ १ | ८·३ | ५५३ ६ | ६·९ |
| ८,५०० | ४८६ ९ | ५·३ | ७९४ ४ | ८·८ | ६६१ १४ | ७·३ |
| १०,००० | ५५४ ११ | ५·६ | ९२४ ८ | ९·२ | ७७० ७ | ७·७ |
| ११,००० | ६७९ ११ | ६·२ | १,१३२ १३ | १०·३ | ९४४ ० | ८·६ |
| १२,००० | ८०४ ११ | ६·७ | १,४४१ ३ | ११·२ | १,११७ ११ | ९·३ |
| १३,००० | ९२९ ११ | ७·२ | १,४४९ ८ | ११·९ | १,३९१ ४ | ९·९ |
| १४,००० | १,०५४ ११ | ७·५ | १,७५७ १३ | १२·६ | १,४६४ १४ | १०·५ |
| १५,००० | १,१७९ ११ | ७·९ | १,९६६ ३ | १३·१ | १,६३८ ८ | १०·९ |
| १८,००० | १,६४८ ७ | ९·२ | २,७४७ ७ | १५·३ | २,२८९ ९ | १२·७ |
| २१,००० | २,११७ ३ | १०·१ | ३,५२८ ११ | १६·८ | २,९४० ९ | १४·० |
| २४,००० | २,५८५ १५ | १०·८ | ४,३०९ १५ | १८·० | ३,५९१ १० | १५·० |
| २७,००० | ३,१८० ० | ११·८ | ५,३४८ ० | १९·८ | ४,४९२ ११ | १६·६ |
| ३०,००० | ३,८३६ ० | १२·८ | ६,४९७ ० | २१·७ | ५,५१९ ० | १८·४ |
| ३३,००० | ४,४९२ ० | १३·६ | ७,६५४ ० | २३·२ | ६,५४५ ० | १९·८ |
| ३६,००० | ५,२११ ० | १४·५ | ८,९०४ ० | २४·७ | ७,६६५ ० | २१·३ |
| ४०,००० | ६,३३६ ० | १५·८ | १०,८२० ० | २७·० | ९,५४९ ० | २३·९ |
| ५०,००० | ९,१४८ ० | १८·३ | १५,६१२ ० | ३१·२ | १४,२८२ ० | २८·६ |
| ६०,००० | १२,२७३ ० | २०·५ | २०,८७३ ० | ३४·८ | १९,५०४ ० | ३२·५ |
| ७०,००० | १५,७११ ० | २२·५ | २६,६०२ ० | ३८·० | २५,२०६ ० | ३६·० |
| ८०,००० | १९,१४८ ० | २३·९ | ३२,३३१ ० | ४०·४ | ३०,९१४ ० | ३८·६ |
| ९०,००० | २२,५८६ ० | २५·१ | ३८,०६० ० | ४२·३ | ३६,६२७ ० | ४०·७ |
| १,००,००० | २६,०२३ ० | २६·० | ४३,७८९ ० | ४३·८ | ४२,३४३ ० | ४२·३ |
| १,५०,००० | ४४,७७३ ० | २९·८ | ७४,७७९ ० | ४९·९ | ७३,२९४ ० | ४८·९ |
| २,००,००० | ६५,०८६ ० | ३२·५ | १,०८,११२ ० | ५४·० | १,०६,६०८ ० | ५३·३ |
| ३,००,००० | १,११,९६१ ० | ३७·३ | १,८४,१५४ ० | ६१·४ | १,८२,६३० ० | ६०·९ |
| ४,००,००० | १,६१,९६१ ० | ४०·५ | २,६३,३२० ० | ६५·८ | २,६१,७८७ ० | ६५·४ |
| ५,००,००० | २,१५,०८६ ० | ४३·० | ३,४५,६१२ ० | ६९·१ | ३,४४,०७३ ० | ६८·८ |
| १०,००,००० | ५,११,९६१ ० | ५१·२ | ८,०३,९४५ ० | ८०·४ | ८,०२,३९४ ० | ८०·२ |
| २०,००,००० | ११,०५,७११ ० | ५५·३ | १७,२०,६१२ ० | ८६·० | १७,१९,०५६ ० | ८५·९ |
| ३०,००,००० | १६,९९,४६१ ० | ५६·६ | २६,३७,२७९ ० | ८७·९ | २६,३५,७२० ० | ८७·८ |

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.
श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.
नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर
आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.



मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
सोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय
पूना गेस्ट हाऊस
फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २
वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

हें पत्र पुणें, पेठ मांयुडां घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांयुडां, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. दा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख १७ मार्च १९४३ | अंक ११

महायुद्ध द्वारासी आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

( Estd. in 1935 )
The Co-operators' Book Depot
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
Books on :—
Economics and Sociology ; Co-operation and Rural Development ; Banking and Finance ; Accountancy and Auditing ; Commerce and Industries etc.
Books on all other subjects are also readily supplied.
Agents for the Publications of :
1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४ | महेंद्रकर ब्रदर्स | बुधवार चौक, पुणें
तयार कपड्याचे व्यापारी

# विविध माहिती

### औषधांचें हिंदुस्थानांत उत्पादन

चालू युद्धापूर्वी हिंदुस्थान औषधांसाठी परदेशांवर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून होता. चाळीस वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत औषधांचे तीन-चारच कारखाने होते; त्यांची संख्या हळुहळु वाढत जाऊन १९३५ सालीं त्यांत ६० लक्ष रुपयांच्या मालाचें उत्पादन झालें. त्या वर्षी २ कोटि रुपये किंमतीच्या औषधांची आयात झाली. युद्धामुळें आतां आयात अशक्यप्राय झाली असून, लोकांची मोठी गैरसोय झाली आहे. युद्धामुळें हिंदुस्थानांत औषधांचे उत्पादनास चालना मिळाली आहे. सरकारी कारखान्यांतच आतां ३५० वेगवेगळ्या प्रकारचीं औषधें तयार होऊं लागलीं आहेत. स्थानिक कारखान्यांचेंहि उत्पादन पुष्कळ वाढलें आहे. आतां सुमारें ७१% औषधें हिंदुस्थानांत तयार होऊं लागलीं आहेत; १९३९ मध्यें हें प्रमाण २५% होतें.

### जपानी आगबोटी

पर्ल हार्बरवर जपाननें हल्ला केला तेव्हांपासून जपानच्या १५१ युद्धनौका बुडविण्यांत आल्या आहेत. एकूण १,०६३ जपानी आगबोटी बुडाल्या आहेत अथवा कमी-अधिक प्रमाणांत नाश पावून कायम अगर तात्पुरत्या कामांतून बाहेर गेल्या आहेत.

### धान्याच्या वहातुकीस प्राधान्य

धान्याच्या वहातुकीस रेल्वेजनीं प्राधान्य दिलेलें आहे. रबीचीं पिकें मोठ्या प्रमाणांवर निघालीं तर ह्या बाबतींत रेल्वेजवर आणखी ताण पडणार आहे.

### मि. जे. पी. मॉर्गन

मि. जे. पी. मॉर्गन हे सुप्रसिद्ध कोट्याधीश गेल्या आठवड्यांत आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी निवर्तले. जे. पी. मॉर्गन आणि कंपनीचे ते प्रमुख होते. पनामा कालव्याचे हक्क फ्रान्सकडून ४ कोटि डॉलर्सला विकत घेण्याचें अमेरिकेनें ठरविलें तेव्हां ही रकम आर्थिक घडी न बिघडवितां सोन्याच्या नाण्यांत जमविण्याचें काम अमेरिकन सरकारनें ह्या फर्मकडे सोपविलें होतें. गेल्या युद्धाचे वेळीं दोस्त राष्ट्रांना मोठमोठीं कर्जे उभारून देण्याची कामगिरी ह्या फर्मनें यशस्वी रीतीनें पार पाडली. १९२७ ते १९३१ ह्या मंदीचे काळांतही मॉर्गन फर्मनें २ कोटि डॉलर्स नफा मिळविला. मॉर्गनइतका मोठा आयुर्विमा दुसऱ्या कोणाचा क्वचितच असेल. १९१७ सालीं त्यानें २५ लक्ष डॉलर्सची पॉलिसी घेतली. १९१५ सालीं त्यांच्या खुनाचा प्रयत्न झाला होता.

### डि गॉलचा सल्ला

फ्रेंच कामगार जर्मनीकडे जाण्याचे मार्गांत शक्य ते अडथळे आणण्याचा सल्ला जनरल डि गॉल ह्यांनीं फ्रेंच जनतेस दिला आहे.

### बँकांना सुट्टी

शुक्रवार, ता. १९ रोजीं "इदे मिलाद" निमित्त व सोमवार ता. २२ रोजीं "होळी" निमित्त बँका बंद रहातील.

### मोटारींच्या वेगाचें नियंत्रण

मध्यप्रांत व वऱ्हाड ह्यांतील रस्त्यांची व पुलांची परिस्थिति लक्षांत घेतां, त्यांवर वहातुक करणाऱ्या मोटारींच्या वेगाचें नियंत्रण करणें, येथील प्रांतिक सरकारास आवश्यक झालें आहे.

### सरकारी आकड्यांचा खुलासा

सरकारी रिपोर्टांत दिलेल्या आकडेवार माहितीचें नीट आकलन करणें बरेंच कठीण जातें. ही अडचण दूर करण्यासाठी "सरकारी आकड्यांचा खुलासा करणारा मार्गदर्शक" ह्या नांवाचें एक पुस्तक हिंदुस्थान सरकारच्या कचेरीमार्फत प्रसिद्ध करण्यांत येत आहे. ह्याचा पहिला भाग उपलब्ध झाला असून दुसरा भाग लवकरच प्रसिद्ध होईल.

### महाराष्ट्रांतील कारखान्यांची साखर

महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांची डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन ह्या नांवाची एक प्रातिनिधिक संस्था आहे, तिचे वतीनें श्री. डहाणूकर ह्यांचे नेतृत्वाखालीं एका शिष्टमंडळानें मि. नाइट, मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार, ह्यांची भेट घेतली. असोसिएशनच्या सभासदांचे कारखान्यांत साखरेचा साठा वाढत आहे तेव्हां त्यांस ज्यास्त साखर जनतेस विकतां येण्याची सवलत मिळावी अशी श्री. डहाणूकर ह्यांनीं विनंति केली.

### हिंदुस्थान सरकार विरुद्ध मद्रास सरकार

मद्रास प्रांतानें मालाच्या विक्रीवर कर बसविला आहे, त्यापैकी पहिल्या विक्रीवरील कर एक्साईज पट्टीचा भाग असल्यामुळें तो हिंदुस्थान सरकारच्या कक्षेंत येत असल्यानें तेवढ्यापुरता मद्रास सेल्स टॅक्स ॲक्ट बेकायदा आहे अशा स्वरूपाचें आपलें म्हणणें हिंदुस्थान सरकारनें फेडरल कोर्टांत मांडलें होतें. फेडरल कोर्टांत हा प्रश्न उपस्थित करण्याचा हेतु सरकारास प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करतां यावें असा होता. फेडरल कोर्टानें मद्रास प्रांतिक सरकारच्या बाजूनें निवाडा केला.

### हिंदी तांदळाचें पीक

| | |
|---|---|
| १९४१–४२ | २,५३,५१,००० टन. |
| १९४२–४३ | २,४५,२२,००० टन. |
| घट | ३% |

### हातसडीचे तांदूळ

तांदळाच्या कमतरतेमुळें चालू वर्षी लोकांना सकस अन्नाचा पुरवठा थोडा कमी होईल, त्यास मुख्य उपाय म्हणजे तांदळाची लागवड वाढविणें हा होय. मुंबई सरकार त्याबाबत प्रयत्न करीतच आहे. तांदळांतील महत्त्वाचे सत्वांश, तांदूळ गिरणींत कांडल्यामुळें नाहींसे होतात, ते कायम राखणें हाहि अन्नपुरवठा वाढविण्याचा एक मार्ग आहे. हातानें सडलेल्या तांदळापेक्षा गिरणींत सडलेला तांदूळ अन्न ह्या दृष्टीनें कमी कसाचा असतो हें सिद्ध आहे. तांदळाच्या वरच्या टरफलांतील जीवनास आवश्यक असलेलीं द्रव्यें, हातसडीच्या तांदळांतून नाहींशीं होत नाहींत. शिवाय, कोंड्याचा उपयोग दुसरे जिन्नस करण्याकडे अथवा जनावरांस घालण्याकडे होतो, हा हातसडीच्या तांदळाचा आणखी फायदा आहे. घरगुती धंद्यांस मिळणारें उत्तेजनहि ह्यासंबंधांत लक्षांत ठेवलें पाहिजे. हातसडीच्या तांदळाच्या अभावीं निदान कमी सडलेले तांदूळ तरी खाण्यासाठी वापरावे.

### राजपुताना विश्वविद्यालय

राजपुतान्यासाठी स्वतंत्र विश्वविद्यालय स्थापण्यांत यावें, अशी सूचना जयपूरचे दिवाण, सर मिर्झा इस्माइल ह्यांनीं आपल्या भाषणांत नुकतीच केली. राजपुतान्यांतील सर्व संस्थानांनीं सहकार्यानें त्याची स्थापना न केल्यास, जयपूर संस्थान स्वतःपुरतें वेगळें विश्वविद्यालय काढील असेंहि ते म्हणाले.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ८२ | नवें कॉमर्स कालेज... | ८५ |
| २ लंडनमधील हिंदी शिलका... | ८३ | ५ बीवर ... ... | ८६ |
| ३ हातसडीचे तांदूळ ... | ८४ | ६ देवकरण नानजी इ. कं. लि. ... | ८६ |
| ४ स्फुट-विचार फिनॅन्स बिलावर चर्चा—भावी आंतरराष्ट्रीय चलन—रबराच्या मळ्यांचें भवितव्य— | | ७ रिझर्व्ह बँकेचें साप्ताहिक पत्रक ... | ८७ |
| | | ८ इंडस्ट्रिअल इ. ट्रस्ट लि. | ८७ |


# अर्थ

बुधवार, ता. १७ मार्च, १९४३

## लंडनमधील हिंदी शिलका

सध्या युद्धपरिस्थितीमुळें हिंदुस्थानांत चलनी नोटांचा विस्तार सारखा चालला आहे आणि हिंदी शिलका लंडनमध्यें वाढत असून त्यांचा विनियोग कसा करावयाचा ह्याविषयीं वादग्रस्त प्रश्न उपस्थित झाला आहे. सर जरेमी रेसमन ह्यांनीं ह्या बाबतींत असेंब्लींत भाषणें केलीं त्यांचा मथितार्थ आम्हीं ह्या पूर्वीच दिला आहे. अर्थमंत्र्यांच्या खुलाशानें कायदेमंडळाच्या सभासदांचें समाधान झालेलें नाहीं असें उघड दिसतें आणि हिंदी वृत्तपत्रांतहि तोच ध्वनि उमटलेला आहे. हिंदी व्यापारी संस्थांनींहि प्रस्तुत संबंधांत असमाधान व्यक्त केलें आहे. कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें ह्या विषयावर एक ठरावच पुढें मांडण्यांत आला होता आणि त्यावर झालेल्या चर्चेवरून हिंदी चलनाचा विस्तार व लंडनमध्यें साचणाऱ्या हिंदी शिलकांचा विनियोग ह्या दोन्ही बाबतींत सरकारचें धोरण सभासदांस असंमत असल्याचें स्पष्ट होतें.

हिंदुस्थानच्या शिलका लंडनमध्यें फुगत आहेत, ह्याचें कारण असें आहे कीं, साम्राज्य सरकारच्या वतीनें हिंदुस्थान सरकार ह्या देशांत रुपयाच्या स्वरूपांत खर्च करतें त्याचा मोबदला लंडन येथें पौंड-स्टर्लिंगमध्यें आम्हांस मिळतो. ह्या खर्चासाठीं हिंदुस्थान सरकार नोटा काढून त्या प्रचलित करतें त्यामुळें येथील चलन फुगतें आणि लंडनमध्यें जमणारें स्टर्लिंग ह्या चलनास आधार म्हणून समजलें जातें. लंडनमध्यें साचणाऱ्या शिलकांतून हिंदुस्थानचें इंग्लंडांत काढलेलें कर्ज फेडण्यांत आलें आहे आणि ह्या देशाच्या तिकडे द्यावयाच्या इतर देण्यांची वासलात लावण्यासाठींहि त्यांचा उपयोग करण्यांत येत आहे. तरीहि शिलका वाढत राहिल्या आहेत. त्यांची एक गंगाजळी बनवण्यांत यावी आणि युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानास आवश्यक असलेला माल इंग्लंडमध्यें खरेदी करण्यांत तिचा विनियोग व्हावा अशी हिंदुस्थान सरकारची योजना आहे.

ही सरकारची कल्पना आणि चलनी नोटांचा चाललेला विस्तार ह्यांचेवर कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें प्रतिकूल टीका झाली. हिंदुस्थान सरकार साम्राज्य सरकारासाठीं ह्या देशांत रुपये खर्चतें आणि त्यांचा मोबदला त्यास लंडनमध्यें प्रचलित हुंडणावळीच्या दरानें मिळतो. पुढें त्या शिलकांचा विनियोग ब्रिटिश माल घेण्यांत होईल किंवा अन्य तऱ्हेनें केला जाईल तेव्हां हुंडणावळीचा दर बदलला तर हिंदुस्थानचें नुकसान होण्याचा संभव आहे. मागील महायुद्धाच्या समाप्तीनंतर पौंड-स्टर्लिंगचें मोल कमी झालें, तसाच प्रकार ह्या खेपेसहि झाल्यास हिंदुस्थानच्या पदरांत कमी किंमतीचा माल पडेल अशी भीति व्यक्त करून कौन्सिल ऑफ स्टेटच्या एका सभासदांनीं या बाबतींत ब्रिटिश सरकारनें हमी द्यावी असें सुचवलें. ज्या भावानें रुपयाचें स्टर्लिंगमध्यें रूपांतर होत आहे त्याच भावानें लंडनमधील हिंदी शिलकांतील स्टर्लिंगचा रुपयांत मोबदला होण्याची खात्री पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. दुसऱ्या एका सभासदांनीं चलनांत होणाऱ्या बेसुमार विस्ताराविषयीं भीति व्यक्त केली. चालू वर्षाच्या पहिल्या ४७ दिवसांत ५१ कोटि रुपयांचें चलन नवीन चालू करण्यांत आलें असल्याचें त्यांनीं सांगून आपल्या म्हणण्यास पुष्टी दिली. ह्या रीतीनें चलनाचा विस्तार चालू राहिल्यास पुढील वर्षाच्या मध्यास त्याचें प्रमाण एक हजार कोटि रुपयांची मर्यादा गाठील असेंहि ते म्हणाले आणि ह्या गोष्टीस तात्काळ आळा घालण्यांत आला पाहिजे असें त्यांनीं सुचविलें. या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करण्यासाठीं मध्यवर्ती कायदेमंडळाची एक समिती नेमण्यांत यावी अशीहि सूचना पुढें मांडण्यांत आली.

सरकारच्या वतीनें उत्तरादाखल भाषण करतांना फिनॅन्स खात्याच्या चिटणिसांनीं वरील प्रकारच्या समितीची अनावश्यकता प्रतिपादिली व अशी माहिती दिली कीं लंडनमधील हिंदी शिलकांचा विनियोग कसा व्हावा, ह्याविषयीं सल्ला द्यावा म्हणून तो प्रश्न पुनर्घटना कमिटीस सादर करण्यांत आला आहे आणि ही कमिटी पूर्णपणें प्रातिनिधिक आहे व दुसऱ्या चौकशी समितीची आवश्यकता नाहीं. पुनर्घटना कमिटीचा तरी सल्ला घेण्याची जरूरी सरकारास वाटली ह्यावरून त्यांच्या योजनेवर झालेल्या टीकेंत पुष्कळ तथ्यांश आहे ह्या विषयींची त्यांनीं कबुली दिल्यासारखेंच आहे. पण ही तपशिलाच्या विचाराची व्यवस्था झाली, त्याच्या बुडाशीं असलेल्या तत्त्वाची नव्हे, हें विसरतां कामा नये. लंडनमधील स्टर्लिंग शिलकांचा हिंदुस्थानास पूर्ण मोबदला मिळावा असें टीकाकार म्हणतात ह्यावरून सदरहू शिलकांची उपयुक्तता त्यांस मान्य आहे असें झालें, ह्या फिनॅन्स सेक्रेटरींनीं केलेल्या कोटिक्रमांत काय स्वारस्य आहे हें समजणें कठीण आहे. युद्धपरिस्थितींत चलनाची वाढ होणें अपरिहार्य आहे ह्या त्यांच्या म्हणण्यांत सत्य आहे आणि चलनाच्या वाढीचा परिणाम बाजारभावाच्या वाढींत होऊन महागाईमुळें चलनाचा विस्तार आवश्यक होतो हें त्यांनींच कबूल केलें आहे. इंग्लंडपाशीं हिंदुस्थानास मोबदल्यांत देण्यास चांदी-सोनें नाहीं आणि त्यास इकडे ऐनजिनसी माल पाठवितां येत नाहीं. ह्यामुळें लंडनमध्यें हिंदी शिलका सांचत आहेत असा खुलासा त्यांनीं केला. वाढत्या चलनाच्या स्वरूपांत क्रयशक्ति लोकांच्या हातीं जात आहे ती कमी कशी होईल आणि पैशाच्या विस्ताराचें अनिष्ट परिणाम कसे टाळतां येतील ह्या विषयीं त्यांनीं विशेष कांहींच सांगितलें नाहीं. हा वास्तविक रीत्या मुद्याचा प्रश्न आहे आणि तो सोडविण्याचा यत्न सरकारनें लोकांच्या सहकारितेनें करणें अगत्याचें आहे. लंडनमधील शिलकांचा विनियोगहि हिंदी लोकमतास अनुसरून झाला पाहिजे आणि त्या संबंधांतील साशंकपणा व अनिश्चितता हीं दूर करण्यांत आलीं पाहिजेत.

## हातसडीचे तांदूळ

समाजामध्यें आधुनिक सुधारणांचा जसजसा प्रसार होतो, तसतसा लोकांच्या रहाणींत कृत्रिमपणा वाढत जातो, आणि तो अनेक बाबतींत प्रकृतिस्वास्थ्यास प्रतिकूल ठरतो. जुन्या चालीरीती व रहाणी ही सर्वस्वी निर्दोष असून त्यांत बदल किंवा सुधारणा होण्यास मुळींच वाव नसतो असा प्रकार नाहीं. परंतु आवश्यक सुधारणांचे बरोबर दोष येतात, त्यांचें निवारण होण्याची काळजी वेळींच घेतली जाणें आवश्यक असतें. युद्ध-परिस्थितीमुळें कित्येक नेहमींच्या संवयीच्या वस्तु दुर्मिळ झाल्या आहेत, त्यांची जागा भरून काढण्याच्या प्रयत्नांत विशिष्ट नव्या संवयीस लो बसत असून कृत्रिमता नाहींशी होत आहे व नैसर्गिकपणानें वागण्याची प्रवृत्ति स्वीकारणें प्राप्त झालें आहे, ही गोष्ट आतां प्रत्येकाच्या अनुभवाची असल्यानें तिच्याविषयीं तपशील येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. तरीहि हातसडीच्या तांदुळाच्या उपयोगाचें उदाहरण ठळक असल्यानें त्याचा उल्लेख करण्यासारखा आहे. सध्या हिंदुस्थानांत युद्धाच्या पूर्वीच्या काळाच्या मानानें तांदुळाचा पुरवठा मर्यादित झाला आहे आणि त्याच्या तुटवड्याची जागा भरून काढणें आवश्यक झालें आहे. अशा वेळीं एका महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधलें जात आहे, ती म्हणजे गिरणींत स्वच्छ केलेल्या तांदुळापेक्षां हातसडीच्या तांदुळाचा अन्नांत उपयोग केला गेल्यास तो अधिक आरोग्यकारक आहे ही होय. अलीकडे यंत्रसहाय्यानें भात कांडून त्याचे स्वच्छ तांदूळ करण्याचा प्रघात प्रसार पावला आहे. त्यांत भात सडण्याचे मानवी श्रम वांचतात आणि पांढरा शुभ्र तांदूळ त्यांतून निघतो असा दुहेरी फायदा दिसत असल्यानें ही यांत्रिक पद्धति समाजांत फैलावली आहे. परंतु हातसडीच्या तांदुळावर कोंडा राहिल्यानें तो काळसर दिसत असला तरी त्यांत व्हिटामिनचें पोषक द्रव्य शिल्लक रहातें आणि अन्न या नात्यानें त्याचे गुण अधिक असतात, असें मत आधुनिक शास्त्रज्ञांनीं व्यक्त केलें आहे. सध्याच्या युद्धकाळांत तांदुळाचा पुरवठा अपुरा झाला असल्यामुळें लोकांनीं हातसडीचे तांदुळ वापरल्यास यंत्रांत सहा टक्के इतका मोलवान कोंड्याचा भाग नष्ट होतो तो वाचून जनतेस पौष्टिक अन्न मिळेल हा दुहेरी फायदा होण्याजोगा आहे. भात कांडण्याच्या घरगुती धंद्यास त्यायोगानें उत्तेजनहि मिळेल, ही गोष्टहि नजरेस आणण्यांत आली आहे, तिच्याकडे लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे. यंत्र मानवी श्रम वांचवितें हें खरें आहे, आणि यांत्रिक सुधारणेचा उपयोग करणें इष्टहि असतें, परंतु यंत्रांतून स्वच्छ करून काढलेले तांदूळ प्रकृतीस अपायकारक ठरत असतांना, हातसडीच्या तांदुळांत पोषक व पाचक द्रव्यें असतात तीं नाहींशीं करणें हें चुकीचें काम असल्याचें शास्त्रीय रीतीनें सिद्ध झालें असतां आणि तांदुळाच्या सध्याच्या पुरवठ्याचा अधिकांत अधिक उपयोग कर्तव्य असतां हातसडीच्या तांदुळास नाकें न मुरडतां तोच नियमानें वापरणें उचित नाहीं असें कोण म्हणेल?

### वॅगन्स

९९७५ ब्रॉड गेज व ७३६ मीटर गेज वॅगन्सची ऑर्डर सरकारनें देऊन ठेवली आहे. त्यापैकीं २६५ ब्रॉड गेज वॅगन्स आलेल्या आहेत. बाकीच्या वॅगन्स १९४३–४४ अखेर येतील.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्केअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,४८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,२४,२७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष. श्री. धों. कृ. साठे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. वा. पुं. वर्दे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते,

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड जाहीर झालें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणी बरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळवे,

ऑफिशिएटिंग मॅनेजर.

# स्फुट विचार

## करांविषयींच्या बिलाची चर्चा

सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडलेल्या अंदाजपत्रकांतील खर्चाच्या बाबीस मान्यता मिळून त्यांनीं सुचविलेल्या करांच्या योजनांची चर्चा गेल्या आठवड्याच्या अखेरीस चालू झाली. ह्या सूचना एका बिलांत ग्रथित केलेच्या असतात आणि त्याचा कायदा मंजूर झाला म्हणजे सरकारास त्यांतील अंतर्भूत कर वसूल करण्याचा अधिकार प्राप्त होतो. इतर कायद्यांच्या खर्ड्याप्रमाणें ह्याहि बिलाची तीन वाचनें होतात. त्यांतल्या पहिल्या वाचनास गेल्या आठवड्यांत प्रारंभ झाला. ह्या वाचनाचे प्रसंगीं बिलांत अंतर्भूत झालेल्या करांविषयींच सभासदांनीं बोलावें असा निर्बंध नसतो. एकंदर राज्यकारभाराच्या धोरणावर टीका करण्यास त्यांस मुभा असते. ह्या प्रघातास अनुसरून अनेक विषयांवर आपले विचार व्यक्त करण्याची संधी निरनिराळ्या सभासदांनीं प्रस्तुत बिलाच्या चर्चेच्या प्रसंगीं घेतली. युद्धखर्चाची वाटणी ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान न्यायानें व ह्या देशाच्या ऐपतीस धरून होण्यासाठीं हिंदी लोकमताचा सल्ला घेण्याची आवश्यकता ह्या चर्चेंत प्रतिपादली गेली. लंडनमधील हिंदी शिलकांचा विनियोग हा टीकेचा विषय असणें तर अपरिहार्यच होतें. चलनाच्या विस्तारास मर्यादा घालण्याचें महत्त्व, अधिक सरकारी कर्जें काढून वाढता खर्च भागविण्याची आवश्यकता, तसेंच, युद्धोत्तर काळांतील आर्थिक पुनर्घटनेची योजना आखण्याचें अगत्य ह्यांचे संबंधांत सूचना करण्यांत आल्या. वनस्पतिजन्य तुपावरील कर हा सामान्य जनतेच्या अन्नावर कर असल्याचें सांगण्यांत आलें. एका सभासदानें हिंदी योद्ध्यांच्या शौर्याची स्तुति करून युद्धोत्तर काळांतील त्यांच्या जीवनक्रमाची तरतूद केली जावी असें सांगितलें. युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानच्या लंडनमधील पैशाचा उपयोग अमेरिकेमध्येंहि यंत्रसामुग्री खरेदी करण्यांत येऊं शकला पाहिजे आणि ह्यासाठीं ह्या दोन देशांचे दरम्यान खास व्यवस्था होणें आवश्यक आहे असें सुचविण्यांत आलें, कामकरी वर्गास स्वस्त धान्य आणि कापड मिळेल अशी तजवीज सरकारनें करण्याची आवश्यकता प्रतिपादण्यांत आली.

---

## भावी आंतरराष्ट्रीय चलन

चालू युद्धाच्या शेवटीं जागतिक पुनर्घटना होईल तेव्हां सर्व प्रकारची आंतरराष्ट्रीय सहकारिता अंगिकारली गेल्यावांचून तिची कोणतीच योजना यशस्वी होणें अशक्य आहे. युद्धामुळें झालेली हानि भरून काढण्यास राष्ट्राराष्ट्रांत व्यापार व देवघेव सुरळीतपणानें व्हावी लागेल. आंतरराष्ट्रीय व्यापार, राष्ट्रीय उद्योगधंदे, राष्ट्रांतील अंतर्गत बाजारभाव, चलन व हुंडणावळ यांचे परस्पर संबंध इतके नाजुक आहेत कीं, त्यांविषयींचा विचार व तरतूद एव्हांपासून होण्याचें महत्त्व इंग्लंड व अमेरिका ह्या देशांस भासूं लागलें आहे. पंधरा वर्षांमागें एक जागतिक आर्थिक परिषद भरली होती, पण राष्ट्रीय चलनांचे परस्पर संबंध कसे असावे ह्या संबंधांत तीमध्यें मतभेद उत्पन्न होऊन तिची चर्चा फलद्रूप होऊं शकली नाहीं. ह्याकरितां चलन व हुंडणावळ ह्यांचे बाबतींत आंतरराष्ट्रीय धोरण काय असावें ह्याचा विचार प्रस्तुत युद्धाच्या समाप्तीपूर्वींच चालला असल्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे. ह्यासंबंधांतली तपशीलवार योजना अर्थातच उपलब्ध नाहीं. तथापि, सोन्यावर आधारलेलें किंमतीचें प्रमाणभूत असें चलन मान्य करण्यांत यावें आणि त्याच्या अनुरोधानें राष्ट्रांनीं स्वतःचीं चलनें निश्चित करावीं असें सुचविण्यांत येत असल्याचें समजतें. आंतरराष्ट्रीय देणीं-घेणीं सुरळीतपणानें पार पडावीं म्हणून त्यांवर देखरेख करण्यासाठीं प्रातिनिधिक आंतरराष्ट्रीय समितीसारखी संस्था स्थापणें आवश्यक होईल. गरीब व कर्जदार राष्ट्रांच्या सोयीसाठीं आंतरराष्ट्रीय फंड व हिशेब ठेवावे लागतील आणि चलनांच्या अंतर्गत व बहिर्गत मोलांच्या वैचित्र्यामुळें उद्भवणारी स्पर्धा व घोटाळा टाळण्याची योजना अमलांत आणावी लागेल. शांतता जिंकणें हें युद्ध जिंकण्याइतकेंच अवघड आहे, ह्याचा अनुभव मागील महायुद्धाचे बाबतींत आलेला आहे. त्यापासून बोध घेण्याची प्रवृत्ति इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत दृष्टोत्पत्तीस येत आहे. सोन्या-चांदीचा व भांडवलाचा पुरवठा अमेरिकेंत युद्धोत्तरकाळांतहि विपुल रहाणार असल्यानें त्या राष्ट्राची सहकारिता आर्थिक पुनर्घटनेंत निर्णायक ठरेल ह्याविषयीं शंका नाहीं. हिंदुस्थानांत राष्ट्रीय चलन आणि लंडनमधील हिंदी शिलकांचा विनियोग ह्यांचे संबंधांत सध्या जोराची चर्चा चालू आहे तिचें महत्त्व व अगत्य वरील विवेचनावरून स्पष्ट होण्यासारखें आहे. भावी आर्थिक पुनर्घटनेंत हिंदुस्थानच्या हितसंबंधींचें योग्य रक्षण व्हावें ह्यासाठीं एव्हांपासून दक्षता बाळगली जाण्याचें महत्त्व ह्या चर्चेच्या मुळाशीं आहे.

---

## रबराच्या मळ्यांचें भवितव्य

जपानी आक्रमणामुळें रबराच्या उत्पादनापैकी नऊ दशांश उत्पादन जपानच्या ताब्यांत गेलें आहे. आतां वार्षिक फक्त २ लक्ष टन इतकेंच रबर बाकीच्या देशांस उपलब्ध आहे. नैसर्गिक रबराची जागा भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे. १९४० सालीं २,५०० टन कृत्रिम रबर तयार करण्यांत आलें. १९४३ सालीं हा आकडा ४ लक्ष टनांवर जाईल, अशी अपेक्षा आहे. कृत्रिम रबराचें उत्पादन ह्याच गतीनें वाढत गेल्यास नैसर्गिक रबरास तो एक जबरदस्त प्रतिस्पर्धी निर्माण होणार आहे. पूर्व आशियांतील मळ्यांत रबर अत्यंत स्वस्तांत तयार होत असलें तरी मोठ्या प्रमाणावर तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या कृत्रिम रबरापुढें विशेषतः किंमतींत त्यास हार खावी लागेल, असा अंदाज आहे. तथापि नैसर्गिक रबराचे कांहीं विशेष गुणधर्म आहेत, त्यांमुळें त्याचें महत्त्व अबाधित राहील, अशी अपेक्षा आहे. रबर प्लँटेशन इनव्हेस्टमेंट ट्रस्ट कंपनीचे उपाध्यक्ष, मि. एरिक मॅकफेडनस्, ह्यांनीं ह्या संबंधांत व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे आहेत. नैसर्गिक रबराची बाजारांतून हकालपट्टी झाल्यास ब्रिटिशांनीं रबराच्या मळ्यांत गुंतविलेल्या भांडवलाचें काय होणार? रबराच्या मळ्यांत काम करणाऱ्या हिंदी, जपानी व चिनी मजुरांची उपासमार कशी टळणार? इत्यादि प्रश्न त्यांनीं उपस्थित केले आहेत. रबराचा उपयोगच इतका मोठ्या प्रमाणावर होऊं लागेल कीं, कृत्रिम रबराबरोबर नैसर्गिक रबरासहि मोठी मागणी कायम राहील व आपत्ति टळेल, अशी त्यांची अपेक्षा आहे. कपास व लोकर ह्यांचेवर रेयॉन व कृत्रिम धागे ह्यांचा जाणवण्याइतका प्रतिकूल परिणाम झालेला नाहीं, हा दाखला देऊन, रबराच्या मळ्यांची सुधारणा घडवून आणून उत्पादन कार्यक्षमतेनें केलें तर त्यांस भय नाहीं, असें मि. मॅकफेडन ह्यांनीं सांगितलें.

## पुण्याचें नवें कॉमर्स कॉलेज

पुणें येथें एक कॉमर्स कॉलेज स्थापन होणार असल्याची माहिती आतां जाहीर झाली आहे. हें व्यापारी कॉलेज डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्यातर्फे निघणार असून त्याची सर्व पूर्वतयारी झालेली आहे. व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे वाढीबरोबर महाराष्ट्रांत व्यापारी शिक्षणाच्या व्यवस्थेचीहि आवश्यकता होती, ती प्रस्तुत कॉलेज भरून काढीत आहे—त्यामुळें उच्च व्यापारी शिक्षण सहजसाध्य होईल हा त्याचा मोठा फायदा आहे. अशा तऱ्हेचें कॉलेज पुणें येथें स्थापण्याचे कांहीं प्रयत्न ह्यापूर्वी झाले होते परंतु ते यशस्वी झाले नाहींत. डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या संस्थेचा भक्कम पाठिंबा व सोसायटीचे सेक्रेटरी प्रा. द. गो. कर्वे ह्यांची उत्कृष्ट योजना ह्यांचेमुळें कॉमर्स कॉलेजला युनिव्हर्सिटीची व सरकारची मान्यता मिळण्यास अडचण पडली नाहीं. प्रा. कर्वे हे नव्या कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल आहेत. त्यांच्या विद्वत्तेप्रमाणें कुशल मार्गदर्शन व नेतृत्व ह्यासाठींहि त्यांची ख्याती आहे. त्यांचे निदर्शनाखालीं कॉमर्स कॉलेजची भरभराट होऊन त्यास मानाची जागा प्राप्त होईल ह्याबद्दल शंका नाहीं. सध्या मुंबई येथें दोन व अहमदाबाद येथें एक अशीं तीन व्यापारी कॉलेजें चालू आहेत. महाराष्ट्रासाठी नवें कॉलेज स्थापल्यानें डेक्कन एज्युकेशन सोसायटीस महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या पद्धतशीर वाढीस हातभार लावल्याचें श्रेय मिळणार आहे.

## बॉम्बर

बॉंबवाहू विमानास बॉंबर असें म्हणतात. बॉंबचें प्रत्येकी वजन ५०० ते ८००० पौंड असूं शकतें. असे बॉम्ब वहाणारीं विमानें अर्थातच मोठीं असावीं लागतात. फायटर्सपेक्षां तीं मोठीं असतात, त्यांत पेट्रोल अधिक मावतें व तीं ज्यास्त दीर्घ प्रवास करूं शकतात. बॉम्बरमध्यें बहुधा सहा माणसें असतात. उंचीवरून लक्ष्यावर बरोबर बॉम्ब टाकतां यावा, ह्यासाठी बॉम्बरमध्यें अत्यंत अचुक अशी यंत्रसामुग्री असते. ग्रेट ब्रिटनचीं बॉम्बर पुष्कळच मोठीं असतात. युरोपांत आंतपर्यंत जाऊन बॉम्ब टाकण्याची कामगिरी त्यांस करावयाची असते. इजिप्तमध्यें फायटर–बॉम्बरचा उपयोग करण्यांत येत आहे. ह्यामध्यें फक्त एकच बॉम्ब मावतो. ह्या विमानांतील बॉम्ब शत्रूवर टाकला म्हणजे तें फायटर म्हणून काय करतें. अमेरिकेचें बॉम्बर "फ्लाइंग फोर्ट्रेसेस" म्हणजे उडते किल्ले या नांवानें प्रसिद्ध आहेत. ह्या बॉम्बरवर कित्येक तोफा बसविलेल्या असतात व त्यावर हल्ला करणें अत्यंत कठीण असतें. फार मोठ्या उंचीवरून हे उडते किल्ले प्रवास करूं शकतात व त्यामुळें त्यांचें अस्तित्व जमिनीवरून कळून येत नाहीं. विशेषत: दिवसाकाठी बॉम्ब टाकण्यास त्यांचा फार उपयोग होतो. "लिबरेटर" नांवाचेंहि अमेरिकन बॉम्बर आहेत ते "उडत्या किल्ल्या" पेक्षांहि मोठे व मजबूत असतात. "डाइव्ह बॉम्बर" हें जर्मनीचें वैशिष्ट्य आहे. हा बॉम्बर फार उंचावरून बॉम्ब टाकत नाहीं, तो आपल्या लक्ष्याचे समीप वेगानें येतो व आपलें काम आटपून वर निघून जातो. जमिनीवरील सैनिकांवर हल्ला करण्यासाठी त्याचा मुख्यत: उपयोग करतात; परंतु उंचीवरून अचूक बॉम्बफेक त्यास करितां येत नाहीं. ज्या फौजांच्या रक्षणासाठी फायटर विमानें व ॲन्टी एअर क्राफ्ट तोफा नाहींत, अशा फौजांस डाइव्ह बॉम्बरचा फार धोका असतो.

## निजाम राज्य

प्रवासी व व्यापारी लोकांच्या माहितीसाठी हैद्राबाद शहराविषयीचें एक सुंदर व चित्रमय छापील चोपडें हैद्राबाद नगरपालिकेनें प्रसिद्ध केलें आहे. या चोपड्यांतील कांहीं माहिती पुढें उद्धृत करण्यांत आली आहे.

निजाम राज्याचें क्षेत्रफळ, वऱ्हाड सोडून, ८२,६९८ चौरस मैल आहे. म्हणजे तें इंग्लंड व स्कॉटलंड या दोन देशांच्या क्षेत्रफळापेक्षां अधिक आहे. वऱ्हाडची राज्यव्यवस्था मध्यप्रांताबरोबर होत असली तरी तो प्रदेश निजाम सरकारच्या आधिपत्याखालीं आहे.

सन १९४१ च्या खानेसुमारीप्रमाणें संस्थानची एकंदर लोकसंख्या १ कोट ६२ लाख असून हैद्राबाद शहराची लोकसंख्या ७·२८ लाख आहे.

संस्थानांत ५,००० मैल लांबीच्या सडका आहेत. कोणत्याहि संस्थानांत असलेल्या रेल्वे लाइनींपेक्षा या संस्थानच्या हद्दींतील रेल्वे लाइनी जास्त आहेत. एकंदर रेल्वे लाइनची लांबी १,३६४ मैल आहे. सडका व रेल्वे लाइन्समुळें आयात व निर्यात व्यापाराची उत्कृष्ट तरतूद झाली आहे, व उत्तर व दक्षिण हिंदुस्थानमध्यें आणि पूर्व व पश्चिम किनारा यांमधील असलेल्या थेट पर्यंतच्या लाइनींचा व सडकांचा या संस्थानमधील रेल्वे लाइनी व सडका एक भाग बनला आहे. याशिवाय रेल्वे व रस्ता यांत्रिक वाहतुकीचा समन्वय करण्यांत आला असून बसेसची संख्या थोडीथोडकी नसून ११८ इतकी मोठी आहे व बसेस चालत असलेल्या सडकांची लांबी जवळजवळ ४,००० मैल आहे. हवाई वाहतुकीचाहि समन्वय करण्याच्या दिशेनें प्रगति चालू आहे. या बाबतींत हैद्राबादेंत एक विमानतळ व जिल्ह्याच्या कांहीं महत्त्वाच्या ठिकाणीं विमान उतरण्याचीं स्थळें बांधण्यांत येऊन सदरील कार्याचा प्रारंभ आधींच करण्यांत आला आहे.

हैद्राबादेंत खनिज पदार्थ विपुल असून त्यामध्यें कोळसा हा सर्वांत महत्त्वाचा आहे. याशिवाय शहाबाद येथें संगमरवरी दगडाच्या खाणी असून सोन्याच्या खाणी खोदण्याचें काम चालू आहे.

शेतकी हा संस्थानच्या आर्थिक जीवनाचा पाया आहे. हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या एकंदर कापसाचा सुमारें १/५ हिस्सा संस्थानांत तयार होतो. आणि भुईमूग, ऊंस व इतर महत्त्वाच्या खाद्यधान्यांखेरीज जगांत एरंडी व गळित धान्य जितकें तयार होतें त्याचें शेंकडा ६० टक्के पीक हैद्राबाद संस्थानांत होतें.

## देवकरण नानजी इन्व्हेस्टमेंट कं. लि.

देवकरण नानजी ह्या सुप्रसिद्ध फर्मनें वरील कंपनी स्थापन केली आहे. कंपनीनें १ कोटी रुपयांचें भांडवल विक्रीस काढलें आहे, तें देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि. नें २½% कमिशनवर अंडरराइट केलें आहे. देना सन्स आणि लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. मॅनेजिंग एजंटांस कंपनीच्या बोर्डावर डायरेक्टरांच्या संख्येच्या एक तृतीयांशाइतके डायरेक्टर नेमण्याचा अधिकार आहे व त्यांपैकीं एक बोर्डाचा एक्स ऑफिशियो अध्यक्ष म्हणून येईल. देवकरण नानजी बँकिंग कंपनी ही इन्व्हेस्टमेंट कंपनीची प्रमुख बँकर राहील. तिचा एक प्रतिनिधी इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या बोर्डावर येईल. मात्र बँकिंग कंपनीनें इन्व्हेस्टमेंट कंपनींत किमान ५ लक्ष रुपयांचे भाग धारण केले पाहिजेत. डिबेंचर डायरेक्टराच्या नेमणुकीचीहि तरतूद करण्यांत आलेली आहे. भागीदारांनीं निवडावयाच्या डायरेक्टरानें किमान २५ हजार रुपयांचे भाग घेतले पाहिजेत. श्री. प्राणलाल देवकरण नानजी हे बँकेचे पहिले एक्स ऑफिशिओ अध्यक्ष आहेत.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें साप्ताहिक पत्रक

( ५ मार्च, १९४३ )

बँकिंगचा विभाग

| देणें | रु. |
|---|---|
| भांडवल भरलेलें | ५,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ५,००,००,००० |
| ठेवी:— | |
| ( अ ) सरकारी | |
| मध्यवर्ती सरकारच्या | १४,७७,६३,००० |
| ब्रह्मदेश सरकारच्या | ३६,५६,००० |
| इतर सरकारी खातीं | १७,२६,९७,००० |
| ( ब ) बँकांच्या | ५२,९५,१४,००० |
| ( क ) इतर | ५,३६,०७,००० |
| बिलें द्यावयाचीं | १,६४,०६,००० |
| इतर देणीं | ७,९५,९८,००० |
| एकूण रु. | ११०,३२,४१,००० |

| येणें | रु |
|---|---|
| नोटा | ९,४२,६४,००० |
| रुपये ( नाणें ) | ९,२९,००० |
| चिल्लर ( नाणें ) | १,९८,००० |
| विकत घेतलेल्या आणि डिस्कौंट केलेल्या हुंड्या | |
| ( अ ) अंतर्गत | ......... |
| ( ब ) बाहेरच्या | ......... |
| ( क ) हिं. सरकारचीं ट्रेझरी बिलें | ३६,७२,००० |
| परदेशांत ठेवी | ९१,५६,७९,००० |
| सरकारांस कर्जें व ॲडव्हान्स | ......... |
| इतर कर्जें व ॲडव्हान्स | २५,००,००० |
| कर्जरोख्यांत गुंतविलेला पैसा | ६,३१,२६,००० |
| इतर येणें | २,२८,७३,००० |
| एकूण रु. | ११०,३२,४१,००० |

### स्वस्त कपास, महाग कापड

कपाशीची किंमत न वाढतां सुताची व कापडाची किंमत मात्र वाढत आहे, ह्या प्रवृत्तीचें निदर्शक म्हणून कोहिनूर मिल्सनें प्रसिद्ध केलेले आकडे दाखवितां येतील. ३१ डिसेंबर, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी कोहिनूर मिल्समध्यें ९१ लक्ष, २६ हजार रुपयांचा, म्हणजे त्यापूर्वीच्या वर्षापेक्षां १५½ लक्ष अधिक रुपयांचा कापूस खपला. परंतु गिरणीच्या कापडाच्या खपाचा आकडा मात्र ह्याच मुदतींत २ कोटि, ३१ लक्ष रुपयांवरून ३ कोटि, १७ लाखांवर गेला.

### पिसाळलेलीं कुत्रीं

मुंबई शहरांत दरसाल सुमारें २ हजार लोकांना पिसाळलेलीं कुत्रीं चावतात व त्यांस हाफकिन इन्स्टिट्यूटमध्यें उपचार करण्यांत येतो.

## इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि.

वरील कंपनीस ३१ डिसेंबर, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ३ लक्ष, ३ हजार रुपये नफा झाला. कंपनीच्या भागीदारांस करमाफ ४½ % डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीचें वसूल भांडवल ५० लक्ष रुपये आहे. कंपनीनें आपले पैसे कसे गुंतविले आहेत त्याची माहिती खालील तक्त्यांत दिली आहे. कंपनीनें सरकारी रोख्यांत ३ लक्ष, ७७ हजार रुपये घातले असून ४९ लक्ष ५६, हजार रुपये कंपन्यांचे भाग व डिबेंचर्स ह्यांत गुंतविले आहेत.

| शेअर व रोखे | % |
|---|---|
| बँका | ४·५८ |
| सिमेंट | १·३८ |
| कपास कापड | १८·५४ |
| विमा | ४·४१ |
| लोखंड–पोलाद | ९·२१ |
| ताग | १४·३४ |
| खाणी | २·०१ |
| किरकोळ | ६·४४ |
| पब्लिक युटिलिटीज | १४·६४ |
| कागद | ४·१७ |
| रेल्वेज | ५·५९ |
| रबर | १·५१ |
| आगबोट कं. | १·१८ |
| साखर | ४·६८ |
| चहा | १·२९ |
| सरकारी रोखे | ७·०८ |
| | १००·०० |

कंपनीनें सरकारी रोख्यांत गुंतविलेल्या रकमेपैकीं ८९·४८ % रक्कम हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांत असून १०·५२ % इतकी रक्कम ब्रिटिश रोख्यांत आहे. कंपनीच्या गुंतवणुकीची छाननी रोख्यांच्या प्रकाराप्रमाणें खाली केली आहे :—

| | |
|---|---|
| सरकारी रोखे व डिबेंचर्स | १०·८६ % |
| प्रेफरन्स भाग | २६·३७ % |
| ऑर्डिनरी भाग | ६२·४७ % |
| | १००·०० |

### रेल्वेज व मध्यवर्ती सरकार

चालू वर्ष अखेर, रेल्वेजनीं मध्यवर्ती सरकारास द्यावयाचें व घसारा खात्याकडून घेतलेलें कर्ज सर्व फेडलें जाईल, असा अंदाज आहे. रेल्वेजनीं कांहीं झालें तरी किमान ठराविक रक्कम मध्यवर्ती सरकारास द्यावी ही अट असतांना पुनः रेल्वेजच्या उत्पन्नाचा मोठा भाग सरकारास मिळावा हें उचित नाहीं. याबाबत नवी योजना असेंब्लीस सादर करण्यांत येईल.

### चीनला अमेरिकेची मदत

अमेरिका चीनला मदत करण्यासाठीं उत्सुक आहे हें दर्शविण्यासाठीं अमेरिकेनें चीनमध्यें लढण्यासाठीं आपली फौज पाठवावी असें मादाम चँग काय शेक ह्यांनीं सुचविलें आहे.

### हिंदुस्थान एअर क्राफ्ट फॅक्टरी

वरील कारखान्यांत बंगलोर येथें चांगल्या प्रतीचीं विमानें तयार होऊं लागलीं असल्याचें कंपनीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष, सर जॉन हिगिन्स ह्यांनीं नुकतेंच सांगितलें.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उठाठेवी
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय.

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक

# श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर.

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

# DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व प्रो. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

| जाहिरातींचे दर. |
|---|
| खालील पत्त्यावर चौकशी करावी. |
| व्यवस्थापक, अर्थ, |
| 'दुर्गाधिवास' पुणें ४. |

# अर्थ

| वर्गणीचे दर. |
|---|
| वार्षिक वर्गणी |
| रु. ४ |
| ( टपाल हंशील माफ ) |
| किरकोळ अंकास |
| दोन आणे. |

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख २४ मार्च १९४३ | अंक १२

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें १.

(Estd. in 1935)
The Co-operators' Book Depot
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
*Books on* :—
Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.
Books on all other subjects are also readily supplied.
Agents for the Publications of:
1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### चेकमची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें १२ मार्च अखेर संपलेल्या आठवड्यांत ४२ कोटि,५७½ लक्ष रुपये किंमतीच्या १,३२,७०६ चेकसची देवघेव झाली.

### रशियाचे हद्दीजवळील जपानी सैनिक

जपाननें रशियाचे सरहद्दीजवळील मांच्युरियांतील आपले बरेचसे सैनिक मागें घेतले आहेत.

### चाचणीचा प्रश्न

"चालू युद्धांत आपला मुख्य शत्रू कोणता? जपान की जर्मनी?" ह्या चाचणीच्या प्रश्नास अमेरिकेंत उत्तरें गोळा करण्यांत आलीं. त्यावेळीं जपानला ५३% व जर्मनीला ३४% मतें पडलीं. एका वर्षापूर्वी ह्याच प्रश्नास जर्मनीला ६४% व आठ महिन्यांपूर्वी ५०% मतें पडलीं होतीं. जर्मनीला तोंड देण्याची कामगिरी रशिया व इंग्लंड ह्यांनीं मुख्यतः स्वीकारली आहे; जपानचा नायनाट करण्याचें काम अमेरिकेकडे येईल असें अमेरिकन लोकमत वरील उत्तरांत प्रतिबिंबित झालेलें दिसतें.

### ईस्टर्न ग्रुप कौन्सिल

१९४० सालीं स्थापन झालेलें ईस्टर्न ग्रुप कौन्सिल १५ एप्रिल पासून बंद करण्यांत येईल. युद्धक्षेत्राच्या मर्यादा पश्चिमेकडून पूर्वेकडे हळूहळू विस्तार पावत गेल्यामुळें ह्या बाजूकडील रणमैदानावर लढाईची सामुग्री सुएझ कालव्याचा पूर्वेकडील देशांनीं पुरविणेंच सोईचें झालें. ब्रिटिश साम्राज्यांतील ह्या बाजूच्या देशांनीं संघटनात्मक योजना आखण्याच्या हेतूनें दिल्ली येथें एक परिषद ऑक्टोबर १९४० मध्यें भरली होती. परिषदेनें युद्धसामुग्रीची पैदास व तिचा पुरवठा ह्यांची वाटणी ह्या देशांत करून प्रत्येकाचा सहकार्याचा भाग निश्चित केला होता. ईस्टर्न ग्रुप कौन्सिलची आतां आवश्यकता उरली नसल्याकारणानें तें बंद करण्यांत येत आहे.

### चीनमधील जपानचे खास हक्क

ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं चीनमधील आपले खास हक्क चुंगकिंगच्या चिनी सरकारकडे सोडून दिले. जपान चीनमधील आपले खास हक्क जपानी नियंत्रणाखालील नॅनकिंगच्या चिनी सरकारास ३० मार्च रोजीं परत करणार आहे.

### ट्रेझरी बिलावर १ रु. १ आ. १ पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. १ पै इतका पडला.

### त्रिवेंद्रम येथील ब्रॉडकास्टिंग स्टेशन

त्रिवेंद्रम येथील ब्रॉडकास्टिंग स्टेशनचें उद्घाटन गेल्या आठवड्यांत हर हायनेस महाराणी सेतु पार्वतीबाई ह्यांनीं केलें.

### युरोपियन व अँग्लो इंडियन

ब्रिटिश इमर्जन्सी कमिशन्ड ऑफिसरांपैकीं वस्तुतः ९९ १/१०% अधिकारी अँग्लो इंडियन आहेत. युरोपियन अधिकाऱ्यांस पगार जास्त मिळतो ह्यासाठी ते दडपून आपण युरोपियन असल्याचें सांगतात. अँग्लो इंडियनांपैकीं खरे सुशिक्षित आहेत, ते आपला हिंदीपणा लपवत नाहींत परंतु त्यामुळें त्यांस जास्त पगार मिळूं शकत नाहीं. लबाड माणसांचा त्यामुळें फायदा होतो व खरें सांगणारांचें नुकसान होतें. अँग्लो इंडियन पुढारी मि. फ्रँक अँथनी ह्यांनीं वरील आशयाची तक्रार मध्यवर्ती असेंब्लीमध्यें आपल्या भाषणांत केली.

### कागदाची काटकसर

कागदाच्या टंचाईमुळें उपस्थित झालेल्या परिस्थितीस तोंड देतां यावें म्हणून विश्वविद्यालयानें व इतर संस्था ह्यांनीं परीक्षामध्यें कागदाची काटकसर करावी, नेमलेलीं पुस्तकें बदलूं नयेत आणि पूर्वी वापरलेलीं पुस्तकें विकत घेऊन तीं विद्यार्थ्यांस पुरवण्यांत यावीं अशी शिफारस करण्यांत आली आहे.

### मुंबईचे नवे गव्हर्नर

सर रोजर लम्ले ह्यांची मुदत संपून नवे गव्हर्नर सर जॉन कॉलव्हिल ह्यांनीं मुंबई प्रांताच्या राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आहेत.


## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ९० | रणांगणांवरील हालचाल–कापूस बाजारांतील सट्टेबाजी–मि. चर्चिल यांचें भाषण | |
| २ मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक | ९१ | ७ साखरेच्या उत्पादनावर परिणाम ... ... | ९५ |
| ३ लिमिटेड कंपन्यांवर पडणारा कर ... | ९२ | ८ ईस्ट इंडिया बँक ... | ९५ |
| ४ मजुरींत वाढ ... ... | ९२ | ९ प्राप्तीवरील कर ... | ९५ |
| ५ रबराची लागवड ... | ९३ | | |
| ६ स्फुट-विचार फिनॅन्स बिल मंजूर झालें– | | | |


# अर्थ

बुधवार, ता. २४ मार्च, १९४३

## मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक

तूट नाहीं, उत्पन्नखर्चाची तोंडमिळवणी, युद्धजन्य परिस्थितींत आवश्यक असलेला अधिक खर्च, नवीन कर नाहींत पण जुने कमी केलेले नाहींत, राष्ट्रसंवर्धनाच्या शिक्षण, आरोग्य इत्यादि बाबींवर योग्य खर्च आणि युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेसाठी वाढती गंगाजळी हे मुंबई सरकारच्या १९४३-४४ सालाच्या अंदाजपत्रकाचे विशेष आहेत असें थोडक्यांत सांगतां येईल. गेल्या दोन वर्षांचीं अंदाजपत्रकें ह्याच तत्त्वावर तयार करण्यांत आलीं होतीं आणि त्यांचेंच मूलभूत धोरण येत्या वर्षीहि अमलांत रहाणार आहे. युद्धाच्या परिणामांस तोंड देतां यावें ह्याकरितां स्वतंत्र फंड निर्माण करण्यांत आला असून त्यांत क्रमाक्रमानें भर घालण्यांत येत आहे. ह्या तजवीजीच्या महत्त्वाचे दृष्टीनें, प्रांतिक उत्पन्नांत वाढ झाली तरी कोणताहि कर कमी करणें किंवा नवीन खर्चाच्या बाबी हातीं घेणें ह्यांवर ह्या वाढाव्याचा उपयोग केला जाऊं नये हें प्रांतिक सरकारचें मूलग्राही धोरण आहे.

१९४१-४२ अखेर रोख शिल्लक २९१ लक्ष रुपये होती आणि स्पेशल डेव्हलपमेंट फंडांत २३० लक्ष रुपये शिल्लक होते. ७५ लक्ष रुपये लांब मुदतीनें त्या वर्षीं गुंतवण्यांत आले होते, ते निराळे. चालू म्हणजे १९४२-४३ ह्या वर्षी खर्चापेक्षां उत्पन्न ५९ लक्षांनीं अधिक होईल आणि शिलकेचा आकडा ३४१ लक्ष रुपयांवर जाईल. स्पेशल डेव्हलपमेंट फंडाची शिल्लक २०२ लक्ष रुपये होईल. युद्धोत्तर पुनर्घटना फंडांत २२ लक्ष रुपये टाकण्यांत आले असून ह्या रकमेंत भर पडण्याचा संभव आहे. चालू सालीं उत्पन्नांत झालेली वाढ मुख्यत्वेंकरून एक्साइज (७३ लक्ष), जंगलें (५२ लक्ष) व प्राप्तीवरील कर (५० लक्ष) ह्यांत आलेल्या अधिक उत्पन्नामुळें झालेली आहे. बाहेरून येणाऱ्या परदेशी दारूची आयात घटली, तिच्या जागीं देशी दारूचा खप झाला हें एक्साइजचें उत्पन्न वाढण्यास कारण असल्याचें स्पष्टीकरण देण्यांत आलें आहे. जंगलांच्या उत्पन्नांत झालेली वाढ युद्धासाठीं लागणाऱ्या लाकडाचा अधिक खप झाला ह्यामुळें आहे. मध्यवर्ती प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांत मुंबई सरकारचा हिस्सा आहे. तो वाढून त्याचा फायदा ह्या प्रांतास सहाजिकपणेंच मिळाला आहे. उत्पन्नाप्रमाणें खर्चांतहि कांहीं बाबींवर वाढ झाली आहे. सिव्हिल डिफेन्ससाठीं ५० लक्ष रुपये खर्ची पडले आहेत आणि जंगल खात्यावर ३८ लक्ष रुपये अधिक खर्च झाले आहेत. पोलीस खात्यावरचा खर्च ३५ लक्ष रुपयांनीं वाढला आहे आणि दुष्काळी भागांच्या मदतीप्रीत्यर्थ १० लक्ष रुपये खर्चण्यांत आले आहेत.

१९४३-४४ सालांत १७ कोटी ६९ लक्ष रुपये उत्पन्न होऊन जवळ जवळ तितकाच खर्च होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. युद्धसमाप्तीनंतरच्या शांततेच्या काळांत लढाऊ पेशाच्या लोकांस काम देण्याचा प्रश्न उद्भवेल आणि तो सोडवण्याच्या योजनांस पैसा लागेल. त्याची व्यवस्था बाजूस काढून ठेवण्यांत येणाऱ्या फंडांतून व्हावयाची असल्यानें तो निधी १९४३-४४ अखेर २कोटि रुपयांपर्यंत नेण्याचा सरकारचा विचार आहे. येत्या सालांत ६० लक्ष रुपयांची भर त्यांत घालण्यांत यावयाची आहे. जंगलांत झाडांची पुन्हां वाढ करणें, ग्रामसुधारणेच्या व औद्योगिक प्रगतीच्या योजना हातीं घेणें असलीं खर्चाचीं कामें ह्या फंडांतून व्हावयाचीं आहेत. मामुली वार्षिक उत्पन्नांतून हा खर्च करतां येणें शक्य नाहीं हें उघड आहे. आपल्या नोकरांस महागाईभत्ता सरकार देत आहे त्याचे पायीं त्यास सुमारें एक कोटी रुपये जादा खर्च येत आहे. उत्पन्न वाढलें पण त्याचेबरोबर खर्चहि वाढला. या कारणानें पुढील सालीं उत्पन्न–खर्चाची तोंडमिळवणी होईल आणि कोणताहि कर कमी करतां येणार नाहीं.

प्रांतिक कर्जाच्या बोजाचे बाबतींत एक महत्त्वाची सुधारणा घडवून आणण्यांत आली आहे तिचा येथें उल्लेख करणें आवश्यक आहे. मुंबई सरकारनें हिंदुस्थान सरकारचें कर्ज घेतलें आहे, त्यावर व्याजाचा दर ४¾ टक्के आहे आणि तें ठराविक हप्त्यांनीं फेडलें जावयाचें आहे. अलीकडे व्याजाचे दर उतरले आहेत, त्यांचा फायदा घेऊन चालू सालीं मुंबई सरकारनें ३ टक्के व्याजानें व १९५५ मध्यें परत द्यावयाचें कर्ज स्वतः काढलें आणि ह्या मार्गानें हातीं आलेले ३½ कोटि रुपये मध्यवर्ती सरकारास त्याच्या कर्जाच्या पोटीं देऊन टाकले. ह्या व्यवस्थेनें प्रांतावरील व्याजाचा बोजा थोडा हलका झाला आहे. ह्या प्रांतिक कर्जाचे बाबतींत घसारा फंड व सिंकिंग फंड ह्यांची तरतूद करण्यांत आली आहे आणि त्याप्रीत्यर्थ एकूण ३५ लक्ष रुपयांची रक्कम अंदाजपत्रकांत दाखल केलेली आहे. राष्ट्रसंवर्धक बाबींसाठी येत्या वर्षी थोडा अधिक खर्च होणार आहे तरी त्यांवर एकंदरीनें पहातां जास्त सढळ हातानें पैसा खर्च होणें अगत्याचें होतें असें वाटल्यावांचून रहात नाहीं. ह्या बाबींवरील खर्चाचे पांच वर्षांचे आकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून हाच निष्कर्ष निघेल:—

| वर्ष | लक्ष रुपये |
|---|---|
| १९३९-४० (अखेरचे आकडे) | ३१४ |
| १९४०-४१ " | ३१८ |
| १९४१-४२ " | ३४९ |
| १९४२-४३ (फेर अंदाज) | ३८४ |
| १९४३-४४ (अंदाज) | ४०४ |

अंदाजपत्रकाचे तपशीलांत, शिक्षण, आरोग्य, शेती, सहकार इत्यादींवर जास्त खर्च करण्याचा सरकारचा कसा व कोठें विचार आहे हें दर्शवण्यांत आलें आहे. हा सर्व हिशेबांत घेतला असतां १९४३-४४ सालअखेर सरकारजवळ मोकळी शिल्लक ३३६ लक्ष रुपये राहील आणि स्पेशल डेव्हलपमेंट फंडांत सुमारें १३४ लक्ष रुपये रहातील असा अंदाज आहे.

## लिमिटेड कंपन्यांवर पडणारा कर

लिमिटेड कंपन्यांवर इनकमटॅक्स व कॉर्पोरेशन टॅक्स आकारण्यांत येतो. ह्या कराचे पूर्वीचे व नवीन दर खालीं देण्यांत आले आहेत:—

| | सध्याचा दर | फिनॅन्स बिलांत सुचविलेला दर |
|---|---|---|
| इनकमटॅक्स | | |
| दर | रुपयांत २ आ. ६ पै | रुपयांत २ आ. ६ पै |
| सरचार्ज | रुपयांत १ आ. ३ पै | रुपयांत १ आ. ८ पै |

म्हणजे, मूळ दर कायम ठेवण्यांत आला असून सरचार्जमध्यें ५ पैंची वाढ करण्यांत आलेली आहे. सध्यांचा एकूण टॅक्सचा दर रुपयांत २ आ. ६ पै + १आ.३ पै = ३ आ.९ पै. इतका आहे, तो आतां २ आ. ६ पै + १ आ. ८ = ४ आ. २ पै इतका होईल.

मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांचेमध्यें प्राप्तीवरील कराच्या वसुलीची कांहीं निश्चित प्रमाणांत वाटणी होते. ही वाटणी करतेवेळीं इनमकटॅक्स वरील सरचार्ज लक्षांत घेतला जात नाहीं. म्हणजे, सरचार्ज वाढविल्यामुळें अधिक मिळणारें उत्पन्न हें मध्यवर्ती सरकारासच मिळेल. ह्यासाठीं, इनकमटॅक्सचा मूळ दर न वाढवितां सरचार्ज वाढविण्यांत येत असतो. कॉर्पोरेशन टॅक्सची गोष्ट वेगळी आहे; तो मुळीं मध्यवर्ती सरकारचाच कर असल्याकारणानें त्यांत कांहींहि फेरबदल केला तरी प्रांतिक सरकारांचा त्यांत संबंध येत नाहीं. इनकमटॅक्सपासून फक्त मध्यवर्ती सरकारचेंच उत्पन्न वाढावें ह्याकरितां मूळ दर न वाढवितां सरचार्जची योजना केली, तशी कॉर्पोरेशन टॅक्सबाबत करण्याचें कारण नाहीं. म्हणून, कॉर्पोरेशन टॅक्सचा मूळचा दर रुपयांत १ आ. ६ पै होता तो वाढवून २ आ. करण्यांत आला आहे. म्हणजे, कॉर्पोरेशन टॅक्समध्यें आतां ६ पैंची वाढ झाली आहे. लिमिटेड कंपन्यांना पूर्वी इनकमटॅक्सचे रुपयांत ३ आ. ९ पै व कॉर्पोरेशन टॅक्सचे १ आ. ६ पै मिळून एकूण ५ आ. ३ पै इतका कर पडे तो ह्यापुढें ४ आ. २ पै + २ आ. म्हणजे एकूण ६ आ. २ पै इतका पडणार आहे.

वरील कराची आकारणी सर्व लिमिटेड कंपन्यांवर केली जाते; कंपनी लहान असो वा मोठी असो, तिला नफा शंभर रुपये होवो वा लाख रुपये होवो, त्यापैकी ठराविक हिस्सा कराचे पोटीं कंपन्यांस द्यावाच लागतो. एकूण नफ्यापैकी करासाठी केवढी मोठी रक्कम बाजूस काढून ठेवावी लागते, ह्याची कल्पना कंपन्यांच्या ताळेबंदावरून येते. अपोलो मिल्सला १९४२ अखेर ४८½ लक्ष रुपये नफा झाला, त्यापैकी २१¼ लक्ष रुपये करासाठी वेगळे काढण्यांत आले. मेयर ससुन मिल्सला ५१ लक्ष रुपये नफा झाला, त्यापैकीं २६½ लक्ष रुपये करासाठी बाजूस ठेवण्यांत आले. पोद्दार मिल्सला २४¾ लक्ष रुपये नफ्यापैकी ६६⅔% रक्कम करासाठी बाजूस राखावी लागली. इनकमटॅक्सबरोबर एक्सेस प्रॉफिट टॅक्सहि त्यांना द्यावा लागतो, त्याचा हा परिणाम आहे. तथापि, औद्योगिक कंपन्यांचा नफा एवढ्या मोठ्या प्रमाणांत वाढत आहे कीं भारी दरानें कर भरूनहि त्यांस आपला डिव्हिडंडचा दर वाढविणें सहज शक्य होत आहे.

## महागाईच्या प्रमाणांत मजुरींत वाढ

### टाटा कंपनीचीं धान्याचीं कुपनें.

वाढते बाजारभाव, त्यांस तोंड देण्यासाठी वाढती मजुरी, त्यामुळें पुनः महागाई आणि पुनः वाढती मजुरी, हें इन्फ्लेशनचें रहाटगाडगें टाळावयाचें असेल तर चलनाचा विस्तार थांबवून बाजारभाव स्थिर केले पाहिजेत. मुंबईमधील रहाणीच्या खर्चाचें मान वाढत चाललें आहे, त्या प्रमाणांत मजुरी वाढविण्यांत येत आहे, परंतु हें प्रकरण कोठवर चालणार ? जानेवारी १९४३ मध्यें ठरवून दिलेलें मजुरीचें मान आजच्या बाजारभावाच्या परिस्थितींत जुनें पुराणें होऊन जाऊन मिल ओनर्स असोसिएशनला महागाई भत्त्यामध्यें पुनः वाढ करणें आवश्यक झालें आहे.

ह्या संबंधांत टाटा आर्यन अँड स्टील कंपनीनें आखलेली योजना उल्लेखनीय आहे. ही योजना ९ मार्चपासून अमलांत आली. तिचे अन्वयें १ आक्टोबर १९४२ ह्या दिवशीं असणाऱ्या बाजारभावाचे दरानें आटा, डाळ, साखर व गूळ हीं कामगारांना देण्यांत येत आहेत. चालू बाजारभाव व ऑक्टोबरमधील बाजारभाव ह्यांमधील फरक व ह्यापुढें बाजारभाव वाढल्यानें पडणारी तफावत ह्यांचा सर्व बोजा कंपनी स्वीकारणार आहे. कंपनीच्या योजनेप्रमाणें प्रत्येक कामगारास प्रत्येक आठवड्यास जास्तींत जास्त १० शेर तांदूळ आणि / अथवा गहू आणि / अथवा आटा, १ शेर डाळ व १ शेर गूळ अथवा साखर एवढे जिन्नस मिळतात. ज्यास आठवड्यानें मजुरी मिळते त्यास प्रत्येक आठवड्यास व ज्यास मासिक वेतन आहे त्यास प्रत्येक पंधरवड्यास अनुक्रमें आठवड्याचा व पंधरवड्याचा माल मिळेल. जमशेदपूरमध्यें धान्याचीं १६ दुकानें उघडण्यांत आलीं आहेत व प्रत्येकास दुकान व खरेदीचा दिवस हीं नेमून दिलेलीं आहेत. कामगारांना वाटपाचीं कुपन बुकें दिलेलीं आहेत त्यांवरील मलपृष्ठावर दुकानाचें नांव व खरेदीचा ठरलेला दिवस हीं लिहिलेलीं असतात. कुपनांची किंमत मजुरीच्या रकमेंतून कापून घेण्यांत येईल. १९३६ च्या पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टाचें त्यापुरतें उल्लंघन करण्याची परवानगी सरकारकडून घेण्यांत आली आहे. रोख रक्कम घेऊन कूपन दिलें जात नाहीं.

टाटा कंपनीच्या ह्या योजनेमुळें कामगारांना धान्य मिळण्याची सोय झाली असून त्यामुळें चलनाच्या फाजील विस्तारास थोडा फार आळा बसला आहे. धान्यपुरवठा वक्तशीर होणें हें सरकारच्या मदतीवर अवलंबून आहे, हें उघड आहे.

## हिंदुस्थानांतील रबराची लागवड

सन १८७७ मध्यें ब्राझीलमधून रबराच्या ७,००० बिया इंग्लंडमध्यें पाठविण्यांत आल्या त्याचीं २,००० रोपें सिलोनला धाडण्यांत आलीं. मलबार व त्रावणकोर येथें त्यांची हिंदुस्थानांत प्रथम लागवड झाली. १९४२ सालीं ७१,५०० एकरांत रबराची लागवड झालेली होती. ३० जून १९४२ चा हिंदी रबराच्या लागवडीच्या क्षेत्राचा आकडा १,३६,६०५ एकर असा आहे. ह्यापैकीं ७७% लागवड त्रावणकोर संस्थानांत आहे.

हीं रबराचीं झाडें समुद्रसपाटीपासून १,५०० फूट उंचीपर्यंतच्या जमिनींत चांगलीं वाढतात. सालिना ८० ते १०० इंच पाऊस पडणारा प्रदेश त्यांस सोईचा असतो. लागवडीपासून पांच वर्षांनीं रबराच्या झाडाचा चीक मिळूं लागतो. दक्षिण हिंदुस्थानांतील चांगल्या मळ्यांतील झाडांपासून दरसाल दर एकरीं ३०० पौंड रबर निघतें. हें उत्पादन वाढविण्यासाठी कांहीं सुधारणा घडवून आणणें शक्य आहे. चालू मोसमांत हिंदी रबराचें उत्पादन १८½ हजार टन भरेल अशी अपेक्षा आहे.

# स्फुट विचार

## फिनॅन्स बिल मंजूर झालें

पाच दिवस टीकेचा सतत विषय होऊन हिंदुस्थान सरकारचें युद्धकाळांतील धोरण अंतर्भूत करणारें फिनॅन्स बिल गेल्या आठवड्यांत मंजूर झालें. असेंब्लीमधील सर्व गटांच्या प्रातिनिधिक सभासदांनीं सरकारवर निरनिराळ्या विविध दृष्टींनीं कडक टीका केली. सरकारच्या राजकीय, आर्थिक, सांपत्तिक व कारभारविषयक धोरणावर बिनसरकारी सभासदांचा जोराचा हल्ला झाला आणि बिलाचें पहिलें वाचन बहुमतानें मान्य झालें. दुसऱ्या व तिसऱ्या वाचनाचा विधि केवळ औपचारिक असतो आणि बिल अखेरें मंजूर होतांना मतें घेण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. पांच दिवसांच्या टीकेस सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं उत्तर दिलें. लंडनमध्यें साचणाऱ्या हिंदी शिलकांच्या विनियोगावर घेण्यांत येणाऱ्या आक्षेपासंबंधानें त्यांनीं सांगितलें कीं ब्रिटिश सरकार ह्या देशांत होणाऱ्या युद्धखर्चाचा मोठा भाग सोशीत असल्यानें त्याची भरपाई इंग्लंडमध्यें केली जाते आणि तेथें ह्या देशाचा पैसा सांचणें अपरिहार्य आहे. ह्या पैशाचा उपयोग हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें योग्य रीतीनें कसा होईल ह्याचा विचार करण्यासाठी मध्यवर्ती कार्यकारी मंडळाची व्हाइसरॉय ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक समिती नेमण्यांत आली असून सर जे. पी. श्रीवास्तव तिचे उपाध्यक्ष आहेत. हिंदुस्थानवर युद्धखर्चाचा मोठा बोजा पडत असल्याची तक्रार करणाऱ्या सभासदांस त्यांनीं असा टोमणा मारला कीं हेच लोक सदरहु युद्धखर्चांतून स्वतःसाठी फायदा उकळणें गैर मानीत नाहींत. इंग्लंडनें येथें स्वतः खर्च केलेला पैसा लंडनमध्यें जमा झाला तर त्याचे संबंधानें ह्या टीकाकारांनीं कां तक्रार करावी असाहि सवाल त्यांनीं टाकला. ह्या व्यवहारांत हिंदुस्थानांत चलन वाढत जात असून त्याचे योगानें महर्गतेस उत्तेजन मिळत आहे ह्या टीकेस मात्र समाधानकारक उत्तर त्यांनीं दिलें नाहीं आणि इतर टीकाविषयक प्रश्नांस त्यांनीं बगल दिली. मुंबईंत कापसाच्या बाजारांत सट्टेबाजी करून भाव कृत्रिम रीतीनें अवास्तव चढवणारांचा सर जेरेमी ह्यांनीं खरपूस समाचार घेतला. गरिबांचें कापड महाग करण्याचें पाप हे लोक आपल्या पदरीं घेत असून त्यांच्या समाजविघातक कारवाया हाणून पाडण्याचे कामीं सरकार आपलें शक्तिसर्वस्व खर्चील असें त्यांनीं निक्षून सांगितलें. कापसाचे भाव चढण्यासारखी परिस्थिति नसतां औद्योगिक घडी विस्कटून जाईल अशा रीतीनें, सट्टेवाल्या लोकांनीं कापसाच्या किंमती चढवल्या आहेत' ह्या कृत्याचा तीव्र शब्दांनीं त्यांनीं सरकारच्या वतीनें निषेध केला आहे. त्याचा योग्य परिणाम कापूस बाजारावर होईल अशी अपेक्षा आहे.

## रणांगणांवरील हालहवाल

रशियन फौजेस खार्कोव्हसारखें महत्त्वाचें ठिकाण सोडून यावें लागलें असून तेथून पूर्वेकडे पीछेहाट करावी लागली आहे, ही बातमी जरी मित्रराष्ट्रांच्या उत्साहावर थोडेंसें थंड पाणी ओतणारी असली तरी एकंदर पूर्व आघाडीवर चाललेल्या हालचालींचा साकल्यें करून विचार करणें आवश्यक असून एका भागांत जर्मनीनें केलेल्या प्रगतीस प्रमाणाबाहेर महत्त्व देतां कामा नये. खार्कोव्हच्या बाजूस रशियन सैन्यास मागें हटावें लागलें आहे ही आश्चर्याची गोष्ट नसून त्या सैन्यानें जर्मनीच्या फौजांस शेकडो मैल अव्याहत रीतीनें मागें रेटीत नेण्यांत धडाडी व शौर्य प्रकट केलें आहे तें खरोखर वाखाणण्यासारखें आहे. पूर्व आघाडीच्या मध्यावर रशियनांची चढाई सारखी चालू असून त्यांनीं व्हिआझ्मा हस्तगत करून स्मॉलेन्स्कच्या दिशेनें प्रगति चालवली आहे. आघाडीच्या उत्तरेच्या टोंकासहि रशियन सैन्य हळूहळू पुढें जात आहे. दक्षिण आघाडीच्या एका मर्यादित भागावर फार मोठी लढाऊ शक्ति एकवटल्यामुळें हिट्लरला खार्कोव्हच्या पूर्वेकडे यश मिळालें आहे. डॉनेट्झनदी पार करून जाण्याची तो शिकस्त करीत आहे, पण रशियन सैनिक जर्मनीच्या फौजेचा चांगला समाचार घेत आहेत. स्टालिनग्राडपासून प्रारंभ करून रशियन सेनापतींनीं विजयी जर्मन फौजांस शेकडो मैल सारखें मागें रेटीत नेऊन मोठमोठालीं शहरें व रेल्वेज परत घेतल्या ह्यांतच हिट्लरनें भयंकर नुकसान सोसून मिळवलेल्या जयावर पाणी पडल्यासारखें झालें. ह्या कारणानें हिटलरला रशियन आघाडीवर आत्मविश्वास व समाधान वाटणें अशक्य झालें आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या रशियाच्या मित्र राष्ट्रांनीं युरोपमध्यें चालू करावयाच्या दुसऱ्या आघाडीच्या प्रश्नानें ह्या वेळेस पुन्हां डोकें वर केलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. परंतु ट्युनीशियामधून जर्मन व इटालिअन फौजांस अगोदर हाकून दिल्यावांचून दुसरी आघाडी व्यवहार्य दिसत नाहीं आणि त्या मर्यादित पण अवघड रणांगणावर ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच सैन्यांनीं चिकाटीनें लढाया चालू ठेवल्या आहेत. जर्मन पाणबुड्या बोटींनीं चालवलेला संहार बंद करण्याचे प्रयत्न कसोशीनें चालू आहेत आणि ह्या कामीं प्रगति होईल त्या मानानें युरोपांतील दुसऱ्या आघाडीचें कार्य सुकर होईल. मित्रराष्ट्रांचें युद्ध ही वास्तविक रीतीनें एक अभेद्य आघाडी आहे आणि निरनिराळ्या क्षेत्रांतील हालचालींकडे ह्या दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. जपानच्या आक्रमणाचा प्रतिकार हा ह्या एकूण युद्धधोरणाचा एक भाग आहे हें विसरून चालावयाचें नाहीं.

---

## कापूस बाजारांतील सट्टेबाजी ?

हिंदुस्थान सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं कापूस बाजारांत सट्ट्याचे व्यवहार करणाऱ्या धंदेवाइकांविरुद्ध त्यांनीं कापसाचे भाव निष्कारण चढवल्याबद्दल गंभीर आरोप केला आहे. आखूड धाग्याच्या कापसास मागणी नसल्यानें त्याची किंमत उतरून शेतकरी वर्गाचें नुकसान होऊं लागलें म्हणून ह्या पिकाची लागवड मर्यादित करण्याचे प्रयत्न जारीनें झाले आहेत आणि कपाशीच्या ऐवजीं धान्यांचीं पिकें केलीं जावीं ह्या उद्देशानें त्यांच्या लागवडीस उत्तेजन देण्यांत येत आहे. कापूस बाजारांत चाललेल्या सट्ट्यांचे योगानें कापसाचा भाव एकदम चढला आहे आणि तो पुढें टिकेल अशी वस्तुस्थिति नाहीं. ह्या तात्पुरत्या चढलेल्या भावामुळें शेतकऱ्यांस कपास पेरण्याचा मोह होऊन कापसाचें उत्पादन कमी करून धान्यांची पैदास वाढण्याचें धोरण निष्फळ ठरण्याची भीति आहे. तसेंच, गोरगरिबांचे उपयोगासाठीं स्वस्त कापड करणें अशक्य होईल. ही कारण-कार्य-परंपरा लक्षांत घेतां सट्टेवाल्यांचें कापसाच्या किंमती चढवण्याचें धोरण राष्ट्रहितविघातक आहे आणि तें हाणून पाडण्याचें सरकारनें ठरवलें आहे. सर जेरेमी ह्यांच्या वरील विचारसरणीस ईस्ट इंडिया

कॉटन असोसिएशनचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, ह्यांनीं एका पत्रकाद्वारें उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं अर्थमंडयांनीं ह्या प्रश्नाचा एकांगी विचार केला आहे. इतर मालाच्या किंमती इतकी वाढ कापसाच्या भावांत झालेली नाहीं. त्याचप्रमाणें, सूत व कापड ह्यांच्या किंमती वाढून गिरणीवाल्यांची कापसाविषयींची मागणी वाढली आहे आणि तिचा परिणाम कापसाचे भाव चढण्यांत झाला आहे. ही घटना अगदीं सहाजिक रीतीची असून तीमध्यें कृत्रिम कांहींच नाहीं असें सांगण्याचा सर पुरुषोत्तमदास ह्यांचा रोख आहे. कापसाच्या किंमती वाढल्या तर त्याचा फायदा शेतकरी वर्गास होईल हें इष्टच आहे असेंहि त्यांचें म्हणणें आहे. सट्टेबाजीमुळें चढलेल्या भावांचा फायदा खरोखर शेतकऱ्यांच्या पदरांत पडेल काय? हा येथें एक महत्त्वाचा प्रश्न आहे. सट्ट्यांच्या बाजारांत किंमतीस भरती-ओहोटी येते तीमध्यें शेतकरी कोरडाच रहातो असा अनुभव असल्यानें सर पुरुषोत्तमदास ह्यांचें उत्तर सामान्यतः पटण्यासारखें नाहीं. अर्थमंडयांनीं दिलेली ताकीद तर गंभीर स्वरूपाची आहे आणि तिच्याविरुद्ध मांडण्यांत आलेली बाजू विशेष बळकट आहे असें दिसत नाहीं. ह्याकरितां प्रस्तुत विषयाची चर्चा व्यापक भूमिकेवर होणें अगत्याचें आहे. सूत-कापडाची मागणी वाढली म्हणून कापूस महाग झाला आणि कापसाचा भाव चढला म्हणजे कापडाचा भाव आणखी चढणार. हें चक्र असेंच फिरूं देणें अनिष्ट आहे. युद्धपरिस्थितींत बाजारभावांचें नियंत्रण आणि स्थिरता हीं अत्यंत आवश्यक असतात हें येथें ध्यानांत बाळगलें पाहिजे.

---

### मि. चर्चिल ह्यांचें भाषण

ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल ह्यांनीं इंग्लंडच्या जनतेस व सामान्यतः मित्र राष्ट्रांस उद्देशून दीर्घ भाषण नुकतेंच केलें. त्यांत इंग्लंडमध्यें व्हावयाच्या पुनर्घटनेची स्थूल मानाची कल्पना मांडण्यांत आली. युद्ध संपतांच आर्थिक गोंधळ उत्पन्न न होतां बेकारीस वाव मिळूं नये, शेती, उद्योगधंदे व व्यापार ह्यांची बढती व्हावी; आरोग्य, शिक्षण, घरांचा पुरवठा व अनेक प्रकारांच्या विम्यांची तरतूद करतां यावी आणि जनतेची रहाणी सुधारावी ह्या उद्देशांचा अंतर्भाव चतुर्वार्षिक योजनांत अंतर्भाव केला जाईल असें त्यांनीं सांगितलें. युद्धासंबंधानें बोलतांना ते म्हणाले कीं मानवतेच्या मानगुटीवर बसलेल्या नात्सी भुतास प्रथम गाडलें पाहिजे आणि त्यास एक दोन वर्षे लागतील. ह्या प्रबळ शत्रूचा नाश झाला म्हणजे जपानचा समाचार घ्यावा लागेल. युद्धास जबाबदार असलेल्या दुष्ट पुढाऱ्यांस योग्य शासन देण्यांत आल्यावर मित्र राष्ट्रें आंतरराष्ट्रीय शांतता व राष्ट्रांची पुनर्घटना ह्या महत्वाच्या कार्यास हात घालतील. इंग्लंडच्या अंतर्गत पुनर्घटनेंत जुनी भांडवलशाही आणि समाजसत्तावाद ह्या विरुद्ध टोंकांस असलेल्या दोन पद्धतींमधला सुवर्णमध्य काढण्यांत येईल. ह्या तऱ्हेच्या धोरणाचा उपक्रम मि. चर्चिल ह्यांनीं सुचवला. युद्धोत्तर काळांत सामाजिक व आर्थिक क्रांति होण्याची भीति सध्याच्या सत्ताधारी वरिष्ठ वर्गास वाटत आहे ती दूर करण्याचा आणि आर्थिक समता व समाजसत्ता ह्यांचा पुरस्कार करणाऱ्या लोकांस श्रमजीवि बहुसंख्याक जनतेच्या हातीं सत्ता यावयास हवी आहे अशा स्थितींत सर्वांस समाधानकारक वाटेल असा तडजोडीचा मार्ग त्यांनीं शोधून काढला आहे. ब्रिटिश चलनाचें सध्याचें मोल अबाधित राखून कोट्यावधि लोकांनीं आपली बचत सरकारच्या स्वाधीन केली आहे ती निर्वेध त्यांच्या पदरांत पुनः पडेल अशी व्यवस्था होत असल्याचेंहि त्यांनीं आश्वासन दिलें.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,४८,५५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,२४,२७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष. श्री. घों. कृ. साठे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. वा. पुं. वर्दे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख.

---

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड जाहीर झालें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणी बरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळवे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

## गुळाच्या वाढलेल्या किंमतीचा साखरेच्या उत्पादनावर परिणाम

१९४२-४३ च्या मोसमांत हिंदी साखर कारखान्यांचें उत्पादन १०,६१,३०० टन होईल अशी अपेक्षा आहे. १९३९-४०, १९४०-४१ व १९४१-४२ च्या उत्पादनाचे आकडे अनुक्रमें १२,४१,७००, १०,९५, ४००; व ७,७८ १०० टन असे होते. म्हणजे, चालू वर्षातील उत्पादन गेल्या वर्षापेक्षां ३६% जास्त असलें तरी तें १९४०-४१ पेक्षां कमीच आहे व १९३९-४० च्या पेक्षां तर तें १५% नें कमी आहे. हिंदुस्थानांतील उत्पादन अंतर्गत मागणीस पुरें पडलें पाहिजे, इतकेंच नव्हें तर मध्यपूर्व देशांकडे पाठविण्यास व लष्करी मागणी पुरविण्यास पुरेल इतकी साखर हिंदुस्थानांत तयार झाली पाहिजे, ह्या हेतूनें हिंदुस्थान सरकार व ज्या प्रांतांत साखरेचे कारखाने बहुंशीं आहेत असे बिहार व संयुक्त प्रांत ह्यांचीं सरकारें ह्यांनीं चालू मोसमांत साखरेचें उत्पादन वाढावें ह्यासाठी विशेष प्रयत्न केले. उसाच्या लागवडीवरील निर्बंध त्यांनीं काढून टाकले व ऊंस लावणाऱ्या शेतकऱ्यांस उसास चांगली किंमत येईल अशीं आश्वासनें दिलीं. तथापि बिहार व संयुक्त प्रांत येथील कांहीं भागांत उसाचें पीक चांगलें आलें नाहीं व उसाचा उपयोग गूळ करण्याकडे होऊं लागला. त्या कारणानें साखरेस प्रचंड मागणी असतांनाहि कांहीं कारखाने सतत चालू ठेवणें शक्य झालें नाहीं. प्रांतिक सरकारांनीं ठरवून दिलेल्या ( मणास ८ आणे ) दरानें कारखानदारांस ऊंस विकण्यापेक्षा त्याचा गूळ करून विकणें शेतकऱ्यांस फायदेशीर वाटूं लागलें, त्यामुळें संयुक्त प्रांताचा पश्चिम भाग व दक्षिण बिहार येथील कारखान्यांस उसाचा तुटवडा भासूं लागला. संयुक्त प्रांत सरकारनें गुळाचा भाव वाढूं न देण्याची व त्याची निर्गत बंद करण्याची व्यवस्था केली तरी सुद्धा उसाचा गूळ करणेंच किफायतशीर होऊन त्या प्रमाणांत साखरेचें उत्पादन घटलें. संयुक्त प्रांत व बिहार सरकारांनीं १ जानेवारी १९४३ नंतर उसाची किंमत ८ आण्यांची १० आणे केल्यामुळें शेतकऱ्यांस ऊंस कारखान्यास विकून टाकणें सोईचें वाटूं लागलें आणि कारखान्यांस उसाचा पुरवठा व्यवस्थित होऊं लागला. चालू मोसमांत एकूण १५१ कारखान्यांत साखर गाळण्यांत येत आहे. एकूण १ कोटि, ९ लक्ष टन उसाची साखर करण्यांत येईल व साखरेचा उतारा ९.७५% पडेल अशी अपेक्षा आहे. इंपीरिअल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजीचे डायरेक्टर श्री. श्रीवास्तव, ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पत्रकावर वरील माहिती आधारलेली आहे.

### हवाई हल्ल्याचे बळी

ग्रेट ब्रिटनवर गेल्या फेब्रुवारींत झालेल्या हवाई हल्ल्यांत २५२ लोक मरण पावले व ३४७ लोक जखमी झाले.

### ग्वाल्हेरमधील कपाशीची लागवड

ग्वाल्हेरमधील चालू वर्षातील कपाशीची लागवड ४, ४६, २१४ एकर एवढी आहे. म्हणजे कपाशीच्या लागवडींत गेल्या वर्षाच्या मानानें १८% घट झालेली आहे.

### एक्सेस प्रॉफिट टॅक्स

ह्या कराचा सध्याचा दर ६६⅔ % आहे. तो वाढविण्यांत येणार नाहीं.

### ईस्ट इंडियन बँक, लि.

विजगापट्टम व कोलंबो ह्यांवर गेल्या एप्रिलमध्यें जपानी बॉंब पडले त्याचा परिणाम दक्षिण हिंदुस्थानांतील बँकांवर प्रतिकूल झाला व लोकांनीं बँकांतून भराभर पैसे काढून घेण्यास प्रारंभ केला व चांगल्या पद्धतीनें चाललेल्या बँका अशा संकटास कशा तोंड देऊं शकतात हें इंडियन बँक लि. च्या उदाहरणावरून समजून येईल व लोकांनीं बँकांवर विश्वास ठेवणें कसें युक्त असतें हें त्यावरून लक्षांत येईल. इंडियन बँकेतून लोकांनीं पैसे काढून घेतल्यामुळें बँकेला आपलीं दिलेलीं कर्जे परत घ्यावीं लागलीं व आपले रोखे विकून पैसे उभे करावे लागले. १९४२ च्या दुसऱ्या सहामाहींत युद्धाचा रंग पालटून बँकेला आपलें बस्तान पुनः नीट बसवितां येणें शक्य झालें. १९४१ सालीं बँकेस २९ लक्ष, १३ हजार रु. ठोक उत्पन्न झालें होतें. १९४२ सालीं १७ लक्ष २७ हजारांवर आलें व निवळ नफा ४ लक्ष, ९ हजारांचा २ लक्ष ३ हजार झाला असें झालें तरी बँक आपल्या १०% कर माफ डिव्हिडंडचा दर कायम ठेवूं शकली. डिसेंबर १९४२ मध्यें बँकेनें अधिकृत भांडवलापैकीं उरलेलें भांडवल १००% प्रीमियमनें विकलें व त्यामुळें मिळालेले १२ लक्ष रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले. बँकेच्या दोघा ऑडिटर फर्मपैकीं एक फर्म एम. के. दांडेकर आणि कं. ही आहे. बँकेचें एकूण खेळतें भांडवल ६½ कोटि रुपयांवर आहे.

### प्राप्तीवरील कर

मध्यवर्ती सरकारनें सुचविलेले प्राप्तीवरील कर कोणत्या दरानें आकारण्यांत येतील ह्याची माहिती खालीं दिली आहे.

इन्कमटॅक्स:—हा कर प्रत्येक व्यक्ती, हिंदु अविभक्त कुटुंब न नोंदलेली फर्म ह्यांस द्यावा लागतो. प्राप्तीचा आकडा १,५०१ ते २,००० रुपये असेल तर पहिल्या ७५० रुपयांवरील प्राप्तीवर रुपयांत ६ पै कर बसतो. ह्या करांत वाढ करण्यांत आलेली नाहीं परंतु ५ हजारांपेक्षा जास्त प्राप्तीवर सरजार्ज बसविण्यांत आलेला आहे. कंपनी व लोकल ॲथॉरिटी ह्यांस रुपयांत २ आणे ६ पै + १ आ.:८ पै = ४ आ. २ पै इतका कर बसतो.

सुपर टॅक्स:-- एकूण उत्पन्नाचे पहिल्या २५ हजारांवर सुपर टॅक्स नाहीं परंतु प्राप्तीच्या पुढील टप्प्यांवरील सरचार्जमध्यें वाढ करण्यांत आलेली आहे. लोकल ॲथॉरिटीच्या सर्व उत्पन्नावर रुपयांत १ आ. + १ आ. =२ आणे कर बसणार आहे. सहकारी सोसायट्यांच्या उत्पन्नापैकीं पहिल्या २५ हजारांच्या प्राप्तीवर कर नाहीं. बाकीच्या जास्त उत्पन्नावर १ आ. + १ आ. = २ आणे कर बसेल. कंपनीवरील कॉर्पोरेशन टॅक्स सर्व उत्पन्नावर बसतो. त्याचा दर १ आ. ६ पै + ६ पै = २ आणे होणार आहे.

### अर्जेंटिना

दक्षिण अमेरिका खंडांतील सर्व देश संयुक्त राष्ट्रांस मिळाले आहेत. अर्जेंटिना हा एकच देश तटस्थ राहिला आहे व त्याच्या राजधानींत जर्मन वकील अद्याप नांदत आहे. अर्जेंटिनाचें हित संयुक्त राष्ट्रांस विजय मिळण्यांत असूनहि त्यानें तटस्थ रहावें हें चमत्कारिक आहे. अर्जेंटिनामध्यें जर्मनी कारवाया करीत असल्यामुळें कित्येक ब्रिटिश व संयुक्त राष्ट्रांच्या आगबोटी बुडाल्या आहेत अशी तक्रार टाइम्स ह्या ब्रिटिश वृत्तपत्रानें केली आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

### ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. | नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून चिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

### ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख ३१ मार्च १९४३ अंक १३

महायुद्ध दारांशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

(Estd. in 1935)
The Co-operators' Book Depot
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
*Books on :—*
Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.
Books on all other subjects are also readily supplied.
Agents for the Publications of :
1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

युद्धजन्य परिस्थितींत सुद्धां
वेस्टर्न इंडियानें

सन १९४२ मध्यें पाऊण कोटींच्यावर विम्याचें काम पूर्ण केलें असून गेल्या वर्षापेक्षा नवीन कामांत सात लाखांची वाढ आहे. सेवा आणि सवलती यांच्या बळावर मिळविलेल्या लोकप्रियतेचें हें दृश्य फळ आहे. आपणहि ह्या कंपनीचे एक विमेदार होऊन तिजकडून मिळणाऱ्या लाभाचे आणि संरक्षणाचे वाटेकरी व्हा. अधिक माहितीसाठी पत्रव्यवहार करा.

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड सातारा.

पुणें शाखा-१७९ बुधवार, लक्ष्मी रोड, पुणें २.

## विविध माहिती

### वंगणासाठीं वनस्पतिजन्य तेलें

अमेरिकेंतून खनिज तेलें येणें कठीण झालें असल्याकारणानें एरंडी, तीळ, इत्यादि वनस्पतींचीं तेलें वंगण म्हणून कशीं वापरतां येतील ह्यासंबंधीं विचार चालू आहे. ट्रॅन्स्पोर्ट अडव्हायसरी कौन्सिलची सभा मुंबई येथें नुकतीच झाली, तिनें ह्या प्रश्नाचा आढावा घेतला. सध्यां ८ हजार टन एरंडेल व १½ हजार टन तिळेल रेल्वेज वंगणासाठी दरसाल वापरतात व ६ हजार टनांचा खप साखर कारखाने व इतर गिरण्या ह्यांत होतो. जेथें जेथें खनिज तेल वापरण्यांत येतें तेथें तेथें वनस्पतिजन्य तेल उपयोगांत आणल्यास प्रतिवर्षी ४६ हजार टन इतकें तेल खपूं शकेल. वेगवेगळ्या प्रकारच्या यंत्रांत निरनिराळें तेल विशेष उपयोगी पडतें. मार्गास वंगण म्हणून खोबरेलहि वापरण्यांत येत आहे. वेगवेगळ्या तेलांचें मिश्रण करून प्रयोग करण्यांत आले आहेत. खनिज व वनस्पतिजन्य तेलांचीं मिश्रणें तयार करून तीं विकण्याची शक्यता कितपत आहे, ह्याचा विचार पेट्रोल कंपन्या करीत आहेत.

### खुजे लोक

ऑस्ट्रेलियन फौजांस न्यूगिनीच्या एका भागांत खुजे लोक आढळले आहेत. त्यांची उंची तीन फुटांपेक्षां अधिक नसते. ते आपले देह वल्कलांनीं आच्छादितात.

### मजेदार जाहिरात

हॉलिवुड येथील एका हॉटेलांत पुढीलप्रमाणें जाहिरात आहेः—
" येथें लागेल तितकी कॉफी मिळेल. पहिल्या पेल्यास ५ सेंट, दुसऱ्यास १०० डॉलर ( ३५० रुपये )."

### पेट्रोल रेशनिंग

पेट्रोलच्या रेशनिंगमध्यें येत्या तिमाहींत कांहींहि फरक होणार नाहीं. सध्यां मिळतें तेवढेंच पेट्रोल मिळेल.

### चीनमधील खास हक्क सोडले

पेकिंग ( चीन ) मधील आपले खास हक्क फ्रान्स, इटली व स्पेन ह्यांनीं सोडून दिले असल्याची माहिती जर्मन रेडिओनें दिली आहे.

### हिंदी भुइमुगाचें पीक

| | उत्पादन ( टन ) | लागवड (एकर) |
|---|---|---|
| १९४१-४२ | २५,८६,००० | ७०,७०,००० |
| १९४२-४३ | २७,१४,००० | ७४,३१,००० |
| वाढ | ४% | ५% |

### गॅस प्लँटला प्रोत्साहन

मोटार वाहतुकीसाठी गॅस प्लँटच्या उपयोगास प्रोत्साहन द्यावयाचें असल्यास, सरकारनें मोटारींच्या खरी धातूंचा पुरवठा उपलब्ध करावा; कारण सध्याच्या रेशनिंगच्या काळांत मोटार वहातूक अतिशय अवघड झाली आहे, असें मोटार मॅन्युफॅक्चरर्स अँड इंपोर्टर्स असोसिएशन लि. चे अध्यक्ष संस्थेच्या वार्षिक सभेंत आपल्या भाषणांत म्हणाले.

### डॉ. जी. डेसा

डॉ. जी. डेसा हा इटालियन युद्धकैदी आतां जयपूर संस्थानाचा भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून काम करीत आहे. ॲबिसिनियांत काम करीत असतांना डॉ. डेसा हे संयुक्त राष्ट्रांच्या हातांत सापडले व त्यांना युद्धकैदी म्हणून हिंदुस्थानांत आणण्यांत आलें.

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

| | ( गाठी ) |
|---|---|
| जानेवारी, १९४२ | ३,६४,४७७ |
| जानेवारी, १९४३ | ३,७२,१३७ |
| सप्टेंबर १९४१ ते जानेवारी, १९४२ | १७,४०,७९७ |
| सप्टेंबर १९४२ ते जानेवारी, १९४३ | १६,७२,५८० |

### साखरेची हिंदुस्थानांत आयात

| | ( टन ) |
|---|---|
| १९३९-४० | २,५१,७०७ |
| १९४०-४१ | १८,७७८ |
| १९४१-४२ | ४८,६३७ |
| १९४१-४२ ( सप्टेंबर अखेर ६ महिने ) | २२,३७७ |
| १९४२-४३ ( " " " ) | ५६० |

### हिंदी उसाच्या पिकाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| एकूण लागवड १९४२-४३ | ३५,९०,००० | एकर |
| गेल्या वर्षीची लागवड | ३५,१५,००० | एकर |
| वाढ | २% | |
| गुळाचें अपेक्षित उत्पादन | ५६,९२,००० | टन |
| गेल्या वर्षीचें उत्पादन | ४३,७२,००० | टन |
| वाढ | ३०% | |

उसाच्या एकूण लागवडीपैकी ५३% लागवड ( १८ लक्ष, ७९ हजार एकर ) संयुक्त प्रांतांत आहे. त्यानंतर पंजाब ( ११·६% ), बिहार ( १०·५% ), बंगाल ( ७·८% ), व मुंबई ( ३·२% ) असा अनुक्रम येतो.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ९८ | फिल्मची काटकसर—कापूस व्यापारी, गिरणीवाले व शेतकरी | |
| २ सहकारी खरेदी-विक्री | ९९ | ८ प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट ... ... | १०२ |
| ३ मध्यवर्ती करांची चर्चा | १०० | ९ कर्जांचा बोजा हलका करण्याची योजना | १०३ |
| ४ खरे सहकारी पुढारी हवेत | १०० | १० महाबळेश्वर मार्केटिंग ... सोसायटी ... ... | १०३ |
| ५ ग्रामसेवकांचा शिक्षणवर्ग | १०० | ११ " अधिक धान्य पिकवा " मोहीम ... | १०३ |
| ६ गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्म ... ... | १०० | | |
| ७ स्फुट-विचार ... | १०१ | | |
| बॉल्शेव्हिकांचा बागुलबोवा-युद्धपरिस्थिति आणि सहकारी स्टोअर्स—सहकारी संस्थांचा नोकरवर्ग—कच्चा | | | |



# अर्थ

बुधवार, ता. ३१ मार्च, १९४३


## सहकारी खरेदी-विक्री

कामकरी व पांढरपेशा लोकांनीं त्यांस आवश्यक असलेल्या नित्याच्या उपयोगाच्या जिनसा विकत घेणें, शेतकरी व कारागीर ह्यांनीं स्वतः तयार केलेला माल विकणें आणि स्वतः-च्या जरूरीचे पदार्थ खरेदी करणें ह्यांचें संघटन स्वतंत्र रीतीनें सहकारी तत्त्वावर व पद्धतीनें करण्यांत येतें. इंग्लंडसारख्या पाश्चात्य देशांत सहकारी माल खरेदीचें प्रमाण कामकरी वर्गांत फार मोठें व वाढतें आहे. डेन्मार्कसारख्या देशांत शेतीच्या मालाची विक्री व शेतीस लागणाऱ्या साधनांची खरेदी सहकारी घटनेस अनुसरून चालते. सहकारांत असलेल्या संघशक्तीच्या योगानें उत्पादन, खरेदी व विक्री ह्यांच्या व्यवहारांत कार्यक्षमता उत्पन्न होते व खर्चांत बचत होऊन ते किफायतशीर ठरतात. शहरांतील सहकारी दुकानांत विकला जाणारा माल जर तो उत्पन्न करणाऱ्या संस्थांकडून घेतला जाईल तर खरेदी-विक्रीची सहकारी साखळी पूर्ण होईल. परंतु शेतकरी व सहकारी संस्था आपला माल उघड्या बाजारांत विकत घेण्यांत आणि शहरी सहकारी दुकानें विकावयाचा माल फार थोड्या प्रमाणांत त्यांचे-कडून खरेदी करण्यांत, पाश्चात्य देशांतहि ह्या दोहोंचा दुवा जुळलेला नाहीं.

हिंदुस्थानांत सहकारी खरेदी-विक्रीच्या प्रयत्नास अलीकडेच महत्त्व प्राप्त झालें असून त्यांचें क्षेत्र अजून अत्यंत मर्यादित आहे. फारच थोड्या मोठ्या कारखान्यांत कामधंद्याच्या उपयोगासाठी मालविक्रीचे स्टोअर्स काढण्यांत आले असून त्यांस कारखानदारांचें प्रोत्साहन व सहाय मिळत आहे. पगारदार व सरकारी व इतर नोकरांनीं चालवलेल्या दुकानांस युद्धपरिस्थिती-तली टंचाई आणि महागाई ह्यांचे योगानें उत्तेजन मिळालें आहे. परंतु ही नैमित्तिक गरज संपतांच ह्यांपैकीं किती संस्था शिल्लक रहातील हें पहाणें आहे. मद्रास येथील ट्रिप्लिकेन सोसायटी ही मालाच्या विक्रीची जुनी व प्रसिद्ध संस्था आहे. तिनें स्वतःस लागणारा माल घाऊक व्यापाऱ्यांकडून घेण्याचे ऐवजीं शेतकऱ्यां-कडून व त्यांच्या मालविक्री सोसायट्यांकडून घेण्याचे प्रयत्न केले आहेत. शेतीच्या मालाच्या विक्रीकरितां सोसायट्या बहुतेक प्रांतांत काढण्यांत आल्या आहेत आणि त्यांचा विस्तार केला जात आहे. मुंबई प्रांतांत कपाशीच्या विक्रीच्या संस्था चांगल्या रीतीनें चालल्या आहेत. गूळ, मिरची, फळें वगैरे मालाच्या विक्रीची व्यवस्था ह्या रीतीनें होत आहे. पंजाबमध्यें गहूं, संयुक्त प्रांतांत तूप, बिहारमध्यें ऊंस ह्यांच्या विक्रीच्या सोसायट्या महत्त्वाच्या आहेत. मद्रास प्रांतांत गेल्या चारपांच वर्षांत असल्या संस्थांचा मोठा विस्तार झाला आहे आणि त्यांचे मार्फत तांदूळ, तूप, लोणी, गूळ, बटाटे, आंबे, अंडीं इत्यादि जिन्नस विकले जात आहेत. १९४०-४१ सालीं ह्या सर्व संस्थांची मिळून एकूण विक्री पावणे दोन कोटि रुपयांची झाली. पण ह्या संस्थांची विक्री आणि सहकारी स्टोअर्सची खरेदी ह्यांची वर सुचविल्याप्रमाणें, सांगड बसलेली नसल्यानें, सहकारी खरेदी व विक्री बहुतांशीं सहकारी क्षेत्राच्या बाहेर होते. मद्रास प्रांतांत कित्येक जिल्ह्यांतून घाऊक खरेदी-विक्रीच्या सहकारी सोसायट्या निघाल्या आहेत आणि शहरांतील स्टोअर्सनीं त्यांचेकडून माल घ्यावा अशी अपेक्षा आहे. पण ह्यांचे दरम्यान व्हावें तसें सहकार्य होत नाहीं, ह्यामुळें मध्यवर्ती संस्थांस आपल्या स्वतः-च्या मर्यादेचे बाहेर जाऊन व्यवहार करणें प्राप्त होतें.

मुंबईमध्यें मध्यवर्ती मालविक्रीची सोसायटीची स्थापना झाली असून तिचा उद्देश प्रांतांतील सहकारी संस्थांच्या मालाची विक्री आणि त्यांचेसाठी मालाची खरेदी करणें हा आहे. तिचें कार्य यशस्वी होण्यास प्रांतांत मालविक्रीच्या संस्थांची संख्या वाढली पाहिजे आणि त्यांनीं ह्या मध्यवर्ती सोसायटीच्या सवलतीचा फायदा घेणें जरूर आहे. मद्रासच्या प्रांतिक सोसायटीस परस्पर सहायाचा अभाव, अंतर्गत स्पर्धा इत्यादि अडचणी भासत आहेत. परस्परविरुद्ध हितसंबंधांचा मेळ, सभासदांची निष्ठा, प्रामाणिकपणाचा कारभार, माहितगाराचे व्यवहार इत्यादि गोष्टींचें स्टोअर्स व खरेदी-विक्रीच्या संस्था ह्यांचेमध्यें विशेष अगत्य असते. त्यांच्या मार्गांत ह्याविषयींचे अडथळे येतात, त्यांची बारकाईनें चौकशी होऊन ते दूर करण्याचा प्रयत्न कसोशीनें व्हावयास हवा आहे. ह्या कामीं सरकारनें द्रव्यसहाय देऊन खरेदी-विक्रीच्या संस्था भक्कम पायावर उभ्या राहतील अशी व्यवस्था करणें जरूर आहे. असल्या संस्थांच्या कारभाराचें शिक्षण देण्याची तजवीज मुंबईची प्रांतिक इंस्टिट्यूट करीत आहे. एकंदरीनें सहकारी संघटनाच्या खरेदीविक्रीच्या विभागाकडे अधिक आस्थेनें व तत्परतेनें पहाण्याची आवश्यकता आहे. प्रस्तुत बाबतींत अपयशाचे व निराशेचे अनुभव निरनिराळ्या प्रांतांत आले आहेत, त्यांपासून बोध घेतला जाऊन मुंबईंत चिकाटीचा प्रयत्न होईल अशी आम्हांस आशा आहे.

### मद्रास टेलिफोन कंपनी

वरील कंपनीची व्यवस्था १ एप्रिलपासून हिंदुस्थान सरकारनें आपल्या स्वतःकडे घेतली आहे.

### आगपेटीची किंमत

पन्नास ते साठ काड्या असलेल्या आगपेटीची कमाल किंमत प्रत्येकी ८ पै होती ती हिंदुस्थान सरकारनें २० मार्चपासून ९ पै निश्चित केली आहे.

## मध्यवर्ती करांची चर्चा

तंबाखू व वनस्पतीचें तूप त्या दोन जिनसांवर कर बसवण्याचें हिंदुस्थान सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं ठरवलें होतें त्याप्रमाणें त्या करांची बिलें असेंब्लीपुढें मंजूरीसाठी मांडण्यांत आलीं होतीं. देशी तंबाखूवरील कर गरीब लोकांस जाचक होणार आहे ह्या अर्थाची टीका त्यावर झाली होती. परंतु तो तंबाखू पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर पडणार नाहीं असें सर जेरेमी रेस्मन यांनीं आश्वासन दिलें आणि अखेर बऱ्याच चर्चेनंतर त्यासंबंधांतील बिल मंजूर झालें. वनस्पतीपासून तयार केलेल्या तुपावर दर हंड्रेडवेटास ७ रुपये ह्याप्रमाणें पट्टी बसवून तीपासून सुमारें दीड कोटी रुपये उत्पन्न काढण्याचें फडणविसांनीं ठरवलें होतें. एका काळीं कृत्रिम तुपाविषयीं जनतेच्या मनांत आढी होती ती अलीकडे दूर झाली असून हा पदार्थ वाढत्या प्रमाणांत गोरगरीब लोकांच्या उपयोगांत येत असल्यानें त्या खाद्यपदार्थावर कर बसवणें योग्य नाहीं असें लोकनियुक्त सभासदांचें म्हणणें होतें. सर जेरेमी ह्यांचा युक्तिवाद असा होता कीं, वनस्पतिजन्य तेलाची आयात अलीकडे पूर्णपणें बंद झाली असून त्याचें हिंदुस्थानांतील उत्पन्न दर वर्षास एक लक्ष टनांपर्यंत गेलें आहे आणि तें आणखी वाढण्यास पुष्कळ वाव आहे. तथापि, ह्या पदार्थाची किंमत इतकी वर गेली आहे कीं, त्यावर बसवण्यांत येणारा कर पुष्कळ अंशीं उत्पादकांच्या नफ्यांतून घ्यावा लागेल. ह्यासंबंधांत असा मुद्दा पुढें मांडण्यांत आला कीं कृत्रिम तूप बनवणारे कारखानदारांचा धंदा इतका संघटित झाला आहे कीं, स्वतःवर बसलेला कर ते यशस्वी रीतीनें गिऱ्हाइकांवर ढकलूं शकतील. ह्यावर फडणवीस थोडेसे विरघळले आणि दर हंड्रेडवेटास ७ रुपयांचे ऐवजीं ५ रुपये ह्या दरानें कृत्रिम तुपावरील पट्टी आकारण्याची तयारी त्यांनीं दर्शवली. तिच्या बिलांत जरूर ती दुरुस्ती सुचवण्यांत आली आणि ती असेंब्लीनें मान्य केली. ह्या रीतीनें सभासदांच्या टीकेचा उपयोग होऊन सरकारी तिजोरीचें उत्पन्न ४० लक्ष रुपयांनीं कमी झालें, पण लोकांवरील कराचा बोजा त्या रकमेनें हलका झाला.

## खरे सहकारी पुढारी हवेत

"आपण व्यवहारकुशल माणसांच्या हातांत धंदा देतों, बँकिंगची चांगली प्रत्यक्ष माहिती असणारांस बँकेचे व्यवस्थापक नेमतों, सैन्याचा ताबा कसलेल्या सेनापतीस देतों आणि परराष्ट्रांच्या राजकारणांत मुरलेल्या मुत्सद्यांस आपण दुसऱ्या देशांत आपले वकील म्हणून पाठवतों. त्याचप्रमाणें सहकारी संघटनाच्या कार्यावर अनुभवी, खऱ्याखुऱ्या हाडाच्या सहकारी कार्यकर्त्यांची योजना झाली पाहिजे. आपण असें केलें तरच सहकारी चळवळ स्वतंत्र राहील व इष्ट फलदायी होईल. अधिकारी वृत्तीनें व हुकमी पद्धतीनें ती चालल्यास—मग ह्या वृत्तीचा उगम मध्यवर्ती असो किंवा स्थानिक असो—सहकारी कार्याच्या स्फूर्तीचा झरा आटून जाईल आणि त्याच्यामधील सर्व स्वारस्य नष्ट होईल."—चीनमधील औद्योगिक सहकारी संघटनाविषयींच्या अमेरिकन समितीच्या अध्यक्षांचें निवेदन.

## ग्रामसेवकांचा शिक्षणवर्ग

खेडेगांवांतून ग्रामसुधारणेचें काम करण्यासाठी रूरल असिस्टंट तयार करण्याच्या सरकारी योजनेस अनुसरून रूरल असिस्टंटांच्या तिसऱ्या तुकडीच्या अभ्यासक्रमास १ मे १९४३ रोजीं प्रारंभ होईल. धुळें, मांजरी, देविहोसूर, बोर्डी, भडोच व राजापूर येथील शिक्षण केंद्रांत अनुक्रमें ३०, ४३, ३२, ३०, ३५ व १० असे उमेदवार घेण्यांत येतील. अहमदनगर, सातारा, सोलापूर, पुणें व बेळगांव ( मराठी ) जिल्ह्यांतील उमेदवारांसाठीं मांजरी हें केंद्र आहे. पूर्व व पश्चिम खानदेश आणि नाशिक ह्या जिल्ह्यांतील उमेदवार धुळ्यास जातील. बेळगांव ( कन्नड ), विजापूर, धारवाड व कानडा ह्या जिल्ह्यांतील उमेदवारांचें शिक्षण देविहोसूर येथें होईल. ठाणें, कुलाबा, मुंबई उपनगर व रत्नागिरी जिल्ह्यांतील उमेदवारांची व्यवस्था बोर्डी येथें होईल. व भडोच हें केंद्र अहमदाबाद, खेडा, भडोच, पंचमहाल येथील उमेदवारासाठीं असून राजापूर येथील केंद्रांत सुरत राजापूर शेतकी शाळेचें दुसरें वर्ष पुरें झालेले उमेदवार दाखल केले जातील.

उमेदवाराचें वय १८ ते ३५ असलें पाहिजे. सेवाधर्मानें खेडेगांवांसाठी काम करण्याची त्यांची तयारी पाहिजे व शरीरानें ते। कणखर पाहिजेत. खेडेगांवांत रहाणाऱ्या व शेतकऱ्यांच्यापैकी उमेदवारांस प्राधान्य मिळेल. स्थानिक भाषेची शेवटची परीक्षा, शेतकीची व्हरनॅक्युलर परीक्षा अथवा इंग्रजी पांचवी इतकें तरी उमेदवारांचें शिक्षण झालेलें असावें. अभ्यासक्रमाच्या वर्षाच्या मुदतींत उमेदवारांस जेवणाच्या व इतर वैयक्तिक खर्चासाठी दरमहा २० रुपये मिळतात. रहाण्याची सोय फुकट केली जाते. शिक्षणक्रम पुरा झाल्यावर सरकारची किमान पांच वर्षें नोकरी करण्याची जबाबदारी उमेदवारांवर आहे. वर्गांत दाखल होऊं इच्छिणारांनीं आपआपल्या जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांकडून अधिक माहिती मागवावी.

## गिलिगन कॅटल ब्रिडिंग फार्म पिंपळे

( लि. आ. म. )

गेल्या फेब्रुवारी महिन्यांत गिलिगन कॅटल ब्रिडिंग फार्म, पिंपळें येथें पूर्वखानदेश जिल्ह्यांतील व परजिल्ह्यांतील २६९ शेतकरी जाऊन त्यांनीं फार्म पाहून शेती, जनावरें, पोल्ट्री, डेअरी, कॅटल, याविषयीं माहिती घेतली. तसेंच इतर सभ्य गृहस्थ, जळगांव येथील कन्याशाळेचा शिक्षक वर्ग, विद्यार्थिनी व धुळें येथील गव्हर्नमेंट पोल्ट्री फार्मचे विद्यार्थी फार्म पाहून गेले.

प्रोफेसर व्ही. जी. काळे, एम्. ए., प्रॉव्हिंशियल रुरल डेव्हलप्मेन्ट बोर्ड मेंबर पुणें, श्री. एम्. एम्. धारखान, बी. ए., एल्एल्.बी., अडव्होकेट, मुंबई यांनींहि भेटी दिल्या.

फार्मांस तेथील निरनिराळ्या ॲक्टिव्हिटीजकरितां १४१० रु. फेब्रुवारी महिन्यांत खर्च आला.

## ब्रिटिश पोस्ट ऑफिसाच्या कार्याचा व्याप

ब्रिटिश पोस्ट ऑफिस दररोज सव्वादोन कोटि तिकिटें विकतें. वर्षाकाठीं सहाशें कोटि पत्रें जमा करून तीं वाटतें. पोस्ट ऑफिसच्या सेव्हिंग बँकेंत दीड कोटींच्यावर नागरिकांचीं खातीं आहेत आणि त्यांत १,२०० कोटि रुपये शिल्लक आहेत.

# स्फुट विचार

## बॉल्शेव्हिकांचा बागुलबोवा

जर्मन नात्सींनीं युरोपच्या संरक्षणाचा मक्ता स्वतःकडे घेतला असून त्यांच्या प्रचारांत आपण युरोपांतील लहानमोठ्या राष्ट्रांचा रशियन बॉल्शेव्हिकांच्या धाडीपासून बचाव करीत आहों असा त्यांनीं बहाणा चालवला आहे. हिट्लरनें नुकतेंच एक भाषण जर्मन जनतेस उद्देशून केलें, त्यांत हीच भूमिका स्वीकारण्यांत आली होती. बॉल्शेव्हिकांनीं पूर्वेकडील आघाडीवर अतुल पराक्रम करून जर्मन सैन्यांस जेरीस आणलें आहे ह्यावरून युरोपच्या स्वातंत्र्याचा बळी घेण्यासाठी त्यांनीं केवढी प्रचंड तयारी केली होती ह्याची खात्री पटते असें म्हणून नात्सी पक्ष दहा वर्षांमागें जर्मनींत जन्मास आला नसता तर आज युरोपाचें स्वातंत्र्य व संस्कृति ह्यांचा नायनाट झाला असता अशा अर्थाचें जर्मन लुटारूपणाचें समर्थन त्यानें केलें. स्वतःस आलेल्या अपयशाची सारवासारव करून निराश बनलेल्या जर्मन जनतेच्या मनांत हुरूप उत्पन्न करण्याचा हिटलरचा हा प्रयत्न आहे हें उघड आहे. रशियांत मित्रराष्ट्रें ह्यांचे संबंधानें गैरसमज पसरवण्याची आणि त्यांचेमध्यें वितुष्ट निर्माण करण्याची ही सर्व खटपट आहे. तिचे योगानें जर्मन जनतेची दिशाभूल करणें कांहीं काळपर्यंत नात्सींस शक्य झालें तरी युरोपांतलीं लहानमोठीं राष्ट्रें त्यांच्या कांगाव्यानें फसणार नाहींत.

## युद्धपरिस्थिति आणि सहकारी स्टोअर्स

नित्याच्या जीवनास आवश्यक असलेले खाद्यपदार्थ निश्चयानें स्वस्त मिळावे म्हणून जाणत्या लोकांनीं युद्धपरिस्थितींत सहकारी संघटनेचा आश्रय घरून स्टोअर्स स्थापावे हें स्वाभाविक आहे. ही प्रवृत्ति सर्व प्रांतांत आढळते पण मद्रासमध्यें सहकारी स्टोअर्सची घटना अगोदरच लोकांच्या सामान्य परिचयाची असल्यानें तेथें स्टोअर्सची वाढ जोरानें झाली आहे. युद्धापूर्वी मद्रास प्रांतांत एकूण ८५ सहकारी स्टोअर्स होते आणि त्यांची वार्षिक विक्री सुमारें २५ लक्ष रुपयांची होती. १९४१ च्या जून अखेरचे हे आकडे अनुक्रमेंकरून ३०० व ६२ लक्ष असे झाले आहेत. गेल्या वर्षीं ह्या आकड्यांत आणखी झपाट्यानें वाढ झालेली आहे. निकडीची गरज भागविण्यासाठी करण्यांत आलेली तात्पुरती व्यवस्था, असेंच ह्या वाढीचें स्वरूप आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. मद्रासच्या ट्रिप्लिकेन स्टोअरच्या त्या शहरांत ११ शाखा आहेत आणि लोकांच्या त्याशिवाय मागणीस अनुसरून ६० नवीन डेपो चालू करण्यांत आले. शत्रूच्या हल्ल्यांची भीति मध्यंतरीं मद्रास येथें उत्पन्न झाली होती तेव्हां त्या शहरांत खाद्यपदार्थांची सवलत व पुरवठा हीं अगत्याचीं होऊन त्यासंबंधांत व्यवस्था करण्यास प्रांतिक सरकारनें ट्रिप्लिकेन स्टोअरला उत्तेजन व द्रव्यसहाय्य दिलें आहे. ह्या स्टोअर्सच्या व्यवहारांचा फायदा त्याच्या सात हजार सभासदांस मिळतो, तो आतां इतरांस म्हणजे सभासद नसलेल्या लोकांसहि मिळत आहे. युद्धकाळांतली ही विशिष्ट घटना किती प्रमाणांत दृढमूल होते हें सांगतां येत नाहीं. आजच्या अग्रलेखांत आम्हीं म्हटल्याप्रमाणें खेडेगांवांतील उत्पादकांच्या सहकारी सोसायट्या व शहरांतील सहकारी स्टोअर्स यांची सांगड घालण्याचा प्रश्न अद्याप समाधानकारक रीतीनें सुटावयाचा आहे.

## सहकारी संस्थांचा नोकर वर्ग

सर्व सार्वजनिक संस्थांत जेथें जेथें अनेक नोकर स्थिर कामावर असतात तेथें ह्या लोकांच्या लायकीच्या मर्यादा, पगार, बढती, प्राव्हिडंट फंड, रजा इत्यादि बाबतींत नियमबद्धता असणें आवश्यक होतें. नोकरांस आपल्या जागेची शाश्वती वाटावी आणि स्वतःच्या कुटुंबाची तरतूद करतां यावी अशी व्यवस्था असली म्हणजे तें संस्था व नोकर ह्या दोहोंसहि हितावह व सोयीचें असतें. सहकारी संस्थांत ह्या प्रकारची सर्वांगीण योजना अंमलांत येण्यासंबंधांत कित्येक वर्षे चर्चा चालू आहे. कित्येक सहकारी बँकांत असली व्यवस्था अगोदरच चालू आहे. तथापि अशा संस्थांची संख्या अल्प असून सहकारी खात्यानें नियम करून ठराविक पद्धतीनें ते स्वीकारण्याची सार्वत्रिक सक्ती करावी किंवा काय असा प्रश्न उपस्थित झाला. मुंबई येथें दोन वर्षांमागें अखिलभारतीय दोन संघांच्या संयुक्त समितीची सभा भरली होती तेव्हां ह्या विषयाची सांगोपांग चर्चा झाली. आपल्या नोकरवर्गाचें आर्थिक हित व कार्यक्षमता ह्यांची काळजी घेणें सहकारी संस्थांचें कर्तव्य आहे, तें त्यांनीं सढळ हातांनीं पार पाडलें पाहिजे ह्या संबंधांत मतभेद नव्हता. परंतु ह्या कामीं सहकारी खात्यानें केलेल्या नियमांची सक्ती असूं नये असें बहुमत पडलें. मद्रासच्या सहकारी समितीनें अशी सूचना केली होती कीं नोकरवर्गासंबंधाच्या व्यवस्थेस नियमांचें स्वरूप देण्यांत यावें आणि हे पोटनियम सर्व मोठ्या संस्थांवर सक्तीनें लादण्यांत यावे. तथापि, त्या प्रांताच्या रजिस्ट्रारनीं विशिष्ट पोट नियम तयार करून ते संस्थांनीं स्वीकारावे अशी शिफारस केली आहे. त्या नियमांच्या योग्यायोग्यतेची छाननी करून ते सहकारी संस्थांनीं स्वीकारण्यास हरकत नाहीं. संस्थांच्या सांपत्तिक स्थितीशीं ते जुळते असले पाहिजेत हें उघड आहे.

## कच्च्या फिल्मची काटकसर

कच्च्या फिल्ममध्यें बचत करण्याचे हेतूनें ब्रिटिश सरकारनें एक नवीन हुकूम काढला आहे. त्या अन्वयें ग्रेट ब्रिटनमध्यें १९४२ सालीं जेवढी फिल्म खर्चीं पडली, त्याच्या तीन चतुर्थांशाइतकीच फिल्म १९४३ मध्यें वापरतां येईल. ह्या योजनेमुळें तयार होणाऱ्या चित्रपटांची संख्या कमी होण्याचें कारण नाहीं; प्रत्येक चित्रपटाच्या प्रती मात्र पूर्वीपेक्षा कमी काढाव्या लागतील. प्रत्येक चित्रपटची प्रत्येक प्रत सध्यापेक्षा अधिक दिवस दाखवावी लागेल, एवढाच त्याचा परिणाम होईल. सिनेमा प्रेक्षकांची चित्रपटांचे अभावीं कुचंबणा होणार नाहीं. ज्यास्त प्रती प्रत्येकी थोडे दिवस दाखविण्याऐवजी कमी प्रतींकडूनच तेवढें काम करून घेण्यांत येईल, असा त्याचा अर्थ आहे. १९४२ चे आरंभीं ब्रिटिश सरकारनें तेथील फिल्म कंपन्यांना कच्ची फिल्म कमी वापरण्याविषयीं विनंति केली होती; आतां त्यासंबंधांत सरकारी हुकूमच निघालेला आहे. हिंदी कंपन्यांवरहि फिल्मची काटकसर करण्याची सक्ती करण्यांत आलेली असून कोणत्याहि हिंदी फिल्मची लांबी ११ हजार फुटांपेक्षा ज्यास्त भरतां कामा नये असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें असल्याचें वाचकांस स्मरत असेलच. विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या चित्रपटांची लांबी फारच जास्त, कधी कधी १५१ हजार फुटांहूनहि अधिक असे. १९४१ सालीं दाखविण्यांत आलेल्या ४२ हिंदी

चित्रपटांच्या टॉकीची सरासरी १२½ हजार फुटांपेक्षा थोडी अधिक भरली. हिंदी चित्रपट कंपन्यांना ११ हजार फुटांची मर्यादा संभाळूनहि चित्रपट काढण्यास पुरेशी कच्ची फिल्म मिळणें अवघड पडूं लागलें आहे.

---

### कापूस व्यापारी, गिरणीवाले व शेतकरी

मुंबईच्या कापूस बाजारांत, समाजहितास विघातक अशा रीतीनें व्यापाऱ्यांनीं सट्टेबाजी चालवली असल्याचा आरोप सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं केल्यापासून ह्या विषयाबाबत वृत्तपत्रांत अभिप्राय व्यक्त झाले आहेत, त्यावरून असें दिसून येतें कीं कापड व सूत ह्यांच्या किंमती भडकल्यामुळें गिरणीवाल्यांस झालेल्या भलत्या नफ्याविरुद्ध व्यापाऱ्यांचा कटाक्ष असून मागणी–पुरवठ्याच्या परिस्थितीच्या दृष्टीनें कापसाची चढलेली किंमत यथायोग्य आहे आणि तिचा फायदा शेतकरी वर्गास मिळणें उचित आहे असें त्यांचें म्हणणें आहे. सुताची व कापडाची किंमत भरमसाट वाढली तरी कापसाचा भाव त्या मानानें चढूं नये आणि कपास पिकविणाऱ्या शेतकऱ्यास त्याच्या पिकास येणाऱ्या वाढत्या मागणीच्या प्रमाणांत, अधिक पैसा कां मिळूं नये, असा त्यांचा सवाल आहे. आपणांस होणाऱ्या नफ्याचा फार मोठा भाग करांच्या मार्गानें सरकारी तिजोरींत जातो आणि कापसाचे भाव लाणखी वर गेल्यास सूत व कापड यांच्या किंमती अधिक चढतील, आणि गोरगरीब जनतेची कुचंबणा होईल असें त्यावर गिरणीवाल्यांचें म्हणणें आहे. कापसाचे सट्टे करणारांची शेतकरी वर्गाविषयींची सहानुभूति नुसती दिखाऊ आहे असें म्हणण्यापर्यंत कांहीं लेखकांची मजल गेली आहे. मागणी–पुरवठ्याच्या दृष्टीनें शेतकऱ्यांस कपाशीची किंमत अधिक आली तर तें इष्टच आहे. महर्गतेचा फायदा इतर उत्पादकाप्रमाणें कपास पिकवणारांस कां मिळूं नये ? पण सट्टे बाजारांत कापसाच्या किंमती खंडीमागें शंभर रुपयांनीं एका पंधरवाड्यांत खालीं वर होतात आणि त्याबाबतींत सरकारच्या फडणविसांस गंभीर इषारा द्यावा लागतो ही घटना स्वाभाविकच समजावयाची काय ?

---

### पंजाब सरकारचें कर्ज

पंजाब प्रांताच्या सरकारास ३७ कोटि रुपयांचें कर्ज आहे, पण त्यानें उपयुक्त व फायदेशीर कामांत गुंतवलेलें भांडवल ४५ कोटि रुपये आहे.

### चेक्सची देवघेव

बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १८ मार्चअखेर. संपलेल्या आठवड्यांत ३८ कोटि, ३७ लक्ष रुपये किंमतीच्या १,२०,०८२ चेक्सची देवघेव झाली.

### जर्मन विमानांचें उत्पादन

गेल्या वर्षांत जर्मनींतील विमानांचें उत्पादन घटलें असून मासिक ३ हजारांवरून ते २ हजारांवर आलें आहे असें स्टॉकहोमहून न्यूयॉर्कला एका इंजिनिअरनें पाठविलेल्या संदेशांत म्हटलें आहे.

### जनन आणि मृत्यु

इंग्लंड आणि वेल्समध्यें १९४२ सालीं जेवढे जन्म झाले तेवढे गेल्या दहा वर्षांत कोणत्याच वर्षीं झाले नव्हते. मृत्यूंचें प्रमाण, हवाई हल्ल्यांतील मृत्यू धरूनहि आतांपर्यंतच्या कोणत्याहि वर्षापेक्षां फक्त एक वर्ष वगळून कमीच आहे.

## प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, मुंबई

प्रॉ.को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें मुंबईंतील कंझूमर्स सोसायट्या व बाइंग क्लब यांची एक सभा मुंबई येथें ता. २० मार्च १९४३ रोजीं दिवाण बहादूर काजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यास सुमारें ४० प्रतिनिधी हजर होते.

अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितलें कीं, मुंबई शिक्षण कमिटीच्या विद्यमानें सर्व कंझूमर्स सोसायट्यांची एक परिषद् भरविण्याचें ठरलें होतें, त्यामध्यें मुख्यतः सध्याच्या सरकारी अन्न नियंत्रण योजनेमध्यें वरील सहकारी संस्थांना कोणतें स्थान देण्यांत यावें याबद्दल चर्चा करणें हाच मुख्य विषय होता. परंतु मागाहून जे सरकारी खुलासे प्रसिद्ध झाले त्यांत कंझूमर्स सहकारी सोसायट्यांना अन्न नियंत्रण योजनेमध्यें इतर दुकानांप्रमाणें परवाने देणेचें ठरविण्यांत आलें असल्याचें प्रसिद्ध झाल्यानें वरील परिषदेची आवश्यकता उरली नाहीं. तरी पण सदर सोसायट्यांची एक सभा भरवून तीमध्यें ह्यांच्या कार्याचा आढावा घ्यावा व इतर कांहीं अडचणी असल्यास त्या समजून घ्याव्या ह्या हेतूनें ही सभा भरविण्याचें ठरलें. यानंतर सामान्य चर्चा झाल्यावर कांहीं गोष्टींचा खुलासा करण्यांत आला. तीमध्यें मुख्यतः वरील सोसायट्यांना ५०० सभासदांपर्यंत धान्यपुरवठा करणेंबाबत जें नियंत्रण आहे तें लागू असणार किंवा कसें हा प्रश्न होता. त्यावर आसिस्टंट रजिस्ट्रारनीं नियंत्रण सदर सोसायट्यांना बंधनकारक नसून प्रत्येक सोसायटीनें आपणांस किती लोकांना व्यवस्थितपणें पुरवठा करतां येईल ह्याचा निर्बंध आपणच ठरविणें जास्त श्रेयस्कर होईल असें सांगितलें. अध्यक्षांनीं दुसऱ्या अशाच प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें कीं नियंत्रणाखेरीजच्या इतर धान्यांचे बाबतींत सहकारी सोसायट्यांना इतर दुकानांपेक्षां कमी अगर जास्त सवलती मिळणार नाहींत. सोसायटीच्या प्रतिनिधींनीं मुख्य अशी तक्रार मांडली कीं नियंत्रण नक्की कधींपासून अमलांत येणार त्याची तारीख अद्याप ठरली नाहीं. पण ती ठरेपर्यंतच्या काळांत सोसायट्यांना नेहमीप्रमाणें धान्य विकत घेण्यास जे परवाने लागतात ते देण्याचेंही सरकारनें बंद केलें असल्यानें त्यांची अत्यंत कुचंबणा होत आहे, तरी ह्या सभेनें ह्याबाबत सरकारकडे परवानें देणेचें बंद करून सभासदांची गैरसोय होऊं नये अशी विनंती करावी. यावर असि- रजिस्ट्रारनीं सदर नियंत्रण सोसायट्यांना बंधनकारक नसून प्रत्येक सोसायटीनें असा खुलासा केला कीं कांहीं सभासद दोन दोन तीन तीन ठिकाणांहून धान्य घेत असतात, त्याला आळा घालतां येत नाहीं. शिवाय त्यांच्या पहाण्यांत असेंहि आढळलें कीं कांहीं सोसायट्या धान्य वाटण्याचे कामीं अतिशय पक्षपात करतात, त्यामुळें बऱ्याच सभासदांना धान्य मिळूं शकत नाहीं. याकरितां परवाने देणें सरकारला योग्य वाटत नाहीं. यानंतर सोसायट्यांनीं आपणांस लागणारा सर्व माल प्रॉ. को. मार्केटिंग सोसायटीकडे इंडेंट पाठवून घेत जावा, कारण सदर सोसायटी घाऊक माल पुरविणारी संस्था म्हणून गणली गेली आहे. यामुळें सोसायट्यांचें काम सुलभ होईल.

यानंतर सोसायट्यांनीं किती सभासदांना व विनसभासदांना माल पुरवावा, नियंत्रणाखालील वस्तूंचे हिशेब सुटसुटीतपणें कसे ठेवतां येतील, सोसायट्यांच्या आर्थिक गरजा, नियंत्रणाव्यतिरिक्त इतर जिनसांची एकत्र खरेदी करणें, घाऊक विक्री करणारी ( होलसेल सोसायटी ) वगैरे बाबींची चर्चा करणेकरितां १२ सभासदांची एक पोट कमिटी निवडली व सभेचें काम समाप्त झालें.

## नाशिक जिल्हा

### समासदाकडील थकबाकी कमी होऊन त्यांच्या-कडील कर्जाचा बोजा हलका करण्यासाठी मंजूर झालेली योजना

१. योजनेंतील महत्त्वाचे मुद्दे:—

(अ) नाशिक बँकेच्या क्षेत्रांतील, चालूं असलेल्या अगर रद्द झालेल्या शेतकी पतपेढ्यांपुरतीच ही योजना अंमलांत येईल.

(ब) लवाद हुकुमनाम्यांतील अगर लिक्विडेटरच्या हुकुमांतील रकमेवर व्याज न आकारतां, तें घेतलेल्या मुद्दलापैकीं जी बाकी देणें निघत असेल त्या रकमेवर आकारण्यांत येईल.

(क) व्याजाचा जो दर सोसायटीच्या पोटनियमांत नमूद केलेला असेल त्या दरानेंच व्याज आकारण्यांत येईल.

(ड) दंडाचें व्याज आकारण्यांत येणार नाहीं.

(इ) ज्याअर्थी, या योजनेमध्यें (१) तडजोडीनंतर पुढील व्याज आकारणी बंद व्हावयाची आहे; (२) सोइस्कर ठराविक हप्ते द्यावयाचे आहेत; व (३) शेवटच्या हप्त्यांत, नियमितपणें फेड करणाऱ्यास, ठराविक दरानें सूट द्यावयाची आहे, त्याअर्थी, दामदुपटीबद्दलचीं नेहमीचीं बंधनें पाळण्यांत येणार नाहींत.

(ख) या योजनेंतील सवलती देतांना तगाई कर्ज व साधें कर्ज यांत भेदभाव केला जाणार नाहीं.

२ ज्यांना हप्ते नको आहेत त्यांच्यासाठी मंजूर झालेल्या अटी

(अ) जे कर्जदार व्याजाची सर्व रक्कम फेडूं शकत नाहींत परंतु एकंदर येणें व्याजाच्या २५ टक्के इतकी रक्कम निदान दीड (१॥) वर्षाच्या मुदतीचें व्याज, यांपैकीं जी रक्कम कमी असेल ती, फेडतील त्यांना व्याजांत १० टक्के सूट मिळेल.

(२) जे कर्जदार आपणांकडील सर्व व्याज फेडतील त्यांस व्याजांत ३० टक्के सूट मिळेल, मात्र हें येणें व्याज त्यांच्याकडील असलेल्या मुद्दलबाकी वरील तीन वर्षांच्या व्याजाच्या रकमेपेक्षा कमी असतां कामा नये.

(क) आपणाकडील व्याज मुद्दलासह सर्व बाकी फेडणाऱ्या कर्जदारास येणें असलेल्या व्याजांत ५० टक्के सूट मिळेल.

(ड) कर्जदाराच्या बाबतींत वर दिलेल्या प्रमाणापेक्षां अधिक प्रमाणांत सूट देणें जरूरीचें अथवा योग्य वाटत असेल तर सदरहू कर्जदारांचीं प्रकरणें मे. असिस्टंट रजिस्ट्रार साहेब यांच्या अखेरच्या मंजुरीकरितां पाठविण्यांत येतील.

(इ) चालूं सोसायटींत कर्जफेड करणाऱ्या बाकीदारास, वेळोवेळीं ज्या अटी ठरतील त्या अटींवर, नवीन कर्जे देण्यांत येतील.

(फ) ज्या कर्जदाराच्या बाबतींत बिगरव्याजी ठराविक हप्ते मंजूर केलेले असतील त्यांच्याखेरीज इतर कर्जदारांच्या बाबतींत उरलेल्या मुद्दल रकमेवर सोसायटीच्या पोट-नियमांत नमूद केलेल्या व्याजाच्या दरानें, रक्कम फिटेपर्यंत व्याज आकारण्यांत येईल.

(जी) वरील कलमांत सांगितलेली व्याजांतील सूट ही फक्त थकलेल्या व्याजापुरती मर्यादित राहील. नवीन दिलेल्या कर्जाच्या बाबतींत व्याजांत सूट या योजनेखालीं मिळणार नाहीं.

## महाबळेश्वर फळें व भाजीपाला करणाऱ्या लोकांची मार्केटिंग सोसायटी, लि:

महाबळेश्वर येथील फळें व भाजीपाला करणाऱ्या लोकांच्या मार्केटिंग सोसायटीची पहिली साधारण सभा तेथील म्युनिसिपल हॉलमध्यें मे० सुपरिंटेंडेंटसाहेब खरेदीविक्री संघाचे प्रेसिडेंट मे० एस्. एम्. भरूचा साहेब यांचे अध्यक्षतेखालीं ता. २०-२-४३ शनिवार रोजीं दुपारीं दोन वाजतां भरली होती. सभेस पेठ्याचे महालकरी, संघाचे चेअरमन मे. देशपांडे साहेब, सहकारी खात्यातर्फे सातारा जिल्ह्याचे को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे ऑडीटर व इन्-चार्ज डिस्ट्रिक्ट को-आपरेटिव्ह ऑफिसर मे. एम्. व्ही. पंडित साहेब हे हजर होते. याशिवाय सोसायटीचे रजिस्ट्रेशन प्रपोझल व सह्या करणारे मेंबर्स व इतर बागायतदार मिळून ४०-४५ लोक हजर होते.

अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर मे. रजिस्ट्रारसाहेबांकडून रजिस्टर होऊन आलेलें सोसायटीचें नांव व पोट नियम जमलेल्या लोकांना मे० पंडित साहेब यांनीं मराठीमध्यें समजावून सांगितलें त्यानंतर ते रीतसर मंजूर करण्यांत आले. पुढें पंचकमिटीची नेमणूक, सेक्रेटरीची नेमणूक वगैरे कामें झाल्यानंतर ताजमहाल हॉटेल व एच्. क्लब यांना पुरवावयाच्या स्ट्रॉबेरीचे दर मंजूर करण्यांत आले. शेवटीं सातारा जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाचे, मे० रजिस्ट्रारसाहेब यांचे व सभेचे अध्यक्ष मे. सुपरिंटेंडेंट-साहेब व लोकांचे आभार मानून सभा बरखास्त झाली.

मुंबई सरकारचे ॲडव्हायसर मे. एच्. एफ्. नाइटसाहेब यांच्या सूचनेवरून सातारा जिल्हा रुरल डेव्हलपमेंट बोर्ड व सहकारी खातें यांचेकडून ही सोसायटी स्थापन करण्यास प्रथम चालना मिळाली. लगेच प्रयोगादाखल प्राथमिक मदत म्हणून जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाकडून २०० रु. ग्रँट खरेदीविक्री संघास गतवर्षी मिळाली. येवढ्या प्रोत्साहनावरून संघानें काम सुरू करून २७०० रुपयांच्या वर किंमतीच्या स्ट्रॉबेरीज व भाजीपाला मुंबई, बेळगांव, पुणें वगैरे ठिकाणीं खरेदीदारांना कसोशीनें पुरविला. आतां "महाबळेश्वर येथील फळें व भाजीपाला करणाऱ्या लोकांची मार्केटिंग सोसायटी." या नांवानें सोसायटी रजिस्टर होऊन तिच्यामध्यें संघाचें रूपांतर झालें आहे व यापुढें या नवीन नांवानेंच कामकाज केलें जाईल. केवळ महाबळेश्वर येथें होणाऱ्या स्ट्रॉबेरीजसारखीं फळें मोठमोठ्या गांवीं विकण्याची सोय माणसें किंवा स्टाल्स ठेवून या संस्थेतर्फे होणार असल्यामुळें बागायतदारांना किफायतशीर अशी किंमत मिळवून देऊन खरेदीदारांना सुद्धां योग्य किंमतींत माल मिळणार आहे.

### "अधिक धान्य पिकवा" मोहीम

अधिक धान्य पिकविण्याची मोहीम गेल्या वर्षी सुरू करण्यांत आली, ती त्या वेळेपेक्षांहि अधिक जोरानें ह्या वर्षी चालू ठेवण्यांत येईल. महाराष्ट्रांतील कित्येक जिल्हे अद्याप धान्याचे बाबतींत स्वयंपूर्ण नाहींत. प्रत्येक शहरांत व खेड्यांत सभा भरवून ह्या मोहिमेस प्रारंभ केला जाईल.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत


# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहात पहा.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक

# DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून विनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

## विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशिल माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख ७ एप्रिल १९४३ अंक १४

## दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

फोन नं. ९१४६ टेलिग्रॅम. Bharatbank.

सोमवार, ता. ५ एप्रिल १९४२ रोजीं वर्षप्रतिपदेच सुमुहूर्तावर खोपोली येथें पे-ऑफिस सुरू झालें.

पुणें कॅन्टोन्मेंट येथें बँकेची शाखा लवकरच उघडण्यांत येणार आहे.

ठेवींवरील व्याजाचे दर

| | |
|---|---|
| चालू खातें | ½% |
| सेव्हिंग्ज खातें | २% |
| मुदतीच्या ठेवी | १¾% ते ४½% |

मुदत ६ महिने ते ५ वर्षेपर्यंत.

### शेअर विक्री चालू आहे.

१९४२ अखेर ऑर्डिनरी शेअरवर ३% डिव्हिडंड वांटण्यांत आलें.

आर. बी. साळवेकर, B. A., LL. B.
एन. एन. क्षीरसागर.
मॅ. डायरेक्टर्स.

## महायुद्ध दारांशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

### आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

औषधें मागवा.

### आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बिहार सरकारचें बजेट

बिहार प्रांतिक सरकारच्या १९४३-४४ च्या अंदाजपत्रकांत ६१ लक्ष रुपयांचा वाढावा अपेक्षित आहे.

### भुइमुगाची लागवड

हिंदुस्थानांतील भुइमुगाच्या एकूण लागवडीपैकीं ५५% मद्रास प्रांतांत व मुंबई प्रांतांत २८% आहे. त्यांचे खालीं (१८%) हैद्राबाद संस्थानचा अनुक्रम येतो.

### शत्रु राष्ट्रांच्या व्यापारी जहाजांचा नाश

चालू युद्धाच्या प्रारंभापासून गेल्या महिन्याच्या अखेरपर्यंत-च्या काळांत ९० लक्ष टन वजनाचीं शत्रु राष्ट्रांचीं व्यापारी जहाजें नष्ट करण्यांत आलीं. ह्यांत ३३ लक्ष टन वजनाचीं जर्मन जहाजें होतीं. इटालियन जहाजांचा आकडा ४० लक्ष टन इतका होता. रशियानें नष्ट केलेल्या शत्रूच्या जहाजांचा वरील एकूण आकड्यांत अंतर्भाव केलेला नाहीं.

### नव्वद हजार अमेरिकन लढाऊ विमानें

अमेरिकेचें युद्ध सामुग्रीचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे हें आतां सुप्रसिद्ध आहे. लढाऊ व व्यापारी जहाजें अमेरिकेंत कल्पनेपेक्षाहि अधिक त्वरित बांधण्यांत येत आहेत. लढाऊ विमानांचें अमेरिकेचें उत्पादन चालू सालांत ९० हजारपर्यंत जाणार आहे. उत्पादनाच्या ह्या प्रगती बरोबर लढाऊ सामुग्री-च्या बनावटीचा खर्च कमी होत आला आहे हें विशेष आहे.

### मध्यवर्ती असेंब्ली

हिंदी मध्यवर्ती असेंब्लीचें अंदाजपत्रक अधिवेशन गेल्या आठवड्यांत समाप्त झालें. चालू वर्षी तिची आणखी दोन अधिवेशनें होण्याचा संभव आहे.

### आंतरराष्ट्रीय हुंडणावळीची व्यवस्था

युद्धोत्तर काळांतील आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या व्यवस्थे-बाबतची म्हणजे चलन-हुंडणावळीच्या पद्धतीविषयींची आपली एक योजना अमेरिकन सरकारनें मित्रराष्ट्रांस विचारासाठीं सादर केली आहे.

### हिंदुस्थानची लोकसंख्या

१ मार्च, १९४१ रोजीं घेण्यांत आलेल्या शिरगणतीप्रमाणें हिंदुस्थानची लोकसंख्या ३८,८९,९७,९५५ इतकी आहे. त्यापैकीं २९,५८,०८,७२२ लोक ब्रिटिश हिंदुस्थानांत असून ९,३१,८९,२३३ लोक संस्थानी हद्दींत आहेत.

### इटालियन युद्धकैदी

ब्रिटिशांचे ताब्यांत युद्धकैदी २½ लक्ष इटालियन युद्धकैदी आहेत.

### तिघांत एकजण खातेदार

ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक तीन लोकांपैकीं सरासरी एकाचें पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत खातें आहे. १ कोटि, ६० हजार खातेदारांच्या खात्यांत मिळून ९० कोटि पौंड आहेत.

### हगवणीस बळी

जखमी होऊन मरण पावणाऱ्या चिनी सैनिकांचे दुप्पट चिनी सैनिक मलेरियानिर्मित हगवणीस बळी पडतात.

### पोस्टाचे नवे दर

एप्रिलच्या १ तारखेपासून पोस्टानें खालील नवे दर अंमलांत आणले आहेत.—

पाकिटें:—१ तोळ्यापर्यंत १ आ. ३ पै, पुढें प्रत्येक तोळ्यास आणखी १ आ.

पार्सलें:—४० तोळ्यापर्यंत ६ आ., पुढें प्रत्येक ४० तोळ्यास आणखी ४ आ.

### ट्रेझर बिलांवर १ रु. १ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि, ६३½ लक्ष रुपयांची ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ११ पै इतका पडला.

### हिंदी कपाशीची निर्गत

४०० पौंडांच्या गांठी (हजारांचे आकडे)

| | |
|---|---|
| १९३७–३८ | २०,५३ |
| १९३८–३९ | ३२,७४ |
| १९३९–४० | २३,४० |
| १९४०–४१ | २०,१३ |
| १९४१–४२ | ८७३ |

### नवी स्टँडर्ड टाइम चालू रहाणार

नवी स्टँडर्ड टाइम उन्हाळ्यांत दिवस लांबल्यामुळें तात्पुरती बंद होऊन जुनी स्टँडर्ड टाइम पुन्हां चालू होईल असें वाटत होतें. परंतु हिंदुस्थान सरकारनें दीर्घ विचारांतीं युद्ध चालू आहे-पर्यंत हा बदल करावयाचा नाहीं, नवी स्टँडर्ड टाइम आहे तशीच चालू ठेवण्याचें ठरवलें आहे. ह्या टाइममुळें वीज, कोळसा व रेल्वे वहातुक ह्यांमध्यें बचत होते असें ह्या निश्चयाचें कारण सांगण्यांत आलें आहे. लांबलेल्या दिवसामुळें देशाच्या कांहीं भागांत विशेष गैरसोय होईल, तेथें ऑफिसच्या वगैरे कामाच्या वेळांत जरूर तो योग्य बदल केला असतां कार्यभाग होईल असेंहि सुचवण्यांत आलें आहे.

**युद्धजन्य परिस्थितींत सुद्धां**

**वेस्टर्न इंडियानें**

सन १९४२ मध्यें पाऊण कोटीच्यावर विम्याचें काम पूर्ण केलें असून गेल्या वर्षापेक्षा नवीन कामांत सात लाखांची वाढ आहे. सेवा आणि सवलती यांच्या बळावर मिळविलेल्या लोकप्रियतेचें हें दृश्य फळ आहे. आपणहि ह्या कंपनीचे एक विमेदार होऊन तिजकडून मिळणाऱ्या लाभाचे आणि संरक्षणाचे वाटेकरी व्हा. अधिक माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

**वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड सातारा.**

**पुणें शाखा-१७१ बुधवार, लक्ष्मी रोड, पुणें १.**

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १०६ | ६ स्फुट विचार ... | १०९ |
| २ सक्तीच्या बचतीची योजना. ... | १०७ | दूरल डे. बोर्डाची सभा—धान्यें, कपास व कापड—बोनस शेअर—ट्युनिशिया—औंध स्टेट बँ. अँड इं. कं. | |
| ३ ग्रेट ब्रिटनचा निर्गत व्यापार. ... | १०८ | ७ औंध स्टेट बँकिंग अँड इं. कं. ... | १११ |
| ४ कंपनी कायद्याचें १५३ वें कलम ... | १०८ | | |
| ५ सरकारचें शेतकऱ्यांस आश्वासन ... | १०८ | | |



# अर्थ

बुधवार, ता. ७ एप्रिल, १९४३


## सक्तीच्या बचतीची योजना

ब्रिटिश सरकारच्या वतीनें ह्या देशांत हिंदुस्थान सरकार खर्च करतें. त्यासाठी नोटांच्या स्वरूपांतील चलनाचा सारखा विस्तार चालू आहे. युद्धपरिस्थितीमुळें अधिक चलन सरकारास प्रचलित करावेंच लागतें व त्यांत वरील सरकारी खर्चाची भर पडते. ह्या चलनवृद्धीचा परिणाम बाजारभावांचें मान वाढण्यांत होत आहे आणि ह्या रीतीनें उत्पन्न होणाऱ्या महर्गतेमुळें देशाच्या आर्थिक घटनेंत विस्कळितपणा निर्माण होऊन सरकार, उत्पादक व जनता ह्यांच्या मार्गांत अडचणी येत आहेत. ह्या परिस्थितीची जाणीव सरकारास आहे, पण तीवर आतांपर्यंत परिणामकारक योजना अंमलांत आणण्यांत आलेली नाहीं. वर वर्णिल्याप्रमाणें लोकांच्या हातांत जाणारें व व्यवहारांत खेळणारें चलन मामुली, रोजच्या देवघेवीस आवश्यक नाहीं, तरीहि पदार्थांचा अपुरा असलेला पुरवठा हस्तगत होण्याच्या खटपटींत त्याचा उपयोग केला जातो आणि त्या योगानें महागाई वाढते. जनतेच्या हातांतली माल विकत घेण्याची चलनाच्या स्वरूपांतली शक्ति मर्यादित होईल तरच पैसा आणि माल ह्यांचें परस्पर प्रमाण स्थिर राहून बाजार भावांत सारख्या होणाऱ्या चढीस आळा बसेल. चलन शोषून घेण्याचीं दोन साधनें सरकारच्या हातीं असतात आणि तीं कर व कर्ज हीं होत. लोकांच्या मिळकतीमधून व बचतींतून ह्या दोन मार्गांनीं सरकारनें पैसा स्वतःकडे खेचून घेतल्यास समाजांत विखुरलेलें चलन आणि मालाचा पुरवठा ह्यांचें योग्य प्रमाण बसूं शकतें आणि बाजारभाव चढणीस लागत नाहींत.

हिंदुस्थान सरकारास ज्या मानानें चलन समाजांत खेळवावें लागत आहे त्या मानानें तें शोषून परत खेचण्यांत त्यास यश मिळालेलें नसल्यानें चलनात्मक महागाईस बराच वाव मिळत आहे. मध्यवर्ती असेंब्लींत फिनॅन्स बिलाची चर्चा चालू असतांना सर विठ्ठलराव चंदावरकर ह्यांनीं सरकारच्या कर्ज काढून लोकांची बचत ओढून घेण्याच्या पद्धतीवर टीका करून कांहीं विधायक सूचनाहि पुढें मांडल्या. त्यांचें म्हणणें असें कीं, हिंदी जनता सरकारी कर्जरोख्यांत आपला पैसा घालीत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट असली तरी ती सत्य आहे. कित्येक व्यापारी व औद्योगिक मंडळ्या पूर्वी रिकाम्या पैशाची अशा रीतीची गुंतवण करीत असत, त्याहि अलीकडे तो पैसा दुसरीकडे गुंतवीत आहेत. सामान्य लोकांनीं पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंतून आपले पैसे काढले आहेत. त्याचें कारण एकतर त्यांस पोस्टाच्या स्वाधीन आपली बचत करावयाची नाहीं आणि दुसरें, महागाईमुळें त्यांस खर्चास ह्या पैशाची निकड भासली असली पाहिजे. जनतेची बचत सरकारास कर्ज रूपानें हटकून मिळूं शकेल अशा प्रकारचे सक्तीचे उपाय योजण्याची वेळ आली आहे. कंपन्यांच्या डिव्हिडंडला मर्यादा घालावी अशी सर विठ्ठलराव यांची सूचना नव्हती. परंतु कंपन्यांच्या नफ्यांतला विशिष्ट भाग सरकारी कर्जरोख्यांत गुंतवला गेलाच पाहिजे, अशी सक्ती केली गेल्यास डिव्हिडंडवर अप्रत्यक्ष रीतीनें नियंत्रण बसणार आहे. रिझर्व्ह फंडांत नफ्याचा कांहीं भाग घातला जावा आणि तो सरकारी कर्ज रोख्यांत गुंतवला जाऊन युद्धसमाप्तीनंतर डिव्हिडंड म्हणून वाटतां यावा अशीहि व्यवस्था करतां येण्याजोगी आहे असें ते म्हणाले. डिव्हिडंड सतत वाटतां येणें शक्य व्हावें म्हणून कित्येक कंपन्या डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड निर्माण करून बाजूस ठेवतात, तशातलाच हा उपाय होईल असें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. भागीदारांस आपल्या मालकीचा नफा नाहींसा झाला अशी तक्रार करण्यासहि जागा रहाणार नाहीं ही गोष्ट आपल्या सूचनेस अनुकूल असल्याचें सर विठ्ठलराव ह्यांनीं सांगितलें.

ह्या विषयास उद्देशून बोलतांना अर्थमंत्री, सर जरेमी रेस्मन, म्हणाले कीं सक्तीच्या बचतीचा प्रश्न सरकारच्या नजरेंतून सुटलेला नाहीं आणि त्यांनीं आपला निर्णय अजून पक्का केलेला नाहीं. कंपन्यांच्या डिव्हिडंड्सना हात लावण्यांत येऊं नये असें सर विठ्ठलराव चंदावरकरांनीं सांगितलें पण तें पटण्यासारखें नाहीं कारण लोकांच्या हातांत जाणारा पैसा जर सरकारी कर्जांत ओढून घ्यावयाचा आहे तर ज्यांच्या ज्यांच्या हातीं अधिक चलन वापण्याची शक्ती जात आहे, मग ते कारखानदार, धंदेवाले, श्रीमान् किंवा कामकरी असोत, त्यांच्याकडून तो आकर्षला पाहिजे आणि मंडळ्यांनीं वाटावयाचें डिव्हिडंड ह्या नियमास अपवाद होऊं शकत नाहीं. ह्यावर सर विठ्ठलराव यांनीं डिव्हिडंड्स मर्यादित करण्याच्या अर्थ मंत्र्यांच्या कल्पनेस विरोध दर्शवला. तथापि, सर जरेमी ह्यांनीं आपला मुद्दा सोडला नाहीं आणि प्रस्तुत प्रश्नाचा आपण सर्व बाजूंनीं विचार करीत असल्याचें सांगितलें. ह्या भाषणानें मुंबईच्या शेअर बाजारांत खळबळ उडून गेली असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. सरकारनें औद्योगिक व व्यापारी मंडळ्यांच्या डिव्हिडंड्सना हात लावल्यास देशांतील उद्योग धंद्यांच्या प्रगतीस अडथळा येईल आणि त्यांत आपला पैसा घालण्याची लोकांची अत्यंत इष्ट असलेली प्रवृत्ति सुटेल अशा आशयाचा अभिप्राय व्यक्त करण्यांत आणि तो अर्थमंत्र्यांस कळवण्यांत आला आहे. सरकारची प्रस्तुत विषयाबाबतची नक्की योजना बाहेर येण्यापूर्वी तिच्या संबंधांतलें लोकमत स्पष्टपणानें व्यक्त झालें पाहिजे.

---

## ग्रेट ब्रिटनला निर्गत व्यापार वाढवावा लागणार

ग्रेट ब्रिटनमधील लोकांची सुबत्ता सर्वस्वी त्या देशाच्या निर्गत व्यापारावर आधारलेली आहे, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. ब्रिटिश लोकांना लागणाऱ्या अन्नसामुग्रीचा मोठा भाग त्यास बाहेरून आणावा लागतो व ग्रेट ब्रिटनमधील कारखान्यांस लागणारा कच्चा मालहि मोठ्या प्रमाणांत बाहेरूनच येतो. ह्या आयातीच्या मोबद्-ल्यांत पक्का माल निर्गत होतो व ह्या देवघेवींतील व्यापारा हा त्या व्यवहारांत नफा उरतो. ग्रेट ब्रिटन इतर देशांचे माल आगबोटींतून वहाण्याचें कामहि करितो व त्यासंबंधांतहि त्या देशास नफा रहातो. ह्या सर्व व्यवहारांत उरलेल्या नफ्याची रक्कम युद्धापूर्वी इतकी साचली होती, कीं तिचेवरील केवळ व्याजांतच ब्रिटिश आयातीच्या एक पंचमांश भागाची किंमत भागत असे! वहातुकीच्या धंद्यांतील नफ्यांतून एक नवमांश आयातीची किंमत निघे.

चालू युद्ध संपल्यानंतर ब्रिटिश लोकांच्या रहाणीचें मान उच्च कसें टिकवितां येईल, ह्या प्रश्नाची चर्चा ग्रेट ब्रिटनमध्यें जोरानें चालू आहे. ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रांत गुंतलेलें भांडवल युद्ध-खर्चासाठी वापरण्यांत आलें आहे व युद्धसमाप्तीनंतर पूर्वीप्रमाणें व्यापार चालू राहील अशी खात्री नाहीं. युद्धापूर्वीपेक्षा युद्धानंतर ग्रेट ब्रिटनला आपल्या अन्नपुरवठ्याच्या मोबदल्यासाठी निर्गतीच्या मोठ्या भागाची योजना करावी लागेल, हें उघड आहे. ह्याचा अर्थ ब्रिटिश लोकांच्या रहाणीचें मान आणखी सुधारावयाचें असल्यास, ब्रिटिश मालाची निर्गत पूर्वीप्रमाणें चालू राहून केवळ भागणार नाहीं; तिचें प्रमाण पुष्कळच वाढवावें लागेल. युद्धोत्तर काळांत अमेरिकेशीं सहकार्यानें वागूनच ग्रेट ब्रिटनला आपला परराष्ट्रीय व्यापार वाढवावा लागेल व कच्चा माल तयार करणाऱ्या राष्ट्रांत ब्रिटिश पक्का माल अधिकाधिक प्रमाणांत खपवावा लागेल.

---

## कंपनी कायद्याच्या १५३ व्या कलमाची अंमलबजावणी

---

### बॉंबे टेलिफोन कं. लि. च्या भागाची किंमत

गव्हर्नमेंट टेलिफोन बोर्ड लि. नें १६ एप्रिल १९४१ रोजीं बॉंबे टेलिफोन कं. लि. च्या भागीदारांस पत्र पाठवून, कंपनीचे सर्व भाग भांडवल प्रत्येक भागास ८९ रु. १५ आणे देऊन विकत घेण्याचा आपला मानस कळविला. हें पत्र पाठविल्यावर कायद्या-प्रमाणें चार महिन्यांचे आंत तीन चतुर्थांशाहून भाग धारण करणारांनीं ह्या योजनेस संमति दिली. जे भागीदार ह्या किंमतीत भाग विकण्यास तयार नव्हते, त्यांचे भाग सक्तीनें घेण्यांत येतील, असें त्यांस कळविलें. १२७ भागीदारांना भाग खरेदीची योजना अमान्य होती, व त्यांनीं भागांची सक्तीनें वर्गावर्गी न होण्यासाठीं मुंबई हायकोर्टाकडे अर्ज केला. प्रत्येक भागाची किंमत ८९ रु. १५ आ. ही फार कमी आहे, ती १३४ रु. असली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. कंपनीच्या मालमत्तेची किंमत मार्च १९४० ची धरण्यांत आली, ती मार्च १९४१ ची धरा वयास पाहिजे, अशी अर्जदारांनीं तक्रार केली. बोर्डानें भागांची किंमत ठरवितांना योग्य गोष्टी लक्षांत घेतल्या नाहींत, ही गोष्ट हायकोर्टास पटली. "मार्च १९४० मधील किंमतीनें १९४१ मध्यें पुरी इतकीच मालमत्ता घेतां येईल असें मानण्यास मुळीच जागा नाहीं," असें म्हणून हायकोर्टानें असा निर्णय दिला कीं अर्जदारांचे भाग प्रत्येकीं ८९ रु. १५ आ. देऊन सक्तीनें वर्ग करून घेण्याचा गव्हर्नमेंट टेलिफोन्स बोर्डास अधिकार नाहीं. न्यायमूर्ति छगला ह्यांच्या ह्या निर्णयाविरुद्ध गव्हर्नमेंट टेलिफोन्स बोर्डानें अपील केलें. चीफ जस्टिस सर जॉन बोमंट व न्या. कानिआ ह्यांनीं अपील ऐकून घेऊन न्या. छगला ह्यांचा निकाला फिरवला. दाव्याच्या खर्चासंबंधीं त्यांनीं कांहींच हुकूम दिला नाहीं. कंपनी कायद्याच्या १५३ व कलमाखालील कामाचा हा पहिलाच प्रसंग होय.

---

## सरकारचें शेतकऱ्यांस आश्वासन

धान्यांचीं अधिक पिकें काढा असा सल्ला शेतकरी वर्गास दिला जात आहे. त्यासंबंधांत अशी शंका काढण्यांत येते कीं धान्याची पैदास अधिक झाल्यास, त्यांची निर्गत बंद झाल्यानें त्यांच्या किंमती उतरून शेतकऱ्यांचें नुकसान होईल. ही भीति निराधार आहे असें सरकारचें म्हणणें आहे. धान्यांच्या किंमती विशेष खाली जातील असें मानण्याचें कारण नाहीं आणि यदा-कदाचित् त्या उतरत आहेत असें दिसून आल्यास योग्य किंम-तीनें आपण स्वतः धान्य बाजारांत खरेदी करून त्या खाली जाऊं देणार नाहीं असें स्पष्ट आश्वासन हिंदुस्थान सरकारनें दिलें आहे, ही गोष्ट अत्यंत समाधानकारक आहे. आखूड धाग्याच्या कपा-शीचें पीक न करतां त्याचे ऐवजीं धान्य पेरा एवढेंच नव्हे तर शक्य तेथें धान्यांच्या पिकाचें क्षेत्र वाढवा असें शेतकऱ्यास एका बाजूनें सांगण्यांत येत असतां बाजारभाव पडण्याच्या शक्यते-पासून त्यांचें रक्षण करण्याची जबाबदारी सल्लागार व प्रचारक ह्यांचेवर येते. ती सरकारनें तात्काळ व असंदिग्धपणानें उच-लली आहे. युद्धपरिस्थितींत धान्यांचा पुरवठा देशांत वाढणें अगत्याचें आहे आणि तो वाढविणारांस आपल्या उद्योगांत योग्य मोबदला मिळण्याची निश्चित व्यवस्था होणार आहे हें अभि-नंदनीय आहे. सेंट्रल कॉटन कमिटीनें ह्या बाबतींत केलेल्या शिफारसीस मुंबई प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डानें मान्यता दिल्याविषयींचा उल्लेख आम्हीं केलाच आहे. ह्या विषयांचा हिंदु-स्थान सरकारनें आतां योग्य निकाल लावला आहे.

---

### धान्यांच्या क्षेत्रांत वाढ

"अधिक धान्य पिकवा". ह्या घोषणेनुसार गेल्या वर्षी प्रचार व यत्न झाला, त्याच्या योगानें धान्यांचीं पिकें अधिक पैंशी लक्ष एकरांत काढण्यांत आलीं. चालू सालीं हा वाढावा आणखी वीस लक्षांनीं वाढेल अशा हेतूनें प्रयत्न करावयाचें ठरलें आहे.

### जर्मनींत फ्रेंच कामगार

चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत सुमारें २½ लक्ष फ्रेंच कामगारांना कामासाठी जर्मनींत नेण्यांत आलें.

### भूमध्य समुद्राचें महत्त्व

उत्तर आफ्रिकेंतून जर्मन व इटालियन फौजांची हकालपट्टी केली व भूमध्य समुद्रांतून आगबोटींची ये-जा सुरू झाली तर ग्रेट ब्रिटन ते हिंदुस्थानच्या आगबोटींच्या खेपा दुपटीनें वाढूं शक-तील. अलेक्झॅंड्रियाकडे तिप्पट खेपा होऊं शकतील व ऑस्ट्रे-लियाकडे दीडपट खेपा होतील.

## स्फुट विचार

### प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा

गेल्या आठवड्यांत मुंबई येथें प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा भरली होती. तिचें उद्घाटन प्रांताचे नवे गव्हर्नर, सर जॉन कॉलव्हिल ह्यांनीं केलें. खेडेगांवांच्या सुधारणेच्या बाबतींत सार्वजनिक रीतीनें भाषण करण्याचा प्रसंग नव्या प्रांताधिपतींच्या कारकीर्दीच्या प्रारंभासच आला हा ह्या सभेचा विशेष होय. स्वतःच्या देशांत आपण शेतीच्या खेडेगांवांच्या संबंधांत विशेष लक्ष घालीत असूं आणि आपणांस पार्लमेंटमध्यें मंत्री ह्या नात्यानें काम करण्याचा अनुभव आहे ह्या गोष्टींचा उपयोग मुंबई प्रांताच्या राज्यकारभारांत होईल असा विश्वास गव्हर्नरांनीं प्रकट केला. रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभेपुढें चर्चेसाठीं येणाऱ्या दोन विषयांचा त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेख केला. युद्ध संपल्यावर ह्या प्रांतांत लढाईवर गेलेले लोक परत येतील त्यांच्या जीवनाची व्यवस्था आणि धान्याची पैदास वाढवण्याची आवश्यकता हे ते विषय होत. रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभेंत ह्या दोन्ही प्रश्नांचा सांगोपांग विचार झाला. धान्याच्या पिकांचा विस्तार होण्याचे संबंधांत गेल्या वर्षांत मोठ्या प्रमाणांत प्रचार झाला आणि त्याचा पुष्कळ उपयोगहि झाला. त्याच धर्तीचा यंदाहि प्रयत्न व्हावा आणि सरकारनें त्यास सर्व प्रकारांनीं सहाय्य द्यावें असा अभिप्राय बोर्डानें व्यक्त केला. खेडेगांवांच्या सुधारणेविषयीं जो कार्यक्रम चालू आहे त्याच्या मार्फत लढाईंतून परत येणाऱ्या शिपायांच्या पुढील जीवनास सहाय्य दिलें जावें ह्या आशयाची कल्पना सर्वसाधारणपणानें मान्य झाली. वरील दोन्ही प्रश्न गुंतागुंतीचे व अवघड आहेत. ह्यामुळें त्यांची चर्चा निरनिराळ्या दृष्टींनीं व तपशीलवार झाली. विजापुर जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थिति, आरोग्य, शिक्षण इत्यादीविषयींच्या प्रश्नांचाहि विचार झाला.

### धान्यें, कपास व कापड

मुंबई प्रांतांत आखूड धाग्याच्या कापसाचें पिक मर्यादित करून त्याच्या जागीं धान्याच्या पिकांची लागवड केली जाण्याचे संबंधांत गेल्या वर्षी जो प्रचार झाला, त्याचा इष्ट परिणाम दिसून आला आहे. मध्यवर्ती कापूस समितीनें ह्या प्रश्नाबाबत अलीकडे ठराव करून हेंच धोरण येत्या शेतीच्या हंगामांत चालू रहावें अशी शिफारस केली आहे. तिला अनुसरून मुंबई सरकारनें यंदाहि प्रचाराची, बीं बियाण्याच्या पुरवठ्याची, वगैरे विस्तृत योजना आखली आहे आणि तिला प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डानें संमति दिली आहे. सध्या कपाशीची किंमत चढली आहे आणि शेतकऱ्यांस तिचें पीक लावण्यापासून परावृत्त करावयाचें व धान्यें पिकवण्यास उत्तेजन द्यावयाचें तर ह्या कामीं त्यास नुकसान लागू नये अशी तजवीज केली जाणें अगत्याचें होतें ही गोष्ट लक्षांत घेऊन सेंट्रल कॉटन कमिटीनें असें सुचवलें आहे कीं पिकांच्या व्हावयाच्या अदलाबदलींत धान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचें नुकसान होणार नाहीं ह्याविषयीं सरकारनें हमी द्यावी. प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डानें ह्या सूचनेस आपली संमति दिली आहे. सूत आणि कापड ह्यांच्या किंमती भरमसाट चढल्या आहेत त्यांस आळा बसणें आवश्यक असल्याचें लोकमत प्रसिद्ध झालें आहे. त्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकार कांहीं व्यवस्था योजीत आहे असें समजतें. सरकारच्या वतीनें असें जाहीर करण्यांत आलें आहे कीं शेतकऱ्यांस आपल्या कपाशीचा चांगला भाव येईल तर त्याच्या विरुद्ध कारवाई करण्याचा कोणाचाच विचार नाहीं. सट्टेबाजीमुळें कापसाचे भाव भरमसाटपणानें चढवले जातात त्याचे विरुद्ध सरकारचा कटाक्ष आहे.

### बोनस शेअर

युद्धकाळांतील चलतीच्या दिवसांत कंपन्यांस नफा मोठा होतो व त्यांस आपल्या भागीदारांस डिव्हिडंडहि वाढत्या दरानें देतां येतें. तथापि, डिव्हिडंडचा हा वाढलेला दर पुढें कायम टिकवितां येतोच, असें नाहीं. डिव्हिडंडच्या दराचे बाबतींत कंपनीला सहसा मागें पाऊल टाकण्याची पाळी येऊं नये, असें तिच्या चालकांचें धोरण असतें. ह्याकरितां, नैमित्तिक कारणांमुळें नफा वाढला तर त्यांतून वाढत्या दरानें डिव्हिडंड देण्याऐवजीं, कंपन्या पूर्वीच्या दराचें डिव्हिडंड देऊन आणखी वरती बोनसच्या स्वरूपांत नफा वाटतात. ह्याहिपेक्षां दूरदर्शीपणाचें धोरण म्हणजे, जादा नफ्याची रक्कम भागीदारांत वाटून न टाकतां, त्यांना बोनस शेअर देणें हें होय. पोद्दार मिल्सनें १९४२ च्या नफ्यांतून ४ लक्ष रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून त्यापैकीं ३ लक्ष रुपयांचें भाग भांडवल निर्माण करून तें सध्याच्या भागीदारांत वाटण्याचें योजिलें आहे. ह्या बोनस शेअरवर भागीदारांस ४% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स डिव्हिडंड मिळेल. कंपनीचे सध्या २० हजार ऑर्डिनरी भाग आहेत; म्हणजे प्रत्येक २० ऑर्डिनरी भागास ३ प्रेफरन्स भाग मिळतील. बोनस शेअर भागीदारांना दिल्यामुळें त्यांस प्रत्यक्ष रोख रक्कम द्यावी लागणार नाहीं; फक्त तेवढी रक्कम भागीदारांचे नांवानें भागांचे स्वरूपांत कंपनीकडे जमा राहील. त्या कारणानें, कंपनीला खेळत्या भांडवलाची मदत होईल. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, भागीदारांत रोख पैसा वाटला न गेल्याकारणानें चलनाच्या विस्तारास त्या प्रमाणांत पायबंद बसेल. टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें १९४१-४२ असेरच्या नफा वाटणीपैकीं ऑर्डिनरी व डिफर्ड भागांवरील डिव्हिडंडचा कांहीं अंश ( अनुक्रमें १२ रु. व ८६ रु. ) बेअरर डिपॉझिट सर्टिफिकेटांचे स्वरूपांत दिला त्यामुळें कंपनीला सुमारें १ कोटि रुपये अल्प व्याजानें खेळतें भांडवल म्हणून वापरण्यास मिळाले, हें वाचकांच्या लक्षांत असेलच.

### ट्यूनीशिया

उत्तर आफ्रिकेंत ट्यूनीशियाच्या संकुचित क्षेत्रांत आठवी ब्रिटिश फौज, अमेरिकेची सेना, आणि फ्रेंच तुकड्या ह्यांनी तीन बाजूंनीं जर्मनीच्या फौजेस घेरून रोमेलला मार्ग हटवण्याचा क्रम सारखा चालू ठेवला आहे. ह्या पिछेहाटींत रोमेलचें मनुष्यबळ व लढाऊ सामुग्री ह्यांचे बाबतींत पुष्कळ नुकसान झालें आहे. तरीहि रोमेल आणि फॉन आर्मिन' यांच्या फौजा एकत्र होऊन मित्रराष्ट्रांचा निकरानें प्रतिकार करण्याचा संभव आहे असें मत, अमेरिकन युद्धमंत्री, मि. स्टिम्सन, ह्यांनीं व्यक्त केलें आहे. ट्यूनीशियांतील मित्र राष्ट्रांची मोहीम यशस्वी रीतीनें पुरी होण्यापूर्वी एखादा संकुचित पण मजबूत रणक्षेत्रांत शत्रुसेनानी शिकस्तीनें लढतील असें त्यांचें म्हणणें आहे. तथापि मित्रराष्ट्रांचें वैमानिक बळ विलक्षण वाढलें असून त्याचा जोर

घेत्या टप्प्यांत परिणामकारक झाल्यावांचून रहाणार नाहीं. इटली व सिसिलीमधून शत्रूची लढाऊ सामुग्री येत रहाणार पण ब्रिटिश आरमार व विमानें शत्रूच्या वहातुकीच्या जहाजांचा योग्य समाचार घेत आहेत. क्रमाक्रमानें मित्रराष्ट्रांचीं सैन्यें पुढें चालली असतां त्यांच्या कचाट्यांत न सापडतां नुकसान सोसूनही मागें मागें हटत जाण्याचें धोरण रोमेलनें तूर्त स्वीकारलें आहे. पण ह्या पिछेहाटीस मर्यादा आहे आणि ती भूमध्य समुद्राची आहे. ही मर्यादा गांठण्याचा प्रसंग अखेर येईपर्यंत रोमेल आपली फौज वांचवण्याची आणि मित्रराष्ट्रांच्या पुढें चाल करून जाणाऱ्या सैन्यांच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करण्याची धडपड करील ह्यांत कोणासच शंका नाहीं. ह्या जाणीवेनेंच मित्रराष्ट्रांचे सेनानी आपलें युद्ध धोरण आंखीत आहेत.

---

## औंध स्टेट बँकिंग अँड इं. कं. लि., औंध

### पंचवार्षिक अहवाल

औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि. च्या स्थापनेपासूनच्या पांच वर्षांचे अहवाल आमचेकडे आले आहेत, त्यांवरून ह्या कंपनीच्या प्रगतीचा चांगला अंदाज घेतां येतो. औंध स्टेट सेंट्रल बँक लि. ची स्थापना १९३२ मध्यें झाली व ती पहिल्या वर्षापासून भागीदारास ६% डिव्हिडंड देत आली. बँकिंगला जोडून विम्याचाहि धंदा करावा ह्या हेतूनें वरील संयुक्त कामाची कंपनी डायरेक्टरांच्या प्रेरणेनें स्थापन झाली व तिमध्यें औन्ध स्टेट सेंट्रल बँक मिळाली. बँकिंग व विमा हे धंदे हे एकाच कंपनीचे दोन विभाग म्हणून चालू झाले, त्याचा दुष्परिणाम कंपनीला कसा भोगावा लागला, कंपनीवर आर्थिक जबाबदाऱ्या व अडचणी कोणत्या आल्या व विमा विभागांतून कंपनी मोकळी कशी झाली, ह्याची माहिती गेल्या पांच वर्षांच्या डायरेक्टरांच्या रिपोर्टांवरून चांगली समजते. विमा विभागामुळें कंपनीला भारी दरानें ठेवी घ्याव्या लागल्या व विमा विभागाचें पुढें अनुकूल मूल्यमापन होण्यावरच आपला नफा अवलंबून ठेवावा लागला. विमा खात्यापायीं कंपनीला आलेला तोटा (सुमारें १० हजार रुपये) जिंदगी खातीं दाखविण्यांत आलेला आहे. औंध म्युच्युअल इं. सोसायटीला मूल्यमापनांत किमान नफा झाल्यानंतर त्याचा कांहीं भाग हा तोटा भरून काढण्यासाठीं कंपनीला उपलब्ध होईल. १९४२ सालीं बुडीत व संशयित कर्जफंडांतून ४,३२९ रुपये काढून कंपनीनें बूड व सूट ह्यांची तरतूद केली आहे. औंध संस्थानाशीं जुन्या कर्जाबाबत करार करून त्या बाबतींत कंपनीची भूमिका आतां स्पष्ट झाली आहे. कंपनीचें भाग भांडवल हळुहळु वाढत असून ठेवींतहि चांगली वाढ होत आहे, ह्यावरून कंपनीवरील जनतेचा विश्वास दिसून येतो. कंपनीचें वसूल भांडवल व फंड्स मिळून सुमारें १७१ हजारांची रक्कम होते, तिचें एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाण समाधानकारक आहे. मागील सर्व अडचणी नाहींशा करून कंपनी पुढें जोमानें पाऊल टाकण्यास आतां समर्थ झाली आहे. डायरेक्टरांच्या काटकसरीच्या व काळजीकाट्याच्या धोरणानुसार कंपनीची भरभराट होवो, असें आम्ही इच्छितों.

---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस | |
| काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

### डायरेक्टर्स

श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कमिशनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणी बरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळवे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

---

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## दि औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि., औंध

### डायरेक्टर बोर्डाच्या रिपोर्टाचा सारांश

#### १९३८

वरील कंपनीनें औंध स्टेट सेंट्रल बँक लि. चा व्यवहार आपल्याकडे घेतला, त्या वेळीं बँकेच्या हिशेबांत १६,१२६ रुपये नफा होता. नव्या कंपनीस १९३८ च्या शेवटच्या चार महिन्यांत १८९ रु. तोटा आला. म्हणजे, कंपनीस १९३८ अखेरच्या वर्षी १५,९३७ रुपये नफा उरला. कंपनीच्या विम्याच्या शाखेचा सर्व खर्च (७०५ रु.) चालू खर्चांतूनच भागविण्यांत आला; १५०० रुपये संशयित व बुडीत कर्ज फंडांत टाकण्यांत आले, ५०० रुपये थकलेल्या व्याजाच्या रिझर्व्हमध्यें टाकण्यांत आले, प्राथमिक खर्चाकडे ४०० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. हें सर्व करूनच नफ्याचा आकडा दाखविण्यांत आला व भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें. विमा शाखेची सर्व प्राथमिक तयारी पुरी झाली.

#### १९३९

अहवालाचे वर्षी कंपनीच्या वसूल भांडवलांत ९,४१० रुपयांची वाढ होऊन तें १,२८,०५० रुपये झालें. खेळत्या भांडवलांतहि १ लाखाचे वर वाढ होऊन तें ९ लक्ष रुपये झालें. ३१ डिसेंबर १९३९ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षांत कंपनीच्या विमा विभागाला काम करण्यास फक्त सातच महिने मिळाले. ह्या अवधींत ऑर्डिनरी व इंडस्ट्रिअल मिळून १,५०,५०० रुपयांच्या पॉलिसी देण्यांत आल्या. कंपनीनें विमा विभागांत ५३ हजार रुपये गुंतविलेले आहेत व औंध स्टेट प्रॉ. इन्शुअरन्स कंपनीचे १० हजार रुपयांचे शेअर खरेदी केली आहेत. विमा विभागाचा व प्रॉव्हिडंड कंपनीचा फायदा व्हॅल्युएशन झाल्यावरच दिसून येणारा असतो. जो आतां नफा झाला आहे, तो बँकिंग खात्याचाच आहे. १९३९ सालीं कंपनीला ६,४४५ रुपये नफा झाला. भागीदारांस ४% डिव्हिडंड मिळालें. लवकरच ज्यावेळीं विमा विभागाचा नफा व प्रॉव्हिडंट कंपनीचा नफा बाहेर पडेल त्यावेळीं डिव्हिडंडमध्यें वाढ दिसून येईल.

ह्या वर्षी प्राथमिक खर्च खातीं १,१०० रुपये घातलेले दिसतात.

#### १९४०

कंपनीचें वसूल भांडवल व खेळतें भांडवल अनुक्रमें ९ लक्ष, ५५ हजार व १,३१,४६० रुपये झालें. कंपनीच्या मुख्य कचेरीचें बांधकाम पुरें झालें. अहवालाचे वर्षी विमा खात्यानें १,६२,३५० रुपयांचें काम पुरें केलें. हिंदुस्थान सरकारच्या विमा कायद्याप्रमाणें कंपनीला ब्रिटिश हिंदुस्थानांत ऑफिस ठेवून आपल्या कामाचें व हिशेबाचें पूर्ण रेकॉर्ड ठेवावें लागतें. त्याचप्रमाणें कंपनीची सर्व जिंदगी ट्रस्ट ॲक्टप्रमाणें गुंतवावी लागत असल्यानें त्यावरील उत्पन्न ३% च्यावर मिळणार नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांत कोणत्याहि बँकिंग कंपनीला बँकिंग व्यतिरिक्त दुसरा कोणताहि धंदा करण्याची परवानगी नाहीं. आपल्या कंपनीची स्थापना नॉन-रेसिडेन्शिअल सर्कलमध्यें झाली असल्यानें ब्रिटिश सरकारला अस्तित्वांत असलेल्या ज्यास्तींत ज्यास्त दराप्रमाणें इन्कम टॅक्स भरावा लागतो. विमा कायद्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडे २ लाखांची ठेव सिक्युरिटिजचे स्वरूपांत ठेवावी लागणार आहे. या रकमेवर व्याज आकारून त्याचा नफ्यांत समावेश करतां येणार नाहीं. अर्थात, ही दोन लाखांची रकम विमा विभागाकडे गुंतवावयाची म्हटल्यास कंपनीला यापुढें अंदाजें दहा वर्षेपर्यंत तरी डिव्हिडंड वाटतां येणार नाहीं. नवीन विमा कायद्याप्रमाणें संस्थानचे हद्दींत काम करणें कठीण झालें आहे.

या सर्व अडचणींचा विचार करून डायरेक्टरांनीं ब्रिटिश हिंदुस्थानांत औंध म्यूच्युअल विमा कंपनी काढून तिला भांडवल पुरवून तिच्या वाढीस मदत करण्याचें ठरविलें. १९४० मध्यें कंपनीला ३,२३४ रु. नफा झाला व भागीदारांस ३% डिव्हिडंड देण्यासाठीं डिव्हिडंड ई. फंडांतून १२७० रुपये काढून घ्यावे लागले.

#### १९४१

विमा विभाग स्वतंत्र करून औंध म्यूच्युअल अॅ. सोसायटी लि. पुणें ह्या संस्थेची स्थापना करण्यांत आली व तिचेकडे विमा विभागाचा व्यवहार वर्ग करण्यांत आला. त्या कंपनीला व्हॅल्युएशन लायबिलीटीचे ८,४१८ रुपये देण्यांत आले. हिशेब पुरे होईपर्यंतचा खर्च त्यांत मिळवून ९,९९६ रुपये कंपनीच्या ताळेबंदांत विमा विभागाची तूट म्हणून दाखविण्यांत आली. नवीन कंपनीस ५० हजार रुपयांचें कर्ज देण्यांत आलें. वरील तूट भरून काढण्याकरितां सदर सोसायटीनें औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कंपनीस १५ हजार रुपये देणेचें ठरलें आहे, ती रकम त्या सोसायटीचें व्हॅल्युएशन झाल्याबरोबर मिळून ती तूट नाहींशी होईल. कंपनीच्या डायरेक्टरांनीं खर्चांत विविध तऱ्हेनें काटकसर केली. "औंध संस्थानची हमी असलेलीं कर्जें" ताळेबंदांतून नाहींशीं झालीं व त्या संबंधांत संस्थान व कंपनी ह्यांत करार झाला. विमा विभागाकरितां कंपनीनें एक लाखाच्या ठेवी भारी व्याजानें स्वीकारल्या. त्यामुळें बँकिंग विभागाच्या नफ्यावर गेलीं दोन वर्षें परिणाम झाला. वर्षअखेर बँकेस फक्त १९७ रुपये नफा झाला, तो पुढील वर्षांत ओढण्यांत आला.

#### १९४२

इमारत घसारा खातें नवें काढून त्यांत चालू सालचे नफ्यांतून ६२५ रुपये जमा केले. ३५० रुपये प्राथमिक खर्चांतून वजा केले. ह्या रकमा काढल्यावर २,८५७ रुपये निव्वळ नफा उरतो. त्यांत १९७ रुपये शिलकी नफा मिळवून ही रकम पुढील वर्षांत ओढावी, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. औंध संस्थानाबरोबर झालेल्या करारानुसार ४,३३९ रुपयांची तूट व घट, कंपनीच्या वांट्यास आली, ती त्यासाठीं असलेल्या रिझर्व्ह फंडांतून खर्च घातली. कंपनीचें वसूल भांडवल व खेळतें भांडवल अनुक्रमें १,३३,७७० रुपये व ११ लक्ष ५६ हजार रुपये झालें.

---

### कपाशीच्या पिकाचा अंदाज

| | लागवड (एकर) | उत्पादन (४०० पौंडांची खंडी) |
|---|---|---|
| १९४२–४३ (अंदाज) | १,८७,१६,००० | ४४,२०,००० |
| १९४१–४२ | २,३४,५९,००० | ६०,१३,००० |
| घट | २०% | २६% |

लागवडीपैकीं २४·४ % लागवड मुंबई प्रांतांत आहे, १५·५% मध्यप्रांत वऱ्हाडांत आहे, १५·२% पंजाबांत आहे व १४·१% हैद्राबाद संस्थानांत आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ असेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.





## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड. ४२३ ए, सदाशिव, पुणें २.



## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.



राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून विनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ } वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व १८ श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख १४ एप्रिल १९४३ अंक १५

## दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

फोन नं. ९१४६ टेलिग्रॅम. Bharatbank.

सोमवार, ता. ५ एप्रिल १९४२ रोजीं वर्षप्रतिपदेचे सुमुहूर्तावर खोपोली येथें पे-ऑफिस सुरू झालें.

पुणें कॅन्टोन्मेंट येथें बँकेची शाखा लवकरच उघडण्यांत येणार आहे.

ठेवींवरील व्याजाचे दर

| | |
|---|---|
| चालू खातें | ½% |
| सेव्हिंग्ज खातें | २% |
| मुदतीच्या ठेवी | १¾% ते ४½% |

मुदत ६ महिने ते ५ वर्षेंपर्यंत

## शेअर विक्री चालू आहे.

१९४२ अखेर ऑर्डिनरी शेअरवर ३% डिव्हिडंड वांटण्यांत आलें.

आर. बी. साळवेकर, B. A., LL. B.
एन. एन. क्षीरसागर.
मॅ. डायरेक्टर्स.

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### डरबानमधील हिंदी लोकांचे हक्क

दक्षिण आफ्रिकेच्या नाताळ प्रांतांतील हिंदी लोकांच्या, तेथें मालमत्ता खरेदी करण्याच्या हक्कावर गदा आणणारा कायदा तेथील सरकार करणार आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. नाताळचें क्षेत्रफळ ३५½ हजार चौरस मैल असून १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें त्याची वस्ती १,७७,२२४ गोरे व १३ लक्ष काळे अशी आहे. डरबान ही नाताळची राजधानी आहे. राजधानीच्या क्षेत्रांत ८,२७४ एकर जमीन आहे, त्यापैकीं ३५० एकर हिंदी लोकांच्या मालकीची आहे. डरबानमधील लोकसंख्येच्या एक चतुर्थांशाइतकी तेथील हिंदी लोकसंख्या आहे. १९२७ सालीं हिंदी मालकीची २०४ एकर जमीन होती ती आतां ३५० एकर झाली आहे. ह्या वाढलेल्या जमिनींपैकीं बहुतेक जमीन हिंदी विभागास लागूनच आहे.

### शिक्षकांसाठीं हातकागद करण्याचा वर्ग

कित्येक शाळांच्या चालकांचे सूचनेस अनुसरून अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ, मुंबई, ह्यांचेतर्फे हातकागद करण्याचा शिक्षकांसाठीं एक वर्ग हातकागद संशोधन केंद्र, पुणें, येथें भरविण्यांत येणार आहे. ह्या वर्गास १५ मे, १९४३ रोजीं प्रारंभ होऊन तो दोन महिने चालेल. एकूण २० शिक्षकांपेक्षा अधिक शिक्षकांस पहिल्या वर्गांत घेतलें जाणार नाहीं. जरूर भासल्यास आणखी एकादा वर्गहि पुढें भरविला जाईल. ज्या शिक्षकांस वर्गांत दाखल व्हावयाचें असेल, त्यांनीं एप्रिल अखेर अर्ज करावेत. सबंद अभ्यासक्रमाची फी १०' रुपये असून ती आगाऊ द्यावी लागेल. रहाण्याचा व जेवणाचा खर्च ज्याचा त्यास करावा लागेल. शास्त्रीय विषयाच्या पदवीधरांस व ज्यांस हातकागद करण्याच्या क्रियेचा प्रत्यक्ष अभ्यास करावयाचा आहे, अशांस वर्गांत प्राधान्य मिळेल. ज्यास्त माहितीसाठीं हातकागद संशोधन केंद्र, पुणें नं. ५ येथें चौकशी करावी.

### कापडाचें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न

स्टँडर्ड क्लॉथ पॅनेलची सभा मुंबई येथें गेल्या आठवड्यांत भरली होती, तीमध्यें गरीबांसाठीं काढण्यांत येणाऱ्या कापडाचें उत्पादन वाढवून कापड स्वस्त कसें विकतां येईल, ह्याचा विचार झाला. गिरण्यांचें उत्पादन वाढवावें व कापड आणि सूत ह्यांचा साठा गिरण्यांनीं व व्यापाऱ्यांनीं दीर्घ काळ करून ठेवणें बेकायदा ठरवावें, अशी शिफारस सभेनें केली आहे. गिरण्यांच्या उत्पादनांत १०% वाढ होऊन तें ४५० कोटि वार होईल अशी अपेक्षा आहे. त्यापैकीं ६० कोटि वार लष्करी मागणीच्या पुरवठ्यासाठीं लागेल. ५० कोटि वार कापडाची निर्गत होईल. म्हणजे, बिनलष्करी जनतेसाठीं १९४३ सालीं ३६० कोटि वार कापड उपलब्ध होईल. १९४२ च्या मानानें हा पुरवठा दुपटीइतका आहे.

### गलबतांतून मालाची वहातुक

रेल्वेज वरील ताण कमी करण्याच्या उद्देशानें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील गलबतांच्या वहातुकीस उत्तेजन देणें आवश्यक झालें, परंतु ही वहातुक अपेक्षेइतकी कार्यक्षम होत नाहीं, असें आढळून आलें आहे. पावसाळ्यांत ही वहातुक बंद असते. ह्या मुदतीमध्यें, ही वहातुक कशी सुधारतां येईल ह्याचा विचार करण्यांत येणार आहे.

### बाँबे इंजिनिअरिंग काँग्रेस व इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया)

बाँबे इंजिनिअरिंग काँग्रेस व इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) ची मुंबई शाखा ह्यांचें एकत्रीकरण करण्याचें ठरलें आहे. इंजिनिअरिंग काँग्रेसची स्थापना १९१४ सालीं झाली होती व इन्स्टिट्यूटची स्थापना १९२० सालीं झाली होती. दोन्ही संस्थांचे उद्देश एकच आहेत, तथापि इन्स्टिट्यूटचें क्षेत्र व्यापक असून तें अखिल भारतीय स्वरूपाचें आहे. इन्स्टिट्यूटचीं एकूण सात केंद्रें आहेत. काँग्रेसच्या सभासदांची संख्या २४४ आहे. इन्स्टिट्यूटच्या पटावर १,७०० सभासद आहेत, त्यापैकीं ४०७ मुंबई केंद्राचे आहेत. ७० लोक दोन्ही संस्थांचे सभासद आहेत.

### धान्यांच्या लागवडीस उत्तेजन

बंधाऱ्यांच्या पाण्यावर लावण्यांत येणाऱ्या धान्याच्या पिकांवरील पाणीपट्टीपैकीं निम्मी पट्टी माफ करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. शेतीस पाणीपुरवण्यासाठीं चालणाऱ्या ऑइल इंजनांस लागणारें क्रूड ऑईल, ह्या पाण्यावर धान्याचें पीक काढण्यांत आलें, तरच मिळूं शकेल, असेंहि सरकारनें जाहीर केलें आहे.

### कोठारांसंबंधीं माहिती कळवा

मुंबई शहर व उपनगर ह्यांतील ६ हजार चौरस मैलांपेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या जागेच्या कोठारवाल्यांनीं कोठारांसंबंधीं तपशीलवार माहिती—मालकाचें नांव व पत्ता, कोठाराची जागा, कोठार ज्याचे ताब्यांत असेल त्याचें नांव, कोठारांतील मालाचें वर्णन—फूड कंट्रोलर, मुंबई, ह्यांचे कचेरीस कळविली पाहिजे. सरकारी, लष्करी व रेल्वेजचीं कोठारें ह्यांस व युद्धविषयक मालाचे उत्पादनांत गुंतलेल्या व फॅक्टरी ॲक्ट लागू असलेल्या कारखान्यांच्या कोठारांस हा नियम लागू नाहीं.

### कागदाची बचत

कागदाची बचत करण्याचे हेतूनें हिंदुस्थान सरकारनें खालीलप्रमाणें कायदा केला आहे.

(१) दुकानदारानें जुन्या वर्तमानपत्राखेरीज दुसरी रद्दी माल गुंडाळण्यासाठीं वापरतां कामा नये.

(२) खाण्याच्या जिनसा गुंडाळण्यासाठीं व दुसरीकडे माल पोचविण्यासाठीं मात्र इतर कागद वापरला तरी चालेल.

(३) ज्या मालास कागद गुंडाळण्याची साधारणपणें आवश्यकता नाहीं, अशा मालास कागद गुंडाळतां कामा नये.

(४) माल गुंडाळण्यास आवश्यक तेवढ्याच कागदाचा उपयोग केला पाहिजे.

### औद्योगिक वांधे

हिंदुस्थानांतील औद्योगिक वांध्यांविषयींचे प्रसिद्ध झालेले सर्वांत ताजे आकडे ३० जून १९४१ अखेरच्या तिमाहींसंबंधीचे आहेत. ह्या तिमाहींत १२८ वांधे झाले व त्यांत ८,२१,४३१ कामाचे तास बुडाले. १९४२ च्या पहिल्या तिमाहींतील १८४ वांध्यांत कामाचे १९,४१,३७९ तास बुडाले होते. १९४१ च्या दुसऱ्या तिमाहींत १२१ वांधे झाले होते व त्यांत १२,२५,२४० कामाचे तास बुडाले होते. १९४२ च्या दुसऱ्या तिमाहींतील वांध्यांपैकीं २५ वांध्यांचा निकाल कामगारांस अनुकूल झाला, ३४ अंशतः यशस्वी झाले व ६० वांध्यांत कामगारांस अपयश आलें. १२८ वांध्यांपैकीं ५१ वांधे कपास, लोकर व रेशीम ह्यांच्या गिरण्यांत झाले होते.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ११४ |
| २ बँकांच्या अनिष्ट वळणावर इलाज | ११५ |
| ३ हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचेमधील व्यापार | ११६ |
| ४ स्फुट विचार… युद्धोत्तर काळांत सोन्याचें स्थान—आंतरराष्ट्रीय चलन व हुंडणावळ—आखूड धाग्याची कपास पेरणारांस इषारा. | ११७ |
| ५ नारळ-सुपारीच्या पिकांची परिस्थिति | ११८ |
| ६ हिंदी चलनाच्या फाजील विस्तारावर उपाययोजना | ११९ |



# अर्थ

बुधवार, ता. १४ एप्रिल, १९४३


## बँकांच्या अनिष्ट वळणावर इलाज

### रिझर्व्ह बँकेच्या सूचना

" बँकांच्या भाग-भांडवलाची रचना ( वर्गीकरण ) आणि कारभाराची व्यवस्था अशा प्रकारची असावी कीं भलती महत्त्वाकांक्षा व फाजील फायदा उकळण्याची घाई ज्यांत आहे अशा धोरणास तिचे योगानें आळा बसावा आणि अनुभवानें इष्ट ठरलेल्या, जुन्या, व सावधगिरीच्या कारभारास तीमुळें उत्तेजन मिळावें असें आमचें मत आहे.":—रिझर्व्ह बँकेचें मध्यवर्ती बोर्ड

वर उद्धृत केलेला उतारा रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती बोर्डानें हिंदुस्थान सरकारास सादर केलेल्या एका महत्त्वाच्या सूचनापत्रकांमधून घेतलेला आहे. रिझर्व्ह बँकेचें मुख्य कार्य देशांतील चलनें व बँकिंग ह्यांचे व्यवहार सुरक्षित व सुरळीत रीतीनें चालण्याविषयीं दक्षता बाळगणें आणि त्यासाठी योग्य ते उपाय योजणें हें आहे. हिंदुस्थानांत बँकिंगच्या धंद्याचें नियमन करणारा स्वतंत्र कायदा केलेला नाहीं. कंपन्यांचे संबंधांतल्या कायद्यांत विशिष्ट कलमें घालून हा नियमनाचा कार्यभाग उरकून घेण्यांत आला आहे. ही तरतूद अपुरी असून बँकिंगच्या धंद्याचें नियमन करणारा स्वतंत्र व तपशीलवार कायदा मध्यवर्ती सरकारनें करावा अशा आशयाची सूचना तीन–चार वर्षांमागें त्यास करण्यांत आली होती आणि तसल्या कायद्याचा मसुदाहि प्रसिद्ध केला जाऊन त्यावर लोकमत व्यक्त झालें होतें. युद्धपरिस्थिति नवीन कायद्याच्या बनावटीस अनुकूल नसल्यानें तो प्रश्न तसाच पडून राहिला आहे. तथापि अलीकडे अनेक नव्या बँका झपाट्यानें एकामागून एक निघत आहेत, त्यांच्या भांडवलाची घटना व त्यांची कारभारपद्धति ह्यांत आढळून आलेले कांहीं विशेष असे आहेत कीं त्यांच्याकडे सरकारचें लक्ष वेधून त्यांच्या बाबतींत नियमन करण्याचें अगत्य पटवून देणें हें रिझर्व्ह बँकेला आपलें कर्तव्य वाटलें आहे.

सर होमी मोदी ह्यांनीं सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वार्षिक साधारण सभेचे प्रसंगीं नवीन बँकांच्या स्थापनेचा सध्या सपाटा चालला आहे, त्यांचे भाग घेणारांस इषारा दिला तो येथें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. सध्या लोकांच्या जवळ रिकामा पैसा पडून आहे म्हणून तो बँकांच्या भागांत गुंतविणें कित्येकांस सोईचें वाटत आहे. पण पुढें मोठमोठ्या बँकांच्या परस्पर स्पर्धेत ह्या संस्थांस धंदा किती मिळेल आणि तो भागीदारांस किफायतशीर कितपत होईल हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. बँकांस आपला पैसा फायदेशीरपणानें पण सुरक्षित रीतीनें गुंतविण्यास पुरेसा वाव मिळून आपलें अस्तित्व व्यवस्थित राखतां येईल कीं नाहीं हा मतभेदाचा प्रश्न आहे असें मानलें तरी रिझर्व्ह बँकेच्या बोर्डाच्या मतानें युद्धोत्तर काळांत ज्या अडचणी उपस्थित होणार आहेत, त्यांच्या दृष्टीनें नवीन बँकांची घटना व कारभार ह्यांचे संबंधांत विशेष दक्षता बाळगणें अगत्याचें आहे. नवीन निघालेल्या बँकांच्या घटनेंत रिझर्व्ह बँकेच्या बोर्डास कोणते ठळक दोष आढळले आणि ते दूर व्हावे म्हणून त्यानें सरकारास कोणत्या आग्रहाच्या सूचना केल्या आहेत तें आतां पाहूं.

सप्टेंबर, १९३९ मध्यें रिझर्व्ह बँकेनें बँकिंगचा स्वतंत्र कायदा करण्यांत यावा म्हणून सुचविलें. तेव्हांपासून ३८ नव्या बँकिंगच्या कंपन्या स्थापन झाल्या असून त्यांपैकीं २ संस्थानांत आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतील ३६ बँकांपैकीं १६ बँकांचें अधिकृत भांडवल प्रत्येकीं ५ लक्ष रुपये किंवा अधिक आहे, आणि ६ बँकांचें वसूल झालेलें भांडवलहि ५ लक्ष रुपयांच्यावर आहे. अधिकृत भांडवल एकूण बँकांत १ लक्ष रुपयांपासून २० कोटि रुपयांपर्यंत आहे. बहुतेक नव्या बँकांचें भरलेलें भांडवल रिझर्व्ह बँकेच्या मतानें अपुरें आहे. तथापि, ह्यापेक्षां अधिक महत्त्वाचें वैगुण्य हें आहे कीं ज्यांचें विक्रीस काढलेलें व भरलेलें भांडवल माहीत आहे अशा १२ बँकांपैकीं फक्त ४ संस्थांच्या बाबतींत विक्रीस काढलेलें भांडवल अधिकृत भांडवलाच्या निम्म्या इतकें आहे. विक्रीस काढलेलें भांडवल अधिकृत भांडवलाच्या निम्म्या इतकें असलें पाहिजे ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेचा कटाक्ष आहे. अधिकृत भांडवलाच्या भपकेदार देखाव्याचे खालीं प्रत्यक्ष खपलेलें भांडवल थोडें असणें हा बँकांच्या व्यवहारांत ठळक दोष आहे आणि तो ह्या संस्थांच्या कमकुवतपणाचें लक्षण आहे असें तिच्या डायरेक्टरांचें म्हणणें आहे. त्यांच्या दृष्टीनें त्याहिपेक्षां अधिक अनिष्ट गोष्ट अशी आहे कीं कांहीं नवीन बँकांत ऑर्डिनरी, प्रेफरन्स व डिफर्ड ह्या प्रकारांच्या भागांत जें वर्गीकरण केलेलें आहे तें ह्या संस्थांमध्यें सत्ता विशिष्ट व्यक्ती किंवा गट ह्यांच्या हातीं रहावी ह्या हेतूनें केलेलें आहे ही होय. बँकेस मोठा नफा झाला असतां डिफर्ड शेअर्स धारण करणाऱ्या भागीदारांस त्यांतला भलत्या प्रमाणांत मोठा वाटा मिळून असुरक्षित असे व्यवहार करण्याचा मोह व्यवस्थापकास होण्याचा संभव आहे, असें रिझर्व्ह बँकेस वाटत आहे. बँकांच्या बाबतींत एकाच प्रकारचे म्हणजे ऑर्डिनरी भाग असावें असें तिचें मत आहे.

बँकांत मॅनेजिंग एजंट्स असूं नये असा कायदा आहे, पण मॅनेजिंग डायरेक्टर नेमून त्यांस एजंट्सप्रमाणें पगार व नफ्यांतला हिस्सा देण्याचे १५।२० वर्षांचे करार कित्येक नव्या बँकांनीं केले आहेत आणि तत्त्वतः कायद्याचा भंग केला आहे ही गोष्ट रिझर्व्ह बँकेच्या बोर्डानें प्रामुख्यानें पुढें मांडली आहे. कांहीं बँकांत मॅनेजिंग डायरेक्टरांचें प्रस्थ माजवण्यांत आलें असून त्यांस एजंटाप्रमाणें अवाच्यासवा पगार व अलावन्सेस देण्याचे करार झाले आहेत आणि कांहीं ठिकाणीं त्यांस नफ्यांतला हिस्साहि मिळावयाचा आहे. ह्या व्यवस्थेचा परिणाम बँकांचा

सुरक्षितपणा व चोखपणा ह्यांचेवर अनिष्ट झाल्यावांचून रहाणें शक्य नाहीं, म्हणून कंपनी कायद्याचें कलम २७७ एच्. ह्यास धरून वरील नवी प्रथा आहे की काय ह्याची चौकशी करून जरूर दिसल्यास त्यांत इष्ट ती दुरुस्ती सरकारनें करावी असें रिझर्व्ह बँकेनें सुचविलें आहे. स्वार्थी व महत्त्वाकांक्षी व्यक्ती व गट ह्यांच्या कारवायांपासून ठेवीदार व सामान्य जनता ह्यांचें रक्षण व्हावें ह्या उद्देशानें हा सबंध प्रश्न पुढें मांडण्यांत आला आहे आणि प्रांतिक सरकार व धंदेवाले लोक ह्यांचा अभिप्राय घेऊन हिंदुस्थान सरकारनें त्यास सुचविण्यांत आलेली व्यवस्था अमलांत आणावी असें रिझर्व्ह बँकेच्या बोर्डाचें म्हणणें आहे. इतर कंपन्यांच्या मानानें बँकांच्या व्यवस्थेचे बरे वाईट परिणाम समाजास विस्तृत प्रमाणांत भोगावे लागतात; सामान्य स्थितींतले ठेवीदार, भागीदार, व्यापारी, धंदेवाले ह्यांचे नाजुक आर्थिक संबंध बँकांच्या व्यवहाराशीं निगडीत झालेले असल्यानें ह्या संस्थांच्या कारभाराचें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें नियमन करणें सरकारनें अगत्याचें समजलें पाहिजे, ही रिझर्व्ह बँकेची प्रस्तुत विषयांतली भूमिका आहे.

---

## हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचेमधील व्यापार

### अमेरिकेचें वर्चस्व वाढणार!

चालू युद्धामुळें हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचा व्यापारी संबंध बराच दृढ झाला आहे. खंड उसनवार पद्धतीनें हिंदुस्थान अमेरिकेंत कांहीं माल खरेदी करीत आहे, त्यांत मुख्यतः पोलाद व मोटार लॉऱ्या यांचा भरणा आहे. मशिनटूलसची आयातहि वाढली आहे. पॉवर अल्कोहोलच्या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामुग्री अमेरिकेंतून आणण्याचा हिंदुस्थान सरकारचा प्रयत्न चालू आहे. हिंदुस्थान हा देश उसाच्या लागवडीच्या दृष्टीनें सबंद जगांत अग्रेसर झाला असला तरी पॉवर अल्कोहोलच्या उत्पादनाचा आकडा अद्याप असमाधानकारक आहे. अमेरिकेला हिंदी अभ्रक हवा आहे. अभ्रकाच्या एकूण जागतिक उत्पादनापैकी ८०% उत्पादन एकट्या हिंदुस्थानांत होतें. हिंदी मँगेनीजलाहि अमेरिकेंत मागणी आहे. युद्धापूर्वी, हिंदी तागाच्या मालाच्या निर्गतींपैकी६०% निर्गत अमेरिकेकडे होत असे. अमेरिकेंतील शेतीचें वाढतें उत्पादन व त्याच्या वहातुकीची व साठवणीची व्यवस्था ह्यांमुळें अमेरिकेंत हिंदी तागाच्या गोणपाटास मोठी मागणी आहे, व ती पुरी पाडण्याच्या मार्गांतील अडचण एकच म्हणजे आगबोटींतील मर्यादित जागा ही आहे.

### अमेरिकेशीं वाढता व्यापार

१९३८–३९ मध्यें हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचेमधील व्यापारांत १·३ कोटि डॉलर्सची तफावत हिंदुस्थानाचे दृष्टीनें अनुकूल पडत होती तिचा आकडा १९४१–४२ मध्यें ५·४ कोटि डॉलर्स इतका झाला. युद्धामुळें व्यापारांत इतकी वाढ झाली आहे. १९३८–३९ ज्या हिंदी निर्गत व्यापारांतील अमेरिकेचा हिस्सा ७½% इतकाच होता; १९४१–४२ मध्यें तो २०%झाला. ग्रेट ब्रिटनच्या खालोखाल अमेरिका हेंच हिंदुस्थानचें प्रमुख गिऱ्हाइक आहे. हिंदुस्थानाची अमेरिकेंतून होणाऱ्या आयातीची किंमत १९३८–३९ मध्यें ३ कोटि डॉलर्स भरली ती १९४१–४२ मध्यें १० कोटि डॉलर्सपेक्षा अधिक झाली. हिंदी आयातीच्या ६·४% आयात अमेरिकन मालाची होती, ती १९४१–४२ मध्यें २०% झाली. हिंदुस्थानास माल पुरविणाऱ्या देशांतहि अमेरिकेचा दुसरा अनुक्रम लागूं लागला आहे; १९३८–३९ मध्यें तो पांचवा होता. युद्धविषयक मालाच्या आयातीचा समावेश वरील आकड्यांत करण्यांत आलेला नाहीं.

### युद्धोत्तर व्यापाराची दिशा

युद्धानंतरच्या काळांत अमेरिकेचें हिंदी परराष्ट्रीय व्यापारांत कोणतें स्थान राहील, हा प्रश्न हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्या दोन्ही देशांचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. "स्टेटिस्ट" पत्रांतून घेतलेल्या वरील आकड्यांवरून, अमेरिकेनें हिंदी व्यापारांत आतां किती महत्त्वाचें स्थान मिळविलें आहे, हें स्पष्ट होतें. हिंदी कच्च्या मालाची अमेरिकेस जेवढी आज गरज वाटते, तेवढी ती युद्धोत्तर काळांत भासणार नाहीं, परंतु हिंदी आयातींत अमेरिकन मालाचें प्रमाण वाढतेंच राहील असा संभव दिसतो. हिंदी कारखान्यांतील उत्पादन हळू हळू वाढत चाललें असल्यामुळें, पक्क्या मालाच्या आयातीपेक्षा यंत्रसामुग्रीच्या आयातीसच प्राधान्य मिळत राहील, अशी अपेक्षा आहे. यंत्रें, रसायनें, वहातुकीचीं साधनें ह्यांचेप्रमाणें विजेचें साहित्य, सिनेमा फिल्म्स, रेडिओ सेट्स, टेलिफोनचें साहित्य, रेफ्रिजरेटर्स, इत्यादींची आयात वाढणार व ती अमेरिका पुरविणार, अशीं चिन्हें दिसत असून त्याचा ब्रिटिश निर्गतीवर परिणाम होणें साहजिक आहे. ह्यापुढें व्यापारी दृष्टीनें अमेरिकेचें हिंदुस्थानावर जेवढें वर्चस्व राहील व जेवढें तें आजहि आहे, तें लक्षांत घेऊन अमेरिकन लोकांनीं ब्रिटिशांना दोष देऊं नये, असें "स्टेटिस्ट"नें सुचविलें आहे.

---

## श्री. नारायणराव नाईक ह्यांचा अल्पोपाहार समारंभ

बंगलोर येथील म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. व श्रीराम सिल्क मिल्स लि. ह्या. कंपन्यांचे मॅनेजिंग एजंट श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं ता. ११ रोजीं सायंकाळीं श्री. बाबासाहेब साळवेकर ह्यांच्या "विश्वकुंज " बंगल्याचे गच्चीवर अल्पोपाहाराचा समारंभ घडवून आणला. आपल्या कंपन्यांच्या यशास महाराष्ट्रीयांची सहानुभूति व मदत कशी कारणीभूत झाली, हें श्री. नाईक ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें व त्याबद्दल त्यांनीं कृतज्ञता व्यक्त केली. श्री. नाईक ह्यांच्या दोन्ही कंपन्या चांगल्या प्रकारें डिव्हिडंड देत असून त्यांपैकी एका कंपनीचे भाग तर १००% प्रीमियमनेंहि मिळणें अशक्य झालें आहे. श्री. नाईक ह्यांनीं म्हैसूर संस्थानांतील औद्योगिक क्षेत्रांत मान्यता मिळविलेली असून ते म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष होते.

---

## चीनच्या होनान प्रांतांत दुष्काळ

चीनच्या हानान प्रांतांत भयंकर दुष्काळ पडला आहे व त्यामुळें ५० लक्ष चिनी लोकांवर संकट ओढवलें आहे. चिनी सरकारनें ११० कोटि रुपये आपद्ग्रस्तांच्या निवारणासाठी मंजूर केले. होनान हा प्रांत चीनच्या मध्यभागीं असून त्याचेमधून पीत नदी वहाते. ह्या प्रांताचें क्षेत्रफळ सुमारें ६८ हजार चौ. मैल आहे.

## चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २ एप्रिल अखेर संपलेल्या आठवड्यांत ५३ कोटि, ५५ लक्ष रुपये किंमतीच्या १,३५,९६६ चेक्सची देवघेव झाली.

# स्फुट विचार

## युद्धोत्तर काळांत सोन्याचें स्थान

शांततेच्या काळांत सर्व प्रमुख देशांत राष्ट्रीय चलन व आंतर-राष्ट्रीय हुंड्यांचा व्यवहार ह्यांमध्यें सोन्याला मोठें महत्त्व होतें. विशिष्ट वजनाचें सोनें राष्ट्रीय चलनाचा कायदेशीर आधार व त्याचें प्रमाण समजलें जाई आणि राष्ट्रा-राष्ट्रांतील देवघेव ह्या प्रमाणभूत चलनाच्या परस्पर संबंधांस अनुसरून होत असे. बाहेरचें देणें-घेणें भागवण्यासाठीं जरूर तितकी सोन्याची निर्गत-आयात करीत आणि ह्या रीतीनें आंतर-राष्ट्रीय देवघेव व राष्ट्रीय चलनाची व्यवस्था सुरळीतपणानें चाले. युद्धपरिस्थितींत सोन्याची आयात-निर्गत बंद असून हुंडणावळींवर सरकारांनीं नियंत्रण घातलें आहे. त्यामुळें सोनें आणि राष्ट्रीय चलनें व आंतर-राष्ट्रीय हुंडणावळ ह्यांचा एकमेकांशीं संबंध आज नांवा-चाच आहे. तथापि युद्धानंतरच्या काळांत सोन्यास पूर्वीचें महत्त्व पुन्हा प्राप्त होणार काय ? आणि त्याची आजची वाढलेली किंमत कायम रहाणार कीं उतरणार हे प्रश्न आज येथें उद्भवतात. राष्ट्रीय व्यापार, उद्योगधंदे व सामाजिक हीं सोन्याचा पुरवठा व त्याची चढती-उतरती किंमत ह्यांवर अवलंबून ठेवण्याच्या पद्धतीचा कित्येक विचारवंतांनीं निषेध केलेला आहे आणि सोन्याचे दास्यत्व राष्ट्रांनीं झुगारून द्यावें अशा सूचनाहि केल्या आहेत. पण सोन्याचा आधार नसलेली राष्ट्रीय चलनाची व्यवस्था किंवा आंतर-राष्ट्रीय हुंड्यांच्या व्यवहाराची पद्धति व्यावहारिकतेच्या क्षेत्रांत न आल्यानें युद्धोत्तर काळासाठीं सुचविण्यांत आलेल्या ब्रिटिश व अमेरिकन आंतर-राष्ट्रीय चलन योजनांत सोन्यास स्थान देण्यांत आलेलें आहे. ह्या दोन्ही योजनांमध्यें आंतर-राष्ट्रीय देवघेवींचा मूल्य आधार म्हणून सोन्याचें चलन सुचविण्यांत आलें आहे आणि निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपलें चलन त्यास जुळतें करून घ्यावयाचें आहे. ह्यावरून असें दिसतें कीं चलनपद्धतींतलें पूर्वीचें सोन्याचें स्थान अबाधित रहाणार असून युद्धोत्तर काळांतील प्रचंड घडामोडींमध्यें त्याची किंमतहि विशेष उतरण्याचा संभव नाहीं. आपली योजना स्पष्ट करतांना लॉर्ड केन्स ह्यांनीं सोन्याच्या युद्धोत्तर स्थानाबाबत खालील उद्गार काढले आहेत:—"योजनेंत वस्तुस्थिति हिशेबांत घेतलेली आहे. सोन्याची चढलेली किंमत आणि त्या धातूची कांहीं संबंधांत उपयुक्तता ह्या त्या गोष्टी होत. तथापि, आंतर-राष्ट्रीय चलनाचें मोल सोन्याचा कमी-अधिक होणारा पुरवठा किंवा त्या धातूच्या संग्रहाचा आधार ह्यांवर अवलंबून रहाणार नाहीं, अशी खबरदारी घेण्यांत आली आहे.

---

## आंतरराष्ट्रीय चलन व हुंडणावळ

युद्धसमाप्तीनंतर तात्काळ अमलांत आणावयाच्या आंतर-राष्ट्रीय चलन व हुंड्यांचा व्यवहार ह्यांचेविषयींच्या व्यवस्थेची चर्चा इंग्लंड व अमेरिका ह्यांचे दरम्यान चालू आहे. ब्रिटिश सरकारनें ह्या बाबतींत कांहीं योजना सुचविली आहे आणि लॉर्ड केन्स ह्या प्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाच्या व्यावहारिक कल्पनांस प्रसिद्धि मिळाली आहे. सोन्याच्या विशिष्ट वजनावर आधारलेलें चलन सर्व देशांत असावें आणि राष्ट्रीय चलनांचा परस्परांशीं संबंध निश्चित केला जावा; आंतरराष्ट्रीय व्यापारास उत्तेजन मिळावें आणि कमकुवत राष्ट्रांस श्रीमान् राष्ट्रांनीं आर्थिक सहाय देणें शक्य व्हावें अशी सर्वसाधारण व्यवस्था असावी हें त्या कल्पनेच्या मुळाशीं मुख्य तत्त्व आहे. मागील युद्धानंतर राष्ट्राराष्ट्रांत चलन, हुंडणावळ, व्यापार इत्यादि बाबतींत अनिष्ट स्पर्धा झाली. तो प्रकार ह्या खेपेस टळावा ह्या उद्देशानें अमेरिकन सरकारनें आपलीहि एक योजना तात्काळ विचारांत घेतली जावी असें मित्रराष्ट्रांस नुकतेंच कळविलें आहे. आंतर-राष्ट्रीय व्यवहारांत स्थैर्य उत्पन्न व्हावें म्हणून एक मोठा फंड निर्माण करावा, त्यांत भांडवल घालण्याची मुभा सर्व राष्ट्रांस असावी, सोनें, परराष्ट्रीय हुंड्या व स्थानिक चलन ह्यांच्या स्वरूपांत ह्या फंडांत पैसे घालतां यावेत, सोन्यावर आधारलेलें आंतर-राष्ट्रीय चलन असावें आणि हुंडणावळीसारख्या व वरील फंडाचे बाबतींत एका आंतरराष्ट्रीय समितीनें अधिकार चालवावा व राष्ट्रांचीं परस्पर.देणीं भागवण्याकडे आंतरराष्ट्रीय फंडाचा विनियोग व्हावा इत्यादि कलमें अमेरिकेनें सुचविलेल्या योजनेंत आहेत. अमेरिकेसारख्या सुवर्णसंपन्न देशाच्या हातांत ह्यासारख्या व्यवस्थेनें आंतरराष्ट्रीय व्यवहारांवरची सत्ता जाणार, हें उघड आहे. ह्यासंबंधांत ब्रिटिश सरकारचें काय म्हणणें आहे आणि होऊं घातलेल्या योजनेंत हिंदुस्थानास कोणतें स्थान मिळेल हें अर्थात्‌च आज अनिश्चित आहे.

---

## आखूड धाग्याची कपास पेरणारांस इषारा

सध्या कपाशीचा बाजारभाव पुष्कळच वाढलेला आहे, म्हणून हुरळून जाऊन शेतकऱ्यांनीं येत्या मोसमांत आखूड धाग्याची कपास आणखी पेरूं नये, अशा अर्थाची सूचना हिंदुस्थान सरकारनें एक पत्रक काढून केली आहे. हिंदी कपाशीचें बाहेरील गिऱ्हाईक नाहींसें झाल्याकारणानें १९४१–४२ च्या मोसमांतील कपाशीस मागणी एकदम कमी आली व हिंदुस्थान आणि प्रांतिक सरकारांनीं कपास, विशेषतः आखूड धाग्याची कपास, कमी पेरण्याविषयीं प्रचार सुरू केला त्यामुळें १९४२–४३ च्या मोसमांत लागवड २०% कमी झाली. त्या प्रमाणांत अर्थातच धान्यांची लागवड वाढली. आखूड धाग्याच्या कपाशीस चालू मोसमांत मागणी वाढण्याचा संभव नाहीं, ह्या दृष्टीनें गेल्या मोसमांतील कपाशीच्या लागवडीच्या क्षेत्रापेक्षां अधिक क्षेत्र चालू मोसमांत असण्याचें कारण नाहीं, अशी इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीची शिफारस आहे, तिला अनुसरूनच हिंदुस्थान सरकारनें वरील पत्रक काढलें आहे. कपाशीची एकूण लागवड न वाढवितां आखूड धाग्याऐवजीं लांब धाग्याची कपास जेवढी पेरतां येईल तेवढी जरूर पेरावी, असाहि सेंट्रल कॉटन कमिटीचा सल्ला आहे. सध्याच्या बाजारभावाच्या आकर्षणास बळी पडून आखूड धाग्याच्या कपाशीची पैदास शेतकऱ्यांनीं वाढविली तर त्यामुळें होणाऱ्या किंमतींतील घटीस सरकार जबाबदार रहाणार नाहीं व बाजारभावाची पातळी राखण्यासाठीं स्वतः कपास खरेदी करण्याची जबाबदारी सरकार स्वीकारत नाहीं, असा स्पष्ट इषारा सरकारनें दिला आहे. धान्याच्या किंमती प्रतिकूलपणें खालीं गेल्या तर मात्र योग्य किंमतीस धान्य विकत घेण्याची सरकारची तयारी आहे, हें मागेंच प्रसिद्ध झालेलें आहे.

---

## रत्नागिरी व कानडा या जिल्ह्यांतील नारळ-सुपारी या टिकाऊ पिकांची आजची परिस्थिति

रत्नागिरी व कानडा या दोन जिल्ह्यांतील महत्त्वाचीं पिकें म्हणजे भात, नागली, आंबे, नारळ व सुपारी हीं होत. भात व नागली हीं पिकें तेथील लोकांनाच पुरेशीं नसल्यामुळें तीं बाहेर पाठवून त्यांचा पैसा करणें शक्य नाहीं. आंब्याचें पीक थोडा पैसा देतें, परंतु, त्याला रोग फार, पीक हुकमी नाहीं, नाशवंत, मागास आलें किंवा लवकर वादळ सुरू झालें तर तें बहुतेक फुकट जातें.

आतां राहतां राहिली नारळ व सुपारी. ह्या संबंधांतील माहितीचा एक लेख " शेतकी आणि शेतकरी "च्या ताज्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. त्याचा कांहीं भाग येथें उद्धृत केला आहे. मुंबई इलाख्यांत नारळाखालीं ४५,२१५ एकर क्षेत्र आहे. त्यांपैकीं रत्नागिरी जिल्ह्यांत ३०,९४८ एकर व कानडा जिल्ह्यांत ११,५४३ एकर क्षेत्राचा समावेश झालेला आहे. सन १९३८-३९ सालीं युद्ध सुरू असूनसुद्धां ६१॥ लाखांवर नारळ हिंदुस्थानांत परदेशांतून आले. याशिवाय खोबरें, खोबरेल तेल, काथ्या, सुंभ, मार्गरीन हे जिन्नस येतात ते निराळेच.

रत्नागिरी व कानडा या दोन जिल्ह्यांच्या मध्यभागीं असलेल्या गोवा प्रांतांतहि नारळाची मोठी लागवड आहे. त्या प्रांताचें क्षेत्र रत्नागिरी किंवा कानडा या जिल्ह्यांच्या सुमारें एकतृतीयांश आहे. गोवा प्रांतांतून सन १९३२ सालीं ३,०४,१२,९६७ इतके नारळ निर्गत झाले. याची किंमत ८,९९,६५५ रुपये व ७,६८२ मण खोबरें किंमत रु. ६७,९५२ बाहेर निर्गत झाल्याचे आंकडे मिळतात. रत्नागिरी व कानडा या जिल्ह्यांतील या जिनसांचे निर्गतीचे आंकडे मिळत नाहीं. परंतु आमचे माहितीप्रमाणें तें प्रमाण कमी आहे.

नारळाचें इतकें महत्त्वाचे हें पीक असून सुद्धां तें कसें सुधारतां येईल, त्याची आणखी लागवड कशी करतां येईल, गोवा प्रांतामध्यें डोंगराच्या उतरणीवर बिनपाण्यावर नारळीची लागवड कशी करतां येईल, यासंबंधींचे प्रयत्न व प्रयोग व्हावयास पाहिजेत. कुमठा येथील प्रयोगक्षेत्रावर कांहीं प्रयोग झाले, परंतु त्याचा प्रसार झाला नाहीं, अगर त्यासंबंधींचा उल्लेख सरकारी रिपोर्टांत आतां येत नाहीं. शेतकीखात्यानें या प्रश्नांत अधिक लक्ष घालून या टिकाऊ पिकांचें क्षेत्र व उत्पन्नांत वाढ करण्याचा मार्ग या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना दाखवून दिल्यास त्या खात्यास खात्रीनें धन्यवाद मिळतील.

आमच्या समजुतीप्रमाणें गोवा प्रांतांत जशी डोंगरांत बिनपाण्यावर नारळाची लागवड होते, तशी सबंध कानडा जिल्हा व रत्नागिरीच्या दक्षिणच्या चार तालुक्यांत तरी होण्यास मुळींच हरकत नाहीं. तशीच खाड्यांच्या कांठींहि आणखी ती वाढविण्यासारखी आहे.

सुपारीच्या पिकाविषयीं विचार करतां असें दिसून येतें कीं परदेशांतून दरवर्षास जवळ जवळ दीड कोटी रुपयांची सुपारी हिंदुस्थानांत येते. रत्नागिरी जिल्ह्यांत सुपारीचें क्षेत्र ३,८८४ एकर आहे. व कानडा जिल्ह्यांत १८,०१९ एकर आहे. गोवा प्रांतांतून सन १९३२ सालीं २,३९,००० रुपये किंमतीची सुपारी निर्गत झाली. सुपारीच्या गळ किंवा कोळे रोगावर शेतकीखात्यानें संशोधन केलें, पण त्या गोष्टीस आतां तीस वर्षें झालीं. त्यानंतर सुपारीचें पीक वाढवून त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देण्याबाबत कांहीं प्रयत्न झाल्याचें आमचे ऐकिवांत नाहीं. सुपारीच्या बांडरोगामुळें व इतर कांहीं रोगांमुळें फार नुकसान होतें अशी तक्रार अनेक वर्षें आहे, परंतु त्याचें निवारण झालेलें दिसत नाहीं. महत्त्वाच्या व उत्पन्न देणाऱ्या अशा या दोन पिकांकडे शेतकीखात्यानें लक्ष देऊन शेतकऱ्यांचे पदरांत अधिक पैसा कसा पडेल हें पहाण्याची वेळ टळत चालली असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी चलनाच्या फाजील विस्तारावर उपाययोजना

### हिंदी अर्थशास्त्रज्ञांचें पत्रक

हिंदी चलनाच्या फाजील विस्तारासंबंधीं भयसूचना देऊन त्यावर उपाययोजना सुचविणारें एक पत्रक हिंदुस्थानांतील प्रो. काळे प्रो. गाडगीळ, प्रो. शहा, प्रो. वकील, प्रो. कर्वे, प्रो. वाडिया, प्रो. ग्यानचंद प्रभृति प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं काढलें आहे. त्या पत्रकाचा सारांश खालीं दिला आहे. अशा तऱ्हेचें पत्रक वेळेवर काढून व इन्फ्लेशनच्या अनिष्ट परिणामांकडे सरकारचें लक्ष वेधून वरील अर्थशास्त्रज्ञांनीं आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजाविलें आहे.

गेल्या दोन वर्षांतील बाजारभावांतील वाढ व चलनाचा विस्तार ह्यांचा कार्यकारणाचा संबंध आहे. ब्रिटिश व संयुक्त राष्ट्रांच्या खरेदीचे पैसे पौंडांचे चलनांत स्वीकारून त्यांचे बदली रुपये देण्याचें धोरण हिंदी चलनाच्या अप्रमाणबद्ध विस्ताराच्या मुळाशीं आहे. त्यामुळें लंडनमध्यें पौंड साठतात व त्यांचे आधारावर हिंदी चलनांत वाढ होते. हिंदुस्थान सरकार आपल्या नेहमींच्या बजेटांतील रकमांची व्यवस्था ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतच करतें; त्याप्रमाणेंच ह्या खरेदीच्या पैशाची व्यवस्था होणें आवश्यक आहे. ही गोष्ट सरकारास मान्य न झाल्यामुळें सध्याच्या हिंदी आर्थिक व चलनाविषयक प्रश्नाकडे त्यास योग्य दृष्टीनें पहाणें कठीण झालेलें दिसतें. आपल्या बजेटांतील तुटीपुरती तरतूद करून, ब्रिटिश सरकारची नड जास्त नोटा छापून भागवितां येण्याजोगी आहे, असें सरकारी धोरण असल्याचें आढळतें. त्यामुळें, अंतर्गत उत्पादन व व्यापार ह्यांचे प्रमाणाबाहेर चलनाचा विस्तार झाला आहे. ह्या विस्ताराचें चक्र कोठें थांबणार, हें समजत नाहीं. बाजारभाव असेच वाढत गेल्यास, लोक चलनाऐवजीं मालाचे स्वरूपांत आपली जिंदगी ठेवूं लागतील, अशी भीति वाटते. इन्फ्लेशनमुळें युद्धखर्चाचा बोजा गरिबांवर जास्त पडतो. त्यामुळें युद्धाचा खर्चहि वाढतो. इन्फ्लेशनचे आर्थिक परिणाम तात्काळ निदर्शनास येतात, परंतु त्याचे मागून येणार राजकीय परिणामहि दृष्टीआड करून चालणार नाहीं. चलनाच्या फाजील विस्तारास आळा घालण्यासाठी तातडीचे व कडक उपाय योजण्यांत आले पाहिजेत, असें आमचें निश्चित मत आहे. उत्पन्न-खर्चांतील तूट भरून काढण्यासाठी कर वाढविणें व कर्ज उभारणें, हा पहिला उपाय आहे. करवाढ शक्य तितकी केली पाहिजे. ज्यांस सहन करतां येईल, अशांकडून चढत्या दरानें इनकम् टॅक्स वसूल केला पाहिजे. कर्जउभारणीसाठीं सक्तीच्या बचतीची व्यापक योजना आखली पाहिजे व पैसे गुंतविण्याच्या सर्व मार्गांवर नियंत्रण बसविलें पाहिजे. हें सर्व तातडीनें अंमलांत आणणें जरूर आहे. फाजील चलन आटोक्यांत येण्यास थोडा काळ लागणें स्वाभाविक आहे, परंतु सध्याचा चलनविस्तार चालू भारी बाजारभावांचे मानानेंहि फाजील आहे. सर्व तऱ्हेच्या किंमतींवर प्रभावी नियंत्रण बसवून त्या ताळ्यावर आणणें अगदी लवकर हातीं घेतलें पाहिजे. हें सर्व मध्यवर्ती व एकसूत्री नियंत्रणानेंच घडून येण्याजोगें आहे. असें व्यापक धोरण अंगीकारलें तरच चलनाच्या फाजील विस्ताराच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक परिणामांपासून हिंदुस्थानाचा बचाव होऊं शकेल. हिंदुस्थान सरकारनें अंगावर घ्यावयाचा खर्चाचा बोजा, त्यास कर व कर्ज ह्यांचे स्वरूपांत उचलतां येईल त्यापेक्षा भारी असूं नये, हें नमूद करणें आम्हांस आवश्यक वाटतें.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.,
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

### डायरेक्टर्स

श्री. घों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. बर्वे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, श्री. फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कमीशनीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणी बरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळबे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,२०,५०,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतींच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सकामीं बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. टालवाणी.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवींवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. | नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.



मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

| जाहिरातींचे दर. | | वर्गणीचे दर. |
|---|---|---|
| खालील पत्त्यावर चौकशी करावी. व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४. | | वार्षिक वर्गणी रु. ४ (टपाल हंशील माफ) किरकोळ अंकास दोन आणे. |

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ | पुणें, बुधवार, तारीख २१ एप्रिल १९४३ | अंक १६

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

डायरेक्टर्स

श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. बर्वे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, श्री. फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रकम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळबे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं!!!

— कारण —

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

औषधें मागवा.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### १ जुलै

बँकांना आपले सहामाही हिशेब पुरे करतां यावे, ह्याकरितां मुंबई सरकारनें मुंबई शहरापुरता १ जुलै हा दिवस सुट्टीचा दिवस म्हणून जाहीर केला आहे.

### रेशनिंग

मुंबई शहरांतील रेशनिंगच्या प्रारंभाची तारीख थोडी पुढें ढकलण्यांत आली आहे.

### दरमाणशी करभार

१९४२-४३ मध्यें हिंदुस्थानाच्या मध्यवर्ती सरकारच्या करांचें उत्पन्न सुमारें ११४ कोटि रुपये झालें. १९४१ च्या शिरगणतीच्या आकड्यांच्या आधारानें, दरमाणशी मध्यवर्ती सरकारचा करबोजा ३ रु. ११ आ. ७ पै इतका पडला. ग्रेट ब्रिटनमधील करभार दरमाणशी ५० पौंड व अमेरिकेंत १९० डॉलर इतका आहे.

### धान्यांच्या लागवडीची मोहीम

धान्यांच्या उत्पादनाची वाढ करण्याबाबतच्या मोहिमेस किती वाव आहे, हें नीट समजून यावें, ह्याकरितां बंगाल सरकारनें आपल्या प्रांतांतील वेगवेगळ्या धान्यांच्या लागवडीचे आकडे गोळा करण्याकरितां ३½ लक्ष रुपये मंजूर केले आहेत.

### कचऱ्यापासून खत

शहरांतील कचऱ्याचें खत बनविण्याच्या पद्धतीचे प्रयोग सेंट्रल फूड ॲडव्हायसरी कौन्सिलच्या विद्यमानें बंगलोर येथील रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्यें करण्यांत येऊन देवळाली येथील एका लष्करी कँपमध्यें त्याचा पडताळा पहाण्यांत आला. प्रयोग यशस्वी ठरले असून मुंबई प्रांतांतील ३० म्युनिसिपॅलिटयांच्या नोकरवर्गास हें नवें तंत्र शिकविण्याचें निश्चित झालें आहे.

### इराक पेट्रोलियम कंपनीकडून इराकी सरकार कर्ज घेणार

इराक पेट्रोलियम कंपनीकडून इराक सरकार १५ लक्ष पौंड कर्ज काढणार आहे. कंपनीच्या दुय्यम कंपन्या, बसरा पेट्रोलियम कंपनी व मोसल ऑइल फील्ड्स, ह्यांची वाढ होण्यासाठी दिलेल्या सवलती युद्धसमाप्तीनंतर दोन वर्षें चालू रहातील, हा इराक पेट्रोलियम कंपनीस मोबदला मिळणार आहे.

### म्युनिसिपॅलिटयांची थकलेली वसुली

बार्शी, चाळिसगांव, लोणावळें व नाशिक ह्या शहर म्युनिसिपॅलिटयांच्या वसूल व्हावयाच्या कराची थकबाकी ३५% आहे. इंदापूर व होनावर म्युनिसिपॅलिटयांच्या कराची बाकी अनुक्रमें ८१% व ७५% आहे. इतर आणखी १६ म्युनिसिपॅलिटयांची थकलेली बाकी ५०% आहे. १९४१-४२ अखेरच्या व्यवहाराचे हे आकडे आहेत.

### बटवड्याच्या वेळांत छाटाछाट

ग्रेटब्रिटनमधील पोस्ट खात्यानें टपालाच्या बटवड्याच्या वेळा कमी केल्या आहेत, त्यामुळें ५,००० स्त्रिया व २ हजार पुरूष इतर कामासाठी उपलब्ध होतील. रात्रीच्या वेळी तारा करण्याची सवलतहि रद्द करण्यांत आली आहे.

### रेशमाच्या किड्यांच्या पैदाशीस उत्तेजन

शेतकऱ्यांस रेशमाच्या किड्यांची पैदास करण्यास तयार करण्याचे उद्देशानें मुंबई सरकारनें तीन प्रात्यक्षिक गटांची योजना आखून त्यांवर तीन डेमॉन्स्ट्रेटर नेमले आहेत. शिकाऊ शेतकऱ्यांस दरमहा १० रुपये मिळतील. शिक्षण पुरें झाल्यावर सुमारें १० रुपयांचीं उपकरणें त्यास मिळतील. शिकून तयार झालेल्या शेतकऱ्यांच्या उत्पादनाची विक्री करण्यासाठी ५ हजार रुपयांचें खेळतें भांडवल मंजूर करण्यांत आलें आहे.

### युद्धकैद्यांना पत्रें

इंटर नॅशनल रेडक्रॉस मार्फत मलाया, जावा, शांघाई, हाँगकाँग, चीन, फिलिपाइन्स, ब्रह्मदेश व जपान ह्यांतील युद्धकैद्यांकडे २ लक्ष पत्रें पोचविण्यांत आलीं आहेत. त्यांपैकीं १ लक्ष, ८० हजार पत्रें एकट्या मलायाकडे गेलीं.

### जेवणावळींवर नियंत्रण

एकाच दिवशीं पन्नासापेक्षा ज्यास्त लोकांना जेवणावळ घालतां कामा नये असा नियम मुंबई सरकारनें केला. त्याची अंमलबजावणी टाळण्यासाठी जेवण देणारे लोक इतरांच्या घरीं अन्न पाठवूं लागले, असें आढळून आल्यावरून, सरकारनें नियमांत दुरुस्ती करून तो नियम अधिक व्यापक केला आहे.

### ग्रामोद्योगाचें प्रायोगिक वर्कशॉप

खेडेगांवांतील उद्योगधंद्यांचें एक प्रायोगिक वर्कशॉप पुणें येथें आहे. तें ३१ मार्च, १९४६ अखेर चालू ठेवण्यांत येणार आहे. ह्या वर्कशॉपमध्यें शिकण्यास येणाऱ्या शेतकऱ्यांना दरमहा १५ रुपयांऐवजी ह्यापुढें २० रुपये मासिक शिष्यवृत्ति मिळणार आहे.

### जर्मनीचें वाढतें कर्ज

जर्मनीच्या राष्ट्रीय कर्जाचा आकडा आतां ९३० कोटि पौण्डांवर गेला आहे. हिटलरच्या सत्तेस प्रारंभ झाला, त्यावेळीं जर्मनीचें राष्ट्रीय कर्ज ५९ कोटि पौण्ड होतें. युद्धाच्या पहिल्या वर्षी त्यांत ९० कोटींची, दुसऱ्या वर्षी १७० कोटींची व १९४१ सालीं २५० कोटींची भर पडली.

### शालेय पुस्तकांच्या किंमतींत वाढ

छपाईचा कागद व इतर जिनसा ह्यांची वाढलेली किंमत लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें शालेय पुस्तकांच्या प्रकाशकांस पुस्तकांच्या किंमती ४०% ते ५२½% वाढविण्यास परवानगी दिली आहे. युद्धपूर्व किंमतीमध्यें वरीलप्रमाणें वाढ करतां येईल व पांढऱ्या कागदावर छपाई केलेल्या नवीन आवृत्त्या व पुनर्मुद्रणें ह्यांसच ती लागू होईल. ठरवून दिलेल्या किंमतीस अगोदरच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या किंमती वाढवितां येणार नाहींत.

### साक्षरतेंत वाढ

१९३१ च्या मानानें १९४१ सालीं हिंदुस्थानांत साक्षरतेचें प्रमाण पुष्कळच वाढलेलें आहे. सर्वांच्या मिळून साक्षरतेच्या प्रमाणांत ७०% वाढ झालेली आहे. पुरुषांची साक्षरता ६०% वाढली व स्त्रियांतील साक्षरता १५०% वाढली.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १२२ | विभाग-अधिकारी-जर्मनी खंडणी कशी वसूल करतो | |
| २ चलनविस्तार आणि हिंदी अर्थशास्त्रज्ञ ... | १२३ | ५ ब्रिटिश सरकारचें बजेट | १२६ |
| ३ ब्रिटिश बँकांचे परराष्ट्रांतील व्यवहार ... | १२४ | ६ जपान अंकित देश ... | १२६ |
| ४ स्फुट विचार... ... | १२५ | ७ मितव्यय मोहीम ... | १२७ |
| हिंदुस्थानांत युद्धोत्तर घटना-अन्न पुरवठ्यासाठी | | ८ ब्रिटिश आगीच्या विमा कंपन्या ... ... | १२७ |



# अर्थ

बुधवार, ता. २१ एप्रिल, १९४३


## चलनविस्तार आणि हिंदी अर्थशास्त्रज्ञ

हिंदुस्थानमध्यें सरकारला कागदी चलनाचा विस्तार झपाट्यानें सारखा करावा लागत आहे आणि त्याचा परिणाम पदार्थांच्या किंमतीवर होत आहे. मालाचा अपुरा पुरवठा हें त्याच्या महागाईचें एक कारण असलें तरी, जरूरीच्या मानानें अधिक चलन व्यवहारांत खेळल्यानें बाजारभाव चढत रहाणें अपरिहार्य आहे हें निर्विवाद आहे. नवीन चलनास म्हणजे चलनी नोटांस लंडनमध्यें धारण केल्या जाणाऱ्या स्टर्लिंगमधील रोख्यांचें भरपूर कायदेशीर तारण आहे. परंतु देशांतील मालाचें उत्पादन व पुरवठा ह्यांचे मानानें व्यवहारांत खेळणारें चलन, कितीतरी पटीनें अधिक असल्यानें तें बाजारभाव सारखे चढवीत जाण्यास कारणीभूत होतें. ह्या रीतीनें उत्पन्न होणाऱ्या महागाईमुळें उत्पादन खर्च व लोकांची रहाणी ह्यांत वाढ होऊन समाजाची आर्थिक अवस्था दुःसह होऊं लागते ह्या गोष्टींची जाणीव राष्ट्रीय सरकारास असते आणि समाजांत खेळणारें चलन कर आणि कर्जें ह्यांच्या द्वारांनीं आपल्या तिजोरींत शोषू न देण्याचा प्रयत्न तीं करीत असतात. हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांस ह्या बाबींची पूर्ण जाणीव आहे पण येथील परिस्थिति वेळींच ताब्यांत आणण्याचें त्यांस अजून साधलेलें नाहीं. कांहींजण तर चलनविस्ताराचा व महागाईचा प्रत्यक्ष संबंध नाहीं आणि चलन विस्तारापेक्षा पुरवठ्याच्या अपुरेपणावरच मुख्य भर दिला पाहिजे असें सांगत आहेत. अनियंत्रित चलन विस्ताराचे घोर परिणाम आणि त्यांचेवर आवश्यक असलेले उपाय सरकारापुढें ह्या स्थितींत तज्ञांनीं स्पष्ट रीतीनें मांडणें अगत्याचें झालें आहे. ही महत्त्वाची कामगिरी वीस प्रमुख हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं बजावली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. मुंबई प्रांतांतील प्रा. धनंजयराव गाडगीळ, प्रा. काळे, प्रा. कर्वे, प्रा. वकील, प्रा. शहा ह्यांनीं पुढाकार घेऊन एक पत्रक तयार केलें असून त्यास इतर प्रांतांतील कित्येक प्रमुख अर्थशास्त्रवेत्त्यांची संमती मिळवली आहे. हें पत्रक हिंदुस्तान सरकारच्या फडनवीसांस सादर करण्यांत आलें आहे आणि लोकांच्या माहितीसाठी त्यास प्रसिद्धी देण्यांत आली आहे. चलनाचा फाजील विस्तार झाला असतां त्या योगानें युद्धखर्चाचा अवास्तव बोजा विषम रीतीनें मध्यम व कनिष्ट स्थितींतल्या लोकांवर पडतो आणि युद्धखर्च वाढून युद्धप्रयत्नांत अडथळा उत्पन्न होतो असें प्रस्तुत पत्रकांत म्हटलें आहे. स्वतःचा खर्च कर आणि कर्जें ह्यांच्या मार्गानें सरकार भागवतें पण ब्रिटिश सरकाराच्यासाठी जो खर्च ह्या देशांत करावा लागतो त्याची नवीन नोटा काढून तें तरतूद करतें. देशाच्या उत्पादनास व व्यापारास ह्या जादा चलनाची आवश्यकता नसते, तरीहि तें समाजांत खेळत रहातें आणि तें कृत्रिम महागाई उत्पन्न करण्यास कारणीभूत होतें. साम्राज्य सरकाराप्रीत्यर्थ होणारा बहुतेक सर्व खर्च नोटा काढल्या जाऊन केला जातो आणि हें फाजील चलन अत्यंत घातुक ठरतें. हिंदुस्थानचें लंडनमधील कर्ज फेडून टाकण्यांत आलें आहे, त्याची जागा हिंदी सरकारी रोखे घेतील त्या प्रमाणांतच चलन सरकाराकडे परत येतें आणि बाकीचें व्यवहारांत खेळत रहातें. ह्या आपत्तीवर एकच रामबाण उपाय आहे आणि तो म्हटला. म्हणजे कर आणि कर्जें ह्यांच्या द्वारांनीं पैसा सरकारी तिजोरींत खेचणें हाच आहे असें अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे.

श्रीमान लोकांकडून त्यांच्या फाजील प्राप्तीपैकी अधिकांत अधिक अंश घेणें, फाजील खर्चाचीं तोंडें बंद करणें, सक्तीची बचत चालू करणें आणि सरकारी तिजोरींत कर्जाच्या रूपानें जास्तींत जास्त पैसा येण्याचे सर्व मार्ग अवलंबणें हे कडक उपाय पत्रकांत सुचवण्यांत आले आहेत. ह्याच बरोबर बाजारभावांचें नियंत्रण झालें पाहिजे म्हणजे कामकरी लोकांची रहाणी महागाईची आणि जाचक व्हावयाची नाहीं आणि नफे व किंमती ह्यास एकाच वेळीं मर्यादा घालण्यांत आली पाहिजे. फाजील चलनाच्या वाढीचे घोर दुष्परिणाम लक्षांत घेतले असतां वरील कडक उपाय सौम्यच समजले पाहिजेत. चलनजन्य महागाईमुळें जनतेचें भयंकर नुकसान होत आहे. आणि त्याचे परिणाम सध्याची व्यवस्था चालू राहिल्यास दुःसह होण्याची भीति आहे. महागाईमुळें बहुजन समाजाची रहाणी कष्टाची होते आणि युद्धखर्चाचा अवास्तव बोजा अप्रत्यक्ष रीतीनें त्याचेवर पडतो. स्वतःच्या बजेटांतील तूट कर व कर्ज ह्यांच्या मार्गांनीं भरून काढली कीं आपली जबाबदारी संपली अशी सरकारी फडनाविसांची कल्पना दिसते ती चुकीची आहे. ब्रिटिश सरकारासाठी हिंदुस्थानांत होणारा खर्च हाहि तुटीच्या स्वरूपाचाच आहे आणि त्याकरितां प्रचलित केल्या जाणाऱ्या चलनी नोटा मध्यवर्ति सरकारकडे कर्जाच्या मार्गानें परत आल्या पाहिजेत. ह्या नोटांच्या मोबदल्यांत येथील सरकारास लंडनमध्यें पौंड मिळतात, पण ह्या देशांत पौंडाच्या आधारावर काढलेलें चलन समाजांत खेळत रहातें आणि तें महागाई वाढवीत जातें. मालाचा पुरवठा मागणीपेक्षां कमी आहे म्हणून महागाई होते हें खरें असलें तरी मर्यादित पुरवठ्याच्या व्यवहारासाठी खेळणारें चलन कमी लागावें हें स्पष्ट आहे. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, पुरवठा वाढत नसून चलन मात्र झपाट्यानें वाढत आहे. हें भटकणारें चलन सरकारनें जमा करून डांबून टाकलें पाहिजे तरच कृत्रिम महागाईचा प्रश्न सुटेल असें अर्थशास्त्रज्ञांच्या पत्रकाचें सार आहे. इंग्लंड, अमेरिका वगैरे राष्ट्रांसाठी चलन पुरवावयाचें तें हिंदुस्थान-सरकारनें आपल्या लोकांच्या जवळचा फाजील पैसा आकर्षून घेण्याच्या शक्तीच्या मर्यादेंत पुरवावें आणि ह्या बाबतींत अंथरूण पाहून हातपाय पसरावे असें त्यांचें निक्षून सांगणें आहे.

## ब्रिटिश बँकांचे परराष्ट्रांतील व्यवहार

युद्धपरिस्थितींतहि एक्सचेंज बँकांचा व्यवहार भविष्यकाळाच्या उज्ज्वलतेवर विश्वास ठेवून कसा व्यवस्थितपणें चालविण्यांत येतो, ह्याचें उदाहरण म्हणून ऑटोमन बँक लि. चे अध्यक्ष सर हर्बर्ट लॉरेन्स ह्यांनीं बँकेच्या गेल्या (७५ व्या) वार्षिक सभेच वेळीं केलेल्या भाषणांतील कांहीं उतारे खालीं दिले आहेत.

### ओटोमन बँकेच्या अध्यक्षांचें भाषण

भापटीं फ्रेंच चलनांतील येणी-देणीं १७६.५० ह्या दरानें ताळेबंदांत दाखविण्यांत आलीं आहेत. फ्रान्सशीं ग्रेटब्रिटनचें दळणवळण तुटलें, त्यावेळचा हा हुंडणावळीचा दर आहे. ग्रीसमधील बँकेच्या शाखेचे १९४० असेरचेच हिशेब पुढें ओढले आहेत. बँकेच्या एकूण हिशेबांत फ्रेंच व ग्रीक शाखांचा व्यवहार १०% इतकाहि नाहीं. फ्रेंच व ग्रीक शाखांच्या नफ्याचा ताळेबंदांत समावेश झालेला नाहीं, हें सांगावयास नकोच. हुंडणावळीवरील नियंत्रणामुळें बँकेस परदेशांत झालेला बराच नफा स्टर्लिंगमध्यें आणतां आला नाहीं, म्हणून तो १९४१ च्या ताळेबंदांत समाविष्ट करण्यांत आलेला नाहीं, त्यामुळें बँकेच्या गंगाजळींत अदृश्य भर पडलेली आहे.

माहीत झालेलीं सर्व बुडीत व संशयित कर्जे ह्यांची तरतूद करून, बँकेस गेल्या वर्षी ९९ हजार पौण्ड नफा झाला. ब्रिटिश चलनांत वसूल झालेला अथवा होण्यासारखा हा सर्व नफा आहे. मागील शिलकी नफा त्यांत मिळविला, म्हणजे २ लक्ष, ८ हजार पौण्ड रक्कम होते. पूर्वीच्या वर्षांप्रमाणेंच नफा न वाटण्याची शिफारस बोर्ड करीत आहे. बँकेकडील ठेवी वाढत असून, अहवालाचे वर्षी त्यांत ८० लक्ष पौंडांची भर पडली आहे.

### तुर्कस्थान

तुर्कस्थान तटस्थ राहिला, तरी त्याच्या अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापारावर युद्धाचा परिणाम होणें स्वाभाविक आहे. समुद्रावरील वहातुकीच्या मार्गांतील अडचणी, सैन्य सुसज्ज ठेवण्याची आवश्यकता, वाईट हवेमुळें कमी पिकलेलीं द्विदल धान्यें, इत्यादि कारणांमुळें सरकारास नियंत्रणें बसवावीं लागलीं. औद्योगिक उत्पादन पुर्वीप्रमाणें चालू राहिलें तरी आयात कमी झाल्यामुळें कित्येक वस्तूंचा तुटवडा पडला आणि बाजारभाव पुष्कळच वाढले. यु. कि. कमर्शिअल कार्पोरेशनच्या व्यवहारांमुळें ग्रेटब्रिटन व तुर्कस्थान ह्यांचेमधील व्यापारवाढ सुलभ झाली. वाढत्या खर्चाची तरतूद करवाढ व करउभारणी ह्यांचेद्वारा करण्यांत आली. जमिनीच्या किंमती बऱ्याच वाढल्या. तुर्कस्थानांतील आपल्या शाखांचा व्यवहार चांगला झाला परंतु त्यांचा नफा ग्रेटब्रिटनमध्यें पाठविणें शक्य झालें नाहीं.

### इजिप्त

इजिप्तमधील कपाशीच्या पिकापैकीं फारच थोडें निर्गत करतां आलें तरी त्या देशांतील ब्रिटिश फौजांच्या खर्चाचा फायदा इजिप्तला मिळाला. आयात वाढली त्यामुळें बँकांस काम चांगलें मिळालें. सुएझच्या कालव्याचे विभागांतील लष्कराच्या सोईसाठीं बँकेनीं दोन शाखा उघडल्या. इजिप्तमध्यें बँकेचा व्यवहार किफायतशीर झाला.

### इराक व इराण

आगबोटींतून वहातुक करण्याची अडचण व अंतर्गत बंडाळी ह्यामुळें १९४१ च्या प्रारंभीं काम कमी झालें. बंडखोर सरकारनें पुढें ब्रिटिश बँका बुडविल्याचें जाहीर केलें. परंतु बंडाळी मोडल्यावर पुढच्या महिन्यांत बँका पुनः सुरू झाल्या. चलनी नोटांचा फार तुटवडा पडला, तो हिंदुस्थानांतून तांतडीनें नोटा छापून आणून दूर करण्यांत आला. ब्रिटिश फौजेच्या वास्तव्यामुळें व्यवहारांतील चलन वाढून महागाईहि वाढली. बंडाळी मोडल्यावर बँकांचें काम सुधारलें. खजुराचा मोसम बरा गेला. लोकरीची आयात कमी प्रमाणावर झाली. ब्रिटिश व रशियन फौजा इराणमध्यें दाखल झाल्यानंतर प्रजासत्ताक सरकारची स्थापना झाली व व्यापारावरील कृत्रिम बंधनें ढिलीं झालीं.

### पॅलेस्टाइन व सायप्रस

पॅलेस्टाइनमध्येंहि लष्कराच्या वास्तव्यामुळें व्यापार वाढला. बाजारभाव चढले. संत्र्यांचा निर्गत व्यापार अजिबात बंद पडला. तथापि सरकारी हमीखालीं बँकांनीं मळेवाल्यांस कर्जे दिलीं आहेत, त्यामुळें बागाइत चालू राहील व त्याचा फायदा पुढें मिळेल. सायप्रसमध्यें पावसाच्या अभावामुळें दुष्काळ पडला. त्यामुळें व्यापार मंदच राहिला.

आपल्या बँकेच्या पॅरीसमधील डायरेक्टरांशीं आमचा पत्रव्यवहार अशक्यच आहे. त्यांपैकीं दोघे बँकेच्या आर्टिकल्सप्रमाणें निवृत्त होत आहेत. त्यांची फेरनिवड करण्यांत यावी. (त्यांची एकमतानें फेरनिवड झाली.)


# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

# स्फुट विचार

## हिंदुस्थानांत युद्धोत्तर पुनर्घटना

युद्ध संपून शांतता पुन्हां प्रस्थापित झाली म्हणजे समाजाची विस्कटलेली आर्थिक घडी पुन्हां नीट बसवण्यासंबंधानें अनेक अवघड प्रश्न उपस्थित व्हावयाचे आहेत. लढाऊ फौज कमी होऊन शिपाई घरीं परत येतील, युद्धसामुग्रीचे धंदे बंद करावे लागतील, सध्याचीं अनेक सरकारी नियंत्रणें शिथिल व्हावीं लागतील किंवा काढून घेतलीं जातील इत्यादि महत्वाचे बदल घडून येणें अपरिहार्य आहे. वेळ येईल तेव्हां ह्या गोष्टींची व्यवस्था लावूं असें म्हणणें अदूरदर्शीपणाचें होईल आणि युद्ध चालू असतांनाच युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना तयार ठेवल्या पाहिजेत असें मत इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत सर्वत्र मान्य झालें आहे. हिंदुस्थानांतहि त्यांच्या धर्तीवर पुनर्घटनेच्या योजनांची व्यवस्था केली जाण्याचें महत्व येथील सरकारनें कबूल केलें आहे. निरनिराळ्या सरकारी खात्यांच्या उपसमित्या ह्या कामासाठी नेमल्या गेल्या असल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें होतें. परंतु ही तजवीज पुरेशी नसल्याविषयीं लोकमत व्यक्त झालें असल्यानें मध्यवर्ती सरकारचे मंत्री, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं प्रस्तुत विषयासंबंधानें अलीकडे जास्त खुलासा केला आहे. पुनर्घटनेच्या योजनांस जोर लागावा आणि त्यास मूर्तस्वरूप मिळण्याची कार्यक्षम तजवीज व्हावी ह्या हेतूनें मध्यवर्ती सरकारच्या कार्यकारी मंडळाची एक उपसमिती नेमण्यांत आली आहे हें एक महत्त्वाचें पाऊल पुढें टाकण्यांत आलें आहे असें त्यांचें म्हणणें आहे. वरील योजनांत एकसूत्रीपणा यावा आणि त्यांचें प्रत्यक्ष काम उत्साहानें चालावें ह्यासाठी आवश्यक असलेले अधिकारी व नोकर ह्यांची नेमणूक केलेली आहे आणि सरकारच्या आर्थिक सल्लागारांचा सबंध ह्या कार्याशी संबंध ठेवण्यांत आला आहे ही दुसरी गोष्ट त्यांनीं पुढें मांडली आहे. निरनिराळ्या बाबींचा विचार करण्यासाठी स्वतंत्र उपसमित्या नेमण्यांत आल्या असून त्यांच्या सूचनांचा मेळ घालण्यांत यावयाचा आहे. सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं वरील आशयाची माहिती दिली आहे, पण त्यांच्या आखणीस धरून प्रत्यक्ष कार्य किती व कोणतें झालें आहे हें समजल्यावाचून त्याची दिशा योग्य आहे कीं नाहीं ह्यासंबंधानें मत व्यक्त करणें कठीण आहे. सबंध प्रश्न गुंतागुंतीचा आहे हें खरें; तथापि इंग्लंडमध्यें व अमेरिकेंत कित्येक योजना बाहेर पडल्या आहेत त्यांचेप्रमाणे येथेंहि होणें अगत्याचें आहे.

---

## अन्नपुरवठ्यासाठी विभाग–अधिकारी

देशाच्या निरनिराळ्या भागांत अन्नाचा पुरवठा समदृष्टीनें करण्याची जबाबदारी प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या सहकारितेनें हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या शिरावर घेतली आहे. ती पार पाडण्यासाठी आपल्या धोरणांत एकसूत्रीपणा उत्पन्न करणें त्यास आवश्यक आहे. ह्यासाठी त्यानें देशाचे सहा भाग पाडून त्यांमधल्या व्यवस्थेवर देखरेख करण्याकरितां फुड कमिशनर्सची नेमणूक केली आहे. पंजाब, सिंध, बलुचिस्तान, वायव्यप्रांत आणि पंजाबांतलीं संस्थानें मिळून एक गट बनवण्यांत आला आहे. मेजर जनरल बेरेस्फर्ड ह्यांची त्यावर योजना झाली आहे. संयुक्त प्रांत व सेंट्रल इंडिया संस्थानें ह्यांचा दुसरा गट आहे आणि कर्नल दीनानाथ त्याचे कमिशनर आहेत. बंगाल, बहार, आसाम व त्यांतलीं संस्थानें ह्यांचा मिळून तिसरा गट बनला आहे. अलाहाबादचे माजी चीफ जस्टिस ब्रॉड हे त्याचे कमिशनर आहेत. मद्रास, म्हैसूर, त्रावणकोर, कोचीन ह्यांचा समावेश चवथ्या विभागांत केलेला असून त्यावरचे कमिशनर रावबहादुर करुणाकर मेनन हे आहेत. मुंबई, हैद्राबाद, मध्यप्रांत व वऱ्हाड व त्यांतलीं संस्थानें ह्यांचा पाचवा गट बनला आहे आणि त्यावरील अधिकाऱ्याची नेमणूक व्हावयाची आहे. राजपुताना, ग्वाल्हेर, भोपाळ, काठेवाड वगैरे भागांचा सहावा गट बनला आहे आणि सर अबदुल इमाम हे त्याचे कमिशनर आहेत. अन्नसामुग्रीच्या योग्य वाटणीच्या हेतूनें केलेली वरील योजना ठीक आहे. तथापि, ज्या कार्यासाठी ती आखण्यांत आली आहे तें काम त्वरित व सुरळीत होण्याची दक्षता प्रारंभापासूनच बाळगली जाणें अगत्याचें आहे. नाहींतर खातीं व अधिकारी ह्यांची संख्या वाढते तिच्याबरोबर अधिक पत्रव्यवहार व कालक्षेप होण्याची भीति असते. ती टाळण्यांत येऊन धान्यपुरवठ्याच्या वाटणीचें कार्य सुकर व कार्यक्षम होईल असें धोरण अंमलांत आणण्याची व्यवस्था प्रारंभापासूनच झाली पाहिजे.

---

## जर्मनी खंडणी कशी वसूल करतो !

जर्मनी युरोपांतील आपल्या अंकित देशांकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गानें युद्धसहाय्य कसें मिळवितो, ह्याची माहिती फिनॅन्शिअल ऑब्सर्व्हरच्या संपादकांनीं दिली आहे. जर्मनीच्या हिताकरितां केलेल्या योजनांचा शेवट युरोपांतील देशाच्या चलनाचा फाजील विस्तार होण्यांत होतो. युरोपांतील इतर देशांतील लोक जर्मनीस माल विकतात, त्याच्या मोबदल्यांत त्यांस मार्क मिळतात. हे मार्क ते आपल्या देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून मोडून घेतात. म्हणजे जर्मनीला माल मिळतो, अंकित देशांच्या मध्यवर्ती बँकांजवळ मार्कमध्यें येणें जमतें व अंकित राष्ट्रांचीं चलनें विस्तार पावतात. युरोपियन मध्यवर्ती बँकांच्या जिंदगींपैकीं ४०% ते ८०% येणें ह्या स्वरूपाचें आहे व त्याचे आधारावर त्यांनीं चलनविस्तार केलेला आहे. ग्रेट ब्रिटनला त्याच्या साम्राज्याकडून उसनवार मिळालेल्या मदतीपेक्षां ज्यास्त मदत जर्मनीला ह्या प्रकारानें झालेली आहे. कॅनडानें ग्रेट ब्रिटनला दिलेली देणगी व अमेरिकेनें खंड-उसनवार दिलेलें सहाय्य ह्यांची बेरीज जर्मनीस अप्रत्यक्ष रीतीनें मिळालेल्या वरील खंडणीपेक्षां कमीच भरेल. अंकित राष्ट्रांच्या कारखान्यांचें भांडवल विकत घेऊन त्यांत निर्णायक मताधिक्य मिळविण्याचेहि प्रयत्न जर्मनी करीत आहे. त्या देशांच्या बँकांवरहि जर्मन बँकांनीं हुकमत सुरू केली आहे. जर्मनीचें आर्थिक जाळें युरोपियन राष्ट्रांवर अशा तऱ्हेनें पसरलेलें आहे.

---

## मजूरसंघांस सक्तीची मान्यता

एखादा मजूरसंघ ( ट्रेड युनियन ) नोंदण्यांत आलेला असून तो व्यवस्थित जमाखर्च ठेवीत असला व त्यास सर्व नियम पाळल्याबद्दलचें रजिस्ट्रारचें सर्टीफिकिट मिळालेलें असलें, तर त्या संघास मान्यता देणें मालकांस सक्तीचें व्हावें, असा कायदा लवकरच होणार आहे. हितसंबंधी मजुरांपैकीं निदान ३०% तरी संघाचे सभासद असले पाहिजेत अशी कायद्यांत तरतूद असावी, ही प्रांतिक सरकारांची सूचना मान्य झालेली नाहीं.

### जपानअंकित देशांचें जपानीकरण

जपान पादाक्रांत केलेल्या देशांना कसें वागवीत आहे, ह्याची खालील माहिती बँक इन्फर्मेशनमध्यें प्रसिद्ध करण्यांत आली आहे:—

" टोकियोचा रेडिओ जगास एक दर्शवितो, परंतु स्वदेशीयांस जपान आपल्या अंकित देशांस कसें वागवणार ह्याबद्दल अगदीं वेगळेंच सांगतो. " आठ दिशा, एक स्वामित्व " ह्या तत्त्वावर जपानचें धोरण आधारलेलें आहे. लष्करी येन ह्या चलनाचे विनिमयांत जपान अंकित राष्ट्रांतील सर्व जिनसा खरेदी करतो. हें चलन न स्वीकारणाऱ्या व्यापाऱ्यास तुरुंगाचा मार्ग दाखविण्यांत येतो. फिलिपाइन्समधील लोकांना अमेरिकनांनीं फाजील मजुरी देऊन बिघडविलें आहे असें मनिला रेडियोवरून सांगण्यांत आलें. " आतां तेथील स्थानिक लोक उत्साहानें २४ तास काम करीत आहेत. " हा उत्साह ' टिकावा ' ह्यासाठी फिलिपिनोंच्या राजकीय सभांस बंदी करण्यांत आली आहे. जपाननें सर्व अंकित देशांवर आपल्या मुद्रा व आपलें पंचांग हीं लादलीं आहेत. १९४२ चा २६०२ सन झाला आहे. सर्व आशियाची मुख्य भाषा जपानी करण्याचे दृष्टीनें जपानी भाषेच्या शाळा सर्वत्र स्थापन करण्यांत आल्या आहेत. शहरें व रस्ते ह्यांचीं नांवें बदलून तीं जपानी केलीं आहेत.

---

### ब्रिटिश अंदाजपत्रक

ब्रिटिश सरकारचे फडनवीस, सर किंग्जले वुड, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत पार्लमेंटास बजेट सादर केलें, त्यांत ६ अब्ज पौंड एवढ्या प्रचंड रकमेच्या खर्चाची तरतूद आहे. गेल्या वर्षीच्या खर्चाच्या आकड्यापेक्षां हा आकडा २१½ कोटि पौंडांनीं मोठा आहे. ग्रेट ब्रिटननें चालू युद्धाप्रीत्यर्थ आजवर १५½ अब्ज पौंड खर्च केलेले आहेत. १९४० सालीं ग्रेट ब्रिटनचा रोजचा युद्धखर्च ¾ कोटि पौंड होता तो १९४१ मध्यें १¼ कोटि पौंड झाला. आतां त्याचा आकडा १½ कोटि पौंडावर गेला आहे. एवढ्या प्रचंड युद्धखर्चापैकीं ५६% रक्कम करवसुलींतून जमा होणार आहे. १९४२ सालीं हें प्रमाण ५२% व १९४१ मध्यें ४८% होतें. वाढत्या युद्धखर्चाचा शक्य तेवढा बोजा आजची पिढी उचलीत आहे असें ह्यावरून दिसून येतें. ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रांत गुंतलेलें भांडवल युद्धखर्चासाठी उपयोगांत आणलें गेलें असून हिंदुस्थानांत ग्रेट ब्रिटनतर्फे होणाऱ्या युद्धखर्चाबद्दल यावयाच्या पैशाची व्यवस्था कशी करावयाची, हा प्रश्न पुढें उभा राहील व त्याची जाणीव ब्रिटिश फडनवीस व पार्लमेंट ह्यांस आहे. लंडनमध्यें हिंदुस्थानाच्या शिलका वाढत आहेत, त्यांचा एक फंडच तयार होईल व युद्धोत्तर कालांतील आर्थिक पुनर्घटनेसाठी इंग्लंडमधून आणाव्या लागणाऱ्या सामुग्रीच्या आयाताची त्यामुळें आयतीच व्यवस्था होईल, असें हिंदुस्थानचे फडनवीस सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीस सांगितलें होतें.

---

### बँकांस सुट्टी

शुक्रवार, ता. २१ एप्रिल रोजीं " गुड फ्रायडे " निमित्त बँका बंद रहातील.

---

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मितव्यय मोहीम

**हैद्राबाद रेडिओवर महिलांचीं महिलांना उद्देशून भाषणें**

प्रस्तुत युद्धजन्य प्रश्नांमध्ये दैनंदिन खर्चासंबंधींची काटकसर करण्याचा प्रश्न कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं. म्हणून काटकसरीच्या आवश्यकतेवर महिलांसाठीं एक व्याख्यानमाला महिलांकडून हैद्राबाद नभोवाणी केंद्रानें गुंफवली. त्यांतील भाषणांतील उतारे पुढें देण्यांत आलेले आहेत:—

(१) मिसेस् अब्दुल हाफीज:—"स्वातंत्र्य व शांतताप्रेमी अशा सर्व लोकांनीं विद्यमान गैरसोयी सहन करून आपलें जीवन सोईचें करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. खाद्यधान्याचा संचय न करण्याचें आणि वस्त्रप्रावरण व त्यांसारख्या इतर आवश्यक गरजांच्या बाबतींत देखील जरुरीपेक्षां अधिक खरेदी न करण्याचें ठरविलें पाहिजे. ऐषआरामाच्या पदार्थांची खरेदी अगदींच बंद करण्यांत यावी. अशा पदार्थांत शृंगारसाहित्याचाहि समावेश केला पाहिजे. अशा वातावरणांत मोठ्या झालेल्या बालकांना काटकसर व हात राखून खर्च करण्याच्या कल्पना आत्मसात् करतां येतील. हा काटकसरीनें जीवन व्यतीत करण्याचा एक फायदा आहे. लाखों लोकांची उपासमार होण्याचीं चिन्हें समोर दिसत असतांना जडावाचे दागदागिने वापरणें हें अमानुषतेचें व कठोरपणाचें लक्षण आहे."

लतीफुन्निसा बेगम:—"बहुतेक लोक आपल्या उत्पन्नापेक्षां खर्च जास्त करतात, म्हणून केवळ युद्धजन्य गरज म्हणून नव्हे तर शांततेच्या काळांतहि मितव्ययाची आवश्यकता असते. चांगली सतरंजी वा गालिचा तुमच्याजवळ असल्यास जास्त किंमतीचे फर्निचर तुम्ही कां घेतां? शरीरास हितकर व साध्या अशा रोजच्या जेवणांत ज्वारी, गहू अथवा बाजरी, थोडेसे तांदूळ आणि चांगल्या शिजलेल्या दोन भाज्या किंवा मांस असल्यास पुरें; तसेंच स्वयंपाकघर व जेवणाच्या खोलीची देखरेख करावयाचें काम नोकरवर्गावर न सोपवितां तें गृहिणीनें स्वतःच करावें, कारण नोकरांना कितीहि जास्त पगार मिळत असला तरी सामानाच्या नासधुशीस, भेसळीस व चोरीस ते कधींहि प्रतिबंध घालू शकणार नाहींत. मध्यमवर्गानें पाश्चिमात्य अथवा आपल्या देशांतील श्रीमंत वर्गाची नक्कल करू नये. मादक पेयें, तंबाखू आणि चहाकॉफी देखील पिण्याचें सोडून द्यावें, कारण या वस्तूंची आपल्या जीवनांत आवश्यकता असतेच असें नाहीं. पॅकबंद डब्यांत असलेले खाद्यपदार्थ अथवा तुमच्या घरीं तयार न झालेली मेवामिठाई विकत घेऊं नका. आपल्या घरींच ब्रेड, बिस्किट्स, केक्स तयार करण्यांत आल्यास तें नेहमीं स्वस्त पडतें. आपल्या आवडीप्रमाणें मुरंबे व चटण्या देखील थोड्या खर्चांत तयार होऊं शकतात. ज्वारीची व बाजरीची भाकरी चांगली असते. उत्तम मेजवानी देऊन पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्याची पद्धति आतां बंद झाली पाहिजे."

मिसेस सूफी:—"आपल्या पोषाखांत काटकसर केली पाहिजे. बाजारहाट करण्याची कला बहुतेक महिलांस माहित नाहीं. स्वतःच्या गरजा व आवश्यक गोष्टी काय आहेत याची निश्चित कल्पना नसतांनाच त्या दुकानामध्यें खरेदीसाठी जातात, आणि एखाद्या दुकानांत गेल्या म्हणजे लहरीनुसार वाटेल तो जिन्नस त्या खरेदी करतात. आपण अनावश्यक व अयोग्य वस्तू खरेदी केल्या आणि आपल्या गरजेच्या वस्तू अधाप घ्यावयाच्या तशाच राहिल्या आहेत याची जाणीव त्या आपल्या घरीं परत आल्यावरच त्यांना होते. आपला पोषाख साधा व सोईस्कर असावा अशी आजकालची प्रवृत्ति आहे. भारी पोषाखाची पद्धत आतां प्रचलित नाहीं. संगारेड्डी, करीमनगर, औरंगाबाद व नांदेड या ठिकाणीं तयार होणारा माल खरेदी करा. जुनीं वस्त्रप्रावरणें फेकून देऊं नका, कारण वापरतां न येणाऱ्या कपड्यांचे लहान कपडे शिवून तुमच्या मुलाबाळांना ते पुनरपि उपयोगी पडतात; हा काटकसर करण्याचा एक मार्ग आहे."

मिसेस् अन्वरुल्ला:—"मानवी गरजा स्थितिस्थापक असतात. त्यांची संख्या कमींत कमी करतां येणें अथवा ती वाटेल तितकी प्रमाणाबाहेर वाढवितां येणें शक्य आहे. मोटरकारचा निष्कारण उपयोग आणि सिनेमा, पाहुणचार, मेजवान्या यांसारख्या ऐषआरामाच्या बाबी नागरिकांनीं सोडून द्याव्यात. आपल्यापेक्षां कमी अनुकूल परिस्थितींत असलेल्यांचा आणि ज्यांना अन्न अथवा वस्त्रप्रावरण नाहीं अशीं माणसें व इतर लोक या सर्वांविषयीं आम्ही विचार केला पाहिजे. आपण तसें केल्यास, जीवनास अगदीं अत्यावश्यक असलेल्या वस्तूंच्या बाबतींत देखील खात्रीनें आपणाकडून काटकसर होईल."

---

### ब्रिटिश आगीच्या विमा कंपन्या

युद्धपरिस्थितींतहि ब्रिटिश आग विमा कंपन्यांस चांगलें काम मिळत आहे असें १९४१ च्या आंकड्यांवरून दिसतें. ब्रिटिश कंपन्यांस जगांतील बहुतेक सर्व देशांतून काम मिळतें; त्यामुळें कंपन्याचा दर्जा व आर्थिक मजबुती हीं वाढत रहातात. अमेरिका व ब्रिटिश वसाहती हीं सोडलीं, तर ब्रिटिश कंपन्यांस काम देणारे कित्येक देश शत्रूच्या ताब्यांत गेलेले आहेत. असें असूनहि ब्रिटिश कंपन्यांना १९४१ सालीं १९४० चे मानानें अधिक काम मिळालें, हें विशेष आहे. विम्यांचे रकमेंत वाढ होण्याचें एक कारण मालमत्तेची व मालाची वाढलेली किंमत हें होय. कंपन्यांकडील एकूण विम्यापैकीं ६०% काम ग्रेटब्रिटन बाहेरील आहे. परदेशांत मिळणाऱ्या विमाकामामुळें ग्रेटब्रिटनची आर्थिक सत्ता कशी वाढते ह्याचें विवेचन 'अर्था' मध्यें मागें येऊन गेलेलें आहे. १९४१ सालीं ब्रिटिश आग विमा कंपन्यांना हप्त्यांच्या उत्पन्नाचा १९४० सालाचे मानानें लहान अंश क्लेमसाठी खर्चावा लागला, ही गोष्टहि महत्त्वाची आहे. कमिशनच्या व्यवस्थेचा खर्च व कर ह्याप्रीत्यर्थहि कंपन्यांचा खर्च १९४१ सालीं कमी झाला.

---

### बोलिव्हिया

बोलिव्हियानें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें आहे. हें राष्ट्र दक्षिण अमेरिका खंडांत असून तें ब्राझील, पॅरॅग्वे, अर्जेंटिना, चिली आणि पेरू या राष्ट्रांनीं वेढलेलें आहे. त्यास समुद्रकिनारा नाहीं. देश बहुतेक सडकाळ आहे. एकूण लोकसंख्या १९३१ सालीं ३० लक्ष होती. बोलिव्हिया १८२४ सालीं स्वतंत्र झाला. तोंपर्यंत तो स्पेनच्या हुकमतीखालीं होता.

### ट्रेझरी बिलावर १ रु. २ आ. व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं. त्यावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. २ आ. इतका पडला.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे.]
युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.
श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर
आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.


मधुमेहावरील औषध
तीन आंठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय
पूना गेस्ट हाऊस
फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ } वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ | पुणें, बुधवार, तारीख २८ एप्रिल १९४३ | अंक १७

## महायुद्ध दाराशीं आलें
### परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं
पण
### भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजिवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

### डायरेक्टर्स
श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, श्री. फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळवे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

युद्धजन्य परिस्थितींत सुद्धां
वेस्टर्न इंडियानें
सन १९४२ मध्यें पाऊण कोटीच्यावर विम्याचें काम पूर्ण केलें असून गेल्या वर्षापेक्षा नवीन कामांत सात लाखांची वाढ आहे. सेवा आणि सवलती यांच्या बळावर मिळविलेल्या लोकप्रियतेचें हें दृश्य फळ आहे. आपणहि ह्या कंपनीचे एक विमेदार होऊन तिजकडून मिळणाऱ्या लाभाचे आणि संरक्षणाचे वाटेकरी व्हा. अधिक माहितीसाठी पत्रव्यवहार करा.
वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड सातारा.
पुणें शाखा–१७९ बुधवार, लक्ष्मी रोड, पुणें २.

## विविध माहिती

### " पूना को-ऑपरेटिव्हज् "

पुणें शहर व त्या लगतचा विभाग ह्यांतील सहकारी संस्थांचें एक फेडरेशन स्थापन करण्यांत आलें आहे, त्यासंबंधीची घटना, नियम, इत्यादि सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व व्यक्तिशः सभासद यांनीं ता. २६ एप्रिल रोजीं झालेल्या सभेंत मान्य केले. संस्था रजिस्टर करण्याकरितां सहकारी खात्याकडे जरूर ती खटपट करण्यांत येणार आहे. प्रो. शं. रा. भागवत ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं एक तात्पुरतें मध्यवर्ती मंडळ निवडण्यांत आलें आहे, तें फेडरेशन रजिस्टर होईपर्यंत काम करणार आहे. तीन कमिट्यांचीहि स्थापना झाली असून त्यांचेकडे हाउसिंग, क्रेडिट व कंझ्यूमर्स हे विभाग सोपविण्यांत आले आहेत.

### मुंबई प्रांतांतील मजूर संघ-ताजे उपलब्ध आकडे

१९४१ अखेर मुंबई प्रांतांत एकूण ८१ मजूर संघ नोंदण्यांत आले होते व त्यांचे पटावर १,४२,३५९ सभासद होते. एकूण २९ मजूर संघांत स्त्री-सभासद होते व त्यांची संख्या ७,२५४ भरली. सर्व संघांच्या जनरल फंडाची बेरीज ३ लक्ष, ८० हजार रुपये भरली. एकूण ४ लक्ष ४८ हजारांच्या जिंदगी व येण्यांत वसूल व्हावयाच्या १ लक्ष,-१३ हजारांच्या वर्गणीचा आकडा आहे. "मजूर संघांचा खर्च उत्पन्नाच्या मानानें अवाच्या सवा आहे. त्यांस मोठाल्या देणग्या मिळाल्या नसत्या, तर त्यांचें कार्य चालू शकलें नसतें." असें मुंबई प्रांतांतील इंडियन ट्रेड यूनियन ॲक्टाच्या अंमलबजावणीचा १९४१-४२ चा अहवाल म्हणतो.

### बॉंबे को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा २६ व्या वर्षाचा शेवटचा ( मार्च, १९४३ चा ) अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रारंभीं श्री. एन. पी. भागवत ह्यांचा " मुंबई प्रांतांतील लँड मॉर्गेज बँकांच्या व्यवहाराच्या कांहीं बाबी " ह्या विषयावरील लेख प्रसिद्ध झाला आहे. श्री. व्ही. रामकृष्णराव ह्यांनीं आपल्या लेखांत मद्रास प्रांतांतील लँड मॉर्गेज बँकांसंबंधीं सविस्तर माहिती दिली आहे. सहकारी चळवळीचें बीजारोपण करणारे म. सी. ए. कँबेल ह्यांच्याबद्दलच्या कांहीं आठवणी श्री. एम. एस. कुलकर्णी ह्यांनीं सांगितल्या आहेत. लमाणी लोकांसाठी सहकारी सोसायटी हा श्री. एच. आर. गुडी ह्यांचा लेखहि वाचनीय आहे. अंकांतील नेहमींचीं इतर सदरेंहि माहितीपूर्ण आहेत. जी. आय. पी. रेल्वे एम्प्लॉईज को. बँक लि. वि० त्रिकमजी मेरवानजी कारंजिया ह्या दाव्याचा मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निवाडा अंकांत देण्यांत आला आहे त्याची माहिती 'अर्थ' मध्यें पुढें देण्यांत येईल.

### जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचेमध्यें व्यापारी करार

येत्या वर्षी जर्मनीनें तुर्कस्तानास विशेष उपयोगी असा १२ कोटि मार्क किंमतीचा माल पुरवावा व त्याचे मोबदल्यांत तुर्कस्तानानें जर्मनीस कच्चा माल पुरवावा, अशा स्वरूपाचा एक व्यापारी करार त्या दोन देशांमध्यें नुकताच झाला.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १३० |
| २ शेतकऱ्याचें जीवन आणि सहकार ... | १३१ |
| ३ सहकारी प्रश्नांची चर्चा | १३२ |
| ४ मेंढ्यांचा दोन हजार मैलांचा प्रवास ... | १३२ |
| ५ स्फुट विचार... ... चांदी-सोन्यास विलक्षण तेजी–दुधाच्या बाटल्यांचा तुटवडा–ब्रिटिश दुय्यम नाण्यांसाठी अमेरिकन चांदीची आयात | १३३ |
| ६ मूळ ऋणकोचा वारस | १३४ |
| ७ अन्नपुरवण्याच्या तुटवड्यावर उपाय ... ... | १३४ |
| ८ मुं. को. इन्स्टिट्यूट... | १३५ |
| ९ सटाणा सहकारी वृत्त | १३५ |
| १० प्रा. बेरी ह्यांचें निधन | १३५ |
| ११ 'अधिक धान्य पिकवा' सप्ताह ... ... | १३५ |
| १२ सटाणा को. सी. सप्लाय सोसायटी ... ... | १३६ |



# अर्थ

बुधवार, ता. २८ एप्रिल, १९४३


## शेतकऱ्याचें जीवन आणि सहकार

खेडेगांवांतील जनतेची स्थिति असमाधानकारक असून ती सुधारण्याचे पद्धतशीर प्रयत्न मोठ्या प्रमाणावर होणें अगत्याचें आहे, ह्याविषयीं दुमत नाहीं. ह्यासाठीं द्रव्यबळ आणि मनुष्यबळ पुष्कळ लागेल आणि त्याचा उपयोग योजनात्मक रीतीनें व्हावा लागेल ह्यांत शंका नाहीं. प्रस्तुत बाबतींत झालेले व होणारे प्रयत्न जरूरीच्या वास्तविक मानानें केवळ तुजबी आहेत असें म्हणावें लागतें. खेडेगावांच्या आर्थिक जीवनांत झालेल्या बिघाडाची चिकित्सा स्थूल मानानें झालेली आहे आणि तीस अनुसरून करावयाच्या उपाययोजनेची सामान्य कल्पना ह्या विषयांत लक्ष घालणारांस आलेली आहे. तथापि, निरनिराळ्या ठिकाणच्या आणि भिन्नभिन्न परिस्थितींतल्या खेडेगावांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाची शास्त्रीय पद्धतीनें छाननी झाल्यास त्यांत करावयाच्या सुधारणांची योजना पायाशुद्ध होण्याची खात्री असते. अशा प्रकारच्या कांहीं चौकशा ह्या प्रांतात झाल्या आहेत. त्यांमध्यें डॉ. एम्. जी. भगत ह्यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकानें उपयुक्त भर घातली आहे. ठाणें जिल्ह्यांपैकीं भिवंडी तालुक्यांतील कांहीं खेडेगांवांतील कुटुंबांची आर्थिक व सामाजिक माहिती तपशीलवार गोळा करून स्पष्ट अनुमानें ज्यांवरून काढतां येतील अशा प्रकारच्या कोष्टकांत व्यवस्थितपणानें त्यांनीं ती मांडली आहे. प्रांतिक सहकारी बँकेच्या सांगण्यावरून श्री. भगत ह्यांनीं मागें अशाच प्रकारची चौकशी करून अभ्यासाचा अनुभव मिळविला होता. मुंबई विश्वविद्यालयाच्या सहाय्यानें पी.एच. डी. च्या पदवीसाठीं त्यांनीं प्रस्तुत कार्य केलें आहे.

पुस्तकांत एकूण नऊ प्रकरणें आहेत. पहिल्या प्रकरणांत भिवंडी तालुक्याची नैसर्गिक वैशिष्ट्यें वर्णिलीं आहेत. दुसऱ्यांत जन्ममृत्यूंचे आकडे दिले आहेत आणि तिसऱ्यांत लोकसंख्याविषयक प्रश्नांची चर्चा आहे. चौथ्या प्रकरणांत शेतीच्या परिस्थितीची माहिती आहे व पांचव्यांत शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची माहिती आहे. सहाव्या प्रकरणांत सहकारी संस्थांचें वर्णन आहे, सातव्यांत कुटुंबांच्या उत्पन्न-खर्चाची छाननी आहे; आठव्यांत खेडेगांवांच्या विविध प्रश्नांची चर्चा आहे, आणि नवव्यांत ग्रामोद्धाराची योजना दिली आहे. ह्या सर्व विषयांचा येथें त्रोटक रीतीनेंहि परामर्ष घेऊन ग्रंथकर्त्यानें मांडलेल्या माहितीची स्थूलमानाचीहि कल्पना देणें शक्य नाहीं. प्रस्तुत परीक्षणांत सहकारी पतपेढ्या व त्यांच्या सभासदांची परिस्थिति ह्याविषयीं पुस्तकांत वर्णन व विवेचन आलें आहे, त्यासंबंधानें दोन शब्द लिहावयाचे आहेत.

डॉ. भगत ह्यांनीं चौकशीसाठीं निवडलेल्या ७६० कुटुंबांपैकीं ७२१ कुटुंबांचा सभासदत्वाच्या नात्यानें सहकारी पतपेढ्यांशीं प्रत्यक्ष संबंध आहे हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भिवंडी तालुक्यांतील ३८ पतपेढ्यांच्या सांपत्तिक स्थितीचें, त्यांच्या सभासदांच्या कर्जाचे, थकबाकीचे वगैरे आकडे सभासदांची आर्थिक दृष्ट्या वर्गवारी करून त्यांनीं दिले आहेत. ही माहिती १९३७–३८ सालाबाबतची आहे. हिंदुस्थानांत शेतकरी वर्गाचा कर्जबाजारीपणा नाहींसा करून त्याची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या आपल्या ध्येयांत सहकार यशस्वी झालेला नाहीं, ह्या सामान्य अभिप्रायास ह्या माहितीनें पुष्टी मिळत आहे. तथापि, सहकारी चळवळींत काम करणाऱ्या विचारी लोकांप्रमाणें डॉ. भगत ह्यांचाहि असा सिद्धांत आहे कीं, आमच्या सहकारी संस्थांस अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं झगडावें लागत असून त्यांच्या कार्याची व्याप्ती संकुचित आहे, ह्या कारणानें त्यांच्या हातून अपेक्षित कामगिरी घडून आलेली नाहीं आणि त्यांच्यामधील दोष काढून टाकून त्या कार्यक्षम रीतीनें व व्यापक क्षेत्रांत चालवल्या गेल्यास आपणांस त्या अत्यंत यशस्वी व परिणामकारक बनवतां येतील. आपल्या निरीक्षणावरून त्यांस दिसून आलेलीं सहकारी संस्थांचीं वैगुण्यें डॉ. भगत ह्यांनीं दाखविलीं आहेत आणि भावी ग्रामसुधारणेच्या व्यापक योजनेंत सहकारास त्यांनीं मध्यवर्ती स्थान दिलें आहे. सहकाराचा वृक्ष हिंदुस्थानांतल्या हवेंत वाढावयाचा नाहीं आणि त्यास फळें यावयाचीं नाहींत, हें कांहीं लोकांचें मत त्यांस मान्य नाहीं, इतकेंच नाहीं, तर सहकाराच्या विस्तृत व बळकट चौकटींत ग्रामसुधारणेचें कार्य बसवलें पाहिजे, असा आपला स्पष्ट अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. त्यांनीं मोठ्या श्रमानें उपयुक्त माहिती जमा करून व ती शास्त्रीय पद्धतीनें मांडून खेडेगावांचें जिवंत चित्र रेखाटलें आहे. जिज्ञासूंस व अभ्यासकांस तें बोधप्रद झाल्यावांचून राहणार नाहीं.

"The Farmer, His Welfare and Wealth" By Dr. M. G. Bhagat, M. A., Ph.D.: The Co-operative Book Depot, 9 Bakehouse Lane, Fort, Bombay. Price Rs. 10.

### सिंधमधून गहूं येणार

सिंधमध्यें जरुरीपेक्षा ज्यास्त असलेला गव्हाचा व तांदळाचा साठा इतर प्रांतांना उपलब्ध होणार आहे.मुंबई प्रांताच्या वाट्यास ५ हजार टन गहूं येईल.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. २ आ. व्याजाचा दर

हिंदुस्थान सरकारचीं ७ कोटि, ५८ लक्ष रुपयांचीं ट्रेझरी बिलें रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. २ आ. इतका पडला.

## सहकारी प्रश्नांची चर्चा

सहकारी प्रांतिक बँका व इंस्टिट्यूट्स ह्यांच्या अखिल भारतीय मंडळाच्या स्थायी समित्यांची संयुक्त सभा गेल्या शनिवार-रविवारीं मद्रास येथें श्री. रामदास पंटलू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. तीमध्यें युद्धजन्य परिस्थितीमुळें सहकारी क्षेत्रांत उत्पन्न झालेल्या मुख्य प्रश्नांचा विचार केला जाणें अपेक्षितच होतें. सध्या युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेच्या योजनांची मांडणी व चर्चा सर्वत्र चालली आहे तिच्या दृष्टीनें सहकारी संघटन व पद्धति ह्यांस ह्या योजनांमध्यें योग्य स्थान मिळण्याचें महत्त्व सहकारी कार्यकर्त्यांस वाटावें त्यांत नवल नाहीं. अंतर्गत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संबंधाची घडी पुन्हां बसविण्यांत येईल तेव्हां ती सहकारी भावनेनें बसविण्यांत आली तर जगांत दीर्घकालीन शांतता नांदू शकेल ही सहकाराची शिकवण आहे. कलह, स्पर्धा, महत्वाकांक्षा ह्यांचा अतिरेक हेंच प्रस्तुत युद्धाचें प्रमुख कारण असल्यानें भावी काळांत ही आपत्ति पुन्हां जगावर येऊं नये ह्यासाठी सर्वांचें हित तेंच व्यक्तीचें हित ह्या सहकाराच्या आद्य तत्त्वांचा अंगिकार राष्ट्रांनीं करणें अगत्याचें आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन मद्रास येथील सभेच्या कार्यक्रमांत प्रस्तुत विषयास तिच्या चालकांनीं स्थान दिलें होतें. जगांतल्या सर्व राष्ट्रांतील सहकारी संस्थांनीं एकमुखानें ह्या बाबतींत आपला अभिप्राय व्यक्त करावा आणि आपल्या सूचनेस मूर्तस्वरूप मिळेल असा संघटित प्रयत्न करावा.

युद्धजन्य परिस्थितींत प्रत्येकास विशेष तीव्रतेनें जाचक वाटणारी कोणती गोष्ट असेल तर ती खाद्य पदार्थ व इतर नित्याच्या जरूरीच्या जिनसांच्या पुरवठ्याविषयींची आहे. सहकारी पद्धतीचीं माल विक्रीचीं दुकानें मोठ्या प्रमाणांत चालवून आणि त्यांचा विस्तार चोहोंकडे करून हा प्रश्न कांहीं अंशीं सोडविण्याची शक्यता सरकार व जनता ह्यांस पटली आहे आणि ह्या संबंधांत प्रयत्न चालले आहेत. मद्रास प्रांतांत सहकारी स्टोअर्सची प्रगति झपाट्यानें झाली आहे आणि युद्धपरिस्थितींतल्या निकडीच्या गरजेनें तिला प्रोत्साहन दिलें आहे. मद्रास येथील सभेनें प्रांतिक व संस्थानी सरकारांस सहकारी स्टोअर्स स्थापन करणें, त्यांचा विस्तार करणें, उत्पादन व विक्री ह्यांच्या व्यवहारांत मेळ घालणें इत्यादि कार्यांत सहाय्य देण्याची विनंति केली आहे. खेडेगांवीं धंद्यांस उत्तेजन दिलें गेल्यास सध्याच्या मालाच्या तुटवड्याचा व महागाईचा प्रश्न सुटण्यास सहाय्य होईल असें तिनें सुचविलें आहे. सामान्य कापडाच्या पुरवठ्याविषयींची सध्याची अडचण पाहिली असतां त्यांत हातमागावरील उत्पादनाची भर घालण्याची आवश्यकता सहज पटण्यासारखी आहे. कापड गिरण्यांची पुष्कळशी शक्ती सरकारास माल पुरविण्यांत गुंतली आहे अशा स्थितींत हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांच्या मदतीनें सहकारी विणकरांच्या संस्था स्थापन करून त्यांच्याकडून "स्टँडर्ड" कापड बनवून घ्यावें अशी सूचना मद्रासच्या सभेनें केली आहे. ह्यारीतीनें युद्धपरिस्थितीच्या दृष्टीनें सहकारी संस्थांस पुष्कळ महत्त्वाची कामगिरी बजावतां येण्यासारखी असून सहकारी चळवळीच्या प्रगतीस सध्याची संधी अत्यंत अनुकूल आहे ही गोष्ट प्रांतिक सरकारांच्या मनावर बिंबविण्याचा तिनें प्रयत्न केला आहे हें स्पष्ट दिसतें. ही इच्छित प्रगति सरकारच्या उत्तेजनावांचून व प्रत्यक्ष सरकारच्या सहाय्यावांचून घडून येणें अशक्य आहे हें सांगावयास नको. शेतीच्या मालाचें उत्पादन व विक्री, खेडेगांवीं धंद्यांचें पुनरुज्जीवन व त्यांची वाढ ह्यांचे बाबतींत केले जाणारे प्रयत्न युद्धाच्या कार्यास व जनतेच्या सुखसोयींस उपकारक ठरणार आहेत हें येथें ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे.

मद्रासच्या कार्यक्रमांत सहकारी संस्थांच्या हिशेब तपासणीचा प्रश्न अंतर्भूत झाला होता. हिशेब तपासनीस नेमून त्यांचें वेतन ठरविणें ह्या गोष्टी सध्या रजिस्ट्रारच्या हातांत आहेत. ह्या पद्धतीनें हिशेब तपासणी स्वतंत्र बुद्धीनें व निःपक्ष रीतीनें होऊं शकते हा तिच्यामध्यें फायदा आहे अशी समजूत आहे. पण ही पद्धति सहकारी संस्थांस अधिक खर्चाची होते आणि शिवाय स्वतःच्या हिशेबांची तपासणी त्यांनीं जबाबदारीनें करून घेणें लोकशाहीच्या तत्त्वास धरून आहे ह्या मुद्यावर तिच्यामध्यें बदल होण्याची आवश्यकता प्रतिपादिली जात आहे. मुंबई प्रांतांत रजिस्ट्रारनीं निश्चित केलेल्या यादीपैकीं हिशेब तपासनीस निवडण्याची मुभा विशिष्ट संस्थांस प्रयोग म्हणून अलीकडे ठेवण्यांत आली आहे. ह्या नव्या पद्धतीचा विस्तार केला जावा अशी मागणी सहकारी संस्थांनीं, विशेषतः शहरी बँकांनीं केली आहे. मद्रासच्या सभेपुढें हा प्रश्न मांडण्यांत आला होता. तेथें असेंहि सुचविण्यांत आलें कीं, इच्छित सुधारणा घडवून आणण्यासाठी सहकारी कायद्यांत व त्या खालील नियमांत आवश्यक वाटल्यास दुरुस्ती करण्यांत यावी. ह्या मागणीचा विचार सहानुभूतीनें केला जाण्याची वेळ आतां सर्व प्रांतांत आली आहे यांत शंका नाहीं. सहकारी संस्थांच्या सबंध कारभाराविषयींची पूर्ण जबाबदारी त्यांच्या चालकांवर टाकणें आणि जनतेच्या हिताच्या व सहकारी चळवळीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें सरकारनें त्यांचेवर नजर ठेवणें ह्या दोन गोष्टींचा प्रस्तुत बाबतींत मेळ घालतां येणें शक्य आहे.

### मेंढ्यांचा २ हजार मैलांचा प्रवास

१९४२ च्या प्रारंभीं न्यूझीलंडमधून चीनकडे मेरिनो, कॉरिडेल, लिंकन व रॉमने मॉर्श ह्या जातींच्या सुमारें १५० मेंढ्या चीनकडे पाठविण्यांत आल्या. रंगूनच्या बंदरांत त्यांस उतरवून घेऊन बर्मा रोडनें त्यांची चीनकडे रवानगी व्हावयाची होती, परंतु रंगून जपान्यांच्या हातीं गेल्यामुळें कलकत्ता बंदरांत मेंढ्या उतरल्या. त्यांना चीनकडे नेण्याची व्यवस्था पुरी होईपर्यंत, त्यांस आसाम सरकारच्या शेतकी खात्यानें आसरा द्यावा, अशी त्यास चिनी सरकारनें विनंति केली. त्याप्रमाणें नदींतून बोटीवर घालून त्यांस शिलाँगला धाडण्यांत आलें. तेथें त्या मेंढ्या एप्रिल, १९४२ मध्यें पोंचल्या. वायव्य चीनचा लाइव्ह स्टॉक अधिकारी चुंकिंगहून कलकत्त्यास आला व त्यानें मेंढ्यांच्या पुढच्या प्रवासाची व्यवस्था केली. दार्जिलिंग व ल्हासा या मार्गानें २ हजार मैलांच्या प्रवासानंतर मेंढ्या चीनला पोंचतील. वाटेंत त्यांची काळजी घेण्यासाठीं एका चिनी अधिकाऱ्याची योजना केलेली आहे. चीनमधील मेंढ्यांची पैदास सुधारण्याच्या उद्देशानें ह्या मेंढ्या इतक्या काळजीपूर्वक व्यवस्थेंत चीनकडे चालविल्या जात आहेत. मेंढ्यांचा प्रवास पुरा होण्यास किमान एक वर्ष लागेल. चिनी लाइव्ह स्टॉक अधिकारी, मि. कु, ह्यांनीं आसामच्या शेतकी खात्याच्या डायरेक्टरास खालीलप्रमाणें आभार-प्रदर्शक पत्र पाठविलें आहे.:—"मेंढ्यांचा हा तांडा सुप्रसिद्ध झाला आहे. लंडनमधील वृत्तपत्रें त्याच्या ठाण्याठिकाणची चौकशी करीत आहेत. ह्यामुळें चीन व हिंदुस्थान ह्यांचेमधील सलोखा वाढण्यास मदत होईल."

# स्फुट विचार

## चांदी-सोन्यास विलक्षण तेजी

आपली बचत सोनें आणि चांदी ह्या मोलवान धातूंमध्यें गुंतवून ठेवण्याची प्रवृत्ति हिंदुस्थानांत जुनीच आहे. अशिक्षित वर्गास आपली बचत ह्या स्वरूपांत धारण करणें सोयीचें वाटत असतें. युद्धपरिस्थितीमुळें सोनें किंवा चांदी बाहेरून येणें अशक्य झालें आहे आणि जनतेची त्या धातूंविषयींची मागणी वाढत आहे. ह्या कारणानें सदरहु धातूंची किंमत भलत्याच मर्यादेच्या पलीकडे गेली आहे. चलनाच्या विस्ताराचाहि एक परिणाम चांदी-सोन्याचा भाव वाढण्यांत झाला आहे. गेल्या आठवड्यांत ह्यां भावांनीं आणखी वर उडी मारली आहे. शंभर तोळ्यांस १२२ रुपये हा चांदीचा भाव अनपेक्षित तेजीचा आहे. भाव ११० च्या सुमारांत मागें एक वेळ होता तेव्हां त्यानें अंतिम सीमा गाठली असें वाटत होतें. सोन्याचा भाव त्याचप्रमाणें दर तोळ्यास ८८-८९ रुपयांपर्यंत गेल्या आठवड्यांत गेला. सॉव्हरिनची किंमत सोन्याबरोबर ६२ रुपयांपर्यंत चढली. अमृतसरहून आलेल्या बातमीवरून असें दिसतें कीं तेथील बाजारांत चांदीची व सोन्याची किंमत अनुक्रमें करून १२३ आणि ९२ रुपये अशी होती. एकच महिन्यामागें हे भाव अनुक्रमें ११० व ७० रुपये असे होते. केवळ एका महिन्यांत चांदी-सोन्याच्या बाजारभावास केवढी मोठी तेजी आली आहे ह्याची सदरहु तुलनेवरून कल्पना येण्यासारखी आहे.

---

## दुधाच्या बाटल्यांचा तुटवडा

इंग्लंडमध्यें बाटल्यांमध्यें घालून दूध घरोघर पुरवलें जातें आणि सवाचार कोटि बाटल्या अशा रीतीनें दररोज उपयोगांत असतात. रोजच्या रतीबासाठी दूधवाल्यांस सुमारें दोन कोटि बाटल्या लागतात. ह्या प्रत्येक बाटलीच्या मागें दुसऱ्या तीन चार बाटल्या व्यवहारांत फिरत असतात. ह्या सर्वांची एकूण किंमत सुमारें पाऊण कोटि रुपये भरते. गिऱ्हाइकांनीं वेळच्या वेळीं बाटल्या परत न केल्यास त्यांची किंमत त्यांचेकडून वसूल केली जाईल असें दूधवाल्यांनीं जाहीर केलें आहे. युद्धपरिस्थितीमुळें बाटल्यांच्या पुरवठ्यास महत्व आलें आहे हें उघड आहे. दुधाच्या गिऱ्हाइकांचा हलगर्जीपणा ह्या अडचणीस बऱ्याच अंशीं कारणीभूत झाला आहे असें दिसतें. नुसत्या लंडनमध्यें गेल्या वर्षी सुमारें २४ लक्ष बाटल्या केराच्या पेट्यांमध्यें पडलेल्या आढळल्या. कित्येक जण ह्या बाटल्यांत तेल, रंग वगैरे जिन्नस घालतात आणि त्या निरुपयोगी करून टाकतात. असल्या खराब झालेल्या बाटल्या स्वच्छ करणें फार कठिण होतें. गिऱ्हाइकांनीं दुधाच्या बाटल्यांचे संबंधांत काळजी घ्यावी अशी सूचना ब्रिटिश दूधवाल्यांनीं केली आहे.

---

## ब्रिटिश दुय्यम नाण्यांसाठी अमेरिकन चांदीची आयात

ब्रिटिश व ऑस्ट्रेलियन सरकारांच्या विनंतीस अनुसरून अमेरिकन सरकार त्यांस खंड-उसनवार पद्धतीनें चांदी पुरविणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. युद्धसमाप्तीनंतर अमेरिकेस ही चांदी परत मिळावयाची आहे. ग्रेट-ब्रिटन व ऑस्ट्रेलिया ह्यांस नाणीं पाडण्यासाठीं चांदी हवी आहे. दुय्यम नाण्यांस तेथें मागणी वाढली आहे. ग्रेट-ब्रिटनमध्यें युद्धास प्रारंभ झाल्यापासून ऑक्टोबर, १९४२ अखेर प्रचलित चलनी नोटांत ७८% वाढ झाली, त्या मानानें प्रचलित नाण्यांत फक्त २७% ची भर पडली. युद्धाचे सुरवातीस ग्रेट ब्रिटनमध्यें चांदीचा बराच मोठा साठा होता, तो आतां कमी झालेला दिसतो. हिंदुस्थान सरकारकडून ब्रिटिश सरकारनें वेळोवेळ चांदी खरेदी केली, परंतु तेथें त्याचा पुरेसा साठा शिल्लक नाहीं अशा परिस्थितींत हिंदुस्थानकडून आणखी चांदी विकत घेणें म्हणजे हिंदुस्थानचें ग्रेट-ब्रिटनमधील येणें अगोदरच वाढत आहे, त्यांत भर घालण्यासारखें होणार; म्हणून ब्रिटिश सरकारनें अमेरिकेकडे धांव घेतली आहे. प्रत्यक्ष अमेरिकेंतच चांदीस औद्योगिक मागणी मोठ्या प्रमाणावर असतांना व ग्रेट-ब्रिटनमध्यें दुय्यम नाण्यांचे ऐवजी वापरण्याजोग्या बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा छापून तयार असतांना ब्रिटिश सरकारनें अमेरिकन चांदी घ्यावी, ह्याबद्दल "एकॉनामिस्ट" नें थोडें आश्चर्य व्यक्त केलें आहे.

---

## बँकांचे गुप्त रिझर्व्ह

हिंदुस्थानांत स्थापन होत असलेल्या नव्या बँकांसंबंधी सरकारास सावधगिरीचा इशारा देण्याची आवश्यकता रिझर्व्ह बँकेला भासत असून, जनतेच्या हिताचे दृष्टीनें त्यासंबंधांत तातडीनें कायदा करण्याची आवश्यकता त्या बँकेच्या डायरेक्टरांनीं प्रतिपादिली आहे. ग्रेट ब्रिटनमधील बँकिंगचा धंदा किती सावधगिरीनें व पद्धतशीर चालविण्यांत येतो आणि त्यामुळें तेथील बँकांच्या मजबुतींत कशी भर घालण्यांत येते ह्याची कल्पना मि. मॅकेन्ना ह्यांनीं "बँकर्स मॅगेझिन"मध्यें प्रसिद्ध केलेल्या आकड्यांवरून चांगली येते. "भागीदारांच्या खऱ्या भांडवलावर सुमारें ४% डिव्हिडंड सुटतें" असें मि. मॅकेन्ना म्हणतात. १९४१ सालीं आठ प्रमुख ब्रिटिश बँकांनीं डिव्हिडंडच्या स्वरूपांत १,०६,९२,००० पौंड वाटले. हा आकडा भागीदारांच्या खऱ्या भांडवलाच्या ४% आहे, ह्या हिशेबानें, खऱ्या भांडवलाची रक्कम २६,७३,१५,००० पौंड इतकी होते. बँकेच्या ताळेबंदांत दाखविण्यांत आलेलें भाग भांडवल, रिझर्व्ह फंड, न वाटलेला नफा, इत्यादींची बेरीज व बँकेजवळील गुप्त रिझर्व्ह हीं सर्व मिळून होणारी रक्कम म्हणजेच भागीदारांचें एकूण खरें भांडवल होय. कारण, ठेवी व इतर देणीं देऊन टाकल्यावर ह्या सर्व रकमा भागीदारांच्याच वाट्याच्या असतात. १९४१ अखेर वरील आठ बँकांच्या ताळेबंदांत भाग भांडवल, रिझर्व्ह फंड व न वाटलेला नफा मिळून दाखविलेल्या रकमांची बेरीज १३,७२,४०,००० पौंड झाली. म्हणजे, १२,००,७५,००० पौंड एवढी रक्कम बँकांजवळील गुप्त रिझर्व्ह दर्शविते असा हिशेब झाला. भागीदारांच्या एकूण खऱ्या भांडवलापैकीं ४९% रक्कम गुप्त रीतीनें गुंतलेली आहे, ह्यावरून ब्रिटिश बँकांच्या मजबुतीची कल्पना येते. बँकेजवळील खऱ्या रिझर्व्हज्चे प्रत्यक्ष आकडे जाहीर करणें उचित नगलें तरी मि. मॅकेन्ना ह्यांनीं अप्रत्यक्ष रीतीनें ब्रिटिश बँकांच्या धोरणावर चांगला प्रकाश पाडला आहे. हिंदुस्थानांतील नामवंत बँकांनीं ब्रिटिश बँकांचा कित्ता उचललेला आहे व नफ्याचा आकडा फुगविण्यापेक्षा आपली मजबुती वाढवून भागीदारांस योग्य डिव्हिडंड बक्षीस देण्याची प्रथा त्यांनीं पाडली आहे. बँकांच्या नफ्याचे आकड्यांवर वैयक्तिक हितसंबंध अवलंबून ठेवण्यांतील धोक्याकडे रिझर्व्ह बँकेनें सरकारचें लक्ष वेधलें आहे, त्याचें मर्म ब्रिटिश बँकांचा आदर्श पुढें ठेवल्यानें चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे.

---

## मूळ ऋणकोच्या वारसास आपण स्वतः शेतकरी असल्याची तक्रार करतां येईल काय?

### डे. ॲ. रिलीफ ॲक्ट : मुंबई हायकोर्टाचा निवाडा

मेघजी हिरजी आणि कंपनी... वादी वि० मांगीलाल.. प्रतिवादी

हकीकत:—प्रतिवादीचा मयत बाप गोवर्धनदास यानें वादींना मुंबईतील हरएक प्रकारचा माल वायद्यावर खरेदी करण्याकरितां कमिशन एजन्ट व पक्का आडत्या नेमलें होतें. ता. २६-१-४० रोजीं वादी व मयत गोवर्धनदास यांच्यामधील व्यवहाराचा हिशेब होऊन मयत गोवर्धनदासनें वादीचें रु. १५०९२-१०-३ देणें निघालें व मयत गोवर्धनदासानें वादींना त्याच तारखेस रु. ११००० ची प्रॉमिसरी नोट लिहून दिली. या प्रॉमिसरी नोटीवरून देणें निघालेल्या बाकीबद्दल वादींनीं हा दावा मयत गोवर्धनदासाचा मुलगा मांगीलाल यांचेविरुद्ध गोवर्धनदासाचा कायदेशीर वारस या नात्यानें आणला. प्रतिवादीनें मूळ तक्रार अशी आणली कीं, त्याचें उपजीविकेचें मूळ साधन शेती आहे. तो धंद्यानें शेतकरी आहे. म्हणून हा दावा चालविण्याचा या कोर्टास अधिकार नाहीं.

वादींच्या वकिलांनीं असा मुद्दा उपस्थित केला कीं, प्रतिवादीला 'शेतकरी' असल्याची तक्रार करतां येत नाहीं. दाव्यांतील देवघेवीचे व खरेदीविक्रीचे व्यवहार वादी व प्रतिवादीच्या मयत बापामध्यें झाले होते. प्रतिवादीचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं. वादीनें प्रतिवादीच्या जातीवर हुकूमनामा मागितला नसून, प्रतिवादीच्या ताब्यांत असलेल्या मयत गोवर्धनदासाच्या इस्टेटीविरुद्ध हुकूमनामा मागितला आहे. मूळ ऋणको गोवर्धनदास याला 'शेतकरी' असल्याबद्दल तक्रार करतां आली असती. पण ऋणकोच्या वारसाला अशी तक्रार करतां येत नाहीं.

ज्या प्रकारचे दावे दिवाणी कोर्टाला चालवितां येणार नाहींत ते सर्व प्रकार शेतकी कायद्याच्या कलम ३ (डब्ल्यु) मध्यें दिले आहेत व शेतकी कायद्याच्या कलम ३ (डब्ल्यु) मध्यें दर्शविल्या प्रकारचे दावे चालविण्याचा दिवाणी कोर्टाला अधिकार नाहीं हें शेतकी कायद्याच्या कलम ११ मध्यें म्हटलें आहे. हा दावा कलम ३ (डब्ल्यु) मध्यें वर्णन केल्या प्रकारचा आहे हें वादीचे वकील कबूल करतात, पण जेव्हां एखादा व्यवहार वादी प्रतिवादीमध्यें असेल तेव्हांच कलम ११ लागूं होईल असें त्यांचें म्हणणें आहे. कलम ११ मध्यें म्हटलें आहे कीं, प्रतिवादी जर शेतकरी असेल तर तो ज्या हद्दींत राहात असेल त्या स्थलसीमेच्या कोर्टांत वादीनें दावा दाखल केला पाहिजे. प्रतिवादीची तक्रार अशी आहे कीं, "मी या कोर्टाच्या हद्दींत राहात नाहीं, माझ्यावर केलेला दावा शेतकी कायदा कलम ३ (डब्ल्यू) या प्रकारचा आहे. मी शेतकरी आहें. तेव्हां हा दावा चालविण्याचा या कोर्टाला अधिकार नाहीं."

शेतकी कायद्याच्या ११ व्या कलमाचा आम्हीं सरळ अर्थ लावून पाहिला व या कलमाखालीं मूळ ऋणकोच्या वारसाला म्हणजे प्रतिवादीला सुद्धां शेतकरी असल्याची तक्रार करतां येते असें आमचें स्पष्ट मत आहे. ३९ बी. एल. आर. ११७२ या केसची व आमच्यापुढें चालू असलेल्या केसची हकीकत सारखीच आहे. त्या केसमध्यें दावा चालू असतांना एक प्रतिवादी मेला तेव्हां त्याचा अज्ञान मुलगा त्या प्रतिवादीच्या जागीं आला. वादींनीं अशी तक्रार आणली कीं, प्रतिवादी अज्ञान असल्यामुळें त्याला शेतकरी असल्याची तक्रार करतां येत नाहीं. पण तो मूळ ऋणकोचा वारस असल्यामुळें त्याला शेतकरी म्हणून तक्रार करतां येते असा मुद्दा वादींनीं मांडला नव्हता. कायदेशीर निवाड्याचा अर्थ लावतांना असें एक तत्त्व ठरून गेलें आहे कीं, एखाद्या दाव्याच्या निकालाकरितां उघड दिसणारा मुद्दा एखाद्यानें घेतला नसेल तर तो मुद्दा टिकण्यासारखा नव्हता हें उघड आहे. म्हणूनच वादींनीं त्या केसमध्यें 'वारस प्रतिवादीला' शेतकरी म्हणून तक्रार घेतां येत नाहीं हा मुद्दा पुढें आणला नाहीं हें स्पष्ट आहे. तेव्हां या दाव्यांतील प्रतिवादीला शेतकरी म्हणून तक्रार करतां येते असा आम्ही निकाल देतों व हिशेब करण्याकरितां हा दावा आम्ही कमिशनरकडे पाठवितों.

दावा कमिशनरकडे पाठविला.

सारांश:—शेतकी कायद्याप्रमाणें शेतकरी असल्याची तक्रार उपस्थित करण्याकरितां प्रतिवादी मूळ ऋणको असण्याची आवश्यकता नाहीं. ऋणकोच्या वारसाला (लीगल रिप्रेझेंटेटिव्ह) देखील शेतकरी असल्याची तक्रार घेतां येते.

(B.) —"न्यायबोध"

## अन्नपुरवठ्याच्या तुटवड्यावर उपाय

### आंब्याच्या कोयींचा अन्न म्हणून उपयोग

मद्रास प्रांतांत गंजम एजन्सीमधील जंगली लोक आंब्यांच्या कोयींचा अन्न म्हणून उपयोग करीत आलेले आहेत, ह्याचें प्रमुख कारण त्यांचें दारिद्र्य हें होय. ऑगस्ट ते सप्टेंबरपासून भाताचें पीक हातीं येईपर्यंतच्या काळांत तेथील गरीब लोक कोयींच्या पिठावरच आपली गुजराण करितात. आंब्याच्या मोसमांत कोया साठवून ऑगस्टमध्यें त्या फोडण्यांत येतात व त्यांचें कवच काढण्यांत येतें. हीं सर्व एकत्र करून रात्रभर पाण्यांत भिजत ठेविलीं जातात. तीं मग कुटून त्यांची भुकटी करण्यांत येते, ती टोपल्यांत घालून सकाळपर्यंत ठेवण्यांत येते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ही टोपली धुवून पूड वाळविण्यांत येते व मग तिचा खाद्य म्हणून उपयोग होतो. तिची भाकरी, पानगी वगैरे होऊं शकते; ती तांदुळांत मिसळून तिचा भात करतां येतो व तिचे गोळे करून गरम राखेंत ती भाजतां येते. कोयींची पूड फार दिवस टिकत नाहीं; तयार झाल्यावर दोन—चार दिवसांत ती संपविली पाहिजे.

तांदुळाइतकें अन्नसत्त्व कोयींच्या कवचांत असतें असें म्हणतां येईल. हिंदुस्थानांतील बहुतेक ठिकाणीं आंबे मुबलक आढळतात, त्यांच्या कोयींचा उपयोग अन्न म्हणून करतां येण्याजोगा आहे.

नेहमींच्या वेळीं ज्या गोष्टीस आपण हात लावणार नाहीं, तिचा अन्न म्हणून उपयोग करण्याची पाळी आतां आली आहे. कोंड लोकांना जिवंत राखणाऱ्या कोया इतरांनाहि उपयोगी पडतील हें उघड आहे. मि. गॉर्डन विल्किन्स, एम. डी., डी. टी. एम्. अँड एच. (उदयगिरि, गंजम, येथील मूरहेड मेमोरिअल हॉस्पिटल) ह्यांनीं वरील विषयावर "इंडियन फार्मिंग"मध्यें एक लेख लिहिला आहे. सध्याच्या धान्यपुरवठ्याच्या अडचणीचे काळीं व आंब्याचा मोसम लवकरच सुरू होणार आहे अशा प्रसंगीं, त्या लेखांतील माहिती उपयुक्त होईल ह्या दृष्टीनें ती संक्षेपानें दिली आहे. कलकत्ता विश्वविद्यालयांतील अप्लाइड केमिस्ट्री शाखेचे प्रमुख, डॉ. बी. सी. गुहा, ह्यांनीं गवताचा अन्न म्हणून उपयोग करतां येणें शक्य आहे, असें प्रसिद्ध केलें आहे, व सध्याच्या अडचणींचें प्रसंगीं गवत व झाडपाला ह्यांचें मिश्रण खाण्यास त्यांनीं गरिबांस सुचविलें आहे, ही हकीकत नुकतीच प्रसिद्ध झाली आहे.

## प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट, मुंबई

### ठाणें जिल्हा सेक्रेटरीकरितां शिक्षण वर्ग

इन्स्टिटयूटची नवी घटना मंजूर झाल्यापासून तिनें आपला आखलेला कार्यक्रम मोठ्या उत्साहानें पार पाडण्यास सुरुवात केली आहे. इन्स्टिटयूटकडे नव्या घटनेनुसार फक्त सहकारी शिक्षणाचेंच कार्य प्रामुख्यानें असल्यानें तिनें गेल्या फेब्रुवारींत अर्बन बँकांच्या नोकर वर्गास शिक्षण देण्याकरितां एक वर्ग मुंबई येथें उघडला होता. आतां तिनें ठाणें जिल्ह्यांतील सहकारी पतपेढ्यांकरितां एक शिक्षक वर्ग येत्या मेच्या १ तारखेपासून बोर्डीस उघडण्याचें ठरविलें आहे. शेतकी पतपेढ्या आतां इन्स्टिटयूटच्या सभासद राहूं शकत नाहींत. तरी पण वरील शिक्षण वर्गात सर्व शेतकी पतपेढ्यांच्या सेक्रेटरींना मोफत शिक्षण देण्यांत येणार आहे. एवढेंच नव्हे तर विशेष अभिनंदनीय गोष्ट ही कीं सदर सेक्रेटरींची राहण्याची व जेवणखाण्याची सोयहि इन्स्टिटयूट आपल्या खर्चानें करणार आहे. वरील वर्ग ता. १ मे पासून २१ मे पर्यंत चालू राहील व ता. २४ व २५ मे रोजीं सेक्रेटरींची परीक्षा घेण्यांत येईल. वर्गांत सहकारी कायदा, शेतकी कर्जनिवारण कायदा, कुळ कायदा, शेतकी मालाच्या विक्रीबाबतचा कायदा वगैरे कायद्यांची सहकारी तत्त्वें, सोसायटयांचे प्रकार व त्यांचे पोट नियम, कर्जाचे विविध प्रकार व त्यांबाबत विशेष लक्षांत ठेवण्याजोग्या गोष्टी, लवाद, वसुली, सोसायट्या गुंडाळण्याबद्दलची सर्व माहिती, जमीन गहाण बँका व त्यांचे व्यवहार, सहकारी सोसाट्यांचे हिशेब व इतर कागदपत्रें वगैरे विषय शिकविण्यांत येणार आहेत. शिक्षण देण्याकरितां इन्स्टिटयूटच्या ऑफिसचे सुपरिंटेंडंट श्री. तळपदे व अकौंटंट श्री. बापट, प्रॉ. को. बँकेमधील श्री. एच्. एस्. पाटील, श्री. हळबे, श्री. खंडागळे, बोर्डी येथील रुरल असि. ट्रेनिंग सेंटरचे सुपरिंटेंडेंट श्री. पाटील वगैरे अनुभवी गृहस्थांची नेमणूक करण्यांत आली आहे. तेव्हां अशा संधीचा फायदा ठाणे जिल्ह्यांतील बरेचसे सेक्रेटरी घेतील असा विश्वास वाटतो.

यानंतरचा इन्स्टिटयूटचा कार्यक्रम म्हणजे लँड मॉर्गेज बँकांच्या नोकरवर्गाकरितां एक शिक्षण वर्ग मुंबई येथें जुलै १९४३ मध्यें व सेल सोसायट्या वगैरेचे सेक्रेटरीकरितां मार्केटिंग क्लास चालविणें हा होय. सदर मार्केटिंग क्लास ऑगस्ट १९४३ मध्यें भरविण्यांत येणार आहे व त्यामध्यें मुख्यत: सेल सोसायटयांचे सेक्रेटरी अगर वरिष्ठ अधिकारी यांनाचें दाखल केलें जाईल. सदर वर्गांत इंग्रजींतून शिक्षण दिलें जाणार आहे. परंतु इंग्रजी न जाणणाऱ्या व इतर नोकरवर्गाकरितां प्रांतिक भाषेमध्यें शिक्षण देण्याकरितां वेगळे वर्ग मागाहून काढण्यांत येतील.

अर्बन बँक सेक्रेटरींची परीक्षा मेच्या ३ तारखेस मुंबई येथें घेण्यांत येणार आहे.

### सटाणा सहकारी वृत्त

शुक्रवार ता. ९।४।४३ रोजीं सटाणा ता. को. सु. युनियनच्या ऑफिसांत मे.आर. बी. पालेकरसाहेब को. सो. धुळे भाग हे सेवानिवृत्त झाल्यामुळें त्यांना निरोप देण्यासाठीं व मे.डब्ल्यू.डी. साळुंखे साहेब को. सो. यांची नेमणूक धुळें भागला झाल्यामुळें त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं बागलाण तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांतील कार्यकर्त्यांची जंगी सभा झाली. पुष्कळशा वक्त्यांनीं गुणगौरवपर भाषणें केलीं. त्यांच्या योग्य मार्गदर्शकत्वाखाली व सहानुभूतीच्या वागणुकीखाली बागलाण तालुक्यांत सहकारी चळवळीची वाढ होऊन सुधारणा झाली. सर्वांनीं त्यांना दिर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना केली व त्यांचे जागीं लायक व्यक्तीची निवड करून नेमणूक केली याबद्दल सरकारचे आभार मानले.

### प्रो. बेरी यांचें शोचनीय निधन

मुंबईच्या सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समधील अर्थशास्त्राचे प्राध्यापक श्री. बेरी हृदयविकारानें गेल्या आठवड्यांत अकालीं मृत्यू पावले ह्याबद्दल आम्हांस अत्यंत खेद होत आहे. प्रो. बेरी फर्ग्युसन कॉलेजांत अर्थशास्त्राचे हुषार विद्यार्थी म्हणून गणले जात आणि त्यांनीं विश्वविद्यालयाच्या परीक्षांत इतिहास व अर्थशास्त्र ह्या विषयांत उच्च स्थान मिळविलें. सरकारी विद्याखात्यांत त्यांचा प्रवेश होऊन त्यांस त्याच विषयाचे प्राध्यापकाची जागा देण्यांत आली. ते साधे, सरळ वृत्तीचे, कष्टाळू शिक्षक होते आणि प्रो. जठार ह्यांच्या सहकारित्वानें त्यांनीं लिहिलेला हिंदी अर्थशास्त्रावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. अर्थशास्त्रीय विषयांवर प्रो. बेरी मधून मधून निबंध व लेख लिहीत असत, त्यांवरून त्यांची अभ्यासू व शिक्षणप्रेमी वृत्ती स्पष्ट दिसून येत असे. सहकारी चळवळी संबंधांच्या प्रश्नांत ते नेहमी लक्ष घालीत असत आणि धारवाडास तेथील कॉलेजांत अध्यापक असतांना त्यांनीं कर्नाटकांतील कपास–विक्रीच्या सहकारी संस्थांचा चांगला अभ्यास करून त्यांवर उपयुक्त लेखहि त्यांनीं लिहिले होते. प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटशीं त्यांचा संबंध होता आणि तो अधिक दृढ व उपकारक होत जाण्याची अपेक्षा होती. त्यांच्या मृत्यूपूर्वी थोडेच दिवस अगोदर प्रो. बेरी ह्यांचा हिंदुस्थानांतील बाजार–भावांचें नियंत्रण ह्या विषयावरील वाचनीय निबंध प्रसिद्ध झाला होता. त्यांच्या मृत्यूनें ह्या प्रांतांतील सहकारी चळवळीची मोठी हानी झाली आहे.

### जळगाव तालुका शेतकी असोसिएशनतर्फें 'अधिक धान्य पिकवा' सप्ताह

ता. १४।३।४३ रोजीं असोसिएशनच्या मॅनेजिंग कमिटीची व इतर खात्यांतील अधिकाऱ्यांची सभा भरून तींत ठरल्याप्रमाणें ता. २३।३।४३ ते ता. २९।३।४३ अखेरपर्यंत जळगांव तालुकाभर "अधिक धान्य पिकवा" असा प्रचार करण्यांत आला. जळगांव तालुक्यांतील एकूण वस्तीच्या ८९ खेड्यांचे १४ विभाग करण्यांत आले होते व प्रत्येक विभागाकरितां निरनिराळे ऑफिसर्स नेमण्यांत आले होते. ज्या त्या ऑफिसरांनीं आपापल्या भागांतील प्रत्येक खेड्यास भेटी दिल्या व तेथें शेतकऱ्यांच्या सभा भरवून व्याख्यानद्वारें चालू हंगामांत अधिक धान्य पिकविण्याची किती आवश्यकता आहे याची जाणीव करून दिली. तसेंच खालील मुद्दे शेतकऱ्यांच्या मनावर बिंबविण्यांत आले:—(१) ज्वारी, बाजरी गहू, हरबरे, उडीद, मूग, चवळी, तूर, इ. खाद्य धान्यें जास्त प्रमाणांत पेरणें. (२) पडीत असलेल्या जमिनी धान्याकरितां लागवडींत आणणें. (३) शेतकऱ्यांनीं स्वतःला लागणारें बीं राखून ठेवणें. (४) बीं लागल्यास तें जळगांव शेतकी असोसिएशनकडून घेणें. (५) खतामुळें पीक अधिक येत असल्यामुळें धान्य पिकांस खत घालणें. (६) धना न पेरणें. गांवोगांव भरलेल्या सभांना एकूण ४,७७३ शेतकरी हजर राहिले होते. प्रत्येक शेतकऱ्यानें अधिक धान्य पिकवावें अशा प्रकारची परिस्थिति निर्माण करण्याकरितां सदरहु प्रचाराचो हरएक गांवीं तेथील वजनदार लोकांच्या (पोलीस पाटील, मुलकी पाटील, तलाटी, सो. चे चेअरमन व पुढारी) कमिट्या नेमण्यांत आल्या आहेत. या सप्ताहांतील प्रचाराचा लोकांचे मनावर उपयुक्त असा परिणाम झाला. दुसरा प्रचार सप्ताह ता. १५।५।४३ ते ३१।५।४३ अखेरपर्यंत असोसिएशनतर्फें पाळण्यांत येणार आहे.

## सटाणा को. सीड सप्लाय ॲन्ड सेल सोसायटी, लि.

सदर सोसायटी सन १९२६ साली रजिस्टर झाली असून त्यावेळी १४ मेंबर्स होते व शेअर भांडवल १४ रु. होतें. पहिली तीन वर्षे भांडवलाभावी व्यवहार सुरू झाला नाहीं. पुढें सन १९३८–३९ अखेर ४६ मेंबर्स व शेअर्स भांडवल रु. ७१० होतें. नंतर निम्मे भरतीवर व्यवहार सुरू केला. सन १९४० साली मुं. प्रां. को. बँकेला सामील झाली व भांडवलाची उणीव दूर केली व पूर्ण कमिशनवर व्यवहार सुरू केला. यंदा सोसायटीनें म्यानेजिंग डायरेक्टरची मागणी केल्यावरून मि. दगा भजवा पाटील यांची म्यानेजिंग डायरेक्टर म्हणून खात्याच्या परवानगीनें नेमणूक केली व व्यवहारास सुरवात केली. त्यांनीं सर्वांच्या सहकार्यानें १३१ मेंबर्स केले. शेअर भांडवल १५ हजारावर झालें असून त्यांत ४३ सोसायट्या मेंबर्स आहेत. अडीच लाखांची शेंग, कापूस, तिळ वगैरे खरेदी-विक्री झाली असून एकूण निरनिराळे व्यवहार हातीं घेतले आहेत. ९ महिन्यांत ९ लाखाची एकूण उलथापालथ झाली आहे. १५ हजारांच्या ठेवी २ टक्के व्याजानें मिळविलेल्या असून १५ हजार रुपये अनामत बिनव्याजी शेतकरी व्यापारी यांचे आहेत. शिवाय ब्यांकेचें कर्ज सार्वे व मालतारणावर मिळून ५० हजारपर्यंत मंजुरी मिळविलेली आहे.

सोसायटीनें फेअर प्राइज शॉप कलेक्टर साहेबांच्या मंजुरीनें काढलें असून गोरगरिबांस धान्य, रॉकेल, व साखर कंट्रोल रेटनें पुरविण्याची व्यवस्था केली आहे. गहू–हरभरा ५,२५० रु. ची खरेदी करून सवलतीच्या दरानें १,००० रु. झीज सोसून वाटले. तसेच जरीला सरकी व शेंगा यांचेंहि बीं अनुक्रमें ११०० व १०५० रु.चें वाटलें आहे. तेंहि कमी भावानें उत्तम बीं दिलें आहे. पेंड पुरविण्याची व्यवस्था केली. १२५ रु. चा भाजीपाला बीं दिलें. पुणें, निफाड वगैरे ठिकाणीं बीं पुरविण्याची व्यवस्था केली.

कापड, झोरे, सतरंज्या, घोंगड्या, रग वगैरेंची विक्रीची व्यवस्था केली असून चहा, लोणी, तूप वगैरेहि व्यवहार केला. मालतारणावर ॲडव्हान्स दिला.

पंच लोकांनीं व इतरांनीं १०९ रु. देणगी मिळविली. ६ लोक पगारी असून १० लोक कमिशन पद्धतीवर नोकरीस आहेत. ४ गोडाउन्स असून मध्यवर्ती व्यवस्थित ऑफीस आहे. कमिटींत २ पदवीधर वकील निस्वार्थबुद्धीनें काम करीत आहेत. आजपर्यंत संस्थेस सरकारी मदत मिळालेली नाहीं. एकूण अडत कमिशन ३ हजारापर्यंत मिळविली आहे.

सोसायटीनें रेडक्रास फंडास १०१ रु. देणगी दिलेली आहे. आडीट वर्ग ब आहे. अशा रितीनें संस्थेनें सवलती देऊन प्रगति अल्प मुदतींत करून दाखविली आहे.


राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

THE FARMER

HIS WELFARE & WEALTH

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

Price Rs. 10 nett

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT

Sir Vithaldas Thakersey Memorial Building

9 Bakehouse Lane, Fort, Bombay.

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख ५ मे १९४३ अंक १८

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

डायरेक्टर्स

श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, श्री. फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळवे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४ | महिंद्रकर ब्रदर्स | बुधवार चौक, पुणें
तयार कपड्याचे व्यापारी

## विविध माहिती

### आगबोटींची हानि

संयुक्त राष्ट्रांच्या १ कोटि, २० लक्ष टनांच्या आगबोटी १९४२ सालीं बुडाल्या.म्हणजे अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांनीं मिळून त्या वर्षी बांधलेल्या आगबोटींच्या वजनापेक्षां बुडालेल्या आगबोटींचें वजन अधिक भरलें. १९४२ च्या अखेरीस आगबोटी बुडण्याचें प्रमाण उतरलें.

### दररोज ६ पैशां शिष्यवृत्ति

कुलाबा जिल्ह्यांतील रानटी जातीच्या मुलांपैकीं जीं मुलें शाळेच्या दिवसांपैकी निदान ५० दिवस तरी हजर राहातील, त्यांस दररोज ६ पै ह्याप्रमाणें स्कॉलरशिप देण्यांत येईल असें सरकारनें जाहीर केलें आहे. ही रकम रोख अगर कपडे, पुस्तकें अथवा पाट्या ह्यांचे स्वरूपांत दिली जाईल.

### प्राप्तीवरील कर आणि म्युनीसिपल कर

स्थावर मालमत्तेवरील प्राप्तीवर कराची आकारणी करतेवेळीं त्या मालमत्तेबाबत भरलेली म्युनिसिपल कराची रकम वजा करतां येते किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचा निवाडा मुंबई हायकोर्टानें नुकताच केला. मि. महमदभाय रावजी ह्यांनीं १९३९-४० च्या हिशोबाच्या वर्षी मुंबई म्युनिसिपॅलिटीस आपल्या मालकीच्या मालमत्तेबाबतच्या कराचे १६,३७० रुपये भरले. मालमत्तेच्या वार्षिक उत्पन्नांतून कांहीं रकमा कमी करतां येतात, त्यांपैकी "वार्षिक चार्ज" ही एक बाब आहे आणि म्युनिसिपल कर हा एक वार्षिक चार्ज आहे, ह्या मुद्यावर म्युनिसिपल प्रॉपर्टी टॅक्स हा एकूण उत्पन्नांतून वजा करावा, ही मि. रावजी ह्यांची मागणी होती, ती हायकोर्टानें अमान्य केली.

### बॉंबे टॉकीज लि.

वरील चित्रपट कंपनीनें ३१ ऑक्टोबर १९४२ अखेर संपलेल्या वर्षाच्या नफ्यांतून ऑर्डिनरी भागांस ८% कर माफ डिव्हिडंड दिलें. कंपनीस १,०७,६३५ रुपये नफा झाला.

### इंडियन पीनल कोडांत दुरुस्ती

कित्येक वेळां चलनी व बँक नोटांच्या फोटोचा जाहिरातीसाठी उपयोग करण्यांत येतो. हिंदी जनता बहुंशीं निरक्षर व अशिक्षित असल्याकारणानें अशा चित्रांमुळें त्यांचा गैरसमज होऊन चलनव्यवस्थेसहि धोका निर्माण होण्याचा संभव आहे. हें सर्व टाळण्यासाठी नोटांचीं चित्रें छापण्यास मनाई करणारा एक कायदा हिंदुस्थान सरकारनें नुकताच केला आहे, तो २६ मार्च रोजीं अमलांत आला. नोटांचीं चित्रें छापणारांस त्या अन्वयें १०० रुपयांपर्यंत दंड होऊं शकेल.

### तूप व दुभतीं जनावरें ह्यांच्या निर्गतीवर नियंत्रण

तूप व दुभतीं जनावरें ह्यांच्या निर्गतीस आळा बसविण्यासाठी अलवार संस्थानानें तुपावर दर मणास ४० रुपये जकात बसविली आहे. गाईंची निर्गत पूर्णपणें बंद करण्यांत आली आहे. म्हशी, बैल व पारडीं ह्यांच्या निर्गतीस प्रत्येकी २५ रुपये जकात पडेल.

### सेंट्रल शुगर कमिटी

इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या धर्तीवर एक सेंट्रल शुगर कमिटी नेमण्याचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे. ह्या कमिटीच्या कामाचा वार्षिक खर्च १२ हजार रुपये येईल.

### जर्मन भांडवलाची युरोपियन देशांत गुंतवणूक

जर्मनी युरोपांतील आपल्या मांडलिक देशांवर जबर खंडणी बसवीत असून, त्यांतील जर्मन सैन्यावर होणारा खर्च वजा जातां बरीच रक्कम उरते. तिचा विनियोग जर्मनी अंकित देशांतील उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याकडे करीत आहे व अशा रीतीनें त्या धंद्यांवर पकड बसवीत आहे. युद्धसमाप्तीनंतर हें भांडवल उरूं देतां कामा नये, असें ब्रिटिश पत्र "टाइम्स" आपल्या अग्रलेखांत म्हणतें.

### गवताची व कडब्याची टंचाई दूर करण्याचा प्रयत्न

मुंबई शहर व उपनगर येथें जनावरांस कडब्याची टंचाई भासूं लागल्यामुळें दुधाचे भाव चढले आहेत. रेशनिंगच्या पद्धतीनें जनावरांच्या मालकांस कडबा पुरविण्याची एक योजना बॉंबे ह्युमॅनिटेरियन लीगनें आखली व ती मुंबई सरकारास सादर केली. सरकारनें ती मंजूर केली आहे. ह्या योजनेस अनुसरून, गवत व कडबा ह्यांचा पुरवठा व विक्री हीं सर्वस्वीं लीगच्या हातीं राहणार आहेत. मुंबई सरकारनें पंचमहाल व खानदेश जिल्ह्यांत विकत घेतलेलें २३ कोटि पौंड गवत लीगच्या स्वाधीन केलें आहे, तें लीगनें १००० पौंडास ३८ रुपये ह्या दरापेक्षा अधिक दरानें विकतां कामा नये, असें ठरलें आहे. ही किंमत मुंबई सरकारास परवडणारी नाहीं, तथापि मुंबईच्या दूध-पुरवठ्याच्या दृष्टीनें सरकार नुकसान सोशीत आहे, असें प्रसिद्ध झालें आहे.

### तिळाच्या लागवडींत वाढ

१९४२-४३ च्या सरकारी अंदाजाप्रमाणें त्या वर्षाच्या पूर्वीच्या सालाचे मानानें हिंदुस्थानांतील तिळाची लागवड ४०% वाढून ती ४३,२८,००० एकर झाली. तिळाचे उत्पादनांत १२% वाढ अपेक्षित आहे.

### हिंदी कपाशीचें उत्पादन २६% घटलें

हिंदी कपाशीची लागवड व उत्पादन ह्यासंबंधींच्या ताज्या सरकारी अंदाजावरून असें दिसतें कीं कपाशीची लागवड गेल्या वर्षापेक्षा २२% कमी झाली व उत्पादन २६% घटलें. लागवड व उत्पादन ह्यांविषयीं आकडे खालीं दिले आहेत:—

| कपाशीचा प्रकार | लागवड (एकर) | उत्पादन (४०० पौं. च्या खंडी) |
|---|---|---|
| बंगाल | १६,९५,००० | ५,८४,००० |
| अमेरिकन | ३१,४९,००० | १४,५२,००० |
| उमरा | ५०,८६,००० | ९,३३,००० |
| भडोच | ७,७४,००० | १,९२,००० |
| सुरती | ५,२८,००० | १,१०,००० |
| धोल्लरा | १३,०७,००० | २,५३,००० |
| इतर | ६३,७३,४०० | १०,३०,००० |
| | १,८८,१२,००० | ४५,५४,००० |

### हिंदुस्थानचा युद्धखर्च

"हिंदुस्थानचा १९४२-४३ मधील युद्धखर्च १८ कोटि पौंड झाला. ही रकम हिंदी लोकांच्या आर्थिक परिस्थितीच्या मानानें मोठीच आहे. युद्धापूर्वी हिंदुस्थानाचा वार्षिक लष्करी खर्च ३३ कोटि पौण्ड इतकाच होता."—भारतमंत्र्यांचे सल्लागार, सर अतुल चतर्जी, ह्यांनीं लंडन "टाइम्स" ला लिहिलेल्या पत्रांतील उतारा.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... १३८ |
| २ संयुक्त राष्ट्रांस अमेरिकेचें युद्धसहाय. | ... १३९ |
| ३ "अधिक धान्य पिकवा" | १४० |
| ४ स्फुट विचार... चांदी-सोन्यासंबंधानें लंडनचा अभिप्राय-शिधा पद्धतीविषयीं एक प्रश्न—पश्चिम क्षेत्रांतील युद्ध परिस्थिति. | ... १४१ |
| ५ प्राथमिक शिक्षण प्रसार | ... १४२ |
| ६ महाराष्ट्र एपेक्स बँक | १४३ |
| ७ व्यापारांतील अडचणी | १४३ |

अर्थ

बुधवार, ता. ५ मे, १९४३

## संयुक्त राष्ट्रांस अमेरिकेचें प्रचंड युद्धसहाय

### खंड–उसनवार पद्धतीचें यथार्थ स्वरूप

खंड–उसनवार पद्धतीनें अमेरिका आज सर्व संयुक्त राष्ट्रांना युद्धोपयोगी माल शक्य तेवढ्या मोठ्या प्रमाणावर पुरवीत आहे. ह्या पद्धतीचा अवलंब अमेरिकेनें कोणत्या प्रकारानें केला, त्यामध्यें अमेरिकेचा हेतु काय आहे, खंड–उसनवार म्हणजे काय, इत्यादि गोष्टींबद्दल सर्वत्र बरेंच अज्ञान दिसून येतें. त्यांत अमेरिकेची कांहींतरी स्वार्थमूलक कारवाई असली पाहिजे, असाहि अमेरिकेवर क्वचित् प्रसंगीं आरोप केला जातो. अमेरिकेची संपत्ति व वार्षिक राष्ट्रीय उत्पादन एवढें मोठें आहे, कीं अमेरिका इतर राष्ट्रांस किती मदत करूं शकेल, ह्यास सीमाच दिसत नाहीं. ग्रेटब्रिटन अथवा जर्मनी ह्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षां अमेरिकेचें उत्पन्न चौपट आहे. सबंध युरोपच्या वार्षिक उत्पन्नापेक्षां अमेरिकन उत्पादन दुप्पट भरेल. एवढें सामर्थ्यवान राष्ट्र संयुक्त राष्ट्रांस सढळ हातानें सहाय करीत आहे, त्याचें मूळ उद्दिष्ट व परिणाम हीं लक्षांत येणें आवश्यक आहे.

खंड–उसनवार कायदा अमेरिकन काँग्रेसनें मार्च, १९४१मध्यें मंजूर केला. ज्या देशांचें संरक्षण अमेरिकेच्या अध्यक्षांचे मतानें अमेरिकेच्या संरक्षणास आवश्यक आहे, अशा देशांकरितां युद्धोपयोगी मालाचें उत्पादन करण्याचा अथवा तो मिळवून देण्याचा अध्यक्षांस अधिकार देणें, हा प्रस्तुत कायद्याचा मुख्य हेतु आहे. ज्यांचें संरक्षण करणें अमेरिकाच्या संरक्षणाचे दृष्टीनें अगत्याचें आहे, अशा देशांस युद्धोपयोगी माल विकणें, मोबदल्यांत देणें, खंडानें देणें, उधार देणें, किंवा अन्य मार्गानें त्यांस तो उपलब्ध करणें, ह्याहि बाबी त्या अधिकारांत अंतर्भूत आहेत. अध्यक्षास दिलेले हे अधिकार ३० जून, १९४३ अखेर संपतात व ह्या अधिकारान्वयें द्यावयाच्या मालाची निर्गत १ जुलै, १९४६ पूर्वी झाली पाहिजे असा खंड–उसनवार कायद्याचा दंडक आहे. खंड–उसनवार कायद्याच्या कक्षेत ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व देश व आणखी ३५ इतर देश येतात. ह्या कायद्याची मुदतवाढ होण्यास मुळीच अडचण पडणार नाहीं व प्रस्तुत युद्धप्रयत्नाची ती एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे, हें कोणीहि कबूल करील.

अमेरिका युद्धांत पडण्यापूर्वीच्या आरंभीच्या काळांत, युद्धमान देशांस शस्त्रास्त्रें पुरविण्यास तटस्थता कायद्यानें अमेरिकेस बंदी केलेली होती, ती बंदी अमेरिकेच्या अध्यक्षांनीं नोव्हेंबर, १९३९ मध्यें अंशतः दूर केली. युद्धमान देशांनीं अमेरिकेकडून शस्त्रास्त्रें खरेदी करण्यास हरकत नाहीं, मात्र त्यांची किंमत अमेरिकेस रोखीनें मिळाली पाहिजे व त्यांची निर्गत करण्यास अमेरिकन आगबोटी मिळणार नाहींत, असा ह्या तटस्थता कायद्याच्या दुरुस्तीचा अर्थ होता. ह्यालाच "कॅश आणि कॅरी" म्हणजे "रोख रकम देऊन माल न्या" करार असें म्हणतात. ह्या योजनेप्रमाणें ग्रेट ब्रिटननें अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यास प्रारंभ केला. ही खरेदी पुढें इतकी वाढली, कीं ग्रेट-ब्रिटनचें अमेरिकेंतील भांडवल संपुष्टांत येऊं लागलें. १९४१ च्या प्रारंभीं ह्यासंबंधांत कांहीं तरी नवी योजना करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. ग्रेट ब्रिटनकडे युद्धसाहित्याचा ओघ कायम राहिला पाहिजे ह्या दृष्टीनें १९४१ च्या मार्चमध्यें वर सांगितल्याप्रमाणें खंड–उसनवार कायदा करण्यांत आला.

खंड–उसनवार कायद्यान्वयें अमेरिका ग्रेट ब्रिटन व इतर देश ह्यांस मदत देत आहे, तिचें स्वरूप कोणतें आहे, ह्याचा खुलासा प्रेसिडेंट रूझवेल्ट व अमेरिकन सेक्रेटरी फॉर वार मि. स्टिम्सन ह्यांचे भाषणांत वारंवार आलेला आहे. खंड–उसनवार पद्धतीनें अमेरिका खरोखर आपलें संरक्षणच विकत घेत आहे; ही मदत म्हणजे संयुक्त राष्ट्रांस दिलेलें कर्ज नव्हे वा धर्मादाय देणगीहि नव्हे; त्याचप्रमाणें अमेरिका युद्धसाहित्य पुरविते, ह्याचा अर्थ ग्रेट ब्रिटन, रशिया, इत्यादि राष्ट्रांनीं आपलें उत्पादन कमी करून अमेरिकेकडून सर्व सहाय्याची अपेक्षा करणें असाहि नव्हे; एकट्या अमेरिकेनें इतर राष्ट्रांस मदत करावी, इतरांनीं मात्र अमेरिकेस सहाय्य करूं नये, असाहि त्याचा अर्थ नाहीं.

ग्रेट ब्रिटन रशियाला युद्धसाहित्य पुरवीत आहे, तें अमेरिकन पद्धतीनेंच. फरक इतकाच, कीं अमेरिकेच्या उत्पादनाचें मान अत्यंत मोठें असून तो देश प्रत्यक्ष रणभूमीपासून जरा दूर आहे. त्यामुळें अमेरिकेची इतर राष्ट्रांस होणारी मदत साहजिकच फार प्रचंड स्वरूपाची आहे. अमेरिकेकडून खंड-उसनवार पद्धतीनें ज्या मालाची निर्गत होते, त्यांत विमानें, रणगाडे, बंदुका, दारूगोळा इत्यादि लष्करी गोष्टी; पोलाद, पेट्रोल, मशीनटूल्स इत्यादि औद्योगिक महत्त्वाच्या बाबी व खाद्य आणि शेतीविषयक पदार्थ ह्यांचा मुख्यतः समावेश होतो. एकूण निर्गतीपैकीं सुमारें ३५% माल ग्रेट ब्रिटनकडे, ३५% माल रशियाकडे व ३०% माल मध्यपूर्व, आस्ट्रेलिया व इतर क्षेत्रांकडे जातो. ह्या सर्व मालाची किंमत आयात करणारे देश शक्यतोंवर देऊन टाकतात, परंतु आज किंमत देतां येत नाहीं म्हणून त्यांची आयात थांबूं नये, हा खंड-उसनवार कायद्याचा खरा अर्थ आहे. सध्याच्या कायद्यानें खंड–उसनवार मदतीची कमाल मर्यादा २५० अब्ज रुपये इतकी बांधून दिलेली आहे. ही मर्यादा जरूर पडली तर वाढविण्यास अमेरिकन काँग्रेस तयार होईल, हें स्पष्ट आहे.

तटस्थतेच्या भूमिकेवरून अमेरिका हळूहळू युद्धसाहित्याच्या पुरवठ्याचें केंद्र कसकशी बनत गेली व प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं

परिस्थितीस अनुसरून अमेरिकन लोकमत सावधगिरीनें व युक्तीनें वळवून अमेरिकन सहाय्याचें मान कसें वाढवलें, ह्याचा गेल्या साडेतीन वर्षांतील इतिहास मोठा उद्बोधक आहे. ह्या मदतीचा युद्धोत्तर आर्थिक परिणाम काय होईल, ह्या प्रश्नाचा विचार आज करण्यास सवड नाहीं.तथापि ह्यासंबंधांतील अमेरिकेची भूमिका स्पष्ट आहे.ती म्हणजे अमेरिका आपण होऊन जागतिक आर्थिक व्यवहार कार्यान्वित करण्यास निघालेली नाहीं; युद्धाच्या धडामोडी, जागतिक गंभीर परिस्थिति, अमेरिकेची प्रचंड उत्पादनशक्ति, इत्यादींचा समन्वय होऊनच आज संयुक्त राष्ट्रांस एवढें प्रभावी युद्धसाहित्य मिळूं शकलें आहे.

## “ अधिक धान्य पिकवा ”

पावसाळयाचा प्रारंभ जवळ येऊं लागला असल्यानें “ अधिक अन्नसामुग्री पिकवा ” ह्या संदेशाचा प्रचार देशभर व विशेषत: मुंबई प्रांतांत जोरानें चालला आहे. धान्यांचें उत्पादन वाढण्यास लागवडीचें क्षेत्र विस्तार पावणें, चांगल्या बियांच्या व खताच्या सहाय्यानें जमिनीची उत्पादकता वृद्धिंगत करणें, शेतीस लागणारा पाणीपुरवठा शक्य तेथें वाढवणें इत्यादि उपायांचा अवलंब करण्यांत येत असून त्यांचे संबंधांत प्रांतिक सरकार निरनिराळया प्रकारांनीं सहाय्य देत आहे. लंडनमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या “एकॉनॉमिस्ट” ह्या प्रसिद्ध साप्ताहिकाच्या हिंदुस्थानांतील लेखकानें ह्या विषयावर व्यक्त केलेले विचार आणि दिलेली माहिती त्या पत्रानें प्रसिद्ध केली आहे तीं येथें नमूद करण्यासारखी आहेत. हिंदुस्थानांत मुख्य धान्यांचें मामुली उत्पादन व पुरवठा हीं किती असतात, युद्धपरिस्थितीमुळें त्यांवर कोणते परिणाम झाले आहेत आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचें प्रस्तुत प्रश्नासंबंधानें विधायक धोरण कोणतें आहे ह्याचें वर्णन करून ‘एकॉनॉमिस्ट’ मधील लेखकानें कांहीं मूलभूत गोष्टींचें विवेचन केलें आहे. प्रांतिक शेती खात्यांनीं शेतीच्या सुधारणेबद्दल केलेल्या प्रयत्नांविषयीं त्यानें धन्योद्गार काढले असून अधिक धान्य पिकवण्याच्या प्रयत्नांचें त्यानें अभिनंदन केलें आहे. तथापि, ह्या सर्व खटपटीस मर्यादा घालणाऱ्या कित्येक मूलग्राही बाबी आहेत त्यांचेकडेहि लेखकानें वाचकांचें लक्ष वेधलें आहे.

प्रसंग आला असतां उत्पादन शक्ति वाढविण्यास मुळांत जे गुण लागतात ते हिंदी शेतीच्या धंद्यांत दिसून येत नाहींत असें लेखकाचें म्हणणें असून त्यानें त्यास आधार म्हणून बारा वर्षांमागें सायमन कमिशननें काढलेल्या उद्गारांचा उल्लेख केला आहे. स्वतःच्या कुटुंबाच्या पोषणास जरूर असलेल्या किमान उत्पादनापेक्षा अधिक पीक काढण्यास हिंदी शेतकऱ्यांस स्फूर्तीच नाहीं हें वर्णन आजहि बहुतांशीं लागू आहे असें त्याचें मत आहे. पाश्चात्य देशांत आपल्या धंद्यांत अधिक फायदा काढण्याची तिकडील शेतकरी खटपट करितात. हिंदी शेतकऱ्यांस असली पैशाची व नफ्याची टोचणी नसते ह्याचीं कारणें लेखकानें नमूद केलीं आहेत. लहान आकाराचीं शेतें हें त्यांतलें एक आहे. पंजाबमध्यें कांहीं वर्षांमागें चोवीसशें खेड्यांची पहाणी करण्यांत आली, तींत असें दिसून आलें कीं १८ टक्के शेतें प्रत्येकीं एक एकरापेक्षां लहान आकाराचीं होतीं, २५ टक्के एक ते तीन एकरांचीं होतीं, तीन ते पांच एकरांच्या आकाराचीं शेतें १५ टक्के होतीं आणि पांच ते दहा एकरांचीं १८ टक्के होतीं. इतर प्रांतांत शेतांचा सरासरीचा आकार पंजाबच्या मानानें पुष्कळ कमी आहे. इंग्लंडमध्यें शेतीचा खर्च दर एकरास २०० रुपये येतो; पंजाबमध्यें ३० रुपये भांडवल पुरें होतें. शेतांचा आकार लहान असतो, एवढेंच नव्हे तर त्यांचे तुकडे इतस्ततः पसरलेले असतात, ह्याकारणानें असल्या जमिनींत फायदेशीर पिकें काढणें अशक्य होतें. रत्नागिरी जिल्ह्यांत कांहीं शेतें एका एकराच्या एकशें साठाव्या भागा एवढीं चिमकुलीं असल्याचें आढळून आलें आहे.

धंद्याच्या वाढीस विघातक असलेली ही शेतांच्या आकाराची गोष्ट झाली. प्रत्यक्ष धंद्याच्या पद्धतीची तऱ्हा तरी उत्पादक असावी, पण तीहि नाहीं असें ‘एकॉनॉमिस्ट’ मधला लेखक म्हणतो. हिंदी शेतांत एक कोटि, तीस लक्ष लाकडी नांगर काम करीत आहेत आणि जमीन सारखी करणें, नांगरणें वगैरे क्रिया त्यांचेकडून होत आहेत. पिकें कापणें, मळणी करणें हीं सर्व कामें अगदी गावठी पद्धतीनें चालतात. शेतकऱ्यांपाशीं बियास धान्य शिल्लक रहात नाहीं; तें त्यांनीं खाऊन टाकलेलें असतें आणि हलक्या दर्जाचें बीं त्यांस सावकारांकडून भलत्या किंमतीनें घ्यावें लागतें. ह्या सर्व बाबतींत सुधारणा झाल्यावांचून हिंदी शेतीचें उत्पादन कसें वाढणार ? १९३८-३९ मध्यें हिंदी तांदुळाचें सरासरीचें दर एकरीं उत्पन्न ७३१ पौंड होतें. इतर देशांतले तुलनात्मक आकडे असे होते: अमेरिका १४८१ पौंड, जपान २३०७ पौंड, इजिप्त २०७९ पौंड आणि इटली ३००० पौंड. गव्हाच्या पैदाशीचे तुलनात्मक आकडे त्याच प्रकारचे आहेत. हिंदुस्थानच्या अन्नपुरवठ्याच्या आणि बहुसंख्य जनतेच्या जीविताचा आधार असलेल्या शेतीच्या धंद्याच्या मुळाशीं कोणत्या महत्त्वाच्या बाबी आहेत ह्याचें दिग्दर्शन करून प्रांतिक शेतीखात्यांनीं चालवलेल्या सुधारणेच्या प्रयत्नांस पूर्ण यश आल्यास ह्या धंद्याच्या स्थितींत क्रांति घडून येईल असें ‘एकॉनॉमिस्ट’मधील लेखक म्हणतो. युद्धकालांतील अडचणी आणि त्यांवर योजण्यांत येणारे तात्पुरते उपाय ह्यांच्या अनुभवाचा उपयोग युद्धोत्तर काळांत योजनात्मक रीतीनें हिंदी शेतीच्या धंद्याची उन्नति घडवून आणण्यांत झाला पाहिजे हा सिद्धांत त्याच्या लेखावरून स्पष्ट निघतो.

## हिशेबांत हुषारी

दुकानदार बाप (मुलास): रावसाहेबांकडून आपलें बरेंच दिवसांचें येणें आहे. त्याबद्दलचें बिल त्यांचेकडे पाठविलेंस कां ?

मुलगा : होय, बाबा.

बाप : पांच रुपये चढवून बिल केलेंस कीं नाहीं ?

मुलगा : पांच रुपये आणि दीड आणा चढविला आहे.

बाप : हा आणखी दीड आणा कसला ?

मुलगा : बिल अधिक केलें म्हणून रावसाहेबांची तक्रार हटकून येणार आणि तिला उत्तर आपणांस धाडावें लागेल त्याबद्दलच्या पोस्टाच्या तिकिटाचा खर्च !

## २० कोटि रुपयांचें नवें कर्ज

हिंदी रेल्वेजच्या डिबेंचर्सची परतफेड करण्यासाठी हिंदुस्थान सरकार २० कोटि रुपयांचें ३% व्याजाचें व १९४६ सालीं परत फेडावयाचें कर्ज उभारणार आहे.

# स्फुट विचार

### चांदी-सोन्यासंबंधानें लंडनचा अभिप्राय

हिंदुस्थानांत मुंबईचा सोन्या-चांदीचा बाजार फार मोठा आहे आणि त्यामध्यें ह्या धातूंच्या किंमती अपूर्व रीतीनें भडकल्याचें आम्हीं गेल्या "अर्था"च्या अंकांत निदर्शनास आणलें होतें. ह्या विलक्षण तेजींत सट्टेबाजीचें अंग निश्चित होतें आणि तीस आळा घालण्यासाठीं बाजाराच्या नियामक मंडळास मध्यें पडावें लागलें होतें. गेल्या आठवड्याचे अखेर चांदी-सोन्याची तेजी थोडीशी नरमली आणि ह्या धातूंचे भाव १२३ व ८८ रुपये ह्या मर्यादेंत राहिल्याचें दिसून आलें. हे भाव वस्तुस्थितीच्या मानानें तेजीचेच आहेत, ह्या आशयाचा अभिप्राय लंडनमधील तज्ज्ञांच्या गटांत व्यक्त करण्यांत आला आहे. इंग्लंडमधील आणि हिंदुस्थानांतल्या चांदी-सोन्याच्या बाजारभावांत अर्थातच प्रमाणबद्धता राहिलेली नाहीं. उदाहरणार्थ, लंडनमधली चांदीची किंमत येथील किंमतीच्या एक पंचमांशाइतकी आहे. हिंदुस्थानांत चलनाच्या फाजील विस्तारामुळें बाजारभाव चढत आहेत ह्याची जाणीव ब्रिटिश तज्ज्ञ पत्रांत स्पष्टपणें प्रकट करण्यांत आली आहे. चांदी-सोन्याचे भाव चढण्याचें हें एक कारण असल्याचें आम्हीं लिहिलें होतें त्यास ह्या मतानें दुजोरा मिळत आहे. युद्धोत्तर काळांतील जागतिक चलन व्यवस्थेच्या संबंधांत इंग्लंडमध्यें व अमेरिकेंत योजना पुढें मांडण्यांत आल्या आहेत, त्यांत सोन्यास महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें असल्यानें ह्या धातूची किंमत चढीची रहाणार ह्या भावनेनें मुंबईच्या बाजारांत सट्टेबाजांनीं किंमती कृत्रिम रीतीनें चढवल्या आहेत, पण ह्या कल्पनेस वस्तुस्थितीचा आधार नाहीं असा लंडनमधल्या तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. तसेंच, ब्रिटिश सरकार अमेरिकेकडून उसनवारीच्या पद्धतीनें चांदी घेत आहे, ह्यावरून हिंदुस्थान सरकारची लंडनमधली चांदी संपुष्टांत आली असली पाहिजे असा अंदाज बांधण्यांत येत आहे. पण हा तर्कहि निराधार आहे असें ब्रिटिश तज्ज्ञांचें म्हणणें आहे. हिंदुस्थान सरकारनेंहि अमेरिकन चांदी मिळवल्यास तिचा येथील भाव मंदावेल,पण ह्या व्यवहाराचाहि परिणाम सट्टेवाल्यांकडून चांदीची किंमत चढवली जाण्यांत होईल अशी भीति त्यांस वाटत आहे ! उसनवारीच्या पद्धतीनें अमेरिका इंग्लंडला वीस लक्ष औंस चांदी पुरवणार आहे असें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे.

### शिधापद्धतीविषयीं एक प्रश्न

खाद्य पदार्थांची नियमबद्ध वाटणी चालू झाली असतां उद्भवणाऱ्या अडचणींविषयीं अगोदर तयारी ठेवावी लागते आणि वेळोवेळ उत्पन्न होणाऱ्या भानगडींच्या प्रश्नांचा निकाल लावावा लागतो. इंग्लंडमध्यें ही पद्धति बराच काल चालू आहे. तिच्या बाबतींत अन्नसामुग्रीच्या नियमित वाट्यांपैकीं कांहीं भाग बक्षिस म्हणून दुसऱ्यास देणें कायदेशीर आहे काय असा प्रश्न पार्लमेंटांत विचारण्यांत आला तेव्हां सरकारतर्फे असें सांगण्यांत आलें कीं अन्नसामुग्री अदलाबदलींत किंवा फुकट दिली जाणें अनिष्ट आहे. असल्या व्यवहारांच्या योगानें चोरटे बाजार उपस्थित होण्यास वाव मिळण्यासारखा असल्यानें ते प्रकार बंद पाडले पाहिजेत आणि त्या दृष्टीनें कायद्यांत इष्ट ती दुरुस्ती करण्याचा विचार चालू आहे असें उत्तर योग्य सरकारी अधिकाऱ्यांनीं दिलें. तथापि, नियंत्रित पुरवठ्यापैकीं कांहीं भाग कोणी सद्हेतूनें दुसऱ्यास दिल्यास त्यावर खटला करण्यांत यावयाचा नाहीं असेंहि आश्वासन देण्यांत आलें. शिधापद्धतीचा दुरुपयोग केला जाऊं नये आणि तिचा अयोग्य फायदा कोणीहि घेतां कामा नये ह्याविषयीं सरकारनें दक्षता बाळगिली पाहिजे. पण नियम जाणून बुजून मोडण्याचा हेतु नसून किंवा शिधापद्धति यशस्वी होण्याच्या मार्गांत व्यत्यय आणण्याची कल्पनाहि मनांत नसतांना ठराविक शिध्यांतला भाग बदल्यांत किंवा फुकट दुसऱ्यास देण्याचा प्रकार घडण्याचा पुष्कळ संभव आहे. तो नियमास अपवाद म्हणून समजला जाणें सरळ दिसतें. ब्रिटिश प्रधान मंडळाच्या वतीनें करण्यांत आलेल्या वर निर्दिष्ट केलेल्या खुलाशाचा व दिलेल्या आश्वासनाचा हाच आशय दिसतो. ह्या देशांत व प्रांतांत शिधापद्धति चालू होत आहे, तेव्हां असल्या प्रश्नांचा विचार वेळींच झाला असला म्हणजे सोयीचें होणार आहे.

### पश्चिम क्षेत्रांतील युद्धपरिस्थिति

ट्युनिशियामध्यें मित्रराष्ट्रांच्या सैन्यांचें पाऊल हळूहळू पण निश्चयानें पुढें पडत चाललें आहे आणि ट्युनिस व बिझर्टा हीं महत्त्वाचीं बंदरें त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आलीं आहेत. जर्मन व इटालियन फौजा अशा रीतीनें घेरल्या जात असतां त्यांनीं निकरानें लढून आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या प्रगतीच्या मार्गांत शक्य तेवढे अडथळे उत्पन्न करावे हें सहाजिक आहे. पण ट्युनिशिया आतां दीर्घकाळपर्यंत आपणांस लढवीत ठेवतां येणें शक्य नाहीं ह्याची जाणीव जर्मन सेनापतींस खात्रीनें असली पाहिजे. अमेरिकन व ब्रिटिश सैन्याची बाजू सर्व अंगांनीं मजबूत व समृद्ध आहे. भूमध्य महासागरांत ब्रिटिश आरमार व विमानदल शत्रूच्या जहाजांचा संहार करीत आहेत, ह्यामुळें जर्मनीस बाहेरून येणाऱ्या लढाऊ सामुग्रीचा तुटवडा पडणें अपरिहार्य आहे. ट्युनिशियांतील युद्ध नुकसान सोसूनहि शक्य तितकें लांबवावयाचें एवढाच जर्मन सेनापतींचा उद्देश दिसतो, कारण त्यांत अखेर यश मिळण्याचा विश्वास त्यांसहि वाटणें अशक्य आहे. अलीकडे हिटलरनें अंकित देशांच्या मुख्याधिकाऱ्यांस भेटीस बोलावून त्यांच्याशीं खास वाटाघाटी केल्या, त्यांचा विषय, ट्युनिशियांतून आपली हकालपट्टी झाल्यावर मित्रराष्ट्रांची दुसरी आघाडी युरोपांत चालू होईल तिला एका बाजूनें तोंड द्यावयाचें व दुसऱ्या बाजूनें रशियाशीं लढत रहावयाचें, हा दुहेरी पेंच कसा सोडवावयाचा ह्या संबंधाचाच असला पाहिजे. मित्रराष्ट्रांमध्यें फूट पाडण्याचाहि प्रयत्न हिटलरनें नुकताच करून पाहिला आहे. पोलंड व रशिया ह्यांचेमध्यें वितुष्ट उत्पन्न करण्याचा जर्मन प्रयत्न फसला आहे आणि हिटलरशाहीचा पूर्ण निःपात करण्याचा निश्चय त्यांनीं एकमुखानें पुन्हां जाहीर केला आहे. रशियन रणक्षेत्रांत जर्मनीची चढाई थांबली आहे. हिटलरनें तिकडे जादा फौजा पाठवल्या असल्याची बातमी आहे. तथापि, त्यांस तोंड देण्याची रशियाची पूर्ण तयारी आहे. ट्युनिशियांतील मोहीम संपतांच जर्मनीच्या हळूहळू कमी होणाऱ्या लढाऊ शक्तीवर जोराचा ताण दुतर्फा पडणार आहे.

### जमीनमहसुलाची वसुली

मुंबई सरकारला १९४१-४२ मध्यें मिळावयाच्या शेतसाऱ्यापैकीं ९९% साऱ्याची वसुली झाली आहे. तहकुबी व माफी हीं वजा करून ३,६९,७६,००० रुपयांच्या येण्यापैकीं ३,६६,५२,००० रुपयांचा सारा वसूल झाला.

## प्राथमिक शिक्षणप्रसार कोणीं व कसा करावा ?

( श्री. ब.मा.कुंभार, म्हा.प्रिन्सिपॉल, एम्. ए. ट्रे. कॉलेज, नाशिक)

आपल्या देशांत शे. ९० लोक निरक्षर आहेत. देशांतील जनतेच्या साक्षरतेवर देशाची उन्नति अवलंबून आहे असें सर्वत्र बोललें जातें. परंतु, त्याप्रमाणें साक्षरता-प्रसाराचे प्रयत्न किती नेटानें चालू आहेत ? कित्येकांना वाटतें कीं, हें काम सरकार, सरकारी शिक्षणाधिकारी व शिक्षक यांचें आहे. कित्येक स्थानिक-स्वराज्य-संस्थांकडे बोट दाखवितात. या गतीनें हें कार्य चालल्यास सर्व देश साक्षर बनण्यास कितीतरी शतकें लागतील ! प्राथमिक शिक्षण-प्रसार ही एक देशोद्धाराची बाब आहे हें तत्त्व मान्य केल्यावर त्याप्रमाणें आपणांकडून होतील ते प्रयत्न करणें हें प्रत्येक सुज्ञ-शिक्षित व्यक्तीचें प्रमुख कर्तव्य होय असें आम्हांस वाटतें. त्या दृष्टीनें कोणीं काय करावें हें थोडक्यांत पाहूं.

**शेतकरी व शैक्षणिक कर**—सुमारें ६५ वर्षांपूर्वी आपले देशांत शेतकी हा एकच प्रमुख धंदा होता. म्हणून सार्वजनिक करासाठीं सरकारास चटकन् शेतकरी दिसला. त्यांवर सर्वांस उपयुक्त अशीं कामें करण्यासाठीं लोकलफंड बसविण्यांत आला. या करांत वेळोवेळीं वाढ होत असतांही कार्याचें महत्त्व जाणून शेतकरी-वर्ग तो बिनतकार भरीत आहे. असा लोकल-फंडासारखा सार्वजनिक प्रत्यक्ष कर शेतकरीवर्गाशिवाय इतर कोणत्याही वर्गावर नाहीं अशी आमची अल्प समजूत आहे.

मोठमोठ्या कारखानदार लोकांवर ते सरकारांत जितका कर भरीत असतील, तितकेंच आणे कर बसवून तो सरकारनें शिक्षण-खात्याचे स्वाधीन केला तर काय हरकत आहे ?

अशा धंद्यांपैकीं ( १ ) **विमा कंपन्या**—हा एक प्रमुख धंदा सध्यां प्रगतिपथावर आहे. या कंपन्या वार्षिक हिशेब करून बोनस जाहीर करतात. अशा नफ्यांतून त्यांनीं एखादा सार्वजनिक कर कां भरूं नये ? आज विमा उतरविण्यांत फक्त शिक्षित लोकच पुढें येत आहेत. यापुढें विमा कंपन्यांना आपलें क्षेत्र वाढविण्यास खेड्यांतील शेतकरीवर्गाकडेच धांव घेतली पाहिजे. परंतु तो वर्ग साक्षर झाल्याशिवाय त्यास विमा उतरविण्याचें महत्त्व पटणार नाहीं. तेव्हां विमा कंपन्यांनीं आपला धंदा नेहमींसारखा चांगला रहावा अशी इच्छा असल्यास त्यांनीं साक्षरताप्रसारास मदत करणें त्यांच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट ठरत नाहीं काय? या कंपन्यांवर सरकारी कांहीं कर असल्यास त्यांवर लोकलफंड सरकारानेंच आकारावा किंवा नसल्यास वार्षिक नफ्याचा कांहीं भाग लोकल-फंड म्हणून त्यांनीं सरकारांत भरावा असा एखादा कायदा करावा असें आमच्या विचारास वाटतें.

**सर्व प्रकारच्या गिरण्या** :—गिरणी-मालकांच्या ऐश्वर्यावरून ते नफ्यांत चालले आहेत हें सिद्ध होतें. अशा श्रीमंत लोकांवर त्यांचें उत्पन्न पाहून एखादा शैक्षणिक कर बसविला तर तो अस्थानीं होईल असें कोणालाहि वाटणार नाहीं. त्यांचेवर सरकारी कर असल्यास ही आकारणी सरकारास सहजसुलभ आहे.

देशांतील सर्व जनता साक्षर झाली, त्यांना आपले सर्व व्यवहार करूं लागले, लोकांची ऐपत थोडीशी सुधारली म्हणजे आपोआपच त्यांच्या गरजा वाढतात. तशा गरजा वाढल्या कीं, लोक नाना प्रकारच्या वस्तु खरेदी करतात. असें झालें म्हणजे आपोआपच कारखानदार लोकांच्या मालाचा खप वाढून त्यांना नफाहि भरपूर होतो.

**डॉक्टरवर्ग** :—चालू काळीं निरनिराळ्या प्रकारच्या रोगांवर निरनिराळ्या प्रकारचे डॉक्टरी इलाज उपलब्ध झाले आहेत. त्यांचा शिक्षित लोक भरपूर उपयोगहि करून घेत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग शेतकरीवर्गास अशिक्षितपणामुळें मुळींच होत नाहीं. यासाठीं या वर्गांत शिक्षण-प्रसार होऊन त्यांना डॉक्टरी इलाजाचें महत्त्व पटविणें, आपल्या ज्ञानाचा त्यांस फायदा मिळून त्यांचा दुःखभार हलका करणें हें सहृदय डॉक्टरवर्गाचें कर्तव्य ठरत नाहीं काय ? या वर्गानेंहि आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग शिक्षणप्रसारासाठीं सरकारचे स्वाधीन करणें योग्य आहे असें म्हणणें वावगें होईल काय ?

**ग्रंथकार, प्रकाशक व मुद्रक**:—देशांत साक्षरतेचा आरंभ झाल्यापासून पुस्तक-प्रकाशन हा एक नवीन धंदा उत्पन्न झाला आहे व तो साक्षरतेबरोबर सारखा वाढत आहे हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. अशा लोकांनीं पुढें त्यांनाच लाभदायक अशा शिक्षण-प्रसाराचे कामासाठीं कांहीं पैका खर्च केला तर त्यांत कांहीं वाईट नसून अगदीं व्यवहार्य आहे अशी विचारांतीं त्यांचीच खात्री होईल. विद्यार्थ्यांच्या वाढीवरच या उपरिनिर्दिष्ट धंद्यांची वाढ आहे हें निश्चित समजावें.

**ध्येयसिद्धीसाठीं शिक्षण-प्रसार**:—आज आपले देशांत शेतकरीवर्गासाठीं अनेक चळवळी चालू आहेत. त्यांत सहकारी चळवळीस प्रमुख स्थान दिलें पाहिजे. ही चळवळ शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उपयोगी पडणारी असून तात्काळ फळ देणारी आहे. परंतु या चळवळीची प्रगति मात्र निराशाजनक आहे असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. आपली शेतकरी-उद्धाराची सहकारी चळवळ यशस्वी करून या खात्यावर होणारा मोठ्या प्रमाणावरील खर्च सत्कारणीं लावावयाचा असेल तर शेतकरी वर्गांत शिक्षण-प्रसार होणें अवश्य आहे. शिक्षणकार्यास हातभार लावण्याला सहकारी संस्थांना पुष्कळ वाव आहे. ज्या संस्थांना वार्षिक बराच नफा होतो, त्यांना त्यांपैकीं कांहीं रक्कम धर्मादाय कामांत खर्च करतां येते. अशा नफ्यांतून सोसायटीनें आपल्या गांवच्या शाळेची गरज अवश्य भागवावी म्हणजे चालकांना शिक्षण-प्रसारास मदत केल्याचें श्रेय मिळणार आहे. आपलें गांव साक्षर झालें म्हणजे आपली सोसायटी चांगली चालून अंतीं आपल्या उद्देशाप्रमाणें शेतकऱ्यांचा अनेक प्रकारचा फायदा करून देतां येईल. तेव्हां शेतकी सोसायट्यांच्या चालकांना विनंति कीं, त्यांनीं आपल्या गांवच्या शाळामास्तरांशीं सहकार्य करून, त्यांच्या शैक्षणिक अडचणी समजून घेऊन त्यांना मदत करावी. यांतच आपल्या भावी पिढीचें खरें कल्याण आहे हें विसरतां कामा नये.

**ज्याचें त्यास-देण्यांतच खरें पुण्य आहे !**—व्यापारी लोकांसाठीं आम्ही असें सांगतों कीं, तुम्ही शेतकऱ्यांशीं जे व्यवहार करतां त्या प्रत्येकांत कांहीं रक्कम धर्माऊ म्हणून काढून घेतां. त्या शेतकऱ्यांच्या आहेत, तेव्हां त्या शेतकऱ्यांसाठींच खर्च झाल्या पाहिजेत असें आमचें मत आहे. त्यांतून कुत्र्यास भाकरी, चिमण्यास पाणी, कबुतरास दाणे, मुंग्यांस साखर, माकडास फुटाणे, देवळांत नंदादीप, यांमध्यें पैसा खर्च करूं नका.

तुमच्या जवळील धर्माऊ रकमांचा व प्रसंगीं तुमच्या खासगी थोड्या द्रव्याचा सुद्धां तुम्ही खेड्यांतील शिक्षणप्रसाराचे कामीं उपयोग करणें हेंच खरें पुण्य आहे. तरी तुम्ही गांवच्या शाळांस भेट द्या. जवळच्या खेड्यांतील शाळांत जा, तेथील अडचणी

नाहींशा करण्याचा प्रयत्न करा, म्हणजे ज्याचा पैसा त्याचे कारणीं लावण्याचें खरें सुख तुम्हांस लाभेल.

**सुशिक्षितांनो, नैतिक जबाबदारी सांभाळाः**—शिक्षण घेऊन सरकारी, निमसरकारी, खासगी अनेक लहानमोठ्या पगाराच्या नोकऱ्यांवर जे स्वदेश-बांधव विलसत आहेत त्यांना आमची नम्र विनंति कीं, बंधूंनो, आपणांकडे असलेलें काम चांगल्या प्रकारें पार पाडून राहिलेल्या वेळांत देशाचा थोडा तरी विचार करा. तुम्हांला मिळालेलें शिक्षण व मिळणारा पैसा याचा देशकार्यार्थ थोडातरी उपयोग होऊं द्या. आपल्या शिक्षणास अप्रत्यक्षपणें शेतकऱ्यानें थोडी तरी मदत केली आहे ही गोष्ट आपले सहज ध्यानीं येईल. त्या वर्गासाठी—त्यांचें शैक्षणिक ऋण फेडण्यासाठी-आपण प्रत्यक्ष कांहीं करावयास नको काय? आपण आपल्या पगारापैकीं दर रुपयास एक पावआणा शैक्षणिक कार्यासाठी सरकारतर्फे शिक्षणखात्याचे स्वाधीन केला, तर इतका पैसा जमेल कीं, शिक्षणप्रसारास पैशांची असलेली अडचण सहज दूर होईल.

**निर्जीव देवांकडून सजीव मानवाकडे याः**—निरनिराळ्या देवळांच्या संस्थानिकांनीं आपल्या खर्चांत थोडी काटकसर करून कांहीं भाग शैक्षणिक कार्यांत खर्च केला तर देवाचा त्यांचेवर रोष होईल असें आम्हांला वाटत नाहीं. "विद्यादानासीं तुल्य पुण्य आणिक न" या कै. चिपळूणकरांच्या उक्तीकडे लक्ष दिलें तर त्यांना आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल. लोक साक्षर बनले, त्यांना चांगलें धर्मग्रंथ वाचतां येऊं लागले, त्यांना धर्माचें उज्ज्वल स्वरूप कळलें तर कांहीं धर्महानि होणार नाहीं हें खास. तरी देवदेवतांनीं आपापल्या पुजाऱ्यांना तसा दृष्टांत देऊन त्यांची दृष्टि शिक्षणकार्याकडे वळवावी, अशी त्यांना माझी नम्र प्रार्थना आहे.

**इनामदार मंडळींनो, गरीबांकडे पहाः**—श्रीमंत देशमुख, देशपांडे, खोत, मालगुजार, राऊळ इ. वतनदार बांधवांना पूर्वी कांहींतरी महत्त्वाचें सरकारी काम करावें लागे, त्याचा मोबदला म्हणून त्यांना नक्त देणग्या व इनाम जमिनी मिळत. त्या देणग्या सरकारनें तशाच चालू ठेवल्या असून जमिनीही त्यांचेकडेच आहेत. मात्र त्याचा मोबदला म्हणून त्यांना कोणतेंही सरकारी मोठें काम हल्लीं करावें लागत नाहीं असें दिसतें. अशा वर्गानें आपल्या उत्पन्नाचा कांहीं अंश शिक्षण-कार्याकडे जरूर खर्च करावा अशी आमची त्यांना विनंति आहे.

**सिनेमा-सृष्टि इकडे दृष्टि देईल काय?**—तुमचे हितचिंतक तुमच्या या नव्या व्यवसायाला "राष्ट्रीय धंदा" हें नांव देतात, तुमचेंहि मत तसेंच असावें. पण राष्ट्रांतील एका मोठ्यांत मोठ्या भागाला जर तुमच्या उत्पन्नाचा कांहींच उपयोग होत नसेल, तर तें नांव सार्थ आहे असें कसें म्हणतां येईल?

**विश्वविद्यालयांत विश्व आहे काय?** उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याचें श्रेष्ठ कार्य विश्वविद्यालयानें अंगिकारलें आहे. उच्च शिक्षणाचा लाभ जास्तींत जास्त विद्यार्थ्यांना घेतां यावा यासाठीं आधीं प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होणें अवश्य ठरत नाहीं काय? या बाबतींत विश्वविद्यालयांनीं कांहींतरी भरीव कार्य करावें अशी त्यांना आमची विनंति आहे.

शिक्षणप्रसाराचें महत्त्व जाणून वरील संस्थांनीं आपण होऊन एकादा लहानसा कर देण्यास सिद्ध व्हावें. त्यांत त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येईल, परंतु तसें झालें नाहीं तर सरकारनें त्या बाबतींत एकादी योजना सत्वर हातीं घेऊन अमलांत आणावी अशी आमची आग्रहाची नम्र विनंति आहे. कोणत्याही दृष्टीनें विचार केला तर सार्वजनिक सुखसोयींचा जास्तींत जास्त फायदा घेणारे शहरवासी सुखवस्तु लोक कमींत कमी कर भरतात ही गोष्ट लक्षांत येते.

सरकारी अगर निमसरकारी नोकरवर्गाच्या एप्रिल महिन्याच्या पगारावर रुपयामागें एक आणा लोकल फंड वर्षातून एकदा आकारण्यास कोणतीच हरकत नाहीं. इन्कमटॅक्सवरही तसा तो बसविल्यास तो अस्थानीं होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. शिवाय असले कर वसूल करण्यास दगदग अगर खर्चही अधिक येण्याचा संभव नाहीं. प्राथमिक शिक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबीकडे खरोखर जनतेचें दुर्लक्ष होत आहे काय, असा प्रश्न उत्पन्न होतो. मुद्दाम दुर्लक्ष कोणी करीत नाहीं पण पैशाच्या कमतरतेमुळें तें आपोआप होतें असें म्हणावें लागतें.

पैशांचे अभावीं खेड्यांच्या शाळांना स्वतःचीं योग्य शाळागृहें मिळत नाहींत, शिक्षणसाहित्यांचा अभाव असतो, साहील खर्चांत काटकसर केली जाते, शिक्षकांस योग्य वेतन दिलें जात नाहीं इ. अनेक कारणांमुळें खेड्यांतील शाळा शहरांतील शाळांप्रमाणें मुलांनीं प्रफुल्ल झालेल्या दिसत नाहींत. शिक्षण-प्रसारासाठीं सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था आपल्याला परीं खर्च व प्रयत्न करीत आहेत, त्यांस आर्थिक मदत करण्यास जनतेनें पुढें आल्याशिवाय हें कार्य पूर्णपणें यशस्वी होणार नाहीं.

## दि महाराष्ट्र एपेक्स बँक लि.

वरील नांवाची एक बँक लवकरच स्थापन होणार असून दि कॅनरा इंडस्ट्रिअल अँड बँकिंग सिंडिकेट लि. उडपी, ही बँक तिचे मॅनेजिंग एजंट्स म्हणून काम करणार आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. ह्या कॅनरा सिंडिकेटचें अधिकृत भांडवल ५६ लक्ष रुपये आणि खपलेलें व वसूल झालेलें भांडवल अनुक्रमें १५ लक्ष १९ हजार रुपये व सुमारें ७ लक्ष, २७ हजार रुपये आहे. खपलेल्या भांडवलापैकीं ७ लक्ष रुपयांचे भाग ५% क्युम्युलेटिव्ह करमाफ डिव्हिडंडचे आहेत. तिची स्थापना १९२५ सालीं झाली असून तिच्या शाखांची संख्या ४६ आहे. सिंडिकेटकडे ३१-१२-४२ रोजीं ५९ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या. सदर्न इंडिया एपेक्स बँक लि. नांवाच्या उडपी येथील बँकेची मॅनेजिंग एजन्सी सिंडिकेटकडे आहे. नवीन निघणाऱ्या बँकेच्या मॅनेजिंग एजंट बँकेच्या व्यवहाराची कल्पना ह्या माहितीवरून वाचकांना येईल. सिंडिकेटच्या ४२ शाखांपैकीं २ शाखा बेळगांव जिल्ह्यांत, ३ शाखा रत्नागिरी जिल्ह्यांत, ४ शाखा धारवाड जिल्ह्यांत व २ शाखा विजापूर जिल्ह्यांत आहेत. खेरीज सिंडिकेटच्या मुंबई व सोलापूर येथेंहि शाखा आहेत.

## व्यापारांतील अडचणी

धंद्यांतल्या अडचणींस कंटाळलेला एक व्यापारी आपल्या मित्रास म्हणाला: "अडचणी दूर करण्याची एक युक्ती मीं आतां योजिली आहे. भल्या मोठ्या पगारावर मीं एक हुशार मनुष्य नेमला आहे, आणि अडचण आली कीं ती दूर करणें हेंच त्याचें काम."

मित्र: पण तुमचा धंदा तोट्यांत चालला आहे आणि एवढा मोठा पगार तुम्हीं कोठून देणार?

व्यापारी: हीच पहिली अडचण दूर करण्याचें काम त्यास प्रथम करावें लागणार आहे!

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या मांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईंत बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

## मधुमेहावरील औषध



तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यामुळे बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आतिष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२१।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

दा. ता. १२-५-४३. ६०.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख १२ मे १९४३ | अंक ११

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें १.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस | |
| काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

**डायरेक्टर्स**

श्री. घों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, श्री. फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कमोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. ढवळे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### चिठोऱ्याचें महत्त्व

नॉर्वेनें सरकार शरण जाण्यापूर्वी त्यानें आपल्या मालवाहू आगबोटींस ब्रिटिश बंदरांचा आश्रय घेण्याबद्दल हुकूम दिला. एका वहीच्या फाडलेल्या चिठोऱ्यावर हा हुकूम पेन्सिलीनें लिहिण्यांत आला व तो रेडिओनें सर्व नॉर्वेजिअन आगबोटींस कळविण्यांत आला. त्यामुळें संयुक्त राष्ट्रांस बऱ्याच आगबोटी मिळूं शकल्या. कागदाचा हा चिठोरा लंडनमध्यें जतन करून ठेवलेला आहे. सध्या ग्रेट ब्रिटनमध्यें नॉर्वेचे २३ हजार खलाशी आहेत. लंडनमधील नॉर्वेचें सरकार इतर राष्ट्रांवर पैशाकरितां अवलंबून नाहीं.

### लंडन रेडिओवरील हिंदी लोकांसाठी कार्यक्रम

लंडन येथून हिंदी नागरिकांसाठी हिंदुस्थानी, गुजराती, मराठी व बंगाली ह्या चार भाषांतून रेडिओवर कार्यक्रम करण्यांत येतात. हिंदुस्थानाचा ३५ वर्षांचा दीर्घ अनुभव असलेले सर माल्कम डार्लिंग हे हिंदुस्थानी विभागाचे प्रमुख आहेत. बी. बी. सी. च्या ईस्टर्न सर्व्हिसमध्यें कपुरथळ्याच्या प्रिन्सेस इंदिरा ह्या इंग्रजींतून पार्लमेंटांतील चर्चा समजावून सांगतात. कलकत्ता विश्वविद्यालयांत नेमलेल्या इंग्रजी पुस्तकांवर ब्रिटिश साहित्यिक हिंदी विद्यार्थ्यांसाठी भाषणें करतात. युद्धासंबंधीं बरोबर माहिती पुरविणें, ग्रेट-ब्रिटनमधील रहाणी व युद्धपरिस्थिति ह्यांची पार्श्वभूमि समजावून देणें व हिंदी सैनिकांची करमणूक करणें हे तीन उद्देश लंडनच्या रेडिओच्या हिंदी विभागापुढें आहेत. हिंदी सैनिकांच्या कुटुंबियांचे संदेश त्यांच्याच आवाजांत लंडन रेडिओवरून सैनिकांस ऐकविले जातात.

### अलेंबिक केमिकल वर्क्स, लि.

वरील कंपनीची १९४२ मध्यें ३३½ लक्ष रुपयांची विक्री झाली. १९४० व १९४१ मधील विक्रीचे आकडे अनुक्रमें १५ लक्ष रुपये व २१½ लक्ष रुपये असे होते. नफ्याची रकम १९४२ सालीं ६ लक्ष, ३७ हजार रुपये झाली. भागीदारांस १२% डिव्हिडंड मिळालें. कंपनीच्या १०० रुपयांच्या भागाची मुंबई स्टॉक एक्सचेंजवर ३४५ रुपयांपर्यंत किंमत गेली आहे.

### कला चित्र लि.

वरील नांवाची २५ लक्ष रुपये भांडवलाची सिनेमा कंपनी मि. एच. बी. वाडिया ह्यांनीं मुंबई येथें स्थापन केली आहे.

### ना. पंतलु ह्यांची सहकारी चळवळीस देणगी

ना. रामदास पंतलु ह्यांनीं आपल्या घराचा कांहीं भाग हिंदी सहकारी चळवळीस देणगी म्हणून दिला आहे. सहकार व ग्रामोद्योग ह्यांचा अभ्यास आणि संशोधन ह्यांचें तें एक केंद्र निर्माण व्हावें अशी त्यांची इच्छा आहे व त्यासाठी त्यांनीं आपला पुस्तकसंग्रहहि दिला आहे. ना. पंतलु ह्यांच्या घरींच इंडियन को. रिव्ह्यू ह्या इंग्रजी त्रैमासिकाचा आठ वर्षांपूर्वी जन्म झाला व त्याच ठिकाणीं सहकारी इन्स्टिट्यूटस असोसिएशन व प्रांतिक बँकांची असोसिएशन ह्यांचें गेलें संयुक्त अधिवेशन भरलें होतें.

### इंग्रजी संगीताचा साप मारण्यास उपयोग !

एक इंग्रज स्त्री हिंदुस्थानांतील तिच्या बंगल्याच्या व्हरांड्यांत बसली असतांना तिनें एका बेडकाच्या मागें साप जात असलेला पाहिला. बेडकानें डबक्यांत उडी टाकली, त्याचे मागोमाग सापहि गेला. इंग्रज स्त्रीनें नुकताच रेडिओ लावून लंडन येथील संगीत सुरू केलें होतें, तें सापाचे कानीं पडून तो ऐकूं लागला, त्यामुळें इंग्रज स्त्रीस साप मारण्यास अवसर मिळाला.

### सोन्याचें घटतें उत्पादन

१९३१ सालापासून १९४० पर्यंत सोन्याचें वार्षिक जागतिक उत्पादन २ कोटि २५ लक्ष औंसांवरून ४ कोटि, ५ लक्ष औंसापर्यंत वाढत गेलें, परंतु त्यानंतर उत्पादन घटूं लागलें. गेल्या तीन वर्षांतील उत्पादनाचे आकडे खालीं दिले आहेत:—

| | |
|---|---|
| १९४० | ४ कोटि, ५ लक्ष औंस |
| १९४१ | ४ कोटि औंस |
| १९४२ | ३ कोटि, ६० लक्ष औंस |

जागतिक उत्पादनांत दक्षिण आफ्रिकेचा हिस्सा ४०% (१ कोटि, ४० लक्ष औंस) व ब्रिटिश साम्राज्याचा हिस्सा ६२% आहे.

### मुंबई प्रांतांतील मजूर संघ

| | १ जून, १९४२ | ३१ डिसेंबर, १९४२ |
|---|---|---|
| एकूण संख्या | १८१ | १८९ |
| त्याचे सभासद | १,७९,१०५ | १,८५,३५६ |
| मुंबई शहरांतील संघांचे सभासद | १,०९,१०६ | १,२४,२४३ |
| अहमदाबाद शहरांतील संघांचे सभासद | ४६,१४९ | ३४,८५७ |
| इतर ठिकाणच्या संघांचे सभासद | २३,८७० | २६,२५६ |

### लष्करासाठी भाजीपाला

मुंबई प्रांतांतील सैनिकांना भाजीपाला पुरविण्याची योजना ऑगस्ट, १९४२ मध्यें सुरू झाली व आक्टोबर, १९४२ पासून लष्करी केंद्रांना भाजीपाला मिळूं लागला. दररोज ३ ते ४ हजार शेर भाजी ह्या योजनेप्रमाणें पुरविली जाते. भाजीपाला लावण्यास शेतकऱ्यांस उत्तेजन देऊन त्यांस पाणी-पुरवठा व इतर सहाय्यहि दिलें जातें. ठराविक किमान किंमत व बाजारभाव ह्यांपैकीं जास्त असेल ती किंमत शेतकऱ्यांस मिळते. लष्कराचें ठाणें हाललें तर भाजी उरते ती स्थानिक बाजारांत विकली जाते व किंमत कमी आल्यास लष्करी खातें तूट भरून देतें. योजनेप्रीत्यर्थ होणाऱ्या ५६ हजार रुपयांच्या खर्चापैकीं निम्मा खर्च लष्करी खातें सोसणार आहे.

### अमेरिकेंतील निग्रो डॉक्टर व इस्पितळें

अमेरिकेंत निग्रो लोकांसाठी एकूण ११० इस्पितळें आहेत, त्यांत १० हजार रुग्णांची सोय आहे. निग्रो लोकांची संख्या १ कोटि, ३० लक्ष इतकी आहे. निग्रो डॉक्टरांची संख्या ४,००० आहे. निग्रो लोक श्वेतवर्णीय डॉक्टरच पसंत करितात, असें दिसतें. अमेरिकन मेडिकल असोसिएशननें १९४० सालीं विचारलेल्या प्रश्नास, ६,३०० पैकीं ४,२३० इस्पितळांनीं, "आम्हीं निग्रो रुग्णांस घेऊं" असें उत्तर दिलें व १५७७ इस्पितळांनीं नकार दर्शविला.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १४६ |
| २ युद्धकालांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज ... | १४७ |
| ३ तांदुळाच्या पिकाचा अंदाज ... ... | १४८ |
| ४ आकड्यांचा खेळ ... | १४८ |
| ५ नर्सेस ... ... | १४८ |
| ६ स्फुट विचार... ... | १४९ |
| ट्युनिशियांतून शत्रूची हकालपट्टी—लंडनमधील शिलका—इंग्लंडच्या धनकोपणाच्या स्थानाचें भवितव्य — जर्मनीच्या युद्धखर्चाचा बोजा—मुंबई प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने. | |
| ७ बँकिंगविषयक एक प्रश्न | १५१ |

# अर्थ

बुधवार, ता. १२ मे, १९४३

## युद्धकालांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज

कित्येक प्रमुख हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं हिंदुस्थान सरकारच्या चलनप्रसाराच्या घोरणांतील दोष दाखवून त्याचा संबंध चढत्या बाजारभावाशीं कसा निकट आहे आणि फाजील चलनाचे दुष्परिणाम युद्धप्रयत्नांच्या यशस्वितेच्या दृष्टीनें कसे टाळले पाहिजेत ह्याविषयीं विधायक सूचना केल्या असल्याविषयींची माहिती "अर्था"मध्यें येऊन गेली आहे. अर्थशास्त्रज्ञांनीं काढलेल्या पत्रकांत प्रतिपाद्य विषयाचें विवेचन त्रोटक असें असून त्यांतील मुद्दे व विधानें आकडे व इतर पुरावे यांचे सहाय्यानें विशद करणें अशक्य होतें. ह्याकारणानें तें पत्रक सूत्रांच्या स्वरूपांत प्रसिद्ध झालें आहे असें म्हणतां येईल. सरकारचें चलनविषयक धोरण कसें सदोष आहे हें सर जेरेमी रेस्मन ह्यांच्या अंदाजपत्रक व करांचा, वार्षिक कायदा ह्यांचे संबंधांत झालेल्या भाषणांतील खुलाशानंतर त्वरित सरकारचे निदर्शनास आणणें आवश्यक असल्यानें अर्थशास्त्रज्ञांनीं आपल्या पत्रकांत, तपशिलांत शिरण्याचें टाळलें आणि मुद्दे, सिद्धांत व सूचना थोडक्यांत पुढें मांडल्या. सामान्य वाचकांच्या दृष्टीनें दिसणारी ही खुलासेवार व आकडेवार विवेचनाची उणीव गोखले इंस्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे डायरेक्टर प्रा. धनंजयराव गाडगीळ व श्री. एन्. व्ही. सोहोनी ह्यांनीं "युद्ध आणि हिंदुस्थानचें आर्थिक धोरण" हें पुस्तक प्रसिद्ध करून उत्कृष्ट रीतीनें भरून काढली आहे*. युद्धकाळांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज आणि हिंदी सरकारचें त्यासंबंधांतील धोरण हा सध्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे आणि त्याचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन उद्बोधक झाल्यावांचून राहणार नाहीं. किंबहुना, असें पुस्तक प्रसिद्ध करून प्रा. धनंजयराव ह्यांनीं महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

पुस्तकाचे दोन विभाग आहेत. पहिल्यांत चलन आणि बाजारभाव ह्यांच्या परस्पर संबंधाचें विवेचन असून दुसऱ्यामध्यें आर्थिक व सांपत्तिक धोरणाची चर्चा आहे. चलनाचा विस्तार किती व कसा कसा झाला ह्याविषयींचे तपशीलवार आकडे देऊन बाजारभावांतील वाढीची प्रगति कशी घडून आली हें दर्शवलें आहे आणि ह्या दोहोंचा निकट संबंध किती आहे ह्याचें विवेचन केलें आहे. त्यासंबंधांत खालील आकडे मुद्याचे आहेत. व्यवहारांत खेळणाऱ्या चलनी नोटांची किंमत ऑगस्ट, १९३९ मध्यें १७० कोटि रुपये होती. ती १९४० चे प्रारंभीं २२६ व अखेरीस २२५ कोटि झाली. १९४१ चे अखेरीस हा आंकडा ३०४ कोटींपर्यंत, १९४२ चे शेवटीं ५६० कोटींपर्यंत व चालू वर्षाच्या फेब्रुआरींत ६०९ कोटि रुपयांपर्यंत चढला. त्याच अवधींत बाजारभावांचा शेकड्यांच्या प्रमाणांत मोजणारा आकडा ऑगस्ट, १९३९ मधील १०० पासून निघून प्रथम त्या वर्षाचे अखेर १३८ झाला, व पुढच्या सालअखेर ११४ वर उतरला. पुढें तो सारखा चढत चालला आणि १९४१ अखेर १४० होऊन १९४२ च्या शेवटीं १८६ वर गेला. १९४३ चे प्रारंभीं हा आकडा १९५ चे वर चढला. नोटांमध्यें झालेली सारखी वाढ व बाजारभावांतली वाढ यांचा परस्पर संबंध वरील आंकड्यांवरून स्पष्ट होत आहे. खरें पाहिलें असतां कांहीं विशिष्ट कारणामुळें बाजारभाव नोटांच्या बरोबरीनें चढले नसून त्यांच्यामागें रेंगाळले आहेत. ह्यावरून बाजारभाव चढले म्हणून अधिक नोटा काढाव्या लागल्या ह्या विधानाचा फोलपणा सिद्ध होऊन फाजील नोटांच्या पुरवठ्यामुळें किंमती चढल्या हा सिद्धांत खरा ठरतो हें येथें जातां जातां सांगणें आवश्यक आहे.

पण वाढत्या प्रमाणांतील चलनी नोटा कशाच्या आधारावर काढण्यांत आल्या? रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत एका सरकारी वटहुकुमानें दुरुस्ती करण्यांत आली आणि त्या बँकेच्या चलनी नोटांच्या विभागांतील एकूण जिंदगीचा निदान दोन पंचमांश भाग सोनें किंवा स्टर्लिंगमधील रोखे ह्यांच्या स्वरूपांत असावा आणि बाकीचा तीन-पंचमांश रुपये, रुपयांतील रोखे व अंतर्गत हुंड्या ह्यांमध्यें असावा असें नवीन प्रमाण निश्चित करण्यांत आलें. ह्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेजवळचे स्टर्लिंगमधले रोखे ऑगस्ट १९३९ मध्यें ५९ कोटि रुपये किंमतीचे होते, ते १९४२ अखेर ३१८ कोटींचे झाले. म्हणजे त्यांत ५८० टक्के इतकी वाढ झाली. एवढी मोठी वाढ स्टर्लिंग रोख्यांत झाली कशी? ज्यांचीं चलनें ब्रिटिश स्टर्लिंग पौंडाशीं संबद्ध आहेत अशा देशांचें इंग्लंडकडून येणें त्यांच्या नांवावर लंडनमध्यें पौंडांत जमा होत असतें, त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें ह्या देशांत केलेल्या खर्चाबद्दलच्या इंग्लंडकडून मिळावयाच्या रकमा त्याच्या खात्यावर लंडनमध्यें जमा होत आहेत, आणि त्या ब्रिटिश रोख्यांत गुंतवल्या जात आहेत. ह्या प्रकारची वाटेल तेवढी गुंतवण रिझर्व्ह बँकेंत करतां येते आणि तिच्या आधारावर अहीचपट नोटा हिंदुस्थानांत काढतां येतात. हिंदी चलननिधीमध्यें स्टर्लिंग रोखे धारण करण्याचा मूळ हेतु हुंडणावळीचें स्थैर्य राखणें हा होता. परंतु युद्धपरिस्थितींत हुंडणावळ नियंत्रित झाल्यानें लंडनमधील स्टर्लिंग निधीचा उपयोग चलन विस्तारास आळा घालण्यांत न होतां उलट त्यास उत्तेजन देण्यांत होत आहे. ही वस्तुस्थिति प्रा. गाडगीळ ह्यांनीं मार्मिक रीतीनें विशद केली

* "War and Indian Economic Policy" By D. R. Gadgil, M.A., M. Litt. and N.V. Sohoni, M. A., Gokhale Institute of Politics and Economics. Publication No. 10. Price Rs. 5/-.

आहे. त्यांनी हेंहि दाखविलें आहे कीं हिंदुस्थान व इतर साम्राज्यांतर्गत देशांच्या लंडनमधील शिल्लका ब्रिटिश सरकारास सहाय्यकारक होत आहेत. त्यांच्या रकमा इतकीं ट्रेझरी बिलें ब्रिटिश बँकांच्या गळ्यांत बांधण्याची जरूरी कमी होते. पण ब्रिटिश तिजोरीची ह्या रीतीनें सोय होऊन तिचा चलनविस्तार मर्यादित होत असतां हिंदुस्थान देशावर मात्र अगदीं उलट परिणाम होऊन आमच्या लंडनमधील शिलकांच्या आधारावर येथें नोटांचा विस्तार सारखा चालला आहे.

चलनी नोटा व लंडनमधील स्टर्लिंग शिलका ह्यांचा विस्तार आणि बाजारभावांतली वाढ ह्यांची सुलभ कल्पना यावी म्हणून पुस्तककर्त्यांनीं दिलेल्या तक्त्यांतून खालील तुलनात्मक आंकडे निवडून आम्हीं देत आहों.—

| वर्ष अखेर महिना | खेळत्या नोटा (कोटि रुपये) | बाजार भाव शत-प्रमाण | स्टर्लिंग रोखे (कोटि रुपये) | हिंदी रोखे (कोटि रुपये) |
|---|---|---|---|---|
| १९३९ ऑगस्ट | १७० | १०० | ५९ | ३७ |
| १९३९ डिसेंबर | २१९ | १३८ | ९६ | ३७ |
| १९४० ,, | २२५ | ११४ | १३१ | ४९ |
| १९४१ ,, | ३०४ | १४० | २१३ | ४२ |
| १९४२ ,, | ५६० | १८६ | ३८८ | १२६ |
| १९४३ फेब्रुआरी | ६०९ | — | ३७८ | १८४ |

## तांदुळाच्या पिकाचा अंदाज
### (१९४२-४३)

| | |
|---|---|
| पिकाखालील क्षेत्र | ७,४९,१९,००० एकर |
| गेल्या वर्षीपेक्षां वाढ | २% |
| उत्पादन | २,४५,३३,००० टन |
| गेल्या वर्षीपेक्षां घट | ३% |
| दर एकरी उत्पादन | |
| १९३८-३९ | ७३१ पौंड |
| १९३९-४० | ७७६ ,, |
| १९४०-४१ | ६८० ,, |
| १९४१-४२ | ७७२ ,, |
| १९४२-४३ | ७३४ ,, |

प्रांतवार लागवड—

| | एकर | एकूण लागवडीशीं प्रमाण % |
|---|---|---|
| बंगाल | २,११,४२,००० | २८·८ |
| मद्रास | १,०३,९४००० | १३·३ |
| बिहार | ९२,७५,००० | १२·६ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ७६,१७,००० | १०·३ |
| आसाम | ५०,८३,००० | ७ |
| ओरिसा | ५०,५५,००० | ६·८ |
| मुंबई | २६,२८,००० | ३·२ |

### तांदुळाची निर्गत (टन)

| वर्ष | ब्रह्मदेशांतून | बंगाल व ओरिसा मधून | मुंबई, मद्रास व सिंधमधून |
|---|---|---|---|
| १९३७ | ४,४३,५०० | १,२३,४०० | १,२६,२०० |
| १९३८ | | १,२८,६०० | १,३५,६०० |
| १९३९ | | १,२७,७०० | १,५१,६०० |
| १९४० | | ८३,२०० | १,६१,२०० |
| १९४१ | | ८२,६०० | २,२१,००० |

## आकड्यांचा खेळ

सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट ह्या अमेरिकेंत प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकानें त्या देशासंबंधानें खालील माहिती आकड्यांनिशीं दिली आहे.—

युद्ध सुरू होतांच थोड्या महिन्यांत आपल्या जुन्या-नव्या सैनिकांच्या उपयोगासाठीं अमेरिकेनें सुमारें साडेचार कोटि इतक्या निरनिराळ्या प्रकारांच्या टोप्या तयार केल्या.

* * *

इंग्लंडमध्यें आइस्क्रीम तयार करण्यास बंदी करण्यांत आली. तीस अनुलक्षून असें सांगण्यांत आलें आहे कीं ही बंदी अमेरिकेंत लोकांस जशी जाचक होईल तशी ती ब्रिटिश जनतेस होणें शक्य नाहीं. सुमारें ४॥ कोटि वस्तीच्या ब्रिटनमध्यें दरवर्षी तीन कोटि गॅलन आइस्क्रीम खपतें, पण केवळ वीस लक्ष वस्तीच्या एकट्या फिलाडेल्फिया शहरांत पावणे दोन कोटि गॅलन आइस्क्रीमचा एक वर्षांत फडशा उडतो.

* * *

मृत्यूच्या संख्येच्या बाबतींत १९४१ व १९४२ हीं वर्षें फार चांगलीं गेलीं आहेत. १९४२ च्या पहिल्या सहामाहींत दर हजार लोक संख्येस दहा पेक्षांहि कमी असें मृत्यूंचें प्रमाण पडलें. १९४१ च्या समान सहामाहींतलें हें प्रमाण पावणेअकरा होतें. हिंदुस्थानशीं तुलना करतां हें प्रमाण अमेरिकेंत निम्यापेक्षांहि कमी आहे. पाश्चात्य देशांतील लोकांच्या आरोग्याची ह्या आकड्यावरून कल्पना येते.

* * *

प्रत्येकीं आठ हजार वस्ती असलेल्या गांवांत एकूण अमेरिकन लोकसंख्येपैकीं केवळ ४ टक्के लोक १७९० मध्यें रहात असत. आतां हें प्रमाण ५० टक्क्यांचे वर गेलें आहे.

* * *

कांहीं गणित्यांनीं असा हिशेब केला आहे कीं कुटुंबाचें एक जेवण पार पाडण्यास घरमालकिणीस सरासरीनें एकूण ३,६९६ पावलें टाकावीं लागतात. म्हणजे सुमारें दीड मैलांचा प्रवास होतो.

* * *

अमेरिकेंत १९३० ते १९४० ह्या दहा वर्षांच्या अवधींत सौंदर्यवर्धक साधनांचा खप ३५ टक्क्यांनीं वाढला. त्या प्रमाणांत अमेरिकन स्त्रियांच्या सौंदर्यांत सुधारणा झाली काय ?

## नर्सेस

ऑक्झिलिअरी नर्सिंग सर्व्हिसमध्यें दाखल होण्यासाठीं आतांपर्यंत १५,००० स्त्रियांचे अर्ज आले आहेत. अर्जदारांपैकीं ४,९३० मद्रास प्रांतांतील आहेत, १,४५० बंगालमधील आहेत व १,३०० मुंबई प्रांतांतील आहेत. आतांपर्यंत एकूण १,९५२ नर्सेसचें शिक्षण पुरें झालें आहे. एकूण नर्सेसपैकीं मद्रास प्रांतांतील एक तृतीयांश आहेत व मुंबई प्रांतानें एक पंचमांश नर्सेस दिल्या आहेत. नर्सेसची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| अँग्लो इंडियन | ६०३ |
| डोमिसाइल्ड युरोपियन | १४३ |
| युरोपियन | ३३९ |
| हिंदी ख्रिस्ती | ५४३ |
| हिंदु | १२३ |
| पारशी | २४ |
| शीख | ५ |
| मुसलमान | ११ |

# स्फुट विचार

## ट्युनिशियांतून शत्रूची हकालपट्टी

बिझर्टा आणि ट्यूनिस हीं महत्त्वाचीं बंदरें जनरल ऐसनहॉव्हर ह्यांच्या नेतृत्वाखालीं लढणाऱ्या मित्र राष्ट्रांच्या सैन्यांनीं पाडाव करून हस्तगत केलीं असल्यानें जर्मनी व इटली ह्यांचा उत्तर आफ्रिकेंतला प्रतिकार आतां संपला आहे. ट्युनिशियामधला संग्राम गेले सहा महिने चालला होता आणि अमेरिकन व ब्रिटिश संयुक्त फौजांस त्यांत क्रमाक्रमानें जय मिळत जाऊन अखेरीस शत्रूची हकालपट्टी होणार ह्यांत कधींच संशय नव्हता. जर्मन व इटालिअन फौजा तीन बाजूंनीं घेरल्या गेल्या होत्या आणि राहिलेल्या समुद्राच्या बाजूनें निसटून जाणें त्यांस शक्य नव्हतें. त्या परिस्थितींतहि बाहेरून मदत मिळणें हळूहळू कठिण होत चाललें असतां त्या फौजा सारखी पिछेहाट करीत होत्या. बिझर्टा व ट्यूनिस मित्र राष्ट्रांच्या सैन्यांच्या दृष्टिपथांत आलीं तरी त्या महत्त्वाच्या बंदरांच्या बचावासाठीं शत्रु निकरानें लढेल आणि कांहीं आठवडे तरी तग धरील असें सामान्यत: वाटत होतें. परंतु तसें झालें नाहीं आणि अखेरीस शत्रूचा प्रतिकार नाहींसा झाला. त्याच्या तुरळक तुकड्यांच्या हातून तगाव धरणें होणार नाहीं आणि त्यांस शरणच यावें लागेल. विजयी मित्रराष्ट्रांच्या हातीं शत्रूचे हजारो सैनिक सापडले आहेत आणि सापडत आहेत. लढाऊ सामान मागें राहिलें आहे तेंहि त्यांस मोठ्या प्रमाणांत मिळत आहे. युरोपांत दुसरी आघाडी चालू करण्याच्या मार्गांतला मोठा अडथळा ट्युनिशियांतील मित्रराष्ट्रांच्या महत्त्वाच्या विजयामुळें नाहींसा झाला आहे. आफ्रिकेंत आतां भूमध्य समुद्राचा सबंद किनारा मित्रराष्ट्रांच्या ताब्यांत आल्याकारणानें युद्धाच्या इतिहासांत नवीन प्रकरणास आतां प्रारंभ होणार असें म्हणण्यास हरकत नाहीं. अमेरिकेची व इंग्लंडची मोठी फौज दुसरीकडे लढण्यास मोकळी झाली आहे आणि तिकडे लढाऊ सामुग्रीचा उपयोगहि मोठ्या प्रमाणावर करतां येईल.

---

## लंडनमधील शिलका

हिंदुस्थानच्या लंडनमध्यें सांठणाऱ्या शिलकांचा उल्लेख आजच्या अग्रलेखांत आम्हीं केला आहे. ह्या शिलका इंग्लंडमध्यें कां जमा होतात आणि त्यांच्या तारणावर ह्या देशांत चलनी नोटा काढल्या गेल्यामुळें फाजील चलनाचा परिणाम बाजारभावांवर कसा होतो ह्याचें विवेचन प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या नव्या पुस्तकाच्या परीक्षणाचे ओघानें करण्यांत आलें आहे. ज्यांचीं चलनें पौंड स्टर्लिंगवर आधारलेलीं आहेत, अशा ब्रिटिश साम्राज्यांतर्गत व इतर देशांचें इंग्लंडकडून मिळावयाचें येणें लंडनमध्येंच पडून रहातें आणि तेथें तें ब्रिटिश अल्प मुदतीच्या रोख्यांत गुंतवावें लागतें ही गोष्ट प्रा. गाडगीळ ह्यांनीं विशद केली आहे. हिंदुस्थान व इतर साम्राज्यांतर्गत देश ह्यांच्या येणें रकमा लंडनमध्यें ह्या रीतीनें कशा गुंतवल्या आहेत. ह्याचे तुलनात्मक आकडे "एकॉनॉमिस्ट" ह्या ब्रिटिश साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेले आतांच हातीं आले आहेत ते आम्ही स्थूलमानानें खालीं देत आहों:-

### लंडनमधील शिलका

| | कोटि पौंड | कोटि पौंड |
|---|---|---|
| हिंदुस्थान (जाने.) | २१·४ (१९४२) | २०·८ (१९४३) |
| ऑस्ट्रेलिया (ऑक्टो.) | ३·६ (१९४१) | ५·९ (१९४२) |
| न्यूझीलंड (ऑगस्ट) | १·२ (१९४१) | ९·५ (१९४२) |
| आयर (सप्टें.) | ८·१ (१९४१) | ९·३ (१९४२) |
| दक्षिण आफ्रिका (नोव्हें.) | २·१ (१९४१) | ·१ (१९४२) |
| | ३६·८ | ४८७ |

---

## इंग्लंडच्या धनकोपणाच्या स्थानाचें भवितव्य

साम्राज्यांतर्गत देशांच्या लंडनमधील शिलकांमध्यें हिंदुस्थानच्या पैशाचें प्रमाण किती मोठें आहे हें वरील आकड्यांवरून दिसून येईल. इंग्लंडचें बाहेर गुंतवलेलें भांडवल आतां संपुष्टांत आलें आहे. ऋणको देशांनीं इंग्लंडकडून घेतलेलीं कर्जे फेडण्यांत आलीं आहेत आणि त्यांच्या लंडनमधील शिलकाच वाढत आहेत. ह्याचा अर्थ असा होतो कीं युद्धसमाप्तीनंतर इंग्लंडचें आंतरराष्ट्रीय धनको ह्या नात्याचें स्थान नाहींसें होऊन त्या राष्ट्रास ऋणको देशांच्या वर्गांत जाऊन बसावें लागेल. ह्या बदललेल्या परिस्थितीकडे "एकॉनॉमिस्ट" पत्रानें लक्ष वेधलें आहे. लंडनमधील आपल्या साचलेल्या शिलकांचा पैसा परत कसा आणावयाचा आणि त्याचा योग्य उपयोग कसा करावयाचा हा हिंदुस्थानपुढें अवघड प्रश्न आहे. युद्धोत्तर कालांतील पुनर्घटनेचें हें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. तीमध्यें स्टर्लिंगचें मोल काय राहील आणि हिंदुस्थानच्या लंडनमधील शिलकांचें रुपयांमध्यें परिवर्तन कसें होईल ह्या बाबी आज अनिश्चित आहेत. त्यांचे संबंधांत हिंदुस्थानच्या आर्थिक हिताचें योग्य रक्षण होईल ह्याविषयीं सरकार आणि जनता ह्यांनीं दक्षता बाळगिली पाहिजे. ह्याबाबतींत हिंदी बिनसरकारी मत स्पष्टपणें व्यक्त झालेंच आहे आणि त्याचा योग्य विचार करण्याचें आश्वासन सरकारच्या वतीनें देण्यांत आलें आहे. ह्या विषयाच्या विशेष महत्त्वाच्या दृष्टीनें तो सतत नजरेपुढें ठेवला जाणें अगत्याचें आहे.

---

## जर्मनीच्या युद्धखर्चाचा बोजा कोणावर पडतो ?

जर्मनी आपल्या युद्धखर्चाचा बोजा शक्यतितका युरोपांतील अंकित देशांवर टाकीत आहे. ह्या देशांकडून जर्मनीला दरसाल सुमारें ३० अब्ज राइशमार्क इतकी मदत मिळते. युरोपांतील देश जर्मनीकडे माल पाठवीत आहेत, त्यामुळें निर्माण होणारें जर्मनीचें देणें जर्मनी चालू उत्पन्न म्हणूनच समजत आहे. जर्मनीनें पादाक्रांत देशांत केलेली मालमत्तेची, अन्नपुरवठ्याची व मालाची लूट ही वेगळीच. सोनें व मौल्यवान जिनसा ह्यांचाच केवळ लुटीचा आकडा १५ अब्ज रुपयांवर आहे! युरोपियन देश आपल्या युद्धपूर्व उत्पन्नाचा एक पंचमांश ते एक तृतीयांश इतका भाग जर्मनीला खंडणी म्हणून देत आहेत. जर्मनी अंकित देशांत कर्जे उभारून पैसा वसूल करीत आहेच. ह्या देशांत आपल्या फौजा ठेवून जर्मनी शांतता राखीत आहे, त्याचा खर्च अंकित देशांवरच पडतो. फ्रान्स ह्याप्रमाणें प्रथम दररोज ४० कोटि फ्रँक खंडणी देत असे. १९४२ सालीं हा आकडा जर्मनीनें

कमी करून १० कोटि फँकवर आणला. खंडणीची रकम आतां वाढवून ती ५० कोटि फँक करण्यांत यावयाची आहे. बेल्जम व इतर देश ह्यांचीहि अशीच अवस्था झाली आहे. युद्धापूर्वीपासूनच जर्मनी युरोपियन देशांतून, विशेषतः बाल्कन्समधून, आपली आयात वाढवीत होता. त्या देशांकडून माल घ्यावयाचा परंतु परत माल मात्र पाठविण्याचा नाहीं, ह्या धोरणामुळें जर्मनीचें त्या देशांस प्रचंड देणें उत्पन्न झालें आहे व मुख्यतः त्याचे आधारावरच अंकित देशांचें चलन अधिष्ठित झालें आहे. युद्धसमाप्तीनंतर जर्मनी ह्या देशांकडे पुनः माल पाठवूं लागेल, अशा पूर्ण विश्वासावरच युरोपियन देशांनीं अवलंबून रहाणें भाग आहे. गेल्या महायुद्धानंतर जर्मनीवर वार्षिक २३ कोटि पौंडांची खंडणी बसविण्यांत आली, ती १९२४ साली १२½ कोटि पौंडांवर आणण्यांत आली. १९१९ ते १९३१ ह्या मुदतींत जर्मनीनें २०० कोटि पौंड खंडणी भरली. आज युरोपियन राष्ट्रांकडून जर्मनीस मिळणाऱ्या वार्षिक खंडणीचा आकडा ह्या सुमारांतच आहे. ह्यावरून युरोपच्या पिळवणुकीची कल्पना येईल.

## मुंबई प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने

मुंबई प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने ह्यासंबंधींचा १९३९–४१ चा त्रैवार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून इस्पितळांची, दवाखान्यांची व त्यांचा फायदा घेणाऱ्या रुग्णांची व रोग्यांची संख्या १९३६–३८ च्या मानानें वाढलेली दिसून येते. १९४१ सालीं मुंबई प्रांतांतील सर्व इस्पितळें व दवाखाने ह्यांत मिळून ४८ लक्ष, ३८ हजार रोग्यांना औषधें मिळालीं, त्यांपैकी १२,१४३ रोगी मरण पावले. १९३९–४१ ची ह्याबाबतची वार्षिक सरासरी ४७ लक्ष, ६४ हजार रोगी व ११,०९७ मृत्यू अशी आहे. १९३६–३८ ची वार्षिक सरासरी ३८ लक्ष, ८६ हजार रोगी व ९,६२५ मृत्यू अशी होती. १९३९ व १९४१ चे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत.:–

| | १९३९ | १९४१ |
|---|---|---|
| इस्पितळांत दाखल केलेले रोगी (रोजची सरासरी) | ५,७०८ | ६,३६४ |
| बाहेरून औषध घेणारे रोगी (रोजची सरासरी) | ३८,२७२ | ४०,९९२ |
| इस्पितळांत उपचार केलेले रोगी | ३८,८१,२६१ | ४०,२८,३८९ |
| बरे झालेले रोगी | ७४,२९३ | १,०४,०१८ |
| मृत्यूचें एकूण रोग्यांशीं प्रमाण% | ७·९ | ६·२ |
| इस्पितळांत किती खाटांची सोय | ६,८६० | ७,५८८ |
| इस्पितळें व दवाखाने ह्यांची संख्या | ४५० | ७३९ |
| मेडिकल ऑफिसर्सची संख्या | १२११ | १४४० |
| नर्सेसची संख्या | ८५८ | ११८५ |

इस्पितळें व दवाखाने ह्यांतील बहुसंख्य (८,७५,७९५) रोगी मलेरियाचे होते. १९३८–४१ मध्यें सरासरीनें दरसाल ६० लक्ष रुपये दवाखाने व इस्पितळें ह्यांवर खर्च झाले. फी वगैरे उत्पन्न वजा केलें, तर वार्षिक निव्वळ खर्चाची सरासरी ५५ लक्ष रुपये पडते. खेडेगांवांत डॉक्टरी उपचार उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या योजनेस अनुसरून ३३० केंद्रें मंजूर करण्यांत आलीं त्यांपैकी २७० केंद्रें (१०७ ॲलोपॅथिक, १५२ आयुर्वेदिक व ११ युनानी) १९४१ मध्यें चालू झालीं होतीं. ८१ नर्स–दायांची नेमणूक व्हावयाची, परंतु पुरेशा लायक उमेदवारांचे अभावीं फक्त ४९ च नेमणुका होऊं शकल्या. १९४१ मध्यें हाफकीन इन्स्टिट्यूटमध्यें वेगवेगळ्या सुयांचे ५० हजार डोस तयार करण्यांत आले. पिसाळलेलीं कुत्रीं चावलेल्या ७,९८४ लोकांना १०३ केंद्रांत उपचार करण्यांत आला. युद्धपरिस्थितीमुळें इस्पितळांच्या व दवाखान्यांच्या वाढीस थोडा पायबंद बसल्याचें अहवालावरून दिसून येतें.

## जगांतील रेडियो-गृहें

जगांत सध्यां सुमारें ४० कोटि लोक रेडियो ऐकतात. दरसाल सुमारें १ कोटि रेडियो सेट्सची भर पडते. युद्धविषयक बातमी ऐकण्याची उत्सुकता रेडियोच्या लोकप्रियतेच्या मुळाशीं आहे. जानेवारी १९४२ मध्यें सर्व जगांत मिळून २,८३६ रेडियोगृहें होतीं, त्यांपैकी १३९८ उत्तर व मध्य अमेरिकेंत, ५०८ दक्षिण अमेरिकेंत, युरोप, रशिया व तुर्कस्थान ह्यांत मिळून ४७२, आशियांत २१६, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडमध्यें १६५ व आफ्रिकेंत ७७ होतीं. गेल्या ६ वर्षांत रेडियोगृहांत ८०० गृहांची भर पडली. युद्धापूर्वी जर्मनींत ३० रेडियो स्टेशन्स होतीं. जिंकलेल्या प्रदेशांत त्याच्या हातीं आणखी ९८ स्टेशन्स आहेत. त्यांपैकी १६ रशियन हद्दींत आहेत. बातमी व प्रचार ह्यांस रेडियोवर अधिकाधिक वेळ दिला जात असला, तरी अद्याप ५०% वेळ संगीतानेंच व्यापला जातो.

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

THE FARMER

HIS WELFARE & WEALTH

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR

SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT**

**Sir Vithaldas Thakersey Memorial Building**

**9 Bakehouse Lane, Fort, Bombay.**

## इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची परीक्षा

( सन १९४३ )

प्रॅक्टीस अँड लॉ ऑफ बँन्किंग भाग १ ला.

प्रश्नः—एका बँकेंत अ नें आपले नांवचें चालू खातें उघडलें असून त्यांत त्याची जमा बाकी (G. Balance) शिल्लक आहे. त्या खात्यावर चेक सोडण्याचा अधिकार त्यानें 'ब' ला दिला आहे. कांहीं दिवसांनीं बँकेला असें कळलें कीं, 'अ'च्या मेंदूमध्यें कांहीं बिघाड झाला असून, त्याला कांहीं दिवस तरी त्याच्या पैशासंबंधींच्या व्यवहारावर देखरेख ठेवतां येणें शक्य नाहीं व मध्यंतरी त्याला वेड्याच्या इस्पितळांत पाठवलें आहे.

अद्यापि ब ला अ च्या खात्यावर चेक सोडण्याचा अधिकार राहील काय ?

सन १८७२ च्या इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टमधील से.१२ मध्यें, ज्या मनुष्याचें डोकें नेहमीं शुद्धीवर नसतें परंतु कधीं कधीं शुद्धीवर असतें अशा मनुष्यास त्याचें डोकें शुद्धीवर असतांना करार करतां येण्याची तरतूद केली आहे. तसेंच ज्या मनुष्याचें डोकें नेहमीं शुद्धीवर असतें परंतु कधीं कधीं त्यास वेडाची लहर येते त्या मनुष्यानें केलेला करार वेडाच्या लहरींत केलेला असूं नये.

करार करतेवेळीं, करार करणाऱ्या इसमांना आपण करीत असलेल्या करारांत आपणावर कोणत्या अटी बंधनकारक आहेत व त्या करारापासून आपल्या हितसंबंधावर काय परिणाम होतील हें समजलें पाहिजे.

अ नें तो शुद्धीवर असतांना ब ला आपल्या खात्यावरील चेक काढण्याचा अधिकार दिलेला आहे व त्यावेळीं अ व ब हे दोघेहि, त्यांनीं काय करार केला आहे व त्याचा परिणाम त्यांच्या हितसंबंधावर काय होईल हें समजण्याच्या परिस्थितींत होते. व पुढें जरी अ चें डोकें फिरलें असलें तरी ब नें अ करतां केलेले सर्व व्यवहार अ वर कोणतेही प्रकारचें दडपण न आणतां व सचोटीनें केले आहेत असें सिद्ध करण्याची जबाबदारी ब वर से. १६ प्र. पडते.

यावरून ब चा अ च्या खात्यांतील रक्कम चेकनें काढण्याचा पूर्वीचा अधिकार कायम रहातो व ब ला तसें करूं देण्यांत बँकेस कांहीं धोका नाहीं.

१८७३ च्या गव्हर्नमेंट सेव्हिंग्ज बँक ॲक्ट से. १२ मध्येंहि वेड लागलेल्या अगर डोकें शुद्धीवर नसलेल्या मनुष्याचे पैसे त्यानें वेड लागण्यापूर्वी तशा तऱ्हेचा अधिकार दिलेल्या मनुष्याच्या मंडळीस द्यावेत व तशा तऱ्हेचा अधिकार दिला नसल्यास बँकेच्या व्यवस्थापकानें वेळोवेळीं सदर इसमाच्या खात्यांतील पैसे त्यास लागतील त्याप्रमाणें कोणातरी योग्य माणसाचे स्वाधीन करावेत व तशी त्याजकडून पावती घ्यावी, असें सांगितलें आहे.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

---

**ग्रेट ब्रिटनचे सैनिक**

ग्रेट ब्रिटनची लोकसंख्या ४ कोटि, ६० लक्ष आहे. त्यांपैकी ४५ लक्ष लोक लष्करांत दाखल झालेले आहेत.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठीं लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.



## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठीं जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर





# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६. पुणें, बुधवार, तारीख १३ मे १९४३ अंक २०

महायुद्ध दारांशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळे
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

डायरेक्टर्स
श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. बर्वे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, श्री. फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कमीशीनें करून दिली जाते.
बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागेल.

ग. ल. हळवे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

**अमेरिकेचा युद्धखर्च**

एप्रिल १९४३ मध्यें अमेरिकेच्या युद्धखर्चाच्या आकड्यानें उच्चांक गाठला. त्या महिन्यांत अमेरिकन युद्धखर्च ७२९ कोटि डॉलर इतका झाला. जुलै १९४२ पासून एप्रिल १९४३ अखेरचा अमेरिकन युद्धखर्च ९४ अब्ज रुपये भरला.

**२१ मे**

ट्युनिशियांतील विजय साजरा करण्यासाठी शुक्रवार ता. २१ मे हा दिवस सार्वजनिक सुट्टीचा दिवस म्हणून जाहीर करण्यांत आला आहे.

**कॉलऱ्याची साथ**

कलकत्ता शहरांत कॉलऱ्याची साथ सुरू झाली असल्याचें कलकत्ता कॉर्पोरेशनच्या हेल्थ ऑफिसरनीं जाहीर केलें आहे.

**कोयनेलचें उत्पादन**

दरसाल एक लक्ष पौंड कोयनेलचें उत्पादन घडवून आणणारी एक योजना बंगाल सरकारनें आखली आहे.

**तीन वर्षे मुदतीचे बिनव्याजाचे रोखे**

४ जून १९४० रोजीं हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलेल्या बिनव्याजाच्या रोख्यांच्या परतफेडीची तारीख १० जून १९४३ ही आहे. हे रोखे धारण करणारांस त्या दिवशीं रोख्यांचे पैसे मिळतील अथवा त्यांच्या इच्छेनुसार आणखी तीन वर्षेपर्यंत त्यांस रोखे धारण करतां येतील. व्याज घेणें हें कित्येकांच्या धार्मिक भावनांच्या विरुद्ध आहे आणि अशा लोकांनीं आपले पैसे सरकारनें कर्जाऊ घ्यावे अशी सूचना केल्यावरून ह्या मार्गानें कर्ज काढण्यांत येत आहे, असा खुलासा ह्या अभिनव प्रकारच्या कर्जाच्या उभारणीचे वेळीं, जून, १९४० मध्यें करण्यांत आला होता.

**डॉ. शाख्ट**

डॉ. शाख्ट ह्यांची नाझी पक्षांतून हकालपट्टी झाली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

**दरमहा ९० लक्ष नवे पैसे**

करन्सी कचेऱ्यांची मागणी पुरी पडण्याइतकीं दुय्यम नाणीं एप्रिलमध्यें हिंदी टांकसाळी पाडूं शकल्या. गेल्या कित्येक महिन्यांत मागणी पुरी पडत नव्हती. दरमहा ९० लक्ष ताम्यांचे पैसे टांकसाळींत तयार होत आहेत, परंतु ते अद्याप लोकांच्या हातीं सढळपणें खेळतांना कां दिसून येत नाहींत ?

**चेक्सची देवघेव**

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ७ मे अखेर संपलेल्या आठवड्यांत ४३ कोटि, ३७ लक्ष रुपये किंमतीच्या १,३७,२२४ चेक्सची देवघेव झाली.

**हिंदी युद्धकर्जरोखे**

मार्च १९४३ अखेर वेगवेगळ्या रूपानें हिंदुस्थानांत १ अब्ज, ४२ कोटि रुपये कर्ज जमा झालें आहे, त्याची वर्गवारी खालीं दिली आहे :—

| | लक्ष रु. |
|---|---|
| मुंबई | ९५५३ |
| बंगाल | ५०४७ |
| पंजाब | ८१४ |
| संयुक्त प्रांत | ६८५ |
| मद्रास | ५९७ |
| सिंध | १७१ |
| बिहार | १४३ |
| दिल्ली | १३९ |
| मध्यप्रांत–वऱ्हाड | ८३ |
| सरहद्द–प्रांत | ३६ |
| ओरिसा | ३४ |
| बलुचिस्तान | २६ |
| अजमीर–मारवाड | १२ |
| कूर्ग | ५ |
| हिंदी संस्थानें इ० | ४४१ |

**केन्याच्या मळ्यांतील मजूर**

केन्याचे किती मजूर चहाचे व कॉफीचे मळ्यांत सक्तीच्या मजुरीचे तत्त्वावर काम करीत आहेत, ह्या प्रश्नास कॉमन्स सभेंत उत्तर देतांना वसाहत मंत्रि, मि. स्टॅनले म्हणाले, "फेब्रुवारीपासून सक्तीची मजुरी बंद आहे. तथापि, डिफेन्स रेग्युलेशन्सखालीं कॉफीचे मळ्यांत ५५० व चहाचे मळ्यांत १०० आफ्रिकन मजूर आहेत. संयुक्त राष्ट्रांस चहा-कॉफीचा पुरवठा चालू रहावा ह्यासाठीं हे दोन धंदे आवश्यक धंदे म्हणून ठरविण्यांत आले आहेत. इतर मार्गानें मजुरांचा पुरेसा पुरवठा न झाल्यामुळें डिफेन्स रेग्युलेशनचा अवलंब करावा लागला."

**अमेरिकेच्या सैनिकांची हानि**

अमेरिकेच्या सैनिकांपैकीं आतांपर्यंत १२,९६४ सैनिक मृत झाले असून ३८,१६९ बेपत्ता आहेत; १६,२०१ जखमी झाले आहेत व १३,३२७ युद्धकैदी आहेत.

**ओरिएन्टल इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लि.**

वरील नांवाची एक इन्व्हेस्टमेंट कंपनी लवकरच स्थापन होणार आहे. तिचें अधिकृत भांडवल २ कोटि रुपये राहून निम्मे भांडवल विक्रीस काढण्यांत येईल. २० हजार भाग प्रत्येकी १०० रुपयांचा ५% क्यु. प्रेफरन्स व ८० हजार भाग प्रत्येकी १०० रुपयांचा ऑर्डिनरी असे रहातील.

युद्धजन्य परिस्थितींत सुद्धां

वेस्टर्न इंडियानें

सन १९४२ मध्यें पाऊण कोटीच्यावर विम्याचें काम पूर्ण केलें असून गेल्या वर्षापेक्षा नवीन कामांत सात लाखांची वाढ आहे. सेवा आणि सवलती यांच्या बळावर मिळविलेल्या लोकप्रियतेचें हें दृश्य फळ आहे. आपणहि ह्या कंपनीचे एक विमेदार होऊन तिजकडून मिळणाऱ्या लाभाचे आणि संरक्षणाचे वाटेकरी व्हा. अधिक माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

**वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड सातारा.**

**पुणें शाखा–१७९ बुधवार, लक्ष्मी रोड, पुणें २.**

# स्फुट विचार

## युरोपांतील दुसऱ्या आघाडीची तयारी

ट्युनिशियांत मित्रराष्ट्रांचा दणदणीत विजय होऊन जर्मन व इटालियन फौजा शरण आल्या आहेत. शत्रुसेना अखेरपर्यंत लढत रहातील आणि समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत पिछेहाट करून तेथून पलायन करतील असा अंदाज होता तो खोटा ठरून त्या मित्रराष्ट्रांच्या हातीं शरण येऊं लागल्या आहेत. समुद्राची वाट ब्रिटिश आरमार व विमानदल ह्यांनीं रोखल्या कारणानें जर्मन व इटालियन फौजा सापळ्यांत सांपडल्यासारख्या झाल्या आणि त्यांनीं पळण्याच्या धडपडींत मरण्यापेक्षां जिवंतपणीं शरण जाण्याचा अपमानास्पद् मार्ग पत्करला. दारूगोळा संपल्यामुळें आपणांस ही आपत्ति पत्करावी लागली, नाहीं तर शेवटच्या गोळी-पर्यंत लढत राहण्याचा आपणांस हुकूम होता आणि त्याप्रमाणें आपण वागणार होतों असा बहाणा. शत्रुसैनिक करीत आहेत. पण मित्रराष्ट्रांच्या हातीं जी मुबलक युद्धसामुग्री लागली आहे तीवरून तिचा खोटेपणा सिद्ध होत आहे. इजिप्तवर स्वारी कर-ण्याच्या घमेंडीनें निघालेली शत्रूची सेना हजारों मैल मागें हाटत हाटत शेवटीं केप बॉनच्या कचाटींत सांपडली आणि तीमधून निसटण्याचा संभव न दिसल्यामुळें शस्त्रें टाकून देऊन विजयी मित्रराष्ट्रांच्या सेनापतींच्या हातीं कैदी बनली. शत्रूचा सारखा पाठलाग करून उत्तर आफ्रिकेंतून त्याची पूर्ण हकालपट्टी कर-ण्यांत ह्या सेनापतींनीं जी चिकाटी दाखवली ती कौतुकास्पद् आहे. ह्या त्यांच्या अभिनंदनीय विजयाचे दोन महत्त्वाचे परिणाम होणार आहेत. एक तर जर्मनींत व इटलींत निराशेचें वातावरण पसरलें आहे. उत्तर आफ्रिकेंतून दक्षिण युरोपांत मित्रराष्ट्रांच्या विजयी सेना आतां मोहिमा चालू करणार ह्या भितीनें शत्रूस व व विशेषतः इटलीस पछाडलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. इटलीमध्यें उत्पन्न झालेल्या अस्वस्थतेच्या बातम्या येत आहेत त्यांत पुष्कळ तथ्य असलें पाहिजे. दुसरा परिणाम असा आहे कीं पश्चिम किंवा दक्षिण युरोपांत दुसरी आघाडी निर्माण करण्याच्या मार्गांत उत्तर आफ्रिकेंतील लढ्याची जी अडचण होती ती आतां दूर होऊन मित्रराष्ट्रांचा युरोपांतील मोहिमेचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांचें लढाऊ बळ वाढलें आहे आणि जर्मनीची शक्ति घटली आहे. त्याच सुमारास मि. चर्चिल ह्यांनीं अमेरिकेस जाऊन वॉशिंग्टन येथें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्याशीं पुढील युद्धकार्यक्रमाच्या योजनेबाबत लढाऊ तज्ज्ञांसमवेत वाटाघाटी चालवल्या आहेत. प्रतिकाराची हिटलर शिकस्त करील ह्यांत शंका नाहीं. तथापि, युद्धाच्या शेवटास प्रारंभ झाला आहे असें म्हणतां येण्याजोगी मित्रराष्ट्रांची अनुकूल परिस्थिति आहे हें निर्विवाद् आहे. ट्युनिशियामधील त्यांच्या प्रचंड विजयास ह्या दृष्टीनें विशेष महत्त्व आहे.

---

## वर्षअखेरचे बँकांचे ताळेबंद

गेल्या डिसेंबर अखेरच्या हिंदी बँकांच्या ताळेबंदांची पूर्वीच्या जून अखेरच्या त्यांच्या ताळेबंदांशीं तुलना करून सर्वसाधारण आशयाचे खालील उद्गार इंडियन इंस्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या नियतकालिकानें काढले आहेत त्यावरून सदरहू सहामाहींत त्या संस्थांच्या सांपत्तिक परिस्थितींत कसा अनुकूल बदल झाला हें दिसून येतें. गेल्या जूनच्या ताळेबंदांत ब्रह्मदेश, मलाया वगैरे देशांत ज्यांचे व्यवहार होते आणि ज्यांचा धंदा हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर होता अशा बँकांच्या बाबतींत पूर्व एशियांतील युद्धपरिस्थितीचें प्रतिबिंब ठळक उमटलेलें दिसत होतें. परंतु डिसें-बरच्या ताळेबंदावरून त्या बँकांची स्थिति सुधारलेली आहे असें स्पष्ट होतें. मद्रासच्या बाजूस बँकांतील ठेवी, १९३८ सालच्या आपत्तींतून त्या नुकत्याच बाहेर पडत होत्या अशा वेळीं जपा-ननें युद्ध पुकारल्या कारणानें घटल्या, त्या परत आल्या आहेत आणि हें त्यांच्या सांपत्तिक सुधारणेचें अचुक गमक आहे. जनतेचा डळमळलेला विश्वास पुनः स्थिर झाला असल्याचें हें लक्षण आहे. बँकांच्या एकंदर वस्तुस्थितीचा विचार करतां असें दिसतें कीं, त्यांचेकडील चालू ठेवींत जून १९४२ च्या मानानें त्या वर्षाचे अखेरीस पुष्कळच वाढ झाली. मुदतीच्या ठेवींतही थोडीशी वाढ झाल्याचें दिसतें. व्यापारासाठी बँकांकडे कर्जाची मागणी मर्यादित झाल्यानें त्या वाढलेल्या ठेवींचा उपयोग अधिक रोकड शिल्लक आणि सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवण ह्यांचेकडे झालेली आढळते. सरकारी ट्रेझरी बिलांची विक्रीची मर्यादा दर आठवड्यास दोन कोटींची दहा कोटी केली गेल्यामुळें त्या अल्प मुदतीच्या रोख्यांत आपला मोकळा पैसा गुंतवण्याच्या संधीचा फायदा बँकांनीं घेतला आहे. ठेवीवरील व्याजाचे दर गेल्या वर्षीं बँकांनीं उतरवले आणि त्यांचा पैसा रोख्यांत गुंतवला त्या कारणानें अधिक व्याज उत्पन्न करणाऱ्या गिऱ्हाइकांस कर्जाऊ द्यावयाच्या रकमांत अपेक्षेप्रमाणें वाढ झाली नाहीं तरी ह्या संस्थांचा नफा १९४१ सालच्या मानानें वाढला आणि प्राप्तीवरील कर व सुपर टॅक्स ह्यांचे दर चढले तरी त्यांस पूर्वीइतकें डिव्हिडंड भागीदारांस वाटतां आलें. कांहीं बँकांनीं तर त्यापेक्षां थोडें अधिकच डिव्हिडंड दिलें.

---

## इंग्लंडमधील शेतीची वाढ टिकेल काय ?

ग्रेट ब्रिटन अन्न पुरवठ्याचे दृष्टीनें स्वयंपूर्ण नाहीं व त्यास बाहेरून धान्य व इतर खाद्य पदार्थ आणावे लागतात, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून ग्रेट ब्रिटननें आपलें शेतीचें उत्पादन वाढविण्याचा नेटानें प्रयत्न चालविला आहे. आगबोटींचा उपयोग शक्य तोंवर युद्धोपयोगी मालाच्या वहातुकी-कडेच व्हावा ह्या दृष्टीनें धान्याच्या आगबोटींतील जागा अडवणें श्रेयस्कर नाहीं. गहूं आणि बार्ली ह्यांच्या लागवडीखालीं १९४३ मध्यें १० लक्ष एकर जमीन नव्यानें आणण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार आहे. १९३९ सालापासून आतांपर्यंत ब्रिटिश शेतींत ६० लक्ष एकर जमिनीची भर अगोदरच पडलेली आहे, त्यांत आणखी वाढ करण्याचें काम अर्थातच बिकट आहे. मनुष्यबळाचा अधि-कांत अधिक उपयोग प्रत्यक्ष युद्धकार्याकडेच होणें इष्ट असल्या-कारणानें, लागवडीचे क्षेत्रांतील वाढ यंत्रसामुग्रीच्या उपयोगाचे सहायानेंच करण्यांत आलेली आहे. युद्धापूर्वी ५२ हजार ट्रॅक्टर काम करीत होते; त्यांची संख्या आतां १ लक्ष, २० हजार झाली आहे. युद्धसमाप्तीनंतर, अशा प्रकारें शेती करणें परवडेल किंवा नाहीं, हें अर्थातच यंत्रें मनुष्याचें काम किती कार्यक्षम रीतीनें करूं शकतात ह्यावर अवलंबून राहील. ग्रेट ब्रिटननें शेतीच्या धंद्याच्या यंत्रसामुग्रींत भांडवल गुंतवणें तें इतर धंद्यांत गुंतविण्यापेक्षां किफा-यतशीर ठरेल किंवा नाहीं, ह्या प्रश्नाच्या उत्तरावरच शेतीचें ह्या-पुढील यंत्रीकरण अवलंबून राहील. देशांतील परिस्थितींच्या मानानें जे धंदे विशेष उत्पादक ठरतात त्यांत इतर धंद्यांपेक्षां अधिक भांडवल गुंतणें स्वाभाविक आहे. प्रत्येक देशांत, ज्या वस्तू उत्पन्न करण्यास इतर देशांच्या मानानें कमी खर्च लागतो त्या वस्तू परदेशीं पाठविल्या जाऊन ज्या वस्तूंच्या उत्पादनास इतर देशांचे मानानें अधिक खर्च येतो त्यांची आयात करण्यांत येते. कापड निर्गत करून धान्याची आयात करणें ग्रेट ब्रिटनला आजवर परवडत असे, तें तसेंच पुढें परवडणें युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय परि-स्थितीवर अवलंबून राहील.

## खेड्तासाठी

( लेखकः—श्री. श्रीधर हरी वातार, ए. सी. आर. ए., बी.कॉम., मॅनेजर, सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., इचलकरंजी. )

प्रतिदिनीं सर्व वर्तमानपत्रांतून खेड्यांतील घरें, सरकारी कचेऱ्या, शाळा, चावड्या वगैरे सारख्या सार्वजनिक उपयोगाच्या इमारती व रेल्वे स्टेशनें अत्याचारी लोकांच्या अविचारानें अग्निमुखांत पडल्याच्या बातम्या येत आहेत. त्याचप्रमाणें खेड्यांतील सावकार व सधन लोकांचीं घरें जाळून, मारपीट करून त्यांना लुटल्याचेंहि वृत्त वरचेवर येतें. या योगानें बऱ्याच लोकांचे महत्त्वाचे कागदपत्र व मूल्यवान् वस्तू अग्निनारायणाचे भक्ष्यस्थानीं पडल्यानें जनतेचें फारच नुकसान होत आहे. सार्वजनिक उपयोगाच्या इमारती जाळून सर्व जनतेची गैरसोय करण्यानें अत्याचारी लोकांना काय फायदा असतो समजत नाहीं. तालुक्यासारख्या मोठ्या गांवीं दंगे होऊन जाळपोळ व लुटालूट होण्याचा संभव कमी असतो. परंतु हजार पांचशें वस्तीच्या खेडेगांवीं दंगेखोर व लुटारू लोकांचे या ठिकाणीं चांगलेच फावतें. तेव्हां अशा ठिकाणीं गांवचे लोकांनीं एकजुटीनें राहून, मिळेल त्या साधनांचा योग्य उपयोग करून खालील सूचना अमलांत आणलेस खेड्याचें संरक्षण होण्यास फारच मदत होणार आहे.

१. प्रत्येक खेडेगांवीं सार्वजनिक संरक्षक दलाची स्थापना करावी. त्याकरितां ज्या त्या गांवचे मानानें भागवार हुशार लोकांचें पुढारी मंडळ नेमावें. या मंडळाचे देखरेखीखालीं गांवचे सर्व लोकांनीं वागावें. ज्या त्या भागांतील लोकांनीं आपापले गटांतील पुढाऱ्यांचे सूचनेप्रमाणें वागून सर्व गटनायकांनीं एकमेकांचे विचारानें वागावें.

२. ज्या त्या गटांनीं आपापले भागांत पाळीपाळीनें रात्रीं पाहारा करावा. गांवांतील कोणाही इसमास संकटाची अगर दगाफटक्याची आगाऊ बातमी लागली तर ती त्यानें प्रथम आपले गटनायकास द्यावी व गटनायकानें इतर गटनायकांस द्यावी. या योगानें सर्व भागांतील गटनायक सावध राहातील.

३. गांवांस धोका आहे अशा प्रकारची कोणतीहि गोष्ट दिवसा अगर रात्रीं केव्हांहि दिसून आलेस ठराविक तऱ्हेनें शिंग वाजवावें म्हणजे गांवांतील सर्व लोकांना एकदम इषारा मिळून ते सावध राहातील. रात्रींचे वेळीं संकटाची सूचना मिळालेस भयसूचक अशा तार स्वरांत एकसारखें शिंग वाजवावें म्हणजे गांवांतील लोक सावध होतील व शेजारचे गांवांतील लोकांनाही इषारा मिळून तेहि सावध राहातील व शक्य झाल्यास मदतीस धावून येतील.

४. खेडेगांवचे भोंवतालचे रानांतून ठिकठिकाणीं जागते पाहारे गुप्तपणें ठेवावेत. अशा पहारेकऱ्यांपैकीं कोणासहि कांहीं संशय आल्यास त्यानें शीट देऊन जवळचे पहारेकऱ्यास इषारा द्यावा. अशा प्रकारें या गुप्त पहारेकऱ्यांनीं शिटा घातलेनें गांवांतील लोकांना बाहेरून कांहीं संकट येत आहे याची आगाऊ सूचना मिळेल व येणारे संकटास तोंड देणेंकरितां गांवांतील लोक शक्य तितक्या तयारीनें राहातील. गांवचे लोक सावध आहेत असें समजलेवर बाहेरून येणारे दंगेखोर कदाचित् परस्पर परतहि जातील.

५. प्रत्येक गांवकऱ्यानें आपणाजवळील धान्यसामुग्री बाहेरून सहजासहजी न दिसेल अशा तऱ्हेनें ठेवावी. ज्यांचे घरीं पेव अगर तळघरें असतील त्यांनीं तेथें धान्य व मल्यवान वस्तू ठेवाव्यात म्हणजे जास्त सुरक्षित राहातील.

६. प्रत्येक गांवकऱ्यानें कायद्याच्या कक्षेंत बसेल अशा प्रकारचें हत्यार नेहमीं तयार ठेवावें. अशीं हत्यारें घरीं प्रसंगीं आपणासच सहजासहजी सांपडतील अशा रीतीनें ठेवावीत. आपले संरक्षणासाठी बाळगलेलें हत्यार प्रसंगीं दुसऱ्याचें हातीं लागून आपणासच घातक होणार नाहीं अशी दक्षता मात्र घ्यावी.

७. बहुतेक खेडेगांवांतून पाणी दुर्मिळ असतें व आग लागल्यावर वेळेवर थोडेसुद्धां पाणी न मिळाल्यानें भयंकर नुकसान झाल्याचीं उदाहरणें आहेत. याकरतां गांवचे चावडीजवळ अगर सोईच्या अशा मध्यमार्गी शेंदोनशें घागरी पाणी साठवून ठेवणेची कायमपणें सोय करून ठेवणें हितावह आहे. तसेंच प्रत्येक गांवकऱ्यानें आपले घरांत शक्य तितकें पाणी भरून ठेवावें.

८. ज्या गांवीं वरीलप्रमाणें पाण्याची सोय होणेसारखी नसेल अशा ठिकाणीं गांवांत जागोजागीं वाळूचे अगर मातीचे ढीग ठेवावेत. भुगा माती असणें केव्हांही जास्त चांगलें. पाण्याचे अभावी आग विझविणेचे व ती वाढूं न देणेचे कामीं माती व वाळू यांचा फारच चांगला उपयोग होतो. पाणी असणाऱ्या गांवांनींही या साधनाची सोय करून ठेवल्यास जास्तच उपयोग होईल.

९. गवत, कडबा वगैरेच्या चाऱ्याचें साठे-गंजी गांवांशेजारीं अगर घरानजीकचे मोकळया जागेंत घालणेची बहुतेक ठिकाणीं प्रथा आहे ती चालू धामधुमीचे काळांत फारच घातक आहे. कारण गवत, कडबा वगैरे सारखे चाऱ्याचे जिन्नस लवकर पेटतात व त्यांचा जाळही मोठा होऊन किटाळ फार दूरवर जातें. यायोगें आसपासचीं घरें पेटण्याचा संभव अधिक असतो. याकरितां याबाबतींत जास्त काळजी घेणें जरूर आहे. गवताच्या गंजी घरांतील आंगणांत अगर गांवानजीक घालूं नयेत. गांवापासून दूर रानांतून अंतराअंतरावर घालाव्यात. यायोगें गांवांस धोका पोचणार नाहीं. सर्व गंजी एका जागीं घोळक्यानें घातल्यास त्यांतील एखादी गंजी पेटल्यास इतर सर्व गंजी अग्निमुखांत पडणेचा संभव असतो. गंजी अंतराअंतरावर घालून ती बाहेरून मातीनें लिंपून घ्यावी. दुर्दैवानें एकादी गंजी पेटली तरी लिंपल्यानें आग मोठी होत नाहीं व वाढतहि नाहीं.

१०. ज्या खेडेगांवीं सोसायटी असेल त्यांनीं आपले सोसायटीचे महत्त्वाचे कागदपत्र नजीकचे शहर गांवांत अगर तालुक्याचे गांवीं सुरक्षितपणें ठेवावेत. कारण एकादें नाठाळ कूळ सोसायटीचें कागदपत्र नाहींसे केल्यानें आपलें देणें बुडेल अशा गैरसमजुतीनें चालू परिस्थितीचा गैरफायदा घेऊन या बाबतींत दगा होणेचा संभव आहे. तसेंच सोसायटीकडील रु. १०–१५ पेक्षांची जास्त शिल्लक सोसायटीनें नजीकचे पोस्ट ऑफिसांत अगर बँकेंत सेव्हिंग्ज खातेवर ठेवावी; सोसायटीकडे ठेवूं नये. कारण सोसायटीकडे पैसा शिल्लक असतो या भावनेनें या ठिकाणीं दगा होणेचा जास्त संभव आहे.

११. गांवांतील प्रत्येक इसमानें आपले शेजारचे इसमाचे हालचालीवर बारीक नजर ठेवणें जरूर आहे. प्रत्येकानें आपला शेजारी रात्रीं घरीं असतो अगर कसें, बाहेरगांवीं गेला असल्यास योग्य कारणाकरितां गेला आहे अगर कसें याकडेहि लक्ष ठेवलेनें साहाजिकच सर्वांचे हालचालींवर सर्वांचीच देखरेख राहील व या योगानें बंडखोर व लुटारू वृत्तीचे लोकांना सवड मिळणार नाहीं.

१२. खेड्यांतील प्रत्येक स्त्रीनें आपले घरांतील पुरुष वर्गाचे सर्व हालचालीवर सूक्ष्मपणें लक्ष ठेवावें. कारण एकादे मनुष्याचे

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १५४ |
| २ बँकिंग म्हणजे काय ? | १५५ |
| ३ युद्धकालांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज... | १५६ |
| ४ स्फुट विचार... ... | १५७ |
| युरोपांतील दुसऱ्या आघाडीची तयारी–वर्षअखेरचे बँकांचे ताळेबंद–इंग्लंडमधील शेतीची वाढ टिकेल काय ! | |
| ५ खेडुतांसाठी ... | १५८ |
| ६ कच्च्या फिल्मचा कांहीं अटीवर पुरवठा होणार | १५९ |
| ७ युद्धजन्य परिस्थितीमुळें क्षयरोगाचा फैलाव ... | १५९ |
| ८ गॅस प्लॅन्टचा हिंदुस्थानांत प्रसार ... | १५९ |



# अर्थ

बुधवार, ता. १९ मे, १९४३


## " बँकिंग " म्हणजे काय ?

युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेच्या योजनांची चर्चा चालू आहे, तीमध्यें इंग्लंडसारख्या देशांत बँका आज खाजगी व्यक्तींनीं चालवल्या आहेत त्या राष्ट्रीय सरकारनें स्वतःच्या मालकीच्या कराव्या अशा आशयाची एक सूचना पुढें मांडण्यांत आली आहे. ह्या तऱ्हेच्या सूचना करणारांची कल्पना अशी आहे कीं, बँकांच्या हातीं कर्जाच्या मार्गानें पैसा समाजांत प्रसृत करण्याची मोठी व अनियंत्रित सत्ता असून ती हाताच्या बोटांवर मोजतां येतील एवढ्या थोड्या संस्थांच्या हातीं एकवटली आहे. जनतेस भांडवल व चलन पुरवण्याचा किफायतशीर धंदा अशा रीतीनें खाजगी व्यक्तींच्या हातीं ठेवण्यापेक्षां जनतेच्या हिताच्या व सोयीच्या दृष्टीनें तो सरकारनें चालवावा म्हणजे राष्ट्राचें कल्याण होईल अशी वरील लोकांची समजूत आहे. आर्थिक सत्ता बळकावून तिचा दुरुपयोग करणें, नफेबाजीनें थोड्या व्यक्तींचे खिसे गरम करणें इत्यादि त्यांचेवर झालेल्या आरोपांपासून स्वतःचा बचाव करणें आणि टीकाकारांचें म्हणणें किती अज्ञानमूलक आहे हें दाखवणें ब्रिटिश बँकिंगच्या पुढाऱ्यांस अगत्याचें वाटलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. कित्येक बँकांच्या अध्यक्षांनीं आणि आर्थिक विषयांच्या चर्चेस वाहिलेल्या पत्रांनीं टीकाकारांचा समाचार घेतलाच आहे आणि त्यांच्या युक्तिवादाचा फोलपणा उघड करून दाखवला आहे. तथापि मिडलंड बँक ह्या नांवाची सर्वांत मोठी ब्रिटिश बँक आहे, तिचे दोन तपें अध्यक्ष असलेले आणि एका काळीं इंग्लंडचे फडनवीस म्हणून नाणावलेले मि. रेजिनॉल्ड मॅकेना ह्यांनीं आपल्या देशांतील " बँकर्स मॅगेझिन "मध्यें एक उत्कृष्ट लेख लिहून प्रस्तुत विषयाचें अत्यंत उद्बोधक असें विवेचन केलें आहे. त्यांतली विचारसरणी व माहिती बोधप्रद असल्यानें बँकिंगच्या धंद्याची व्याप्ती व उपयुक्तता ह्यांचे संबंधांत मि. मॅकेना ह्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांचें दिग्दर्शन येथें केलें आहे

" ठेव, " " पत, " "पत उत्पन्न करणें" " पतीचें नियंत्रण " इत्यादि शब्द नेहमीं वापरांत असून त्यांचा अर्थ निरनिराळ्या रीतींनीं केला जात असल्यानें गोंधळ व गैरसमज उत्पन्न होतो. बँकेनें आपल्या गिऱ्हाइकास कर्जाऊ रक्कम दिली असतां ती बँकेंत त्यानें भरलेली ठेव होते, पण ओव्हरड्राफ्ट देण्याचीच पद्धति विशेष प्रचारांत असून तिच्या योगानें ठेवींत अशी भर पडत नाहीं. गिऱ्हाइकांस आपला पैसा बँकेंतून स्वतःच्या इच्छेप्रमाणें काढून घेतां येत असल्यानें ते आपल्या खात्यांत राहूं देतील त्याच पैशाची एकूण ठेव बनत असते आणि बँकेच्या दृष्टीनें हें कर्ज होय. चेकसच्या मार्गानें आपले पैसे काढून घेऊन वापरण्याची मोठी सोय बँकांनीं लोकांस करून दिली आहे आणि तिची व्यवस्था अत्यंत कार्यक्षम रीतीनें ह्या संस्था करीत आहेत ही त्यांची अत्यंत महत्वाची कामगिरी आहे. ठेवींचा पैसा रोकड, रोख्यांतली गुंतवण व कर्जें ह्यांचे स्वरूपांत उपयोगांत आणणें ही बँकांच्या चातुर्याची बाब आहे. अनेक वर्षांच्या अनुभवास अनुसरून किती रोकड जवळ बाळगली पाहिजे हें बँकांनीं निश्चित केलें आहे. सरकारच्या देण्याघेण्याचा कारभार बँक ऑफ इंग्लंड करीत असते आणि इतर बँकांची रोकड त्या बँकेंतील त्यांच्या खात्यांत असल्यानें ह्या मध्यवर्ती बँकेच्या व्यवहारांचा परिणाम बँकांच्या रोकडीवर व ठेवींवर होतो. सरकारच्या तिजोरीचें धोरण व तें अंमलांत आणण्यास बँक ऑफ इंग्लंडनें दिलेलें सहाय हींच देशांतील एकूण चलनप्रसाराच्या बाबतींत निर्णायक असतात आणि इतर बँकांस आपलीं देणींघेणीं त्यांच्यशीं जुळतीं करून घ्यावीं लागतात.

जॉइंट स्टॉक बँकांच्या हातांत चलन म्हणजे जनतेची पदार्थ विकत घेण्याची शक्ती कमी–अधिक करण्याची सत्ता एकवटली आहे ही कल्पना निराधार व अज्ञानमूलक आहे हें सिद्ध केल्यावर मि. मॅकेना टीकाकारांच्या इतर मुद्यांकडे वळले आहेत. युद्धपरिस्थितीचा अयोग्य फायदा बँका करीत नसून उलट युद्धकर्जांत आपला पैसा गुंतवून कमी व्याजाचा दर स्वीकारीत आहेत ही गोष्ट त्यांनीं निदर्शनास आणली आहे. गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जाचें प्रमाण पुष्कळ उतरून सरकारी कर्जांतली बँकांची गुंतवण वाढली आहे. ह्या योगानें त्यांची प्राप्ती मर्यादित होऊन जादा नफ्यावरील करास त्या पात्र झालेल्या नाहींत अशी वस्तुस्थिति आहे. तर बँका १४ ते १६ टक्के डिव्हिडंड कसें वाटूं शकतात आणि युद्धाचा त्यावर कसा परिणाम झालेला नाहीं ह्या प्रश्नास मि. मॅकेना ह्यांनीं दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. डिव्हिडंडचा दर बँकांच्या भरलेल्या भांडवलाशी नफ्याच्या पडणाऱ्या प्रमाणावर आकारण्यांत येतो. पण ताळेबंदांत न दाखवलेले असे रिझर्व्ह बँकांजवळ असतात आणि भागीदारांच्या नफ्यांतून किंवा पैशांतून ते आलेले असतात. भरलेलें भांडवल, प्रसिद्ध व अप्रसिद्ध रिझर्व्ह वगैरेची बेरीज केली असतां होणाऱ्या भागीदारांच्या मालकीच्या एकूण भांडवलावर वस्तुतः ४ टक्केच डिव्हिडंड पडतें. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली असतां बँकेच्या नफेबाजीची कल्पना कशी पोकळ आहे हें दिसून येईल असें मि. मॅकेना ह्यांचें म्हणणें आहे. वरील रिझर्व्हसच्या योगानें बँकांची सांपत्तिक मजबुती वाढली आहे आणि प्रतिकूल परिस्थितीस तोंड देण्यास त्या समर्थ झाल्या आहेत.

बँका या स्वतःच्या फायद्यासाठी मूठभर लोकांनीं चालवलेल्या मक्तेदारीच्या संस्था नाहींत हें दाखवण्यासाठी मि. मॅकेना म्हणतात कीं, इंग्लंडमधील "पांच बड्या" बँकांचे एकूण तीन लक्ष भागीदार आहेत आणि त्यांचें सरासरीनें प्रत्येकीं भांडवल २२० पौंड आहे व त्यावर प्रत्येकास सरासरीनें करास पात्र असलेलें ११

पेंड डिव्हिडंड मिळते. बँकांच्या कारभारांत कोणत्याहि व्यक्तींच्या स्वार्थाचें प्रस्थ नसून डायरेक्टर भागीदारांस त्या संस्थांची सुस्थिति व मजबुती ह्यांचेबद्दल जबाबदार असतात. डायरेक्टरांची निवडणूक भागीदार स्वतः करतात. बोर्डानें निवडणुकीसाठी शिफारस केलेले डायरेक्टर भागीदारांकडून नेहमी निवडले जातात. बँकेच्या चांगल्या कारभाराविषयीं विश्वास ह्याच्या मुळाशी आहे. बँकेचें काम सुरळीत चाललें असतां डायरेक्टरांच्या कामांत हात न घालण्याचें भागीदारांचें धोरण असतें तें उचित आहे. त्याप्रमाणें राष्ट्राची बचत सुरक्षित राखून ती आर्थिक व्यवहारांच्या सोयीसाठी योग्य वेळीं व योग्य स्थळीं खेळवण्याचें महत्त्वाचें कार्य बँका यशस्वी रीतीनें करीत आहेत. त्यांस आणखी मजबुती आणण्याकरितां कांहीं सुधारणा करतां येतील आणि युद्धोत्तर काळांत त्यांचे व्यवहार अधिक कार्यक्षम करतां येतील; पण त्या संस्थांविषयीं मळतेच गैरसमज करून घेणें व पसरणें अनिष्ट आहे हा मि. मॅकेनांच्या लेखाचा मथितार्थ आहे. चलनाचा फाजील विस्तार, त्याचें करावें लागणारें आकुंचन, आंतरराष्ट्रीय हुंडणावळ, सोन्याचें चलन व्यवस्थेंतलें स्थान इत्यादि अवघड प्रश्नांकडे सुधारणेच्छू लोकांनीं अगोदर लक्ष पुरवावें आणि बँकांवर हल्ले करण्याचें सोडून द्यावें अशी त्यांची आग्रहाची सूचना आहे.

## युद्धकालांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज

वरील विषयावरील पहिल्या लेखांत प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं आपल्या नवीन पुस्तकांत* हिंदुस्थानांत वाढत चाललेलें चलन आणि चढणारे बाजारभाव ह्यांमध्यें असलेला कारण-कार्य-संबंध स्पष्ट करून दाखवला आहे, त्याचें आम्हीं विवेचन केलें आहे. ह्या संबंधांतली, सरकारचे फडनवीस सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं स्वीकारलेली भूमिका चुकीची आहे हें लक्षांत येणें आवश्यक आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, युद्धाप्रीत्यर्थ सरकारला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो, रोकड पैसा निरनिराळ्या वर्गांच्या लोकांचे हातीं जातो आणि रोकड जवळ बाळगण्याची व वापरण्याची त्यांची प्रवृत्ति बळावली आहे. ही जनतेची रोकड पैशास असलेली मागणी भागवणें सरकारास प्राप्त आहे. ह्यास्तव चलन वाढल्यामुळें बाजारभाव चढत आहेत असें म्हणणें हें कार्यकारण संबंध उलटा करणें होय. ह्या कोटिक्रमास प्रा. गाडगीळ ह्यांनीं असें उत्तर दिलें आहे आहे कीं, सरकारास युद्धासाठीं मोठ्या प्रमाणांत खर्च करावा लागतो ह्याचा अर्थच असा आहे कीं, त्यास अगोदर चलनाचा पुरवठा करावा लागतो आणि तो कर, कर्ज किंवा चलनाचा विस्तार ह्यांपैकीं एक किंवा अधिक उपायांनीं तो केला पाहिजे. कर व कर्ज हे उपाय अपुरे ठरल्याकारणानें सरकार चलनी नोटा काढून काम भागवीत आहे. आधी खर्च आणि मागाहून नोटांचा विस्तार असा प्रकार येथें नसून अगोदर नोटा व मागाहून खर्च असा तो क्रम आहे आणि त्यामुळें लोकांच्या हातांतलें चलन वाढून बाजारभाव चढवण्यास कारणीभूत झालें आहे हा सिद्धांत प्रा. गाडगीळ ह्यांनीं मुद्देसूद व साधार रीतीनें प्रस्थापित केला आहे. ह्या बाबतचें पुराव्याचें माप चोख रीतीनें त्यांनीं विरुद्ध पक्षाच्या पदरांत टाकलें आहे.

युद्धकाळांत हिंदुस्थान सरकारला उपयोगांत आणावें लागलेलें एकूण चलन आणि निरनिराळ्या मार्गांनीं त्याचेकडे परत आलेलें चलन ह्यांचा एक ताळेबंदच त्यांनीं तयार केला आहे. मध्यवर्ती उत्पन्न-खर्चांतील तूट, रिझर्व्ह बँकेनें खरेदलेले स्टर्लिंग रोखे आणि साम्राज्य सरकारनें लंडनमध्यें दिलेलें स्टर्लिंग ह्यांचा तपशील एक बाजूस आहे आणि त्याची बेरीज ९२१ कोटी रुपये होते. दुसऱ्या बाजूस सरकारच्या हातीं आलेलें चलन नमूद केलें आहे. त्यांत त्यानें काढलेलीं कर्जे आणि त्याचेपासून लोकांनीं खरेदी केलेलीं ट्रेझरी बिल्स ह्यांचा अंतर्भाव केलेला आहे. ह्या बाजूची बेरीज ३७६ कोटी रुपये होते. ह्या दोन बाजूंमधला फरक ५४५ कोटि रुपये इतका भरतो. म्हणजे एवढी मोठी खिंड सरकारला जादा नोटा काढून भरून काढावी लागली असें झालें. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची तर असें म्हणतां येईल कीं एवढ्या मोठ्या रकमेच्या काढलेल्या नोटा सरकाराकडे परत न येतां समाजांत खेळत राहिल्या. सप्टेंबर १९३९ ते जानेवारी १९४३ ह्या मुदतींत हिंदी चलनांत झालेली वाढ पाहिली तर ती ५३९. कोटी रुपये इतकी होते. ह्यावरून ही गोष्ट सिद्ध झाली कीं सर्व युद्धखर्च करांचें उत्पन्न व कर्जे ह्यांनीं न भागल्यामुळें आलेली तूट नोटा काढून भरून काढण्यांत आली आहे. एवढें रिकामें चलन समाजांत वावरत असल्यानें आणि मालाचा पुरवठा मागणीच्या मानानें अपुरा असल्याकारणानें बाजारभाव चढत राहिले तर त्यांत नवल काय? ज्या कारणांमुळें चलन-विस्तार चालू आहे आणि महागाई पसरत आहे तीं दूर झाल्यावांचून सध्याच्या फाजील चलनाचा आणि त्याच्या अनिष्ट परिणामांचा प्रश्न सुटावयाचा नाहीं हें उघड आहे. आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत प्रा. गाडगीळ ह्यांनीं सध्यांच्या अडचणींवर योजावयाच्या व्यावहारिक उपायांचें विवेचन केलें आहे. हे उपाय कडक व सर्वव्यापी आहेत असें सकृद्दर्शनी वाटल्यावांचून रहाणार नाहीं. तथापि, फाजील चलनाची आपत्ति युद्धप्रयत्नांच्या व राष्ट्रीय सुस्थितीच्या दृष्टीनें दूर करण्याचें अगत्य कोणासहि व सरकारास पटण्यासारखें आहे. त्या कामीं जरूर असलेलें किंमतींचें नियंत्रण, श्रीमान लोकांवर बसवण्याचे जादा कर, जनतेनें शक्य तेथें करावयाची बचत, सरकारी कर्जांत वाढती गुंतवण इत्यादि गोष्टी लोकांच्या अंतिम हिताच्या असल्यानें त्यांस त्यांनीं पाठिंबा देणें आवश्यक आहे. सर जेरेमी रेस्मन त्या संबंधांत उपाययोजना आखीत असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. टाइम्स ऑफ इंडिया सारखीं पत्रेंहि सरकारनें नियंत्रणाचें धोरण अवलंबण्यांत कसुर करूं नये असें सुचवूं लागलीं आहेत. प्रा. गाडगीळ यांच्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचा परामर्श पुढच्या लेखांत घेण्यांत येईल.

* "War and Indian Economic Policy"—Gokhale Institute of Politics and Economics, Poona 4.

### ट्यूबच्या रबराची बचत.

अमेरिकेंतील मोटारवाल्यांचे जवळच्या वहानांवर १३½ कोटि रबरी ट्यूब बसविण्यांत आलेल्या आहेत व सुमारें ५ कोटि ट्यूब्ज कारखानदारांजवळ व दुकानदारांजवळ आहेत. प्रत्येक ट्यूबमध्यें सुमारें २½ पौंड रबर असतें, त्यापैकीं ६८% रबर अत्यंत उत्कृष्ट दर्जाचें असतें. अशा रीतीनें सुमारें २,७७,५०० टन रबर अडकून पडलेलें आहे. पूर्व आशियांतील रबराचा पुरवठा संयुक्त राष्ट्रांस उपलब्ध नसल्याकारणानें, हें रबर युद्धकार्यासाठीं कसें घेतां येईल, याबद्दल अमेरिकेंत चर्चा चालू आहे. आंत ट्यूब्ज न घालतां नुसत्या टायर्सवर मोटारी चालविता याव्यात, यासंबंधीं तेथें संशोधन सुरू आहे. तें यशस्वी झाल्यास, २½ लक्ष टन रबर युद्धकार्यास उपलब्ध होईल.

वाद्यात् वर्तनानें कुटुंबांतील सर्व मंडळींवर आपत्ति कोसळते. चावड्या, शाळा, कोर्टें, स्टेशनें वगैरें सारख्या सार्वजनिक उपयोगाच्या इमारती जाळणें, लुटणें वगैरे प्रकारच्या गुन्ह्यांत सांपडलेल्या लोकांना प्रसंगीं जबर दंड होऊन जन्मठेपेसारखी लांब मुदतीच्या सक्तमजुरीच्या शिक्षा होतात. लुटालूट व जाळपोळ वगैरे सारख्या दुलढींत सांपडणें अशिक्षित तरुण जाणे जास्त संभवनीय असतें. तेव्हां स्त्रियांनीं आपापले घरांतील सर्व पुरुषवर्गाचे विशेषतः तरुण मुलांचे हालचालीवर जास्त लक्ष ठेवणें जरूर आहे.

१३. खेड्यांतील "वासाच्या कुळांनीं"—म्हणजे सधन लोकांनीं आपल्या जवळची रोकड व दागदागिने यासारख्या मूल्यवान वस्तू शहरांतील बँकांत सुरक्षिततेकरितां केलेल्या जागेंत ठेवाव्यात व तसे ठेवले असल्याबद्दल गांवांत अफवा उठवावी. यायोगें लुटारू लोक निराश होतील व गांवचें संकटही टळेल.

१४. खेडेगांवची लोकसंख्या थोडी असल्यानें प्रत्येक खेडुतास त्याचे गांवांतील बहुतेक सर्व रहिवाशांची ओळख असतेच. कोणी अनोळखी इसम गांवीं आल्यास त्याची सत्वर चौकशी करून तो गांवांत कोणाकडे व काय कामाकरतां आला आहे याची माहिति घ्यावी. अशा परक्या इसमास जर समाधानकारक उत्तरें देतां आलीं नाहींत तर सदर इसमास गांवचे पोलीस पाटलाचे स्वाधीन करावें.

---

## कच्च्या फिल्मचा कांहीं अटींवर पुरवठा होणार

युद्धप्रयत्नांस पोषक होणाऱ्या चित्रपटांचें उत्पादन वाढावें व ते चित्रपटगृहांतून वाढत्या प्रमाणांत दाखविण्यांत यावेत, ह्या हेतूनें हिंदुस्थान सरकारनें एक नवा डिफेन्स ऑफ इंडिया नियम जाहीर केला आहे, त्याची अंमलबजावणी १५ सप्टेंबर १९४३ रोजीं सुरू होईल. त्या तारखेपासून प्रत्येक सिनेमा-गृहांतील कार्यक्रमांत किमान २ हजार फूट लांबीच्या, इन्फर्मेशन व ब्रॉडकास्टिंग खात्यानें मंजूर केलेल्या फिल्मचा समावेश करण्यांत आलाच पाहिजे. १९४३ सालीं कच्च्या फिल्मचा पुरवठा मोठ्या प्रमाणांत होण्याची व्यवस्था हिंदुस्थान सरकार करीत आहे, परंतु त्या पुरवठ्याचा उपयोग युद्धप्रयत्नास पोषक होणें आवश्यक आहे ह्या दृष्टीनें सिनेमा कंपन्यांस कच्च्या फिल्मचा पुरवठा व थिएटरवाल्यांवर २ हजार फूट लांबीची युद्धप्रयत्नविषयक फिल्म दाखविण्याची सक्ती यांचा संबंध जोडण्यांत आलेला आहे.

---

## अमेरिकेसंबंधीं कांहीं आकडे

| | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या | १३,२०,००,००० |
| एकूण कुटुंबें | ३,४८,९१,५२५ |
| कुटुंबांतील सरासरी माणसें | ३·८ |
| त्यांचा दरवर्षी अन्नावर खर्च | १५७५ रु. |
| ,, ,, करमणुकीवर ,, | १७५ रु. |
| ,, ,, घरभाड्यावर ,, | १०२० रु. |
| किती कुटुंबांजवळ मोटारी आहेत ? शंभरांत | ४४ |
| ,, ,, रेडिओ ,, ,, | ६९ |
| ,, ,, नोकर ,, ,, | ५ |
| वार्षिक जन्मसंख्या | २२,०१,६१० |
| दर ताशीं विवाह | १५६ |
| दर माणशी वार्षिक आइसक्रीमचा खप | ४½ शेर |

## युद्धजन्य परिस्थितीमुळें क्षयरोगाचा फैलाव

युद्ध काळांत बॉंबगोळे, मशीनगन्स ह्यांमुळें माणसें मरण पावतात. त्याबरोबरच रोगांस बळी पडणारांचीहि संख्या वाढते, असा अनुभव आहे. सध्याच्या युद्धास प्रारंभ होईपर्यंत ग्रेटब्रिटनमध्यें क्षयरोग कमी कमी होत चालला होता. १९२८ सालीं इंग्लंड व वेल्समध्यें ह्या रोगानें ३६,६३२ लोक मेले; १९३८ सालीं ही संख्या २६,१६७ झाली. म्हणजे प्रत्येक १ लक्ष लोकसंख्येंत ९१ ऐवजीं ६० लोक क्षयरोगास बळी पडले. १९४१ सालीं ह्या रोगानें मरण पावलेल्यांची संख्या १९३८ च्या मानानें १३% वाढली असल्याचें आढळलें आहे. हवाई हल्ल्यांस बळी पडलेल्यांना जागा करून देण्यासाठी इस्पितळांतील क्षयरोग्यांना घरीं पाठवावें लागतें, प्रकाश नियंत्रणामुळें पुरेशी खेळती हवा मिळत नाहीं, दाटवस्तींत रहावें लागतें. उत्कृष्ट दुधाचा पुरवठा नीट होत नाहीं, क्षयी लोक कारखान्यांतून कामें करतात, इत्यादि कारणांमुळें क्षयरोग प्रसार पावत आहे, त्यास आळा घालण्याचे उपाय डॉ. डॉसन यांनीं सुचविले आहेत. दुध उकळून तें जंतुरहित करणें, दूध पुरेंसें न मिळाल्यास अंडीं, मांस वगैरे अधिक खाणें, कामावर घेतांना उमेदवारांची नीट तपासणी करणें, इत्यादि ते उपाय आहेत. इंग्लंडमधील क्षयरोगाच्या प्रसाराचे मानानें हिंदुस्थानांत ह्या रोगाचा प्रसार कितीतरी विस्तृत आहे आणि दारिद्र्य व युद्धजन्य परिस्थिति ही क्षयरोग फैलावण्यास अनुकूलच आहेत. ह्या दृष्टीनें, इंग्लंडमधील ह्या संबंधांतील दक्षता लक्षांत घेण्याजोगी आहे.

---

## गॅस प्लँटचा हिंदुस्थानांत प्रसार

पेट्रोल रेशनिंगला प्रारंभ झाल्यानंतर बसेस व लॉऱ्या ह्यांना प्रोड्यूसर गॅस प्लँट बसविण्यास सुरवात झाली. आतां हिंदुस्थानांत गॅस प्लँटचे एकूण ५१ कारखाने आहेत. मद्रास, मुंबई, संयुक्तप्रांत व पंजाब हे प्रांत गॅस प्लँटच्या उत्पादनाचे बाबतींत अग्रेसर आहेत. वेगवेगळ्या कारखान्यांत तयार झालेल्या गॅस प्लँटच्या किंमतींत अपार तफावत आढळून येते; उत्पादनाचें ठिकाण व विक्रीचें केंद्र ह्यांमधील अंतर हें त्याचें मुख्य कारण आहे. हिंदुस्थानांत आतांपर्यंत ६,७७६ बसेस व २,२१० लॉऱ्या ह्यांना गॅस प्लँट बसविण्यांत आलीं आहेत. खासगी गाड्यांवरील गॅस प्लँट मोजलीं तर सर्वांची एकूण संख्या १०,३४३ भरते. ह्या सर्व गॅस प्लँटची किंमत १ कोटि रुपयांचे पेक्षां अधिक भरते, ह्यावरून ह्या धंद्याचें वाढतें महत्त्व लक्षांत येईल. गॅस प्लँटच्या वापरामुळें आजच्या स्थितींतच दरसाल १½ कोटि गॅलन पेट्रोलची बचत होऊं लागली आहे. गॅस प्लँटची संख्या आणखी वाढली म्हणजे ह्याहिपेक्षा अधिक पेट्रोल युद्ध कार्यासाठी उपलब्ध होईल. मद्रास प्रांतांत सर्वांत अधिक म्हणजे ३,७०७ गॅस प्लँट चालू आहेत. त्याचे खालोखाल मुंबई (१,३५९), बंगाल (८३३), संयुक्त प्रांत (८८२), पंजाब (५०७) असा अनुक्रम येतो. संस्थानांत म्हैसूर (४७४) अग्रेसर आहे.

---

## ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. ७ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ७ पै इतका पडला. सरकारास फक्त ८ कोटि रुपये हवे होते, परंतु १५ कोटींचीं टेंडरें आलीं होतीं.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

# DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख २६ मे १९४३ | अंक २१

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टरसहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ इंडिया लि.
[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेड्डिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिल्लकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बंगालला तांदुळाचा पुरवठा

तांदूळ व तांदुळाऐवजीं खाण्याजोगीं इतर धान्यें मिळून ५ १/२ लक्ष टन धान्य बंगालला पुरविण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे.

### धान्याची वाढती लागवड

हिंदुस्थानांत सध्या सुमारें ४७ लक्ष एकर जमिनींत आखूड धाग्याच्या कपाशीचे ऐवजीं धान्यें पेरण्यांत येत आहेत.

### शेतकऱ्यांच्या क्रयशक्तीवर बंधन

"शेतकरीवर्गाची चलती असून, त्यांस मिळणाऱ्या भारी किंमतीमुळें त्यांचे जवळील जादा पैसा व्यवहारांत येऊन चलनाच्या फाजील विस्तारास कारणीभूत होतो. शेतकऱ्यांचा पांच वर्षांचा सारा एकदम वसूल करण्यांत यावा व आगाऊ घेतलेल्या रकमेवर सरकारनें आकर्षक व्याज द्यावें, असें सुचविण्यांत येत आहे. इन्फ्लेशनला त्यामुळें आळा बसून शिवाय मंदीचे काळांत शेतकऱ्यांस साऱ्याचा बोजा प्रमाणाबाहेर वाटणार नाहीं. शेतकऱ्यांची क्रयशक्ति मर्यादित करण्याचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे." सिव्हिल ॲन्ड मिलिटरी गॅझेट (लाहोर) च्या दिल्लीच्या बातमीदारानें वरील बातमी प्रसिद्ध केली आहे.

### साखरेचें अंदाजापेक्षां ज्यास्त उत्पादन

हिंदुस्थानांतील साखरकारखान्यांत १९४२-४३ च्या मोसमांत ३० एप्रिल १९४४ अखेर १०,६१,०६५ टन साखरेचें उत्पादन झालें. म्हणजे अपेक्षेपेक्षां ६९,५३४ टन इतकें उत्पादन ज्यास्त झालें आहे. मुंबई व पंजाब ह्या प्रांतांत मात्र अपेक्षेपेक्षा उत्पादन कमी झालेलें आहे. ३० एप्रिल रोजीं सर्व कारखान्यांत मिळून ६,६३,६१० टन तयार साखर शिलक होती.

### लायब्ररीअनचा अभ्यासक्रम

मद्रास आणि पंजाब विश्वविद्यालयांच्या अभ्यासक्रमाच्या धर्तीवर मुंबई विश्वविद्यालय पुस्तक-शालाधिपतीच्या शिक्षणाचा एक अभ्यासक्रम सुरू करणार आहे. हा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून मॅट्रिक पास उमेदवारास त्या वर्गात प्रवेश मिळूं शकेल. लायब्ररिअनच्या कामाचा अनुभव असलेले मॅट्रिक पास व पदवीधर उमेदवारांस शिक्षणक्रम एक वर्षात पुरा करतां येईल; बाकीच्यांस दोन वर्षे लागतील. मुंबई विश्वविद्यालयाच्या लायब्ररींत हे वर्ग चालविण्यांत येतील व परीक्षा उत्तीर्ण होणारांस डिप्लोमा दिला जाईल.

### मद्रास प्रांताची आघाडी

लष्करी नोकरींत स्वयंस्फूर्तीनें दाखल झालेल्या हिंदी डॉक्टरांच्या संख्येंत मद्रास प्रांतीयांचा अनुक्रम पहिला लागतो.

### रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

१९४२-४३ च्या दुरुस्त अंदाजांतील अपेक्षित उत्पन्नापेक्षां हिंदी रेल्वेजचें प्रत्यक्ष उत्पन्न ५ कोटि, १७ लक्ष रुपयांनीं वाढून खर्चाच्या आकड्यांत ९० लक्ष रुपयांची घट झाली. एप्रिल १९४३ मधील रेल्वेजचें उत्पन्न १९४२ च्या एप्रिलमधील उत्पन्नापेक्षां २ कोटि रुपयांनीं अधिक भरलें.

### हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

| | |
|---|---|
| एप्रिल, १९४३ | २९६ लक्ष रुपये |
| मार्च, १९४३ | २६९ „ „ |
| एप्रिल, १९४२ | ३०४ „ „ |

### चीनमधील हक्क सोडण्याचा करार

ग्रेट ब्रिटन, हिंदुस्थान व चीन ह्यांचेमध्यें १९४३ च्या जानेवारींत कराराचा मसुदा ठरून चीनमधील खास हक्क सोडण्याचें ठरलें. हा करार २० मे १९४३ च्या दुपारीं १२ वाजल्यापासून अमलांत येऊं लागला.

### एक रुपयावाल्या नोटा

जुन्या, मळलेल्या, एक रुपयावाल्या चलनी नोटा बदलून मिळाव्या ह्या सूचनेस सरकारचें असें उत्तर आहे कीं, नोटांस लागणारा विशिष्ट कागद दुर्मीळ असल्यामुळें नोटा जास्त दिवस प्रचारांत ठेवणें अपरिहार्य आहे.

### आंतरराष्ट्रीय अन्न परिषद

हॉट स्प्रिंग्ज (व्हर्जिनिया) येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय अन्न परिषदेंत ब्रिटिश, रशियन व अमेरिकन प्रतिनिधींच्या मतामध्यें फरक असल्याचें दिसतें, परंतु तो फरक कमी करीत आणला जात आहे. युद्धानंतर मुक्त केलेल्या राष्ट्रांसाठी लागणाऱ्या अन्नपुरवठ्यावर भर द्यावा, असें ब्रिटिश मत आहे. युद्ध जिंकणें हा मुख्य हेतु असून अन्न हें रशियन सैनिक व नागरिक ह्या दोघांसहि हत्यार म्हणून पाहिजे, असें रशियन म्हणणें आहे. युद्ध जिंकेपर्यंत, त्यानंतरच्या अन्न पुरवठ्याचा विचार हा केवळ तात्त्विक महत्त्वाचा आहे, अशी त्याची विचारसरणी आहे. दीर्घदृष्टीनें विचार करण्यासाठींच ही परिषद बोलाविलेली आहे, असें अमेरिकन प्रतिनिधींचें म्हणणें आहे.

### असेंब्लीचें अधिवेशन

मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या अधिवेशनास २६ जुलै रोजीं दिल्ली येथें प्रारंभ होईल.

### महापूर.

अमेरिकेंतील मिसिसिपी नदीस महापूर येऊन लाखों लोकांची तारांबळ उडाली आहे. लाखो एकर शेतीची जमीन वाहून गेली आहे. नागरिकांच्या सहाय्यानें ५ हजार सैनिक बांध घालण्याचें काम करीत आहेत. एकूण नुकसान १० कोटि रुपयांपेक्षां अधिक झालें आहे. खाणींत पाणी शिरल्यामुळें ५ हजार कामगार बसून आहेत. निराश्रित कुटुंबें शोधून काढण्यासाठीं विमानांचा उपयोग केला जात आहे.

### जपाननें चालवलेली लूट

जपान चीन, इंडोचायना व सयाममधून २५ लक्ष टन तांदूळ दरसाल नेतो. १७ लक्ष टन मीठ, ४० लक्ष टन कोळसा, ६० लक्ष टन पोलाद, त्याचप्रमाणें बरेंचसें रबर, तेल इत्यादि जिनसाहि जपान बळकावतो, अशी माहिती चिनी राजधानींतून अधिकृतरीत्या प्रसिद्ध झाली आहे.

### मुंबई म्युनिसिपॅलिटीचे दिवे

मुंबई म्युनिसिपॅलिटी रस्त्यांवर दिवे लावण्यासाठीं दरसाल ११ लक्ष रुपये म्हणजे आपल्या उत्पन्नाच्या ३½ ते ४% रकम खर्च करते. ८,५५० गॅसचे दिवे लागण्यासाठीं ६ लक्ष, ९० हजार रुपये लागतात, १,०२१ विजेच्या दिव्यांवर २ लक्ष, ६० हजार रुपये खर्च होतो, तेलाच्या ३०० दिव्यांसाठीं ५५ हजार रुपये खर्ची पडतात आणि पोर्ट ट्रस्टच्या दिव्यांप्रीत्यर्थ ४४ हजार रुपये खर्च येतो. गॅसच्या दिव्यांपेक्षां विजेचे दिवे महाग पडतात.

अनुक्रमणिका


| पृष्ठ | | पृष्ठ | |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १६२ | कर्जे–जागतिक अन्न परिषद्–अन्न पुरवठा आणि सहकार–"जागृतीचा" रौप्य महोत्सव–ज्ञानेश्वरांचा सुलभ संदेश | |
| २ मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळ ... ... | १६३ | ६ नफ्याचा भाग सरकार ठेव घेणार ... ... | १६७ |
| ३ सहकारी सोसायटी व तिचे नोकर ह्यांचेमधील बांधा | १६४ | ७ नव्या कंपन्यांच्या स्थापनेवर नियंत्रण ... ... | १६७ |
| ४ हिंदी बँकिंगचा नकाशा | १६४ | ८ अधिक धान्य पिकवा | १६८ |
| ५ स्फुट विचार... ... शहरी सहकारी संस्थांची समाधानकारक प्रगति–शेतकी सोसायट्यांची बुडीत | १६५ | | |



# अर्थ

बुधवार, ता. २६ मे, १९४३


## मुंबई प्रांतांतली सहकारी चळवळ

### शेतीविषयक सोसायट्या

मुंबई प्रांतांतल्या सहकारी चळवळीच्या १९४१–४२ सालांतल्या परिस्थितीसंबंधांतला वृत्तांत साररूपानें प्रसिद्ध झाला आहे. निरनिराळ्या वर्गांच्या सहकारी संस्थांची हालहवाल सदरहु वर्षांत कशा प्रकारची होती, हें त्यावरून दिसून येतें. प्रथमतः शेती सोसायट्यांचा विचार करूं. वाईट स्थितींतल्या ह्या संस्था गुंडाळणें आणि नवीन संस्था सावधगिरीनें स्थापन करणें हें सहकारी खात्याचें धोरण अहवालाच्या वर्षींहि चालू राहिलें. त्याचा परिणाम असा झाला कीं २२ सोसायट्या रद्द झाल्या आणि ७० नवीन रजिस्टर करण्यांत आल्या. वर्षअखेर ह्या सोसायट्यांची एकूण संख्या ३,८२५ झाली. त्यांच्या एकूण भांडवलांत ५½ लक्ष रुपयांची घट होऊन त्याचा आंकडा २ कोटि ६४ लक्षांवर आला. कांहीं सोसायट्या रद्द झाल्या, त्याचे भांडवल नाहींसें झालें आणि सभासदांकडे येणें असलेलीं कर्जें कमी झालीं, हें सदरहु घट घडून येण्याचें दुहेरी कारण आहे. तथापि, सोसायट्यांच्या रिझर्व्हसमध्यें अडीच लाखांची वाढ झाली असून, सवा लाख. रुपयांचें नुकसान त्यांमधून भरून काढण्यांत आलें असतांहि ती झाली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. सोसायट्यांनीं बँकांकडून घेतलेल्या कर्जांची रकम सहा लक्षांनीं उतरली आहे. त्यांचें स्वतःच्या मालकीचें भांडवल बाहेरून घेतलेल्या कर्जांच्यापेक्षां साडेतेरा लक्ष रुपयांनीं अधिक आहे आणि त्यांच्या एकूण भांडवलाच्या ५२ टक्क्यांइतकें आहे ही अभिनंदनीय परिस्थिति आहे. सोसायट्या अधिकाधिक स्वावलंबी होत चालल्या असल्याचें तें चिन्ह आहे. त्यांनीं केलेली कर्जांची वसूली पूर्वींच्या वर्षाचे मानानें १२½ लक्ष रुपयांनीं अधिक होती. थकलेलें एकूण येणें १ कोटि २६ लक्ष रुपयांचे १ कोटि, १२ लक्ष रु. होऊन १४½ लक्षांनीं तें कमी झालें. एकूण येणें कर्जाच्या रकमेशी थकबाकीचें प्रमाण ५७ टक्के पूर्वींच्या वर्षी होतें तें ५२ टक्क्यांवर उतरलें. शेती संस्था गेलीं कित्येक वर्षें वाईट स्थितींतून बाहेर निघून त्यांस आतां बरे दिवस आले आहेत आणि त्यांच्या सांपत्तिक अवस्थेंत सुधारणा होत आहे असें वर दिलेल्या आकड्यांवरून अनुमान काढण्यास जागा आहे.

वृत्तांताच्या वर्षी माल्टिपर्पज सोसायट्यांच्या संख्येंत तीन नवीन संस्थांची भर पडून ती ७३ झाली. त्यांच्या एकूण येण्यापैकीं म्हणजे २७ लक्ष रुपयांपैकीं फक्त २१ हजार रुपये थकलेले होते. त्यांनीं आपल्या सभासदांस सुमारें सवा लक्ष रुपये किंमतीचा माल पुरवला आणि त्यांचा सुमारें चार लक्षांचा माल विकला. कमिशनच्या मार्गानें त्यांस सुमारें साडेनऊ हजार रुपयांची प्राप्ती झाली. सर्वत्र माल्टिपर्पज सोसायट्यांची स्थिति समाधानकारक आहे असें म्हणतां येत नाहीं. पण त्या स्वतःस येणाऱ्या अडचणींशीं झगडून प्रगतीचा मार्ग काढीत आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. सोसायट्यांच्या कारभारावर देखरेख करणाऱ्या सुपरवायाजिंग यूनिअन्सच्या जिल्हा बोर्डांच्या घटनेंत सुधारणा करण्यांत आली आणि त्या सर्वांचेवर प्रांतिक सुपरव्हिजन बोर्डाची स्थापना करण्यांत आली. ह्या बदलांच्या योगानें देखरेखीचें कार्य अधिक फलदायी होईल अशी अपेक्षा आहे. जिल्हा बोर्डांची एकूण संख्या १९ आहे आणि बँकिंग यूनिअन्स धरून एकूण यूनिअन्सची १११ आहे. ह्या सर्वांस जोडलेल्या एकूण सोसायट्या ३,४८० आहेत. डिस्ट्रिक्ट बोर्डांचे ३ सीनिअर सुपरव्हायजर्स, ११५ सुपरव्हायजर्स व २२ मदतनीस सुपरव्हायजर्स आहेत.

लांब मुदतीच्या कर्जासंबंधानें बोलावयाचें म्हणजे हें सांगितलें पाहिजे कीं, प्रांतिक जमीन–गहाणाच्या बँकेची प्रगति होत राहिली आहे. तिचें भाग भांडवल ४ लक्ष ७१ हजार रुपयांचें ४ लक्ष, ९२ हजार रुपये झालें. ह्या बँकेनें सुमारें साडेपाच लक्ष रुपयांचीं ३७७ कर्जें प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांस दिलीं. तीं बहुतेक सर्व जुन्या कर्जांच्या फेडीसाठी होतीं. वृत्तांताच्या वर्षी मुंबई सरकारनें प्रांतिक बँकेनें काढलेल्या नवीन डिबेंचर कर्जाची ५ लक्ष रुपयांची हमी घेतली. प्राथमिक बँकांची संख्या १७ होती आणि तीमध्यें कांहीं बदल झाला नाहीं. त्यांचें भाग भांडवल ३ लक्ष, २१ हजार रुपयांचें ३ लक्ष, ५३ हजार झालें. त्यांचें कर्जांचें एकूण येणें ३० लक्ष ६९ हजार रुपयांपासून ३३ लक्ष ६१ हजार रुपयांपर्यंत चढलें. थकलेल्या कर्जाचा आकडा १ लक्ष, १४ हजार रुपये होता आणि पूर्वींच्या वर्षाच्या सवा लक्षाच्या मानानें तो कमीच होता. थोडे अपवाद सोडले तर एकंदरीनें पाहतां प्राथमिक जमीन गहाणाच्या बँकांनीं आपली प्रगति वृत्तांताचे वर्षीं कायम ठेविली होती असें म्हटलें पाहिजे.

शेतीच्या पण बिगरपत सोसायट्यांची स्थिति प्रगतिपर राहिली. त्यांची संख्या ३४ नीं वाढून ४१३ झाली. त्यांनीं केलेल्या विक्रीची किंमत ११४ लक्ष रुपयांची १३० लक्ष रु. झाली. कपास विक्रीच्या ४५ सोसायट्या आहेत आणि त्यांचें स्थान महत्त्वाचें आहे. ह्या संस्थांनीं ७३ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. प्रांतिक मार्केटिंग सोसायटीच्या कार्यास चांगला प्रारंभ झालेला आहे. येथें तालुका डेव्हेलपमेंट सोसायट्यांच्या उपयुक्त कार्याचाहि उल्लेख करणें आवश्यक आहे. प्रांतिक कोऑपरेटिव्ह बँकेची परिस्थिति समाधानकारक होती. तिचें एकूण भांडवल २ कोटि, ७९ लक्ष रुपये झालें. नवीन कर्जें २७ लक्ष, २९ हजार रुपयांचीं तिनें दिलीं आणि

२८ लक्ष, ७१ हजारांची वसुली केली. सोसायट्या व बँका यांचे-कडूनचें येणें वर्ष अखेर ७४ लक्ष, २० हजार रुपये होतें. बँके-पाशीं असलेल्या तरत्या पैशाचें प्रमाण मोठें व समाधानकारक होतें आणि ठेवींच्या एकूण रकमेशीं त्याचें प्रमाण ७० टक्के इतकें होतें. जिल्हा मध्यवर्ती बँकांची संख्या ११ होती आणि त्यांची भाग भांडवल, रिझर्व्ह, सभासदांची संख्या इत्यादि बाबतींत समाधानकारक प्रगति झाली. युद्धपरिस्थितींतहि ह्या बँकांच्या ठेवींत व भांडवलांत वाढ झाली हें त्यांवर असलेल्या जनतेच्या विश्वासाचें निदर्शक आहे. त्यांचें एकूण भांडवल ३ कोटि रुपयांचें १ कोटि, एकतीस लक्ष रुपये झालें. पण ह्या वाढत्या पैशाचा उपयोग सहकारी संस्थांस कर्जे देण्यांत त्यांस करतां आला नाहीं आणि एकूण भांडवलापैकीं फक्त ८६ लक्षच रुपये कर्जात गुंतवले गेले. येणें झालेल्या त्यांच्या एकूण ११६ लक्ष रुपयांच्या कर्जापैकीं ६७ लक्षांची वसुली झाली आणि एकूण फिटावयास पाहिजे होत्या त्या कर्जाच्या रकमेशीं अनाधिकृत थकबाकीचें प्रमाण २२ टक्के पडलें. ह्या बँकांचें स्वतःच्या मालकीचें भांडवल ५५ लक्ष रुपये होतें. त्यांच्या एकूण भांडवलाशीं त्याचें प्रमाण सुमारें १६ टक्के होतें.

—:०:—

## सहकारी सोसायटी व तिचा नोकर ह्यांचेमधील वांधा

### सहकारी कायद्याचें ५४ वें कलम

बॉंबे को. सोसायटीज ॲक्टचें ५४ वें कलम आणि इंडियन आर्बिट्रेशन ॲक्टचें ३३ वें व ४६ वें कलम ह्यांचे दृष्टीनें एक महत्त्वाचा निवाडा मुंबई हायकोर्टानें नुकताच केला. बॉंबे को. सोसायटीज ॲक्ट १९२५ सालीं पास झाल्यानंतर त्यासंबंधींच्या प्रश्नाचा हा पहिलाच निवाडा होय. मि. कारांजिया, हे जी. आय. पी. रेल्वे एम्प्लॉइज को. बँक लि. चे एक नोकर व सुमारें १० वर्षे तिचे टेस्ट ऑडिटर होते. अंतर्गत ऑडिटचे कामाचे वेळीं त्यांनीं बँकेच्या हिशोबांत पुष्कळ सुधारणा सुचविल्या होत्या, परंतु पुढें बँकेच्या मॅनेजरचें व त्यांचें वांकडें येऊन त्यांची नोकरी जाण्याचा प्रसंग आला. १० जून, १९४१ रोजीं मि. कारांजिया ह्यांजवर मॅनेजर ह्यांनीं नोटीस बजावून त्यांचेवर कांहीं आरोप केले व त्यांस कामावरून तात्पुरतें दूर केलें. मि. कारांजिया ह्यांस, मॅनेजरनें नियमबाह्य वर्तन करून त्यांजवर केलेल्या आरोपांस उत्तर देण्याचें प्रयोजन वाटलें नाहीं. ७ जुलै १९४१ रोजीं मि. कारांजिया ह्यांनीं रजिस्ट्रारला लिहून बॉंबे को. सोसायटीज ॲक्टाच्या ५४ व्या कलमानुसार आर्बिट्रेटरच्या नेमणुकीची विनंति केली. १७ जुलै, १९४१ रोजीं बँकेच्या बोर्डानें ठराव करून मि. कारांजिया ह्यांस कामावरून दूर केलें. १५ ऑगस्ट, १९४१ रोजीं असिस्टंट रजिस्ट्रारनीं बँकेस पत्र लिहून आर्बिट्रेशन करावें लागणार असल्याचें कळविलें व बँकेनें आपला ट्रायब्यूनल बोर्डावरील प्रतिनिधि मुक्रर करावा असें तिला सांगितलें. बँकेचें असें म्हणणें पडलें, कीं वादाचा विषय हा बँकेच्या व्यवहाराचा एक भाग होत नसल्याकारणानें आर्बिट्रेशनबाबतचें ५४ वें कलम त्यास लागूच पडत नाहीं. रजिस्ट्रारला युक्तिवाद पटला नाहीं. तेव्हां बँकेनें मि. कारांजिया ह्यांस त्यांनीं आर्बिट्रेशनबाबत रजिस्ट्रारला केलेला अर्ज परत घेण्याविषयीं लिहिलें व त्यांनीं तसें न केल्यास कोर्टांत योग्य तो इलाज करावा लागेल, असें सुचविलें. मि. कारांजिया ह्यांनीं अर्ज परत घेण्याचें साफ नाकारलें. तेव्हां बँकेनें हायकोर्टांत अर्ज करून, वादाचा विषय हा बॉंबे को. सोसायटीज ॲक्टाच्या ५४ व्या कलमाचे कक्षेंत येत नाहीं, कारण बँक व मि. कारांजिया ह्यांचेमध्यें आर्बिट्रेशन-बाबत करार झालेला नव्हता, असा हुकूम मिळविण्याचा प्रयत्न केला.

### हायकोर्टाचा निवाडा

"आर्बिट्रेशनबाबतचा करार व त्या संबंधांतील निवाडा ह्यांचा निर्णय लावण्यासाठीं बॉंबे को. सोसायटीज ॲक्टानें एका स्पेशल कोर्टाची व्यवस्था केलेली आहे; तेव्हां त्या बाबीचा विचार हायकोर्टास करतां येणार नाहीं. आर्बिट्रेशनकडे सोपविण्यांत यावयाच्या वादाचा प्रश्न हा बँकेच्या व्यवहारासंबंधींचा प्रश्न होता किंवा नाहीं, हा मुद्दा उपस्थित करण्यांत आला. बँकेला आपला व्यवहार करतांना अनेक माणसांची व नोकरांची योजना करावी लागेल, तेव्हां "सोसायटीच्या व्यवहाराबाबत" ह्या ५४ व्या कलमांतील शब्दप्रयोगाचा संकुचित अर्थ करून त्यांतून सोसायटीचे नोकर व सोसायटी ह्यांचेमधील वांधे वगळणें सयुक्तिक होणार नाहीं. वरिष्ठ नोकरांस फक्त आर्बिट्रेशन मागतां येईल, असें म्हणणें तर मुळींच समर्थनीय ठरत नाहीं. सोसायटी व तिचा नोकर ह्यांचेमधील वांधा आर्बिट्रेशनकडे सोपविण्याचें वेळीं नोकर सोसायटीचे नोकरींत असला पाहिजे, मागाहून त्यास आर्बिट्रेशन मागतां येणार नाहीं, असा ५४ व्या कलमाचा अर्थ लावण्याचा बँकेतर्फे प्रयत्न करण्यांत आला, परंतु असा अर्थ निघत नाहीं. प्रस्तुत प्रकरणांत मि. कारांजिया ह्यांनीं तर ७ जुलै १९४१ रोजीं आर्बिट्रेशनची मागणीच केली, तेव्हां ते बँकेच्या नोकरींत असल्यानें हा प्रश्नच येथें उपस्थित होत नाहीं. सहकारी सोसायटी व तिचेशीं व्यवहार करणारे लोक ह्यांचेमधील वादांचा निकाल सत्वर व कमी खर्चांत लागावा ह्या दृष्टीनें सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमाची योजना केलेली आहे, तिचेपासून फायदा मूळ अपेक्षेप्रमाणें झाला पाहिजे. सबब, बँकेचा अर्ज नामंजूर करण्यांत येत आहे."

रजिस्ट्रारनें नेमलेल्या ट्रायब्यूनलपुढें आर्बिट्रेशनच्या कामास प्रारंभ होण्यास हायकोर्टाच्या निवाड्यानें मुभा करून दिली आहे.

### हिंदी बँकिंगचा नकाशा

मुंबई येथील ब्यूरो ऑफ कमर्शिअल इंटेलिजन्स ॲन्ड स्टॅटिस्टिक्सनें हिंदुस्थानांतील बँकांची माहिति देणारा एक नकाशा प्रसिद्ध केला आहे, त्यांत ३३६ बँकांचा समावेश झालेला आहे. सहकारी बँका व ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं ५० हजार रुपयांखालीं आहेत अशा बँका नकाशांत दाखविलेल्या नाहींत. बँकांची कमीअधिक दाटी वेगवेगळ्या रंगांच्या सहायानें दाखविण्यांत आली आहे. ३३६ बँकांचीं नांवें अनुक्रमानें दिलीं आहेत. वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं निदर्शित करण्यासाठीं बँकांच्या नांवामागें खुणा केल्या आहेत. नकाशाच्या दोन्ही बाजूंस मिळून एक हजार गांवांचीं नांवें छापलीं आहेत, त्यांचे पुढें दिलेल्या आंकड्यांवरून तेथील बँकांचीं नांवें समजतात. नकाशाची किंमत ५० (पन्नास) रुपये आहे.

### कच्छमध्यें बँक ऑफ इंडियाची शाखा

कच्छच्या महाराजांनीं बँक ऑफ इंडिया लि. च्या एका शाखेचें नुकतेंच उद्घाटन केलें. कच्छमधली ही पहिलीच बँक होय.

# स्फुट विचार

## शहरी सहकारी संस्थांची समाधानकारक प्रगति

आजच्या अग्रलेखांत आम्हीं मुंबई प्रांतांतील शेतीशीं संबंध असलेल्या सहकारी संस्थांच्या १९४१-४२ सालांतील परिस्थितीची कल्पना सहकारी खात्यानें प्रसिद्ध केलेल्या त्रोटक वृत्तांतावरून दिली आहे. ह्या प्रांतांतील बिगर शेतीविषयक सहकारी सोसायट्यांची प्रगति अत्यंत समाधानकारक अशी आहे. त्यांची संख्या १९४०-४१ मध्यें ९८७ होती, ती वृत्तांताच्या सालीं १०१० झाली. बिगर शेतीच्या पत विषयक सोसायट्यांची संख्या ७४१ वरून ७५२ पर्यंत गेली. त्यांच्या जवळच्या ठेवींच्या रकमेंत पुष्कळ वाढ होऊन ती ३९६ लक्षांची ४३७ लक्ष रुपये झाली. भाग भांडवल आणि रिझर्व्ह फंड ह्यांचेमध्येंहि समाधानकारक वाढ झाली. त्यांचें एकूण भांडवल ६४३ लक्षांवरून ६९० लक्ष रुपयांपर्यंत चढलें. शहरी बँकांनीं जनतेचा विश्वास उत्कृष्ट रीतीनें संपादन केला असून त्यांचे व्यवहार व्यापार व धंदे ह्यांस उपकारक झाले आहेत. प्रांतिक सहकारी विमा सोसायटीनें ३,६६६ पॉलिसीज दिल्या, त्यांची रक्कम ४४ लक्ष रुपये भरली. ह्या संस्थेचें एकूण काम १४७ लक्ष रुपयांचें झालेलें आहे आणि तिचा लाइफ फंड १२ लक्ष रुपयांचे जवळ येऊन पोचला आहे. वृत्तांताच्या वर्षी संस्थेची प्रीमियमची प्राप्ती सुमारें ७ लक्ष रुपये होती. युद्धपरिस्थितीमुळें धान्य वगैरे सारख्या जिनसा लोकांस मिळण्यांची अडचण भासली, त्यायोगानें सहकारी स्टोअर्सची संख्या ३१ ची ३८ झाली आणि त्यांच्या व्यवहारांची रक्कम १० लक्षांचे वर गेली. एकूण मालपुरवठ्याच्या कार्याची ह्या आकड्यावरून वास्तविक कल्पना येणार नाहीं, कारण कित्येक कर्ज देणाऱ्या सोसायट्यांनींहि हा उद्योग केला. उदाहरणार्थ, खडकीच्या ॲम्युनिशन फॅक्टरीच्या सहकारी पतपेढीनें ८ लक्ष रुपयांचा माल वृत्तांताचे सालीं पुरविला. घरांच्या सोसायट्यांची संख्या एकानें वाढून १०५ झाली. त्यांची स्थिति समाधानकारक होती. युद्धपरिस्थितीच्या योगानें विणकरांच्या सोसायट्यांस उत्तेजन मिळालें.

---

## शेतकी सोसायट्यांचीं बुडीत कर्जें

कांहीं शेतकी पतपेढ्यांचीं, विशेषतः कॅनाल सोसायट्यांचीं, त्यांच्या सभासदांकडील येणीं बुडीत ठरण्याचा संभव आहे. आपल्या रिझर्व्ह फंडांतून हीं येणीं लिहून टाकण्याचा अधिकार बॉम्बे को. सो. रूल्सपैकीं १२ व्या नियमानें सोसायट्यांना दिलेला आहे. परंतु त्या नियमाप्रमाणें करण्यास सोसायट्या साहजिकच उत्सुक नसतात. कारण, ज्यांचीं येणीं अशारीतीनें लिहून टाकलीं अशांची आर्थिक परिस्थिति पुढें सुधारली तरी सोसायट्यांना त्याचा फायदा घेतां येणार नाहीं. ह्या उलट, सोसायट्यांनीं बुडीत कर्जें रिझर्व्ह फंडांतून लिहून न टाकतां तशींच ताळेबंदांत दाखविलीं तर खेळतें भांडवल निष्कारण फुगलेलें दिसतें व त्या प्रमाणांत सोसायट्यांस ऑडिट व सुपरव्हिजन फी द्यावी लागते. बुडीत कर्जे जिंदगींतून कमी करून त्या मानानें रिझर्व्ह फंड कमी केला, तर सोसायट्यांचें खेळतें भांडवल वास्तविक असेल तेवढेंच दिसेल व त्यावरच ऑडिट आणि सुपरव्हिजन फीचा बोजा निष्कारण पडणार नाहीं. ह्यांतून मार्ग काढण्यासाठी रजिस्ट्रारनीं एक योजना सुचविली आहे. ताळेबंद तयार करतेवेळीं सोसायट्यांनीं अपेक्षित बुडीत कर्जांची एक यादी तयार करावी व बुडीत कर्जाच्या बेरजेइतकी रक्कम रिझर्व्ह फंडांतून वजा करून दाखवावी. जिंदगीचे बाजूस तिसऱ्या कलमाचे पोटांत (१) बुडीत सोडून बाकीचीं कर्जें व (२) बुडीत कर्जे वेगळीं दाखवून बाहेरील कॉलममध्यें बुडीत सोडून बाकीचीं कर्जे तेवढींच नमूद करावींत. देणें बाजूस बाराव्या कलमाचे पोटांत बुडीत कर्जे रिझर्व्ह फंडांतून वजा करून उरलेला रिझर्व्ह फंड तेवढा बाहेरील कॉलममध्यें दाखवावा. अशारीतीनें, ताळेबंदांत खेळतें भांडवल फुगून दिसणार नाहीं व सोसायट्यांवर ऑडिट आणि सुपरव्हिजन फीचा अवास्तव बोजा बसणार नाहीं. रिझर्व्ह फंडांतून बुडीत कर्जें प्रत्यक्ष लिहून होईपर्यंत ह्या पद्धतीनें ताळेबंद तयार करण्यांत यावा. बुडीत कर्जे पुन्हां वसूल होण्याजोगीं झालीं म्हणजे योग्य ती दुरुस्ती करावी. त्यामानानें खेळतें भांडवल वाढेल व त्यावर ऑडिट व सुपरव्हिजन फी नंतर द्यावी लागेल. शेतकी पतपेढ्यांचेसाठी मुंबई सरकारच्या सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारनीं वरील सूचना करणारें एक सर्क्युलर नुकतेंच काढलें आहे, त्याकडे पतपेढ्यां व त्यांचे ऑडिटर ह्यांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे.

---

## जागतिक अन्न परिषद

प्रस्तुत युद्धाचे बाबतींत मित्रराष्ट्रांनीं आपल्या ध्येयाविषयींची "अटलांटिक सनद" ह्या नांवानें घोषणा केली आहे. तीमध्यें युद्धोत्तर काळांत प्रत्येक देशांतील प्रत्येक व्यक्तीस जरूरीच्या अन्नाचा पुरवठा निश्चित रीतीनें होईल अशी व्यवस्था करणें ह्या उद्दिष्टाचा अंतर्भाव आहे. युद्धोत्तर काळांतील इच्छित घटनांच्या सिद्धीची तयारी एव्हांपासून करावयाची ह्या त्यांच्या धोरणास अनुसरून त्यांनीं व्हर्जिनियामध्यें अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय एक परिषद भरविण्याचें ठरविलें आणि तिचें अधिवेशन गेल्या आठवड्यांत झालें. निरनिराळ्या चवेचाळीस राष्ट्रांचे प्रतिनिधी ह्या प्रसंगीं उपस्थित होते. परिषदेस पाठविलेल्या आपल्या संदेशांत प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं असे उद्गार काढले होते कीं, संयुक्त राष्ट्रें ज्या भावनेनें चालू युद्धांत शत्रूचा पाडाव करण्याकरितां एकत्र झालीं आहेत, त्याच भावनेनें त्यांनीं युद्धोत्तर काळांतले अन्नवस्त्राच्या पुरवठ्याचे प्रश्न एकदिलानें व सहविचारानें सोडवले पाहिजेत. अन्न-वस्त्र हा मानवी जीवनाचा पाया आहे आणि भरपूर धान्यें उत्पन्न करून जगांतील सर्व लोकांस पौष्टिक अन्नाचा आवश्यक असलेला पुरवठा होण्याची तरतूद सर्व राष्ट्रांनीं मिळून केली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीस अन्नाचा किमान पुरवठा करण्याची जबाबदारी समाजाची आहे आणि त्यानें ती पार पाडली पाहिजे असेंहि प्रेसिडेंट रूझवेल्ट म्हणाले. सध्याचें युद्ध राष्ट्रांच्या व व्यक्तींच्या स्वातंत्र्यासाठी लढलें जात आहे. पण उपाशी किंवा अर्धपोटी माणसांस स्वातंत्र्याची किंमत कशी वाटणार ? असे उद्गार काढून परिषदेच्या अध्यक्षांनीं सांगितलें कीं प्रस्तुत आंतरराष्ट्रीय मेळावा ह्यापुढें भरवयाच्या अशाच अनेक परिषदांचा केवळ प्रारंभ होय.

---

### अन्नपुरवठा आणि सहकार

जगांतील सर्व राष्ट्रांस व व्यक्तींस अन्नवस्त्राचा पुरवठा करण्याचें ध्येय साध्य व्हावयास आंतरराष्ट्रीय सहकार्य व राष्ट्रांतील अंतर्गत संघटन व नियमन हीं अगत्याचीं आहेत हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. ज्या देशांत त्यांच्या गरजेपेक्षां अधिक धान्यें व शेतीचा इतर माल हीं पिकतात त्यांमधून तुटवड्याच्या देशांत त्यांची निर्गत होण्यास आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सवलती लागतील. त्याचप्रमाणें देशांत तयार झालेल्या आणि बाहेरून आलेल्या अन्नसामुग्रीची वाटणी अशी व्हावी लागेल कीं सर्व व्यक्ती व कुटुंबें ह्यांची योग्य गरज भागावी. येथेंच नियमनाचा व नियंत्रणाचा अवघड प्रश्न उपस्थित होतो आणि तोच समाजानें युक्त रीतीनें सोडवावयाचा आहे. ह्या कामीं सहकारी संघटनेचा अधिकांत अधिक उपयोग करण्यांत आला पाहिजे हें आम्हांस ह्या ठिकाणीं सांगावयाचें आहे. लागवडीचा विस्तार होणें, पिकाची सुधारणा होऊन त्यांची पैदास वाढणें, शेतीच्या धंद्यास भांडवल उपलब्ध होणें, मालाची किफायतशीर विक्री होणें व शेतकरी वर्गाची रहाणी सुधारणें ह्या गोष्टी कष्टसाध्य व संघटनासाध्य आहेत. हिंदुस्थानसारख्यां देशांत सहकारी पद्धतीनेंच प्रयत्न केल्यास त्यांत यश मिळण्याचा संभव आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि परस्पर सहाय्य यांचा उत्कृष्ट मिलाफ सहकार्यतेमध्यें आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेंत डेन्मार्कसारख्या देशांत तेथील यशस्वी सहकारी संघटनेचा पुन्हां विकास होईल. सोव्हिएट रशियांत तर शेती सर्वस्वी सहकारी पद्धतीनेंच चालविली जात आहे. हिंदुस्थानांत सहकारी चळवळीनें मूळ धरलें आहे. पण तिचा विस्तार व जोपासना हीं पद्धतशीरपणानें व उत्साहानें व्हावयास हवीं आहेत. येथील सरकारास ह्या कामीं सहकारी संस्थांस परिणामकारक सहाय्य द्यावें लागेल. "अधिक धान्य पिकवा" ह्यांसारख्या प्रचाराचा व प्रत्यक्ष कार्याचा जनतेस व सरकारास युद्धपरिस्थितींत अनुभव आला आहे. त्याचा पूर्ण उपयोग युद्धोत्तर कालांत केला जाणें आवश्यक आहे. सर्व राष्ट्रांस व सर्व व्यक्तींस अन्नपुरवठा करण्याचें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचें ध्येय साधावयाचें असेल आणि व्हर्जीनियांत भरलेल्या आंतरराष्ट्रीय अन्नपुरवठा परिषदेच्या चर्चेमधून कांहीं फलनिष्पत्ति व्हावयाची असेल तर निदान हिंदुस्थानांत तरी सहकारी चळवळीचा विस्तार आणि तिचें कार्यक्षम संवर्धन सरकार व सहकारी कार्यकर्ते ह्यांनीं योजनात्मक पद्धतीनें केलें पाहिजे.

---

### बडोद्याच्या "जागृति" पत्राचा रौप्य महोत्सव

बडोद्याच्या "जागृति" पत्रानें दोन तपांच्या वर लोकजागृतीचें जें बहुमोल कार्य केलें आहे तें लक्षांत घेऊन सदरहु पत्राचे संपादक श्री. भगवंतराव पाळेकर ह्यांस मानपत्र व थैली अर्पण करण्याचें स्थानिक पुढाऱ्यांच्या समितीनें ठरविलें आहे आणि ह्या उपक्रमास चोहोंकडून पाठिंबा मिळवला आहे. ह्या रौप्य महोत्सवासंबंधानें काढण्यांत आलेल्या प्रसिद्धि पत्रकांत "जागृति" पत्रानें चालवलेल्या उदारमतवादी, लोकहितवर्धक व संग्राहक कामगिरीचें मार्मिक वर्णन आलें आहे, तें माहितगार व गुणगौरवी मंडळींस पटण्यासारखें आहे. पत्रक म्हणतें:— "थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राजकीय बाबतींत महर्षी दादाभाई नौरोजी व प्रातःस्मरणीय देशभक्त गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आणि सामाजिक बाबतींत महर्षी रानडे, महात्मा जोतीबा फुले व महात्मा आगरकर ह्यांच्या विचारसरणींचा व तत्त्वांचा अनुवाद "जागृती"नें केलेला आहे. भांडवलशाहीच्या काळांत राजकीय व सामाजिक विषमतेच्या बरोबरीनेंच आर्थिक विषमता दूर करणें अवश्य असल्यामुळें शेतकरी, कारागीर व मजूर ह्या वर्गाच्या उन्नतीकडे "जागृती"नें विशेष लक्ष द्यावें हें स्वाभाविक होय. तथापि ह्या बाबतींतहि "जागृती" नें उत्क्रांतिवादी विचारसरणीचाच अवलंब केला." "जागृती" रौप्यमहोत्सव समितीनें द्रव्यसहाय्यार्थ जाहीर विनंति केली आहे तिचा योग्य परामर्श घेतला जाईल अशी आम्हांस आशा आहे. श्री. वै. गुप्ते, बी. ए., एलएल. बी. आणि रा. सा. डी. देशमुख, एडे. जी. हे समितीचे चिटणीस आहेत.

---

### ज्ञानेश्वरीचा सुलभ संदेश

श्री. शंकर दिनकर कांदीकर या प्रसिद्ध सामुद्रिक तज्ज्ञाच्या "भाग्यरेषा" ह्या ग्रंथाचें परीक्षण कांहीं महिन्यांमागें करतांना आम्हीं लेखकाच्या विचारसरणींतील प्रयत्नवादित्वाचा आणि भाषासौष्ठवाचा गौरवपूर्वक उल्लेख केलेला "अर्था"च्या वाचकांच्या स्मरणांत असेल. श्री. कांदीकर ह्यांची ग्रंथनिर्मिती मोठी आणि विविध असून ती सारखी चालूच आहे. आतां त्यांनीं आपली ओजवती लेखणी भगवद्गीतेचें हृद्गत ज्ञानेश्वरीच्या आधारानें सुगम रीतीनें विशद करण्याकडे वळवली आहे. * गीतेची तत्त्वज्ञानविषयक पण संसारी लोकांस स्फूर्तिदायक शिकवण, ज्ञानेश्वरांनीं आपल्या प्रासादिक वाणीनें तिचें मराठी भाषेंत केलेलें हृदयंगम विवेचन आणि श्री. कांदीकरांनीं मंथन करून काढलेलें ज्ञानेश्वरीचें मधुर अमृत हा त्रिवेणीसंगम ह्या पुस्तकाचे बाबतींत झालेला आहे. ग्रंथकर्त्यानें नियोजिलेल्या कार्याचा हा पहिला खंड आहे आणि त्यांत गीतेच्या पहिल्या दोन अध्यायांचा विषय आलेला आहे. असे आणखी आठ खंड काढण्याचा त्यांचा मानस आहे.

"काव्य–शास्त्र–विनोद" ह्या दृष्टीनें केलेला श्री. कांदीकरांचा ज्ञानेश्वरीचा व्यासंग नाहीं. ते म्हणतात, "माझ्या निराश अंतःकरणास आशावादी करणारें, नित्य प्रसन्नता ठेवणारें ओजस्वी चैतन्यपूर्ण ज्ञान मला पाहिजे होतें. कित्येक वर्षें मी त्यासाठीं भुकेलेला होतों. श्रीज्ञानेश्वरीच्या वाचनानें, मननानें, अभ्यासानें तें संपूर्ण समाधान मला मिळालें." ज्ञानेश्वरीचा संदेश महाराष्ट्रांत घरोघर पोहोचवावा आणि आबालवृद्धांस सहज समजेल आणि त्यांच्या रोजच्या जीवनांत मार्गदर्शी होईल अशा रीतीनें अत्यंत सोप्या भाषेंत तो सांगावा हाच प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश आहे. "पंडित, प्रोफेसर आणि बुवा महाराज हे माझ्या ग्रंथाची कसोटी नसून श्रद्धावंत, भक्तीमार्गी व स्त्रोद्धारक जनताजनार्दन हाच माझी परीक्षा घेणारा व कसोटी पाहणारा देव आहे." असें श्री. कांदीकर सांगत आहेत. ज्ञानेश्वरीचा आशय त्यांनीं प्रस्तुत पुस्तकांत सुगम, सुबक व सुंदर रीतीनें आणला आहे असेंच सामान्य वाचकास वाटल्यावांचून राहणार नाहीं. संकल्पित बाकीचे आठ खंड असेच त्यांच्या हातून प्रसिद्ध होवोत असें आम्हीं इच्छितों. सध्याच्या युद्धपरिस्थितींत ह्या पुस्तकाचें विशेष महत्त्व आहे हें सांगावयास हवें असें नाहीं. त्याच्या प्रत्येक पानावर एक उद्बोधक वचन घालण्यांत आलें आहे तें मननीय आहे.

---

* "श्रीज्ञानेश्वरी कथामृत" (प्रथम खंड) लेखक: श्री. शंकर दिनकर कांदीकर. किं. ३ रु.

## जादा नफ्याचा भाग सरकार ठेव म्हणून घेणार

व्यवहारांत खेळणारें फाजील चलन परत खेचून घेऊन बाजारभावांच्या चढत्या कमानीस आळा घालण्याचे उद्देशानें हिंदुस्थानें सरकारनें एक आर्डिनन्स काढला आहे, त्या अन्वयें एक्सेस प्रॉफिट-जादा नफ्यापैकीं फक्त ६३% नफा कर भरणारास उपलब्ध होऊन बाकीची ९७३% नफा सरकारी तिजोरींत जाईल. करास पात्र असणाराचे हिशेब पुरे होताच, जादा नफ्याचे संबंधांतील अधिकारी त्यास भेटतील व दोघांच्या विचारानें होणारी जादा नफ्याची रक्कम वसूल केली जाईल. जादा नफ्याची आकारणी चुकीची असल्याचें मागाहून आढळून आल्यास आवश्यक तेवढी रक्कम कर भरणारास ५% व्याजासकट परत केली जाईल. सध्याचा एक्सेस प्रॉफिट टॅक्सचा दर ६६३% आहे व १३३% इनकमटॅक्स व सुपरटॅक्स आहे. म्हणजे, एकूण नफ्याचा ८०% नफा सरकार घेतें. नव्या ऑर्डिनन्सन्वयें उरलेल्या २०% पैकीं १३३% सरकार स्वतःकडे ठेव म्हणून ठेवून घेईल व उरलेली नफ्याची ६३% रक्कम डिव्हिडंडसाठी शिल्लक उरेल. सरकारनें ठेव म्हणून घेतलेल्या रकमेवर २% व्याज मिळेल व लढाई संपल्यावर १२ महिन्यांनीं अथवा ठेवीच्या तारखेपासून २४ महिन्यांनीं, जी तारीख मागाहून येईल त्या दिवशीं ठेव परत मिळूं शकेल. सरकार आपले स्वतःचें ६३% घालणार आहे, तेंहि ठेवीदारास मिळावयाचें आहेत. इनकमटॅक्सचा विचार करतांना कोणतें बोनस व कमिशन करमाफ असावें, ह्या प्रश्नाचा विचार करून सरकारनें त्यासंबंधांत नियम करण्याचा अधिकार सरकारनें स्वतःकडे घेतला आहे. बोनस दिलें, म्हणजे त्या प्रमाणांत सरकारचें कराचें उत्पन्न कमी होतें, ह्या दृष्टीनें त्यावर नियंत्रण बसविण्याचें सरकारनें ठरविलें आहे. कच्च्या मालाचा मोठा सांठा एकाद्यानें बाळगला व त्याची किंमत वाढली म्हणजे सहाजीकच त्यांत गुंतलेल्या रकमेची वाढ होते. कित्येक कारखानदार भरमसाठपणें मालाचे साठे करतात त्या कारणानें इतरांना मालाचा तुटवडा पडून बाजारभाव चढतात. इनकम टॅक्सच्या दृष्टीनें किती मालाचा साठा योग्य आहे हें ठरविण्याचा अधिकार सरकारास ऑर्डिनन्सनें दिला आहे. हिंदी संस्थानांस हे नवे कायदे लागू होण्यासंबंधींच्या प्रश्नाचा विचार चालू आहे. ज्या प्रमाणांत प्रस्तुत ऑर्डिनन्समुळें सरकारकडे पैसा परत येईल, त्या प्रमाणांत नवीन चलनांची वाढ मर्यादित होईल असें वरील ऑर्डिनन्सचें समर्थन हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेसमन, ह्यांनीं केलें आहे.


### पाहिजेत

सटाणा को. सी. स. अँड सेल सोसायटी लि. ता. बागलाण जि. नाशिक या संस्थेस हिशेबाची माहिती असलेले क्वालीफाईड इंग्रजी जाणणारे अकाउंटंट पाहिजेत. गरजूंनीं नांव, गांव, जात, वय, शिक्षण, लायकी, अनुभव, पगार काय घेणार वगैरे माहितीसह लवकर अर्ज पाठवावेत. कळावें.

डी. ए. पाटील
मॅनेजिंग डायरेक्टर


## नव्या कंपन्यांच्या स्थापनेवर नियंत्रण

हिंदुस्थान सरकारनें ९४ वा डिफेन्स ऑफ इंडिया नियम म्हणून नव्या कंपन्यांचे स्थापनेवर एक बंधन जाहीर केलें आहे. मध्यवर्ती सरकारचे पूर्वसंमतीशिवाय, भांडवल उभारण्यास जाहीर रीतीनें शेअर्स विकण्याची योजना करण्यास रोख्याची रक्कम देण्याची मुदत भरत आली असल्यास ती वाढविण्यास ह्या नियमानें बंदी केली आहे. लिमिटेड कंपनीनें सरकारच्या पूर्वसंमतीशिवाय शेअर विक्रीस काढण्यासहि बंदी करण्यांत आली आहे. प्रॉस्पेक्टस प्रसिद्ध करतेवेळीं, रोख्यांच्या विक्रीस सरकारची संमति मिळाली असल्याचा त्यांत उल्लेख केला पाहिजे. नव्या भांडवल उभारणीस मंजुरी देतेवेळीं सरकार रिझर्व्ह बँकेचा सल्ला घेईल. युद्धानंतरच्या काळांत ज्या कंपन्या टिकण्याचा संभव नाहीं, अशा कंपन्या अस्तित्वांत येणेंच अशक्य करून पैसे गुंतविणारांचें हितसंरक्षण करणें हा प्रस्तुत नियमाचा उद्देश असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. भरभक्कम पायावर निघणाऱ्या औद्योगिक कंपन्यांच्या स्थापनेस ह्या नव्या नियमानें आडकाठी येणार नाहीं, परंतु बँका, इनव्हेस्टमेंट कंपन्या व विमा कंपन्या ह्यांच्या भरमसाट वाढीस मात्र त्यानें चांगलाच पायबंद बसणार आहे. बँकांच्या भागांचें वर्गीकरणाबद्दलचा रिझर्व्ह बँकेचा अभिप्राय व त्यासंबंधांत करावयाच्या कायद्याचा आराखडा ह्यांची प्रत्यक्ष कायद्याचे स्वरूपांत अंमलबजावणी होऊं लागेपर्यंत नव्या कंपन्यांच्या स्थापनेस थोपवून धरण्याचें काम प्रस्तुत नियम निःसंशय करील.


*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

### THE FARMER
### HIS WELFARE & WEALTH

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR
SIR T. VIJAYARAGHAVACHARYA,
K. B. E.

**Price Rs. 10 nett**

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT**
**Sir Vithaldas Thackersey Memorial Building**
**9 Bakehouse Lane, Fort, Bombay.**

## " अधिक धान्य पिकवा " मोहीम

### ता. डेव्ह. ॲग्रि. को-ऑप. असोसिएशन लि. जळगांवचें कार्य

ता. १०।५।४३ रोजीं असोसिएशनच्या मॅनेजिंग कमिटीची व इतर खात्यांतील अधिकाऱ्यांची मिटींग भरून तींत ता. १५।५।४३ ते ता. ३१।५।४३ अखेरपर्यंत " अधिक धान्य पिकवा " असा प्रचार करण्यासाठीं दुसरा पंधरवडा पाळण्याचें ठरलें.

खालील धोरणास अनुसरून प्रचार करण्यांत येत आहे.—

( १ ) शाळेंतील मुलांची गांवांतून फेरी काढून " खाद्य धान्याचीं पिकें पेरा " अशी गर्जना करावयास लावावी, यास अनुसरून गाणीं म्हणावयास सांगावीं.

( २ ) गांवांतील शेतकरी गांवाचे प्रमुख ठिकाणीं बोलावून सभा भरवावी.

( ३ ) पोस्टरची माहिती द्यावी.

( ४ ) अधिक धान्य पिकविण्याचें महत्त्व भाषणाद्वारें व पोवाड्याद्वारें शेतकऱ्यांचे मनावर ठसवावें.

( ५ ) सभेंत पुढीलप्रमाणें कामें करावींत.

( अ ) मागील ग्रो मोअर फूड सप्ताहांत नेमलेल्या गांव कमिटीचे सभासदांना यंदा जास्तींत जास्त धान्य पेरलें जाईल अशी खटपट करण्याचें सांगावें. ( गांव कमिटीच्या सभासदांचीं नांवें पाटील तलाठी यांचेकडे मिळतील. )

( ब ) गांवास पुरेल इतकें व इतरांकरितां अधिक २० टक्के जास्त इतकें धान्य पेरण्याबद्दल सांगावें.

( क ) जमिनी पडीत ठेवूं नयेत. पडीत जमिनी खाद्य धान्य पेरण्यासाठी लागवडीस आणण्यास सांगावें.

( ड ) कपाशी पेरण्याचे बाबतींत जें शुद्ध बीं पेरावयाचें तें जरीला सरकारचेंच असावें व तें शेतकी खात्याकडून व जळगांव तालुका शेतकी सभेकडूनच घ्यावें. १॥ मण ५ शेर भरतीच्या एका पोत्याचा भाव रु. ८-१२-० आहे. आखूड धाग्याचा कापूस पेरूं नये.

( ई ) भुइमूग, कापूस, धणा यांना जरी किंमती जास्त मिळत असल्या तरी त्या कांहीं खाण्याच्या वस्तू नाहींत जगावयाचें असेल तर खाद्य धान्याचीं पिकें म्हणजे ज्वारी, बाजरी, उडीद, मूग, तूर, चवळी, मठ, दादर, गहूं, हरभरे पेरणें अधिक जरूरीचें आहे हें पटवावें.

( फ ) शेतकी खात्यानें शोधून काढलेलें सुधारलेलें बीं शक्य त्या गरीब शेतकऱ्यांना मूळ किंमतीच्या एक-तृतीयांश इतकी कमी किंमत घेऊन जळगांव तालुका शेतकी सभेमार्फत पुरविण्यांत येईल. (कन्सेशनच्या दरानें देण्यांत येईल.

( ग ) सुधारलेल्या खाद्य धान्याचें बीं घेण्यास व धान्य पेरण्याकरितां जमीन तयार करण्यास सरकार बिनव्याजी तगाई कर्ज देईल.

( च ) जो शेतकरी युद्ध संपेपर्यंत धान्यच पेरण्यास तयार असेल त्यांना विहिरी खोदणेसाठीं व जमिनीची सुधारणा करण्यासाठी सरकारकडून तगाई कर्जे दिलीं जातील.

रेल्वेनें धान्याच्या वाहतुकीस सरकारकडून अग्रतेचा हक्क दिला जाईल.

खाद्य धान्य पेरण्याच्या अटीवर सरकारी पडीत जमिनी ३ वर्षे करारानें बिन खंडानें देण्यांत येतील व अशा जमिनींची मशागत व सुधारणा करण्यासाठी तगाई कर्जे बिनव्याजी सरकार देईल.

वरील कन्सेशन्स समजून द्यावींत.

सदर प्रचाराकरितां २ पोवाडे म्हणविणाऱ्या इसमांची नेमणूक केलेली आहे.

वरीलप्रमाणें सर्व कामें झाल्यावर सभेंत गेल्या वर्षापेक्षां यंदा किती धान्य पेरा अधिक होईल हें शेतकऱ्यांना विचारून अंदाज इकडे कळवावे. आपल्या भागाची प्रचाराची माहिती एकत्रित करून नमुन्याच्या तक्त्याप्रमाणें तक्त्यांत ता. १०-६-४३ चे आंत इकडे पुरवावी. एक प्रत मे. मामलेदारसाहेब तालुके जळगांव यांजकडे पाठवावी. सर्व तालुक्याची माहिती एकत्रित करून मे. डायरेक्टर ऑफ ॲग्रि. बी. पी. पुणें; व मे. कलेक्टर साहेब पू. खा. जळगांव यांना पुरवावयाची आहे.

ऑनररी ऑफिसर्सना जाण्यायेण्याकरितां लागणारा प्रत्यक्ष खर्च मिळणार आहे.

---

## प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, मुंबई.

### जमीन गहाण बँकांच्या नोकरांकरितां शिक्षणवर्ग

प्रॉ. को. इन्स्टिट्यूटनें जमीन गहाण बँकांच्या नोकरवर्गाकरितां शिक्षणाचे वर्ग काढण्याचे ठरविलें असून सदर वर्ग मुंबई येथें येत्या जुलैच्या अखेरच्या आठवड्यांत दहा ते बारा दिवसपर्यंत भरविण्यांत येतील वर्गांत फक्त इंग्रजींतूनच व्याख्यानें देण्यांत येणार असल्यानें वर्गांत दाखल होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांचें शिक्षण निदान मॅट्रिकपर्यंत तरी झालेलें असावें. प्रत्येक विद्यार्थ्यास शिक्षण फी रु. ५ आकारली जाईल. वर्ग सुरू होण्याची नक्की तारीख व अभ्यासक्रम वगैरे माहिती योग्य वेळीं ज्या बँकांचे विद्यार्थी वर्गांत दाखल होणार असतील त्या त्या बँकांना कळविण्यांत येईल. तरी ज्या बँकांना आपले उमेदवार शिक्षणाकरतां पाठवावयाचे असतील त्यांनीं विद्यार्थ्यांचें संपूर्ण नांव, शिक्षण कोठपर्यंत झालें व ऑफिसमधील त्याचा हुद्दा इतकी माहिती इन्स्टिट्यूटच्या ऑफिसकडे ता. १५ जून १९४३ चे आंत कळवावी.

मुंबई
ता. १५ मे, १९४३

व्ही. एल. मेथा,
ऑनररी सेक्रेटरी

---

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ | पुणें, बुधवार, तारीख २ जून १९४३ | अंक २२

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ इंडिया लि.
[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.
मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.
इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).
लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.
डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. ( अध्यक्ष ), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. भाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.
करंट डिपॉझिट अकाउंट्स :
दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.
विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.
बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.
एजंटः—टी. आर. लालवाणी.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४ | महिंद्रकर ब्रदर्स तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

शेअर्स:–प्रत्येकी पांच रुपये वाढीनें विकले जातात. वाढीची रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर


# विविध माहिती

### पनवेलचा पाणीपुरवठा

पनवेल येथील म्युनिसिपॅलिटीनें गांवास पाणी पुरवठ्याची २ लक्ष ८० हजार रुपयांची योजना आंखली आहे, ती पुरी झाल्यावर १५ हजार वस्तीस दर माणशीं दररोज २५ गॅलन पाणी मिळूं शकेल. सध्यां दररोज फक्त ७ गॅलन पाणी मिळूं शकतें.

### अमेरिकन सैनिकाचा विमा

युरोपियन युद्धक्षेत्रांतील प्रत्येक अमेरिकन सैनिकाचा ९ ऑगस्ट पूर्वी १० हजार पौंडांचा विमा उतरविण्यांत येईल. त्यांची वैद्यकीय तपासणी केली जाणार नाहीं. इस्पितळांतील आजारी सैनिकांचाहि विमा उतरला जाईल. पगारांतून हप्ता कापण्यांत येईल. सैनिकाला कोठेंहि पाठविण्यांत आलें तरी पॉलिसी चालू राहील.

### काश्मीर संस्थानांत बंदी

काश्मीर संस्थानांत युरोपियन व अमेरिकन लोकांना परवानगीशिवाय येण्यास व राहण्यास बंदी करण्यांत आली आहे.

### मि. एडसेल फोर्ड

सुप्रसिद्ध मोटार कारखानदार मि. हेन्री फोर्ड ह्यांचा एकुलता एक मुलगा, मि. एडसेल फोर्ड हा गेल्या आठवड्यांत मरण पावला. मि. एडसेल हे फोर्ड मोटार कंपनीचे अध्यक्ष होते.

### साखरेचें रेशनिंग

मुंबई सरकार मुंबई शहरांत साखरेचें रेशनिंग करणार आहे, असें समजतें. दरमाणशीं दरमहा १½ शेर साखर वाटण्यांत येईल.

### म्हैसूर सरकारचें अंदाजपत्रक

म्हैसूर सरकारच्या १९४३–४४ च्या अंदाजपत्रकांत ६ कोटि ८ लक्ष रु. उत्पन्न व ५ कोटि ९७ लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे.

### ४००० पंखे

लष्करी इस्पितळांकरितां २ हजार विजेचे पंखे कलकत्ता विभागांतून सक्तीनें गोळा करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें एका अधिकाऱ्यास दिला आहे.

### कामाचे तास

ग्रेट–ब्रिटनमध्यें सोळा ते सतरा वर्षांच्या दरम्यानच्या वयाच्या कामगारांचे आठवड्यांतील कामाचे कमाल तास ४८ करण्यांत येणार आहेत.

### केमिकल लॅबोरेटरी

बोर्ड ऑफ सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रिअल रिसर्चच्या विद्यमानें पुणें येथें एक नॅशनल केमिकल लॅबोरेटरी स्थापन होणार आहे, तिच्या इमारतीसाठी व सामानासाठी टाटांनीं ८,३०,००० रुपये दिले आहेत.

### महापुरामुळें नुकसान

इलिनॉइस ( अमेरिका ) येथील महापुरामुळें १० लक्ष एकर शेतजमीन पाण्याखालीं गेली व त्यामुळें ३ लक्ष एकरांतील गहू व इतर पिकें नाश पावलीं.

### दारूबंदी उठणार

बिहार प्रांतांत कॉंग्रेस सरकारनें कांहीं जिल्ह्यांत दारूबंदी केली होती. ही बंदी १ आक्टोबरपासून उठविण्यांत येणार आहे. चोरून दारू गाळण्याचें प्रमाण वाढत आहे, म्हणून ही बंदी उठविण्यांत येत आहे व त्यामुळें सरकारचें उत्पन्न सुमारें २० लक्ष रुपयांनीं वाढेल.

### नटीचा युद्धप्रचार

"दि गॉट मॅरीड" ह्या चित्रपटाचें शूटिंग चालू असतांना, त्यांतील प्रमुख नटी डोरोथी लामूर हिला तिच्या सेक्रेटरीनें कळविलें, कीं चहात्यांशीं पत्रव्यवहारास लागणारे तिचे नोटपेपर पार संपून गेले आहेत. डोरोथीनें १० हजार नोटपेपर व पाकिटें छापण्याचा हुकूम दिला व त्यांवरील नेहेमींच्या मजकुराबरोबर तांबड्या व निळ्या शाईनें " अमेरिकेचे ( अंकल सॅमचे ) चहाते व्हा; युद्धकर्जरोखे विकत घ्या " असा मजकूर छापण्यास सांगितलें. छापखानेवाल्यांनीं आपल्या गिऱ्हाइकांस डोरोथी लामूरचें उदाहरण दाखवून द्यावें व युद्धप्रयत्नांस सहाय करावें असें " दि इनलंड प्रिंटर"नें सुचविलें आहे.

### रंगीत जाहिराती

गेल्या वर्षी अमेरिकेंतील मासिकांत एकूण ४७,७५५ पृष्ठें जाहिराती छापण्यांत आल्या, त्यांपैकीं १४,४६७ पृष्ठांतील जाहिराती रंगीत होत्या व ३२,२८८ पृष्ठांतील जाहिराती काळ्या शाईत होत्या. म्हणजे, प्रत्येक तीन पानांतील एक पान रंगीत जाहिरातींचें होतें. साप्ताहिकांत रंगीत जाहिरातींचें एकूण जाहिरातींशीं प्रमाण सुमारें ४०% पडलें. एकूण २०,७२१ पृष्ठें जाहिरातींपैकीं ७,८०८ पृष्ठें रंगीत जाहिरातींचीं होतीं.

### कागदाची बचत

पोस्टाचीं तिकिटें छापतांना त्याच्या कडांतून निघणारे सूक्ष्म कागदाचे तुकडे इंग्लंडमध्यें जमा करण्यांत येतात. हें काम ऑटोमॅटिक यंत्रें करितात. दरसाल ७ अब्ज तिकिटें छापण्यांत येतात; तेव्हां जमा होणारे तुकडे गोळा केल्यास बरीच काटकसर होऊं शकते. सुमारें १० टन तुकडे अशा रीतीनें नुकतेच रांधा बनविण्यासाठी पाठविण्यांत आले.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १७० | ७ स्फुट विचार... ... | १७३ |
| २ रेशनिंगसंबंधीं इंग्लंडमधील अनुभव ... | १७१ | रूझवेल्ट-चर्चिल वाटाघाटी—हिंदुस्थानचें आर्थिक युद्धसहाय—स्टालिनचें नवें आर्थिक धोरण—ब्रिटिश मजूर पक्ष आणि कम्युनिस्ट. | |
| ३ बँकिंगसंबंधीं प्रश्नोत्तर | १७२ | | |
| ४ सटाणा सहकारी वृत्त | १७२ | | |
| ५ हिंदुस्थानांत तंबाखूची लागवड | १७२ | | |
| ६ श्री. आपटे ह्यांचें कार्य | १७२ | ८ आर्थिक समालोचन | १७४ |



# अर्थ

बुधवार, ता. २ जून, १९४३


## रेशनिंगसंबंधीं इंग्लंडमधील अनुभव

इंग्लंडमध्यें रेशनिंगला प्रारंभ होऊन बराच काळ लोटला आहे त्यामुळें तेथील रेशनिंगसंबंधीचे अनुभव आपणांस येथें उपयुक्त व उद्बोधक वाटण्याजोगे आहेत. रेशनिंग यशस्वी व्हावयाचें असेल तर ज्या जिनसा वाटप पद्धतीखालीं येणार त्यांबद्दल लोकांना पूर्वसूचना मिळतां कामा नये, हा इंग्लंडमधील रेशनिंगच्या उपक्रमाचा पहिला धडा आहे असें एक प्रमुख अमेरिकन साप्ताहिक ह्या विषयावर लिहितांना म्हणतें. पहिल्या पहिल्यांदा, अमूक जिनसाचें ह्यापुढें रेशनिंग होणार, अशी लोकांना समज दिली जाई परंतु अनुभवानंतर पूर्ण गुप्तता राखणेंच योग्य असल्याचें दिसून आलें. रविवार ता. १ जून १९४१ रोजीं इंग्लंडमध्यें कपड्यांच्या रेशनिंगची मि. ऑलिव्हर लिटिलटन, उत्पादनखात्याचे मंत्रि, ह्यांनीं घोषणा केली, त्यापूर्वी त्याचा कोणासहि सुगावा लागला नव्हता. “सोमवारी मी दोन कपडे खरेदी करणार होते, परंतु मि. ऑलिव्हर ह्यांची रविवारची घोषणा एकदम मधें आडवी आली.” असें उद्गार मिसेस लिटिलटन ह्यांनीं काढले! प्रत्यक्ष मंत्र्याचे पत्नीसही रेशनिंगचा सुगावा लागला नव्हता. रेशनिंगची आगाऊ सूचना न देण्याची इंग्लंडमध्यें पद्धति आहे; अमेरिकेंत नव्या जिनसांच्या रेशनिंगची घोषणा रविवारीं—ज्या दिवशीं दुकानें बंद असतात, त्या दिवशीं—करतात. मूल जन्माला आलें कीं इंग्लंडमध्यें त्याचेवर रेशनिंग बुकाचा अंमल सुरू होतो. इंग्लंडमध्यें प्रत्येक माणसास दर आठवड्यास ५ तोळे चहा व २० तोळे साखर मिळते. महिन्याकाठी १ अंडें घेण्यास परवानगी आहे. एक अमेरिकन चित्रपट इंग्लंडमध्यें दाखविण्यांत आला त्यांत अंड्यांचें पक्वान्न करीत असल्याचा देखावा होता. तो पाहतांच थिएटरमधील प्रेक्षकांचे तोंडास पाणी सुटलें! युद्धापूर्वी, ग्रेटब्रिटनमध्यें त्यास लागणाऱ्या अन्नाच्या २०% अन्नाचें उत्पादन होत आहे. उत्पादनाच्या वाढीबरोबर त्याची योग्य वाटणीहि महत्त्वाची आहे. ह्या दृष्टीनें लिव्हरपूल येथील एका प्रसिद्ध स्टोअरच्या यशस्वी मॅनेजरची अन्न खात्याचा मंत्रि म्हणून नेमणूक करण्यांत आली, ती अत्यंत योग्य ठरली आहे. युद्धाच्या प्रारंभीच्या काळांत सरकारनें लोकांना अन्नाचा अल्पशा प्रमाणावर साठा करण्यास प्रोत्साहन दिलें, परंतु रेशनिंगला प्रारंभ झाल्यावर ह्या साठेवाल्यांवर खटले भरण्यांत आले नाहींत किंवा त्यांस साठा कळविण्यासहि सांगण्यांत आलें नाहीं. तथापि मोठ्या प्रमाणावर साठा करणारांस कडक शासन केलें जातें. इंग्लंडमधील स्वयंपाक विशेष उच्च दर्जाचा असतो अशी त्याची ख्याति नाहीं. परंतु रेशनिंगला प्रारंभ झाल्यापासून त्यांत पुष्कळच सुधारणा झाली आहे. मिळेल त्या जिनसांचें उत्कृष्ट खाद्य तयार करण्याची कला आतां वाढली आहे. स्वयंपाकाच्या पुस्तकांचा खप कादंबऱ्यांच्या खपाचे बरोबरी इतका झाला आहे. अन्न खात्यानें बटाट्यापासून तयार करावयाच्या १९९ पदार्थांची माहिती प्रसिद्ध केली आहे. हे सर्व पदार्थ वेगवेगळ्या नांवांनीं ओळखले गेले, तरी आंतला बटाटा आपलें अस्तित्व दाखवीतच असतो! ह्याचा अर्थ इतकाच, कीं लोकांच्या स्वदेशाभिमानामुळेंच रेशनिंगची शिस्त त्यास सुसह्य झाली आहे. कोळशाचें रेशनिंगहि त्यामुळेंच इतकें यशस्वी झालें आहे. रात्रीं दिव्याचा प्रकाश बाहेर दिसला तर घर मालकावर ब्लॅक आउट नियंत्रणाचा भंग केल्याबद्दल खटला होऊन शिवाय सर्पण वाया घालविल्याबद्दलहि जाब द्यावा लागतो. पेट्रोलचें रेशनिंग अस्तित्वांतच नाहीं. कारण खासगी वापरासाठी लोकांना पेट्रोल जवळ जवळ अजिबातच मिळत नाहीं. कपड्यांच्या रेशनिंगमुळें गरीब-श्रीमंत भेद कमी झाला आहे. कपडे उलटणें, दुरुस्त करणें, इत्यादिसंबंधीं वर्तमानपत्रांतून सूचना प्रसिद्ध होतात. त्यांचा अवलंब फार मोठ्या प्रमाणावर केला जातो. कित्येक ठिकाणीं स्त्रियांचे क्लब स्थापन करण्यांत आले आहेत, तेथें कपडे शिवणें, दुरुस्त करणं रफू करणें इत्यादि गोष्टी केल्या जातात. असे सुमारें २ हजार क्लब आहेत. कपड्यांचा ऐनजिनसी विनिमय मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. ज्याच्या जवळ तीन सद्रे आहेत पण बूट नाहींत तो ज्याच्याजवळ जादा बूट आहेत पण सद्रे नाहींत, अशाकडून सद्र्याच्या मोबदल्यांत बूट मिळवूं शकतो. ज्यावेळीं कपड्याच्या रेशनिंगला प्रारंभ झाला, त्यावेळीं युद्धपरिस्थिति अतिशय गंभीर होती व युद्धास मदत करण्यासाठी लोकांनीं गोणपाटेंहि वापरलीं असतीं. रेशनिंगच्या पहिल्याच वर्षी ४ लक्ष स्त्री—पुरुष कामगारांनीं कपड्यांच्या कारखान्यांतून दारूगोळ्याच्या कारखान्यांत प्रवेश केला. लंडनमधील सुप्रसिद्ध ऑक्सफर्ड स्ट्रीटमध्यें लोक खाकेंतून उघडे जिन्नस नेतांना दिसतात. मासेहि उघडेच नेण्यांत येतात. ठराविक पद्धतीचे, समाधानकारक दर्जाचे व नियंत्रित किंमतीचे अधिकाधिक जिन्नस लोकांस उपलब्ध करून देण्याचें तेथील सरकारचें धोरण आहे.

### अमेरिकेचें युद्धसहाय्य

खंड—उसनवार पद्धतीनें अमेरिकेनें इतर देशांना ३१ मार्च १९४३ अखेर एकूण ११ अब्ज, १० ¾ कोटि डॉलर्सची मदत केली. ग्रेट ब्रिटनला ३ अब्जांचा माल मिळाला व रशियाकडे १ ¾ अब्जांचा माल गेला. रशियाकडे गेलेल्या मालांत प्रत्यक्ष युद्धसाहित्यच मोठ्या प्रमाणावर होतें. चीन, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया व न्यूझिलंड ह्या सर्वांचा मिळून वाटा ७३ ¾ कोटि डॉलर्सचा झाला. रशियाला ह्यापुढें अन्नसामुग्री वाढत्या प्रमाणांत पाठविण्यांत येणार आहे.

## इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची परीक्षा, १९४३

### प्रॅक्टिस ॲन्ड लॉ ऑफ बँकिंग, भाग १ ला

प्रश्न:—बँकेमध्यें एका खातेदाराची कांहीं रक्कम त्याच्या खात्यांत शिल्लक आहे. पुढें त्यास अफरातफर केल्याचे आरोपावरून अटक करण्यांत आली. मध्यंतरी रिमांड व ट्रायलच्या काळांत फिर्यादीच्या सॉलिसिटरनें बँकेस अशी नोटीस दिली कीं आरोपीनें सोडलेल्या त्याच्या खात्यावरील चेकची रक्कम बँकेनें देऊं नये, कारण त्या खात्यांतील असलेली रक्कम अफरातफरीची आहे. त्याचप्रमाणें आरोपीनें तुरुंगांत जाण्याचे अगोदर त्याचे खात्यांत शिल्लक असलेल्या रकमेचा 'बेअरर' चेक सोडला आहे. अशा परिस्थितींत त्या चेकचें 'पेमेंट' सदर खटल्याचा निकाल लागेपर्यंत बँकरला तहकूब ठेवतां येईल काय ?

उत्तर:—जोंपर्यंत खातेदाराच्या खात्यामध्यें त्याची शिल्लक आहे तोंपर्यंत त्यानें सोडलेले चेक बँकेनें स्वीकारले पाहिजेत. खातेदारानें सोडलेल्या चेकचें 'पेमेंट' करूं नये असें खातेदारानें जर बँकेला लेखी कळविलें असेल तर त्या चेकचे पैसे देतां येणार नाहींत. तसेंच त्यानें ज्या तारखेस तो चेक सोडला तत्पूर्वी तो खातेदार मृत्यू पावला असेल अगर त्यानें स्वतःचें दिवाळें काढलें असेल अगर त्यास वेड लागलें असेल तर त्या चेकचें 'पेमेंट' करतां येणार नाहीं. शिवाय त्या खात्यावरील व्यवहार बंद करण्याविषयीं जर कोर्टाकडून अगर इतर कायदेशीर हुकूम बँकेला आला असेल तर त्या खात्यावरील व्यवहार बँकेनें बंद केले पाहिजेत.

सदर बाबतींत सॉलिसिटरनें बँकेला नोटीस दिली आहे व केस चालू असतांना कोर्टांत अगर कोर्टाबाहेर अशा तऱ्हेच्या तात्पुरत्या गोष्टी करणेचा अधिकार सॉलिसिटरला आहे. खटल्याचा निर्णय लागेपर्यंत सदरहू पैशाची विल्हेवाट आरोपीस लावतां येऊं नये व तशा तऱ्हेची विल्हेवाट लावून आरोपीला फिर्यादीची नुकसानी करतां येऊं नये या उद्देशानें सॉलिसिटरनें बँकेला नोटीस दिली आहे व ती कायदेशीर आहे. निकाल कोणाहीतर्फे जरी लागला तरी अशा परिस्थितींत परत पाठवलेल्या चेकची जबाबदारी बँकेवर नाहीं.

म्हणून बँकेनें सदर खटल्याचा निकाल लागेपर्यंत त्या खात्यावरील चेकचें 'पेमेंट' तहकूब ठेवण्यास हरकत नाहीं.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

---

### सटाणा सहकारी वृत्त

ता. १।५।४३ रोजीं सटाणा ता. को. सु. युनिअनच्या कचेरींत सर्व सामील सोसायट्यांची महंत चरणशरण बाबा यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. तींत श्री दगा अजबा पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर, सटाणा को. सी. स. अँड सेल सो. लि. यांनीं सदर सोसायटीचा इतिहास, केलेली प्रगति व करावयाचीं कामें यासंबंधीं थोडक्यांत माहिती दिली. शेवटीं सदर सोसायटीचें शेअर्स भांडवल व क्षेत्र वाढविणें, सर्व क्रेडिट सोसायट्यांचे मेंबरांनीं माल सदर सोसायटीमार्फतच विक्री करणें व साळअसेरच्या नफ्यांतून धर्मादाय फंड काढून त्यांतून सदर सोसायटीच्या इमारत फंडास मदत देणेचें एकमतानें ठरलें.

### हिंदुस्थानांत तंबाखूची लागवड

पोर्तुगीज लोकांनीं, सुमारें ४०० वर्षांपूर्वी, हिंदुस्थानांत तंबाखूच्या लागवडीस प्रारंभ केला. कपास, ताग, चहा, लोकर इत्यादींच्या खालोखाल तंबाखूचा अनुक्रम हिंदुस्थानांत अकरावा येत असला, तरी तंबाखूच्या लागवडीच्या बाबतींत अमेरिका व चीन ह्यांचेबरोबर पहिल्या तीन देशांत हिंदुस्थानचें स्थान आहे. वेगवेगळे मोसम व वजन करण्याचे भिन्नभिन्न प्रकार ह्यामुळें ह्या तीन देशांतील तंबाखूच्या पिकांची तुलना करणें कठीण आहे. हिंदुस्थानांत बंगाल, मद्रास, मुंबई, बिहार, संयुक्तप्रांत व पंजाब ह्या प्रांतांत लागवड मोठ्या प्रमाणावर होते. हिंदी उत्पादन अत्यंत प्रचंड असलें, तरी परराष्ट्रीय व्यापारांत हिंदी तंबाखूचा प्रवेश झालेला नाहीं. सिगारेटसच्या उत्पादनासाठी हिंदी तंबाखूंत अमेरिकन तंबाखू मिसळावा लागतो व त्यासाठी अमेरिकेंतून हिंदुस्थानांत तंबाखूची मोठ्या प्रमाणावर आयात होत असे. सिगारेटस मात्र मुख्यतः इंग्लंडहून येत असत. अमेरिकन सैनिकांस चांगल्या दर्जाची सिगारेट लागते, त्याकरितां अमेरिकन तंबाखू आणवून व त्यांत उत्कृष्ट हिंदी तंबाखूचें मिश्रण करून सिगारेटस बनविण्याची योजना केलेली आहे. १९३७ सालीं हिंदुस्थानांत सिगारेटसचे ३० कारखाने होते व त्यांत १०,९८४ कामगार काम करीत होते. अमेरिकेचे तत्सम आकडे ८५२ कारखाने व ९२,१५८ कामगार, असे आहेत. कारखान्यांच्या उत्पादनाची सरासरी अमेरिकेच्या मानानें हिंदुस्थानांत अगदींच कमी असलेली आढळते. हिंदुस्थानांत विड्यांचें रोजचें उत्पादन ४ कोटि विड्या इतकें आहे.

---

### इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रि. रिसर्चमध्यें श्री. आपटे ह्यांचें कार्य

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बॉडीवरील प्रतिनिधी, श्री. न. गं. आपटे, बी. एजी. एम्. एससी., एफ. जी. एम. एस. ह्यांनीं गव्हर्निंग बॉडीचे सभासद ह्या नात्यानें १९४१-४२ मध्यें केलेल्या कामाचा अहवाल फेडरेशनच्या अध्यक्षांस सादर केला आहे. गव्हर्निंग बॉडीचे सभासद झाल्यापासून त्यांनीं प्रायॉरिटी कमिटी, जनरल बॉडी व गव्हर्निंग बॉडी ह्यांच्या झालेल्या सर्व सभांस हजर राहून आपली कामगिरी बजाविली व त्यांत त्यांना त्यांच्या विशिष्ट ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा झाला. धान्याच्या उत्पादनाचे वाढींत शेतीचीं जनावरें, वाहतुकीचीं साधनें, खतें इत्यादींचें महत्त्व श्री. आपटे ह्यांनीं प्रतिपादन केलें. फेडरेशनच्या प्रतिनिधीनें कौन्सिलच्या कामकाजांत विशेष लक्ष घातल्याबद्दल कौन्सिलच्या अध्यक्षांनीं श्री. आपटे ह्यांचें आपल्या समारोपाच्या भाषणांत अभिनंदन केलें. सेंट्रल फूड ॲडव्हायसरी कौन्सिलच्या सभेंतील विषयांसंबंधीं श्री. आपटे ह्यांचे विचार फेडरेशनच्या अध्यक्षांनीं मुद्दाम मागविले होते, त्याचाहि तपशील श्री. आपटे ह्यांनीं आपल्या अहवालांत दिला आहे.

---

# स्फुट विचार

## रूझव्हेल्ट–चर्चिल वाटाघाटी

ट्युनिशियामधून शत्रुराष्ट्रांच्या सैन्याची पूर्ण हकालपट्टी झाली तीमध्यें जर्मनी व इटली ह्यांचें किती भयंकर नुकसान झालें आहे, ह्याची कल्पना कैद्यांची संख्या व हातीं आलेलें लढाऊ सामान ह्यांचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून येते. उत्तर आफ्रिका मित्र राष्ट्रांच्या हातीं येऊन शत्रूचा एकहि शिपाई तेथें उरलेला नाहीं असें झाल्यानें सिसिली, सार्डिनिया व इटली ह्यांवर वैमानिक हल्ला चढविणें व भूमध्य समुद्र सुरक्षित करणें हीं महत्त्वाचीं कार्ये आतां सुकर झालीं आहेत. ब्रिटिश विमानांचे धूमधडाक्याचे हल्ले जर्मनीच्या औद्योगिक क्षेत्रांवर अहर्निश चालले आहेत. त्याचे योगानें शत्रूची त्रेधा उडाली आहे आणि मित्र राष्ट्रांची आघाडी आतां कोठें चालू होते ह्याची जर्मनीस काळजी वाटूं लागली आहे. ह्याच सुमारास मि. चर्चिल ह्यांनीं अमेरिकेंत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्याशीं पुढील युद्धकार्यक्रमाविषयीं आपापल्या लष्करी तज्ज्ञांसमवेत चर्चा चालविली असल्यानें जर्मनी व इटली ह्यांचें मनःस्थैर्य अधिकच बिघडलें आहे. रूझव्हेल्ट–चर्चिल चर्चेत युद्धधोरणाचा साकल्यानें विचार झाला आहे. मित्रराष्ट्रांच्या वाढत्या लढाऊ सामर्थ्याचा अधिकांत अधिक परिणामकारक उपयोग कसा करावयाचा ह्याचा निर्णय अमेरिकेंतील वाटाघाटींवरून निघाला आहे. हिटलरचा अगोदर बींमोड झाला म्हणजे मित्रराष्ट्रांचें सामर्थ्य जपान विरुद्ध पूर्व आशियांत उपयोगांत आणावयाचें हें मि. चर्चिल ह्यांच्या धोरणाचें सूत्र होतें. तथापि, पश्चिमेकडे जोराचें युद्ध चालू असतांना जपानला मोकळें सोडावयाचें असा त्याचा अर्थ नाहीं हें आतां स्पष्ट झालें आहे. स्वतःच्या विरुद्ध भडकणाऱ्या असंतोषाच्या ज्वाला कशा विझवाव्या याचीच चिंता हिटलरला लागली असली पाहिजे आणि पॅसिफिक महासागरांत मित्रराष्ट्रांचें बळ वाढत आहे ह्याची जाणीव जपानला नाहीं असें नाहीं. चीनला शक्य ती मदत देण्याचें आश्वासन मि. चर्चिल ह्यांनीं दिलें आहे आणि रशिया आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांचेमध्यें वितुष्ट उत्पन्न करण्याचे जर्मनीचे प्रयत्न निष्फळ झाले आहेत. कॅसाब्लँका येथील चर्चेनंतर आफ्रिकेंतील मित्रराष्ट्रांची मोहीम यशस्वी झाली त्याप्रमाणेंच प्रस्तुत वाटाघाटींतून बाहेर पडणाऱ्या लढाऊ कार्यक्रमाचें दृश्यफळ लवकरच दिसूं लागेल असें मानण्यास हरकत नाहीं.

## हिंदुस्थानचें आर्थिक युद्धसहाय्य

आफ्रिकेंतील युद्धांत हिंदी पलटणींनीं गाजवलेल्या पराक्रमाची वाहवा, विशेषतः ट्युनिशियांतील विजयामुळें चोहोंकडे झाली आहे हें योग्यच आहे. वॉशिंग्टन येथें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल ह्यांचे दरम्यान झालेल्या चर्चेच्या बातम्या आल्या आहेत, त्यावरून ब्रह्मदेश पुन्हां जिंकून त्यामधून चीनला सहाय्य देण्यासाठीं हिंदुस्थान पुरवठ्याचें मध्यवर्ती शस्त्रागार केलें जाईल असा मित्र राष्ट्रांचा निश्चित बेत आहे, असें दिसतें. युद्ध चालू झाल्यापासून आफ्रिका व पश्चिम आशिया खंड ह्यांमधील रणक्षेत्रांसहि जरूरीच्या मालाचा पुरवठा हिंदुस्थाननें केला आहे. अशा तऱ्हेची सामुग्री ह्या भागांस पुरविणें इंग्लंड किंवा अमेरिका ह्या राष्ट्रांस विशिष्ट परिस्थितीमुळें शक्य नव्हतें. त्यांची जागा ऐनवेळीं हिंदुस्थाननें घेऊन मित्र राष्ट्रांस बहुमोल सहाय दिलें आहे ही या देशाची महत्त्वाची युद्ध कामगिरी लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन ह्या संस्थेनें सर रामस्वामी मुदलियार ह्यांचा सन्मान करण्याचे प्रसंगीं तिचे अध्यक्ष, सर फ्रॅन्सिस जोसेफ ह्यांनीं हिंदुस्थानची शेती, उद्योगधंदे व खनिज संपत्ति ह्यांचा उपयोग रशिया व मध्यपूर्व देश ह्यांस किती झाला आहे त्याचें वर्णन केलें तें उद्बोधक आहे. सदरहू कॉर्पोरेशनच्या व्यवहारास जून, १९४० मध्यें प्रारंभ झाला तेव्हांपासून हिंदुस्थान सरकारच्या मदतीनें हिंदुस्थानांतून पश्चिम एशिया व आफ्रिका ह्यांचेकडे माल पाठविण्यांत आला आहे. हिंदुस्थानचा गहूं इराणमध्यें गेला नसता तर त्या देशास उपासमारीचीच पाळी आली असती असें सर फ्रॅन्सिस ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. साखर, चहा, कापड व कच्चा माल इराणला पुरविण्यांत आला. सीरिया व पॅलेस्टाईन ह्या देशांचीहि गरज ह्याच रीतीनें भागविण्यांत आली. तुर्कस्थानला लोखंड, पोलाद, कापूस, सूत, तागाचें कापड व कातडीं हिंदुस्थानांतून मिळाली. रशिया युद्धांत पडल्याबरोबर त्या देशासहि विविध प्रकारची सामुग्री पुरविण्यांत आली. सर फ्रॅन्सिस ह्यांनीं ह्या तऱ्हेच्या दिलेल्या माहितीवरून हिंदुस्थान देश पूर्व रणांगणाच्या संबंधांत युद्धाच्या सामुग्रीचें आगर झालें आहे ह्या विधानाची सत्यता पटते. हिंदुस्थाननें नुसते सैनिकच मित्रराष्ट्रांस पुरविले नसून लढाऊ सामुग्रीचाहि भरपूर पुरवठा केला आहे, त्याबद्दल इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत मुक्तकंठानें प्रशंसा केली जात आहे ती उगीच नव्हे. ह्या देशाचें सहकार्य तसेंच भरीव आहे.

## स्टालिनचें नवीन आर्थिक धोरण

हिटलर आणि त्याचे हस्तक ह्यांच्या प्रचारांत रशियाच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या कामकरी वर्गाच्या हुकूमशाहीस महत्त्वाचें स्थान देण्यांत येत असे व आहे. स्टालिनचा उद्देश युरोपांतील सर्व देशांत राज्यक्रांत्या घडवून आणून तेथें मजुरांची हुकूमशाही स्थापन करणें हा असल्यानें ह्या दुर्धर आपत्तीपासून युरोपखंडाचें रक्षण करण्यासाठीं आपण प्रस्तुत युद्ध भयंकर स्वार्थत्याग करून लढवीत आहों असा बहाणा जर्मन प्रचारक करीत आले आहेत. खऱ्या राष्ट्रीय लोकशाहीचे आपण पुरस्कर्ते आहों आणि रशियाचा नायनाट झाला नाहीं तर सर्व युरोपखंड आणि सबंध जगहि बोल्शेव्हिकांच्या हातीं जाईल अशी ते भीति घालीत आले आहेत. रशियन कम्युनिस्ट राष्ट्रीयत्व, वंश, संस्कृति, परंपरा कांहीं ओळखीत नाहींत आणि त्यांस हा सबगोलंकार चोहोंकडे पसरवून आपली पाखंडी व क्रांतिकारक हुकूमशाही प्रस्थापित करावयाची आहे आणि ह्या संकटापासून जगास मुक्त करण्यासाठीं जर्मनीनें पुढाकार घेतला आहे असें ते भासवीत आहेत. असल्या प्रचाराचें मूळच आतां स्टालिननें उखडून टाकलें असून कम्युनिस्टांची आंतरराष्ट्रीय आदि संस्था कॉमिंटर्न ह्या नांवाची आहे ती बंद केल्याचें नुकतेंच जाहीर केलें आहे. रशिया विरुद्ध जर्मनीनें चालवलेल्या खोट्या प्रचाराचे त्यानें ह्या रीतीनें पायच तोडून टाकले आहेत आणि मित्रराष्ट्रांत वैमनस्य उत्पन्न करण्याच्या शत्रूच्या प्रयत्नांची नांगी तोडली आहे. स्टालिननें आपल्या नवीन घोषणेचीं दोन प्रमुख कारणें नमूद केलीं आहेत. रशिया इतर राष्ट्रांच्या अंतर्गत सामाजिक, आर्थिक व राजकीय

घटनेंत ढवळाढवळ करण्याच्या प्रयत्नांत आहे आणि त्या राष्ट्रांतले कम्युनिस्ट लोक रशियाकडून येणाऱ्या हुकुमांची अंमलबजावणी करीत आहेत या दोन आरोपांस आतां आधार राहिलेला नाहीं असें त्याचें म्हणणें आहे. रशियाच्या वर्चस्वासाठी असलेली आंतरराष्ट्रीय कॉमिंटर्नच नाहींशी झाली असल्यानें निरनिराळ्या देशांतील कम्युनिस्ट पक्षाचे लोक आपापल्या परिस्थितींत स्वतंत्रपणानें वागण्यास आतां मोकळे आहेत. रशियांत उद्योगधंदे, व्यापार, जमीन वगैरे मालमत्ता ह्यांची खासगी मालकी नष्ट करण्यांत आली आहे आणि सर्व आर्थिक, राजकीय व सामाजिक सत्ता मजूर व शेतकरी ह्या श्रमजीवी लोकांच्या संघटित संस्थांच्या व पुढाऱ्यांच्या हातीं एकवटलेली आहे. राष्ट्रीय, वांशिक व सांस्कृतिक मर्यादा झुगारून देऊन कामकऱ्यांची अशी घटना सबंध जगांत प्रस्थापित करण्याचा उद्देश असलेली आंतरराष्ट्रीय कॉमिंटर्न बंद झाल्यामुळें रशियाचा जर्मनीकडून दास्तव्यांत येणारा बागुलबुवा आतां नाहींसा झाला आहे आणि जर्मन प्रचारकांच्या हातांतलें रशियाविरोधी शस्त्र बोथट बनलें आहे.

---

## ब्रिटिश मजूरपक्ष आणि कम्यूनिस्ट

इंग्लंडमधील कामकरी वर्ग उत्कृष्टरीतीनें संघटित झालेला असून आर्थिक व राजकीय दृष्ट्या बलवान आहे. पार्लमेंटरी पद्धतीची राजव्यवस्था व लोकशाही पूर्णपणें त्यास संमत असून कॉमन्स सभेंत त्यानें निवडून दिलेल्या प्रतिनिधींची संख्या मोठी आहे. कांहीं वर्षांमागें मजूरपक्षाचें मंत्रिमंडळ प्रत्यक्ष राज्यसूत्रें चालवीत होतें, आणि मि. मॅक्डोनॉल्ड मुख्य प्रधान होते. मजूर पक्षापासून भिन्न असलेला व त्याच्याशीं तात्विक मतभेद असलेला कम्युनिस्टांचा पक्ष इंग्लंडमध्यें अस्तित्वांत आहे. तथापि, तो अत्यंत चिमकुला व अल्पबल असा गट आहे. मित्र राष्ट्रांच्या बाजूनें रशिया युद्धांत शिरल्यापासून ह्या गटानें ब्रिटिश मजूर पक्षाशीं लगट करण्याचा सारखा प्रयत्न चालवला आहे, परंतु मजूर पक्षानें ह्या कम्यूनिस्ट गटास दूर ठेवलें आहे आणि आपणांत सामील करून घेण्याच्या त्याच्या सूचना फेटाळून लावल्या आहेत. स्टालिननें आंतरराष्ट्रीय कॉमिंटर्न गुंडाळतांच आतां स्वतःस मजूर पक्ष जोडून घेईल असें ब्रिटिश कम्युनिस्टांस वाटलें असल्यास नवल नाहीं. परंतु मजूर पक्षाच्या कार्यकारी मंडळानें एक निवेदन प्रसिद्ध करून त्यांची पूर्ण निराशा केली आहे. त्यानें असें म्हटलें आहे कीं, कम्युनिस्टांनीं हुकूमशाहीचें तत्व सोडलेलें नाहीं आणि त्यांस पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही मान्य नाहीं. तसेंच, कम्यूनिस्टांनीं मजूर पक्षाच्या संघटनेंत ढवळाढवळ करण्याचा आणि तिच्या पुढाऱ्यांचें वजन कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचीं ध्येयें मजूर पक्षाच्या ध्येयाशीं जोपर्यंत जुळत नाहींत तोंपर्यंत त्यांस ह्या पक्षास थारा देणें घातुक आहे असें त्यांच्या कार्यकारी मंडळानें स्वच्छ म्हटलें आहे. त्यानें असेंहि सुचविलें आहे कीं, ब्रिटिश कम्युनिस्टांस त्यांची आंतरराष्ट्रीय संस्था नाहींशी झाल्यामुळें मोठा बदल झाला आहे असें वाटत असल्यास त्या संस्थेप्रमाणें आपला गटहि गुंडाळून टाकावा म्हणजे झालें. मजूर पक्ष ब्रिटिश मंत्रिमंडळांत सहभागी असल्यानें रशियाविषयींच्या त्याच्या सहकारी धोरणाचा प्रश्नच उद्भवत नाहीं. त्याचे प्रमुख पुढारी मि. एटली हे तर दुय्यम मुख्य प्रधान पदावर आहेत, एवढें येथें सांगितलें म्हणजे पुरें आहे. कम्युनिस्ट पक्षाचें ध्येय व कार्यपद्धति आणि मजूर पक्षाचें ध्येय व कार्यपद्धति ह्यांमध्यें मूलग्राही स्वरूपाची भिन्नता असल्यामुळें त्यांचा एकजीव होऊं शकत नाहीं किंवा सांधा जोडला जात नाहीं असा हा वांधा आहे. इंग्लंडमध्यें कम्युनिस्ट पक्ष इतका निर्जीव आहे कीं तो मजूर पक्षास जोडल्यानें कामकरी वर्गाचें संघटन अधिक बलवान न होतां त्यांत फुटीरपणास मात्र वाव मिळणार आहे असा या वर्गाचा विश्वास आहे. तेव्हां तो निराळा तरी रहावा किंवा नाहींसा केला जावा असें त्यांचें म्हणणें आहे.

---

## आर्थिक समालोचन

( प्रा. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवर झालेलें भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांचे कृपेनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. )

हिंदुस्थानच्या मध्यवर्ती असेंब्लीच्या नुकत्याच होऊन गेलेल्या अधिवेशनाच्या अखेरच्या दिवसांत सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं मुंबईच्या कापूसबाजारांत सट्टेवाल्यांनीं कापसाच्या किंमती भरमसाट रीतीनें चढवण्याच्या कारवाया चालवल्या होता, त्यांचा तीव्र शब्दांनीं निषेध केला होता. सामाजिक हितास आणि युद्धप्रयत्नास विघातक असणाऱ्या ह्या सट्टेबाजीस वेळींच आळा घातला नाहीं तर आपलें शक्तिसर्वस्व खर्च करून सरकार ती बंद पाडल्यावांचून राहणार नाहीं असेंहि विधान त्यांनीं केलें होतें. फडनवीसांनीं अशी कडक आणि धमकीवजा भाषा वापरली ह्याचें पुष्कळांस त्यावेळीं आश्चर्य वाटलें. त्यांनीं सट्टेवाल्यांच्या भरमसाटपणानें कापसाचे भाव चढविण्याच्या धोरणाचा निषेध केला त्याच्या मुळाशीं दुहेरी कारण होतें. एकतर कापसाच्या किंमती चढत गेल्यास गोरगरिबांसाठी स्वस्त कापडपुरवठ्याची सरकारची योजना विफल झाल्याशिवाय राहिली नसती आणि दुसरें चढत्या भावाच्या मोहानें शेतकऱ्यास अधिक कपास पेरण्यास अनिष्ट उत्तेजन मिळून धान्याच्या पिकाचा विस्तार करण्याची देशभर जी योजना हातीं घेण्यांत आली तिच्या मार्गांत निष्कारण व्यत्यय आला असता. सरकारच्या वतीनें हें स्पष्ट करण्यांत आलें होतें कीं, शेतकऱ्यांस त्यांच्या मालाच्या अधिक किंमती आल्यास त्यांच्या मार्गांत येण्याचा सरकारचा उद्देश नव्हता. परंतु सट्टेबाजीमुळें चढणारे बाजारभाव शेतकऱ्यांच्या पदरांत पडतातच असें नसून त्यांच्या योगानें सुताच्या व कापडाच्या पुरवठ्यांत व किंमतींत मात्र गोंधळ माजून देशाची आर्थिक घडी विस्कटून जाते. युद्धकालीन परिस्थितींत सरकारी धोरण नियंत्रणात्मक असावें लागतें आणि मामुली सट्टेबाजीचे व्यवहार त्याच्याशीं विसंगत असतात.

### कपास बाजारांतील सट्टेबाजीवर उपाययोजना

कापूसबाजारांतील सट्टेबाजीविरुद्ध फडनवीसांनीं केलेल्या याजेनस अनुसरून हिंदुस्थान सरकारनें कापसाच्या नव्या पिकाचे बाबतींत वायद्याचे व तेजी मंदीचे व्यवहार ह्यांस बंदी केली आहे. ह्या हुकुमामुळें कापूस बाजारांत खळबळ उडून गेली असल्यास त्यांत नवल नाहीं. ह्या प्रश्नांत कपास पिकवणारे शेतकरी, कापूस वापरणारे गिरणीवाले, व्यापारी व दलाल आणि सट्टेवाले ह्यांचे हितसंबंध गुंतले असून सबंध देश व यशस्वी युद्धप्रयत्न ह्यांचे दृष्टीनें सरकारास त्याचा निकाल लावावयाचा असल्यानें प्रस्तुत विषयाची अधिक छाननी करून तीमध्यें येणाऱ्या मुद्यांचा परामर्श घेणें आवश्यक आहे. कापूसबाजारांत व्यवहार करणारां-

पैकीं कांहीं जणांचें असें म्हणणें आहे कीं, इतर मालाच्या मानानें कापसाचा भाव चढलेला नसून त्यास वास्तविक रीतीनें आणखी अधिक चढण्यास वाव मिळाला पाहिजे. शिवाय कापड व सूत ह्यांच्या किंमती इतक्या वर गेल्या आहेत कीं त्यांचे मानानें कापसाचा भाव मात्र चढूं न देणें म्हणजे कपास पिकविणाऱ्या शेतकरीवर्गाचें निष्कारण नुकसान करणें आहे. सूत व कापड ह्यांच्या किंमतीवर नियंत्रण घालण्यांत आलें नसतां कापसाच्या व्यवहारांतच तेवढें तें घालणें अयोग्य आहे. ह्या आशयाचें मत कित्येक धंदेवाल्यांनीं वृत्तपत्रांत व्यक्त केलें आहे, आणि तें सरकारपुढेंहि रीतसर मांडण्यांत आले आहे, त्याचा आतां विचार करूं.

### वायद्याचे व्यवहार

निरनिराळ्या जातींच्या मालाच्या खरेदी–विक्रीची नीट व्यवस्था लागावी म्हणून संघटित व नियमबद्ध बाजार चालवण्यांत येतात. त्यांमध्यें वायद्याच्या खरेदी–विक्रीविषयींची तरतूद केलेली असते. उत्पादक आणि खरेदीदार ह्यांची सोय होऊन किंमतीचें नियमन त्यांच्या हिताच्या दृष्टीनें व्हावें हा ह्या व्यवस्थेचा हेतु असतो. सट्टेवाले लोक बाजारभावांत होणाऱ्या चढउतारामुळें उद्भवणाऱ्या नफानुकसानीची जबाबदारी उचलतात आणि प्रत्यक्ष खरेदीदारांस निश्चित भावानें व निश्चित वेळीं जरूर तो माल मिळण्याची खात्री असते. कापूसबाजाराचेंच उदाहरण आपण घेऊं. गिरणीवाल्यांस कराराप्रमाणें कापड बनवून आपल्या गिऱ्हाइकांस ठरलेल्या वेळीं व दरानें विकावयाचें असतें आणि ह्यासाठीं जरूर असलेला कापूस नियंत्रित वेळीं व निश्चित किंमतीनें मिळणें अगत्याचें असतें. वायद्याच्या खरेदी-विक्रीची सोय बाजारांत नसेल तर कापडाचें उत्पादन कठीण होईल आणि धंदेव्यापार सुरळीत चालणार नाहींत. कारण, कच्च्या मालाची किंमत, त्याचा पुरवठा व उत्पादनखर्च ह्यांचा कापडाच्या मिळावयाच्या किंमतीशीं गिरणीवाल्यांस मेळ घालतां यावयाचा नाहीं. ह्यामुळेंच संघटित बाजारांची व वायद्याच्या व्यवहारांची व्यवस्था व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या सुस्थितीच्या दृष्टीनें शांततेच्या काळांत व मामुली परिस्थितींत आवश्यक समजली जाते. कापसाच्या नवीन पिकाचे बाबतींत वायद्याचे व्यवहारांची सरकारनें बंदी केली आहे ती विशिष्ट परिस्थितीस अनुलक्षून आहे. तिच्यावर आक्षेप घेण्यांत येत आहे तो मुख्यत्वेंकरून मामुली पद्धतीच्या मुद्यावरच आधारलेला आहे. आक्षेपकांच्या मतांचा आतां विचार करूं.

### नियंत्रणाची आवश्यकता

सबंध देशाच्या किंवा इतर लोकांच्या हिताहिताची पर्वा न करतां केवळ व्यक्तिस्वार्थासाठी कापूसबाजारांत जुगारीसारखी सट्टेबाजी करणारांस कोणतेंच नियंत्रण नको आहे आणि स्वतःच्या फायद्याचा खेळ खेळण्याचें स्वातंत्र्य हवें आहे. ह्या व्यक्तींच्या मतांचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. बाजारांतील जबाबदार धंदेवाल्यांनीं तेजी–मंदीचे व्यवहार जुगारीच्या स्वरूपाचे असल्याकारणानें ते बंद करण्यास हरकत नाहीं असा अभिप्राय व्यक्तच केला आहे. आतां राहिला वायद्याचा व्यवहार. वायदे बंद झाले तर शेतकरी व गिरणीवाले ह्यांस दलाल आडवून स्वतःचे खिसे गरम करतील किंवा गिरणीवाले शेतकऱ्यांची पिळवणूक करतील असा युक्तिवाद ह्यासंबंधांत करण्यांत आला आहे. त्यास माहितगार लोकांकडूनच असें उत्तर देण्यांत आलें कीं, वायद्याच्या पद्धतीचा फायदा शेतकऱ्यांस मिळतो असें निश्चितपणानें सिद्ध झालेलें नाहीं, एवढेंच नाहीं, तर अडचणीचे प्रसंगीं तिच्या योगानें कपास पिकविणारांच्या हिताचें रक्षण झालेलें नाहीं असा अनुभव आहे. मध्यस्थ दलाल, वायदे असोत वा नसोत, व्यवहारांत रहाणारच. शिवाय, सगळे गिरणीवाले हेज कॉंट्रॅक्टरचा उपयोग करतातच असें नाहीं आणि असा उपयोग न करणाऱ्यांचा धंदा तोट्यांत चालतो असेंहि नाहीं. शिवाय, बाजारांतील भाव व व्यवहार ह्यांचें नियंत्रण युद्धपरिस्थितींत सरकारास करणें आवश्यक असल्यानें मामुली व्यवस्था चालू राहिली पाहिजे असा आग्रह धरण्यांत कांहीं हंशील नाहीं. ह्या नियंत्रणाच्या योजनेंत व्यावहारिक स्वरूपाचे फेरबदल सुचविण्यांत आलें असतां सरकार त्यांचा योग्य परामर्ष घेईल असें समजण्यास हरकत नाहीं. कापसासारख्या मालाचे भावांत मोठे चढउतार होऊन व्यवहारांत अनिश्चितपणा व जुगारी उत्पन्न होऊं नये हा येथें मुख्य उद्देश आहे आणि तो साध्य होण्यास सहाय्य करणें हें सर्व लोकांचें कर्तव्य आहे. गिरण्यांकडून व्हावयाच्या कापडाचा पुरवठा हा युद्धाचा महत्त्वाचा भाग असल्यानें त्यांत व्यत्यय आणील असें कोणतेंच धोरण कापूसबाजाराचे संबंधांत सरकार अंगीकारील हें संभवनीय नाहीं.

### चांदी–सोन्याचा भाव

अलीकडे चांदी आणि सोनें ह्यांच्या किंमतीनें उच्चांक गांठला आहे. चांदीची किंमत दर शंभर तोळ्यांस सुमारें १३० रुपये आणि सोन्याची दर तोळ्यास ९४ रुपये हे बाजारभाव अपूर्व आहेत. ह्या धातूंचा पुरवठा वाढत नसला आणि मागणीच्या मानानें कमी असला तरी त्या योगानें त्याच्या निर्मितींतील भरमसाट वाढीचें समर्थन होऊं शकत नाहीं. चांदी–सोन्याच्या बाजारांतही सट्टेबाजीस ऊत आला असल्याचें स्पष्टपणानें दिसून आलें असून बुलिअन एक्सचेंजला म्हणजे ह्या बाजाराच्या नियंत्रक समितीस मध्यें पडून पुढील वायद्याचे व्यवहार बंद ठेवण्याचा सल्ला देणें प्राप्त झालें आहे. जवळ कमीअधिक मोकळा पैसा असणारास चांदी–सोन्यांत गुंतवण्याचा जबर मोह झाला आहे आणि ह्या धातूंच्या किंमती पुढें उतरण्याचा संभव आहे की काय ह्याचा कोणी विचारहि करीत नाहीं. आपली बचत आणि शिल्लक चांदी–सोन्याच्या स्वरूपांत बाळगणें सुरक्षितपणाचें आहे अशी कित्येकांची भोळी समजूत असते आणि ते कृत्रिम रीतीनें चढलेल्या बाजारभावांस बळी पडतात. कापसाच्या वायद्यांत किंवा चांदी–सोन्यांत पैसा घालणारांचा उद्देश ह्या व्यवहारांत धंदा करून त्वरित नफा उकळण्याचा असतो. ह्या रीतीनें गुंतवला जाणारा मोकळा पैसा सरकारनें कराच्या किंवा सक्तीच्या कर्जांच्या व बचतीच्या स्वरूपांत स्वतःच्या तिजोरीकडे आकर्षून घ्यावा अशा अर्थाची सूचना त्यांस करण्यांत आली आहे. तिचें रहस्य लक्षांत घेणें अगत्याचें आहे. ( अपूर्ण )


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

### कामाच्या वेळांत बदल

बँकेचे भागीदार, खातेदार व बँकेशीं संबंध येणाऱ्या सर्व लोकांस विनंतीपूर्वक कळविण्यांत येते कीं, बँकेच्या मुख्य कचेरीच्या कामाची वेळ शनिवार व सुटीचे दिवस खेरीज करून दुपारीं ११॥ ते २ व शनिवारीं दुपारीं ११॥ ते १२॥ पर्यंत होती, ती मंगळवार ता. १ जून १९४३ पासून अनुक्रमें दुपारीं १० ते २॥ व १० ते १ करण्यांत आली आहे.

पुणें शहर.
ता. २६-५-४३

जी. एल. हळवे
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु पक्षाकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव घडवून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमियम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

**ट्रस्ट ऑफ इंडिया**

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं.

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

---

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

---

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


---

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

---



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

---

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

---

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. | नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख ९ जून १९४३ अंक २३

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजविन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

## WANTED

THE ISLAMPUR CO-OP. PEOPLES BANK, LTD.

Wanted immediately a qualified and experienced hand for the post of Manager of the above Bank. The scale of pay is Rs. 60-5-1-85. Application should reach the Chairman on or before the 20th of June 1943, along with copies of Testimonials.

Sd/- M. D. PAWAR.
Vice-Chairman,
Islampur Co-op: Peoples Bank, Ltd.,
Islampur: ( Dt. Satara ).

Date 4-6-43

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ४००, किंमत ४ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची आणीबाणी ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचें व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण सेव्हतें भांडवल रु. ६०,००,०००

शेअर्सः—प्रत्येकीं पांच रुपये वाढीनें विकले जातात. वाढीची रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर


## विविध माहिती

### फ्रेंच युद्धकैद्यांचें रूपांतर

जर्मनीनें २१ लक्ष फ्रेंच युद्धकैद्यांचें कामगारांत रूपांतर केलें आहे. त्यामुळें जर्मन कारखान्यांत कामें करण्यास तेवढे जास्त कामगार मिळाले आहेत.

### ब्रिटिश साम्राज्याची सैनिक हानि

चालू युद्धाच्या पहिल्या तीन वर्षांत मिळून एकूण ब्रिटिश साम्राज्याचे खालीप्रमाणें सैनिक कामास आले.

| | |
|---|---|
| मारले गेले | ९२,०८९ |
| बेपत्ता | २,२६,७१९ |
| जखमी | ८८,२९४ |
| युद्धकैदी | १,०७,८९१ |

अति पूर्वेकडील युद्धांत भाग घेतलेल्या ३३,००० नाविक, लष्करी व वैमानिक दलांतील ब्रिटिशांचा अद्याप पत्ता नाहीं. २४,३०० लोकांसंबंधीं माहिती मिळाली आहे.

### अमेरिकेंत विमानांचें व आगबोटींचें उत्पादन

युद्धविषयक उत्पादनाच्या कार्यक्रमास प्रारंभ झाल्यापासून आतापर्यंत अमेरिकेनें एक लक्ष विमानांचें उत्पादन पुरें केलें आहे. आगबोटींच्या बुडण्याचे मानानें नव्या आगबोटींच्या उत्पादनाचें प्रमाण चौपट आहे.

### दर आठवड्यास २५ तोळे साखर

मुंबईमधील नागरिकांना दर आठवड्यास २५ तोळे साखर मिळण्यास प्रारंभ झाला आहे.

### स्टार्चचें कांद्यापासून उत्पादन

कागदाच्या आणि कापडाच्या गिरण्यांत स्टार्च फार मोठ्या प्रमाणावर लागतो, तो हल्लीं तांदूळ, मका, साबूदाणा, गहू, इत्यादींपासून बनविण्यांत येतो. रानटी कांद्यांपासून तो तयार करण्याची पद्धत एका संशोधकानें काढली आहे, ती यशस्वी झाल्यास खाद्य धान्यांचीं १६ लक्ष पोतीं हिंदुस्थानांत लोकांना उपलब्ध होतील.

### चुंगकिंग येथें एक्सचेंज बँक

चार्टर्ड बँक ऑफ आस्ट्रेलिया अँड चायना ह्या एक्सचेंज बँकेच्या चुंगकिंग येथील शाखेच्या कामास ता. १ जून रोजीं प्रारंभ झाला.

### उत्तर आफ्रिकेंतील यशांत हिंदुस्थानचा वाटा

उत्तर आफ्रिकेंतील युद्धास हिंदुस्थानचें बहुमोल सहाय झालें आहे, असें अमेरिकेच्या युद्धवार्ता कचेरीनें प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टांत नमूद केलेलें आहे. हिंदी सैनिक शिताफीनें लढलेच परंतु त्याबरोबर हिंदुस्थाननें १५ लक्ष टन युद्धसाहित्य पाठवून अमेरिकेकडून साहित्य येऊं लागेपर्यंत, फार महत्त्वाची कामगिरी बजावली.

### हिंदुस्थानांतील गव्हाच्या उत्पादनाचा अंदाज
(१९४२-४३)

| | |
|---|---|
| गव्हाखालील क्षेत्र: | ३,४०,५७,००० एकर |
| गेल्यावर्षीपेक्षां वाढ | ०·४% |
| अपेक्षित उत्पादन | १,०९,३८००० टन |
| गेल्यावर्षींपेक्षां वाढ | ९·५% |

### बँकांजवळील भात सरकार घेणार

ठाणे जिल्ह्यांत बँकांनीं ज्या भाताचे साठ्याचे तारणावर कर्जे दिलीं आहेत, त्या साठ्याचा ताबा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट घेणार आहे. हा भात भाताच्या गिरणीवाल्यांस नियंत्रित भावांनीं विकला जाईल. गिरणीवाले सरकारी देखरेखीखालीं भाताचे तांदूळ करतील व त्यासाठी त्यांना ठराविक पैसे मिळतील. ज्या मानानें गिरण्यांत भात सडला जाईल त्या मानानें ठराविक प्रमाणांत गिरणीवाले आपल्या साठ्यांतून कांहीं तांदळाची भर घालतील. अशा रीतीनें सरकारास १ लक्ष बंगाली मण भात उपलब्ध होईल व त्यापासून २५ हजार पोती सडीक तांदूळ मिळेल. त्यांत गिरणीवाल्यांच्या तांदळाची भर पडून मुंबईंत वाटण्यासाठी ३० हजार पोतीं मिळूं शकतील.

### धान्याची निर्गत

हिंदुस्थानांतून धान्याची निर्गत पूर्णपणें बंद करण्याची आवश्यकता सरकारास पटवून देण्याचा फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री प्रयत्न करणार आहे.

### हिंदी कपाशीच्या पिकाचा अंदाज (१९४२-४३)

| | |
|---|---|
| क्षेत्र | १,८८,१२,००० एकर |
| उत्पादन | ४५,५४,००० एकर |
| १९४१-४२ मधील क्षेत्र | २,४१,५१,००० एकर |
| १९४१-४२ मधील उत्पादन | ६१,२७,००० गांठी |
| १९४०-४१ मधील क्षेत्र | २,३३,११,००० एकर |
| १९४०-४१ मधील उत्पादन | ६०,८०,००० एकर |

### हिंदी गव्हाचें पीक

हिंदुस्थानांतील गव्हाचें येतें पीक चांगलें येईल, त्याचा सट्टेवाल्यांनीं फायदा घेऊन गव्हाच्या योग्य वाटणीस अडथळा आणूं नये, ह्यासाठी रेशनिंगला जोडून गहूं खरीदण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक मध्यवर्ती योजना आखावी, असें मँचेस्टर गार्डियनच्या आर्थिक विभागाच्या संपादकानें आपल्या लेखांत सुचविलें आहे. प्रांतिक स्वायत्तता व देशी संस्थानें ह्यांमुळें मध्यवर्ती सरकारचा ह्या संबंधांतील अधिकार अतिशय मर्यादित आहे, असेंहि ते आपल्या लेखांत म्हणतात.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | १७८ | वाढत चाललें—हि गॅल-जॅरो समझोता—युद्धोत्तर धान्याचा तुटवडा व उपाय-योजना—ऐक्य विशेषांक. | |
| २ स्वस्त कापडाच्या पुरवठ्याची योजना | १७९ | ६ श्री कामगारांस कार्यक्षम करण्याचा प्रयत्न | १८२ |
| ३ फ्रान्सच्या मुक्ततेसाठी समिती | १८० | ७ आर्थिक समालोचन | १८३ |
| ४ जागतिक अन्न-परिषदेची समाप्ती | १८० | | |
| ५ स्फुट विचार सरकारी नियंत्रणाचें क्षेत्र | १८१ | | |


# अर्थ

बुधवार, ता. ९ जून, १९४३

## स्वस्त कापडाच्या पुरेशा पुरवठ्याची व्यवस्था

### सरकार व गिरणीवाले ह्यांचा प्रयत्न

हिंदी कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन वाढवून सुताची व कापडाची किंमत उतरविण्यासाठी नियंत्रणाची योजना आखण्याचे उद्देशानें गेल्या आठवड्यांत मुंबई येथें हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि, मि. हैदरी व हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांचे प्रतिनिधी ह्यांचेमध्यें वाटाघाटी चालल्या होत्या, त्या अखेर यशस्वी झाल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. सरकार व गिरणीवाले ह्यांचेमध्यें ठरलेल्या योजना अंतर्भूत करणारा एक हुकूम डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टच्या ८१ ( २ ) च्या नियमाखालीं लवकरच जाहीर होईल. कापडाच्या अवास्तव साठ्यावर तात्काळ निर्बंध घालण्यांत येतील व उत्पादन वाढविण्यास ताबडतोब प्रारंभ होऊन डिसेंबर अखेर १०० कोटि वार स्टँडर्ड क्लॉथ तयार होईल. ह्यासंबंधींतील सरकारी योजना मि. हैदरी ह्यांनीं स्टँडर्ड क्लॉथ पॅनेलच्या सभेत मंगळवार ता. १ जून रोजीं सांगितली.

गरीबांसाठीं स्वस्त कापड काढण्याची योजना यशस्वी झाली नसल्याचें त्यांनीं मान्य केलें. गरीबांस स्वस्त कापड मिळवून देण्याची तातडीनें व्यवस्था केली पाहिजे, असें सांगून लष्करी मागणी पुरी पाडून गरीबांचीहि सोय लावली पाहिजे, असें ते म्हणाले. आतां करावयाची योजना सर्वव्यापी पाहिजे व त्यांत हिंदी संस्थानांचाहि समावेश झाला पाहिजे. येत्या बारा महिन्यांत २०० कोटि वार कापड तयार करून तें सर्व प्रांतांस व संस्थानांस लोकसंख्येच्या प्रमाणांत वाटावें. व सबंद हिंदुस्थानांत एकाच ठराविक दरानें कापड विकलें जावें, अशी सरकारची योजना आहे. ह्या कापडाची किंमत वाढत जाऊं न देतां ती स्थिर रहाणें आवश्यक आहे व त्यासाठी उत्पादनाच्या सर्वांवर प्रभावी नियंत्रण बसवावें लागेल व तें बसविण्याचें सरकारनें ठरविलें आहे. हिंदुस्थानांतील प्रजेची मागणी पुरविणें हें सरकारचें आद्य कर्तव्य असलें तरी शेजारच्या देशांकडे योग्य किंमतीनें कापड पाठविण्याची आवश्यकता दृष्टीआड करणें सरकारास शक्य वाटत नाहीं. सुएझच्या भाजूबाजूच्या देशांत कापडाचें तीव्र दुर्भिक्ष आहे, त्यांत वाटेल त्या किंमतीनें कापड खपूं शकेल. परंतु, दीर्घदृष्टीनें विचार करतां, हिंदी गिरण्यांनी योग्य किंमतीसच तेथें कापड विकावें, हें उचित आहे, असें मि. हैदरी म्हणाले. त्यांनीं नंतर नियंत्रणाच्या नियोजित व्यवस्थेची तपशीलवार माहिती दिली.

प्रत्येक गिरणीचें उत्पादन अधिकांत अधिक कसें होऊं शकेल ह्या प्रश्नाची त्यांनीं नंतर चर्चा केली. कांहीं गिरण्यांत आज सातहि दिवस तीन पाळ्या चालू आहेत, परंतु कित्येकांत सहा-दिवसांच्या दोन पाळ्या आहेत व कांहींत अद्याप पुऱ्या दोन पाळ्याहि नाहींत. शक्य तितक्या गिरण्यांत प्रत्येकी ७॥ तासांच्या तीन पाळ्या चालू करून गिरण्या आठवड्यांतील सातहि दिवस चालू ठेवण्याचा प्रयत्न करणें इष्ट व आवश्यक झालें आहे. प्रत्येक गिरणीची परिस्थिति नीट तपासूनच, अर्थात हें ठरवावें लागेल. यंत्रें सारखीं चालू ठेवल्यामुळें घसाऱ्याची तरतूद अधिक करावी लागेल, उत्पादन वाढवावयाचें म्हणजे कापडाचे प्रकार कमी करावे लागतील, व त्याप्रमाणें सुताच्या निर्मितीवरहि नियंत्रण बसवावें लागेल.

गिऱ्हाइकानें द्यावी लागणारी किंमत कमीत कमी असावी, ह्यासाठी किरकोळ विक्रीची कमाल किंमत ठरवून टाकणें आवश्यक आहे. कापडावर ह्या किंमतीच्या आकड्याचा ठसा उठवून दिला, म्हणजे सोय होणार आहे. गिरण्यांस मिळावयाची कमाल किंमतहि ठरवून टाकून किंमतीचें सर्वव्यापी नियंत्रण करण्याची ही योजना आहे. कपाशीचा भाव नियंत्रित करण्याची व्यवस्था अगोदरच करण्यांत आलेली आहे. कपाशीच्या किंमती अवास्तव खालीं गेल्या, तर सरकार योग्य किंमतीस कपास खरेदी करील, असें मि. हैदरी ह्यांनीं अधिकृतपणें जाहीर केलें. स्वस्त कापडाचे उत्पादन व पुरवठा ह्यांस पोषक होतील असे सर्व प्रकारचे उपाय तातडीनें योजण्याचें सरकारचें धोरण आहे व कापडाचा सर्व साठा मध्यें कोणतीहि कारवाई न होतां गिऱ्हाइकांचे हातीं पडावा, असा सरकारचा प्रयत्न राहील. सरकारी योजनेचें सर्व-साधारण स्वरूप वरीलप्रमाणें आहे. गिरणीवाल्यांनीं सरकारच्या योजनेस तात्काळ संमति दिली नाहीं व योजनेच्या अंमलबजावणी-मधील व्यावहारिक अडचणी त्यांनीं मि. हैदरी ह्यांचेपुढें मांडल्या. तीन पाळ्या चालविण्यासाठी लागणारे आणखी ८० हजार हुशार कामगार आणावयाचे कोठून? त्यांची राहण्याची व्यवस्था काय? त्यांच्या अन्नपाण्याची सोय काय? गिरण्यांस लागणारे स्टोर्स नियंत्रित भावानें पुरेसे मिळतील काय? तयार होणाऱ्या मालाची वाटणी यशस्वी रीतीनें होईल काय? इत्यादि प्रश्न गिरणीवाल्यांनीं पुढें मांडले, परंतु सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. अखेर, उभयपक्षांतील वाटाघाटी यशस्वी होऊन सरकारी योजना तींत विशेष बदल न करतां, गिरणीवाल्यांनीं मान्य केली. नियंत्रणाच्या अंमलबजावणींत गिरणीवाल्यांच्या प्रतिनिधींचे म्हणण्यास महत्वाचें स्थान असावें, ही त्यांची मागणी सरकारनें मान्य केली. त्याचप्रमाणें, उत्पादनाचा खर्च, कापड व सुत ह्यांची विक्रीची किंमत इत्यादि ठरवण्याचे बाबतींतहि त्यांचे प्रतिनिधींस महत्त्वाची जागा मिळणार आहे. अशा रीतीनें, स्वस्त कापडाच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या बाबतींत सरकार व गिरणीवाले ह्यांची योजना तयार झाली आहे, आणि त्याच्या परिणामाकडे म्हणजे स्वस्त कापड पुरेसें मिळूं लागण्याकडे लोकांचें लक्ष लागलें आहे.

## युद्धकाळांत नागरिकांचें वर्तन कसें असावें ?

एका अमेरिकन मासिकांत लोकांनीं युद्धप्रयत्नांस सहाय्यकारक वर्तन कसें ठेवावें ह्याविषयीं सूचना आल्या आहेत. त्या उद्बोधक असल्यानें त्यांचा सारांश खालीं दिला आहे.

( १ ) युद्ध कर्ज रोखे व तिकिटें विकत घ्या. तुम्हीं वर्तमानपत्रें वाचलीं असलीं व रेडिओ ऐकला असला, तर ह्यासंबंधीं वादाचें कारणच नाहीं.

( २ ) मालाच्या काटकसरीच्या सर्व योजनांस हातभार लावा. जुनें लोखंड पोलाद, तांबें, रबर, सर्व गोळा करा व योग्य त्या अधिकाऱ्यांचे हवालीं करा.

( ३ ) अफवा बंद पाडण्यास मदत करा.

( ४ ) शत्रुपक्षाच्या प्रचाराकडे दुर्लक्ष करा.

( ५ ) आपल्या मित्रराष्ट्रांकडे कांहीं दोष असले तरी त्यांना कमी लेखूं नका. आपणांतहि कांहीं दोष असतील. आपण सर्व एकाच नावेंत आहों.

( ६ ) लष्करांतील सैनिकांस उत्तेजन द्या. मित्र व नातेवाईक ह्यांचेकडून आलेलीं मनोरंजक पत्रें व आतिथ्यपूर्वक घरगुती जेवण ह्रीं त्यांस फार आवडतात.

( ७ ) रिक्रूटिंगचे कामीं मदत करा.

( ८ ) रेडक्रॉसला सहाय्य करा.

( ९ ) नागरिक संरक्षणाचे कामीं मनापासून काम करा.

( १० ) आपलें शरीर सुदृढ राखा. शरीर प्रकृति चांगली राखणें हें राष्ट्रकार्य आहे.

( ११ ) नवीन होणाऱ्या मित्रांत, आपला व्यवसाय वाढावा ह्या दृष्टीनें त्याचें बीजारोपण करा.

( १२ ) संधी शोधत रहा. प्रत्येक युद्ध व सामाजिक क्रांती नवीन उद्योग व व्यवसाय ह्यांस जन्म देते.

( १३ ) हें तुमचें युद्ध आहे, हें लक्षांत ठेवा. तुम्हीं तें सुरू केलें नसलें तरी आतां आपण त्यांत सापडलों असल्यानें, सैनिकाप्रमाणें आपणांवरहि तें जिंकण्याची जबाबदारी आहे.

---

### फ्रान्सच्या मुक्ततेसाठीं समिति

जनरल गिरॉड व जनरल डीगॉल ह्यांच्या संयुक्त अध्यक्षतेखालीं आल्जियर्स येथें कार्यकारी समिति नेमण्यांत आली आहे. तिचें सध्याचें एकमेव कार्य मित्रराष्ट्रांस जर्मनी व इटली ह्यांस जमीनदोस्त करण्यांत पूर्ण सहाय देणें हें आहे. जर्मनीच्या अंकित असलेला फ्रान्स देश सोडला असतां त्याच्या बाहेर जे जे फ्रेंच प्रदेश आहेत, त्यांचें तात्पुरतें आधिपत्य ह्या समितीनें स्वीकारलें आहे. मित्रराष्ट्रांच्या विजयास ह्या घटनेचें फार महत्त्वाचें सहाय होणार आहे. कारण, फ्रान्सबाहेरील जगांतील सर्व फ्रेंच मनुष्यबळ, लढाऊ सामुग्री, आरमार व सेना त्यांच्या बाजूनें लढण्यास सज्ज झाली आहे. हें सहाय कार्यक्षम रीतीनें देतां यावें म्हणून जनरल गिरॉड व जनरल डीगॉल ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या निवेदनांत त्यांच्या नवीन स्थापलेल्या समितीनें सर्व राज्यसत्ता स्वतःच्या हातीं घेतल्याचें जाहीर केलें आहे. फ्रान्सची जर्मन वर्चस्वापासून मुक्तता होतांच फ्रान्सचें पूर्वीचें प्रजासत्ताक राज्य स्थापन केलें जाईल आणि लोकनियुक्त राज्यकर्त्यांच्या स्वाधीन आपण आपली सर्व सत्ता करूं असें आश्वासन जनरल गिरॉड ह्यांनीं दिलें आहे. त्यांनीं फ्रान्समधील जनतेला हिटलरशाहीचा नाश करून फ्रान्सला स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं तिनें आपल्या समितीस सर्वतोपरी सहाय द्यावें अशी कळकळीची विनंती केली आहे. आपले सर्व मतभेद नाहींसे करून स्वतंत्र फ्रान्सचे पुढारी एकदिलानें आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेसाठीं मित्रराष्ट्रांच्या खांद्याला खांदा लावून लढण्यास तयार झाले ह्याविषयीं जनरल डीगॉल ह्यांनीं आपल्या घोषणेंत समाधान व्यक्त केलें आहे. स्वतंत्र फ्रेंच पुढाऱ्यांची एकवाक्यता आणि त्यांचें परिणामकारक सहाय हा हिटलरशाहीच्या शवपेटींत ठोकलेला एक मोठा खिळाच होय.

---

### जागतिक अन्नपरिषदेची समाप्ती

युद्धसमाप्तीनंतर व्हावयाच्या पुनर्घटनेंत कोणत्याहि राष्ट्रास किंवा त्यांतील व्यक्तीस अन्नाची पंचाइत पडूं नये अशी व्यवस्था कोणत्या रीतीनें करतां येईल ह्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठीं अमेरिकेंत व्हर्जिनीयामध्यें एक मोठी आंतरराष्ट्रीय परिषद् भरली असल्याची माहिती आम्हीं मागें दिलीच आहे. ह्या परिषदेचें काम सोळा दिवस चालून तें आतां समाप्त झालें असल्याचें वृत्त नुकतेंच आलें आहे. खाद्य पदार्थांचें वाढतें उत्पादन, त्यांची वाटणी व उपयोग ह्यांची व्यवस्था सुरळीतपणें चालावी ह्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय समिति नेमली जावी असा परिषदेचा एक निर्णय आहे. राष्ट्रीय सरकारांनीं आपल्या लोकांस खाद्य पदार्थांचा भरपूर पुरवठा केला जाईल असें आश्वासन द्यावें, अशा अर्थाची शिफारस अन्नपरिषदेनें केली आहे. जगांतील निरनिराळ्या लोकांच्या अन्नविषयक गरजा त्यांच्या जरूरीप्रमाणें भागवणें हें उद्दिष्ट साध्य होण्यास धान्याचा सांठा कोठेंतरी मध्यवर्ती ठिकाणीं करावा लागेल आणि खाद्य पदार्थांच्या उत्पादनाचें नियमन व्हावें लागेल. हे अवघड प्रश्न असून त्यांचा निर्णय परिषदेंत झाला नाहीं आणि त्यांचा विचार कायमची आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन होईल तिनें करावयाचा आहे. परिषदेच्या कार्याचा उपसंहार करतांना तिचे अध्यक्ष मि. मार्विन जोन्स म्हणाले कीं, जगांतील प्रत्येक व्यक्तीस जिव्हाळ्याची अशी माहिती उपलब्ध झाली असून अटलांटिक सनदेंत नमूद केलेलें अन्नपुरवठ्याविषयींच्या आश्वासनाची पूर्तता करण्याची तयारी चालू झाली आहे. त्याचप्रमाणें प्रस्तुत युद्धांत मित्रराष्ट्रें एकविचारानें कार्य करीत आहेत. तसेंच संयुक्त व सहकाराचें कार्य युद्धसमाप्तीनंतर होईल ह्याची खात्री प्रस्तुत परिषदेनें पटवली आहे, असेहि उद्गार त्यांनीं काढले. हिंदुस्थानासारख्या आर्थिक बाबतींत मागसलेल्या देशांत शेतीचें उत्पादन वाढवण्यासाठीं प्रयत्न करण्यास येथील सरकारास परिषदेच्या चर्चेनें स्फूर्ती मिळाली तर तें इष्टच आहे. आंतरराष्ट्रीय परिषदांचे ठराव कृतींत उतरण्याच्या मार्गांत अनेक अडचणी येत असतात हें न विसरतां विधायक व परिणामकारक धोरण हिंदुस्थानांत अमलांत आलें पाहिजे.

---

### जपानची हानी

जपाननें युद्धांत प्रवेश केल्यापासून आतांपर्यंत संयुक्त राष्ट्रांनीं त्याचीं १,१०० विमानें नष्ट केलीं असून ४८० विमानें मोडलीं आहेत. आणखी ३९२ विमानांचा बहुधा नाश झाला असावा. ह्याच मुदतींत जपानच्या २२½ लक्ष टनांच्या ४४६ बोटींना जलसमाधी मिळालेली आहे.

# स्फुट विचार

## सरकारी नियंत्रणाचें क्षेत्र वाढत चाललें

युद्धपरिस्थितींत निरनिराळ्या जरूरीच्या जिनसांचे बाजारभाव नियंत्रित करून स्थिर राखणें अगत्याचें असतें हें आम्हीं अनेकवार दाखवलें आहे. पण हिंदुस्थान सरकार ह्या कामीं प्रथमपासूनच कचरत आलें आहे. गव्हाच्या भावाचें व विक्रीचें नियंत्रण करण्याचा हिंदुस्थान सरकारनें प्रयत्न केला. तो यशस्वी न झाल्यानें पुढें सोडून द्यावा लागला. ह्या अनुभवावरून व्यापारी देवघेवीवर सरकारी नियंत्रणच असूं नये असें प्रतिपादण्यापर्यंत कित्येकांची मजल गेली. तथापि नियंत्रणाच्या अभावीं सट्टेवाल्यांनीं घुमाकूळ माजवून सर्व जिनसांच्या किंमती अवाच्यासवा चढवल्या तेव्हां ह्या कामीं हस्तक्षेप करण्याचें अगत्य सरकारास पटलें आणि कापसाच्या बाजारांतील वायद्यांचे सवदे व तेजीमंदीचे व्यवहार ह्यांस त्यानें बंदी केली. कपास विकविणाऱ्या शेतकऱ्यांचें नुकसान होऊं नये आणि गिरणीवाल्यांस आपला कच्चा माल निर्वेध रीतीनें मिळावा ह्या रीतीची सोयहि त्यानें केली. सोनें-चांदीच्या बाजारांत चाललेल्या सट्टेबाजीकडे सरकारनें आपलें लक्ष वळवलें आणि तेथेंहि वायद्याचें नियंत्रण केलें. उत्पादन, पुरवठा, मागणी वगैरेच्या परस्पर संबंधांकडे दुर्लक्ष करून महागाईच्या परिस्थितीच्या गंगेंत हात धुवून घेणाऱ्या धंदेवाल्यांनीं आळशी, शेंगदाणा इत्यादि गळिताच्या धान्यांच्या बाजारांतहि गडबड उडवून किंमती भरमसाटपणानें चढविल्या होत्या. सरकारनें त्यांवर नियंत्रण घालून ह्या बाजारांतील सट्टेबाजांचाहि समाचार घेतला आहे, कापड आणि सूत ह्यांचे भाव विलक्षण भडकले असल्यानें त्यांचेकडे सरकारनें लक्ष पुरवावें अशी ओरड चोंहोंकडून होत आली आहे. ह्या बाबतींतहि गिरणीवाल्यांच्या सहकार्यानें आतां सरकारनें स्वस्ताईची योजना हातीं घेतली आहे.

## डि-गॉल-जीरो समझोता

स्टालिननें कम्युनिस्टांची जागतिक अधिकारी संस्था, कॉमिंटर्न, बंद केली असल्याचें जाहीर करून मित्रराष्ट्रांच्या ऐक्यांत पूर्ण दृढता निर्माण केली आहे आणि सर्व स्वातंत्र्यप्रेमी लोकांनीं हिटलरशाहीचा पाडाव करण्यास एकजुटीनें झटावें असा आदेश दिला आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतली लोकशाही आणि रशियांतील कम्युनिझम ह्यांचीं ध्येयें परस्परविरोधी असल्यामुळें युद्ध चालू असतांना व तें संपल्यावर ह्या राष्ट्रांचें सहकार्य परिणामकारक होणार नाहीं अशी कांहीं लोकांस वाटत असलेली शंका स्टालिननें आतां दूर केली आहे आणि जर्मन प्रचारकांस फजीत केलें आहे. ह्याच प्रकारचा एक प्रश्न ट्युनिशियांतील फ्रेंच पुढाऱ्यांच्या अधिकारासंबंधानें उपस्थित झाला होता. जनरल डि. गॉल प्रथमपासून मोठ्या स्वार्थत्यागानें व परिश्रमानें इंग्लंडला सहाय्य देत आला आहे. पण ट्युनीशियांत अमेरिकेनें जनरल जिरोस उचलून धरलें. ह्यामुळें ह्या दोन फ्रेंच पुढाऱ्यांमध्यें वांधा उपस्थित झाला आणि त्याचा परिणाम इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या एकसूत्री धोरणावर होण्याची भीति वाटूं लागली. ट्युनिशियामधून शत्रूची हकालपट्टी केल्यावर तेथें राजकीय सत्ता कोणाची आणि कशी प्रस्थापित करावी हा प्रश्न अमेरिकन व ब्रिटिश मुत्सद्यांपुढें उभा राहिला. इकडे डिगॉल व जीरो ह्यांची भेट होण्याच्या जागेविषयींहि वांधा निघाला आणि त्यांच्या वाटाघाटी तर दूर राहिल्या. पण आतां ही समाधानाची गोष्ट आहे कीं ह्या दोन फ्रेंच पुढाऱ्यांचा समझोता झाला असून ट्युनिशियांतील व इतर स्वतंत्र फ्रेंच मुलुखांतील राज्यसत्तेच्या घटनेच्या अग्रभागीं ते संयुक्त अध्यक्ष निश्चित झाले आहेत. ही व्यवस्था अत्यंत समाधानकारक आहे.

## युद्धोत्तर धान्याचा तुटवडा व त्यावर उपाययोजना

हॉट स्प्रिंग्ज येथें भरलेल्या, संयुक्त राष्ट्रांच्या अन्न परिषदेंत अन्नपुरवठ्याचा विचार झाला. खाद्य पदार्थांचें व धान्यांचें उत्पादन तातडीनें वाढविलें पाहिजे, असें मत व्यक्त करून युद्धसमाप्तीनंतरहि जोपर्यंत अन्नाचा तुटवडा भासेल तोपर्यंत सर्व राष्ट्रांनीं ह्या संबंधांत संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वावर आपल्या योजना आखल्या पाहिजेत, असे तिनें सुचविलें. सर्व जगास योग्य किंमतीस अन्नपुरवठा व्हावा, ह्या दृष्टीनें सर्व देशांतील शेतीचा उपयोग करावा लागेल व जेथें तुटवडा असेल तेथें इतर देशांना धान्यधुन्य पाठवावें लागेल. शेतीस भांडवल पुरवठा, सहकारी सोसायट्यांच्या कार्यास वाव, जमीनधान्याच्या चालू पद्धतींची पहाणी, इत्यादि विषयींहि परिषदेनें विचार केला. सर्वांस अन्न मिळेल, या दृष्टीनें सर्व देशांचें आर्थिक धोरण आंखण्यांत आलें पाहिजे ह्या मुद्यावर परिषदेनें विशेष भर दिला आहे. म्हणजे, शेतिप्रधान राष्ट्रांवर युद्धोत्तर पुनर्घटनेंत इतर देशांना धान्य पुरविण्याची जबाबदारी पडणार आहे, असें दिसतें. परिषदेच्या सूचना अंमलांत आणण्यास सर्व देशांनीं तात्काळ प्रारंभ करावा अशी तिची शिफारस आहे.

## "ऐक्य" साप्ताहिकाचा शैक्षणिक विशेषांक

सातारा येथील "ऐक्य" साप्ताहिकानें नेहेमींप्रमाणें आपला शैक्षणिक विशेषांक नुकताच प्रसिद्ध केला आहे, त्यांत मुख्यत: सातारा शहरांतील व जिल्ह्यांतील शिक्षण संस्थांची तपशीलवार माहिती दिलेली आहे. ह्याखेरीज, औंध संस्थानांतील शैक्षणिक प्रगति, शिक्षणाचा भविष्यकाळ ( प्रि. महाजनी ह्यांचे विचार ), वर्गांतील विनोद ( लेः—रा. ग. कुंभोजकर ), केसरीच्या सातारा जिल्हा बोर्डावरील टीकेस बोर्डाचे अध्यक्ष श्री. देसाई ह्यांचें उत्तर, कर्मवीरांचें वीरकर्म ( श्री. भाऊराव पाटील ह्यांच्या कामगिरीचा परामर्ष ), मुंबई प्रांतांचा शैक्षणिक अहवाल, सार्जंट कमिटीचा अहवाल, इत्यादि माहितीपूर्ण लेख अंकांत प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. ठिकठिकाणच्या शैक्षणिक बाबींची हकीकतहि अंकांत देण्यांत आलेली आहे. नव्या वर्षाचे आरंभीं, कोणत्या संस्थेत प्रवेश मिळवून कोणतें शिक्षण घ्यावें हें ठरविण्यास प्रस्तुत विशेष अंक फार उपयोगी पडणार आहे. अंकाचीं पृष्ठें २८ असून त्याची किंमत ८ आणे आहे.

## मँच्युरिया चीनला परत मिळाला पाहिजे

पूर्व आशियाच्या युद्धोत्तर आर्थिक घटनेंत मँच्युरिया हा चीनला पुन: मिळणें अत्यावश्यक आहे, कारण मँच्युरिया हें चीनचें धान्याचें कोठार आहे व तेथें उत्पादन होणारा माल चीनच्या निर्गत व्यापाराचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे, असे उद्गार हॉटस्प्रिंग्ज येथील अन्न परिषदेंतील चिनी प्रतिनिधीनें काढले.

## स्त्री-कामगारांस कार्यक्षम करण्याचा प्रयत्न

शक्य तीं कामें स्त्रियांकडून करवून घेऊन पुरुष कामगारांस अवघड व जोखमीचीं कामें देण्याची पद्धत पाश्चिमात्य देशांत आतां, युद्धप्रसंगीं, सर्रास अवलंबिली जात आहे. स्त्री-कामगारांस कार्यक्षम करून त्यांचेकडून अधिकाधिक काम कसें करवून घेतां येईल, ह्या प्रश्नाचा अभ्यास अर्थातच सुरू झाला. अनुभवानुसार खालील सूचना एका लेखकानें केल्या आहेत, त्यांतील कित्येक पुरुष कामगारांनाहि लागू पडण्याजोग्या असल्यानें त्या उपयुक्त होतील.

( १ ) कामाचे जागेपासून नजीक राहणाऱ्या कामगारांना नेमा. घरचें काम संभाळून कामास येणाऱ्या स्त्रीला येण्या-जाण्या साठी फार वेळ खर्चणें परवडत नाहीं. लहान मुलांच्या आयांना काम आटपून घरीं लवकर जावयास मिळालें म्हणजे त्या आनंदी रहातात.

( २ ) तरुण, विवाहित स्त्रियांची निवड शक्यतोवर करावी. अविवाहितांपेक्षां त्यांस जबाबदारीची जाणीव जास्त असते; त्यांचें कामाकडे लक्ष अधिक असतें, त्यांस कामाची गरज असल्यासेरीज त्या काम करणारच नाहींत, त्यांस कष्टानें काम करण्याची ताकद असते.

( ३ ) वयस्क स्त्रियांची नेमणूक करतांना, त्यांनीं पूर्वी कोठे बाहेर काम केलें होतें किंवा नाहीं, ह्याची चौकशी करावी. ज्या कधीं घराबाहेर पडल्याच नाहींत, अशांना बदललेल्या परिस्थितीशीं समरस होणें व बरोबरीच्या कामगारांशीं नीट वागणें जमत नाहीं. त्या चिडखोर असण्याचा संभव असतो. मित्रत्वानें व विनयानें वागण्याचें महत्त्व त्यांस पटवून देणें अवश्यक असतें.

( ४ ) साधारणतः, जराशा लठ्ठ स्त्रिया पातळ स्त्रियांपेक्षां अधिक कार्यक्षम व समतोल वृत्तीच्या असतात, असा अनुभव आहे. अर्थात्, सारखें उभें रहाण्याच्या अथवा फिरण्याच्या कामावर लठ्ठ स्त्री टिकूं शकणार नाहीं.

( ५ ) नेमावयाच्या प्रत्येक स्त्री कामगाराची नेमणुकीचे वेळीं शारीरिक तपासणी करण्यासाठी डॉक्टराची योजना करा. त्यामुळें कंपनीविरुद्ध दावा लागण्याचा संभव नाहींसा होतो. शिवाय ज्यामुळें ती शरीरानें अथवा मनानें कामास नालायक ठरेल अशीं कांहीं विशिष्ट लक्षणें असल्यास तीं स्पष्टपणें दिसून येतील.

( ६ ) ज्यांना अद्याप बाहेरच्या कामाचा अनुभव नाहीं, अशांना प्रारंभींच वेळेचें महत्त्व पटवून द्या. एक-दोन मिनिटें वाया गेलीं तरी फार मोठें नुकसान होतें, हें त्यांस नीट समजलें नाहीं तर त्या गप्पांत फार वेळ वाया घालवितील.

( ७ ) स्त्री-कामगारास सबंद दिवसाचें काम आरंभींच आखून द्या, म्हणजे त्या एकसारख्या, पुढे काय? म्हणून विचारत बसणार नाहींत. स्त्रिया नेमून दिलेलें काम व्यवस्थित करतात, परंतु स्वतः होऊन योग्य तें काम करणें त्यांस जमत नाहीं.

( ८ ) स्त्रियांना कामांत थोडा बदल केलेला आवडतो. तेव्हां दिवसांतून एकदा त्यांचीं कामें बदलून दुसऱ्या स्त्री-कामगारांना द्यावीं.

( ९ ) दिवसांतून पुरेशा वेळीं स्त्रियांना विश्रांतीच्या सुट्या द्याव्या. त्यांना आपले केस नीट राखण्यास, हात धुण्यास व आरशांत पाहण्यास सवड दिली म्हणजे त्या जास्त कार्यक्षमतेनें काम करतात.

( १० ) पुरुषांप्रमाणें स्त्रियांना कडक शब्द सहन होत नाहींत; सूचना देतांना अथवा चुका दाखवून देतांना खुबीनें शब्दप्रयोग करा-

( ११ ) स्त्री कामगारांना गणवेश दिला असेल, तर त्याचे वेगवेगळे आकार उपलब्ध करा म्हणजे प्रत्येकीस योग्य तो गणवेश वापरतां येईल.

( १२ ) कठीण काम-उ. वजन उचलणें—करण्यास पुरुष कामगारांचीच योजना करा. स्त्रियांच्या कामें करण्याच्या शक्तीस मर्यादा आहे.

( १४ ) शक्य असल्यास, स्त्री कामगारांना रोखी ऐवजी चेकनें पगार द्या. एका मोठ्या कारखान्यानें ह्यासंबंधांत चौकशी केली तेव्हां असें आढळलें कीं स्त्रियांना चेकचीच पद्धत पसंत पडते.


# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

## अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

## आर्थिक समालोचन

### (२)

सध्यांच्या युद्धपरिस्थितींत विशिष्ट वर्गाच्या हातांत पुष्कळ पैसा खेळतो. पैसा म्हणजे पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य व हक्क. एका बाजूनें हें सामर्थ्य वाढत आहे आणि दुसऱ्या बाजूनें विकत घ्यावयाच्या मालाचा पुरवठा मर्यादित झाला आहे. ह्याचा परिणाम महागाई वाढत जाण्यांत होणें अपरिहार्य आहे. हिंदुस्थान सरकारास युद्धखर्चाप्रीत्यर्थ आणि ब्रिटिश सरकारच्या वतीनें माल खरेदी करण्याकरितां वगैरे कोट्यवधि रुपये सारखे ओतावे लागत आहेत आणि त्यामुळें चलनी नोटांचा समाजांत विस्तार होत आहे. युद्धपरिस्थितीमुळें मर्यादित झालेल्या बिनटिकाऊ जातींच्या जिनसांच्या उत्पादनास व विनिमयास वाढत चाललेल्या चलनाची वास्तविक रीतीनें आवश्यकता नाहीं. पण तें फाजील चलन समाजांत खेळत रहातें आणि पदार्थांच्या किंमती चढवण्यास कारणीभूत होतें. किंमती चढल्या म्हणजे लोकांच्या रहाणीचा, उत्पादनाचा व युद्धाचा खर्च वाढतो आणि ह्या योगानें पुनः महागाई तीव्र होते. हें चढीचें चक्र चालू देणें देशाच्या हिताच्या दृष्टीनें अनिष्ट आहे. समाजांत वावरणारें फाजील व भटकें चलन सरकारी तिजोरीकडे खेचून घेण्याच्या योजना अंमलांत आणल्या जाणें अगत्याचें आहे, अशी सूचना सर जेरेमी रेसमन ह्यांस करण्यांत आली आहे. मध्यवर्ती असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनांत फडनवीसांनीं असें सांगितलें कीं, ह्या विषयांचा त्यांचा विचार चालू असून ह्यासंबंधांतली योजना लवकरच बाहेर येईल. समाजाच्या आर्थिक व्यवहारांस आवश्यक नसलेलें चलन आकर्षण्याचे कर व कर्ज हे दोन मार्ग आहेत. जनतेच्या ऐपतीच्या योग्य प्रमाणांत निरनिराळ्या वर्गांकडून कर वसूल केल्यानें सरकारच्या आवश्यक खर्चाचा एक भाग भागवला जातो, बाकीच्या खर्चासाठी त्यास लोकांकडून कर्ज घ्यावें लागतें. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत ह्याच दुहेरी पद्धतीचा अवलंब यशस्वी रीतीनें करण्यांत येत आहे. लोकांनीं आपली बचत सरकारला व्याजानें कर्जाऊ यावी ह्यासाठी हिंदुस्थानांत निरनिराळ्या सोयी केल्या आहेत. पोस्टामार्फत वगैरे सामान्य माणसांसहि आपली अल्प बचत सरकारला कर्जाऊ देतां येते. उच्च व मध्यम स्थितींतल्या लोकांच्या प्राप्तीपैकीं कांहीं भाग परस्पर सरकारी कर्जामध्यें वळवून घेण्याच्या व्यवस्थेचें तत्वहि ह्या देशांत अंशतः अंमलांत आहे. औद्योगिक, व्यापारी व इतर मंडळ्यांच्या नफ्यांतून भागीदारांस डिव्हिडंड वाटण्यांत येतें व बोनस दिलें जातें. त्याचा अंश सरकारी कर्जांत विलीन व्हावा अशी एक कल्पना हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांपुढें मांडण्यांत आली आहे. लंडनच्या भागीदारांचा कांहीं नफा सरकारास तात्पुरतें कर्ज म्हणून मिळावयाचा आणि युद्धसमाप्तीनंतर तो परत केला जावयाचा अशी ही कल्पना आहे. लोकांच्या पैशाची परस्पर बचत व गुंतवणूक करण्याची ही विस्तृत केलेली योजना आणि तिच्या योगानें चलन मर्यादित होण्यास व महागाई वाढण्याच्या प्रवृत्तीस आळा बसण्यास मदत होण्यासारखी आहे. मंडळ्यांनीं वाटावयाच्या डिव्हिडंडलाच कायदेशीर मर्यादा घालावी कीं काय हा वादग्रस्त प्रश्न आहे आणि त्यांची घटना व परिस्थिति हीं भिन्नभिन्न असल्यानें ह्या सर्वांस सारखाच लागू पडेल असा नियम करणें अवघड आहे. तथापि डिव्हिडंडचा विशिष्ट भाग भागीदारांच्या हातीं वापरण्यास जाऊं न देतां, तो त्यांच्या वतीनें बाजूस काढून ठेवण्याचें तत्त्व निरपवाद आहे.

सक्तीची बचत, तिची सरकारी रोख्यांत गुंतवण इत्यादि समाजांत खेळणाऱ्या फाजील चलनास पायबंद घालण्याचे उपाय कित्येकांचे मतें आवश्यक मालाचा पुरवठा अपुरा झाल्यानें त्याच्या किंमती चढल्या आहेत म्हणून महागाईवर खरा तोडगा उत्पन्नांत वाढ करणें हा आहे असें त्यांचें म्हणणें आहे. युद्धपरिस्थितींत सामान्य जनतेच्या उपयोगास अवश्य लागणाऱ्या पदार्थांचें उत्पादन, कितीहि प्रयत्न केला तरी, विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जाऊंच शकत नाहीं हें ते टीकाकार विसरतात. धान्यांच्या पिकांची पैदास वाढवण्याची खटपट गेल्या वर्षी झाली आणि यंदांही ती पद्धतशीर रीतीनें केली जात आहे. नवीन जमीन लागवडीखाली आणणें, चालू जमिनीची उत्पादनशक्ति वाढविणें इत्यादि बाबींवर प्रांतिक सरकारें खर्च करून शेतकऱ्यास जरूर त्या सवलती देत आहेत. गोरगरिबांच्या उपयोगासाठी स्वस्त कापड तयार करवून तें पुरवण्याची व्यवस्था होत आहे. पण अपरिहार्य झालेल्या चलनप्रसाराच्या मानानें उत्पादनांतली असली वाढ मर्यादितच राहणार हें लक्षांत ठेवलें पाहिजे. विशिष्ट मालाचा पुरवठा मर्यादित झाला असतां, त्याची किंमत चढावी हें स्वाभाविक आहे. पण सर्वच जिन्नस महाग होण्यास आणि त्यांची महागाई सारखी वाढत जाण्यास हें एक कारण अपुरें आहे. युद्धकालीन सरकारी कर्जामुळें पदार्थ विकत घेण्याची शक्ति म्हणजे चलन कांहीं वर्गांच्या हातांत फाजील खेळत आहे आणि त्याचा ताण मालाच्या पुरवठ्यावर पडत आहे. ह्या परिस्थितीकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. म्हणून ही शक्ति योग्य प्रमाणांत सरकारच्या हातीं कर्जाच्या मार्गानें गेल्यावांचून महागाईस आळा बसणार नाहीं हें उघड आहे.

युद्धकाळ हा मामुली आर्थिक व्यवहारांच्या नियमनाचा आणि नियंत्रणाचा काळ होय हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जनतेच्या किमान रहाणीची योग्य व्यवस्था लावली जाऊन उरलेली राष्ट्रीय आर्थिक शक्ति युद्धप्रयत्नांवर एकवटावी लागते. खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याचा प्रश्न घेतला तर असें दिसून येईल कीं, धान्यांची पैदास वाढवून त्यांची सर्व देशभर जरूरीप्रमाणें योग्य वाटणी करण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनें स्वतः उचलली आहे. देशाचे सोईस्कर असे सहा भाग पाडून त्यांतील धान्य वाटणीच्या व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी त्यानें सहा कमिशनर नेमले आहेत. प्रांतांतील अंतर्गत धान्यवाटणीची जबाबदारी अर्थातच त्यांच्या सरकारावर आहे. स्वतः कापडाच्या वाटणीबाबतहि अशाच प्रकारची व्यवस्था करण्यांत आली असून त्याच्या पुरवठ्याचें काम मध्यवर्ती सरकारनें स्वतःकडे घेतलें आहे. युद्धपरिस्थितींत योजनात्मक नियंत्रण किती आवश्यक आहे ह्याची कल्पना शिधापद्धति म्हणजे रेशनिंग अंमलांत येण्याचें अगत्य सर्वांस पटलें आहे ह्यावरून सहज येण्यासारखी आहे. मोठ्या शहरांत रेशनिंग अंमलांत आणण्याचें काम मोठ्या जिकीरीचें आहे आणि त्यामध्यें कित्येकांची गैरसोय होते. तथापि सामान्य बहुसंख्य जनतेच्या सोयीच्या दृष्टीनें रेशनिंगवांचून गत्यंतर नाहीं असें सर्वांस आढळून आलें आहे. नित्याच्या जीवनास आवश्यक असलेल्या जिनसांची किमान गरजांच्या प्रमाणांत अधिकारी रीतीनें समतेच्या पातळीवर वाटणी होणें हें रेशनिंगचें तत्व अनुभवानें आतां लोकांस पटल्यासारखें दिसत आहे. (समाप्त)

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु पक्षाकडून हवाई हल्ला झाला असतां त्यांत उडणार बाँबमुळें बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसींच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा निमिअम भरावा लागेल काय! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

### विमा कंपनीच्या

विमा पॉलिसींमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा निमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक. व्यवस्थापक



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२१ ए, सदाशिव, पुणें २.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, दसवनगुडी, बंगलोर. | नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार-संवर्धन-दुकानीं पहा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

१५१६४३

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १६ जून १९४३ अंक २४

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
भांडवल
अधिकृत व विक्रीस काढलेलें — रु. १०,००,०००
खपलेलें — रु. ६,७९,२००
वसूल झालेलें — रु. ३,३९,६००
एकूण खेळतें भांडवल रु. ५०,००,०००
शेअर्सः—प्रत्येकीं पांच रुपये वाढीनें विकले जातात. वाढीची रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागते.
बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.
मॅनेजर

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ४००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS.

**SERVANTS OF INDIA SOCIETY'S HOME, POONA 4.**

**ADMISSIONS TO STUDENTS** :—reading for the M. A. Examination by papers or by thesis in Economics. One scholarship of Rs. 25 p. m. to be awarded to research student.

D. R. GADGIL,
DIRECTOR.

# DECCAN INSTITUTE OF COMMERCE POONA.

**( 25 YEARS STANDING ).**

Opens on Thursday the 1st July. Students admitted for L. C. C., G. D. C., D. Com- ( I. M. C. ), R. A. ( 1st part ), G. D. C. and A., Short-hand and Typewriting. Classes in the morning and evening. Prospectus free on application.

592/3 Budhwar Peth, Opp. New English School, POONA. } Secretary.


# विविध माहिती

### सिव्हिक गार्ड

मुंबई प्रांतांतील एकूण सिव्हिक गार्डांची संख्या एप्रिल १९४३ अखेर ६,२१२ भरली.त्यांपैकीं १,०१४ मुंबई शहरांत व ५,१९८ इतर ठिकाणीं होते.

### संयुक्त राष्ट्रांस अमेरिकेचा अन्नपुरवठा

अमेरिकेच्या १९४३ मधील अन्नपुरवठ्यापैकीं २५% पुरवठा लष्करी मागणीसाठीं व लंड-उसनवार पद्धतीनें इतर देशांकडे पाठविण्यासाठीं राखून ठेवण्यांत आलेला आहे. १९४१ सालीं हें प्रमाण ४% व १९४२ सालीं १३% होतें. गेल्या दोन वर्षांत अमेरिकेनें ४५ लक्ष टन अन्न संयुक्त राष्ट्रांस पुरविलें आहे.

### युद्धोत्तर मिशनरी कार्य

मिशनऱ्यांच्या युद्धसमाप्तीनंतर परराष्ट्रांतील कार्याची आखणी करण्याकरितां इंटरनॅशनल मिशनरी कौन्सिलचे अमेरिकन सेक्रेटरी मि. जॉन डेकर, हे लंडन येथें आले आहेत.

### सिलोनकडे कापडाची निर्गत

सिलोनकडे एप्रिल ते जून, १९४३ ह्या तिमाहींत आणखी १० लक्ष वार हातमागाचें कापड पाठविण्यास हिंदुस्थान सरकारनें संमति दिली आहे. गिरण्यांतील व हातमागावरील मिळून सुमारें २८ लक्ष वार कापड १९४१-४२ मध्यें दरमहा सिलोनकडे गेलें. ऑक्टोबर ते डिसेंबर १९४२ मधील तिमाहींतील निर्गतीचा आंकडा १ कोटि, ६८ लक्ष वार इतका भरला. ह्यांपैकीं १ कोटि, १८ लक्ष वार कापड मद्रासमधून रवाना झालें व तें सर्व हातमागावरील होतें. ही निर्गत कमी करण्यासाठीं एप्रिल ते जून १९४३ मध्यें फक्त ४० लक्ष वार हातमागाचें कापडच पाठविण्यास सरकारनें मंजुरी दिली. हा आकडा भरतांच आणखी कापडाच्या निर्गतीस लायसेन्स देण्याचें बंद करण्यांत आलें. परंतु निर्गतीवरील नियंत्रणामुळें प्रारंभीं होणारी अडचण दूर करण्याचे उद्देशानें वर सांगितल्याप्रमाणें आणखी १० लक्ष वार कापडाच्या निर्गतीस सरकारनें परवानगी दिली आहे.

### बंगाल सरकारची मदतीसाठीं विनंति

बंगालनें सध्यांच्या तातडीच्या प्रसंगीं केलेला जादा खर्च व वादळग्रस्त लोकांसाठीं केलेला जादा खर्च भरून काढण्यासाठीं बंगाल सरकार मध्यवर्ती सरकारकडे मोठी रक्कम मदत मागणार असल्याचें समजतें.

### अमेरिकेंत चिनी लोकांना मुक्तप्रवेश

चिनी लोकांना अमेरिकेंत येण्यास असलेली बंदी उठविण्याच्या बिलावरील चर्चा अमेरिकन पार्लमेंटच्या इमिग्रेशन कमिटीनें तहकूब केली आहे. ह्या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल लावण्यासाठीं कमिटीची सभा लौकरच पुनः भरणार आहे. अमेरिकेंत आणखी अल्पसंख्याकांचे प्रश्न निर्माण होतील, ह्या मुद्यावर दक्षिणेकडील कांहीं सभासदांचा विलास विरोध आहे.

### हिंदी प्रश्नाचें अमेरिकेंत आकलन

" हिंदुस्थानासंबंधीं अमेरिकेंत बरेंच अज्ञान व गैरसमज होते, परंतु आतां तेथील मत बदललें आहे, [असें दिसतें.] प्रथम दिसला तितका हिंदुस्थानचा प्रश्न सोपा नाहीं हें त्यांस हळु हळु पटूं लागलें आहे. " लंडनमधील हिंदी हायकमिशनर, सर सॅम्युअल रंगनॅदन, हे अमेरिकेंतून नुकतेच परतले, त्यांनीं लंडनमध्यें वृत्तपत्र-प्रतिनिधींस वरील माहिती सांगितली.

### जनावरांची शिरगणति

इटलींतून सर्व जनावरांची शिरगणति तावडतोब करण्याचा हुकूम तेथील सरकारनें सोडला आहे. शहरांस सरकारमार्फत मांसाचा पुरवठा शक्य तितका मिळविण्याचा हा प्रयत्न आहे.

### व्हॅनिला आइसक्रीम

अमेरिकेंत तयार केल्या जाणाऱ्या आइसक्रीमपैकीं निम्म्यापेक्षां अधिक आइसक्रीमला व्हॅनिलाचा स्वाद दिलेला असतो.

### अमेरिकेंतील अर्भकांचा जन्म

अमेरिकेंत १९३५ सालीं जन्मलेल्या अर्भकांपैकीं दोन तृतीयांश अर्भकांचा जन्म घरींच झाला. १९४१ मध्यें मात्र निम्म्यापेक्षां अधिक जन्म इस्पितळांतच झाले.

### बँक ऑफ बरोडा लि. च्या भांडवलांत वाढ

बँक ऑफ बरोडा लि. नें डिफेन्स ऑफ इंडियाच्या ९४ अ नियमानुसार ८० हजार नवे भाग विक्रीस काढण्याची सरकारकडे परवानगी मागितली आहे. ही बँक बडोदे संस्थानांत १९०८ सालीं रजिस्टर झाली. तिचें अधिकृत भांडवल २ कोटि, ४० लक्ष रुपयांचें असून विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल १ कोटि, २० लक्ष रुपये आहे. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत १०० रुपये आहे. म्हणजे, नवीन विक्रीस निघावयांचें भांडवल ८० लक्ष रुपयांचें आहे.

### अमेरिकेची जर्मनीला समज

शत्रुपक्ष लढाईमध्यें विषारी वायूचा उपयोग करणार असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. संयुक्त राष्ट्रांपैकीं कोणाही विरुद्ध शत्रुपक्षानें विषारी वायूचा उपयोग केल्यास, अमेरिकेविरुद्धच आगळीक झाली असें समजलें जाईल, व जशास तसें हा न्याय तात्काळ अंमलांत आणला जाईल, असें प्रे. रूझवेल्ट यांनीं जाहीर केलें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... १८६ | कार्य–हिंदी विमा कंपन्यांची प्रगति—विजय टेक्स्टाइल्स लि. | |
| २ साखरेच्या पुरवठ्याविषयीं आश्वासन | ... १८७ | ६ मुंबई प्रांतांतील प्रमुख पिकें | ... १९० |
| ३ युद्धकालांतील चलन आणि कर्ज | ... १८८ | ७ सटाणा को. सीड सोसायटी | १९० |
| ४ आजचा स्वित्सरलंड | ... १८८ | ८ शेतकी कॉलेजची डेअरी | १९० |
| ५ स्फुट विचार दुसऱ्या आघाडीची तयारी–भारत सेवक समाजाचें | ... १८९ | ९ बँकिंग विषयक प्रश्न | १९१ |



# अर्थ

बुधवार, ता. १६ जून, १९४३


## साखरेच्या पुरवठ्याविषयीं आश्वासन

हिंदुस्थानांत स्वदेशी साखरेचें उत्पादन एवढ्या मोठ्या प्रमाणांत होतें कीं, तिचा तुटवडा पडूं नये आणि तिची विशेष महागाईहि वास्तविकपणानें होऊं नये. जकातीच्या संरक्षणाचे धोरणामुळें देशांत चोहोंकडे नवीन कारखाने निघत आहेत आणि जरूरीपेक्षां अधिक साखर तयार होत आहे, त्यासाठीं सरकारनें उत्पादनाच्या नियंत्रणाची व्यस्था करावी अशा सूचनाहि करण्यांत आल्या होत्या. हिंदुस्थानची कांहीं साखर बाहेरच्या देशांत गेल्यावांचून तिला चांगला भाव यावयाचा नाहीं आणि साखरेचे कारखानेहि चालावयाचे नाहींत असेंहि कांहीं धंदेवाले एकाकाळीं म्हणत होते. साखरेच्या कारखान्यांची उत्पादनशक्ति अलीकडे वाढली असतां आणि त्यांच्या संख्येंत भर पडली असतां तिची टंचाई व महागाई कां भासावी असा प्रश्न सहाजिकच उत्पन्न होतो आणि कांहीं साखर देशाच्या बाहेर जाते किंवा सांठवून ठेवण्यांत येते कीं काय अशा शंकेस जागा उत्पन्न होते. पुरवठा भरपूर असेल तर साखरेच्या वाटणीच्या पद्धतींत व व्यवस्थेंत दोष असला पाहिजे असें म्हणणें प्राप्त होतें. हिंदुस्थान सरकारच्या साखर-नियंत्रण अधिकाऱ्यांनीं प्रस्तुत विषयाचे संबंधांत माहिती नुकतीच प्रसिद्ध केली आहे ती उद्बोधक असली तरी तिच्या योगानें वरील शंकांचें समाधान होत नाहीं असें म्हणावें लागतें. ह्या माहितीप्रमाणें हिंदी साखर कारखान्यांचा हंगाम पुरा झाला असून, साखरेचें उत्पादन चांगलें आहे. गेल्या महिनाअखेर साखरेच्या एकूण उत्पादनापैकीं ४५ टक्के माल कारखान्यांच्या बाहेर पडला आहे आणि सर्व प्रांतिक बाजारांत भरपूर पुरवठा आहे. संयुक्त प्रांत व बिहार येथील कारखान्यांची साखर त्या प्रांतांच्या गरजेपेक्षां नेहमीच पुष्कळ अधिक असते आणि त्या मालापैकीं सुमारें अडीच लक्ष टन साखर येत्या पांच महिन्यांत बाहेर जावयाची आहे. हिंदी साखरेची निर्गत झाल्यामुळें तिचा देशांत तुटवडा पडतो ह्या समजुतीस अनुलक्षून सरकारी नियंत्रण अधिकारी म्हणतात, कीं वस्तुस्थिति अगदीं निराळी आहे. १९४३ सालांत सुमारें पावणे अकरा लक्ष टन साखरेचा पुरवठा होईल, त्यापैकीं अवघे १५ हजार टन म्हणजे पुरा दीड टक्का नाहीं एवढीच साखर बाहेर जाऊं दिली जाईल आणि ही निर्गत अफगाणिस्तान, इराणी आखात व सौदी अरेबिया ह्या शेजारच्या देशांत होईल. खाजगी रितीनें साखरेची निर्गत होण्यास बंदी करण्यांत आली आहे आणि वर सांगितलेली निर्गत सरकारी नियंत्रणाखालीं व्हावयाची आहे. आतांपर्यंत केवळ दीड हजार टन साखर यंदा बाहेर गेली आहे आणि ह्याशिवाय दोन हजार टन साखर सिलोनला उसनवारीनें देण्यांत आली आहे. हिंदी साखरेचें उत्पादन व पुरवठा ह्यांविषयीं वस्तुस्थिति वरीलप्रमाणें आहे तर हिंदी जनतेस जरूरी इतकी साखर मिळण्यास अडचण पडूं नये. ती पडत असल्यास सरकारीरीत्या त्यासंबंधांत समाधानकारक खुलासा होणें अगत्याचें आहे. उदाहरणार्थ, साखरेचें रेशन मुंबई शहरांत अपुरें असल्याची तक्रार आहे ती सहज दूर झाली पाहिजे आणि इतर ठिकाणीं असली ओरड ऐकूं येतां कामा नये.

इतर खाद्यपदार्थांच्या मानानें साखरेच्या पुरवठ्याची वांटणी एकूण परिस्थितीचा विचार करतां समाधानकारक रीतीनें होणें अपेक्षित आहे. ह्याचें कारण स्पष्ट आहे. जुन्या-पुराण्या पद्धतीनें बनविला जाणारा थोडा माल सोडला तर हिंदुस्थानांतली सर्व साखर कारखान्यांत आधुनिक पद्धतीनें तयार होते. सर्व कारखान्यांच्या उत्पादनाची माहिती उपलब्ध आहे. हिंदुस्थान सरकारच्या साखर-पट्टीच्या वसुलीपद्धतीमुळें कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या साखरेचा पूर्ण हिशेब लागतो. साखरेच्या मुख्य बाजारपेठा, त्यांतला मामुली उठाव, त्यांत व्यवहार करणारे घाऊक व्यापारी व दुकानदार ह्यांचा तपशील अनुभवानें माहीत झालेला आहे. साखरेच्या नियंत्रणासाठीं हिंदुस्थान सरकारचे स्वतंत्र अधिकारी आहेत. संयुक्त प्रांत आणि बिहार ह्यांमध्यें उसाच्या व साखरेच्या किंमती निश्चित करण्यांत येतात. रेल्वेची वहातुक सर्वस्वी सरकारच्या नियंत्रणाखालीं असून खाद्यपदार्थांच्या हालचालीस प्राधान्य देण्याचें धोरण त्यानें जाहीर केलें आहे. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतली असतां इतर खाद्यपदार्थांचें कांहींही असो, निदान साखरेचा योग्य पुरवठा सुरळीतपणानें होण्याचे मार्गांत दुर्लंघ्य अडचणी उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. असें आम्हीं वर म्हटलें आहे त्याची समज पटेल. अशा कांहीं अडचणी असतील तर त्या दूर होण्यासाठीं स्वतः कोशीस करून जनता व व्यापारी वर्ग ह्यांचें सहकार्य सरकारनें मिळविलें पाहिजे. त्याचप्रमाणें साखरेच्या वांटणीसंबंधानें होणाऱ्या तक्रारींबाबत योग्य खुलासाहि केला पाहिजे.

---

### सहकारी स्टोअर्स व विक्रीवरील कर

मद्रास प्रांतांतील सहकारी स्टोअर्सच्या प्रतिनिधींची एक परिषद् मद्रास येथें भरली होती, तिनें सहकारी स्टोअर्संना सेल्स टॅक्सची माफी करावी, अशी सरकारास विनंति करणारा ठराव पास केला आहे. स्टोअर्सच्या शाखा उघडण्यास त्यांस सरकारनें बिनव्याजी कर्ज द्यावें, अशीहि परिषदेची विनंति आहे. स्टँडर्ड क्लॉथ वाटण्यासाठीं ह्या स्टोअर्सचा उपयोग केला जावा, अशी परिषदेची सूचना आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ४ जून अखेर संपलेल्या आठवड्यांत ४० कोटि, १९ लक्ष रुपये किंमतीच्या १,२४,३४४ चेक्सची देवघेव झाली.

## युद्धकालांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज

### तिसरा व शेवटचा लेख

चलनविस्तारामुळें हिंदुस्थानांत महागाई वाढत आहे आणि तिच्या योगानें युद्धप्रयत्नांत अडचणी येत आहे, ह्यासाठी जनतेच्या हातांतलें चलन स्वतःकडे कर व कर्ज ह्यांच्या मार्गानें सरकारनें आकर्षून घ्यावें म्हणजे बाजारभाव चढण्याचें बंद होईल ह्या विषयावरील प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या नवीन पुस्तकावर* आम्हीं दोन परीक्षणात्मक लेख लिहिले आहेत. आजच्या लेखांत सदरहू पुस्तकाच्या दुसऱ्या व सूचनात्मक भागाच्या स्वरूपाचें दिग्दर्शन करावयाचें आहे. पहिल्या भागांतील विवेचनावर ह्या विधायक सूचना आधारलेल्या आहेत आणि त्यांचा हेतु फाजील चलनाचा ओघ परत सरकारी तिजोरीकडे वळवणें हा आहे. देशांत फाजील चलन खेळत असल्यानें बाजारभाव चढले आहेत हा सिद्धांत हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं प्रत्यक्ष रीतीनें मान्य केला नसला तरी ह्यासंबंधांत त्यांनीं कांहीं योजना अंमलांत आणल्या आहेत व दुसऱ्या आणण्याचा विचार चालवला आहे त्यावरून त्यांची गर्भित कबुली उघड होत आहे. आपण सुचवलेले उपाय एकसमयावच्छेदेंकरून एकजिनसी धोरण म्हणून सरकारनें योजावे, म्हणजेच त्याचें धोरण यशस्वी होईल असें प्रा. गाडगीळ ह्यांचें निक्षून सांगणें आहे. सरकारला मात्र हा सल्ला अजून चांगला पटलेला दिसत नाहीं आणि त्याचें धोरण अर्धवटपणाचें आहे. त्याची दिशा मात्र स्पष्ट आहे.

युद्धकालीन सरकारी आर्थिक धोरण त्रिविध असलें पाहिजे. (१) सरकारला युद्धासाठी खर्चास लागणारें उत्पन्न पूर्णपणें उभें केलें पाहिजे; (२) देशांतील उत्पादन शक्य तितकें वाढवलें पाहिजे आणि युद्ध चालवण्यास आवश्यक असलेल्या मालाच्या बनावटींवर तें एकत्रित झालें पाहिजे; आणि (३) देशांतील मालाचा उपलब्ध पुरवठा लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनास पोषक होऊन त्याची न्याय्य वाटणी जनतेमध्यें होईल अशी व्यवस्था हवी. लोकांच्या हातांत फाजील चलन खेळत राहातें तेव्हां हें त्रिविध उद्दिष्ट साधण्याच्या मार्गांत व्यत्यय येतो. शांततेच्या काळांत आपली प्राप्ती मालाच्या उत्पादनासाठी किंवा कौटुंबिक वापरासाठी वापरावी हें ठरवण्याचें पूर्ण स्वातंत्र्य व्यक्तीस असतें. युद्धपरिस्थितींत सरकारास हें स्वातंत्र्य मर्यादित करावें लागतें. आणि व्यक्तींनीं आपल्या हातांतला पैसा कसा व किती वापरावा हें त्यानें ठरवावयाचें असतें. म्हणजेच, करांच्या व कर्जांच्या स्वरूपांत विशिष्ट मर्यादेपलीकडची लोकांची प्राप्ती सरकारनें स्वतःच्या युद्धोपयोगाकरितां काढून घेणें आवश्यक होतें हें ओघानेंच आलें. श्रीमान लोकांवर कमाल प्रमाणांत कर, बाजारभावांचें पक्कें नियंत्रण, रॅशनिंग, सक्तीच्या बचतीच्या योजना, सरकारी कर्जांत जनतेच्या प्राप्तीची गुंतवण, ह्या उपायांची अंमलबजावणी सरकारनें कां व कशी केली पाहिजे ह्याचें विवेचन प्रा. गाडगिळांनीं सुबोध रीतीनें केलें आहे. सामान्य आर्थिक स्थितींतल्या वर्गास जाचक न होतां हें धोरण करें अंमलांत आणतां येईल हें त्यांनीं दाखवलें आहे. एका अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सरकारला योग्य सल्ला देणारें प्रस्तुत पुस्तक योग्य वेळीं लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल आम्ही प्रा. गाडगीळ ह्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

*"War and Indian Economic Policy" By Prof. D. R. Gadgil and Mr. N. V. Sovani—Gokhale Institute of Politics and Economics. Price Rs. 5/-.

## आजचा स्वित्सरलंड

स्वित्सरलंड हा देश तटस्थ असला, तरी शत्रुराष्ट्रीयांच्या प्रदेशानें तो वेढलेला आहे. जर्मनी, जर्मनीच्या अंकित असलेला फ्रान्स व इटली ह्यांचें कडें त्याच्या भोंवतीं आहे. स्वित्सरलंडच्या ४० लक्ष प्रजेस भयग्रस्तानीं घालण्यास भोंवतालच्या ह्या १२३ कोटि शेजाऱ्यांस कितीसा वेळ लागणार ! स्विस लोक शांततेचे भोक्ते व स्वतंत्र वृत्तीचे आहेत व त्यांस युरोपच्या वादळांत पडण्याची इच्छा नाहीं, परंतु त्यांच्यावर जर्मनीचें एकसारखें पिस्तुल रोखलेलें आहे. आज स्वित्सरलंडचा कारभार जर्मन मंत्री, बॅरन फॉन बिबेरा ह्यांचेच हातीं असल्यासारखा आहे. त्यानें स्वित्सरलंडला जर्मनीसाठी काम करणारें वर्कशॉपच बनविलें आहे. जर्मनीसेरीज इतर कोठेंहि माल निर्गत करण्यास जर्मनीची परवानगी लागते. स्विस कारखान्यांत जर्मन इन्स्पेक्टर तपासणीचें काम करीत आहेत. स्वित्सरलंडमध्यें बाकब कारागीर आहेत, त्यांस जर्मनींत कामासाठी नेण्याचा कसून प्रयत्न केला जातो. १९४१ पासून आतांपर्यंत सुमारें ८३ हजार स्विस कारागिरांनीं जर्मन निमंत्रण स्वीकारलें आहे. स्वित्सरलंड कच्च्या मालासाठी जर्मनीवरच अवलंबून आहे. जर्मनीनें ह्या गोष्टीचा फायदा घेऊन आपलें धोरण आखलें आहे. त्यामुळें स्वित्सरलंडला जर्मनीच्या ओंजळीनें पाणी पिणें भाग पडत आहे, जर्मनीसाठी उत्पादन न करणाऱ्या कंपन्या तेथें जवळजवळ नाहींतच. गेल्या थंडीमध्यें स्वित्सरलंडमध्यें विजेचा तुटवडा पडला. त्याचें कारण असें सांगण्यांत आलें कीं डोंगरांत पुरेसा पाऊसच पडला नाहीं. वास्तविक जर्मन कारखान्यांसाठी वीज वाहून नेण्यांत येत होती व इकडे स्विस लोक थंडीनें कुडकुडत होते. विजेचे स्टोव्ह व इतर उपकरणें वापरण्यास स्विस सरकारनें बंदी केली होती. स्विस कारखाने चालू रहाण्यापुरताच कोळसा जर्मनी स्वित्सरलंडकडे पाठवितो. पोर्तुगाल सोडला, तर युरोपांतील कोणत्याही देशापेक्षां स्वित्सरलंडमधील अन्नपुरवठ्याची परिस्थिति अधिक समाधानकारक आजवर होती परंतु ती हळूहळू बिघडत चालली आहे. स्वित्सरलंडमध्यें शांतता नांदणें जर्मनीच्याच हिताचें आहे. स्विस लोकांपैकीं बहुसंख्य लोकांस संयुक्त राष्ट्रांनीं युद्ध जिंकावें असेंच वाटतें, परंतु तेथील सरकारास शेजारच्या जर्मनीपुढें मान तुकविणें आज अपरिहार्य झालें आहे.

### म्हैसूर संस्थानांतील शिक्षणप्रसार

म्हैसूर संस्थानांत मार्च १९४२ अखेर ८,४३१ शिक्षणसंस्था होत्या व त्यांत ३,८२,७७९ विद्यार्थी होते. म्हणजे एका वर्षांत संस्थांचे संख्येंत २७३ ची भर पडली व विद्यार्थ्यांची संख्या १२,७९६ नें वाढली. विश्वविद्यालयास जोडलेल्या कॉलेजांत ४,२७५ मुलगे व ४२७ मुली होत्या. प्राथमिक शिक्षणावर संस्थानानें ६० लक्ष रुपये खर्च केले.

# स्फुट विचार

## दुसऱ्या आघाडीची तयारी

ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्याशीं वॉशिंग्टन येथें युद्धाविषयींच्या पुढील धोरणाची सविस्तर चर्चा करून स्वदेशीं परतल्यावर युरोपवरील स्वारीस लवकरच प्रारंभ होणार असा तर्क कित्येकांनीं केला होता. प्रत्यक्ष मि. चर्चिल ह्यांनीं युद्धपरिस्थितीचें सिंहावलोकन व स्पष्टीकरण एका विस्तृत भाषणाच्या द्वारें केलें तें त्यांच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून चढाईचें पण सावधगिरीचें होतें. ट्युनिशियांतील विजयानंतर मित्र राष्ट्रें शत्रूविरुद्ध मोठी मोहीम हातीं घेतील असें अनुमान काढण्यास मात्र त्यांत जागा होती. युरोपमध्यें शत्रूवर कोणत्या बाजूनें व कसा हल्ला होणार ह्याचें मित्रराष्ट्रांचे मुत्सद्दी गुपितच राखणार हें उघड आहे. पण युरोपांत दुसरी आघाडी चालू होणार अशी अपेक्षा मात्र आज चोहोंकडे आहे. उत्तर आफ्रिकेमधून जर्मन व इटालियन सैन्याची हकालपट्टी केल्यावर भूमध्य समुद्रावर पूर्णपणें आपलें वर्चस्व स्थापणें हें मित्र राष्ट्रांचें पहिलें महत्त्वाचें कार्य आहे आणि दुसऱ्या आघाडीची ती तयारीच आहे असें म्हटलें पाहिजे. तसेंच सिसिली व इटली ह्यांचे बाजूनें ह्या आघाडीस प्रारंभ व्हावयाचा म्हटलें तरी इटलीच्या भूमध्य समुद्रांत पसरलेल्या बेटांचा प्रथम पाडाव केला पाहिजे. मित्र राष्ट्रांच्या वैमानिकांनीं सिसिली व इटली ह्यांवर जोराचे हल्ले करून मुसोलिनीची लढाऊ शक्ति खिळखिळी केलीच आहे. ब्रिटिश आरमार व विमानदल भूमध्य समुद्रांत आतां एवढें सामर्थ्यवान आहे कीं पँटेलेरिया व लँपेड्यूसा हीं इटलीचीं बेटें त्यांनीं सहज सर करून टाकलीं आहेत. इटलीच्या मार्गावरचे हे टप्पे आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं आणि येथें जर्मनीस आपल्या दोस्तांस विशेष सहाय्य देतां आलेलें नाहीं. स्वतःच्या देशाच्या रक्षणाचीच विवंचना हिटलरला लागलेली आहे. ब्रिटिश व अमेरिकन विमानदलाचे हल्ले जर्मनीवर प्रत्यहीं चालू आहेत आणि रशियन आघाडीवर त्याची प्रगति होऊं शकलेली नाहीं. शत्रूची लढाऊ परिस्थिति अधिकाधिक प्रतिकूल होत चालली आहे आणि मित्र राष्ट्रांचें बळ व उत्साह सारखीं वाढत आहेत ह्यांत शंका नाहीं.

## भारत सेवक समाजाचें कार्य

कै. वा. नामदार गोपाळ कृष्ण गोखले ह्यांनीं १९०५ सालीं स्थापलेल्या भारत सेवक समाजाच्या स्थापनादिनाचे प्रसंगीं पुणें येथील त्या संस्थेच्या आश्रमांत गेल्या १२ तारखेस सभासदांनीं व मित्रांनीं दर वर्षाच्या प्रघातास अनुसरून केलेल्या कामाचा आढावा घेऊन विचारविनिमय केला व पुढील कार्याची रूपरेखा आखली. समाजाचे अध्यक्ष, ना. हृदयनाथ कुंझरू ह्यांनीं देशांतील एकूण परिस्थितीचें सिंहावलोकन आपल्या मुख्य भाषणांत केलें. भारत सेवक समाजाचें कार्य मुंबई, मद्रास, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत इत्यादि क्षेत्रांत नामदार गोखले ह्यांनीं घालून दिलेल्या तत्त्वांस व पद्धतीस अनुसरून चाललेलें आहे. हिंदी राष्ट्राची राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नति होऊन त्यास जगांत महत्वाचें स्थान प्राप्त व्हावें ह्याकरितां निरपेक्ष बुद्धीनें व स्वार्थत्यागपूर्वक संघटनेचें, मार्गदर्शनाचें व आवश्यक तेथें स्वतः प्रत्यक्ष काम करावयाचें ही समाजाच्या सभासदांची दैनंदिनी आहे. प्रत्येक प्रांतांतली परिस्थिति आणि गरजा ह्यांस अनुसरून समाजाच्या शाखांतील सभासद काम करतात. राजकीय मतप्रदर्शन, कायदेमंडळांतील काम, सहकार, ग्रामसुधारणा, दुष्काळपीडितांस मदत, कामकरी वर्गाचें संघटन, अस्पृश्य वर्गाची उन्नति, बालचमूचें संघटन, संस्थानी प्रजेच्या प्रश्नांचा विचार इत्यादि विविध बाबींचा अंतर्भाव यथास्थळ व यथाकाळ सभासदांच्या कार्यक्रमांत होत आला आहे. गाजावाजा न करतां केवळ कर्तव्यबुद्धीनें सभासद आपली कामगिरी बजावीत आहेत. जनतेची सहानुभूति आणि मदत ह्यांवर तिची यशस्विता अवलंबून रहाणें स्वाभाविक आहे. भारत सेवक समाजाच्या कार्यास आम्ही वाढतें यश इच्छितों.

## हिंदी विमा कंपन्यांची प्रगति

१९४२ सालीं हिंदी विमा कंपन्यांनीं मिळविलेल्या कामाचे आंकडे अद्याप प्रसिद्ध झालेले नाहींत; तथापि कांहीं अग्रेसर कंपन्यांच्या व्यवहाराचे आंकडे हातीं आले आहेत, त्यावरून हिंदी कंपन्यांनीं १९४२ सालीं चांगली प्रगति केली असल्याचें आढळून येतें. १९४० व १९४१ मध्यें युद्धजन्य परिस्थितीमुळें कंपन्यांच्या कामावर प्रतिकूल परिणाम झाला होता, परंतु आतां हिंदी कंपन्या पुनः चांगल्या रीतीनें काम मिळवूं लागल्या आहेत. कांहीं प्रमुख कंपन्यांसंबंधींचे आंकडे खालीं दिले आहेत.

हिंदी आयुर्विमा कंपन्यांस मिळालेलें काम

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| कंपनी | १९३८ | १९३९ | १९४० | १९४१ | १९४२ |
|---|---|---|---|---|---|
| ओरिएंटल | ९,७३ | ७,६६ | ७,४८ | ८,१९ | ९,५१ |
| हिंदुस्थान को. | ३,०५ | ३,१० | २,८२ | २,७० | २,८८ |
| न्यू इंडिया | १,५३ | १,५४ | १,४३ | १,७७ | २,११ |
| लक्ष्मी (१०महिने) | २,५३ | १,४३ | ८२ | १,०१ | १,२५ |
| बॉंबे म्युच्युअल | २,०२ | २,०३ | १,५१ | १,७१ | १,७३ |
| नॅशनल | १,७९ | १,६६ | १,५६ | १,६६ | १,३७ |
| भारत | २,२६ | २,०८ | १,५० | १,४० | १,२८ |
| वेस्टर्न इंडिया | ८४ | ७५ | ६१ | ९८ | ७५ |
| मेट्रॉपॉलिटन | ७३ | ७३ | ७१ | ७४ | ७६ |
| जनरल ॲशुरन्स | ५८ | ६४ | ६७ | ६८ | ७१ |
| एम्पायर ऑफ इंडिया(२२महिने | १,०९ | १,५० | १,३१ | १,३४ | १,१६ |

## दि विजय टेक्स्टाइल्स लि.

वरील कंपनीची दुसरी वार्षिक सभा शनिवार ता. १२ जून रोजीं कंपनीच्या कारखान्यामध्यें भरली होती. सभेनें ३१ मार्च, १९४३ अखेरचा १५ महिन्यांचा ताळेबंद मंजूर करून भागीदारांस ऑर्डिनरी व प्रेफरन्स भागांवर ६% डिव्हिडंड देण्याचें ठरविलें. श्री. जी. व्ही. वाळवेकर, श्री. व्ही. व्ही. पंडित व श्री. एम. आर. जोशी ह्या सेवानिवृत्त होणाऱ्या डायरेक्टरांची फेरनिवड झाली. गेल्या वर्षीचे ऑडिटर श्री. जी. डी. आपटे ह्यांची कंपनीचे ऑडिटर म्हणून पुनः नेमणूक करण्यांत आली. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें २८ हजार रुपये असून तिचेकडे ६२½ हजारांच्या ठेवी आहेत. कंपनीच्या मालमत्तेचा ७१ हजार रुपयांचा विमा उतरलेला असल्याचें अहवालांत म्हटलें आहे. कंपनीच्या कापडास येत असलेली वाढती मागणी पुरी

करण्यासाठी कंपनीनें आणखी २० माग मागवले त्यांपैकी ११ माग महत्त्वाचें वर्ष संपण्यापूर्वी चालू झाले. कंपनीच्या विक्रीचा आकडा ८८½ हजार रुपये आहे व त्यावर १८½ हजार रु. ठोक नफा व २,९१० रुपये निव्वळ नफा कंपनीस मिळालेला आहे. त्यांतून शेअर कमिशनची सर्व रक्कम खर्ची टाकून व ६% डिव्हिडंडची तरतूद करून गेल्या वर्षीचा नफा लिहून टाकण्यासाठी १,११८ रुपयांचा विनियोग केलेला आहे. वरील वृत्तांतावरून कंपनीच्या प्रगतीची कल्पना येईल. श्री. बाबासाहेब साळवेकर हे कंपनीचे चेअरमन आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील दक्ष बोर्डानें व मॅनेजिंग एजंट श्री. कवडीकर ह्यांनी कारखान्याची केलेली वाढ प्रशंसनीय आहे. कंपनीचे शेअरला चांगली मागणी येऊं लागली असून तिचेकडे ठेवीहि चालत येऊं लागल्या आहेत. हें कंपनीनें मिळविलेल्या लोकविश्वासाचें गमक आहे. कंपनीची भरभराट होवो, असें आम्ही इच्छितों.

## मुंबई प्रांतांतील प्रमुख पिकें

### ( १९४१-४२ )

मुंबई प्रांतांतील वेगवेगळ्या पिकांच्या लागवडीच्या क्षेत्राचा तक्ता खाली दिला आहे, त्यावरून १९४१-४२ मध्यें एकूण क्षेत्रांत पूर्वीच्या दहा वर्षांच्या सरासरीचे मानानें फारसा फरक पडलेला दिसत नाही. तांदुळाची लागवड पूर्वीइतकीच कायम राहिली. गहूं व बाजरी ह्यांची लागवड कमी झाली परंतु ज्वारीची लागवड वाढली.

| पिकांचें नांव | १९४१-४२ | १९४०-४१ | १९३०-३१ ते १९३९-४० (सरासरी) |
|---|---|---|---|
| | एकर | एकर | एकर |
| तांदूळ | १९,१५,३७० | १९,९९,८९१ | १९,८३,५७७ |
| गहू | १५,९३,८८७ | १७,५१,६१७ | १७,७७,३४७ |
| ज्वारी | ८६,५३,२४९ | ८१,५४,०९० | ८१,२५,४२३ |
| बाजरी | ३८,२२,१११ | ४०,८६,९२५ | ३९,२९,२११ |
| कपास | ४०,३७,५९१ | २८,८४,६६२ | ३७,९५,२३५ |
| हरवरा | ५,१५,९९४ | ५,८४,८७४ | ६,६४,११५ |
| तूर | ३,८०,११८ | ४,१२,९५८ | ४,०६,९७० |
| भुइमूग | १३,०९,६१० | १५,७९,८२३ | ११,५१,१११ |
| ऊंस | १,१३,४०१ | १६,८३६ | ७५,६४३ |
| तंबाखू | २,१०,२०७ | १,७३,९३५ | १,५५,३०० |

पावसाची परिस्थिति समाधानकारक नसल्याकारणानें उत्पादन अपेक्षेपेक्षां कमी आलें. तांदळाचें उत्पादन पूर्वीच्या वर्षांच्या मानानें २०·९% कमी झालें; गव्हाचें उत्पादन २३·३% कमी भरलें. बाजरीहि १२·५% कमी आली.

### कागदाची चणचण थोडी दूर होणार

बिनसरकारी परंतु आवश्यक अशा कामास पुरेसा कागद मिळत नाहीं. ही तूट शक्य तेवढी भरून काढण्यासाठी, सरकारी कामासाठी राखून ठेवावयाच्या हिंदी गिरण्यांच्या उत्पादनाचें प्रमाण ९०% चें ७०% करून लोकांस १०% ऐवजीं ३०% कागद उपलब्ध करून देण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### महाभारताचें रशियन भाषांतर

महाभारताचें रशियन भाषांतर करण्याचें काम चालू आहे.

## सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि. जि. नाशिक

ता. २८-४-४३ च्या अंकीं सदर सोसायटीसंबंधी माहिती व तिनें गेल्या ९ महिन्यांत विशेषतः केलेली कामगिरी व प्रगती दिलेलीच आहे. त्यानंतर पुन्हां २५ मेंबर्स नवीन केले म्हणजे आज ४३ क्रेडीट सोसायट्या व ११३ व्यक्तिशः असे एकूण १५६ मेंबर्स झाले आहेत. शेअर भांडवल त्यानंतर १० हजारांनीं वाढलें असून आज जवळ जवळ २५ हजारांचें झालें आहे त्यांत निम्में सोसायट्यांचे व निम्में व्यक्तिशः सभासदांचें आहे. सालअखेरपर्यंत एकूण २०० मेंबर्स व ३० हजार शेअर भांडवल करण्याचा निश्चय आहे.

संस्थेमुळें व्यापारी व शेतकरी लोकांत मालाच्या तारणावर कर्ज घेऊन किंमत आल्यावर मालविक्री करण्याची गोडी लागली आहे. धान्य, गूळ वगैरेचे अडतीचे व्यवहार होत नसत ते होण्यास सुरवात झाली. सारांश, अडतीनें मालविक्री करण्याची गोडी लागली असून चांगलें मार्केट निर्माण झालें आहे. त्याचा परिणाम मालेगांव-लासलगांव मार्केटवर झाला आहे.

संस्थेनें शेतकऱ्यांसाठी बीं-बेंणाचे, कपाशीचे व धान्याचे सांठे करून विक्री करण्याची तरतूद केलेली आहे. उसासाठी पेंड पुरविण्याची व्यवस्था केली आहे.

### पुणें येथील शेतकी कॉलेजची डेअरी

वरील डेअरी किफायतशीर धंदा म्हणूनच केवळ चालविली जात नसून, शेतकी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना डेअरीचें शिक्षण देण्याकडे तिचा उपयोग केला जातो. शेतकी कॉलेजांतील शेतकी विषयाचे प्रोफेसर डेअरीची व्यवस्था पहातात. डेअरींत सिंधी गाई व सुरती म्हशी आहेत व दुधाचा मुख्य पुरवठा म्हशींकडूनच होतो. प्रत्येक गाईच्या वार्षिक दुधाची सरासरी २,३५७ पौंड पडली; प्रत्येक म्हैस सरासरीनें दरसाल ३,०८४ पौंड दूध देते. १९४१-४२ मध्यें डेअरींतील जनावरांनीं ३,४२,५९६ पौंड दूध दिलें त्यांपैकीं १८,०४७ पौंड दूध वासरांस पाजलें. दुधाच्या उत्पादनाचा खर्च १०० पौंडांस १३·५२ रुपये आला व विक्रीचे १०० पौंडास १४·८७ रुपये मिळाले. डेअरीच्या आवारांत ४४ लक्ष, ८४ हजार पौंड गवत निघालें.

### औद्योगिक वांधे

मुंबई प्रांतांत गेल्या मार्च महिन्यांत ३९ औद्योगिक वांधे झाले त्यांत १४,४७९ कामगारांचे ५७,१२२ कामाचे तास बुडाले.

### मुंबई कॉर्पोरेशन

मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या सभासदांची मुदत १ एप्रिल, १९४२ रोजीं संपत होती ती दोन वर्षें वाढविली होती. आतां ती आणखी एक वर्ष वाढविण्यांत आली आहे.

### ऑल इंडिया मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्री, मुंबई

वरील चेंबरच्या दुसऱ्या वार्षिक सभेचे प्रसंगीं, मुसलमानांसाठी प्रांतनिहाय स्वतंत्र चेंबर्स असण्याची आवश्यकता अध्यक्ष, सर अब्दुल हलिम गझनवि ह्यांनीं प्रतिपादन केली. आतां आठ प्रांतांत मुसलमानांचीं स्वतंत्र चेंबर्स ऑफ कॉमर्स आहेत.

## इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची परीक्षा १९४३

### प्रॅक्टीस ॲन्ड लॉ ऑफ बँकिंग भाग, १ ला

प्रश्नः—किती प्रकारच्या हुंड्या प्रचारांत आहेत. प्रत्येकाबद्दल थोडथोडी माहिती द्या.

उत्तरः—देशी भाषेंत लिहिलेल्या 'बिल ऑफ एक्स्चेंज' ला हुंडी असें म्हणण्याचा प्रघात आहे. यांना निगोशिअेबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट लागू आहे परंतु त्यामुळें हुंड्या देखाड करणें, हुंडीचे पैसे पेढीवर भरणें वगैरे ज्या स्थानिक पद्धती अस्तित्वांत असतील त्यांस बाध येणार नाहीं. 'इन्स्ट्रुमेंट' मध्यें तशा प्रकारचा खुलासा केला असतां या पद्धती माळावयासहि. हरकत नाहीं. हुंड्यांचा प्रघात फार पूर्वीपासून हिंदुस्थानांत अस्तित्वांत आहे. पुष्कळसे व्यापारी हुंड्या विकण्याचा व विकत घेण्याचा धंदा करतात.

हुंड्यांचे खालील प्रकार कमी अधिक प्रमाणांत व्यवहारांत आहेत.

शहाजोग हुंडीः—या हुंडीचे पैसे हुंडी दाखवणाऱ्या कोणत्याही लायक इसमास मिळतात. या हुंडीचे पैसे देणाऱ्यावर त्यानें ते लायक इसमासच दिले आहेत कीं नाहींत हें पहाण्याची जबाबदारी पडते.

धनीजोग हुंडीः—ज्यानें रुपये भरून हुंडी घेतली आहे त्यासच ते रुपये मिळावे अशी व्यवस्था या हुंडींत केलेली असते.

नामजोग हुंडीः—या हुंडीमध्यें हुंडीचे पैसे ज्यांस द्यावे असें लिहिलेलें असतें त्यासच ते मिळतात.

निशाजोग हुंडीः—ज्याला हुंडीचे पैसे द्यावयाचे असतील त्याची ओळख पटण्यासाठी त्याच्या अंगावरील खाणाखुणा या हुंडींत लिहिलेल्या असतात. हुंडी घेऊन कोणीतरी भलतांच इसम येऊं नये व पैसे भलत्याच इसमास मिळूं नयेत अशासाठीं ही व्यवस्था असते.

हुंडीचे पैसे द्यावयास लागणाऱ्या कमी अधिक मुदतीवरून हुंड्यांचे खालील प्रकार पडतात.

हुंडी दाखवतांच जिचे पैसे मिळतात ती दर्शनी हुंडी. हिलाच चिठ्ठी असेंही म्हणतात. या हुंड्या विकत मिळण्याचा दरही बँकेच्या डिमांड ड्रॉफ्टपेक्षा कमी असतो व त्यामुळें व्यापाऱ्यांमध्यें या हुंड्यांचा प्रसार जास्त आहे.

ज्या हुंडींत हुंडी दाखवल्यापासून अगर लिहिल्यापासून अमूक दिवसांत पैसे द्यावे असें लिहिलेलें असतें तिला मुदतीची हुंडी म्हणतात.

ज्या हुंडींत हुंडी लिहिल्यापासून अमूक दिवसांनीं पैसे द्यावे असें लिहिलेलें असतें ती बंद मुदतीची हुंडी.

ज्या हुंडीचे पैसे पोचल्याचा जबाब राखिल्यास म्हणजे (पैसे भरून हुंडी घेणारास) आणून द्यावा लागतो ती जाबी हुंडी व तसा जबाब आणून देण्याची जींत आवश्यकता नसते ती बिनजाबी हुंडी.

पूर्वीच्या काळीं जलद वाहतुकीच्या साधनांचा अभाव व प्रवासांत येणारे निरनिराळ्या प्रकारचे अडथळे व अडचणींचे प्रसंग लक्षांत घेऊन हुंड्यांच्या व्यवहारांत जास्तींत जास्त सुरक्षितता येण्यासाठी हुंड्यांचे असे अनेक प्रकार अस्तित्वांत आले.

एच. व्ही सहस्रबुद्धे

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १८ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १९ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | २० धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | २१ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २२ शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २३ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २४ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २५ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २६ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २७ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २८ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २९ सटाणा („ „) |
| १३ बेलापूर („ „) | ३० कळवण („ „) |
| १४ राहुरी („ „) | ३१ लासलगांव („ „) |
| १५ भिवंडी („ ठाणें) | ३२ नांदगांव („ „) |
| १६ पालघर („ „) | ३३ दोहद („ पंचमहाल) |
| १७ कल्याण („ „) | ३४ कालोल („ „) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव घडून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमियम भरावा लागेल काय? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर




रहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक. व्यवस्थापक





## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.



## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें १.



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा—खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को—ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार—संवर्धन—गृहांत पहा.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हें पत्र पुणें, पेठ मांडुडां घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांडुडां, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख २३ जून १९४३ अंक २५

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**
पण
भिण्याचें कारण नाहीं!!!
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००
शेअर्सः—प्रत्येकीं पांच रुपये वाढीनें विकले जातात. वाढीची रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागते.
बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमीशनें करून दिली जाते.
मॅनेजर

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ६००; किंमत ६ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**
गिरगांव मुंबई नं. ४
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

**अमेरिकेचा प्रचंड युद्धखर्च**

१९४३ सालीं अमेरिका युद्धासाठीं जेवढा खर्च करील तेवढा प्रचंड खर्च जर्मनी, ग्रेटब्रिटन, रशिया, इटली, जपान, इत्यादि सर्व युद्धमान राष्ट्रांचा मिळूनहि होणार नाहीं, असें न्यूयॉर्क टाइम्स म्हणतो. अमेरिकेच्या खर्चाच्या प्रमाणांत त्याचें उत्पादन आहे, असें मात्र समजूं नये. कामगारांना प्रचंड मजुरी, ४० तासांच्या आठवड्यामुळें ज्यादा कामाबद्दल द्यावें लागणारें ज्यादा वेतन, इत्यादींमुळें खर्च फार होतो, असें न्यूयॉर्क स्टेट एकॉनॉमिक जर्नलचें म्हणणें आहे.

**कामगारांस एक आठवडा सुटी**

ग्रेटब्रिटनमधील कामगारांना चालू वर्षी त्यांच्या नेहमीच्या सुट्यांखेरीज आणखी एक आठवडा सुट्टी मिळणार आहे. सर्व कारखान्यांतील कामगारांना एकदम सुट्टी न देतां सरकारी अधिकाऱ्यांच्या संमतीनें कारखानदारांनीं सुटीचे दिवस ठरवावे म्हणजे गैरसोय होणार नाहीं, अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. लोकांनीं सुटीचे दिवस घरींच घालवावे, असा त्यांस सल्ला देण्यांत आला आहे. रेल्वेचा प्रवास त्यांनीं टाळावा व रेल्वेवर ताण पडूं नये, ह्यासाठीं ही सूचना आहे. तथापि कारखान्यांचे जवळपास, सायकलींच्या टप्प्यांत सहलींचे कार्यक्रम आखण्यांत येतील.

**पोलंडमधील निराश्रितांना आसरा**

पोलंडमधील निर्वासित निराश्रितांना कित्येक देशांच्या सरकारांनीं आश्रय दिला आहे. वेगवेगळ्या देशांत मिळून निर्वासितांचीं १५ केंद्रें आहेत, त्यांपैकीं ४ हिंदुस्थानांत आहेत. हिंदुस्थाननें ११ हजार एकूण निराश्रितांना आश्रय देण्याचें मान्य केलें आहे. त्यांपैकीं ४ हजार नवानगर, कोल्हापूर व कराची येथील कँपांत आले व त्यांतील २ हजार मेक्सिको व पूर्व आफ्रिका इकडे रवाना झाले व रशिया व पोलंड ह्यांचेमधील संबंध पक्के झाले म्हणजे १ लक्ष पोलिश निर्वासित वेगवेगळ्या कँपांत पाठविण्यांत येतील, त्यांपैकीं कांहीं हिंदुस्थानांतहि येतील. पोलंडचे लेबर खात्याचा मंत्री मि. स्टॅन्झी, हे पोलिश कँपांची पहाणी करीत आहेत. त्यांनीं पोलिश निर्वासितांना आश्रय देणाऱ्या देशांच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दिल्ली येथून ते लवकरच पूर्व आफ्रिकेकडे रवाना होतील.

**अमेरिकन युद्धकैदी**

अमेरिकन युद्धकैद्यांची संख्या इंटर नॅशनल रेड क्रॉसमार्फत आलेल्या माहितीप्रमाणें सुमारें १७ हजार आहे. त्यांपैकीं ११,३०७ जपानजवळ, ३,३१२ जर्मनीजवळ व, २,४६४ इटलीजवळ आहेत, एकूण कामास आलेल्यांची (मृत, जखमी व बेपत्ता) संख्या ८९,८५२ आहे.

**कॅनडाच्या नाविक बलाची वाढ**

युद्धास प्रारंभ झाल्यापासून अमेरिकेचें नाविक बल ३४ पट वाढलें आहे. आगबोटींची संख्या १५ची ५०० झाली व खलाशांची संख्या ६० हजारांवर गेली. १९४४ अखेर खलाशांची संख्या ९० हजारांवर जाईल.

**स्वित्झरलंडमध्यें जर्मन प्रचार**

स्वित्झरलंडमध्यें जमन प्रचारास सहाय्य करण्यासाठीं स्विस राजधानी बर्न येथें जर्मनांनें "इंटर-कॉंटिनेंटल" नांवाची बातमी संस्था स्थापन केली आहे.

**हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न**

१९४२-४३ मध्यें हिंदी रेल्वेजच्या हिशेबांत ३६½ कोटि रुपयांचा वाढावा अपेक्षित होता, परंतु प्रत्यक्ष वाढावा ४१ कोटि रुपयांवर जाईल अशी अपेक्षा फेब्रुवारी १९४३ मध्यें बजेटाचे वेळीं व्यक्त करण्यांत आली होती. १ एप्रिल ते २० मे १९४३ ह्या मुदतींत रेल्वेजना १९४२ च्या तत्सम मुदतींतील उत्पन्नापेक्षा ४½ कोटि रुपये अधिक मिळाले, ह्यावरून चालू वर्षी रेल्वेजचा वाढावा गेल्या वर्षीपेक्षा पुष्कळच अधिक उरेल असें दिसतें. अमेरिकेंतून इंजनें आलीं म्हणजे रेल्वेजचें उत्पन्न आणखी वाढेल. दहा मीटर गेज इंजनें येऊन दाखल झालीं असून तीं कामासहि लागलीं आहेत, असें समजतें.

**ट्युनिशियांत शत्रुपक्षाची हानि**

ट्युनिशियांत शत्रुपक्षीयांच्या मारलेल्या व कैद केलेल्या सैनिकांचा आकडा ३,४१,००० वर गेला आहे. मि. चर्चिल ह्यांनीं सांगितलेला २ लक्ष, ४८ हजार हा आकडा ५ मेनंतर कैद केलेल्या सैनिकांचा होता. त्यापूर्वी मृत झालेले ५० हजार व कैद झालेले ४३ हजार त्यांत मिळविले पाहिजेत.

**"आधीं इतर, आपण शेवटीं"**

अन्नाची वाटणी व रेशनिंग ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकारास सल्ला देण्याकरितां ब्रिटिश अन्न खात्याचे तज्ञ, मि. कर्बी, हे हिंदुस्थानांत येऊन दाखल झाले आहेत. "आधीं इतर, आपण शेवटीं" हें ध्येय सध्या लोकांनीं ठेवलें पाहिजे, असें ते एका मुलाखतींत म्हणाले, "व्यापाऱ्यांनीं किंमती माफक ठेवाव्या, उत्पादकाला योग्य किंमत मिळाली पाहिजे व कोणाची उपासमार होतां कामा नये" हें अन्नविषयक प्रश्नांचें सार आहे असेंहि त्यांनीं सांगितलें.

**कपाशीची लागवड कमी करण्यास उत्तेजन**

आखूड धाग्याच्या कपाशीचे ऐवजी धान्याची लागवड व्हावी, ह्या हेतूनें मुंबई सरकारनें बक्षिसाची एक योजना आखली आहे. कपाशीचें क्षेत्र कमी होऊन ज्या खेड्यांत धान्याचा पेरा सर्वांत अधिक वाढेल त्या खेड्यांस बक्षीस दिलें जाईल. आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड ज्यांत होते असे मुंबई प्रांतांत ५५ तालुके व ६ पेटे आहेत. प्रत्येक तालुक्यांत १ हजार रुपयांचीं व प्रत्येक पेट्यांत ५०० रुपयांचीं बक्षिसें वाटलीं जातील. अशा रीतीनें खर्चिल्या जावयाच्या ५८ हजार रुपयांची ग्रँट हिंदुस्थान सरकारनें मुंबई सरकारास दिली आहे. प्रत्येक तालुक्यांत २५० रुपयांचें एक, १५० रुपयांचें एक, १०० रुपयांचें एक, व ५० रुपयांचीं दहा अशीं बक्षिसें ठेवण्यांत येतील. प्रत्येक पेट्यांतील बक्षिसें २५०, १५० व १०० रुपयांचें प्रत्येकीं एक ह्याप्रमाणें तीनच असतील.

**अमेरिकन लोकांची वाढती प्राप्ती**

अमेरिकेंतील लोकांच्या प्राप्तीमध्यें कशी वाढ होत चालली आहे, त्याची कल्पना हा कर भरणाऱ्या लोकांची संख्या फुगत चालली आहे, ह्यावरून स्पष्ट होईल.

| वर्ष | इनकमटॅक्स भरणारे लोक |
| --- | --- |
| १९४० | ३८,९६,४३५ |
| १९४१ | ७४,३७,३०७ |
| १९४२ | १,६७,६०,८६५ |
| १९४३ | २,७०,००,००० (अंदाज) |

प्राप्ती वाढली की घरभाड्यावरील खर्च वाढतो, तो इतका की पहिल्या गटापेक्षां चवथा गट तिपटीनें घरभाडें देतो. त्यामुळें इतर बाबींवरील खर्चाचें प्रमाण जरूरीइतकें वाढत नाहीं. कामकरी वर्गाचे मानानें मध्यम वर्गावर घरभाड्याचा बोजा फारच मोठा पडतो. पाश्चिमात्य देशांत त्याचें प्रमाण १०% पेक्षां अधिक भरत नाहीं.

मुंबई शहरांतील गुजराती वस्ती ज्या विभागांत केंद्रित झाली आहे, तो मुंबईतील सर्वांत ज्यास्त दाट वस्तीचा भाग आहे. प्रत्येक एकरांत तेथें ४०·२ इमारती आहेत. सबंद मुंबई शहराची त्याबाबत सरासरी फक्त ३·२ एवढीच आहे. बहुतेक कुटुंबांच्या खोल्यांत पुरेसा उजेड व हवा हीं नाहींत. स्नानाच्या जागा फारच लहान असतात.

### बिऱ्हाडांचें स्वरूप

बिऱ्हाडांतील माणसांची संख्या, खोल्यांचा आकार व त्यांची संख्या, खेळत्या हवेची सोय, स्वच्छता, बिऱ्हाडाचा प्रकार इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या, तर खालील निष्कर्ष निघेल:—

| गट | प्रत्येक गटांतील बिऱ्हाडांचें प्रमाण ( % ) | | |
|---|---|---|---|
| | वाईट | बरें | चांगलें |
| १ | ७८ | १४ | ८ |
| २ | ५४ | २६ | २० |
| ३ | ४० | ३३ | २७ |
| ४ | २७ | २७ | ५६ |
| सरासरी | ५० | २६ | २४ |

### दाट वस्ती

म्हणजे, शेकडा ५० कुटुंबांची रहाण्याची जागा "वाईट" ह्या सदरांत येते. सरासरी उत्पन्नाच्या एक पंचमांशाइतकी रकम भाड्यासाठीं खर्च केली तरी, समाधानकारक रहाण्याची सोय होत नाहीं, असा त्याचा अर्थ आहे. बिऱ्हाडांतील दाटीची कल्पना खालील आकड्यांवरून येईल. फक्त ९% लोकांच्या बिऱ्हाडांत तीन खोल्या आहेत. प्रत्येक माणसाचे वाट्यास ७′ × ७′ एवढी जागा येते; त्यांतच मोरी व स्वयंपाकघर ह्यांचा समावेश होतो. ही सरासरी झाली; गरीब कुटुंबांच्या खोल्यांतील दाटी अर्थातच ज्यास्त आहे. १०० चौरस फूट जागेस ७·६ रुपये भाडें सरासरीनें पडतें. तेव्हां प्रत्येक कुटुंबास पुरेशी जागा पाहिजे असल्यास, सध्याच्या दुप्पट भाडें त्यास द्यावें लागेल. भाड्यासाठीं येणाऱ्या मोठ्या खर्चामुळें अन्न व इतर आवश्यक बाबींवरील खर्चांत काटकसर करणें भाग पडून लोकांची रहाणी खालावते, हें उघड आहे. दाट बिऱ्हाडांचा प्रकृतीवर दुष्परिणाम होतो, हेंहि पहाणींत दिसून आलें आहे. फक्त ३१·७ लोकांची प्रकृति समाधानकारक म्हणतां येईल. मृत्यूचें भारी प्रमाण हाहि शहरी दाट वस्तीचाच एक परिणाम आहे. (अपूर्ण)

### हिंदी युद्धकर्जांचा आकडा

हिंदुस्थानांतील सर्व प्रांत व संस्थानें प्रांत मिळून एप्रिल, १९४१ अखेर १,५२,४५,०१,००० रुपयांचें युद्धकर्ज रोखे खपले आहेत.

### युद्धाचा ग्रेटब्रिटनमधील विमा कंपन्यांवर परिणाम

" कंपनीला गेल्या वर्षापेक्षा जास्त काम मिळालें आहे. कंपनीच्या नोकर वर्गापैकीं अधिकाधिक लोक लष्करांत दाखल होत आहेत. मूळ नोकरांपैकीं आतां फक्त ३०% नोकरच शिल्लक राहिले आहेत. जास्ती वेळ काम, तात्पुरत्या नेमणुका व शास्त्री तात्पुरत्या बंद करणें, ह्या मार्गानें हा प्रश्न सोडविण्यांत येत आहे. काम करणारे नोकर कंपनीच्या विमेदारांची शक्य तेवढ्या कसोशीनें सेवा करीत आहेत. ॲक्चुअरीच्या अपेक्षेइतकेच प्रत्यक्ष मृत्यू अनुभवास आले. सरेंडर केलेल्या पॉलिसींची संख्या समाधानकारक वाटण्याइतकी अल्प आहे. सरकारी कर्जरोख्यांत कंपनी अधिकाधिक रकमा गुंतवीत आहे. " इक्विटि अँड लॉ लाइफ अॅ. सोसायटीचे अध्यक्ष सर जिऑफ्रे एलिस, ह्यांचें वार्षिक सभेंत भाषण.

## पाहिजेत

पश्चिम खानदेश व नाशिक जिल्ह्यांतील जरीला कॉटन सेल सोसायट्यांकरितां सेक्रेटरीच्या ४ जागा भरावयाच्या आहेत. सेक्रेटरीच्या जागेचा पगार द. म. रु. ४० राहील व शिवाय वेळोवेळीं होणाऱ्या सरकारी ठरावाप्रमाणें महागाई भत्ताही मिळेल. उमेदवार व्ह. फायनल परीक्षा पास असले पाहिजेत व त्यांना इंग्रजी भाषेचें साधारण ज्ञान असलें पाहिजे. कोऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या सेक्रेटरीची परीक्षा पास असलेले व सोसायटीचे हिशोबाचा अनुभव असलेले व कपाशीच्या लागवडीसंबंधीं माहितगार अशा उमेदवारास अगोदर पसंत केलें जाईल. या जागा ता. ३१–३–१९४५ पर्यंतच्या मुदतीच्या आहेत. उमेदवारांनीं वय, जात, लायकी व पूर्वानुभव अर्जांत नमूद करून लायकीच्या दाखल्यासह अर्ज खालीं सही करणार यांचेकडेस ता. १५–७–१९४३ चे आंत पोहचतील अशा बेतानें पाठवावेत. अर्जदारांस भेटीसाठीं बोलविल्यास स्वखर्चानें यावें लागेल.

- W. D. SALUNKHE

धुळें, ता. १६-६-१९४३ असिस्टंट रजिस्ट्रार, को. सो. धुळें.

## The Willingdon College, Sangli

Reopens for the academic year on 30th June 1943. The registration of names will commence on 15th June. The college provides for instruction in the Arts and Science courses in the first two years, for B.A. Degree courses, pass and Honours, and for Post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12/- for a double room and Rs. 15/- for single room Further information can be had on application.

Separate accommodation for Lady students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the College Premises.

V. K. GOKAK,
Principal

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुपक्षाकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव पावाकून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ } वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक





## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.



वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.



## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस. बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.


हें पत्र पुणें, पेठ मांवुडां प. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विट्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांवुडां, प. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

रा. स. ग्रं. पुणे ११७१८२

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख ३० जून, १९४३ | अंक २६

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ इंडिया लि.
[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.
मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.
इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).
लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.
डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :
दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.
विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करतेः सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.
बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.
एजंटः—टी. आर. लालवाणी.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

The Deccan Education Society's
COLLEGE OF COMMERCE POONA

Affiliated to the University of Bombay, will start work from 30th June 1943.

Registration of names in the First Year and Intermediate Commerce Classes commences from 20th June.

Arrangements have been made for instruction in Kannada and Gujarati.

Hostel Accommodation for eighty students is available.

D. G. KARVE
Principal.

DECCAN INSTITUTE OF COMMERCE POONA.
( 25 YEARS STANDING ).

Opens on Thursday the 1st July. Students admitted for L. C. C., G. D. C., D. Com- ( I. M. C ), R. A. ( 1st part ), G. D. C. and A., Short-hand and Type-writing, Classes in the morning and evening. Prospectus free on application,

592/3 Budhwar Peth, Opp. New English School, POONA. } Secretary.

## विविध माहिती

### टाटा कंपनीचें डिव्हिडंड

| भागाचा प्रकार | सुचविलेला दर |
|---|---|
| पहिले प्रेफरन्स भाग (प्रत्येक भाग १०० रु. चा) | ९ रु. ( प्राप्तीवरील कर वजा करणेचा ) |
| दुसरे प्रेफरन्स भाग (प्रत्येक भाग १०० रु. चा) | ७½ रु. ( प्राप्तीवरील कर वजा करणेचा ) |
| ऑर्डिनरी भाग (प्रत्येक भाग ७५ रु. चा) | ३३ रु. ( करमाफ ) |
| डिफर्ड भाग (प्रत्येक भाग ३० रु. चा) | १२९ रु. ८ आ. ९ पै (करमाफ) |

डिव्हिडंडचा सुचविलेला दर प्रत्येक भागासाठी आहे; भागाची दर्शनी किंमत लक्षांत घेऊन शतमानानें किती डिव्हिडंड पडलें तें लक्षांत येईल.

### टेक्स्टाइल कंट्रोल बोर्ड

कापडाच्या धंद्यावरील सरकारी नियंत्रणाबाबत हिंदुस्थान सरकारनें गिरणीवाल्यांशीं वाटाघाटी करून योजना ठरविली व तिला अनुसरून डिफेन्स ऑफ इंडिया नियमाखालीं एक हुकूम काढला. २५ सभासदांच्या एक नियंत्रक मंडळाच्या नेमणुकीची योजना त्यांत जाहीर झाली. आतां ह्या मंडळाच्या सभासदांची यादी प्रसिद्ध झाली आहे. श्री. कृष्णराज एम. ठाकरसी हे बोर्डाचे अध्यक्ष नेमण्यांत आले आहेत. कापडाच्या गिरणीवाल्यांचे १५ प्रतिनिधी, ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनचा एक प्रतिनिधि, इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचा एक प्रतिनिधि, ग्राहकांतर्फे एक प्रतिनिधि, कामगारांच्या हितसंबंधाचे दोन प्रतिनिधी, व्यापाऱ्यांचे दोन प्रतिनिधी, रिजनल कंट्रोलर ऑफ रेल्वे प्रॉपर्टीज, अशा तेवीस लोकांच्या नेमणुका झालेल्या असून ग्राहकांचा आगखी एक प्रतिनिधि व हातमागाच्या धंद्याचा एक प्रतिनिधी ह्यांचीं नांवें अद्याप प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत.

### मुंबई शहरांत स्वस्त कापडाचा पुरवठा

मुंबई शहरांतील स्थानिक नागरिकांस स्वस्त दरानें कापड पुरविण्यासाठी मुंबईच्या गिरणीवाल्यांच्या संघानें एक योजना आंखली आहे, ती पुढें मुंबईच्या उपनगरांतहि सुरू केली जाण्याचा संभव आहे. रेशनकार्डे दाखल करणारांस प्रत्येकीं ठराविक प्रकारचें १८ वार कापड दर सहामाहीस मिळेल. दोन वर्षांवरील परंतु बारा वर्षांखालील मुलांस प्रत्येकीं ९ वार कापड मिळूं शकेल. हें कापड वाटण्यासाठीं मुंबईच्या वेगवेगळ्या विभागांत मिळून २५ दुकानें उघडण्यांत येणार आहेत.

### कापड व सूत ह्यांचे वायद्याचे करार

कापड आणि सूत ह्यांचे वायद्याचे करार बंद करणारा एक हुकूम सरकारनें काढला आहे. अगोदरच करण्यांत आलेले वायदे पुरे होण्यास प्रत्यवाय नाहीं "पुढील कोणत्या तरी तारखेस प्रत्यक्ष माल देण्याचा करार म्हणजे वायद्याचा करार" असा खुलासा हुकुमांत करण्यांत आलेला आहे.

### शेतीसुधराईची योजना

ग्रेटब्रिटनमधील शेतीसुधराईसाठी एक चार वर्षांची योजना आंखण्यांत येत आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें १८ जून अखेर संपलेल्या आठवड्यांत २९ कोटि, ३९ लक्ष रुपये किंमतीच्या १,२२,४०१ चेक्सची देवघेव झाली.

### पेट्रोल पेवजी खोबरेल

खोबरेल तेलावर मोटार चालविण्याचे प्रयोग पनामरम ( मलबार ) येथें मि. नायर हे करीत आहेत व त्यांत त्यांस यश येत आहे, असें समजतें. एक गॅलन खोबरेलावर २६ ते ३० मैल मोटार चालूं शकते, असें त्यांचें म्हणणें आहे

### जर्मनीमध्यें लाकडाचा तुटवडा

लाकडें जाळून प्रोड्यूसर गॅसवर चालणाऱ्या वहानांची संख्या जर्मनीमध्यें इतकी वाढली आहे कीं, आतां तेथें लाकडाचा तुटवडा पडूं लागला आहे.

### स्ट्रॉ प्रॉडक्ट्स लि., भोपाळ

१९४२ अखेर वरील कंपनीस ७½ लक्ष रुपये नफा झाला. तिनें ५०% दरानें डिव्हिडंड वाटलें. गेल्या वर्षाचा डिव्हिडंडचा दरहि ५०% च होता. १९३९ सालीं कारखाना सुरू झाला व भागीदारांस एवढ्यांतच त्यांच्या भांडवलावर १२०% रक्कम मिळाली आहे. ७½ लक्ष रुपयांच्या भांडवलावर ९ लक्ष रुपये डिव्हिडंड वाटलें गेलें आहे.

### शेतकऱ्यांस चांगल्या बियांचा स्वस्त दरानें पुरवठा

हिंदुस्थान सरकारनें मुंबई सरकारास, शेतकऱ्यांस सवलतीच्या दरानें सुधारलेल्या धान्यांचें बीं वाटण्यासाठीं २,२१,४५९ रुपये दिले आहेत. १९४२-४३ मध्यें असल बी खरेदीसाठीं मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याचे हवालीं ११,१२,००० रुपये करण्यांत आले होते. शेतकऱ्यांना दिलेल्या सवलतीमुळें सरकारावर ४,१७,००० रुपयांच्या खर्चाचा बोजा पडला. चालू मोसमांतहि सवलती चालू ठेवण्यांत येणार आहेत व त्याप्रित्यर्थ येणारा तोटा सुमारें ३,३०,००० रुपये भरेल.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २०२ |
| २ सहकारी इन्स्टिट्यूटचा रौप्यमहोत्सव | २०३ |
| ३ सहकारी प्रश्नांची चर्चा | २०४ |
| ४ दुधाच्या भेसळीस बंदी | २०४ |
| ५ जनावरांच्या रक्ताचा मनुष्यास उपयोग | २०४ |
| ६ स्फुटविचार ... | २०५ |
| मुंबई सहकारी विमा सोसायटी, लि.—रस्त्यावरील वहातूक वाढविण्याचा सल्ला—मुंबईतील गिरण्यांची साप्ताहिक सुटी—कापड व सूत बाजारांत कायदा बंदी | |
| ७ भांडवल विकण्यास सरकारची परवानगी | २०६ |
| ८ शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति व कर्जबाजारीपणा | २०७ |
| ९ बँकर व त्यांचीं कर्तव्यें | २०८ |

अर्थ

बुधवार, ता. ३० जून, १९४३

# मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचा रौप्यमहोत्सव

## २५ वर्षांचा आढावा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची स्थापना जुलै, १९१८ सालीं झाली, त्या गोष्टीस येत्या जुलैमध्यें २५ वर्षें पुरीं होतील. ता. १३ जुलै रोजीं इन्स्टिट्यूटचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत येणार आहे. इन्स्टिट्यूटच्या कार्याचें क्षेत्र सबंद मुंबई प्रांत हें असल्यानें व इन्स्टिट्यूटनें सबंद प्रांतामध्यें गेलीं २५ वर्षें सहकारी प्रचाराचें काम अविरत केलें असल्याकारणानें, इन्स्टिट्यूटच्या रौप्यमहोत्सवांत मुंबई प्रांतांतील सर्व सहकारी संस्थांनीं सहभागी व्हावें व उत्सव सर्व ठिकाणीं साजरा करण्यांत यावा, हें उचित आहे. ज्युबिलीचा मुंबईमधील मुख्य कार्यक्रम ज्युबिलीच्याच दिवशीं, म्हणजे ता. १३ जुलै रोजीं, होणार असला तरी इतर ठिकाणीं तो त्याच दिवशीं झाला पाहिजे, असें नाहीं. स्थानिक सोयी-गैरसोयी लक्षांत घेऊन त्याचा दिवस निश्चित करण्यांत यावा. इन्स्टिट्यूटनें गेल्या पंचवीस वर्षांत अनेक अडचणींना तोंड देऊन भरीव कामगिरी केली असली, तरी रौप्यमहोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यास सद्यःस्थिति अनुकूल नाहीं हें कोणीहि मान्य करील. तथापि, ठिकठिकाणचे सहकारी कार्यकर्ते सभा भरवून ज्युबिली साजरी करतील, अशी अपेक्षा आहे.

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या प्रत्यक्ष स्थापनेचें श्रेय कोणास द्यावयाचें, हें ठरविणें कठीण आहे. १९१७ सालीं भरलेल्या मुंबई प्रांतिक सहकारी परिषदेनें रा. ब. एस. एस. तालमाकी ह्यांच्या "सहकारी सोसायट्यांचीं सामाजिक व शैक्षणिक कार्यें" ह्या निबंधास अनुसरून इन्स्टिट्यूटच्या स्थापनेस मान्यता देणारा ठराव पास केला. इन्स्टिट्यूटच्या स्थापनापत्रकांत तिचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणें नमूद करण्यांत आले होते:—(१) सर्व प्रकारच्या सहकारी उपक्रमांस प्रोत्साहन देणें, (२) सहकारी प्रचार, शिक्षण व चौकशी हीं अंगावर घेणें व (३) सहकारी चळवळीसंबंधीं सहकारी लोकांचें स्पष्ट मत निर्भीडपणें मांडणें. इन्स्टिट्यूटच्या घटनेंत पुढें दोनदां महत्त्वाचे बदल झाले, तरी संस्थेचे मूळ उद्देश विशेष बदललेले नाहींत. मि. एस. ए. बेल्वी ह्यांनीं बाँबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्लीच्या सप्टेंबर, १९१७ च्या अंकांत एक लेख लिहून, सर होरेस प्लंकेट ह्यांनीं आयर्लंडमध्यें स्थापलेल्या संस्थेच्या स्वरूपाची संस्था येथें स्थापावी, असें सुचविलें होतें. इन्स्टिट्यूटच्या स्थापनापत्रकाच्या प्रसिद्धीकरणानंतर त्यांनीं ह्याच विषयावर पुनः जून, १९१८ मध्यें लेख लिहून खऱ्या प्रातिनिधिक मध्यवर्ती संस्थेच्या महत्त्वाचें विवरण केलें.

सहकारी चळवळ ही वस्तुतः लोकांची चळवळ आहे व तीवरील सरकारी अधिकारी हा तात्पुरता, लोकांमध्यें सहकाराचीं बीजें नीट रुजेपर्यंतचाच आहे, अशी सरकारची प्रारंभीची भूमिका होती. लोकांना अनुभव मिळून सोसायट्या स्वतःचे पायावर उभ्या राहूं लागल्या, म्हणजे रजिस्ट्रारच्या नियंत्रणाचें कारण उरणार नाहीं अशी कल्पना होती. रजिस्ट्रारकडे सहकारी चळवळीचें नियंत्रण होतें, तें हळुहळु इन्स्टिट्यूटकडे म्हणजे सहकारी चळवळीच्या प्रातिनिधिक संस्थेकडे यावें, अशी अपेक्षा होती, असें दिसतें. गेल्या पंचवीस वर्षांचे अवधींत ह्यासंबंधांत किती प्रगति झाली आहे? सहकारी चळवळीनें किती मूळ धरलें आहे? सरकारी देखरेखीची आवश्यकता कितपत नाहींशी झाली आहे? सहकाराची मुख्य कल्पनाच हिंदी मनोवृत्तीशी विसंगत आहे काय? इत्यादि प्रश्नांचा विचार करण्यास इन्स्टिट्यूटचा पाव शतकाचा इतिहास उपयुक्त होणार आहे.

सहकारी चळवळ यशस्वी होण्यावरच हिंदी शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नति अवलंबून आहे, असें कित्येक वेळां म्हटलें जातें. सहकाराचा अवलंब केल्यानें सर्व प्रश्न चुटकीसरशी सुटतील असेंहि विधान कधीं कधीं केलें जातें. हिंदी सहकारी चळवळीचा इतिहास काय सांगतो? हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचा पाया सरकारी नेतृत्वाखालीं घालण्यांत आला व प्रांतिक सरकारें ह्या चळवळीवर देखरेख करण्यासाठी स्वतंत्र सहकारी खातीं चालवितात. खेडेगावीं पतपेढ्यांची प्रगति शहरी सोसायट्यांचे मानानें असमाधानकारक आहे. शेतीच्या उत्पन्नाचा अनिश्चितपणा हें त्याचें प्रमुख कारण आहे. केवळ शेतीस स्वस्त भांडवलाचा पुरवठा केल्यानें शेतकऱ्यांचा प्रश्न सुटत नाहीं. त्याच्या आर्थिक प्रश्नास जितक्या बाजू असतील, तितक्या बाजूंनीं त्यावर उपाययोजना केली पाहिजे. शेतीचें उत्पादन वाढलें पाहिजे, शेतकऱ्यास काटकसरीचें महत्त्व पटलें पाहिजे व त्याची कार्यक्षमता वाढली पाहिजे. शेतीसुधारणा म्हटली म्हणजे शेतांच्या तुकड्यांचा बिनकिफायतशीर आकार, चांगल्या बियांचा पुरवठा, लागवडीच्या पद्धतींत सुधारणा, खतांचा पुरवठा, पाणीपुरवठा, इत्यादि प्रश्न उपस्थित होतात. तयार होणाऱ्या मालाची पद्धतशीर विक्री, जोडधंदे, ह्याहि बाबींचा विचार करणें जरूर होतें. सहकारी पतपेढ्यांनीं शेतकऱ्यांस कर्जें दिल्यानें केवळ ह्या सर्व गोष्टी घडून येतील काय? आणि त्या घडून आल्याखेरीज शेतकऱ्यांची पत वाढून त्यांस कर्जें तरी कशी मिळणार? ग्रामसुधारणेचा प्रश्न हा एक व्यापक प्रश्न असून सहकार हाच एक त्यावर तोडगा आहे व त्याचे सहाय्यानेंच ग्रामसुधारणेचें कार्य सुकर होऊं शकेल, असें रिझर्व्ह बँकेचें निश्चित मत आहे. प्रांतिक सरकारांनीं ह्या दृष्टीनें आपलें धोरण आतां आंखलेलें आहे. तथापि, शेतकऱ्यांच्या उन्नतीचा प्रश्न इतका बिकट व महत्त्वाचा आहे, कीं तो कोणत्याहि उपायानें तातडीनें सुटण्याजोगा नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे व कार्यकर्त्यांनीं निराश होतां कामा नये.

व्यापक सहकारी कार्यक्षेत्रांत काम करण्यासाठीं उत्साही, तज्ज्ञ व निष्ठावंत लोकांचीच आवश्यकता आहे, ती पुरी पाडण्याचा प्रयत्न इंस्टिट्यूट करीत आली आहे. इंस्टि-

टयूटची घटना गेल्या पंचवीस वर्षांत दोनदा बदलली असली, व तिच्या कार्यपद्धतींत व व्यवस्थेत बदल होत गेला असला तरी तिचें उद्दिष्ट बदललेलें नाहीं. तिच्या शाखा, तिच्या सभासदांची वर्गवारी, तिचीं व्यवस्थापक मंडळें, तिची कामगिरी, तिचीं नियतकालिकें, तिचें ग्रंथालय, तिच्या आर्थिक पहाण्या, प्रचार-देखरेख व सल्ला, इतर प्रांतिक सहकारी चळवळींशी तिचा दुवा, तिची आर्थिक परिस्थिति, इत्यादि बाबतींत काळ व परिस्थिति ह्यांस अनुसरून फेरबदल होत गेले असले, तरी तिनें आपलें ध्येय कायम ठेवलेलें आहे. इन्स्टिट्यूटच्या कारभारांत लक्ष घालण्यास मुंबई शहर व प्रांत ह्यांतील निष्ठावंत सहकारी कार्यकर्ते आजवर मिळत गेले, तसेच ते इन्स्टिटयूटला पुढें लाभोत, अशीच सहकारी हितसंबंधी लोकांची इच्छा असणार हें उघड आहे. बिनसरकारी कार्यकर्त्यांचा उत्साह कायम टिकावा, असें धोरण सरकारनें सतत ठेवावें म्हणजे नवीन कार्यकर्त्यांस हुरूप वाटेल. सहकारी चळवळ सर्वस्वी लोकांच्या हातीं जाण्यास पुरेसे उत्साही व लायक कार्यकर्ते हवेत, ते निर्माण होण्यासाठी अनुकूल वातावरण असणें अत्यंत जरूर आहे.प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटवर आलेलीं गंडांतरें टाळून तिचें प्रातिनिधिक स्वरूप कायम टिकविण्यास कित्येक सहकारी पुढाऱ्यांचे श्रम कारणीभूत झालेले आहेत. इन्स्टिटयूटच्या इतिहासाचा पुढचा टप्पा ह्यापेक्षांहि अधिक उज्वल होईल, अशी आम्हांस आशा आहे.

### जनावरांच्या रक्ताचा मनुष्यास उपयोग

मनुष्याच्या रक्ताचे 'ओ', 'ए,' 'बी' व ' ए-बी' असे चार गट पडतात व प्रत्येक माणसाचें रक्त ह्यांपैकीं कोणत्या तरी प्रकाराचें असतें. रक्तस्राव अतिशय झाला म्हणजे किंवा कांहीं शस्त्रक्रियांचे वेळीं रक्तांतराची आवश्यकता असते, व ज्याचे अंगांत रक्त घालावयाचें त्याचें व ज्याचें रक्त दुसऱ्याचे अंगांत घालावयाचे त्याचें अशा दोघांचेंहि रक्त एकाच गटाचें अथवा प्रकाराचें असावें लागतें. इंपीरिअल व्हेटरिनरी रिसर्च इन्स्टिट्यूट, इझ्झतनगर येथें जनावरांच्या रक्ताची पहाणी चालू आहे. माणसांप्रमाणें जनावरांतहि तशाच प्रकारांचें रक्त असतें असें आढळून आलें आहे. ह्या माहितीचा उपयोग जनावरांची पैदास सुधारण्याकडे तर होईलच, परंतु माणसांसहि त्याचा उपयोग होण्याजोगा आहे. रक्तांतरासाठीं दुसऱ्या माणसाचें रक्त सध्या घेण्यांत येतें, त्याऐवजी एखाद्या जनावराचें रक्त वापरतां आलें तर फारच मोठी सोय होणार आहे. रक्ताच्या बँकांत जनावराच्या रक्ताच्या ठेवी ठेवतां येऊन, मनुष्यप्राण्याचा जीव बचावण्यास त्याचा उपयोग होईल.

### शेतकी कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या शेतकामास वेतन

बेंगॉल ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूटमधील बी. एजी.च्या अभ्यासक्रमांत, विद्यार्थ्यांनीं कॉलेजच्या वेळेच्या बाहेर शेतकाम केल्यास त्यांस प्रत्येक तासास २ आ. ६ पै वेतन मिळावें, अशी व्यवस्था आहे. आठवड्यांतून अशा प्रकारें त्यांना आठ तास काम करतां येईल. ह्या योजनेमुळें विद्यार्थ्यांस शेतकाम करण्यास उत्तेजन मिळतें व त्यांच्या शिक्षण खर्चाचा कांहीं भागहि वसूल होतो.

### सायप्रस बेटांतील हिंदी सैनिक

सायप्रस बेटांतील हिंदी सैनिक तेथें अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. सर्वच हिंदी लोकांना हस्तसामुद्रिक कळतें, असें तद्देशीयांना वाटतें. त्यांना हिंदी सैनिकांचा मळलांब फार आवडतो.

## सहकारी प्रश्नांची चर्चा

अखिल भारतीय सहकारी इन्स्टिटयूट्स असोसिएशन व हिंदी प्रांतिक सहकारी बँकांची असोसिएशन ह्यांच्या स्टँडिंग कमिटयांची संयुक्त सभा एप्रिल, १९४३ अखेर मद्रास येथें भरली होती. सभेनें मंजूर केलेल्या ठरावांतील महत्वाच्या ठरावांचा सारांश खाली दिला आहे.

(१) धान्य व इतर जिनसांच्या वाटणीसाठीं सहकारी संस्थांचा उपयोग शक्य तितका करून घेण्यांत यावा.

(२) युद्धोत्तर पुनर्घटनेंतील सहकाराचें स्थान लक्षांत घेतां, युद्धोत्तर पुनर्घटनेसाठीं सरकारनें नेमलेल्या कमिटयांवर सहकारी चळवळीचे कांहीं प्रतिनिधी सरकारनें नेमावे.

(३) उत्पादकांच्या व उपभोक्त्यांच्या सहकारी सोसायटया एकमेकांच्या हिताच्या दृष्टीनें जोडल्या जाणें इष्ट आहे. त्या जोडल्या जाण्यास उत्तेजन देण्यांत यावें.

(४) (अ) वेगवेगळया प्रकारच्या सोसायटयांतील व वेगवेगळया दर्जाच्या नोकरांसाठी किमान शैक्षणिक लायकी निश्चित करण्यांत यावी. (ब) निरनिराळया दर्जाच्या नोकरांच्या पगाराचें मान ठरविण्यांत यावें व बढतीबाबत नियम करण्यांत यावेत. (क) प्रांतिक, मध्यवर्ती व मोठ्या अर्बन बँका ह्यांनीं नोकरवर्गासाठी आपल्या आर्थिक परिस्थितीस अनुरूप अशा प्रॉव्हिडंट फंडाच्या योजना अंमलांत आणाव्या. (ड) तात्पुरती, हक्काची व वैयक्तीय रजा मिळण्याची तरतूद करावी. (इ) सहकारी नोकरांचे बाबतींत शिस्त राखण्याचे नियम करावेत व (फ) नोकरांच्या नोकरीचें व वर्तणुकीचें अद्यावत रेकॉर्ड ठेवावें.

(५) स्त्रियांच्या सहकारी सोसायटया स्थापन करण्यांत याव्यात व तें नीट घडून यावें ह्यासाठीं स्त्री-इन्स्पेक्टर व स्त्री-असि. राजिस्ट्रार नेमण्यांत यावेत.

(६) युद्धकार्यास लागणाऱ्या जिनसांचें तूर्त उत्पादन करून पुढें औद्योगिक सहकारी सोसायटयांचे स्वरूपांत चालू रहातील असे सोईस्कर खेडेगांवी धंदे सहकारी तत्त्वावर चालू करण्याकडे सहकारी खात्यांनीं लक्ष पुरवावें व त्यासंबंधांत त्यांनीं औद्योगिक खात्यांचा सल्ला घ्यावा.

(७) वेगवेगळया प्रकारच्या सोसायटयांचे हिशेब ठेवण्याचे पद्धतींत प्रकारवार एकवाक्यता आणण्याचा प्रयत्न करण्यांत यावा.

(८) शेतकी सोसायटयांस स्वस्त व्याजाच्या दरानें भांडवलाचा पुरवठा व्हावा, अशी खास सोय रिझर्व्ह बँकेनें करावी.

(९) प्रांतिक सहकारी बँकांना कर्जे देण्याची रिझर्व्ह बँकेची योजना तिनें जानेवारी, १९४२ मध्यें जाहीर केली, त्याचा फायदा मोसमांतील शेतीच्या व्यवसायांस होण्याजोगा असला तरी बँकेनें देऊं केलेल्या सवलतीचा फायदा बँकांनी पुरेपूर घेतलेला नाहीं. सध्यां शेतीच्या मालाच्या किंमती चांगल्या आहेत, तेव्हां गोडाउन्स बांधण्यास सरकारनें कर्जे व मदत देऊन ही योजना यशस्वी होण्यास मदत करावी.

## स्फुट विचार

### मुंबई सहकारी विमा सोसायटी, लि.

वरील सहकारी विमा सोसायटीची स्थापना १९३० सालीं झाली. तिची १३ वी वार्षिक सभा नुकतीच भरली होती. सोसायटीच्या पटावर आतां ११ हजार सभासद झाले आहेत. १९३९ अखेर सभासदांची संख्या ७,९१५ होती, १९४० अखेर ती १०,४८४ झाली होती. सहकारी विम्याचे हेतू मुख्यतः जॉइंट स्टॉक विमा कंपन्यांचेपेक्षा विमा स्वस्त करणें, विमा संस्था व विमेदार ह्यांचेमधील मध्यस्थ शक्यतोंवर कमी करून काम मिळविण्याचा खर्च उतरविणें, प्रीमियमचे हप्ते कमी करणें, जाहिरातीचे व इतर खर्च ह्यांत बचत करणें, रद्द होणाऱ्या पॉलिसींची संख्या मर्यादेंत राखणें, विम्यांतील अटी सौम्य ठेवणें, सोड किंमतीचे बाबतींत सढळपणा राखणें, इत्यादि आहेत. प्रत्येक प्रांतांत एक सहकारी विमा सोसायटी असावी, सर्व प्रांतिक सोसायट्यांचें अखिल भारतीय फेडरेशन करून रीइन्शुअरन्सची व्यवस्था करावी, सहकारी खात्यांनीं अशा सोसायट्यांचे स्थापनेस उत्तेजन द्यावें, सहकारी चळवळीचे मार्फतच शक्यतोंवर सहकारी विमा सोसायट्यांनीं विम्याचा प्रचार करून काम मिळवावें, इत्यादि गोष्टी सहकारी विमा सोसायट्या यशस्वी होण्याचे दृष्टीनें सुचविण्यांत आलेल्या आहेत. सहकारी विम्याचे बाबतींत मुंबई व मद्रास प्रांत आणि हैद्राबाद संस्थान ह्यांत बरी प्रगति झालेली आहे. प्रांतिक व सेंट्रल बँका मालाचे तारणावर कर्जें देतात त्यांचा विमा उतरण्यासाठी आगीचा व इतर विमा उतरणारी सहकारी सोसायटी चांगल्या तऱ्हेनें चालू शकेल. मद्रास प्रांतांत असें काम करण्यासाठी एक सोसायटी स्थापन झालेली आहे. तथापि, एकंदरीनें पहातां सहकारी विमा सोसायट्यांची प्रगति, त्यांची संख्या व त्यांस मिळणारें काम ह्या दृष्टीनें ह्यापेक्षा जलद व्हावयास पाहिजे. मुंबईच्या विमा सोसायटीस १९४२ मध्यें १९४१ च्या मानानें कमी काम मिळालें, तरी चांगल्या तऱ्हेनें काम करण्यावरच तिनें भर दिलेला असून, खर्चहि कमी केला आहे आणि १९४२ अखेर विमा खातीं फंडांत २ लक्ष रुपयांची भर पडून तो १६½ लक्ष रुपये झाला आहे असें कंपनीच्या अध्यक्षांनीं तिच्या वार्षिक सभेंत सांगितलें.

---

### रस्त्यावरील वहातुक वाढविण्याचा सल्ला

वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल असोसिएशनची वार्षिक साधारण सभा गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती, त्यावेळीं अध्यक्ष, मि. पॅटक, ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थान सरकारनें मोटारींचा कारखाना काढण्याची व्यवस्था करावी, असें सुचविलें. व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांची वाढ होण्यास रस्त्यावरील वहातुक वाढणें आवश्यक आहे व रेल्वेजच्या बरोबर रस्त्यांकडेहि सरकारनें लक्ष दिलें पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. आज रेल्वेजप्रमाणें रस्त्यांचीहि सोय असती, तर लष्करी वहातुकीसाठीं रेल्वेजचा उपयोग करून नागरिकांच्या सोयीसाठी रस्त्यांनीं वहातुक करतां आली असती. परंतु रेल्वेजच्या वाढीकडे लक्ष देतांना वहातुकीच्या इतर प्रकारच्या मार्गांकडे दुर्लक्ष झालें व आतां रेल्वेजवर सर्वच वहातुकीचा बोजा पडला आहे. पॉवर अल्कोहोलच्या उत्पादनास सरकारनें वेळेवर उत्तेजन देऊन पेट्रोलचा पुरवठा वाढवला असता, तर सध्याची पेट्रोलची अडचण कमी झाली असती असें सांगून, अजूनहि वेळ गेलेली नाहीं असें मि. पॅटक हे म्हणाले. मोटारींच्या तुटवड्याबद्दल बोलतांना ते म्हणाले, कीं हिंदुस्थानांत मोटारींचा कारखाना स्थापन करण्याचा सरकारनें कसून प्रयत्न करावा व कारखानदार ह्या योजनेंत भांडवल गुंतविण्यास तयार असतील, त्यांस सरकारनें सर्वतोपरी सहाय्य करावें. मोटारींच्या कारखान्याची कल्पना कांहीं वर्षांपूर्वी निघून त्यासाठीं कांहीं मंडळींनीं पैशाची व इतर व्यवस्थाहि केली होती, परंतु ती योजना मूर्त स्वरूपांत कशी येऊं शकली नाहीं, हें 'अर्था'च्या वाचकांस स्मरत असेलच.

---

### मुंबईतील गिरण्यांची साप्ताहिक सुटी

मुंबई प्रांतांतील हैड्रो इलेक्ट्रिक कंपन्यांच्या विद्युद्गृहांवर पडणारा विजेच्या उत्पादनाचा ताण कमी कसा करतां येईल, ह्यासंबंधीं हिंदुस्थान सरकारचे त्यासंबंधांतील अधिकारी विचार करीत आहेत. पाण्याच्या आघाताचे सहाय्यानें वीज निर्माण करणाऱ्या (हैड्रो इलेक्ट्रिक) कंपन्या मुंबई प्रांतांत स्थापन झाल्या व चालू आहेत, त्या म्हणजे टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक, आंध्र व्हॅली व टाटा पॉवर ह्या होत. ह्या तीनहि कंपन्या घाटांतील पावसाचें पाणी उंच ठिकाणीं साठवून व तें खोल खोऱ्यांत नेऊन त्याच्या सहायानें वीज निर्माण करितात. मुंबईच्या गिरण्या व ट्राम्वे, आगगाड्या, दिवे इत्यादींस ह्याच विजेचा पुरवठा होतो व पुणें शहरांतहि हीच वीज खेळवलेली आहे. ह्या विजेवर चालणाऱ्या कारखान्यांत मुंबईच्या गिरण्यांचें ग्राहक ह्या नात्यानें फार महत्त्वाचें स्थान आहे. गिरण्यांनीं आपले कामाचे दिवस वाटून घेऊन दर आठवड्यास एकाच दिवशीं सुटी घेऊं नये, म्हणजे विद्युद्गृहांवर ताण कमी पडेल, अशी एक सूचना पुढें आली आहे. गिरण्यांचे मालक त्यास प्रतिकूल नाहींत व कामगारांचेकडून त्या सूचनेस विरोध होईल अशी कल्पना होती तीहि फोल ठरली आहे, असें समजतें. म्हणजे आतां लवकरच रविवार हा सार्वत्रिक सुटीचा दिवस रहाणार नाहीं; एकूण कामगारांच्या एक सप्तमांशाइतके कामगार आळीपाळीनें दररोज घरीं रहातील. मुंबईमधील ट्राम्वेच्या व इतर वहातुकीवरील ताणहि त्यामुळें सारखा वांटला जाईल.

---

### कापड व सूत बाजारांत वायदेबंदी

कपाशीच्या बाजारांत वायद्याचे आणि तेजीमंदीचे व्यवहार कांहीं आठवड्यांपूर्वी सरकारी वटहुकुमानें बंद केल्याचें वाचकांस आठवत असेलच. आतां कापड व सूत बाजारांत वायद्याच्या देवघेवी बेकायदेशीर ठरविणारा नवा हुकूम निघाला आहे तो पहिल्या हुकुमाचा क्रमप्राप्त परिणामच होय. युद्धकालीन परिस्थितींत कपास व कापड ह्यांच्या तुटवड्यामुळें उत्पन्न होणारी बाजारभावांची वाढ नियमित करणें जरूर असतें. परंतु जोंपर्यंत गिरणीवाल्यांस लागणाऱ्या व त्यांजकडून घाऊक बाजारास पुरविल्या जाणाऱ्या जिनसा सट्टे खेळणाऱ्यांच्या तावडींतून सोडविल्या जात नाहींत तोंपर्यंत गिऱ्हाईक व थोड्या प्रमाणांत गिरणीवाले व व्यापारी यांचाही नाइलाज होतो, व सर्वांनाच अवास्तव किंमती द्याव्या लागतात. आतां कपाशीपासून तों कापडापर्यंत सर्व बाजारांतून सट्टेवाल्यांचें उच्चाटण झाल्यानें उपलब्ध मालाची विभागणी व निरनिराळ्या तऱ्हांचे बाजारभाव ह्यांमध्यें पद्धतशीर धोरण स्वीकारणें शक्य होईल. सट्टेबाजारांतच युद्धकालीन नियंत्रण इतकें क्रमप्राप्त व न्याय्य

आहे की त्यामुळें कांहीं थोडया लोकांचा नेहमीचा धंदा बंद होतो म्हणून त्यास विरोध करणें योग्य नाहीं. वास्तविक पहातां 'देणंनास्ति–घेणंनास्ति, फरक (डिफरन्स) घावा हे विनंति,' अशा तऱ्हेचे व्यवहार कायद्याच्या व उपयुक्ततेच्या अगदीं कडेचे समजले पाहिजेत. त्याचें बेकायदेशीर जुगारबाजींत केव्हां पर्यवसान होईल हें सांगतां येत नाहीं. परंतु ज्यावेळीं मागणीच्या मानानें पुरवठा कमी–अधिक करण्याची शक्यता असते तेव्हां निदान तात्त्विक दृष्ट्या तरी मुदतबंदीच्या खरेद्या व विक्र्या ह्यांची उपयुक्तता मान्य करावी लागते. पुढें मागणी कमी-जास्त होणार असेल त्या मानानें आजच पुरवठा जास्त–कमी करण्याची तरतूद केल्यास उत्पादक व गिऱ्हाईक ह्या दोहोंसही सोयीचें असतें. परंतु मालाच्या तुटवड्यामुळें आणि मागणींतील वाढीमुळें युद्धकाळीं असा मेळ बसणें मुळांतच अशक्य असल्यानें वायद्याच्या व्यवहारास खरोखर जागाच रहात नाहीं. हें ध्यानांत घेऊन आतां कापडापुरती तरी सरकारनें सट्टेबाजी थांबविली हें योग्य होय.

## विक्रीस काढलेलें भांडवल विकण्यास सरकारची परवानगी पाहिजे

### डिफेन्स ऑफ इंडिया नियमाचें स्पष्टीकरण

हिंदुस्थान सरकारनें ९४ वा डिफेन्स ऑफ इंडिया नियम म्हणून कंपन्यांच्या उभारणीवर बंधन घातलें; त्यास एक महिना झाला. ह्या नियमाचा अर्थ पुरेसा स्पष्टपणें लोकांस कळला नाहीं, हें सरकारच्या नजरेस आल्यावरून, ह्या संबंधांतील गैरसमज दूर करण्यासाठी सरकारनें आतां खुलासा प्रसिद्ध केला आहे. मध्यवर्ती सरकारचे पूर्वसंमतीशिवाय लिमिटेड कंपन्यांनीं भाग विकूं नयेत, असा निर्बंध नियमानें घातला आहे. ही विक्री भागाचा अर्ज मंजूर केला व तो मंजूर केल्याचें भागीदारास कळविलें म्हणजे पुरी होत. तेव्हां, १७ मे १९४३ नंतर भागाचा अर्ज मंजूर केला अथवा अर्जमंजुरी भागीदारास कळविली तर त्यास सरकारची पूर्वसंमति हवी. कंपनी स्थापन करतेवेळीं, तिच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशनवर सह्या करणारे सभासद आपण किती भाग विकत घेणार हें लिहितात व अशा भागांस इतर भागांप्रमाणें डायरेक्टरांची मंजुरी वगैरे लागत नाहीं. मेमोरँडम नोंदण्यांत आला, कीं त्यावर सही करणाऱ्या सभासदांस भाग इश्यू केले, असाच अर्थ होतो. मेमोरँडम ऑफ असोसिएशनवर सही करणारांस एकूण एक हजार रुपयांपेक्षां ज्यास्त रकमेचे भाग दिलेले नसल्यास, अशा मेमोरँडममधील भागीदारांस सरकारच्या पूर्वसंमतीची आवश्यकता नाहीं, असा हुकूम सरकारनें काढला आहे. त्यामुळें नवीन कंपन्यांच्या मामुली स्थापनेस असलेली अडचण दूर होईल; फक्त त्यांचें मेमोरँडममधील भागीदारांनीं घेतलेलें भांडवल १ हजार रुपयांपेक्षां अधिक असतां कामा नये. तें तसें असल्यास, डिफेन्स ऑफ इंडियाच्या ९४ व्या नियमाखालीं तो गुन्हा होईल व असा मेमोरँडम नोंदण्याचा प्रयत्न करणारावर हा गुन्हा करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप येईल. ९४ वा नियम जाहीर होण्यापूर्वीच कांहीं कंपन्यांची शेअरविक्री चालू असेल तर ती त्यांस सरकारची पूर्वसंमति मिळेपर्यंत स्थगित करावी लागेल. कित्येक कंपन्यांचें कांहीं भांडवल खपलेलें नसतें. विक्रीस काढलेलें भांडवल (इश्यूड कॅपिटल) ह्याचा होणारा सामान्य अर्थ येथें लागू पडत नाहीं, व नियम जाहीर होण्यापूर्वीपासूनच आमची शेअरविक्री चालू आहे, असें त्या कंपन्यांना म्हणतां येणार नाहीं. सरकारची संमति मागतेवेळीं कंपन्यांनीं एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, फिनॅन्स डिपार्टमेंट, गव्हर्मेंट ऑफ इंडिया, न्यू दिल्ली ह्या अधिकाऱ्याकडे आपल्या नियोजित शेअर विक्रीचा व त्यामागील उद्देशाचा संपूर्ण तपशील पाठवावा. उद्देश देतांना कच्चा माल, पक्का माल, यंत्रसामुग्री, इत्यादिंपैकी कशाची आवश्यकता आहे, हें स्पष्ट करावें.

### मुंबई प्रांतांतील युद्धप्रयत्न

| जिल्हा | एप्रिल १९४३ मधील जमा | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | युद्ध देणगी फंड | रेडक्रॉस फंड | डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें | ३% डिफेन्स बॉंड | बिन व्याजाचे रोखे |
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| खेडा | १,०३८ | १,०४३ | ... | ... | ... |
| सुरत | १,४७९ | १,४१० | ... | ... | ... |
| ठाणें | ८०० | ५,९०४ | ... | ... | ... |
| नगर | ९२८ | २१,२४० | ७८० | १,५०० | ... |
| पू. खानदेश | ८७० | ३५,०१६ | ... | ... | ... |
| प. खानदेश | ५८ | १,४४४ | ... | ... | ... |
| पुणें | ११,५७१ | ७९६ | २१,०६० | २६,००० | ३५० |
| सोलापूर | ८०२ | ३७ | २,०१० | १२,००० | ... |
| बेळगांव | ४० | २५,८४६ | ... | ... | ... |
| विजापूर | १९० | ३५ | १४० | ... | ... |
| कानडा | ४ | ७०२ | १,२४१ | ... | ... |
| रत्नागिरी | ३९५ | ३२० | ७१० | ... | ... |

### हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

| | रु. |
|---|---|
| एप्रिल, १९४३ | ३,००,००,००० |
| मे, १९४३ | २,९७,००,००० |
| मे, १९४२ | ९,६३,००,००० |
| एप्रिल व मे, १९४३ | ८,५२,००,००० |
| एप्रिल व मे, १९४२ | ७,६५,००,००० |

### अमेरिकेचा प्रचंड युद्धखर्च

मे १९४३ मध्यें अमेरिकेचा रोजचा सरासरी युद्धखर्च २ अब्ज, ८३½ कोटि रुपये होता. एप्रिलमधील रोजच्या खर्चाच्या मानानें हा आकडा ३० लक्ष डॉलर्सनीं मोठा आहे.

### बायबलांचें युद्धसहाय्य

बायबल ग्रन्थानें कित्येक समरभूमी पाहिल्या आहेत. सैनिकांच्या खिशांत राहून तो आपली कामगिरी आजवर बजावीत असे, परंतु युद्धसहाय्यास त्याचा आतां प्रत्यक्ष हातभार लागणार आहे. न्यूयॉर्कच्या अमेरिकन बायबल सोसायटीनें बायबलें छापण्याच्या, २० टन प्लेट्स ३ हजार पौंड फौन्ड्री टाइप व कित्येक हजार ब्लॉक मोडले आहेत त्याचा दारूगोळा बनेल. ह्या प्लेटांतील टाइप जुन्या पद्धतीचा व हल्लीं प्रचारांत नसलेला आहे, झुलु, .मस्कोजी, पोनेप व वेल्श भाषांतील बायबलांच्या छपाईच्या टाइपावर ह्या गोष्टीचा परिणाम होणार आहे.

## शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति व कर्जबाजारीपणा

### भिवंडी तालुक्याची तपशीलवार पहाणी

#### सावकारी व पतपेढ्यांचीं कर्जें

ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी तालुक्यांतील ७६० शेतकरी कुटुंबांची आर्थिक व सामाजिक पहाणी डॉ. एम्. जी. भगत ह्यांनीं करून त्यासंबंधांत त्यांनीं एक ग्रंथ प्रसिद्ध केला, त्याचा परिचय वाचकांस मागें करून देण्यांत आलेलाच आहे. ह्या ७६० कुटुंबांपैकीं ७२१ कुटुंबांचा सभासदत्व या नात्यानें सहकारी पतपेढ्यांशीं संबंध आहे व त्यांपैकीं ६८४ कुटुंबांनीं पतपेढ्यांकडून कर्जें घेतलेलीं आहेत. भिवंडी तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं घेतलेल्या कर्जांची छाननी खालीलप्रमाणें त्यांनीं केली आहे:—(१) सहकारी पतपेढ्यांकडून घेतलेलीं कर्जें; (२) सावकारांकडून घेतलेलीं कर्जें; (३) पालेमोडी कर्जें व (४) ऐनजिनसी कर्जें. ७६० कुटुंबांच्या मिळून कर्जबाजारीपणाचा आकडा ३,८०,११५ रु. ८ आ. असा आहे. म्हणजे दर कुटुंबावर ४०६ रुपयांचा बोजा व दरमाणशीं ५८ रुपये कर्ज, असा हिशेब होतो. सहकारी पतपेढ्यांकडूनच फक्त कर्ज घेऊन शेतकऱ्यांची पैशाची गरज भागत नाहीं, ह्यामुळें सावकारांकडूनहि पतपेढ्यांचे सभासद कर्जें काढतात. ६०३ कुटुंबांस सावकारांचें कर्ज आहे व एकूण कर्जापैकीं सावकारांकडील कर्ज ६०% इतकें आहे. सहकारी पतपेढ्यांकडून शेतकऱ्यांनीं घेतलेल्या कर्जाचें, त्यांच्या एकूण कर्जाशीं प्रमाण ३३% पडतें. कर्जदाराच्या आर्थिक परिस्थितीशीं त्याचीं सावकाराकडून घेतलेलीं कर्जें प्रमाणबद्ध असतात. चांगल्या कुळांस तारण देतां येतें व त्यांस सावकारांकडून कर्जेहि अधिक मिळतें. सहकारी सोसायट्यांकडील कर्जाचा विचार करतां, आर्थिक दृष्टीनें कनिष्ठ असलेल्या शेतकरीच त्यांचा सर्वांत ज्यास्त प्रमाणांत अवलंब करतात असें दिसून येतें. शहाजोग कुळांनीं सावकारांकडे जाव व बाकीच्यांनीं पतपेढ्यांकडे जावें, ही गोष्ट सहकारी चळवळीच्या दृष्टीनें खचित चिंतनीय आहे. खालील तक्ता पहा.

**शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा**

| कोणाकडून कर्ज घेतलें ? | अ | | ब | | क | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कुटुंबें | रक्कम | कुटुंबें | रक्कम | कुटुंबें | रक्कम | कुटुंबें | रक्कम |
| | संख्या | रु. | संख्या | रु. | संख्या | रु. | संख्या | रु. |
| सावकार | ६४ | ६१,२०६ | ४१५ | १,१७,६५९ | १२४ | १३,८७६ | ६०३ | १,९२,७४१ |
| सहकारी पतपेढ्या | ६७ | २६,२१५ | ४४६ | ६६,१७८ | १७१ | १२,३७३ | ६८४ | १,०४,७६६ |
| पालेमोडी कर्जें | १० | १,०९७ | १३३ | ७,६२६ | २४ | ५५४ | १६७ | ९,२७८ |
| ऐनजिनसी कर्जें | ... | ... | ३५ | ८८२ | २१ | ४४८ | ५६ | १,३३० |
| कर्जें नसलेलीं कुटुंबें | ४ | ... | १५ | ... | १५ | ... | ३४ | ... |
| एकूण | | ८८,५१८ | | १,९२,३४५ | | २७,२५१ | | ३,०८,११५ |

ह्या तक्त्यांतील कुटुंबांचें अ, ब, व क असें वर्गीकरण केलें आहे. ज्या कुटुंबांजवळ १० एकरांपेक्षा अधिक जमीन आहे, किंवा ज्यांस व्यापार इत्यादि धरून चांगली प्राप्ती होते, अशीं कुटुंबें "अ" ह्या वर्गांत आहेत. "ब" वर्गांतील कुटुंबांजवळ ५ एकरांपेक्षा अधिक जमीन नाहीं. ज्यांचेजवळ मुळींच जमीन नाहीं अथवा असली तरी फारच थोडी आहे व ज्यांचें मजुरीवरच पोट अवलंबून आहे, अशीं कुटुंबें "क" वर्गांत सामील आहेत.

अ वर्गांतील कुटुंबांपेक्षा ब वर्गांतील कुटुंबांत कर्जदार कुटुंबांची संख्या अधिक आढळते. क वर्गांतील कुटुंबांस सावकारांकडून कर्ज मिळणें कठीण जातें. क वर्गांतील १८७ कुटुंबांपैकीं १७१ कुटुंबांनीं पतपेढ्यांकडून कर्जें घेतलेलीं आहेत.

#### सावकारांकडून घेतलेलीं कर्जें

सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम १,९२,७२१ रुपये आहे. ८३,११३ रुपयांचें कर्ज तारणावर घेतलेलें आहे. ह्यापैकीं ७६,२७७ रुपयांच्या कर्जास जमिनीचें तारण आहे. ६५१६ रुपयांच्या कर्जासाठीं दागिने गहाण ठेवण्यांत आलेले आहेत व १२० रुपयांच्या कर्जासाठीं कर्जदारांनीं नोकरी करण्याचा करार करून दिलेला आहे. कर्ज काढण्याचीं कारणें पहातां, ३३·७% कर्जें लग्नखर्चासाठीं १४·९% कर्जें घरगुती खर्चाकरितां व ८·३% कर्ज जमीन खरेदीसाठीं घेतलेलीं आढळतात. बहुतेक कर्जें उत्पादक कार्यासाठीं काढलेलीं नसल्याकारणानें, त्यांचा बोजा एकसारखा वाढत जातो.

#### सहकारी पतपेढ्यांकडील कर्जें

७६० कुटुंबांपैकीं ७२१ कुटुंबें पतपेढ्यांशीं सभासद ह्या नात्यानें संबंधित आहेत व त्यांतील ६८४ कुटुंबांनीं पतपेढ्यांकडून १,०४,७६६ रुपयांचें कर्ज घेतलेलें आहे. कर्जदार कुटुंबाचें प्रत्येकीं सरासरी कर्ज १५३ रु. आहे. "अ" गटांत ही सरासरी ३९१ रुपये, "ब" गटांत १४६ रुपये व "क" गटांत ७३ रुपये पडते. एकूण कर्जापैकीं "अ" गटांतील सोसायट्यांकडे २५%, "ब" गटांतील सोसायट्यांकडे ६३% व "क" गटांतील सोसायट्यांकडे १२% कर्ज आहे. ६८४ कुटुंबांपैकीं ३०७ म्हणजे ४४% कुटुंबांनीं कर्जावरील व्याज पूर्णपणें दिलेलें आढळतें. "अ" गटांत अशा कुटुंबांचें प्रमाण ६०% आहे, "ब" गटांत तें ४७% आहे व "क" गटांत तें ३४% आहे.

भिवंडी तालुक्यांतील शेतकरी कुटुंबांची पहाणी करून, सहकारी चळवळीविषयीं व्यक्त केलेला डॉ. भगत ह्यांचा अभिप्राय विशेष महत्त्वाचा आहे, कारण सामान्य सिद्धांतास त्यानें मिळत असलेली पुष्टी तपशीलवार माहितीवर आधारलेली आहे. सहकारी संस्थांचें कार्यक्षेत्र व्यापक करून, त्यांत शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीच्या प्रयत्नांचा अंतर्भाव झाला पाहिजे; जमिनीचें उत्पादन वाढवून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारली पाहिजे, इत्यादि ग्रामसुधारणेबाबत योजना त्यांनीं नमूद केल्या आहेत व त्यास आधार म्हणून खेडेगांवाचें चित्र त्यांनीं शास्त्रीय पद्धतीनें रेखाटलें आहे. वरील टेबलांतील माहिती त्यांच्याच ग्रन्थांतून घेतलेली आहे.

## इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सची परीक्षा, १९४३

### प्रॅक्टीस ॲन्ड लॉ ऑफ बँकिंग, भाग १ ला.

प्रश्न:—'बँकर' कोणास म्हणावें व 'बँकर' या नात्यानें त्याचीं कर्तव्यें काय ठरतात?

उत्तर:—'बँका' व 'बँकर' यांचे व्यवहार अनेक प्रकारचे असल्यामुळें त्यांची सुटसुटीत अशी व्याख्या करणें फार अवघड होऊन बसलें आहे; व ही व्याख्या करण्याची अडचण फार तीव्रतेनें जाणवते. सन १८८२ च्या 'बिल ऑफ एक्स्चेंज' या महत्त्वाच्या कायद्यांतही 'बँक' या शब्दाऐवजीं प्रत्येक वेळीं 'बँकर' हा शब्द वापरला आहे.

'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट' से. २ प्रमाणें बँकिंगचा धंदा करणाऱ्या व्यक्तीला अगर कंपनीला बँकर असें म्हणतां येईल.

जो आपल्या रोजच्या व्यवहारांत लोकांकडून आलेले पैसे जमा करतो व ज्यांचकडून ते पैसे घेतले असतील त्यांचे 'चेक' स्वीकारून ते पैसे परत करतो त्यास 'बँकर' असें म्हणावें असें 'हार्ट' म्हणतो.

जर 'बँकर'नें सेव्हिंग्ज व चालू खात्यावर ठेवी स्वीकारल्या नाहींत व स्वतःवर काढलेले 'चेक' स्वीकारले नाहींत तसेंच गिऱ्हाइकाकडून आलेले क्रॉस केलेले अगर क्रॉस न केलेले चेक त्यांचे खातीं जमा करणेसाठीं घेतले नाहींत तर त्यास 'बँकर' म्हणतां येणार नाहीं, अशीहि एक व्याख्या आहे.

बँकिंगच्या सर्व व्यवहाराचे मुळाशीं परस्पर विश्वास व पत हीं असतात. लोक बँकांमध्यें विश्वासानें आपला शिलकी पैसा ठेव म्हणून ठेवतात. या ठेवींचा उपयोग व्यापाऱ्यांस व कारखानदारांस कर्जरूपानें भांडवल पुरवण्याकडे होतो व फायदेशीर रीतीनें सुरक्षित स्थळीं पैसा गुंतला जाऊन ठेवीदारांस लागेल तसतसा पैसा परत मिळत गेल्यास बँकेची पत वाढते व ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास वाढत जातो. यावरून गिऱ्हाइकांशीं पैसा, पत व भांडवल यासंबंधी जो व्यवहार करतो तो 'बँकर' होय, असें म्हणतां येईल.

नोटा काढणें ( हिंदुस्थानांत हा अधिकार फक्त रिझर्व्ह बँकेला आहे. ), सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारणें, प्रॉमिसरी नोटा व बिलें 'डिस्कौंट' करणें, आपल्या गिऱ्हाइकांस कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅशक्रेडिट मंजूर करणें, वगैरे कामेंही बँकरला करावीं लागतात.

याशिवाय सुधारलेल्या बँका आपल्या देशांतील अगर परदेशांतील बँकांचे एजंट म्हणून काम पहातात. तसेंच 'सिक्युरिटीज' विकणें व विकत घेणें, चेक, डि. वॉरंटस, परदेशीं बिलें वगैरे वसुलीकरतां पाठवणें, डिमांड ड्रॉफ्टस काढणें, इत्यादि कामेंही त्या करतात.

परदेशीं दूरवर प्रवास करणाऱ्या आपल्या गिऱ्हाइकांना त्यांना पाहिजे असेल तेथें पैसा मिळण्याची सोय व्हावी व एरवीं प्रवासांत जवळ पैसा बाळगण्याचें कारण त्यास पडूं नये म्हणून त्यास 'लेटर ऑफ क्रेडिट' देण्याची व्यवस्थाही कांहीं बँकांनीं केलेली असते.

तसेंच आपल्या गिऱ्हाइकांच्या मौल्यवान् वस्तू स्वीकारून त्या संभाळण्याचा धंदाहि कांहीं बँका करतात.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'बँकर'चे व त्याच्या गिऱ्हाइकाचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असतात.

बँकरनें एखाद्या इसमाचें खातें एकदा उघडलें म्हणजे बँकवर त्यानें काढलेले चेक जोंपर्यंत पद्धतशीर व व्यवस्थित आहेत व त्या चेकची रक्कम भागण्याइतकी शिल्लक जोंपर्यंत त्याचे खातीं शिल्लक आहे तोंपर्यंत ते चेक स्वीकारण्यास 'बँकर' बांधला गेला आहे.

तसेंच खातेदाराच्या खात्याची परिस्थिति काय आहे याची माहिती योग्य व पटण्याजोगें कारण असल्याशिवाय 'बँकर'कडून बाहेर फुटतां कामा नये.

ठेवीदारांशीं आलेले त्याचे जिव्हाळ्याचे संबंध लक्षांत घेतां बँकरचें हें कर्तव्य ठरतें.

एच. व्ही. सहस्रबुद्धे.


राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

THE FARMER

HIS WELFARE & WEALTH

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR

SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT

Sir Vithaldas Thakersey Memorial Building

9 Bakehouse Lane, Fort, Bombay.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२५।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
मालकिन पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ — पुणें, बुधवार, तारीख ७ जुलै, १९४३ — अंक २७



## विश्वासाची ज्योत तेवत राहूं द्या.

इतिहासास समाप्त हा शब्दच माहीत नाहीं. पृष्ठ संपो किंवा वर्ष सरो, एका प्रकरणाच्या शेवटांत पुढील प्रकरणाचा प्रारंभ असतो. आणि जुन्या वर्षाच्या शेवटांतून नवीन वर्षाचा उदय होतो. १९४३ संपण्यापूर्वीच्या प्रस्तुत समयीं आपणांपुढील प्रसंग गंभीर आहे व पैलतिरीं पोचण्यासाठीं आपणांस अविरत प्रयत्न, क्षणोक्षणीं परीक्षेची तयारी व स्वार्थत्याग ह्यांचा आत्मविश्वासानें अवलंब केला पाहिजे. गेल्या वर्षाकडे पहातां, तें अंधःकारमय व दुःखदायक असें गेलें तरी शूरांच्या मृत्यूनें त्यास उजळा दिला आहे. त्यांच्या शौर्याच्या स्वरूपांत आपल्या उज्वल भवितव्याची खंडणी दिलेली आहे व आपणांस त्यामुळें क्षितिजावर विजयचिन्हें दिसूं लागलीं आहेत. विजयासाठीं आपण जसजशी शिकस्त करूं, तसतशी आपली विश्वासाची ज्योत तेजस्वी होऊं दे. भूतकाळाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून, वर्तमानकाळासाठीं धैर्याचा अवलंब करून व भविष्यकाळाच्या उज्वलतेबद्दल विश्वास बाळगून, मानवजातीचें दुःख नाहींसे होऊन सर्व राष्ट्रांस व लोकांस शांतता लाभावी, ह्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं आपण सर्वस्व अर्पूं या.

सन लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडाच्या ७२ व्या वार्षिक अहवालांतील उतारा

## सन लाइफ ऑफ कनडा

कॅनडामध्यें, नियमित जबाबदारीच्या तत्त्वावर १८६५ सालीं स्थापन झालेली कंपनी

उद्यासाठीं आजच दूरदृष्टीपूर्वक बचत करा.

पी. व्ही. लाड, यूनिट ऑर्गनायझर
सन लाइफ ऑफ कॅनडा, पुणें.

**महापुरुषाची जाणीव! कपड्यांच्या खर्चात काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# बालकांचे खरे मित्र



पावसाळ्यांत लहान मुलें आजारी पडतात याचें कारण त्यांच्या आरोग्याची नीट काळजी घेतली जात नाहीं

पुण्याच्या रसशाळेची

● बालजीवन ● कुमारी आसव
● कुटजारिष्ट **अस्थिपोषक** ● बालगोळी
● नागगुटी ● ज्वराग्निवटी

ही औषधें संग्रहीं बाळगून त्यांचा वेळींच योग्य उपयोग केल्यास मुलें गुटगुटीत व आनंदी राहातील.

: आमचीं केंद्रें :

मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

पुणें मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें.

**आयुर्वेद रसशाळा, पुणें लि.**


## विविध माहिती

### ४ जुलै, १७७६

४ जुलै, १७७६ रोजीं अमेरिकेंतील १३ वसाहतींनीं फिलॅडेलफिया येथें स्वातंत्र्याची घोषणा केली व "युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका" हें नवें राष्ट्र स्थापन केलें. १७८२ मध्यें इंग्लंडनें अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य केलें, तें १७८३ च्या व्हर्साइच्या तहानें पक्कें झालें. ४ जुलै हा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन नुकताच साजरा झाला. अमेरिका आतां जर्मनी व जपान ह्यांच्या राज्यतृष्णेपासून बचाव करण्याच्या प्रयत्नांत असणाऱ्या सर्व राष्ट्रांस मनःपूर्वक सहाय्य देत आहे.

### ३% १९६३-६५ चे कर्जरोखे

हिंदुस्थान सरकारच्या वरील कर्जरोख्यांच्या विक्रीस ३ जुलै रोजीं प्रारंभ झाला. १० जुलै रोजीं विक्री बंद करण्यांत येईल, परंतु त्यापूर्वीं १५ कोटि रुपये मिळाले तर अगोदरच विक्री बंद होईल. विक्रीची किंमत १०० रुपयांच्या रोख्यास ९९ रु. ८ आ. अशी आहे.

### ३% १९५३-५५ चे कर्जरोखे

वरील कर्जरोख्यांची विक्री ३ जुलै रोजीं सुरू झाली, ती पुनः जाहीर होईपर्यंत चालू राहील. १०० रुपयांच्या रोख्यांची किंमत १०० रुपये आहे, ती दर आठवड्यास द. शे. ८ पै प्रमाणें वाढत जाईल.

### मि. डी व्हॅलेरा

मि. डी व्हॅलेरा ह्यांची आयराचे मुख्य प्रधान म्हणून ६७ वि. ३७ मतांनीं फेरनिवड झाली आहे.

### एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया, लि.

मुंबई, काठेवाड व पश्चिम हिंदुस्थानांतील इतर ठिकाणें ह्यांचे दरम्यान मोठ्या प्रमाणावर वैमानिक वहातुक सुरू करण्याचा वरील कंपनीचा उद्देश नीट साध्य झाला नाहीं. सरकारला कंपनीचीं विमानें युद्धकार्यासाठीं देण्यांत आलीं. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. कावली, ह्यांनीं कंपनीच्या पुनरुज्जीवनासाठीं श्री. वालचंद हिराचंद ह्यांजपाशीं बोलणीं सुरू केलीं तीं यशस्वी होऊन सध्याच्या मॅनेजिंग एजन्सीच्या जागीं आतां सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लि. ची नेमणूक होणार आहे. एअर सर्व्हिसेसच्या डायरेक्टर बोर्डापैकीं आठ जागा सिंधिया कंपनीच्या प्रतिनिधींनीं भरल्या जातील.

### जर्मनींतील झेक कामगार

झेकोस्लोव्हाकियांतील सुमारें ५ लक्ष लोक जर्मनींत कामासाठीं नेण्यांत आले आहेत, असा जानेवारी १९४३ अखेरचा अंदाज आहे. २ फेब्रुवारी १९४३ रोजीं बोहिमिया आणि मोरेव्हिया येथें पुरुष व स्त्रीकामगारांची भरती करण्यास प्रारंभ झाला, ती पुरी झाली म्हणजे वरील आकड्यांत १०० टक्के वाढ होईल.

### युद्धवार्ताहार

आतांपर्यंत किमान २५ ब्रिटिश व अमेरिकन युद्ध वार्ताहार चालू युद्धांत मृत्युमुखीं पडले आहेत. ७ जण बेपत्ता आहेत, ६० जखमी झाले आहेत व २० युद्धकैदी आहेत.

### तारा लवकर पोंचूं लागल्या

एक वर्षापूर्वी तारा पोचण्यास अतिशयच विलंब लागत असे; आतां ह्या संबंधांत पुष्कळच सुधारणा झाली आहे. कराची, लाहोर, सिमला व मद्रास येथील तार ऑफिसें तार स्वीकारण्याच्या दिवशींच त्या पाठवूं शकतात, परंतु नवी दिल्ली, कलकत्ता, मुंबई व आग्रा येथील परिस्थिति कमी समाधानकारक आहे व ज्या दिवशीं तेथील ऑफिसें तारा पाठविण्यासाठीं घेतात, त्याच दिवशीं तीं धाडूं शकतात. कलकत्ता-दिल्ली, कलकत्ता-मुंबई, कलकत्ता-आग्रा, आग्रा-मुंबई, मुंबई-दिल्ली ह्या मार्गांवर तारांची ये-जा फार आहे.

### सर वेव्हेल व्हायकौंट झाले

आगामी व्हाइसरॉय फील्डमार्शल सर आर्किबाल्ड वेव्हेल, ह्यांस बादशहांनीं व्हायकौंट केल्याकारणानें त्यांस नवें नांव धारण करावें लागेल. ब्रिटिश पिअरेजमध्यें पांच पायऱ्या आहेत, त्यांचा अनुक्रम ड्यूक, मार्केस, अर्ल, व्हायकौंट व बॅरन असा आहे. म्हणजे सर वेव्हेल ह्यांची पदवी चवथ्या दर्जाची आहे. ह्या सर्व पदवी धारण करणारांस लॉर्डांचे सभेंत बसण्याचा अधिकार आहे व त्या सर्वांस लॉर्ड असें म्हणतात.

### शेतीस पाणीपुरवठ्यासाठीं वीज

पाटबंधाऱ्यांतून शेतीस पाणी पुरविण्याचे कामीं विजेचा उपयोग करतां आल्यास बंगालमधील सर्व पडीक जमिनींत लागवड करतां येईल, असें मत हिंदुस्थान सरकारचे इरिगेशन तज्ज्ञ, सर विल्यम स्टँप, ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

### मि. हेन्री फोर्ड

मि. हेन्री फोर्ड हे आपल्या पुत्राच्या मृत्यूनंतर फोर्ड मोटार कंपनीचे अध्यक्ष झाले. आतां त्यांनीं जनरल मॅनेजरचें काम करण्यासहि प्रारंभ केला आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २१० | नांचा अवलंब-विमा कंपनी व सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स-म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. | |
| २ आयुर्विम्याच्या हप्त्यांचे दर वाढविण्याची आवश्यकता | २११ | ५ शेअर बाजार | २१४ |
| ३ हिंदी चलन विस्तार व रिझर्व्ह बँकेचा नफा | २१२ | ६ सह्याद्रि विमा कं. | २१४ |
| ४ स्फुटविचार ... धान्याची लागवड वाढविण्यासाठी पडीक जमि- | २१३ | ७ हैद्राबाद संस्थानाची निवडक माहिती | २१५ |
| | | ८ सनलाइफ ऑफ कॅनडा | २१५ |



# अर्थ

बुधवार, ता. ७ जुलै, १९४३


## आयुर्विम्याच्या हप्त्यांचे दर वाढविण्याची आवश्यकता

### नवे व जुने विमेदार ह्यांचे हितसंबंध

आयुर्विमा कंपन्यांचे फंडावर पडणारा व्याजाचा दर पूर्वीइतका आतां समाधानकारक नाहीं, हें प्रसिद्धच आहे. हिंदी विमा कंपन्यांना विमा कायद्याचे अन्वयें त्यांच्या पैशापैकीं अतिशय मोठी रक्कम सरकारी कर्जरोख्यांत गुंतवावी लागते. विमेदारांच्या सुरक्षितपणाचे दृष्टीनें हें हितकारक असलें, तरी सरकारी रोख्यांवरील व्याजाचा दर अत्यल्प असल्याकारणानें विमा कंपन्यांच्या उत्पन्नावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो आणि अप्रत्यक्ष रीतीनें विमेदारांचें थोडेसें नुकसानहि होतें. विमा कंपन्यांच्या सरकारी रोख्यांतील सक्तीच्या गुंतवणुकीचें प्रमाण कमी करण्यांत यावें, अशी कंपन्यांची मागणी आहे. तथापि, अद्याप ती पुरी झालेली नाहीं. आपले हप्त्यांचे दर वाढवून उत्पन्न सुधारण्याचा मार्ग विमा कंपन्यांनीं अवलंबावा, अशी सूचना त्यांस हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्यांनीं केली होती, परंतु चढाओढीच्या काळांत, आपले एकट्याचे हप्त्यांचे दर वाढविण्यास कोणती कंपनी पुढें येणार? हिन्दी विमा कंपन्यांवर युद्धविषयक अनिश्चितपणाचा परिणाम होऊन त्यांचें काम कमी झालें होतें, परंतु आतां त्यांस वाढत्या प्रमाणावर काम मिळूं लागलें आहे. लोकांचा विम्याचे उपयुक्ततेवर पुन्हा विश्वास बसूं लागला आहे. तेव्हां हप्त्यांचे दर वाढविण्यास प्रस्तुत काळ हा अतिशय सोईचा आहे. कांहीं कंपन्यांनीं आपले हप्त्याचे दर बदललेल्या परिस्थितीस अनुसरून सुधारून घेतले आहेत परंतु त्यामुळें त्यास अधिक काम मिळविण्यास अडचण पडलेली नाहीं, असें दिसून येतें. हा अनुभव लक्षांत घेऊन, सर्व लहान-मोठ्या कंपन्यांनीं आपलें धोरण आंखणें आवश्यक आहे.

वाढलेले हप्ते हे नव्या विमेदारांसच लागू होणार, हें उघड आहे. विमा कंपनी व विमेदार ह्यांचेमधील पॉलिसीचा करार हा ठराविक, दीर्घ मुदतीचा असतो; तेव्हां त्यांतील हप्त्याबद्दलच्या अटी बदलण्याचा अधिकार कंपनीस नाहीं. तथापि, नव्या विमेदारांकडून किती रक्कम वसूल करावयाची हें ठरविण्याचा अधिकार कंपनीस आहे. विमा कंपनीनें आपले हप्त्यांचे दर वाढविले तर त्याचा बोजा नवीन विमेदारांवरच बसणार आणि त्याचा फायदा मात्र जुन्या व नव्या सर्व विमेदारांना मिळणार, ह्यांत नव्या विमेदारांवर अन्याय होईल, असें कोणास वाटण्याचा संभव आहे. कंपनीच्या प्रारंभीच्या विमेदारांचे विम्याबाबत कंपनीस आलेल्या खर्चाचा बोजा त्यांचे मानानें नवीन विमेदारांवर कोठें पडतो? चालू कामांत जसजशी वाढ होत जाते तसतसा विमा कंपनीचा पाया व्यापक व दृढ होत जातो, आणि कंपनीच्या खर्चाचें एकूण कामाशीं पडणारें प्रमाण कमीकमी होत जातें. मागाहून येणाऱ्या विमेदारांस प्रारंभीच्या विमेदारांच्या मानानें कमी खर्चाचा बोजा सहन करावा लागतो, परंतु बोनस वाटतेवेळीं दहा वर्षांची जुनी पॉलिसी व एक वर्षापूर्वी काढलेली पॉलिसी ह्यांत कंपनी पंक्तिप्रपंच करीत नाहीं. कंपनीचे हप्ते ठरविण्याच्या वेळीं तिचा खर्च, अपेक्षित व्याजाचा दर, मृत्यूंचें अपेक्षित प्रमाण, हीं लक्षांत घेतलीं जातात, व ह्यापैकीं कोणत्याहि बाबतींत अपेक्षेपेक्षा वेगळा अनुभव आला तर त्याचा परिणाम लक्षांत घेणें हें विमा कंपन्यांचें कर्तव्यच ठरतें. विमा पॉलिसींची मुदत दीर्घकालीन असल्या कारणानें व कंपनीच्या पटावर दरसाल नवे नवे विमेदार येत असल्यानें, किरकोळ अथवा अल्पकालिक महत्त्वाच्या गोष्टींकडे तिनें दुर्लक्ष करणें चूक ठरणार नाहीं. परंतु, व्याजाच्या दरांचा कल कमी-कमी होण्याकडे आहे व ही प्रवृत्ति दीर्घ काल टिकण्याचा संभव आहे, हें समजून आल्यावरहि जुन्याच हप्त्यांच्या दरानें नवीन विमे स्वीकारणें वाजवी होणार नाहीं.

विम्याचे बाबतींत आणखी एका गोष्टीचा विचार येथें करण्याजोगा आहे. विम्याचे हप्ते व विम्याची रक्कम ह्यांची किंमत पैशानें ठरविलेली असते, परंतु प्रत्यक्ष पैशाची किंमत कोठें कायम आहे? मंदीच्या काळांत भरलेल्या ५० रुपयांची बरोबरी सध्याच्या काळांतील ५० रुपयांशीं कशी करतां येईल? मंदीच्या काळांतील बचतीचें विनिमय-मोल अधिक असणार, हें उघड आहे. मंदीच्या काळांत भरलेल्या हप्त्यांची पॉलिसी सध्यासारख्या पैशाच्या फाजील वाढीचे व महागाईचे काळांत परिपक्व झाली, तर विमेदारास त्याच्या मूळ बचतीच्या प्रमाणांत विनिमय-साधन हातीं येत नाहीं. देण्या-घेण्याच्या सर्वच व्यवहारांत असें होतें व चलनाच्या किंमतीच्या वाढीच्या अथवा उताराच्या प्रमाणांत धनको-ऋणकोचा नफा-तोटा होतो. विमा कंपनीचा व्यवहार हा एक सतत चालू असलेला ओघ आहे आणि त्या ओघास मिळणाऱ्या विमेदारांस कांहीं बाबतींत नफा तर कांहीं बाबतींत तोटा होणें, अपरिहार्य आहे. परंतु सर्व साधारण विचार करतां, सर्व विमेदारांचें हित हें एकाच गोष्टींत असतें व कंपनीचे व्यवहार वाढले म्हणजे त्यांचे हितसंबंधांतील विषमता कमी-कमी होते. दुसऱ्याच्या त्यागाचा आपल्यास फायदा मिळतो, तेव्हां आपणहि त्यास कांहीं तरी देणें लागतों, ह्या विचारानेंच प्रस्तुत प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. विम्याची योजना ह्याच तत्त्वावर आधारलेली आहे.

### रबरास प्रचंड मागणी

युद्धोत्तर काळांत रबरास भयंकर मागणी येईल व दरसाल सुमारें २० लक्ष टन रबर ही जागतिक मागणी पुरविण्यास लागेल, असें गुडरिच रबर कंपनीचे अध्यक्ष आपल्या भाषणांत नुकतेच म्हणाले. युद्धापूर्वी दरसाल १० लक्ष टन रबर लागत असे.

## हिंदी चलन विस्तार व रिझर्व्ह बँकेचा नफा

रिझर्व्ह बँकेच्या डिव्हिडंडवर तात्पुरतें नियंत्रण घालणारा एक ऑर्डिनन्स हिंदुस्थान सरकारनें काढला आहे, त्या अन्वयें ऑर्डिनन्स अंमलांत असेंपर्यंत डिव्हिडंडचा कमाल दर ४% असावा, असें ठरविण्यांत आलें आहे. संयुक्त राष्ट्रांतर्फे हिंदुस्थानांत अत्यंत मोठ्या प्रमाणावर युद्धखर्च चालू आहे, त्याचा परिणाम हिंदी चलनविस्तारांत झाला आहे. युद्धविषयक व्यवहारांसाठी चलन पुरविण्याचें काम रिझर्व्ह बँकेचें आहे, कारण तिलाच चलनी नोटा काढण्याचा अधिकार आहे. नोटा काढण्याचा व चलनाची व्यवस्था पहाण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें रिझर्व्ह बँकेस दिलेला आहे. हिंदी चलनाचा विस्तार कसा करण्यांत येतो, त्याचें स्पष्टीकरण येथें केलें असतां, चलनविस्तारामुळें रिझर्व्ह बँकेचा नफा कसा वाढतो, तें लक्षांत येईल. रुपयाचीं नाणीं व नोटा, सोन्याचीं नाणीं व सोनें, हिंदुस्थान सरकारचे रोखे व ट्रेझरी बिलें आणि ब्रिटिश सरकारचे रोखे ह्यांचे तारणावर नोटा काढण्यांत येतात. म्हणजे, बँकेच्या इश्यू खात्यांतून ज्यास्त नोटा प्रसृत करावयाच्या असल्या, कीं त्यांचे प्रमाणांत वरीलपैकीं कोठल्या तरी बाबींत वाढ करावी लागते. त्याचप्रमाणें चलनाचा विस्तार कमी करावयाचा असला, म्हणजे नोटा परत घेऊन त्या प्रमाणांत वरीलपैकीं कोठल्या तरी बाबींत घट करावयाची असते. साधारणतः बँक आपल्या बँकिंग खात्यांतून इश्यू खात्याकडे रोखे वर्ग करून इश्यू खात्याची जिंदगी वाढविते व चलन प्रसृत करते; चलनविस्तार कमी करतेवेळीं बँक इश्यू खात्यांतील जिंदगींतील रोखे बँकिंग खात्याकडे वर्ग करते. चलनाचा विस्तार ज्या मानानें वाढेल त्या मानानें नोटांची संख्या फुगेल व त्या प्रमाणांत रिझर्व्ह बँकेचा नफा वाढत जाईल. नोटा काढतांना ठेवावयाचें तारण तितक्याच किंमतीचें सोनेंच असावें लागलें असतें तर नोटा काढण्याच्या व्यवहारांत बँकेला नफा उरण्याचा प्रश्नच उपस्थित झाला नसता. बिन तारणाच्या अगर अपुऱ्या तारणाच्या नोटांची संख्या ज्या मानानें ज्यास्त, त्या मानानें नोटा काढणाऱ्या संस्थेस नफा अधिक उरतो, हे उघड आहे. ह्या नोटांवरील व्याज रिझर्व्ह बँकेस मिळत असतें. हिंदुस्थान सरकारनें नोटा काढण्याचें काम रिझर्व्ह बँकेला दिलें आहे व त्याबरोबर बँकेच्या नफ्यांतील हिश्श्याचा हक्क त्यानें स्वतःकडे ठेविला आहे.

### डिव्हिडंड वांटणीची योजना

रिझर्व्ह बँकेच्या डिव्हिडंड वांटणीची मूळ योजना बँकेच्या कायद्यांतील ४७ व्या कलमांत सांगितलेली आहे. प्रथम भागीदारांस ३½% क्युम्युलेटिव्ह डिव्हिडंड मिळावें व नंतर नफा उरला तर त्याचा कांहीं अंश डिव्हिडंड देण्याकडे खर्च करावा व उरलेला अंश मध्यवर्ती सरकारास मिळावा, अशी ही योजना आहे. रिझर्व्ह फंडाची रकम भांडवलाचे रकमेपेक्षां कमी असेल, तर किमान ५० लक्ष रुपये रिझर्व्ह फंडांत टाकले पाहिजेत. जोपर्यंत भांडवल ५ कोटि रुपये आहे, तोपर्यंत डिव्हिडंडसाठी कोणत्या प्रकारें रकम खर्चावी, हेंहि ४७ व्या कलमांत नमूद केलेलें आहे. ३½% डिव्हिडंडची तरतूद करून उरलेल्या ४ कोटींवरील नफ्याच्या रकमेवरील पहिल्या १½ कोटींचा १/४ वा हिस्सा डिव्हिडंडसाठी खर्चावा व नंतरच्या १½ कोटींचा १/८ वा हिस्सा डिव्हिडंडसाठी मिळावा, त्यावरील १½ कोटींचा पुनः १/१६ वा हिस्सा मिळावा, अशी व्यवस्था आहे. रिझर्व्ह बँकेचा रिझर्व्ह फंड भांडवलाचे रकमेइतका म्हणजे ५ कोटि रुपये केव्हांच झालेला आहे, तेव्हां त्यांत भर टाकण्याचा तूर्त प्रश्नच उपस्थित होत नाहीं. आतांपर्यंत कोणत्याही वर्षी रिझर्व्ह बँकेस झालेल्या नफ्याची रकम ३½% डिव्हिडंडची तरतूद करून ४ कोटि रुपयांचे पेक्षां कधींच जास्त उरलेली नसल्याकारणानें त्याची भागीदारांत वांटणी होण्याचा प्रश्नच कधीं उपस्थित झाला नाहीं. जेव्हां बँकेस ४ कोटि, १७½ लक्षांपेक्षा अधिक निवळ नफा उरेल, तेव्हांच फक्त डिव्हिडंडचा दर ३½% चे वर जाण्याचा संभव उपस्थित होतो, कारण ५ कोटि भांडवलावर ३½% डिव्हिडंड देण्यास १७½ लक्ष रुपये लागतात. ३०–६–४० अखेरपर्यंतच्या काळांत बँकेचा वार्षिक नफा ६० लक्ष रुपयांपेक्षां कधींच जास्त भरला नव्हता. ३०–६–४१ अखेरच्या वर्षी तो १७९ लक्ष रुपये झाला व ३०–६–४२ अखेरच्या सालीं त्याची रकम ३४१ लक्ष रुपयांवर गेली. हिंदुस्थान सरकारनें ऑर्डिनन्स काढून रिझर्व्ह बँकेचें डिव्हिडंड ४% वर मर्यादित केलें, ह्याची पार्श्वभूमि वरील हकीकतीवरून लक्षांत येईल.

### नफा व त्याची वाटणी

रिझर्व्ह बँकेचा सालोसाल नफा व त्याचा विनियोग, ह्यासंबंधीचे आकडे खालीं दिले आहेत. ३० जून, १९४३ अखेरच्या वर्षाबद्दलचे आकडे लवकरच प्रसिद्ध होतील त्याची वरील आकड्यांशीं तुलना केली, म्हणजे युद्धजन्य चलन विस्तारामुळें बँकेचा निवळ नफा कसा वाढत चालला आहे व त्याचा सरकारास मिळणारा वाटाहि कसा मोठा आहे, हें दिसून येईल.

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| वर्षअखेर | निवळ नफा | डिव्हिडंड | सरकारचा वांटा |
|---|---|---|---|
| १—१—३५ ते ३१–१२–३५ | ५६ | १३ | ४३ |
| ३१–१२–३६ | ५३ | १८ | ३५ |
| ३१–१२–३७ | २८ | १८ | १० |
| ३१–१२–३८ | ३८ | १८ | २० |
| ३१–१२–३९ | २३ | १८ | ५ |
| ३०—६–४० | २९ | ९ | २० |
| ३०—६–४१ | २७९ | १८ | २६२ |
| ३०—६–४२ | ३४१ | १८ | ३२४ |

सध्याचा चलन विस्ताराचा परिणाम बँकेच्या नफा वाढींत झाला आहे. ह्या नफ्याची वांटणी कशी करावयाची, हें रिझर्व्ह बँक कायद्यानें ठरवून दिलेलें आहे, हें वर सांगितलेंच आहे. बँकेच्या भागीदारांच्या हिताच्या दृष्टीनेंच, तिचें डिव्हिडंड एकदम भरमसाट वाढूं नये हें इष्ट आहे; बँकेच्या अभूतपूर्व नफ्याचें कारण व सरकारचें चलनाचा व्यवहार मर्यादित करण्याचें निश्चित धोरण हीं लक्षांत घेतां, डिव्हिडंडचा दर ४% पेक्षां अधिक जाऊं न देणें सरकारला इष्ट वाटत आहे. असें करण्यांत सरकारचा विशेषसा फायदा नाहीं, हें सरकारनें मुद्दाम स्पष्ट केलें आहे.

## स्फुट विचार

### धान्याची लागवड वाढविण्यासाठी पडीक जमिनींचा अवलंब

आज लागवडीखाली नसलेल्या जमिनी त्यांच्या मालकांनी स्वतः अगर कुळांचे मार्फत लागवडीखालीं आणल्या नाहींत, तर त्या लागवडीसाठी इतरांचे स्वाधीन केल्या जातील व त्याबाबत मालकांस खंड मिळणार नाहीं, असें मुंबई प्रतिक सरकारनें जाहीर केलें आहे. ही व्यवस्था युद्ध संपून सहा महिने लोटीपर्यंत अमलांत राहील. धान्यांची लागवड वाढविण्याच्या हेतूनें वरील हुकूम काढण्यांत येणार आहे. पुणें, अहमदनगर व ठाणें ह्या जिल्ह्यांतील कांहीं खेडेगांवांत लागवडीखाली न आलेल्या जमिनींसंबंधीं सरकारनें चौकशी केली, तेव्हां त्यास आढळून आलें कीं अशा जमिनींपैकीं शेकडा २० इतक्या जमिनी मालकीहक्काच्या वादामुळें अथवा मालकाच्या दुर्लक्षामुळेंच केवळ पडून रहातात. तेव्हां मालकांनीं तरी त्यांत धान्य पेरावें किंवा सरकारमार्फत त्या दुसऱ्याचे स्वाधीन केल्या जाव्या, ह्या व्यवस्थेंत वास्तविक तक्रारीस जागा नाहीं. ज्या जमिनींत आज कांहींच उत्पन्न होत नाहीं, तिचेबद्दल खंड मागण्याचा अधिकार जमीनमालकांस ठेवण्यांत आलेला नाहीं. सरकार अशा जमिनी आपल्या ताब्यांत घेईल व त्या कसण्याची इच्छा असणारांकडून अर्ज मागविण्यांत येऊन त्यांचा निकाल, सरकार स्वतःच्या पडीक जमिनी लागवडीसाठीं देतांना ज्या पद्धतीनें करतें त्याच पद्धतीनें केला जाईल. प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या मार्च, १९४३ मध्यें भरलेल्या सभेंत ह्या प्रश्नाचा खल झाला होता व पडीक जमीन लागवडीसाठीं सक्तीनें उपलब्ध करण्यांत यावी, नाहींतर अशा जमिनींवर दंड बसविण्यांत यावा, असें बोर्डानें मत व्यक्त केलें होतें. त्यास अनुसरून, डिफेन्स ऑफ इंडिया नियमाखालीं मुंबई सरकार वरील प्रमाणें हुकूम काढीत आहे.

### विमा कंपनी व सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स

अर्थाच्या अंकांत ता. २३ जून रोजीं विमाविषयक एक निवाडा प्रसिद्ध करण्यांत आला आहे तो वाचकांना विशेष उद्‌बोधक वाटेल. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सचें मत हें तज्ज्ञांचें मत ह्या दृष्टीनें महत्त्वाचें असलें तरी व्यवहार व सहानुभूतीची दृष्टी ह्यासंबंधांत त्याचा विचार केला असतां त्याचें मत निर्णायक न ठरणें कांहीं प्रसंगीं कसें आवश्यक आहे हें ह्यावरून दिसून येईल. सुपरिंटेंडेंटच्या मतांस कोर्टें सहाजीकच विशेष महत्त्व देणार हें उघड आहे. तथापि, निवाड्यांत दिसून येणारी कंपनीची परिस्थिति, सुपरिंटेंडेंटच्या हुकुमामुळें कंपनीसंबंधीं निर्माण झालेलें साशंक वातावरण, युद्धजन्य चलबिचल, कंपनीच्या डायरेक्टरांचें सचोटीचें वर्तन, कंपनीच्या पूर्वीच्या व्यवहाराचा समाधानकारक इतिहास ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे लाहोर हायकोर्टानें कंपनीचे बाजूनें निकाल देण्यांत फारच दक्षता दाखविली, असें म्हणावें लागतें. सुपरिंटेंडेंटच्या चुकीच्या हुकुमामुळें कंपनीचें रजिस्ट्रेशन रद्द होऊन तिच्या विमेदारांच्या अंतिम हितास बाध आला, तर त्यास जबाबदार कोण? सुपरिंटेंडेंटनें कंपन्यांविरुद्ध इलाज करण्यापूर्वी तिच्या व्यवहाराची अधिक काळजीपूर्वक व सहानुभूतिपूर्वक तपासणी करणें जरूर आहे, असा बोध ह्या निवाड्यावरून निघतो.

### म्हैसूर सिल्क फिलेचर्स, लि.

वरील कंपनीच्या ३१ डिसेंबर, १९४२ अखेरच्या रिपोर्टावरून तिच्या उत्कृष्ट प्रगतीची चांगली कल्पना येते. कंपनीचें रेशीम पॅरेशूट्‌साठीं उपयुक्त ठरलें असून कंपनीच्या उत्पादनशक्तीनेंच त्याच्या पुरवठ्याची मर्यादा ठरत आहे. कंपनीचें सर्व उत्पादन हिंदुस्थान सरकार घेत आहे, इतकेंच नव्हे तर म्हैसूर सरकारच्या फिलेचर्सच्या वाढींत कंपनी पुढाकार घेत आहे. ह्या योजनेप्रमाणें, कंपनीच्या वाट्यास ६०० बेसिन्स आलीं आहेत. कंपनीनें अहवालाचे वर्षीं ४ लक्ष रुपयांचे भाग विक्रीस काढले, ते सर्व खपले, त्यामुळें कंपनीच्या खपलेल्या भांडवलाचा आकडा ८ लक्ष रुपयांवर गेला आहे. कंपनीला तिच्या नव्या शेअरवर प्रत्येकीं ५ रु. म्हणजे ५०% प्रीमियम मिळालें, त्यामुळें २ लक्ष रुपयांची रक्कम कंपनीस प्रीमियमखातीं ठेवतां येईल. कामाच्या विस्तारासाठीं म्हैसूर सरकारनें पैशाची सढळ मदत केली व कामगार आणि नोकरवर्ग ह्यांस कामांत तयार करण्यासाठीं येणाऱ्या खर्चासाठी ६९,६९० रुपयांची ग्रँट दिली. इमारतींचें व यंत्रसामुग्री बसविण्याचें काम जोरांत चालू आहे. युद्धविषयक ऑर्डरीमुळें कंपनीला बिनलष्करी मागणी पुरवणें कठीण गेलें; तथापि कंपनीची युद्धविषयक कामगिरी इतकी महत्त्वाची आहे, कीं लोकांची झालेली गैरसोय त्या मानानें कांहींच नाहीं, असें म्हटलें पाहिजे. कंपनीची १९३८ सालीं स्थापना झाली, तेव्हां तिचीं फक्त ३४ बेसिन्स होतीं. कंपनीनें अल्पावधींत केलेली प्रगति प्रशंसनीय आहे. अहवालाचे वर्षअखेर घसारा, युद्धविषयक धोक्याचा विमा, मॅनेजिंग एजन्सी कमिशन, ह्या सर्वांची तरतूद करून कंपनीला १,९१,९६० रुपये नफा झाला, त्यांत गेल्या वर्षींच्या हिशेबांतील शिल्की नफा मिळविला म्हण १,९३,१५० रुपयांची रक्कम होते. इनकमटॅक्स व सुपरटॅक्स ह्यांसाठीं ५६ हजारांची तरतूद करून व २९,३६१ रुपये इंटेरिम डिव्हिडंडचे वजा करून, नफा वाटणीस १,०७,७८९ रुपये रहातात, त्याचा विनियोग कंपनीनें खालील प्रमाणें करण्याचें ठरविलें आहे:—१० रुपयांच्या भागावर १९ आ. कर माफ डिव्हिडंड (इंटेरिम डिव्हिडंड १२ आ. धरून एकूण डिव्हिडंड १५% करमाफ होतें) देण्यासाठी ३० हजार रुपये, भागावर ४ आ. करमाफ बोनससाठी १० हजार रु., ५० हजार रुपये जनरल रिझर्व्ह फंड व १७,७८९ रुपये पुढील वर्षांत ओढण्यासाठी. कंपनीनें मागाहून वाढीव्या दरानें विकलेल्या भागांस १९४२ च्या नफ्यांतून डिव्हिडंड मिळणार नाहीं, कारण ते भाग अहवालाचें वर्ष संपण्यापूर्वी अलॉट झालेले नाहींत. कंपनीच्या यशस्वी कारभाराबद्दल तिचें डायरेक्टर बोर्ड व मॅनेजिंग एजंट, मेसर्स नाइक आणि कं. हे अभिनंदनास पात्र आहेत. मॅनेजिंग एजन्सीचे प्रमुख भागीदार श्री. नारायणराव नाईक हे आहेत व त्यांनीं म्हैसूर प्रांतांत जाऊन यश मिळवून त्याचा वाटा त्यांच्या महाराष्ट्रीय शेअर होल्डरांना दिला आहे.

### रिझर्व्ह बँकेसंबंधीं तुलनात्मक तक्ता

(इश्यू विभाग, आंकडे कोटि रुपयांचे)

| | १ सप्टें. १९३९ | एक वर्षापूर्वी | २५ जून, १९४३ |
|---|---|---|---|
| सुटलेल्या नोटा | १७२·४४ | ४३९·०० | ७१३·३५ |
| स्टर्लिंग रोखे | ५९·५० | २५६·८५ | ५५४·४८ |
| हिं. सरकारचे रोखे | ३७·३९ | १२२·२८ | ११९·७१ |

## शेअर बाजार

( श्री. ब. वि. छोणकर, एम्. ए., बी. कॉम., २४, डे. जि. पुणें ४ यांजकडून )

**कापड गिरण्या:**—बॉबे डाईंग सेरीज सर्व गिरण्यांचे भाव पडलेल्या भावांत मागील पंधरवडा स्थिर आहेत. दोन तारखेस बदल्याच्या वेळेस डाईंगला मंदीवाल्यांस पंधरा दिवसांकरतां दहा रुपये इतका मोठा गाळा यावा लागला यावरून त्यामध्यें वेचाण बरीच आहे असें दिसतें व त्यामुळें डाईंगचा भाव मजबूत रहावा. त्याबरोबरच असेंही म्हणतां येईल कीं, ज्या अर्थी मंदीवाले इतका जबर गाळा देऊनही आपली वेचाण कापावयास तयार नाहींत त्या अर्थी त्यांना भाव आणखी पडावयास हवेत याचा विश्वास वाटत असला पाहिजे. कापडाचे व सुताचे भाव मुंबई, अहमदाबाद, अमृतसर इत्यादि ठिकाणच्या बाऊक बाजारांत तीस ते चाळीस टक्के उतरले आहेत व आणखीही उतरण्याचा संभव आहे.गिरण्यांच्या शेअरचे भाव या अगोदरच तितक्याच प्रमाणांत पडले आहेत. यापुढें मात्र भाव खालीं जाण्याचा वाव कमी होत आहे. कारण हिंदुस्थान सरकारचे वस्त्रनियंत्रणाबाबत जे वटहुकूम निघाले आहेत त्याचा परिणाम गिरण्यांचे नफ्यापेक्षां मधल्या दलालावर जास्त होणार आहे. तसेंच जादा नफ्यावरील वटहुकुमामुळें सर्व कारखानदारांना सरकारकडे नफ्यापैकीं बऱ्याच मोठ्या रकमा अनामत ठेवाव्या लागणार आहेत व त्या सव्याज परत मिळणार आहेत याचा परिणाम अंतीं कारखान्यांची आर्थिक मजबुती होण्याकडे होणार आहे. वस्त्रनियंत्रणाच्या हुकुमामुळें बाजारभावांत जी घसरगुंडी उडाली त्याबाबत एका प्रमुख गिरणीमालकानें, "यापुढें आम्ही सरकारचे वसुली कारकून म्हणून काम करण्याची जरूर उरली नाहीं" असे उद्गार काढले.यावरून भागीदारांना मिळणारे व्याजाला फार मोठा धक्का बसेल असें वाटत नाहीं. जर १९४१–४२ व १९४२–४३ या दोन वर्षांच्या व्याजाची सरासरी यापुढें मिळणें अगदीं शक्य आहे असें धरलें तर डाईंग, कोहिनूर इत्यादिकांस ४ टक्के व अपोलो, स्वदेशी, स्वान इत्यादींना पांच टक्के करमाफ व्याज सुटेल. उत्तरोत्तर चलनवाढीमुळें व्याजाचे दर कमी होत जाणार असल्यानें गुंतविणारास येवढ्यावरच समाधान मानणें भाग आहे.

**लोखंड व पोलाद:**—टाटा कं. नें मागील वर्षापेक्षां कमी व्याज जाहीर केलें असलें तरी, गुंतविणारास दुसरें कांहींच आकर्षण सांपडत नसल्यानें, ऑर्डिनरी व डिफर्डवर, अनुक्रमें ५॥ टक्के व ६। टक्के करमाफ व्याज चालू भावावर सुटत असल्यानें, दोन्ही शेअर्स अनुक्रमें ४१२–४१५; २०५०–२०७५ या सीमेंत अगदीं टिकून आहेत.

**इतर:**—हिंदुस्थान सरकारनें नुकतेच ३ टक्के १९६३–६५ व ३ टक्के १९५३–५५ संरक्षण कर्ज काढण्याचें जाहीर केलें आहे. जरी व्याज आकर्षक नसलें तरी खेळत्या पैशाच्या वैपुल्यामुळें तीं पुरेपूर उभारण्यास कोठलीच हरकत दिसत नाहीं. साडेतीन टक्क्यांचा भाव वरील उभारणीस अनुसरून ९४ वरून एकदम ९४॥ पर्यंत चढला आहे. तसेंच रिझर्व बँक इतके दिवस ३॥ टक्के रोखे वाटेल तितके ९४ च्या भावांत विकत होती, तें आतां थांबलें आहे. तेव्हां ३॥ टक्क्यांचे भाव वर जाण्याचाच जास्त संभव आहे. सरकारी रोख्यांना अनुसरून बँका, विमा, रेल्वे व वीज यांच्या शेअर्सचे भावही साडेतीन टक्क्यांच्या पातळींत येऊन बसले आहेत व खरीददार ते बाहेर काढावयास तयार नसल्यानें त्यांचे भाव चांगलेच मजबूत आहेत व यापुढेंही राहतील.

### सह्याद्रि विमा कंपनी, लि., नासिक

वरील कंपनीनें १९४२ सालीं १२,१२,८८१ रुपयांचें काम पुरें केलें व त्याच्या ९२५ पॉलिसी दिल्या. १९४१ चे तत्सम आंकडे १०,२९,२२७ रुपयांचें काम व १०७९ पॉलिसी, असे होते. म्हणजे, कंपनीच्या कामांत सुमारें १७% वाढ झाली. विम्याच्या प्रत्येक पॉलिसीची सरासरी १९४१ सालीं ९५४ रुपये होती ती १९४२ सालीं १,३११ रुपये झाली. म्हणजे, कामांत सुमारें २ लक्ष रुपयांची वाढ होऊनहि नव्या पॉलिसींची संख्या गतसालापेक्षां १५४ नीं कमी भरली. हप्त्यांचें उत्पन्न अहवालाचे वर्षी १,२५,९५२ रुपये झालें, म्हणजे त्यांत ३३% वाढ झाली. विमा खाती फंडांत ४६% ची भर पडून तो १,१०,५७२ रु. झाला. कंपनीचें खपलेलें भांडवल २ लक्ष रुपये झालें आहे. वसूल भांडवल ९७ हजार रुपये आहे. विमा खाती फंडावर ६·१७% व्याजाचा दर पडला आहे, तो अत्यंत अनुकूल असा आहे. गोवा प्रांतांत कंपनी रजिस्टर झाली असून मडगांव येथें तिचें प्रचार केंद्र उघडण्यांत आलें आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षीं प्राथमिक खर्च, शेअरवर कमिशन आणि ऑर्गनायझेशन खर्च ह्यांची ८,७३७ रुपयांची जिंदगीकडील बाब पूर्णपणें लिहून टाकली आहे, अहवालावरून कंपनीची प्रगति चांगल्या पायावर चालू आहे. असें दिसून येतें. १९४१ अखेरच्या मूल्यमापनांत कंपनीला वाढावा उरला होता व त्यानंतरची ही प्रगति कंपनीचा भक्कमपणा वाढविण्यास सहायकारक होईल.

### दुधाच्या भेसळीस बंदी

दुधाची भेसळ दोन प्रकारांनीं करतां येते. ( १ ) त्यांत पाणी घालून व ( २ ) त्यांतील स्निग्ध द्रव्य काढून घेऊन. ह्यांपैकीं दुधांत पाणी घालण्याचा प्रकार सर्वत्र आढळून येतो. दूध विकत घेणाराची त्यांत फसवणूक होतेच, परंतु असें पाणी मिसळणें धोक्याचेंहि असतें. हें पाणी खराब असणें अगदीं शक्य आहे व त्याचेद्वारा रोगजंतूंचा फैलाव होणें संभवनीय आहे. चांगल्या दुधाचा किमान दर्जा निश्चित करण्यांत आलेला आहे, त्यावरून कोणतेंहि दूध भेसळ आहे किंवा नाहीं, हें सांगतां येतें. ह्यापेक्षां कनिष्ट दर्जाचें दूध भेसळ असतें, हें स्पष्ट होतें. दुधांत १% पाणी घातलें तरी तें ओळखतां येण्याची व्यवस्था आतां झाली आहे व दुधांत थोडेंसुद्धां पाणी मिसळण्याची कायद्यानें बंदी केलेली आहे. दूध विशेष सकस असल्यास चांगल्या दुधाच्या किमान दर्जाइतकें तें होण्यापुरतेंसुद्धां पाणी घालणें बेकायदा आहे, असा हायकोर्टाचा निकाल लागलेला आहे.

### अमेरिकेची खंड-उसनवार मदत

अमेरिका संयुक्त राष्ट्रांना खंड-उसनवार पद्धतीनें प्रचंड प्रमाणावर सहाय्य करीत आहे. त्यासंबंधांतील अगदीं ताजे आकडे प्रसिद्ध झाले आहेत. मे, १९४३ मध्यें ह्या पद्धतीनें ७९ कोटि डॉलर्सची मदत अमेरिकेनें केली; ११ मार्च, १९४१ पासून ३१ मे, १९४३ अखेरच्या मदतीचा आकडा ११ अब्ज, ८९ कोटि डॉलर इतका झाला आहे. खंड-उसनवार पद्धतीनें अमेरिकेंतून निर्गत होणाऱ्या मालापैकीं २६% माल रशियाकडे जात आहे.१९४१ च्या अखेरीस रशियाकडे माल जाण्यास प्रारंभ झाला. एप्रील १९४३ अखेरच्या निर्गतीपैकीं ५२% माल दारूगोळ्याचा आहे.

## हैद्राबाद संस्थानाच्या अहवालांतील निवडक माहिती

शेती:—

हैद्राबाद संस्थानांतील लागवडीखालीं असलेलें एकंदर क्षेत्र सुमारें २,१८,००,००० एकर आहे.

ज्यांना शेती आहे त्यांची संख्या अंदाजी १४,१८,००० आहे.

सुधारलेल्या जातींच्या पिकांखालील एकंदर जमीन सुमारें ४,१७,००० एकर आहे. सुधारलेल्या बियाणांचा पुरवठा शेतकी खात्याकडून होत असतो.

संस्थानांतील एकंदर सोसायटया व त्यांचे सभासद यांची संख्या अनुक्रमें ४,५०० व १,७५,००० आहे व या सोसायटयांचें कामचलाऊ भांडवल सुमारें ३ कोट रुपये आहे.

संस्थानांत १५,००० वर सभासद असलेल्या ग्रामोद्धार सोसायटयांची संख्या १३० आहे.

औद्योगिक:—

संस्थानांत सुमारें ६५० कारखाने आहेत.

दरवर्षी २,४५,००,००० युनिट वीज तयार होते.

आठ जिल्ह्यांच्या शहरीं विद्युत्‌शक्तिपुरवठ्याची तरतूद झालेली आहे.

संस्थानांत कापडाच्या ६ गिरण्या असून तेथें प्रतिवर्षी सुमारें २॥ कोट पौंड सूत व ७ कोट वार कापड तयार होतें.

'शहाबाद सिमेंट कंपनी' दरवर्षी १॥ लाख टन सिमेंट तयार करते.

दोन लाख टनांहून जास्त साखर प्रतिवर्षी संस्थानांत तयार होते.

संस्थानांत सुमारें १३ लाख टन कोळसा दरवर्षी निघतो.

संस्थानांतील सिगारेटच्या कारखान्यांत दरवर्षी सुमारें १३३ कोट सिगारेटस्‌ तयार होतात.

'डेक्कन मार्बल आणि मायनिंग कंपनी' प्रतिवर्षी ४५० टन संगमरवरी दगड खाणींतून काढीत असते.

गंगावती व जगत्याल तालुक्यांत अनुक्रमें अभ्रक व लोह या मौल्यवान धातू खाणींतून काढण्याचें लायसेन्स हैद्राबाद कन्स्ट्रक्शन कंपनीस देण्यांत आलें आहे.

सरकारी खातीं व जनता यांच्याकडून आलेल्या मालांच्या ६५० नमुन्यांचें पृथक्करण औद्योगिक प्रयोगशाळांतून करण्यांत आलें.

हैद्राबाद संस्थानांत गुळ्यांचे २२ कारखाने आहेत.

'कोहिनूर ग्लास फॅक्टरीनें' गेल्या वर्षी २५ लाख रुपये किंमतीचा माल तयार केला.

'रोज बिस्कीट' कारखान्यांत गेल्या वर्षी तयार झालेल्या मालाची किंमत १॥ कोट रुपये होती.

हैद्राबाद संस्थानांत १३ आगकाड्यांचे कारखाने असून त्यामध्यें प्रतिवर्षी ४,६२,००० डझन आगकाड्यांच्या पेट्या तयार होतात.

दळणवळणाचीं साधनें:—

पब्लिक वर्क्स खात्यानें तयार केलेल्या सडकांची लांबी ५,२२५ मैलांहून अधिक आहे.

बस सर्व्हिस चालत असलेल्या सडकांची लांबी ४,००० मैलांपेक्षां जास्त आहे. चालू असलेल्या बसेस्‌ व लॉरीज्‌ची संख्या ३०० वर आहे.

हैद्राबाद संस्थानांत सुमारें १,४०० मैल लांबीचे रेल्वे रस्ते आहेत.

संस्थानांत जवळजवळ १,२०० पोस्ट ऑफिसेस्‌ आहेत. प्रतिवर्षी या पोस्टांतून ३॥ कोट पार्सलांचा बटवडा होतो. एकंदर १,२५,००,००० रुपयांच्या सुमारें ६॥ लाख मनिऑर्डरींचा व्यवहार या पोस्टांतून होतो.

दरवर्षी रु. ६,६३,००० किमतीचीं पोस्टाचीं साधीं तिकीटें व ३,३५,००० रुपयांचे सर्व्हिस स्टँप्स विकले जातात.

हैद्राबाद शहरांत व जिल्ह्यांत मिळून सुमारें १,५०० टेलिफोन आहेत.

## सन लाइफ ऑफ कॅनडा

### एकूण चालू कामाचा आकडा ८०० कोटींवर गेला

दहा लक्षांपेक्षां अधिक विमेदारांच्या बचतीमुळें निर्माण झालेली सन लाइफ ऑफ कॅनडाची जिंदगी आतां २,८६,८३,००,००० रुपयांपेक्षां अधिक झाली आहे, असें १९४२ च्या अहवालावरून दिसतें. नवीन कामाचा आकडा १९४१ च्या आकड्यापेक्षां अधिक भरून तो ५५ कोटि रुपये एवढा भरला. कंपनीनें संयुक्त राष्ट्रांच्या कर्जरोख्यांत ८० कोटि रुपये गुंतविलेले आहेत. सन लाइफनें १९४२ सालीं प्रत्येक कामाच्या दिवशीं सरासरीनें ७ लक्ष रुपये विमेदारांस दिले, म्हणजे वार्षिक सरासरी २१ कोटि रुपयांपेक्षां जास्त झाली. कंपनीनें तिच्या स्थापनेपासून आतांपर्यंत अशा रीतीनें ४१० कोटि रुपये वाटले आहेत. हप्त्यांचें उत्पन्न २० कोटि रु., गुंतविलेल्या रकमेवरील उत्पन्न १० कोटि रु., सर्व बाबींचें मिळून उत्पन्न ४६ कोटि रु., विमेदारांना वाटलेले ३ कोटि रु., भरलेला कर ७० लक्ष रु., घाटावा व कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह १० कोटि रु., इत्यादि आकडे १९४२ च्या रिपोर्टांत आढळतात. कंपनीच्या एकूण जिंदगीपैकीं ६२% रकम सरकारी व इतर रोख्यांत आहे.

### मृत्यूचें अनुकूल प्रमाण

कंपनीचे अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर, मि. वुड हे विमेदारांस उद्देशून म्हणतात:—"आयुर्विम्याची वाढ हें चालू शतकांतील सामाजिक प्रगतीचें एक महत्त्वाचें प्रतीक आहे. विमेदार व विमा कंपनी यांचेमधील सहकारी स्वरूपाचे संबंध आतां सर्वांस मान्य झालेले आहेत. प्रत्येक विमेदार हा विम्याचे व्यवसायांत सहभागी असतो. आयुर्विम्यानें पिढ्यानपिढ्या आपलें महत्त्व व स्थैर्य सिद्ध केलें आहे. सन लाइफला विमेदारांच्या मृत्युबाबत अनुभव अपेक्षेपेक्षां चांगला आला, तो इतका कीं मृत्यूचें प्रमाण १९४२ इतकें कमी गेल्या दहा वर्षांत नव्हतें. युद्धामुळें जादा क्लेम आले, त्यांस जागा करणें सर्वसाधारण विमेदारांच्या मृत्यूंच्या अल्प प्रमाणास सहज शक्य झालें. एकूण मृत्यूंच्या क्लेम्सच्या मानानें युद्धजन्य क्लेम्स आजवर २·८% पडले. हें प्रमाण फारच समाधानकारक आहे, कारण अपघातजन्य मृत्यूंचें प्रमाण मामुली काळांतहि ९% असतें. युद्धाचीं पहिलीं तीन वर्षें हीं मुख्यतः तयारींत व सिद्धतेंत गेलीं आहेत व युद्ध जसें पेटेल, त्या मानानें क्लेम्सचें प्रमाण वाढेल, हें लक्षांत घेऊन कॉन्टिन्जन्सी रिझर्व्हजमध्यें मोठाल्या रकमा टाकण्याचें धोरण सन लाइफनें प्रारंभापासूनच ठेवलेलें आहे."

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**


**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनीच्या**

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

**तरी विलंब न लावतां—**

**तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा**

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनींतच उतरा.**

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित.

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

## THE FARMER
## HIS WELFARE & WEALTH

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT**

**Sir Vithaldas Thakersey Memorial Building**

**9 Bakehouse Lane, Fort, Bombay.**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

रा. सं. के. ग्रं. पुणे ९२१०८४३

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख १४ जुलै, १९४३ | अंक २८

## बालकांचे खरे मित्र



पावसाळ्यांत लहान मुलें आजारी पडतात याचें कारण त्यांच्या आरोग्याची नीट काळजी घेतली जात नाहीं

**पुण्याच्या रसशाळेचीं**

● बालजीवन
● कुटजारिष्ट
● नागगुटी

अस्थिपोषक

● कुमारी आसव
● बाळगोळी
● ज्वराग्निवटी

हीं औषधें संग्रहीं बाळगून त्यांचा वेळींच योग्य उपयोग केल्यास मुलें गुटगुटीत व आनंदी राहातील.

: आमचीं केंद्रें :
मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें.

**आयुर्वेद रसशाळा, पुणें लि.**

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... | रु. १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. भाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

महापुरुषाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

# महेंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

**क्षेत्रफळाचे दृष्टीनें संयुक्त राष्ट्रांत पांचवा अनुक्रम**

अमेरिकेचें युद्धसहाय सर्वांत मोठें असलें तरी तो देश क्षेत्रफळाचे दृष्टीनें संयुक्त राष्ट्रांत पाचव्या अनुक्रमाचा आहे. युद्धापूर्वी रशिया व चीन ह्यांची लोकसंख्याहि अमेरिकेपेक्षा जास्त आहे. कॅनडा व ब्रॅझील ह्या देशांचें क्षेत्रफळ अमेरिकेपेक्षा जास्त आहे.

**मनुष्याच्या शरीरांतील रक्त**

सर्व साधारणपणें, प्रत्येक माणसाच्या वजनापैकीं ६% वजन त्याच्या रक्ताचें असतें.

**अमेरिकेंतील खेळाडू**

अमेरिकेंतील खेळाडूंना दरसाल २६ लक्ष फुटबॉल्स, ५ लक्ष बास्केट बॉल्स व ४ लक्ष बॉक्सिंग ग्लोव्हज् लागतात.

**मधमाशा**

एक हजार मधमाशांनीं त्यांच्या सबंद हयातींत जमविलेल्या मधाचें वजन एक पौंडापेक्षा अधिक भरत नाहीं.

**के. प्रो. एन. एस. सुब्बराव**

राजकार्यप्रवीण श्री. एन. एस. सुब्बराव, एम. ए. ( कँटब ), बार अॅट लॉ, अलाहाबाद विश्वविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख, हे बंगलोर येथें नुकतेच निधन पावले. श्री. सुब्बराव हे म्हैसूर विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु होते. अर्थशास्त्राचा त्यांचा व्यासंग मोठा होता. हिंदी आर्थिक परिषदेचे ते १९२९ सालीं अध्यक्ष होते व कॉटन टेक्स्टाइल टॅरिफ बोर्डाचे ते सभासद होते.

**मगोरा केमिकल कं. लि.**

वरील नांवाची एक कंपनी श्री. ए. व्ही. रानडे ह्यांनीं नुकतीच रजिस्टर केली आहे. कंपनीचें भांडवल २ लक्ष रुपये असून ती खासगी लिमिटेड कंपनी आहे.

**उंदरांच्या नाशासाठी दर एकरी ३ आणे कर**

पिकांचें नुकसान करणाऱ्या उंदरांचा नाश करण्यासाठी "रॅट पेस्ट अॅक्ट" नांवाच्या एका कायद्याचा मसुदा सिंध असेंब्लीमध्यें मंजुरीसाठी मांडण्यांत येईल. हा कायदा पांच वर्षे अंमलांत राहील. पांच वर्षांच्या ह्या योजनेवर ७½ लक्ष रुपये खर्च केला जाईल तो वसूल करण्यासाठी लागवडीखालील प्रत्येक एकरावर ३ आणे कर बसविण्यांत येईल.

**कॉलेज ऑफ नर्सिंग**

भायखळा मर्सिना हॉस्पिटलमध्यें वरील कॉलेज उघडण्यांत येणार आहे, तेथें नर्सिंगचें प्राथमिक शिक्षण देण्यांत येईल. बारा आठवड्यांचा शिक्षणक्रम असून असे चार वर्गाचे शिक्षणक्रम वर्षांत पुरे होऊन वर्षअखेर १४० नर्सेसचें शिक्षण पुरें होईल. शिक्षण इंग्रजींतून दिलें जाईल. उमेदवाराचें शिक्षण इंग्रजी सातवीइतकें असणें आवश्यक आहे.

**महाराष्ट्र युनिव्हर्सिटी**

महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमिटीनें मुंबई सरकारांस सादर करावयाच्या रिपोर्टाची मुदत ऑगस्टअखेर पुन: वाढविण्यांत आली आहे.

**सहकारी इन्स्टिटयूटची ज्युबिली**

बुधवारीं सायं. ६-३० वाजतां मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट संस्थेच्या रौप्य ज्युबिलीनिमित्त-पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत प्रो. शंकर रामचंद्र भागवत यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरणार आहे.

**जपानपुढें रबराच्या फाजील उत्पादनाचा प्रश्न**

जपाननें रबराच्या जागतिक उत्पादनाच्या बहुतेक भागाचा ताबा मिळविला असला, तरी त्यामुळें जपानची अडचण दूर झालेली नाहीं. नेदरलंड ईस्ट इंडीजमधून मागें रबर मोठ्या प्रमाणावर निर्गत होई, त्यामुळें स्थानिक तद्देशीय मळेवाल्यांचें पोट भरूं शके. जपान रबराची जगांत दुसरीकडे निर्गत करूं शकत नाहीं व त्यास स्वत:स उत्पादनाच्या एक दशांशापेक्षा ज्यास्त रबर नको आहे. रबराचें उत्पादन कमी केल्यास नेदरलंड ईस्ट इंडीजमधील आर्थिक घडी पार मोडून जाईल. जपाननें रबराचें उत्पादन सरकारी देखरेखीखाली नियंत्रित केलें आहे. युरोपियन मळे बंद केले तरी तद्देशीयांचे मळे चालू आहेत त्यामुळें जपानला रबर सांठवून ठेवावें लागत आहे. ह्या सांठवणीसाठी भांडवल अडकवून ठेवावें लागतें. कोयनेल, चहा, कॉफी, रबर, इत्यादींचें उत्पादन, विक्री व निर्गत हीं नियंत्रित करण्याचें काम एका कॉर्पोरेशनकडे देण्यांत आलेलें आहे.

**टिटाघर पेपर मिल्स कं. लि.**

टिटाघर पेपर मिल्सनें ३१ मार्च, १९४३ अखेरच्या वर्षी १ कोटि, ५३ लक्ष रुपयांची विक्री केली. म्हणजे, त्यापूर्वीच्या वर्षीच्या मानानें विक्री ४४ लक्ष रुपयांनीं जास्त झाली. नफा ७३ लक्ष रुपये उरला. डिव्हिडंड १५% सुटलें.

**बँक ऑफ इंडिया, लि.**

| | |
|---|---|
| १९४३ च्या पहिल्या सहामाहीचा नफा | २०,०३,१८४ रु. ५ आ. ९ पै |
| त्यांतून इनकमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी वजा | ७,५०,००० रु. |
| उरलेला निवळ नफा | १२,५३,१८४ रु. ५ आ. ९ पै |
| मागील सालच्या हिशेबांतील शिलकी नफा | ९,४४,५७९ रु. ० आ. ८ पै |
| एकूण | २१,९७,७६३ रु. ६ आ. ५ पै |

बँकेचें भरणा झालेलें भांडवल १ कोटि रुपये आहे, त्यावर द. सा. द. शे. ११% ( प्रत्येक भागास २ रु. १२ आ. ) करमाफ पहिल्या सहामाहीचें इंटेरिम डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे, त्यास ५ लक्ष, ५० हजार रुपये लागतील. उरलेली १६,४७,७६३ रु. ६ आ. ५ पै ही रकम पुढील सहामाहीच्या हिशेबांत ओढण्यांत येईल.

**सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.**

वरील बँकेस १९४३ च्या पहिल्या सहामाहींत मागील १० लक्ष, ८ हजार रुपयांचा शिलकी नफा धरून ४१ लक्ष, १½ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागास १ रु. ४ आणे करमाफ इंटेरिम डिव्हिडंड मिळणार आहे, त्यासाठी ८,४०,६६० रुपये लागतील.

**हिंदी लष्करभरतीची प्रांतवार वाटणी**

| | | | |
|---|---|---|---|
| पंजाब | ५०% | संयुक्तप्रांत | १५% |
| मद्रास | १०% | मुंबई | १०% |
| सरहद्द प्रांत | ५% | अजमीर-मारवाड | ३% |
| बंगाल | २% | मध्यप्रांत, आसाम, बिहार, ओरिसा | ५% |

**ट्रेझरी बिलांवर १ रु. व्याज**

गेल्या आठवड्यांत विकलेल्या हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रुपया व्याजाचा दर पडला.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २१८ | कार्दली–प्रो. काळे ह्यांची प्रकृति. | |
| २ दिल्ली येथें अन्न-पुरवठ्याची चर्चा ... | २१९ | ५ हिंदी आयुर्विमा कंपन्यांचें काम ... | २२२ |
| ३ शेअर बाजार ... | २२० | ६ वेस्टर्न इंडियाची वार्षिक सभा ... | २२२ |
| ४ स्फुट विचार ... | २२१ | ७ म्हैसूर संस्थानाची औद्योगिक प्रगति ... | २२३ |
| युरोपांत दुसरी आघाडी उघडली–मध्यवर्ती साखर कमिटी—वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.—बँक ऑफ बॉम्बे कं. | | ८ गुजराती समाजाची पद्दाणी ... | २२३ |



# अर्थ

बुधवार, ता. १४ जुलै, १९४३


## दिल्ली येथें अन्नपुरवठ्याची चर्चा

### मध्यवर्ती नियंत्रणाची आवश्यकता

अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें दिल्ली येथें भरविलेल्या परिषदेचें काम आतां संपलें आहे. गेल्या आठवड्यांत ह्या परिषदेस प्रारंभ झाला, त्यावेळीं प्रथम व्हाइसरॉयांनीं भाषण केलें व त्यानंतर हिंदुस्थान सरकारच्या अन्न-पुरवठा खात्याचे प्रमुख, सर अझीझुल हक, ह्यांचें भाषण झालें. व्हाइसरॉयांच्या भाषणाचा गोषवारा कोठेंच प्रसिद्ध झालेला नाहीं. परिषदेस मुख्यत: मध्यवर्ती सरकारचे, प्रांतिक सरकारांचे व संस्थानांचे अधिकारीच उपस्थित होते. प्रांतिक व संस्थानी प्रतिनिधींच्या सूचनांचा विचार करण्यासाठी परिषदेनें चार उपसमित्या नेमल्या व त्यांनीं धान्य खरेदी व वांटणी ह्यांवर मध्यवर्ती नियंत्रण, रेशनिंगच्या पद्धतीचा प्रमुख शहरांत अवलंब, भरमसाठ साठा करणारांवर व नफेबाजीवर उपाययोजना, वाहतुकीच्या साधनांचा विस्तार, चलनवाढीचें नियंत्रण, इत्यादि प्रश्नांचा विचार केला. सबंद हिंदुस्थानचा साकल्यानें विचार करून सर्व ठिकाणच्या लोकांना अन्नपुरवठा योग्य प्रमाणांत कसा करतां येईल व ह्या पुरवठ्याची किंमत मर्यादित कशी राखतां येईल, हे प्रश्न ह्या संबंधांत महत्त्वाचे आहेत. पुरवठ्याची सध्याची पद्धत सदोष असून, प्रांताप्रांतांतील स्पर्धेमुळें अन्नपुरवठ्यावर एकतंत्री नियंत्रण बसविणें कठीण आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. धान्यांचें उत्पादन व वाटणी हीं पूर्णपणें नियंत्रित केलीं तरच परिस्थितींतून मार्ग निघण्याजोगा आहे, हेंहि उघड आहे. ह्या बाबतींत मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक व संस्थानी सरकारें ह्यांचें पूर्ण सहकार्य होणें अगत्याचें आहे. कांहीं प्रांतांना व विभागांना आपल्या जवळील धान्याचा साठा व पुरवठा गरजू प्रांतांस व विभागांस द्यावा लागेल व ह्यासंबंधांत त्यांचेवर तशी सक्तीहि करावी लागेल. केवळ प्रांतिक सरकारांनीं एक-मेकांशीं वाटाघाटी करून धान्य देणें–घेणें ठरविणें श्रेयस्कर नाहीं. मध्यवर्ती नियंत्रणाची आवश्यकता आतां पटवून देण्याचें प्रयोजन उरलेलें नाहीं. चलनाच्या विस्ताराबरोबर वाढत असलेल्या महागाईस आळा घालणें ही गोष्ट मात्र सर्वस्वी मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंतील आहे व त्यासाठी हिंदुस्थान सरकारनें तातडीनें उपाययोजना आखणें अत्यंत जरूरीचे आहे. धान्य पुरवठ्याच्या परिस्थितीच्या असमाधानकारकपणांत चलनविस्तारामुळें घडून येणाऱ्या क्रयशक्तीच्या संकोचनाची भर पडूं न देणें हें हिंदुस्थान सरकारचें कर्तव्य आहे. सरकारास त्याची जाणीव आहे व त्या बाबतींत त्याचे प्रयत्नहि चालू आहेत.

अन्नपुरवठा परिषदेपुढें ता. ८ रोजीं भाषण करून सर अझीझुल हक ह्यांनीं हिंदुस्थान सरकारचे निर्णय विशद करून सांगितले. प्रांतिक सरकारांनीं आपल्या धान्याच्या खरेदा सध्याप्रमाणेंच पुढें चालू ठेवण्याच्या आहेत; प्रांतिक सरकारांनीं लोकांनीं धान्याचे निष्कारण साठे ठेवूं नयेत ह्याविषयीं दक्षता बाळगली पाहिजे; साठे करणारांस व नफेबाजांस कडक शासन करून त्यांचें निर्मूलन करण्यावरच सरकारच्या अन्नपुरवठ्याची योजना अवलंबून आहे; अधिकाधिक शहरांत रेशनिंगला प्रारंभ करण्याचे दृष्टीनें त्याच्या प्राथमिक तयारीस तावडतोब सुरवात केली पाहिजे; तुटीच्या प्रांतांनीं इतर प्रांतांकडून योग्य ती व्यवस्था करून धान्य मिळवावें, म्हणजे मध्यवर्ती सरकारच्या प्रयत्नांस ही गोष्ट पोषकच होईल; कापडासारखे नित्योपयोगी व आवश्यक जिन्नस लोकांना उपलब्ध करून देण्याची सरकार शिकस्त करीत आहे व करील; आंतरप्रांतीय खुल्या व्यापाराकडे उद्दिष्ट ह्या दृष्टीनेंच सध्यां पहाण्यांत येईल व त्याचा चालू परिस्थितीवर दुष्परिणाम घडूं दिला जाणार नाहीं; तूर्त धान्याचे कमाल बाजारभाव ठरवितां येणार नाहींत परंतु इतर मालाच्या किंमतीच्या मानानें धान्य महाग होऊं नये ह्याविषयीं सरकार कसून प्रयत्न करील; चलन विस्ताराच्या प्रश्नाचा सरकार विचार करीत आहे; नवीन व्यवस्था अंमलांत येईपर्यंत चालू व्यवस्थाच अंमलांत राहील, इत्यादि मुद्दे त्यांच्या भाषणांत मुख्यत: होते. सर अझीझुल हक ह्यांनीं कमालीच्या युद्धप्रयत्नाची आवश्यकता प्रतिपादन करून लोकांनीं शक्य तेवढा स्वार्थत्याग करण्याची तयारी केली पाहिजे, असें शेवटीं सांगितलें.

अन्न पुरवठा परिषदेची फलश्रुति वरीलप्रमाणें आहे. परिषदेची यशस्विता लोकांच्या अपेक्षेस उतरलेली नाहीं हें कबूल करणें भाग आहे. अन्न पुरवठ्याचा प्रश्न जितका व्यापक व बिकट तितकाच तो तातडीचा आहे, ह्या दृष्टीनें परिषदेच्या सल्ल्यानें सरकारनें केलेले निर्णय पुरेसे दूरगामी स्वरूपाचे नाहींत. युद्धविषयक लष्करी धोरण ही जशी मध्यवर्ती सरकारच्याच कक्षेंतील बाब समजण्यांत येते, तद्वतच अन्न पुरवठ्याची बाबहि हिंदुस्थान सरकारनें स्वत:च्या जबाबदारीची गोष्ट समजली पाहिजे. प्रांतिक सरकारांचें सहकार्य मध्यवर्ती सरकारनें जरूर घ्यावें, परंतु योजना आखतांना व ती अंमलांत आणतां एकसूत्रीपणा असणें आवश्यक असल्यानें, त्याबाबत मध्यवर्ती सरकारनेंच पुढाकार घेतला पाहिजे. धान्याची पैदास वाढविणें, त्यास उत्तेजन देणें, इत्यादि बाबी प्रांतिक सरकारें करूं शकतील; तथापि व्यापक प्रश्न सोडविण्याचे कामीं मध्यवर्ती सरकारचेंच नेतृत्व पाहिजे. ही जबाबदारी स्वीकारण्यांत कसूर होऊं देतां कामा नये, अशीच लोकांची स्वाभाविक अपेक्षा आहे.

## शेअर बाजार

( श्री. व. बि. लोणकर एम्. ए., बी. कॉम्. २४डे. जि. पुणें ४ )

**चलनवाढ आणि शेअर बाजारः**—काल अमुक झालें म्हणून बाजार वरती गेला व तमुक झालें म्हणून बाजार खालीं आला, अशा तऱ्हेची बाजारभावांची छाननी दैनंदिन चालली असतांना एक घटना प्रामुख्यानें मान्य करण्यांत येते कीं आज जवळ जवळ वर्षभर शेअर बाजारांत चाललेल्या तेजीच्या मागें एक सारख्या वाढत चाललेल्या चलनाचा जोर आहे. या चलनवाढीमुळें बाजारभाव लढाईच्या वाईट बातम्यांमुळें तात्पुरता खालीं येत असे व पुन्हा उफाळी मारून वर येत असे. लोकांच्या हातांत पैसा आला कीं तो कोठेतरी गुंतविला हा गेलाच पाहिजे. तेव्हां सर्व शेअर बाजारांतून दलालांच्या दीडवितीच्या कचेऱ्यांतून गिऱ्हाइकांची गर्दी वाढल्यास नवल नाहीं. मग 'हा फार वाढला आहे व तो अजून खालीं आहे, मग तोच घे ' अशा रीतीनें चांगल्या-वाईट शेअर्सचे सर्वांचेच भाव एकसारखे वाढत राहिले. जोपर्यंत पैशाचा ओघ सारखा देशांत पसरत आहे तोपर्यंत भाव खालीं येण्याची भाषाच काढणें व्यर्थ आहे, या विश्वासावरच, जरी मागील महिन्यांत पुष्कळसे पडले असले तरी, अजूनही भाव १९४२ चे कमालमर्यादेचे मानानें पुष्कळच वर टिकून आहेत. हा विश्वास कोठवर टिकेल ?

बेसुमार चलन वाढ करून देशांत आर्थिक बेबंदशाही उत्पन्न करून स्वतःच खड्ड्यांत पडण्याइतकें आमचे सरकार खुळें नाहीं. झालेली वाढ आतां मात्र यापुढें आपल्याच गळ्यांत येईल कीं, काय अशी जाणीव हिंदुस्थान सरकारला झाल्याचीं चिन्हें हळु हळु दिसूं लागलीं आहेत. प्रथमतः युद्ध कार्य साधण्याकरतां निवळ स्वतःच्या शब्दांच्या जोरावर सरकार नोटा छापीत होतें. हें चालू असतांना जाणत्या लोकांनीं सावधान केलें असतां युद्धामुळें देशांत ही खुशालीच्या भरभराटीची लाट आली असून लोक त्याचा फायदा घेत आहेत असें चलन वाढीचें समर्थन करण्यांत आलें. परंतु आतां ही परिस्थिति दूर झाली आहे, व या धावऱ्या चलन वाढीवर सरकार उपाय योजूं लागलें आहे. सरकार लोकांच्या हातांत नोटा आल्यावर पुन्हां परत काढण्याच्या उद्योगांत आहे.

प्रथमतः जादा नफ्याबाबत वटहुकूम काढून वाढलेल्या शंभर रुपये नफ्यापैकीं शेकडा ९३$\frac{3}{4}$ इतके कर रूपानें परत सरकारी तिजोरींत उद्योग धंद्यांकडून खेचण्यांत येणार आहेत. अर्थातच यामुळें भागीदार, मजूर व सर्व लहान-मोठा दलाल वर्ग यांची क्रयशक्ति कमी होणार आहे. तसेंच नवीन कंपन्या काढण्यास बंदी केल्यामुळें लोकांत पसरविला जाणारा पैसाही बंद करण्यांत आला आहे. या बंदीमुळें आणखी बँका निघणें बंद होऊन त्यांच्या तर्फे ' निर्माण ' करण्यांत येणाऱ्या पैशालाही एकपरीनें मर्यादित करण्यांत आलें आहे. नुकतीच बातमी आली आहे कीं, हिंदुस्थान सरकार बँकांना यापुढें सोनें, चांदी व इतर मालाच्या तारणावर कर्जें देण्यास बंदी करणार आहे. यामुळेंही बँकांची पैशांची ' निर्मिति ' व त्याची फिरत कमी होणार आहे.

कापड व सूत या बाबतच्या वटहुकुमामुळें सर्व कापडाचा व सुताचा साठा आतां बाहेर येण्यास लागून भाव पडण्यास चांगली सुरवात झाली आहे. नुकत्याच दिल्लीस झालेल्या अन्न परिषदेनें सुद्धां जेणेंकरून धान्याचे व इतर मालाचे साठे बाहेर पडतील अशी योजना आंखली आहे. या सर्व योजनांमुळें लपून राहिलेला माल बाहेर पडून मागणी व पुरवठा यामधील तफावत कमी होईल. माल दडविण्याचें कारण नफा हें एकच नसून त्याच्यामागें व्यापारी वर्गाला पैशाच्या कमी होत चाललेल्या किंमतीची भीति प्रमुख आहे. जो जो महर्गता वाढत होती तों तों प्रत्यक्ष माल साठवून सवनता कायम राखण्याचे व्यापारी वर्गाचे प्रयत्न चालू होते व त्यामुळें जास्त उत्पादनाच्या अभावीं खोटा दुष्काळ पडून चलनवाढीचें स्वरूप जास्त भयानक दिसत होतें. हे साठे बाहेर पडल्यानें टंचाई कांहींना कांहीं कमी झाल्याखेरीज राहणार नाहीं व चलनाचा आकार व मालाचा आकार यामधील तफावत कमी होऊन थोडी तरी सुसंबद्धता निर्माण होईल. अशी परिस्थिति निर्माण होण्यास कांहीं काळ आणखी लागेल. पण येवढें आज धरून चालण्यास हरकत नाहीं कीं चलन वाढीची कमाल मर्यादा आतां झाली आहे व यापुढें या ना त्या तऱ्हेनें ती खुंटण्याच्या मार्गास लागली आहे.

वरील चर्चेवरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं ज्या एका कारणाच्या जोरावर शेअर बाजार सारखा तेजींत जात होता त्या कारणाचें सामर्थ्य कमी होण्यास सुरवात झाली आहे. यावरून जाणत्यांनीं काय बोध घ्यावयाचा तो घ्यावा.

---


ऐन युद्धाच्या काळांतहि

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनीनें केलेली

उत्साहवर्धक प्रगति

१९४२ मध्यें ७६ लाखांवर नवें काम

आयुर्निधींत १८ लाखांवर नवी भर

| | |
|---|---|
| एकूण चालू विमे | ५,८१,००,००० रु.हून अधिक |
| गंगाजळीसह आयुर्निधि | १,६८,००,००० रु.हून अधिक |
| १९४२ चें वार्षिक उत्पन्न | ३५,००,००० रु.हून अधिक |
| खर्चाचें शेंकडा प्रमाण | ११.१० |

विमा उतरण्याच्या अथवा एजन्सी घेण्याच्या दृष्टीनें वेस्टर्न इंडियाची निवड करणें फायदेशीर असतें.

माहिती मागवा—

मॅनेजर,

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.

पुणें शाखाः—१७९ बुधवार, लक्ष्मी रोड, पुणें २.

## स्फुट सूचना

### संयुक्त राष्ट्रांची सिसिली बेटावर स्वारी

जनरल आयझेनहॉवर ह्यांच्या नेतृत्वाखालीं संयुक्त राष्ट्रांच्या फौजांनीं १० जुलै रोजीं पहांटे सिसिली बेटावर उतरून युरोपांतील दुसऱ्या आघाडीस प्रारंभ केला, हें वृत्त संयुक्त राष्ट्रांस विशेष उत्साहकारक वाटलें तसेंच दोस्त राष्ट्रांना, विशेषतः इटलीला त्यानें धक्काच बसला असला पाहिजे. सिसिलीच्या भूमीवर पदार्पण करून शत्रूला त्याच्या मातृभूमींतून मागें हटवण्याचें कार्य अत्यंत बिकट आहे, ह्यांत संशय नाहीं. परंतु संयुक्त राष्ट्रांनीं सर्व पूर्व तयारी करून व यशाप्रीत्यर्थ द्यावी लागणारी जबर किंमत हिशेबांत घेऊनच ही आघाडी उघडलेली आहे. शत्रुराष्ट्रांनीं सिसिलीवर स्वारी होणार हें अगोदर ओळखलें असलेंच पाहिजे, ह्या दृष्टीनें शत्रू बचावाची शिकस्त करील, हेंहि उघड आहे. युद्धाची प्रगति कशी होत आहे हें इतक्यांतच समजणार नाहीं, परंतु संयुक्त राष्ट्रांना त्यांत यश येऊन इटलीवर चालून जाणें पुढें सोईचें होईल, ह्याबद्दल शंका नाहीं. भूमध्य समुद्राचा मार्ग संयुक्त राष्ट्रांस त्यामुळें पूर्णपणें खुला होईल आणि युरोपांत आणखीहि कांहीं ठिकाणीं चाल करून जाणें त्यांस शक्य होईल. जर्मनीच्या अंकित असलेलीं युरोपियन राष्ट्रें प्रस्तुत लढाईच्या प्रगतीकडे टक लावून पहात असतील ह्यांत नवल नाहीं.

---

### मध्यवर्ती साखर कमिटी

इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या अथवा ज्यूट कमिटीच्या धर्तीवर इंडियन सेंट्रल शुगर कमिटीची स्थापना होण्याचें घाटत आहे व तिच्या घटनेसंबंधीं प्रांतिक सरकारांचीं मतें मागविण्यांत आलीं आहेत. साखरेवरील एक्साइज ड्युटीच्या फंडांतून कमिटीचा खर्च चालेल. साखरेसंबंधीं संशोधन सुरू करून त्यांत सुधारणा करवणें व पॉवर अल्कोहोल, रेक्टिफाइड स्पिरिट, ह्यांसारख्या उपयुक्त पदार्थांचें उत्पादन घडवून आणणें, हीं शुगर कमिटीचीं प्रमुख कामें रहातील. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचे प्रतिनिधी व उंसाचे उत्पादक, कारखानदार आणि व्यापारी ह्यांचा कमिटींत समावेश होईल. कमिटीचा सेक्रेटरी हा प्रारंभीं तरी सरकारी अधिकारी राहील व चेअरमन बिनसरकारी असेल. अशा तऱ्हेची कमिटी अस्तित्वांत यावी, ह्याबद्दल गेलीं कित्येक वर्षे हितसंबंधी लोकांची मागणी होती. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्सनें १९३७ मध्यें ह्या विषयावर ठरावहि केला होता. संशोधनावर केलेला खर्च ही वस्तुतः तोट्याची बाब नसून, ती एकप्रकारची मोठ्या व्याजानें गुंतवलेली रकमच होय, ही गोष्ट आतां सर्वांस पटलेली आहे. साखरेवरील एक्साइजच्या पट्टींतील कांहीं भागाचा विनियोग त्या धंद्याच्या सुधारणेकडे होणें, हें अत्यंत अगत्याचें आहे. साखरेच्या धंद्यासाठीं इतके दिवस कमिटीची स्थापना झाली नाहीं, हेंच विशेष होय. साखरेच्या उत्पादनांत ज्यास्त कार्यक्षमता निर्माण होण्यास व त्याचा दर्जा सुधारण्यास कमिटीनें हातीं घ्यावयाच्या योजना उपयोगी पडतील. प्रत्येक हंड्रेडवेट साखरेस एक आणा, ह्या दरानें साखरेवरील एक्साइजच्या वसुलींतून वेगळ्या फंडांत रकम वर्ग करण्यांत येईल व शुगर कमिटीच्या खर्चासाठीं त्या फंडाचा विनियोग केला जाईल.

---

### वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीचे चेअरमन, श्री. वि. शं. वैद्य, ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं केलेल्या भाषणाचा गोषवारा आजच्या अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध करण्यांत आला आहे, त्यावरून कंपनीच्या सतत प्रगतीची कल्पना येईल १९४२ साली कंपनीस १९४१ पेक्षा ७½ लक्ष रुपयांचें काम अधिक मिळालेलें आहे, लाइफ ॲशुअरन्स फंडांत १८½ लक्ष रुपयांची भर पडली आहे, रिझर्व्ह फंडाची रकम ४ लक्ष रुपयांवर गेली आहे, कंपनीजवळील रोख्यांची ताळेबंदांतील किंमत प्रत्यक्ष बाजारभावानें होण्याच्या किंमतीपेक्षा १४ लक्ष, ८४ हजार रुपयांनीं कमी आहे तरी ती वेस्टर्न इंडियाच्या वहिवाटीप्रमाणें हिशेबांत घेतलेली नाहीं, भागीदारांना १९४२ सालाकरितां १०% डिव्हिडंड देण्यांत आलें खर्चाचें प्रमाण अगोदरच कमी असूनहि तें आणखी खालीं गेलें आहे, लॅप्सचें प्रमाणहि अल्प आहे, इत्यादि गोष्टी कंपनीची सुस्थिति व भरभक्कमपणा ह्यांची निदर्शक आहेत. "सांप्रतच्या परिस्थितींत नवीन भर पडणाऱ्या कामावरील हप्त्याच्या मोठमोठ्या रकमा पूर्वीप्रमाणें चांगलें व्याज येण्याच्या दृष्टीनें गुंतविणें दुर्घट झालें आहे व त्याचा परिणाम व्हॅल्युएशनवर झाल्याखेरीज रहाणार नाहीं असें वाटतें" असें चेअरमननीं आपल्या भाषणांत सांगितलें. कित्येक हिंदी कंपन्यांना आपले हप्त्यांचे दर वाढवावे लागले आहेत, ह्या दृष्टीनें वेस्टर्न इंडियास मूल्यमापनांत वाढावा पूर्वीचे मानानें कमी उरला तरी विमेदारांनीं विश्वासाठीं वेस्टर्न इंडियाचीच निवड केली ती योग्यच केली, असेंच त्यांस वाटण्याजोगी त्या कंपनीची भक्कम परिस्थिति आहे. गेल्या २९ वर्षांच्या काटकसरीच्या व सावधगिरीच्या कारभाराची पुण्याई कंपनीचे पाठीशी आहे, त्यामुळें युद्धजन्य प्रतिकूल परिस्थितीस तोंड देण्याचें तिचें सामर्थ्य निर्विवाद आहे.

---

### बॉंबे को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा जून, १९४३ चा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत प्रारंभीं सर मणिलाल नानावटी ह्यांनीं मुंबईच्या रोटरी क्लबांत "हिंदी शेतकऱ्यांचा प्रश्न" ह्या विषयावर केलेल्या भाषणाचा सारांश दिला आहे. त्यांत, शेतकऱ्यांची व खेडेगांवांची आजची स्थिति त्यांनीं वर्णिली असून त्यांच्या उद्धाराचें महत्त्व आणि मार्ग हीं सांगितलीं आहेत. मद्रास येथें सहकारी इन्स्टिट्यूटसच्या व बँकांच्या असोसिएशन्सच्या स्टँडिंग कमिट्यांची संयुक्त सभा भरली होती, त्याची माहिती सभेस हजर राहिलेले दि. ब. काजी ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे. श्री. त्रिवेदी ह्यांनीं "लँड मॉर्गेज बँकांपुढील जुने-नवे प्रश्न" ह्या विषयावर लेख लिहिला आहे व लँड मॉर्गेज बँकांच्या कामकाजाचें वर्णन श्री. गुर्जर ह्यांनीं केलें आहे. बेळगांव जिल्ह्यांतील स्वस्त धान्याच्या सहकारी दुकानांची माहिती श्री. अगरगोल ह्यांनीं दिली आहे. अभिप्राय, नवे ग्रंथ, संपादकीय स्फुटें, सहकाराची प्रगति, सहकारी बातम्या, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें, सहकारी बँकांच्या हिशेबाचे तक्ते, इत्यादि नेहमींचीं सदरें अंकांत आहेतच.

---

### प्रो. काळे ह्यांची प्रकृति सुधारत आहे

गेले कांहीं महिने, पचनक्रियेंत बिघाड झाल्यामुळें प्रो. वा. गो. काळे ह्यांची प्रकृति नादुरुस्त होती. २२ जून रोजीं मुंबई येथें त्यांचेवर शस्त्रक्रिया करण्यांत आली, ती यशस्वी होऊन प्रो. काळे पुणें येथें परत आले आहेत. त्यांची प्रकृति सुधारत आहे.

---

## हिंदी आयुर्विमा कंपन्यांचें १९४२ मधील काम

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| कंपनी | १९४२ | १९४१ | १९४० |
|---|---|---|---|
| ओरिएंटल | ९५१ | ८१६ | ७४९ |
| हिंदुस्थान | २८८ | २६० | २७५ |
| न्यू इंडिया | २३५ | १७७ | १४३ |
| बॉबे म्युच्युअल | १७२ | १७१ | १५१ |
| नॅशनल | १३७ | १६६ | १५९ |
| एंपायर | १३६ | १३४ | १३२ |
| भारत | १३२ | १४० | १५१ |
| लक्ष्मी | १२५ | १०० | ८३ |
| बॉबे लाइफ | १०० | १११ | १२२ |
| इंडस्ट्रिअल अँड प्रुडेन्शिअल | ९८ | ९० | ८१ |
| युनायटेड इंडिया | ८५ | ११८ | ९८ |
| एशिअन | ८४ | ७० | ५८ |
| मेट्रोपॉलिटन | ७६ | ७४ | ७१ |
| वेस्टर्न इंडिया | ७५ | ६९ | ६७ |
| जनरल | ७१ | ६९ | ६९ |
| नॅशनल इंडियन | ६७ | ६१ | ४९ |
| ज्युपिटर जनरल | ६५ | ४५ | १९ |
| न्यू एशिॲटिक | ६० | ६२ | ६० |
| रुबी जनरल | ५७ | ५३ | ३१ |
| फ्री इंडिया | ३७ | १६ | ३४ |
| ओघ इंशुरन्स | ३० | ३७ | ३३ |
| बॉर्डन | २८ | ३० | २८ |
| हेलिथ | २४ | २९ | २० |
| कलकत्ता इं. | २४ | २१ | १६ |
| नेपच्युन | २३ | २२ | २२ |
| बॉबे कोऑपरेटिव्ह | २३ | ४५ | ४० |
| इं. एकनॉमिक | १९ | १३ | ९ |
| आर्यस्थान | १५ | १४ | १३ |
| बंगाल इं. | १५ | २१ | २० |
| भाग्यलक्ष्मी | १४ | १५ | १० |
| कॅनरा म्युच्यूअल | १३ | १२ | ८ |
| डिपॉझिटर्स बेनिफिट | १२ | ७ | ४ |
| सेंटिनल | ११ | १८ | १० |
| साउथ इं. को. | ९ | १३ | ० |
| पॉप्युलर | ८ | ८ | ६ |
| महावीर | ८ | ६ | ६ |
| स्टार ऑफ इंडिया | ८ | ३ | ६ |
| ट्रस्ट ऑफ इंडिया | ८ | ७ | ६ |
| बंगलक्ष्मी | ५ | ५ | ५ |
| पलाडियम | ४ | ३ | ५ |
| प्रवर्तक | २ | ४ | १ |

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची वार्षिक सभा

### चेअरमन, श्री. विनायक शंकर वैद्य, बी. ए. (डि.) यांचें ता. २७ जूनच्या सभेंतील भाषण

१९४२ मध्यें कंपनीकडे एकंदर ९५, ७१, ४४१ रुपयांचें नवीन काम दाखल झालें. पैकीं ७६, १८, ७२९ रुपयांचें नवीन काम हते येऊन पुरें झालें. या वर्षाच्या नव्या कामाची गेल्या वर्षाच्या कामाशीं तुलना केल्यास या वर्षी सुमारें साडेसात लाखांची नवीन कामांत वाढ झाली असल्याचें आपणांस आढळून येईल.

अहवालाचे सालीं प्रिमियमचें एकूण उत्पन्न रीइन्शुअरन्स प्रिमियम वजा जातां रुपये २८,०९,६२३ चें झालें. इन्व्हेस्टमेंटवरील निव्वळ व्याजाचें व भाड्याचें उत्पन्न रु. ६,२२,६३५ जमा आहे. सर्व तऱ्हेचा खर्च वजा जातां या सालीं कंपनीला लाइफ ॲशुअरन्स फंडांत रुपये १८,१९,३९९ ची भर घालतां आली. त्यामुळें कंपनीचा एकंदर विमाफंड आतां रुपये १,६२,९४,०३१ इतका झाला आहे. कंपनीच्या इन्व्हेस्टमेंटची हिशेबी नोंदलेली खरेदीची एकूण किंमत रुपये १,५३,१६,७१६ असून कंपनीचे हिशेबाचे वर्षी तारीख ३१-१२-४२ ला बाजारभावानें त्याची किंमत रुपये १,६८,०१,५७७ इतकी होत आहे. कंपनीच्या लाइफ फंडावर सरासरी ३·९४% इतका व्याजाचा दर पडला आहे. १९४१ सालीं हा दर ३.९९ इतका होता. आर्थिक मंदीमुळें नवीन इन्व्हेस्टमेंटवर व्याजाचा दर बराच कमी मिळत असल्यानें व इन्कमटॅक्सच्या दरांत झालेल्या वाढीमुळें हा फरक होत आहे.

"विमा कंपन्यांना आपला पुष्कळसा फंड हिंदुस्थानांतील उद्योगधंदे वाढविण्यासाठी संपूर्ण सुरक्षित अशा स्थळीं गुंतविणें शक्य नाहीं कां? या कार्याकरितां एकाद्या विमा कंपनीनें कां पुढाकार घेऊं नये किंवा या बाबतींत खुद्द वेस्टर्न इंडियानेंच पुढाकार घेऊन दुसऱ्यांना हा नवीन धडा कां घालून देऊं नये?" असा प्रश्न सर विश्वेश्वर अय्या ह्यांनीं कंपनीच्या रौप्यमहोत्सवाचे वेळीं पुढें मांडला होता.

सर विश्वेश्वरअय्या यांनीं म्हटल्याप्रमाणें वेस्टर्न इंडियानें पायोनियर संस्था म्हणवून घेण्याचा योग आणावा अशी माझी सूचना आहे. भरपूर सुरक्षितता ठेवून निदान पांच टक्के पैसे तरी उद्योगधंद्यांत गुंतवावेत अशी माझी आपणांस सूचना आहे. अहवालाचे सालीं खर्चाचें प्रमाण शेंकडा २०·१० आहे. १९४१ सालीं तें २१·४१ होतें. नवीन कामांत वाढ असूनहि खर्चाचें प्रमाण कमी झालें आहे. त्याचप्रमाणें अहवालाचे सालीं कंपनीच्या कामाचें लॅप्सचें प्रमाण नेहमीप्रमाणें कमी आहे.

### बाजारभावाऐवजीं उत्पादनाचा खर्च हिशेबांत घेणार

कपाशीच्या कापडाच्या उत्पादकांजवळील मालाच्या साठ्यांवर युद्धविषयक धोक्याच्या विम्याचा हप्ता बसवितांना, साठ्याची बाजारभावानें होणारी किंमत हिशेबांत घेतली जात असे. १ जुलै पासून पुढें बाजारभावाऐवजी विम्याच्या वेळेची उत्पादनाची किंमत हिशेबांत घेतली जाणार आहे. ही सवलत उत्पादकांजवळील साठ्यालाच फक्त मिळणार आहे व त्यामुळें गिरणीवाल्यांच्या विम्याच्या हप्त्यांत बरीच घट होणार आहे.

## म्हैसूर संस्थानाची औद्योगिक प्रगति
### ( १९४१-४२ )

१९४१-४२ मध्यें संस्थानाच्या मदतीनें खालील कारखाने स्थापन झाले अथवा सुरू झाले:—

( १ ) म्हैसूर वूलन इंडस्ट्रीज लि.
( २ ) म्हैसूर किर्लोस्कर लि.
( ३ ) भारत ऑईल मिल्स लि.
( ४ ) चितळदुर्ग ऑइल अँड इं. कं. लि.
( ५ ) दावणगिरी वनस्पति व्हेजिटेबल ऑइल कं. लि.

संस्थानच्या औद्योगिक खात्यानें ३० अर्जदारांना २७,१६० रुपयांचीं कर्जें दिलीं. गेल्या कांहीं वर्षांत कार्यक्रमाप्रमाणें स्थापन केलेल्या ग्रामोद्योगांची प्रगति घडवून आणण्यांत आली. हातमागाच्या धंद्यावर गिरण्यांच्या स्पर्धेमुळें अनिष्ट परिणाम झाला, तेव्हां कोष्टयांना स्वस्त किंमतीस सूत विकण्याची योजना आखण्यांत आली, तिचेप्रमाणें कोष्टयांना १९४१-४२ मध्यें ९६ हजार रुपयांचें सूत पुरविण्यांत आलें.

### कांहीं महत्त्वाचे सरकारी कारखाने

सेंट्रल इंडस्ट्रिअल वर्कशॉप, बंगलोर:—ह्या वर्कशॉपमध्यें किरकोळ यंत्रें बनविण्याचें व दुरुस्तीचें मिळून १,३६,०५९ रुपयांचें काम झालें.

चामराजेंद्र टेक्निकल इन्स्टिटयूट:–ह्यामध्यें ९३ ½ हजारांचा माल तयार झाला. विक्रीची रकम १ लक्ष, २८ हजार रुपये भरली.

गव्हर्मेंट इलेक्ट्रिक फॅक्टरी:—ह्या कारखान्याची विक्री ५,१०,३३८ रुपयांची झाली. सप्लाय खात्यास लागणारा माल तयार करून फॅक्टरीनें पुरवला.

गव्हर्मेंट प्रोसिलेन फॅक्टरी:—ह्या कारखान्यानें २,६३,२३५ रुपयांची विक्री केली. कोकरी खात्याची वाढ चालू आहे.

गव्हर्मेंट इंडस्ट्रिअल अँड टेस्टिंग लॅबोरेटरी:—विक्रीचा आकडा ३,२१,२६० रुपये झाला. तिचे लिव्हर एक्स्ट्रॅक्ट, ॲसिटेट्स व क्रीम ऑफ टार्टर हे पदार्थ चांगले खपत आहेत.

गव्हर्मेंट सोप फॅक्टरी:—विक्रीचा आकडा ८,८०,६६४ रुपये झाला. फॅक्टरीची वाढ करण्यांत येत आहे.

गव्हर्मेंट सिल्क वीव्हिंग फॅक्टरी—विक्रीचा आकडा सुमारें ४ लक्ष रुपये झाला. कारखाना पॅरेशूट कापडाच्या उत्पादनांत मुख्यतः गुंतला होता.

गव्हर्मेंट बायक्रोमेट फॅक्टरी—१९४१-४२ हें ह्या कारखान्याचें पहिलेंच वर्ष होय. विक्री २६, हजारांची झाली.

म्हैसूर केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि.—विक्रीचा आकडा १०,९५,००० रु. होता सलफ्युरिक ॲसिड, अमोनियम सल्फेट, अमोनिया, सुपर फॉस्फेट, इत्यादींचें उत्पादन कारखान्यानें केलें.

म्हैसूर लँप वर्क्स लि.—ह्या कारखान्यानें २,०१,००० रुपयांचा माल विकला.

म्हैसूर कॉफी क्युरिंग वर्क्स लि.—सुमारें २२०० टन कॉफीचे क्युरिंगवर कंपनीनें २२ हजार रुपये निवळ नफा मिळविला. कॉफी लावणारांना १,१८,४६८ रुपये कर्जाऊ देण्यांत आले.

म्हैसूर स्टोनवेअर पाइप्स अँड पॉटरीज लि.–कारखान्यानें २,२३,०४५ रुपयांचा माल विकला व म्हैसूर आणि बंगलोर ड्रेनज कामासाठीं लागणारा माल पुरविला.

## मुंबई शहरांतील मध्यम वर्गीय गुजराती समाजाची पहाणी

( ता. २३ जूनच्या अंकांतील लेखाचा उत्तरार्ध )

एकूण २८० कुटुंबांच्या पहाणींत असें आढळून आलें, कीं ३५·८% कुटुंबांची थोडीफार बचत आहे; २८·७% कुटुंबें कर्जांत आहेत. ज्या कुटुंबांना बचत करतां येते, अशांचे संबंधीं खालीं माहिती दिली आहे—

| उत्पन्नाचा गट | बचत करणारीं कुटुंबें | वार्षिक सरासरी बचत रु. |
|---|---|---|
| १ | ८ | ५७ |
| २ | ५५ | ८६ |
| ३ | ३७ | ९६ |
| ४ | ३६ | २१३ |

बचत गुंतविण्याचा सामान्य मार्ग विमा पॉलिसी हाच आढळला. कारण, मध्यम वर्गांतील लोकांना आपण होऊन दरमहा शिलुक टाकणें कठीण जातें; विमा पॉलिसींतील सक्तीच्या शिलकीची योजना त्यांना ज्यास्त पसंत पडते.

कर्जबाजारीपणाचा तपशील खालील तक्त्यांत आढळेल:—

| उत्पन्नाचा गट | कर्जदार कुटुंबांची संख्या | सरासरी कर्ज (हजार रु.) |
|---|---|---|
| १ | ३१ | १·४ |
| २ | ८९ | १·७ |
| ३ | १५ | १·५ |
| ४ | ४ | २·६ |


कर्जाचा बोजा फार नाहीं, असें चौकशीचा रिपोर्ट लिहिणारांचें मत आहे. कर्जाचें कारण शोधतां, मासिक खर्च भागण्याइतकें कुटुंबांचें उत्पन्नच नाहीं, असा निष्कर्ष निघतो. कित्येक ठिकाणच्या चौकशींत कर्जाचें मूळ पिढीजात देणीं असण्यांत किंवा उधळपट्टींत असल्याचें नमूद केलेलें असतें तसें येथें नाहीं; चालू उत्पन्न—खर्चांतील प्रतिकूल तफावत हेंच ह्या समाजाच्या कर्जाच्या परिस्थितीचें कारण आहे. कर्जापैकीं तीन चतुर्थांश कर्ज मित्रमंडळी व नातेवाईक ह्यांचेकडून घेतलेलें आहे, त्यामुळें कर्जावरील व्याजाचा बोजा वाचलेला आहे. जेथें व्याज दिलेलें आढळून आलें तेथें त्याचा दर ६ ते १२% होता. व्याजाचा बोजा हलका असल्यामुळें, कर्जबाजारीपणाचे दुष्परिणाम फारसे दिसून येत नाहींत.

गुजराती अन्नांत मांसल द्रव्यांचा तुटवडा आहे. गुजराती लोक दूध व पालेभाज्या ह्यांपेक्षां तूप व वनस्पतिजन्य तेलें हींच जास्त खातात. कच्छी व काठेवाडी ह्यांच्या खाण्यांत इतर गुजराती लोकांपेक्षां दूध ज्यास्त आढळतें. प्राप्ती वाढेल त्या प्रमाणांत जरी नाहीं तरी थोड्या कमी प्रमाणांत दुधावरील खर्च वाढत जातो. दूध व डाळी ह्यांचा वाढत्या प्रमाणावर उपयोग त्यांनीं करणें जरूर आहे. स्निग्ध पदार्थांचें सेवन व बैठी रहाणी ह्यांमुळें लठ्ठपणाचें पोषण होतें विशेषतः स्त्रिया व मुलें ह्यांचें पोषण व्हावें तसें होत नाहीं. बहुसंख्य गुजराती कुटुंबें सध्या अन्नावर जेवढा खर्च करतात, तेवढ्या खर्चांत त्यांच्या शरीरांचें योग्य पोषण होणें अशक्य आहे. उत्पन्नाच्या वाढीबरोबर लोकांची प्रकृतिहि सुधारलेली आढळते; परंतु डोकेदुखी, खोकला, अपचन, अग्निमांद्य, इत्यादि किरकोळ विकारांनीं गुजराती पछाडलेले दिसतात. प्रत्येकास कोणताना कोणता तरी विकार असतोच. पुरुषांपेक्षा स्त्रियांना ह्या विकारांचा उपसर्ग अधिक होतो.

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, हरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

THE FARMER
HIS WELFARE & WEALTH

BY
DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY
DEWAN BAHADUR
SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

Price Rs. 10 nett

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*
THE CO-OPERATORS' BOOK DEPOT
Sir Vithaldas Thakersey Memorial Building
9 Bakehouse Lane, Fort, Bombay.

हें पत्र पुणें, पेठ मांबुडां घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुडां, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
बाकीची पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख २१ जुलै, १९४३ | अंक २९

## बालकांचे खरे मित्र



पावसाळ्यांत लहान मुलें आजारी पडतात याचें
कारण त्यांच्या आरोग्याची नीट काळजी
घेतली जात नाहीं

### पुण्याच्या रसशाळेचीं

● बालजीवन ● कुमारी आसव
● कुटजारिष्ट **अस्थिपोषक** ● बाळगोळी
● नागगुटी ● ज्वराग्निवटी

हीं औषधें संग्रहीं बाळगून त्यांचा वेळींच योग्य
उपयोग केल्यास मुलें गुटगुटीत व
आनंदी राहातील.

: आमचीं केंद्रें :
मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली,
कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें.

## आयुर्वेद रसशाळा, पुणें लि.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी**: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा** : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा** : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स** : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स** : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स** :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० एकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधी नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

**महापुरुषांची आणीबाणी ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## दि कॉमनवेल्थ

ॲशुअरन्स कं. लि. पुणें यांतच आपला
विमा उतरा.

ठिकठिकाणीं सढळ अटींवर एजन्सीज देणें आहेत.

मेता अगर लिहा:— ल. ब. भोपटकर,
एम्. ए., एलएल्. बी.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

संरक्षण – सुरक्षितता – सेवा
हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस्
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बॅक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
'रामनिवास' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.


# विविध माहिती

### न्यू फौंडलंड

न्यू फौंडलंडनें सुचविलें, तर कॅनडा त्या देशास कॅनडाचा दहावा प्रांत ह्या नात्यानें सामील करून घेण्यास तयार होईल, परंतु ह्या बाबतींत न्यू फौंडलंडकडूनच विनंति आली पाहिजे, असें कॅनडाचे मुख्य प्रधान मि. मॅकेंझी किंग ह्यांनीं कनेडियन पार्लमेंटांत सांगितलें. न्यू फौंडलंड ही सर्वांत जुनी (१५८३) ब्रिटिश वसाहत उत्तर अमेरिका खंडांत सेंट लॉरेन्स नदीच्या मुखाचे पूर्वेस असून तिचें क्षेत्रफळ ४३ हजार चौ. मैल आहे. लोकसंख्या २३ लक्ष आहे. १९३३ सालीं न्यू फौंडलंडची आर्थिक परिस्थिति अतिशय बिघडून त्याला ग्रेट ब्रिटनकडे याचना करावी लागली होती.

### दि महाराष्ट्र एक्स्चेंज बॅन्क, लि., उडपी

वरील बँकेनें २५ लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी भाग ३ मे १९४३ रोजीं विक्रीस काढले, ते सर्व खपून ता. १७ मे रोजीं त्यांची विक्री बंद झाली. बँकेच्या कोल्हापूर शाखेचें उद्घाटन २६ जून रोजीं झालें. चिपळूण व रत्नागिरी येथें तिच्या शाखा लवकरच निघणार आहेत.

### कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नव्या कॉमर्स कॉलेजचें उद्घाटन शनिवार ता. २४ जुलै रोजीं टाटा सन्स लि. चे सर अर्देशिर दलाल, आय. सी. एस. (रि.) ह्यांचे हस्तें होईल. त्यावेळीं सांगलीचे राजेसाहेब अध्यक्षस्थान स्वीकारतील.

### इंडियन बँक लि., मद्रास

वरील बँकेस ३० जून अखेरच्या सहामाहींत ५ लक्ष, ४० हजार रुपये नफा झाला.

### सर जहांगिर कोयाजी

सर जहांगिर कोयाजी, अर्थशास्त्रज्ञ, हे आपल्या वयाच्या ६७ व्या वर्षी नुकतेच मरण पावले. १९११ ते १९३० पर्यंत ते कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें प्रोफेसर होते. पुढें ते आंध्र विश्वविद्यालयांत गेले. १९२८ सालीं त्यांस सर हा किताब मिळाला. इंडियन फिस्कल कमिशन व रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सी अँड एक्सचेंज ह्या दोन बादशाही कमिशन्सवर त्यांची नेमणूक झाली होती. १९२३ सालीं हिंदी आर्थिक परिषदेचे ते अध्यक्ष होते.

### वार्षिक उत्पन्नापेक्षा राष्ट्रीय कर्ज मोठें

अमेरिकेच्या राष्ट्रीय कर्जाचा आंकडा आतां त्या देशाच्या वार्षिक उत्पन्नापेक्षां अधिक भरूं लागला आहे. जगांतील बहुतेक देशांचें राष्ट्रीय कर्ज त्यांच्या वार्षिक उत्पन्नाच्या किती तरी पट असतें.

### विजापूर दुष्काळ निवारण फंड

वरील फंडाचा आंकडा आतां ४ लक्ष, ३२ हजार रुपये झाला आहे.

### हिंदी युद्धखर्चाची वाढती कमान

| | |
|---|---|
| एप्रिल, १९४२ | ९,१७,००,००० रु. |
| एप्रिल, १९४३ | १५,५१,००,००० रु. |
| सरासरी रोजची वाढ | २१ लक्ष रु. |

### ब्रिटिश संस्कृतीचा व इंग्रजी भाषेचा प्रचार

ग्रेट ब्रिटनसंबंधीं माहिती व इंग्रजी भाषा ह्यांचा विस्तृत प्रमाणावर फैलाव करण्याकरितां आणि इतर देशांशीं सांस्कृतिक संबंध वाढविण्याकरितां स्थापन झालेल्या ब्रिटिश संस्थेस १९४३ मध्यें खर्च करण्याकरितां ब्रिटिश सरकारनें २० लक्ष पौंडांची ग्रँट मंजूर केली आहे.

### नवीन पावली

ऑगस्ट, १९४३ पासून पुढें सरकारी टांकसाळींत काढल्या जाणाऱ्या पावल्यांना सध्याच्या अधेल्याप्रमाणें कंगोरा ठेवण्यांत येणार आहे. त्यामुळें खोट्या पावल्या काढणें कठीण होणार आहे. जुन्या पावल्या पूर्वीप्रमाणेंच व्यवहारांत खेळत्या रहातील.

### टाटा आयर्न ॲण्ड स्टील कं. लि.

वरील कंपनीला ३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ३ कोटि, ९७३ लक्ष रुपये नफा झाला. गेल्या वर्षीच्या नफ्याची रक्कम ५ कोटि, १२३ लक्ष रुपये होती. नफ्यांतील घटीमुळें कंपनी रिझर्व्ह फंडांत १ कोटि रुपयांऐवजी ३५ लक्ष रुपयेच टाकूं शकली.

### ३% १९६३–६५ कर्जरोखे

३% १९६३–६५ च्या हिंदुस्थान सरकारच्या कर्जरोख्यांची विक्री १५ कोटि रुपयांचे कर्जरोखे खपतांच ता. ५ जुलै रोजीं बंद करण्यांत आली.

### ५० लक्ष औंस चांदी

१९४३ च्या पहिल्या सहामाहीमध्यें औद्योगिक उत्पादनासाठीं व चलनासाठीं ग्रेट ब्रिटनला ५० लक्ष औंस चांदी पाहिजे होती, त्यापैकीं ११३ लक्ष औंस चांदी कॅनडानें पुरविण्याचें मान्य केलें व ३८३ लक्ष औंस चांदीची हमी अमेरिकेनें घेतली. अमेरिकेनें दिलेली चांदी औंसास औंस ह्याप्रमाणें परत देण्याचें ग्रेट ब्रिटननें मान्य केलें आहे.

अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... २२६
२ ब्रिटिशांची हिंदी बाजारपेठ ... ... २२७
३ मि. चर्चिल ह्यांची दिनचर्या ... २२८
४ कॉमनवेल्थ विमा कंपनी २२८
५ रिझर्व्ह बँक ... २२८
६ स्फुट विचार ... २२९
गव्हाचा जागतिक पुरवठा.—भांडवलाच्या उभारणीवरील निर्बंध—गंधकाऐवजीं कोळशाचा उपयोग—माल गहाणावरील कर्जांचें नियंत्रण.
७ शेअर बाजार ... २३०
८ अमेरिकन फिल्म कंपन्यांचें येणें.... ... २३०
९ ब्रिटिश जीवनाचें चित्रीकरण. ... ... २३०
१० रस्ते आखण्याची कमिटी २३१
११ ईस्टर्न बँकेचा आढावा २३१
१२ ग्रेट ब्रिटनमधील कुपनपुस्तक ... ... २३१
१३ टाटा आयर्न अँड स्टील कंपनी ... ... २३१

# अर्थ

**बुधवार, ता. २१ जुलै, १९४३**

## ब्रिटिशांची हिंदी बाजारपेठ

### युद्ध समाप्तीनंतर ब्रिटिश निर्गत पुनः सुरू होणार

हिंदुस्थानांतील गेल्या चाळीस वर्षांतील औद्योगिक प्रगतीचा आढावा लंडन येथील टाइम्स पत्राच्या एका बातमीदारानें नुकताच घेतला, तो बराच उद्बोधक आहे. युद्धानंतर ग्रेट ब्रिटननें आपला निर्गत व्यापार फार मोठ्या प्रमाणावर वाढवल्याखेरीज त्या देशांतील लोकांच्या रहाणीचें युद्धापूर्वीचें मान टिकणें शक्य नाहीं. ह्यासाठीं, निर्गत व्यापाराची आखणी आजपासूनच करून ठेवण्याचा प्रयत्न त्या देशाचें सरकार व कारखानदार करीत आहेत. युद्धानंतरच्या काळांत हिंदुस्थान देश ग्रेट ब्रिटनला गिऱ्हाईक ह्या नात्यानें किती उपयोगी पडेल ? ब्रिटिश माल हिंदुस्थानांत पुनः कसा खपूं लागेल ? हिंदी गरजांचा नीट अभ्यास करून त्यांस अनुसरून कोणत्या प्रकारचा माल हिंदुस्थानांत पाठवतां येईल ? इत्यादि प्रश्नांचा विचार ग्रेट ब्रिटनमध्यें चालू आहे. ह्या दृष्टीनें खालील आढावा उपयुक्त वाटेल. त्याबरोबरच, हिंदुस्थान सरकारचे एक माजी डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशन मि. कोटमन, ह्यांस ब्रिटिशांना आपली हिंदी बाजार पेठ पुनः मिळविण्यास अडचण पडणार नाहीं असें वाटतें. ह्या दोन्हींचा निष्कर्ष मात्र एकच निघतो.

सोळाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत हिंदुस्थान हा देश उद्योगधंद्यांत अग्रेसर होता. सतराव्या शतकांत ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदी कापडास युरोपमध्यें बाजारपेठ निर्माण केली, परंतु पुढें इंग्लंडमध्यें ह्या कापडाचे आयातीवर निर्बंध घालण्यांत आले व लँकेशायरच्या गिरण्यांचें कापड हिंदी कापडास मागें सारूं लागलें. यंत्रावर तयार होणाऱ्या ब्रिटिश कापडानें आशियांतील सर्व देशांत हिंदी कापडाशी स्पर्धा करून हिंदी धंदा पार बसवून टाकला. तेव्हांपासून, तयार मालासाठीं हिंदुस्थान परदेशांवर अवलंबून राहूं लागला. चालू शतकाच्या प्रारंभीं हिंदी उद्योगधंद्यांच्या स्थापनेस व वाढीस नव्यानें चालना मिळाली. १९०७ सालीं टाटा आयर्न अँड स्टील कंपनीची स्थापना झाली व १९१५ सालीं टाटा हैड्रो इलेक्ट्रिक कंपन्या मुंबईच्या गिरण्यांना वीज पुरवूं लागल्या. १९१८ ते १९३९ ह्या मुदतींत हिंदी कारखान्यांची संख्या ३ हजारांपासून १० हजारांवर गेली. इतकें असूनहि, उद्योगधंद्यांवर पोट भरणाऱ्या लोकांची संख्या अजूनहि फारच थोडी आहे. पोलाद, सिमेंट, साखर, कागद, कांच सामान, साबण, विजेचे दिवे, रंग, इत्यादींच्या उत्पादनास हिंदुस्थानांत चालना मिळाली आहे. हे बहुतेक सर्व धंदे हिंदी भांडवलानें स्थापन झाले असून ते हिंदी व्यवस्थेखालीच आहेत. ताग, कोळसा, चहा, इत्यादि धंद्यांत युरोपियन देखरेखीचें प्रमाण मोठें असलें तरी त्यांत गुंतलेल्या भांडवलाचा अधिकाधिक अंश हिंदी लोकांच्या हातीं येत आहे. कपास कापडाचा धंदा बहुंशीं हिंदी मालकीचा आहे; तागाच्या धंद्यांतील भांडवलापैकीं ७०% भांडवल हिंदी आहे. साखरेच्या धंद्यांत परदेशी भांडवलास वाव मिळालेला नाहीं.

हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीचीं प्रमुख कारणें, जकातीचें धोरण ठरविण्यास हिंदुस्थान सरकारास १९१९ सालीं मिळालेली परवानगी व १९२३ सालीं हिंदुस्थान सरकारनें स्वीकारलेलें मर्यादित संरक्षणाचें धोरण, हीं होत. मध्यवर्ती सरकार हें लोकमतानुवर्ती झालें, म्हणजे जकातीचें धोरण ठरविण्याच्या मुभेचा पूर्णपणें उपयोग करून घेतला जाईल व हिंदी उद्योग धंद्यांस जोराची चालना मिळेल, असें टाइम्स पत्राच्या बातमीदारानें सुचविलें आहे. युद्धानें हिंदी परराष्ट्रीय व्यापाराच्या परिमाणांत खळबळ उडवून दिली आहे. १९३८ सालीं हिंदुस्थानाचें परराष्ट्रांतील देणें ३७½ कोटि पौंड होतें, त्यापैकीं १९४२ अखेर फक्त ६½ कोटि पौंडच राहिलें व तेंहि आतां फेडून टाकण्यांत आलें आहे. उलट हिंदुस्थानचें इंग्लंडमधील येणें फुगत चाललें आहे व हिंदुस्थान आणि ग्रेट ब्रिटन ह्यांचेमधील घेणेकरी व देणेकरी ही पूर्वीची भूमिका आतां पार उलटली आहे, युद्धसमाप्तीनंतर हिंदी उद्योगधंदे स्वतःच्या भांडवलानें व हिंदी देखरेखीखालीच उत्तम तऱ्हेनें चालू असलेले आढळतील. ग्रेट ब्रिटनला द्यावी लागणारी वार्षिक व्याजाची खंडणीहि बंद होईल. हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें ब्रिटिश निर्गत-व्यापारांत घट होईल, असें मानण्याचें मात्र कारण नाहीं. हिंदी लोकांच्या रहाणीचें मान वाढलें, म्हणजे त्यांच्यासाठीं रेल्वेज, मोटारी, ट्रॅम गाड्या, इत्यादि अधिक लागतील; घरें चांगलीं बांधण्यांत येऊं लागतील; नव्या नव्या उद्योग धंद्यांसाठीं यंत्र सामुग्रीची गरज लागेल. ब्रिटिशांची भांडवलाची मगरमिठी सुटल्यानंतर ह्यांसाठीं लागणारा माल ग्रेट ब्रिटनकडून घेण्यास हिंदी लोकांचा विरोध रहाणार नाहीं. रशिया आणि जपान ह्या देशांनीं योग्य मोबदला देऊन भांडवल व तज्ञ सल्ला मिळविला, तसेंच हिंदुस्थानास करतां येईल. त्यामुळें, ब्रिटिश भांडवलाच्या गुंतवणुकीस पुनः वाव निर्माण होईल, असें टाइम्सच्या बातमीदाराचें भाकित आहे. हिंदी उद्योग धंद्यांच्या वाढीमुळें ब्रिटिश भांडवलाची हिंदुस्थानांत गुंतवणूक व ब्रिटिश मालाची हिंदुस्थानांत आयात ह्यांस आळा बसणार नाहीं, असा त्याचा मथितार्थ आहे.

हिंदुस्थान सरकारचे एक माजी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्फर्मेशन, मि. जॉन कोटमन, ह्यांनीं आपल्या भाषणांत, युद्धोत्तर ब्रिटिश-हिंदी व्यापारास किती वाव आहे, ह्याची नुकतीच छाननी केली. टाइम्सच्या बातमीदारानें हिंदी उद्योगधंद्यांच्या विकासासंबंधीं व्यक्त केलेल्या विचारांपेक्षा मि. कोटमन ह्यांचे विचार जरा वेगळ्या स्वरूपाचे आहेत. हिंदुस्थानांतील शेकडा ९० लोक शेतीच्या धंद्यावर अवलंबून आहेत. कांहीं उद्योगधंदे विशेषतः दारूगोळ्याचें उत्पादन वाढलें असलें, तरी ह्या बाबतची मागासलेपणाची परिस्थिति एकदम बदलेल असें त्यांस वाटत नाहीं. हिंदी लोकांची

भाती मात्र वाढत आहे, असें त्यांस वाटतें. इतर कोणत्याहि देशापेक्षां हिंदुस्थान हा युद्धानंतर सदृढ राहिलेला आढळेल. ग्रेट-ब्रिटनशीं अधिकाधिक व्यापार त्यास करावा लागेल. हिंदुस्थानाच्या गरजेप्रमाणें माल पुरवला, तर लँकेशायरला हिंदुस्थानांत पूर्वी मिळाली नाहीं एवढी मोठी बाजारपेठ मिळेल, असें त्यांनीं सांगितलें. लंडन टाइम्सच्या बातमीदारास हिंदी उद्योगधंदे वाढतील असें तरी वाटतें; त्यांची वाढ ब्रिटिश निर्गतीस आड येणार नाहीं, एवढेंच तो म्हणतो. मि. कोटमन ह्यांस हिंदी उद्योगधंद्यांची वाढ बिलकूल चिंताजनक वाटत नाहीं व आणखी बराच दीर्घकाळ हिंदुस्थान हा शेतीप्रधानच रहाणार असें त्यांचें मत आहे. परंतु दोघांचं महत्वाच्या बाबतींत मात्र ऐकमत्य आहे. युद्धोत्तर काळांत ब्रिटिश मालाची हिंदुस्थानांत वाढत्या प्रमाणावर निर्गत होण्यास वाव आहे आणि त्यासाठी ब्रिटिश कारखानदारांनीं आतांपासूनच योग्य ती पूर्वतयारी करावी, असें दोघांचेंहि सांगणें आहे. हिंदी सरकार व कारखानदार ह्यापासून कोणता बोध घेणार ?

---

## मि. चर्चिल ह्यांची दिनचर्या

मि. चर्चिल ह्यांचा एक दिवस म्हणजे सामान्य माणसाचे दोन दिवस होतात, इतकें ते दररोज काम करतात. चोवीस तासांपैकीं अठरा ते एकोणीस तास त्यांचे कामांतच जातात. उठल्याबरोबर ते सर्व वर्तमानपत्रें भराभर वाचतात. रात्रीं झोपेंत उठवून कळविण्याइतकीं महत्त्वाचीं वृत्तें नसतील तीं सकाळीं त्यांस निवेदन केलीं जातात. त्यांस पाहिजे त्या सेक्रेटरीबरोबर त्यांची बोलणीं नंतर सुरू होतात. सर्व सेक्रेटरी नेहमीं तेथें हजर पाहिजेत; कारण कोणास काम पडेल, ह्याचा नेम कोणी सांगावा ? अंथरुणांतून उठून बाहेर येण्यापूर्वीच मि. चर्चिल हे आपल्या मंत्र्यांशीं सलवतें सुरू करतात व निर्णय ठरवितात. सकाळच्या चहाचे वेळीं सेक्रेटरी पाठीमागें उभा असतोच. "हं, घे लिहून" असें मि. चर्चिल केव्हां म्हणतील, ह्याचा नेम नाहीं. दुपारपर्यंतचा वेळ निरनिराळ्या प्रश्नांची वेगवेगळ्या मंत्र्यांशीं व परराष्ट्रीय पुढाऱ्यांशीं चर्चा करण्यांत जातो. दुपारच्या जेवणास मिसेस चर्चिल व कौटुंबीय मंडळी हीं बहुधा हजर असतात. जेवतांनाचा वेळहि वाया जाऊं नये, म्हणून कोणी तरी मंत्री भोजनास बोलाविलेले असतातच. त्यानंतर, कामाच्या सवडीप्रमाणें, अर्धा तास ते विश्रांति घेतात. कॉमन्स सभेंत हजर राहून भाषण करण्याची अथवा चर्चा ऐकण्याची आवश्यकता असेल, तर ते पार्लमेंटकडे जातात, नाहीं तर पुनः मुलाखती व भेटी ह्या सुरू होतात त्या रात्रीपर्यंत चालतात. अमेरिकन दृष्टिकोणास मि. चर्चिल हे विशेष महत्त्व देतात, व अमेरिकन पुढारी इंग्लंडला आला तर त्यास ते एकदा तरी जेवणास बोलावल्याखेरीज रहात नाहींत. रात्रींचें जेवण संपलें, कीं पुनः कामास प्रारंभ ! काम विशेष महत्त्वाचें असेल, तर सकाळपर्यंत त्यांस जागरण होतें. रात्रीच्या चर्चेवर विचार करून सकाळीं उठल्याबरोबर ते सेक्रेटरींना आपला निर्णय लिहून घेण्यास सांगतात. मि. चर्चिल ह्यांचा उत्साह दांडगा आहे. कधी कधी ते लवकर चिडतात. विशेषत: कामांत चूक त्यांना मुळींच खपत नाहीं. त्यांचें वय ६९ वर्षे आहे.

---

## कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि., पुणें

वरील कंपनीची १४ वी वार्षिक सभा ४ जुलै रोजीं भरली होती, त्यावेळीं विमा कायद्याच्या १३ व्या कलमानुसार ३१ डिसेंबर, १९४१ अखेरच्या कंपनीच्या मूल्यमापनास अनुसरून हिशेबांत केलेली सुधारणा, डायरेक्टरांचा रिपोर्ट, ताळेबंद इत्यादींस मंजुरी देण्यांत आली. अहवालाचे सालीं सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें कंपनीच्या परिस्थितीची चौकशी करवून तिच्या लाइफ फंडांत कमी असलेल्या ५,००,४८० रुपयांच्या तुटीची भरपाई करण्यास सांगितलें, त्याप्रमाणें नवीन भांडवल काढून व इतर व्यवस्था करून कंपनीनें ॲक्चुअरीचें समाधान केलें. मि. सी. डी. शार्प, एफ. आय. ए. ह्यांनीं केलेल्या मूल्यमापनांत ३½% चा दर गृहीत धरला होता; म्हणजे मूल्यमापन अगदीं कसून झालेलें आहे. ३१ डिसेंबर १९४१ च्या मानानें आतां भरणा झालेल्या भांडवलांत सुमारें ३½ लक्ष रुपयांची भर पडलेली आहे. कंपनीच्या खर्चाचें प्रमाण १९३६—१९३७ ते १९४० पर्यंत ४०% च्या खालीं कधींच नव्हतें. तें १९४१ सालीं ३१·१६% झालें व १९४२ मध्यें तर तें २५·५ % पर्यंत खालीं उतरलें. लाइफ फंडाची रक्कमहि ३१¾ लक्ष रुपये झाली आहे. कॉमनवेल्थवर आलेल्या अनेक अडचणींस तोंड देऊन, तिच्या बोर्डाचे नेते ( अध्यक्ष ), प्रमुख व्यवस्थापक ( मॅनेजिंग डायरेक्टर ), कायदेशीर सल्लागार व सर्व बाबतींत लक्ष घालून तिला वाचविणारे तिचे भरभक्कम संरक्षक ह्या सर्व नात्यांनीं श्री. ल. ब. भोपटकर ह्यांनीं कंपनीची अमूल्य कामगिरी बजावली आहे. अवघड परिस्थितींतहि १९४२ सालीं कंपनी १५,६०,२४७ रुपयांचें काम पुरें करूं शकली, ह्यावरून महाराष्ट्रांत तिचेबद्दल आपुलकी किती वाटत आहे, हें दिसून येतें. ज्या बिकट परिस्थितींत श्री. भोपटकर यांनीं कंपनीचीं सूत्रें हातीं घेतलीं ती लक्षांत घेतली व तिची आजची प्रतिष्ठित व निर्दोप स्थिति पाहिली म्हणजे श्री. भोपटकर ह्यांच्या कर्तबगारीची कल्पना येईल. कांहीं घटनेमुळें कंपनीच्या भविष्यकाळाबद्दल साशंकता निर्माण झाली होती, ती दूर झाली असून नवे फायदेशीर उपक्रम हातीं घेण्यास आतां ती सुसज्ज झाली आहे. १९४३ च्या पहिल्या सहामाहींतच कंपनीकडे आलेल्या कामावरून एक दोन वर्षांत कामाच्या आंकड्यांचे बाबतींत ती पूर्वींचें उच्च स्थान प्राप्त करून घेईल, असें वाटतें. विमेदारांच्या हिताच्या दृष्टीनें, तिची मजबुति आजहि निर्विवाद आहे.

---

### रिझर्व्ह बँकेसंबंधीं तुलनात्मक तक्ता

( इश्यू विभाग : आकडे कोटि रुपयांचे )

| | १ सप्टेंबर, १९३९ | एक वर्षापूर्वी | ९ जुलै, १९४३ |
|---|---|---|---|
| खेळत्या नोटा | १७२·४४ | ४४६·७८ | ७३७·६१ |
| स्टर्लिंग रोखे | ५९·५० | २६६·८५ | ५७०·७८ |
| हिं. सरकारचे रोखे | ३७·३९ | १२२·२९ | ११८·४१ |

खेळत्या व बँकिंग विभागांतील मिळून ७४८·२५ कोटि रुपयांच्या चलनी नोटांस ५७०·७८ कोटि रुपयांचे स्टर्लिंग रोखे, ११८·४१ कोटि रुपयांचे हिंदुस्थान सरकारचे रोखे, ४४·४१ कोटि रुपयांचें सोनें ( नाणीं धरून ) व १४·६३ कोटि रुपयांचीं नाणीं ह्यांचें तारण आहे.

## स्फुट सूचना

### गव्हाचा जागतिक पुरवठा

अमेरिका, कॅनडा, अर्जेंटिना, व ऑस्ट्रेलिया हे देश गव्हाच्या निर्गतींत अग्रेसर आहेत. त्या सर्वांत १९४२-४३ मध्यें पीक चांगलें आलें आहे. १९२८ सालाखेरीज बाकी कोणत्याहि वर्षी इतकें मोठें पीक आलें नव्हतें. गव्हाचा साठाहि आतांपर्यंत कोणत्याच वर्षी इतका शिल्लक नव्हता. हा गहू वरील चार देशांची वार्षिक मामुली गरज भागवून व नेहेमी इतका साठा शिल्लक ठेवून पूर्वीच्या मानानें चौपटीपेक्षा अधिक निर्गत करण्यास पुरेसा आहे. युद्ध संपल्यावर कित्येक देशांत उपासमार होऊं लागेल, त्यावेळीं ह्या साठ्याचा उपयोग होईल. ग्रेट ब्रिटनमध्यें १९३८ सालीं ७ कोटि बुशेल गहू तयार झाला होता; १९४१ सालीं त्याचा आकडा ९ कोटि बुशेल झाला व १९४२ च्या उत्पादनाचा आकडा १२½ कोटि बुशेल, असा आहे. गेल्या ७५ वर्षांत ग्रेट ब्रिटनमध्यें एवढें पीक निघालें नव्हतें. तथापि ब्रिटिश गरज भागविण्यासाठी गव्हाची आयात करणें जरूर पडतेंच. रशियांतील गव्हाच्या परिस्थितीचें वर्णन "असमाधानकारक, परंतु आवाक्याबाहेर नाहीं" असें करण्यांत आलें आहे. खालील तक्ता प्रमुख चार राष्ट्रांतील गव्हाची परिस्थिति दर्शवितो:—

अमेरिका, कॅनडा, अर्जेंटिना व ऑस्ट्रेलिया ह्यांतील गहू.
( कोटि बुशेल )

| पिकाचें वर्ष | मूळ साठा | नवीन पीक | एकूण पुरवठा | अंतर्गत खप | वाढावा | निर्गत |
|---|---|---|---|---|---|---|
| १९३४-३९ सरासरी | ४१ | १३८ | १७९ | ९५ | ८४ | ४४ |
| १९३९-४० | ६४ | १६१ | २२५ | ९६ | १२९ | ५० |
| १९४०-४१ | ७९ | १७३ | २५२ | ९६ | १५६ | ४५ |
| १९४१-४२ | १,१२ | १६५ | २७७ | ९७ | १७९ | ३७ |
| १९४२-४३ | १,४२ | १९६ | २३८ | ... | ... | ... |

### भांडवलाच्या उभारणीवर निर्बंध

हिंदुस्थान सरकारनें ९४ वा डिफेन्स ऑफ इंडिया नियम म्हणून कंपन्यांच्या उभारणीवर बंधन घातलें, त्यास दोन महिने होत आले. मध्यवर्ती सरकारचे पूर्वसंमतीशिवाय भांडवल उभारण्यास व जाहीर रीतीनें रोखे विकण्याची योजना करण्यास ह्या नियमानें बंदी केली. ह्या नियमासंबंधीं एक खुलासा सरकारनें पुढें प्रसिद्ध केला व आतां त्या नियमाचें व त्याचे मागील सरकारी धोरणाचें आणखी स्पष्टीकरण करण्यांत आलें आहे. युद्धप्रयत्नास प्रत्यक्ष सहाय करतील अशाच नव्या उद्योगांस सरकार प्रोत्साहन देईल. शिवाय, लोकांच्या जीवनास अत्यावश्यक असलेल्या जिनसांचें उत्पादन नवीन उपक्रमांस लवकर हातीं घेतां आलें पाहिजे. चैनीच्या वस्तूंच्या उत्पादकांनीं सरकारच्या संमतीची अपेक्षा करूं नये. चालू युद्धप्रयत्नास हातभार लावून पुढेंहि उपयुक्त ठरतील अशाच कारखान्यांच्या स्थापनेस भांडवल पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडे सरकार सहानुभूतिपूर्वक पाहील. बँका, विमा कंपन्या, ट्रस्ट कंपन्या, इत्यादींचे मार्फत सरकारी रोख्यांत गुंतवणूक होते हें खरें असलें तरी ह्या संस्थांकडून भरमसाट साठा करणारे व सट्टेबाज ह्यांसहि कर्जे मिळूं शकतात, ह्या गोष्टीची सरकारास जाणीव आहे. ज्या यंत्रसामुग्रीची ऑर्डर दिलेली आहे परंतु प्रत्यक्ष यंत्रसामुग्री युद्धानंतर हातीं येणार आहे, अशासाठी लागणारें भांडवल कंपन्यांनीं उभारण्यास सरकार संमति देईल; परंतु जमा झालेले पैसे मध्यंतरीच्या काळांत सरकारी रोख्यांत गुंतविण्याची अट त्या कंपन्यांवर घालण्यांत येईल. डिफेन्स ऑफ इंडियाच्या नियमामागील सरकारी धोरणाचा खुलासा वरील स्पष्टीकरणानें होईल. युद्धसमाप्तीनंतर चालू करावयाच्या उद्योगधंद्यांची पूर्वतयारी आज केली तरी चालेल परंतु जमा केलेलें भांडवल युद्धसमाप्तीपर्यंत सरकारी रोख्यांतच अडकविलें पाहिजे ही अट चलन-विस्तारास आळा घालण्यास मदत करील. कारण, आज पूर्वतयारी करणारांस त्यावांचून उद्योगधंदे काढण्याचा उपक्रमच करतां येणार नाहीं.

### गंधकाऐवजीं कोळशाचा उपयोग

साखर कारखान्यांत उसाचा रस शुद्ध करण्यासाठी गंधकाचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत येतो. गंधक दारुगोळ्यांच्या उत्पादनांतील महत्त्वाचा घटक असल्याकारणानें व गंधकासाठी हिंदुस्थानास परदेशावर अवलंबून रहावें लागत असल्यामुळें हिंदी साखर कारखानदारांनीं गंधकाची शक्यतों बचत करावी असें हिंदुस्थान सरकारनें मागेंच सुचविलें होतें. भोपाळ संस्थानांतील साखरेच्या धंद्याची नीट घडी बसवून देण्यासाठी त्या संस्थानच्या सरकारनें जावा येथील साखरेचे अनुभवी तज्ज्ञ डॉ. क्रोपेनबर्ग ह्यांना बोलाविलें होतें व ते सध्या संस्थानचे मुख्य केमिस्ट म्हणून काम करीत आहेत. त्यांनीं साखरेच्या उत्पादनांत लागणाऱ्या गंधकांत ७५% बचत करतां येईल, अशी उत्पादनाची एक नवीन पद्धत शोधून काढून ती यशस्वी रीतीनें उपयोगांत आणली आहे. गंधकाऐवजी कोळसा वापरतां येईल व सध्याच्या भट्ट्यांत त्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती सहज करतां येईल, असें त्यांचें म्हणणें आहे. ही नवी पद्धत गंधकाची बचत करणारी असून ती स्वस्तहि पण आहे. बलुचिस्थानांत सांपडणारें कनिष्ठ दर्जाचें गंधक कोळशाचे बरोबर वापरतां येणें शक्य आहे. नव्या पद्धतींत चुनाहि कमी पुरतो. कानपूर येथील इंपीरिअल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी ह्या प्रश्नाचा आणखी खोल विचार करीत आहे व त्यासंबंधांत प्रयोग चालू आहेत.

### माल गहाणावरील कर्जाचें नियंत्रण

हिंदुस्थान सरकारनें एक नवीन डिफेन्स ऑफ इंडिया नियम काढून मालाचे (सोनें-चांदी सुद्धां) तारणावर देण्यांत येणारीं कर्जें बंद करण्याचा अधिकार स्वतःकडे घेतला आहे. कांहीं विशिष्ट वर्गाशीं व्यवहार अथवा कांहीं विशिष्ट प्रकारचे व्यवहार बंद करण्याचाहि अधिकार त्यांत समाविष्ट आहे. अशा तारणावर अगोदरच कर्ज दिलेलें असेल, तर ठराविक मुदतींत तें परत फेडण्यांत आलेंच पाहिजे, अशीहि तजवीज ह्या नियमांत करण्यांत आली आहे. युद्धप्रयत्न नीट चालू रहाण्यांत अडथळा येत आहे अथवा आवश्यक मालाचा पुरवठा कमी पडत आहे, असें सरकारास वाटलें तर सरकार ह्या नियमाच्या आधारानें योग्य ती उपाययोजना करील. मालाचा साठा गहाण राहून, त्याच्या अभावीं लोकांची उपासमार होऊं लागली तर तो माल सक्तीनें बाहेर पाडण्याचा अधिकार अशा रीतीनें सरकारनें स्वतःकडे घेतला आहे.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. ढोलकर, एम्. ए., बी. कॉम्.
२४ डे. जि. पुणें ४ )

दोस्त राष्ट्रांची सिसिलीवर स्वारी झाली ती जर महिन्या-दोन महिन्यापूर्वी झाली असती तर शेअर बाजारानें आनंदातिशयानें वर उडी मारली असती. मग आज माशी कोठें शिंकली, कोण जाणें ! उलट, मागील आठवडाभर बाजारानें सुतकी चेहेरा धारण केलेला आहे. याची कारणमीमांसा मुख्यत: सरकारच्या बँकांना सोनें-चांदी व इतर मालावर कर्जें देण्यास बंदी करणाऱ्या वट-हुकुमांत सांपडेल. किरकोळ लोकांना शेअर गळ्यांत पडला अथवा जरासा मोठा धंदा करावयाचा झाला म्हणजे घेतलेले शेअर गहाण टाकण्यास बँकांचा मोठा आधार वाटतो. त्यांना या हुकुमामुळें हुडहुडी भरल्यासारखी दिसते. त्यांतच मुंबई सरकार बदले बंद करण्याची धास्ती अजून निवारण झालेली नाहीं, त्यामुळें या निर्धन गिऱ्हाइकांची पळापळ झाल्यास नवल नाहीं. वास्तविक वरील हुकुमांत शेअर व रोखे यांचा उल्लेख दिसत नाहीं. व मुंबई सरकारला बदला पद्धत बंद करणें कठीण जाणार आहे. बदला पद्धतिमुळें सट्टयांना जरी उत्तेजन थोडें-फार मिळत असलें तरी तो एक धंदा आहे. कारण त्यांत पैसे उसने देऊन व शेअर तारण घेऊन व्याज देणेंचें असतें अथवा शेअर वापरावयास घेऊन त्याबद्दल गाळा देण्याचा असतो. तेव्हां सरकारला हा धंदा मुळां-तच मारून टाकण्याचें कारण दिसत नाहीं.

पण या बाजारांत भावना बदलली म्हणजे शेअरची योग्य गुण-किंमत, कंपनीची परिस्थिति, राजकीय आंदोलन, व्याजाचा दर हे सगळे दिसेनासे होऊन कोठल्याहि भावांत एकदांचे विकून मोकळे व्हावयाचें अशी नेहमीची प्रवृत्ति आहे. या कोंकरी मनोवृत्तीचा फायदा घेण्यास मंदीवाले सदा एका पायावर तयार असतातच. त्यांच्या बिनबुडा-च्या बेचाणीमुळें बाजाराची घसरगुंडी परवामर्यात जाते. सध्या थोडीफार अशीच परिस्थिति निर्माण झालेली आहे. म्हणून धीराचा शब्द द्यावासा वाटतो कीं, चालू घट आणखी महिना दीड महिना केवळ भीति म्हणून फार तर टिकेल व आजच्या भावांत जो कोणी खरेदी करील, मग ते शेअर गिरण्यांचे, पोलादाचे कशाचेही असोत, त्यास पांच टक्के कर माफ व्याज सुटून थोडा फार नफा दिसल्याशिवाय राहणार नाहीं. मात्र भावांच्या हेलका-व्याकडे पूर्ण दुर्लक्ष करावयास हवें. ही गोष्ट पूर्ण ध्यानांत ठेवा-वयास हवी कीं जरी सरकारनें चलन वाढीमुळें चढणाऱ्या भावांस गवसणी घालण्यास आरंभ केलेला असला तरी युद्धपूर्व परिस्थिति चलनापुरतीच येण्यास अजून फारच अवकाश आहे. म्हणून व्याजांचे दर उतरल्याखेरीज राहाणार नाहींत व त्यास धरून शेअर्सचे भाव आणखी वेडेवांकडे खाली पडणें दूरच पण पुन्हा निश्चित वाढावयासच हवेत. केव्हां वाढतील हें ब्रह्मदेवास सांगणें सुद्धा शक्य नाहीं. पण आर्थिक घटनांना जर कांहीं महत्त्व असेल तर बाजार टिकलेच पाहिजेत. विख्यात वॉल स्ट्रीट जर्नलचा संपादक 'डो' सांगतो कीं जेव्हां चढत्या भावांत खरेदी विक्रीचें प्रमाण वाढतें व पडत्या भावांत कामकाज घटतें तेव्हां बाजार तेजीचाच असतो. मुंबई बाजारांतहि अशीच परिस्थिति असल्यानें वरील अनुमानास पुष्टी मिळते.

## अमेरिकन फिल्म कंपन्यांचें इंग्लंडमधील येणें

ग्रेट ब्रिटनमध्यें अमेरिकन चित्रपट पुष्कळ लोकप्रिय आहेत. तेथें दाखविण्यांत येणाऱ्या चित्रपटांचें उत्पन्न अमेरिकेंत न्याव-याच्या मार्गांत इतके दिवस बरीच अडचण होती. प्रत्यक्ष ग्रेट ब्रिटनलाच अमेरिकेंतून पैसे आणावे लागतात; तेव्हां ग्रेट ब्रिटन-मधून अमेरिकेकडे पैसे कसे पाठविणार ? हुंडणावळीवरील नियं-त्रणास प्रारंभ झाल्यापासून, अमेरिकन फिल्म कंपन्यांचें ग्रेट ब्रिटनमधील येणें वाढत चाललें होतें. त्यांतील कांहीं भाग दरसाल अमेरिकेकडे पाठविला जाई, तथापि बरीच मोठी रक्कम पौंडांच्या हिशेबांतच राहिलेली होती. गेल्या ऑक्टोबरमध्यें तिचे डॉलरमध्यें रूपांतर केलें, त्याची किंमत ४½ कोटि डॉलर भरली. त्यानंतर पुन: अमेरिकेचें देणें वाढलें, तें देऊन टाकण्याची व्यवस्था ब्रिटिश तिजोरीनें आतां केली आहे. अर्थात् अमेरिकन फिल्म कंपन्यांस सर्व पैसे अनियंत्रितपणें मिळूं लागतील, असा त्याचा अर्थ नाहीं. त्यांवरील विशेष निर्बंध आतां रद्द केले असून, अमेरिकेकडे पाठविण्याच्या रकमेचा प्रत्येक अर्ज स्वतंत्रपणें विचारांत घेतला जाऊन रक्कम पाठविण्यास परवाना दिला जाईल.

## ब्रिटिश जीवन व अमेरिकन फिल्ममध्यें त्याचें चित्रीकरण

ब्रिटिश लोकांच्या रहाणीचें चित्रण अमेरिकन चित्रपट कंपन्या करतात, तें कित्येक प्रसंगीं चुकीचें असतें, असें त्यांस दाखवून देण्यांत आलें आहे. ब्रिटिश लोकांच्या रहाणींत आतां उच्च-कनिष्ठ हा भेद पूर्वीप्रमाणें राहिलेला नाहीं व लोकांची रहाणी पुष्कळच बदललेली आहे, असें सांगणारें एक पत्रक अमेरिकन चित्रपट निर्मात्यांकडे नुकतेंच पाठविण्यांत आलें. एका फिल्ममध्यें कॉमन्स सभेचा देखावा दाखविण्यांत आला त्यांत प्रत्येक सभासदानें उंची कपडे घातलेले व त्याच्या बोलण्यांत रंगेलपणा असलेला वाटला. सभासदांपैकीं एकहि मजूरपक्षीय दिसला नाहीं व एका-चेहि कपडे इर्ष्या बिघडलेले नव्हते. अशा तऱ्हेनें भडक ब्रिटिश जीवन दाखविणें म्हणजे ब्रिटिश चित्रपटांत अमेरिकन काँग्रेसचे सभासद तंबाखू खाऊन थुंकतांना दाखविण्याइतकेंच अपमानास्पद आहे, असें सदरहू पत्रक म्हणतें.

## टॉवेल, पायमोजे का शर्ट !

ग्रेट ब्रिटनमध्यें कपड्याचें रेशनिंग सुरू होऊन बराच काळ लोटला. आतां तेथें ह्या कपड्यांत टॉवेलांचाहि समावेश करण्यांत आला आहे. त्यामुळें नवीन टॉवेल घेतांना दुसरा एखादा त्याच दर्जाचा कपडा वगळावा लागेल. सबंद कुटुंबास मिळणारीं कप-ड्याचीं कूपन्स एकत्र करून, त्यांतून आवश्यक ते कपडे घ्यावे म्हणजे अडचण भासणार नाहीं व स्वार्थत्याग सुसह्य होईल, अशी सरकारी खात्याची सूचना आहे. प्रत्येक जण आपल्या कूपन्समधून स्वत:चे कपडे विकत घेतो व कुटुंबांतील प्रत्येकास लागणाऱ्या टॉवेल्स सारख्या जिनसा आणण्यासाठी घरधनिणीला आपलें स्वत:चें कूपन खर्चावें लागतें, अशी त्यांची तक्रार आहे. वाटलें तर प्रत्येकाचें एक एक कूपन कमी करा, परंतु घरांत लागणाऱ्या जिनसांसाठीं वेगळीं कूपन्स देत जा, अशी महिलांची मागणी आहे. ती पुरी झाली म्हणजे नवीन टॉवेल घेतेवेळीं बापानें शर्ट कमी घ्यावे कां मुलीनें पायमोजे घेण्याचें पुढें ढकलावें, हा घरगुती वाद बंद होईल.

### रस्ते आखण्याची कमिटी

हिंदुस्थानांत रस्त्यांवरील वहातूक वाढविण्यास पुष्कळ वाव आहे व त्या दृष्टीनें नव्या रस्त्यांची आंखणी करणें जरूर आहे, ह्याविषयीं " अर्था " मध्यें लेख नुकताच येऊन गेला आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें तेथील रस्त्यांच्या वाढीसंबंधीं व सुधारणेविषयीं चर्चा चालू आहे. तेथें, रस्त्यांचा मुख्य प्रश्न शहरांतील वहातुकीसंबंधींचा आहे. कारण तेथील वस्ती मुख्यत: शहरी स्वरूपाची आहे. वहातूक व्यवस्थित चालावी, अपघात टळावे, बांधणी काटकसरीची असावी, शहरांची अपेक्षित वाढ लक्षांत घेतली जावी, इत्यादि सूचना करून ब्रिटिश सरकारनें रस्ते आखण्यासाठीं एक तज्ज्ञांची कमिटी नेमली आहे.

---

### ईस्टर्न बँक लि. च्या अध्यक्षांचा आढावा

" बँकेस निवळ नफा ९५,५८० पौंड, म्हणजे मागील वर्षाइतकाच झाला. डिव्हिडंडचा दर ४½%चा ५% करण्यांत आला आहे. बँकांकडे ठेवलेल्या रोख रकमा, स्टेट्स सेटलमेंट सरकारकडे ठेवलेल्या रकमा व १९४० च्या ३% कर्जरोख्यांत गुंतविलेल्या रकमा, ह्या वगळून सिंगापूरमधील बाकीची सर्व जिंदगी व येणें हीं बँकेच्या ताळेबंदांतून लिहून टाकण्यांत आलीं आहेत. करंट व सेव्हिंग्ज खात्यांत ठेवी वाढल्या आहेत. परंतु सुमारें ७ लक्ष पौंडांचीं कर्जे कमीं दिलीं गेलीं, त्यास मुख्य कारण मुबलक पैसा हेंच होय. निर्गत व्यापार मुख्यत: सरकारी नियंत्रणाखालीच असल्या कारणानें, बँकेला त्यांत भाग घेण्यास फारसा वाव नाहीं. हिंदुस्थान व इराक येथें वाढत्या चलनविस्तारामुळें खाद्य पदार्थांचे बाजारभाव वाढत आहेत, त्याचा परिणाम मुख्यत: आपल्या स्थानिक कारकून लोकांवर झाला आहे. त्यांस आपण मदत करीत आहोंच."

---

### ग्रेट ब्रिटनमधील कुपन पुस्तक

ग्रेट ब्रिटनमध्यें नित्योपयोगी बहुतेक सर्व जिनसांचें रेशनिंग चालू आहे. सर्व जिनसांचीं वर्षाचीं कुपन्स एकत्र बांधलेलीं पुस्तकें स्थानिक कचेऱ्यांतून नांवांच्या अनुक्रमानुसार वाटण्यांत येतात. २५ जुलै रोजीं सुरू होणारीं कुपन पुस्तकें मे महिना संपण्यापूर्वीच लोकांच्या हातीं येऊं लागलीं. रेशनिंगखाली आलेल्या सर्व खाद्य पदार्थांचीं कुपन्स एकाच पृष्ठावर छापलेलीं आहेत. त्यामुळें, दुकानदारांना पानें चाळावीं लागणार नाहींत. कुपन्स खोडतांना मात्र जरा गैरसोय वाटेल, कारण खोडण्याच्या जागेचा आकार आतां फारच लहान झाला आहे. साबणासाठीं स्वतंत्र पान नाहीं, पुस्तकाच्या मलपृष्ठाचा त्यासाठीं उपयोग करण्यांत आला आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें, दुकानदाराचा व गिऱ्हाइकाचा दोघांचाहि वेळ जाणार नाहीं, अशी सोय झाली आहे. कपड्यांच्या कुपनांचें पुस्तक मोठ्या कुपन बुकांतच आहे, तेंहि आतां सुधारण्यांत आलें आहे. त्यांत तीन पृष्ठें आहेत. पहिल्या दोहोंवर ३६ कुपनें छापलीं आहेत त्यांपैकी ४ कुपन्सचे पुन: चार भाग केलेले आहेत. तिसऱ्या पृष्ठावर चार टोकन कुपन्स छापलेलीं आहेत, तीं मोडेसारखीं वापरतां येतील. त्यांत आणखीहि १४ कुपन्स आहेत त्यांचा खुलासा करण्यांत आलेला नाहीं. अधिकाधिक जिनसा रेशनिंगखालीं आल्या, म्हणजे त्यांसाठीं वेगळीं रेशनकार्डे काढण्याची आवश्यकता राहूं नये, ह्यासाठीं हीं १४ कुपन्स कोरीं ठेवलेलीं असलीं पाहिजेत.

## टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.

### विक्री, नफा, डिव्हिडंड, इत्यादींची तुलनात्मक माहिती

| | ३१ मार्च अखेरचें वर्ष; आंकडे हजार रुपयांचे | | | |
|---|---|---|---|---|
| | १९४३ | १९४२ | १९४१ | १९४० |
| | रु. | रु. | रु. | रु. |
| विक्री | १६,०२,०४ | १८,१७,१५ | १७,४३,०६ | १३,२८,८८ |
| मजुरी व पगार | ३,०७,१३ | २,४९,३१ | २,३१,२० | २,०६,३४ |
| एकूण खर्च | १०,७१,४४ | ९,२६,७९ | ९,५७,५८ | ८,४७,६७ |
| ठोक नफा | ६,८९,२३ | ८,९४,५६ | ७,४८,७९ | ५,४२,४० |
| निवळ नफा | २,७२,२३ | ३,६७,५६ | ३,५३,७८ | ३,५७,४० |
| डिव्हिडंड | २,००,१९ | २,२६,१९ | २,४२,१८ | २,१४,१८ |
| नोकरांस बोनस | ५२,५० | ५१,५० | ४९,७७ | ४३,९० |

१९४१–४२ च्या मानानें १९४२-४३ मध्यें विक्रींत २ कोटि रुपयांची घट आहे, त्याचा परिणाम, ठोक नफा, निवळ नफा, डिव्हिडंड, रिझर्व्ह फंड, कराची तरतूद, ह्या सर्वांवर झाला आहे.

### डिव्हिडंडचा तुलनात्मक तक्ता

| मुदत | प्रत्येक शेअरवर दिलेलें डिव्हिडंड: पहिला प्रेफरन्स क्युम्युलेटिव्ह (किं. १५० रु.) | | दुसरा प्रेफरन्स क्युम्युलेटिव्ह (किं. १०० रु.) | | ऑर्डिनरी (किं. ७५ रु.) | | डिफर्ड (किं. ३० रु.) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | रु. | आ. | रु. | आ. | रु. | आ. | पै. |
| १९३५–३६ | ९ | ० | १७ | ८ | ६ | ० | ७ | ८ | ० |
| १९३६–३७ | ९ | ९ | १५ | २ | १० | ० | ३६ | ३ | ६ |
| १९३७–३८ | ९ | ० | २० | १० | १५ | ८ | ७५ | ११ | ३ |
| १९३८–३९ | ९ | ० | २२ | २ | १८ | ० | ९३ | १० | ५ |
| १९३९–४० | ९ | ० | ७ | ८ | २५ | ० | १४३ | १४ | ७ |
| १९४०–४१ | ९ | ० | ७ | ८ | २९ | ० | १७२ | १० | ० |
| १९४१–४२ | ९ | ० | ७ | ८ | २७ | ० | १५८ | ४ | ० |
| १९४२–४३ | ९ | ० | ७ | ८ | २३ | ० | १२९ | ८ | ९ |

पहिल्या प्रेफरन्स भागावर ६% म्हणजे प्रत्येक भागास ९ रुपये डिव्हिडंड मिळालें, म्हणजे सेकंड प्रेफरन्स भागास ७½% म्हणजे प्रत्येक भागावर ७ रु. ८ आ. डिव्हिडंड मिळूं शकतें. तें देऊनहि नफा उरला, तर ऑर्डिनरी शेअरवर ८% म्हणजे प्रत्येक भागास ६ रु. मिळतात व नंतर डिफर्ड भागास २५% म्हणजे प्रत्येक भागास ७ रु. ८ आ. मिळतात. त्यानंतर उरलेली रकम ऑर्डिनरी व डिफर्ड भागांत निम्मी निम्मी वाटली जाते. कंपनीस चांगला नफा झाला म्हणजे डिफर्ड भागांवर फारच उत्तम डिव्हिडंड मिळतें, कारण प्रेफरन्स शेअरवर डिव्हिडंड देऊन वरीलप्रमाणें वांटणी झाली म्हणजे ४८,७५० डिफर्ड शेअर्सना मिळणारी रकम व ३,५०,००० ऑर्डिनरी शेअर्सना मिळणारी रकम, ह्या दोन्ही सारख्याच असतात. सट्टेवाल्यांस टाटा डिफर्ड फार प्रिय आहे.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**


**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

### विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

## THE FARMER
## HIS WELFARE & WEALTH

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR
SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

> Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.
>
> *T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT**
**Sir Vithaldas Thakersey Memorial Building**
**9 Bakehouse Lane, Fort, Bombay.**

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ पुणें, बुधवार, तारीख २८ जुलै, १९४३ अंक ३०

## दि कॉमनवेल्थ

ॲशुअरन्स कं. लि. पुणें यांतच आपला
विमा उतरा.
ठिकठिकाणीं सढळ अटींवर एजन्सीज देणें आहेत.
भेटा अगर लिहाः— ल. ब. भोपटकर,
एम्. ए., एलएल्. बी.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक. व्यवस्थापक

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.
महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहाः—

मुंबईचे चीफ एजन्टस्
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बँक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
' रामनिवास ' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,१०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

शेअर्सः—प्रत्येकीं पांच रुपये वाढीनें विकले जातात. वाढीची रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागते.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीकरितां

## शिक्षणवर्ग

पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या सेक्रेटरीकरितां दोंडाईचे येथें ता. २-८-४३ पासून ता. १६-८-४३ पर्यंत ट्रेनिंग क्लास भरविण्याचें ठरविलें आहे. तरी यापूर्वी तालुकानिहाय भरविण्यांत आलेल्या सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासास जे सेक्रेटरी हजर राहूं शकले नाहींत अगर जे परीक्षेंत यशस्वी झाले नाहींत अशा सर्व सेक्रेटरींनीं या क्लासाचा जरूर फायदा घ्यावा. सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरी व्यतिरिक्त ज्या इसमांना सेक्रेटरीचें शिक्षण घेण्याची इच्छा असेल अशा बाहेरील इसमांनाहि सदर क्लासांत शिक्षण घेण्याची मोकळीक आहे. तरी ज्यांना सदर शिक्षण वर्गाचा फायदा घ्यावयाचा असेल, त्यांनीं तसें आमचेकडे अगाऊ अर्ज पाठवून कळवावें व ता. २-८-४३ रोजीं दोंडाईचे येथें क्लासास हजर रहावें. शिक्षणाबाबत फी ठेवलेली नाहीं.

डब्ल्यू. डी. साळुंखे

असिस्टंट रजिस्ट्रार, कोऑपरेटिव्ह सोसायटीज, धुळें.

## WANTED

Applications are invited for the post of Sales-Manager for organising the "AGMARKING" of pure Jarila Cotton and sale of such cotton produced by the Co-operative Cotton Sale Societies in West Khandesh and Nasik Districts.

Qualifications :—Candidates having previous experience in Marketing or possessing B. Com., B. Ag., B. Sc. (Ag.) or B. A. with economics degrees.

Scale of pay :—Rs. 120-10-200.

The post is temporary for the period ending 31-3-1945 in the first instance. Applications stating age, caste, qualifications, previous experience should reach the under-signed with copies of testimonials, if any, not later than 31st August 1943. The Candidates, if called for interview, will have to come at their own expenses.

W. D. Salunkhe
Assistant Registrar,
Co-operative Societies, Dhulia.

Dhulia, 23-7-43.

## विविध माहिती

### कॅनडांतील रेशनिंग

कॅनडामध्यें खालील पांच जिनसांचें रेशनिंग करण्यांत आलेलें आहे. साखर, चहा, कॉफी, लोणी व पेट्रोल. प्रत्येकास दर आठवड्यास १ औंस चहा अथवा ४ औंस कॉफी मिळते, त्यापासून प्रत्येकीं १२ पेले पेय होऊं शकतें. प्रत्येक माणसाचे वाट्यास दर आठवड्यास पावशेर साखर येते, परंतु लोणचीं व मोरंबे करण्यास सवड मिळेल, अशी सोय आहे.

### हिंदुस्थानांत अमेरिकन चांदीची आयात ?

हिंदुस्थान सरकार अमेरिकेकडून खंड-उसनवार पद्धतीनें चांदी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे, अशी बातमी आहे. ती खरी असल्यास ही चांदी नाणीं पाडण्यासाठीच असणार, हें उघड आहे. नाणीं व औद्योगिक उपयोग ह्या दोन कारणांसाठीच अमेरिका चांदी देण्यास तयार होईल; तेव्हां ही चांदी बाजारांत येणार नाहीं. चांदीची किंमत उतरविणें, हा चांदी आणण्याचा उद्देश नसला तरी त्याचा परिणाम मात्र बाजारावर होणें अपरिहार्य आहे.

### रशिया-इंग्लंड व्यापार

रशिया आणि ग्रेट ब्रिटन ह्यांचेमध्यें व्यापार आणि आर्थिक हितसंबंध वाढविण्याचे उद्देशानें एक अँग्लो-सोव्हिएट ट्रेडिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें घाटत आहे.

### ऑस्ट्रेलियाचा युद्धखर्च

ऑस्ट्रेलियाचा रोजचा युद्धखर्च १५ लक्ष पौंड आहे.

### सरकारी देखरेखीखाली मोटार वाहतूक

खंड-उसनवार पद्धतीनें हिंदुस्थानांत मोटार लॉऱ्या येऊं लागल्या आहेत. सरकार सांगेल त्या कामीं त्यांचा उपयोग करण्याची ज्यांची तयारी असेल, अशांना त्या मिळूं शकतील. ज्या व्यक्ती, संस्था अथवा सोसायट्या किमान २ लक्ष रुपयांचें भांडवल उभें करूं शकतील, अशांनाच त्याचा फायदा मिळूं शकेल. विशेष माहिती रिजनल मोटार ट्रॅन्स्पोर्ट कंट्रोलर, सेक्रेटारिएट, मुंबई, ह्या पत्त्यावर मिळेल.

### हिंदी लष्करभरतीची प्रांतवार वाटणी

| | |
|---|---|
| पंजाब ५०% | संयुक्त प्रांत १५% |
| मद्रास १०% | मुंबई १०% |
| सरहद्द प्रांत ५% | अजमीर-मारवाड ३% |
| बंगाल २% | मध्यप्रांत, आसाम, बहार ओरिसा ५% |

### महाराष्ट्र युनिव्हर्सिटी

महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमिटीनें मुंबई सरकारास सादर करावयाच्या रिपोर्टाची मुदत ऑगस्ट अखेर पुनः वाढविण्यांत आली आहे.

### कोळशाच्या खाणींत स्त्री मजूर

हिंदी कोळशाच्या खाणींतून स्त्री मजुरांचें हळुहळु उच्चाटन करण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण युद्धकालापुरतें प्रारंभीं चार महिने तरी, तहकुब ठेवण्यांत येणार आहे. खाणींत काम करण्यास पुरेसे मजूर मिळत नाहींत, हें त्याचें कारण आहे.

### जर्मन बॉंब हल्ल्यांचे बळी

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत ग्रेट ब्रिटनमधील सुमारें १४ हजार देवळें व धार्मिक ठिकाणें जर्मनीच्या बॉंब हल्ल्यांत सापडलीं, अशी माहिती कॉमन्स सभेंत सांगण्यांत आली.

### मुंबई शहरांतील रेशनिंग

मुंबई शहरांतील २० लक्ष रहिवासी व उपनगरांतील २½ लक्ष लोक ह्यांस रेशनिंगच्या पद्धतीनें धान्य व साखर वाटली जाते. रेशनिंगची मुख्य कचेरी रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या इमारतींत आहे. शहरांत दहा वॉर्ड कचेऱ्या आहेत व उपनगरांत चार वॉर्ड कचेऱ्या व तीन उपकचेऱ्या आहेत. ह्या सर्वांत मिळून १,६०० लोक काम करीत आहेत. सरकारी किरकोळ विक्रीचीं दुकानें, अधिकृत रेशनचीं दुकानें, सहकारी सोसायट्या, गिरण्या व कारखाने ह्यांचे मार्फत धान्य वाटलें जातें. मुंबई शहरांत ५६० रेशनचीं दुकानें, १०३ सहकारी सोसायट्या, २८१ गिरण्या व कारखाने आणि १८ सरकारी दुकानें हें काम करीत आहेत. उपनगरांत ह्याचेच आकडे अनुक्रमें ११०,२७,९ व १६ असे आहेत.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २३४ |
| २ हातसडीचे तांदूळ ... | २३५ |
| ३ इन्स्टिट्यूटची रौप्यज्युबिली ... | २३६ |
| ४ स्फुट विचार ... | २३७ |
| रिझर्व्ह बँकेचा नफा—फाजील चलनविस्ताराचे दुष्परिणाम—प्रो. वकील ह्यांचे स्पष्टोद्गार—माल तारणावरील कर्जासंबंधी ऑर्डिनन्स—अर्बन बँकांना परवानगी—कॉमर्स कॉलेज—गूळ व ऊस ह्यांवर नियंत्रण. | |
| ५ गव्हाच्या लागवडीचा अंदाज ... | २३८ |
| ६ चांदीचा कारखान्यांत उपयोग ... | २३८ |
| ७ रौप्यमहोत्सवाच्या सभा | २३९ |
| ८ चांभार विद्यार्थी मंडळ | २३९ |
| ९ गिलिगन कॅटल फार्म | २४० |
| १० मटाणा सीड सोसायटी | २४० |

# अर्थ

बुधवार, ता. २८ जुलै, १९४३

## हातसडीचे तांदूळ*

### अखिल भारत ग्रामोद्योग संघाचें प्रकाशन

हिंदी लोकांचें दारिद्र्य अतिशय भयंकर स्वरूपाचें असून, बहुसंख्य लोकांना रोज पोटभर जेवण मिळणेंहि अशक्यप्राय असतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. मानवी आहारासंबंधीं आतां पुष्कळ संशोधन झालेलें असून, शरीराच्या गरजेप्रमाणें मनुष्याच्या अन्नांत कोणतीं द्रव्यें कोणत्या प्रमाणांत असलीं पाहिजेत, त्यांत विविधता कशी आवश्यक आहे, वयोमानाप्रमाणें त्यांत बदल कसा करावा लागतो, इत्यादि गोष्टींची माहिती आरोग्यविषयक पुस्तकांत कोठेंहि मिळूं शकते. परंतु, हिंदी दरिद्री लोकांना त्याचा उपयोग काय? दुधाची महति पुष्कळ सांगितली असली, तरी तें किती मुलांना मिळूं शकतें? गरीब तर सोडाच, परंतु मध्यम वर्गीय लोकांस तरी सात्त्विक व पौष्टिक अन्न खाणें कोठें परवडतें? दारिद्र्याचाच हा सर्व परिणाम आहे, आणि हिंदी लोकांची क्रयशक्ति सुधारल्याविना त्यांस पोटभर सकस अन्न मिळण्याचा प्रश्न सुटणार नाहीं. तथापि निकृष्ट आर्थिक परिस्थितींतहि आपणांस काय करतां येणें शक्य आहे? मिळणारें अन्न जास्तींत जास्त उपयोगी कसें बनवितां येईल? लोकांना त्यांच्या मिळकतींत अधिक पौष्टिक व प्रमाणशीर आहार कसा मिळूं शकेल? अखिल भारत ग्रामोद्योग संघानें ह्या प्रश्नाकडे लक्ष पुरवून "तांदूळ" हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. प्रस्तुत पुस्तक हें संघानें इंग्रजींत व हिंदींत प्रसिद्ध केलेल्या मूळ पुस्तकांचें मराठी रूपांतर आहे.

आपल्या लोकांना एक किंवा दोन जातींचीं धान्यें, थोडें मीठ, कांदा अथवा मिरची, ह्यांवरच वर्षभर निर्वाह करावा लागतो. त्यांतहि तांदूळ हें महत्त्वाचें धान्य आहे व कोट्यवधि लोकांचें जीवन तांदळावरच चालतें. म्हणून, तांदळाच्या संबंधीं बारीक सारीक गोष्टींचाहि अभ्यास करणें जरूर आहे. त्याच बरोबर, तांदळापासून जीं जीं सत्त्वें मिळूं शकतात, तीं तीं सगळ्यांच्या सगळीं लोकांना कशीं उपलब्ध होतील व जीं आवश्यक सत्त्वें तांदळांत नाहींत त्यांचा अन्य मार्गानें पुरवठा कसा होईल, ह्याचाहि विचार केला पाहिजे. या विषयांत तज्ज्ञ असलेल्या लोकांनीं जी महत्त्वपूर्ण आणि शास्त्रीय माहिती मिळविलेली आहे, तिचा प्रचार खेड्यांतील कार्यकर्त्यांपर्यंत जाऊन पोचावा, असा प्रस्तुत पुस्तकाचे प्रसिद्धीचा उद्देश आहे असें त्याच्या प्रस्तावनेंत श्री. वैकुंठराय ल. मेहता ह्यांनीं म्हटलें आहे. लोकांनीं गिरणींत सडलेले तांदूळ न खातां हातसडीच्या तांदळाचाच अवलंब करावा; हातसडीचे तांदूळ थोडे महाग वाटले तरी ते कमी प्रमाणांत खाल्ले तरी पुरतात ह्या दृष्टीनें ते अखेर स्वस्तच पडतात; त्यास स्वादहि चांगला असतो आणि हातसडीच्या तांदळाचा अवलंब केल्यानें ग्रामोद्योगास प्रोत्साहन मिळतें हाहि त्याचा महत्त्वाचा फायदा आहे, हा पुस्तकाचा मथितार्थ श्री. मेहता ह्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत स्पष्ट सांगितला आहे. युद्ध परिस्थितीमुळें हिंदुस्थानांत तांदळाचा पुरवठा मर्यादित झाला आहे, अशा प्रसंगीं लोकांना सकस अन्नाचा पुरवठा थोडा कमी होईल, त्यास मुख्य उपाय तांदळाची लागवड वाढवणें हा असला तरी गिरणींत स्वच्छ केलेल्या तांदळाऐवजी हातसडीचे तांदूळ वापरल्यानें लोकांना आरोग्यकारक व पौष्टिक अन्न मिळूं शकेल असें मुंबई सरकारनेंच कांहीं महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केलें होतें, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. यंत्रांत सहा टक्के इतका मोलवान कोंड्याचा भाग नष्ट होतो, तो हातसडीचे तांदूळ वापरल्यानें वांचणार आहे, असें त्यावेळीं म्हणण्यांत आलें होतें. हातसडीच्या तांदळाचे अभावीं निदान कमी सडलेले तांदूळ तरी खाण्यासाठी वापरावे.

प्रस्तुत पुस्तकांत प्रथम आहारदृष्ट्या तांदळाचें महत्त्व वर्णिलें असून नंतर भात भरडण्याची आणि तांदूळ कुटण्याच्या साधनांची माहिती दिली आहे. त्यानंतर तांदळाच्या गिरण्या आणि हातकुटाई ह्यांची तुलना करण्यांत आली आहे. अन्नविषयक महत्त्वाचे दृष्टीनें मिलकुटाईमुळें तांदळांतील पौष्टिक सत्त्व निघून जाऊन तो शरीरास थोडा अपायकारकहि कसा होतो, हें स्पष्ट केल्यानंतर तांदूळ खाणारांना अधिकाधिक सत्त्वांश कसा मिळूं शकेल, ह्याबाबत व्यावहारिक सूचना देण्यांत आल्या आहेत. त्यांतील कांहीं व्यक्तिगत आहेत. कांहीं सूचना सरकारच्या कर्तव्यासंबंधींच्या आहेत. सरकारी व सार्वजनिक संस्थांतून (तुरुंग, दवाखाने, महाविद्यालयें, विद्यालयें, शाळांचीं वसतिगृहें, खाणावळी, यांत) हातकुटाईचे तांदूळच उपयोगांत आणण्याबद्दल सक्ती असावी; स्थानिक स्वराज्य संस्थांनीं तांदळाच्या गिरण्यांवर परवाना फी इतकी आकारावी कीं गिरण्या चालविणें मालकांस फायद्याचें होऊंच नये, मिलमध्यें कुटून तयार होणाऱ्या तांदळावर जबर कर बसून हातसडीच्या तांदळास उत्तेजन द्यावें, आणि इतकें करूनहि भागलें नाहीं तर सरकारनें तांदळाच्या गिरण्यांचें समूळ उच्चाटण करण्यासाठीं त्या कायद्यानेंच बंद कराव्यात, अशा त्या सूचना आहेत. हातसडीचा तांदूळ वापरण्याचें राष्ट्रीय महत्त्व सरकारनें स्वतःच मान्य केलेलें असल्या कारणानें, ह्या सूचनांत अंतर्भूत असलेलें तत्त्व सरकारनें मान्य करून त्याबाबत योजना आखणें त्याचें कर्तव्यच ठरतें. फिलिपाईन बेटांच्या सरकारनें मिलकुटाईच्या तांदळाचें चांगल्या तऱ्हेनें उच्चाटण केलेलें आहे. तेथें २४६ रत्तलच्या मिलकुटाईच्या तांदळाच्या एका पोत्यास ८ रु. १२ आ. ६ पै एवढा कर द्यावा लागतो व आयात होणाऱ्या तांदळावरहि अशीच कराची आकारणी होते. हिंदुस्थानांत पोत्यामागें १ रु.

* "तांदूळ." प्रकाशक: श्री वैकुंठ ल. मेहता, ९ बॅक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. पृष्ठसंख्या ६०, किंमत ८ आणे.

८ आ. एवढें जरी हातसडीच्या तांदुळास संरक्षण मिळालें तरी त्यामुळें हातसडी तांदुळास चांगलें उत्तेजन मिळेल, असा हिशेब आहे. अ. भा. ग्रामोद्योग संघानें प्रसिद्ध केलेल्या " तांदूळ " ह्या पुस्तकाचा प्रसार जितका अधिक होईल त्या मानानें संघाचें उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होणार आहे.

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची रौप्यज्युबिली

### इन्स्टिट्यूटच्या रौप्य महोत्सव प्रसंगास सर जनार्दन मदन ह्यांची प्रस्तावना

इन्स्टिट्यूटला पंचवीस वर्षे पुरी झाल्याबद्दल आपण उत्सव समारंभ आज साजरा करीत आहों. अशा प्रसंगीं आपण सर्वजण-विशेषत: आपला शेतकरी समाज—विद्यान्‌पिढ्या अनेक आर्थिक आपत्ति भोगीत असतां सहकारी चळवळ ह्या आपत्ति दूर करणारा एक रामबाण उपाय आहे अशा भावनेनें काम करणाऱ्या सहकारी बांधवांच्या मनांत दोन गोष्टी प्रामुख्यानें येतात.

पहिली गोष्ट अशी कीं जरी चळवळीच्या कांहीं अंगांची चांगली वाढ झाली असली तरी इतर अंगांची वाढ आपल्या अपेक्षेप्रमाणें झाली नाहीं. तेव्हां आपल्या कल्पनेप्रमाणें चळवळीचे मुख्य हेतू साध्य व्हावे असें आपणांस वाटत असेल तर तिची सर्वांगीण प्रगति होण्याबाबत सर्वांनीं कसून प्रयत्न केले पाहिजेत. बाहशाही शेतकी कमिशननें आपल्या रिपोर्टांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, "जर सहकारी चळवळ अयशस्वी झाली तर हिंदुस्थानांतील खेडुतांच्या सर्व आकांक्षा नष्ट झाल्याच म्हणून समजा. " हें विधान मला वाटतें, आपणां सर्वांस मान्य आहे. असें आहे तर आपण सर्वांनीं व्यक्तिश: व संघटनेनें चळवळ कोणत्याही प्रकारें लंगडी पडणार नाहीं अशाविषयीं दक्षता घेणें अत्यंत जरूर आहे.

दुसरी गोष्ट आपल्या मनांत येते ती ही कीं आपली इन्स्टिट्यूट ही खरी प्रातिनिधिक स्वरूपाची, प्रचार कार्य व सहकारी शिक्षणाची तरतूद करणारी एवढेंच नव्हे तर सर्व चळवळींचें धोरण आंखून देणारी संस्था व्हावी ह्या मूळ ध्येयापासून आपण पराङ्मुख झालों आहोंत. गेल्या पंचवीस वर्षांत इन्स्टिट्यूटच्या जीवनांत बरेच चढउतार झाले, आणि सध्यां तर तिचें कार्य सर्व बाजूंनीं बरेंच मर्यादित झालें आहे. सरकारी मदतीची, कार्यकर्ते व द्रव्य-पुरवठा या दोनही बाबतींत या पुढें कांहीं काळ तरी आवश्यकता भासणारच, ही गोष्ट खरी आहे. पण जर निस्वार्थीपणानें काम करणारे—विशेषत: सहकारी चळवळीमधून पुढें आलेले—लोक जर आपणांस लाभले तर आपली ध्येयसिद्धि जवळ जवळ येत जाईल आणि सध्यां आपणांकडे सोपविलेलें सहकारी शिक्षणाचें कार्य आपण उत्तम तऱ्हेनें पार पाडल्यावर सहकारी लोकमत तयार करण्याच्या व चळवळीचें धोरण आंखून देण्याच्या कार्याला लागूं.

वरील ध्येय गांठायचें असेल तर प्रत्येकानें चळवळीचें पाऊल प्रगतिपथावर नेण्याकरितां आपल्यापुरतेंच नव्हे तर चळवळींत कार्य करणाऱ्या सर्वांना मन:पूर्वक व कसोशीनें मदत करणें अत्यंत जरूर आहे. या मार्गाचें अवलंबन केल्यास आपल्या इन्स्टिट्यूटला तिच्या आद्य जनकांच्या अपेक्षेप्रमाणें उच्च स्थान प्राप्त करून देण्याचे कामीं मदत केल्यासारखें होईल.

### ज्युबिलीचे वेळीं सर जनार्दन मदन ह्यांचें भाषण

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या रौप्य ज्युबिलीचा मुख्य समारंभ मुंबई येथें ता. १३ रोजीं झाला, त्याप्रसंगीं इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, सर जनार्दन मदन, ह्यांनीं विस्तृत भाषण केलें. त्यांत त्यांनीं इन्स्टिट्यूटनें देखरेखीबाबत, शैक्षणिक व प्रचारात्मक केलेल्या कामगिरीचें सिंहावलोकन करून पुढील कार्यासंबंधीं आपले विचार मांडले. इन्स्टिट्यूटच्या २५ वर्षांच्या इतिहासाचा आढावा आम्हीं " अर्था "मध्यें ता. २९ जून रोजीं घेतलेला आहे. जिल्हा सुपरवायझिंग बोर्डांच्या स्थापनेमुळें व इन्स्टिट्यूटच्या शाखा बंद झाल्यामुळें इन्स्टिट्यूटचें कार्यक्षेत्र शैक्षणिक गोष्टींपुरतेंच मर्यादित झालें आहे आणि मध्यंतरी कांहीं काळ तर इन्स्टिट्यूटचें कार्य स्थगित झाल्यासारखेंच होतें. इन्स्टिट्यूटच्या इतिहासांतील ह्या घटनेस सरकार बिलकूल जबाबदार नव्हतें, असें सर जनार्दनरावांनीं सांगितलें. इन्स्टिट्यूटची आतां पुनर्घटना झाली असून ती आपलें मर्यादित क्षेत्रांतील कार्य पुन: जोमानें करण्यास सज्ज आहे, असें ते म्हणाले. सहकारी कार्यकर्त्यांसाठीं तिनें वर्ग काढले आहेत, जिल्हावार शिक्षण कमिट्या स्थापण्याचा तिचा विचार आहे, सहकारी खात्याच्या सहकार्यानें सहकारी प्रश्नांसंबंधीं संशोधन करण्याच्या कार्यास तिनें प्रारंभ केला आहे, कार्यकर्त्यांसाठीं सहकारी विषयावर पुस्तकें व पत्रकें काढण्याची तिची तयारी चालू आहे व बिनसरकारी कार्यकर्त्यांत सहकाराबद्दल जागृति निर्माण करून त्यांस कार्यप्रवण करण्याचा तिचा प्रयत्न यशस्वी होऊं लागला आहे, अशी त्यांनीं माहिती सांगितली. मुंबई प्रांतांत सहकारी चळवळीची प्राणप्रतिष्ठा करून तिची जोपासना करणारांच्या निष्ठावंत कार्याची त्यांनीं आठवण करून ह्यापुढेंहि सहकारी चळवळीस उत्साही कार्यकर्ते मिळतील, अशी आशा प्रदर्शित केली.

### इतर ठिकाणच्या सभांतील भाषणें

इन्स्टिट्यूटचा रौप्य महोत्सव मुंबईप्रमाणें इतर ठिकाणींहि साजरा करण्यांत आला. त्यावेळीं इन्स्टिट्यूटच्या २५ वर्षांच्या कामगिरीबद्दल तिचें अभिनंदन करण्यांत आलें. जुन्या स्थानिक कार्यकर्त्यांनीं आपल्या आठवणी सांगून इन्स्टिट्यूटच्या कार्याबद्दल आपले विचार पुढें मांडले. जिल्हा शाखा रद्द झाल्यामुळें स्थानिक कार्यकर्त्यांचा उत्साहभंग होऊन मुंबई शहर आणि जिल्ह्यांतील व खेड्यांतील कार्यकर्ते ह्यांचेमधील दुवा नाहींसा झाला आहे, ह्याबद्दल पुणें येथें बहुतेकांनीं नाखुषी व्यक्त केली. इन्स्टिट्यूटचें शैक्षणिक कार्य उत्साहानें चालविण्यास स्थानिक कार्यकर्ते तयार असले तरी त्यांस वाव नाहीं, असें कित्येक वक्त्यांनीं सांगितलें. इन्स्टिट्यूटच्या कारभारांत लक्ष घालण्यास जिल्ह्यांतील लोकांना सवडच ठेवण्यांत आलेली नाहीं, असा त्यांचा आक्षेप आहे. इन्स्टिट्यूटचा सहकारी चळवळीशीं जितका जिव्हाळ्याचा संबंध असावयास पाहिजे, तितका तो आतां राहिलेला नाहीं, अशी त्यांनीं तक्रार केली. कार्यकर्त्यांनीं व्यक्त केलेल्या वरील विचारांकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. मध्यंतरी इन्स्टिट्यूटचें अस्तित्व डळमळीत झालें होतें व ही बिनसरकारी प्रातिनिधिक संस्था नामशेष होण्याचा संभव होता. त्या प्रसंगांतून संस्था निभावली व ती आतां पुन: आपलें अंगीकृत कार्य करण्यास तत्पर झाली आहे. सहकारी कार्यकर्त्यांना उत्तेजन वाटावें व अधिकाधिक उत्साही लोकांनीं चळवळींत आपुलकीनें भाग घ्यावा, ह्या दृष्टीनें इन्स्टिट्यूटनें आपलें धोरण ठेवलें पाहिजे. त्याकरितां इन्स्टिट्यूटला सवडहि दिली पाहिजे. सर जनार्दनराव मदन ह्यांच्या नेतृत्वाखालीं इन्स्टिट्यूटचें पाऊल योग्य दिशेनें पडून तिला पूर्वीचा दर्जा व वैभव प्राप्त व्हावें, अशीच सहकारी कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे.

## स्फुट सूचना

### रिझर्व्ह बँकेस सात कोटि रुपये नफा झाला

हिंदुस्थान सरकारनें ऑर्डिनन्स काढून रिझर्व्ह बँकेचें डिव्हिडंड ४% वर मर्यादित केलें, ह्या विषयावर लिहितांना, ३० जून १९४३ अखेरच्या वर्षी रिझर्व्ह बँकेस किमान ३ कोटि, १७½ लक्ष रुपये तरी नफा होईल असा अंदाज केला होता. इतका नफा झाला, तरच भागीदारांना ३½%चे पेक्षा ज्यास्त नफा मिळण्याचा प्रश्न उपस्थित होतो. प्रत्यक्ष नफा ७,६९,८०,७४० रुपये झाला आहे, म्हणजे तो १९४१-४२ च्या नफ्याचे दुपटीपेक्षा ज्यास्त आहे. इतकें असून, भागीदारांचे वाटणीस फक्त २० लक्ष रुपये येणार असून बाकीची रक्कम मध्यवर्ती सरकारास मिळणार आहे. ५ कोटि रुपयांचे भांडवलावर ४% दरानें डिव्हिडंड देण्यास २० लक्ष रुपये लागतात. चलनाच्या विस्ताराबरोबर रिझर्व्ह बँकेचा नफा कसा वाढला आहे, व त्याबरोबर सरकारच्या वाट्याची रकम कशी फुगली आहे, हें वरील आकड्यांवरून दिसून येईल. १ जानेवारी १९३५ ते ३० जून, १९४३ अखेरच्या बँकेच्या साडेआठ वर्षांच्या नफ्यापैकीं सरकारास फक्त १ कोटि, ३३ लक्ष रुपये मिळाले, १९४०-४१ च्या वर्षाच्या नफ्यापैकीं सरकारच्या वाटणीस २ कोटि, ६२ लक्ष रुपये आले, १९४१-४२ च्या नफ्यांतील सरकारचा वाटा ३ कोटि, २४ लाखांवर गेला व नुकत्याच संपलेल्या वर्षाच्या नफ्यापैकीं ७ कोटि, ५० लक्ष रुपये सरकारास मिळणार आहेत. रिझर्व्ह बँकेस चलनास तारण ठेवलेल्या सरकारी रोख्यांवरील व्याज मिळत असतें व चलनविस्तारामुळें हा व्याजाचा आकडा वाढत जातो.

---

### फाजील चलनविस्ताराचे दुष्परिणाम

चलनविस्तारामुळें युद्धखर्चाचा हिंदी जनतेवर अप्रमाण बोजा पडत आहे, तो कमी व्हावा ह्याविषयीं सरकारास सूचना करणारे, सुप्रसिद्ध व जबाबदार अशा अर्थशास्त्रज्ञांचे दोन-तीन ग्रंथ ह्यापूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत. युद्धखर्च,चलनविस्तार आणि महागाई ह्या सर्वांचा अत्यंत निकट संबंध आहे व त्यासंबंधींतील सरकारी धोरण बदलण्याचा आग्रह ह्या सर्व लेखकांनीं केला आहे. केवळ प्रचलित झालेलें चलन परत खेचून आणून भागणार नाहीं, तर चलनाचा विस्तारच मर्यादित झाला पाहिजे, असें मत व्यक्त करकरण्यांत आलेलें आहे. प्रो. काळे, वाडिया, शहा, वकील,गाडगीळ प्रभृति वीस अर्थशास्त्रज्ञांनीं ह्यासंबंधांत सरकारास इशारा देणारें पत्रक १२ एप्रिल रोजीं प्रसिद्ध केलें. चलनवाढीचा बेसुमारपणा सरकारला आतां मान्य असलेला दिसतो. फाजील चलन विस्ताराचा मध्यम व खालच्या वर्गांतील लोकांच्या रहाणीवर फारच वाईट परिणाम झालेला आहे आणि त्याचा ताण फार काळ त्यांस सहन होणार नाहीं. सरकारनें स्वतः कांहीं ऑर्डिनन्स काढून, फाजील चलनवाढीच्या दुष्परिणामांस आवरून धरण्याचा प्रयत्न केला असला तरी चलनवाढच ताब्यांत ठेवण्याची खटपट त्यांनीं केलेली दिसत नाहीं. एकीकडे चलनाचा विस्तार चालू ठेवून दुसरीकडे चलन खेचून घेण्याचा प्रयत्न करणें, म्हणजे टाकींत पाणी आणणारा नळ बंद न करतां ती उपसण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच आहे. तथापि, प्रसिद्ध होणाऱ्या बाजारभावांच्या आंकड्यांवरून, त्यांत थोडा उतार होण्याची प्रवृत्ति आढळून येत आहे व महागाईच्या मानाच्या कमानीची चढण संपत आली आहे असें दिसतें. हा सरकारी धोरणाच्या टीकाकारांचा विजयच आहे.

---

### प्रो. वकील ह्यांचे स्पष्टोद्गार

प्रो. सी. एन. वकील ह्यांनीं गेल्या जानेवारींत एक पुस्तक प्रसिद्ध करून हिंदी युद्धखर्च व त्याचा रुपयाची किंमत कमी होण्यांत झालेला परिणाम ह्यासंबंधी विवेचन केलें. ह्या पुस्तकानें बरीच जागृति निर्माण केली. प्रो. वकील ह्यांनीं "हिंदुस्थानावर युद्धाचा पडणारा आर्थिक बोजा" (Financial Burden of the War on India. पृ. सं. १४०. किं. ४ रुपये) ह्या नांवाचें एक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे, त्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. हिंदुस्थानाच्या बचावाचा खर्च ग्रेट ब्रिटन सोशीत आहे, त्यामुळेंच हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमध्यें येणें साठल्याचा देखावा दिसतो, असें सांगण्यांत येतें. ह्या प्रश्नावर प्रो. वकील ह्यांनीं चांगला प्रकाश पाडला आहे. युद्धजन्य.कारभाराची माहिती देऊन त्यांनीं युद्धाचा हिंदुस्थान सरकाराच्या कर्जविषयक परिस्थितिवर काय परिणाम झाला आहे त्याचें वर्णन केलें आहे व त्यासंबंधांतील सरकारी धोरणाची छाननी केली आहे. इन्फ्लेशनची कारणमीमांसा करून त्यावर उपाय योजनाहि त्यांनीं सुचविली आहे. देशांत शांतता नांदून युद्ध-प्रयत्न जोमानें चालण्यास महागाई दूर होणें आवश्यक आहे, असा पुस्तकाचा शेवट करून ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं ह्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास त्यांत संयुक्त राष्ट्रांचें नुकसान होण्याचा संभव आहे, असा इषारा त्यांनीं स्पष्टपणें दिला आहे. प्रो. वकील यांच्या पुस्तकाचें विस्तृत परीक्षण पुढें देण्यांत येईलच.

---

### माल तारणावरील कर्जासंबंधीं ऑर्डिनन्स

मालाचे (सोनें-चांदीसुद्धां) तारणावरील कर्जे बेकायदा ठरविण्याचा अथवा तीं नियंत्रित करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें डिफेन्स ऑफ इंडिया नियमाखालीं घेऊन ठेवला आहे, त्याचा उद्देश नेहमीचा व्यवहार थांबविणें हा नसून सट्टेबाजीस आळा घालणें हा आहे, असें दिसतें. रिझर्व्ह बँकेनें ह्यासंबंधांत बँकांना सल्ला दिला आहे, त्यांत विशेषतः धान्य व सोनें-चांदी ह्यांच्या सट्ट्यांस उत्तेजन मिळेल अशा तऱ्हेचे कर्जाचे व्यवहार त्यांनीं करूं नयेत, असें म्हटलें आहे. सरकारनें स्वतःकडे अधिकार घेतले आहेत, त्यांचा उपयोग करण्याची पाळीच त्यांजवर येऊं नये, अशी त्यांची इच्छा आहे व बँका आणि तत्सम संस्था व कर्जे देणाऱ्या व्यक्ती ह्यांनीं संयम दाखविला, तर डिफेन्स ऑफ इंडिया नियमांचा अवलंब सरकारास करावा लागणार नाहीं. भरमसाट साठे करण्यासाठीं बँका व सावकार ह्यांचीं माल-तारणावरील कर्जे उपयोगांत आणलीं जातात, तीं नियंत्रित करणें एवढाच सरकारचा हेतु आहे. तेव्हां ऑर्डिनन्स प्रसिद्ध झाला ह्याचा अर्थ माल तारणावरील कर्जांचा मामुली व्यवहार बंद पडला, असें कोणीं समजूं नये.

---

### अर्बन बँकांना लिमिटेड कंपन्यांस कर्जे देण्याची परवानगी

मे, १९४२ मध्यें पुणें येथें सहकारी बँकांची परिषद भरली होती, तिनें एक ठराव करून अर्बन को. बँकांना इंडियन कंपनी कायद्याखालीं नोंदण्यांत आलेल्या संस्थांस सरकारी रोखे व इतर 'ट्रस्टी' सिक्युरिटीज ह्यांच्या आणि मालाच्या तारणावर रिझर्व्ह बँकेनें ह्या संबंधांत व्यक्त केलेला अभिप्राय लक्षांत घेतला जाऊन योग्य मर्यादेंत कर्जे देण्यास मुभा असावी, अशी सूचना केली होती. मुंबई सरकारनें ह्या सूचनेचा विचार करून सरकारी

ठोसे व ट्रस्टी सिक्युरिटीज ह्यांच्याच फक्त तारणावर अर्बन बँकांनी अशा संस्थांस कर्जे देण्यास हरकत नाहीं, असें आतां जाहीर केलें आहे. जॉइंट स्टॉक कंपन्यांस सभासद करून घेण्या-पूर्वी रजिस्ट्रारची अगोदर परवानगी मिळाविली पाहिजे, व त्यासाठी जरूर तर बँकेने आपले कानू बदलून घेतले पाहिजेत.

---

### डे. ए. सोसायटीचें कॉमर्स कॉलेज

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नूतन व्यापारी कॉलेजाचें उद्घाटन गेल्या शनिवारीं सर अर्देशिर दलाल ह्यांचे हस्तें झालें. त्या प्रसंगीं कॉलेजचे प्रिन्सिपॉल व सोसायटीचे सेक्रेटरी, प्रो. द. गो. कर्वे, ह्यांनीं कॉलेजच्या स्थापनेचा इतिहास निवेदन करून सोसायटीचें शिक्षणक्षेत्रांतील उच्च स्थान सध्याच्या अडचणीच्या प्रसंगींहि कॉलेजची स्थापना करण्यास कसें उपयोगी पडलें, तें सांगितलें. सर अर्देशिर दलाल ह्यांनीं व्यापारी शिक्षणाचें महत्त्व पूर्वीपेक्षा आतां फार वाढलें आहे; व्यापारी दृष्टि कांहीं ज्ञाती व समाज ह्यांतच आढळूं शकते व बाकीच्यांना ती प्राप्त होणें शक्य नाहीं ही कल्पना चुकीची आहे, महाराष्ट्रीय लोक बुद्धिमान व कर्तबगार आहेत तेव्हां ते व्यापारांत यशस्वी होण्यास अडचण नाहीं व त्यांना व्यापारी वातावरण व शिक्षण प्राप्त करून देण्यास हें कॉलेज उपयोगी पडेल असें सांगितलें. प्रिन्सिपॉल कर्वे तज्ञ शिक्षकांच्या सहायानें कॉलेज यशस्वी करतील, असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला. सोसायटीचा प्रस्तुत उपक्रम तिच्या कीर्तींत भर घालील ह्यांत संशय नाहीं.

---

### गूळ व ऊस ह्यांवर नियंत्रण

डिफेन्स ऑफ इंडिया नियमाखाली हिंदुस्थान सरकारनें गुळाचें नियंत्रण करण्याचा अधिकार घेणारी एक कंट्रोल ऑर्डर जाहिर केली आहे. विशिष्ट विभागांत गूळ कोणत्या दरानें विकला जावा, हें त्या आर्डरचे अन्वयें सरकार ठरवून टाकील. गुळाच्या प्रतवारीप्रमाणेंच अर्थात भाव ठरविला जाईल. गुळाचें उत्पादन, विक्री, साठा, किंमत, ह्या सर्वांचे बाबतींत कंट्रोलर नियम करील, ते सर्वांवर बंधनकारक होतील. गुळाच्या उत्पादनामुळें साखरेच्या उत्पादनास ऊस कमी पडत आहे, असें कंट्रोलरला दिसून आलें, तर तो सरकारी गॅझेटांत जाहीर करून विशिष्ट विभागाचे बाहेर ऊस पाठविण्यास प्रतिबंध करूं शकेल अथवा त्यावर नियंत्रण घालील. उसाची लागवड करणारांनीं विशिष्ट साखर कारखान्यांस ठराविक किंमतीनें, ठराविक वेळीं ठराविक ऊस पुरविला पाहिजे, अशी त्यांजवर सक्ती करतां येईल. गुळाचें उत्पादन मर्यादित करण्याचा अधिकारहि कंट्रोलरला देण्यांत आला आहे.

---

### सैनिकांसाठी चहाचें नवें पेय

बीरचा तुटवडा पडूं लागल्यामुळें चहापासून एखादें नवें पेय निर्माण करण्याचा प्रयत्न चालू झाला, तो यशस्वी होत आहे. चहा-साखर अंबवण घालून त्याचें पेय बनवून त्यांत सोडा वॉटर घालून तें सोडा वॉटरच्या बाटल्यांतून देण्याचा हिंदी आर्मी कँटीन स्टोर्स खात्याचा विचार आहे. सैनिकांना हें पेय आवड-ल्यास, त्या ' सायडर ' पेयाचें मोठ्या प्रमाणावर सरकारी कार-खान्यांतून उत्पादन करतां येईल. लष्करी तळाजवळच सायडरचे हे कारखाने काढणें सोईचें पडेल.

### हिंदी गव्हाच्या लागवडीचा अंदाज

( १९४२-४३ )

| | | |
|---|---|---|
| गव्हाखालील क्षेत्र | ३,४०,५८,००० | एकर |
| गेल्या वर्षी | ३,३९,१४,००० | ” |
| अपेक्षित उत्पादन | १,०९,३८,००० | टन |
| गेल्या वर्षी | ९९,९०,००० | ” |
| वाढ | ९% | |

गव्हाच्या लागवडीचे दृष्टीनें प्रांतांचा अनुक्रम पंजाब (३१·५%), संयुक्त प्रांत ( २३% ), मध्यप्रांत–वऱ्हाड ( ९·४% ), मुंबई ( ६ % ), सिंध ( ३·५% ), बिहार ( ३·१ % ) ह्याप्रमाणें आहे.

### गव्हाची निर्गत व आयात ( टन )

| | १९३९-४० | १९४०-४१ | १९४१-४२ |
|---|---|---|---|
| निर्गत | ७,८०० | ४५,००० | १,८५,९०० |
| आयात | ८५,५०० | १८,८०० | १८,१०० |

म्हणजे, १९३९-४० सालीं निर्गत वजा करून प्रत्यक्ष आयात ७७,७०० टन झाली. १९४०-४१ मध्यें आयात-निर्गतीची वजावट होऊन प्रत्यक्ष निर्गत २६,२०० टनांची झाली व १९४१-४२ मध्यें हा आकडा १,६७,८०० टनांवर गेला.

### चांदीचा कारखान्यांत उपयोग

चांदीचा औद्योगिक उपयोग वाढत्या प्रमाणावर होऊं लागला आहे. युद्ध-विषयक माल उत्पादन करणाऱ्या कारखान्यांत पूर्वी जेथें तांबें वापरत असत, तेथें चांदी वापरण्यांत येऊं लागली आहे. अर्थात्, अमेरिका देश ह्यांत अग्रेसर आहे. मॅग्नेशियम, ॲल्युमिनियम, ग्राफाइट, कृत्रिम फेनॉल, इत्यादींच्या उत्पादनास सतत मोठ्या विजेच्या प्रवाहाची आवश्यकता असते, विद्युत्प्रवा-हासाठी तांबें लागतें, त्याची जागा आतां चांदी घेत आहे. हें तांबें अथवा चांदी ही झिजून जात नसल्याकारणानें, त्यांचें काम झाल्यावर हे धातू पुनः मूळ उपयोगासाठी वापरतां येतात. अमे-रिकेकडून ग्रेट ब्रिटननें बरीच चांदी उसनवार घेतली आहे, तिचे-पैकीं कांहीं भाग अशा रीतीनें कारखान्यांत वापरला जाईल व युद्धसमाप्तीनंतर ती चांदी जशीच्या तशी परत केली जाईल.

### भाडें नियंत्रण

पुणें शहर, सबर्बन हद्द, कँटोन्मेन्ट हद्द व बोपोडी ग्राम पंचा-यतीखालील औंध रोड हद्द, ह्यांतील दुकानें व कारखाने ह्यांसाठी भाड्यानें घेतलेल्या जागांस भाडें मर्यादित करणारा कायदा लागू करण्यांत आला आहे. सप्टेंबर, १९४० मध्यें ह्या जागांस जेवढें भाडें होतें, त्यापेक्षां अधिक भाडें आतां आकारतां येणार नाहीं, परंतु २१ जुलै, १९४३ पूर्वी जास्त दिलेलें भाडें भाडेकऱ्यास परत मागतां येणार नाहीं.

### रेशनिंगचें अन्न सकस व पुरेसें आहे काय ?

लोकांस देण्यांत येणाऱ्या अन्नाचा दर्जा व त्याचें प्रमाण ह्यां-संबंधीं रेशनिंग अधिकाऱ्यांना सल्ला देण्याकरितां एक कमिटी नेम-ण्यांत यावी व तिचेवर डॉक्टर वर्गाचें योग्य प्रतिनिधित्व असावें, असा ठराव बाँबे मेडिकल यूनियनच्या मॅनेजिंग कमिटीनें पास केला आहे.

### युद्धविषयक धोक्याच्या विम्याचा ५८ लक्ष रुपयांचा हप्ता

टाटा आयर्न अँड स्टील कंपनी युद्धविषयक धोक्याच्या विम्याचा हप्ता म्हणून दरसाल ५८ लक्ष रुपयेच देत आहे.

## इन्स्टिटयूटच्या रौप्य महोत्सवाच्या सभा

### नाशिक

मुंबई प्रां. को. इन्स्टिटयूटचा रजत महोत्सव येथें ता. १५ रोजी मि. जे. बूथ, आय. सी. एस., कलेक्टर, यांचे अध्यक्षखालीं साजरा करण्यांत आला. सदर प्रसंगीं नाशिक जिल्ह्यांतील २०० वर सहकारी कार्यकर्ते उपस्थित होते. ईशस्तवन झाल्यानंतर रा. ब. आर. व्ही. वंडेकर यांनीं इन्स्टिटयूटचा इतिहास, कार्य-महत्व व पुढील धोरण याबद्दल माहिती दिली. मुंबईचे गव्हर्नर व सर जनार्दन ए. मदन यांचेकडून आलेले संदेश वाचून दाखविण्यांत आले. मि. आर. एच. देशपांडे, एज्युकेशनल सुपरवायझर, यांनीं शेतकी सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांना व व सेक्रेटरी यांना शिक्षण देण्याच्या सरकारी योजनेची माहिती देऊन नाशिक जिल्ह्यांतील केलेल्या कार्याचा वृत्तांत निवेदन केला. यानंतर सहकारी चळवळ, तिचें महत्व व फायदे व निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांबद्दल डॉ. एम. एन. देसाई, ऑडिटर व रिकन्स्ट्रक्शन ऑफिसर मि. बी. एस. कानविंदे, डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल ऑफिसर, मि. डब्ल्यु. डी. साळुंके, असिस्टंट रजिस्ट्रार धुळे, प्रो. पुराणिक व मि. एम. आर. दळवी यांचीं भाषणें झालीं.

अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत इन्स्टिटयूटच्या कार्याचें महत्व कसें आहे व शिक्षणानें बौद्धिक अन्न कसें मिळतें हें सांगितलें. स्वतःच उत्पादक व गिऱ्हाईक अशा परिस्थितींत सहकारी संस्थेमार्फत कशी मदत मिळूं शकेल याचें त्यांनीं उत्तम विवेचन केलें व इन्स्टिटयूटचा सुवर्ण–महोत्सवही चांगल्या प्रकारें पार पडो अशी सदिच्छा व्यक्त केली.

सरदार एन. जी. विंचुरकर यांनीं अध्यक्षांचे व इतर पाहुण्यांचे आभार मानिले. राष्ट्रगीतानंतर हा कार्यक्रम संपला.

### धारवाड

सहकारी कार्यकर्ते व कर्नाटकांतील सहकारी संस्था ह्यांचे प्रतिनिधी मिळून सुमारें २०० गृहस्थ धारवाड येथील कर्नाटक सेंट्रल को. बँकेच्या हॉलमध्यें इन्स्टिटयूटची ज्युबली साजरी करण्याकरितां ता. १८ रोजीं जमले होते. सभेच्या अध्यक्षस्थानीं मि. सी. बी. हुली, बी. ए. ( रि. डेप्युटि रजिस्ट्रार, को. सो. ) ह्यांची योजना केली होती. प्रारंभीं श्री. आर. बी. पालेकर डि. अ. रजिस्ट्रार ह्यांनीं इन्स्टिटयूटचे अध्यक्ष सर जनार्दन मदन ह्यांजकडून आलेला संदेश वाचून दाखविला. त्यानंतर, रा. ब. के. आर. वाळवेकर ( हुबळी को. अर्बन बँकेचे अध्यक्ष ), रावसाहेब डी. एल. पाटील, श्री. व्ही. एस. बसवानल ( मॅ. डायरेक्टर, कर्नाटक सें. को. बँक ) श्री. एस. कुलकर्णी (डि. ऑनररी ऑर्गनायझर, गदग), श्री. एस. एस. मलिमठ ( इन्स्टिटयूटचे माजी सेक्रेटरी ) ह्यांचीं इन्स्टिटयूटच्या कार्यासंबंधीं भाषणें झालीं. सर जनार्दन मदन यांच्या अध्यक्षत्वाखालीं इन्स्टिटयूटचें कार्य प्रभावी होईल व तिला बिन सरकारी सहकारी लोकमताची प्रातिनिधीक संस्था, ह्या नात्याचा पूर्वीचा उच्च दर्जा प्राप्त होईल, अशी आशा अध्यक्षांनीं व्यक्त केली. सभेस सहकारी खात्याचे स्थानिक अधिकारी उपस्थित होते. श्री. यावगल, वकील आणि रजिस्ट्रारचे प्रतिनिधी, ह्यांनीं आभार मानल्यावर अल्पोपहार होऊन सभेचें काम संपलें.

### अहमदनगर

अहमदनगर येथें सेंट्रल बँकेचे दिवाणखान्यांत मुंबई प्रांतिक को–ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूटचा रौप्यमहोत्सव दिन ता. १३ रोजीं सायंकाळीं रा. ब. चितळे यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. प्रारंभीं श्री. दादासाहेब धनेश्वर यांनीं इन्स्टिटयूटचा पंचवीस वर्षांचा इतिहास सांगून ह्याप्रसंगीं सर जनार्दन यांचा आलेला संदेश वाचून दाखविला. नंतर श्री. डावरे, श्री. काळे, श्री. कानडे, श्री. गायतोंडे ह्यांचीं भाषणें झालीं. त्यांत त्यांनीं सहकाराचें महत्त्व सांगून त्या बाबतींत शिक्षण, शील वगैरे कशीं आवश्यक आहेत हें सांगितलें. अध्यक्षांनीं कोणचीहि संस्था टिकाऊ करावयाची असल्यास चालकांनीं ती संस्था आपले पायावर उभी कशी राहील इकडे लक्ष द्यावें असें सांगितलें. आभार प्रदर्शन, पानसुपारी व कॉफिपान होऊन हा समारंभ संपला.

## चांभार विद्यार्थी मंडळ, पुणें

मंडळाची वार्षिक सर्व साधारण सभा मुंबईचे प्रख्यात व्यापारी श्री. बाबुराव तुकाराम गायकवाड यांचे अध्यक्षतेखालीं रविवार ता. ११।७।४३ रोजीं सकाळीं९॥ वाजतां पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत भरली होती. सदर प्रसंगीं प्रो. न. का. घारपुरे, डॉ. भट, श्री. भावसार, आमदार एस. जी. सोनगांवकर, श्री. पालखंडवार, श्री. डी. एम. शिंदे, श्री. दळवी, श्री. घोंडिबा पोटे, श्री. गलांडवाडकर, श्री. शंकरराव पोटे वगैरे मंडळी उपस्थित होती. संस्थेचे चेअरमन श्री. हरिभाऊ ढवळे यांनीं प्रथम संस्थेच्या कार्याची माहिती सांगून अध्यक्षांची थोडक्यांत ओळख करून दिली व नियोजित अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षपदाचा स्वीकार करावा अशी त्यांना सूचना केल्यावर श्री. बाबूराव गायकवाड हे अध्यक्षपदारूढ झाले.

गेल्या वार्षिक सभेचें अहवाल वाचन, १९४३–४४ च्या संस्थेच्या कार्याचें अहवाल वाचन हें झाल्यानंतर चालू वर्षाचे बजेट मंजूर करण्यांत आलें. व चालू वर्षाकरितां कार्यकारी मंडळाची निवड करण्यांत आली.

त्यानंतर प्रो. घारपुरे, डॉ. भट, श्री. पालखंडवार, श्री. भावसार, श्री. शास्त्री, श्री. राऊत, आमदार एस. जी. सोनगांवकर वगैरे मंडळींचीं समयोचित भाषणें झाल्यावर अध्यक्षांनी समारोपादाखल भाषण केलें. शेवटीं आभार प्रदर्शनानंतर हारतुरे होऊन सभेचें काम संपलें.

सदर प्रसंगीं संस्थेस खालीलप्रमाणें देणग्या मिळाल्या. (१) १३१ रु. श्री. बाबुराव तुकाराम गायकवाड. (२) ४० रु. श्री. भाऊ पुंडलीक शिंदे. (३) २० रु. हरिजन सेवक संघ, दिल्ली. बिल्डिंग फंडाकरितां. (४) १० रु. गलांडवाडकर. (५) १० रु. श्री. शंकरराव ( धारावी ) (६) १० रु. श्री. सोनबा राघोबा भादेकर. (७) २ रु. श्री. भावसार. एकूण २२३ रुपये.

व्ही. के. ढवळे
सेक्रेटरी

### ट्रेझरी बिलांवर १५ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत ८ कोटि रुपयांची ट्रेझरी बिलें विकलीं, त्यावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १५ आ. ११ पै इतका पडला.

## गिलिगन कॅटल ब्रिडिंग फार्म, पिंपळे
## १९४२-४३ चा वार्षिक अहवाल

( ता. १-४-१९४२ ते ३१-३-१९४३ अखेर )

१४६ गाई, कालवडी, खोंड, इतर ( बैल, घोडे ) २५, मिळून १७१ जनावरें होतात.

( जन्म ) खोंड २२ + कालवडी १६ = एकूण ३८ वासरें

( मृत्यु ) खोंड ५ + कालवडी ४ = एकूण ९

**दूधविक्रीचें वाढतें प्रमाण**

| सन | दूध पौंड | दुधाची आलेली किंमत |
|---|---|---|
| १९४०-४१ | २१४४८॥ | १७२७,१२-३ |
| १९४१-४२ | २४९८८ | १८५३–२-० |
| १९४२-४३ | २८०८७॥ | २३२९–२-० |

**वळू व गायी विक्री:—**

शेतकऱ्यांस कन्सेशनच्या दरानें १६ वळू पुरविले त्यांची किंमत रु. १९५० आली व कन्सेशनच्या दरानें ७ गायी पुरविल्या त्यांची किंमत रु. २३५ आली.

**सायलो**—उन्हाळ्यांत जनावरांना हिरवा चारा मिळत नाहीं, तेव्हां त्यांची स्थिति उन्हाळ्यांत सुद्धा चांगली टिकविण्याकरितां सायलो करण्याची अत्यंत जरूरी आहे. फार्मवर १६ फूट खोल व १६ फूट रुंद असे तीन पक्के सायलो तयार केलेले आहेत. वरील तिन्ही सायलो भरणेंकरितां रु. ३५५-६-३ खर्च आला आहे.

**तिन्ही सायलोंत भरलेला चारा**

| | | |
|---|---|---|
| मका चॉफ करून | = | ३२००० पौंड |
| निळवा ,, ,, | = | २२९००० पौंड |
| गवत ,, ,, | = | ८९५०० |
| एकूण | = | ३५०५०० पौंड |

**पोलट्री पक्षी:**—तारीख १।४।१९४२ रोजीं २५६ व तारीख ३१।३।१९४३ रोजीं २१३ पक्षी होते.

**मॉडेल पोलट्री फार्मातील अंड्यांची व पक्षांची माहिती**

| | | |
|---|---|---|
| शेतकऱ्यांना उबविणेंकरितां कन्सेशन रेटणें दिलेलीं अंडीं— | १५३७ | २७४६ |
| फार्मकरितां पिलें काढिलीं तीं अंडीं— | १२०९ | |
| फार्ममधील खाण्याकरितां दिलेलीं अंडीं = | | ४३१० |
| बाहेरून विकत घेऊन खाण्याकरितां पुरविलेलीं अंडीं = | | ३१४९ |
| पुरवण केलेलीं एकूण अंडीं | | १०२०५ |

उबविण्याकरितां १५३७ अंडीं ५५ गांवांतील १०५ शेतकऱ्यांना कन्सेशन रेटनें पुरविलीं त्याचप्रमाणें २५ व्हॉईट लेगहॉर्न नर, ५ माद्या व टर्कीच्या ५ माद्या ब्रिडिंगकरितां पुरविण्यांत आल्या.

तसेंच ग्रेडेशन सिस्टीमप्रमाणें १०२०५ अंड्यांची प्रतवारी लावण्यांत आली.

अंडीं, नर व माद्या विक्रीपासून रु. १०३१-१४-९ उत्पन्न आलें आहे.

**कॅटल डीप:**—अदमासें २५०० शेतकरी फार्म पाहून गेले. त्यांना जनावरें डीपमध्यें टाकलीं असतां जनावरांच्या अंगावरील गोचीड, गोमाशा व इतर त्वचेचे रोग कसे नाहींसे होतात हें प्रत्यक्ष डीपमध्यें जनावरें टाकून पटवून दिलें. शेतकऱ्यांची जनावरें टाकण्याकरितां फार्मवरील रिपोर्टाचे सालांत आसपासच्या खेड्यांतील शेतकऱ्यांचीं ५२८ जनावरें डीपमध्यें फुकट टाकण्यांत आलीं. फार्मचीं जनावरें महिन्यांतून दोन वेळां डीप करण्यांत येतात.

**शेतकी प्रदर्शन**

जळगांव येथें नोव्हेंबर १९४२ मध्यें मे. जे. एम. कोरीन आय. सी. एस. कलेक्टर अँड चेअरमन डि. रु. डे. बोर्ड पू. खा. यांचे अध्यक्षतेखालीं जिल्हा शेतकी प्रदर्शन भरलें होतें.

ज्या विभागांत फार्मातील जनावरांनीं भाग घेतला, त्यांतील तिन्ही मेडल्स गिलिगन कॅटल ब्रिडिंग फार्मातील जनावरांनीं मिळविलीं.

चालू सालीं रु. २३२५०/- फार्मास खर्च आला आहे व आतांपर्यंत रु. १६३४० फार्मास तोटा झाला आहे.

## सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि. जि. नाशिक.

ता. २८-४-४३ च्या अंकीं सदर सोसायटीसंबंधीं माहिती व तिनें केलेली गेल्या १० महिन्यांतील प्रगति दिलेलीच आहे. त्यानंतर सामील सोसायट्यांची सभा होऊन शेअर भांडवल वाढविणें, क्षेत्र वाढविणें, मेंबरांनीं माल विक्री करणें झाल्यास सोसायटीमार्फत करावी व सालअखेरच्या नफ्यांतून इमारतीसाठीं फंड जमवावा, असें ठरलें. कलेक्टर साहेब नाशिक यांची चांगली मदत होते याबद्दल त्यांचे आभार मानले.

त्यानंतर ५० मेंबर्स नवीन झाले. म्हणजे आज ४६ क्रेडिट सोसायट्या व व्यक्तिशः १३६ असे १८२ मेंबर्स झाले. शेअर भांडवल ३३,२७० रु. झालें आहे. त्यांत सोसायट्यांचें निम्में भांडवल आहे.

संस्थेमुळें व्यापारी व शेतकरी यांस मालतारणावर अडव्हान्स घेऊन किंमत आल्यावर माल विक्री करण्याची गोडी लागली. धान्य व गुळ यांचे अडतीनें व्यवहार होऊं लागले. संस्थेनें बीं व पेंड सवलतीच्या दरानें देण्याची व्यवस्था केली आहे. संस्थेवर लोकांचा विश्वास बसत असून ठेवीही वाढत आहेत.

संस्थेनें नुकतीच १४ सांच्याची ५५ हॉर्स पावरची इलेक्ट्रिक मशिनरी, जर्मन, इमारती, विहीर, स्पेअर सामान, रेडीओसह २९ हजारास खरेदी केली आहे. बिल्डिंग फंड म्हणून जवळ जवळ दोन हजारापर्यंत झाला आहे. पारशी शेट यांनीं ५०० रुपये, श्री. दगा पाटील मॅनेजिंग डायरेक्टर यांनीं १४०० रु. व श्री. चिंतामण श्रीधर खरे ह्यांनीं ४४ रु. देणगी दिली आहे. त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेला अजून गोडाऊन्स, माल वहातुकीसाठीं मोटार, ऑफिससाठीं बिल्डिंग, इतक्या बाबी तूर्त करणें आहेत. त्याप्रमाणें संस्थेस चांगले माहितगार, विश्वासू, क्वालिफाइड इंग्रजी जाणणारे तरूण नोकर पाहिजे आहेत. गरजूंनीं अर्ज करावेत.

हें पत्र पुणें, पेठ मांवुडां घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविवास,' मांवुडां, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED 1434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख ४ ऑगस्ट, १९४३ अंक ३१

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

आधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,२०,५०,०००

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेद्दिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

### विमा कंपनीच्या

विमा पॉलिसींमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### अमेरिकेचा युद्धखर्च

| | रोजचा खर्च ( डॉलर ) |
|---|---|
| १९४३ मध्यें | ६,६२,५०,००० |
| १९४०–४२ मधील सरासरी | २,२५,००,००० |

### अश्रूंची उपयुक्तता

डोळे स्वच्छ करून त्यांचें संरक्षण करण्याकरितां प्रत्येक माणसाच्या डोळ्यांत दररोज सरासरीनें २० अश्रूंचे थेंब येतात, असा अंदाज आहे. कांहीं विशिष्ट भावना उद्दीपित झाल्या म्हणजे अश्रू जोरानें वाहूं लागतात व ते डोळ्यांचे बाहेर येऊं लागले म्हणजे त्यांस रडण्याचें स्वरूप प्राप्त होतें. प्रत्येक डोळ्यांत अश्रूंचे १० थेंब तयार झाले, तरी त्यांचें पाणी अगदीं सूक्ष्म प्रमाणांत डोळ्यांत पसरतें व पापण्यांच्या उघडझापीमुळें तें पाणी डोळ्यांत सर्वत्र सेव्टविलें जातें. अश्रूंच्या पाण्यांत जंतू नाश करण्याचा गुण असतो.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९४३ च्या पहिल्या सहामाहींत मागील १० लक्ष, ८ हजार रुपयांचा शिलकी नफा धरून ४१ लक्ष, १३ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागास १ रु. ४ आ. करमाफ इंटेरिम डिव्हिडंड मिळणार आहे. त्यासाठीं ८,४०,६६० रुपये लागतील.

### ज्वारीचे मोबदल्यांत रॉकेल–साखरेची विक्री

वर्धा येथें सरकारनें कांहीं दुकानें उघडलीं आहेत, त्यांत ज्वारीचे मोबदल्यांत रॉकेल, साखर, स्टँडर्ड क्लॉथ, इत्यादि जिन्नस विकले जातात. जमा होणारें धान्य मध्यप्रांतांत इतर ठिकाणीं पाठविण्यांत येतें.

### रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा

रिझर्व्ह बँकेच्या १६ जुलैच्या पत्रकांत प्रचलित नोटांचे आकडे दिले आहेत, त्यांवरून ९ जुलैच्या मानानें १६ जुलै रोजीं प्रचलित नोटांत २० लक्ष रुपयांची घट झालेली आढळते. चलन विस्तारास प्रारंभ झाल्यानंतर अशी घट प्रथमच दिसून येत आहे.

### कोहिनूर कंपनीची नव्या भांडवलाची विक्री

भांडवल उभारणीवरील नियंत्रणाचा उपयोग करून सरकारी कर्जरोख्यांत पैसे आकर्षून चलन विस्तारास आळा घालण्याचें मूळ उद्दिष्ट सरकार कसें पार पाडीत आहे हें कोहिनूर मिल्स लि. च्या उदाहरणावरून दिसून येतें. ह्या कंपनीला आपलें अधिकृत भांडवल ३० लक्ष रुपयांवरून ५० लाखांवर न्यावयाचें होतें व त्याप्रमाणें कंपनीनें विशेष सभा भरवून ठरावहि केला होता. नवीन २० हजार भागांपैकीं १५ हजार भाग प्रत्येकी २०० रुपयांस (म्हणजे १०० रुपये वाढाव्यानें ) विकून कंपनी ३० लक्ष रुपये जमविणार होती, इतक्यांत नवीन ऑर्डिनन्स निघाला. कंपनीनें सरकारकडे शेअर विकण्याची परवानगी मागितली. ती आतां आली आहे. ती देतांना कंपनीनें जमलेले पैसे दोन महिन्यांत सरकारी रोख्यांत गुंतवून ते रोखे सरकारच्या संमतीनें एखाद्या बँकेंत ठेवले पाहिजेत, अशी कंपनीवर अट घालण्यांत आली आहे. सरकारच्या पूर्ण परवानगीशिवाय हे रोखे कंपनीला विकतां येणार नाहींत, अथवा त्यांचे तारणावर पैसे उभारतां येणार नाहींत.

### विमानांमुळें पृथ्वीवरील अंतरें घटलीं

विमान वहातुकीमुळें जगांतील दूरचे प्रदेश जवळ आल्यासारखे वाटूं लागले आहेत. आतां अंतरें तुटलीं जाऊन समुद्रांचें डबक्यांत रूपांतर झालें आहे. खालील तक्त्यांतील अंतरें, तीं तोडण्यास लागणारी पूर्वीची वेळ व आतां विमानांस लागणारी वेळ हेंच दर्शवितात.

| पासून | पर्यंत | बोटी व रेल्वेना लागणारा वेळ | | विमानांस लागणारा वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मैल | दिवस | मैल | तास |
| न्यूयॉर्क | चुंगकिंग | ११,३०० | ३१ | ७,५०० | ३८ |
| न्यूयॉर्क | मॉस्को | ५,७०० | ८ | ४,५२५ | २३ |
| न्यूयॉर्क | लंडन | ३,७००. | ५ | ३,४६२ | १७ |
| न्यूयॉर्क | मुंबई | ९,४०० | २१ | ७,७९० | ३९ |
| सॅन फ्रॅन्सिस्को | ब्रिसबेन | ८,२०० | २१ | ७,०५० | ३५ |

### अमेरिकन वर्तमानपत्रांतील कांहीं मासलेवाईक जाहिराती

पाहिजे—महिना १०० रुपये पगार मिळविण्याच्या लायकीचा, परंतु ५० रुपये स्वीकारण्यास तयार असलेला टायपिस्ट क्लार्क पाहिजे.

पाहिजे—हॉटेलमधील लिफ्ट चालविण्यासाठीं २० लिफ्टमन पाहिजेत. ६५ वर्षांखालील कोणत्याहि इसमानें अर्ज करूं नये.

पाहिजे—केमिस्टच्या दुकानांत काम करण्यासाठी तरुण, म्हातारा, बहिरा अथवा मुका नोकर पाहिजे. त्याला कुबड्यांशिवाय चालतां आलें पाहिजे.

पाहिजे—घर कामासाठी बाई पाहिजे. घरांत माणसें दोन. चांगलें बिऱ्हाड. मुबलक साखर.

### हिंदुस्थानांतील कोंबड्या व त्यांचीं अंडीं

कोंबडीच्या अंड्यांचें अन्न ह्या दृष्टीनें महत्त्व विशेष आहे. हिंदुस्थानांत अंड्यांचा धंदा वाढविण्यास पुष्कळच वाव आहे, कारण येथें प्रत्येक १०० माणसांमागेंच फक्त १५ कोंबड्या असें प्रमाण पडतें. डेन्मार्कमध्यें तेथील लोकसंख्येच्या तिपटीइतक्या कोंबड्या आहेत. हिंदुस्थानांतील प्रत्येक कोंबडी दरसाल सरासरी प्रत्येकी १३ औंस वजनाचीं ५० अंडीं देते. डेन्मार्कमधील कोंबडी २ औंस वजनाचीं १२० अंडीं देते. कॅनडामध्यें प्रत्येक मनुष्य सालिना सरासरीनें ३०० अंडीं खातो; हिंदुस्थानांत प्रत्येकाच्या वाट्यास , सरासरीनें फक्त ८ अंडीं येतात. खेडेगांवांत कोंबड्या बाळगण्यास फारसा खर्च येत नसल्याकारणानें अंड्यांचें उत्पादन व त्याचा खप वाढविण्यास किती वाव आहे ह्याची कल्पना वरील आकड्यांवरून येईल.

### इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची परीक्षा

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या १९४३ च्या असोसिएट परीक्षेस बसलेल्या उमेदवारांपैकीं १७० उमेदवारांना इन्स्टिट्यूटचें असोसिएट सर्टिफिकेट देण्यांत येणार आहे. त्यांपैकीं २८ उमेदवार इंपीरिअल बँकेंतील, २८ पंजाब नॅशनल बँकेंतील, २० रिझर्व्ह बँकेंतील, १६ सेंट्रल बँक ऑफ इंडियांतील, १५ बँक ऑफ इंडियांतील व ९ बँक ऑफ बरोडांतील आहेत. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांत बँक ऑफ महाराष्ट्राचे श्री. म. अ. केळकर, न्यू सिटीझन बँकेचे श्री. दि. रा. भागवत आणि मुंबई प्रां. सहकारी बँकेचे सौ. शैलबाला साठे व श्री. स. बा. कुलकर्णी हीं नांवें आढळतात.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | २४२ | मालांची वांटणी—महागाईची चिकित्सा | |
| २ मुसोलिनीचा अधःपात | २४३ | ५ भूमध्य समुद्र व सभोंवतालचे देश | २४६ |
| ३ शेड्यूल्ड बँका व रिझर्व्ह बँक | २४४ | ६ बाजरभावांचें स्थैर्य | २४६ |
| ४ स्फुट विचार | २४५ | ७ बँकिंगविषयक प्रश्न | २४७ |
| मुंबई प्रांताचें धान्याचें उत्पन्न—रिझर्व्ह बँकेच्या | | ८ सांगली बँक लि. | २४७ |



# अर्थ

बुधवार, ता. ४ ऑगस्ट, १९४३


## मुसोलिनीचा अधःपात

प्रस्तुत युद्धांतील अंतिम परिणामास सहायभूत होण्यासारखी व अनपेक्षित रीतीनें झालेली घटना म्हणजे सीन्यॉर मुसोलिनीनें आपल्या अधिकारपदाचा केलेला त्याग ही होय. मित्र राष्ट्रांनीं जर्मन व इटालिअन फौजांची उत्तर आफ्रिकेमधून हकालपट्टी केली, सिसिलीचा बहुतेक प्रदेश व्यापला व प्रत्यक्ष इटलीच्या किनाऱ्यावर उतरण्याची तयारी चालविली ह्यांत मुसोलिनीची सर्वस्वी नामुष्की झाली. इटलीचें साम्राज्य संपलें आणि त्याच्या घरावरच धाड आली असतां आपल्या देशाचें व लोकांचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य स्वतःपाशीं नाहीं आणि तें हिटलरच्या सहायानेंहि प्राप्त होण्यासारखें नाहीं हें पाहून मुसोलिनीचें मन त्यास खाऊं लागलें असलें पाहिजे. वीस वर्षामागें मुसोलिनीनें फॅसिस्ट पक्ष स्थापन करून त्याच्या मदतीनें इटलीमधले सर्व अधिकार आपल्या हातीं घेतले. इटलीचा राजा व्हिक्टर इमॅन्युअल, ह्यास त्यानें बाहुलें बनवलें आणि सीझर व नेपोलिअन ह्यांचा आव आणून इटालिअन साम्राज्य दुसऱ्या देशांचें व लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेऊन वृद्धिंगत करण्याचें धोरण अंमलांत आणलें. प्राचीन रोमन बादशाहीच्या वैभवाचें पुनरुज्जीवन करण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें धरली आणि इटलीस लष्करी राष्ट्र बनवण्याच्या योजना चालू केल्या. उत्तर आफ्रिकेंत मागसलेल्या व शक्तिहीन ॲबिसीनियास केवळ पाशवी शक्तीनें जिंकून तो देश इटालिअन साम्राज्यांत त्यानें सामील केला. प्रस्तुत युद्धांत हिटलरला युरोपमध्यें प्रथम सारखे जय मिळत गेले आणि फ्रान्सलाहि त्याच्यापुढें माघार घ्यावी लागली हें पाहून मुसोलिनीच्या तोंडास पाणी सुटलें आणि जर्मन विजयांत अंशभागी होण्याची संधी साधण्याचें त्यानें ठरवलें. मित्रराष्ट्रांचें वैर संपादण्यांत त्यानें केलेला जुगारी हिशेब खोटा ठरला आणि उत्तर आफ्रिकेंत झालेल्या युद्धांत इटलीस भयंकर नुकसान सोसावें लागलें. साम्राज्य जाऊन सारें राज्यहि गमावण्याचा त्याचेवर प्रसंग आला तेव्हां त्याचें हिटलरशी सलूत झालें आणि त्यांत आपली घडगत राहिली नाहीं असें त्यास दिसून आलें. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आलेल्या संकटास तोंड देण्याचें अवसान मुसोलिनींत उरलें नाहीं. मित्रराष्ट्रें इटलीचा दरवाजा ठोठावूं लागलीं तेव्हां तो किंकर्तव्यमूढ बनला आणि अधिकारसूत्रें त्यानें व्हिक्टर इमॅन्युएलच्या स्वाधीन केलीं. याप्रमाणें ह्या नकली वीराचें चरित्र संपलें आहे आणि मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत म्हटल्याप्रमाणें मित्रराष्ट्रांस शरण जावयाचें का हिटलरच्या नादीं लागून स्वतःचा संपूर्ण नाश करून घ्यावयाचा हा प्रश्न इटालिअन लोकांपुढें दत्त म्हणून उभा राहिला आहे. तो त्यांनीं धैर्यानें व शहाणपणानें सोडवावयाचा आहे.

मुसोलिनीनें सत्तात्याग केला, त्याचीं खरीं कारणें कांहीं काळपर्यंत अज्ञातच रहाणार आहेत. ह्या विषयींचे मित्र राष्ट्रांतले अंदाज तूर्त केवळ तर्क म्हणूनच गणले पाहिजेत. तथापि, नुसता राजीनामा देऊन आपण इटलीवर आणलेल्या आपत्तीच्या जबाबदारीमधून मोकळें होऊं अशी मुसोलिनीची कल्पना असेल तर ती सर्वस्वी भ्रममूलक ठरल्यावांचून रहाणार नाहीं. मि. चर्चिल व प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं इटालिअन जनतेस बजावलें आहे कीं तिच्या राजकर्त्यांनीं हिटलरची बाजू सोडून देऊन मित्रराष्ट्रांस शरण आल्यावांचून त्यांच्या विरुद्ध चाललेलें युद्ध थांबणार नाहीं. इटलींत स्थापन झालेल्या नव्या मंत्रिमंडळानें फॅसिस्ट पक्षाचें विसर्जन केलें एवढ्यावरून त्याच्या धोरणासंबंधानें मित्रराष्ट्रांस विश्वास वाटणें अशक्य होतें. इटलीचें राज्य हें मुसोलिनीच्या नेतृत्वाखालीं चाललेलें फॅसिस्ट पक्षाचें राज्य होतें. इटालिअन जनतेचें विचाराचें व आचाराचें स्वातंत्र्य त्यानें हिरावून घेतलें होतें. तें इटालिअन लोकांस पुन्हां प्राप्त झालें आहे. त्याचा उपयोग त्यांनीं मुसोलिनीचें हिटलरच्या दास्यत्वाचें धोरण झुगारून देण्यांत करणें अगत्याचें आहे ही गोष्ट मित्रराष्ट्रांच्या मुत्सद्यांनीं स्पष्ट करून सांगितली आहे. जनरल ऐसेन हॉवर ह्यांनीं मित्रराष्ट्रांच्या वतीनें इटालिअन जनतेस उद्देशून घोषणा केली तीमध्यें मुसोलिनीस तिनें हुसकून लावलें ह्याविषयीं समाधान व्यक्त केलें, पण तिनें ह्यापुढें जाऊन जर्मनीशी असलेला आपला संबंध तोडून टाकला पाहिजे, तरच ती स्वतःस वांचवूं शकेल असें बजावलें. मुसोलिनी व फॅसिस्ट पक्षाचे विरुद्ध इटलीमध्यें निदर्शनें लोकांनीं केल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. पण हें लोकमत संघटित व प्रभावी होईल तरच मित्रराष्ट्रांच्या अटी इटली पुऱ्या करूं शकेल. नवीन इटालिअन मंत्रिमंडळानें फॅसिस्टांचें सर्वत्र उच्चाटन केलें असलें तरी जर्मनीच्या वर्चस्वाच्या शृंखला तोडून टाकण्याची त्याची तयारी दिसली नाहीं. एवढेंच नव्हे तर युद्ध आहे तसेंच चालू ठेवण्याचा आपला निश्चय त्यानें व्यक्त केला. इटलीविषयींचें हिटलरचें धोरण काय आहे, त्या देशावरची आपली पकड सोडण्यास तो तयार होईल कीं नाहीं, का स्वतःच्या बचावासाठीं तो त्या देशाचा बळी देणार हें मुसोलिनीच्या सत्तात्यागामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितींत समजणें कठिण आहे. फॅसिस्टांची सत्ता नष्ट होणें ही इटलींत घडून आलेली क्रांति आहे यांत संशय नाहीं, पण प्रस्तुत युद्धांत तेवढ्यानें कार्यभाग होऊं शकत नाहीं. हिटलर व नाझीपक्ष हे पूर्णपणें ठेचले जातील तेव्हांच मित्रराष्ट्रांचें उद्दिष्ट सफळ होईल असे उद्गार मि. चर्चिल ह्यांनीं काढले आहेत ते यथार्थ आहेत.

## शेड्यूल्ड बँका व रिझर्व्ह बँक ह्यासंबंधीं ताजे आकडे

शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून एप्रिल ते जून, १९४३ ह्या तिमाहींत सिमला बँकिंग अँड इंडस्ट्रिअल कं. लि. चें नांव काढून टाकण्यांत आलें व हिंद बँक लि. कलकत्ता, युनायटेड कमर्शिअल बँक लि. कलकत्ता, ट्रेडर्स बँक लि. लाहोर व न्यू बँक ऑफ इंडिया लि. लाहोर ह्या नव्यांनें दाखल करण्यांत आल्या. म्हणजे शेड्यूल्ड बँकांच्या संख्येंत तिहींची भर पडली. शेड्यूल्ड बँकांसंबंधीं आकडे खालीं दिले आहेत:—

शेड्यूल्ड बँकांची संख्या

| | ३०-६-४२ | ३१-३-४३ | ३०-६-४३ |
|---|---|---|---|
| एक्सचेंज बँका | १७ | १७ | १७ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ४५ | ४७ | ५० |

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | ३१-३-४२ | ३०-९-४२ | ३१-३-४३ |
|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ४०० | ३९२ | ३९३ |
| पांच प्रमुख बँका | ३४३ | ३४९ | ३७५ |
| एक्सचेंज बँका | ९४ | ८५ | ८६ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ६०७ | ५९७ | ६५८ |
| | १,४४४ | १,४२३ | १,५१२ |

### ठेवींच्यां प्रमाणांत कर्जें वाढलीं नाहींत

२५ जून १९४३चे एकूण ६३ शेड्यूल्ड बँकांचे आकडे हातीं आले, त्यांवरून त्यांचें हिंदुस्थानांतील एकूण देणें ५४९¾ कोटि रुपये होतें. त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडे ७२¾ कोटि रुपये ठेवलेले होते, त्याचे त्यांच्या एकूण देण्यांशीं प्रमाण १३·१९% पडलें. बँकांनीं दिलेलीं कर्जें व डिस्कौंट केलेल्या हुंड्या ह्यांची रक्कम १४६ कोटि रुपये भरली. म्हणजे त्याचें एकूण देण्यांशीं प्रमाण २६·५७% पडलें. १-९-३९ रोजींचे युद्धापूर्वींचे तत्सम आकडे, बँकाचे एकूण देणें २३७ कोटि रुपये; रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेली रक्कम ३२ कोटि रुपये; त्याचें एकूण देण्याशी प्रमाण १३·४७%; कर्जें व डिस्कौंट १०६ कोटि रुपये; त्यांचें एकूण देण्यांशीं प्रमाण ४४·४२%, असे आहेत. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी १-९-१९३९ ते २५-६-४३ ह्या मुदतींत २३७ कोटींच्या ५४९ कोटि रुपये झाल्या तरी त्यांनीं दिलेल्या कर्जांचा आकडा १०६ कोटींवरून फक्त १४६ कोटींवरच गेला.

### चलनी नोटांस तारण

रिझर्व्ह बँकेच्या इश्यू विभागाच्या आकड्यांवरून असें दिसतें, कीं १-९-१९३९ ते २५-६-१९४३ ह्या मुदतींत प्रचलित चलनी नोटांची किंमत १७२ कोटि रुपयांवरून ७२३ कोटि रुपयांवर गेली. चलनी नोटांस तारण असलेल्या सोन्याची व सोन्याच्या नाण्यांची किंमत ४४ कोटि, ४१ लक्ष रुपये कायमच राहिली, रुपयांची संख्या ७५ कोटि, ८७ लक्षांची १६ कोटि, १३ लक्ष झाली व हिंदी कर्ज रोख्यांची किंमत ३७ कोटि, ३९ लक्ष रुपयांची ११९ कोटि, ७१ लक्ष रुपये भरली. मुख्य वाढ झाली ती ब्रिटिश कर्जरोख्यांनीं दिलेल्या तारणांत होय. हिंदी चलनास युद्धापूर्वी ५९½ कोटि रुपयांचे ब्रिटिश कर्जरोखे तारण होते, आतां त्यांचा आकडा ५५४¾ कोटि रुपये झाला आहे. सोनें व ब्रिटिश रोखे ह्यांचें एकूण तारणाशीं प्रमाण ४७·८५% पडत होतें, तें आतां ८१·५१% पडूं लागलें आहे.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक

संरक्षण – सुरक्षितता – सेवा
हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.
महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगाव,
बॅक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
'रामनिवास' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

# NOTICE.

**THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE, LIMITED, POONA 2.**

Notice is hereby given that an Extra-Ordinary General Meeting of the Share-holders of the above Company will be held at Tilak Smarak Mandir, Poona 2, on Sunday the 29th day of August, 1943, at 4 P. M. when the subjoined Resolution will be proposed as a special Resolution.

**RESOLUTION.**

Resolved that in Article 56 the wording "Not exceeding Rupees twenty-five (25) lacs" be substituted in place of the present wording "Not exceeding Rupees Fifteen (15) lacs."

By Order of the Board of Directors,
C. G. Agashe & Co.,
MANAGING AGENTS.

Dated 28-7-1943.

980, Sadashiv Peth, Commonwealth Building,
POONA 2.

*N. B.:—Article 56 reads as follows.*

"Subject to Article 131 hereof the Directors may raise or secure the payment or repayment of such sum or sums NOT EXCEEDING Rupees Fifteen (15) lacs, in such manner and upon such terms and conditions in all respects as they think fit, and, in particular, by the issue of debentures or debenture stock of the Company charged upon all or any part of the property of the Company, (both present and future) including its uncalled Capital for the time being."

## स्फुट सूचना

### मुंबई प्रांताचें धान्यांचें उत्पादन

मुंबई प्रांतांतील धान्याचें उत्पादन त्यांतील रहिवाशांच्या गरजेच्या मानानें अपुरें पडतें ही गोष्ट आतां सुप्रसिद्ध आहे. अपुऱ्या पुरवठ्याच्या प्रांतांस फाजील पुरवठ्याच्या प्रांतांनीं योग्य प्रमाणांत धान्य पुरवलें पाहिजे आणि या वाटणीची व्यवस्था होण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारची आहे असें लोकमत आहे त्याचें स्वारस्य सहज धान्यांत येण्याजोगें आहे. मुंबई प्रांताचा धान्याचा तुटवडा केवढा आहे याची कल्पना येण्यास त्यांतील उत्पादनाचे ताजे आकडे आवश्यक आहेत, पण ते अजून तपशीलवार अधिकारी रीत्या उपलब्ध नाहींत. १९४१-४२ सालचे पक्के आकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून सदरहु वर्ष उत्पादनाचे दृष्टीनें विशेष अनुकूल परिस्थितीचें नव्हतें असें स्पष्ट दिसतें. त्या सालांतलीं धान्यांचीं पिकें विशेष चांगलीं आलीं असतीं तर १९४२-४३ सालच्या महागाईवर त्यांचा थोडातरी अनुकूल परिणाम झाला असता असें म्हणतां येईल. १९४१–४२ मध्यें धान्यांच्या पिकांचें क्षेत्र पूर्वीच्या वर्षापेक्षा १·३ टक्क्यांनीं कमी झालें पण उत्पादनांत १३½ टक्क्यांची घट झाली. त्या कारणानें सबंद प्रांतभर अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याची टंचाई भासली असल्यास नवल नाहीं. १९४०–४१ मध्यें पिकांचें एकूण क्षेत्र २ कोटि, २ लक्ष एकर होतें आणि त्यांतलें उत्पादन ३९ लक्ष, ७५ हजार टन भरलें. १९४१–४२ मधले तत्सम आकडे अनुक्रमानें १ कोटि ९९ लक्ष एकर आणि ३४ लक्ष, ३७ हजार टन असे होते. ह्या संबंधांतले तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत.

| | १९४०–४१ | | १९४१–४२ | |
|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (लक्ष एकर) | उत्पादन (लक्ष टन) | क्षेत्र (लक्ष एकर) | उत्पादन (लक्ष टन) |
| गुजरात | २५·३ | ६·९ | २३·८ | ५·२ |
| उत्तर मध्यभाग | ३८·२ | ७·८ | ३७·६ | ७·१ |
| दक्षिण „ | ७५·४ | ११·० | ७५·८ | ९·५ |
| कर्नाटक | ४७·२ | ७·५ | ४६·७ | ७.८ |
| कोंकण | १६·१ | ६·२ | १५·६ | ४·८ |
| एकूण | २०२·२ | ३९·७ | १९९·६ | ३४·३ |

### रिझर्व्ह बँकेच्या भागांची वाटणी

रिझर्व्ह बँकेचें भांडवल प्रारंभीं सबंद हिंदुस्थानांत व्यवस्थित रीतीनें वाटण्यांत आलें होतें, तरी पुढें बँकेचे भाग मुंबई विभागांत एकत्रित होऊं लागले व भागीदारांची संख्या कमी होऊं लागली. ही प्रवृत्ति थांबविण्यासाठीं रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन, २६ मार्च १९४० नंतर कोणालाहि २०० पेक्षा अधिक भाग घेतां येऊं नयेत, असा नियम करण्यांत आला. तथापि, त्या नियमाचा विशेष उपयोग झालेला नाहीं हें खालील तक्ता दर्शवितो. बँकेच्या स्थापनेचे वेळीं तिच्या भागीदारांची संख्या ९२,०४७ होती, ती आतां ४९,४०२ झाली आहे. ३० जून, १९४२ अखेरच्या वर्षांत भागीदारांची संख्या ५३,४६८ ची ५१,७७१ झाली व गेल्या बारा महिन्यांत ती आणखी १,७६९नें घटली.

| | भागीदारांची संख्या | |
|---|---|---|
| विभाग | १ एप्रिल, १९३५ | ३० जून, १९४३ |
| मुंबई | २८,००० | १८,०१२ |
| कलकत्ता | २३,८९० | ११,२९९ |
| दिल्ली | २३,००० | ११,९०१ |
| मद्रास | १४,००० | ७,४७१ |
| रंगून | ३,१५७ | ७१९ |
| एकूण | ९२,०४७ | ४९,४०२ |

बँकेचे भाग कांहीं व्यक्तींच्या हातीं केंद्रीभूत होऊं नयेत, अशी मूळ कल्पना होती, ती प्रत्यक्ष व्यवहारांत यशस्वी होण्यास अवघड पडत आहे. भागीदारांची संख्या त्यांच्या मूळ संख्येच्या ५४% वर आली आहे. भागांच्या प्रांतवार वाटणीकडे पहातां, असें दिसतें कीं सर्वच विभागांतील सभासदांची संख्या कमी झाली असली, तरी इतर विभागांचे मानानें मुंबईच्या वाट्यास ज्यास्त सभासद आहेत. स्थापनेचे वेळीं एकूण सभासदांच्या ३०% सभासद मुंबई बिभागाचे होते; आतां हें प्रमाण ३६% चे वर गेलें आहे. मुंबईप्रमाणें दिल्ली विभागहि आतां भाग आकर्षूं लागला आहे. खालील तक्त्यांत ही प्रवृत्ति निदर्शनास येईल—

| विभाग | भागांची विभागवर वाटणी | | |
|---|---|---|---|
| | १ एप्रिल, १९३५ | ३० जून, १९४२ | ३० जून, १९४३ |
| मुंबई | १,४०,००० | २,१८,६४९ | २,२५,०२२ |
| कलकत्ता | १,४५,००० | १,१९,९४१ | १,१९,२४१ |
| दिल्ली | १,१५,००० | ८५,७६२ | ८७,१६३ |
| मद्रास | ७०,००० | ५८,८१० | ५८,०९९ |
| रंगून | ३०,००० | १६,८३८ | १०,४७६ |
| एकूण | ५,००,००० | ५,००,००० | ५,००,००० |

### महागाईची चिकित्सा

हिंदुस्थानांतील महागाईचीं कारणें, तिचा वाढत्या चलनाशीं असलेला निकट संबंध, लोकांच्या बचतीचें महत्त्व, बाजारभावांच्या नियंत्रणाची आवश्यकता, मध्यवर्ती सरकारच्या सांपत्तिक धोरणांत योग्य बदल होण्याची जरूरी इत्यादि विषयांचें विवेचन "अर्था"मध्यें वारंवार करण्यांत आलें आहे व येईल. ह्याच प्रश्नांची संगतवार व सुलभ अशी मांडणी श्री. श्री. रा. पोतनीस ह्यांनीं आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत* केली आहे ती स्वागतार्ह व अभिनंदनीय आहे. प्रमुख हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं महागाईच्या आपत्तीचें मूळ शोधून काढून तिच्यावर उपाययोजना सरकारास सुचविली आहे, त्यांच्याच विचारसरणीचा अवलंब श्री. पोतनीस ह्यांनीं केला आहे आणि तें यथोचितच आहे. चलनाचें कार्य व त्याचा बाजारभावाशीं असणारा संबंध, हिंदी चलनपद्धतीचें स्वरूप आणि युद्धपरिस्थितींतली ह्या देशांतलीं चलन व्यवस्था, युद्धखर्च व तो भागवण्याचे मार्ग, ह्यांविषयींची माहिती सोप्या रीतीनें देऊन लेखकानें हिंदुस्थानांत खाद्यपदार्थ व कापड ह्यांची महागाई कां व कशी झाली आहे, ह्याचें सविस्तर विवेचन केलें आहे. भावनियंत्रण व शिधापद्धती ह्यांचे विषयीं उपायांची छाननी करून अखेर महागाईवर लेखकानें कांहीं तोडगे सुचविले आहेत. चलनाचा विस्तार हें महागाईचें कारण नाहीं असें म्हणणाऱ्या बिर्ला शेटजींच्यासारख्या प्रतिपादकांच्या युक्तिवादाचा योग्य समाचार घेऊन त्यानें स्वतःची विचारसरणी तात्त्विक व व्यावहारिक पद्धतीनें पुढें मांडली आहे, ती हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या भूमिकेस सर्वस्वीं धरून आहे. श्री. पोतनीस ह्यांचें पुस्तक ह्या रीतीनें वाचनीय व मननीय झालें आहे.

* "महागाई कां ?"—लेखक : श्री. श्री. ग. पोतनीस, एम. ए., एलएल. बी. प्रकाशक : श्री. गो. वा. कुलकर्णी, महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर. पृष्ठसंख्या ८०, किंमत १॥ रु.

## भूमध्य समुद्र व त्याच्या किनाऱ्यालगतचे देश

### ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व

भूमध्य समुद्राभोंवतालच्या सर्व १९ देशांची आज रणभूमि झालेली आहे. विस्तार आणि ऐतिहासिक व आजचें महत्त्व ह्या दृष्टीनें भूमध्य समुद्राच्या तोडीचा एकहि समुद्र नाहीं. ह्या समुद्रानें १० लक्ष चौरस मैल क्षेत्र व्यापलें आहे व त्याची लांबी २,८०० मैल म्हणजे न्यूयॉर्क ते इंग्लंड इतकी आहे. पश्चिमेकडून जिब्राल्टरच्या मार्गें ह्या समुद्रांत प्रवेश होतो,तेथून सुएझचा कालवा २,२०० मैल आहे. ह्या समुद्रास लागून उत्तरेस स्पेन, फ्रान्स, मोनॅको, इटली, युगोस्लाव्हिया, अल्बेनिया, ग्रीस, तुर्कस्तान हे देश आहेत. दार्दनिलिसची सामुद्रधुनी, मार्मरा समुद्र आणि बॉस्परस ह्यांतून जाऊन काळा समुद्र हें भूमध्य समुद्राचें शेपूट समजल्यास, बल्गेरिया, रुमानिया, बेसरेबिया, युक्राइन, कायमिया, जॉर्जिया, तुर्कस्तानचा उत्तर किनारा हीं त्यास लागलेलीं आढळतील. तुर्कस्तानच्या दक्षिणेकडून पुनः मोजूं लागल्यास सिरिया, पॅलेस्टाइन, इजिप्त हे देश येतात व पश्चिमेकडे वळलें म्हणजे लिबिया,ट्युनिशिया, अल्जेरिया, आणि फ्रेंच व स्पॅनिश मोरोक्को हे देश लागतात. जेरुसलेम येथील खिस्ताचें अंत्यस्थान ७० कोटि खिस्त्यांना पूज्य स्थान वाटतें; जेथून महंमदानें स्वर्गारोहण केलें तें जेरुसलेम येथील स्थान२१ कोटि मुसलमानांना पूज्य आहे. पॅलेस्टाइन ही १½ कोटि ज्यू लोकांची पवित्र भूमि आहे. ४८ कोटि रोमन कॅथॉलिक लोकांचें धार्मिक सत्ताकेंद्र रोममधील व्हॅटिकन हें आहे. हीं सर्व पवित्र स्थळें भूमध्य समुद्राभोंवतालच्या प्रदेशांत आहेत. सत्तेसाठी मोठमोठे बादशहा, राजे व सुलतान येथें झगडलेले आहेत. मोठमोठ्या साम्राज्यांचें मूळ ह्याच प्रदेशांत आहे.

भूमध्य समुद्राशी ज्यांचे हितसंबंध विशेषत्वानें निगडित झालेले आहेत, अशीं तीन प्रमुख राष्ट्रें म्हणजे ग्रेटब्रिटन फ्रान्स व इटली हीं होत. जिब्राल्टर व सुएझचा कालवा हीं ब्रिटिशांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यास जागतिक व्यापारांत प्रभुत्व प्राप्त झालें. इटली, सिसिली व सार्डिनिया ह्यांचें टोक भूमध्य समुद्रांत खालपर्यंत आलेलें असल्यामुळें इटली हा भूमध्यसमुद्रांत प्रामुख्यानें दिसतो. भूमध्य समुद्र आणि काळा समुद्र ह्यांस जोडणारी दार्दनिलिसची सामुद्रधुनी हा रशियाच्या काळ्या समुद्रावरील बंदरांतून बोटी बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग आहे व त्याच्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळें तो आंतरराष्ट्रीय वादाचा विषय झालेला आहे. त्याच्या दोन्ही बाजूंवर तुर्कस्तानाचें प्रभुत्व आहे, व ही सामुद्रधुनी त्यांतून कोणी युद्धनौका नेऊं लागल्यास बंद करण्याचा त्याला अधिकार आहे. परंतु तसें करण्याचें तुर्कस्तानला सामर्थ्य आहे काय? फ्रान्सनें अल्जेरिया, ट्युनिशिया आणि मोरोक्को हे उत्तर आफ्रिकेंतील देश जिंकले, तेथें कित्येक युरोपियनांनीं जाऊन वस्ती केली आहे. मार्सेई हें फ्रेंच बंदर सुप्रसिद्धच आहे. भूमध्य समुद्रांतील लष्करी दृष्ट्या महत्त्वाच्या वेगवेगळ्या बेटांवर आज वेगवेगळ्या सहा देशांचा ताबा आहे. माल्टा व सायप्रस ह्यांवर ब्रिटिशांचें प्रभुत्व आहे; कोर्सिका बेट फ्रेंचांच्या ताब्यांत आहे; बेलेरिक्सवर स्पेनची सत्ता आहे. सार्डिनिया व होड्स हीं इटलीच्या हातीं आहेत व पँटेलेरिया आणि सिसिली हीं त्यानें नुकतींच गमावलीं आहेत; ग्रीसचें क्रीट बेट जर्मनांनीं घेतलेलें आहे व तुर्कस्थानचे ताब्यांत दार्दानेलिसच्या मुखाजवळील महत्त्वाचीं बेटे आहेत.

भूमध्य समुद्राभोंवतालच्या देशांचें ऐतिहासिक व सांस्कृतिक वर्णन नॅशनल जिऑग्रॅफिक मासिकांत आलें आहे. त्यांत वरील माहिती देऊन नंतर तेथील प्रमुख देशांची सांस्कृतिक छाप इतर देशांवर कशी पडली तें वर्णिलें आहे. भूमध्य समुद्राच्या भोंवतालच्या प्रदेशांतील संस्कृतीच्या वाढीचा सबंद जगाच्या ज्ञानावर व संस्कृतीवर फार मोठा परिणाम झालेला आहे. शास्त्रीय चिकित्सक बुद्धीचा उगम येथूनच झालेला आहे. गणित, वैद्यक, राजकारणशास्त्र, इतिहास, व्याकरण, भूगोल, प्राणिशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इत्यादि शास्त्रांचे अंकुर ग्रीसमध्येंच प्रथम फुटले. ग्रीक शिल्पकलेचें प्रभुत्व अद्यापहि कायम आहे. युरोप व अमेरिका येथील सार्वजनिक इमारती अजूनहि ग्रीक धर्तीवरच बांधल्या जातात. कॉलेजांतून ग्रीक नाटकें अभ्यास करण्यांत येतात. ग्रीक शब्दांनीं इंग्रजी भाषा भरलेली आहे. ऑलिंपिक सामन्यांचा उगम ग्रीसमधलाच आहे. युक्लिडच्या भूमितीची माहिती प्रत्येक विद्यार्थ्यास आहे. रोमनें ग्रीसचें पुष्कळ बाबतींत अनुकरण केलें असलें तरी रोमनेंहि जगास पुष्कळ शिकवलें आहे. इस्पितळांची आजची रचना जुन्या रोमन धर्तीचीच आहे इटालियन, स्पॅनिश, पोर्तुगीज व फ्रेंच ह्या राष्ट्रांच्या भाषेचा उगम रोमनमध्यें आहे. काव्य, नाटक, वक्तृत्व, कायदे, ह्यांवर रोमचा छाप उठलेला आहे. नव्या हमरस्त्यांची आखणी रोमन धर्तीवरच केलेली आहे. अंतर दर्शविणारे मैलाचे दगड व कमानीचे पूल. ह्या सर्व रोमन कल्पना आहेत. आज भूमध्य समुद्राच्या युद्धांत अमेरिका जातीनें भाग घेत आहे, कारण तेथें चालू असलेल्या लढ्याचा अमेरिकेच्या भवितव्यावर फार मोठा परिणाम होणार आहे.

---

### इंग्लंडमध्यें बाजारभावांचें स्थैर्य

हिंदुस्थानाचा मोठा आकार व प्रचंड लोकसंख्या आणि प्रांतिक व संस्थानी राज्यकारभाराची विविधता ह्या गोष्टी हा देश व इंग्लंड ह्यांमधील आर्थिक परिस्थिति व धोरण यांची तुलना करतांना लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. तथापि जीवनास आवश्यक असलेल्या जिनसांच्या किंमतींचें नियंत्रण करून त्या स्थिर ठेवण्यांत ब्रिटिश सरकारनें यश संपादलें आहे त्याचें ध्येय हिंदुस्थान सरकारनें स्वतः पुढें ठेवून त्याप्रमाणें आपलें धोरण आखणें अगत्याचें आहे. जरूरीच्या जिनसांच्या किंमती चढूं न देण्यासाठी दूध, रोट्या इत्यादि पदार्थांच्या व्यवहारांचें नियंत्रण ब्रिटिश सरकारनें केलें आहे आणि त्याप्रीत्यर्थ तें आपल्या तिजोरींतून खर्च करीत आहे. ह्या धोरणासंबंधानें समाधान व्यक्त करून कॉमन्स सभेंत एका सभासदानें किंमतीच्या नियंत्रणाची ही व्यवस्था, जरूरीच्या नाहींत पण उपयुक्त आहेत अशा जिनसांचे बाबतींतहि अमलांत आणावी अशी सूचना ब्रिटिश फडनवीसांस केली. ब्रिटिश सरकारानें बाजारभाव नियंत्रणाची योजना अन्नसामुग्रीस मुख्यत्वेंकरून मर्यादित केली आणि पुढें तीमध्यें कापडाचा अंतर्भाव केला आहे. ह्या कारणानें रहाणीच्या मानाचें प्रमाण इंग्लंडमध्यें स्थिर राहिलें आहे. दारू, तंबाखू इत्यादि सारख्या चैनीच्या वस्तू नियंत्रणाच्या कक्षेच्या बाहेर ठेवण्याचें ब्रिटिश सरकाराचें धोरण योग्य आहे. असल्या चैनीच्या जिनसांवर जबर कर बसविण्यांत आले आहेत. त्यामुळेंहि त्यांच्या किंमती चढल्या आहेत. जरूरीच्या जिनसांच्या किंमती चढूं न देण्याच्या धोरणास ह्यायोगानें मदतच होत आहे हें येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

## इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सची परीक्षा १९४३

### प्रॅक्टीस अॅन्ड लॉ ऑफ बँकिंग

केस इन नीड, नॉट निगोशिअेबल क्रॉसिंग, व डोमिसाइल्ड बिल, याविषयीं थोडक्यांत माहिती द्या.

**केस इन नीड:**—कित्येक वेळा, ज्या इसमावर एकादी हुंडी काढली असेल त्या इसमाचे नांवाशिवाय आणखी एका इसमाचें नांव त्या हुंडींत, हुंडी काढणारानें लिहिलेलें असतें. त्या इसमासच 'केस इन नीड' असें म्हणतात. ज्या इसमावर मूळ ती हुंडी काढली असेल त्यानें ती सत्कारली नाहीं अगर तिचे पैसे दिले नाहींत तर हा दुसरा इसम ती हुंडी सत्कारतो व तिचे पैसे देतो. आपण काढलेली हुंडी खात्रीलायक स्वीकारली जावी अशासाठीं ही सोय केलेली असते. परदेशांत पाठवावयाच्या हुंड्या अशा तऱ्हेनें पाठवण्याचा जास्त प्रघात आहे.

नॉट निगोशिएबल क्रॉसिंग:—एकाद्या चेकवर नेहमीप्रमाणे मजकूर असून त्यावर क्रॉस केलेला असेल व त्यामध्यें 'नॉट निगोशिअेबल' अशीं अक्षरें लिहिलीं असतील तर त्यास 'नॉट शिगोशिएबल' क्रॉसिंग असें म्हणतात. अशा रीतीनें क्रॉस केलेला चेक इतर चेकप्रमाणें दुसऱ्याचे नांवें 'बिर्चा' करतां येत नाही असे मात्र नाही. पण अशा तऱ्हेचा चेक स्वीकारणारास हा चेक म्हणजे 'तुम्हांस हा चेक देणाराविषयीं सावध रहा' असा इषाराच होय. कारण हा चेक देणाराकडे जर त्या चेकची कायदेशीर मालकी नसेल तर आपणांसही पर्यायाने त्या चेकची कायदेशीर मालकी प्राप्त होणार नाहीं. अशा तऱ्हेचा चेक प्रत्येकानें आपल्या जबाबदारीवर स्वीकारावयाचा असतो.

डोमिसाइल्ड बिल्स:—

बिल् ऑफ एक्स्चेंज देखाड केल्यावर तें स्वीकारतेवेळी तें बिल स्वीकारणारानें त्या बिलाचे पैसे आपण अमुक ठिकाणीं देऊं असें सांगून तशा प्रकारचा शेरा त्याने बिल स्वीकारते वेळीं बिलावर लिहिला व तें बिल स्वीकारलें तर त्या बिलास डोमिसाइल्ड बिल असें म्हणतात. अशा तऱ्हेनें स्वीकारलेलें बिल सशर्त स्वीकारलें असल्यामुळें ती अट मान्य करणें अगर न करणें हे ते बिल देखाड करणाराच्या मर्जीवर अवलंबून राहील. जर अशा प्रकारची अट त्यास अमान्य असेल तर त्याने तें बिल नाकारून परत आले असें समजण्यास हरकत नाहीं.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

---

### सांगली बँक लि. सांगली

वरील बँकेस ३१-१२-४२ अखेरच्या वर्षांत ३५,८९८ रुपये निव्वळ नफा झाला. २७ जून रोजीं बँकेची साधारण सभा झाली, तीमध्यें ७% डिव्हिडंड व १% बोनस अशी डिव्हिडंड वाटणी मंजूर झाली. बँकेचें वसूल भांडवल २ लक्ष रुपये असून जनरल व इतर रिझर्व्ह १ लक्ष, ६३ हजार रुपयांचे आहेत. ठेवींचा आकडा ३६ लक्ष रुपयांवर आहे. बँकेनें ९ लक्ष रुपये रोख इतर बँकांत ठेवून १०½ लक्ष रुपये रोखे व शेअर्स ह्यांत गुंतवले आहेत आणि सुमारें २० लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. बँकेची इमारत व स्थावर इस्टेट घसारा वजा करून ५४½ हजारांची आहे. रावसाहेब एच. बी. कुलकर्णी, बी. ए. हे चेअरमन असून श्री. पी. एस. मोकाशी बी. ए. हे मॅनेजर आहेत.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद् ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

**या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात**

**आणि**

**इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.**

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

(Estd. in 1935)

**The Co-operators' Book Depot**

9, BAKEHOUSE LANE, FORT, BOMBAY.

*Books on :—*

Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.

Books on all other subjects are also readily supplied.

Agents for the Publications of :

1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

**THE FARMER**

**HIS WELFARE & WEALTH**

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR

SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT

Sir Vithaldas Thakersey Memorial Building

9 Bakehouse Lane, Fort, Bombay.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

**( Approved Re-traders and Approved Contractors )**

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

**पु. ग. मराठे**

मॅनेजिंग डायरेक्टर.


हे पत्र पुणें, पेठ मांपुडा घ. नं. ५१५। आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांपुडा, घ. नं. १२०।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

१२८-२५२

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ५ | पुणें, बुधवार, तारीख ११ ऑगस्ट, १९४३ | अंक ३२

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून घिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

### ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

### ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### मुंबईमधील सोन्याची किंमत

मुंबईमधील सोन्याच्या किंमतींत कशी वाढ होत गेली, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| वर्ष | सर्वांत ज्यास्त | सर्वांत कमी | सरासरी |
|---|---|---|---|
| | प्रत्येक तोळ्याची किंमत | | |
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| १९३८-३९ | ३७-१०-६ | ३४-१२-३ | ३६-४-२ |
| १९३९-४० | ४३—८-० | ३६—९-० | ३९-१४-७ |
| १९४०-४१ | ४८—८-० | ४०—२-६ | ४२-७-११ |
| १९४१-४२ | ५८—४-० | ४१-११-० | ४४-१०-१० |
| १९४२-४३ | ७२—०-० | ४४-१२-० | ५७-१-१ |

### मुंबई प्रांतांत नोंदलेलीं पुस्तकें व नियतकालिकें

मुंबई प्रांतांत १९४२ सालीं एकूण ४,३६८ पुस्तकें नोंदण्यांत आलीं. हा आकडा १९४१ चे मानानें १७६ नें लहान आहे. ह्या पुस्तकांपैकीं इंग्रजी व इतर युरोपियन भाषांतील पुस्तकें ७२३ होतीं व बाकीचीं ३,१२८ होतीं. पुनर्मुद्रणें व भाषांतरें हीं अनुक्रमें १९ व ३८ भरलीं. पुस्तकांत मराठी सर्वांत जास्त (६७३) होतीं. त्यांचे खालोखाल गुजराती (५२१) व कानडी (१५९) पुस्तकांचा अनुक्रम येतो. नियत कालिकांत ९१२ गुजराती, ६२५ मराठी व १६५ कानडी होती. पुस्तकांची विषयवार वर्गवारी खालीं दिली आहे:—

धर्म ४१५, भाषा २४३, कादंबऱ्या १७७, वैद्यक १६५, शास्त्र ४४८, काव्य १००, चरित्र ७१, कायदा ५९, राज्यशास्त्र ५५, इतिहास ४२, तत्त्वज्ञान इ. ३९, गणित व यंत्रशास्त्र ३४, नाट्य ३१, कला २१.

### घरगुती जनावरांस किती पाणी लागतें?

घरगुती जनावरांना पिण्यास किती पाणी लागतें, हें त्यांच्या खाण्यावर, हवामानावर आणि त्यांच्या आकारावर व हिंडण्याफिरण्यावर अवलंबून असतें. कडब्याऐवजीं ओलें गवत त्यांस खाण्यास दिलें, तर पाणी कमी लागतें. घोड्यास दररोज सरासरीनें ६ ते ८ गॅलन पाणी लागतें. घोड्याचें पोट लहान असल्याकारणानें त्यास खावयास देण्याची व पाणी देण्याची वेळ ह्यांत तास-दोन तास जाऊं देणें इष्ट असतें. घोड्यांपेक्षां गाई-म्हशी पाणी ज्यास्त पितात. गाय जेवढें दूध देते, त्याच्या निदान चारपट तरी ती पाणी पिते.

### जोग विद्युत्योजना

जोग धबधब्याच्या विद्युत्योजनेवरील खर्चाचा मूळ अंदाज २ कोटि, ८० लक्ष रुपये होता. त्यानंतरच्या अंदाजाची रकम ३ कोटि, ५८ लक्ष रुपये झाली व आतां ताजा अंदाज ४ कोटि, ९ लक्ष रुपयांचा आहे. मूळ योजनेंत ३२ हजार अश्व शक्तींच्या विजेचें उत्पादन करण्याचें ठरलें होतें; आतांच्या योजनेप्रमाणें ६४ हजार अश्व शक्तींची वीज तयार केली जाईल. आवश्यक ती यंत्रसामुग्री मागविण्याचा अग्रहक्क मिळविण्यांत आला असून चालू वर्षअखेर ती येऊं लागेल. संस्थानांच्या वीज खात्याचे पांच अधिकारी इंग्लंडला यंत्रसामुग्री बसविण्याचें व ती चालविण्याचें शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यांत आले आहेत.

### हिंदी युद्धकैदी

जर्मनी व इटली ह्यांचे हातांत १२,७७७ हिंदी युद्धकैदी आहेत.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

इंपीरिअल बँकेचा ३० जून, १९४३ अखेरचा ताळेबंद प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें दिसतें कीं बँकेचें भाग भांडवल ५ कोटि ६२½ लक्ष रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड ५¾ कोटि रुपये आहे. बँकेकडे १९६ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत. तिनें १२९ कोटि सरकारी व इतर रोख्यांत गुंतविले असून ४०½ कोटि रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. तिची मालमत्ता १ कोटि ५७ लक्ष रुपयांची असून तिच्या फर्निचर वगैरेची किंमत १५ लक्ष रुपये आहे. बँकेनें रोख व इतर बँकांत ३६ लक्ष रुपये ठेवलेले आहेत.

### मुंबई शहराचा पाणी पुरवठा

मुंबई शहरास सध्यां दररोज १०½ कोटि गॅलन पाणी पुरविण्यांत येतें, तें अपुरें पडतें. दररोज १४½ कोटि गॅलन पाण्याची आवश्यकता आहे. हें ४ कोटि गॅलन पाणी उपलब्ध करून देण्याची योजना तयार करण्याकरितां सर एम्. विश्वेश्वर अय्या व मि. इन्गिलस ह्यांची योजना झालेली आहे.

### अशोक इन्शुअरन्स कं. लि.

वरील विमा कंपनीचें वसूल भांडवल २८,२०० रुपये आहे. कंपनीच्या हिशेबांत ७४,३८० रुपयांची तूट असल्याचें अॅक्चुअरी, मि. वैद्यनाथन्, ह्यांचे तपासणींत आढळून आलें. कंपनी चांगल्या पायावर स्थिर करण्याची कांहीं योजना आंखण्यांत आली, ती अंमलांत न आल्यामुळें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें ही विमा कंपनी गुंडाळण्यांत यावी, असें विमा कायद्याच्या ५३ (२) व ३ कलमान्वयें सुचविलें. मुंबई हायकोर्टांत ह्या अर्जाचा विचार चालू असतांना, कंपनीनें आपण तावडतोब १½ लक्ष रुपयांचे भाग खपवून रकम वसूल करतां व ३० ऑक्टोबर १९४३ पूर्वी सरकारकडे २ लक्ष रुपयांचें डिपॉझिट पुरें करतों, असें आश्वासन देऊन ३१ डिसेंबर १९४३ अखेरच्या मूल्य मापनास तयारी दर्शविली. ह्यांपैकी कोणतीहि अट पाळली गेली नाहीं, तर कंपनी गुंडाळली जावी, असेंहि तिनें मान्य केलें. ह्या गोष्टी विचारांत घेऊन अर्जदार सुपरिंटेंडंटनें अर्जाचा विचार तहकूब होण्यास मान्यता दिली.

### जादा नफ्यावरील कर व निवळ नफा

लिमिटेड कंपनीच्या निवळ नफ्याचा आकडा काढण्यापूर्वी ठोक नफ्यांतून जादा नफ्यावरील कर खर्च ह्या नात्यानें वजा करतां येतो किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचा मुंबई हायकोर्टानें नुकताच निवाडा केला आहे. मेसर्स वालचंद हिराचंद आणि कं. लि. हे हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कं. लि. चे मॅनेजिंग एजंट्स आहेत व हिंदुस्थान कन्स्ट्रक्शनच्या निवळ नफ्याचा कांहीं भाग मॅनेजिंग एजंटांस मिळावयाचा असतो. तो ठरविण्यासाठीं निवळ नफा निश्चित करणें आवश्यक असतें. जादा नफ्यावरील कर हा कंपनीच्या खर्चाचा एक भाग समजून, तो नफ्यांतून वजा करून निवळ नफ्याचा आकडा काढला पाहिजे, असा निवाडा हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनी व तिचे मॅनेजिंग एजंटस ह्यांचेमधील वादग्रस्त विषयासंबंधानें हायकोर्टानें केला आहे.

### ओली वाळू वापरा

शत्रुपक्ष उपयोगांत आणीत असलेले नव्या प्रकारचे बॉंब विझविण्यास साध्या वाळूचीं पोतीं उपयोगी पडण्याजोगीं नाहींत असें मद्रास सरकारचें पत्रक म्हणतें. प्रत्येक ८०० चौरस फूट क्षेत्ररक्षणासाठीं सहा गॅलन पाणी व दोन घनफूट सुटी वाळू मद्रास शहरांतील लोकांनीं तयार ठेवावी, असें त्यांत सुचविलें आहे. ओली वाळू बॉंब विझविण्यास जास्त उपयोगी ठरते.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... २५० |
| २ मुंबई प्रांताचें आरोग्य | २५१ |
| ३ मालाचे तारणावरील कर्जें | २५२ |
| ४ मार्सलंड प्राइस अँड कं. | २५३ |
| ५ स्फुट विचार | ... २५३ |
| चांदी-सोन्याचा धंदा करणारास इशारत—हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार —नवीन मांडवल विक्री-वर निर्बंध | |
| ६ शेअर बाजार | ... २५४ |
| ७ कलकत्ता शहरांतील चहापानाचा प्रसार. | ... २५५ |
| ८ सोन्याचें उत्पादन व संचय | २५५ |



# अर्थ

बुधवार, ता. ११ ऑगस्ट, १९४३


## मुंबई प्रांताचें आरोग्य-जनन-मृत्यु

मुंबई प्रांतांतील जनतेच्या जनन-मृत्यूंचें प्रमाण, मृत्यूंचीं कारणें इत्यादि माहिती देणारा १९४१ सालाबाबतचा सार्वजनिक आरोग्य खात्याचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे तो बोधप्रद आहे. अहवालाच्या वर्षी ह्या प्रांतांत झालेल्या जननांचें प्रमाण मोठें होतें. जननांची संख्या ७ लक्ष, ६३ हजार होती आणि ती त्या पूर्वीच्या वर्षाचे मानानें सवा सात हजारांनीं अधिक होती. मृत्यूंची संख्या १९४१ मध्यें ५ लक्ष, ३९ हजार होती आणि त्या पूर्वीच्या वर्षी हा आकडा ५ लक्ष एवढाच होता. पटकी, हगवण, ताप, दमा-खोकला इत्यादि रोगांस अधिक लोक बळी पडल्यानें मृत्यूंच्या संख्येंत वाढ झाली. वयोमानास अनुसरून, मेलेल्या लोकांच्या गटांत तुलनात्मक दृष्टीनें मृत्यूंचें प्रमाण काय होतें हें पाहूं गेल्यास मुलें होण्याच्या वयांत असलेल्या स्त्रियांमध्यें मृत्यु अधिक झाले असें दिसून येतें. १९४१ सालीं जननसंख्या मोठी होती असें वर सांगितलें आहे त्याचा व मृत्यु संख्येचा संबंध सहजच लागतो. मृत स्थितींत जन्मास आलेल्या अर्भकांची संख्या ११-१२ हजार नमूद झाली असली तरी ह्या संबंधांतले खेडेगांवांतले आकडे विश्वसनीय नसल्याकारणानें हा आकडा हिशेबांत घेतां येत नाहीं. पण मुंबई शहरांतली जन्म-मृत्यूंची नोंदणी कसोशीनें होत असल्यानें तेथले आकडे विश्वसनीय आहेत असें मानण्यास हरकत नाहीं. मुंबईत जननाचे वेळीं मृत असलेल्या अर्भकांचें जिवंत अर्भकांशीं सुमारें साडे सहा टक्के असें प्रमाण पडतें. अर्भकांच्या मृत्यूंचें दर हजारीं प्रमाण १९४० मध्यें १६९ होतें, तें १९४१ मध्यें सुमारें १५९ झालें हें समाधानकारक आहे. जननाचें प्रमाण वाढलें असतांहि ही घट झाली हें विशेष आहे. अर्भकांच्या मृत्यूंपैकीं ४० टक्के मृत्यु एक महिना वयाच्या आंतील अर्भकांचे होते. बाल मृत्यूंचें सर्वांत कमी प्रमाण नेहमीप्रमाणें रत्नागिरी जिल्ह्यांत होतें हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

मुंबई प्रांताची लोकसंख्या, १९४१ च्या शिरगणतीप्रमाणें २ कोटी, ८ लक्ष आहे. १९३१ मध्यें ही संख्या १ कोटी ७९ लक्ष इतकी भरली होती. म्हणजे ह्या दोन वर्षांच्या मधील दश वार्षिक मुदतींत लोकसंख्येंत सुमारें १६ टक्के वाढ झाली. प्रांताचें एकूण क्षेत्र ७६ हजार चौरस मैल आहे आणि दर चौरस मैलास २७२ माणसें असें वस्तीचें प्रमाण बसतें. १९३८ व १९३९ ह्या वर्षांत मुंबई प्रांतांत जनन संख्या सारखी वाढत गेली. मध्यें १९४० सालीं तींत थोडी घट झाली ती १९४१ मधील वाढाव्यानें भरून काढली. जननाच्या प्रमाणांत पश्चिम खानदेशाचा नंबर पहिला आणि मुंबई उपनगरचा शेवटला होता. त्यांचें दर हजारी प्रमाण अनुक्रमानें ४६ व २२ असें होतें. एकूण खेडेगांवांतलें हें प्रमाण ३८ आणि शहरांतलें ३० होतें. मुंबई शहराची जननाची संख्या १९४० सालीं ३८ हजार होती, ती १९४१ मध्यें सुमारें ४० हजार झाली. मृत्युसंख्येची पंच वार्षिक प्रातिक सरासरी ५ लक्ष होती, तिच्या मानानें १९४१ सालांतले मृत्यु ५ लक्ष १९ हजार हे अधिक होते. सोलापूर व धारवाड जिल्ह्यांतील मृत्यूंचें दर हजार लोकसंख्येशीं प्रमाण ३० च्या वर होतें. खेडेगावांतलें प्रमाण २६ व शहरांतलें २३ होतें. १९४१ मध्यें तापानें १ लक्ष, ८० हजार बळी घेतले, दमा-खोकल्याचे बळी १ लक्ष, हगवणीचे २६ हजार, पटकीचे १६ हजार, दुखापतीचे ७ हजार, प्लेगचे ५ हजार व देवीचे तीन ते चार हजार असे होते.. कोणत्याहि ठळक रोगाच्या यादींत न पडणाऱ्या मृत्यूंची संख्या सर्वांत मोठी म्हणजे १ लक्ष, ९३ हजार होती. प्लेगचा जोर १९४० सालच्या मानानें कमी होता, पण पटकीचा जोर वाढला होता. फुफुसांच्या विकारानें आलेले मृत्यु वाढत्या प्रमाणांत होत आहेत ही काळजी वाटण्यासारखी गोष्ट आहे. ह्या सदराखाली येणाऱ्या मृत्यूंमध्यें ट्युबरक्युलॉसिसचें प्रमाण मोठें असून हा रोग शहरांतून खेडेगांवांत पसरत आहे अशी भय सूचना आरोग्य खात्यानें दिली आहे. शहरांतली विशिष्ट प्रकारची रहाणी ह्या परिस्थितीस जबाबदार आहे आणि सदरहू रोगाचा प्रतिकार नेटानें होणें अगत्याचें आहे ह्यांत शंका नाहीं. १९४१ मध्यें २,५९४ खेड्यांत पटकीचा प्रादुर्भाव होऊन त्यानें ३४ हजार माणसें पछाडलीं व त्यांपैकीं १६ हजार मृत्युमुखीं पडलीं. १९३१ सालापासून पटकीनें इतके मृत्यु कधींच झाले नव्हते. ह्या रोगाची लस सुमारें १४ लक्ष लोकांस टोचण्यांत आली होती. १९४० मधला हा आकडा फक्त २ लक्ष होता. १९३६ ते १९३८ प्लेगचा जोर विशेष नव्हता, तो १९३९ व १९४० ह्या सालीं वाढला आणि १९४१ मध्यें थोडा उतरला. १९४० च्या मानानें देवीच्या साथीनें कमी बळी घेतले. ह्या रोगानें झालेल्या मृत्यूंपैकीं दहा वर्षांच्या खालील वयाच्या मुलांचे ६१ टक्के बळी होते. त्यावरून मुलांस देवी एकदां व पुन्हां लस टोचण्याचें महत्त्व सिद्ध होतें. १९४१ सालीं सुमारें साडे सहा लक्ष माणसांस देवी टोचण्यांत आल्या आणि पुन्हां टोचलेल्यांची संख्या ७ लक्षांचे वर होती.

### दुधाची टंचाई

हिंदुस्थानांत दररोज दर माणशीं गाई म्हशींचें सुमारें पावशेर दूध निघतें आणि त्यापेक्षा थोडें कमी दूध लोकांच्या पोटांत जातें. न्यूझीलंडसारख्या देशांत दररोज दर माणशीं ७½ शेर दूध निघून सुमारें पावणेदोनशेर दूध तेथील लोकांच्या पोटांत दररोज दर माणशीं जातें. ही माहिती व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळाचे एक सभासद सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें दिली.

## माल व सोनें-चांदी ह्यांच्या तारणावरील कर्जे

### रिझर्व्ह बँकेचा शेड्यूल्ड बँकांना सल्ला

मालाचे (सोनें-चांदी सुद्धां) तारणांवरील कर्जे बेकायदा ठरविण्याचा अथवा तीं नियंत्रित करण्याचा अधिकार सरकारनें डिफेन्स ऑफ इंडिया नियमाखालीं घेऊन ठेवला आहे, त्याचा उद्देश नेहमींचे व्यवहार थांबविणें हा नसून सट्टेबाजीस माळा घालणें हा आहे व रिझर्व्ह बँकेनें ह्यासंबंधांत बँकांना सल्ला दिला आहे, असें आम्ही "अर्था"च्या ता. २८ जुलैच्या अंकांत म्हटलें होतें. ह्या आर्डिनन्ससंबंधीं लोकांस असलेल्या शंका दूर व्हाव्या, याकरितां रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांना पाठविलेल्या सर्क्युलरचा गोषवारा खाली दिला आहे.

### बाजारभाव नियंत्रित करण्याचें सरकारी धोरण

"सट्टेबाजीस सवलत मिळेल, अशा तऱ्हेचे कोणतेहि व्यवहार सध्याच्या काळीं बँकांनीं न करण्याचें महत्त्व त्यांनीं लक्षांत घ्यावें. पुढें भाव वाढतील ह्या अपेक्षेनें ज्यांनीं मालाचे, विशेषतः खाद्यपदार्थांचे व सोन्याचे, साठे करून ठेवले असतील अशांच्या तारणावर बँकांनीं कर्जे व ओव्हरड्राफ्ट देण्याचें बंद करावें. मामुली गरजेपेक्षां ज्यास्त साठे केल्यानें बाजारांत मालाचा तुटवडा पडतो व कृत्रिम चणचण निर्माण होऊन बाजारभाव आणखी वाढतात. बाजारभाव आणखी वाढूं न देण्याचें सरकारचें धोरण जाहीरच आहे व शक्य त्या मार्गांनीं तें यशस्वी करण्याचा सरकारचा निर्धार आहे. बँका, इतर संस्था व व्यक्ती ह्यांच्या मालाच्या तारणावरील कर्जांमुळें भरमसाट साठे करण्यास लोकांना सवड होत असें आढळून आल्यास सरकाराची कडक उपाय योजण्याची तयारी आहे. मालाचे साठे ताब्यांत घेण्याचा व लोकांना आपले साठे जाहीर करण्यास लावण्याचा अधिकार डिफेन्स ऑफ इंडिया नियमांनीं सरकारला दिलेला आहेच व धान्याचे बाबतींत ठिकठिकाणीं ह्यासंबंधांत हुकूम काढण्यांत आलेलेच आहेत. डिफेन्स ऑफ इंडिया नियम नं. ९४ ब ह्या नवीन नियमाकडे बँकांनीं लक्ष पुरवावें, कारण त्या नियमानुसार कांहीं विशिष्ट वर्गांशीं व कांहीं विशिष्ट प्रकारचे व्यवहार बंद करण्याचा अधिकार सरकारास आहे. मालाचे तारणावर अगोदर कर्ज दिलेलें असलें, तर ठराविक मुदतींत तें फेडण्यांत आलेंच पाहिजे, अशीहि तजवीज ह्या नियमांत करण्यांत आलेली आहे.

### नित्याच्या मामुली व्यवहारांस कर्जे जरूर द्या

"आपल्या नेहमींच्या गिऱ्हाइकांस त्यांच्या मामुली व्यापार-धंद्यासाठी बँकांनीं कर्जे व ओव्हरड्राफ्ट दिल्यास, त्यांत अडथळा आणण्याचा सरकारचा उद्देश नाहीं. कच्च्या मालाचा साठा करण्यासाठी कारखाने व गिरण्या ह्यांस कर्जे देणें, घाऊक अथवा किरकोळ व्यापाऱ्यांनीं पुनः विक्री करण्यासाठी घेतलेल्या मालाचे तारणावर कर्जे देणें, अथवा नेहमींच्या चांदी-सोन्याच्या व्यापाऱ्यांस त्यांच्या रोजच्या व्यवहारांसाठी सोन्याचांदीवर पैसे देणें, ह्यांस कांहींच प्रत्यवाय नाहीं. तथापि, सट्टेबाजीसाठी बँकांकडून कर्जे घेण्यांत येत आहेत असें सरकारच्या नजरेस आलें तर डिफेन्स ऑफ इंडियाच्या ९४ ब ह्या नियमाचा अवलंब करून अशीं कर्जे बंद पाडणें सार्वजनिक हिताचे दृष्टीनें सरकारास भाग पडेल व त्यामुळें मामुली व्यवहारास अडचण निर्माण होईल त्यास इलाज रहाणार नाहीं.

### सट्टेबाजी थांबविण्यांत बँकांचेंच हित आहे.

"बँकांकडे गहाण असलेला माल एकदम सरकारनें विक्रीस बाहेर काढला तर मालाची किंमत एकदम घसरेल व त्यामुळें मालकाचें निश्चित नुकसान होऊन कर्जे देणाऱ्या बँकांसहि कदाचित चट्टा बसण्याचा संभव आहे. सर्वसाधारण अपेक्षेपेक्षा युद्ध लवकर संपलें, तर किंमती एकदम खाली येतील व त्यामुळें बँकांना संकट निर्माण होईल. आज जीं कर्जे योग्य मर्यादेंत आहेत असें वाटतें, तीं एकदम मर्यादेच्या बाहेर जातील. सच्च्या सुज्ञ मामुली व्यापारी व्यवसायासाठीच मालाचे तारणावर योग्य मर्यादेंत कर्जे देऊन सरकारच्या धोरणाशी सहकार्य करण्यांत बँकांचेंच हित आहे. अशा रीतीनें सट्टेबाजीच्या व्यवहारांचें बँकांनीं आपण होऊन नियंत्रण केलें तर डिफेन्स ऑफ इंडिया नियम नं. ९४ बचा सरकारास अवलंब करावा लागणार नाहीं."

---

## मार्सलंड प्राइस अँड कं. लि.

वरील कंपनीचा कळंब येथें साखरेचा कारखाना आहे. कंपनीनें रेक्टिफाइड स्पिरिट काढण्यास प्रारंभ केला आहे व त्याचें रोजचें उत्पादन १,५०० गॅलन इतकें आहे. कंपनीच्या डेअरीमधील दूध मुंबई व पुणें येथें पाठविण्यांत येतें. ३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षाचें भागीदारांस प्रेफरन्स भागांवर १२% व आर्डिनरी भागांवर ३६% डिव्हिडंड मिळालें. डिव्हिडंडमधून इनकम टॅक्स वजा व्हावयाचा आहे. मेसर्स प्रीमियम कन्स्ट्रक्शन कं. लि. ही वरील कंपनीची मॅनेजिंग एजंट आहे. मार्सलँड प्राइस ही कंपनी १९०८ सालीं रीइनफोर्स्ड काँक्रीटचें व पोलादी बांधकामाचें काम करण्यासाठीं स्थापन झाली. पहिलीं बारा वर्षे कंपनीस वाईट गेलीं. कंपनी प्रेफरन्स भागांवरील डिव्हिडंड देऊं शकली नाहीं व भरणा मांडवलाइतकेंच तिला डिबेंचर्सचें कर्ज झालें. श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं १९२० सालीं कंपनीचें नेतृत्व घेतल्यापासून परिस्थिति पार पालटली. मंदीच्या काळांत कंपनी बंद पाडण्याचें ठरेपर्यंत परिस्थिति आली होती. पुढें साखरेच्या धंद्यास संरक्षण मिळतांच,ह्या इंजिनिअरिंग कंपनीचें साखर कारखान्यांत रूपांतर करण्यांत आलें. कळंब येथें १९३३ सालीं रस गाळण्याची यंत्रसामुग्री बसविण्यांत आली. कळंबचें वालचंद नगरमध्यें रूपांतर झालें. १९३५-३६ मध्यें ९७३ एकरांत ऊंस लावण्यांत आला होता. १९४२ मध्यें त्याचें क्षेत्र ३,५०० एकर झालें. यंत्रांनीं ऊस गाळण्याची शक्ति १९३४ मध्यें १५० ते २५० टन होती; आतां ती १,००० ते १,१०० टन आहे. वालचंद नगरचा विस्तार ५० चौरस मैल आहे. इस्टेटीवरील रेल्वेची लांबी ६५ मैल भरते. एकूण ८ हजार कामगारांना तेथें काम मिळतें. मार्सलँड प्राइस अँड कंपनीची मॅनेजिंग एजन्सी प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं. लि. कडे आहे.

---

### लुसर्न गवत खाऊन सैनिक लढणार !

लुसर्न गवतांत महत्त्वाचीं अन्नद्रव्यें असून माणसास तीं अत्यंत उपयोगी आहेत. लुसर्नची चार चमचे वाळवलेली पूड आणि एक मोठा कोबीचा गड्डा, ह्यांची अन्न ह्या दृष्टीनें किंमत सारखीच भरते. लुसर्न गवतांतील पाणी काढून पुडीच्या स्वरूपांत तें लष्करी सैनिकांना पुरविण्याची योजना अंमलांत येत आहे.

## स्फुट सूचना

### चांदी-सोन्याचा धंदा करणारांस इशारत

बँकांनीं सोनें-चांदी वगैरे मालाच्या तारणावर कर्जें देऊं नयेत असा हुकूम काढण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें नवीन नियम करून स्वतःकडे घेतला आहे. त्याचे संबंधांत मध्यवर्ती कायदेमंडळांत प्रश्न विचारला असतां फडनवीस, सर जरेमी रेस्मन, ह्यांनीं त्यास दिलेलें उत्तर महत्त्वाचें आहे. चांदी-सोन्याच्या बाजारांत सट्टेवाले बँकांकडून आपल्या मालाच्या तारणावर कर्जें काढून किंमतीच्या चढउताराचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. ह्या योगानें कृत्रिम रीतीनें मालाच्या किंमती चढतात आणि बाजाराचा जुगडा होतो. सट्टेवाल्यांस अशा कारवाया करण्यास बँकांकडून सहाय मिळूं नये आणि बाजारभावांत स्थैर्य रहावें ह्या उद्देशानें सरकारनें वर सांगितल्याप्रमाणें नियम करून सोन्या-चांदीच्या तारणावरील कर्जांस बंदी करण्याची सत्ता घेतली आहे. तिचा उपयोग अजून करण्यांत आलेला नाहीं. तो केला गेल्यास तारणावरील कर्जांच्या सरळ व मामुली व्यवहारांत व्यत्यय येऊन व्यापारी, बँका व सराफ ह्यांची गैरसोय व नुकसान होईल अशी भीति वाटणें साहजिक आहे. तथापि, सरकार नवीन नियम अंमलांत आणील ह्या कल्पनेचा परिणाम सोनें-चांदीच्या बाजारावर झाला असून त्या धातूंच्या किंमती किती तरी उतरल्या आहेत. ह्या घटनेकडे बोट दाखवून सर जरेमी रेस्मन म्हणाले कीं केवळ सट्टेबाजीमुळें सोनें-चांदीच्या किंमती भरमसाटपणानें भडकल्या होत्या ही गोष्ट सद्रहु बाजारभावांतील उतार स्पष्ट सिद्ध करीत आहे. तथापि, जरूर पडल्यास सरकार आपल्या हातांतील नवीन अधिकार अंमलांत आणण्यास कचरणार नाहीं आणि असें झाल्यास मामुली व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांस भिण्याचें कांहीं कारण नाहीं. मालाच्या तारणावांचून देण्यांत येणाऱ्या कर्जांवरहि निर्बंध घालण्याचा सरकारचा उद्देश आहे काय? असा प्रश्न विचारला असतां सर जरेमी म्हणाले कीं तूर्त तसें करण्याचा आपला विचार नाहीं; परंतु सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें तसें करणें अगत्याचें आहे असें दिसून आल्यास तशी बंदीहि करण्यास सरकार मागेंपुढें पहाणार नाहीं. एकंदरीनें बाजारभाव उतरत आहेत असें जादा प्रश्नांस उत्तर देऊन त्यांनीं सोनें-चांदीच्या बाजारांत सट्टे करणारांस इशारत देऊन ठेविली कीं, त्यांच्यावर नुकसानीची आपत्ति कोसळल्यास तिची जबाबदारी सर्वस्वी त्यांचेवरच राहील. आपल्या डोक्यावर लटकणारी ही तरवार पाहून बाजारांत व्यवहार करणाऱ्या धंदेवाल्यांमध्यें गडबड उडाली आहे आणि सरकारनें किंमतीच्या नियंत्रणाची त्याची काय योजना आहे हें स्पष्ट करावें म्हणजे सामान्य व्यापाऱ्यांस सोईचें होईल असें त्यांपैकीं कित्येकांचें म्हणणें आहे.

---

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

कोणत्याहि देशाचा युद्धकालीन परराष्ट्रीय व्यापार मर्यादित होऊन लढाऊ गरजांस अनुसरून त्यास विशिष्ट वळण लागणें स्वाभाविक आहे. समुद्र मार्गानें होणारी मालाची वहातुक बहुतेक लढाऊ सामुग्रीचीच असते आणि चालू युद्धासारख्या जगभर पसरलेल्या युद्धांत मामुली व्यापारास वावहि नसतो. शिवाय मालाच्या किंमती विलक्षण रीतीनें चढल्यामुळें आयात-निर्गत व्यापाराच्या परिस्थितीची विशिष्ट वर्षांची पूर्वकालाशी तुलना करून बोधप्रद अनुमानें काढणें व्यर्थ होतें. ह्या गोष्टी लक्षांत ठेवूनच हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराविषयाचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांकडे पहाणें आवश्यक आहे. मेल्या चार वर्षांत ह्या व्यापारांत आयात-निर्गतीचे बाबतींत काय फरक झाला आहे हें खालीं दिलेल्या तुलनात्मक आकड्यांवरून दिसून येईलः—

( कोटि रुपये )

| | आयात | निर्गत | आयातीपेक्षा निर्गत किती अधिक |
|---|---|---|---|
| १९३८-३९ | १५२-३ | १६२-७ | १०-४ |
| १९४०-४१ | १५६-९ | १८६-९ | २९-० |
| १९४१-४२ | १७३-२ | २३७-५ | ६४-३ |
| १९४२-४३ | ११०-४ | १८७-६ | ७७-१ |

युद्धापूर्वी आयात व निर्गत मालाचे भाव होते, त्यापेक्षां युद्धकालांत ते कितीतरी चढले आहेत हें लक्षांत बाळगलें असतां हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारांत फार मोठी घट झाली आहे हेंहि वरील आकड्यांवरून दिसेल. १९४१-४२ सालाच्या मानानें १९४२-४३ मध्यें तर ही घट विशेष मोठी आहे. त्याचें कारण गेल्या वर्षांत झालेला युद्धाचा विस्तार हें होय. व्यापाराच्या बाजार पेठा आणि आयात-निर्यात मालाचे प्रकार त्यांतहि बदल झालेला आढळतो. इंग्लंड आणि अमेरिका ह्या देशांशीं झालेल्या व्यवहारांत हिंदुस्थानची निर्गत आयातीच्या मानानें घटली आहे. इजिप्त व इराक ह्यांचे संबंधांतहि हीच वस्तुस्थिति आहे. ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका ह्यांसारख्या साम्राज्यांतर्गत देशांकडे हिंदी निर्गत अधिक झाली आहे. निर्गत झालेल्या मालाच्या स्वरूपाची कल्पना खालील आकड्यांवरून येईलः—

( कोटि रुपये )

| | १९३८-३९ | १९४० ४१ | १९४१-४२ | १९४२-४१ |
|---|---|---|---|---|
| धान्य... | ७·८ | ९·७ | १०·७ | ७·१ |
| चहा ... | २३·२ | २७·७ | ३९·६ | ३१·९ |
| तेलें ... | १·० | २·४ | २·६ | १·४ |
| कपास | २४·८ | २४·६ | १७·९ | ५-५ |
| ताग, कच्चा | १३·४ | ७·८ | १०·४ | ९·० |
| तागाचें कापड | २६·२ | ४५·३ | ५३·० | ३३·३ |
| धातू ... | २·० | ५·२ | ४·२ | १·९ |
| कमावलेलें कातडें | ५·२ | ५·९ | ६·० | ४·८ |

---

### नवीन भांडवल विक्रीवर निर्बंध

नवीन भांडवल उभारणीवर नियंत्रण घालणारा डिफेन्स ऑफ इंडिया नियम सरकारनें जाहीर केला, त्याचें उल्लंघन नकळत झालें असल्यास, त्या व्यवहारांचा बेकायदेशीरपणा नाहींसा करण्याचा अधिकार डिफेन्स ऑफ इंडिया नियमांत दुरुस्ती करून सरकारनें आपणाकडे आतां घेतला आहे. १७ मे, १९४३ रोजीं नियंत्रक नियम जाहीर होऊन अंमलांत आला, त्याच दिवशीं त्याची माहिती लोकांना होणें संभवनीय नाहीं. कित्येक कंपन्यांनी १७ मे रोजीं नवे शेअर विकले. अशा रीतीनें ज्यांनीं न कळत नियमाचें उल्लंघन केलें असेल, त्यांनीं एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूजकडे अर्ज करून झालेल्या व्यवहाराचा बेकायदेशीरपणा रद्द करून घ्यावा.

## शेअर बाजार.

(श्री. व. वि. टोपकर, एम्. ए., बी. कॉम्., २४ डे. जि. पुणें४)

युद्धाच्या बातम्या अनुकूल असतांना मागील तीन आठवडे बाजार निद्राधीन झालेला आहे. तसेंच सेळता पैसा मुबलक असतांही बाजारमात्र उठावणी करतांना दिसत नाहीं. यावरून एकच निष्कर्ष निघतो कीं, बाजाराला सरकारी धोरण सध्यां इतर कोठल्याही घटनेपेक्षां जास्त महत्त्वाचें वाटत आहे.

कापड बाजारांतून प्रथमतः सवा कोटींच्यावर माल नाहीं अशी व्यापारी बतावणी करतांना आढळत होते. पण सरकारनें विक्री करून टाकण्याची मुदत लांबवण्याची तयारी नाहीं असें निःसंदिग्ध केलें असतां आतां मात्र माल सात कोटींच्यावर असून एवढ्या थोड्या अवधींत तो खपणें अशक्य आहे; तसेंच तो वरच्या भावांत खरेदिलेला असल्यानें फार नुकसानींत विकावा लागेल म्हणून नक्राश्रू ढाळले जात आहेत. व्यापाऱ्यांनीं प्रथमतः सट्टा खेळण्याकरतां माल सांठवून भाव चढवले व भरमसाट नफा मारून जनतेची जरूरीच्या गोष्टींकरतां पिळवणूक चालवली होती तेव्हां धर्म आठवला नाहीं. त्यांनीं आतां केलें तसें भगावें हें उचितच आहे. वास्तविक गिरण्या ठोक व्यापाऱ्यांना फार वरच्या भावांत माल विकित होत्या असें नाहीं. उदाहरणार्थ, एक विशिष्ट तऱ्हा गिरण्या जर व्यापाऱ्यांना रत्तली २ रु. ९ आ. पर्यंत विकत होत्या तर व्यापारी तो माल बाहेर ३ रु. १४ आ. अगर ४ रु. भावानें विकित होते. यावरून मधला दलालांचा वर्ग किती मोठ्या प्रमाणांत नफेबाजी करत होता हें आढळून येईल. यापुढें पूर्वीचा माल गांसडीच्या बाहेर पडलाच पाहिजे व विशिष्ट मुदतींत विकला गेलाच पाहिजे. तसेंच नवीन निघणाऱ्या मालावर तारखेचे छाप पडणार असल्यानें या निर्बंधांनीं अजून कापडाच्या भावांनीं तळ पाहिला नाहीं असें म्हणावें लागतें.

इकडे विधिमंडळांत पुन्हा रेसमन साहेबांनीं आपल्या सोनें, चांदी बाजारांतील सटोडिया स्नेह्यांना बजावून ठेवलें आहे कीं तुम्ही सट्टे खेळून खड्ड्यांत पडलांत तर 'माझ्या कानीं सात बाळ्या!' तेव्हां शेअर बाजारालाही अजून धास्ती पडलेलीच आहे कीं न जाणो कोणता बडगा येऊन बसतो.

या सर्व अंतर्गत भानगडीमुळें बाजार स्वस्थ आहेत. कांहींचि भाव—फिनले, स्वान, ई. डी., गोकाक इ०, तळाच्या आसपास घोटाळत आहेत तर कोहिनूर, डाईंग यांचे तांत्रिक कारणामुळें मधून मधून वर चढण्याचा देखावा करत आहेत. पण खरा जीव कोणांतच नाहीं.

टाटा स्टीलसुद्धां एकदां व्याज बाद झाल्यावर कोठल्या पायरीवर जाऊन बसावेत या विचारांत दिसत आहेत. सीमेंटमध्यें कोळशाच्या तुटवड्यामुळें एक वेचाणीची मोठी लाट येऊन गेली व २०८ चा भाव येऊन गेला.

फक्त सरकारी रोखे मात्र विशेष तेजींत आहेत व राहतील. रिझर्व बँकेनें साडेतीन टक्क्यांचा भाव ९९ करून टाकला आहे व मजल करीत तो ९७, ९८ पर्यंत नेण्यांत येईल असें दिसत आहे. पांच टक्के करमाफ १९४५–५५ चे रोखे यापुढें धारण करणारांनी काढून टाकून त्याऐवजी साडेतीन टक्के रोखा उचलावा असें करण्यांत निःसंशय फायदा आहे. १९४५ सालीं हें कर्ज नक्कीच परत होईल या दृष्टीनें आज त्यावर मिळणारा सुमारें सात रुपयांचा नजराणा पदरांत पाडून घेणेंच इष्ट आहे.


# Bombay Provincial Co-operative Institute.

Applications are invited for twelve posts of Educational Supervisors on Rs. 50-5/2-75 with Rs. 7 as dearness allowance and fixed T. A. of Rs. 20 to Rs. 25 per month. Preference will be given to graduates who will have a start of Rs. 55/- per month. Minimum qualifications Matriculation and experience of or training in co-operative work. Candidates will be posted outside Bombay and will have to do touring in one or two districts. Applications detailing qualifications with copies of certificates should reach the Institute 9, Bakehouse Lane, Fort, Bombay not later than 25th August 1943.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

# दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस्<br>के. डब्ल्यू. फडके,<br>फडके गणपतिवाडी, गिरगांव,<br>बॅक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,<br>'रामनिवास' लक्ष्मी रोड,<br>पुणें शहर.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
| --- | --- | --- |
| रु. १०,००,००० | रु. ६,७१,२०० | रु. ३,३१,६०० |

एकण खेळतें भांडवल रु. ९०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

## कलकत्ता शहरांतील चहापानाचा प्रसार

इंडियन टी मार्केट एक्सपान्शन बोर्डाच्या सूचनेवरून इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूटनें केलेल्या पहाणीचा निष्कर्ष खाली दिला आहे. चहा पिणारीं कुटुंबें व माणसें ह्यांचें प्रमाण, दिवसांतून किती वेळां चहा पिण्यांत येतो त्याची संख्या व दर माणशी चहाचा खप ह्यासंबंधीं आकडे गोळा करण्यांत आले. बंगाली हिंदु कुटुंबें, बंगाली मुसलमान कुटुंबें व इतर हिंदू कुटुंबें ह्यांविषयीं स्वतंत्र माहिती जमा केली गेली. आर्थिक परिस्थितीचा चहापानावर काय परिणाम होतो त्याचाहि विचार करावा लागला. ह्या पहाणीचा उद्देश, चहाचा प्रचार करण्यासाठी टी मार्केट एक्सपान्शन बोर्डाजवळ अधिकृत व शास्त्रीय पद्धतीनें छाननी केलेली माहिती असावी, हा आहे. मद्रासी, मुसलमान व मध्यम वर्गीय बंगाली हिंदूंनीं आढेवेढे न घेतां माहिती पुरविली. मारवाडी व गरीब बंगाली कुटुंबांकडून माहिती काढणें मात्र फार त्रासाचें झालें. कलकत्ता शहरांतील वेगवेगळ्या विभागांतील एकूण ११८७ कुटुंबांकडून माहिती गोळा केली, त्यांपैकीं ९३७ बंगाली हिंदू, ९६ बंगाली मुसलमान, १०८ मारवाडी हिंदू, ३०० पंजाबी हिंदू-१६ मद्रासी हिंदू अशी त्या कुटुंबांची वर्गवारी होती.

बंगाली हिंदू कुटुंबांत, उत्पन्नाच्या वाढीबरोबर चहाचा खप वाढलेला आढळला. दरमहा २३ रुपयांचें उत्पन्न असलेल्या कुटुंबांपैकीं ३०% कुटुंबांत चहा चालू असला, तर जास्त उत्पन्नाच्या कुटुंबांत तें प्रमाण ८५% इतकें आहे. गरीब कुटुंबांपैकीं थोड्या कुटुंबांत चहाचा प्रसार झाला असला, तरी त्यांतील ६०% माणसें चहा पितात. ५० रुपये प्राप्तीपर्यंत चहाचा खप वाढतो, तो पुढें दरमहा दर माणशी ०·४१ पौंड इतका कायम रहातो. एकूण लोकसंख्येपैकीं ४२% लोक चहा पितात व दर माणशी दरमहा खप ०·१६ पौंड पडतो. बंगाली हिंदूंच्या मानानें बंगाली मुसलमानांत चहाचा प्रसार अधिक झालेला आहे. पंजाबी व मद्रासी हिंदूंतील चहाचा प्रसार बंगाली हिंदूमधील प्रसाराइतकाच आहे, परंतु मारवाडी हिंदूमध्यें चहा पिणारीं कुटुंबें फार थोडीं म्हणजे २५% च आहेत. पांचापैकीं चार मुसलमान कुटुंबें चहा पितात व तिहींपैकीं दोन हिंदू कुटुंबांत चहा चालतो, परंतु चारांपैकीं फक्त एका मारवाडी कुटुंबांत चहापानाचा प्रसार झालेला आहे. तथापि, मारवाड्याच्या घरांत चहाचा प्रवेश झाला, कीं कुटुंबांतील सर्व लोक चहा पिऊं लागतात.

चहा पिणारांपैकीं शेकडा ७७ लोक दिवसांतून दोनदा चहा घेतात, १७% एकदा घेतात व सुमारें ६% लोक तीनदा किंवा त्यापेक्षां अधिक वेळा घेतात. म्हणजे, कलकत्ता शहरांतील चहाबाजांपैकीं एक षष्ठमांश लोक फक्त एकदाच सकाळीं चहा पितात व चार पंचमांश लोक दोनदा पितात. बंगाली हिंदू लोकांत पांच वर्षांखालील १५% मुलांना चहा देतात. १० ते १५ वर्षांच्या मुलांपैकीं ३०% मुलांना चहा मिळतो. २० ते ४० वर्षांच्या लोकांपैकीं निम्मे लोक चहा पितात. ४० वर्षांपर्यंत पुरुष व स्त्रिया सारख्याच प्रमाणांत चहा घेतात; त्यानंतरच्या वयांत स्त्रियांचें चहा पिण्याचें प्रमाण कमी आहे. मुसलमानांत लहान मुलांना सढळ हातानें चहा दिला जातो व म्हातारपणीं पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रिया चहा पितात.

चौकशीचा निष्कर्ष असा, कीं आर्थिक परिस्थितीवर मुख्यतः चहापानाचा प्रसार अवलंबून आहे; तथापि बंगाली मुसलमानांत बंगाली हिंदूंचेपेक्षां अधिक लोक चहा पितात व मारवाडी कुटुंबांत चहाचा प्रसार फारच थोडा झालेला आहे. बंगाली हिंदू कुटुंबांत ४२% पुरुष नोकरांना व २९% स्त्री नोकरांना चहा मिळतो. मुसलमान कुटुंबांत हें प्रमाण अनुक्रमें १६% आणि २७% आहे. इतर समाजांत नोकरांना चहा देण्याची पद्धत नाहीं.

## सोन्याचें उत्पादन व त्याचा संचय

### जागतिक उत्पादन

सोन्याचें जागतिक उत्पादन १९४२ सालीं अंदाजें ३ कोटि, ६० लक्ष औंस झालें. १९४० व १९४१ मध्यें तें ४ कोटि, ५ लक्ष व ३ कोटि ९५ लक्ष औंस झालें होतें. १९४२ मधील उत्पादनापैकीं ब्रिटिश साम्राज्यांतील उत्पादनाचा हिस्सा ६२·५% भरला. खालील तक्त्यांत सोन्याच्या उत्पादनाचे तुलनात्मक आकडे दिले आहेत—

तुलनात्मक आकडे

( हजार औंस )

| देश | १९४० | १९४१ | १९४२ |
|---|---|---|---|
| हिंदुस्थान | २८९ | २८६ | २६० |
| अमेरिका | ६,००३ | ५,७८० | ३,७०० |
| दक्षिण आफ्रिका | १४,०४७ | १४,३८९ | १४,१२१ |
| सर्व देश (एकूण) | ४०,५०० | ३९,५०० | ३६,००० |
| जागतिक उत्पादनाचा हिस्सा ( % ) | | | |
| ब्रिटिश साम्राज्य | ४९·२ | ६०·५ | ६२·५ |
| दक्षिण आफ्रिका | ३४·७ | ३६·० | ३९·२ |

### उत्पादन कमी कां ?

सोन्याच्या उत्पादनांत गुंतलेले लोक, यंत्रसामुग्री, इत्यादींचा उपयोग इतर युद्धकार्याकडे होऊं लागला व उत्पादनाचा खर्चहि वाढला ह्या कारणानें सोन्याचें उत्पादन कमी झालें. विशेषतः अमेरिकेंतील बहुसंख्य खाणी बंदच आहेत.

### अमेरिकेजवळील संचय

अमेरिकन सरकारजवळ सुमारें ६५ कोटि औंस सोन्याचा संचय आहे. म्हणजे जागतिक साठ्याचा ६०% साठा अमेरिकन सरकारजवळ आहे. अर्थात, त्यापैकीं कांहीं सोनें इतर देशांच्या सरकारांनीं त्याचे जवळ सुरक्षितपणासाठी ठेवून दिलेलें आहे.

### हिंदी उत्पादन

हिंदुस्थानांतील उत्पादनाचे आकडे १९४१ = ३ कोटि ३१ लक्ष रु.; १९४२ = ३ कोटि, ७३ लक्ष रु. असे आहेत. औंसांमध्यें पाहिलें, तर उत्पादन २,८५,९२९ औंसांचें २,६०३८७ औंसांवर आलें. सोन्याच्या किंमतींत झालेल्या वाढीमुळें, कमी उत्पादन होऊनहि त्याची किंमत जास्त भरली. १९४२ अखेरच्या १० वर्षांत मिळून हिंदुस्थानांत २१ लक्ष, १३ हजार औंसांचें उत्पादन झालें. म्हणजे त्याच मुदतींतील जागतिक ( रशिया वगळून ) उत्पादनाच्या मानानें हिंदी उत्पादन १% भरतें.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

(Estd. in 1935)

## The Co-operators' Book Depot

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

*Books on :—*

Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.

Books on all other subjects are also readily supplied.

Agents for the Publications of :

1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

## THE FARMER
## HIS WELFARE & WEALTH

BY
DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY
DEWAN BAHADUR
SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

> Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.
>
> *T. Vijayaraghavacharya.*

*Published by*
THE CO-OPERATORS' BOOK DEPOT
Sir Vithaldas Thakersey Memorial Building
9 Bakehouse Lane, Fort, Bombay.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

९८१८८५

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख १८ ऑगस्ट, १९४३ | अंक ३३

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,२०,५०,०००

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बँकांस सुटी

सोमवार, ता. २३ ऑगस्ट रोजीं गोकुळ अष्टमीनिमित्त बँका बंद रहातील.

### ग्रामोन्नतीबद्दल बक्षीस

पश्चिम खानदेशांतील नंदुरबार तालुक्यामधील खोंडामळी गांवास १९४२ मधील ग्रामोन्नतीबद्दल १०० रुपये बक्षीस देण्यांत आलें. खेडेगांवांतील २०० लोक तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनचे सभासद आहेत व ते सुधारलेल्या जातीचें बीं व औतें वापरतात. ताली व बंधारे घालण्याचें काम करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. गांवांतील रस्ते बऱ्या स्थितींत आहेत. गावकऱ्यांनीं नुकतीच एक सोसायटी स्थापन केली आहे. गांवाच्या हद्दींतील लागवडीचें क्षेत्र चालू वर्षी २५% वाढलें आहे.

### छपाईसाठी कागद कमी वापरा

(१) समास अगदीं लहान सोडा.
(२) समासांत हेडिंग न घालतां तें मजकुरांतच घाला.
(३) नवीन प्रकरण नव्या पानावर सुरू करूं नका.
(४) कागदाचे एकाच बाजूवर चित्रें छापूं नका.
(५) चित्राभोंवतालच्या जागेवरहि मजकूर कंपोज करा.
(६) शक्यतों लहान टाइप वापरा.
(७) डबल कॉलमी छपाईचा अवलंब करा.
(८) कमी कागद वापरा व वापरावयाच्या कागदाचा प्रत्येक कोपरान् कोपरा उपयोगांत आणा.

### रावळगांव शुगर फार्म लि.

वरील कंपनीचा रावळगांव ( जि. नाशिक ) येथें साखर कारखाना आहे. कंपनीनें ३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षाच्या नफ्यांतून ऑर्डिनरी भागीदारांस १४% करमाफ व डिफर्ड भागीदारांस ७% डिव्हिडंड दिलें. डिफर्ड भागांवरील डिव्हिडंडमधून प्राप्तीवरील कर कापून घेतला जाईल.

### वृक्षारोपण

अलिबाग तालुका प्रात्यक्षिक केंद्रातर्फे एक दिवस वृक्षारोपण दिन म्हणून पाळण्यांत आला. ह्या प्रसंगीं कुलाबा जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं हापूसचें कलम लावलें व दहा कलमें शेतकऱ्यांना दिलीं. जंगल खात्यानें दिलेल्या १०० फरच्या झाडांपैकीं ८५ लावण्यांत आलीं. जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांनीं वृक्षारोपणाचें महत्त्व समजावून सांगितलें.

### रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर

श्री. सी. डी. देशमुख, बँकेचे १९४१ पासून डेप्युटी गव्हर्नर, ह्यांस बँकेचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांच्या मृत्यूनंतर नवीन नेमणूक होईपर्यंत गव्हर्नरचे अधिकार देण्यांत आले होते. श्री. देशमुख ह्यांची गव्हर्नर म्हणून नेमणूक आतां जाहीर झाली आहे. मि. सी. आर. ट्रेव्हर व मि. वजाहत हुसेन ह्या दोघांची डेप्युटी गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली आहे.

### पेटंट्स

अमेरिकेंत प्रत्येक आठवड्यास सुमारे एक हजार पेटंटें देण्यांत येतात.

### ब्रिटॅनिया बिस्किट कं. लि.

वरील कंपनीस ३१ मार्च अखेरच्या सहामाहींत १ लक्ष, ६९ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड व २½% बोनस मिळणार आहे. मुंबई व कलकत्ता येथील कंपनीचे कारखाने कच्च्या मालाच्या पुरवठ्याचे अभावीं मधूनमधून कांहीं काळ बंद होते, त्याचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला. कलकत्त्याहून कांहीं यंत्रसामुग्री आणून मुंबईच्या कारखान्यांत बसविण्यांत आली. कंपनीच्या बिस्किटांच्या उत्पादनापैकीं ९५% उत्पादन सरकार घेत आहे. लोकांच्या उपयोगासाठी माल पुरवितां येईना, म्हणून कंपनीनें १९४२ अखेर दिल्लीचा आपला डेपो बंद केला. कंपनीचें भाग भांडवल १३½ लक्ष रुपये असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड ५ लाखांचे वर आहेत.

### टाटा ऑइल मिल्स लि. चे बोनस शेअर

वरील कंपनीनें ३१ मार्चअखेर संपलेल्या वर्षी १ कोटि, ८० लक्ष रुपयांची विक्री केली. १९४२ मधील विक्रीचा आकडा १ कोटि, ३ लक्ष रुपये होता व १९४१ मधील विक्री फक्त ९४ लक्ष रुपयांची होती. ठोक नफा २३ लक्ष रुपये झाला व निव्वळ नफा १२ कोटि, ८९ लक्ष रुपये भरला. कंपनीनें ४% डिव्हिडंड दिलें व प्रत्येक २० भागास एक २५ रुपयांचा एक भाग ह्याप्रमाणें बोनस शेअर दिले. ह्या बोनस भागाची किंमत ५% डिव्हिडंड इतकी आहे. २५ रुपयांच्या भागाची आज बाजारभावानें होणारी किंमत ९४ रुपये आहे. कंपनीच्या स्थापनेस २५ वर्षे पुरी झाली. त्यानिमित्त बोनस शेअर देण्यांत येत आहेत व त्यासाठी डिफेन्स ऑफ इंडियाच्या ९४ अ नियमानुसार सरकारची मंजुरी मागण्यांत आली आहे. अशा रीतीनें २,७५,७५० रुपयांचे ११,०३० ऑर्डिनरी भाग निर्माण होतील.

### हॉटेलांतील खोल्या

अमेरिकेंतील सर्व हॉटेलांत मिळून १४,४५,४१५ खोल्या आहेत. प्रत्येक १०० नागरिकांस एकापेक्षा अधिक खोली, असें प्रमाण पडलें.

### दुय्यम नाणीं

अमेरिकेंत दुय्यम नाण्यांचें उत्पादन पुष्कळच वाढलें आहे, हे खालील आकडे दर्शवितील:—

| | पेनी | निकल्स | डाइम्स |
|---|---|---|---|
| १९३८ | १९ कोटि | ३½ कोटि | ३½ कोटि |
| १९४१ | १११ कोटि | ३० कोटि | २६½ कोटि |

### मुंबई प्रांतांतील खेडीं

मुंबई प्रांतांत १९४१-४२ अखेर २२,८४५ खेडीं होतीं. १९४१-४२ मध्यें सुरत जिल्ह्यांतील दोन खेडीं शेजारच्या खेड्यांशीं एकत्रित करण्यांत आलीं.

### तुर्कस्तानाची हिंदी कापडाची खरेदी

तुर्कस्तान पूर्वी इंग्लंडकडून कापड विकत घेत असे; आतां हिंदुस्थानांतून तें आणणें त्यास अधिक सोईचें पडतें. हिंदुस्थानानें ५०० टन सूत अगोदरच पाठविलें आहे व १,७५० टन कापड अद्याप तिकडे जावयाचें आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २५८ | अन्नपुरवठा—सर ज्वालाप्रसाद ह्यांचें आश्वासन—श्री. देशमुखकृत आढावा—शेअर्यांचा युद्धोत्तर उपयोग—युद्धास नवीन समाधानकारक वळण—चलन विस्ताराचें सरकारी समर्थन | |
| २ अन्नपुरवठा चर्चेची फलश्रुति ... | २५९ | | |
| ३ मुंबईमधील बाजारभाव | २६० | | |
| ४ प्रो. शहा यांचें नवें पुस्तक | २६० | | |
| ५ हिंदी उद्योगधंद्यांची जंत्री | २६० | | |
| ६ स्फुट विचार ... | २६१ | | |
| कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें | | ७ कंपन्यांची भांडवल उभारणी | २६३ |



# अर्थ

बुधवार, ता. १८ ऑगस्ट, १९४३


## अन्नपुरवठा चर्चेची फलश्रुति

हिंदुस्थानच्या अनेक भागांत धान्यपुरवठ्याच्या अपुरेपणाविषयीं सारखी ओरड चालली आहे, आणि अलीकडे बंगालमध्यें ह्या संबंधांतली परिस्थिति अति बिकट झाल्याकारणानें ह्या सबंद प्रश्नाच्या मध्यवर्ती असेंब्लींत होऊं घातलेल्या चर्चेकडे लोकांचें लक्ष लागून राहिलें होतें. अन्न पुरवठ्याची समाधानकारक व्यवस्था लावण्याच्या हेतूनें आणि सर्व देशभर धान्याची वाटणी समतेच्या तत्त्वावर होण्याच्या दृष्टीनें धोरण आखण्यासाठीं हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें अनेक परिषदा भरल्या आहेत आणि ह्या प्रकारची परिषद् भरून फार आठवडे झालेले नाहींत. धान्य पुरवठ्याचा कारभार हाकण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें स्वतंत्र खातें निर्माण केलें व त्याकरितां एक स्वतंत्र चिटणीस नेमला. हें सर्व काम कार्यक्षम रीतीनें व्हावें म्हणून त्यानें इंग्लंडहून तज्ञ आणवले आहेत. सर्व मोठ्या शहरांत शिधा पद्धति चालू करावी असें ठरलें असून त्या बाबतींतले तज्ञ मि. कर्बी ह्यांनीं कित्येक शिफारशी केल्या आहेत असें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. तथापि हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांत व संस्थानांत होणारें धान्याचें उत्पादन आणि त्यांतील लोकांच्या किमान गरजा ह्यांचा मेळ घालण्याचें काम कोणी व कसें करावयाचें हा प्रश्न शिल्लक रहातो आणि त्या संबंधांत मध्यवर्ती सरकारनें कोणतें धोरण स्वीकारलें आहे हें जाणण्याची असेंब्लीच्या सभासदांची इच्छा होती. त्यांनीं आपापल्या दृष्टीनें सरकारवर कडक टीका केली, पण दोन दिवसांच्या चर्चेच्या अखेरीस त्यांस निश्चयात्मक असें उत्तर मिळालें नाहीं.

देशाच्या सर्व भागांस उपलब्ध धान्यांच्या पुरवठ्याचा योग्य अंश मिळण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनेंच त्या विषयींचें नियमन स्वतःच्या हातीं घेतलें पाहिजे हें मत एकदां बहुमान्य झालें असल्याचें दिसत होतें. जरूर पडल्यास हिंदुस्थान सरकार कोट्यवधि रुपये खर्च करून धान्याचा पुरवठा स्थानिक गरजा भागवून अधिक असेल अशा प्रांतांत तें खरेदी करील आणि तुटवडा असेल त्या प्रांतांस तें पुरवील हें धोरण अखेरीस सुटून प्रांतिक सरकारांनीं मध्यवर्ती सरकारच्या हस्तक्षेपाची अपेक्षा न करतां परस्परांशीं बोलणीं करून स्वतःच्या अन्नविषयक गरजा भागवाव्या हें खुल्या व्यापाराचें तत्त्व त्याच्या जागीं आलें. ह्या धरसोडीच्या धोरणामुळें घोटाळा उत्पन्न झाला आणि कांहीं प्रांतिक सरकारच्या विचित्र वागणुकीमुळें मध्यवर्ती सरकारच्या धोरणांत बदल करणें भाग पडलें असा निष्कर्ष अन्न मंत्री, सर अझीझुल हक, ह्यांच्या असेंब्लींत झालेल्या भाषणावरून निघतो. बंगालच्या तांदुळाच्या पुरवठ्याबाबतच्या आजच्या हलाखीबाबतची सर्व जबाबदारी त्यांनीं तेथील माजी मंत्रिमंडळावर टाकली. ह्या मंडळानें आमच्या प्रांतास तांदुळाचा पुरवठा बाहेरून होण्याची आवश्यकता नाहीं असें गेल्या डिसेंबरमध्यें भरलेल्या अन्न परिषदेंत ठासून सांगितल्याकारणानें इतर प्रांतांनीं आपापल्यापुरती व्यवस्था केली. आतां बंगालमध्यें तांदुळासंबंधानें हाकाटी चालली आहे आणि तो पुरवण्याची मध्यवर्ती सरकार तजवीज करीत आहे असेंहि त्याच्या वतीनें सांगण्यांत आलें. हिंदुस्थान सरकारच्या निरनिराळ्या प्रांतांस धान्यपुरवठाविषयक धोरणाचे अंमलबजावणीच्या मार्गांत अनेक अडथळे कसे उत्पन्न केले गेले आणि त्या कारणानें नियमन सोडून देऊन खुल्या देवघेवीचें धोरण त्यास कसें पत्करावें लागलें ह्याचा इतिहास अन्न मंत्र्यांनीं निवेदन केला. मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांचे दरम्यान आवश्यक असलेलें सहकार्य झालें नाहीं आणि त्या सरकारच्या योजनेची अंमल बजावणी वाटेंत उपस्थित करण्यांत आलेल्या विघ्नांमुळें होऊं शकली नाहीं ह्या त्यांनीं प्रांजळपणानें केलेल्या विधानानें अन्न पुरवठा परिस्थितीच्या गोंधळाची कल्पना येते.

जुलैमध्यें भरलेल्या दिल्ली येथील अन्न परिषदेनें हिंदुस्थान सरकारनें धान्य पुरवठ्याची जबाबदारी पुन्हां स्वतःकडे घ्यावी असें सुचवलें आणि ती शिफारस मान्य करण्यांत आली असल्याचें सर अझीझुल हक ह्यांनीं सांगितलें. मध्यवर्ती असेंब्लींत अन्न पुरवठा प्रकरणीं अनेक सभासदांचीं कडक टीकाप्रचुर भाषणें झालीं आणि त्यांनींहि हिंदुस्थान सरकारनें धान्याची योग्य वाटणी प्रांतांमध्यें करण्याचें काम स्वतः करावें असें सुचवलें. धान्याची परदेशीं निर्गत झाल्याकारणानें सध्याची टंचाई उत्पन्न झाली आहे ह्या टीकेस अनुलक्षून अन्न मंत्र्यांनीं बाहेर गेलेल्या धान्याचें प्रमाण अत्यंत अल्प व उपेक्षणीय आहे असें आंकडे देऊन सांगितलें आणि प्रांतिक सरकारें, व्यापारी व जनता ह्यांच्या पूर्ण व हार्दिक सहकारावाचून धान्याच्या टंचाईचा प्रश्न सुटणें अशक्य आहे असें बजावलें. बंगाल सारख्या विशेष हलाखीच्या प्रांतास धान्य पुरवण्याची शिकस्त करण्यावर हिंदुस्थान सरकार आपलें शक्तिसर्वस्व तूर्त वेचीत आहे आणि सध्याची आपत्ति टळल्यानंतर अखिल भारतीय धोरणाचा प्रश्न हातीं घेण्यांत येईल; तथापि तें धान्य वाटणीची समाधानकारक व्यवस्था अंमलांत आणण्याची शिकस्त करील असेंहि आश्वासन त्यांनीं दिलें. आपल्या पुढील धोरणाची परिस्फुटता आतांच झाल्यास तिचा गैरवाजवी फायदा स्वार्थी व्यापारी वगैरे लोक घेतील अशी भीति प्रदर्शित करून त्या संबंधांत निश्चित असें कांहींहि सांगण्याचें त्यांनीं नाकारिलें. धान्य पुरवठ्याची व्यवस्था पहाण्याचें एकमेव काम एका मंत्र्याकडे द्यावें ह्या सूचनेचा स्वीकार सरकारनें केला आहे. दूरवर दृष्टी ठेवून हिंदुस्थानच्या अन्नपुरवठ्याचे संबंधांत काय केलें पाहिजे ह्याचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या समितीचा रिपोर्ट तयार झाला आहे आणि त्याचा योग्य परामर्श घेऊन मध्यवर्ती सरकार धोरण आखील असें सांगण्यांत आलें आहे. कांहीं झालें तरी अन्न पुरवठ्याचा विषय राष्ट्रीय महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा असून त्याचा युद्ध-प्रयत्नाशीं निकट संबंध आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकारनें तो समाधानकारक रीतीनें सोडवण्यासाठीं आपल्या अधिकाराचा पूर्ण उपयोग केला पाहिजे. स्वतःच्या मार्गांतील अडचणींचा पाढा वाचण्याचा प्रसंग सर अझीझुल हक ह्यांचेवर आला ही घटना कोणासहि इष्ट वाटणार नाहीं आणि त्याची पुनरावृत्ति न होण्याची खबरदारी घेतली जाणें अगत्याचें आहे.

## मुंबईमधील बाजारभाव

**आठवड्याचे घाऊक बाजारभाव, १२ ऑगस्ट, १९४३**

| जिनसाचें नाव | मालाचा प्रकार | किंमतीचें माप | किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| | | | (८२ पौंडाचा मण) |
| १ गहू | | " | १३—१—० |
| २ ज्वारी | | " | १०—८—० |
| ३ बाजरी | | " | ७-१०-० |
| ४ तुरीची डाळ | कानपूर | " | १६—५—० |
| | | | ते १६-१४-० |
| ५ " " | सुरत | " | १८-११-० |
| " " | " | , | ते २०-११-० |
| ६ हरबरा " | पंजाब तांबडा | " | १९-१०-० |
| ७ " " | " पिवळा | " | २०—०—० |
| ८ मूग | मोगलाई नं. १ | " | १२-१३-० |
| | | | ते १२-१५-० |
| ९ " | " नं. २ | " | १०—१—० |
| | | | ते १०—३—० |
| १० " | " नं. ३ | " | ९-१२-० |
| ११ तांदूळ | (अ) स्पेशल | " | ४९—०—० |
| | (ब) पहिली प्रत | " | २४—०—० |
| | (क) दुसरी प्रत | " | ११—८—० |
| १२ साखर यु.पी. | | " | १६—५—० |
| | | | ते १६—९—० |
| १३ " दक्षिण | | " | १५-११-० |
| | | | ते १५-१५-० |
| १४ गूळ | कोल्हापूर | " | २४—८—० |
| | | | ते १६—५—० |
| १५ " | कोपरगांव | " | १७—४—० |
| | | | ते १८—३—० |
| १६ शेंगदाणा | खानदेश | " | |
| १७ " | खानदेशी जात | " | १५—७—० |
| १८ " | कऱ्हाड | " | १४-११-० |
| १९ " | मोठा | " | १४-११-० |
| २० आळशी | मोठी | " | ११—०—० |
| २१ " | लहान | " | १०-१०-० |
| २२ भुईमूग तेल | | " | ३१—७—० |
| २३ आळशी तेल | | " | ३१—७—० |
| २४ नारळ तेल | | " | ३१—७—० |
| २५ भुइमूग पेंड | | " | ३—५—० |
| २६ बटाटे | डीसा | " | ३२—५—० |
| २७ कांदे पुणें व नाशिक | पहिली प्रत | " | ५—५—० |
| | | | ते ५-१०-० |
| २८ " | दुसरी " | " | ४-१३-० |
| | | | ते ५—१—० |
| २९ " | तिसरी " | " | ४—०—० |
| | | | ते ४-११-० |
| ३० देशी लोणी | खानदेश | " | ११४-१०-० |
| ३१ " " | बेळगांव | " | ९९-१४-० |
| ३२ तूप | पोरबंदर | " | १५७—४—० |
| ३३ " | गुजरात | " | १४९-१४-० |
| ३४ " | हाथरस | " | १३२—४—० |
| ३५ " | बेळगाव | " | १२९—४—० |
| ३६ " | खानदेश | " | १३८—१—० |
| ३७ दूध, सकाळचें | | " | ३०—०—० |
| ३८ " संध्याकाळचें | | " | ३०—०—० |
| ३९ अंडीं, घाऊक, न निवडलेलीं | | ५५० अंड्यांची टोपली | ५०—०—० |

### प्रो. के. टी. शहा ह्यांचें नवें पुस्तक

"हिंदुस्थान युद्धखर्च कसा सोशीत आहे?" ह्या नावाचें एक पुस्तक प्रो. के. टी. शहा ह्यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनी इतर संयुक्त राष्ट्रांच्या युद्धखर्चाची छाननी करून हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या कर्जाची व बसविलेल्या करांची माहिती दिली आहे. सरकारनें कराच्या स्वरूपांत जास्त रकम जमा करावयास पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानाचें इंग्लंड-मधील साठलेलें येणें युद्धसमाप्तीनंतर रद्द तर केलें जाणार नाहींना? अशी त्यांनीं भीति व्यक्त केली आहे. पौंडाची किंमत युद्धानंतर उतरली, तर हिंदुस्थानाचें नुकसान होईल, हेंहि त्यांनीं नमूद केलें आहे. रुपया व पौंड ह्यामधील दुवा नाहींसा करून, युद्धानंतर रुपयाची आंतरराष्ट्रीय बाजारांत ठरेल ती किंमत ठरूं द्यावी, असें त्यांचें मत आहे. सरकारनें अमेरिकेकडून सोनें मिळवून युद्धकाळांत अमेरिकेंतच तें ठेवून, त्याचे तारणावर हिंदुस्थानानें नोटा काढाव्या अशीहि त्यांची सूचना आहे. प्रातिनिधिक मध्यवर्ती सरकारच्या आवश्यकतेवर त्यांचा विशेष भर आहे.

### हिंदी उद्योगधंद्यांची जंत्री

ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशननें हिंदी उद्योगधंद्यांची माहिती देणारें एक पत्रक तयार केलें आहे, त्यांत उद्योगधंद्यांचें मोठे, मध्यम व लहान असें त्यांतील वसूल भांडवलाचे आधारावर वर्गीकरण केलें आहे. ३० लाखांपेक्षा अधिक वसूल भांडवलाचे मोठे, १ ते ३० लाख वसूल भांडवलाचे मध्यम व १ लाखाखा-लील भांडवलांचे लहान, असें वर्गीकरण करून त्यांतील वेगवे-गळ्या उद्योगधंद्यांची छाननी करण्यांत आली आहे. मोठ्या उद्यो-गधंद्यांत कपास सूत-कापडाच्या गिरण्या, तागाच्या गिरण्या, लोखंड पोलादाचे कारखाने व हैड्रो-इलेक्ट्रिक कंपन्या असा अनुक्रम येतो. कापडाच्या व तागाच्या गिरण्यांत गुंतलेल्या कामगारांची संख्या मोठ्या उद्योगधंद्यांतील कामगारांच्या संख्येच्या ८०% भरते. ह्या दोन प्रकारच्या गिरण्यांतील वसूल भांडवल मोठ्या उद्योगधंद्यांतील वसूल भांडवलाच्या फक्त ३४·६३% आहे. तागाच्या कारखान्यांतील मजुरीचें प्रमाण मात्र खाली आहे. एकूण उत्पादनाच्या ४८·४४% उत्पादन ह्या दोन प्रकारच्या गिरण्यांचें आहे. लोखंड-पोलादाच्या कारखान्यांची संख्या फक्त ३ च असली तरी त्यांतील वसूल भांडवल वरील सर्व कापड गिरण्यांतील भांडवलाची बरोबरी करील. नफ्याचे दृष्टीनें लोखंड पोलादाचे कारखाने सर्व प्रकारच्या मोठ्या उद्योगधंद्यांत पहिला अनुक्रम मिळवितात.

## स्फुट विचार

### कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें अन्न पुरवठा

मध्यवर्ती असेंब्लीप्रमाणें कौन्सिल ऑफ स्टेटमध्येंहि अन्न-पुरवठ्याच्या प्रश्नाची चर्चा झाली. तीमध्यें नवीन मुद्दे येणें अर्थातच शक्य नव्हतें. धान्याचा व्यापार आनियंत्रित असेल तर त्याच्या किंमती उतरून त्याची सर्व प्रांतांत जरूरीप्रमाणें वाटणी होईल हें मत जरी कांहीं सभासदांनीं व्यक्त केलें असलें तरी आपापल्या गरजांकडे पहाण्याची मुभा प्रांतिक सरकारांस न देतां मध्यवर्ती सरकारनें ह्याबाबतची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असाच अभिप्राय सर्वसाधारणपणानें मान्य झालेला आहे. अन्नपुरवठा खात्याचे चिटनवीस, जनरल वुड, ह्यांनीं मध्यवर्ती सरकारची बाजू पुढें मांडतांना सांगितलें कीं, तें सरकार सर्व देशासाठी एक धोरण आखूं शकतें पण त्याची अंमलबजावणी प्रांतिक सरकारांनीं करावयाची असते. मध्यवर्ती सरकाराच्या सत्तेखाली प्रांतांमधली धान्याची वाटणी करण्यास स्वतंत्र असें साधन नसल्यानें त्यास प्रांतिक सरकारांच्या ओंझळीनेंच पाणी पिणें प्राप्त आहे. मध्यवर्ती सरकार योजना आखील, त्यामध्यें एकसूत्रीपणा आणण्याची शिकस्त करील, पण त्याच्यापलीकडे त्यास जाता येत नाहीं. सहा महिन्यांच्या मागें ह्याप्रमाणें त्यानें आखलेली योजना अयशस्वी झाली आणि देशाच्या पूर्व भागांत त्यास पुरवठ्याचें नियंत्रण काढून टाकावें लागलें. अन्नपुरवठ्यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नाचे बाबतींत प्रांतांचें सहकार्य होऊं नये आणि त्या कामीं मध्यवर्ती सरकारनें दुबळेपणा दाखवावा हें आश्चर्यकारक व शोचनीय आहे असें कायदेमंडळाच्या सभासदांस व सामान्य जनतेस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. गेल्या अन्न परिषदेनेंहि मध्यवर्ती नियंत्रणास पाठिंबा दिला होता हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

### सर ज्वालाप्रसाद ह्यांचें आश्वासन

राष्ट्रीय महत्त्वाच्या सर्व बाबी मध्यवर्ती सरकारच्या अधिकारांत येतात आणि युद्धपरिस्थितींत तर हें राष्ट्रीय नियंत्रण कडक असलें पाहिजे हें उघड आहे. असें असतां अन्नाच्या वाटणीचे संबंधांत प्रांतिक स्वायत्ततेची अडचण पुढें येत आहे तिचेविषयीं लोकमत व्यक्त झालें आहे त्याकडे मध्यवर्ती सरकारानें लक्ष दिलें पाहिजे. प्रांतिक व संस्थानी सरकारांचें सहकार्य युद्धप्रयत्नाचे इतर बाबतींत त्यास जसें मिळत आहे तसेंच तें अन्न पुरवठ्याचे वाटणींत कां मिळूं नये हें समजणें कठिण आहे. अन्नखात्याचे नवे मंत्री सर ज्वाला प्रसाद ह्यांनीं जनरल वुड ह्यांच्या पुढें जाऊन कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें झालेल्या टीकेस उत्तर देतांना असें आश्वासन दिलें कीं, मध्यवर्ती सरकार प्रांतिक सरकारांच्या स्वायत्ततेविषयीं घटनात्मक कल्पनांस न जुमानतां स्वतःचें नियंत्रणात्मक धोरण अंमलांत आणील आणि धान्यपुरवठ्याचा प्रश्न लोकांच्या सहकारितेनें सोडविण्याची शिकस्त करील. शहरांतील शिधापद्धतीस धान्याच्या वाटणीची योजना मर्यादित न होतां ती सबंध देशास लागू करण्यांत येणें अगत्याचें आहे. मध्यवर्ती कायदे मंडळांतील लोकप्रतिनिधींच्या टीकेचा हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांवर आवश्यक तो परिणाम होईल अशी अपेक्षा आहे.

---

### हिंदी चलन परिस्थितीचा श्री. देशमुखकृत आढावा

रिझर्व्ह बँकेची नववी वार्षिक साधारण सभा कलकत्ता येथें सोमवार, ता. ९ रोजीं भरली होती. त्या प्रसंगीं बँकेचे डेप्युटि गव्हर्नर, मि. सी. डी. देशमुख, सी. आय. ई. ह्यांनीं अध्यक्षस्थानावरून भाषण करतांना हिंदी चलनाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. आर्थिक व्यवहारांच्या गरजेच्या मानानें चलनवाढ फार ज्यास्त झाली, ह्याचीं मुख्य कारणें लोकांस नेहमी लागणाऱ्या जिनसांचा तुटवडा व किंमतींत एकदम झालेली चढ हीं होत असें ते म्हणाले. लोकांस आवश्यक असणाऱ्या जिनसांचा पुरवठा वाढवणें, बचतीस प्रोत्साहन देणें व मालाची वाटणी योग्य करून त्याची किंमत मर्यादेंत ठेवणें, हे उपाय चलनवाढीवर त्यांनीं सुचविले. ह्या प्रश्नासंबंधानें सरकारी विचारसरणी व हिंदी अर्थशास्त्रज्ञांचें मत ह्यांतील तफावत "अर्थ"मध्यें वेळोवेळ स्पष्ट करून सांगितलेलीच आहे. चलनविस्ताराचें मुख्य मूळ व त्यामागील सरकारी धोरण ह्यांचा उल्लेख श्री. देशमुख ह्यांचे भाषणांत आला नाहीं. सध्या मुंबई व कलकत्ता येथील टांकसाळींत नाणीं पाडण्यांत येतात. तिसरी टांकसाळ लवकरच सुरू झाली, म्हणजे दुय्यम नाण्यांचा पुरवठा भरपूर होईल. तथापि, "लोकांचीं डोकीं जाग्यावर आलीं, म्हणजे दुय्यम नाण्यांचा पूर उलट दिशेनें सुरू होईल व परत येणाऱ्या नाण्यांचें काय करावें, हें ठरविणें कठीण जाईल" अशी भीति श्री. देशमुख ह्यांनीं व्यक्त केली. नाण्यांच्या टंचाईच्या आजच्या बिकट परिस्थितीपेक्षां ती आपत्ती कमी तापदायक होईल, हें स्पष्टच आहे. आजच्या टंचाईस त्यांनीं मुख्यतः नाणीं साठवून ठेवण्याची प्रवृत्ति कारणीभूत आहे, असें सांगितलें व त्याचें कारण नफेबाजी व चलनाबाबत खोटी विचारसरणी हें आहे, असें ते म्हणाले.

---

### चलनाच्या तारण-रोख्यांचा युद्धोत्तर उपयोग

हिंदी चलनास तारण असलेलें सर्व सोनें हिंदुस्थानांतच सुरक्षित आहे व त्याची बँकेच्या ३३ व्या कलमाप्रमाणें ठरविलेली किंमत सध्याच्या बाजारभावाप्रमाणें तिपटीपेक्षा अधिक भरेल, ही गोष्ट लोकांच्या नजरेस आणली पाहिजे, असें त्यांनीं आग्रहपूर्वक सांगितलें. तारण असलेल्या सोन्याची किंमत तिप्पट झाली असली, तरी प्रसृत नोटांशीं सोन्याच्या तारणाचें प्रमाण कसें कमी होत गेलें आहे व स्टर्लिंग रोख्यांच्या तारणाचें प्रमाण कसें वाढत चाललें आहे, हेंहि त्याचबरोबर स्पष्ट केलें असतें, तर हिंदी चलनविषयक परिस्थितीवर चांगला प्रकाश पडला असता. तारण सोन्याचा आकडा (४४ कोटि, ४२ लक्ष रु.) युद्धापूर्वीपासून कायमच आहे, परंतु पौंडांतील रोख्यांचा आकडा मात्र ७८ कोटींवरून ५६० कोटींवर आला आहे. हिंदी चलनास पुरेसें तारण नाहीं, असें कोणीच म्हणत नाहीं. परंतु चलनविस्तार आखडता घेतला, म्हणजे पौंडांतील रोख्यांची हिंदुस्थानांत वसुली कशी करावयाची, हा प्रश्न उपस्थित होईल. दुय्यम नाण्यांची संख्या कमी करण्याच्या आपत्तीपेक्षा हा प्रश्न खास ज्यास्त महत्त्वाचा आहे. युद्धानंतर हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी ब्रिटिश यंत्रसामुग्री व माल आणावा लागेल, त्यासाठीं इंग्लंडमधील रोख्यांचा उपयोग होईल व त्याबाबत काळजीचें कारण नाहीं, असें श्री. देशमुख ह्यांनीं खात्रीपूर्वक सांगितलें. हिंदी बँकांनीं आपले पैसे तरते ठेवून युद्धपरिस्थितीस अनुरूप आपलें धोरण आखलें, ह्या-

बद्दल श्री. देशमुख ह्यांनीं समाधान व्यक्त केलें व जेथें पूर्वी
बँकिंगची सोय नव्हती अशा ठिकाणीं शाखा स्थापन करण्याची
बँकांची प्रवृत्ति त्यांनीं वाखाणली. बाजारभावांतील चढउतार व
त्याचा लोकांवर झालेला विषम परिणाम ह्यांकडे लक्ष वेधून, ठरा-
विक उत्पन्नाच्या लोकांची परिस्थिति वाईट झाल्याचें त्यांनीं सांगि-
तलें. ह्यासंबंधांत सट्टेबाजीस आळा घालून परिस्थिति सुधारण्या-
बाबत सरकारनें दिलेल्या आश्वासनाचा त्यांनीं उल्लेख केला.
एकंदर आर्थिक व चलनविषयक परिस्थिति समाधानकारक आहे,
असा त्यांचा भाषणाच्या माथितार्थ आहे.

---

### युरोपांत युद्धास नवीन समाधानकारक वळण

युरोपांतील पूर्व आघाडीवर रशियन सैन्यांनीं जर्मन फौजांस
ओरेलच्या पश्चिमेस व खारकॉव्हपर्यंत मागें ढकलण्यांत यश
संपादन केलें आहे तें कौतुकास्पद आहे. जर्मनीची पूर्वेकडील
चढाई थोपवून धरून उलट शत्रूस जोरानें मागें हाटवण्याचा हा
रशियाचा पराक्रम हिटलरला अनपेक्षितच असला पाहिजे. हिटल-
रच्या चढाईच्या लढायांचें रुपांतर बचावाच्या लढ्यांत झालें असून
रशियन चढाईचा लोंढा आतां कोठें थांबणार याची चिंता त्यास
लागली असली पाहिजे. रशियन मोहीम एका बाजूनें आंगलट
आली त्याच वेळीं सिसिलीमधून जर्मन फौज काढून घेतां घेतां
हिटलरच्या नाकीं नव आले आहेत. केवढ्या तरी मोठ्या फौजेस
व लढाऊ सामुग्रीस त्यास सिसिलीमध्यें मुकावें लागलें आहे.
इटलीवरील आपली पकड सैल होऊं द्यावयाची नाहीं आणि स्वतः-
च्या संरक्षणासाठी त्या देशाचा बळी द्यावयाचा असा त्याचा
बेत दिसतो. मुसोलिनीच्या जागीं आलेल्या नवीन इटालिअन
राजसत्तेस स्वतंत्रतेनें वागण्याचें सामर्थ्य आहे असें दिसत नस-
ल्यानें मित्रराष्ट्रांस इटलीविरुद्ध युद्ध चालू ठेवणें अपरिहार्यच
आहे. आतां इटालिअन भूमीवर युद्धाचें लोण येऊन पोहोंचलें
आहे. खुद्द जर्मनीमध्यें ब्रिटिश व अमेरिकन वैमानिक प्रमुख औद्यो-
गिक शहरांवर सारखे हल्ले चढवून शत्रूचें लढाऊ बळ खच्ची
करीत आहेत. गेल्या तीन चार आठवड्यांत रशियन व सिसिलि-
अन आघाड्यांवर मित्र राष्ट्रांस एवढे मोठे व महत्वाचे
विजय मिळाले आहेत कीं युरोपांतील युद्धाच्या
कार्यक्रमाचा तातडीनें विचार करणें मि. चर्चिल, प्रेसिडेंट
रूझव्हेल्ट व स्टालिन ह्यांस अगत्याचें वाटलें आहे. कॅनडांत
क्वेबेक येथें मि. चर्चिल व प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांचा विचार विनि-
मय चालू झाला आहे आणि मॉ. स्टॉलिन ह्यांस ह्या चर्चेंत स्वतः
भाग घेतां आला नाहीं तरी त्यांच्या संमतीनेंच पुढील धोरण आख-
ण्यांत येत आहे हें उघड आहे. आतां युरोपांत दुसरी व तिसरी
आघाडी चालू करण्याचा इंग्लंड व अमेरिका ह्यांचा उद्देश आहे
असें दिसतें. रशियावरील जर्मनांचें दडपण आणखी हलकें कर-
ण्याचेंहि कार्य ह्या योगानें साधण्यासारखें आहे. जर्मनीचा चोहों-
कडून कोंडमारा करण्याची संधी आतां प्राप्त झाली असून त्या
राष्ट्रानें पादाक्रांत केलेल्या देशांतील लोक ह्या घटनेची वाट
उत्सुकतेनें पहात आहेत. पॅसिफिक महासागरांतहि मित्रराष्ट्रांच्या
वैमानिकांस वाढतें यश मिळत आहे आणि तिकडील युद्धपरि-
स्थितिहि अधिक अनुकूल होत चालली आहे.

---

### चलन विस्ताराचें सरकारी समर्थन

सरकारनें जरूरीच्या जिनसांच्या किंमती स्थिर रहातील असें
आपलें चलनविषयक धोरण ठेवावें या आशयाचा ठराव मध्यवर्ती
असेंब्लींत चर्चेसाठी गेल्या आठवड्यांत मांडण्यांत आला होता.
त्यावर भाषण करतांना फडनवीस, जेरेमी रेस्मन, ह्यांनीं सरकार-
च्या धोरणाचा खुलासा केला. वाढत्या चलनाचा परिणाम बाजार-
भाव वाढींत प्रत्यक्षपणें होत आहे अशी भीति गेल्या मे महिन्यांत
सरकारला वाटली होती अशी कबुली त्यांनीं दिली. पण पुढें जाऊन
ते म्हणाले कीं ह्या भीतीस आतां जागा राहिली नाहीं अशी सरकारनें
स्वतःची खात्री करून घेतली आहे. चलन वाढलें कीं किंमती
वाढल्याच पाहिजेत अशी स्थिति सध्या नाहीं. हिंदुस्थानासारख्या
अफाट व चाळीस कोटि लोकसंख्येच्या देशांत ७५० च काय,
पण १,००० कोटि रुपये किंमतीचें चलन जरी खेळत राहिलें
तरी ह्या वाढीनें बिचकून जाण्याचें कारण नाहीं असेंहि ते
उद्गारले. किंमतीचें नियंत्रण करण्याचें धोरण अलीकडे सरकारनें
स्वीकारलें असून कापड, चांदी व सोनें ह्यांच्या किंमती उतरल्या-
कारणानें हेंच धोरण विस्तृत केल्यास चलनवाढीमुळें महागाई
होण्याची भीति रहाणार नाहीं असें प्रतिपादण्याचा सर जेरेमी
ह्यांचा उद्देश होता. बाजारभाव निश्चित व नियंत्रित करणें,
नफेबाजी व सट्टेबाजी ह्यांस आळा घालणें, लोकांच्या बचतीस व
सरकारी रोख्यांच्या खरेदीस उत्तेजन देणें इत्यादि उपाय सरकारनें
एकाच वेळीं योजिले पाहिजेत म्हणजे व्यवहारांतलें खेळतें चलन
सरकारच्या तिजोरीकडे आकर्षिलें जाऊन त्याचा परिणाम
पदार्थांच्या किंमतींवर होणार नाहीं असें प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं
सुचवलें होतें. स्थिर बाजारभावानें विनिमयास आवश्यक
असलेलें तेवढें चलन व्यवहारांत खेळतें राहून बाकीचें
कर व कर्ज ह्यांचे मार्गानीं सरकारकडे परत यावें म्हणजेच
चलनाचा परिणाम महागाईत होणार नाहीं असें त्यांचें
म्हणणें होतें. त्यावर सर जेरेमी ह्यांनीं सांगितलें कीं लोकांच्या
हातांतील पैशाचा प्रवाह सरकारच्या तिजोरीकडे जोरानें वाहूं
लागला आहे आणि सर्व महत्वाच्या वस्तूंच्या किंमती स्थिर
केल्या जात आहेत, हें ठीक आहे. तथापि खेळतें व वाढतें चलन
आणि सरकाच्या तिजोरींत परत येणारें चलन ह्यांचें परस्पर प्रमाण
काय आहे हें स्पष्ट समजल्यावांचून चलन कितीहि वाढलें तरी
चिंता नाहीं हें विधान मान्य होण्याजोगें नाहीं. चलन ही कांहीं
खाण्यापिण्याची किंवा उपभोगाची अशी वस्तू नाहीं कीं जिचें
उत्पादन व विस्तार हीं सारखीं आपोआप समाजांत खपत जावीं
आणि त्यांचा परिणाम बाजारभावांवर होऊं नये, ही येथें
मुद्याची गोष्ट आहे. भरकें व फाजील चलन जिनसांच्या किंमती
चढल्यावांचून रहाणें शक्य नाहीं. हें चलन निरुपद्रवी असें करा-
वयाचें हाच येथें मुख्य प्रश्न आहे. देशाचा विस्तार आणि प्रचंड
लोकसंख्या ह्यांवरच केवळ चलनाच्या विस्ताराची आवश्यकता
अवलंबून नसते आणि हिंदी चलन ज्या गतीनें वाढत आहे त्या
गतीचें समर्थन सर जेरेमी रेस्मन ह्यांच्या युक्तिवादानें होऊं
शकत नाहीं.

---

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## नव्या-जुन्या कंपन्यांची भांडवल-उभारणी

### सरकारी परवानगी मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाचा तपशील

नवीन भांडवल उभारणीवर निर्बंध घालणारा ९४ वा डिफेन्स ऑफ इंडिया नियम सरकारनें जाहीर करून मध्यवर्ती सरकारचे पूर्वसंमतीशिवाय भांडवल उभारण्यास बंदी केली. ही संमति मिळविण्यासाठी कंपन्यांनीं एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज्, फिनॅन्स खातें, न्यू दिल्ली ह्या पत्त्यावर खालील प्रश्नांची माहिती देऊन अर्ज करावयास पाहिजे.

**( अ ) नवीन उद्योगधंदा, चालू कंपन्यांची नवी भांडवल मागणी**

( १ ) नांव—कंपनीचें सध्यांचें अथवा नियोजित नांव.

( २ ) नोंदणी—कोठें नोंदली, मुख्य कचेरीची जागा, पब्लिक कीं खासगी कंपनी.

( ३ ) कंपनीनें अथवा तिचे वतीनें १७ मे नंतर ह्यासंबंधांत पूर्वी अर्ज केला असल्यास, त्याचा तपशील.

( ४ ) ( अ ) नियोजित उद्योगधंद्याचें स्वरूप.

( ब ) धंदा कोठें चालविणार.

( ५ ) डायरेक्टर, वगैरे. त्यांचीं नांवें व त्यांच्या व्यवसायाचे पत्ते. ( नव्या कंपन्यांनीं उत्पादकांचीं व नियोजित डायरेक्टरांचीं नांवें, त्यांचा अनुभव, इत्यादि माहिती द्यावी. )

( ६ ) शेअर, डिबेंचर्स, इत्यादींच्या स्वरूपांत उभारावयाच्या रकमेचा तपशील—ऑर्डिनरी, प्रेफरन्स, डिफर्ड इ.

( ७ ) उभारणीचें स्वरूप—पब्लिक का खासगी ? अंडरराइट करणारांचें नांव, कमिशनची रकम, प्रॉस्पेक्टसनें कां सर्क्युलरनें विक्री इ.

(८) ( अ ) जमा होणारी रकम कोणत्या कारणासाठी खर्च-णार त्याचा तपशील.

( ब ) खर्चाच्या बाबींपैकीं कांहीं सरकारी नियंत्रणाखालीं असल्यास, त्या उपलब्ध होतील असें मानण्याचीं कारणें.

( क ) वहातुक—कारखाने, वर्कशॉप्स, इमारती, इत्यादि उभारावयाचे असल्यास.

(१) बांधणीचें सामान ( किती वजन अथवा वॅगन्स लागेल, कोठून कोठें तें न्यावें लागेल, इ. )

(२) कच्चा माल, कोळसा, इत्यादींच्या वहातुकीचा तपशील.

(३) नवीन उद्योगधंदा सुरू झाल्यामुळें सध्या होणाऱ्या वहातुकींत होणारी वाढ अथवा घट.

(ड) परदेशांतील खरेदी, हिंदुस्थानाबाहेरून किती मालाची खरेदी करावी लागेल, धंदा चालविण्यासाठी सतत माल आयात करावा लागणार असल्यास त्याचा तपशील.

(इ) चालू उद्योगधंद्याची खरेदी. खाली 'ब' सदरांत सांगि-तलें आहे त्याव्यतिरिक्त मार्गानें एखादा चालू उद्योगधंदा विकत घ्यावयाचा असल्यास खरेदीचा तपशील, किंमत कशी ठरविणार, इ.

(९) (अ) रोख रकम न घेतां द्यावयाच्या शेअर्स व डिबेंच-र्सचा तपशील.

(ब) अशा रीतीनें शेअर्स व डिबेंचर्स देण्याचीं कारणें.

(क) कोणास देणार, त्यांचीं नांवें.

(१०) सरकारी कंत्राटें. सरकारी खात्याकडून कंपनीस कांहीं कंत्राटें मिळण्याची खात्री अथवा अपेक्षा असल्यास, खात्याचें नांव, अपेक्षेचें कारण, इत्यादींचा तपशील.

(११) इतर माहिती.

(अ) अर्ज मंजूर व्हावा, ह्यासाठी आणखी कांहीं माहिती द्यावयाची असल्यास ती माहिती.

( ब ) चालू कंपन्यांनीं विकलेलें व वसूल भांडवल ह्यांचे आंकडे देऊन ताजा ताळेबंद अर्जाबरोबर पाठवावा. मूळ ताळेबंद इंग्रजींत नसल्यास त्याचें अधिकृत इंग्रजी भाषांतर.

( क ) नवीन कंपन्यांनीं मेमोरॅंडम व आर्टिकल्सचा आणि प्रॉस्पेक्टसचा मसुदा पाठवावा.

**( ब ) नवीन कंपन्या; चालू व्यवसायांचें लिमिटेड कंपन्यांत रूपांतर, नवीन भांडवलाची उभारणी**

१ ते ११ ( अ ) व ११ ( क ) ह्यांत विचारलेली सर्व माहिती देऊन आणखी खालील माहिती पुरवावी:—

( १२ ) सध्याच्या मालकांचीं नांवें व पत्ते; भागीदारी, वैय-क्तिक का कौटुंबिक मालकी.

(१३) (अ) उद्योगधंदा चालू झाल्याची तारीख

( ब ) त्याच्या घेण्या-देण्याचा तक्ता.

( क ) नवीन कंपनी कोणत्या किंमतीस उद्योगधंदा विकत घेणार—गुडविल, खेळतें भांडवल, जमीन ह्यांच्या किंमतीचा स्वतंत्र तपशील.

**(क) नव्या कंपन्या; चालू व्यवसायांचें लिमिटेड कंपन्यांत रूपांतर—नवीन भांडवल उभारणी नको आहे.**

१, २, ३, ४, ५, ९, ११ (अ), ११ (क), १२ व १३ हे प्रश्न व खालील प्रश्न ह्यांचीं उत्तरें द्यावीं.

(१४) भांडवल वाढविण्यासाठीं नाहीं तर डायरेक्टरांस पात्र करण्याकरितां, वगैरे करावयाची थोड्या शेअर्सची विक्री. ९ व्या प्रश्नाचीं उत्तरें द्यावीं.

**(ड) चालू कंपन्या—नवीन पैशाचा व्यवहार नाहीं. रिझर्व्ह अथवा नफा ह्यांचें भांडवलांत रूपांतर डिबेंचर्सचेऐवजीं शेअर्स देणें इ.**

१, २, ३, ४, ९ (अ) आणि (ब), ११ (अ) आणि (ब) ह्यांचीं उत्तरें देऊन नफा अथवा रिझर्व्हचें भांडवलांत रूपांतर करावयाचें असल्यास खालील माहिती द्यावी.

(१५) (अ) रिझर्व्ह फंड (ब) नफातोटापत्रक ह्यांतील नक्की आकडे.

( ब ) कराची पूर्णपणें तजवीज करून आकडे काढले आहेत काय ? नसल्यास ह्या तरतुदींची अंदाजी रकम.

( क ) ताळेबंदांत गुडविल जिंदगीचे बाजूस दाखविली परंतु ती स्वतंत्र दाखविली नसल्यास त्या रकमेचा तपशील.

( १६ ) रिझर्व्ह व नफा ह्यांचें भांडवलांत रूपांतर करण्याचा उद्देश.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

(Estd. in 1935)

## The Co-operators' Book Depot

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

*Books on* :—

Economics and Sociology; Co-operation and Rural Development; Banking and Finance; Accountancy and Auditing; Commerce and Industries etc.

Books on all other subjects are also readily supplied.

Agents for the Publications of:

1. The Govt. of India, 2 Govt. of Bombay, 3 Reserve Bank of India and 4 Times of India.

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

## THE FARMER
## HIS WELFARE & WEALTH

BY
DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY
DEWAN BAHADUR
SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*
**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT**
**Sir Vithaldas Thakersey Memorial Building**
**9 Bakehouse Lane, Fort, Bombay.**

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।७ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.


# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख २५ ऑगस्ट, १९४३ अंक ३४



मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२१ ए, सदाशिव, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय
पूना गेस्ट हाऊस
फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक

संरक्षण – सुरक्षितता – सेवा
हेंच आमचें ध्येय.
दि औंध म्युच्युअल
लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.
महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहाः—
मुंबईचे चीफ एजन्टस्
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगाव,
बॅक रोड, मुंबई ४.
हेड ऑफिस,
' रामनिवास ' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
| --- | --- | --- |
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.
मॅनेजर

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
साहिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेनें ३० जून अखेर संपलेल्या वर्षी १७ प्राथमिक बँकांना एकूण ३ लक्ष ९४ हजार रुपये कर्ज दिलें. त्यापूर्वीच्या वर्षी ५ लक्ष, ५४ हजारांची कर्जे देण्यांत आलीं होतीं. धान्य व जमिनी ह्यांच्या किंमतींत कमालीची वाढ झाल्यामुळें, जुनीं कर्जे भागविण्यासाठी लँड मॉर्गेज बँकांकडून कमी कर्जे घेण्यांत आलीं, त्याचा हा परिणाम आहे. अहवालाचे सालीं प्रांतिक बँकेची व्याजाची वसुली पुरेपूर झाली व येणें मुद्दलापैकीं ९७·८% मुद्दल वसूल झालें. बँकेस नफा १७ हजार रुपये झाला. भागीदारांस ३½% डिव्हिडंड मिळेल.

### दि को. पीपल्स बँक लि., धुळे

वरील बँकेचें भाग भांडवल ३,५७५ रुपये आहे व तिचेकडे ११ हजारांच्या ठेवी आहेत. कॅश क्रेडिटवर तिनें ११½ हजार रुपये व तारण गहाणावर सुमारें ७ हजार रुपये दिले आहेत. बँकेस ३० जून अखेरच्या वर्षी पूर्वीच्या कोणत्याहि दोन वर्षांच्या व्यवहारापेक्षां अधिक नफा झाला. मागील सालचा ५७८ रुपये नफा धरून, १२८३ रुपये नफा उरला. भागीदारांस ८% डिव्हिडंड मिळेल.

### उसास योग्य खत कोणतें ?

महाराष्ट्रांत होणाऱ्या उसाच्या पिकास जो खर्च येतो त्यापैकीं ४५% खर्च खताचा असतो. जमिनींत बिघाड होऊं न देतां योग्य रीतीनें खत कसें घालावें ह्या प्रश्नास सहाजिकच त्यामुळें महत्त्व प्राप्त होतें. पाडेगांव येथें ह्यासंबंधांत संशोधन १९३२ सालापासून चालू आहे, त्याचा निष्कर्ष देणारी माहिती मुंबई सरकारनें प्रसिद्ध केली आहे.

### लोकभ्रमाचें निराकरण

हिंदुस्थानांतून, विशेषतः बंगालमधून, अद्याप मोठ्या प्रमाणावर धान्यांची निर्गत चालू आहे, हा लोकभ्रम खोटा आहे हें सिद्ध करण्यासाठी सरकारनें निर्गतीचे ताजे अधिकृत आकडे प्रसिद्ध केले आहेत, ते खाली दिले आहेत.

| १९४३ | गहू (टन) | तांदूळ (टन) | एकूण (टन) |
|---|---|---|---|
| जानेवारी | १४० | १३,८३० | १३,९७० |
| फेब्रुवारी | १६६ | १९,०५८ | १९,२२४ |
| मार्च | ६ | १२,६१२ | १२,६१८ |
| एप्रिल | ३३ | ७,८१९ | ८,८५२ |
| मे | २१६ | ५,४७९ | ५,६९२ |
| जून | २०,३२१ | १०,१३६ | ३०,४८७ |
| जुलै | २८३ | २,००८ | २,२९१ |
| एकूण | २१,१६५ | ७०,९७२ | ९२,१३७ |

हिंदी वस्ती असलेल्या सिलोन, इराणचें आखात, आफ्रिका, इत्यादि क्षेत्रांकडेच ही निर्गत झालेली आहे. १९३७–३८ मध्यें ९ लक्ष टनाची निर्गत झाली होती. १९४२–४३ चा आकडा ३ लक्ष ७० हजार टन आहे.

### ६ हजार टन तांदूळ मुंबईत येणार

सिंध सरकारनें मुंबईकडे ६ हजार टन तांदूळ पाठविला आहे.

### १५० मैलांस १ दिवस मुक्काम करण्याची सवलत

रेल्वेनें प्रवास करतांना, सध्या प्रत्येक १०० मैलांस एक दिवस ह्याप्रमाणें वाटेंतल्या स्टेशनवर उतरून मुक्काम करतां येतो. १ सप्टेंबर १९४३ पासून पुढें जी. आय. पी. रेल्वेवर, १०० मैलांऐवजी १५० मैल प्रवासास एक दिवस वाटेंत मुक्काम करतां येईल, अशी नियमांत दुरुस्ती करण्यांत आली आहे. जी. आय. पी. प्रमाणें इतर रेल्वेहि हाच नियम लवकरच लागू करतील.

### हिंदी लष्करास लागणारा गहू व तांदूळ

हिंदी लष्करास दरसाल फक्त ५ लक्ष टन गहू व १ लक्ष ४४ हजार टन तांदूळ लागतो. हा गहू पंजाबांत पिकणाऱ्या गव्हाच्या एक अष्टमांशाइतकाच आहे व तांदूळ बंगालमधील उत्पादनाच्या एकासोळांशापेक्षा अधिक नाहीं.

### सोन्याच्या किंमतीचा उच्चांक

३१ ऑक्टोबर १९४२ रोजीं सोन्याची किंमत ७२ रुपये झाली; तेथून ती खाली जात १७ डिसेंबर रोजीं ६१ रु. ८ आण्यांवर आली. मार्चपर्यंत, सोन्याचा भाव ६४ रु. १० आ. व ७१ रु. १३ आ. ६ पै ह्यांचे दरम्यान होता. २६ एप्रिल रोजीं सोन्यानें ९६ रु. ४ आ. च्या दराचा उच्चांक गाठला. २४ जून नंतरच्या वायद्याच्या ऑप्शनच्या व्यवहारांस बंदी करण्याचें १८ मे रोजीं मुंबई बुलियन एक्सचेंजनें ठरविलें, त्याबरोबर १५ मे चा ९५ रु. ४ आ. चा भाव २९ मे रोजीं ७५ रु. ४ आण्यांवर घसरला. त्या दिवशीं सरकारनें सर्व वायदे व ऑप्शनचे करार बंद करून व्यवहार आटपते घेण्यास बारा दिवसांचा अवधि दिला. त्याबरोबर केलेले करार पुरे करण्यासाठी सोन्याची खरेदी वाढून सोन्याचा दर १ जून रोजीं ८६ रु. १२ आणे झाला त्यानंतर पुनः भाव खाली गेला त्याचा इतिहास ताजा आहे.

### कऱ्हाड बँकेचा रौप्यमहोत्सव

कऱ्हाड अर्बन को-बँकेचा रौप्यमहोत्सव कऱ्हाड येथें सर जनार्दनराव मदन ह्यांचे अध्यक्षतेखालीं सप्टेंबरच्या ५ तारखेस होणार आहे. त्याप्रसंगीं बँकेचे सध्याचे अध्यक्ष, श्री. नानासाहेब देशपांडे, ह्यांचें तैलचित्रहि बँकेंत लावण्यांत येणार आहे. रौप्य-महोत्सव समितीचे अध्यक्ष, श्री. वि. मा. फणसळकर वकील हे आहेत.

### परीक्षेसाठी बक्षीस

इंडियन मर्चंटस चेंबरच्या बँकिंग डिप्लोमाच्या परीक्षेंत दरसाल उत्तीर्ण होणाऱ्यापैकी सर्वोत्कृष्ट उमेदवारास बक्षीस देण्यासाठी देवकरण नानजी बँकेतर्फे श्री. प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं १८०० रुपयांची देणगी दिली आहे.

### साइक्स ढाल

मुंबई प्रांताच्या मध्यविभागांत १९४२ मध्यें सर्वांत चांगली ग्रामोन्नति केल्याबद्दल, नगर जिल्ह्यांतील शेगांव तालुक्यामधील जोहारपूर गांवास सर फ्रेड्रिक साइक्स ढाल देण्यांत आली आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... २६७ | ५ " अधिक धान्य पिकवा " मोहीम | ... २७० |
| २ प्रांतिक शेती खात्याचें कार्य | ... २६८ | ६ वृक्षारोपण दिन | ... २७० |
| ३ शेअर बाजार | ... २६८ | ७ धुळें येथें रौप्यज्युबिली | २७० |
| ४ स्फुट विचार | ... २६९ | ८ पाण्याखालील पिकें | ... २७० |
| कापडाच्या कमाल किंमती निश्चित झाल्या–विश्वविद्यालयीन शिक्षण–सहकारी शिक्षण व प्रचार ह्यांची नवी व्यवस्था | | ९ धान्याची पेरणी करणारांस सवलती | ... ...२७१ |
| | | १० मुंबईमधील बाजारभाव | २७२ |
| | | ११ चांदीचें उत्पादन व बाजारभाव | ... २७२ |



# अर्थ

बुधवार, ता. २५ ऑगस्ट, १९४३


## सहकारी औद्योगिक मंडळ्या

हिंदुस्थानांतील सहकारी संस्थांचें कार्य निरनिराळ्या आर्थिक क्षेत्रांत चाललें आहे, त्यांचा वेळोवेळ आढावा घेऊन त्यांत विस्तार व सुधारणा कशी करतां येईल ह्याचा विचार करणें आवश्यक आहे. विशेषतः सध्याच्या युद्ध परिस्थितींत आणि युद्धोत्तर काळांतील अपेक्षित पुनर्घटनेंत अशा प्रकारच्या आढाव्याचें व विचाराचें मोठें महत्व आहे. ह्या दृष्टीनें श्री. वैकुंठराय मेथा ह्यांचा 'दि ईस्टर्न एकॉनॉमिस्ट' नामक साप्ताहिकांत 'सहकारी औद्योगिक संस्था' ह्या विषयावरील लेख अलीकडे प्रसिद्ध झाला आहे, त्याकडे लक्ष वेधलें जाणें उद्बोधक होणार आहे. युद्धजन्य परिस्थितींत सामान्य जनतेस नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा खेडेगावी उद्योगधंद्यांस उत्तेजन देऊन हिंदुस्थान सरकार करणार आहे, असें मध्यंतरी प्रसिद्ध झालें होतें, परंतु त्या संबंधांत सहेतुक असें धोरण त्या सरकारानें किंवा प्रांतिक सरकारांनीं अंमलांत आणलेलें दिसत नाहीं. कांहीं प्रांतांत सहकारी औद्योगिक मंडळ्यांच्या मार्फत विशिष्ट युद्धोपयोगी माल तयार करून घेण्याची व्यवस्था केलेली असली तरी तिच्या मागें निश्चित धोरण किंवा योजना आहे असें मानण्यास जागा नाहीं असें म्हणून खेडेगावी उद्योगांचे संबंधांत काय करणें आवश्यक आहे ह्या विषयीं श्री. वैकुंठराय ह्यांनीं सूचना केल्या आहेत.

कारागिरांच्या हस्त व्यवसायांस राष्ट्रीय आर्थिक संघटनेंत स्थान आहे असें पुढारलेल्या देशांतहि मानण्यांत येतें. हिंदुस्थानासारख्या मागासलेल्या देशांत ह्या धंद्यांचें तर विशेषच महत्व असून त्यांस सरकारनें उत्तेजन देणें आवश्यक आहे. ह्या हस्तव्यवसायांची व्यवस्था दोन प्रकारांनीं होऊं शकते. मोठे धंदेवाले व भांडवलवाले ह्यांनीं कारागिरांस मजुरी देऊन त्यांच्याकडून माल काढून घेणें ही पद्धति, तिच्यांत कामकऱ्यांचें स्वातंत्र्य व उत्साह ह्यांचा अभाव असल्यानें, त्याज्य ठरते. म्हणून सरकारनें स्वतःच्या देखरेखीखालीं लहान धंदे चालवणें किंवा स्वयंशासित कारागीर संघांनीं मालाचें उत्पादन व विक्री करणें हे दोन मार्ग उरतात. ह्यांपैकी पहिल्या पद्धतींत कारागिरांच्या हितसंबंधांची पायमल्ली हा भांडवलशाहीचा दोष टळतो हें खरें; तथापि तीमध्ये हुन्नरी लोकांच्या कल्पकतेस व नैसर्गिक गुणांच्या विकासास वाव मिळत नाहीं दुसऱ्या व्यवस्थेंत कारागिरांचें वैयक्तिक स्वातंत्र्य व उत्साह अबाधित राहून संघशक्तीनें स्वतःची उन्नति करण्याचें साधन त्यांस उपलब्ध होतें.

सहकारी संघटनांत ह्या दुसऱ्या व इष्ट पद्धतीचा अंगिकार केलेला असल्यानें हस्तव्यवसायांची प्रगति व विस्तार सहकाराच्या उपायानेंच घडवून आणणें हितावह आहे असें श्री. वैकुंठराय ह्यांचें म्हणणें आहे आणि तें सर्वस्वी योग्य आहे. मोठे कारखाने ज्यांनीं यशस्वी केले आहेत अशा पाश्चात्य देशांतच सहकारी औद्योगिक संस्थांचें संगोपन करण्यांत आलें आहे असें नसून चीन देशांत युद्धकाळांत स्वयंशासित अशा लहान कारखान्यांत कारागिरांनीं हरतऱ्हेचा माल काढावा अशी व्यवस्था करण्यांत आली आहे तिच्याकडे त्यांनीं आपल्या लेखांत लक्ष वेधलें आहे. ह्या धर्तीवर हिंदुस्थानांत सहकारी औद्योगिक संस्था काढावयाच्या झाल्यास चीनचें उदाहरण अनुकरणीय ठरण्यासारखें आहे. तेथें सरकारनें भांडवल पुरवणें, कच्च्या मालाची तरतूद करणें, धंदेशिक्षण देणें, वहातुकीच्या सवलती उपलब्ध करणें, तयार माल विकत घेणें इत्यादि मार्गांनीं सहकारी औद्योगिक संस्थांस सहाय करण्याचें धोरण अंमलांत आणलें आहे. येथें एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे आणि ती ही आहे कीं चिनी सरकार संस्थांस एवढी मदत देत असतांहि तें त्यांच्या अधिकारी मंडळींत आपले प्रतिनिधी नेमण्याचा आग्रह धरीत नाहीं.

सहकारी औद्योगिक संस्था हिंदुस्थानांत सध्याच्या युद्धपरिस्थितींतहि काढणें व चालवणें शक्य आहे आणि अशा संस्थांस येथें पुष्कळ वाव आहे असें श्री. वैकुंठराय ह्यांचें म्हणणें असून ह्या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. कापूस, लोकर, रेशीम, ताग व काथ्या ह्यांचे जिन्नस, तेल, मातीचीं भांडीं, कागद, साबण, काड्याच्या पेट्या, बांगड्या, बटन, दुधाचे पदार्थ इत्यादि माल सहकारी संस्थांस कार्यक्षम रीतीनें करतां येण्याजोगा आहे. ह्या धंद्यांस भांडवल थोडें लागतें, त्यांची यंत्रसामुग्री साधी असते आणि ती व त्यांचा कच्चा माल हीं सहज मिळण्यासारखीं आहेत. खेडेगावांतील लोकांस स्वतःच्या घरीं किंवा शेजारी स्वतंत्रपणानें काम करून पोटास मिळवण्याचें साधन सहकारी मंडळ्यांच्यामार्फत उपलब्ध करून देतां येईल. सध्याची वेळ अशा प्रयत्नास अनुकूल आहे आणि ह्या संधीचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यांत आला पाहिजे अशी सूचना श्री. वैकुंठराय ह्यांनीं केली आहे. श्रमजीवी लोकांस स्वतंत्रतेनें व मानानें जगून जनतेस अत्यावश्यक असणाऱ्या जिनसांचें उत्पादन करतां येईल अशी सोय व सामर्थ्य सहकारी संघटनेंत आहे. सरकार आणि सहकारी कार्यकर्ते हा प्रश्न हातीं घेतील काय ?

---

### पेरणीसाठी अकोला बाजरीची वाटणी

हवेली तालुका डे. असोसिएशनच्या मदतीनें मुंबई सरकारनें पुणें जिल्ह्यांत पेरणीसाठी अकोला बाजरीचें बीं वाटलें, त्याची वाटणी खालीलप्रमाणें झाली:—

हवेली ४०१; खेड १४५; जुन्नर १२९; पुरंदर ८२; आंबेगाव ६०; शिरूर ३५; मुळशी ३०; दौंड २५; भिमथडी २०; इंदापूर २०; मावळ १० सें. को. बँक ४१०; एकूण १,३६८ पोतीं.

## प्रांतिक शेती खात्याचें कार्य

मुंबई प्रांताच्या शेती खात्याचा १९४१-४२ सालाबाबतचा अहवाल सारांश रूपानें अधिकारीरीत्या प्रसिद्ध झाला आहे. हें साल पाऊस पाण्याच्या दृष्टीनें चांगलें नसल्यानें ह्या प्रांतांत पिकांचें उत्पादन घटलें. यामुळें आणि वहातुकीच्या साधनांची अडचण, व्यापाऱ्यांची सट्टेबाजी व अनिश्चित युद्धपरिस्थिति इत्यादि कारणांनीं शेतीच्या मालाच्या किंमती भारी होत्या. त्या योगानें सरकारास नियंत्रणाचें धोरण स्वीकारावें लागलें. प्रांतिक शेतीखात्याचा खर्च १९४०-४१ मध्यें साडेनऊ लक्ष रुपये होता तो १९४१-४२ मध्यें साडेसतरा लक्ष रुपये झाला. ग्रामसुधारणा खातें स्वतंत्र होतें तें पुन्हां शेती खात्यास जोडण्यांत आल्यानें ही खर्चात वाढ झाली आहे. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च, सेंट्रल कॉटन कमिटी व सर डेव्हिड ससून ट्रस्ट फंड ह्यांकडून शेती सुधारणेच्या कार्यासाठी तीन लक्ष रुपयांची मदत मिळाली. प्रांतिक सरकारनें अधिक धान्य पिकवण्याकरितां शेतकऱ्यांस बी पुरवतां यावें म्हणून शेती खात्याच्या स्वाधीन १ लक्ष, ७० हजार रुपये केले. शेती सुधारणेच्या बाबतींत पाढेगांव येथील उसावर चाललेले शास्त्रीय प्रयोग आणि सोलापूर येथें जमिनींत पाणी व ओलावा साठून रहाण्याच्या दृष्टीनें उपाय शोधण्याचे प्रयत्न ह्या दोन संशोधनाच्या योजना चालू होत्या. ह्या दोन्ही योजनांचा पिकें सुधारण्याचे व त्यांचें उत्पादन वाढण्याचे कामीं चांगला उपयोग होत असल्याचें आढळून आलें आहे. सुधारलेल्या जातींच्या पिकांचा प्रसार करण्याचें काम वनस्पति शास्त्रज्ञांच्या संशोधनास अनुसरून चाललें आहे तेंहि फलद्रूप होत आहे. पूर्व खानदेशांत जरीला कपाशीच्या लागवडीचा विस्तार करण्यांत आला आहे, त्याचे योगानें दोन वर्षांत तेथील शेतकऱ्यांच्या पदरांत ८० लक्ष रुपयांचा जादा फायदा पडला आहे असा अंदाज आहे. शेती खात्यावर सरकारनें चार वर्षांच्या मुदतींत केलेला खर्च दोन वर्षांत भरून निघाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कपाशीचें पीक सुधारण्याच्या दृष्टीनें गुजरातमध्यें प्रयोग चालू आहेत. नाशिक जिल्ह्यांत निफाड येथें धान्यांचीं पिकें सुधारण्यासाठीं शास्त्रीय प्रयोग करण्यांत येत आहेत. तेथें गहूं व ज्वारी ह्यांचें अधिक उत्पादक बीं तयार झालें आहे. ज्वारीच्या ह्या नव्या बियाच्या उपयोगानें शेतकऱ्यांस दर एकरीं ८ रुपये अधिक मिळतील असा अंदाज आहे. सुधारलेल्या जातींच्या बियांचा पुरवठा शेतकऱ्यांस करण्याविषयींच्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत आणि पूर्व खानदेशांत जरीला कपाशीच्या बियाचा उत्तम प्रसार झाला आहे. पिकांवरील कीड व त्यांचे रोग ह्यांच्या निवारणासंबंधांत शास्त्रीय संशोधन चाललें आहे. मुंबई प्रांतांत फळझाडें व भाजीपाला ह्यांचीं क्षेत्रें अनुक्रमानें ९०,००० आणि १,१३,००० एकर अशीं आहेत आणि त्यांचा विस्तार केला जात असून अन्न पुरवठा वाढवण्यास सहाय दिलें जात आहे. धान्यें व हा पुरवठा ह्यांचा विस्तार केला जाण्यासाठीं व्यवस्थित रीतीचा व परिणामकारक प्रचार होत आहे. मर्यादित क्षेत्रांत शेतीच्या विविध सुधारणा घडवून आणण्याचे हेतूनें शेती खात्याचे अधिकारी शेतकऱ्यांचे सहकारानें कांहीं ठिकाणीं प्रयोग करीत आहेत.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., २४ डेक्कन जिमखाना, पुणें ४ )

मागील पंधरवडाभर प्रथम मुंबई बाजारभाव बळावत जाऊन शुक्रवारीं एकदम बरेच चढले. नेहमींचा अनुभव आहे कीं निरुंद हालचाली राहून भाव दबत नसले कीं समजावें, धंदेवाईक मोठाली मंडळी बऱ्याच प्रमाणांत दिसूं न देतां माल उचलून घेत आहेत व एकादे दिवशीं एकदम बाजार वर खेचतील. मग बाहेरचे लोक बाजार तेजींत आतां मात्र चालला म्हणून डोळे चोळून जागे होतात व जो शेअर चार आठ दिवसांपूर्वीं बऱ्याच स्वस्तांत मिळाला असता तो खूप वर घेण्यास तयार होतात. या वेळेसच धंदेवाले आपला माल लोकांच्या गळ्यांत मारून आपण मोकळे होतात आणि पुन्हा मंदीचें वातावरण उत्पन्न करण्यास उत्सुक होतात. या पुढील काळांत असेंच घडून यावें असें दिसत आहे. या अंदाजास आणखी एका कारणामुळें पुष्टी येते. तें हें कीं फक्त प्रमुख शेअर्सच (डाइंग, सेंचरी, कोहीनूर) एकदम वर चढले आहेत व बाकीचे गिरण्यांचे शेअर्स होते तेथेंच पडून आहेत.

वस्त्रनियंत्रक श्री. हैदरी यांनी शिल्लक मालाची मुदत वाढविण्याचें नाकारलें व कांहीं जातींच्या मालाचे किमान भाव ठरवून टाकले. उदाहरणार्थ, चित्ता छाप कापडाचे भाव गिरणीबाहेर रु. २१३ ठरविण्यांत आला आहे व तो गिरण्या पूर्वीं ज्या भावांत हा नमुना विकत होत्या त्याच्या बाहेर नाहीं. त्यामुळें गिरण्यांच्या नफ्यांत मोठी घट होण्याचें कारण नाहीं असें धरून शुक्रवारीं बाजारांत एकदम वाढ झाली. एकूण चालू भावांच्या आसपास गिरण्यांच्या शेअर्सचे भाव स्थिर होण्याचा प्रयत्न करीत आहेत असें दिसतें.

गिरण्यांच्या मागें व्याजबाद झालेले टाटा स्टीलही थोडे वर आले. आतां लगेच टाटाच्या पुढील वर्षाचे नफ्याचे अंदाज सुरू झालेत व म्हणण्यांत येतें कीं मागील सालीं संपामुळें नुकसान झालें तसा प्रसंग यंदा येण्याचें कारण नाहीं व म्हणून पुढच्या सालीं व्याज जास्त यावें. हें जरी खरें असलें तरी कलकत्त्याचे प्रमुख पोलादाचे शेअर्स, इंडियन आयर्न व स्टील कॉर्पोरेशन हे अगदी स्वस्थ आहेत. पहिल्याचें सहामाही व्याज यंदा आऊच आणे आलें हें सर्वविश्रुतच आहे. बंगालमधील दुष्काळामुळें निरुत्साह व बॉबहल्ल्याची कायमची धास्ती यामुळें पोलादाच्या शेअर्सचे भाव फार वर जातील असें वाटत नाहीं. मात्र टाटाला सर्वांत जास्त व्याज सुटतें ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. दिवसेंदिवस टाटा कं. किमान व्याज आर्डिनरीला रु. २० व डिफर्डला रु. १२५।० केव्हांही देऊं शकेल असें सिद्ध झाल्यानें या दोन्ही शेअर्सचें सट्ट्यांच्या दृष्टीनें महत्व कमी होत जाऊन पैसे बिनधोक गुंतवण्याचे शेअर्स अशी त्यांना योग्यता येत आहे व या दृष्टीनें इकडील गुंतविणारांनीं त्यांकडे पाहिलें पाहिजे.

सरकारी साडेतीन टक्के रोखा ९७ पर्यंत चढला आहे व "अर्था"त वेळोवेळीं सांगितल्याप्रमाणें ९४ पासून तो वर आला आहे व अजूनही ९८ पर्यंत चढण्यास मुळींच हरकत नाहीं. चालू चलनवृद्धी पुढील अनेक वर्षे आकारानें कमी होण्याचा संभव नसल्यानें रोख्यांचे भाव कमी होण्याचें कारण दिसत नाहीं.

# स्फुट विचार

## कापडाच्या कमाल किंमती निश्चित झाल्या

गिरणीवाले आणि कापड व्यापारी आपल्या मालाच्या किंमती वाटेल तशा चढवून भरमसाटपणानें नफा मिळवीत असतां सरकार ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करतें आणि कपाशीच्या चढलेल्या किंमती शेतकरी वर्गास फायद्याच्या असतां त्या मात्र नियंत्रित करतें अशी टीका करण्यांत येत होती. तिला उत्तर म्हणून सरकारनें वटहुकुम काढून घाउक व्यापाऱ्यांनीं साठवलेलें कापड ह्या महिन्या अखेरी-पूर्वी विक्रीस काढलें पाहिजे असें फर्मावलें होतें. भाव आणखी चढण्याच्या आशेनें व्यापारी कापड विक्रीसाठी बाहेर काढीत नाहींत आणि ह्या रीतीनें त्याचा कृत्रिम तुटवडा उत्पन्न करून किंमती चढवतात व अन्याय्य नफा मारतात अशी तक्रार झाली असल्यानें वरील हुकूम सरकारनें काढला होता. ह्या हुकुमाची अंमलबजावणी करणें अव्यवहार्य आहे आणि सरकारनें आपल्या हुकुमांतली मुदत वाढवून द्यावी अशी विनंति व्यापाऱ्यांनीं केली होती, पण सरकारनें ती अमान्य केली आहे. ह्या व्यवस्थेचा परिणाम कापडाचे भाव उतरण्यांत झाला आहे आणि आतां सरकारनें कापडाच्या व सुताच्या प्रमुख जातींच्या कमाल किंमती ठरवून दिल्या आहेत. गिरण्यांनीं कापड व्यापाऱ्यांस कोणत्या किंमतीनें विकावें हें ठरवून तीवर अधिकांत अधिक वीस टक्के चढवण्यांत यावे आणि त्या किंमतीस गिऱ्हाइकांस सर्व देशभर कापड मिळालेंच पाहिजे असें निश्चित झालें आहे. वहातुकीचा खर्च व व्यापाऱ्यांचा योग्य नफा ह्यांविषयींची तरतूद झाल्यानें आणि गिरणीवाल्यांसहि आपला माल ठराविक दरानेंच विकावा लागत असल्यानें कापडाच्या किंमती बेताच्या व निश्चित रहाणार आहेत. कसोशीचे प्रयत्न करून ज्या घाऊक व्यापाऱ्यांस आपल्या साठ्यांतील कापडाचा ह्या महिना अखेर निकाल करतां येणार नाहीं, त्यांचा माल ठराविक किंमतीनें सरकार स्वतः विकत घेईल. ह्या प्रकारच्या कायद्याच्या विषयींची योजनाहि निश्चित झाली आहे. कापडाच्या व्यापारांतील नफेबाजी नष्ट होऊन योग्य व ठराविक किंमतीनें कापड मिळूं लागल्यानें जनतेची मोठी सोय होणार आहे आणि देशांतील जाचक महागाईस आळा बसणार आहे. अगदी गरीब लोकांच्या उपयोगासाठीं स्वस्त स्टँडर्ड कापडाचा पुरेसा पुरवठाहि केला जाणें अगत्याचें आहे.

---

## विश्वविद्यालयीन शिक्षण

प्रस्तुत युद्ध संपून शांतता पुन्हां प्रस्थापित झाली म्हणजे प्रत्येक राष्ट्रांत राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्वरूपाचे महत्त्वाचे प्रश्न पुढाऱ्यांस सोडवावे लागतील ह्याची जाणीव आतां सर्वत्र झाली आहे. आंतरराष्ट्रीय लोकमत व सहकार ह्यांवर ह्या प्रश्नांची उत्तरें बहुतांशीं अवलंबून रहाणार असलीं तरी प्रत्येक राष्ट्रांत त्यासंबंधांत विचार व योजना अगाऊ होणें अगत्याचें आहे. ह्या दृष्टीनें मुंबई विश्वविद्यालयाचे पदवीदान समारंभाचे प्रसंगीं चॅन्सेलर, सर जॉन कॉलव्हिल, ह्यांनीं सदरहु विषयाचें विवेचन करणें स्वाभाविक होतें. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानचें औद्योगीकरण झपाट्यानें होईल त्यांत भाग घेण्याचें महत्त्व त्यांनीं आपल्या भाषणांत पदवीधरांच्या मनांत उसवण्याचा प्रयत्न केला. शास्त्रीय ज्ञानाची वृद्धी करून संस्कृतीस उत्तेजन देणें हेंच प्रमुख उद्दिष्ट विश्वविद्यालयांनीं स्वतःपुढें ठेवलें पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या पुढील आयुष्यक्रमांतील पोटापाण्याच्या प्रश्नाच्या मार्गे लागणें हें त्यांचें कर्तव्य नव्हे, असें कित्येकांचें मत आहे तर उद्योगधंदे, व्यापार इत्यादींचा उत्कर्ष होऊन तरुण पिढीस त्यांमध्यें स्थान मिळवण्यास तयार करणें हेंहि त्यांचें काम असलें पाहिजे असें दुसरे प्रतिपादतात. सर जॉन कॉलव्हिल ह्यांनीं ह्या दोन विचारसरणींचा मेळ घालून विश्वविद्यालयांनीं सांस्कृतिक, शास्त्रीय व व्यावहारिक अशा अनेकविध विषयांचा परामर्श घेतला पाहिजे असें प्रतिपादलें. नागपूर विश्वविद्यालयाचे पदवीदान समारंभाचे प्रसंगीं सर मिर्झा इस्माइल ह्यांनींहि युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांनीं आपल्या शिक्षणक्रमांत महत्त्वाच्या कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत ह्याचें विवेचन केलें. सध्या कॉलेजांतील शिक्षणाचा पाया रुंद व मजबूत नाहीं आणि विषयांचें विशिष्टीकरण अभ्यासक्रमांत प्रारंभापासून करण्याची घाई दिसून येते, ती अनिष्ट आहे असें मत प्रकट करून त्या बाबतींत सुधारणा होण्याची आवश्यकता असल्याचें त्यांनीं सांगितलें. युद्धोत्तर पुनर्घटनेंत शिक्षणाचे व्यवस्थेंत व पद्धतींत योग्य फेरबदल झाले नाहींत तर ही अत्यंत महत्वाची संधि हिंदुस्थाननें गमावली असें होईल. किंबहुना, ह्या देशांतील पुनर्घटना त्यावांचून समाधानकारक होणार नाहीं. तथापि, ह्या गोष्टीकडे विश्वविद्यालयांच्या चालकांचे जावें तसें लक्ष गेलेलें नाहीं असें म्हणावं लागतें. सर मिर्झा ह्यांच्या सारख्याच्या भाषणाचा परिणाम आवश्यक असलेल्या जागृतींत होईल अशी आशा आहे.

---

## सहकारी शिक्षण व प्रचार ह्यांची नवी व्यवस्था

सध्या मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचें शैक्षणिक काम हिंदुस्थान सरकारच्या मदतीनें कोऑपरेटिव्ह ट्रेनिंग अँड एज्युकेशन योजनेस अनुसरून चालू आहे. ह्या योजनेची मुदत लवकरच संपणार आहे व त्यानंतर जिल्हा सुपरवायझिंग यूनियन बोर्डीमार्फत हें कार्य चालू राहील. जिल्हा बोर्डांच्या शिक्षण समित्या इन्स्पेक्टर्स नेमून इन्स्टिट्यूटच्या सर्वसाधारण देखरेखीखालीं शैक्षणिक प्रचार कार्य करतील. तथापि, जिल्हा बोर्डांना शैक्षणिक कामाचा अनुभव नसल्यामुळें व शिक्षण समित्या नवीन व अननुभवी असणार, ह्या कारणानें पहिलीं दोन वर्षे इन्स्टिट्यूटनें ह्या कार्यावर नियंत्रण ठेवावें व रजिस्ट्रारच्या सल्ल्यानें एज्युकेशन इन्स्पेक्टर्स नेमावेत, असें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्याचा अर्थ, जिल्हा बोर्डांच्या शिक्षण समित्या इन्स्टिट्यूटच्या नियंत्रणाखालीं जाणार, असा नव्हे. इन्स्टिट्यूटचें शैक्षणिक धोरण यशस्वी व्हावें या दृष्टीनें शिक्षण-समित्यांवर इन्स्टिट्यूटचें वजन पडावें, एवढेंच त्याचें उद्दिष्ट आहे. ही व्यवस्था पुढें चालू ठेवावी का तींत कांहीं बदल करावा, हें दोन वर्षांची मुदत संपण्याचे वेळीं ठरविण्यांत येईल. कुलाबा, रत्नागिरी, व खेडा जिल्हे आणि पंचमहाल येथें जिल्हा सुपरवायझिंग बोर्डे अस्तित्वांत नाहींत. अहमदाबाद जिल्ह्यांतील सुपरवायझिंग बोर्ड रद्द करण्यांत आलेलें आहे. ह्या ठिकाणीं शिक्षण व प्रचार हीं कामें इन्स्टिट्यूटच्या नियंत्रणाखालीं शिक्षण समित्यांमार्फत केलीं जातील. मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा येथें एक संयुक्त शिक्षण समिति नेमली जाईल.

---

## "अधिक धान्य पिकवा" मोहिम

### मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचें सर्क्युलर

( अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेस सहकारी संस्थांनीं व कार्यकर्त्यांनीं हातभार कोणत्या प्रकारें लावावा, याबाबत सूचना देणारें एक सर्क्युलर इन्स्टिटयूटनें काढलें आहे, त्याचा गोषवारा खालीं दिला आहे. )

सध्याच्या दिवसांत सहकारी कार्यकर्त्यांनीं हातीं घ्यावयाच्या बाबींत, "अधिक धान्य पिकवा" ची मोहीम ज्यास्त जोरानें चालू ठेवण्याची आवश्यकता विशेष महत्त्वाची आहे. येत्या रब्बीच्या मोसमांत जिल्हा सुपरवायझिंग यूनियन्स, इन्स्टिटयूटचे व्यक्तिगत सभासद, इन्स्टिटयूटच्या सभासद असलेल्या सोसायटया या सर्वांनीं सहकारी खात्यांचे अधिकारी यासंबंधांत प्रयत्न करीत आहेत, त्यांस खालील बाबतींत हातभार लावावा, अशी विनंति आहे:—

( १ ) मोहीम चालू करणारे सहकारी अधिकारी व्याख्यानें ठरवितील. इन्स्टिटयूटच्या सभासदांनीं या अधिकाऱ्यांस भेटून योग्य सहकारी केंद्रांतून, स्थानिक सहकारी संस्थांशीं संबंध असणाऱ्या जबाबदार व वजनदार सहकारी लोकांचीं व्याख्यानें घडवून आणावीं.

( २ ) ठिकठिकाणच्या खेड्यांतून सभा होतील, त्या यशस्वी करण्यासाठी जिल्हा यूनियन बोर्डे व जिल्हा शिक्षण समित्या यांनीं सहाय करावें. विशेषतः जेथें सहकारी पतपेढ्यांचे सभासद मोठ्या प्रमाणांत जमूं शकतील, अशा महत्त्वाच्या केंद्रांतून या सभा भरविण्याचा प्रयत्न करावा.

( ३ ) सोप्या भाषेंतील पत्रकें, हॅंडबिलें, इत्यादि पाठवून पतपेढ्यांच्या सभासदांना माहिती द्यावी. सहकारी खात्यांकडून अशी माहिती प्रसिद्ध केली जातेच. परंतु इन्स्टिटयूटमार्फत आणखी प्रचार करून, सहकारी पतपेढ्या धान्य पेरणींत वाढ होण्यास कशा सहायकारक होतील हें समजून सांगतां येईल.

( ४ ) धान्याची पेरणी वाढविण्यास प्रोत्साहन म्हणून सरकारनें कांहीं सवलती दिल्या आहे. त्याबाबत वेळोवेळ हुकूम निघालेले आहेत. जिल्हा यूनियन बोर्डांनीं ही माहिती गोळा करून ती एकत्रित छापून स्थानिक भाषेंत प्रसिद्ध करावी; त्याचा खर्च इन्स्टिट्यूट करील.

या सर्क्युलरप्रमाणें काय कार्य झालें, त्याचा अहवाल इन्स्टिटयूटच्या कचेरीकडे पाठविण्यांत यावा.

### धोकवडें येथील वृक्षारोपण दिन

धोकवडें येथील विद्यानगर इंग्लिश स्कूलमध्यें ता. ५।८।४३ रोजीं वृक्षारोपण दिन जिल्हा कलेक्टर यांचे हस्तें मोठ्या थाटानें साजरा झाला. मुलें व प्रेक्षक मिळून अडीचशेंवर समुदाय जमला होता. प्रि. ना. म. काळे, डे. ए. इ. मोडक, रा. म्हात्रे, शेट हिराचंद अमरसी, रावसाहेब कांगले, रा. वीरकर वगैरेंचीं समयोचित भाषणें झालीं. ८१ मुलांनीं व मुलींनीं या दिवसाचें महत्व वर्णन केलें. कलेक्टरसाहेब यांनीं चिकूचें झाड लावल्यानंतर उद्बोधक भाषण केलें. शेवटीं रावसाहेब नाईक यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर हा समारंभ आटोपला.

### मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचा धुळें येथें रौप्यज्युबिली समारंभ

अगोदर घोषित केल्याप्रमाणें प. खा. जिल्ह्यांतील प्रमुख सहकारी कार्यकर्ते व धुळें शहरांतील कांहीं नागरिक यांची असि. को. सो. धुळें यांचे दिवाणखान्यांत रविवार ता. १८-७-४३ रोजीं प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचा रजत महोत्सवसमारंभ साजरा करणेंसाठी सभा भरविणेंत आली होती. सुमारें १०० मंडळी सदर समारंभ सभेस हजर होती.

धुळें येथील प्रमुख सहकारी कार्यकर्ते श्री. काकासाहेब गरुड, यांच्या विद्यमानें ही सभा बोलाविण्यांत आली होती. त्यांनी प्रारंभीं श्री. डब्ल्यु. डी. साळुंखे (असि॰रजिस्ट्रार) धुळें, नियोजित अध्यक्ष, यांस अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंति करून इन्स्टिटयूटनें गेल्या २५ वर्षांच्या अवधींत केलेल्या कार्याचा व तिच्यांतील स्थित्यंतराचा थोडक्यांत आढावा सांगून सहकारी तत्त्वावर अढळ निष्ठा ठेवून मानवतेच्या उच्च आशा व आकांक्षा सफल होण्यासाठीं पद्धपरिकर होऊं इच्छिणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांनी पुढें यावें व इन्स्टिटयूटच्या सदर कार्यास हातभार लावावा अशी विनंति केली.

श्री. काळे यांनीं इन्स्टिटयूटचा स्थापनेपूर्वीपासूनचा इतिहास, तिचें कार्य यांचा विस्तृत आढावा इंग्रजी व मराठींतून सर जनार्दन मदन यांच्या संदेशासह निवेदन केल्यावर रावसाहेब रणसिंग वकील, श्री. केसकर व श्री. शं. ब. देशमुख यांचीं समयोचित भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं इतर वक्त्यांस भाषणें करण्यास अनुमति दिली. त्याप्रमाणें भाषणें करण्याची संधी बऱ्याच जणांनी साधिली. त्यांत प्रामुख्यानें श्री. मुधोळकर व भिडे वकील व इंपीरियल बॅंकेच्या स्थानिक (धुळे) शाखेचे एजंट श्री. रतिलाल भाई दलाल हे होते.

अध्यक्षांनीं प. खा. जिल्ह्यांतील सहकारी चळवळीच्या प्रगतीचें व इन्स्टिटयूटच्या सदर प्रगतीसाठी झालेल्या मदतीचें व कार्याचें साधार, विस्तृत व अर्थपूर्ण सिंहावलोकन केलें व सदर चळवळीचें पुढें पाऊल पडणेंसाठी तरुण सहकारी कार्यकर्ते अहमहमिकेनें पुढें येऊन नजीकच्या भविष्य काळांत इन्स्टिटयूटचें ध्येय साध्य होईल अशी आशा प्रगट करून आपलें समारोपाचें सुंदर, सर्वांगपरिपूर्ण विवेचन पूर्ण केलें. श्री. गरुड ह्यांचें आभार प्रदर्शनाचें भाषण झाल्यावर पानसुपारी व अल्पोहार होऊन समारंभ संपला.

### मुंबई प्रांतांतील पाण्याखालील पिकांचें क्षेत्र

मुंबई प्रांतांतील पिकांपैकीं ४·१% पिकांस कालव्यांचें, तळ्यांचें अगर विहिरींचें पाणी दिलें जातें. खालील तक्त्यांत पिकांस पाणी कोठून मिळतें व त्या पाण्यावर कोणतीं पिकें काढण्यांत येतात, ह्याची माहिती दिलेली आहे.

| | १९४०–४१ हजार एकर | १९४१–४२ हजार एकर |
|---|---|---|
| सरकारी कालवे | २४५ | ३०४ |
| खासगी कालवे | ६७ | ५६ |
| विहिरी | ६९४ | ६७३ |
| तळीं | ११२ | ११३ |
| इतर मार्ग | २० | २१ |
| एकूण | ११३८ | ११६७ |

१९४१–४२ मध्यें सरकारी कालव्यांखालील जमिनींत २४·१% वाढ झाली. खासगी कालव्यांखालील लागवडींत १६·४% घट झाली. विहिरींखालील क्षेत्र ३·०% कमी झालें.

## धान्याची पेरणी करणारांस सवलती

### कालव्याचें पाणी व बीं यांचा पुरवठा— तकावी कर्जें— वहातुकीस प्राधान्य—सरकारी आश्वासन

कपाशीची लागवड सोडून शेतकऱ्यांनीं धान्यें अधिक प्रमाणांत पेरावीं, ह्यासाठी मुंबई सरकारनें तकावी कर्जें, कालव्याचें पाणी, सरकारी पडीक जमिनींची लागवड, बियांचा पुरवठा, इत्यादि संबंधांत कित्येक सवलती दिल्या आहेत, त्यांचा फायदा शेतकऱ्यांनीं जरूर घ्यावा.

#### धान्याच्या लागवडीस कालव्याच्या पाण्याचा पुरवठा

पावसाळ्यांत धान्याच्या पिकांसाठी प्रत्येक एकरास १ रुपया ह्या दरानें कालव्याचें पाणी पुरवण्यांत येईल. रब्बीच्या पिकांस पहिलें पाणी ३० सप्टेंबरपूर्वी घेतल्यास, एकरी ३ रुपये ह्या सवलतीच्या दरानें पाणी मिळेल. पाझराचें पाणी मोफत वापरण्यास हरकत नाहीं. कालव्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासंबंधीं सरकार दीर्घकालपर्यंत स्वतःस बांधून घेणार नाहीं. शक्य तेवढें पाणी धान्याच्या लागवडीसाठी राखून ठेवण्यांत येईल. मोसमाच्या बोलीनें कपाशीच्या लागवडीस पाणी मिळणार नाहीं. रब्बीच्या पिकांची लागवड पावसाळा संपण्यापूर्वीच १५ ऑगस्ट नंतर व्हावी ह्या दृष्टीनें त्यास उत्तेजन देण्यांत येईल व त्यांस १५ ऑक्टोबरनंतर कालव्याचें पाणी नको असल्यास, दर एकरी फक्त १ रुपया आकारण्यांत येईल.

ऑगस्टमध्यें थकबाकीदाराचें नांव त्या यादींतून काढून टाकण्यांत आलें नसल्यास, त्यास कालव्याचें पाणी मिळण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं. तथापि, आपली सर्व बाकी त्यानें देऊन टाकली व तसें त्यानें केल्याचें मामलेदारानें इरिगेशन अधिकाऱ्यास कळविलें, तर त्यास ताबडतोब पाणी मिळावें असें आतां ठरलें आहे. अशा थकबाकीदारानें शक्य तेवढ्या जमिनींत धान्य पेरलें पाहिजे, त्यानें आखूड धाग्याची कपास पेरतां कामा नये व ह्या अटी त्यानें पाळल्या नाहींत तर पुढील वेळीं त्यास अशा सवलती मिळणार नाहींत, ह्या मुद्यांवरच त्यास पाणी मिळेल. बंधाऱ्यांच्या पाण्याखालील जेवढ्या जमिनींत धान्य पेरण्यांत येईल, त्याच्या पाणीपट्टीच्या निम्मी रक्कमच वसूल केली जाईल. सरकारी बंगले व कचेऱ्या ह्यांचे हद्दींत कालव्याचें अथवा पाटाचें पाणी मिळूं शकल्यास त्यावर धान्य व भाजीपाला काढण्यास पाणीपट्टी घेतली जाणार नाहीं.

#### बियांचा पुरवठा

धान्याची व वैरणीची पेरणी शक्य तेवढी जास्त व्हावी व दर एकरी उत्पादन अधिकांत अधिक यावें, ह्यासाठी सरकारनें सुधारलेल्या जातींच्या व चांगल्या बियांच्या खरेदीसाठी १० लक्ष रुपये राखून ठेवले आहेत. खरेदीच्या किंमतीच्या एक तृतीयांशापेक्षा कमी किंमतीनें हें बीं शेतकऱ्यांना देण्यांत येईल.

#### तकावी कर्जें

धान्य पेरण्यासाठी घ्यावयाचें बीं व करावयाचा लागवडीचा सर्व खर्चासाठी बिन व्याजाचीं तकावी कर्जें देण्यांत येतील. युद्धसमाप्तिपर्यंत धान्यच पेरलें जाईल, ह्या अटीवरच विहीर खोदण्यासाठी व जमीन सुधाराईसाठी तकावी कर्जें दिलीं जातात. ह्या कर्जांवरील व्याजाचा दर कमी करण्याच्या प्रश्नाचा विचार चालू आहे. अधिक धान्य पिकविण्याची मोहीम चालविण्यासाठी तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सना प्रत्येकी ५० रुपये देण्यांत येत आहेत. ज्यास्त कार्यक्षम असोसिएशन्सना जास्त रकम देण्याचा अधिकार कलेक्टरांना देण्यांत आला आहे. ज्यांत पेरणी करतां येईल अशा पडीक जमिनींत धान्य पेरल्यास त्या पडीक जमिनींच्या खंडकऱ्यास दर एकरी २० रुपये बिनव्याजी तकावी कर्ज मिळूं शकेल.

#### वहातूक

खाद्य धान्यांच्या वहातुकीसच प्राधान्य दिलें जातें; आखूड व मध्यम धाग्याची कपास, वगैरे लावणारांच्या वहातुकीच्या अडचणींचा विचार तातडीनें होणार नाहीं. पेंड व इतर खतांच्या वहातुकीस प्राधान्य मिळवून देण्याचा सरकार शक्य तो प्रयत्न करील.

#### इतर

धान्यांची लागवड वाढविण्यास शेतकऱ्यांस उद्युक्त करण्याची सूचना पाटलांस व इतर अधिकाऱ्यांस करण्यांत आली आहे. जेथें धान्याची पेरणी विशेष मोठ्या प्रमाणांत वाढली आहे तेथील अधिकाऱ्यांस योग्य पारितोषिक जमाबंदीचे वेळीं देण्याचा कलेक्टर विचार करतील.

धान्य पेरण्यासाठी सरकारी पडीक जमिनी तीन वर्षें खंड न घेतां देण्यांत येतील. बिनव्याजी तकावी कर्जाचा फायदा अशा खंडकऱ्यांनाहि मिळूं शकेल. रेल्वे हद्दींतील जमिनी धान्याच्या पेऱ्यासाठी रेल्वेच्या जिल्हा इंजिनिअराच्या सल्ल्यानें कलेक्टर खंडानें देतील. ह्या खंडकऱ्यांसहि तकावी कर्जें मिळूं शकतील. ज्यांना सरकारनें सारा-माफीनें जमिनी दिलेल्या असतील अथवा ज्यांना सारा माफ आहे अशीं इस्पितळें, शाळा, सॅनिटोरियम, चर्च, इत्यादींच्या हद्दींत धान्य व भाजीपाला लावण्यास कलेक्टर परवानगी देतील. जे क्रूड ऑइल इंजनाच्या पाण्यावर धान्य अथवा भाजीपाला लावतील, अशांनाच इंजन चालविण्यासाठी क्रूड ऑइल मिळूं शकेल. जंगल हद्दींतील लोकांकडून घेण्यांत येणारा एकरी आठ आणे ते एक रुपया त्यांनीं आपल्या सर्व जमिनींत धान्य पेरल्यास घेतला जाणार नाहीं.

#### सरकारचें आश्वासन

वरील अथवा इतर योजनेस अनुसरून धान्याचें उत्पादन वाढल्यामुळें त्याची किंमत खालीं जाऊन ती किफायतशीर होणार नाहीं अशी शंका बाळगण्याचें कारण नाहीं. तथापि युद्ध चालू आहे तोंपर्यंत व त्यानंतर एका वर्षाचे अवधींत, सरकारच्या "अधिक धान्य पिकवा" मोहिमेमुळें धान्याची किंमत प्रमाणाबाहेर खालीं जाऊन शेतकऱ्यांस योग्य नफा राहात नाहीं असें आढळून आलें, तर सरकार "योग्य" किंमतीस खुल्या बाजारांत सर्व धान्य विकत घेईल, हें सरकारी आश्वासन पुनः जाहीर करण्यांत येत आहे.

---

#### टाटांची देणगी

बंगालच्या दुष्काळ निवारण फंडास टाटांनीं १½ लक्ष रुपये दिले आहेत. त्यांत टाटा आयर्न ॲन्ड स्टीलचे ५० हजार, सर दोराब टाटा ट्रस्टचे ५० हजार, व सर रतन टाटा ट्रस्टचे २५ हजार रुपये आहेत.

## मुंबईमधील बाजारभाव

### आठवड्याचे घाऊक बाजारभाव, १९ ऑगस्ट, १९४३

| जिनसाचें नांव | मालाचा प्रकार | किंमतीचें माप | किंमत (रुपये) (८२ पौंडाचा मण) |
|---|---|---|---|
| १ गहू | | ” | १३—१–० |
| २ ज्वारी | | ” | १०—८–० |
| ३ बाजरी | | ” | ७–१०–० |
| ४ तुरीची डाळ | कानपूर | ” | १६–१२–० ते १६–१४–० |
| ५ ” ” | सुरत | ” | १८—८–० ते २१—३–० |
| ” ” | ” | ” | |
| ६ हरबरा ” | पंजाब तांबडा | ” | १९—९–० |
| ७ ” ” | ” पिवळा | ” | २०—२–० |
| ८ मूग | मोगलाई नं. १ | ” | ११—९–० |
| ९ ” | ” नं. २ | ” | ११—०–० |
| १० ” | ” नं. ३ | ” | ९–१२–० |
| ११ तांदूळ | (अ) स्पेशल | ” | ४९—०–० |
| | (ब) पहिली प्रत | ” | २४—०–० |
| | (क) दुसरी प्रत | ” | ११—८–० |
| १२ साखर यु.पी. | | ” | १६—५–० ते १६—९–० |
| १३ ” दक्षिण | | ” | १५–११–० ते १५–१५–० |
| १४ गूळ | कोल्हापूर | ” | २१—९–० ते २४—८–० |
| १५ ” | कोपरगांव | ” | १६—२–० ते १७–१२–० |
| १६ शेंगदाणा | खानदेश | ” | |
| १७ ” | खानदेशी जात | ” | १३–१०–० |
| १८ ” | कऱ्हाड | ” | १३—१–० |
| १९ ” | मोठा | ” | १३—१–० |
| २० आळशी | मोठी | ” | १०—९–० |
| २१ ” | लहान | ” | १०—३–० |
| २२ भुइमूग तेल | | ” | २९—९–० |
| २३ आळशी तेल | | ” | ३१—४–० |
| २४ नारळ तेल | | ” | ३१—४–० |
| २५ भुइमूग पेंड | | ” | ३—५–० |
| २६ बटाटे | डीसा | ” | ३५–१३–० |
| २७ कांदे पुणें व नाशिक | पहिली प्रत | ” | ५–११–० |
| २८ ” | दुसरी ” | ” | ४–१०–० |

## चांदीचें उत्पादन व बाजारभाव

चांदीचें जागतिक उत्पादन १९४१ सालीं २६¾ कोटि औंस झालें होतें; १९४२ सालीं तें २५ कोटि औंसांवर आलें. १९४२ अखेर अमेरिकन सरकारजवळ ३४३¼ कोटि औंस चांदीचा साठा होता. हिंदुस्थानांत १९४२ सालीं ४८¾ हजार रुपये किंमतीच्या २२¼ हजार औंस चांदीचें उत्पादन झालें. १९४१ चे तत्सम आकडे २३ हजार औंस व ४२ हजार रुपये असे आहेत. खालील तक्त्यांत चांदीचा बाजारभाव कसा वाढत गेला, तें दाखविलें आहे:—

### मुंबई शहरांतील चांदीची किंमत

(१०० तोळ्यांस)

| वर्ष | सर्वांत ज्यास्त रु. | आ. | सर्वांत कमी रु. | आ. | सरासरी रु. | आ. |
|---|---|---|---|---|---|---|
| १९३८–३९ | ५३ | १ | ४८ | २ | ५१ | ४ |
| १९३९–४० | ६६ | ४ | ४४ | ७ | ५५ | ८¾ |
| १९४०–४१ | ६४ | १३ | ५४ | १० | ६२ | ० १०/१२ |
| १९४१–४२ | ९६ | ८ | ६२ | ० | ६६ | १२ १/२ |
| १९४२–४३ | ११६ | ८ | ७५ | ४ | ९२ | १२ ११/१२ |

मुंबई शहरांतील चांदीच्या किंमतीची सरासरी ९२ रु. १२ आ. ११ पै होती; आणि सर्वांत जास्त व सर्वांत कमी किंमत ह्यांतील तफावत ४१ रु. ४ आ. भरली.

युद्धविषयक उत्पादनांत चांदीचा वाढता उपयोग, हें १९४२–४३ चें वैशिष्ट्य मानतां येईल. शत्रु राष्ट्रांकडे चांदीची गळती होऊं नये, ह्यासाठीं अमेरिकेनें ५ मे रोजीं युरोपकडे चांदी निर्गत करण्याचें बंद केलें. चलनाकरितां संयुक्त राष्ट्रांपैकीं कोणाला चांदी पाहिजे असल्यास ती उसनवार देण्याचें अमेरिकेनें १५ डिसेंबर रोजीं जाहीर केलें.

### चांदीच्या किंमतींतील चढउतार

हिंदुस्थानांतील बाजारांतील चांदीचे हेलकावे खाली दाखविले आहेत:—

| | रु. | आ. | |
|---|---|---|---|
| ७ एप्रिल | ८७ | ८ | |
| १८ ” | ७५ | ४ | वर्षांतील सर्वांत कमी किंमत |
| ८ सेप्टेंबर | | | रिझर्व्ह बँकेनें चांदी–विक्री बंद केली. |
| १० ” | ९१ | ० | |
| ८ नोव्हेंबर | ११६ | ८ | १९१८ नंतर एवढी किंमत ह्यापूर्वी कधींच झाली नव्हती. |
| १७ डिसेंबर | ९५ | ८ | उत्साहकारक युद्धवार्ता व संयुक्त राष्ट्रांस उसनवार चांदी देण्याचा अमेरिकेचा निश्चय ह्यांचा परिणाम. |
| १२ मार्च | ११२ | १० | |
| ३१ मार्च | ११६ | ६ | |
| २६ एप्रिल | १३५ | ० | |
| ३ मे | १३९ | ० | |
| २९ मे | ११७ | ० | |
| ३० जून | १२३ | ० | |

हें पत्र पुणें, पेठ मांबुडां घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुडां, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434.

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख १ सप्टेंबर, १९४३ | अंक ३५

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कराड
स्थापना १९१७ ] ह्या बँकेचा [ ऑडिट वर्ग 'अ'

"रौप्यज्युबिली" समारंभ

रविवार, तारीख ५-९-१९४३ रोजीं कराड येथें 'प्रभात टॉकीज' मध्यें सर जनार्दन ए. मदन, C. S. I., C. I. E., यांचे अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. ६५,००० | ठेवी | रु. ७,६९,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. ५४,००० | सन १९४३ चे जून अखेर नफा | रु. १८,००० |

बँकिंगचा सर्व व्यवहार केला जातो.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बँकांस सुटी

शुक्रवार ता. ३ रोजीं गणेश चतुर्थीनिमित्त व शनिवार ता. ४ रोजीं संवत्सरीनिमित्त बँका बंद राहतील.

### लिमिटेड कंपनीच्या भागीदारावर व्यक्तिशः जबाबदारी केव्हां येते ?

पब्लिक लिमिटेड कंपनीचे किमान सभासद ७ तरी असले पाहिजेत. खासगी कंपनीच्या पत्रावर निदान २ तरी सभासद पाहिजेत. ह्यांपेक्षा सभासदांची संख्या कमी झाली व अशा रीतीनें संख्या कमी असतांना कंपनीचा व्यवहार सहा महिन्यापेक्षा दीर्घ काळ चालू राहिला तर सहा महिन्यांनंतर शिल्लक उरलेल्या सभासदावर कंपनीनें केलेल्या कर्जांची अनियमित जबाबदारी व्यक्तिशः येते. अर्थात्, कायद्यानें आवश्यक असलेल्या सभासदांच्या संख्येपेक्षा ती कमी झालेली आहे, ह्याची माहिती उरलेल्या सभासदास असेल, तरच त्याचेवर ही जबाबदारी पडते. सहा महिन्यानंतरच्या काळांत, त्याचें सभासदत्व कायम आहे तोंपर्यंत त्याचेवरील जबाबदारी नाहींशी होणार नाहीं. सहा महिन्यानंतर कंपनीनें केलेल्या कर्जाबद्दल असे सभासद व्यक्तिशः जबाबदार रहातील.

### कोळशासंबंधी संशोधन

कोळशाचे नवे उपयोग शोधून काढण्यासाठी व त्यापासून नवे उपपदार्थ निर्माण करण्यासाठीं संशोधन हातीं घेण्याकरितां ग्रेट ब्रिटनमध्यें येत्या पांच वर्षांत १० लक्ष पौंड खर्चण्यांत येणार आहेत. सरकार, खाणीवाल्यांची असोसिएशन व कोळशावर चालणारीं यंत्रें वापरणारे कारखानदार ह्यांच्या ग्रँटमधून दरसाल २ लक्ष पौंडाचा विनियोग केला जाईल. सरकार दरसाल ५० हजार पौंड देणार आहे. खाणीवाले ८० हजार पौंड देतील व कारखानदारांनीं ७० हजार पौंड देण्याचें मान्य केलें आहे. संशोधनाचा फायदा सबंद देशास मिळाला पाहिजे, ह्या अटीवरच सरकार ग्रँट देणार आहे. कोळशाची उष्णता देण्याची कार्यक्षमता ३०% वरून ४५% पर्यंत वाढवितां आली, तर ग्रेट ब्रिटनचे सालिना ६ कोटि पौंड वांचतील व बचत होणाऱ्या कोळशाचा इतर कामाकडे उपयोग करतां येईल.

### लंडन शहरांत गॅस प्लँट बसेस

लंडन शहरांत प्रोड्यूसर गॅस प्लँटवर चालणाऱ्या ५५० बसेस आहेत. प्रत्येक बसला दर आठवड्यास एक मण कोळसा लागतो व प्रत्येक ८० मैलांच्या प्रवासानंतर कोळसा बदलावा लागतो. गॅस प्लँटच्या वापरामुळें दरसाल ३½ लक्ष गॅलन पेट्रोलची बचत होईल.

### ब्रिटिश बँकांतील ठेवी

युद्धास प्रारंभ झाल्यापासून ब्रिटिश बँकांकडील ठेवींत १२५ कोटि पौंडांची भर पडली आहे. अकरा प्रमुख बँकांकडे मिळून ३६३ कोटि पौंडांच्या ठेवी आहेत.

### स्वतंत्र पोलिस शाखा

धान्याचें रेशनिंग, भावनियंत्रण, कापड व सूत ह्यांवरील नियंत्रण, इत्यादींसंबंधींचे गुन्हे उघडकीस आणण्यास मदत व्हावी म्हणून मुंबई शहरांत एका डेप्युटी कमिशनरच्या हाताखालीं अधिकारी व पोलिस देऊन एक स्वतंत्र शाखा निर्माण करण्यांत आली आहे.

### गुमास्ता कायदा

गणेशचतुर्थी व संवत्सरी ह्या सणांचे निमित्त दुकानें उघडीं ठेवण्याबाबत नियमांत सरकारनें नेहमीप्रमाणें सवलती दिल्या आहेत.

### शेतीच्या उत्पन्नावर कर

प्रांतावरील करांचे धर्तीवर शेतीच्या उत्पन्नावर कर बसविण्याचें बंगाल सरकारनें ठरविलें आहे. त्या सरकारास आपलें स्वतःचें उत्पन्न तातडीनें वाढविणें आवश्यक झालें आहे व शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणें अगदीं योग्यच आहे असें त्याचें म्हणणें आहे. शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणाऱ्या बिलाचा मसुदा प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

### जनावरांच्या निर्यातीवर बंधन

उंट व इतर जनावरें यांच्या सिंधमधून होणाऱ्या निर्यातीवर तेथील सरकारनें नियंत्रण घातलें आहे.

### युद्ध किती दिवस चालणार ?

"युद्ध आणखी कांहीं काळतरी चालू रहाणारच, आणि १९४४ अखेर तरी तें संपण्याची मला खात्री वाटत नाहीं" असें दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रधान, जनरल स्मट्स हे नुकतेच म्हणाले.

### हिंदुस्थानांत कोयनेलचा पुरवठा

सरकारजवळ २ लक्ष, ४० हजार पौंड कोयनेलचा साठा आहे. १९४३-४४ मध्यें लोकांना देण्यासाठी प्रांतिक सरकारांस १ लक्ष, ४६ हजार पौंड कोयनेल देण्यांत येईल. अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटीस ५ पौंड कोयनेल मिळेल. इतर कोणत्याहि विश्वविद्यालयानें कोयनेलची मागणी केली नव्हती.

### इन्फ्लेशनवर तोडगा

प्रसृत झालेलें फाजील चलन खेचून घेऊन इन्फ्लेशन कमी करण्यासाठी संयुक्त प्रांतांमध्यें युद्ध कर्जरोखे खपविण्याची मोहीम एप्रिलमध्यें सुरू केली, ती यशस्वी होऊन जुलै अखेर ७ कोटि, ४२ लक्ष रुपयांचे कर्जरोखे खपले.

### एअरग्राफ

साध्या टपालानें जाणाऱ्या ३० पत्रांचें वजन १ पौंड भरतें. तेवढ्याच वजनांत एअरग्राफ पद्धतीनें ३,००० पत्रें जाऊं शकतात.

### कंपनीच्या वार्षिक सभेंत ऑडिटरची नेमणूक झाली नाहीं तर ?

कंपनीच्या वार्षिक साधारण सभेंत ऑडिटरची नेमणूक होते, तिची मुदत पुढील वार्षिक साधारण सभेपर्यंत असते. एखाद्या कंपनीच्या वार्षिक साधारण सभेनें ऑडिटरची नेमणूक केलीच नाहीं, तर काय परिस्थिति निर्माण होईल ? ह्यासंबंधांत कायदा असा आहे, कीं कोणत्याहि भागीदारास प्रांतिक सरकारकडे अर्ज करून ऑडिटर नेमण्याची मागणी करतां येते. असा अर्ज आल्यानंतर, प्रांतिक सरकार कंपनीच्या ऑडिटरची स्वतःच नेमणूक करतें व त्यास मेहनताना कंपनीनें किती दिला पाहिजे, तेंहि सरकारच ठरवितें.

### धान्याचीं सहकारी दुकानें

धान्याची खरेदी-विक्री करतांना वाजवी लागणारी दलाली वाचावी, ह्या दृष्टीनें पंजाब सरकार धान्याचीं सहकारी दुकानें उघडणार आहे.

### पोस्टखात्यांचा नफा

सरकारी पोस्ट व तार खात्याचे १९४०-४१ चे पक्के हिशेब तयार झाले आहेत, त्यावरून ह्या खात्यास त्या वर्षी ३ कोटि, ४१ लक्ष रुपये नफा झाला असल्याचें दिसून येतें. १९३९-४० मधील नफ्याचा आंकडा १ कोटि, २५ लक्ष रुपये होता.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २७४ |
| २ जितराष्ट्रांच्या प्रयोगशाळांवर पहारा... ... | २७५ |
| ३ मुंबई प्रांतांतील पिकें ... | २७६ |
| ४ व्यापार वृद्धीसाठीं सहकार्य | २७६ |
| ५ स्फुट विचार ... | २७७ |
| केबेक परिषदेंतील निर्णय–हिंदी जहाजांचा धंदा–बंगाल मधील अन्न परिस्थिति–मध्यवर्ती सरकारचें धोरण काय आहे?—बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट—कराड बँकेचा रौप्यमहोत्सव. | |
| ६ हैद्राबाद स्टेट बँक ... | २७९ |
| ७ हिंदी गिरण्यांत कपाशीचा उठाव ... ... | २७९ |
| ८ मुधोळ स्टेट सें. को. बँक | २७९ |

अर्थ

बुधवार, ता. १ सप्टेंबर, १९४३

# जितराष्ट्रांच्या प्रयोगशाळांवर पहारा करण्याची आवश्यकता

"केवळ निःशस्त्रीकरणानें भागणार नाहीं"

## रसायन शास्त्रज्ञांचा इशारा

इतर प्रमुख राष्ट्रांना चकवून जर्मनी एवढा प्रबळ झाला कसा? त्याच्या शक्तीचें रहस्य कोणतें? शत्रुराष्ट्रांवर विजय मिळविल्यानंतर तीं पुनः तापदायक होणार नाहींत, अशी व्यवस्था करण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे? इत्यादि प्रश्नांची चर्चा वेगवेगळ्या दृष्टिकोनांनीं केलेली ऐकण्यांत येते. जर्मनी व जपान ह्यांचें संपूर्ण निःशस्त्रीकरण केलें पाहिजे व त्यांचेवर तीक्ष्ण नजर ठेवून त्यांची लष्करी तयारी बंद पाडली पाहिजे, असें कांहीं सांगतात. कित्येकांच्या मतें जर्मन सत्तेचें मूळ त्या देशांतील विशिष्ट शिक्षणक्रमांत असल्यानें, युद्धसमाप्तीनंतर तेथील शिक्षणाचें ध्येय व व्यवस्था ह्यांवर संयुक्त राष्ट्रांनीं नजर ठेवून, जर्मन राक्षस पुनः निर्माण होऊं देतां कामा नयेत. जर्मनी एवढा सामर्थ्यवान झाला, ह्याचें कारण त्या देशाची शास्त्रीय प्रगति होय, व विशेषतः रासायनिक शोधांचा युद्धोपयोगी उत्पादनासाठी त्यानें केलेल्या फार मोठ्या प्रमाणावरील उपयोगाकडे संयुक्त राष्ट्रांचें लवकर लक्ष वेधलें गेलें नाहीं, त्यामुळें जर्मनीचें लढाऊ बळ वाढलें, असेंहि मत व्यक्त करण्यांत येतें. इन्स्टिटय़ूटशन ऑफ केमिकल इंजिनिअर्सच्या वार्षिक सभेंत तिचे अध्यक्ष, मि. गार्लंड, ह्यांनीं आपल्या शास्त्राच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाचा उहापोह केला. युद्धानंतर आपण आपल्या परराष्ट्रांतील वकिलांस शास्त्रज्ञ मदतीस दिले पाहिजेत; म्हणजे त्यांच्या सल्ल्यानुसार पराजित शत्रुराष्ट्रांच्या तयारीस पायबंद घालतां येईल; जगांतील कच्च्या मालाच्या पुरवठ्याची चौकशी करून तो कसा मिळवितां येईल ह्याचा विचार केला पाहिजे; कोळसा व समुद्राचें पाणी ह्यांपासून नवे पदार्थ निर्माण करण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले पाहिजेत; मागसलेल्या देशांतील लोकांस जिन्नस स्वस्त मिळावेत, ह्या दृष्टीनें उत्पादनाचा खर्च कमी केला पाहिजे व त्यासाठी उत्पादनाच्या नव्या पद्धति शोधून काढल्या पाहिजेत; वगैरे सूचना मि. गार्लंड ह्यांनीं केल्या. ते पुढें म्हणालेः—कोणत्याहि मोठ्या राष्ट्राच्या मानानें ग्रेट ब्रिटनमध्यें मोठ्या प्रमाणावरील उत्पादनास आवश्यक असलेले खनिज धातू कमी प्रमाणांत सापडतात. फक्त कोळसा, लोखंड, शाडू हीं आपल्या देशांत आहेत. आपल्या साम्राज्यांतील खनिज धातू व ग्रेट ब्रिटनमधील धातू हीं मिळून आपणांस पुरेशी आहेत, ह्या गोड समजुतीखाली आपण इतकीं वर्षें होतों. परंतु पेट्रोलियमच्या जागतिक उत्पादनापैकीं फक्त १·८% आपल्या नियंत्रणाखाली आहे; पायरायटिस व गंधक ह्यांचा वाटा अनुक्रमें फक्त ५·६% व ५·२% आहे; बॉक्साइटच्या उत्पादनापैकी ८·३% उत्पादन आपल्या साम्राज्यांत होतें आणि पोटॅशच्या उत्पादनापैकी फक्त ०·५% आपल्या साम्राज्याच्या वाट्यास येतें. हीं सर्व द्रव्यें अत्यंत महत्वाचीं आहेत. कोळसा आपल्याजवळ विपुल आहे, परंतु त्याचा तरी आपण काय उपयोग केला आहे? इंजनांत सर्पण म्हणून व वीज निर्माण करण्यासाठीं म्हणूनच आपण तो मुख्यतः जाळतों, परंतु त्यापासून किती रासायनिक पदार्थ निर्माण होऊं शकतील, ह्याकडे आपण पुरेसें लक्ष दिलेलें नाहीं. समुद्राच्या पाण्यापासून ब्रोमीन व मॅग्नेशियम हे पदार्थ मोठ्या प्रमाणावर करण्यास आपण प्रारंभ केला पाहिजे. शत्रुराष्ट्रांतील रासायनिक धंद्यांच्या वाढीस वेळींच पायबंद घातला असता, त्यांचे ॲसिडचे कारखाने वेचून काढून त्यांचा नाश केला असता व नैट्रिक ॲसिडचें उत्पादन त्यांना वाढवूं दिलें नसतें तर आजची परिस्थिति कदाचित् निर्माण झालीहि नसती, ह्या सर रॉबर्ट रॉबिनसन ह्यांच्या उद्गारांचा उल्लेख करून मि. गार्लंड ह्यांनीं पुढील घ्यावयाच्या खबरदारीकडे लक्ष वेधलें. युद्धसमाप्तीनंतर, नव्या व्यवस्थेंत, शत्रुराष्ट्रांचे लष्करी, आरमारी, वैमानिक बळ नाहींसें करावें लागेल, त्यांच्या आर्थिक धोरणावर निर्बंध घालावे लागतील; त्याचप्रमाणें त्यांच्या रासायनिक संशोधनावर कडक निर्बंध घालणें अत्यावश्यक आहे. एकाद्या राष्ट्राची रासायनिक प्रगति मोठ्या प्रमाणावर झालेली असेल, तिच्यांत तज्ज्ञ संशोधकांची संख्या मोठी असेल व त्या राष्ट्रास लढाऊ तयारी करण्याची प्रबळ इच्छा झाली तर त्याचा नैट्रिक ॲसिडचा सबंद पुरवठा बंद पाडला, तरीसुद्धा त्यास विध्वंसक दारूगोळा करतां येणें शक्य होईल अशी परिस्थिति आहे. ह्यावरून आपल्या देशांतील रासायनिक प्रगतीचें महत्त्व किती आहे व शत्रूराष्ट्रांची रासायनिक प्रगति तापदायक होऊं न देण्याचें आगत्य किती आहे ह्याची कल्पना येईल. एकाद्या देशाचा उद्देश कांहींतरी विशेष प्रकारचा आहे, हें ओळखण्याचें गमक मि. गार्लंड ह्यांनीं सांगितलें. चिलीमधून वाटेल तेवढें नायट्रेट जर्मनीस मिळण्याची शक्यता असतांना १९१४–१८ च्या महायुद्धापूर्वींच जर्मनीनें हवेंतून नायट्रेट काढण्याची "हाबर" महागडी पद्धत कां स्वीकारली? १९३३–३८ मध्यें जर्मनीनें कृत्रिम रबर तयार करण्यासाठी व पेट्रोलच्या उत्पादनासाठी प्रचंड कारखाने कां उभारले? लाकडापासून साखर व मांसोत्पादक द्रव्यें निर्माण करण्यासाठी जर्मनीनें "बर्गिअस"च्या संशोधन कार्यावर एवढा प्रचंड खर्च का केला? ह्या सर्वांचें उत्तर एकच; जर्मनीच्या मनांत कालांतरानें इतर देशांवर चढाई करण्याचें होतें व त्याचीही पूर्वतयारी होती! एकादा देश कांहीं महत्त्वाच्या द्रव्यांच्या बाबतींत—तीं पुरेशीं मिळत असतांहि—स्वयंपूर्ण होण्यासाठी भरमसाट व प्रमाणाबाहेर खर्च करूं लागला, म्हणजे त्याचा उद्देश सरळ नाहीं हें निश्चितपणें समजावें, ह्या

मुद्यावर मि. गार्डव ह्यांनीं भर देऊन, ह्यापुढें तरी संयुक्त राष्ट्रांनीं असा उपक्रम हाणून पाडण्याची कांहींतरी कार्यक्षम व कायमची व्यवस्था करावी, असें सुचविलें आहे. निःशस्त्रीकरणाची लष्करी बाजू सर्वांस परिचित आहे; परंतु ह्यापुढें इतर देशांतील केवळ औद्योगिक प्रगतीवरच नव्हे, तर शास्त्रीय ज्ञानावर व संशोधनावरहि नियंत्रण घालण्याची पाळी कशी येणार आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

## मुंबई प्रांतांतील पिकें

### लागवड, उत्पादन व बाजारभाव

पाण्याखालील पिकें

| | १९४०-४१ हजार एकर | १९४१-४२ हजार एकर |
|---|---|---|
| तांदूळ | १६२ | २०८ |
| गहू | १७५ | १५७ |
| ज्वारी | २७० | २८७ |
| बाजरी | ६५ | ७० |
| मका | २२ | २२ |
| बार्ली | ९ | ९ |
| इतर धान्यें व द्विदल धान्यें | ८३ | ८४ |
| ऊंस | ११६ | ११२ |
| इतर खाद्य पिकें | १८० | १७५ |
| कपास | ३३ | ३७ |
| इतर बिगर खाद्य पिकें | १९८ | १५७ |
| एकूण | १,३१३ | १,३१८ |

### लागवड कायम, परंतु उत्पादनांत घट

मुंबई प्रांतांतील १९४१-४२ मधील पिकें

मुंबई प्रांतास शेतीच्या दृष्टीनें १९४१-४२ हें वर्ष विशेष चांगलें गेलें नाहीं. लागवडीचें क्षेत्र कायम राहूनहि प्रमुख पिकांच्या उत्पादनांत घट झालेली आढळली. शेतीचें क्षेत्र १९४०-४१ च्या मानानें १·३%नें घटलें, परंतु उत्पादनांत मात्र १३·५% घट झाली. खालील तक्ता हें स्पष्टपणें दर्शवितो:—

| विभाग | क्षेत्र (हजार एकर) १९४०-४१ एकर | १९४१-४२ एकर | उत्पादन (हजार टन) १९४०-४१ टन | ४१-४२ टन |
|---|---|---|---|---|
| गुजराथ | २५३० | २३८० | ६९३ | ५२१ |
| उत्तर डेक्कन | ३८२० | ३७६७ | ७८९ | ७१० |
| दक्षिण डेक्कन | ७५४५ | ७५८० | ११०० | ९५६ |
| कर्नाटक | ४७२० | ४६७३ | ७६५ | ७६८ |
| कोकण | १६१३ | १५८५ | ६२८ | ४८२ |
| सबंद मुंबई प्रांत | २०,२२८ | १९९६५ | ६,९७५ | ३,४३७ |

दक्षिण डेक्कनमध्येंच फक्त लागवडीच्या क्षेत्रांत किंचिततरी वाढ झालेली दिसते. बाकी सर्वत्र, लागवड व उत्पादन हीं दोन्ही घटलेली आहेत. त्या कारणानें धान्य व वैरण ह्यांची प्रांतांतील बहुतेक भागांत थोडी तूट भासली.

### चढते बाजारभाव

घटलेलें उत्पादन, अनिश्चित आंतरराष्ट्रीय परिस्थिति व वहातुकीच्या अडचणी, ह्यांमुळें धान्याच्या किंमती वाढत चालल्या, कपाशीची किंमत मात्र कमी झाली, त्याचें कारण कपाशीचें बाहेर देशांतील गिऱ्हाईक नाहींसें झालें, हें होय. सरकारास किंमतींचें नियंत्रण करणारे हुकूम वेळोवेळ सोडावे लागले.

पीक कापणीच्या वेळच्या बाजारभावांचा तुलनात्मक तक्ता खाली दिला आहे. कपाशीची खंडी ७४८ पौंड वजनाची असून बाकीचा शेर ८० तोळ्याचे आहेत.

रुपयास किती शेर ?

| जिन्नस | ठिकाण | १९३७-३८ शेर | १९३८-३९ शेर | १९३९-४० शेर | १९४०-४१ शेर | १९४१-४२ शेर |
|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी | सोलापूर | १७ | १६ | १३ | १८ | १६ |
| बाजरी | नाशिक | ११ | ११ | १० | ११ | ११ |
| तांदूळ | ठाणें | ९ | ८ | ८ | ७ | ५ |
| गहू | अहमदाबाद | १० | ११ | ९ | ८ | ६ |
| शेंगदाणा | कराड | १४ | १५ | १३ | १४ | ११ |
| | | खंडीस किती रुपये ? | | | | |
| कपास (भडोच) | मुंबई | १६८ | १६० | २५४ | २५७ | १६४ |

## परराष्ट्रीय व्यापारवृद्धीसाठी अमेरिका व इंग्लंड ह्यांचें सहकार्य

(१)

अमेरिका व ब्रिटिश साम्राज्य ह्या दोघांचें मिळून उत्पादन शत्रुराष्ट्रांच्या उत्पादनाच्या दुप्पट-तिप्पट आहे, असें ब्रिटिश मंत्रिमंडळांतील उत्पादन खात्याचे मंत्री मि. ऑलिव्हर लिट्लटन हे एका भाषणांत नुकतेच म्हणाले. जगांतील सर्व राष्ट्रांत अमेरिकेइतका मोठा सावकार कोणताहि नाहीं; युद्धसमाप्तीनंतर ग्रेट ब्रिटन व अमेरिका हे परराष्ट्रीय व्यापार वाढविण्यास पुनः प्रारंभ करतील तेव्हां मागसलेल्या देशांस मुक्तहस्तानें सावकार राष्ट्रानें कर्जाऊ मदत केल्याविना व स्वतःचे हद्दींत कांहीं आयात होऊं दिल्याविना परराष्ट्रीय व्यापार वाढविण्याचें ध्येय साध्य होणार नाहीं हें अमेरिकेनें ध्यानांत ठेवावें, अशी सूचना मि. लिट्लटन ह्यांनीं केली.

(२)

युनायटेड स्टेट्स चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, मि. एरिक जॉनसन, हे आपल्या लंडन येथील एका भाषणांत नुकतेच म्हणाले, "ग्रेट ब्रिटनच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील आर्थिक व राजकीय धोरणांत बदल करण्याचा यत्न करण्याची अमेरिकेची इच्छा नाहीं; अमेरिकेचें स्वतःचें धोरणहि बदलण्याचें प्रयोजन नाहीं. सध्याची परिस्थिति गृहीत धरूनच, ह्या दोन देशांमध्यें सहकार्य कसें शक्य होईल, हें पाहिलें पाहिजे. जगांतील मागसलेल्या प्रदेशांस अमेरिकन व ब्रिटिश भांडवलाची गरज भासेल, परंतु त्यांत स्वतःचें भांडवल मिसळून नियंत्रणाचे अधिकारहि त्यांस पाहिजे आहेत. सर्व जगभर गिऱ्हाइकांची संख्या वाढावी, अशीच माझी इच्छा आहे. अमेरिकेजवळ भरपूर भांडवल आहे, तर भिन्न भिन्न चलन व्यवस्था, हुंडणावळी इत्यादींच्या जंजाळांतून आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याचें कागदी व्यवहार करून भांडवल गुंतविण्याचा अनुभव इंग्लंडजवळ आहे. अमेरिका व इंग्लंड ह्यांनीं सहकारित्वानें आपली योजना आखणें इष्ट आहे."

## स्फुट विचार

### क्वेबेक परिषदेंतील निर्णय

ब्रिटिश-अमेरिकन फौजांनीं सिसिलीचा केलेला पाडाव आणि पूर्व आघाडीवर रशियानें मिळवलेले महत्त्वाचे विजय ह्यांच्या योगानें युरोपांतील युद्धास नवीन स्वरूप प्राप्त झालें आहे. इटलीवर मित्रराष्ट्रांच्या विमानांच्या स्वाऱ्या सारख्या चालू आहेत आणि जर्मनी तो देश आपल्या लष्करी वर्चस्वाखाली आणून लढवणार असें दिसत आहे. अशा वेळीं मित्रराष्ट्रांच्या पुढाऱ्यांस दक्षिण व पश्चिम ह्या दिशांनीं युरोपवर स्वारी करण्याच्या दृष्टीनें योजना आखणें अगत्याचें होऊन मि. चर्चिल व प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या कॅनडामध्यें क्वेबेक येथें आपल्या लष्करी सल्लागारांच्या समवेत सुमारें दोन आठवडे पर्यंत वाटाघाटी झाल्या. ह्या पुढील मोहीम किंवा मोहीमा कोठें होणार ह्या प्रश्नास प्रत्यक्ष रणांगणांवर दिसून येईल अशा अर्थाचें उत्तर प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं दिलें आहे. युरोपांतील नवीन मोहिमेची रूपरेखा आखण्यांत आली असून तिची सिद्धता होत आहे असें अनुमान ह्या उत्तरावरून काढलें जावें अशी अपेक्षा तें देणाराची आहे हें उघड आहे. ह्या संबंधांत एका बाजूस इंग्लंड व अमेरिका आणि दुसऱ्या बाजूस रशिया ह्यांचेमध्यें एकवाक्यता नाहीं अशी शंका उत्पन्न होण्यास कारणें असलीं तरी क्वेबेकच्या परिषदेचे निर्णय मि. स्टालिन ह्यांस कळवण्यांत येत असून त्यांची अंमलबजावणी रशियाच्या संमतीनेंच केली जाईल असें प्रसिद्ध झालें आहे. मित्रराष्ट्रांची एकजूट अबाधित ठेवण्यावर त्यांचा अंतिम विजय अवलंबून आहे ही साधी गोष्ट ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्दी विसरतील हें संभवनीय नाहीं. मित्रराष्ट्रांचें लक्ष तूर्त युरोपियन आघाड्यांवर केंद्रित झालें असलें तरी त्यांच्या योजनांतून पॅसिफिक महासागर व जपान वगळला जाणें अशक्य आहे. जपान विरुद्धहि चढाई सुरू करण्यांत येईल आणि चीनला युद्धसहाय पुरवण्याची व्यवस्था केली जाईल असें क्वेबेक परिषदेंतील चर्चेच्या प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून दिसत आहे. पूर्व एशियामध्यें लॉर्ड लुइ मौंटबॅटन ह्यांची सरसेनापती म्हणून योजना झाली आहे ती जपान विरुद्ध होणाऱ्या चढाईचें पूर्व चिन्ह आहे असें मानण्यांत येत आहे तें सूचक आहे. युद्धास जसजसा अधिक रंग चढेल तसतशा क्वेबेकसारख्या परिषदा वारंवार भरवाव्या लागून नवीन नवीन लढाऊ योजना हातीं घ्याव्या लागतील असें मित्रराष्ट्रांचे पुढारी म्हणत आहेत, ह्यावरून मित्रराष्ट्रांच्या अपेक्षा किती आशामूलक आहेत हें स्पष्ट होत आहे.

### हिंदी जहाजांचा धंदा

एका काळीं जहाजें बांधणें आणि त्यांमधून वहातुक करणें ह्या धंद्यांत हिंदुस्थान देश पुढारलेला होता हें प्रसिद्ध आहे. पण वाफेनें चालणारीं प्रचंड जहाजें पाश्चात्य देशांत तयार होऊन साता समुद्रांत वावरूं लागलीं तेव्हां हिंदुस्थानचा हा धंदा मागें पडला. ह्या देशाचा परराष्ट्रीय व्यापार दुसऱ्या देशांच्या जहाजांतून होऊं लागल्याप्रमाणें ह्या वहातुकीच्या धंद्यांतील फायद्यास हिंदुस्थान मुकला. फार काय, ह्या देशाच्या किनाऱ्यालगतची समुद्रांतील वहातुक परराष्ट्रीय जहाजांतून होत आहे. देशाचें संरक्षण आणि त्याची आर्थिक प्रगति ह्यांचे दृष्टीनें जहाजांच्या राष्ट्रीय धंद्याची जोपासना करणें आपलें कर्तव्य आहे असें सर्व राष्ट्रीय सरकारें समजतात आणि त्या धंद्यास सहेतुक रीतीनें सहाय देतात. जहाजें बांधणें हा उद्योग आधुनिक काळांत मोठ्या भांडवलाचा व यांत्रिक स्वरूपाचा झाल्यानें हिंदुस्थानांत तो यशस्वी होणार नाहीं अशा समजुतीनें येथील राजकर्त्यांनीं त्याकडे दुर्लक्ष केलें आहे आणि ब्रिटिश जहाजें विपुल व कार्यक्षम असतांना स्वतंत्र हिंदी नौकानयनाच्या उद्योगाचा खटाटोप करण्याचें कारण नाहीं, असें त्यांनीं ठरवलें. हिंदी धंदेवाल्यांनीं धाडस करून हा धंदा काढण्याची व चालवण्याची तयारी केली असतांहि त्यांस सवलती आणि सहाय मिळूं शकलें नाहीं. ह्या बेफिकीरीच्या धोरणाविरुद्ध हिंदुस्थानांत सारखी ओरड करण्यांत आली आहे, पण तिचा विशेष उपयोग झालेला नाहीं. ह्या देशांत जहाजें बांधण्याचे कारखाने असते तर सध्याच्या युद्धपरिस्थितींत त्यांचा किती मोठा उपयोग झाला असता ह्याची जाणीव ब्रिटिश सरकारसहि झाल्यावांचून राहिली नसेल. युद्ध चालू असतांना जहाजें बांधण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानांत स्थापणें व्यवहार्य नाहीं असें म्हणून ब्रिटिश सरकारानें त्यास भरीव उत्तेजन देण्याचें नाकारलें आहे. युद्धसमाप्तीनंतर मित्रराष्ट्रांच्या विचमानें जगांतील समुद्रावरील जहाजांच्या वहातुकीच्या धंद्याची निरनिराळ्या देशांमध्यें वाटणी होईल तेव्हां हिंदुस्थानच्या गरजेचा विसर पडेल अशी भीति वाटणें स्वाभाविक आहे. म्हणूनच मुंबईच्या इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्सला हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर अझीझ उल हक ह्यांनीं भेट नुकतीच दिली, तेव्हां त्या संस्थेच्या अध्यक्षांनीं हिंदी लोकांचें प्रस्तुत विषयाबाबतचे गाऱ्हाणें त्यांचेपुढें मांडलें. युद्ध चालू असतांच कॅनडानें आपलें जहाजांचें उत्पादन वाढवलें आणि ऑस्ट्रेलियांतहि ह्या धंद्यास चालना मिळाली आहे, पण हिंदुस्थान देश मात्र कोरडा राहिला आहे असें ते म्हणाले. हिंदुस्थानची बाजू ब्रिटिश सरकारापुढें जोरानें मांडून विस्तीर्ण समुद्रकिनारा व मोठा आंतरराष्ट्रीय व्यापार असणाऱ्या ह्या देशास जहाजांचा धंदा मिळवून देण्याचा प्रयत्न मध्यवर्ती सरकारानें करावा असें त्यांनीं विनविलें. प्रस्तुत युद्धाच्या परिस्थितीपासून बोध घेऊन हिंदुस्थानच्या व्यापारी व लढाऊ जहाजांच्या उद्योगांस उत्तेजन देणें इंग्लंड व इतर मित्रराष्ट्रें यांना अगत्याचें वाटावयास पाहिजे.

### बंगालमधील अन्नपरिस्थिति

कलकत्ता शहर आणि बंगालमधले कांहीं इतर भाग ह्यांचेमध्यें अन्नपरिस्थिति भीषण होऊन गेल्याचें तिकडून प्रसिद्ध होणाऱ्या उपासमारीच्या व तीमुळें घडणाऱ्या मृत्यूंच्या करुण कहाण्यांवरून स्पष्ट दिसत आहे. अन्न नाहीं म्हणून मेलेल्या लोकांचीं प्रेतें कलकत्ता शहरांत पडावीं अशा थराला गोष्टी येत तोंपर्यंत ह्या अवस्थेची पूर्व कल्पना येऊन तिच्या प्रतिकारार्थ वेळींच उपाययोजना झाली नाहीं ह्यासंबंधांत मध्यवर्ती सरकार व बंगाल सरकार ह्यांचे दरम्यान एकमेकांवर दोषाचें खापर फोडण्याचे प्रयत्न झाले आहेत. पण सध्याचा प्रसंग उत्पाद्यापासाड्यांचा नमून आलेल्या संकटास यशस्वी रीतीनें तोंड देण्याचा आहे हें सर्व विचारी माणसांस पटलें आहे हें समाधानकारक आहे. तसेंच, हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांच्या स्वार्थी किंवा आडमुठेपणाच्या धोरणास न जुमानतां देशाच्या सर्व भागांस धान्याचा योग्य पुरवठा होईल असें निश्चयात्मक धोरण अंगिकारणें अग-

त्याचें आहे असें स्पष्ट लोकमत प्रकट झालें आहे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यानें प्रांतिक सरकारांची स्वायत्तता आपले मार्गांत येऊं देतां कामा नये. सध्यासारख्या युद्धपरिस्थितींत असल्या अडचणी सांगणें धडाडीच्या, उत्साहाच्या व कार्यक्षमतेच्या अभावाचें लक्षण ठरेल. बंगालच्या आपत्तीच्या निवारणार्थ इतर प्रांतांतील लोकांनीं फंड उभारून सहाय देण्याचे यत्न चालवले आहेत ते स्तुत्य आहेत. तथापि, बाहेरून धान्य देण्याचे कामांत रेल्वेजची मदत लागेल ती मिळाली पाहिजे आणि हें धान्य उपलब्ध होण्याचीहि व्यवस्था मध्यवर्ती सरकारच्या विद्यमानें होणें इष्ट आहे. ह्या बाबतींत बंगालच्या प्रांतिक सरकारची जबाबदारी मोठी आहे हें विसरून चालावयाचें नाहीं.

### मध्यवर्ती सरकारचें धोरण काय आहे ?

अन्न पुरवठ्याचे बाबतींत कोणाच्याहि चुका आजपर्यंत झाल्या असोत; ह्यापुढचें धोरण तरी मध्यवर्ती सरकारनें स्पष्टपणानें आखून तें निश्चयानें अमलांत येईल अशी कार्यक्षम तजवीज करणें आवश्यक आहे. धरसोडीचें धोरण व दुबळेपणा ह्यांस त्यानें थारा देतां कामा नये असें त्यास सांगण्यांत येत आहे तें मागील अनुभवानें शहाणपणा शिकण्याच्या जरूरीचें द्योतक आहे. मध्यवर्ती सरकारचे अन्न मंत्री सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं कलकत्त्यास जाऊन तेथें प्रांतिक सरकार व लोकांचे प्रतिनिधी ह्यांच्याशीं गेल्या आठवड्यांत विचारविनिमय केला. त्याप्रसंगीं त्यांनीं असें सांगितलें कीं प्रांतिक व संस्थानी सरकारांनीं स्वतःच्या लोकांच्या गरजा भागवाव्यात, पण त्याचबरोबर देशाच्या इतर प्रांतांतील जनतेस शक्य तेवढ्या धान्याचा पुरवठा होण्यास मदत केली पाहिजे. नवीन पिकांवर नजर ठेवून त्यांची वाटणी नीट होईल अशी तजवीज करण्याची जबाबदारी प्रांतिक सरकारांची आहे असेंहि त्यांनीं बंगाल सरकारास उद्देशून बजावलें. बाहेरून पुरवठा होण्याची अपेक्षा करण्यापेक्षा प्रांतांतील अंतर्व्यवस्थेची घडी सुव्यवस्थित रीतीनें बसवण्याचें महत्त्व त्यांनीं त्यांतील सरकारांच्या मनांवर बिंबवण्याचा प्रयत्न केला. कलकत्त्यांत शिधापद्धति अंमलांत आणण्याचें महत्त्वहि त्यांनीं प्रतिपादलें, इतकेंच नव्हे तर प्रांतांत शक्य तितक्या ठिकाणीं ती चालू करणें ही धान्य पुरवठ्याच्या प्रश्नाची गुरुकिल्ली आहे असें सांगितलें. रेल्वेच्या वहातुकीच्या साधनाचा अधिकांत अधिक कार्यक्षमतेनें उपयोग केला जाण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं अखेर जोर दिला. त्यांच्या भाषणांत मध्यवर्ती सरकारच्या धोरणाचा खुलासा कांहींच झाला नाहीं. बाहेरून धान्य मिळण्याची खटपट प्रांतिक सरकारांनीं आपणच करावी, त्या बाबतींत हिंदुस्थान सरकार कांहीं करणार नाहीं कीं काय ? ह्या शंकेस उत्तर त्यांच्या भाषणांत सापडत नाहीं. अनेक अन्न परिषदा भरल्या आणि अन्न पुरवठ्याची दीर्घ चर्चा मध्यवर्ती कायदेमंडळांत झाली. पण एकसूत्री, निश्चित व धडाडीचें असें मध्यवर्ती सरकारचें धोरण अजून ठरलेलें नाहीं असें लोकांनीं समजावयाचें कीं काय ?

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचें पुढें पाऊल

कंपनीच्या आर्टिकल ५६ प्रमाणें कंपनीला पंधरा लक्ष रुपयांपर्यंत कर्जाऊ रकमा घेण्याचा अधिकार दिलेला आहे. सदर पंधरा लक्ष रुपयांची मर्यादा पंचवीस लक्ष करावी असा स्पेशल ठराव भागीदारांच्या विशेष साधारण सभेनें केला आहे. साखर विक्रीवर सरकारी नियंत्रण असल्यामुळें सरकारी हुकूम देईल तेवढींच पोतीं विकलीं जातात. त्यामुळें चाळीस हजार पोत्यांचे जवळ जवळ पंधरा लक्ष रुपये अडकून पडलेले आहेत. पुढील हंगामाचा ऊस लावणें, सरकारी देणीं देणें व फॅक्टरीला लागणारे स्टोअर्स विकत घेणें आणि इतर सर्व चालविणें याकरितां रोख रकमेची जरूरी आहे व त्याकरितां पंचवीस लक्ष रुपयांची मर्यादा करून घेण्यांत आली आहे. परंतु, त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे रसांतील मळी म्हणजे मोलॅसिस यापासून रेक्टिफाईड स्पिरिट काढण्याचा कारखाना उभारण्याचें संचालक मंडळानें ठरविलें आहे ही होय. त्याकरितां हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार यांचेकडे पत्रव्यवहार चालू असून कंपनीला स्पिरिट काढण्याचा परवाना सरकारकडून मिळेल अशी खात्री वाटत आहे. त्याकरितांहि रकमेची जरूरी कंपनीला लागणारी आहे. बृहन्महाराष्ट्र कंपनीला ह्यासाठी लागणाऱ्या पैशाची अडचण भासणार नाहीं व जरूर तेवढी डिपॉझिट्स तिला मिळतील, ह्याबद्दल शंका नाहीं.

### कराड अर्बन को. बँकेचा रौप्यमहोत्सव

कराड अर्बन को. बँकेची स्थापना २४ जानेवारी १९१७ रोजीं झाली. तिचा रौप्यमहोत्सव गेल्या वर्षीच वास्तविक साजरा व्हावयाचा, परंतु तो समारंभ पुढें ढकलण्यांत आला व आतां तो ता. ५ रोजीं होणार आहे. बँकेच्या कारभारांत सतत कळकळीनें लक्ष घालणारे अध्यक्ष, श्री. नानासाहेब देशपांडे, ह्यांचें तैलचित्र त्याच वेळीं बँकेंत लावण्यांत येणार आहे हेंहि औचित्यपूर्ण आहे. सर जनार्दनराव मदन हे अध्यक्षस्थान स्वीकारणार असून, प्रा. धनंजयराव गाडगीळ हेहि उपस्थित राहून भाषण करणार आहेत. ह्या बँकेची कारभार कसोशीनें चालवून दक्षतेनें व्यवहार करण्याबद्दल ख्याती आहे आणि तिच्या आकाराच्या अर्बन बँकांत तिचा दर्जा अत्यंत उच्च आहे. कराड तालुक्याच्या सोसायट्यांना पैसा पुरविण्यास तिला सहकारी खात्यानें परवानगी द्यावी, अशी बँकेची मागणी आहे व तिनें सेल सोसायटीचें कामकाज यशस्वी करून दाखविलें आहे. बँकेच्या रौप्यमहोत्सवाचे निमित्तानें आम्हीं तिचें अभिनंदन करतों व तिच्या कार्यविस्तारास वाव मिळून तिची आगखी भरभराट होवो, असें इच्छितों.

### हैद्राबाद संस्थानांत धान्याच्या पैदाशींत वाढ करण्याच्या योजना

"अधिक धान्य पिकवा" ची मोहीम यशस्वी करण्यासाठी निजाम सरकारनें ८१० बंद पडलेलीं तळीं १२ लक्ष रुपये खर्चून पुनः चालू केलीं, त्यामुळें ५८ हजार एकरांस पाणी मिळूं लागलें. संस्थानांतील औरंगाबाद, बीड, परभणी, एदलाबाद, गुलबर्गा, रायचूर व बिदर ह्या जिल्ह्यांतील जे शेतकरी कपाशीऐवजीं धान्य पेरतील, त्यांस दर एकरी २ रुपये इनाम देण्यांत येईल. १½ लक्ष एकरांस पुरेल एवढें सुधारलेल्या जातींचें भाताचें बीं पुरविण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें, गहूं, ज्वार, इत्यादींचीहि व्यवस्था होत आहे. बीं व खत ह्यांचा पुरवठा करण्यासाठी आणि विहिरी खोदण्यासाठी चालू वर्षाकरितां ३४ लक्ष रुपये सरकारनें मंजूर केले आहेत. द्विदल धान्यें व तांदूळ ह्यांचा दर्जा व उत्पादन वाढविण्यासाठी शेतकी खातें इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲ. रिसर्चच्या सहकार्यानें योजना आखीत आहे.

## हैद्राबाद स्टेट बँक

चलनप्रसाराचें नियमन, चलनाचें स्थैर्य व त्याची हमी, हैद्राबाद संस्थानांत व बाहेर पैशाच्या देवघेवीच्या कार्यांत सुलभता, देशाच्या आर्थिक जीवनास आवश्यक असलेल्या पतीची तरतूद आणि निजाम यांच्या राज्यांतील शेतकी, व्यापार व उद्योग यांच्या विकासास प्रोत्साहन, या सर्व बाबींसाठी हैद्राबाद स्टेट बँक काढण्यांत आलेली आहे.

भागीदारांची बँक म्हणून स्टेट बँक स्थापण्यांत आलेली असून समाजांतील सर्व वर्गांच्या हितसंबंधांचें रक्षण व त्यांच्या बँकेसंबंधींच्या गरजा पूर्ण करतां येणें ह्या दृष्टीनेंच बँकेचा कायदा तयार करण्यांत आला आहे. व्यापारी वर्गाच्या हितासाठी समाधानकारक रीतीनें कार्य करीत असलेल्या इतर व्यापारी बँका व पतपेढ्या यांची स्टेट बँक केवळ नक्कल नसून ती एक मध्यवर्ती संस्था म्हणून कार्य करीत असते. संस्थानामध्यें सर्वत्र व्यापार, उद्योग व शेतकी यांना अधिक प्रोत्साहन मिळावें व त्यांचा विकास व्हावा म्हणून चांगल्या व्यापारी तत्त्वावर आर्थिक मदत व बँकेसंबंधींच्या इतर सवलती देतां याव्यात आणि विद्यमान संस्थांना साह्य करतां यावें म्हणून या स्टेट बँकेस अधिक व्यापक स्वरूपाची व मोठी संधि देण्यांत आली आहे.

### संस्थानच्या पैशाची व्यवस्था बँकेकडे

बँकेचे डायरेक्टर, बोर्डाच्या रचनेबाबत किंवा बँकेचें धोरण आखून देण्याच्या कामीं सरकारास अगदींच अलिप्त राहतां येईल अशा आर्थिक प्रगतीच्या अवस्थेस हैद्राबाद पोहोंचलें नाहीं; म्हणून नियामक मंडळास केव्हांहि सरकारकडून निकट व सतत सहकार्य प्राप्त व्हावा अशी व्यवस्था करण्यांत आलेली आहे. या बँकेचें एक बोर्ड ऑफ डायरेक्टर्स आहे व त्यावर सरकारनियुक्त आणि भागीदारांनीं निवडून दिलेले डायरेक्टर घेण्यांत आलेले आहेत. संस्थानच्या पैशाचा पूर्ण उपयोग व जनतेच्या हितसंबंधांच्या दृष्टीनें संस्थानच्या आर्थिक साधनांचा जास्तींत जास्त फायदा करून घेणें हें वरील एकीकरणामुळें या बँकेस शक्य झालें आहे.

### बँकेचे इतर व्यवहार

स्टेट बँकेनें भाग काढून जमविलेल्या भांडवलाचे शेंकडा ५१ टक्के भांडवल सरकारनें घेतलें आहे आणि ही गोष्ट आवश्यक म्हणून समजण्यांत आली. सरकारची शिल्लक राहिलेली सर्व नगद रक्कम या बँकेंत ठेव म्हणून ठेवण्यांत येते आणि राखून ठेवलेलें कागदी चलन व सरकारतर्फे सरकारी कर्जाची व्यवस्था पाहणें, कागदी नोटा काढणें व नाणीं पाडणें आणि इतर कित्येक ठेवींचा ताबा व त्यांची व्यवस्था बँकेकडे सोपविण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे.

वेळोवेळीं जाहीर पत्रकें काढून सरकारनें निश्चित केलेल्या कमाल व किमान दरानें सुर्ती रुपयांची खरेदी व विक्री या बँकेनें करण्याविषयींचा निर्बंध घालण्यांत आला आहे. सुर्ती १०० रुपयांस हाली ११६-११७ रु. ही जी मर्यादा सरकारनें सध्या घातली आहे त्यामध्येंच बटावणींत होणाऱ्या चढउताराचें नियंत्रण करणें या कार्यपद्धतीमुळें स्टेट बँकेस शक्य झालें आहे.

### हमी असलेलें डिव्हिडंड

रु. १,५०,००,००० च्या अधिकृत भांडवलापैकीं ७५,००,००० रुपये किंमतीचे भाग विक्रीसाठी काढण्यांत आले. या भांडवलापैकी रु. ३८,२५,००० किंमतीचे भाग सरकारास देण्यांत आले आणि बाकीचे जनतेनें खरेदी केले. बँकेच्या भागावर शेकडा ३ टक्के किमान डिव्हिडंड देतां येण्यासारखें आहे आणि सरकारनें या डिव्हिडंडची हमी दिली आहे.

बहुतेक सर्व बाजारांचीं प्रमुख केंद्रें व जिल्ह्याचीं मुख्य ठिकाणें येथें बँकेच्या शाखा काढण्याच्या सूचनेचा बोर्ड ऑफ डायरेक्टर्स विचार करीत आहे आणि पुढील दोन किंवा तीन वर्षांच्या कालावधींत संस्थानच्या बँकेसंबंधींच्या गरजा भागविण्याची संपूर्ण तरतूद केली जाईल अशी अपेक्षा आहे.

---

## हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

हिंदी गिरण्यांतील कपाशीचे सर्वांत ताजे उपलब्ध आकडे मे, १९४३ संबंधींचे आहेत, त्यावरून असें दिसतें कीं एप्रिल,१९४३ चे मानानें मे, १९४३ मध्यें हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव कमी झाला. मे, १९४२ चे मानानें मात्र मे,१९४३ मधील उठाव ५३,६४७ गाठी अधिक भरला. खालील तक्त्यांत तपशीलवार आकडे दिले आहेत:—

( ४०० पौंड = १ गाठ )

| | मे, १९४२ | एप्रिल, १९४३ | मे, १९४३ |
|---|---|---|---|
| मुंबई बेट | १,०२,३८९ | १०७,९०५ | ६७,२९३ |
| अहमदाबाद | ४७,१०९ | ३७,९४४ | ३६,६२५ |
| मुंबई प्रांत | १७५,८४९ | १७२,९२९ | १२७,७३० |
| मद्रास | ५४,४९० | ५५,६६० | ५०,७०६ |
| संयुक्त प्रांत | ३४,६०३ | ३८,२०४ | ३३,६४२ |
| मध्यप्रांत—वऱ्हाड | १३,६७० | १५,६३३ | १४,३३८ |
| बंगाल | १०,६३२ | १०,९५५ | ८,४३६ |
| पंजाब—दिल्ली | १४,०४४ | १५.७१२ | १५,४२२ |
| बाकीचा ब्रि. हिंदुस्थान | ५,०१३ | २,५१२ | ४,९७९ |
| एकूण ब्रि. हिंदुस्थान | ३०८,३०१ | ३११,६०५ | २५५,२५३ |
| हिंदी संस्थानें | ५९,९५४ | ६१,५३९ | ५९३५५ |
| सबंद हिंदुस्थान | ३६८,२५५ | ३७३,१४५ | ३१४,६०८ |

मे, १९४२ शीं तुलना करतां, मे १९४३ मध्यें मुंबई बेटांतील गिरण्यांचा उठाव ५७% वाढलेला आढळतो. हिंदी संस्थानांतील गिरण्यांच्या उठावांत मात्र वाढ झालेली नाहीं.

## मुधोळ स्टेट सें. को. बँक लि.

वरील बँकेस ३० जून अखेर पहिल्याच वर्षी ३१४ रुपये नफा झाला, त्याचा ६० रुपयांचा रिझर्व्ह फंड, १६ रुपयांचा बुडीत व संशयित रिझर्व्ह व २२० रुपयांचा स्पेशल रिझर्व्ह निर्माण करण्यांत आला. बँकेच्या पटावर ५ पतपेढ्या व १५५ व्यक्ति मिळून १६० सभासद आहेत. वसूल भांडवल २२,६७५ रुपयें असून त्यापैकी १० हजार रुपयांचे भाग मुधोळ दरबारनें घेतलेले आहेत. बँकेकडे एकूण १ लक्ष, १७ हजारांच्या ठेवी आहेत व तिनें पतपेढ्यांना २,५५३ रुपये व व्यक्तींना ५९,८०० रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. बँकेची महालिंगपूर येथें शाखा काढण्यांत आली आहे. वरील वृत्तांतावरून बँकेनें अल्पावधींत संपादन केलेला लोकांचा विश्वास व केलेली प्रगति ह्यांची चांगली कल्पना येते.




# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

# दि औंध म्युच्युअल

## लाइफ अॅशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहा:—

| | |
|---|---|
| मुंबईचे चीफ एजन्टस्<br>के. डब्ल्यू. फडके,<br>फडके गणपतिवाडी, गिरगांव,<br>बॅक रोड, मुंबई ४. | हेड ऑफिस,<br>'रामनिवास' लक्ष्मी रोड,<br>पुणें शहर. |

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

## अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ मांजुडा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविवास,' मांजुडां, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाविलास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख ८ सप्टेंबर, १९४३ | अंक ३६

## बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## नोटीस

बँकेच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येतें की, बँकेची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २६ सप्टेंबर १९४३ इ. चे दिवशीं दुपारीं ३ वाजतां ( स्टॅ. टा. ) बार्शी येथें बँकेच्या साने मेमोरिअल हॉलमध्यें बँकेच्या नोटीस बोर्डावर नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्याकरितां भरणार आहे. त्यावेळीं सर्व सभासदांनीं हजर रहावें अशी विनंति आहे.

बार्शी, दिनांक ..२ सप्टेंबर, १९४३ | बोर्डाचे हुकुमावरून, द. प. पटवर्धन मॅनेजर.

टीप:—डायरेक्टर जागेकरतां नॉमिनेशन अर्ज व सोसायट्यांचे प्रतिनिधी नेमणुकीचे ठराव बँकेचे ऑफिसांत बुधवार ता. १५।९।४३ रोजीं सायंकाळीं ५ वाजेपर्यंत दाखल केले पाहिजेत. त्यानंतर आलेले अर्ज व ठराव विचारांत घेतले जाणार नाहींत.

## फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., चे सभासदांकरतां

## नोटीस

या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २६ सप्टेंबर, १९४३ रोजीं दुपारीं ५-३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरणार आहे. सदर सभेंत अहवाल, ताळेबंद, नफ्याची वांटणी मंजूर करणें; हिशेब तपासनीसांची नेमणूक; डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाइस चेअरमन यांची निवडणूक; पोटनियमांत दुरुस्त्या करणें, वगैरे कामें नेहमींप्रमाणें करण्यांत येतील. तरी सर्व सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे. डायरेक्टरांच्या निवडणुकीसाठीं व ऑडिटरांच्या नेमणुकीसाठीं मतनोंदणीची वेळ मात्र त्याच दिवशीं सदर जागीं फक्त सकाळीं नऊ ते दुपारीं एक (नवीन वेळेप्रमाणें) ठेविली आहे.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

ता. २ सप्टेंबर, १९४३

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## मुंबई सरकारचें नवें कर्ज

**३½ कोटि रुपये; ३% व्याज; १९५६ सालीं परत फेड**

मध्यवर्ती सरकारचें कांहीं कर्ज फेडण्यासाठी मुंबई सरकार ३½ कोटि रुपयांचें नवीन कर्ज उभारीत आहे. १०० रुपयांच्या रोख्याची किंमत १०० रुपये पडेल. १४ सप्टेंबर रोजीं विक्री सुरू होईल व ३½ कोटि रुपयांचे अर्ज येतांच ती बंद होईल. १४ सप्टेंबरला कामाचे तास संपताच, पुरेसे अर्ज आले नाहींत तरी विक्री थांबविली जाईल. कर्जाची मुदत १३ वर्षे असून व्याजाचा दर ३% आहे. व्याजावर इनकम टॅक्स माफ नाहीं.

# विविध माहिती

### प्रोड्यूसर गॅस प्लँटवरील घसारा

मोटारींस बसविलेल्या प्रोड्यूसर गॅस प्लँटच्या बाबतींत इनकम टॅक्स अधिकारी २५% घसारा काढूं देतात. ५०% पर्यंत घसारा काढूं देण्यास परवानगी देण्याचा आपण विचार करूं, असें सर जॉन शीहि ( सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूचे सभासद ) ह्यांनीं नुकतेंच सांगितलें.

### अमेरिकन सैनिकांचा हिंदुस्थानांतील खर्च

हिंदुस्थानांतील अमेरिकन सैनिकांचा सर्व पगार अमेरिकाच देत आहे व त्याची व्यवस्थाहि त्यानेंच केली आहे. त्यांच्या मालपुरवठ्याच्या खर्चाचा कांहीं भाग मात्र संड–उसनवार योजनेस अनुसरून हिंदुस्थान सरकार करीत आहे.

### युद्धकैद्यांचा खर्च

गेल्या तीन वर्षांत हिंदुस्थानांत ठेवलेल्या युद्धकैद्यांचा खर्च १५ लक्ष, १२ हजार रुपये आला. तो सर्व ब्रिटिश सरकारनें दिला.

### रेशमासंबंधीं संशोधन

युद्धकार्यासाठी हिंदी रेशमाचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर चालू आहे. ह्या दृष्टीनें, त्यासंबंधांत संशोधन करण्यासाठी एक केंद्र स्थापन करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्यास भांडवली खर्च सुमारें १३½ हजार रुपये येईल. चार वर्षांत खर्चण्यासाठी १ लक्ष ६३ हजार रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

### चायना एअरक्राफ्ट कंपनी

अमेरिकन देखरेखीखालीं विमानांचे सुटे भाग तयार करण्यासाठी एक चिनी कंपनी स्थापन झाली आहे, तिच्या कारखान्याचें काम 'सॅन फ्रॅन्सिस्को' येथें लवकरच सुरू होईल. ह्या कारखान्यांत सुमारें ९ हजार चिनी कामगार काम करतील.

### अमोनियम सल्फेटचें उत्पादन

अमोनियम सल्फेटचें उत्पादन करण्याकरितां मुंबईमधील कांहीं कारखानदार एक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कंपनी लवकरच स्थापन करणार आहेत, असें समजतें. सध्या हिंदुस्थानांत दरसाल सुमारें १८ हजार टन अमोनियम सल्फेट तयार होतें. हें उत्पादन वीस पटींनीं तरी वाढलें पाहिजे.

### सर फ्रेड्रिक साइक्स हॉल

ग्रामोन्नतीसाठीं ठेवलेली मध्यविभागाची १९४२ सालाची सर फ्रेड्रिक साइक्स हॉल अहमदनगर जिल्ह्यांतील शेगांव तालुक्यामधील जोहारपूर ह्या खेडेगांवास मिळाली आहे. ह्या गांवांतील सर्व रस्त्यांचे दोन्ही बाजूंस गटारें असून झाडें लावलेलीं आहेत शाळेच्या इमारतीचें बांधकाम चालू आहे, त्यासाठी गावकऱ्यांनीं १५० रुपये दिले आहेत. प्रौढांकरितां एक रात्रीची शाळा असून एक लायब्ररीहि पण आहे. १५ गाई व १ वळू असलेलें एक ब्रिडिंग केंद्र गांवांत आहे. गांवांतील सहकारी पतपेढीचें काम ठीक चाललें आहे.

### विहिरी खोदण्यासाठी वार्षिक तीन लक्ष रुपये

म्हैसूर सरकारनें १९३८ सालीं खेडेगांवांना विहिरी खणून पाणी पुरविण्याची योजना आखली व तिच्यासाठी दरसाल, पांच वर्षेपर्यंत, ३ लक्ष रुपये मंजूर केले. एकूण ९,३९२ विहिरी खणण्याचें ठरलें, त्यांपैकीं ४,१७१ विहिरींचें काम पुरें झालें आहे. म्हैसूर संस्थानांत अद्याप २,९७७ खेडेगांवांत पिण्याच्या पाण्याच्या विहिरी नाहींत. माहीतगार कंत्राटदार व सुरुंगाची दारू हीं युद्धपरिस्थितीमुळें मिळणें कठीण असल्यामुळें विहिरी खोदण्याची योजना मूळ अपेक्षेप्रमाणें पांच वर्षांत पुरी झाली नाहीं. म्हणून वार्षिक ३ लक्ष रुपयांची ग्रँट आणखी तीन वर्षे देण्यांत येणार आहे.

### शेतीच्या आयुधांवर जकातीची माफी

शेतकी खात्याचे डेपोंत व सहकारी सोसायट्यांचे जवळ असलेल्या शेतीचे आयुधांवर म्युनिसिपालिट्यांच्या जकातीची माफी असावी, असें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे.

### रत्नागिरी जिल्ह्यांत रबराची लागवड

रत्नागिरी जिल्ह्यांत सुमारें तीन एकर जमिनींत रबराच्या लागवडीचे प्रयोग करण्यांत येणार आहेत.

### ग्रेट ब्रिटनमध्यें कोळशाचा पुरवठा वाढणार

ग्रेट ब्रिटनमध्यें कोळशाचा पुरवठा पुरेसा पडत नसल्या कारणानें कोळशाचें उत्पादन वाढविण्यासाठी खाणींतील कामगारांची संख्या वाढविण्यांत येणार आहे.

### हिंदी गिरण्यांचें वाढतें उत्पादन

| एप्रिल ते जुलै | सूत (हजार पौंड) | कापड (हजार पौंड) |
|---|---|---|
| १९४० | २९१२५८ | ४१२०२१ |
| १९४१ | ३४३५३७ | ४८९५०६ |
| १९४२ | ३८७०५५ | ५२९१०५ |

जुलै, १९४२ नंतरचे आकडे अद्याप उपलब्ध नाहींत.

### ट्रेझरी बिलांवर १४ आ. व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १४ आणे इतका पडला.

### साखर कारखान्यांच्या स्थलांतरावर नियंत्रण

कर वाचविण्यासाठी पुष्कळसे साखर कारखाने ब्रिटिश हद्दींतून संस्थानी हद्दींत स्थलांतर करीत आहेत. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी संयुक्त प्रांताच्या सरकारनें आपल्या प्रांतांतील कारखाने बाहेर जाण्यास बंदी केली आहे. ह्या प्रश्नाचा हिंदुस्थान सरकारहि विचार करीत आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें २७ ऑगस्ट, १९४३ अखेरच्या आठवड्यांत २९ कोटि रुपये किंमतीच्या १,१३,७०० चेक्सची देवघेव झाली.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २८२ |
| २ भावी आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था ... ... | २८३ |
| ३ सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें ... | २८४ |
| ४ स्फुट विचार ... युद्धाचीं गेलीं चार वर्षें—जपानचा समाचार—हिंदी शेतकऱ्यांची स्थिति कशी सुधारेल?—रशिया आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांचे संबंध—मांडवलशाही व समाजसत्तावाद ह्यांवर युद्धाचे परिणाम | २८५ |
| ५ सहकारी संस्थेमार्फत सुधारणा कार्य .. ... | २८६ |
| ६ दांडेकर एम्प्लॉइज को. सोसायटी ... ... | २८६ |
| ७ हिंदी आयुर्विमा कंपन्यांस सूचना ... ... | २८७ |
| ८ हिंदुस्थानांत रंगांचें उत्पादन | २८७ |



# अर्थ

बुधवार, ता. ८ सप्टेंबर, १९४३


## भावी आंतरराष्ट्रीय चलन-व्यवस्था

### दोन योजना

प्रत्येक देशाच्या चलनपद्धतीचा त्यांतील लोकांच्या जीवनाशी किती निकट व जिव्हाळ्याचा संबंध असतो ह्याची कल्पना हिंदुस्थानांत युद्धकाळच्या परिस्थितीनें उत्कृष्ट रीतीनें करून दिली आहे. बाजारभाव, जनतेची प्राप्ती व रहाणी, उद्योगधंदे व व्यापार ह्या सर्वांवर चलन व्यवस्थेचा अनुकूल वा प्रतिकूल परिणाम नेहमी होत असल्यानें राष्ट्रीय सरकारें व मध्यवर्ती बँका ह्या बाबतींत स्थैर्य व सुरळीतपणा साध्य होईल अशी खटपट करीत असतात. आधुनिक काळांत प्रत्येक व्यक्तीचें जीवित चलन देऊन अगत्याच्या वस्तु विकत घेण्याच्या शक्तीवर अवलंबून रहातें, मग ती व्यक्ती जमीनदार, शेतकरी, कामकरी, भांडवलवाला किंवा कारखानदार असो. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार ह्याच रीतीनें चालतो. वैयक्तिक व आंतरराष्ट्रीय देणीघेणीं चलन-व्यवस्था व तिच्याशी निगडित असलेली हुंडणावळ ह्यांस अनुसरून होतात. प्रत्येक राष्ट्रास आपली चलनव्यवस्था इतर राष्ट्रांच्या व्यवस्थेशी जुळती करून घ्यावी लागते तें ह्यासाठीच होय. एकोणिसाव्या शतकांत चांदी व सोनें ह्यांवर आधारलेल्या चलनपद्धतीचे प्रयोग जगांतील राष्ट्रांनीं केले आणि शेवटीं सुवर्णाधिष्ठित चलन व्यवस्थेस सर्वत्र मान्यता प्राप्त झाली. प्रत्येक राष्ट्रानें आपल्या चलनाची किंमत विशिष्ट वजनाच्या सोन्याबरोबर आहे असें निश्चित करून चलन व सोनें ह्यांचा ठराविक प्रमाणांत परस्पर-विनिमय होण्याची तरतूद केली. ह्या कारणानें अंतर्गत व आंतरराष्ट्रीय ह्या दोन्ही प्रकारांच्या देवघेवींत स्थैर्य व निश्चिती निर्माण झाली. सोनें हा सर्व राष्ट्रीय चलनांचा आधार बनल्यानें पौंड, डॉलर, मार्क, रुपया, येन ह्या राष्ट्रीय चलनांचे परस्पर संबंध ठाम झाले आणि आंतरराष्ट्रीय देवघेव सुकर झाली. परंतु ह्या व्यवस्थेची घडी मागील महायुद्धांत बिघडली आणि ती पुन्हां नीट बसण्यास दहा वर्षें लागलीं. तरीहि हें काम समाधानकारक झालें नाहीं आणि इंग्लंडसारख्या संपन्न देशासहि सुवर्णचलनाचा त्याग करावा लागला.

हा झाला मागील महायुद्धाच्या परिणामांचा अनुभव. चालू युद्ध जगाच्या आर्थिक परिस्थितीवर किती तरी अधिक परिणामकारी होणार ह्यांत संशय नाहीं. युद्धोत्तर कालांतील आर्थिक व राजकीय पुनर्घटनेविषयींच्या घोषणा प्रेसिडेंट रूझवेल्ट व मि. चर्चिल ह्यांचेसारख्या मुत्सद्यांनीं केल्या आहेत. "अटलांटिक सनदे" सारख्या योजना अंमलांत येऊन यशस्वी व्हावयाच्या म्हणजे आंतरराष्ट्रीय चलन पद्धतीची भक्कम बैठक त्यांस हवी. युद्ध समाप्तीनंतर जगांतील सर्व राष्ट्रांच्या चलनाचे परस्पर संबंध काय असावे आणि ते स्थिर रहाण्यासाठी कोणती योजना आखावी ह्याचा विचार इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत तज्ञांनी चालवला आहे. मागील महायुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय व्यवहारांत आणि राष्ट्रांच्या अंतर्गत आर्थिक व्यवस्थेंत घोटाळे उत्पन्न झाले ते टाळण्यासाठी एव्हापासूनच चलनाच्या प्रश्नाची चर्चा चालू आहे. त्या बाबतचा अखेरचा निर्णय केला जाण्याकरितां प्रातिनिधिक परिषद् भरवावी लागेल. पण तिच्या विचारासाठी कांहीं तरी तयार योजना अगोदर लोकांच्यापुढें आल्या पाहिजेत आणि त्यांचा खल होऊन मूलभूत कल्पनांची दिशा तरी निश्चित झाली पाहिजे. ह्या दृष्टीनें दोन महत्त्वाच्या योजना जगापुढें तज्ञांच्या अभिप्रायार्थ मांडण्यांत आलेल्या आहेत. त्यांपैकी एक सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ, लॉर्ड केन्स, ह्यांनीं तयार केली आहे आणि दुसरी अमेरिकेच्या तिजोरीखात्याचे डॉ. व्हाइट ह्यांनीं सुचवली आहे.

कोणत्याहि देशांतील किंमती इतर देशांच्या मानानें अधिक असल्या तर त्या देशाची आयात वाढते व निर्गत घटते. ह्याचा परिणाम हुंडणावळींत घोटाळा उडण्यांत होतो आणि त्या देशाच्या चलन पद्धतीची घडी बिघडते. बाहेरून कर्ज काढून देणें करणाऱ्या देशांची अशीच अवस्था होते. व्यापारी व्यवहारांत उत्पन्न होणारीं व इतर बाहेरचीं देणीं देतां यावीं म्हणून राष्ट्रांस परराष्ट्रांत पत निर्माण करावी लागते. हिंदुस्थानच्या चलननिधीचा बराचसा भाग आणि सबंध सुवर्णनिधी लंडनमध्यें ठेवून येथील चलनपद्धतीचें व ह्या देशाच्या परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दराचें स्थैर्य अबाधित राखण्याचें धोरण मागें स्वीकारण्यांत आलें होतें ह्या गोष्टीचें येथें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं. १९२९ मध्यें अमेरिकेंत आर्थिक व चलन व्यवस्था ढासळली तेव्हां बहुतेक राष्ट्रांनीं स्वतःच्या चलनाचें इतर राष्ट्रांच्या चलनांशी असलेलें प्रमाण बदलून स्वतःस अनुकूल करून घेण्याचें धोरण अंमलांत आणलें. परंतु ह्या योगानें आंतरराष्ट्रीय चलनव्यवहारांत स्थैर्य रहाणें अशक्य होतें आणि प्रमुख राष्ट्रांनीं हुंडणावळ स्थिर ठेवण्यास उपयोगी पडावे म्हणून स्वतंत्र फंड निर्माण केले आणि त्यांत सोनें व परराष्ट्रीय हुंड्या साठवून ठेवून जरुरीप्रमाणें ह्या निधीचा उपयोग करण्याचें धोरण अमलांत आणलें. परराष्ट्रांत पत उत्पन्न करणें व सोनें गाठी ठेवणें ह्या दुहेरी उपायानें इंग्लंड सारख्या राष्ट्रास पौंड स्टर्लिंगची अंतर्गत व आंतरराष्ट्रीय किंमत स्थिर राखतां आली.

हुंडणावळ-स्थैर्य निधींतील सोनें व हुंड्या ह्यांची विक्री-खरेदी करून राष्ट्रीय चलनाचें आंतरराष्ट्रीय मोल टिकवणें हेंच तत्त्व युद्धोत्तर काळासाठी केलेल्या ब्रिटिश व अमेरिकन चलन-योजनांच्या मुळाशीं आहे. अमेरिकन योजनेंत जगांतील सर्व राष्ट्रांस उपयोगी पडेल एवढा प्रचंड सोन्याचा व हुंड्यांचा निधी निर्माण करण्याची तजवीज आहे. ह्या निधींत प्रत्येक राष्ट्रानें किती पैसे

घालावे, ते त्यांनीं वापरण्यास मर्यादा कोणची, निर्वाचा कारभार कोणी करावयाचा, ह्या बाबतींत अधिकाराची वाटणी कशी व्हावयाची इत्यादि तपशीलाचे पण अत्यंत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात आणि त्याचा निर्णय लावतांना अनेक अडचणी उद्भवणार आहेत. अमेरिका हें प्रबल राष्ट्र असून, त्याचेपाशी सोन्याचा मला मोठा संचय आहे. ह्या कारणानें वरील जागतिक फंडाच्या विनियोगावर त्याचीच सत्ता चालणार हें इतर राष्ट्रांस कितीसें रुचेल हा प्रश्नच आहे. लॉर्ड केन्स ह्यांच्या योजनेंत सुवर्ण प्रमाण आहे परंतु आंतरराष्ट्रीय चलन फंडांत निरनिराळ्या राष्ट्रांनीं स्वतःचे पैसे घालण्याची आवश्यकता नाहीं. ऋणको व धनको राष्ट्रांच्या देण्याघेण्याचा हिशेब एकत्र ठेवावयाचा आणि बँक ज्याप्रमाणें ठेवीदारांचे पैसे गरजू लोकांस देते, त्याप्रमाणें ह्या हिशेबांची व्यवस्था केली जाईल असें त्यांचें म्हणणें आहे. धनको राष्ट्रांस स्वतःसच पैसा लागल्यामुळें ऋणको राष्ट्रांकडून तीं आपलीं कर्जें परत मिळण्याची निकड लावतात म्हणून आंतरराष्ट्रीय हुंडणावळींत पेचप्रसंग निर्माण होतात. तसा प्रकार आपले योजनेंत होण्याचें कारण नाहीं असा त्यांचा युक्तिवाद आहे. ह्या योजनेंतहि अडचणी नाहींत असें नाहीं आणि त्यांचा विचार लॉर्ड केन्स ह्यांनीं केलेला नाहीं, असेंहि नाहीं. प्रस्तुत युद्धांत अमेरिकेनें चालवलेला प्रचंड खर्च आणि त्या राष्ट्रानें मित्र राष्ट्रांस केलेलें मोठें सहाय, तसेंच, युद्धोत्तर काळांत त्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्या ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां अमेरिकन मुत्सद्यांस ब्रिटिश योजना कितीशी पसंत पडेल हें सांगणें कठिण आहे. अर्थात ह्या योजना अमेरिका व इंग्लंड ह्या राष्ट्रांच्या सरकारांनीं अधिकृत केलेल्या नाहींत. योजना आंतरराष्ट्रीय आणि सहकारमूलक असल्या तरी त्यांचा विचार प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या परिस्थितीच्या व हिताच्या दृष्टीनें केल्यावांचून रहाणें शक्य नाहीं हें उघड आहे. ह्या निरनिराळ्या दृष्टिकोनांचा मेळ घालणें हेंच अवघड पण आवश्यक कार्य घडून येणें इष्ट आहे.

---

## गव्हाची लागवड, उत्पादन, आयात व निर्गत

### हिंदी लागवडीचा व उत्पादनाचा अंदाज

| | लागवड ( एकर ) | उत्पादन ( टन ) |
|---|---|---|
| १९४१-४२ | ३,४०,३९,००० | १,००,३७,००० |
| १९४२-४३ | ३,४२,९८,००० | १,०९,७१,००० |

### निर्गत

ब्रिटिश हिंदुस्थानांतून समुद्रमार्गानें परदेशी गेलेल्या गव्हाचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत.

| | टन |
|---|---|
| १९३९-४० | ७,८०० |
| १९४०-४१ | ४५,००० |
| १९४१-४२ | १,८५,९०० |

### आयात

गव्हाची निर्गत वाढत गेली, त्या उलट आयात कमी होत चालली, हें खालील आंकडे दर्शवितातः—

| | टन |
|---|---|
| १९३९-४० | ८५,५०० |
| १९४०-४१ | १८,८०० |
| १९४१-४२ | १८,१०० |

## बारा वर्षें मुदतीचीं कॅश सर्टिफिकिटें

### १० रुपयांचे १२ वर्षांत १५ रुपये

हिंदुस्थान सरकारनें आपल्या पोस्ट खात्यामार्फत १२ वर्षें मुदतीचीं नॅशनल सेव्हिंग्ज कॅश सर्टिफिकिटें विकण्याचें ठरविलें आहे. १ ऑक्टोबर १९४३ पासून हीं विकत मिळूं लागतील. त्याच तारखेपासून डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांची विक्री बंद ठेवण्यांत येईल.

ह्या नव्या कॅश सर्टिफिकेटांचा तपशील खालीलप्रमाणें आहेः—

( १ ) विक्रीची किंमत १० रु., ५० रु., १०० रु., ५०० रु. व १००० रु. राहील.

( २ ) कोणासहि एका अथवा जोड नांवानें ५ हजारांपेक्षा ज्यास्त रकमेचीं सर्टिफिकिटें घेतां येणार नाहींत.

( ३ ) सर्टिफिकेटांवरील व्याजावर इनकम टॅक्स आकारण्यांत येणार नाहीं. कराचा दर ठरविण्यासाठीं हिशेबांत घ्यावयाच्या प्राप्तींत वरील व्याजाचा समावेश केला जाणार नाहीं.

( ४ ) तारण म्हणून हीं सर्टिफिकिटें दुसऱ्याचे नांवानें करून देतां येणार नाहींत.

( ५ ) खरेदीपासून तीन वर्षेपर्यंत कॅश सर्टिफिकेटांची रकम परत मिळूं शकणार नाहीं; खरेदीदार मध्यंतरीं मयत झाला, तर अपवाद केला जाईल. तीन वर्षांनंतर मात्र केव्हांहि सर्टिफिकिटें मोडतां येतील.

( ६ ) तीन वर्षांनंतर सर्टिफिकेट मोडल्यास १० रुपयांवर ८ आणे व्याज मिळेल. व्याजाची ही रकम दरसाल ८ आण्यांनीं वाढत जाईल. १२ वर्षें पुरीं झाल्यावर १० रुपयांचे १५ रुपये मिळतील.

नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांचा हेतु फाजील क्रयशक्ति खेचून घेणें हा आहे. त्यामुळेंच त्यांचा तारण म्हणून उपयोग होऊं नये, अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

---

### ग्रेटब्रिटनचा वाढता युद्धखर्च

| | कोटि पौंड |
|---|---|
| १९३९–४० | १८२ |
| १९४०–४१ | ३८८ |
| १९४१–४२ | ४७८ |
| १९४२–४३ | ५६८ |
| १९४३–४४ ( अंदाज ) | ५७५ |

### कांहीं अर्थपूर्ण व्याख्या

ज्यांना व्यक्तिशः कांहींहि करतां येत नाहीं, परंतु जे एकत्र येऊन कांहीं करतां येणें शक्य नाहीं असें ठरवितात, त्यांच्या बैठकीला ' परिषद ' असें म्हणतात.

अयुक्त आधारावरून सूक्ष्म गणितानें अगोदरच माहीत असलेला सिद्धांत काढणारास ' आकडेशास्त्रज्ञ ' म्हणतात.

आयुष्यांतील महत्त्वाचे प्रश्न कसे सोडवावयाचे, हें विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याचें ज्याचें काम असतें, परंतु ज्यानें हे प्रश्न स्वतः सोडविण्याचें टाळण्यासाठी प्रोफेसरी पत्करलेली असते, त्यास ' प्रोफेसर ' म्हणतात.

## स्फुट विचार

### युद्धाचीं गेलीं चार वर्षे

चालू युद्धास प्रारंभ होऊन चार वर्षे पुरीं झालीं असून त्यानें आतां पांचव्या वर्षांत पाऊल टाकलें आहे. ह्या चार वर्षांतील घडामोडींचा आढावा घेऊन भावी घटनांचा अंदाज केल्यास एक गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं जर्मनीची सद्दी संपली असून हिटलर-शाहीच्या नाशाचा दिवस जवळ आला आहे. हेतुपुरःसर केलेल्या लढाऊ पूर्वतयारीचें हिटलरचें भांडवल संपुष्टांत आलें आहे आणि मित्र राष्ट्रांचें बळ सारखें वाढत चाललें आहे. जर्मनीचा हस्तक आणि अंकित, इटली आतां युद्धक्षेत्र बनला आहे. रशियानें जर्मनीस मागें रेटीत रेटीत नेऊन जिंकलेले महत्त्वाचे प्रदेश एका मागून एक त्यास ओकावयास लावलें आहे. युरोपांतील मोहिमेस म्हणजे दुसऱ्या आघाडीस प्रारंभ करून मित्र राष्ट्रांनीं प्रत्यक्ष इटलींत आक्रमण केलें आहे. जर्मनीचीं लढाऊ कारखान्यांचीं मोठमोठीं शहरें ब्रिटिश व अमेरिकन वैमानिकांनीं उध्वस्त करून त्याचें लढाऊ सामर्थ्य लुळी केलें आहे. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या देशांत तेथील प्रजा हिट-लरी जुलमाविरुद्ध बंड करून उठली आहे. नाझी प्रचारकांनीं तिच्यावर कितीहि पांघरूण घातलें तरी प्रत्यक्ष जर्मनींत निराशेची परिस्थिति निर्माण झाली आहे आणि बाकीच्या युरोपिअन देशांत जर्मनीविरुद्ध चळवळी चालू झाल्या आहेत, हें डेन्मार्क-मधील अलीकडच्या घडामोडींवरून स्पष्ट दिसतें. स्वीडनसारखीं तटस्थ राष्ट्रेंहि जर्मनीस आपला विरोध उघड रीतीनें दाखवीत आहेत. एकंदरीनें सध्याची युद्ध-परिस्थिति मित्र राष्ट्रांस सर्वस्वी अनुकूल अशीच झालेली आहे. रशिया जिंकून सर्व युरोप आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा हिटलरच्या मनोराज्याचा डोलारा डळमळला आहे.

---

### जपानचा समाचार

पूर्व एशियांत अमेरिकन सैन्यांनीं आणि वैमानिकांनीं जपानला स्वास्थ्य मिळून दिलेलें नाहीं आणि पादाक्रांत केलेल्या प्रदेशांतून भारी नुकसान सोसून त्यास मागें हटावें लागलें आहे. पॅसिफिक महासागरांत चढाईचें धोरण स्वीकारावयाचें मित्र राष्ट्रांनीं ठरविलें आहे आणि चीनला अधिक सहाय्य देण्याची व्यवस्था होत आहे. युद्धास पांचवें वर्ष लागत असतां इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांची लढाऊ परिस्थिति समाधानकारक व उत्तेजनकारक असून मार्शल चांगकायशेक ह्यांचीं सैन्यें जपानला धीरानें तोंड देत आहेत. ह्यांच्याच मानानें शत्रु राष्ट्रांची स्थिति प्रतिकूल झाली आहे. शत्रु शरण येईतोंपर्यंत लढण्याचें मित्रराष्ट्रांचें धोरण असल्यानें आपणांस ह्यापुढेंहि मोठा स्वार्थत्याग करावा लागेल ह्याची त्यांस पूर्ण जाणीव आहे. युरोपांतील युद्ध जिंकलें गेलें तरी जपानचा समाचार त्यांस घ्यावयाचा आहे. तें कार्य परिश्रमाचें, निश्चयाचें व चिकाटीचें आहे हें त्यांस माहीत आहे. मित्र राष्ट्रांपुढें युद्धाच्या पांचव्या वर्षी जो कार्यक्रम आहे तो अंतिम विजया-विषयींच्या विश्वासानें आणि पूर्वीच्या मानानें अधिक अनुकूल परिस्थितींत त्यांस हातीं घेतां येत आहे ही उत्साहजनक गोष्ट आहे.

---

### हिंदी शेतकऱ्यांची स्थिति कशी सुधारेल ?

रिझर्व्ह बँकेचे एक माजी डेप्युटि गव्हर्नर, सर मणिलाल बी. नानावटी, ह्यांनीं वरील विषयावर एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे, त्यावरून त्यांच्या मतें कांहीं शेतकऱ्यांची एकंदर परिस्थिति फारशी आशादायक दिसत नाहीं. १७५० सालीं हिंदुस्थानची लोकसंख्या फक्त १३ कोटि होती; १८७२ मध्यें ती २०३ कोटि झाली, १९०१ मध्यें ती २७३ कोटि होऊन आतां ती ३९ कोटींचे घरांत गेली आहे. लोकसंख्येच्या वाढीचें इतर देशांतील प्रमाण लक्षांत घेतां हिंदुस्थानांत ती कमीच वाढलेली आढळते, असें सांगून त्यासंबंधांत सर मणिलाल ह्यांनीं आंकडे दिले आहेत. हिंदी लोकसंख्येपैकीं बहुसंख्य लोकांच्या पोटाचा आधार म्हणजे शेतीचें उत्पन्न होय. शेतीवरील वाढतें अवलंबन हिंदी लोकांच्या दारिद्र्याचें लक्षण आहे. १८९१ सालीं ६१% लोक शेतीवर अवलंबून होते; १९४१ सालीं हें प्रमाण ७३% झालें. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत शेतीखालील जमिनीचें क्षेत्र विस्तार पावलेलें नाहीं. उलट, जमिनीचा कस कमी होत गेला आहे. कालव्याच्या पाण्याचा फायदा जास्त जमिनीस मिळूं लागला असला तरी ७६% पिकें केवळ पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहेत. त्यामुळें वाढत्या लोकसंख्येस लागणाऱ्या धान्यांचा पुरवठा योग्य प्रमाणांत होऊं शकत नाहीं व तयार होणारें धान्यहि सकस नसतें, अशी सर मणिलाल ह्यांची तक्रार आहे. शेतकऱ्यांची दुःस्थिति दूर करण्याच्या दोन उपायांचा सर मणिलाल ह्यांनीं विचार केला आहे. त्यांपैकीं देशांतराचा प्रश्न आज लक्षांतच घेण्याचें कारण नाहीं. कारण, सिलोनसारख्या शेजारच्या देशांतूनहि हिंदी नागरिकांना परतावें लागत आहे. दुसरा उपाय म्हणजे औद्योगीकरण. "वार्षिक ४० ते ६० कोटींची आयात थांबविणारे कारखाने जर आपण स्थापन केले व त्यामुळें कारखान्यांतील कामगारांची संख्या सध्याच्या मानानें दुप्पट झाली, तरी दहा वर्षांचे अवधींत ३० लक्ष लोकांना नव्यानें काम मिळेल. ह्याच अवधींत ५ कोटींची भर लोकसंख्येंत पडेल!" असें ते म्हणतात. सर मणिलाल नानावटी ह्यांच्या मतें, औद्योगीकरणावांचून गत्यंतर नसलें तरी आपल्या प्रचंड लोकसंख्येचा आर्थिक उद्धार घडवून आणण्याची त्याची शक्ति मर्यादित आहे, हें विसरून चालणार नाहीं.

---

### रशिया आणि इंग्लंड व अमेरिका यांचे संबंध

युरोपवर जर्मनीचें वर्चस्व स्थापन करणें हा प्रस्तुत युद्धाचा आपला खरा हेतु झाकून आपण बोल्शेव्हिकांचा पाखंडी व अराष्ट्रीय असा ध्येयवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य-विध्वंसक व सब-गोलंकारी समाजव्यवस्था सर्व जगावर स्थापन करण्याचा पद्धत-शीर प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं स्वार्थत्यागपूर्वक झगडत आहों असा हिटलरचा बहाणा आहे. स्टालिनच्या महत्त्वाकांक्षी कारवा-यांस इंग्लंड व अमेरिका हीं भांडवलशाही घटनेचीं राष्ट्रें बळी पडलीं आहेत, परंतु त्यांची खरी एकवाक्यता किंवा जूट होणें शक्य नाहीं, अशा आशयाचा प्रचार जर्मनीनें चालवला आहे. मित्रराष्ट्रांमध्यें फूट पाडण्याचा हा उघड प्रयत्न आहे आणि युरोपांत दुसरी आघाडी इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं रशियाच्या इच्छेस अनुसरून चालू केली नाहीं ह्या कल्पनेचा त्यास आधार घेण्यांत आला आहे. क्वेबेकच्या परिषदेस रशियाचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते ह्या गोष्टीचाहि उपयोग नाझी प्रचारक आपल्या उद्दिष्टाच्या सिद्ध्यर्थ करीत आहेत. परंतु ह्या संबंधांतले गैरसमज मि. चर्चिल व प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं दूर केले आहेत. युद्धाविषयींचें नव्हे, तर युद्धोत्तर पुनर्घटनेचेंहि धोरण रशियाच्या सहकार्यानें

निश्चित करें जाईल असें आश्वासनहि त्यांनीं दिलें आहे. भांडवल-शाहीचें व आत्यंतिक समाजसत्तावादाचे हे पुरस्कर्ते एकदिलानें हें कार्य कसें करूं शकतील ह्याविषयीं शंका उत्पन्न करण्यांत आली आहे. परंतु परस्पर विरोधी ध्येयवादानें प्रेरित झालेलीं हीं राष्ट्रें हेतुरहित रीतीनें कां होईना एकमेकांमधलें अंतर प्रत्यक्ष व्यवहारांत तोडूं लागलीं आहेत, हें सूक्ष्म दृष्टि-निरीक्षकांच्या लक्षांत आल्यावांचून राहाणार नाहीं.

### भांडवलशाही व आत्यंतिक समाजसत्तावाद ह्यांवर युद्धाचे परिणाम

इंग्लंड व अमेरिका ह्या भांडवलशाही-प्रधान राष्ट्रांच्या आर्थिक घटनेस युद्धोत्तर काळांत समाजसत्तावादी स्वरूपाची मुरड बसल्यावांचून राहाणार नाहीं. युद्धकाळांतील समाज नियंत्रणात्मक धोरण पुढें भांडवलशाहीस चिकटून रहाणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. तसाच प्रकार रशियामध्यें होऊन आत्यंतिक समाज-सत्तावादानें प्रेरित झालेल्या तेथील घटनेंत बदल होणें अपरिहार्य आहे. सर्व जगांत आपला ध्येयवाद व आर्थिक घटना ह्यांचा पगडा बसवण्याच्या बॉल्शेव्हिकांच्या उद्दिष्टास व प्रयत्नास आळा बसलाच आहे. रशियाच्या अंतर्गत आर्थिक व्यवस्थेंतहि महत्त्वाचे फेरफार होत आहेत असें मानण्यास जागा आहे. वैयक्तिक नफेबाजी हें जें भांडवलशाहीचें प्रमुख लक्षण तें रशियांत दिसूं लागलें आहे. रशियांतील युद्धफंडास श्रीमान शेतकरी मोठमोठ्या रकमा देत आहेत, त्या खाजगी वैयक्तिक प्राप्तींतून येत आहेत यांत शंका नाहीं. अशा एका मोठ्या देणगीचा साभार स्वीकार मार्शल स्टालिननें उदार दात्यास खास पत्र लिहून केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. रशियांत वर्गभेद नाहींत; आर्थिक दृष्ट्या सर्व लोक सारखेच आहेत अशी कल्पना आहे आणि म्हणून तेथें कमी अधिक प्राप्ती असलेल्या गटांची माहिती प्रसिद्ध करण्यांत येत नाहीं. तरीहि युद्ध-परिस्थितीमुळें खाजगी व वैयक्तिक व्यापारास उत्तेजन मिळणें अपरिहार्य आहे असें मानणें चुकीचें होणार नाहीं. रशियन युद्ध-फंडास मुख्यत्वें करून शेतकरी वर्गांतील लोकच पैसा देत आहेत. खाजगी व्यापाऱ्यांच्या नफ्यांतून ह्या रकमा आल्या असणार हें उघड आहे. शेतीच्या मालाच्या किंमती ठिकठिकाणीं वाढल्या असल्या पाहिजेत आणि त्यांपासून होणाऱ्या व्यक्तिगत नफ्यांत रशियन सरकारनें अंशभागी व्हावें अशी त्याची स्वाभाविक इच्छा असणार. मार्शल स्टालिनच्या पत्रानें वैयक्तिक व्यापारी व्यवहारांस संमतिच नव्हे तर उत्तेजन दिल्यासारखें होत आहे. हा परिस्थितीचा प्रभाव आहे आणि तीमधून स्थिर स्वरूपाचे महत्त्वाचे बदल उत्पन्न होणें असंभवनीय नाहीं.

**हिंदी युद्धकर्जांत जून, १९४३ अखेर गुंतविलेल्या रकमा**

| प्रांत | ( हजार रुपयांचे आंकडे ) |
|---|---|
| मुंबई | ७२,००,७२ |
| बंगाल | ५१,९२,२३ |
| पंजाब | ९,८९,२५ |
| संयुक्त प्रांत | ८,२१,४८ |
| मद्रास | ७,१९,५३ |
| हिंदी संस्थानें | ४,७३,२२ |
| सर्व प्रांत व संस्थानें मिळून | १,६२,९३,३९ |

### सहकारी संस्थेमार्फत सुधारणा कार्य

पूर्व खानदेश जिल्ह्यांत जळगांव तालुक्यांत भादली बु॥ या गांवीं एक सहकारी पतपेढी आहे. सदर पतपेढीनें मालविक्री व मालपुरवठा यासंबंधींचे नवीन धोरणियम स्वीकारून आपल्या मेंबरांना शेतकामाकरितां कर्जे देऊन इतर तऱ्हेनें प्रगति घडवून आणली आहे. सोसायटीनें आपल्या मेंबरांना भाड्यानें देण्यासाठी दोन लोखंडी नांगर विकत घेतले आहेत.

सोसायटीनें आपल्या सभासदांस जरीला सरकीचें बीं पुरवून कपाशीचे पिकांतील भेसळीचीं झाडें काढणेचें काम केलें आहे. पिकांना देण्यासाठी खताकरितां लागणारी भुइमुगाची पेंड ४६ टन सामुदायिक पद्धतीवर खरेदी करून आपल्या मेंबरांस पुरविली आहे. तसेंच गुरांना चारण्यासाठीं जवशीची ढेप १९॥ टन संस्थे-मार्फत देण्यांत आलेली आहे. गांवांतील गरीब लोकांना धान्य पुरविणेसाठीं प्रयत्न केला असून सदर संस्थेनें लायसेन्स मिळवून सुमारें ३१ माप ज्वारी व २॥ माप गहू खरेदी केले असून त्यापैकीं सुमारें १४ माप ज्वारी व ३ माप गहू रेशन पद्धतीनें गांवांतील गरीब लोकांना पुरविला असून बाकी धान्य वाटण्यासाठी शिल्लक आहे. ज्वारीचे पिकांवर कांहीं रोग होऊं नये म्हणून आपल्या मेंबरांना १२५ गंधक पुड्या वाटल्या. शेतकऱ्यांचे मालाची विक्री सामुदायिक पद्धतीवर घडवून आणण्याचा संस्थे-च्या चालकांनीं प्रयत्न केला आहे. त्यांच्या मालाचें वजन बरोबर व्हावें म्हणून संस्थेनें काटे, वजनें व मापें विकत घेतलीं असून त्यांचा उपयोग मालाचें वजनमाप करण्याकडे होत आहे. सदर संस्था 'अ' वर्गांत असून तिजजवळ ११,५०० रु. रिझर्व फंड जमलेला आहे व तिची स्वतःची इमारत आहे.

### दांडेकर एम्प्लॉइज को. क्रे. सोसायटी, भिवंडी

३ जुलै, १९४० रोजीं वरील सोसायटी नोंदण्यांत आली. तिचें कार्यक्षेत्र जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. च्या कामगार वर्गापुरतेंच मर्यादित आहे. प्रारंभीं सोसायटीसंबंधीं कामगार अतिशय साशंक होते व कंपनीनें हें आपल्यामागें एक निष्कारण लचांड लावलें आहे, असा त्यांचा समज होता. तथापि, हळूहळू सोसायटीनें त्यांचा विश्वास संपादन केला व तीन वर्षांचे अवधींत सोसायटीनें चांगली प्रगति केली. सोसायटीचे तिसरे वर्षी तिनें सभासदांना तांदूळ, बाजरी, गूळ, साखर, चहा वगैरे अगदीं लहान नफ्यावर उपलब्ध करून देण्यास प्रारंभ केला. त्यामुळें तर सोसायटी ही कामगारांना आपलीशी वाटूं लागली आहे. तिच्या चोख व्यवहारामुळें तिला "अ" वर्ग मिळाला आहे. खालील तक्त्यांत तिची प्रगति दाखविली आहे:—

| वर्ष | सभासद (संख्या) | भाग भांडवल (रु.) | कर्जें (रु.) | निवळ नफा (रु.) | रि. फंड (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ लें | ९६ | २२९० | ३६२५ | ५४ | ११ |
| २ रें | ११० | ४४८१ | ६५११ | २८४ | २३३ |
| ३ रें | १३२ | ६११६ | ७८६३ | ३६२ | ३६५ |

दुसऱ्या वर्षअखेर सोसायटीनें ३½% डिव्हिडंड दिलें व आतां तिसऱ्या वर्षअखेरचें डिव्हिडंड ५½% देण्यांत येत आहे. सोसायटीचे चेअरमन, श्री. जी. जी. दांडेकर, ह्यांचा अनुभवी सल्ला व कळकळ ह्यांमुळेच सोसायटीची ही प्रगति होऊं शकली व त्याबद्दल ती अभिनंदनास पात्र आहे.

## हिंदी आयुर्विमा कंपन्यांस सूचना

( क्राउन ला. इं. कंपनीचे हिंदुस्थानाचे चीफ एजंट मि. टी. ब्राऊ, ह्यांचें मुंबई रोटरी क्लबांत भाषण )

"हिंदी आयुर्विमा कंपन्या आपल्या विमेदारांना त्यांच्या विम्यावर कर्जें देतात अथवा सोडकिंमती देतात, त्यांची रकम फारच अल्प असते. कित्येक वेळा, विमेदारांस वास्तविक रीतीनें—कंपनीच्या सर्व खर्चाचा हिशेब करून—जेवढी रकम मिळावयास पाहिजे, त्याच्या निम्म्याइतकीहि रकम त्यांच्या हातीं येत नाहीं. ह्यासंबंधांत कांहीं तरी विमा कायद्यांतच सुधारणा केली पाहिजे.

"विमा रद्द होण्याचें व त्यांच्या सोडकिंमती घेण्याचें प्रमाण हिंदुस्थानांत फारच मोठें आहे, त्याचा दुष्परिणाम विमेदारास भोगावा लागतो, त्याप्रमाणें विमा व्यवसायावरहि त्याचा वाईट परिणाम होतो. विमेदाराच्या मगदुराचे बाहेर त्यास मोठी विमा पॉलिसी घ्यावयास भाग पाडलें जातें व त्यास विमा चालू ठेवणें अशक्य होतें. विमेदाराची प्राप्ती व त्याची बचत हीं लक्षांत घेऊनच त्यास योग्य रकमेचा विमा घेण्यास सांगितलें पाहिजे.

"आयुर्विमा कंपन्या भरमसाठपणें आगंच्या व इतर शाखा काढीत आहेत. आयुर्विमा कंपन्यांस आपल्या लाइफ फंडाचा उपयोग इतर विम्याच्या कामाकडे करण्यास प्रतिबंध करणारा कायदा करणें आवश्यक आहे. आयुर्विमा कंपन्यांनीं आपली विश्वस्ताची भूमिका नीट ध्यानांत बाळगली पाहिजे."

---

### नगर डि. अर्बन सें. को. बँक लि., अहमदनगर
( वार्षिक सभा : १४-९-४३ )

वरील बँकेचें वसूल भांडवल १ लक्ष, ३१ हजार रुपये असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत २ लक्ष, ८७ हजार रुपये आहेत. ठेवींचा आंकडा २५ लक्ष रुपये झाला आहे, म्हणजे त्यांत दीड पटीपेक्षा ज्यास्त वाढ झालेली आहे. बँकेनें १५ लक्ष, ६२ हजार रुपये रोख व बँकांत शिलक ठेवले आहेत व तिची इन्व्हेस्टमेंट ३ लक्ष, २९ हजारांची आहे. व्यक्तिशः सभासदांकडे ८ लक्ष, ३९ हजार रुपयांचें येणें आहे. कर्जे व कॅश क्रेडिटस ह्यांत बरीच घट झाली आहे. बँकेनें संगमनेर येथें आपली शाखा उघडली आहे. बँकेचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट लोकप्रिय झाला असून सेफ कस्टडीचीहि योजना आतां अमलांत आली आहे. वर्षअखेर बँकेस २२½ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ६¼% डिव्हिडंड मिळेल.

---

### भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ
( वार्षिक सभा : १८-९-४३ )

वरील बँकेचें भाग भांडवल ७५,८७५ रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ९१,७७४ रुपयांचे आहेत. एकूण ठेवींचा आकडा ९ लक्ष, २७ हजार रुपये आहे. बँकेनें हातीं व इतर बँकांत ६½ लक्ष रुपये ठेवले आहेत व रोख्यांत १ लक्ष, ४० हजार रुपये गुंतविले आहेत. एकूण कर्जाची रकम २ लक्ष, ९६ हजार रुपये आहे. थकबाकीचें प्रमाण ८·३% पडतें. वर्षअखेर बँकेस नफा १५,०९२ रुपये झाला. भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळेल.

---

## हिंदुस्थानांत रंगांचें उत्पादन होण्याची शक्यता

### सरकारी सहायाची आवश्यकता

बोर्ड ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चनें श्री. पै व डॉ. वेंकटरमण ह्यांची एक कमिटी नेमून हिंदुस्थानांत रंगांचें उत्पादन करण्याच्या शक्याशक्यतेचा तपशीलवार विचार करण्याचें काम तिच्याकडे सोपविलें. हिंदुस्थानांत अतिशय मोठ्या प्रमाणावर रंगांची आयात होते:—

| | रंगांची आयात ( कोटि रु. ) |
|---|---|
| १९४०-४१ | ६·३८ |
| १९४१-४२ | ६·९६ |
| १९४२-४३ | ५·४२ |

हिंदी कपास कापडाच्या गिरण्या सर्वस्वी विदेशी रंगांवर अवलंबून आहेत. चालू युद्धास प्रारंभ होईपर्यंत जर्मनीनें रंगाची जागतिक बाजारपेठ काबीज केलेली होती आणि ग्रेट ब्रिटन व इतर देश ह्यांस जर्मनीशीं स्पर्धा करणें कठीण जात असे. ब्रिटिश सरकारनें आपल्या रंगाच्या धंद्यास फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय दिलें. १९१८ सालीं पार्लमेंटनें २० लक्ष पौंडांची ग्रँट मंजूर केली. १९१५ सालीं ब्रिटिश डाईज लि. ची स्थापना झाली, तेव्हां तिचें १० लक्ष पौंड भांडवल जमेपर्यंत जमलेल्या प्रत्येक पौंडास एक पौंड देऊं केला व त्यानंतर प्रत्येक चार पौंडांस एक पौंड देण्याचें मान्य केलें. १९१९ सालीं ब्रिटिश डाईज लि. व मेसर्स लेव्हिनस्टीन ही फर्म ब्रिटिश डायस्टफ्स कॉर्पोरेशन नांवाखालीं एकत्रित झाली, तिचे भांडवलापैकीं १७ लक्ष पौंड भांडवल ब्रिटिश सरकारचें होतें. ब्रिटिश सरकारला सुद्धा रंगाच्या धंद्यासाठी एवढी मदत करणें आवश्यक वाटलें, तर हिंदी रंगाचा धंदा सरकारी मदतीवांचून कसा स्थापन होणार व उर्जितावस्थेस येणार ?

रंगांस लागणारीं बेनझीन, टुलीन व नॅपथलीन हीं डांबरापासून निघणारीं द्रव्यें हिंदुस्थानांत विपुल मिळूं शकतील, असें पै-वेंकटरमण कमिटीचें मत आहे. ह्यापैकीं पहिलीं दोन द्रव्यें जरूरीपेक्षा जास्त प्रमाणांतहि उपलब्ध आहेत. नॅपथलीनचा पुरवठा मात्र वाढवावा लागेल. सलफ्यूरिक ॲसिड, हैड्रोक्लोरिक ॲसिड, नैट्रिक ॲसिड, कॉस्टिक सोडा, सोडा ॲश, इत्यादींचें उत्पादन हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर चालू असलें तरी रंगाच्या उत्पादनासाठी तीं आज उपलब्ध होणें कठीणच दिसतें. त्यांची किंमतहि परवडणें अशक्य आहे. ह्यासाठीं रंगाचें उत्पादन हातीं घेण्यापूर्वी कांहीं आवश्यक केमिकल्स तयार करण्यास प्रारंभ करावा लागेल अशी कमिटीची सूचना आहे. सर्वच इनऑर्गॅनिक केमिकल्स हिंदुस्थानांत तयार होईपर्यंत रंगाचें उत्पादन तहकूब करणें इष्ट नाहीं, असें कमिटीचें मत आहे. रंगाचें उत्पादन हातीं घेण्याचा एक पंधरा वर्षांचा कार्यक्रम आंखावा असें कमिटीनें सुचविलें आहे.

---

### रावेर पीपल्स को. बँक लि., रावेर
( वार्षिक सभा : १२-९-४३ )

वरील बँकेचें वसूल भांडवल २०,३७५ रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ५,१७० रुपयांचे आहेत. ठेवी १,३८,७८६ रुपयांच्या आहेत. बँकेनें सुमारें ४० हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. म्हणजे, ठेवी पाहून कर्जाची रकम कमी झाली आहे. ३० जून अखेरच्या वर्षी बँकेस १,१७४ रुपये निव्वळ झाला. डि. इक्वलायझेशन फंडांतून १३८ रुपये काढून नफा व टणीसाठी १३१२ रुपये घ्यावे व ५% डिव्हिडंड द्यावें, अशी मॅनेजिंग कमिटीची शिफारस आहे.



मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२१ ए, सदाशिव, पुणें २.

संरक्षण – सुरक्षितता – सेवा
हेंच आमचें ध्येय.
दि औंध म्युच्युअल
लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.
महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहा:—

| | |
|---|---|
| मुंबईचे चीफ एजन्टस्<br>के. डब्ल्यू. फडके,<br>फडके गणपतिवाडी, गिरगाव,<br>बॅक रोड, मुंबई ४. | हेड ऑफिस,<br>'रामनिवास' लक्ष्मी रोड,<br>पुणें शहर. |

दि बँक ऑफ इंडिया लि.
[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,२०,५०,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा: बुलियन एक्स्चेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स:

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १५ सप्टेंबर, १९४३ अंक ३७

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे (मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० एकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधी नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

## नोटीस

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३२ वी सर्वसाधारण सभा शनिवार, ता. २५ सप्टेंबर, १९४३ रोजीं दुपारीं २-३० (स्टँ. टा.) वाजतां तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई, येथें खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहेः—

(१) ३० जून १९४३ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले हिशेब व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.

(२) नफ्याची वाटणी (डिव्हिडंड) जाहीर करणें.

(३) डिरेक्टरांची निवडणूक करणें.

(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

(५) बायलॉजमध्यें योग्य वाटल्यास खालील दुरुस्ती करणेंः—

(अ) बायलॉ नं. २ च्या शेवटीं पुढील मजकूर घालणें.

नोट—"बँकेनें इतर क्षेत्रांत अगोदरच उघडलेल्या शाखांना कलम २ (ड) हें लागू पडणार नाहीं.

(ब) बायलॉ नं. ७२ च्या खालीं (R) म्हणून खालील कलम घालणें.

"सध्यां बोर्डानें नेमलेल्या अथवा पुढें बोर्ड नेमील त्या शाखा कमिट्यांची स्थापना, नेमणूक, त्या विसर्जन करणें व त्यांचे काम चालविणें ह्यासंबंधांतील नियम करणें आणि त्यांनीं केलेले नियम मान्य करणें, बदलणें अथवा रद्द करणें."

मुंबई
२८ ऑगस्ट, १९४३.

बोर्डाच्या हुकुमावरून
वैकुंठ ल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्स्फर बुकें) २७ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर १९४३ (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.



साखरआंबा, मोरआवळा—सफरचंदाचा गाजराचा, आवळ्याचा, बेलफळाचा, महाळुंगाचा, आल्याचा, हिरड्याचा वगैरे.

भाजणी—थालीपीठ, चकलीकरितां.

द. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें.


# विविध माहिती

### एक मोठी मॅनेजिंग एजन्सी हिंदी हातांत आली

ई. डी. ससून युनायटेड मिल्स लि. ची मॅनेजिंग एजन्सी ई.डी. ससून अँड कं. लि. कडे होती, ती कांहीं प्रमुख मारवाडी गिरणीवाल्यांनीं मिळून ३ कोटि ९५ लक्ष रुपयांस ता. ३ रोजीं विकत घेतली. ई. डी. ससून युनायटेड मिल्स लि. च्या मालकीच्या ५ गिरण्या आहेत, त्यांत २½ लक्ष चात्या व ६½ हजार माग आहेत. मॅनेजिंग एजन्सी आतां विदेशीयांकडून हिंदी हातांत आली आहे. ई. डी. ससून अँड कं. लि. च्या हातीं अद्याप तीन गिरण्यांची व्यवस्था आहे, परंतु तीहि विकण्याचा तिचा विचार आहे.

### बेंगाल केमिकल अँड फार्मास्युटिकल वर्क्स लि.

वरील कंपनीस २० लक्ष रुपयांच्या भांडवलावर १४ एप्रिल, १९४३ अखेरच्या वर्षी १३ लक्ष रुपये निव्वळ नफा झाला. भागीदारांस १९% करमाफ डिव्हिडंड मिळालें. सुपरटॅक्ससाठी १½ लक्ष रुपयांची व जादा नफ्यावरील करासाठी ३ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

### हिंदी उसाची लागवड

| | एकर |
|---|---|
| १९४२-४३ | ३६,४२,००० |
| १९४३-४४ | ३८,९२,००० |

### मुंबई प्रांतांत यांत्रिक शिक्षण

मुंबई प्रांतांत यांत्रिक शिक्षण देणाऱ्या ४२ संस्था चालू आहेत. त्यांत शिक्षण घेऊन तयार झालेल्या २,१९२ लोकांस गेल्या मे अखेर फौज, आरमार, दारूगोळ्याचे कारखाने व बिनलष्करी धंदे ह्यांमध्यें काम मिळवून देण्यांत आलें. वरील तारखेस मुंबई प्रांतांत यांत्रिक शिक्षण घेणारांची संख्या २,९४० इतकी होती.

### सकस धान्यें

हिंदी जनतेच्या खाण्यांत येणाऱ्या धान्यांमध्यें सकसपणाचे बाबतींत गव्हाचा नंबर पहिला व तांदुळाचा शेवटचा लागतो. या दोहोंच्यामध्यें जोंधळा, बाजरी इत्यादि धान्यें येतात. सर्वस्वी किंवा प्राधान्यें करून तांदूळ खाणारांनीं गहूं, बाजरी, जोंधळे ह्यासारख्या धान्याचें आपल्या आहारांत मिश्रण करणें हितावह आहे असें तज्ज्ञांचें मत आहे.

### सिसिलीमध्यें अमेरिकन हानि

सिसिलीमध्यें एकूण ७,५०० अमेरिकन मृत, जखमी अथवा बेपत्ता झाले.

### दौंड बारामती रेल्वे कं. लि.

हिंदुस्थान सरकारनें वरील रेल्वे कंपनी विकत घेण्याचें ठरविलें आहे. हा व्यवहार ३० सप्टेंबर, १९४४ रोजीं पुरा होईल. दौंड रेल्वे कंपनीची स्थापना १९१२ सालीं झाली. दौंड ते बारामती ह्या २७ मैलांच्या फाटयाचें काम तिनें पुरें करून मे, १९१४ मध्यें वहातुकीस प्रारंभ केला. कंपनीनें १९२५ ते ३० पर्यंत ६% व पुढें १९४२ अखेर ४½% ते ५½% डिव्हिडंड दिलें आहे. मेसर्स शापुरजी, गोडबोले आणि कंपनीकडे रेल्वे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे.

### रेशनिंगचा सुपरिणाम

ऑस्ट्रेलियांत चहाचें रेशनिंग सुरू झाल्यापासून, लोकांना चहा स्वस्त व वक्तशीर मिळत आहे, असें त्या देशाचे व्यापारमंत्रि नुकतेच म्हणाले.

### चार प्रांतांचीं नवीं कर्जें

| प्रांत | रक्कम (लक्ष रुपये) | विक्रीची किंमत (रु.) |
|---|---|---|
| मुंबई | ३५० | १०० |
| पंजाब | २५० | ९९ |
| मद्रास | १२५ | ९९½ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ५० | ९९ |

वरील चारीं कर्जें अंडरराइट झालेलीं आहेत. विक्रीसाठी मंगळवार, ता. १४ हा एकच दिवस ठेवण्यांत आलेला होता.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २९० | इटलीची शरणचिट्ठी–अफू पाजण्याचे दुष्परिणाम–कापडाच्या किंमती चढल्या–हिटलरचें भाषण | |
| २ ब्रिटिशांचा परराष्ट्रीय व्यापार | २९१ | ६ शेअर बाजार | २९४ |
| ३ संत्र्या-मोसंब्याची हिंदी लागवड | २९२ | ७ कराड अर्बन को. बँक | २९५ |
| ४ सोन्याची किंमत कां घटली ! | २९२ | | |
| ५ स्फुट विचार ... | २९३ | | |


# अर्थ

बुधवार, ता. १५ सप्टेंबर, १९४३

## युद्धानंतर ब्रिटिशांचा परराष्ट्रीय व्यापार कसा टिकेल व वाढेल ?

### ब्रिटिशांची भविष्यकाळाबद्दल चिंता

### अमेरिकन–ब्रिटिश चढाओढीचे परिणाम

युद्धापूर्वीप्रमाणें युद्धसमाप्तीनंतरहि ग्रेट ब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणावर कसा चालू राहील, ह्याची चिंता ब्रिटिश जनतेस आजपासूनच लागून राहिली आहे. ग्रेटब्रिटन परदेशांतून मालाची आयात करितो, त्याच्या मोबदल्यांत तो देश कांहीं माल निर्गत करतो व बाकीची रकम परदेशांतून येणारें व्याज आणि डिव्हिडंड, आगबोट वहातुकीचें उत्पन्न इत्यादि मार्गांनीं मिळणाऱ्या उत्पन्नाचे स्वरूपांत भागविली जाते. १९३६–३७–३८ च्या आकड्यांवरून असें दिसतें कीं, ९३ कोटि पौंडांच्या मालाच्या आयातीच्या मोबदल्यांत केलेल्या निर्गतीची किंमत ५४ कोटि पौंड असून बाकीची रकम इतर मार्गांनीं भरून काढावी लागते. खालील तक्ता पहाः—

| | कोटि पौंड | | कोटि पौंड |
|---|---|---|---|
| आयात | ९३ | निर्गत | ५४ |
| सरकारी देणीं | १ | गुंतविलेल्या भांडवलाचें उत्पन्न | २० |
| | | आगबोट वहातुकीचें उत्पन्न | ११ |
| | | कमिशनें इ. | ४ |
| | | इतर | १ |
| | | | ९० |
| | | तूट | ४ |
| | ९४ | | ९४ |

परराष्ट्रीय व्यापाराचे वरील ताळेबंदाचे आकडे युद्ध परिस्थितीनें पार बदलून टाकले आहेत. ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रांतील गुंतवणुकीवरील व्याजाचें उत्पन्न पूर्वीच्या निमपटी इतकें सुद्धा राहिलेलें नसेल व मालवाहू आगबोटींचें वहातुकीचें उत्पन्न परराष्ट्रीय व्यापार कमी झाल्यामुळें पुष्कळच घटणें स्वाभाविक आहे. इतर उत्पन्नांतहि बरीच घट झाली असली पाहिजे. आयात होणाऱ्या मालाची किंमत वाढल्याकारणानें, ९३ कोटि पौंड किंमतीच्या मालाची प्रत्यक्ष निर्गत ग्रेट ब्रिटननें केली, तरी तूटच उरेल, असा संभव आहे. अशा परिस्थितींत, ग्रेट ब्रिटनच्या जनतेची रहाणी पूर्ववत् उच्च टिकावयाची कशी ? आयातीची फेड करावयाची कशी ? खुल्या आंतरराष्ट्रीय चढाओढींत ब्रिटिश कारखानदारांचा टिकाव लागणें कितपत शक्य आहे ? अमेरिकेंत मजुरीचे दर भारी असले तरी अमेरिकन चढाओढीची ब्रिटिशांना भीति वाटते व जपान, चीन, हिंदुस्थान इत्यादि देशांत मजुरी कमी आहे म्हणून तेथील मालाशीं आपणांस चढाओढ करतां येणार नाहीं, अशी ब्रिटिशांना धास्ती वाटते. ब्रिटिश निर्गत व्यापार वाढविण्यासाठी, त्यास विशेष मदतीची व संरक्षणाची आवश्यकता आहे, असाच ह्या सर्व गोष्टींचा निष्कर्ष निघतो. परंतु अशा तऱ्हेच्या संरक्षक योजनांचा अवलंब केल्यानें ब्रिटिश परराष्ट्रीय व्यापाराचा प्रश्न कायमचा सुटणें शक्य नाहीं, हें एकॉनॉमिस्ट पत्रानें स्पष्ट करून सांगितलें आहे. ग्रेट ब्रिटननें इतर देशांपेक्षा चांगला माल त्यांच्यापेक्षा कमी किंमतींत तयार करणें, हाच ह्या प्रश्नावर तोडगा आहे, असें सांगून त्या पत्रानें कांहीं आंकडे दिले आहेत, ते उद्बोधक आहेत. युद्धापूर्वी प्रत्येक ब्रिटिश कामगाराचें सरासरी उत्पादन १०० होतें असें मानलें, तर जर्मन कामगाराचें उत्पादन १०१ ते १०७ व अमेरिकन कामगाराचें उत्पादन २२९ ते २३८ होतें. ब्रिटिश कामगारास रहाणी मात्र जर्मन कामगारापेक्षा चांगली पाहिजे. त्याचें उत्पादन जर कमी, तर त्याची ही अपेक्षा पुरी कशी पडणार ? एकूण उत्पादन-खर्चांत मजुरीचा अंश किती आहे, ह्याची तुलना केली तर ग्रेट ब्रिटनमध्यें ४४·३%, जर्मनींत ३२% व अमेरिकेंत ३९·४% असें प्रमाण आढळतें. जर्मनी कमी मजुरी देऊन आपला उत्पादन खर्च बेतांत राखतो; अमेरिका यंत्रसामुग्रीची कुशल योजना करून जास्त मजुरी देऊं शकतो; ग्रेट ब्रिटनला हें दोन्हीं साधत नाहीं व त्यामुळें ब्रिटिश परराष्ट्रीय व्यापारास कुबड्यांची मदत लागते. ह्या कुबड्या टाकून कशा देतां येतील; इतकेंच काय, युद्धानंतर कुबड्या मिळतीलच किंवा नाहीं, हा महत्त्वाचा प्रश्न आज ब्रिटिश सरकार व कारखानदार ह्यांचेपुढें उभा आहे. ब्रिटिश यंत्रसामुग्रींत सुधारणा होऊन यांत्रिक कार्यक्षमता वाढली पाहिजे व आर्थिक दृष्ट्याहि उत्पादन काटकसरीचें झालें पाहिजे. ब्रिटिश निर्गत व्यापाराच्या भवितव्याबद्दल ग्रेट ब्रिटनमध्यें अत्यंत तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. ग्रेट ब्रिटन, अमेरिका इत्यादि राष्ट्रांच्या परराष्ट्रीय व्यापारतृष्णेचे दुष्परिणाम हिंदुस्थानासारख्या देशांना भोगूं लागू नयेत, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकार व हिंदी कारखानदार ह्यांनीं संघटित प्रयत्न केले पाहिजेत; नाहीं तर, हिंदी उद्योगधंद्यांची आजची चलती ही क्षणभंगूर ठरल्याखेरीज रहाणार नाहीं. अमेरिकेचें प्रचंड उत्पादन, त्याची ब्रिटिश उत्पादनाशीं चढाओढ, त्यामुळें त्या दोघांच्या परराष्ट्रीय व्यापारविषयक धोरणांत घडून येणारे स्थित्यंतरें, ह्या सर्वांचें आपण बारकाईनें परीक्षण करून आपल्या हितसंबंधांचें रक्षण वेळींच करणें अगत्याचें आहे.

## संत्र्या-मोसंब्यांची हिंदी लागवड

संत्र्या-मोसंब्यांची, कागदी लिंबांची व इतर तत्सम फळांची माहिती मनुष्य जातीस गेलीं ३ हजार वर्षें असली, तरी त्यांची व्यापारी दृष्टीनें लागवड गेल्या ५० वर्षांतच विशेषतः मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. हीं झाडें विषुववृत्तावर वाढणारीं असलीं, तरी त्यांची लागवड अमेरिका, ब्राझील, स्पेन, इटली, चीन, जपान आणि हिंदुस्थान ह्या विषुववृत्ताच्या बाहेरील देशांतच सध्या अतिशय झालेली आहे. हिंदुस्थानांतील त्यांचें वार्षिक उत्पादन १ कोटि, ४५३ लक्ष मण एवढें आहे, परंतु त्यांची निर्यात मात्र फारच थोडी होते. हिंदुस्थानांत सुमारें १ लक्ष, ३० हजार एकरांत हीं फळझाडें लावण्यांत येतात. मोसंबी, संत्रीं, लिंबें, पपनस, साखर-लिंबू, ईडलिंबू, ग्रेप फ्रूट, महाळुंग ह्या सर्वांचा समावेश वरील फळझाडांत करून सोईसाठीं "संत्री-मोसंबी" ह्या नावानें त्यांस संबोधिलें आहे. त्यांत संत्रीं व कागदी लिंबें हींच महत्त्वाचीं असून त्यांनीं एकूण लागवडीच्या अनुक्रमें ७८·३% व १६·३% क्षेत्र व्यापलेलें आहे.

### प्रांतवार लागवड व उत्पादन

वरील सर्व फळझाडांच्या लागवडीच्या दृष्टीनें प्रांतांचा अनुक्रम खालीलप्रमाणें लागतोः—मद्रास (३१,२७० एकर), मध्यप्रांत (२२,०४७ एकर), पंजाब (१७,१५० एकर), मुंबई (१६,४०० एकर), आसाम (१४,०२५ एकर), कुर्ग (१०,०७१ एकर). ह्या सर्व प्रांतांतील लागवड एकूण हिंदी लागवडीच्या ८९·०% आहे. गेल्या कांहीं वर्षांत सर्वच प्रांतांतून ह्या फळझाडांची लागवड वाढत चालली असल्याचें आढळतें. व्यापारी दृष्टीनें त्यांची लागवड नुकतीच सुरू झाली आहे, त्या कारणानें अद्याप जुन्या मळ्यांतून शास्त्रीय दृष्टीचा अभावच असलेला दिसतो. मद्रास प्रांतांतील गुंतूर जिल्ह्यांत दर एकरी ३३ संत्र्यांचीं झाडें आढळलीं, तर आसाममध्यें एका मळ्यांत दर एकरीं ५०० झाडें दिसलीं. कागदी लिंबाच्याहि बाबतींत गुंतूर जिल्ह्यांत एकरीं ६० तर मदुरा जिल्ह्यांत ३००, असा फरक आढळला. संत्र्या–मोसंब्यांचें दर एकरीं हिंदी उत्पादन ९८ मण आहे; अमेरिकेंत तें १३२ मण आहे.

### आयात-निर्गत

हिंदुस्थानांत संत्र्या–मोसंब्यांची आयात फारच अल्प प्रमाणावर होते. १९३९–४० सालीं त्यांच्या आयातीची (४,०५० मण) किंमत ४५,४१५ रुपये भरली. मार्मलेड, जेली, स्क्वॉश इत्यादींच्या स्वरूपांतहि कांहीं आयात होते. १९३९–४० मध्यें हिंदुस्थानानें ७,९९८ मणांची निर्गत केली, त्यांची किंमत ७४,३८५ रुपये भरली. निर्गतींपैकीं ९०% माल ब्रह्मदेशांत गेला. हिंदी वार्षिक उत्पादनाची किंमत ३३ कोटि रुपये आहे.

### दर माणशीं खप

हिंदुस्थानांत संत्र्या-मोसंब्यांचा वार्षिक दर माणशी खप ३·२ पौंड एवढा आहे. पॅलेस्टाइन २२२·० पौंड, स्पेन ८५·० पौंड अमेरिका ५४·३ पौंड, ब्राझील ५३·९ पौंड, इजिप्त ३०·७ पौंड, ग्रेट ब्रिटन २७·० पौंड, असे इतर देशांतील दर माणशी खपाचे आकडे आहेत. हिंदुस्थानांत सध्या फक्त श्रीमंत व मध्यम वर्गीय लोकच संत्री-मोसंबी खाऊं शकतात. बाकीच्यांना आजाराचे प्रसंगींच तीं खाण्याची पाळी आली तर येते. संत्र्या-मोसंब्यांची लागवड वाढवून व दर एकरी उत्पादन वाढवून उत्पादन खर्च कमी केल्यास, हीं फळें गरीबांसहि परवडूं शकतील. हिंदुस्थानांत सर्व प्रांतांत आसाममध्यें ह्या फळांचा दर माणशी खप अधिक (२५·२ पौंड) आहे. प्रांतांतील पीक बाहेर पाठविण्यास तेथें वहातुकीची व्यवस्था चांगली नाहीं, त्याचा हा परिणाम दिसतो. लागवड करणाऱ्या इतर प्रांतांत दर माणशी खप खालीलप्रमाणें आहेः—मध्यप्रांत २·७ पौंड; मुंबई ५·७ पौंड; मद्रास ६·१ पौंड; पंजाब ५·३ पौंड. हा सर्व खप शहरी लोकांतच होतो व खेडेगांवांतील लोकांच्या वाट्यास कागदी लिंबेंच मुख्यतः येतात.

कागदी लिंबू, संत्रीं, ग्रेप फ्रूट, इत्यादींचीं सरबतें करून तीं बाटल्यांत भरून विकण्याचा धंदा कांहीं ठिकाणीं चालू करण्यांत आला आहे, त्याच्या विस्तारास पुष्कळ वाव आहे.

## मुंबईंत सोन्याची किंमत कां घटली ?

### लंडन टाइम्सचें मत

"मुंबई शहरांतील सोन्याचा भाव वर-खाली कां जातो, हें सांगणें निश्चितपणें कठीण जातें, कारण तेथील बाजाराचा इतर ठिकाणच्या बाजारांशीं निकट संबंध राहिलेला नाहीं. सोन्याचे तारणावरील कर्ज बंद करण्याचा अधिकार सरकारनें स्वतःकडे घेऊन ठेवला, त्याचा उद्देश सोन्याच्या बाजारांतील सट्टेबाजीस आळा घालणें हाच होता. ही सट्टेबाजी फारच मोठ्या प्रमाणावर चालू होती व ती आवाक्याबाहेर जाण्याचा रंग दिसत होता. हिंदी संस्थानांतर्फे व्यवहार करणाऱ्या दलालांनीं बरेंच सोनें विकलें व भूमध्यसमुद्राकडील युद्धाच्या सुवार्तेमुळें लोकांनीं पुढें भाव कमी होईल ह्या अपेक्षेनें विक्री केली, अशी मुंबईची बातमी आहे. त्यामुळेंच सोन्याचा भाव उतरला असावा. लंडन व न्यूयॉर्क येथील बाजारभावांचे मानानें मरमसाट किंमती देऊन लोकांनीं सोनें घेऊन ठेवलें आहे, त्यांस युद्ध लवकर संपण्याचीं चिन्हें घाबरून सोडतील, यांत नवल नाहीं."

### निजाम सरकारचें पोस्ट खातें

निजाम सरकारच्या पोस्टखात्याचा व्याप खालील आंकड्यांवरून लक्षांत येईल.

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज खातीं | ४,८४५ |
| सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवी | ५,८०,१६,६१९ रु. |
| पोस्ट ऑफिसें | १,२७४ |
| टपालाच्या पेट्या | २,१५६ |
| वार्षिक उत्पन्न | १२,७३,२४० रु. |
| वार्षिक खर्च | १०,२०,९९५ रु. |
| नफा | २,५२,२४५ रु. |

### जंगलें वाढविण्याचा ५० वर्षांचा कार्यक्रम

चालू युद्धसमाप्तीनंतर, ग्रेट ब्रिटनमध्यें मोठ्या प्रमाणावर जंगलांची वाढ करण्यांत येणार आहे. त्यासंबंधांत सूचना करण्यासाठी नेमलेल्या कमिशननें ५० वर्षांचा कार्यक्रम आखून दिला आहे. पहिल्या १० वर्षांतील ११ लक्ष एकरांच्या लागवडीस ६० कोटि रुपये खर्च येईल.

## स्फुट विचार

### इटलीची शरण चिठ्ठी

सिसिली ब्रिटिश व अमेरिकन सैन्यांनीं जिंकून घेतल्यावर इटलीची स्थिति अनुकंपनीय झाली. उत्तर आफ्रिकेंतील आपलें साम्राज्य मुसोलिनी गमावून बसलाच होता आणि सिसिली त्याच्या हातचा जाऊन प्रत्यक्ष इटलीमध्यें मित्र राष्ट्रांच्या फौजा घुसल्या आणि महत्त्वाच्या इटालियन शहरांवर व बंदरांवर त्यांच्या लढाऊ विमानांचे घातक हल्ले होऊं लागले. वास्तविक इटलीमध्यें कांहींच त्राण उरलें नव्हतें. इटालियन शिपाई मोठ्या संख्येनें मित्र राष्ट्रांच्या हातीं कैदी म्हणून खुषीनें जात आले आहेत ह्यावरून त्यांचें मन युद्धास विटलें असल्याचें उघड होत आलेंच होतें. इटलीचें आर्थिक सामर्थ्यहि बेताचें होतें आणि तें बहुतेक नष्ट होत आलें होतें. जर्मनी इटलीचा उपयोग युद्ध लांबवण्यांत व युरोपपासून दूर ठेवण्यांत करीत होता. ह्या कारणानें इटलींत असंतोष पसरला असल्यास त्यांत नवल नाहीं. अशा परिस्थितींत मुसोलोनीस सत्तात्यागावांचून मार्ग उरला नाहीं. त्याच्या जागीं आलेल्या अधिकाऱ्यांसहि स्वतःच्या देशांत जर्मनीचें युद्ध लढण्यांत उत्साह वाटण्यासारखा नव्हता. त्यांनीं मुसोलिनीची फॅसिस्ट घटना मोडून टाकली तेव्हां इटली आतां जर्मनीच्या मगरमिठींतून बाहेर पडणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. परंतु बॅडोग्लियो कोणतें धोरण स्वीकारतो ह्या विषयीं शंका वाटण्यास जागा होती. इटालियन सरकार पूर्णपणें शरण येईतों पावेतों मित्र राष्ट्रें आपली चढाई चालू ठेवणार हें त्यास निक्षून सांगण्यांत आलें होतें. इटलीचा संपूर्ण नाश वांचवण्यास जर्मनीची बाजू उघडपणें सोडून देऊन शस्त्रें खाली ठेवण्यावांचून गत्यंतर नाहीं असें त्या सरकारास दिसून आलें आणि त्याप्रमाणें त्यानें मित्र राष्ट्रांच्या सेनापतीस शरणचिठ्ठी लिहून दिली आहे. ह्या योगानें मित्र राष्ट्रांची भूमध्य समुद्रांतली बाजू बळकट झाली आहे आणि त्यांच्या युरोपांतील चढाईचा मार्ग मोकळा झाला आहे. इटलीमधील युद्ध संपलें असा त्याचा अर्थ नव्हे. जर्मनी त्या देशांत लढाई चालू ठेवील आणि हळु हळु माघार घेत उत्तर इटलींत बचावाची व्यवस्था करील असा रंग दिसतो. स्वतःच्या सोयीसाठीं इटलीचा बळी द्यावयाचा हा हिटलरचा डाव आहे. इटालिअन जनतेस जर्मनीविषयीं आपलेपणा वाटणें शक्य नाहीं आणि तिचें मुसोलिनीच्या दोस्तास सहाय मिळणेंहि संभवनीय नाहीं. प्रेसिडेंट रूझव्हेल्टनीं म्हटल्याप्रमाणें मित्र राष्ट्रांस जर्मनीशी इटलींत, फ्रान्समध्यें व इतरत्र युरोपांत हिटलरशाहीचा पूर्ण पाडाव होईपर्यंत लढावें लागणार आहे. तथापि, बॅडोग्लिओच्या शरण चिठ्ठीनें मित्र राष्ट्रांच्या ह्या नवीन आघाडीवरील लढाईचें काम सुकर करून टाकलें आहे हा त्यांचा मोठा व अभिनंदनीय विजयच आहे.

---

### अर्भकांस अफू पाजण्याचे दुष्परिणाम

शिरूर येथील आरोग्य केंद्राच्या कार्याचा तिसरा वार्षिक वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे, त्यांत असें म्हटलें आहे कीं, सदरहू केंद्राच्या टापूंत अफूच्या विषाची बाधा होऊन चार अर्भकें मृत्युमुखीं पडलीं. आपणांस स्वतःचा नित्य व्यवसाय संभाळण्यास सवड व्हावी आणि मुलांच्या रडण्यामुळें वगैरे त्यांत व्यत्यय येऊं नये म्हणून माता अर्भकांस अफू पाजीत असतात. अफूचा असा खुराक देण्याची प्रथा पिढ्यानुपिढ्या चालत आली आहे. तिच्या दुष्परिणामांकडे फारसें लक्ष देण्यांत आलेलें नाहीं ही गोष्ट वरील वृत्तांतावरून प्रतीत होत आहे. मुलांस हगवणीचा विकार झाला असतांहि त्यांस अफू देण्याची वहिवाट आहे. तथापि, मुलें स्वस्थ पडावीं आणि त्यांच्या आयांस आपले उद्योग निर्वेध रीतीनें करतां यावे म्हणून केला जाणारा अफूचा उपयोग आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा निदर्शक आहे आणि ह्या दृष्टीनें त्याचा विचार व्हावयास पाहिजे. शिरूर केंद्राच्या वृत्तांतांत असेंहि नमूद करण्यांत आलें आहे कीं १९४१ मधील पावसाच्या अभावामुळें जनन संख्येंत घट होण्यास मदत झाली. अवर्षणामुळें पोटाची सोय पहाण्यासाठीं आपली खेडीं सोडून पुष्कळ लोक उद्योगधंद्यांच्या ठिकाणीं गेले. तरीहि तेथील मृत्यूंची संख्या पूर्वीच्या वर्षाचे मानानें वाढली. अर्भकांच्या मृत्यूंचें प्रमाणहि बरेंच वाढलें. घोडनदी व तळेगांव येथें आरोग्य विषयक प्रदर्शनें भरवण्यांत आलीं. गर्भवती स्त्रियांस व बाळंतिणींस आरोग्य केंद्राचे मार्फत सहाय देण्यांत आलें आणि त्याचा बराच उपयोग झालेला दिसून आला. आरोग्याच्या सुधारणेचे बाबतींत कसे व किती यत्न होणें आवश्यक आहे याची कल्पना शिरूर केंद्राच्या वृत्तांतावरून येते.

---

### कापडाच्या किंमती मर्यादेबाहेर चढल्या

कापडाच्या किंमती बेसुमार वाढून मध्यम आणि गरीब स्थितींतल्या लोकांची कुचंबणा होऊं लागली, तसेंच चलन विस्ताराचा परिणाम महागाईंत होऊं लागल्याविषयींच्या तक्रारी करण्यांत येऊं लागल्या तेव्हां हिंदुस्थान सरकारनें विशिष्ट जातींच्या कापडाचे भाव ठरवून टाकले आणि व्यापाऱ्यांनीं आपला माल विक्रीकरितां साठ्यांतून बाहेर काढलाच पाहिजे असें फर्माविलें. जादा नफ्याच्या आशेनें घाऊक व्यापारी कापड विकावयास काढीत नसल्यानें त्याच्या किंमती बेसुमार चढल्या असें दिसून आल्यावरून सरकारास वरील प्रकारचा हुकूम काढावा लागला. त्याचा योग्य परिणाम होऊन कापडाच्या किंमती उतरल्या आणि जनतेस हायसें झालें. परंतु कापडाची ही मर्यादित स्वस्ताई फार वेळ टिकली नाहीं आणि व्यापारी पुन्हां पूर्वीच्या मार्गानें जाऊं लागले आहेत. कापड व सूत ह्यांच्या किंमती ठराविक मर्यादेच्यावर जाऊं नयेत हा सरकारचा हेतु निष्फळ करून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न आहे असें दिसतांच टेक्स्टाइल कमिशनरनें एक पत्रक काढून त्यांत व्यापाऱ्यांस इशारत दिली आहे. हें पत्रक म्हणतें कीं अलीकडे कापड व सूत ह्यांच्या किंमती मर्यादेबाहेर एकदम गेलेल्या दिसत आहेत आणि ह्या प्रवृत्तीस व्यापाऱ्यांनीं तात्काळ आळा घातला नाहीं तर तारीख ४ सप्टेंबरच्या सरकारी हुकुमाची अंमलबजावणी केली जाईल आणि कांहीं जातींच्या कापडाचे बाबतींत अपवादात्मक सवलती देण्यांत आल्या आहेत, त्या काढून घेतल्या जातील. टेक्स्टाइल कमिशनरनें वरील पत्रक अगदी वेळेवर काढलें असून त्याचा अपेक्षित परिणाम कापडाच्या किंमतीवर होईल अशी आशा आहे.

---

### हिटलरचें भाषण

गेल्या मार्चपासून हिटलरनें आपलें तोंड उघडलें नव्हतें. परंतु पूर्वेकडील आघाडीवर रशिया मिळवीत असलेले लागोपाठ विजय, जर्मन शहरांवर होणारे ब्रिटिश व अमेरिकन वैमानिकांचे विध्वंसक हल्ले आणि अखेर इटलीमध्यें बॅडोग्लिओनें युद्धांतून घेतलेली

माघार व मित्रराष्ट्रांची त्या देशांतील चढाई ह्या सर्व घटनांमुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितींत आपल्या लोकांची समजूत घालण्याचें व त्यांस धीर देण्याचें अगत्य लक्षांत घेऊन त्यानें नुकतेंच एक छोटें भाषण केलें आहे. बॅडोग्लिओनें शस्त्रसंन्यास करून आपला विश्वासघात केला ह्याबद्दल त्याची निर्भर्त्सना करून, इटलीमध्यें जर्मन सेनाच वस्तुतः मित्रराष्ट्रांविरुद्ध लढत असल्यानें त्यामुळें जर्मनीचें कांहीं विशेष बिघडलें नाहीं असें म्हणून त्यानें मुसोलिनीची भरपूर स्तुति केली. अपयशी रशियन आघाडीचा प्रत्यक्ष उल्लेख न करतां युद्धामध्यें कधीं कधीं व कोठें कोठें आपल्या मुख्य उद्देशाच्या सिद्धीसाठी माघार घ्यावी लागते एवढेंच तो म्हणाला. कांहीं झालें तरी जर्मनीभोंवतालची संरक्षक फोलादी चौकट अभेद्य असल्याचा निर्वाळा देऊन मित्र राष्ट्रांच्या वैमानिक हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी एक कार्यक्षम तोडगा उपयोगांत आणला जाईल असें आश्वासन त्यानें दिलें. इटलीचा शक्य तेवढा भाग आणि विशेषतः उत्तरेचा भाग पूर्णपणें ताब्यांत घेऊन तेथें चढाई करून येणाऱ्या मित्र राष्ट्रांच्या सैन्यास प्रतिकार करण्याचा हिटलरचा बेत दिसतो. रोम शहर ताब्यांत घेऊन इटलींत जर्मनीच्या वर्चस्वाखाली नवीन दिखाऊ राजवट स्थापण्याचा त्याचा प्रयत्न आहे. फ्रान्ससारखीच इटलीची स्थिति त्यास करावयाची आहे. परंतु रशिया व इटली येथील आघाड्यांवर मित्रराष्ट्रांच्या चढाईस तोंड देणें त्यास सोपें जाणार नाहीं. इटालियन जनता व फौजा यांचा जर्मनीस आजच तीव्र विरोध होत आहे आणि इटलीच्या माघारीचे प्रतिकूल परिणाम बाल्कन्स व इतर युरोपियन देश ह्यांमध्यें सहन करावे लागणार आहेत. जर्मन जनता व जर्मनीचे हस्तक ह्यांमध्यें निराशा कमी व्हावी व उत्साह वाढावा असें कांहींच हिटलरच्या भाषणांत नव्हतें.

---

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव

वरील बँकेनें ३० जून, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी चांगली प्रगति केली आहे. तिचें खेळतें भांडवल ६ लक्ष, १४ हजारांचें १४ लक्ष, १७ हजार रुपये झालें आहे. नफाहि ७ हजारांवरून, सुमारें १९३ हजार रुपये झाला आहे. बँकेचें वसूल भांडवल ७९,२७० रुपये आहे व ठेवींचा आंकडा १३ लक्ष, ६ हजार रुपये आहे. बँकेनें ९ लक्ष, ६९ हजार रुपयांचीं कर्जे दिलीं आहेत व तिची इनव्हेस्टमेंट १½ लक्ष रुपयांची आहे. रोख व बँकांत १ लक्ष, ९२ हजार रुपये आहेत. अहवालाचे वर्षी बँकेनें निपाणी व चिकोडी येथें शाखा उघडल्या. बँकेच्या आदनावर शाखेवर दरोडा पडला, परंतु रकमेसह आरोपी सापडले. भागीदारांस करमाफ ५. डिव्हिडंड मिळालें.

## ट्रस्ट ऑफ इंडिया कं. लि.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कंपनी लिमिटेडच्या पुण्यांतील सर्व प्रतिनिधींची खाजगी सभा कंपनीचें आगामी मूल्यमापन व प्रगति याबाबत विचार करण्यासाठी बोलावण्यांत आली होती. सभेस सुमारें ५० प्रतिनिधी हजर होते. सभेचें अध्यक्षस्थान कंपनीचे एक संस्थापक व डायरेक्टर डॉ. सर मोरोपंत जोशी यांनीं स्वीकारलें होतें. श्री. आ. रा. भट, श्री. काकडे बंधु, श्री. एस. के. फाटक, श्री. न. गं. आपटे, श्री. आर. पी. बर्वे यांचीं सूचनात्मक भाषणें झालीं. समारोप करतेवेळीं, जो एजंट कंपनीला विमेदारांना आकर्षक अशी नवी योजना सुचवील व त्या योजनेप्रमाणें जर त्यानें रु. २,५०० विमा हप्त्यादाखल गोळा करून दाखविले तर त्याला स्वतः रु. १०० बक्षिसादाखल देऊं असें सर मोरोपंतांनीं जाहीर केलें. कंपनीचे मॅनेजर श्री. वि. ह. देशमुख यांनीं योग्य शब्दांत सर्वांचे आभार मानल्यावर सभा संपली.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. काम, २४, डे. जि. पुणें ४)

या आठवड्यांत दोन प्रमुख घटना घडून आल्या. पहिली इटलीची शरणागती व दुसरी हिंदुस्थान सरकारनें शनवारीं वटहुकूम काढून बदले करण्यास केलेली बंदी.

इटली शरण आल्याबरोबर साधारण अंदाज बाजार वर जावा असा होता पण उलट बाजार खाली आला. याचें कारण बदल्यांच्या बाबतींत सरकार नक्की कांहीं तरी सटोडियांचे हातपाय बांधून टाकणारा हुकूम काढणार अशी कुणकुण बाजाराला लागली होती. म्हणजे सध्या युद्धापेक्षां अंतस्थ सरकारी धोरण बाजाराला जास्त महत्त्वाचें वाटत आहे. याबरोबरच वस्त्रनियंत्रकानें पुन्हां जाहीर केलें कीं ठरविलेल्या किंमती सरकार केव्हांही बदलूं शकेल व ज्या अर्थी गरजेच्या मालाचे भाव अजूनही समाधानकारक खाली उतरलेले नाहींत त्या अर्थी किंमती पुन्हां खाली आणल्या जाण्याचा दाट संभव दिसतो.

इटलीचा पराभव म्हणजे चालू युद्धाचा शेवट आतां दिसूं लागला आहे. त्या दृष्टीनें बाजारभाव खालच्या पातळीकडे झुकणे स्वाभाविक आहे. अमेरिकन बाजार या दृष्टीनें मागील महिना दोन महिने विशेष हालचाल न करतां बसूनच आहेत. युद्ध एकाएकीं संपलें तर भाव खाली पडणें अपरिहार्य आहे. कारण उद्योगधंद्यांच्या चालू भरभराटीला ओहोटी लागल्याशिवाय राहणार नाहीं. परदेशी आयात थोड्याच काळांत वाढेल व चलनाला खीळ आपोआप बसेल. पण इकडे युद्धानंतरचीं कांहीं वर्षें आशिया-युरोपला पक्क्या व कच्च्या मालाचा पुरवठा हिंदुस्थानच करणार आहे. युद्धकालांतील नफ्यामुळें प्रमुख धंद्यांची व्यक्तिशः आर्थिक मजबुती झालेली आहे व जादा करांचें ओझें कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. यामुळें मागील दोन तीन वर्षांची सरासरी नफ्याची वाटणी भागीदारांना करणें शक्य व्हावयास हरकत नाहीं. तेव्हां शेअरचे भाव वेडेवांकडे खाली पडण्याचें कारण दिसत नाहीं. भावना म्हणून लढाई संपल्यामुळें तात्पुरते पडले तरी पुन्हा वरच यावयास पाहिजेत.

बदले बंद करण्यामुळें मात्र बाजारांत थोडा फार घोटाळा झाल्याखेरीज राहणार नाहीं. डाईंग, सेंचरी यामध्यें मंदीवाले अडकलेले दिसतात तरी आजचा तेजीवाला उद्यां मंदीवाला बनूं शकतो व कांहीं मंदीवाल्यांची वेचाण हातांतल्या मालाच्या तारणावर असली तर त्यांना बाजाराच्या अंगावर कागद फेकून मोकळे होण्याला कांहींच प्रत्यवाय रहाणार नाहीं. तेव्हां तात्पुरती घसरगुंडी होणार असा रंग दिसतो.

---

## पूना गेस्ट हाऊसचा आठवा वाढदिवस

ता. १३ रोजीं (अनंत चतुर्दशी) कै. नानासाहेब सरपोतदार यांनीं स्थापन केलेल्या "पूना गेस्ट हाऊस"चा आठवा वाढदिवस मोठ्या थाटानें साजरा झाला. त्याप्रसंगीं बरीच प्रतिष्ठित मंडळी हजर होती. चालकांनीं त्यांच्या आश्रयदात्यांतर्फे विजापूर दुष्काळ पीडित बंधूंस मदत म्हणून एक पोतें बाजरी दिली.

## कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### रौप्य महोत्सवाची हकीकत

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. या संस्थेचा रौप्य महोत्सव रविवार तारीख ५।९।४३ रोजीं कराड येथें सर जनार्दन मदन सी. एस. आय., सी. आय. ई., यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला. प्रथम बँकेचे चेअरमन श्री. देशपांडे यांनीं सहकारी चळवळीचा उपक्रम सरकारकडून कसा व कोणत्या प्रकारें झाला, त्याबाबत कायदे कसे बदलत गेले व या संबंधांत अर्बन बँकेचें स्थान कोणतें आहे या संबंधींची माहिती सरकारी रिपोर्टाचे व रिझर्व्ह बँकेचा सन १९३९-४० सालचा रेव्ह्यूचे आधारासह सांगितलें. शेतकऱ्यांचे उन्नतीकरितां निरनिराळे उपाय असले तरी त्यांचे मालास योग्य किंमत मिळवून दिल्यानें त्यांचा खरा उपयोग होणार आहे असें सांगून उदाहरणार्थ कराड येथील खरेदी विक्री सोसायटीची व्यवस्था बँकेकडे कशी आली व सन १९४२-४३ सालीं या खरेदी विक्री सोसायटी मार्फत (५,००,०००) पांच लक्ष रुपयेवर किंमतीचा माल विकला जाऊन सोसायटीस खर्चवेच वजा जाता निव्वळ नफा रुपये १६०० वर कसा झाला तें सांगितलें. अर्बन बँकांना समाईक भांडवलाच्या उद्योगधंद्याच्या कंपनीस त्यांचे कच्या व पक्या मालाचे तारणावर पैसे देण्यास परवानगी मिळाल्यास तिचा योग्य उपयोग होईल व उद्योगधंद्याचे वाढीस मदत होईल व शेतीवर निर्वाह करणाऱ्या लोकांची अंशतः सोय होईल. त्याचप्रमाणें सहकारी पतपेढी संस्थांना अर्बन बँका हल्लीं पैसे कर्जाऊ देऊं शकत नाहींत तीही अडचण दूर व्हावी असें सूचित केलें व सर जनार्दन यांचा अल्प परिचय करून देऊन त्यांचा सत्कार केला.

### अध्यक्ष, सर जनार्दनराव मदन, ह्यांचें भाषण

त्यानंतर अर्बन बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. खंडकर यांनीं संस्थेस अभिनंदनपर आलेले सुमारें शंभर संदेश वाचून दाखविले. यानंतर रौप्य महोत्सव समितीचे चेअरमन श्री. फणसळकर वकील यांनीं लिहून तयार केलेल्या बँकेच्या रौप्य महोत्सव ग्रंथाचें प्रकाशन केल्याचें सर जनार्दन यांनी जाहीर केलें व टाळ्यांचे प्रचंड गडगडाटांत त्यांनी आपल्या भाषणास सुरवात केली. बँकेच्या प्रगतीपर कामाचा त्यांनीं मुक्तकंठानें गौरव केला. बँकेचें खेळतें भांडवल व ठेवी यांची वाढ किती झाली व बँकेनें कर्ज कोणकोणत्या विभागावर कसें दिलें हें त्यांनीं सांगितलें. बँकेच्या ठेवींच्या बाबतींत या ठेवीकरितां विशेष व्याजाचें आमीष न दाखवितां कराडसारख्या ठिकाणी झालेली ठेवींची वाढ ही बँकेवरील असलेल्या विश्वासाचें द्योतक आहे असें सांगितलें. जंगममालाचे तारणावर बँकेचीं बरीच रक्कम दिली जाते. हा व्यवहार अत्यंत दक्षतेनें व निर्बंध पाळून केला जात आहे याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. सन १९४२-४३ सालचें बँकेचें थकबाकीचें प्रमाण २·८ इतकें अल्प असल्याचें सांगुन बँकेची सर्व कामगिरी अभिनंदनास्पद आहे असे उद्गार काढले. तसेंच बँकेनें स्वतःची इमारत बांधली आहे व हा एक प्रगतिपथावरील टप्पा आहे असें सांगितलें. नंतर सूचना म्हणून कांहीं गोष्टी सांगितल्या. काटकसर करणें हा सहकारी चळवळीच्या उद्देशांपैकीं एक उद्देश आहे. सभासदांना काटकसरीची सवय लावण्यासाठी होम सेव्हिंग सेफ सारख्या बँकेनें सील केलेल्या पेट्या सर्व सभासदांकडे देऊन त्यांना त्या पेट्यांतून नित्य सवडीप्रमाणें पैसे भरण्यास सांगावें व महिना अखेरीस या पेट्या उघडाव्यात व जो सभासद कर्जदार असेल त्याची या पेट्यांत जमा झालेली रक्कम त्याचे कर्ज खातीं जमा करावी व इतरांची त्यांच्या इच्छेप्रमाणें चालू खातीं जमा करावी. असें केल्यानें सभासदांना काटकसरीची सवय लागेल. एकाच स्वरूपाच्या मागणीवर जास्त कर्ज देण्यापेक्षां निरनिराळें वर्गीकरण करून कर्ज द्यावें म्हणजे त्यांत धोका कमी राहील. बँकेच्या नोकर वर्गाच्या कामाबद्दल संतोष व्यक्त करून त्यांच्या कामाच्या मानानें पगारवाढ करावी असें सुचविलें व त्यांची कार्यक्षमता वाढविणेकरितां त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी व इंडियन मर्चंटस चेंबर किंवा लंडन चेंबर ऑफ कामर्सच्या परीक्षा, बँकिंग सेक्रेटरीचे काम वगैरे एकेक विषयवार पास होण्यास त्यांना उत्तेजन द्यावें असे सांगितलें. कायदा व कानू यांचे कक्षेंत डिव्हिडंड दिलें जातें. तथापि त्यापेक्षा तें आणखी कसें कमी करतां येईल याचा विचार बँकेनें करावा अशी सूचना दिली. शेवटी बँकेची सर्वांगीण उन्नति होवो अशी इच्छा प्रदर्शित करून रौप्य महोत्सव प्रसंगाचे अध्यक्षस्थान दिल्याबद्दल आभार मानून आपलें भाषण संपविलें. नंतर रौप्य महोत्सवानिमित्त बँकेनें दिलेल्या देणग्या व केलेल्या योजना सर साहेबांनीं खाली लिहिल्याप्रमाणें जाहीर केल्या.

### रौप्य महोत्सवानिमित्त देणग्या व योजना

१. बँकेचें सामान्य कर्ज व कॅशक्रेडिट घेऊन तें वक्तशीर फेडणारास सन १९४२-४३ सालचे व्याजांत १ टक्का रिबेट देण्यांत येईल.

२. नॉनमेंबर ठेवीदारांना त्यांचें मुदतीचे ठेवीवर सन १९४२-४३ सालचे व्याजांत एक चतुर्थांश टक्का जास्त देणेंत येईल.

३. सभासदांना सन १९४२-४३ सालचे डिव्हिडंडपेक्षां सव्वा टक्का बोनस म्हणून वाढ करणेंत येईल. मात्र एक शेअर धारण करणारांना बोनसचे बाबतींत अडीच टक्के वाढ करणेंत येईल.

४. पोटनियमास अनुसरून सहकारी तत्त्वाचे प्रसाराकरितां शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्याकरितां देणग्या देण्यांत येतील.

५. बँकेच्या नोकरांना एक महिन्याच्या पगाराचे रकमेइतकें बोनस देण्यांत येईल.

६. रौप्य महोत्सवाचे सालींच बँकेनें आपल्या इमारतीचे शेजारीं गोडाऊनसाठी जागा खरेदी केली आहे. त्यावर होणाऱ्या इमारतीस 'ज्युबिली गोडाऊन' असें नांव देण्यांत येईल.

७. तसेंच बँकेच्या ऑफिसचे व सभासदांचे उपयोगाकरितां हल्लीं जें पुस्तकालय (लायब्ररी) आहे त्यांत ज्युबिलीनिमित्त उत्तरोत्तर पुस्तकांची भर घालून वाढविण्याचा उपक्रम सुरू करण्यांत येत आहे व त्यास ज्युबिली लायब्ररी असें नांव जाहीर करण्यांत येत आहे.

यानंतर डेप्युटी रजिस्ट्रार श्री. भागवत, बॉंबे प्रॉ. को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता, ओगले ग्लास वर्क्सचे श्री. आत्मारामपंत ओगले, बँकेचे डायरेक्टर श्री. ढवळीकर वकील यांचीं बँकेच्या गौरवपर भाषणें झालीं. रौप्य महोत्सव समितीचे चेअरमन श्री. फणसळकर वकील यांनीं सर्वांचे आभार मानले व राष्ट्रगीत, पानसुपारी होऊन समारंभ समाप्त झाला.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२१ ए, सदाशिव, पुणें २.

## संरक्षण — सुरक्षितता — सेवा

हेंच आमचें ध्येय.

# दि औंध म्युच्युअल

## लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बॅक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
'रामनिवास' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यांपासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

## विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

## अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख २२ सप्टेंबर, १९४३ | अंक ३८

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्केअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

**महापुरुषाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड

# भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची सर्वसाधारण वार्षिक सभा रविवार ता. २६-९-४३ रोजीं सकाळीं ९ वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा सन १९४२-४३ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व व्हाइस चेअरमन यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती वगैरे कामें केलीं जातील. डायरेक्टर्सच्या निवडणुकीबाबत मतें नोंदण्याची वेळ सकाळीं ९-३० ते १ अशी आहे, तरी सदर वेळीं सभासदांनीं येण्याचें करावें, अशी विनंति आहे.

म. वि. खंडकर

कऱ्हाड, ता. ११।९।४३ मॅनेजिंग डायरेक्टर.


# विविध माहिती

### पोस्ट ऑफिसांतील स्त्री-नोकर

ग्रेट ब्रिटनमध्यें पोस्ट ऑफिसांत अधिकाधिक स्त्रिया कामें करूं लागल्या आहेत. युद्धापूर्वी एकूण नोकरांपैकीं एक चतुर्थांश स्त्रिया होत्या; आतां ४४% नोकर स्त्रियाच आहेत. एकूण १,२८,००० स्त्री नोकरांपैकीं ९०,३०० हंगामी असून त्यांपैकीं२५,००० संपूर्ण वेळ काम करणाऱ्या नाहींत. युद्धापूर्वी तीन स्त्रिया पोस्टमनचें काम करीत होत्या; आतां १९,००० स्त्रिया टपाल वाटतात. टेलिफोनचीं यंत्रें तपासण्याचा व दुरुस्त करण्याचा ६ हजार स्त्रियांस परवाना आहे. टपालाच्या मोटारी हाकणें, तारा पोचविणें, इत्यादि कामेंहि स्त्रिया करूं लागल्या आहेत. नोकर वर्गांत स्त्रियांचें प्रमाण वाढलें, ह्याचा पोस्ट खात्याचे कार्यक्षमतेवर वाईट परिणाम झालेला नाहीं.

### वस्तऱ्यांचीं पातीं येणार

वस्तऱ्याच्या पातीं व छपाईचा कागद ह्यांची आयात आतां लवकरच वाढणार असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. लोकांना लागणाऱ्या मालाची आयात वाढवून निर्गत कमी करण्याचा हेतु, हिंदी चलनांतील वाढ मर्यादित करणें हा आहे.

### युद्धविषयक धोक्याच्या विम्याचा हप्ता

वॉररिस्क (गुड्स) इन्शुअरन्स ऑर्डिनन्सअन्वयें घेतलेल्या पॉलिसीवरील हप्त्याचा दर १ ऑक्टोबर, १९४३ पासूनच्या तिमाहींत दर शेकडा २ आणे, इतका राहील. म्हणजे ह्या हप्त्यांत ६ पैंची घट झाली आहे.

### "बदला" व्यवहारास बंदी

हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलेल्या नव्या डिफेन्स ऑफ इंडिया नियमानुसार, स्टॉक एक्सचेंजवर "बदला" व्यवहार करण्यास बंदी करण्यांत आली आहे. हा हुकूम २४ सप्टेंबरपासून अमलांत येईल.

### खर्चांत बचत

पतीः—बचत करण्याबाबत एवढा प्रचार चालला असतां आपणांस आपल्या खर्चांत काटकसर कशी करतां येत नाहीं!

पत्नीः—ह्याचें कारण आपले शेजारी. आम्हांला परवडत नाहीं अशा बाबींवर ते नेहमी खर्च करीत असतात!

### इंग्लंडमध्यें चिल्लर नाण्यांचा पुरवठा

युद्धपरिस्थितीमुळें इंग्लंडमध्येंहि हलक्या नाण्यांचा पुरवठा फार मोठ्या प्रमाणांत करावा लागत आहे असें प्रसिद्ध झालेल्या तद्विषयक माहितीवरून दिसतें. गेल्या वर्षी तेथें तीन पेनी किंमतीचीं दहा कोटि नाणीं टांकसाळींत पाडण्यांत आलीं. १९४१ मध्यें हा आकडा सव्वा कोटि व १९३९ मध्यें केवळ अर्ध कोटी होता. वरील दहा कोटि नाणीं पाडण्यांत सहाशे टन तांबें खर्च झालें, त्याची किंमत दीड कोटि रुपये भरली. १९४२ मध्यें ब्रिटिश टांकसाळींत ७ कोटि अर्धपेनी आणि पावणे तीन कोटि फार्दिंग पाडण्यांत आले. एवढ्या प्रमाणांत हीं नाणीं पूर्वी कधीच पाडलीं गेलीं नव्हतीं. १९४० सालापासून पेनीचीं नाणीं मुळींच पाडण्यांत आलेलीं नाहींत. तीन पेनी किंमतीचें एक नाणें पाडण्यास फक्त एक दशांश पेनी खर्च येतो.

### गरीब जनतेसाठीं कापड

गरीब जनतेच्या उपयोगासाठीं हिंदी गिरण्यांत कापड खास काढण्यांत येत आहे, तें १०९ विविध प्रकारांचें आहे. ह्या कापडाची देशाच्या सर्व भागांत प्रमाणशीर वाटणी व्हावी म्हणून विशिष्ट भागांतील गिरण्यांनीं ठराविक बाजारांस आपला माल पुरवावा अशी व्यवस्था केलेली आहे.

### सेंचरी थिएटर्स लि.

वरील नांवाची थिएटरचा धंदा करणारी २० हजार रुपये भांडवलाची खासगी लिमिटेड कंपनी श्री. न. रा. अभ्यंकर ह्यांनीं नोंदली आहे.

### नव्या शेड्यूल्ड बँका

बँक ऑफ जयपूर, नॅशनल बँक ऑफ लाहोर व नारंग बँक ऑफ इंडिया (लाहोर) ह्या तीन बँकांस शेड्यूल्ड बँकांचे यादींत स्थान मिळालें आहे.

### बँकिंगवरील निबंधास ५ हजार रुपयांचीं बक्षिसें

लाहोरच्या ट्रेडर्स बँक लि. नें "हिंदी जॉइंट स्टॉक बँकांच्या वाढीची योजना व हिंदी उद्योगधंद्यांच्या प्रगतीसाठीं बँका करूं शकणारें सहाय" ह्या विषयावर निबंध मागविले आहेत. सर्वोत्कृष्ट निबंधास ४ हजार रुपये व दुसऱ्या निबंधास १ हजार रुपये बक्षिस मिळणार आहे. १५ फेब्रुवारी १९४४ पूर्वी बँकेकडे निबंध पोचले पाहिजेत.

### यंत्रसामुग्रीच्या स्थलांतरावर नियंत्रण

कोणताहि कारखाना मोडण्यास अथवा कोणत्याहि कारखान्याच्या यंत्रसामुग्रीचें स्थलांतर करण्यास ह्यापुढें मध्यवर्ती सरकारची आगाऊ परवानगी घेतली पाहिजे. वहातुकीच्या साधनांवरील ताण कमी करणें व उत्पादनांत खंड पडूं न देणें, हे उद्देश वरील नव्या आर्डिनन्सचे मुळाशी आहेत, असा खुलासा करण्यांत आला आहे.

### सूर्याच्या प्रखर किरणांचा नवा उपयोग

सूर्याच्या प्रखर किरणांचा उपयोग आर्लिंग्टन (अमेरिका) येथील पेंटॅगॉन बिल्डिंग७७° फॅ. इतकी थंड ठेवण्याकडे करण्यांत येत आहे. ह्या इमारतीच्या वर बसविलेलीं फोटो इलेक्ट्रिक सेल्स इलेक्ट्रॉनिक रीलेज व कॉम्प्रेशन टॅंक्सचे द्वारा उष्णतामान कमी-अधिक होईल त्या मानानें पंखे फिरवून इमारत थंड राखतात.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २९८ | ५ कराड अर्बन को. बँक | ३०२ |
| २ हिंदुस्थानची युद्धविषयक कामगिरी ... | २९९ | ६ मिरज स्टेट बँक लि.... | ३०२ |
| ३ शत्रुव्याप्त प्रदेशांतील ब्रिटिश एक्सचेंज बँक ... | ३०० | ७ तैलचित्राचें अनावरण | ३०२ |
| ४ स्फुट विचार ... | ३०१ | ८ रद्दी कागदाचा पुनः कोरा कागद ... | ३०२ |
| विश्वविद्यालयांत लष्करी शिक्षण— मागसलेल्या वर्गांच्या शिक्षणाची प्रगति— सारस्वत को. बँक. | | ९ हिंदुस्थानांत रबराचें उत्पादन ... | ३०२ |
| | | १० विविध कार्यकारी सहकारी सोसायटी ... | ३०३ |


# अर्थ

बुधवार, ता. २२ सप्टेंबर, १९४३

## हिंदुस्थानची युद्धविषयक कामगिरी

### व्हायकौंट वेव्हल यांचें भाषण

लॉर्ड लिनलिथगो पुढील महिन्यांत हिंदुस्थानच्या राज्यकारभारापासून निवृत्त होतील आणि फील्डमार्शल व्हायकौंट वेव्हल त्यांच्या जागीं विराजमान होतील. नवे व्हाइसरॉय हिंदुस्थानास नवे नाहींत. सरसेनापति व व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद ह्या नात्यानें ह्या देशांतील परिस्थितीचा त्यांनीं चांगला प्रत्यक्ष अनुभव मिळवलेला आहे. आफ्रिकन रणांगणावर हिंदी सैनिकांनीं केलेला पराक्रम जगजाहीर झाला आहे आणि पश्चिम एशियाचें शत्रूपासून संरक्षण करण्याचें बरेंचसें श्रेय हिंदुस्थानास आहे. शत्रूची आफ्रिकेमधून हकालपट्टी होऊन सिसिलीचा पाडाव झाला आणि मित्र सैन्यांनीं दक्षिण इटलींत मोहिमा आरंभिल्या ह्या कारणानें हिंदुस्थानास जर्मनीच्या चढाईची भीति उरलेली नाहीं. तथापि, आतां जपानशी निकराचा सामना चालू व्हावयाचा असून त्यासाठी स्वतंत्र सेनापतीची नेमणूकहि झालेली आहे. ह्या पूर्वेकडील आघाडीवरील युद्धांत सहाय देण्याची कामगिरी हिंदुस्थानावरच पडली आहे. पश्चिमेकडील शत्रूशीं इटलीमध्यें व युरोपांत इतरत्र घनघोर संग्राम करून त्याचेवर विजय मिळवावा लागणार आहे ह्याची जाणीव मित्रराष्ट्रांस आहे आणि तिला अनुसरून त्यांची तयारी चालली आहे. ह्याचवेळीं पूर्वेकडे जपानशी दोन हात करून त्यास विश्रांति न मिळूं देण्याची त्यांची सिद्धता आहे. अमेरिकन काँग्रेसला पाठवलेल्या आपल्या संदेशांत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं ह्या गोष्टीचा उल्लेख केला आहे.

पूर्वेकडील आघाडीवर जपानशी होणाऱ्या ह्या सामन्याचा प्रत्यक्ष संबंध हिंदुस्थानशी येणें अपरिहार्य आहे. ह्या युद्धांतील हालचालीचीं सूत्रें हिंदुस्थानांतून हालणार आणि सामुग्रीचा वगैरे पुरवठा ह्या देशांतूनच करावा लागणार हें उघड आहे. त्या कामगिरीच्या जबाबदारीची माहिती व्हायकौंट वेव्हल ह्यांनीं पूर्णपणानें इंग्लंडमध्यें प्राप्त करून घेतली आहे यांत शंका नाहीं. नवीन युद्धप्रयत्नांत हिंदुस्थानचें कार्यक्षम सहाय व्हावें आणि त्याकरितां येथील आर्थिक व राजकीय प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटले जावे ह्याविषयींचा विचार त्यांनीं केला असला पाहिजे. ह्या दृष्टीनें व्हायकौंट वेव्हल यांनीं जाहीर रीतीनें काढलेल्या उद्गारांस विशेष महत्त्व आहे. गेल्या आठवड्यांत लंडनमध्यें केलेल्या आपल्या विस्तृत भाषणांत त्यांनीं हिंदी सैनिकांनीं आफ्रिकेंत केलेल्या पराक्रमाचा गौरवपूर्वक उल्लेख केला. नुसत्या इजिप्तचेंच नव्हे तर पॅलेस्टाइन, सीरिया, इराक व इराण ह्या देशांचें शत्रूपासून संरक्षण करण्यांत हिंदी सैनिकांनीं मित्रराष्ट्रांस ऋणी करून ठेवलें आहे व त्या ऋणाची त्यांस विस्मृति पडणार नाहीं असें ते म्हणाले. युद्धाच्या त्या प्रसंगीं हिंदुस्थाननें आपल्या फौजा व लढाऊ सामान हीं मोठ्या प्रमाणांत बाहेर पाठविलीं. रेल्वेचें सामान व येथील नद्यांत चालणाऱ्या नावा ह्यांचा त्या सामुग्रींत भरणा होता. ह्या साधनांची तूट आतां हिंदुस्थानांत तीव्रतेनें भासत आहे असें सांगून ह्या देशाच्या युद्धाप्रीत्यर्थ केलेल्या स्वार्थत्यागाची व्हायकौंट वेव्हल ह्यांनीं स्तुति केली. पुढें १९४१ सालाच्या अखेरीस एकाएकीं जपाननें युद्ध पुकारलें तेव्हां हिंदुस्थानास आपलें तोंड पश्चिमेकडून पूर्वेकडे अनपेक्षित रीतीनें वळवावें लागलें. ह्या नव्या शत्रूनें उत्पन्न केलेल्या संकटास तोंड देण्याचा प्रसंग हिंदुस्थानवर पूर्वतयारीच्या अभावीं आला. सिंगापूर आणि ब्रह्मदेश ह्यांच्या संरक्षणासाठी कच्च्या तयारीचीं सैन्यें व सामुग्री पाठवावी लागली. जपानशीं कराव्या लागणाऱ्या ह्या सामन्यांत हिंदुस्थानच्या रेलवेज आणि ह्या देशाची सबंद आर्थिक घटना ह्यांच्यावर फार मोठा ताण पडला. सैन्य व लढाऊ सामुग्री ह्यांचा अभावितपणानें जादा पुरवठा हिंदुस्थानास करावा लागला, त्याच्या आर्थिक परिणामाचा निर्देश व्हायकौंट वेव्हल ह्यांनीं स्थूलमानानें केला. "हा जो ताण पडला, त्याचे परिणाम हिंदुस्थानास अजूनहि सोसावे लागत आहेत. अशा स्थितींत ह्या देशावर आणखी बोजा लादण्याचे संबंधांत आपण विशेष खबरदारी बाळगली पाहिजे. असें आपण न केल्यास पायाच निखळून सबंध इमारत घसरावयाची भीति आहे." भावी व्हाइसरॉयांचें हें विधान अत्यंत महत्त्वाचें व अर्थपूर्ण आहे. जपानविरुद्ध व्हावयाच्या चढाईमुळें हिंदुस्थानांत वाहतुकीचीं साधनें, खाद्य पदार्थांचा व इतर आवश्यक जिनसांचा पुरवठा, चलन, इत्यादींवर जादा भार पडणार आहे ह्या गोष्टीचा उल्लेख ह्या उद्गारांत स्पष्ट असून महागाईसारख्या आपत्तींपासून देशाचें रक्षण करण्यास इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं सहाय करणें अगत्याचें आहे अशा आशयाचें विधान त्यांत ध्वनित केलें आहे. हिंदुस्थानांतील अवघड आर्थिक प्रश्नांचा स्पष्ट उल्लेख व्हायकौंट वेव्हल ह्यांच्या भाषणांत नाहीं. तथापि, युद्धामुळें येथें आर्थिक अडचणी उपस्थित झाल्या आहेत आणि ह्यापुढें होतील, ह्यांची जाणीव त्यांत प्रतीत होत आहे. मित्र राष्ट्रांच्या वतीनें व स्वतःसाठी हिंदुस्थान सरकारास जो अधिक खर्च करावा लागणार आहे त्या बाबतींत आणि धान्य वगैरे जरूरीच्या मालाचे पुरवठ्याचे संबंधांत अमेरिका व इंग्लंड ह्यांनीं पुरेसें सहाय देण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आहे. युद्धाचें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हिंदुस्थाननें स्वार्थत्याग केला आहे आणि पुढेंहि तो केला जाईल. पण ही कामगिरी ह्या देशाच्या हातून कार्यक्षम रीतीनें पार पाडली जाण्यास त्यास आर्थिक सहायाची जरूर आहे आणि जपानविरुद्ध व्हावयाच्या मोहिमांत हिंदुस्थानास विशेष महत्त्व प्राप्त होणार असल्यानें मित्रराष्ट्रांनीं त्याचा आर्थिक बोजा हलका केला पाहिजे असें व्हायकौंट वेव्हल ह्यांचें उघड सांगणें आहे. हिंदी लोकमताची हीच मागणी आहे आणि तिला भावी व्हाइसरॉयांच्या भाषणानें दुजोरा मिळाला आहे.

## शत्रु-व्याप्त प्रदेशांतील ब्रिटिश एक्सचेंज बँक

### युद्धोत्तर उज्वल भवितव्याबद्दल विश्वास

हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन ही एक ब्रिटिश एक्सचेंज बँक आहे. तिची मुख्य कचेरी हाँगकाँग येथें असून तिच्या पूर्व गोलार्धातील एकूण ३७ शाखांपैकीं ३३ शाखा जपाननें जिंकलेल्या प्रदेशांत आहेत. जपानशीं युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी, जरूर पडली तर बँकेची मुख्य कचेरी तात्पुरती सिंगापूर येथें नेण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. तथापि घडामोडी इतक्या त्वरेनें झाल्या, कीं मुख्य कचेरीचें स्थलांतर करणें अशक्य झालें. बँकेचे मुख्य मॅनेजर हाँगकाँग येथेंच अडकून पडले. ११ डिसेंबर, १९४१ रोजीं, ब्रिटिश सरकारच्या वसाहत मंत्र्यांच्या कचेरीनें हाँगकाँगच्या गव्हर्नराचा संदेश लंडन शाखेस पोंचविला, त्यांत बँकेची मुख्य कचेरी लंडन येथें न्यावी, असें सुचविलें व मि. मॉर्स ह्यांनीं चीफ मॅनेजरचें काम पहावें, अशी चीफ मॅनेजर, सर ग्रेव्हर्न ह्यांची इच्छा कळविली. १९ डिसेंबर, १९४१ रोजीं ब्रिटिश सरकारनें त्याप्रमाणें मि. मॉर्स ह्यांस योग्य ते अधिकार दिले व ह्या गोष्टीस कायदेशीरपणा प्राप्त करून देणारी ऑर्डर इन कौन्सिल १३ जानेवारी, १९४२ रोजीं मंजूर होऊन तिची अंमलबजावणी १९ डिसेंबर १९४१ रोजींच सुरू झाली असें मानण्याचें जाहीर झालें.

वास्तविक पहातां, ३१ डिसेंबर, १९४१ अखेरचे हिशेब भागीदारांस सादर करावयास हवे होते, परंतु तें अशक्य होतें. १९४२ अखेरचेच हिशेब पुरे करावे, असें बोर्डानें ठरविलें. बँकेच्या शाखा शत्रूच्या हातीं पडण्याच्या दिवशीं त्यांची असलेली परिस्थिति लक्षांत यावी, ह्यासाठीं कसून प्रयत्न करण्यांत आले, व त्यांत बँकेस थोडेंफार यशहि आलें. युद्ध-परिस्थितीमुळें बँकेची जिंदगी वसूल होण्याजोगी नाहीं, म्हणून ताळेबंदांत तिची फोड करून दाखविली नाहीं. शत्रूच्या प्रदेशांत सापडलेल्या बँकांचे हिशेब पौंडांत व्यक्त करण्यांतहि अनेक अडचणी येणें स्वाभाविक होतें. बँकेस झालेल्या नफ्या-तोट्याचा कांहींच अंदाज बांधता येत नसल्या कारणानें नफा-तोटा पत्रक तयार करण्यांत आलें नाहीं. सहाजीकच, डिव्हिडंडचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. बँकेच्या मार्फत चालणारा व्यापार आतां शत्रूच्या नियंत्रणाखालीं गेला आहे. चीनमध्यें मात्र बँकेला आशेचा किरण दिसतो. चीननें प्रबळ जपानला पांच वर्षे केलेल्या यशस्वी प्रतिकाराबद्दल कौतुक व्यक्त करून, संयुक्त राष्ट्रांच्या मदतीनें चीन जपानला बाहेर घालवील अशी बँकेच्या डायरक्टरांना आशा वाटत असल्याचें भागीदारांस पाठविलेल्या पत्रकांत अध्यक्ष म्हणतात. चीनी बंदरांतील खड्डे-खाणी भरून काढून पाश्चात्य राष्ट्रांनीं मोठमोठीं नव्या घर्तीचीं शहरें व बंदरें बांधलीं व तेथील वसाहतींच्या भरभराटीसाठी पाश्चात्य लोकांनीं आपली शक्ति व अनुभव हीं खर्च केलीं. ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं चीनमधील आपले खास हक्क सोडून दिले आहेत. ह्या सर्व गोष्टींचे उपकार चीन विसरणार नाहीं, असा विश्वास मि. मॉर्स ह्यांनीं व्यक्त केला आहे. शत्रूनें व्यापलेल्या इतर देशांना युद्ध-समाप्तीनंतर पुनर्रचनेसाठी पुष्कळच खर्च करावा लागेल, व त्यावेळीं बँकेस सेवा करण्यास पुनः संधी मिळेल, अशी त्यांनीं आशा प्रदर्शित केली.


**खारे काजू, मसालेदार काजू**

सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काळा खजूर, अंजीर वगैरे मिळतील.

द. ना. हेजीब

१० शुक्रवार, पुणें.



## निवेदन—

गेल्या अनंतचतुर्दशीला महायुद्ध सुरू होऊन चार वर्षे झालीं. चालू महायुद्धाची पहिली ठिणगी पडली तेव्हां तुम्हां-आम्हांला वाटलें होतें कीं, निदान हिंदुस्तानला तरी त्याची फारशी झळ बसणार नाहीं. परंतु आज चार वर्षांनीं कलकत्ता, विजापूर वगैरे भागांत सुरू असलेली विपन्नावस्था पाहून उद्यां आपल्या ताटांत काय वाढून ठेवलें आहे हा प्रश्न आपणांला भेडसावीत आहे. मुंबई, पुणें यासारख्या शहरांत सुरू असलेल्या अन्ननियंत्रण व्यवस्थेमुळें जरी स्थानिक नागरिकांचे हाल कमी झाले असले तरी पैसे देऊनसुद्धां सकस आणि पोटभर जेवण मिळत नाहीं ही तक्रार ऐकूं येतेच. याहि स्थितींत गेस्ट हाऊसनें पुण्यांत उतरणाऱ्या प्रवाश्यांची ही होणारी अडचण दूर करण्याची पराकाष्ठा केली आहे हें आपल्यास माहीतच आहे. परंतु त्याचें सर्व श्रेय "गेस्ट हाऊस" विषयीं सहानुभूति वाटणाऱ्या आपणालाच आहे. जेव्हां जेव्हां आपण पुण्यांत याल किंवा असाल तेव्हां तेव्हां "गेस्ट हाऊस" निरंतर आपल्या सेवेस रुजू आहे हें आपण विसरूं नये ही विनंति.

GUEST HOUSE POONA



## हातपाय चालतात तोंवर

म्हातारपणची तरतूद करणें अवश्य आहे. चांगल्या कंपनींत उतरलेला विमा हा ऐन वेळीं उपयोगी पडतो. या संबंधांत आपणांस कसलीहि माहिती पाहिजे असल्यास आम्हांकडे विचारा. आम्ही सर्व खुलासा करून योग्य मार्ग दाखवूं.

मॅनेजर,

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.**

सातारा शहर.

पुणें शाखा–१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.

## स्फुट विचार

### विश्वविद्यालयीन लष्करी शिक्षण

उच्च शिक्षण घेणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची लष्करी शिक्षणाची सोय नव्हती, ती प्रथम विश्वविद्यालयांस जोडलेल्या तुकड्यांत करण्यांत आली. आतां त्याच्यापुढें पाऊल टाकण्यांत आलें असून मुंबई विश्वविद्यालयाच्या विद्यमानें लष्करी शिक्षणाचें एक खातेंच चालू करण्यांत आलें आहे. भौतिकशास्त्रें, अर्थशास्त्र, यांच्या शिक्षणाचीं जशीं स्वतंत्र खातीं आहेत त्याच प्रकारचा हा नवीन उपक्रम आहे. ह्या खात्याचें औपचारिक उद्घाटन विश्वविद्यालयाचे चॅन्सेलर, सर जॉन कॉलव्हिल, ह्यांच्या हस्तें नौरोसजी वाडिया कॉलेजांत गेल्या शुक्रवारीं झालें. हिंदी सुशिक्षित तरुणांस लष्करी पेशा खुला होण्याचें महत्त्व सरकारच्या नजरेस कित्येक वर्षें आणण्यांत येत होतें. तथापि, त्याकामीं होणारी प्रगति अत्यंत मंद होती. हिंदी तरुणांस लष्करांत कमिशनें देण्याचें अगत्य युद्धपरिस्थितीमुळें सरकारास पटून लष्करी शिक्षणाची अधिक तजवीज करण्यांत आली. तथापि, इंग्लंडमधील विश्वविद्यालयांप्रमाणें लष्करी शिक्षणाची व लष्करी पदवी देण्याची सोय इकडे नव्हती. लष्करांतील अधिकाऱ्यांच्या जागांवर नेमणुकांची महत्वाकांक्षा हिंदी विद्यार्थ्यांस बाळगण्याचें व त्या बाबतींतली शैक्षणिक तयारी करण्याचें साधन त्यांस उपलब्ध नव्हतें. मुंबई विश्वविद्यालयानें ह्यासंबंधांत गेलीं कांहीं वर्षें चिकाटीनें प्रयत्न करून लष्करी शिक्षणासाठीं स्वतंत्र खातें निर्माण करण्याच्या आपल्या योजनेस लष्करी खात्याचा पाठिंबा मिळवला आणि दोन वर्षांच्या शिक्षणानंतर विद्यार्थ्यांस डिप्लोमा देतां येण्याची व्यवस्था तिनें आतां केली आहे. महाराष्ट्राची लष्करी परंपरा व तेथील विशेष सोयी ध्यानांत घेऊन विश्वविद्यालयानें आपली लष्करी शाखा पुणें येथें चालू केली आहे. मुंबई शहराचे बाहेर असा उपक्रम केल्याचें विश्वविद्यालयाचें हें पहिलेंच उदाहरण आहे. अंगांत नैसर्गिक पात्रता असूनहि सवलतींच्या अभावीं हिंदी तरुणांस उच्च लष्करी शिक्षण व पेशा न घेतां येणें हें केव्हांहि भूषणावह नव्हतें आणि ती केवळ नाइलाजाची गोष्ट होती. ह्या परिस्थितीची अनिष्टता चालू युद्धानें स्पष्ट निदर्शनास आणली आहे. लष्कर, आरमार व विमानदल ह्यांमध्यें सुशिक्षित तरुणांचा आतां भरणा करण्यांत येत आहे. तथापि, लष्करी पेशा विश्वविद्यालयीन शिक्षणाशीं निगडित करून तरुण पिढीस स्वदेशरक्षणाची संधि देणें व नवीन कामाची जोड करून देणें ह्या गोष्टींचें महत्त्व विशेष आहे. मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रस्तुत उपक्रमाचें पुढें पाऊल पडून त्याचा विकास होईल आणि लष्करी शिक्षणास अभ्यासक्रमांत योग्य मानाचें कायमचें स्थान मिळेल अशी आशा आहे.

### मागसलेल्या वर्गांच्या शिक्षणाची प्रगति

सामान्य जनतेच्या शिक्षणाच्या मानावर देशाची सर्वांगीण उन्नति अवलंबून रहाते ही गोष्ट लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें विद्येंत मागसलेल्या वर्गांच्या शिक्षणास खास उत्तेजन देण्याचे प्रयत्न चालविले आहेत. पुढारलेल्या वर्गांत शिक्षणाची पिढीजाद रूढी असते. ह्याच्या उलट प्रकार इतर वर्गांत आढळतो आणि त्याकरितां त्या वर्गांतल्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या व नादाऱ्या ह्यांविषयींची जादा सोय करावी लागते. मागसलेल्या वर्गांच्या विद्यार्थ्यांत अलीकडे शिक्षणाची प्रगति किती झाली आहे ह्याची माहिती मुंबई सरकारनें प्रसिद्ध केली आहे. १९३७–४२ ह्या पंचवार्षिक मुदतींत 'इंटरमीजिएट वर्गांतील' विद्यार्थ्यांची संख्या २ लक्ष ७८ हजारांनीं वाढून ८ लक्ष ८२ हजार झाली, म्हणजे ही वाढ ४६ टक्के झाली. 'बॅकवर्ड' वर्गांतली वाढ १ लक्षापासून २ लक्ष ४५ हजारांपर्यंत म्हणजे सुमारें ७० टक्क्यांनीं झाली. सर्वांत मोठी वाढ मराठा विद्यार्थ्यांमध्यें होऊन त्यांची संख्या १ लक्ष ९३ हजारांची २ लक्ष ८ हजार झाली. कुणबी, कोळी व इतर शेतकरी वर्गांच्या विद्यार्थ्यांची संख्या ४० टक्क्यांनीं वाढून २ लक्ष २१ हजारांची ३ लक्ष १२ हजार झाली. "इंटरमीजिएट" वर्गांच्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या व नादाऱ्या देण्यांत आल्या. कानरा, कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील मराठा विद्यार्थ्यांस सर्व शाळांतून मोफत शिक्षण दिलें जातें. सरकारी हायस्कुलांत तीस टक्के जागा इंटरमीजिएट विद्यार्थ्यांसाठीं राखून ठेवण्यांत येतात. सरकार आणि म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डस ह्यांच्या शाळांतील इंटरमीजिएट वर्गांच्या शिक्षकांची संख्या ३५ टक्क्यांनीं वाढून ९,७६१ ची ११,७६७ झाली. सरकारी पंचवार्षिक वृत्तांतांत निकृष्ट व भिल्ल जातींमध्यें शिक्षणाविषयीं उत्साह वाढत असल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. त्या वर्गांतील विद्यार्थ्यांस फीची माफी, शिष्यवृत्त्या इत्यादि प्रकारांच्या खास सवलती देण्यांत येत आहेत. अस्पृश्य-वर्गांच्या विद्यार्थ्यांची संख्या ८० हजारांपासून १ लक्ष १० हजारांपर्यंत वर गेली. त्या वर्गांच्या शिक्षकांची संख्या १ हजारांची १,६४३ झाली. 'गुन्हेगार' जातींच्या वसाहतींमध्यें मुलांच्या शिक्षणासाठीं दिवसाच्या व रात्रींच्या शाळा चालवण्यांत येत आहेत.

### सारस्वत को. बँक लि., मुंबई

वरील बँकेचा रौप्यमहोत्सव सर जनार्दनराव मदन ह्यांचे हस्तें १४ सप्टेंबर रोजीं साजरा झाला. १९४१–४२ च्या सरकारी आकड्यांप्रमाणें, मुंबई प्रांतांतील बिगर शेती क्रेडिट सोसायट्यांत बँकेचा सहावा अनुक्रम लागतो व विशिष्ट जातींच्या संस्थांत तिचा अनुक्रम दुसरा येतो ज्या सहकारी बँकांच्या भागांस २०% वाढाव्यानें मागणी आहे, अशा मोजक्या बँकांत तिची गणना होते. दर सभासदामागिल खेळतें भांडवल, दर सभासदामागिल ठेवी, खेळत्या भांडवलाशी खर्चाचें अल्प प्रमाण, कर्जाशीं थकबाकीचें अल्प प्रमाण, कर्जावरील व्याजाचा अल्प दर, ठेवींवरील व्याजाचा दर, ह्या प्रत्येक बाबतींत सारस्वत बँकेनें बिगर शेती संस्थांत उच्च स्थान मिळविलेलें आहे. बँकेची सर्वांगीण वाढ एकसारखी होत आलेली आहे. आज तिचे पटावर १,६९८ सभासद असून त्यांनीं १,२५,०७४ रुपयांचे भाग घेतलेले आहेत. बँकेच्या रिझर्व्ह व इतर फंडांत १ लाखापेक्षा जास्त रकम आहे. बँकेचें खेळतें भांडवल २६ लाखांवर गेलें आहे. बँकेची स्वतःची इमारत गिरगावांत असून इमारतीचें उत्पन्न बिल्डिंग फंडांत स्वतंत्रपणें टाकलें जातें. श्री. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम, हे १९२१ ते १९३० अखेर बँकेचे ऑनररी सेक्रेटरी होते व १० वर्षें ते बँकेचे चेअरमन आहेत. ह्यावरून, बँकेच्या यशास त्यांचें सहाय केवढ्या मोठ्या प्रमाणांत झालें असेल, ह्याची कल्पना येते. रौप्य महोत्सवाचे प्रसंगीं सर जनार्दनराव मदन, श्री. आर. जी. सराय्या, प्रो. वा. गो. काळे, दि. ब. काजी, इत्यादींनीं बँकेच्या अभिनंदनपर भाषणें केलीं व बँकेच्या चालकांच्या प्रगतिपर धोरणाबद्दल आनंद व्यक्त केला.

### कराड अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा २६–९–४३ )

वरील बँकेचें भाग भांडवल एका वर्षात सुमारें १६ हजारांनीं वाढून तें आतां ६५,३२० रुपये झालें आहे. रिझर्व्ह फंड २२ हजार रुपये आहे. ठेवींचा आकडा ५½ लाखांवरून ७¾ लाखांवर गेला आहे व येणें कर्ज २¾ लाखांवरून ५ लाखांवर गेलें आहे. थक बाकीचें प्रमाण ९% वरून उतरून तें २.८% वर आलें आहे. कराड सहकारी खरेदी विक्री सोसायटी लि. चें काम बँकेचे देखरेखीखालीं चांगलें चाललें आहे. अहवालाचे वर्षी ५ लक्ष रुपये किंमतीचा माल सोसायटीमार्फत विकला जाऊन तिला निवळ नफा १६७५ रुपये झाला. अवघ्या तीन वर्षांत सोसायटी " ड " वर्गांतून " अ " वर्गांत आली आहे. माल तारणावरील कर्जाचा व्यवहार वाढत आहे, त्याकरितां स्वतःचें गोडाऊन बांधण्यासाठीं बँकेनें लगतची मोकळी जागा विकत घेऊन ठेवली आहे. बँकेनें आपला व्यवहार चोख व प्रगतिपर असल्याचें दाखवून दिलें आहे, व ह्या दृष्टीनें तिला जॉइंट स्टॉक कंपन्यांना कच्च्या व पक्क्या मालाचे तारणावर रकमा देणेस परवानगी असावी, ह्या तिच्या सूचनेचा विचार केला जाणें अगत्याचें आहे. वर्षअखेर बँकेस १८३४९ रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस ७% डिव्हिडंड व १% ज्युबिली बोनस मिळेल. बँकेचा रौप्यमहोत्सव नुकताच थाटानें साजरा झाला त्यावेळीं सर्वांनीं तिच्या सुस्थितीबद्दल समाधान व्यक्त केलें आहे.

---

### मिरज स्टेट बँक लि., मिरज

( वार्षिक सभा : ३–१०–४३ )

वरील बँकेस ३० जून, १९४३ अखेरच्या वर्षी निवळ नफा १२, ४५५ रु. झाला. बँकेचे माजी मॅनेजर यांचेवरील दाव्यांतील तडजोड व लोन खात्यावरील कांहीं येणें लिहून टाकणें, ह्यांमुळें रिपोर्टाचे वर्षी बँकेस उत्कृष्ट नफा होऊनहि तो कमी दिसत आहे. बँकेकडे १९४०–४१ अखेर १७ ½ लाखांच्या ठेवी होत्या, त्यांची रक्कम आतां ३३ ½ लक्ष रुपये झाली आहे. बँकेचें वसूल भांडवल २० हजार रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड सुमारें १¾ लक्ष रुपयांचे आहेत. बँकेच्या पैशापैकीं ११¾ लक्ष रुपये रोख व इतर बँकांत असून ८ ½ लक्ष रुपयांचे रोखे आहेत. १५ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. बँकेची परिस्थिति अत्यंत भक्कम आहे, ह्यांत संशय नाहीं. भागीदारांस १४% डिव्हिडंड व ३% बोनस द्यावें, असें सुचविण्यांत आलें आहे.

---

### खानापूर तालुका को० सु० यु० लि० वांगी.

वरील युनियनची वार्षिक साधारण सभा सोमवार ता० २७।९।१९४३ रोजीं दुपारीं २ वाजतां वांगी येथें युनियनचे ऑफिसमध्यें सालाबादप्रमाणें युनियनचे वार्षिक कामाचा विचार करणेसाठीं भरणार आहे. तरी सदर सभेस आपण अगत्य येऊन आपले ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा द्यावा अशी विनंति आहे. मे. क. ता. १६।९।४३

एन्० जी० रोकडे.
सुपरवायझर.

आकाराम गणू पाटील.
चेअरमन्.

### श्री. नानासाहेब देशपांडे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण

कराड अर्बन को. बँकेच्या रौप्य महोत्सवाचे निमित्तानें बँकेच्या इमारतीचे दिवाणखान्यांत बँकेचे लोकप्रिय चेअरमन श्री. नानासाहेब देशपांडे यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ श्री. वैकुंठराय मेहता यांचे हस्तें झाला. रौप्य महोत्सवाकरिता आलेले सर्व सन्मान्य पाहुणे उत्साहानें हजर होते. प्रथम रौप्य महोत्सवाचे चेअरमन श्री. फणसळकर वकील यांनीं श्री. नानासाहेब यांचें तैलचित्र बँकेंत लावण्याचें महत्त्व श्री. नानासाहेब यांचे चरित्राचें व कामगिरीचें सिंहावलोकन करून विशद केलें. त्यानंतर श्री. मेहतांनीं तैलचित्राचें अनावरण टाळ्यांचे गजरांत केल्यावर श्री नानासाहेबांच्या यशालोचनात्मक अशी श्री. बाळासाहेब पाटक, रावसाहेब कल्याणी, श्री. भयाशास्त्री वाटवे, श्री. राघुअण्णा घोपाटे व श्री. बाबुराव गोखले यांचीं भाषणें झालीं. श्री. वैकुंठराय मेहतांनीं चित्रकार श्री. नाथ काळे यांना बँकेतर्फे अत्तरदाणी व गुलाबदाणीचा आहेर करून श्री. नानासाहेबांसारख्या विविध क्षेत्रांत कामगिरी करणाऱ्या चारित्र्यवान माणसामुळें सहकारी प्रणालीला कसें महत्त्व प्राप्त झालें आहे हें आपल्या पंधरा वर्षांच्या अनुभवावरून सांगितलें. नंतर श्री. नानासाहेबांनीं जनतेसंबंधीं कृतज्ञता व्यक्त केल्यावर श्री. बाबुराव गोगटे यांनीं आभार मानले आणि समारंभाचा शेवट पाहुण्यांना अल्पोपाहार देण्यांत येऊन आनंदी आनंदांत झाला.

---

### रद्दी कागदाचा पुनः कागद करण्याकडे उपयोग

सर्व सरकारी कचेऱ्या, शाळा, कॉलेजें, इस्पितळें, इत्यादींतील रद्दी कागद, मुंबई प्रांतांतील कागदाच्या गिरण्यांस त्याचा पुनः कागद बनविण्यासाठीं विकण्यांत आला पाहिजे, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. पुणें येथील डेक्कन पेपर मिल व अहमदाबाद येथील गुजरात पेपर मिल ह्या कागदांच्या गिरण्यांचीं नांवें सांगून, त्यांस कोणत्या दरानें रद्दी कागद विकावयाचा तेंहि सरकारनें स्पष्ट केलें आहे. खाजगी शिक्षणसंस्था, म्युनिसिपॅलिटयांच्या, लोकलबोर्डें, बिनसरकारी इस्पितळें, मुंबई विश्वविद्यालय, खाजगी संस्था व कचेऱ्या ह्या सर्वांनीं अशाच प्रकारें रद्दी कागदाची व्यवस्था लावावी असें सरकारनें सुचविलें असून ही सूचना पाळली न गेल्यास त्यांस पुढें व्हावयाच्या कागदाच्या पुरवठ्यावर त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे, असा इशारा दिला आहे.

---

### हिंदुस्थानांत रबराचें मोठें उत्पादन शक्य आहे:

क्रिप्टोस्टेजिया ग्रँडिफ्लोरा नांवाची एक वनस्पति हिंदुस्थानांत सर्वत्र आढळते व तिचेपासून रबर मिळू शकेल. ह्या संबंधांत इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें मोठ्या प्रमाणावर प्रयोग चालू केले आहेत. वरील वनस्पतीचें हिंदुस्थानांत अस्तित्व असल्याची माहिती कित्येक वर्षे असली, तरी मलाया व नेदरलंडसमधील रबराचा पुरवठा बंद पडल्यानंतरच त्या वनस्पतीकडे विशेष लक्ष पुरविण्यास प्रारंभ झाला. क्रिप्टोस्टेजिया ग्रँडिफ्लोरा ही वनस्पति हिंदुस्थानाच्या सर्व विभागांत, निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींत, हवामानांत व पाऊसपाण्यांत वाढते. पुण्याच्या आसपासहि ती सापडते. तिचें रबर गोळा केल्यास दर एकरीं २०० रुपये किंमत येऊं शकेल. हिंदुस्थानांत ह्या वनस्पतीची मोठ्या प्रमाणावर लागवड केल्यास, सध्याचें रबराचें उत्पादन दसपट सहज वाढेल, अशी अपेक्षा आहे.

## विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड, उंब्रज आणि तालुका प्रात्यक्षिक केंद्र, उंब्रज ह्यांचें कार्य

(१) विविध कार्यकारी सहकारी सोसायटी उंब्रजः—ह्या संस्थेकडून शेतकऱ्यांना शेती सुधारणा खत व बीं बियाणें ह्या करितां माफक व्याजाचे दरानें कर्जे दिलीं जातात. मेंबरांना १५० रु. चें बीं बियाणें पुरविलें व २६०० रु. पर्यंत कर्जे दिलीं व मालाची विक्रीकरून दिली. माल तारणावर ५०० रु. पर्यंत कर्जे दिलीं. प्रसंगीं लागणारा मालहि पुरविला जातो; मालाचें तारणावर कर्जे दिली जातात. शेतकऱ्यांनीं पिकविलेला माल व ग्रामीण धंद्यांचा माल ह्यांचीं विक्री व्यवस्थितीत व चोख रीतीनें करून दिली जाते. मि. लांडगे बी. आर., सोसायटीचे उत्साही सेक्रेटरी, हे संस्थेचें काम उत्तम रीतीनें करीत असून ५ मैलांचें क्षेत्रांत प्रचार कार्य करीत आहेत.

(२) तालुका प्रात्यक्षिक केंद्र, उंब्रजः—हें शेतकी खात्यामार्फत चालविण्यांत आलें आहे. येथील शेती सुधारणाप्रिय शेतकरी श्री. यशवंतराव जाधव यांची जमीन प्रयोगाकरितां घेतली आहे. श्री. धोंडीबा दौलतराव ढुबल हे फार कष्टाळू वाटेकरी असून फार्म वरील पिकांची फार उत्तम व्यवस्था ठेवतात.

केंद्राचे फील्ड कामगार मि. एम्. बी. काळे हे फार्मवर देखरेख ठेऊन उंब्रजच्या आसपासचे ५ मैलांचे क्षेत्रांत सुधारलेली 'शेती पद्धती' व 'जास्त धान्य पिकवा' प्रचार कार्य व्याख्यान व पोवाडे ह्यांचें द्वारा करतात.

खालील सुधारणा सुचविण्यांत आल्या आहेतः—

(१) सुधारलेल्या पद्धतीनें बांध व ताली घरून, पाला पाचोळ्याचें खत व गांव खताची दुर्मिळता असलेमुळें तागाचें पीक जमीनींत गाडून जमीनीचा कस वाढविणें.

(२) सुधारलेली व ज्यास्त उत्पन्न देणारें–बीं बियाणें—

(३) पिकांना भुइमुगाची पेंढ घालून उत्पन्न वाढविणें.

(४) पिकें व फळझाडें ह्या वरील कीड व रोगराई ह्यावर वेळींच उपाय करणें.

(५) पुंड्यापेक्षां जास्त उत्पन्न देणाऱ्या उसाच्या सुधारलेल्या जाती–इ. के. २८ व सी. ओ. ४१९ ह्यांची लागवण जास्त प्रमाणांत करणें. उत्पन्नांत सरस ठरल्यामुळें प्रत्येक शेतकऱ्यानें त्या जातींची लागण केली आहे. ७५ हजार बेणें जास्त लावलें आहे.

मि. बी. आर. लांडगे व मि. एम्. बी. काळे हे दोघेही इंग्रजी जाणणारे तसेंच रूरल असिस्टंटस ट्रेनिंग सेंटर मांजरी फार्म येथील कोर्स घेतलेले आहेत. त्यामुळें त्यांना दोन्हीही खात्यांची परिपूर्ण माहिती आहे. त्यामुळें ते दोघेही एकमेकांना साह्य करून काम उत्साहानें करितात.

वरील दोन्ही संस्थांचा फायदा शेतकऱ्यांनीं जरूर करून घ्यावा.

---

### श्रीमंत प्रतापसिंह वाचनालय, तेरदळ

वरील संस्थेचा सुवर्णमहोत्सव समारंभ रविवार, ता. २६ रोजीं श्री. अप्पासाहेब देसाई हनगंडीकर ह्यांचे अध्यक्षतेखालीं साजरा होणार आहे. त्या प्रसंगीं कै. श्रीमंत प्रतापसिंह महाराज ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण श्री. ए. मो. जोशी, डि. ज. सांगली, ह्यांचे हस्तें होणार आहे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

# दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस्‌
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बॅंक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
' रामनिवास ' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्रूकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ मांचुडां घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांचुडां, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

| जाहिरातींचे दर. | अर्थ | वर्गणीचे दर. |
|---|---|---|
| खालील पत्त्यावर चौकशी करावी. व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४. | | वार्षिक वर्गणी रु. ४ ( टपाल हंशील माफ ) किरकोळ अंकास दोन आणे. |

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख २९ सप्टेंबर, १९४३ अंक ३९

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

## महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### "ए. आय. एम. ओ" चें मुखपत्र

आपल्या समासदांस संस्थेच्या कार्याची वक्तशीर माहिती मिळावी ह्यासाठीं ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशननें एक मासिक पत्रक काढण्यास प्रारंभ केला आहे. त्यांत उद्योग-धंद्याविषयीं हकीकत देण्यांत येईल. ह्या पत्रकाचा विस्तार करून त्याचा प्रसार करण्याचा ए. आय. एम. ओ. चा विचार आहे. "इंडस्ट्रिअल कॅनडा" अथवा "ऑस्ट्रेलेशिअन मॅन्युफॅक्चरर" ह्यांच्या धर्तीवर पुढें मासिक काढण्याचीहि त्याची मनीषा आहे.

### अमेरिकेचें रबराचें उत्पादन

अमेरिकन कारखान्यांत आतां दरसाल ४,३५,००० टन कृत्रिम रबर तयार होऊं लागलें आहे. लवकरच हा आकडा ८,००,००० टनापर्यंत जाईल. लष्करी कामासाठी रबराचा तुटवडा भासण्याची भीति आतां बिलकूल उरलेली नाहीं.

### भाज्यांची विक्री सरकार करणार

सरकारी देखरेखीखाली सुरत जिल्ह्यांत बराच भाजीपाला लावण्यांत आला आहे, तो मुंबईस आणून विकण्याचा प्रयोग मुंबई सरकारनें सोमवार ता. २७ पासून सुरू केला आहे. ३६ निवडक सरकारी धान्याच्या दुकानांत दररोज सकाळीं ७-३० वाजतां भाजीच्या विक्रीस प्रारंभ होईल.

### दुधाचा पुरवठा वाढविण्याचा प्रयत्न

मुंबई उपनगर व ठाणें ह्या जिल्ह्यांत दुधाचें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करून व खेडा जिल्ह्यांतील उत्पादन सुधारून मुंबई शहरास जास्त दूध उपलब्ध करून देण्याचे खास कामगिरीसाठी मुंबई सरकारनें डेअरी फार्मिंगकरितां एका डेप्युटि डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरची जागा, प्रारंभीं सहा महिन्यांपुरती, निर्माण केली आहे व तिचेवर श्री. बी. एस. पटेल ह्यांची नेमणूक केली आहे.

### हिंदुस्थान सरकारचा वाढता खर्च

हिंदुस्थान सरकारनें एप्रिल ते जुलै, १९४० ह्या चार महिन्यांचे मुदतींत उत्पन्नापेक्षा ३६$\frac{1}{3}$ कोटि रुपये ज्यास्त खर्च केला. लष्करी बाबींवरील खर्च ६५$\frac{1}{2}$ कोटि रुपये भरला. ह्या चार महिन्यांत सरकारी कर्जाचा बोजा ४९$\frac{3}{4}$ कोटि रुपयांनीं वाढला.

### ट्रेझरी बिलांवर १३ आ. ५ पै. व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १३ आ. ५ पै इतका पडला.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १७ सप्टेंबर, १९४३ अखेरच्या आठवड्यांत ३९ कोटि, ७६ लक्ष रुपये किंमतीच्या १,४९,४५१ चेक्सची देवघेव झाली.

### २०% पेक्षां ज्यास्त नफा बेकायदा ?

धान्याखेरीज बाकीच्या जिनसांवर २०% अधिक नफा घेणें बेकायदा ठरविणारा एक ऑर्डिनन्स सरकार काढणार आहे असें समजतें. धान्याची किंमत मर्यादेंत राखण्याचे अधिकार सरकारास आहेतच.

### प्रांतिक सरकारांचीं नवीं कर्जें

मुंबई, मद्रास, पंजाब व मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांताच्या सरकारांनीं ता. १४ रोजीं आपलीं कर्जे विक्रीस काढलीं. मध्यप्रांत सरकारच्या कर्जाची विक्री १० वाजून १० मिनिटांनीं बंद झाली. पंजाब सरकारचें कर्ज दिवसभर विकलें गेलें. मुंबई व मद्रास सरकारांच्या कर्जास लोकांकडून पुरेशी मागणी न आल्यामुळें अंडररायटर्संना बाकी कर्ज विकावें लागलें.

### देवकरण नानजी बँकेच्या पुणें येथील शाखा

देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि. च्या पुणें येथील दोन्ही शाखा शुक्रवार ता. ८ ऑक्टोबर रोजीं सुरू होतील.

### दिवाळीला साखर जास्त द्या

मुंबई सरकारनें साखरेचें रेशन येत्या दोन महिन्यांत वाढवावें अशी सूचना श्री. एम. पी. गांधी ह्यांनीं केली आहे. साखरेचें चालू वर्षीतील समाधानकारक उत्पादन, गुळाचे उत्पादनावरील नियंत्रण, इत्यादिमुळें साखरेबाबत परिस्थिति समाधानकारक आहे. तेव्हां, दिवाळी व इतर सण ह्या प्रसंगीं लोकांना अधिक साखर मिळाली, तर बरें होईल असें श्री. गांधी ह्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांत साखरेचा दर माणशीं वार्षिक सरासरी खप ३ शेर आहे, मुंबई प्रांतांत प्रत्येक मनुष्यास दरसाल सरासरीनें ८$\frac{3}{4}$ शेर साखर लागते.

### अमेरिकेंतील रेशन बुक

अमेरिकेंत सध्या चालू असलेल्या रेशन बुकांत चार महिन्यांच्या फुल्यांस जागा आहे. नोव्हेंबर १९४३ पासून तेथें नवीन रेशन बुकें देण्यांत येतील, तीं दोन वर्षेपर्यंत पुरतील.

### सिलोनमधील मजुरांच्या मजुरीचा प्रश्न

सिलोनमधील रबराच्या मळ्यांतील हिंदी मजुरांस किमान वेतन द्यावयाच्या ऐवजी ते जेवढें रबर गोळा करतील त्या प्रमाणांत मजुरी देण्याची योजना सिलोन सरकारनें सुरू केली आहे, तिचे विरुद्ध हिंदुस्थान सरकारनें तक्रार केली आहे. प्रत्येक मजुरास किमान निश्चित मजुरी मिळालीच पाहिजे, अशा अर्थाचा हिंदी व सिलोनी सरकारचा करार झालेला आहे, त्याचा ह्या सिलोनी योजनेमुळें भंग होत आहे.

### स्टँडर्ड क्लॉथ

स्टँडर्ड क्लॉथ आतां १०९ प्रकारचें निघूं लागलें आहे. प्रारंभीं फक्त ३५ प्रकारचेंच कापड निघत असे. वेगवेगळ्या विभागांच्या भिन्न भिन्न रुचीस अनुसरून कापडाच्या तऱ्हा वाढवाव्या लागल्या.

### ब्रह्मदेशांत कपाशीच्या लागवडीचा प्रयत्न

जपानमध्यें कपाशीची आयात बंद पडल्यामुळें, त्यानें आपल्या अंकित देशांत कपाशीची लागवड करण्यास प्रारंभ केला. ब्रह्मदेशांतील लागवडीचा प्रयत्न अपेक्षेप्रमाणें यशस्वी झालेला नाहीं. हिंदुस्थानांत कपाशी ऐवजीं धान्य पेरण्याचा उपदेश केला जात आहे; ब्रह्मदेशांत तांदुळाच्या ऐवजीं कपास लावण्याची खटपट चालू आहे.

### सिराथ-इ-जुडी

हैद्राबाद संस्थानांतील कृष्णा नदीवरील नव्या पुलाचें हें नांव आहे. हा पुरा करण्यास १,००५ दिवस लागले व ११ लक्ष, २८ हजार रुपये खर्च आला. पुलाखालून वहाणाऱ्या पाण्याचे प्रवाहाच्या दृष्टीनें विचार करतां, हा पूल अगदीं कमी खर्चांत झाला, असें म्हटलें पाहिजे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३०६ | शोधन केंद्राचे यशस्वी प्रयोग. | |
| २ अन्नसमितीच्या शिफारसी ... | ३०७ | ६ श्री. सरैय्या ह्यांचें भाषण | ३१० |
| ३ समाईक शेतीची आवश्यकता ... | ३०८ | ७ सुप्रीम म्यु. कंपनी ... | ३१० |
| ४ सहकारी पेढ्यांपुढील प्रश्न | ३०८ | ८ मुंबई प्रां. सहकारी बँक | ३१० |
| ५ स्फुट विचार ... | ३०९ | ९ शेअर बाजार ... | ३११ |
| ब्रिटिश सहकारी मालविक्रीच्या संस्था—सहकारी खरेदीविक्रीचे हिंदुस्थानांतील प्रयत्न—कागद सं- | | १० "सराफी म्हणजे बँकिंग नव्हे" ... | ३११ |
| | | ११ सहकारी पशुसंवर्धन... | ३१२ |
| | | १२ सोलापूर बँकेचा रौप्यमहोत्सव ... | ३१२ |

अर्थ

बुधवार, ता. २९ सप्टेंबर, १९४३

## अन्न समितीच्या शिफारसी

खाण्याच्या धान्यांचा तुटवडा, त्यांची दुर्मिळता व महागाई ह्यांचे संबंधांत हिंदुस्थानांत चोहोंकडे ओरड चालली आहे आणि त्या बाबतींत सरकारचें कांहीं निश्चित व कार्यक्षम धोरण आहे कीं नाहीं असा प्रश्न विचारण्यांत येत आहे. आतांपर्यंतच्या मध्यवर्ती सरकारच्या अन्न पुरवठ्याविषयींच्या योजना धरसोडीच्या असल्याबद्दल टीकाहि झाली आहे. त्या सरकारनें आपले आर्थिक सल्लागार सर थिओडोर ग्रेगरी ह्यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमून तिनें अन्न पुरवठ्याच्या प्रश्नांचा व्यापक दृष्टीनें विचार करून त्याचे संबंधांत विधायक सूचना कराव्या असें ठरवलें होतें. त्याप्रमाणें आतां ह्या समितीनें आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. हिंदुस्थान सरकार तिच्या कोणत्या सूचना स्वीकारतें आणि अमलांत आणतें हें लवकरच कळून येईल. समितीच्या मुख्य सूचना स्थूल मानानें खाली दिल्याप्रमाणें आहेत. हिंदुस्थानांतील धान्यांचा पुरवठा वाढेल ह्या प्रकारचा हिंदी आयात–निर्गत व्यवहार असावा म्हणजे युद्ध चालू राहील तो पावेतो ह्या देशांत निर्गतीपेक्षा आयातच अधिक व्हावी असें समितीचें म्हणणें आहे. तिनें दुसरी अशी सूचना केली आहे कीं मध्यवर्ती सरकारानें धान्यांचा स्वतंत्र असा साठा स्वतःच्या नियंत्रणाखाली राखावा, म्हणजे त्याचा उपयोग जरूरीच्या वेळीं व जागीं जादा पुरवठा करण्यांत व बाजारभावांचें नियमन करण्यांत होऊं शकेल. धान्यें पिकवणारांच्या हातून तो माल बाजारांत येण्यासाठी शेतकऱ्यांस लागणाऱ्या जिनसांचा पुरवठा होईल आणि त्यांच्या मोबदल्यांत धान्य मिळूं शकेल अशी व्यवस्था सरकारनें करावी. ही समितीची तिसरी सूचना आहे. खेडेगांवांतून धान्यांचे लहान-मोठे साठे असूनहि तो माल विक्रीसाठी बाहेर येत नाहीं ह्या तक्रारीस तोड ह्या नात्यानें समितीनें केलेली ही शिफारस आहे. ह्या सूचनेस तिनें इतकें महत्त्व दिलें आहे कीं लढाऊ सामुग्रीच्या पुरवठ्यास अगत्याचें स्वरूप आहे त्याच्या खालोखाल शेतकऱ्यांस पुरवावयाच्या जिनसांची गणती व्हावी असें तिचें सरकारास सांगणें आहे. ह्या जिनसांच्या पुरवठ्यांत आवश्यक ती वाढ करणें अशक्य झाल्यास सरकारनें चांदी-सोनें पैदा करून तें शेतकऱ्यांस विकावें व त्याच्या मोबदल्यांत धान्य बाजारांत येईल असें करावें असेंहि समितीनें सुचवलें आहे. तिची अखेरची शिफारस अशी आहे कीं सर्व शहरांतून शिधापद्धति अंमलांत आणली जावी आणि प्रत्येक प्रौढ इसमास दररोज एक पौंड धान्य मिळेल अशी तरतूद करण्यांत यावी. इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांत धान्यांच्या ऐवजीं किंवा जोडीस दुसरें अन्न लोकांस उपयोगांत आणणें शक्य नसल्यानें आपण वरील शिधा सुचवला आहे असें समितीनें म्हटलें आहे. सर्व प्रांतांत आणि संस्थानांत प्रमुख धान्यांच्या किंमतींचें कायदेशीर नियंत्रण व्हावें असा अभिप्रायहि तिनें बहुमतानें व्यक्त केला आहे.

हीं तत्त्वें अंमलांत येण्यासाठी कार्यक्षम अशी कार्यकर्ती व्यवस्था हवी. तिचेविषयीं समितीचें असें मत आहे कीं अन्नखात्याचे ऐवजी एक बोर्ड स्थापन करण्यांत यावें म्हणजे अन्न पुरवठ्याशी संबंध असलेल्या सरकारांचा, गटांचा वगैरे त्यांत समावेश होऊन एकविचारी व एकजिनसी धोरण अंमलांत येऊं शकेल. धोरणाच्या बाबतींत आज जो गोंधळ माजला आहे तो दूर करण्यासाठी हा उपाय आहे. सहा सभासदांचें एक सल्लागार मंडळ नेमण्यांत यावें व त्यांत प्रातिनिधिक धंदेवाल्यांचा समावेश व्हावा आणि वेळोवेळ त्यांचा सल्ला घेण्यांत यावा अशी समितीची शिफारस आहे. अन्नपुरवठ्याच्या पद्धतीची सर्वांस माहिती व्हावी एवढ्यासाठी एक माहिती पुस्तक प्रसिद्ध केलें जावें असेंहि तिनें म्हटलें आहे. मध्यवर्ती सरकार व प्रांतांचीं सरकारें ह्यांच्या अधिकारांच्या मर्यादांचे बाबतींत अलीकडे बरीच चर्चा झाली आहे. प्रांतिक सरकारांवर स्वतःचें धोरण लादण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारास आहे किंवा नाहीं ह्याबद्दल शंका प्रदर्शित करण्यांत आली आहे. प्रांतांच्या कारभारांत मध्यवर्ती सरकारानें हात घालूं नये हें मत जनतेस पटण्यासारखें नाहीं असें म्हणून समितीनें असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, हिंदुस्थान सरकारावर अन्न पुरवठ्याचे संबंधांत पडणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडतां येतील अशा बेताचे अधिकार त्यास असणें आवश्यक आहे. धान्यांच्या किंमती निश्चित करणें, त्यांच्या पुरवठ्याची वाटणी करणें, धान्याचा स्वतंत्र साठा बाळगणें, निकडीच्या प्रसंगीं देशाच्या निरनिराळ्या भागांस सहाय देणें इत्यादि बाबतींत मध्यवर्ती सरकारचा निर्णय अखेरचा असला पाहिजे असें समितीचें म्हणणें आहे. सारांशतः तिच्या पाच शिफारसी एणेंप्रमाणें आहेत. (१) धान्यांच्या उपलब्ध पुरवठ्यांत वाढ, (२) देशांत उत्पन्न होणारें धान्य बाहेर येऊन त्याची बाजारांत विक्री होईल अशी व्यवस्था कार्यक्षम रीतीनें करणें, (३) धान्यांची पद्धतशीर वाटणी—ह्यांत शिधा पद्धतीचा समावेश होतो, (४) किंमतींच्या वाढीवर नियंत्रण, आणि अखेरीस (५) धान्य पुरवठ्याच्या व्यवस्थेचा कारभार अधिक कार्यक्षम करणें. मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांच्या कारभारांत एकसूत्रीपणा आणणें, धान्यांची निर्गत बंद करणें, त्यांची आयात वाढवणें, त्यांच्या पुरवठ्याची योग्य वाटणी करणें आणि त्यांच्या किंमती चढूं न देणें ह्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आहेत आणि त्यांचेवर समितीनें जोर दिला आहे हें समाधानकारक आहे.

## समाईक शेतीची आवश्यकता

### पिंपरद येथील उपक्रम

फलटण येथील श्री लक्ष्मी सें. को. बँकेच्या गेल्या वार्षिक साधारण सभेंत फलटणचे ग्रामसुधारणा अधिकारी, श्री. रा. शं. बापट, एल. सी. ई., ह्यांनीं भाषण करून समाईक शेतीची आवश्यकता ह्या विषयासंबंधीं मौजे पिंपरद येथील समाईक शेतीच्या प्रयोगाचा अनुभव सांगितला व लिहिणें, वाचणें आणि हिशेब ठेवणें ह्यांचें महत्त्व शेतीच्या धंद्यांत किती आहे, हें विशद करून सांगितलें. बँकेचे अध्यक्ष, श्री. भा. ल. लिखिते, एम्. ए., एलएल. बी., अर्थमंत्री, सं. फलटण, ह्यांनींहि "दसकी लकडी एकका बोजा" ह्या म्हणीचें रहस्य आपल्या भाषणांत पटवून देऊन, एकोप्यानें व गटानें शेती करण्याचा उपदेश केला. हीं दोन्हीं भाषणें बँकेचें प्रचारपत्रक नं. १ म्हणून आतां प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं त्यास प्रस्तावना लिहिली आहे, त्यांत ते म्हणतात:— "समाईक शेतीचें स्वरूप, महत्त्व व व्यावहारिक उपयोग यांचें विवेचन श्री. बापट व श्री. लिखिते ह्या दोघांनींहि आपल्या भाषणांत सोप्या भाषेंत व मुद्देसूद रीतीनें केलें आहे. कोणताहि उद्योग किंवा धंदा करणारास तो फायदेशीर व्हावयाचा असेल तर तो विशिष्ट किमान आकाराचा असावा लागतो. लहान प्रमाणावर चालणाऱ्या धंद्यांत कार्यक्षमता व मोठ्या प्रमाणावरील उत्पादकता उत्पन्न होत नाहीं. शेतीच्या मालास येणाऱ्या बाजारभावाच्या मानानें पिकाचा खर्च बेताचा राहील किंवा शेतीचें उत्पन्न वाढून व्यवहारांत चांगला फायदा उरेल अशा रीतीनें हा धंदा होण्यास शेतीचे लहानलहान तुकडे व मर्यादित भांडवल यांचा उपयोग व्हावयाचा नाहीं. परंतु दहावीस लोकांनीं एकत्र शेती केल्यास हाच धंदा फायदेशीर होऊं शकेल यांत शंका नाहीं."

श्री. बापट ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें, शेतीस खालील गोष्टींची आवश्यकता आहे:—

(१) निरनिराळीं पिकें काढण्याचे अनुभविक व उत्तम शास्त्रीय ज्ञान;

(२) शेतीचीं औतें व यांत्रिक साधनें;

(३) शेतीसाठीं लागणारें भांडवल, आणि

(४) उत्पन्न केलेला माल किफायतशीर रीतीनें विकण्याची व्यवस्था.

हिंदी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठी सहकारी चळवळ सुरू करण्यांत आली, तीमध्यें शेतकऱ्यांस बेताच्या व्याजानें कर्जे मिळण्याची सोय झाली तरी मालाचें उत्पादन, खरेदी विक्री, इत्यादि शेतीच्या महत्त्वाच्या अंगांकडे लक्ष दिलें गेलें नाहीं. मल्टि पर्पज, बेटर लिव्हिंग इत्यादि सोसायट्या व संघ काढून हा दोष दूर करण्याचे प्रयत्न आतां सुरू करण्यांत आले आहेत. सर्वांगीण ग्रामसुधारणेचें महत्त्व सर्वांस पटलें आहे आणि त्याबाबत योजना हातीं घेतल्या जात आहेत. पिंपरद येथील संयुक्त शेतीचा उपक्रम ह्या दृष्टीनें उपयुक्त व मार्गप्रवर्तक आहे, आणि शेतकऱ्यांचें त्याच्या यशस्वितेकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे.

## सहकारी पतपेढ्यांपुढील प्रश्न

(लेः—रावसाहेब वाय. डी. खोले, एल्. एम्. जी. डी.)

महायुद्ध सुरू होऊन चार वर्षांचा काळ लोटला. या अवधींतील पहिलीं कांहीं वर्षे नित्योपयोगी वस्तूंबाबत फारशीं काळजीचीं गेलीं नाहींत, परंतु अलीकडे गेल्या वर्षापासून शेतकऱ्यांच्या मालास भाव येऊन परिस्थितींत बदल झाला. चलनवृद्धीमुळें व युद्धोपयोगी सरकारी कामें निघाल्यामुळें बँकांच्या व्यवहारांतहि वाढ झाली. व्याजाचे दर कमी करूनही ठेवींमध्यें झपाट्यानें वाढ झाली. याचे उलट प्रकार कर्जे देण्याबाबत झाला. जुन्या कर्जांची वसुली झाली. परंतु त्या प्रमाणांत नवीन कर्ज मागणी येईनाशी झाली. युद्धजन्य परिस्थितीचा फायदा बाजारभाव वाढल्यानें शेतकऱ्यांस मिळाला व त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारून ते कर्जमुक्त होण्याचे मार्गावर आहेत ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

सहकारी बँका, विशेषतः जिल्हा बँका, यांचे पुढील मुख्य चालू प्रश्न म्हणजे खेळतें भांडवल कशा रीतीनें गुंतवावें हा होय. भांडवलापैकीं पुष्कळसा मोठा भाग सरकारी कर्जरोखे यांमध्यें गुंतविलेला आहे तर जिल्हा मध्यवर्ती बँकेचें जें ध्येय म्हणजे शेतकरी सोसायट्यांना लागणारी आर्थिक मदत देणें तें फारसें साध्य होत नाहीं आणि आतां तर कर्जाची मागणी न आल्यास सध्या शेतकऱ्याकडे असलेला बँकेचा पैसाही परत येत आहे.

सहकारी बँका ह्या मुख्यतः भागीदारांना नफा वाटणींतील डिव्हिडंड देण्यासाठीं अस्तित्वांत आल्या नाहींत, तर सभासदांच्या एकमेकांच्या सहाय्यानें केवळ आर्थिक उन्नतीच करण्याचें काम न करतां त्या बरोबर त्यांची सर्व प्रकारें प्रगति होईल, याकरितां स्थापन झालेल्या आहेत ही गोष्ट जरी खरी असली तरी भागीदारांना योग्य प्रमाणांत डिव्हिडंड देणें बँकेच्या दृष्टीनें इष्ट आहे. याकरितां सुरक्षित व फायदेशीर दृष्ट्या पैसा कसा गुंतवावा हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

आजच्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार करतां नवीन कर्जाची फारशी मागणी ह्यापुढें कदाचित् येणार नाहीं अशावेळीं शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीची सुधारणा करण्याकडे लक्ष देण्यास सांगून त्यासाठीं पैसा द्यावा. विहिरी किंवा लहान प्रमाणांत गावांतील एरिगेशनचीं कामें काढून गावांतील सर्व जमीन लागवडीखालीं येईल अशा रीतीनें जमीनसुधारणा कामहि अंगावर घेणें अगत्य आहे. शेतकऱ्यांनीं आपला माल दलाला मार्फत न विकतां मार्केटिंग सोसायट्यांमार्फत विकावा अशी मनोभूमिका आतांपासूनच तयार करावयाचे प्रयत्न सुरू केले पाहिजेत. त्यांचा अंतिम परिणाम शेतकऱ्यांच्या व बँकांच्या भरभराटींत झाल्याविना रहाणार नाहीं. ह्या प्रयत्नांचें फळ तात्काळ हातांत येणार नाहीं, हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे. आज शेतकरी कर्जाची फेड करूं लागले आहेत, ह्याचा अर्थ त्यांच्या शेतीस पुनः पैशाची गरज पडणार नाहीं, असा नव्हे. परंतु, आतां ते कर्जे घेतील, त्यांचा प्रत्यक्ष उपयोग उत्पादन वाढून मालविक्रीचे अधिक पैसे त्यांच्या हातीं येण्याकडे झाला व त्यांचें शेतीचें उत्पन्न कायमचें वाढूं शकलें तर तें श्रेयस्कर ठरेल.

# स्फुट विचार

## ब्रिटिश सहकारी मालविक्रीच्या संस्था

ग्रेटब्रिटनमधील सहकारी संघटन मुख्यत्वें करून कामगार वर्गाच्या रोजच्या जीवनास लागणाऱ्या जिनसांच्या विक्रीस वाहिलेलें आहे हें सुप्रसिद्ध आहे. इंग्लंड व स्कॉटलंड ह्या देशांत को–ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटी ह्या नांवाच्या मध्यवर्ती सहकारी संस्था आहेत. त्यांचे व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर चालतात आणि त्यांस जोडलेल्या अनेक स्टोअर्स सोसायट्या आहेत. ह्या सर्वांस युद्धपरिस्थितीची झळ लागल्यावांचून राहिलेली नाहीं. मालाचा पुरवठा मर्यादित झाल्यामुळें विक्रीचें प्रमाण उतरलें आहे आणि दुकानांचा चालू खर्च वाढल्यानें लहान स्टोअर्सचा कारभार कठिण होऊन गेला आहे. त्याचप्रमाणें सहकारी स्टोअर्स युद्धोत्तर काळांत कसे टिकवून धरतां येतील हाहि प्रश्न भेडसावूं लागला आहे. आलेल्या व येणाऱ्या संकटांस तोंड देण्याचें कौशल्य व सामर्थ्य हीं कोणत्याहि चळवळीच्या जिवंतपणाचीं लक्षणें असतात. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां ग्रेटब्रिटनमधील सहकारी संस्थांनीं पुनर्घटनेचे व स्वसंरक्षणाचे प्रयत्न चालवले आहेत ते हिंदुस्थानांत अनुकरणीय आहेत. आपत्तीच्या काळीं सोसायट्यांस सहाय देतां यावें म्हणून विक्रीच्या किंमतीवर दर पौंडास एक पेनी ह्या रीतीनें वर्गणी जमा करण्यांत येऊन सुमारें सवा कोटि रुपयांचा फंड जमेल त्याचा विनियोग ह्या कामीं होणार आहे. ह्या वर्गणीचा खर्च प्राप्तीवरील कराचे आकारणींत वजा टाकला जाण्याची सवलत देण्याचें सरकारनें आश्वासन दिलें आहे. को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटीची किरकोळ विक्रीची एक नवीन संस्था स्थापन झाली आहे आणि तिनें संकटांत असलेले स्टोअर्स आपल्या हातीं घेतले आहेत. कित्येक क्षेत्रांत लहान मोठ्या सोसायट्या सहकारितेनें आपले व्यवहार करून मार्गांतल्या अडचणी दूर करीत आहेत. परस्परांतील स्पर्धा नाहींशी करण्याचाहि सोसायट्यांचा प्रयत्न चालला आहे. इंग्लंड व स्कॉटलंड ह्यांमधील मध्यवर्ती मोठ्या सोसायट्या एकत्र करून त्यांची शक्ती व कार्यक्षमता वाढवण्याचाहि विचार आहे. ह्यांपैकीं एकट्या इंग्लंडमधील सहकारी होलसेल सोसायटीची गेल्या वर्षी एकूण उलाढाल सुमारें २०० कोटि रुपयांची झाली. दर आठवड्याची सरासरीची विक्री ४ कोटि रुपयांची झाली ह्यावरून सदरहु संस्थेच्या प्रचंड आकाराची कल्पना येईल. विकावयाचा माल स्वतःच बनवण्याचें रॉकडेल पायोनिअर्सचें ध्येय मूर्त स्वरूपांत आणण्याचें महत्त्व ह्या संस्थांनीं दृष्टिआड होऊं दिलेलें नाहीं. सहकारी शिक्षण देणाऱ्या कॉलेजाचा विस्तार करण्याची खटपट चालू असून त्यासाठीं सुमारें २० लक्ष रुपयांचा फंड जमवण्यांत येत आहे. स्वावलंबनात्मक सहकारी संघटनेचा हा कित्ता हिंदुस्थानांत गिरवला जाणें अगत्याचें आहे. युद्धोत्तर काळांतील भावी परिस्थितीचा सद्यःस्थितीबरोबर विचार करून योजनात्मक धोरण आखण्याचें महत्त्व आमच्या सहकारी कार्यकर्त्यांच्या ध्यानांत येणें अगत्याचें आहे.

---

## सहकारी खरेदी–विक्रीचे हिंदुस्थानांतील प्रयत्न

हिंदुस्थान सरकारच्या ॲग्रिकल्चरल मार्केटिंग खात्यानें शेतीच्या मालाच्या सहकारी विक्रीसंबंधानें एक रिपोर्ट तयार केला आहे, त्यांत सहकारी खरेदी विक्रीचें महत्त्व पटेल अशा रीतीनें हिंदुस्थानांतील प्रयत्नांचें वर्णन दिलेलें आहे. इतर देशांतील ह्या संबंधांतील प्रगतीचीहि माहिती रिपोर्टांत दिली आहे. १९३९–४० मध्यें हिंदुस्थानांत विक्रीच्या ४,१२० सोसायट्या होत्या व त्यांचे पटावर ४½ लक्ष सभासद होते. त्यांनीं सुमारें ११½ कोटि रुपयांचा व्यवहार केला. अशा सोसायट्यांची सर्वांत ज्यास्त संख्या संयुक्त प्रांतांत आहे. त्याचे खालोखाल बिहार, बंगाल, मद्रास, मुंबई हे प्रांत अनुक्रमानें येतात. कोणत्या मालाचा व्यवहार करण्यांत येतो, त्यास अनुसरून रिपोर्टांत सोसायट्यांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे. कंझूमर्स स्टोर्सची संख्या सबंध हिंदुस्थानांत मिळून फक्त ५४७ आहे. त्यांपैकी शेकडा ६४ स्टोर्स दक्षिण हिंदुस्थानांत आहेत. हिंदुस्थानांतील सर्व स्टोर्सच्या व्यवहाराच्या ७५% व्यवहार एकट्या दक्षिण हिंदुस्थानांतील स्टोर्सनींच केला. शेतकऱ्यांसाठी फारच थोडे स्टोर्स आहेत. सहकारी धान्याच्या बँका थोड्या फार प्रमाणांत स्टोअरचेंच काम करीत असतात. उत्पादक व उपभोक्ते ह्यांच्या सोसायट्यांची सांगड घालण्याचे प्रयत्न आपलेकडे फारच थोडे झालेले आहेत. दलालांच्या माध्यमावाचून व्यवहार केल्यानें उत्पादक व गिऱ्हाइक ह्या दोघांचाहि फायदा होतो.

---

## कागद संशोधन केंद्राचे यशस्वी प्रयोग

अ. भा. ग्रामोद्योग संघाच्या पुणें येथील कागद संशोधन केंद्रांत उसाच्या पाचोळ्यापासून तसेंच पानकणिसापासून कार्डबोर्ड तयार करण्याचे प्रयोग केंद्राचे प्रमुख व कागद तज्ञ श्री. के. बी. जोशी ह्यांच्या नेतृत्वाखाली करण्यांत आले, ते यशस्वी झाले आहेत. उसाचे शेंडे व पाचोळा हीं ८·०% कॉस्टिक सोड्यांत चार तास उकळून पुठ्ठा तयार केला, तो चांगला झाला. तथापि उसाचे शेंडे शेतांवरील जनावरांस चारा म्हणून उपयोगी पडतात, ह्यासाठी पुढें फक्त पाचोळ्यावरच प्रयोग केले. प्रथम, प्रयोगशाळेंत लहान प्रमाणावर प्रयोग करून पाहिले व त्यांच्या अनुभवावरून जरा मोठ्या प्रमाणावर उत्पादन केलें. उसाचा पाचोळा साखरेच्या कारखान्यांत जाळला जातो अथवा त्याचें खत होतें. त्याचा अधिक किफायतशीर उपयोग करून बोर्ड तयार करण्याचा जोड धंदा सुरू करतां येणें शक्य आहे, असें कागद संशोधन केंद्राच्या प्रयोगांवरून दिसून येतें. कालव्याचे काठीं व दलदलीच्या जमिनींत पानकणिसें मुबलक सापडतात व तीं उपद्रव देऊं लागतात. पानकणिसांपासूनहि कार्डबोर्ड चांगला तयार होऊं शकेल, असें प्रयोगांचे अंतीं आढळून आलें आहे. उसाचा पाचोळा व पानकणीस ह्यांच्या रांध्यापासून रॅपिंग पेपर (ब्राऊन पेपर) निघूं शकेल. सध्यां कांहीं ठिकाणीं भाताचे पेंढ्यापासून बोर्ड तयार करण्यांत येत आहेत.भाताच्या पेंढ्याचा उपयोग जनावरांच्या खाण्याकडे होत असल्याकारणानें,पेंढ्याऐवजी पाचोळा व पानकणीस ह्यांपासून बोर्ड तयार करणें अधिक श्रेयस्कर ठरतें. कागद संशोधन केंद्रानें बोर्डांच्या उत्पादन खर्चाचा थोडक्यांत अंदाज दिला असून, व्यापक प्रमाणावर यांत्रिक सहायानें उत्पादन केल्यास तें अधिक स्वस्त पडेल, असें म्हटलें आहे. वाया जाणाऱ्या पानपाचोळ्यापासून बोर्ड व रॅपिंगचे कागद तयार करतां येतील व ते किफायतशीर पडतील, असें केंद्राच्या प्रयोगांवरून दिसून येतें. प्रायोगिक अवस्थेंतून बाहेर पडून प्रत्यक्ष उत्पादनाचा उपक्रम हातीं घेतला जाण्यास केंद्राचे परिश्रम उपयोगी पडतील ह्यांत संशय नाहीं.

## प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष, श्री. सरय्या ह्यांचें भाषण

शेतीच्या मालाचे बाजारभाव चढल्याकारणानें शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढलें व त्याचा परिणाम मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या कर्जांची परतफेड सुलभ होण्यांत झाला, ह्याची माहिती बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं देतांना श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं कांहीं तुलनात्मक आकडे दिले, ते खालीं उद्धृत केले आहेत.

तुलनात्मक बाजारभाव

| | ऑगस्ट १९३९ | जून १९४० | जून १९४१ | जून १९४२ | जून १९४३ |
|---|---|---|---|---|---|
| भुईमूग | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| (पल्ला) | ९½ | १२ | १० | १३½ | ३५ |
| कपास (गाठ) | ७० | ७२ | ७५ | ५७ | १६० |
| गूळ (पल्ला) | २२ | १४ | १० | २२ | ४८ |
| तांदूळ („) | २½ | ३ | ४ | ५ | ७ |

बँकेची थकबाकी कशी वसूल झाली, हें खालीं आकड्यांवरून समजून येईलः—

| | १९४१-४२ | १९४२-४३ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| थकलेलें व्याज | ३,०८,५४३ | १,६३,०१३ |
| थकलेलें मुद्दल | १६,३०,८०० | ९,९८,२०० |
| संशयित कर्ज (अंदाज) | ८,२२,१६८ | ४,९५,२०० |

शेतीच्या मालाचे तारणावरील कर्जाच्या व्यवहारांत बँकेनें गतवर्षी पुष्कळच रक्कम गुंतविली, त्याचा उल्लेख श्री. सरय्या ह्यांनीं आपल्या भाषणांत केला व सहकारी संघटनेमार्फत ही व्यवस्था वाढत्या प्रमाणावर होत आहे, ह्याबद्दल त्यांनीं संतोष व्यक्त केला. सहकारी बँकांकडे येणाऱ्या शेतीच्या मालासंबंधीच्या हुंड्या रिझर्व्ह बँकेकडून डिस्कौंट करवून घेण्याचा उपक्रम करणारी मुंबई प्रांतिक बँक ही पहिलीच प्रांतिक बँक आहे, असें सांगून अशा तऱ्हेचा व्यवहार वाढविण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादन केलें.

---

## सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.

दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कं. लि. चा १९४२ सालअखेरचा प्रथम वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. कंपनीनें प्रथम वर्षी मिळविलेलें काम स्पृहणीय आहे. हल्लींच्या युद्धजन्य परिस्थितींत प्रतिष्ठित कंपन्यांना देखील समाधानकारक काम करणें दुरापास्त होऊन बसलें आहे. अशा वेळीं या नव्या कंपनीनें १०,००,००० रुपयांचे विमा अर्ज मिळविले व ७,२४,००० रुपयांवर काम पुरें केलें ही अभिनंदनीय गोष्ट होय. प्रत्येक पॉलिसी सरासरीनें १,७०० रुपयांची आहे. कंपनीचे विमाहप्त्यांचे उत्पन्न २५ हजार रुपयांवर आहे. प्रथम वर्षांतच महाराष्ट्राच्या सर्व भागांतून कंपनीच्या संघटनेचें काम पुरें झालेलें आहे हें प्रशंसनीय आहे. पहिल्याच वर्षी मिळविलेल्या या यशाबद्दल आम्हीं कंपनीच्या चालकांचें हार्दिक अभिनंदन करतो. कंपनीनें चालू वर्षी आतांपर्यंत ९ लाखांवर काम मिळविल्याचें समजतें, यावरून कंपनी याहि वर्षी उत्तम काम मिळवील असें म्हणावयास हरकत नाहीं.

---

## मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

वरील बँकेकडील ठेवींत गेल्या वर्षी खूपच वाढ होऊन बँकेचें खेळतें भांडवल ४ कोटि रुपयांपर्यंत गेलें. त्यापैकीं सुमारें १½ कोटि रुपये रोख व इतर बँकांत असून १ कोटि, ४½ लक्ष रुपयांची इनव्हेस्टमेंट आहे. शेतीच्या मालाचे तारणावरील कर्जांत गेल्या वर्षी बरीच वाढ झाली, त्याचें मुख्य कारण बाजारभावांतील चढ हें होय. सोसायट्यांकडील कर्जाचा आंकडा उतरलेला दिसत आहे व थकबाकी कमी झाली आहे, त्यामुळें थकलेल्या व बुडीत कर्जांची केलेली तरतूद जरूरीपेक्षां पुष्कळच ज्यास्त होऊन राहिली आहे. बँकेनें व्यवहाराच्या वाढीस अनुसरून नव्या शाखा व उपशाखा उघडल्या आहेत. ताळेबंदांत १ लक्ष, ७१½ हजार रुपयांचा नफा दिसत आहे, त्यांत मागील शिलकी नफा २० हजार रुपये मिळवून नफावाटणीस १ लक्ष, ९१½ हजार रुपये येतात. त्यांतून भागीदारांस ४% डिव्हिडंड देण्यास ५२ हजार रुपये लागतील. सुमारें पाऊण लक्ष रुपये रिझर्व्ह व इतर फंडांत जातील. बँकेच्या वरील वृत्तांतावरून तिची परिस्थिति आतां कशी अत्यंत भक्कम झालेली आहे, हें दिसून येईल.

---

## बार्शी सें. को. बँक लि.

वरील बँकेच्या पटावर ५२ सोसायट्या व ८९८ व्यक्ती मिळून ९५० सभासद आहेत व वसूल शेअरभांडवलाची रक्कम ७१,७०० रुपये आहे. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड ७३½ हजार रुपयांचे आहेत. गेल्या वर्षांत बँकेकडील ठेवींत ३८ हजारांची भर पडून त्यांची रक्कम ६ लक्ष, ३६ हजार रुपये झाली. बँकेच्या एकूण ८ लक्ष, १९ हजारांच्या खेळत्या भांडवलापैकीं १ लक्ष, ८६ हजार रुपये रोख व इतर बँकांत असून १ लक्ष, ५४ हजारांची इन्व्हेस्टमेंट आहे व ४ लक्ष, ४३ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. कर्जामध्यें सोसायट्यांकडील व व्यक्तिशः सभासदांकडील कर्जबाकी कमी झाली आहे व माल तारण कर्ज वाढलें आहे, त्याचें कारण भुसार मालाचे किंमतीमधील वाढ, हें होय. कर्जाचें एकूण ठेवींशीं प्रमाण ७०% असून त्यापैकी मालतारणावर ४२% कर्ज आहे, इतर तारणावर २२% आहे व ६% कर्ज सोसायट्यांकडे आहे. थकबाकी अहवालाचे सालीं १०½ हजारांनीं कमी झाली आहे. रोख शिल्लक, बँकांतील ठेवी व रोख्यांतील गुंतवण ह्यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण ५४% पडतें. ह्यावरून बँकेच्या पैशाच्या तरतेपणाची कल्पना येईल. अहवालाचे वर्षी बँकेस इस्टेटविक्रीवर ५,०७१ रुपये नफा झाला, परंतु त्याचा विनियोग इमारत फंड, बॅडडेट फंड, डिव्हिडंड ई. फंड इत्यादि आणखी मजबूत करण्याकडेच केला गेला व नेहमीं प्रमाणें ½ नफा रिझर्व्ह फंडांत टाकून भागीदारांस ७½% डिव्हिडंड देण्यांत आलें. बँकेच्या वैराग शाखेचा व्यवहार समाधानकारक वाढत आहे.

---

## पू. खा. जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल ३५,९२३ रुपये आहे. अहवालाचे वर्षी २७ अर्जदारांस ३१,७५० रुपये कर्ज वाटण्यांत आलें. १९३५ पासून आतांपर्यंत बँकेनें २५९ अर्जदारांना एकूण ३ लक्ष, ६२ हजार रुपये कर्ज दिलेलें आहे. अहवालाचे वर्षी वसुली बऱ्याच अंशीं समाधानकारक झाली. थकबाकीचें एकूण येणें रकमेशीं प्रमाण ९·५% आहे. वर्षअखेर बँकेस ३,३१० रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस २% डिव्हिडंड मिळणार आहे.

## शेअर बाजार

(श्री. ब. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. २५, डे. जि. पुणें ४)

बदले बंद करून टाकणारा वट हुकूम बाहेर पडल्यानंतरची २४ तारखेच्या शेवटच्या दिवसापर्यंत टाईंग व सेंचरीमधील मंदीवाल्यांची झालेली कत्तल प्रेक्षणीय होती. शेवटच्या दिवशीं विशेषतः सेंचरीनें शेवटच्या पंधरा मिनिटांत मंदीवाल्यांच्या लाचार कापणीमुळें पन्नास रुपयांवर उडी मारली. मिळालेल्या अनुभवानें माणसाला शहाणे होता येतेच; तरी पण पराजित मंदीवाल्यांच्या रंजनार्थ सांगावेसें वाटतें कीं (१) ज्या काळामध्यें चलन एकसारखें प्रसरण पावत असतें. (२) आणि म्हणून सर्व वस्तूंच्या किंमती भरमसाट वाढत असतात–विशेषतः गरजेच्या, (३) ज्यामुळें उद्योगधंद्यांचे नफे भलतीकडेच वाढतात आणि (४) देशाच्या कोठल्याहि आर्थिक व्यवस्थेंत प्रसंगोपात हस्तक्षेप करण्याचे अधिकार सरकारनें आपणांकडे घेतलेले असतात व (५) गाळे उलटे आहेत अशा काळांत एकसारखें हट्टानें केवळ रोकडा पैसा स्वतःचा आहे तो गुंतून राहिला तरी बेहत्तर अशा बेपर्वाईनें मंदींत वागणें यासारखा मूर्खपणा जगांत दुसरा नाहीं.

या प्रसंगीं दुसऱ्या एका शेअरबाजाराच्या पांचवीला पुजलेल्या ज्योतिषाचाहि उल्लेख करावासा वाटतो. मागील महिना दोन महिने बाजार मंदींत जावा असें भविष्यवाद्यांचें म्हणणें होतें. त्यामुळें मंदीवाल्यांनीं कबजी बाबांच्यावर विसंबून स्वतःचा संभाजी करून घेतला. ज्योतिषाचा बाजारभाव हमखास सांगता येण्याइतका अधिकार आहे कीं नाहीं हा मुद्दा अजून अधिकारी ज्योतिषांच्या अभावीं सिद्ध झालेला नाहीं, तोंपर्यंत ज्योतिष शास्त्रासंबंधीं आदर दाखवून व व्यवहार काय सांगतो तें पाहून वागणें हेंच हितकारक ठरेल यांत शंका नाहीं.

आज ज्या शेअरवर मागील दोन वर्षांच्या सरासरीवरून चालू भावावर साडेचार ते पांच टक्के व्याज सुटत असेल तें उचलण्यास कोठलीहि हरकत नाहीं. यापुढें बाजारांत वायदेखोरांच्या धांवपळी होणार नाहींत व गुणावर सर्वस्वी किंमत अवलंबून राहून बाजारभाव एकंदरीनें स्थिर राहतील. म्हणून खऱ्या गुंतविणाराला शेअर बाजाराचा आर्थिक व्यवस्थेंत योग्य उपयोग काय आहे तें आढळून येईल.

## प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, मुंबई

गेल्या जुलैमध्यें लॅंड मॉर्गेज बँकांचा शिक्षण वर्ग संपल्यावर सदरहु विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यांत आली, त्यामध्यें खालील विद्यार्थी पास झाले:—

| | |
|---|---|
| १ जी. एस. जोशी, पाचोरा | ७ सी. व्ही. पटेल, नडिआड |
| २ ए. के. बापट, नाशीक | ८ एस्. एच्. वाळवेकर, सांगली |
| ३ जी. टी. पाटील, धुळें | ९ ए. एस्. दिवाणजी, भडोच |
| ४ एस्. डी. पाटील, धुळें | १० सी. एस्. कलगुडी, हावेरी |
| ५ एस्. एच्. दातार, इचलकरंजी | ११ बी. एन्. एलकोटी, बेळगांव |
| ६ एच्. टी. कलवड, हुबळी | |

चटण्या तयार मिळतात!
लसूणाची, जवसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मॅंगो चटणी इ०
द. ना. हेजीब.
(१) १० शुक्रवार, पुणें.

## सराफी म्हणजे बॅंकिंग नव्हे

(मुंबई हायकोर्टाचा ताजा निवाडा)

सराफीचा धंदा करणारी पेढी बॅंकिंगचा धंदा करते, असें मानतां येईल किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचा निवाडा मुंबई हायकोर्टानें नुकताच करून "नाहीं" असा आपला निकाल दिला आहे. दाव्यांतील वादीची फर्म ही ११ जणांची भागीदारी होती व श्रॉफचा, कमिशन एजंटाचा व हुंड्यांचा धंदा ती करीत असे. फर्ममध्यें १० पेक्षां अधिक भागीदार असून ती बॅंकिंगचा व्यवहार करते व कंपनी कायद्याच्या ४ थ्या कलमाप्रमाणें तो व्यवहार तिला करतां येत नाहीं, असा मुद्दा उपस्थित झाला होता. न्यायमूर्ति छगला आपल्या निवाड्यांत म्हणाले, "सराफीचा धंदा व बॅंकिंगचा धंदा हे एकच आहेत, असें मानण्यास मी तयार नाहीं. प्रत्येक मारवाडी सावकार स्वतःस श्रॉफ म्हणवतो, म्हणून तेवढ्यानें तो बॅंकर होत नाहीं. ज्या कंपनीचा मुख्य धंदा चालू खात्यावर चेकनें काढतां येण्याजोग्या ठेवी स्वीकारणें हा असतो, अशा कंपनीस बॅंकिंग कंपनी म्हणावें, अशी २७७ एफ कलमानें व्याख्या केलेली आहे. पैसे कर्जाऊ देणारा प्रत्येक व्यापारी व सावकार स्वतःस श्रॉफ म्हणवतो, म्हणून त्यास बॅंकिंग कंपनीचा कायदा लावणें चुकीचें होईल. म्हणून वादीची फर्म ही बॅंकिंगचा धंदा करीत नव्हती, असें मी ठरवितों."

## मुंबईत कंझ्यूमर्स स्टोअर्सची चळवळ

मुंबई शहरांत रेशनिंगला प्रारंभ होण्यापूर्वी, खाद्य पदार्थ व इतर जिन्नस ह्यांचा सोसायट्यांचे सभासदांत पुरवठा नीट होण्यासंबंधीं विचार करण्याकरितां बाँबे को. एज्युकेशन कमिटीनें स्थानिक सोसायट्यांच्या प्रतिनिधींची एक सभा बोलाविली होती. मुंबई शहर व उपनगर ह्यांतील सहकारी स्टोअर्स व क्लब ह्यांची अशीच एक सभा शनिवार ता. ४ ऑक्टोबर रोजीं सहकारी इन्स्टिट्यूटच्या हॉलमध्यें भरणार आहे. सध्यां २९ कंझ्यूमर्स सोसायट्या व १० क्रेडिट सोसायट्यांस मुंबईच्या रेशनिंगच्या योजनेंत किरकोळ विक्रेते म्हणून मान्यता मिळालेली आहे. त्यांचा अनुभव विचारांत घेऊन त्यांच्या अडचणी दूर करण्याच्या प्रयत्नांचा विचार सभेंत होईल. रेशनिंग लागू नसलेल्या जिनसांची विक्री करण्यास प्रारंभ करून व प्रांतिक सहकारी मार्केटिंग सोसायटीमार्फत खरेदी करून कंझ्यूमर्स सहकारी स्टोअर्सचा चांगला पाया घालण्यास सध्याची वेळ सोईची आहे, ह्या दृष्टीनें सबंध प्रश्नाचा विचार केला जाईल. ह्याविषयीं कोणास सूचना, ठरावांचे मसुदे इत्यादि पाठविणें असल्यास ते २ ऑक्टोबरपूर्वी पाठवावे.

## "श्री ज्ञानेश्वरी–कथामृत"

श्री. शंकर दिनकर करंदीकर ह्यांनीं वरील कथामृताचा प्रथम खंड चैत्रामध्यें प्रसिद्ध केला, त्यावेळीं ग्रंथकर्त्यानें प्रस्तुत पुस्तकांत ज्ञानेश्वरीचा आशय सुगम, सुबक व सुंदर रीतीनें कसा आणला आहे, हें "अर्था" मध्यें सांगितलेंच आहे. कथामृताचा दुसरा खंड आतां प्रसिद्ध झाला आहे. त्याचेंहि पहिल्या खंडाप्रमाणेंच स्वागत होईल, अशी अपेक्षा आहे. पुढील आणखी दोन खंडहि लवकरच प्रसिद्ध होणार आहेत.

## अर्थवादी पशुधन कार्यालयाचें सहकारी पशुसंवर्धनास उत्तेजन

### दोनशें रुपयांचें बक्षिस

(१) सदर प्रयत्न मुख्यत: १०,००० वस्ती खालच्या एकाद्या खेड्यांत चालावा, व त्यांतील एकंदर भागीदारांपैकीं ३ हून अधिक शेतकरी वर्ग असावा.

(२) निदान पांच शेतकरी कुटुंबें, व त्यांची निदान १० मोठीं व उपयोगी जनावरें ( दुभतीं अगर शेतकामाचीं ) त्या प्रयोगांत समाविष्ट असावीत.

(३) प्रयोग निदान नऊ महिने चालू असला पाहिजे; व तो सुरू करतांच या संस्थेकडे कळविलें पाहिजे. प्रयोगाच्या जमाखर्चाचें ( दुधाचें उत्पन्न व बैलांचें काम यासुद्धां ) तपशीलवार टिपण ठेविलें पाहिजे.

(४) प्रयोगांतील भागीदारांकडून जनावरांचे खर्चाकरतां रोख रकम घेण्याऐवजी, त्यांच्याकडून चारा व खुराक प्रत्यक्ष गोळा करण्यावर प्रयोगांत भर असावा.

(५) प्रयोगांतील सर्व जनावरें, प्रयोगाचे मुदतींत ( चरण्याचा व कामाचा वेळ खेरीज करून ) एकाच गोठ्यांत एकत्र ठेविलीं जावींत.

(६) जनावरांची सुस्थिति व सुधारणा व्हावी, तसेंच भागीदारांना अधिक फायदा व्हावा या उद्देशानें प्रस्तुत प्रयोग चालवयाचा असल्यामुळें, त्यांतील जनावरांची उपासमार कधींहि होतां कामा नये.

(७) नऊ महिन्यांनंतर, संस्थेचे अधिकारी या प्रयोगाची पहाणी करतील, त्यावेळीं जनावरें उत्तम स्थितींत आढळलीं पाहिजेत व जमाखर्च, टिपणें यांसंबंधीं वाजवी असा सर्व खुलासा प्रयोगास जबाबदार असणाऱ्या गृहस्थांकडून या संस्थाधिकाऱ्यांस मिळाला पाहिजे.

( ८ ) संस्थेच्या अधिकाऱ्यांस, येत्या वैशाख शके १८६६ अखेरपर्यंत होणारे असे ठिकठिकाणचे प्रयोग पाहून जो प्रयोग समाधानकारक वाटेल, त्या ठिकाणच्या प्रयोगकर्त्यांस रु. २०० चें बक्षीस दिलें जाईल. या बाबतींत संस्थाधिकाऱ्यांचा निर्णय एकमेव प्रमाण मानला जाईल.

( ९ ) या संस्थेच्या प्रचारकांस प्रस्तुत योजनेंत भाग घेतां येईल. मात्र, त्यांचा प्रयोग समाधानकारक वाटल्यास त्यांना मिळणारें पारितोषिक रु. १०० राहील; रु. २०० नव्हे.

### सवलतीच्या दरानें बीं व खत मिळवा.

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें ४ ऑगस्ट रोजीं एक सर्क्युलर काढून " अधिक धान्य पिकवा " मोहिमेस सहकारी चळवळ कशी हातभार लावूं शकेल हें स्पष्टपणें दाखविलें होतें. सहकारी संस्थांनीं आपल्या सभासदांस किती बीं, खत, वगैरे लागेल ह्याची माहिती मिळवून ती आपल्या विभागाच्या डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरकडे पाठवावी, म्हणजे गरीब शेतकऱ्यांस सरकारी सवलतींचा पुरेपूर फायदा मिळूं शकेल, अशी सूचना इन्स्टिट्यूटच्या ता. ८ सप्टेंबरच्या सर्क्युलरमध्यें करण्यांत आली आहे.

## सोलापूर जिल्हा सें. को. बँकेचा रौप्यमहोत्सव

सोलापूर डि. सें. को. बँकेचा रौप्यमहोत्सव शनिवार, ता. १८ रोजीं को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे रजिस्ट्रार, मि. एस. एम. इकम, ह्यांचे अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडला. बँकेचे चेअरमन, श्री. ब. ए. कुलकर्णी, हे आपल्या स्वागतपर भाषणांत म्हणाले, " या जिल्ह्यांतील एकूण १९४ सहकारी पतपेढ्या या बँकेस संलग्न केल्या आहेत. पतपेढ्यांचे कामकाजावर देखरेख करणें सोपें व्हावें व त्यांच्याशीं निकट परिचय असावा म्हणून पंढरपूर, कुर्डूवाडी व करमाळा येथें बँकेच्या शाखा स्थापन केल्या आहेत. अलिकडे कर्जाऊ देण्यांत आलेल्या रकमांत हळुहळु घट आल्याचें दिसून येते. जुन्या कर्जाची करण्यांत येत असलेली वसुली व फक्त चालू शेती बाबतच्या गरजा व लहान मुदतीचीं इतर कामें या करतांच सध्यां कर्जे देण्यांत यावीत अशा तऱ्हेची घालण्यांत आलेलीं बंधनें यामुळें पतपेढ्याकडे गुंतविण्यांत आलेल्या रकमांत घट आलेली आहे. प्राथमिक सहकारी मंडळाच्या गरजा फार मोठ्या व विविध आहेत. परंतु अधिकाधिक रकमा निर्धास्तपणें देण्याजोगी त्यांची स्थिति नाहीं. शेतकऱ्याचा माल बाजारांत किफायतशीर रितीनें विक्री करणें हाही या चळवळीचा महत्त्वाचा भाग आहे व शेतकऱ्याचे मालास जास्तींत जास्त किंमत येईल अशी व्यवस्था करणें जरूर आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन बँकेनें पंढरपूर येथें सहकारी सेलशॉप उघडलें आहे."

### मि. इकम ह्यांचें भाषण

" आपल्या सुदैवानें सध्याचा काळ को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांची संघटणा करण्यास व त्यांना स्थैर्य आणण्यास अनुकूल आहे. कारण शेतकऱ्यांच्या मालाला आज पूर्वीं कित्येक वर्षांत आला नाहीं, असा भाव आला आहे. त्यामुळें शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति बऱ्यापैकीं आहे. अशा वेळीं शेतकऱ्यांना सोसायट्यांचे देणें देऊन टाकण्यास त्यांचें मन वळवावें. यामुळें सोसायट्यांचाही फायदा होईल व शेतकऱ्यांवरचें ओझेंहि कमी होईल. मला अशी खात्री आहे कीं, युद्धसमाप्तीनंतर सहकारी चळवळीला शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनांत एक विशिष्ट स्थान प्राप्त होईल."

### जिनसांचा सहकारी पुरवठा

खाद्य पदार्थ व इतर जिन्नस ह्यांच्या पुरवठ्याचे बाबतींत जिल्हा कलेक्टरांनीं सहकारी संस्थांचें सहाय घ्यावें, अशी सूचना इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षांनीं कलेक्टरांना पत्र लिहून केली. मद्रास प्रांत व मुंबई प्रांतांतील बेळगांव व भडोच हे जिल्हे, ह्यांत सहकारी संस्थांच्या ह्या संबंधांतील कार्याचा उल्लेख करून, सहकारी स्टोअर्सचें सध्याच्या काळांतील विशेष महत्त्व त्यांनीं प्रतिपादन केलें. प्रत्येक जिल्ह्यांतील विशिष्ट परिस्थितीस अनुसरून कोणत्या प्रकारानें योजना आखतां येईल, ह्याचा विचार सहकारी कार्यकर्त्यांनीं करावा, अशी इन्स्टिट्यूटच्या ता. १३ सप्टेंबरच्या पत्रकांत सूचना करण्यांत आली आहे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, प. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख ६ आक्टोबर, १९४३ | अंक ४०

विमेदारांच्या मालकीची
*दि सुप्रीम म्युच्युअल अॅशुअरन्स कंपनी लिमिटेड, मुंबई.*
पश्चिम हिंदुस्थानांतील ही अग्रेसर विमा संस्था
एजन्सीकरितां आणि विम्याकरितां सर्वच पसंत करतात. –अधिक माहितीसाठीं लिहा,
हेड ऑफिस–मुंबई. : : पुणें ऑफिस–७, नागेश पेठ.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय
पूना गेस्ट हाऊस
फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४ | महिंद्रकर ब्रदर्स तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

# हातपाय चालतात तोंवर

म्हातारपणची तरतूद करणें अवश्य आहे. चांगल्या कंपनींत उतरलेला विमा हा ऐन वेळीं उपयोगी पडतो. या संबंधांत आपणांस कसलीहि माहिती पाहिजे असल्यास आम्हांकडे विचारा. आम्ही सर्व खुलासा करून योग्य मार्ग दाखवूं.

मॅनेजर,

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.**

सातारा शहर.

पुणें शाखा-१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.



# फणसपोळी, आंबेपोळी

**किरकोळ व ठोक मिळेल.**

द. ना. हेर्जीब, : : २० शुक्रवार, पुणें २.


## विविध माहिती

**पो. ऑ. सेव्हिंग्ज बँकेचा व्याजाचा दर**

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचा व्याजाचा दर १ ऑक्टोबर, १९४३ पासून वाढविण्यांत आला आहे. ज्या खात्यांत दररोज किमान २०० रुपये तरी शिल्लक आहेत, अशा खात्यांतील रकमेवर २% व्याज दिलें जाईल.

**दौंड बारामती रेल्वे कं. लि.**

३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीस, मागील शिलकी नफा भरून, १,०१,८८३ रुपये नफा झाला. सबंध वर्षाचें ४½% डिव्हिडंड भागीदारांस मिळालें. त्यांतून कर वजा व्हावयाचा आहे.

**पाचोरा जामनेर रेल्वे कं. लि.**

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ९७,१७७ रुपये नफा झाला. भागीदारांस ४¾% डिव्हिडंड मिळालें. त्यांतून कर वजा व्हावयाचा आहे.

**तिळाची लागवड**

| | | |
|---|---|---|
| लागवड | ( १९४३-४४ ) | १८,१६,००० एकर |
| „ | ( १९४२-४३ ) | १७,२७,००० „ |

वरील लागवडीपैकी २६·३०% लागवड संयुक्त प्रांतांत, १५·६ मद्रास प्रांतांत व १०·६ मुंबई प्रांतांत होते.

**मद्रास सरकारनें स्टँप ड्यूटी वाढविली**

फाजील चलनवृद्धीस आळा घालण्याचे उद्देशानें मद्रास सरकारनें स्टँप ड्यूटी वाढविली आहे.

**भुइमुगाच्या पिकाचा अंदाज**

| | | |
|---|---|---|
| लागवड | ( १९४३-४४ ) | २८,०७,००० एकर |
| „ | ( १९४२-४३ ) | २८,०९,००० „ |

भुइमुगाच्या लागवडीपैकी ४२·४% लागवड मद्रास प्रांतांत व २७·९% मुंबई प्रांतांत होते.

**कराचा जनतेवरील बोजा**

| | वर्षअखेर | दरमाणशी बोजा ( पौंड ) ( प्रत्यक्ष ) | ( अप्रत्यक्ष ) |
|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ३१-३-४३ | ३४ | १८ |
| अमेरिका | ३०-६-४३ | ३४ | ७ |
| कॅनडा | ३०-३-४३ | २८ | १२ |

**कागदाची बचत**

ग्रेट ब्रिटनमधील पोस्ट खातें आपल्या टेलिफोनच्या गिऱ्हाइकांस प्रत्येक तिमाहीचे अखेर हिशेबाचे तक्ते पाठवीत असे. आतां हे तक्ते प्रत्येक सहामाहीस धाडण्यांत येतात त्यामुळें ४० लक्ष तक्त्यांचा व पाकिटांचा कागद दरसाल वाचेल. कारकुनी कामहि कमी होईल.

**अमेरिका चीनला २० कोटि डॉलरचें सोनें देणार**

अमेरिका विमानमार्गानें सुमारें २० कोटि डॉलर किंमतीचें सोनें चीनला पोचविणार आहे. फाजील चलन वाढीस आळा घालण्यासाठी नव्या कर्जास आधार म्हणून त्याचा चीनला उपयोग होईल व कांहीं सोनें बाजारांत विकून कांहीं चलन त्या मार्गें सरकारला खेचतां येईल.

**बंगाल सरकारला इंपीरिअल बँक कर्ज देणार**

इंपीरिअल बँक बंगाल सरकारला १६ कोटि रुपये कर्जाऊ देणार आहे, त्याचा उपयोग ९५ लक्ष मण धान्य विकत घेण्याकडे करण्यांत येणार आहे.

**सिसिलीमधील चलन**

संयुक्त राष्ट्रांनीं भूमध्य समुद्रांतील प्रदेश जिंकले आहेत. तेथील चलनाची व्यवस्था अलाइड मिलिटरी फिनॅन्शिअल एजन्सीकडे आहे. इटलीकडून घेतलेल्या प्रदेशांत ह्या एजन्सीनें नवीन “ लिरा ” चलन सुरू केलें आहे. चढाई करणाऱ्या फौजांनीं नव्या चलनाच्या नोटा बरोबरच नेल्या होत्या. त्या आतां सिसिलींत प्रसृत झाल्या आहेत व त्यांस कायदेशीरपणा देण्यांत आला आहे. १ पौंड = ४०० लिरा व १ डॉलर = १०० लिरा असें प्रमाण ठरविण्यांत आलें आहे.

**इटलीचे राजेसाहेब पृथ्वीपति !**

इटलीचे राजे व्हिक्टर इमॅन्युएल ह्यांनीं स्वतःची “ बादशहा ” ही पदवी अद्याप सोडलेली नाहीं. त्यांनीं अजून ठेवलेल्या पदव्यांचा शब्दशः अर्थ केला, तर त्यांचें आज फ्रान्स, स्पेन, इंग्लंड, ग्रीस जेरुसलेम, हँबर्ग ह्यांवर प्रभुत्व चालतें, असें दिसून येतें. “पृथ्वीपति” अशीहि पदवी अद्याप त्यांस भूषवित आहे ! पदव्या व प्रत्यक्ष परिस्थिति ह्यांचेमधील तफावत ह्याहून अधिक किती असणार ?

**३ टन वजनाच्या हिऱ्यांची निर्गत**

एकूण १¾ कोटि कॅरटचे ३ टन हिरे औद्योगिक उपयोगासाठीं आफ्रिकेंतून कॅनडाकडे पाठविण्यांत आले आहेत.

**कलकत्ता शहरांत ऑटोमॅटिक टेलिफोन**

कलकत्ता शहरांत टेलिफोनचा ऑटोमॅटिक एक्सचेंज बसविण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३१४ |
| २ गिरणीवाल्यांचा नफा व कापडाची किंमत | ३१५ |
| ३ इन्कम टॅक्सबाबत एक निवाडा ... ... | ३१६ |
| ४ ग्रेट ब्रिटनमधील औद्योगिक बांधे ... | ३१६ |
| ५ श्री. किणी ह्यांचा इषारा | ३१६ |
| ६ स्फुट विचार ... | ३१७ |
| सिंधमधील महापुरास जबाबदार कोण?–विमा कायद्याच्या २९ व्या कलमाचा अर्थ–लिमिटेड कंपनीचा ग्रामोद्योग ... | |
| ७ ब्रिटिश विश्वविद्यालयांतील विद्यार्थी ... | ३१८ |
| ८ मुंबईच्या गिरण्यांचा नफा ... ... | ३१८ |
| ९ तरुण धंदेवाल्याचें सभोवार निरीक्षण ... | ३१९ |


# अर्थ

बुधवार, ता. ६ आक्टोबर, १९४३

## गिरणीवाल्यांचा नफा व कापडाची किंमत

मुंबई इंडस्ट्रिअल कोर्टानें अहमदाबाद येथील गिरण्यांतील कामगारांना एप्रिल १९४० मध्यें महागाई भत्ता देवविला व सप्टेंबर, १९४१ मध्यें त्यांत वाढ केली. गिरण्यांची आर्थिक परिस्थिति महागाई भत्ता बदलण्याची आवश्यकता निर्माण होण्याइतकी पालटली आहे, असें गिरणी मालक संघ व कामगार संघ ह्यांपैकी कोणासहि वाटलें तर भत्ता चालू ठेवावा कीं त्यांत बदल करावा, हें इंडस्ट्रिअल कोर्टाकडून ठरवून घ्यावें, असें उभयपक्षीं तेव्हां ठरलें होतें. त्याप्रमाणें गिरणीवाल्यांच्या संघानें मुंबई इंडस्ट्रिअल कोर्टाकडे अर्ज करून महागाई भत्ता कमी करण्यांत यावा, अशी मागणी केली. गिरणी मालक संघाच्या बाजूनें श्री. एम. सी. सेटलवाड ह्यांनीं वकीलपत्र घेतलें होतें. त्यांचें म्हणणें असें, कीं आतां अहमदाबाद येथील गिरण्यांतील शेकडा १०.८९ माग लष्करी मागणीचें कापड काढण्यांत गुंतलेले आहेत व शेकडा ४५.११ मागांवर स्टँडर्ड क्लॉथ चालू आहे. म्हणजे, फक्त ४४% माग लोकांच्या मागणीचें कापड तयार करण्यासाठी उपलब्ध आहेत. लष्करी मागणीचें कापड व स्टँडर्ड क्लॉथ ह्यांवरील नफ्याचें प्रमाण अत्यंत मर्यादित आहे व राहिलेल्या कापडापैकीं बऱ्याच जातीच्या कापडाच्या कमाल मर्यादा सरकारनें ठरवून दिल्या कारणानें, त्यांतहि फारशी किफायत राहिलेली नाहीं. महागाई भत्त्याचें मूळ प्रमाण प्रथम ठरविलें त्यावेळीं व त्यांत सप्टेंबर, १९४१ मध्यें वाढ केली त्या प्रसंगींहि, पुढें रहाणीच्या खर्चाचे मानांत इतकी चढ होईल, अशी मुळींच अपेक्षा नव्हती. तेव्हां महागाई भत्त्यांत ४५% काट करावी, अथवा इतर योग्य व न्याय्य महागाई भत्ता ठरवून टाकावा असें श्री. सेटलवाड ह्यांनीं प्रतिपादन केलें. अहमदाबाद येथील गिरण्यांची परिस्थिति जुलै, १९४१ च्या वेळच्या परिस्थितीपेक्षां आज वाईट आहे; एप्रिल १९४० च्या सुमारच्याच परिस्थितीशीं तिची तुलना करणें योग्य होईल. १९४१ सालीं गिरण्यांना १०० रुपयांच्या भांडवलावर १६ रुपये नफा मिळाला; १९४३ मध्यें १९८ रुपयांवर २१ रुपये मिळतील अशी अपेक्षा आहे. म्हणजे नफ्याचें प्रमाण १६% वरून ९.७०% वर उतरत आहे, असें त्यांनीं सांगितलें.

इंडस्ट्रिअल कोर्टानें नफ्याचें प्रमाण काढण्याच्या वरील पद्धतीवर टीका केली आहे. व्यापारी कांहीं किंमतीच्या मालाची खरेदी करून, त्यावर नफा मिळवून माल विकतो. खरेदीच्या रकमेवर किती नफा सुटतो, ह्यावरून नफ्याचें प्रमाण काढण्यांत येतें. गिरणीवाला कच्चा माल विकत घेऊन व त्याचा पक्का माल बनवून तो विकतो. उत्पन्न व खर्च ह्यांतील तफावत म्हणजे नफा होय; तथापि खेळत्या भांडवलाशीं त्याचें पडणारें प्रमाण हें नफ्याच्या प्रमाणाचें खरें निदर्शक नाहीं. कंपनींत गुंतलेल्या भांडवलाशीं काय प्रमाण पडतें, हेंच पाहिलें पाहिजे असें कोर्टानें म्हटलें आहे. कच्च्या मालाच्या खरेदीसाठीं लागणाऱ्या खेळत्या भांडवलावरील व्याज ही एक खर्चाची बाब होय. कंपनीच्या गुंतलेल्या भांडवलावर किती नफा सुटतो हें पहावयाचें असतें. खेळत्या भांडवलाशीं त्याचा संबंध लावावयाचा नाहीं. १९८ रुपये कच्च्या मालावर खर्चून कंपनीस २१९ रुपये मिळाले, तर १९८ रुपयांवर २१ रुपये सुटले असें म्हणणें संयुक्तिक नाहीं. गिरणीवाल्यांनीं ज्या पद्धतीनें नफा कमी होत चालला आहे, असें दाखविण्याचा प्रयत्न केला, त्या पद्धतीप्रमाणेंहि १९४१ सालीं १६.७% नफा झाला तर १९४३ सालीं तो वस्तुतः १५% होतो. १९४१ चे मानानें आताची अहमदाबाद गिरण्यांची परिस्थिति ज्यास्त वाईट झालेली नाहीं, असें सांगून कोर्टानें गिरणीवाल्यांचा अर्ज नामंजूर केला.

अहमदाबादच्या गिरणीवाल्यांच्या कैफियतीवरून, इंडस्ट्रिअल कोर्टाच्या निवाड्यावरून आणि अहमदाबाद येथील गिरण्या व कामगार ह्यांच्या आर्थिक परिस्थितीवरून असें दिसतें, कीं गिरणीवाल्यांस नफा भरपूर सुटत आहे; सरकारी नियंत्रणामुळें त्यास थोडाफार आळा बसला असला तरी अद्याप नफ्याचें प्रमाण कमी झालेलें नाहीं; कामगार सुस्थितींत आहेत; सरकारासहि कराचे रूपानें चांगली मिळकत होत आहे परंतु बिचाऱ्या सामान्य नागरिकास मात्र कापड खरीदतांना भरमसाट किंमत द्यावी लागत आहे. अहमदाबाद येथील सामान्य कामगारांसहि आतां ७३ रुपये महागाई भत्ता मिळणार आहे असें समजतें. मूळ पगार सुमारें ३० रुपये, महागाई भत्ता ७३ रुपये व वार्षिक बोनसचे सुमारें १०० रुपये मिळून कामगारांना दरमहा किमान १०० रुपयांवर प्राप्ती होऊं लागली आहे. पूर्वी महागाई भत्त्याचें मान ठरविण्याचें तत्त्व गिरणीवाले व कामगार संघ ह्यांच्या संमतीनें ठरलें, तेव्हां रहाणीच्या खर्चाच्या वाढीचे प्रमाणांत महागाई भत्ता वाढावा असें उभयपक्षानें मान्य केलें. रहाणीच्या खर्चाचें मान इतक्या भरमसाटपणें वाढेल, अशी गिरणीवाल्यांची तेव्हां कल्पना नव्हती व त्यामुळें कामगारांना द्याव्या लागणाऱ्या भत्त्याचा आंकडा त्यांना आतां जबर वाटूं लागला आहे. कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान वाढलें असलें, तरी महागाईमुळें व जिनसांच्या दुर्भिक्षतेमुळें पूर्वी ते ज्या जिनसा खरेदी करत असत त्या ते आतां विकत घेत नाहींत आणि त्या कारणानें कामगारांस मिळणारा भत्ता भरपूर ठरतो. इतका मोठा भत्ता देऊनहि त्याचा गिरणीवाल्यांच्या नफ्यावर प्रतिकूल परिणाम होत नाहीं, ह्याचा अर्थ काय? उत्पादन खर्च वाढला असला तरी विक्रीची किंमत त्याहिपेक्षा ज्यास्त वाढली आहे असा त्याचा निष्कर्ष आहे. म्हणजे, बिचाऱ्या गिऱ्हाइकाचे डोक्यावरच हा सर्व बोजा बसत आहे. कामगाराचा

महागाई भत्ता कमी झाल्यामुळें कापडाची किंमत उतरणार नसेल परंतु त्यामुळें गिरणीवाल्यांचा नफा मात्र कायम रहाणार असेल तर गिऱ्हाइकांस त्यापासून फायदा काय? इंडस्ट्रिअल कोर्टापुढें आलेल्या माहितीनें ह्या प्रश्नावर चांगला प्रकाश पाडला आहे.

## इनकम टॅक्सबाबत एक निवाडा

**कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स, मुंबई वि. सर होमी मेहता**

**हकीकत:—** ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स नांवाची एक लिमिटेड विमा कंपनी होती. सर होमी मेहता हे त्या कंपनीचे डायरेक्टर होते. कंपनीच्या एकूण शेअर्सपैकीं एकचतुर्थांश शेअर्स एकट्या सर होमींचे होते. सर होमी हे त्या कंपनीच्या मॅनेजिंग एजंटाचें काम करीत असत व त्याबद्दल त्यांस वेतनही मिळत असें. त्या कंपनीची आर्थिक परिस्थिति विशेष समाधानकारक नव्हती. त्यांत एक मोठी रक्कम भरण्याचा त्या कंपनीवर प्रसंग आला. तेवढ्या रकमेची सोय करणें तितकेसें सोपें नव्हतें. सर होमींनीं तेवढी रक्कम आपल्यापासून कंपनीस बक्षीस दिली. सर होमींच्या उत्पन्नांतून ती रक्कम वजा घातली पाहिजे किंवा नाहीं असा मुद्दा उत्पन्न झाला म्हणून इन्कम्‌टॅक्स कमिशनरनें हायकोर्टा-कडे हा रेफरन्स केला होता. व्यापार अथवा धंदा यांचें रक्षण करण्यासाठी खर्च करावी लागलेली रक्कम मजरा मिळूं शकते हें आम्हांस मान्य आहे; परंतु ज्या व्यापाराचें रक्षण करण्यासाठी सर होमींनीं रक्कम खर्च केली तो त्यांचा स्वतःचा व्यापार नसून त्या कंपनीचा होता. मॅनेजिंग डायरेक्टर ह्या नात्यानें त्यांस मिळत असलेल्या वेतनांत खंड पडूं नये ह्या उद्देशानें सर होमींनीं कंपनीस वादांतील रक्कम बक्षीस दिली असें आम्हांस वाटत नाहीं. सर होमींचा तसा उद्देश असता तर त्यांनीं ती रक्कम कंपनीस बक्षिसाऐवजीं कर्ज म्हणून दिली असती.

कंपनींत गुंतलेलें भांडवल, मॅनेजिंग डायरेक्टर ह्या नात्यानें मिळणारें वेतन व व्यापारांतील नांवलौकिक व कीर्ति ह्या सर्वांचें रक्षण करण्यासाठी सर होमींनीं वादांतील रक्कम खर्च केली असल्यामुळें ती मजरा मिळाली पाहिजे असा त्यांच्यातर्फे युक्तिवाद करण्यांत आला आहे. केवळ भांडवल व वेतन यांचे सुरक्षिततेसाठी जर सर होमींनीं वादांतील रक्कम खर्च केली असती तर कदाचित् त्यांना ती रक्कम मजरा मिळूं शकली असती, परंतु उद्योगधंद्यांत मिळविलेल्या लौकिक व कीर्ति यांस कालिमा लागूं नये ह्या प्रधान हेतूनें सर होमींनीं वादांतील रक्कम कंपनीस बक्षीस दिली ह्याबद्दल वाद नाहीं. कीर्ति व लौकिक यांचें जतन व्हावें म्हणून खर्च करण्यांत आलेली रक्कम मजरा मिळूं शकत नाहीं.

**मत:—** सबब वादांतील रक्कम सर होमींना मजरा मागतां येत नाहीं असें आम्ही आपलें मत देतों.

**सारांश:—** व्यापाऱ्यानें अथवा उद्योगधंदा करणाऱ्या इसमानें व्यापारांतील अथवा धंद्यांतील आपला लौकिक व कीर्ति कायम रहावी या उद्देशानें खर्च केलेली रक्कम त्यास इन्कम्‌-टॅक्स आकारतेवेळीं खर्चाचे सदरांत मजरा मिळत नाहीं.

("न्यायबोध" वरून)

## ग्रेट ब्रिटनमधील औद्योगिक वांधे

ग्रेट ब्रिटनमध्यें १९३६ ते १९४२ ह्या मुदतींत झालेल्या औद्योगिक वांध्यांत कामगारांचे किती दिवस वाया गेले त्याचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत; त्यावरून गेल्या सात वर्षांत १९१३ ते १९१९ च्या मानानें औद्योगिक वांध्यापासून कमी नुकसान झालेलें दिसतें. रहाणीचा खर्च आवाक्यांत ठेवून कामगारांना भरपूर वेतन देण्यांत आलें व कारखान्यांस प्राप्तिहि चांगली झाली त्याचा हा परिणाम आहे. खाली तुलनात्मक आंकडे दिले आहेत.

| वर्ष | वाया गेलेले कामाचे दिवस | वर्ष | वाया गेलेले कामाचे दिवस |
|---|---|---|---|
| १९१३ | ९८,००,००० | १९३६ | १८,३०,००० |
| १९१४ | ९८,८०,००० | १९३७ | ३४,१०,००० |
| १९१५ | २९,५०,००० | १९३८ | १३,३०,००० |
| १९१६ | २४,१०,००० | १९३९ | १३,६०,००० |
| १९१७ | ५६,५०,००० | १९४० | ९,४०,००० |
| १९१८ | ५८,८०,००० | १९४१ | १०,८०,००० |
| १९१९ | ३,४९,७०,००० | १९४२ | १५,३०,००० |

चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत औद्योगिक वांध्यांचें प्रमाण जरा वाढलेलें आढळतें.

## श्री. किणी यांचा इषारा*

"सध्यांची युद्धपरिस्थिति बदलून शांतता प्रस्थापित झाली, तरी कांहीं वर्षें बाजारभाव व व्यापार ह्यांत फारसा बदल होणार नाहीं व आपणांस व्यवहार आटोक्यांत आणण्यास सवड मिळेल, अशी कित्येकांची समजूत आहे. गेल्या महायुद्धानंतरच्या काळाचा अनुभव ह्या समजुतीचे मुळाशीं आहे. गेल्या महायुद्धानंतर २० महिनेपर्यंत किंमती चढत गेल्या; चालू युद्धानंतर २० तास सुद्धां त्या टिकणार नाहींत; सर्व किंमती कोसळून पडतील. ह्या आगामी वादळास तोंड देण्याची तयारी आतांपासूनच केली पाहिजे. पावसाळा संपल्यानंतर ब्रह्मदेशावर चढाई करण्याची योजना आखण्यांत आली आहे. ती हाणून पाडण्यासाठी जपान अगोदरच कांहीं हालचाल करणें अशक्य नाहीं. त्यामुळें जपानचा पराभव कांहीं चुकत नाहीं. परंतु कलकत्ता शहरावर मागे छोटासा बॉंब हल्ला झाला, तेव्हां खोबरेलाची किंमत २९० वरून २१० वर आली, हें लक्षांत ठेवा. झालेल्या नफ्यावर संतुष्ट रहा. सट्टेबाजी करूं नका." कॅनरा बँक लि. चे असिस्टंट सेक्रेटरी मि. किणी ह्यांच्या छोटेखानी निबंधाचा हा मथितार्थ आहे. कॅनरा बँकेचे जनरल मॅनेजर, श्री. पी. एस. नायक, ह्यांनीं त्यास प्रस्तावना लिहिली असून, बँकांनीं कोणती खबरदारी घ्यावी, तें सुचविलें आहे. रेल्वेनें व आगबोटीनें माल पाठवून, मालाचे किंमतीची हुंडी काढण्यांत येते व ही हुंडी बँक विकत घेते. परंतु, विशिष्ट परि-स्थितींत वहातुकीच्या साधनांत व्यत्यय येतो व मालाची किंम-तहि एकदम उतरते, अशा वेळीं बँकांनीं बरीच रक्कम अडवान्स घेण्याची पद्धत ठेवणें जरूर आहे अशी त्यांची सूचना आहे.

* लेखक:—श्री. एम. एम. किणी, पृ. सं. २०, किंमत ८ आ.

# स्फुट विचार

## सिंधमधील महापुराच्या आपत्तीस जबाबदार कोण ?

गेल्या वर्षीच्या पावसाळ्यांत सिंधू नदीस पूर येऊन सिंधमधील एक तृतीयांश शेती पाण्याखाली बुडाली व हजारो घरें नाश पाऊन मालमत्तेचें प्रचंड नुकसान झालें. ह्या पुरासंबंधीं चौकशी करण्याकरितां सर जी. डेव्हिस, सिंध चीफ कोर्टाचे चीफ जज्ज, ह्यांचें एक चौकशी कोर्ट नेमण्यांत आलें होतें. सक्कर धरणाचे वरचे बाजूस नदीवर बांधलेला महंमदाबाद हा बंधारा नीट तयार करण्यांत आला नव्हता, असें चौकशी कोर्टास आढळून आलें. नदीच्या पाण्याच्या पातळीचे वाढीचे प्रमाणांत बंधाऱ्याची उंची १९४० व १९४१ मध्यें वाढविण्यांत आली नाहीं; पुराचे वेळीं बंधारा कांहीं ठिकाणीं फोडण्यांत आला तें योग्य झालें परंतु खिंडारें बंद करणें आवश्यक होतें, इत्यादि गोष्टी नमूद करून सिंधू नदीच्यावरील धरण व पाटबंधारें ह्यांवर लक्ष ठेवणाऱ्या सध्याच्या कमिशनची घटना बदलावी व त्याचें काम सुधारण्यांत यावें, असें चौकशी कोर्टानें सुचविलें आहे. सिंधू नदीवर सिंधप्रांताचें सबंध भवितव्य अवलंबून आहे, असें असतांहि कमिशननें आपलें काम जबाबदारीनें बजावलेलें नाहीं असें चौकशी कोर्टानें नमूद केलें आहे. कमिशनच्या सभा क्वचितच भरत असत, कित्येक महत्त्वाच्या बाबींसंबंधीं कमिशन पत्रव्यवहारानेंच निर्णय करी, त्या कारणानें सभासदांस नीट विचारविनिमय करण्यास [illegible] प्रत्यक्ष सभासदांपुढें विचारासाठीं आला असता, तर कमिशन योग्य त्या सूचना देऊं शकलें असतें व आपत्ती टळली असती, असें चौकशी कोर्टानें म्हटलें आहे. महमदाबाद बंधारा बांधणारे कंत्राटदार, त्याचप्रमाणें कांहीं सुपरिंटेंडेंट व एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर ह्यांनीं आपलें काम नीट बजावलें नाहीं, असा कोर्टाचा शेरा आहे.

---

## विमा कायद्याच्या २९ व्या कलमाचा अर्थ

हिंदी विमा कायद्याच्या २९ व्या कलमानें कंपनीला तिचे मॅनेजिंग एजंट, अॅक्चुअरी, ऑडिटर व ऑफिसर ह्यांस कर्ज देण्यास प्रतिबंध केलेला आहे. ह्या ऑफिसरची व्याख्या हिंदी कंपनी कायद्यानें केली आहे, त्यांत डायरेक्टर, मॅनेजर, मॅनेजिंग एजंट व सेक्रेटरी ह्यांचा समावेश होतो. " ऑफिसर " शब्दाचें अधिकृत स्पष्टीकरण आतांपर्यंत झालें नव्हतें. ह्यासाठीं विमा कंपन्यांनीं सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे विचारणा केली. सुपरिंटेंडेंटनें आतां एक सर्क्युलर काढून, सरकारच्या मतें विमा कंपनीचा " ऑफिसर " कोण ह्याचा खुलासा केला आहे. " ऑफिसर " ह्याची कायदेशीर व्याख्या करणें कठीण आहे, परंतु विमा कंपनीचे नोकरींत असलेल्याचा मासिक पगार सर्व अलावन्सेस धरून २५० रुपयांपेक्षा जास्त नसेल, त्यास केवळ मदतनीस, कारकून अथवा शिपाई असें संबोधण्यांत येत असेल, शिपायाखेरीज इतर कोणाच्याहि कामावर देखरेख करण्याचें काम त्याचेकडे नसेल व त्यास आपल्या कामांत कारकून अथवा मदतनीस ह्यांची प्रत्यक्ष मदत होत नसेल, अशास दिलेलें कर्ज गैरवाजवी आहे, असें सुपरिंटेंडेंट म्हणणार नाहीं. ह्यासंबंधांतील अटीहि त्यांनीं सर्क्युलरमध्यें नमूद केल्या आहेत. कर्जदार नोकराचें कर्ज व त्यावरील व्याज ह्यांची बेरीज केव्हांहि त्याच्या दोन महिन्यांच्या पगारापेक्षा ज्यास्त भरता कामा नये, व कर्ज आणि व्याज हीं कमाल २४ मासिक हप्त्यांत वसूल झालीं पाहिजेत. आपल्या पॉलिसींवरील कर्जांवर ज्या दरानें कंपनी व्याज आकारते त्यापेक्षा ह्या कर्जावरील व्याजाचा दर कमी असतां कामा नये. बॅलन्स शीटच्या मुदतींत ह्या अटींचा केव्हांहि भंग झाला नाहीं, असें डायरेक्टरांनीं व ऑडिटरांनीं बॅलन्स शीटबरोबर सर्टिफिकेट दिलें पाहिजे. विमा कंपनीनें ह्या संबंधांतील अटी मोडल्या तर तिला दिलेल्या वरील सवलती रद्द करण्याचा अधिकार सुपरिंटेंडेंटनें स्वतःकडे राखून ठेवला आहे. सरकारनें ठरवून दिलेली कर्जाची मर्यादा व कर्जावरील अटी हीं आणखी सढळ असणें जरूर आहेत, अशी विमा कंपन्यांची मागणी आहे. कर्ज मिळण्यास पात्र असलेल्यांची संख्या ज्यास्त असावी, ह्या दृष्टीनें " ऑफिसर " शब्दाची व्याख्या मर्यादित करावी, असेंहि कंपन्यांचें म्हणणें आहे.

---

## लिमिटेड कंपनीचा ग्रामोद्योग

ग्रामोद्योग संवर्धक मंडळ, लि. लिंब–गोवा, जि. सातारा, ह्या मंडळाच्या लोकसेवा व्हीव्हिंग मिल्सचा चवथ्या व पाचव्या वर्षाचा ३१–७–४३ अखेरचा अहवाल व ताळेबंद आमचेकडे आला आहे. १९४१–४२ हें वर्ष मशिनरीच्या अडचणींमुळें व स्थानिक प्रतिकूल परिस्थितीमुळें गिरणीस वाईट गेलें, परंतु १९४२-४३ हें वर्ष बरेंच समाधानकारक गेलें. मंडळाचें वसूल भांडवल ५,९०० [illegible] हजारांच्या ठेवी आहेत. १९४२-४३ मध्यें मंडळानें ३९½ हजार रुपयांची कापडाची विक्री केली व १६½ हजारांचा तयार व कच्चा माल शिल्लक आहे. मशिनरीवरील घसारा ७४६ रुपये काढून निव्वळ नफा १०६७ रुपये झाला आहे. भागीदारांना चवथ्या व पाचव्या वर्षाचें मिळून ९% डिव्हिडंड मिळणार आहे. १२० रुपये रिझर्व्ह फंडांत जाऊन ४३६ रुपये शिल्लक नफा पुढें ओढण्यांत येईल. लिंब गांवांतील मिलचा हा उपक्रम कसा यशस्वी होत आहे, हें वरील वृत्तान्तावरून लक्षांत येईल.

---

## १९४२–४३ मधील साखरेचें उत्पादन

हिंदुस्थानांत १९४२–४३ मध्यें एकूण १०,७०,००० टन साखरेचें उत्पादन झालें. १९४०–४१ मध्यें १०,९५,४०० टन साखर तयार झाली होती व १९४१–४२ मधील उत्पादनाचा आकडा ७,७८,१०० टन होता. लोकांमध्यें साखरेचा वाढता खप, वाढती लष्करी मागणी, लष्करी फौजांसाठीं निर्गतीची जरूरी, इत्यादि कारणांमुळें १९४२–४३मध्यें साखरेचें उत्पादन वाढविण्याचा कसून प्रयत्न करण्यांत आला. तथापि, उसाचा तुटवडा व गुळास आलेला चांगला बाजारभाव, ह्यांमुळें साखर कारखान्यांस ऊंस विकण्याचें आकर्षण शेतकऱ्यांस राहिलें नाहीं. गुळाचा भाव उतरविणें, गुळाच्या वहातुकीवर नियंत्रण घालणें, गुळाचे वायद्याचे व्यवहार बंद करणें, साखरेची किंमत वाढविणें, दरमणी उसाची किंमत वाढविणें, इत्यादि मार्गांचा त्यामुळें अवलंब करून ऊंस साखर कारखान्यांत आकर्षावा लागला. उताऱ्याचें प्रमाण बिहारमध्यें ११%, संयुक्त प्रांतांत १०·२%, व इतर ठिकाणीं १०% आढळलें. सबंध हिंदुस्थानाचें उताऱ्याचें प्रमाण १०·२८% पडलें; त्या पूर्वीच्या वर्षी तें ९·६९% होतें.

## ब्रिटिश विश्वविद्यालयांतील विद्यार्थी

ग्रेट ब्रिटनमधील ऑक्सफर्ड व केंब्रिजसारख्या विश्वविद्यालयांतील विद्यार्थी बडेबापके बेटेच असतात अशी तक्रार करण्यांत आली आहे. तथापि, ह्या शिक्षण संस्थांतील बरेचसे विद्यार्थी शिष्यवृत्तींच्या सहाय्यानें आपला अभ्यासक्रम चालवतात. युद्धापूर्वींच्या सालीं म्हणजे १९३८-३९ मध्यें इंग्लंड, स्कॉटलंड व वेल्स ह्यांमधील सर्व विश्वविद्यालयांत मिळून ११ हजार पुरुष विद्यार्थी व ४ हजार विद्यार्थिनी दाखल झाल्या. त्यांपैकी ४० टक्के सामान्य शाळांतून शिकून वर आलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी होत्या. ब्रिटिश विश्वविद्यालयांत श्रीमान् कुटुंबांतील मुलांची मक्तेदारी नसून त्यांत सामान्य स्थितींतल्या विद्यार्थ्यांसहि प्रवेश मिळतो हें सांगण्याचा वरील माहिती देणाऱ्या एका इंग्लिश साप्ताहिकांतील लेखकाचा उद्देश आहे. श्रीमान् लोकांस आपलीं मुलें कॉलेजांत पाठवणें सहज परवडतें आणि तेथें शिकून हे तरुण मोठ्या पगाराच्या जागा पटकावूं शकतात अशी इंग्लंडमध्यें अनेक वर्षांची तक्रार आहे, हें येथें सांगणें आवश्यक आहे.

---

## मुंबईमधील गिरण्यांचा प्रचंड नफा

मुंबईच्या गिरणी मालक संघानें आपल्या संघांतील ६८ गिरण्यांचे १९४१ चे हिशेब एकत्रित करून व त्यांचा संयुक्त ताळेबंद व नफातोटा पत्रक हीं तयार केलीं आहेत. त्यावरून असें दिसतें, कीं ६८ गिरण्यांना एकूण ६ कोटि, ९४½ लक्ष रुपये नफा झाला. मॅनेजिंग एजंटांनीं त्यांस मिळावयाचा अलावन्स व कमिशनपैकीं १ लक्ष, ९७ हजार रुपये सोडून दिले आहेत, ते दिले नसते तर नफा ६ कोटि, ९२½ लक्ष रुपये राहिला असता. खालील तक्त्यांत पांच वर्षांचे तुलनात्मक आकडे दिले आहेत:–

| वर्ष | नफा अथवा तोटा रु. |
|---|---|
| १९३७ | –१८४३८८४ |
| १९३८ | +२१,४६,००० |
| १९३९ | –२८,९४,६५८ |
| १९४० | +५०,७२,२७२ |
| १९४१ | +६,९४,२७,७५० |

---

## प्रांतिक सरकारांच्या कर्जाची आजची परिस्थिति

३१-३-४३ रोजीं नवीं कर्जें उभारलेल्या चार प्रांतांची कर्जपरिस्थिति काय होती, हें खालील आकडे दर्शवितात.

| | एकूण कर्ज ( कोटि रु. ) |
|---|---|
| मुंबई | २५·८१ |
| पंजाब | ३८·५१ |
| मद्रास | १६·७५ |
| मध्यप्रांत | ६·१८ |

## कॅप अँड कं. लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ३४½ लक्ष रुपयांची विक्री करून ३½ लक्ष रुपये नफा मिळविला. त्यापूर्वींच्या वर्षी २४½ लक्ष रुपयांची विक्री होऊन १½ लक्ष रुपये नफा झाला होता.

---

## पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल २४,५४१ रुपये आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें २८,२५० रुपयांचीं २४ नवीं कर्जें दिलीं. वर्षअखेर २९% येणें मुद्दल व १९% येणें व्याज थकबाकी सदरांत होतें. १९४० सालापासून असलेल्या प्रांतिक बँकेच्या थकबाकीची फेड अहवालाचे वर्षी पूर्णपणें झाली आहे. ५० लवादी प्रकरणें शिल्लक असून त्यांत गुंतलेली रक्कम ६५ हजार रुपये आहे. वर्षअखेर १,६१८ रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस १½% डिव्हिडंड मिळेल.

## श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

वरील बँकेचें भाग भांडवल ६३,१४० रुपये असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड ९२½ हजारांचे आहेत. ठेवींचा आकडा ९½ लक्ष रुपये झाला आहे. बँकेच्या शिल्लकीपैकीं १ लक्ष, ३७ हजार रुपये रोख व बँकांत असून १ लक्ष, २३ हजार रुपये बँकांत मुदतबंद ठेवींत व ५ लक्ष, ६५ हजार फलटणच्या सरकारी खजिन्यांत 'ठेव' म्हणून आहेत. एकूण २ लक्ष, ७७ हजारांचें कर्ज दिलेलें आहे. त्यांपैकीं १ लक्ष, ८१ हजार रुपये सहकारी पेढ्यांकडून येणें आहे. वर्षअखेर थकबाकी ६० हजारांनीं कमी झाली. वर्षअखेर बँकेस १०,७३३ रुपये नफा झाला. भागीदारांस ६½% डिव्हिडंड मिळणार आहे.

## धुळें अर्बन को. बँक, लि., धुळें

वरील बँकेचें वसूल भांडवल ९६ हजार रुपये असून तिचे [illegible] ४½ लक्ष रुपये आहे. बँकेच्या एकूण ७½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं २ लक्ष रुपये रोख व बँकांत शिल्लक आहेत. १½ लाखांचे सरकारी व इतर रोखे आहेत व सुमारें ३ लक्ष रुपये सभासदांना कर्जाऊ दिलेले आहेत. वर्षअखेर १ लक्ष, ७½ हजारांची थकबाकी आहे. थकबाकीचा आकडा सालोसाल कमी होत चालला आहे. वर्षअखेर बँकेस १५,३८८ रुपये नफा झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड सुचविण्यांत आलें आहे.

## अर्बन को. बँक लि., सांगली

अहवालाचे वर्षी ( जून, १९४२ ते मे, १९४३) वरील बँकेचें भांडवल ४०½ हजार रुपयांवरून ६१ हजारांवर गेलें. ठेवींतहि ५०% वाढ होऊन त्यांची रक्कम ५½ लक्ष रुपये झाली. बँकेनें ४½ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. थकबाकीचें कर्जाशीं प्रमाण २.९% पडतें. अहवालाचे सालीं बँकेस निव्वळ नफा ६,३९२ रुपये झाला. भागीदारांस ६½% डिव्हिडंड मिळालें.

## सहकारी गणेशोत्सव, बारामती

वरील सहकारी गणेशोत्सवाच्या पांचव्या वर्षाच्या दहा दिवसांत स्थानिक लोकांचे अनेक कार्यक्रम करण्यांत आले होते. ह्यांत गायन, भजन, प्रवचन, सनईवादन, ऑर्केस्ट्रा व पोवाडे इत्यादि निरनिराळे कार्यक्रम, श्री. धारपसाहेब, श्री. पवार साहेब प्रेसिडेंट व श्री. वासारकर सेक्रेटरी यांचे नेतृत्वाखालीं उत्साहानें पार पडले. कार्यक्रम सर्वांस खुले होते. शेवटच्या दिवशीं श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनीं उत्सवास मदत करणारांचे मन:पूर्वक आभार मानले.

## तरुण धंदेवाल्याचें समोंवार निरीक्षण

संपादक महाशय ' अर्थ ' यांसी—

सा. न. वि. वि. आपल्याला लिहावें असें बरेच दिवस मनांत आहे. पण पुरेशी फुरसत सांपडत नाहीं. अन् कांहींशी भीतिही वाटते.

आपण व आपले वाचक विद्वान्, व्यवसायी, अधिकारी. मी लिहिलेलें वाचतील अन् म्हणतील, "अनुनभवी अपरिपक्व तरुण लिहित आहे कांहीं तरी." असेलही कदाचित् तसें. म्हणूनच आपल्याला विचारण्याचा मोह अनिवार होतो. वाटतें, असें कां ? असें कसें चालेल ? अन् किती दिवस ?

कॉलेजमध्यें असतांना अर्थशास्त्र माझा आवडीचा विषय होता. त्याच्या परिशीलनानेंच असेल कदाचित्. उद्योगधंदे, व्यापार-उद्दीम मला जिव्हाळ्याचे वाटतात. आपल्या महाराष्ट्रापासून मी दूर राहातों. त्यामुळेंच कीं काय मला त्याचा कमालीचा अभिमान वाटतो. आपल्याकडील वर्तमानपत्रें, मासिकें कधीं कधीं वाचायला मिळतात. बरेचदां कांहीं मंडळी भेटतात. तेव्हांहि आपल्याकडील थोडी-बहुत माहिती कळते.

आपण महाराष्ट्रीय मंडळी बुद्धिवादी मानसन्मानानें राहाणारी. गेल्या पिढीपर्यंतचा नोकरीचा विशेषत: सरकारी नोकरींतील मानमरातब अन् भरपूर पगार आतां राहिले नाहींत. सहजच नवीन क्षेत्रांत चमकण्याचे प्रयत्न होऊं लागलेले दिसतात.

गेल्या २५-३० वर्षांत महाराष्ट्रांतील औद्योगिक क्षेत्रांतील प्रयत्न वाढत्या प्रमाणावर आढळतात. राजकारण व इतर चळवळी यांतहि पैसा बोलत असल्याचेंच अधिकाधिक प्रत्ययास येत आहे. महाराष्ट्र यशस्वी राजकारण लढवूं पहात असेल तर तें महाराष्ट्र संपन्न होण्यानेंच शक्य आहे. अन् आर्थिक संपन्नता यशस्वी उद्योगधंदे व व्यापार याशिवाय येणें शक्य नाहीं !

गेल्या तपा-दोन तपांतील प्रगति स्पृहणीय तर खरीच शिवाय चालू युद्धांत बहुतेक सर्व धंद्यांना विशेषच चलती आलेली दिसते. पण युद्धोत्तर चढाओढीच्या काळांत टिकून राहाण्याची कुवत आली आहे कां त्यांच्यांत ?

महाराष्ट्रीय भांडवलानें, महाराष्ट्रीयांनीं चालविलेले बरेच कारखाने आज आहेत. कांहीं चांगल्या नांवारूपासहि चढले आहेत. पण किती ? एकाच कुटुंबांतील १०-१२ अधिकारी माणसांनीं चालविण्याएवढेच मोठे ! परदेशांतील व कांहीं परप्रांतीय कारखाने पाहिल्यावर वाटतें कीं आपल्याला अजून कितीतरी मोठें व्हावयाचें आहे, असंच नाहीं का ? युद्धकाळांत परदेशी चढाओढ नाहीं; उत्पादनांत नवनवीन अडचणी येत आहेत तरी वाढलेल्या उत्पादन किंमतीच्या मानानें विक्रीची किंमत बरीच येत असल्यानें कारखान्यांना नफाहि बराच येत आहे. या निव्वळ नफ्याचा विनियोग कंपनीला स्थैर्य आणण्याकडे, उत्पादन वाढविण्याकडे, तयार मालाचा दर्जा सुधारण्याकडे, नवीन सुधारणा आत्मसात् करून घेण्याकडे, संशोधनाकडे करावयाचा कीं, धंद्यांत मिळविलेला पैसा त्या धंद्याच्या व्यतिरिक्त इतरत्र—केवळ समाजांत नांव होण्याकरितां—करावयाचा ?

धंद्याला एक तपहि झालें असेल नसेल. मालांत सुधारणा अजून कितीतरी होणें शक्य आहे, आवश्यक आहे. परदेशी मालाशीं टक्कर देण्याकरितां मालाच्या दर्जाप्रमाणेंच विक्रीच्या किंमतींतहि कोशीस करणें अगत्याचें व निकडीचें आहे. विक्रीची व्यवस्था मजबूत व भक्कम पायावर अजून करावयाची आहे. धंद्यांतील यश अजून मिळालेलें नाहीं. त्यांतील मर्म उकलून त्याबाबतचे विचार अजून निश्चितसे झालेले आहेत असें वाटत नाहीं. अशा स्थितींत केवळ वेळेवर व्याज व ठरीव डिव्हिडंड दिल्यानें जनतेचा विश्वास संपादन केल्याचा समाधानाचा पहिला उंच्छ्वास सहि निघाला नाहीं तोंच जनतेच्या विश्वासास वेठीला धरून अधिक भांडवल जमा करून, स्वत:च्या धंद्याशीं तादृशहि संबंध नसलेल्या धंद्यांत रकमा ओतण्याचे प्रयत्न प्रशंसनीय किती ठरतील? कांहीं युरोपियन व देशी कंपन्या एकाच नांवाखालीं अनेक प्रकारचे उद्योगधंदे चालवितांना आढळतात. पण त्यांचे व्याप्ति केवढे, भांडवल केवढें, अधिकारी माणसें किती व कोणत्या दर्जाचीं ? मोठ्या व्यापाला मोठें भांडवल लागतें. युद्धोत्तर काळांत तर धंद्यांतील अधिकारी माणसें अधिकच अनुभवी व मर्मज्ञ असलीं पाहिजेत. अशीं माणसें मिळविण्याची, अन् त्याहून तीं टिकवण्याची कला सोपी नाहीं, अन् ह्या सर्वांना कालावधीची किमान मर्यादा आहेच कीं नाहीं ?

महाराष्ट्रीय कारखानदार आहेत; पण महाराष्ट्रीय व्यापारी फारच कमी आहेत. कारखानदाराला त्याच्या मजुरीपेक्षां किती अधिक-कमी द्यावयाचें हें सर्वसाधारणपणें व्यापाऱ्यांकडून ठरविलें जातें ! आपल्याला अजून विक्रीचें तंत्र समजावून घ्यावयाचें आहे ! तें पचवावयाचें आहे ! !

आपला

" संजय "

### पुणें सं. को. बँक, लि.

वरील बँकेची वार्षिक सभा रविवार, ता. २६ सप्टेंबर रोजीं भरली होती. व्यक्तिश: सभासदांतर्फे खालील गृहस्थ पुढीलप्रमाणें मतें मिळून बोर्डावर निवडून आले:—श्री. तुळशीबागवाले, ५७२; रावसाहेब खोले, ५५६; श्री. पाटंदे, ५४३; श्री. करंदीकर, ५०३; श्री. ओगले, ४९१; श्री. बापट, ४७१; श्री. जोशी, ४२१. रावसाहेब खोले व श्री. दादासाहेब दळवी ह्यांची अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून एकमतानें निवड झाली. श्री. अभ्यंकर व श्री. आपटे ऑडिटर्स नेमण्यांत आले. भागीदारांस ४½% डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें.

### पुणें पोस्टल को. बँक लि.

वरील बँकेच्या पटावर १,०६६ सभासद असून त्यांचें भाग भांडवल २७,८२२ रुपये आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड ११,९२५ रुपयांचा आहे. ठेवींचा आकडा ४१½ हजार रुपये असून काटकसर फंड २ लक्ष, ६ हजार रुपये आहे. बँकेनें १ लक्ष, १९ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत, त्यांपैकीं ६४ हजार रुपये जातजामीनकीवर, ५०½ हजार रुपये काटकसर फंडाचे तारणावर व ४½ हजार रुपये पोस्टल विमा पॉलिसींचे तारणावर आहेत. बँकेस गेल्या वर्षी २,१२२ रुपये नफा झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळेल. अहवालाचे वर्षी बँकेच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ झाला. बँकेनें धान्याचें दुकान सुरू केलें त्याचा फायदा पोस्ट आणि टेलिग्राफ खात्यांतील ९०० कुटुंबांनीं घेतला. १९-१०-४२ ते ३०-६-४३ ह्या मुदतींत दुकानास १,३८१ रुपये नफा झाला, त्याचा भागीदारांस अंश १% डिव्हिडंडचे स्वरूपांत मिळणार आहे.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२१ ए, सदाशिव, पुणें २.

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.
महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस्
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगाव,
बॅक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
' रामनिवास ' लक्ष्मी रोड,
पुणें शहर

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्रकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला
होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां
जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.,
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गानिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १३ आक्टोबर, १९४३ अंक ४१


" किर्लोस्कर "

मजबूत व शास्त्रशुद्ध रचना

१ साईड सक्शन पंप
२ हॉरिझाँटल स्प्लिट केस
( सिंगल व टू स्टेज पंप )
३ नॉनक्लॉगिंग पंप

याखेरीज गिरण्या व कारखाने
यांच्या खास उपयोगाचे

सेंट्रिफ्यूगल पंप



दर मिनिटास १० ग्यालन पासून २,००० ग्यालन पाणी काढणारे

क्याटलाग मागवून घ्या.

किर्लोस्कर बंधु, लि. : : : पो. किर्लोस्करवाडी.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चात काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

**Local Self-Government Service**

Applications are invited from candidates desirous of joining L. S. G. D. Diploma Training Classes for officers of Local Self-Government Service conducted under the joint auspices of this Institute and the Government of Bombay which commence on 10th November 1943 at Bombay. Classes will also be opened at Poona and Ahmedabad if sufficient number of students apply to be admitted at these centres. Prospectus can be had from: The Director, Local Self-Government Institute, 11 Elphinstone Circle, Fort, Bombay.

# विविध माहिती

### अमोनियम सल्फेटचें हिंदुस्थानांत उत्पादन

अमोनियम सल्फेटचें हिंदुस्थानांत उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता सरकारास पटली आहे. सध्या हिंदी कारखान्यांत दरसाल ३० हजार टन सल्फेट तयार होतें. ३½ लक्ष टन सल्फेट तयार होऊं लागेल तेव्हां कोठें हिंदुस्थानाची खरी गरज भागेल. सल्फेटचे कारखाने काढण्यापूर्वी त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री परदेशांतून आली पाहिजे. ती मिळविण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे.

### अमेरिकेची खंड-उसनवार मदत

अमेरिकेनें ऑगस्ट, १९४३ मध्यें संयुक्त राष्ट्रांना खंड-उसनवार पद्धतीनें १६२ कोटि डॉलरांची मदत केली. जुलै, १९४३ मधील मदतीची किंमत १०५ कोटि डॉलर होती. १९४१ सालीं खंड-उसनवार मदतीची योजना सुरू झाली तेव्हांपासून आतांपर्यंत अमेरिकेनें त्या योजनेप्रमाणें १९½ अब्ज डॉलर्सची मदत आपल्या दोस्तांस केली आहे.

### पोलादाचें अमेरिकन उत्पादन

गेल्या महायुद्धाच्या वेळेच्या मानानें आतां अमेरिकेचें पोलादाचें उत्पादन ५७% वाढलें आहे.

### अहमदाबाद येथें रेशनिंग

बहुतेक मुंबईच्या नमुन्यावर अहमदाबाद येथें १ जानेवारी १९४४ च्या सुमारास रेशनिंग सुरू होईल.

### विमानांचें वाढतें उत्पादन

अमेरिकेंत ऑगस्ट, १९४३ मध्यें ७,६१२ विमानें तयार झालीं; सप्टेंबर, १९४३ मध्यें विमानांचें उत्पादन ८ हजारांच्या आसपास झालें.

### अमेरिकेंत सिगारेट्सचा तुटवडा पडणार ?

अमेरिकेंत सिगारेट्सचा तुटवडा पडण्याचा संभव आहे, कारण पुरवठ्याच्या मानानें मागणी पुष्कळच ज्यास्त आहे. १९४४ व १९४५ साठी राखून ठेवलेल्या तंबाखूच्या सिगारेट्स आजच तयार करणें तेथें भाग पडत आहे.

### न्यूयॉर्कमधील दूधपुरवठा

न्यूयॉर्क येथील ३½ लक्ष कुटुंबांना ३,५०० दूधवाल्यांच्या संपामुळें कांहीं काळ अजिबात दूध मिळालें नाहीं.

### टोळधाड तज्ज्ञ

ब्रिटिश टोळधाड तज्ज्ञ, डॉ. केनेडी, हे हिंदुस्थानांत दाखल झाले आहेत. टोळधाडींच्या प्रतिबंधक उपायासंबंधीं त्यांचें निरीक्षण चालू आहे.

### पेट्रोलच्या उपयोग करणारांस सूचना

सध्या हिंदुस्थानांत सामान्यत: मिळणारें पेट्रोल स्वैंपाकासाठी, दिव्यासाठी व जिनसा स्वच्छ करण्यासाठी वापरणें धोक्याचें आहे; कारण त्यांत आतां शिसें मिसळलेलें असतें. हें पेट्रोल मोटारींच्या जळणासच उपयोगी आहे. कित्येक लोक कपड्यांच्या ड्रायक्लीनिंगसाठी, डाग काढण्यासाठी, स्टोव्हमध्यें व दिव्यांत पेट्रोल वापरतात, त्यांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष द्यावें.

### "अधिक धान्य पिकवा"च्या मोहिमेसाठी स्त्री तज्ज्ञाची नेमणूक

ज्यांच्या घराभोंवती मोकळी जागा आहे अथवा ज्यांचे जमिनीचे तुकडे पडून आहेत, अशांना भाजीपाला व धान्य लावण्यासंबंधीं सल्ला देण्याकरितां मुंबईच्या राष्ट्रीय युद्ध आघाडीनें मिसेस लीला बोस, एफ. आर. एच. एस. (लंडन) ह्यांची प्रॅपिगँडा अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

### बंगालमध्यें दररोज २,१०० टन धान्याची आयात

बंगालमधील धान्याचा दुष्काळ दूर करण्याकरितां त्या प्रांतांत दररोज २,३०० टन धान्य पाठविण्यांत येत आहे, असें हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि हे मुंबई येथें नुकतेच म्हणाले.

### पोस्टांतील कमाल ठेवीची मर्यादा

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंतील खात्यांत वर्षांतून ७५० रुपयांपेक्षां जास्त रक्कम ठेवतां येत नसे. ही मर्यादा वाढवून १ हजार रुपये करण्यांत आली, त्याचा फायदा १७ हजार ठेवीदारांनीं घेतला व त्यामुळें ठेवींत ८८ लक्ष रुपयांची वाढ झाली. १९४२-४३ मध्यें कित्येक ठेवीदारांनीं ७५० रुपयांचे आसपासच रक्कम खात्यांत भरली. ह्याचा अर्थ, त्यांस कमाल ठेवीची मर्यादा वाढली आहे, ह्याची माहिती नव्हती असाच होतो.

### शत्रुराष्ट्रांच्या किती आगबोटी नष्ट झाल्या ?

जर्मनी व इटली ह्यांच्या ९०½ लक्ष टनांच्या आगबोटी ३० जून १९४३ अखेर युद्धाच्या ४६ महिन्यांत संयुक्त राष्ट्रांनीं पकडल्या, बुडवल्या अथवा नादुरुस्त केल्या. रशियाच्या कर्तबगारीचा वरील आकड्यांत समावेश झालेला नाहीं.

### पोलंडची हानि

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत पोलंडचे ९ लक्ष सैनिक कामास आले आहेत. जर्मनीनें २ लक्ष सैनिक ठार अथवा जखमी केले व ४½ लक्ष सैनिक कैद केले. रशियानें १० हजार अधिकाऱ्यांसकट एकूण १ लक्ष, ८१ हजार पोलिश सैनिक पकडले व २० हजार सैनिकांस ठार केलें.

### रेल्वेचीं वापरलेलीं तिकिटें

लंडन, मिडलंड ॲन्ड स्कॉटिश रेल्वेनें गेल्या वर्षी उतारूंनीं वापरलेलीं १५,६४,९८,७४१ तिकिटें गोळा केलीं, त्यांचें वजन १२२ टन भरलें.

### बनावट ऑक्झॅलिक ॲसिड

ऑक्झॅलिक ॲसिडच्या नांवाखालीं पोटॅशियम बायसल्फेट मोठ्या प्रमाणावर बाजारांत विकलें जात आहे, ह्या गोष्टीकडे जनतेचें लक्ष वेधणारें पत्रक हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यानें प्रसिद्ध केलें आहे. ग्राहकांनीं त्याची रासायनिक खात्री करून घेऊनच तें विकत घेणें आवश्यक आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३२२ | इंचा खर्च-महाराष्ट्रांतील विकास पावसाची अनुकूलता-युद्ध आणि हिंदी आर्थिक संसार | |
| २ चलन आणि युद्धखर्चाची वाटणी ... | ३२३ | ७ तैलचित्राचें अनावरण | ३२६ |
| ३ पोषण सल्लागार समितीच्या सूचना ... | ३२४ | ८ तरुण धंदेवाल्याचें सभोवार निरीक्षण ... | ३२७ |
| ४ शेकडा साठ लोकांची उपासमार... | ३२४ | ९ पू. म्हा. सें. बँक ... | ३२७ |
| ५ शेअर बाजार ... | ३२४ | | |
| ६ स्फुट विचार ... रस्ते-जपानविरुद्ध चढा- | ३२५ | | |


# अर्थ

बुधवार, ता. १३ आक्टोबर, १९४३

## चलन आणि युद्धखर्चाची वाटणी

### "एकॉनॉमिस्ट" ची टीका

युद्धजन्य परिस्थितीमुळें हिंदुस्थानाकडे जी आर्थिक कामगिरी आली आहे ती पार पाडली जाण्यांत चलन विस्तार आवश्यक झाला आहे आणि ह्या विस्तारास स्टर्लिंग पौंडांचा भरपूर आधार असला तरी त्याचे योगानें लंडनमधील हिंदी शिलका वाढत आहेत आणि देशांत महागाईस उत्तेजन मिळत आहे ह्या गोष्टीचें विवेचन "अर्था"त वेळोवेळीं करण्यांत आलें आहे. सदरहु परिस्थितीवर सरकार कोणते उपाय योजीत आहे आणि त्यानें त्या बाबतींत कोणतें धोरण स्वीकारलें पाहिजे ह्याची माहितीहि देण्यांत आली आहे. हा विषय इतका महत्त्वाचा व निकडीचा आहे कीं, "एकॉनॉमिस्ट" ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश साप्ताहिकानें अलीकडे त्यावर लेख लिहून सरकारच्या चलनसंबंधी धोरणावर टीका केली आहे व स्वतःच्या अशा सूचनाहि केल्या आहेत. ही टीका द्विविध आहे. ब्रिटिश सरकार व हिंदुस्थान सरकार ह्यांचे दरम्यान येथील युद्धखर्चाच्या वाटणीबाबत जो करार झाला आहे तो सदोष आहे, कारण, कर व कर्ज ह्यांचे मार्गानें भरपूर पैसा उभारण्यास हिंदी सरकारास उद्युक्त करण्याचें सामर्थ्य ह्या योजनेंत नाहीं; आणि दुसरें, ब्रिटिश सरकारकडून खर्चाचा पैसा वसूल करण्याची त्यांतली तजवीज गैरसोय उत्पन्न करणारी आहे असें वरील पत्राचें म्हणणें आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांमध्यें चलनाचा विस्तार व महागाई ह्यांचे बाबतींत हिंदुस्तानचा पहिला नंबर आहे. इतर देशांप्रमाणें येथें बाजारभावांचें, खरेदी-विक्रीचें व मालाच्या उपयोगाचें नियंत्रण विशिष्ट परिस्थितीमुळें शक्य झालेलें नाहीं, परंतु प्रस्तुत प्रश्नाच्या मुळाशीं असलेलें बलवत्तर कारण, युद्धसामुग्रीचा पुरवठा करण्यांत हिंदुस्थानचा स्वार्थत्याग चालला आहे त्याची चलनात्मक बाजू मात्र भक्कम पायावर उभारलेली नाहीं हें होय. ह्या आशयाच्या टीकेचा "एकॉनॉमिस्ट"नें पुढें विस्तार केला आहे.

हिंदुस्थानांत होणाऱ्या युद्ध खर्चाची वाटणी ब्रिटिश व हिंदी सरकारच्यामध्यें करण्याची आतांपर्यंत मान्य झालेली योजना सदोष आहे असें मत त्यानें व्यक्त केलें आहे, त्याचें समर्थन इंग्लंडनें येथील युद्ध खर्चाचा मोठा वाटा स्वीकारल्यानें उद्भवणाऱ्या त्याच्या भरपाईच्या मार्गांतील अडचणीमध्यें सापडतें. ह्या वांटणीबद्दलच्या करारांत हिंदुस्थानवर अधिक खर्चाची जबाबदारी टाकण्यांत आली असती तर भरपाईचा प्रश्न सुलभ झाला असता. ज्या मानानें खर्चांतला हिंदुस्थान सरकारचा हिस्सा मोठा त्या मानानें ब्रिटिश सरकारनें ह्या देशास परत करण्याच्या पैशाचें प्रमाण लहान होणार हें उघड आहे. ह्या हिशेबावर भाष्य करतांना त्या पत्रानें हिंदुस्थानांतील युद्धखर्चाचे आकडे दिले आहेत. सप्टेंबर, १९३९ ते एप्रिल, १९४३ ह्या अवधींत हिंदुस्थान सरकारास युद्धासाठी त्यानें खर्च केलेल्या पैशांपैकीं ४३ कोटि पौंड भरपाई म्हणून परत मिळाले आणि ३२ कोटि पौंड त्यानें स्वतःचे असे पुरवले. इंग्लंडनें केलेल्या परत फेडींतून हिंदुस्थान सरकारनें आपल्या इंग्लंडमधील कर्जाचें निवारण केलें आणि बाकी राहिलेल्या येण्याबद्दल स्टर्लिंग घेऊन त्यांची शिल्लक ५० कोटि पौंड लंडनमध्यें गुंतवून ठेवली. ही रकम हिंदुस्थानांतील चलन वाढीच्या प्रमाणांत विस्तार पावत आली आहे ह्या गोष्टीकडे "एकॉनॉमिस्ट"नें लक्ष वेधलें आहे. त्याची विचारसरणी अशी आहे कीं, हिंदुस्थान सरकारनें युद्धखर्चाचा अधिक हिस्सा स्वतःवर घेतला असता तर वरील लंडनमधील शिल्लक फुगली नसती, तिच्या आधारावर अधिक चलन काढण्याचें कारण पडलें नसतें व त्या मानानें बाजारभावांच्या वाढीस आळा बसला असता. युद्धखर्चाच्या वाटणीचा फेरविचार व दुरुस्ती व्हावी अशी सूचना अर्थातच ह्यावरून त्या पत्राच्या दृष्टीनें इष्ट झाली आहे.

युद्धखर्चाबाबतचा करार योग्य असून त्यांत बदल करणें अनिष्ट आहे असें गृहीत धरलें तरी फाजील चलनाच्या दुष्परिणामांस आळा घालण्याचें सामर्थ्य त्यांत नाहीं, ह्या मुद्यावर "एकानॉमिस्ट" नें जोर दिला आहे. हिंदुस्थान सरकारनें खर्चलेल्या पैशाची भरपाई पौंड स्टर्लिंगमध्यें करणें ह्या देशाचें इंग्लंडमधील कर्ज फेडण्याच्या मर्यादेपर्यंत समर्थनीय होतें. कारण, ह्या योगानें हिंदी जनतेच्या जवळचें चलन सरकारकडे परत आलें आणि त्यानें फाजील चलनाच्या आपत्तीस आळा घातला. परंतु ह्या मर्यादेच्या पुढें ब्रिटिश सरकारनें रुपयाच्या चलनाचे स्वरूपांत फेडलीं जावयाचीं कर्जे कां काढलीं नाहींत आणि त्या मार्गानें हिंदुस्थानांत होणाऱ्या स्वतःच्या खर्चाची व्यवस्था कां केली नाहीं, असा "एकानॉमिस्ट" चा सूचक प्रश्न आहे. हें धोरण न स्वीकारलें गेल्यानें फाजील चलनाचा गोंधळ माजला आणि आतां तो आवरणें कठीण होऊन गेलें आहे. सध्या चलन परत आकर्षून घेण्याचे प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे पण ते तुटपुंजे आहेत आणि करांचें उत्पन्न वाढवून चलनाचा हा निर्गमकडचा ओघ अधिक परिणामकारक त्यानें करणें अगत्याचें आहे असें त्या पत्राचें म्हणणें आहे. जादा करांचें ओझें सहन करण्याची शक्ती हिंदुस्थानांत नाहीं ह्या मुद्यास उत्तर देतांना तें म्हणतें कीं, लढाऊ सामुग्रीचें उत्पादन व त्याचा पुरवठा हा देश करीत आहे म्हणजे नेहमीच्या उपयोगाच्या जिनसांचा मामुली पुरवठा न झाल्यानें उद्भवणारी गैरसोय सोसून तात्पुरता त्यागच करीत आहे. रिझर्व्ह बँकेस लंडनमध्यें ब्रिटिश सरकारकडून स्टर्लिंगमध्यें रकमा मिळतात, त्यामुळें ह्या सध्याच्या त्यागांत फरक पडत नाहीं. तेव्हां सदरहु त्यागास चलनाच्या विस्तारास ज्यानें मर्यादा बसेल असें स्वरूप देतां येण्याजोगें

आहे. म्हणजे युद्धखर्चाच्या सध्याच्या वाटणीची योजना बदलली पाहिजे असाच "एकॉनॉमिस्ट"च्या सूचनेचा आशय आहे. हा तोडगा दिसतो तितका सोपा नाहीं ह्याची हिंदुस्थान सरकारास जाणीव आहे ह्याची त्या पत्रास कल्पना नाहीं असें दिसतें. पुरेसे जादा कर ह्या देशांत परिणामकारक रीतीनें बसवतां येतील काय आणि वाढत्या युद्ध-खर्चाची भरपाई होण्यास पुरेशीं कर्जे हिंदुस्थान सरकारास उभीं करतां येतील काय? ज्या प्रमाणांत हें होणार नाहीं, त्या प्रमाणांत चलनाची वाढ होणें अपरिहार्य होईल का नाहीं? ह्या प्रश्नांचा विचार "एकॉनॉमिस्ट"नें केलेला नाहीं. तें पत्र म्हणतें त्या हिंदी त्यागाचा मोबदला आज स्टर्लिंगमध्यें मिळत आहे त्यास मुकण्याचें आर्थिक सामर्थ्य ह्या देशास आहे कीं काय ह्याची व्यावहारिक माहिती हिंदुस्थान सरकारास आहे. ह्या साप्ताहिकाकडून अधिक सहायकारक सूचना येण्याची अपेक्षा होती, ती त्याच्या प्रस्तुत लेखानें वृथा ठरली आहे.

## रेशनिंगबाबत पोषण सल्लागार समितीच्या सूचना

सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्डास न्युट्रिशन ॲडव्हायसरी ( पोषण सल्लागार ) कमिटीनें आपला खालीलप्रमाणें रिपोर्ट सादर केला आहे:-" इस्पितळें, इत्यादि ठिकाणीं भुकेनें ग्रासलेल्यांना जें अन्न देण्यांत येतें, त्याच्या सकसपणासंबंधीं तज्ज्ञांचा सल्ला घेणें आवश्यक आहे. सध्या कलकत्ता येथें देण्यांत येणाऱ्या अन्नापासून दररोज ८०० पेक्षा कमी कॅलरी निर्माण होतात व त्या अन्नामधील घटक योग्य नसतात. इतर प्रांतांत तेथें रेशनिंगच्या योजनेप्रमाणें लोकांना धान्य देण्यांत येतें, तें पुरेसें नाहीं. विशेषतः गरीबांना दुसरें अन्न खातां येत नाहीं त्यामुळें त्यांच्या शरीरास पुरेशा कॅलरी मिळत नाहींत. दर माणसामागणिक ( मोठीं माणसें व मुलें धरून ) दररोज अर्धशेर तरी किमान धान्य पाहिजे. कामकरी व गडी ह्यांना एवढें धान्य पुरणार नाहीं. त्यांच्यासाठी जेवणाची वेगळी सोय केली पाहिजे. मुलांना सध्या देण्यांत येणारें रेशन अपुरें आहे; त्या संबंधांतहि कांहीं योजना केली पाहिजे. गर्भारशी व बाळंत स्त्रिया ह्यांच्या अन्नाकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. त्यांच्यासाठी आणि मुलांसाठी शक्यतेवढें दूध राखून ठेवलें पाहिजे. रेशनिंगच्या योजनेंत, लोकांना ज्या धान्याची सवय आहे तेंच धान्य खाण्यास देणें योग्य होईल."

### जगांतील शेकडा साठ लोकांची उपासमार

"फ्रान्सच्या अटलांटिक किनाऱ्यापासून ते थेट दक्षिण व पूर्व आशियापर्यंतच्या पट्टींतील लोकांवर अर्धपोटी रहाण्याचा प्रसंग ओढवला आहे. जगांतील ६०% लोकांस पुरेसें अन्न खावयास मिळत नाहीं, अशी आजची परिस्थिति आहे. खुल्या व्यापारानें युरोपच्या अन्न तुटवड्याचा प्रश्न सुटूं शकेल, परंतु आशियाचा प्रश्न फार बिकट आहे. तेथील देश दाट वस्तीचे असले, तरी ते उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें मागसलेले आहेत. त्यांच्याकडे बाहेरून धान्य पाठविलें, तर त्याची किंमत देण्यास त्यांचेजवळ पैसा नाहीं. सर्वांस पुरेसें खावयास मिळालें पाहिजे, हें उद्दिष्ट उत्तम आहे, परंतु तें साध्य होण्याचे मार्गांत अडचणी आहेत. युद्धोत्तर पुनर्घटना करणारांनीं त्या सोडविल्या पाहिजेत." मि. जोसेफ थॉर्नडाइक (ज्यु.) ह्यांच्या, अमेरिकन मासिकांतील लेखामधील उतारा.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम.ए., बी. कॉम. २४ डे. जि. पुणें, ४)

केवळ रोखीचे सौदे होण्यास लागून बाजाराचे आठ दिवस प्रत्यक्ष काम चाललें. बदले बंद पडतांच भाव खाली पडतील अशी अपेक्षा असतांना बाजार टिकून राहिले, इतकेंच नव्हे तर वर जाण्याच्या मार्गांत असून मजबुतींत आहेत. यावरून निष्कर्ष असा निघतो कीं सेटल्या पैशाला दुसरे बाजार बंद झाल्यामुळें कोठेंही गुंतविण्यास वाव उरला नाहीं. उत्तम कंपन्यांचे शेअर्स चार ते पांच टक्के करमाफ व्याज देऊं शकत आहेत तेव्हां शेअर बाजार तेजींत राहिल्यास नवल नाहीं.

साधारण घेण्यास चांगले शेअर कोणते हें कोणी विचारतात, त्यांना अमका घ्या, तमका घ्या असें सांगण्यापेक्षां नुकतेच एका सेवानिवृत्त सद्गृहस्थांनीं-अर्थात् ज्यांना पैशाची इतर कोणाच्याहींपेक्षा जास्त काळजी वाटणें साहजिक आहे-कांहीं शेअर घेतले त्यांत प्रामुख्यानें टाटा स्टील ऑर्डिनरी व डिफर्ड, कोहिनूर, ब्रिटिश इंडिया कॉर्पोरेशन, असोसिएटेड सिमेंट व कांहीं साडेतीन टक्का रोखा हे दिसत होते येवढें सांगितलें म्हणजे पुरे. तसेंच काल परवा बडोदा बँक शेअर्स घेण्यास गेले असतां पंचवीससुद्धां मिळूं शकले नाहींत. यावरून वारा काय वहात आहे हें दिसून येईल.

अपोलोनें तीन आणे सहामाही व्याज जाहीर केलें आहे. या गिरणीनें जर चालूं वर्षाला ६ आणे अथवा ८ आणे व्याज दिलें तर हा शेअर पुन्हा भडकल्या खेरीज राहणार नाहीं. सध्या भाव ५ ६. १२ पर्यंत आहे. या गिरणीनें मागील सालीं सत्तर लाखांवर नफा मिळविला होता. चालू साल याहीपेक्षां चांगलें गेलें आहे व गिरणी सोलापूरच्या जुन्या गिरणीच्या सुप्रसिद्ध चालकांकडे सप्सून कं. कडून चालविण्यास घेतली गेली आहे हें सर्वश्रुत आहे. जरी या व जवळ जवळ सर्व सप्सून गिरण्यांचा युद्धपूर्व इतिहास चांगला नसला तरी मागील तीन वर्षांत सगळ्यांचा पूर्ण कायापालट झालेला आहे हें विसरतां कामा नये.

मागच्या "अर्था"च्या अंकांत "संजय" नांवानें कोणी महाराष्ट्रीयांच्याव्यतिरिक्त मोठाले उद्योगधंदे चालविणाऱ्यांचा उल्लेख केला. आपली दृष्टि विशाल नव्हे जगड्व्याळ केली तरच ते मोठे धंदे चालवूं शकतील. हिंदुस्थानांत पाऊणशे वर्षांपूर्वी येऊन आज प्रचंड प्रमाणांत एकच परकीय सूत्रचालक मंडळीच्या अधिकारांत वेगळे वेगळे धंदे; उदा० कापड व सूत, ताग, चहा, कोळशाच्या खाणी, कागद, साखर, नौका व लोहमार्ग; चालविले जातांना दिसत आहेत. उल्लेख करावयाचा तर कलकत्त्याचे अँड्र्यू यूल, बर्न आणि कं., गिलँडर्स अर्बथनॉट, मॅकनिल, पीअर्स लेस्ली, बर्ड कं., बर्ड व हेलजिअर्स, मुंबईचे किलिक निक्सन आणि कं. यांचीं नांवें प्रामुख्यानें डोळ्यापुढें येतात. त्यांची बरोबरी हिंदी लोकांत फक्त टाटा आणि सन्स व वालचंद हिराचंद यांच्याच कडून होईल.

[ गुरुवारीं बाजार बंद झाल्यानंतर वस्त्रनियंत्रकांचा कापडाचे भाव उतरविणारा हुकूम बाहेर पडला आहे. त्यामुळें तात्पुरते भाव खालीं यावेत. कारण जरी हुकुमामुळें १९४३ चे व्याजावर परिणाम झाला नाहीं, तरी १९४३ च्या नफ्यावर परिणाम खचित होईल. तरी सुद्धां डाईंग, कोहिनूर, गोकाक इत्यादि जुन्या गिरण्यांच्या शेअर्सना घेण्यास कोठल्याही प्रकारची हरकत दिसत नाहीं. ]

## स्फुट विचार

### रस्ते

हिंदुस्थानसारख्या अफाट आणि सात लक्ष खेड्यांच्या देशांत दळणवळण आणि व्यापार ह्यांच्या सोयीसाठी चांगल्या रस्त्यांची किती आवश्यकता आहे हें सांगावयास नको. तसेंच, इतर बाबींप्रमाणें हिंदुस्थानांतील रस्त्यांचा विस्तार व निगा ह्यांचे बाबतींत युद्धोत्तर काळांत योजनात्मक धोरणाची आवश्यकता वाटणें सहाजिकच आहे. रस्त्यांविषयींच्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी त्यांच्याशी संबंध येणाऱ्या लोकांची प्रातिनिधिक स्वरूपाची एक "रोड काँग्रेस" ह्या नांवाची परिषद भरत असते. यंदाचें ह्या संस्थेचें अधिवेशन ग्वालेर येथें गेल्या आठवड्यांत झालें. त्या प्रसंगीं सर केनेथ मिचेल ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत खेडेगावी, जिल्ह्यांतले, प्रांतिक व अखिल भारतीय अशा चार वर्गांच्या रस्त्यांचे संबंधांतल्या उणीवा व गरजा काय आहेत ह्याचें विवेचन केलें. खेडेगावी व जिल्ह्याचे रस्ते रिपेरीच्या अभावामुळें खराब झाले आहेत आणि त्यांचे बाबतींत प्रगतीचें नांवहि घ्यावयास नको. ह्या पुढेंहि खेडेगावीं रस्ते खडीचे व पक्के करतां येणें शक्य नाहीं, तथापि त्यांतहि सुधारणा करितां येण्यासारखी आहे आणि बैलगाड्यांच्या चाकांस रबरी धावा लावणें इत्यादि प्रकारच्या सुधारणा झाल्यास शेतकऱ्यांच्या मालाच्या वाहतुकीस सहाय्य होईल असें सर केनेथ म्हणाले. त्यांच्या मतें ह्या रस्त्यांची निगा राखण्याचें काम खेडेगावी लोकांवरच सोपवलें पाहिजे. त्यांस पैसा पुरवतां येणार नाहीं पण श्रमाच्या स्वरूपांत रस्त्यांच्या व्यवस्थेस सहाय्य देतां येईल. जिल्ह्यांतील रस्ते सार्वजनिक पैशांतून चांगले राखले गेले आणि त्यांची खेडेगावी रस्त्यांशीं सांगड घातली गेली तर हा प्रश्न सहज सुटूं शकेल असें त्यांनीं सांगितलें. कमी खर्चांत साधे रस्ते कसें चांगलें काम देतात ह्याची लोकांस कल्पना नाहीं. ह्याचें कारण ही गोष्ट अशक्य कोटींत ढकलण्यांत आली आहे व तिच्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झालें आहे असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

### जपानविरुद्ध होणाऱ्या चढाईचा खर्च

आजच्या अग्रलेखांत "एकॉनॉमिस्ट" ह्या वजनदार ब्रिटिश साप्ताहिकानें, हिंदुस्थान सरकारनें युद्धखर्चाचा अधिक मोठा भाग उचलावा, ह्या आशयाची सूचना केली आहे तिचा विचार आम्हीं केला आहे. जपानविरुद्ध लवकरच होणाऱ्या चढाईमुळें हिंदुस्थानांत सध्यापेक्षा अधिक युद्धखर्च होणें अपरिहार्य आहे आणि त्या योगानें येथील सरकारास इंग्लंडकडून होणाऱ्या खर्चाच्या भरपाईचा व चलन विस्ताराचा प्रश्न अधिक कठीण होणार आहे. ह्या दृष्टीनें "एकॉनॉमिस्ट"च्या सूचनेप्रमाणें युद्ध-खर्चाच्या वाटणीविषयींच्या कराराचा फेरविचार ब्रिटिश व हिंदुस्थान सरकार ह्याचेमध्यें चर्चेचा विषय होणें स्वाभाविक आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्या संस्थेच्या कार्यकारी मंडळानें हिंदुस्थान सरकारकडे विचारणा केली आहे आणि अधिकृत माहिती मागितली आहे. लॉर्ड लुई मौंटबॅटन ह्यांच्या नेतृत्वानें होणाऱ्या चढाईचे संबंधांत हिंदुस्थानांतून माल पुरवला जाईल त्याबद्दलचा खर्च हिंदुस्थान सरकारामार्फत होईल आणि त्याची भरपाई लंडनमध्यें केली जाईल. आतांपर्यंतच्या अनुभवावरून हें उघड होतें कीं ह्या व्यवस्थेमुळें चलनाची वाढ व्हावी लागेल आणि महागाईची कमान चढण्याची भीति आहे. धान्यधुन्य, कापड इत्यादि अत्यावश्यक जिनसांची वाण आजच सामान्य हिंदी जनतेस भासत आहे आणि ती अधिक तीव्र झाल्यावांचून रहाणार नाहीं असें आपलें मत फेडरेशननें सरकारला कळवलें आहे. जपानविरुद्ध व्हावयाची चढाई सर्व मित्रराष्ट्रांच्या वतीनें अंगिकारली जावयाची असल्यानें तिच्या संबंधांतला खर्च हिंदुस्थान सरकारनें सोसूं नये असेंहि त्यास सुचवण्यांत आलें आहे. ह्या संबंध प्रश्नाचा सध्या विचार चालू आहे आणि त्या विषयीं कांहींच माहिती देणें शक्य नाहीं असें उत्तर सरकारनें फेडरेशनला दिलें आहे.

### महाराष्ट्रांतील पिकांस पावसाची अनुकूलता

सप्टेंबरमधील व ऑक्टोबरच्या प्रारंभीचा पाऊस महाराष्ट्रांत सर्व ठिकाणीं समाधानकारक झाला असल्याची सुवार्ता सर्वांस आनंददायक वाटेल. त्या पावसामुळें खरिफाचीं पिकें चांगली येऊन रब्बीच्या पिकांसंबंधींहि खात्री वाटण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली आहे. पुणें, सातारा, अहमदनगर, नाशिक व खानदेशचे दोन जिल्हे, ह्या सहा जिल्ह्यांच्या "मध्य भागा"संबंधीचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून धान्याच्या लागवडीबरोबर त्याचें उत्पादनहि वाढलें असल्याचें आढळून येतें. तांदूळाखालीं ३,०४,००० एकर जमीन असून त्यांतून १,०४,००० टन तांदूळ निघेल. म्हणजे, तांदळाच्या उत्पादनांत ४०% वाढ आहे. ज्वारीची लागवड ६% वाढून उत्पादन १२% अधिक होईल. बाजरीची लागवड ५% ज्यास्त आहे परंतु उत्पादन २१% वाढावा दाखवील. रागीच्या लागवडींत व उत्पादनांत अनुक्रमें ५% व २०% वाढ आहे. ही झाली खरिफाच्या पिकांची गोष्ट. रब्बीच्या पिकांपैकीं गहूं सर्वांत महत्त्वाचें आहे व त्याची लागवड ३५% वाढून तिचें क्षेत्र ७ लक्ष,५५ हजार एकरांवर जाईल अशी अपेक्षा आहे. "अधिक धान्य पिकवा" मोहिमेचा सुपरिणाम होऊन, धान्यांची सबंध प्रांतांतील लागवड ८ लक्ष एकरांनीं वाढली आहे.

### युद्ध आणि हिंदी आर्थिक संसार *

दिल्ली युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक, प्रो. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं चालू लढाईचे हिंदी आर्थिक संसारावर होणारे परिणाम व त्याच्या अडचणी सोडविण्याचे सरकारचे प्रयत्न ह्यांचें वर्णन करणारें एक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं सध्याच्या परिस्थितीचें वर्णन करून, हिंदी आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी कोणतें धोरण स्वीकारणें आवश्यक आहे, ह्याचें स्पष्टीकरण केलें आहे. ह्याच विषयावर कांहीं अर्थशास्त्रज्ञांचीं पुस्तकें नुकतींच प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि, राजकीय पार्श्वभूमीस प्राधान्य देऊन आर्थिक प्रश्नांचा प्रो. राव ह्यांच्या पुस्तकांत विचार करण्यांत आलेला आहे, हें त्याचें वैशिष्ट्य म्हणतां येईल. युद्धाचे प्रारंभीं हिंदी उद्योगधंदे, शेती, वहातुकीचीं साधनें, व्यापार, इत्यादींची परिस्थिति काय होती, युद्धाचा ताण सहन करण्याची त्यांस पुरेशी शक्ति कां नव्हती व युद्धकालीन सरकारी आर्थिक धोरणाचा त्यांवर काय परिणाम झालेला आहे ह्याचें विवेचन ग्रंथकर्त्यानें पुस्तकांत केलेलें आहे.

* "वॉर अँड इंडियन एकॉनॉमी" ले:-व्ही. के. आर. व्ही. राव. पृ. सं. २७२ किं. ३ रु. १२ आ.

## मालेगांवचे के. राजे शंभूसिंग यांच्या तैलचित्राचें अनावरण.

बारामती येथील मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँकेच्या शाखेचे व नीरा कॅनाल खरेदीविक्री संघाचे मार्फत तारीख ३-१०-४३ रोजी दुपारीं २ वाजतां मुंबई प्राव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बॅन्केचे चेअरमन श्री. आर. जी. सरैया यांच्या हस्ते के. राजे शंभूसिंग अमरसिंग जाधवराव, संस्थान मालेगांव, यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ करणेंत आला.

सदर समारंभासाठी श्री. वैकुंठराय मेहता, श्री. कारखानीस ( असि. रजिस्ट्रार को. सोसायटीज् पुणें. ) व रावबहादूर शेंबेकर प्रभृती स्थानिक प्रतिष्ठित मंडळी आणि सदर दोन्हीं संस्थांशी संबंध असलेली इतर मंडळी मिळून सुमारें २०० मंडळी हजर होती.

प्रारंभीं श्री. काकासाहेब करंदीकर वकील यांनीं समयोचित शब्दांत जमलेल्या मंडळींचें स्वागत करून कै. राजे शंभूसिंग यांच्या संबंधीच्या आपल्या कांहीं आठवणी निवेदन केल्या व त्यांचा सहकारी चळवळीशीं कसा निकटचा संबंध होता तेंहि विस्तारानें सांगितलें व अशा सभेस श्री. आर. जी. सरैया यांच्या सारखे अध्यक्ष असावेत अशी सूचना केली.

नंतर श्री. वैकुंठराय मेहता यांनीं आपल्या भाषणांत राजेसाहेबांचा या बॅन्केशीं आरंभापासून जो निकटचा संबंध आला व त्यांनीं सहकारी कार्यक्षेत्रांत जी कामगिरी केली तिचें मार्मिक स्वरूपांत वैशिष्ट्य प्रगट केलें. यानंतर इतर कांहीं वक्त्यांचीं समयानुरूप राजेसाहेबांच्या प्रशंसापर भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत बडोद्याचे श्री. सयाजी महाराज व राजे शंभूसिंग यांची तुलना करून सांगितलें कीं राजे शंभूसिंग यांनीं आपलें आयुष्य आपल्या शेतकरी बांधवांची आर्थिक व सामाजिक उन्नति करण्यांत घालविलें. जहागिरदार असूनही प्रत्यक्ष काम करण्याची त्यांना हौस होती. गरीब, श्रीमंत, आशिक्षित व सुशिक्षित अशा लोकांमध्यें ते मिसळत असत. सहकारी चळवळींत त्यांनीं १९११ पासून १९३० पर्यंत काम केलें. अशा थोर पुरुषाचें स्मारक तैलचित्ररूपानें बारामती शाखेनें व खरेदी विक्री संघानें करणें हें अत्यंत उचित आहे.

बँकेचे सीनियर इन्स्पेक्टर श्री. धारप यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर वंदे मातरम् गीत होऊन रीतिप्रमाणें सभेचें काम संपलें.

### बेळगांव पायोनियर अर्बन को, बँक लि. बेळगांव

ह्या बँकेचें भाग भांडवल २ लक्ष, ३ हजार रुपये असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड २ लक्ष, ९२ हजारांचे आहेत. ठेवींची रक्कम १५½ लक्ष रुपये आहे. बँकेनें १३½ लक्ष रुपये रोख व इतर बँकांत ठेवले असून २ लक्ष, ६६ हजार रुपये रोख्यांत गुंतवले आहेत. सभासदांकडून येणें कर्ज ४ लक्ष, १० हजार रुपये आहे. बँकेचें स्वतःचें मोठें भांडवल ( सुमारें ५ लक्ष रुपये ), वाढत्या ठेवी, कर्जांत घट, इत्यादि गोष्टी अहवालावरून दिसून येतात. ठेवींच्या एकूण रकमेपेक्षां जास्त रक्कम बँकेजवळ रोख व रोख्यांत शिल्लक आहे. अहवालाचे वर्षीं बँकेस २४,०३४ रुपये नफा झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
| --- | --- | --- |
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,१०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिले गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
| --- | --- | --- |
| आधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिम्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## साखरआंबा, मोरआवळा— सफरचंदाचा

गाजराचा, आवळ्याचा, बेलफळाचा, महाळुंगाचा, आल्याचा, हिरड्याचा वगैरे.

**भाजणी**—थालीपीठ, चकलीकरितां.

द. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें.

## तरुण धंदेवाल्यांचें समोवार निरीक्षण

संपादक महाशय, " अर्थ " यांसी —

सा. न. वि. वि.

परप्रांतांतील महाराष्ट्रीयांना वर्तमानपत्रांतील जाहिराती व मजकूर वाचून महाराष्ट्रीय कंपन्यांत ठेवी ठेवाव्याशा वाटतात व तसें करण्यांत अभिमान वाटतो. कंपन्यांचे चालक त्यांचा विनियोग नीट करतात ना?

महाराष्ट्रीय धंद्यांतील भांडवल संपन्न समाजाकडून बसल्या बैठकीला मिळविलेल्या रकमांची गोळाबेरीज नाहीं. आयुष्याच्या ऐन उमेदीचीं वर्षें रक्ताचें पाणी करून, घाम गाळून, मानापमान गिळून मिळविलेल्या मजुरीपैकीं म्हातारपणीं उपयोगी पडावी म्हणून प्रसंगीं अर्धपोटींहि राहून मोठ्या कष्टानें बाजूला ठेविलेली ती चतकोर भाकरी आहे.

महाराष्ट्रानें व्यापार-धंद्यांना, गिरण्या-कारखान्यांना दिलेला पैसा मुख्यतः मध्यम वर्गियांनीं उतार वयाकरितां केलेली तरतूद व कौटुंबीयांची केलेली तरतूद होय. त्यांतील व्याजांतून त्यांचे चरितार्थ चालतात, मुला-नातवांचीं शिक्षणें होतात, बाईचा देव-धर्म होतो. या रकमांचा विनियोग तितक्याच काळजीनें, जपणुकीनें व्हावयास नको कां? युद्धोत्तरच्या मंदीच्या-चढाओढीच्या काळांत जर ह्या प्रथितयश धंदेवाल्यांच्या भांडवलाच्या व्यवस्था अपुऱ्या पडल्या, नीटशा करतां आल्या नाहींत तर... मोठ्या प्रयासानें रुजलेल्या विश्वासाचा अंकूर जळून खाक व्हावयाचा अन् मग त्यांत आहुत्या कितीतरी!!—

आजच पहाना, किती क्षुल्लक गोष्टी असतात. व्यक्ती-व्यक्तींतील चुरशी, मतभेद, धंद्यांत हुकमी न आलेलें यश अन् अशाच कितीक गोष्टी. किती त्याची चर्चा, चिकित्सा. अशानें का धंद्यांत बरकत येते? धंद्यांतील खांचखळग्यांकडे लक्ष असावें पण प्रयत्न असावे धंदा वाढविण्याचे, हिरिरीनें काम करण्याचे. धंद्यांत पत सांभाळावयाची असते. धंद्यांतील पत स्त्रीची अब्रूच!!—

आपल्यांत औद्योगिक महर्षि नाहींत असें कसें म्हणूं मी? धंदा करण्याची तळमळ होती. कामास सुरुवात केली. चांगल्या दिवसा पाठोपाठ वाईट दिवसहि आले. परिस्थितीचे तडाखे अधिकाधिक बसूं लागले. पण ध्येयनिष्ठा जबर. आत्मविश्वास अलोट, कार्यावर प्रेम कमालीचें. अहोरात्र मेहनत. सारें लक्ष विशिष्ट दर्जाचा माल काढण्याकडे, विशिष्ट किंमतींत तो देतां येण्याकडे. कठीण दिवसांतही कामगारांनीं निष्ठेनें कामें केलीं. भरतीचे दिवस आले. मातीचें सोनें झालें. कंपनीच्या भागीदारांनीं दाखविलेल्या विश्वासाचें माप दोन्ही हातांनीं त्यांच्या पदरांत घातलें. तथापि धंद्यांतील एकतानता ढळली नाहीं. प्रयोग, संशोधन मोठ्या प्रमाणावर व अधिक व्यापक दृष्टीनें सुरूच आहे. ही निष्ठा, ही एकतानता मला भुलविते-नमविते. औद्योगिक जीवनांतील हे महर्षि खरेच!

...याला व्यापारी कॉलेज सुरू झाल्याचें नुकतेंच वाचलें. येथें ... महाराष्ट्रीय बी. कॉमस आहेत. बऱ्यापैकीं पगार मिळतात ...ण नोकरीच. ते मला नेहमीं म्हणतात, आपल्यापेक्षा ... पारशी, गुजराथी यांजकडे नोकरी करणें पत्करतें! असें कां?—आपल्या कंपन्या, आपले कारखाने लहान असतील, बी. कॉमसना इतर ठिकाणीं मिळणारा पगार देणें आम्हांस परवडत नसेल, त्यांना आपल्या कंपनी—कारखान्याबद्दल ममत्व वाटेल असें वागविलें जात नसेल. काय तें मला नीटसें समजत नाहीं. किती बी. कॉमस आपल्या कंपन्यांतून आहेत? पुण्यांतील कॉलेजांतून बाहेर पडणारे बरेचसे तरूण महाराष्ट्रीयच असतील. काय करणार आहेत ते? कुठें जाणार आहेत ते? धंदा कीं, नोकरी?—कुठें? —

आमच्या येथील तरूण व आपला महाराष्ट्रीय तरुण यांत मला एक महत्त्वाचा फरक दिसतो. इकडील तरूण धंद्यांत पडला तर हिरिरीनें पडेल. नोकरीस लागला तर मालकास आपण जास्तींत जास्त कसें उपयुक्त होऊं याचा विचार ठरवून त्या दिशेनें अविरत, अविश्रान्त श्रम करील. आपल्या तरुणाच्या कामाच्या अन् मानाच्या कल्पना थेट सरकारी नोकरींतील विशिष्ट जीवनाचें प्रतीकच! ठराविक ५-६ तासांपेक्षां अधिक काम आम्हीं करणार नाहीं. आमच्या मानापेक्षां कमी दर्जाचें काम आम्हीं करणार नाहीं. आमची लायकी आम्हीं काम करतों त्यापेक्षां अधिक खासच आहे. वरच्या जागा आम्हांला मुद्दाम देण्यांत येत नाहींत, अन् त्या द्यावयाच्या तर मालकांनीं आपण होऊन आम्हांला त्या बहाल केल्या पाहिजेत. आम्हांला जेवढा पगार बाल तेवढ्याचेंच काम आम्ही करूं, अन् तें नाइलाज म्हणून तोंडानेंच बडबडत, चेहऱ्यावर दर्शवीत करूं!! जीवनकलहाच्या तीव्रतेबद्दल आपण बोलतों, विचार करतों, चर्चा करतों, अन् काय ही बेपर्वाई वृत्ति!

दोषान्वेषणाचें काम माझें नव्हे, तसें करण्यास लागणारा अनुभव नि अधिकार मला नाहीं. पण जें बोचतें, सुचतें, डोळ्याला पाणी आणतें तें मीं आपल्याला दाखविण्याचा प्रयत्न केला. परिस्थिति सुधारणें अवघड आहे हें मला पटतें, परंतु त्याची सर्वांना माहिती झाल्याविना ती सुधारण्यास त्यांचें हार्दिक सहकार्य कसें मिळणार? म्हणून, एवढें विस्तारानें लिहिलें आहे.

आपला,

"संजय"

---

### पू. खा. सं. को. बँक लि., जळगांव

वरील बँकेचें भाग भांडवल ५,००,८०० रुपये असून रिझर्व्ह फंड, बॅड डेट फंड, सिक्युरिटीज सिंकिंग फंड, फोझन ॲसेट्स, रिझर्व्ह, इत्यादि मिळून तिचें स्वतःचें भांडवल सुमारें १४ लक्ष रुपये आहे. बँकेजवळ ५७ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेचें सोसायट्यांकडून येणें २४½ लक्ष रुपये व व्यक्तिशः सभासदांकडून येणें ५ लक्ष, ६० हजार रुपये आहे. वर्षअखेर निव्वळ नफा ४७,१८५ रुपये राहिला. भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळालें. सहकारी सोसायट्यांना द्यावयाचीं कर्जें शक्य तों जरीला सरकीचें निर्भेळ बियांच्या रूपानें बँकेनें दिलीं. रोग घालविण्याकरितां गंधकाच्या पुड्या सहकारी सोसायट्यांच्या सभासदांना मोफत वाटण्यांत आल्या.

---

### टी. बी. एड्. ची कचेरी

मुंबईसरकारच्या डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थची कचेरी मुंबईहून पुणें येथें नेण्यांत येणार आहे. युद्धसमाप्तीपर्यंत ती पुण्यासच राहील.




# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

# दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आताच लिहाः—

| | |
|---|---|
| मुंबईचे चीफ एजन्टस, के. डब्ल्यू. फडके, फडके गणपतिवाडी, गिरगांव, बॅक रोड, मुंबई ४. | हेड ऑफिस, ' रामनिवास ' लक्ष्मी रोड, पुणें शहर. |

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुपक्षाकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव पावावून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

| | |
|---|---|
| ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | बि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर |

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ . पुणें, बुधवार, तारीख २० आक्टोबर, १९४३ अंक ४२

" *INDUSTRIALISE OR PERISH* "—मा. गो. रानडे.

## दी मागोरा केमिकल कं. लि., पुणें

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. ए. व्ही. रानडे, कॉन्ट्रॅक्टर [ चेअरमन ]

सरदार खंडेराव रामराव ऊर्फ बापूसाहेब विंचूरकर ( व्हाइस चेअरमन )
संगीतकलानिधि मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर
श्री. वा. का. जोगळेकर, मर्चंट
श्री. एन्. जी. रानडे, कॉन्ट्रॅक्टर
श्री. ह. के. जोशी, मर्चंट
प्रो. एन्. एन्. गोडबोले ( बनारस हिंदु युनिव्हर्सिटी )
श्री. म. वा. गोळे, श्री. रा. य. रानडे.

मागोरा केमिकल कं. लि. नें पूर्वी चालू असलेली रेडियंट केमिकल कंपनी ही खासगी मालकीची कंपनी तिच्या सर्व यंत्र-सामुग्रीसह नुकतीच विकत घेतली आहे.

रेडियंट कंपनी ही **A. B. C. INSECTICIDES** या नांवाने सर्व तऱ्हेचीं कीटक–नाशक औषधें तयार करीत होती. सर्व तऱ्हेच्या कीटक–नाशक पावडर्स, लिक्विड, डासांच्या उदबत्त्या तयार करणें हा धंदा संकलितरीत्या या कंपनीशिवाय कोणतीहि कंपनी हिंदुस्थानांत करीत नाहीं. या धंद्याला लागणाऱ्या विशिष्ट वनस्पतींचें हिंदुस्थानांत न मिळणारें बीं महत्प्रयासानें नुकतेंच मिळालें असून त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्याचा विचार आहे.

" **रेडिकेमिको** " या नांवाच्या दम्याच्या सिगारेट्स् व पावडर ही कंपनी तयार करते व त्याच्या गुणाबद्दल अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनी खात्री करून घेतली आहे. त्याचप्रमाणें '**रेडियंट नेल पॉलिश**,' हें उच्च दर्जाचें नेल–पॉलिश व '**रंजन होम रेकार्डींग प्लेटस्**' इ. माल तयार होतो.

वरील सर्व माल तयार करण्याचे बहुमूल्य फॉर्म्युले व पद्धति मागोरा केमिकल कंपनीला रेडियंट कं. कडून मिळाले आहेत. अनेक तज्ज्ञ डॉक्टर व केमिस्ट यांच्या देखरेखीखालीं तयार झालेलीं अनेक औषधें व पेटंट मेडिसिन्स तयार असून तीं लवकरच बाजारांत मिळतील.

वरील सर्व गोष्टींचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी

**मुदतीच्या ठेवी घेणें आहेत**

व्याजाचे दर

| | | | |
|---|---|---|---|
| १ वर्ष | दरसाल | दरशेकडा | ५% |
| २ वर्षे | " | " | ५½% |
| ३ वर्षे | " | " | ६% |

जास्त माहितीसाठी खालील पत्त्यावर भेटा अगर लिहा—

हिराबागेजवळ,
टिळक रोड, पुणें २.

आर. वाय. रानडे ॲण्ड को.
मॅनेजिंग एजंटस्.

# विविध माहिती

### मुंबई प्रांतांतील दवाखाने व इस्पितळें

मुंबई प्रांताचा १९४२ सालाचा वयकीय खात्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने ह्यांची संख्या आतां ७५५ झाली असल्याचें आढळतें. सरकारी डॉक्टर १५८७ असून नर्सेस १३०२, मिडवाइफ्स ३१४ व कंपौंडर ६८० आहेत. क्षयरोगप्रतिबंधक इलाजांची अहमदाबाद, पुणें, सुरत, नाशिक, सोलापूर व विजापूर येथील सरकारी दवाखान्यांत व्यवस्था करण्यांत आली आहे, तिचा लोकांस चांगला फायदा झाला.

### कापडाची किंमत उतरणार

आगामी तीन महिन्यांनीं कापडाच्या किंमतींत शेकडा २० ते ३० इतकी घट होईल, अशी अपेक्षा श्री. कृष्णराज ठाकरसी (टेक्सटाइल कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष) ह्यांनीं एका मुलाखतींत नुकतीच व्यक्त केली. नोव्हेंबर ते जानेवारी ह्या तिमाहींत विकण्यांत यावयाच्या स्टँडर्ड क्लॉथची किंमत १० ते १२ १/२ % कमी राहील असें समजतें.

### हैद्राबाद संस्थानचें अंदाजपत्रक

हैद्राबाद संस्थानच्या १९४३–४४ च्या अंदाजपत्रकांत ११ कोटि, २ लक्ष रुपये उत्पन्न अपेक्षित असून अपेक्षित खर्च १२ कोटि, ९३ लक्ष रुपये आहे. जादा नफ्यावरील नवा कर, तंबाखू व वनस्पति ह्यांवर ड्यूटी, तीन नव्या रिझर्व्ह फंडांची स्थापना, जनहितवर्धक खात्यांच्या खर्चांत वाढ, इत्यादि ह्या बजेटाचीं वैशिष्टयें आहेत.

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

जुलै, १९४३ मध्यें मुंबई शहरांतील कापडाच्या गिरण्यांत १,११,०७७ गाठी कपास खपली. अहमदाबादमधील गिरण्यांत ४२,९,६२ गाठींचा उठाव झाला. सबंध मुंबई प्रांतांत मिळून १,७९,५०३ गाठी गिरण्यांतून खपल्या. सबंध हिंदुस्थानांतील गिरण्यांच्या कपाशीच्या उठावाचा आकडा ३,७७,८२३ गाठी एवढा होता. मुंबई प्रांताचे खालोखाल मद्रास व संयुक्त प्रांत ह्यांचा अनुक्रम येतो.

### हिंदुस्थान जनरल इन्शुअरन्स सोसायटी, लि.

वरील नांवाची कंपनी आग, आगबोट, अपघात, मजुरांची नुकसान भरपाई, रीइन्शुअरन्स, इत्यादि सर्व प्रकारच्या विम्याचें काम करण्याकरितां स्थापन करण्यांत आली आहे. स्थापनेच्या कामीं हिंदुस्थान को. इन्शुअरन्स सोसायटी लि. नें पुढाकार घेतला आहे व तिच्या देशभर पसरलेल्या जाळ्यामार्फत नव्या कंपनीस चांगलें काम मिळेल अशी अपेक्षा आहे. नव्या कंपनीनें १० लक्ष रुपयांचे भाग विक्रीस काढले, ते अगोदरच खपले आहेत. श्री. एन. आर. सरकार हे कंपनीचे अध्यक्ष आहेत. डायरेक्टर बोर्डांत श्री. म. ल. डहाणूकर ह्यांचें नांव आहे.

### रत्नागिरी बस असोसिएशन लि., रत्नागिरी

बस सर्व्हिसचा धंदा करण्याकरितां रत्नागिरी बस असोसिएशन लि. नांवाची एक ३ लक्ष, ६० हजार रुपये भांडवलाची खाजगी लिमिटेड कंपनी रावसाहेब आर. बी. शिर्के ह्यांनी रजिस्टर केली आहे.

### श्री. वरेरकर

जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या मुंबई येथील रजिस्ट्रारच्या कचेरींतील श्री. एम. व्ही. वरेरकर, जी. डी. ए, ह्यांची असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ कंपनीज म्हणून नेमणूक झाली आहे.

### मदतीच्या खेळाचें एक लक्ष रुपये उत्पन्न

बंगाल दुष्काळ निवारणाच्या फंडासाठी मारवाडी रिलीफ सोसायटीनें कलकत्ता येथील पॅरेडाइज सिनेमांत एक बोलपट दाखविला, त्याचें उत्पन्न १,०१,६०६ रुपये झालें.

### जादा धान्याचा साठा करणारास जबर शिक्षा

योग्य मर्यादेपेक्षा जास्त धान्याचा साठा करणारा ५० हजार रुपये दंड अथवा १ वर्ष कारागृहवास किंवा दोन्ही शिक्षा ह्यांस पात्र होईल व जादा धान्य जप्त करून तें विकलें जाईल, अशी तरतूद करणारें एक बिल सर झियाउद्दिन अहमद हे असेंब्लींत मांडणार आहेत.

### रेडिओ सेटस मिळूं लागणार

हिंदुस्थान सरकारनें अमेरिकेंतून आणविलेले रेडिओ सेट्स लवकरच बाजारांत येतील. त्यांची विक्रीची किंमत सरकारनें ठरवून टाकलेली आहे.

### निजाम सरकारचें कर्ज

निजाम सरकारचें ३ १/२ % चें नवें कर्ज ९ ऑक्टोबर रोजीं विक्रीस निघालें, तें थोडयाच मिनिटांत खपून गेलें.

### दक्षिण आफ्रिकेंत क्षयरोगास हिंदी लोकांचे बळी

क्षयरोगानें दक्षिण आफ्रिकेंत ज्या प्रमाणांत युरोपियन लोक मरतात, त्याचे पांचपटीनें हिंदी लोकांत क्षयरोगानें मृत्यू येतो. इस्पितळांत ३४४ रुग्णांची व्यवस्था आवश्यक आहे परंतु आज फक्त ८४ रुग्णांचीच त्यांत सोय आहे.

### स्टँडर्ड क्लॉथची वांटणी

ऑगस्ट, १९४३ ते जानेवारी, १९४४ ह्या मुदतीकरितां मुंबई प्रांताच्या वांट्यास आगामी ५ कोटि, ३६ लक्ष वार स्टँडर्ड क्लॉथ आलें आहे. एप्रिल, १९४३ अखेरच्या पहिल्या दोन तिमाहींत मुंबई प्रांतास ४५ १/२ लक्ष वार कापड देण्यांत आलें होतें तें पुढच्या तिमाहींत वाढवून ८० १/२ लक्ष वार करण्यांत आलें. ५१ लक्ष वार कापड जिल्ह्यांतून रवाना झालें आहे व जून, १९४३ अखेर १६ १/२ लक्ष वार प्रत्यक्ष खपलें आहे. प्रत्येकास दरसाल १५ वारांपर्यंत स्टँडर्ड क्लॉथ घेतां येईल.

### ऑस्ट्रेलियन सैनिकांची हानी

ऑगस्ट, १९४३ अखेर एकूण ६१,५६४ ऑस्ट्रेलियन सैनिक कामास आले, त्यांपैकीं १३,९०८ युद्धांत अथवा जखमामुळें व आजारीपणामुळें मरण पावले, १४,७०२ जखमी झाले, २०,८२३ कैद झाले व १२,१३१ बेपत्ता आहेत.

### केशकर्तनालयांत गप्पा मारीत बसूं नका

झेकोस्लोव्हाकियांतील केशकर्तनालयामध्यें लोकांनीं गप्पा मारूं नयेत, कारण त्यामुळें आर्थिक घडामोडी शत्रूस कळूं शकतात, अशी ताकीद तेथील जर्मन वृत्तपत्रांनीं लोकांना दिली आहे.

### ट्रेझरी बिलांवर १२ आणे व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आणे इतका पडला.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३३० |
| २ अन्नपुरवठ्याचा निकडीचा प्रश्न ... | ३३१ |
| ३ सेफ-कस्टडीमधील सोनें | ३३२ |
| ४ शारीरिक शैक्षणिक संशोधन ... | ३३२ |
| ५ स्फुट विचार ... | ३३३ |
| नफेबाजीवर मोहीम आणि किंमतींचें नियंत्रण–ब्रिटिश कोळशाच्या खाणींत मजुरांचा तुटवडा–अन्नपुरवठ्याबाबत सरकारचे निर्णय | |
| ६ कामगारांचें आरोग्यरक्षण | ३३४ |
| ७ सरकारचें नवें कर्ज... | ३३४ |
| ८ वेड्यांचीं इस्पितळें ... | ३३४ |
| ९ "अधिक धान्य पिकवा" मोहीम ... | ३३५ |
| १० अमेरिकन नट-नटींचे पगार ... | ३३५ |
| ११ सहकारी बँकांचे अहवाल | ३३५ |

अर्थ

बुधवार, ता. २० आक्टोबर, १९४३

## अन्नपुरवठ्याचा निकडीचा प्रश्न

बंगाल प्रांतांत आणि विशेषतः कलकत्त्यांत उपासमारीमुळें होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येस अजून आळा बसलेला दिसत नाहीं. ह्या परिस्थितीचीं कारणें व तीवरील उपाय ह्यांचेसंबंधानें इतकी चर्चा झाली आहे, आणि त्यांचे बाबतींत इतके तीव्र मतभेद प्रदर्शित करण्यांत आले आहेत कीं, सामान्य माणसाचें मन त्या योगानें गोंधळून जाणें स्वाभाविक आहे. धान्याचा अपुरा पुरवठा, व्यापाऱ्यांची नफेबाजी, प्रांतिक सरकारचा गबाळीपणा, मध्यवर्ती सरकारनें आपले अधिकार वापरण्यांत केलेली कसूर, धान्याची निर्गत व त्याच्या आयातीचा अभाव, अशी अनेक कारणें बंगाल्यांतील दुःस्थितीस जबाबदार असल्याचें सांगण्यांत आलें आहे. ब्रिटिश कॉमन्स सभेंत झालेलीं प्रश्नोत्तरें, सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. एमेरी, ह्यांचीं प्रस्तुत विषयावरील स्पष्टीकरणें व 'जबाबदार' अधिकाऱ्यांनीं केलेले खुलासे ह्यांचे योगानें सदरहु प्रश्नावर फारसा प्रकाश पडलेला नाहीं. ह्या मतभेदाच्या गोंधळांत एक समाधानकारक गोष्ट दिसून आली आहे, आणि ती ही आहे कीं, बंगालमधील दुःखद परिस्थितीस कोणतीहि कारणें जबाबदार झालीं असोत ह्यापुढें आतापर्यंतच्या अनुभवानें दिलेल्या अनुभवावर आधारलेलें योजनात्मक धोरण हिंदुस्थान सरकारनें अंमलांत आणावें आणि बाहेरून धान्य देण्यास ब्रिटिश सरकारनें जहाजें पुरवणें आवश्यक आहे, ह्या मतास सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. धान्य पुरवठ्याविषयींच्या धोरणासंबंधानें सूचना करण्यासाठी नेमलेल्या समितीनें केलेल्या सूचना ह्याच दृष्टीनें विधायक स्वरुपाच्या आहेत, आणि त्यांचें विवेचन आम्हीं मागें केलेंच आहे.

हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याच्या प्रश्नास इंग्लंडमध्येंहि आतां महत्त्व देण्यांत येत आहे आणि कॉमन्स सभेंत त्यावर वादविवाद करण्याची संधी सभासदांस लवकरच मिळेल असें मि. चर्चिल ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें आहे. तथापि दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत अन्नपुरवठा परिषद् भरून तीमध्यें धान्याचा पुरवठा आणि वाटणी ह्यांचेविषयीं झालेली चर्चा व निश्चित झालेलें धोरण अधिक फलदायी ठरतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. धान्याची वाटणी, रेशनिंग, बाजारभावांचें नियंत्रण, ह्यांचे बाबतींत दिल्लीच्या परिषदेंत प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केलेल्या स्वतःस योग्य वाटणाऱ्या धोरणांत मतभेद दिसून आले. कित्येक प्रांतांस रेशनिंग पसंत नाहीं, आणि कांहींना बाहेरचें नियंत्रण नको आहे. तरीहि धान्य पुरवठा समितीच्या प्रमुख सूचना हिंदुस्थान सरकारनें मान्य केल्या आहेत. त्यांस दिल्ली परिषदेचा सर्वसाधारण पाठिंबा मिळाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पंजाबसारख्या धान्यसंपन्न प्रांतांची इतर प्रांतांस सहाय देण्याची तयारी आहे, पण स्वतःवर नियंत्रण घालून घेण्यास ते नाखुष आहेत. देशाच्या निरनिराळ्या भागांत पिकणाऱ्या धान्यांचा एक राष्ट्रीय साठा कल्पून त्यांची सारखी वाटणी झाल्यावांचून सध्या भासणारी अडचण दूर होण्यासारखी नाहीं, आणि ही वाटणी करण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनें स्वतःवर घ्यावी हेंच योग्य व अगत्याचें आहे. ह्या दृष्टीनें पहातां दिल्लीच्या अन्न परिषदेंत हिंदुस्थान सरकारच्या अन्नमंत्र्यांनीं केलेल्या भाषणास विशेष महत्त्व दिलें पाहिजे.

आपल्या प्रास्ताविक भाषणांत सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव ह्यांनीं मध्यवर्ती सरकारनें निश्चित केलेलें धोरण स्पष्ट पुढें मांडलें, त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. धान्य पुरवठ्याचे संबंधांत व्यवस्था करण्याचे अधिकार प्रांतिक सरकारांचे असून मध्यवर्ती सरकारानें त्या कामांत ढवळाढवळ करतां कामा नये असें जें मत व्यक्त करण्यांत आलें आहे, त्याचा अन्नमंत्र्यांनीं स्पष्ट शब्दांत इन्कार केला हें समाधानकारक आहे. हिंदुस्थानांतील व बाहेरील लोकमत मध्यवर्ती सरकारनें येथील अन्नाच्या पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवावा अशी अपेक्षा करीत आहे, आणि हें कर्तव्य आपण बजावण्यास मागें पुढें पहाणार नाहीं असें त्यांनीं निक्षून सांगितलें. अन्नपुरवठ्याच्या देशभर व्हावयाच्या वाटणींत प्रांतिक सरकारांच्या हार्दिक सहकार्याची आवश्यकता असून तें आपणांस मिळेल अशी आशा त्यांनीं प्रकट केली आणि प्रसंग पडल्यास हिंदुस्थान सरकार प्रांतिक अडवणी व विरोध ह्यांस न जुमानतां आपलें अखिल भारतीय धोरण प्रभावी करण्यास कचरणार नाहीं, असें बजावलें. ग्रेगरी समितीच्या तीन सूचना मध्यवर्ती सरकारनें मान्य केल्या असल्याचें सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं सांगितलें.

धान्याची आयात व निर्गत ह्यांचा हिशेब करतां आयातीच्या मानानें निर्गत कधींहि अधिक असतां कामा नये, ही पहिली सूचना होय. अत्यंत निकडीच्या मागणीसाठीं व हिंदुस्थानच्या हितास अनुसरूनच धान्याची निर्गत अल्प प्रमाणांत होऊं दिली जाईल आणि त्या धोरणाची अंमलबजावणी अत्यंत कसोशीनें करण्यांत येईल. दुसरी सूचना धान्याच्या आयातीबाबतची असून ब्रिटिशसरकारनें बाहेरून धान्य येण्यास लागणारीं जहाजें पुरवण्याचें कबूल केलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. मध्यवर्ती सरकारास आपलें अन्नविषयक धोरण यशस्वी करण्यास सहाय मिळावें म्हणून प्रातिनिधिक स्वरूपाचें सल्लागार मंडळ नेमण्याचें व त्याचें पूर्ण सहकार्य घेण्याचें ठरविण्यांत आलें आहे. युद्धपरिस्थितींत आर्थिक धोरण अखिल भारतीय राष्ट्रीय स्वरुपाचेंच असणें अगत्याचें आहे आणि अन्नपुरवठा हा तर घरच्या आघाडीचा पाया आहे. ही आघाडी मजबूत राहून युद्धकामगिरी यशस्वी होण्यास मध्यवर्ती सरकारनें एकसूत्री धोरण अंमलांत आणलें पाहिजे. प्रांतांची विशिष्ट परिस्थिति व गरजा हिशेबांत

घेतल्या जाऊनच ही अंमलबजावणी होईल हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. दिल्ली परिषदेंत कांहीं तीव्र प्रांतिक मतभेद प्रकट झाले असले तरी सबंध देशाच्या हिताच्या दृष्टीनेंच अन्नपुरवठ्या-बाबतच्या मुख्य प्रश्नांचा अखेर निकाल लावला जाणें अपरि-हार्य आहे.

**सोनें विकत घेऊन सेफ् कस्टडींत ठेवणें म्हणजे सोन्यांत पैसे गुंतविणें नव्हे.**

मे, १९४० मध्यें सिंधा स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें २५ लक्ष रुपयांचें सोनें विकत घेऊन तें बँकांत ठेवलें. मि. धामनलाल छोटालाल परेख ह्यांचें म्हणणें असें, कीं वरील कृत्य कंपनीचा उद्देश व तिचीं आर्टिकल्स ह्यांस धरून नाहीं. हायकोर्टांत हा वाद गेला तेव्हां त्याचें मत सोनें विकत घेऊन तें सेफ कस्टडींत ठेवणें म्हणजे सोन्यांत पैसे गुंतविणें ( इनव्हेस्टमेंट करणें ) नव्हे असें पडलें. " एकाद्यानें आपले कौटुंबिक दागिने बँकेंत नेऊन ठेवले, तर तो त्यांचा उपयोग करतो असें होत नाहीं. तद्वतच, एकाद्या कंपनीनें सुरक्षितपणासाठीं बँकेत ठेवण्याच्या दृष्टीनेंच केवळ आपल्या पैशाचें सोन्या-चांदींत रूपांतर केलें, तर त्या पैशाची ती इनव्हेस्टमेंट केली असें म्हणतां येणार नाहीं. वरील कारणास्तव, कंपनीचा हा व्यवहार तिच्या उद्देशास धरूनच आहे. " असा हायकोर्टानें निवाडा केला.

**शारीरिक शैक्षणिक संशोधन**

हैद्राबाद संस्थानांतील सरकारी शारीरिक शिक्षणाच्या कॉले-जांतील विद्यार्थ्यांनीं त्यांच्या प्रोफेसरांच्या नेतृत्वाखालीं कांहीं संशोधन केलें, त्याचा निष्कर्ष खालीं दिला आहे.

**तळपायाची कमान**

पायतण न वापरणाऱ्या स्त्रियांच्या तळपायाच्या कमानी पायतण न वापरणाऱ्या पुरुषांच्या तळपायाच्या कमानींपेक्षा जास्त उंच व रुंद असतात, असें २०० पायांच्या तपासणीवरून आढळून आलें. ज्यांस चौकांत उभें रहावें लागतें असे ५० पोलिस व ज्यांस चालावें लागतें असे ५० पोस्टमन ह्यांचे पाय तपासतां पोस्टमन लोकांचे तळपाय अधिक चांगले असल्याचें दिसून आलें. ३३ नर्सेस व ३३ स्त्रीशिक्षक ह्यांपैकीं नर्सेसचे तळपाय व पाऊलें अधिक चांगलीं होतीं.

**दारूपान व धूम्रपान**

दारू न पिणारे ५०, माफक प्रमाणांत पिणारे ५०, मध्यम प्रमाणांत घेणारे ५० व भरपूर पिणारे ५० ह्यांच्या तपासणीवरून दारूचा फुफुसांचे ताकदीवर प्रतिकूल परिणाम झालेला दिसला. धूम्रपान न करणारे विद्यार्थी अभ्यास व खेळ ह्या दोन्ही बाबतींत सरस असलेले आढळले. पडदानशीन स्त्रियांचें आरोग्य इतर स्त्रियांचे मानानें निकृष्ट होतें.

**हिटलरला मारण्याची सर्वोत्कृष्ट कल्पना**

हिटलरचा ठार करण्याच्या सर्वोत्कृष्ट कल्पनेस १०० डॉलर बक्षीस देण्याचें अमेरिकेंतील युनिव्हर्सल स्टूडिओजनीं जाहीर केलें आहे. सुचविलेली ठार करण्याची पद्धत फार भीषण असतां कामा नये, त्यामुळें हिटलरला फार लवकर मृत्यू येतां कामा नये व त्याचा जीव जाण्यास फार वेळाहि लागतां कामा नये. " हिटलरचा मृत्यू " ह्या आगामी बोलपटांत सर्वोत्कृष्ट कल्पनेचा उपयोग करण्यांत येईल.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण सेळलें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हि-डंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

## हातपाय चालतात तोंवर

म्हातारपणाची तरतूद करणें अवश्य आहे. चांगल्या कंपनींत उतरलेला विमा हा ऐन वेळीं उपयोगी पडतो. या संबंधांत आपणांस कसलीहि माहिती पाहिजे असल्यास आम्हांकडे विचारा. आम्ही सर्व खुलासा करून योग्य मार्ग दाखवूं.

मॅनेजर,
**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.**
सातारा शहर.

पुणें शाखा-१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.

## खारे काजू, मसालेदार काजू

सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काळा खजूर, अंजीर वगैरे मिळतील.

द. ना. हेजीब
(२) १० शुक्रवार, पुणें.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक

# स्फुट विचार

## नफेबाजीवर मोहीम आणि किंमतींचें नियंत्रण

गैरवाजवी नफ्याच्या आशेनें माल विक्रीसाठी बाहेर न काढणें व अशा रीतीनें बाजारभाव भलत्या प्रमाणांत वाढवणें आणि लोकांच्या तीव्र गरजेचा फायदा घेऊन अवास्तव किंमती खरीद-दारांकडून उकळणें हीं कारणें सध्यांच्या तीव्र महागाईच्या मुळाशीं बऱ्याच अंशीं आहेत ह्यांत आतां कोणास शंका नाहीं. बेताच्या किंमतीनें सामान्य जनतेस नित्याच्या गरजा भागवण्यासाठीं जिनसा मिळाव्या ह्या बेतानें मालाचा पुरवठा व वांटणी ह्यांची व्यवस्था करण्याची सरकारची खटपट चालली आहे अशा वेळीं नफेबाजी बंद न पडल्यास ह्या प्रयत्नांस अपेक्षित यश येणें अशक्य आहे. ह्याकरितां सरकारनें आपला विशेष अधिकार चालवून जनतेच्या जिव्हाळ्याच्या हितास विघातक असलेले नफेबाजीचे प्रकार संपुष्टांत आणावे अशी मागणी लोकमताच्या वतीनें वारंवार करण्यांत आली आहे. आजच्या अग्रलेखांत सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थान सरकार धान्यपुरवठ्याची समाधानकारक वांटणी करण्याचें धोरण अमलांत आणीत आहे तें फलदायी होण्यासाठीं त्यानें आतां डिफेन्स ऑफ इंडिया कायद्याखालीं नवीन नियम करून नफेबाजी व माल विक्रीसाठीं बाहेर न काढणें हे गुन्हे समजण्यांत येतील असें जाहीर केलें आहे. धान्याच्या सांठ्यांचें नियंत्रण करून सर्वांस जरूरीचे प्रमाणांत माल मिळेल अशी तजवीज प्रांतिक सरकारें करीत आहेत, तिच्या अंमलबजावणींत हिंदुस्थान सरकारचा नवीन हुकूम सहायकारक होईल ह्यांत संशय नाहीं. मालाच्या किंमतींचें नियंत्रण करण्याच्या धोरणास पाठिंबा देण्याचेंहि दिल्ली येथें भरलेल्या अन्नपरिषदेनें ठरवलें आहे हेंहि युक्त आहे. शेतीच्या मालाच्या बाजारभावांसंबंधानें उत्पादकांस निश्चिती नसल्यास धान्य वगैरेचा पुरवठा करणें सरकारास दुरापास्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. नेहमींच्या उपयोगाच्या वस्तूंच्या किंमती ह्याच रीतीनें निश्चित व्हावयाच्या आहेत.

---

## ब्रिटिश कोळशाच्या खाणींत मजुरांचा तुटवडा

गेल्या आठवड्यांत ब्रिटिश कॉमन्स सभेंत तेथील कोळशाच्या परिस्थितीवर चर्चा झाली. स्वस्त कोळशाचा भरपूर पुरवठा कार्यक्षम रीतीनें कसा चालू ठेवतां येईल, हा त्यांतील महत्त्वाचा प्रश्न आहे. इतर उद्योगधंदे व लष्कर ह्यांतून ६० हजार लोक काढून ते कोळशाच्या खाणींत कामास लावले तरी सुद्धां खाणींचें उत्पादन कमीच होत आहे. खाणींतील कामगार असंतुष्ट असून त्याचा धंद्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे. ग्रेट ब्रिटनमधील कोळशाचा प्रश्न हा केवळ युद्धकालीन महत्त्वाचा नाहीं. युद्धसमाप्तीनंतर ब्रिटिश कोळशास इटली वगैरे देशांत मागणी निर्माण होईल, व युरोपांतील इतर देशांकडेहि वहातुकीचें जळण म्हणून कोळसा लागेल. १९३८सालापर्यंत इटली, फ्रान्स, बेल्जम, डेन्मार्क, नेदरलंड्स इत्यादि देशांत ब्रिटिश कोळसा मोठ्या प्रमाणावर आयात होत असे व युद्धानंतर पुनः ती आयात सुरू होईल. ग्रेट ब्रिटनमध्येंहि कोळशाचा खप वाढेल. ह्याचा अर्थ, ब्रिटिश कोळशाच्या खाणींत आणखी सुमारें १½ लक्ष मजूर आवश्यक होतील. आजच मजूर सक्तीनें कामास येण्याची पंचाईत पडत आहे, तर युद्ध संपल्यावर पुरेसे मजूर मिळूं शकतील काय? पालक आपल्या मुलांना खाणींत कामास पाठविण्यास तयार नाहींत. खाणींतील मजुरांचें वेतन व त्यांची रहाणी ही पुरेशी आकर्षक केल्याविना नवीन मजूर मिळणार नाहींत, अशी एकंदर परिस्थिति आहे. युरोपांतील कोळशाच्या खाणी कालांतरानें पुनः सुरू झाल्या म्हणजे ब्रिटिश खाणींना स्पर्धेच्या किंमतींत कोळसा पुरवावा लागेल आणि मग पुरेसे मजूर उपलब्ध होऊनहि केवळ भागणार नाहीं. कोळशाच्या खाणींत यंत्रसामुग्रीचा अधिकाधिक उपयोग करूं लागणें, हाच त्यावर उपाय आहे. ब्रिटिश उद्योगधंदे स्वस्त कोळशावरच आधारलेले आहेत व ह्यापुढील नवे उद्योगधंदेहि त्याच्या मुबलक पुरवठ्यावरच अवलंबून रहाणार आहेत: कोळशाच्या खाणींचें महत्त्व व त्यांची आजची व पुढची परिस्थिति ह्यासंबंधीं ग्रेट ब्रिटनमध्यें इतकी काळजी का व्यक्त केली जाते, ह्याचें रहस्य वरील माहितीवरून लक्षांत येईल.

---

## अन्नपुरवठ्याबाबत सरकारचे निर्णय

दिल्ली येथें भरलेल्या अन्नपरिषदेच्या चर्चेस अनुलक्षून हिंदुस्थान सरकारनें निश्चित केलेल्या तीन महत्त्वाच्या बाबींचे विषयीं अन्नखात्याचे चिटणीस मि. हचिंग्ज, ह्यांनीं घोषणा केली. मुख्य धान्यांच्या किंमती कायद्यानें ठरवणें, शहरांत शिधा पद्धति चालू करणें व जरूरीच्या धान्यांच्या पुरवठ्याची आपल्या प्रांतापुरती त्यांच्या सरकारांनीं तजवीज करणें ह्या त्या तीन बाबी होत. ह्यांपैकीं तिसऱ्या प्रश्नाविषयीं अधिक खुलासा करण्यांत आला आहे, तो असा. धान्यांची जुळवाजुळव करणें पुन्हां प्रांतिक सरकारांवर सोपवण्यांत आलें असतां तें अलिकडील अनुभवाप्रमाणें असमाधानकारक होण्याची भीति आहे. ह्या शंकेस असें उत्तर देण्यांत आलें आहे कीं, धान्यपुरवठ्याचें कार्य मध्यवर्ती सरकारनें सर्वस्वी स्वतःकडे घेणें हें तात्त्विक दृष्ट्या उत्कृष्ट असलें तरी तूर्त तसें करणें व्यावहारिक नाहीं. तथापि, हिंदुस्थान सरकार जरूर तेथें व जरूर त्या प्रमाणांत स्वतःच्या अधिकाराच्या जोरावर प्रांतांमध्यें इष्ट व एकसूत्री धोरण अंमलांत आणलें जाण्याची व्यवस्था करील. प्रांतिक सरकारांच्या धान्य कारभारांत हात न घातला गेला तरी त्यांनीं मध्यवर्ती सरकारास आवश्यक माहिती पुरवावी, त्याच्या सूचनांचा योग्य परामर्श घ्यावा व प्रसंग आल्यास त्याचा हुकूम ऐकावा असा ह्याबाबतचा नियोजित कार्यक्रम आहे. सबंध देशासाठीं धान्यांच्या निश्चित किंमती एकदम ठरवून देतां येणार नाहींत आणि त्या प्रांतांच्या हद्दींत प्रथम निश्चित कराव्या लागतील व त्यांची मर्यादा विस्तृत करतां येईल असें मि. हचिंग्ज ह्यांनीं सांगितलें आहे. शेतकऱ्यांस चरितार्थास लागणाऱ्या धान्याव्यतिरिक्त इतर वस्तूंच्याहि किंमती निश्चित व्हावयाचें ठरलें आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्यांच्या पिकांच्या योग्य किंमती शेतकऱ्यांस मिळाव्या आणि धान्यांचें नियंत्रण झाल्यामुळें ह्या उत्पादक वर्गाचें नुकसान होऊं नये ह्यासाठीं वरील योजना करण्यांत येणार आहे. ती यशस्वी झाल्यास शेतीचा उत्पादन खर्च बेतांत राहून शेतकऱ्यांची रहाणी महागाईची व अडचणीची होणार नाहीं. पाऊण लाख व अधिक वस्तीच्या शहरांत शिधापद्धति अमलांत येण्यावर हिंदुस्थान सरकारचा विशेष भर आहे. देशांतील धान्यांच्या उत्पादनाचे आकडे पूर्णत्वानें विश्वसनीय नाहींत ह्याची त्याम जाणीव असल्यानें येत्या नव्या पिकांच्या अनुभवाच्या आधारावर निश्चित अंदाज व कार्यक्रम उभारण्यांत यावयाचे आहेत. बाहेरून येणाऱ्या धान्यानें भरलेलें पहिलें जहाज हिंदुस्थानास पोहोंचलें आहे आणि दुसरें लवकरच येऊन धडकेल असें सर ज्वालाप्रसाद, अन्नमंत्री, ह्यांनीं जाहीर केलें आहे, ही समाधानाची बातमी आहे.

## कामगारांच्या आरोग्यरक्षणासाठी कारखानदारांचे प्रयत्न

निरोगी कामगार ज्यास्त कार्यक्षम व समाधानी असतो, ह्या तत्त्वावर आपल्या कामगारांना वैद्यकीय मदत देण्याची योजना कित्येक अमेरिकन कारखानदारांनीं अंमलांत आणली आहे. प्रत्येक कामगारानें दररोज आणा दोन आणे द्यावेत व त्या जमणाऱ्या फंडांतून वैद्यकीय उपचाराचा खर्च चालावा, अशी ती व्यवस्था आहे. अर्थात्, त्यामुळें आजारी माणसावर होणाऱ्या खर्चाचा थोडा फार बोजा निरोगी माणसावरहि पडतो. परंतु, एकंदरीनें पहातां, सर्वच कामगारांवर हा बोजा वाटला गेल्यामुळें विम्याच्या तत्त्वाप्रमाणें, त्यांत सर्वांचीच सोय होते. कारखानदारहि ह्या फंडांत रक्कम टाकून कामगारांच्या वैद्यकीय उपचारांस सहाय्य करितात. न्यूयॉर्कच्या कन्सॉलिडेटेड एडिसन कंपनीचें ह्या बाबतींत उदाहरण देण्याजोगें आहे. ही कंपनी कामगारांच्या बरोबरीनेंच फंडांत रक्कम टाकते. न्यूयॉर्क शहरांत ठिकठिकाणीं तिनें ६४ डॉक्टर नेमलेले आहेत, त्याखेरीज आणखी १७५ डॉक्टरहि कांहीं वेळ कंपनीसाठी खर्च करतात. कंपनीनें १० मोठ्या इस्पितळांत आपले कामगार जरूरीप्रमाणें ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे. कामगार इस्पितळांत स्वतःचे पायांनीं जाण्याजोगी त्याची प्रकृति नसल्यास अँब्युलन्सची सोय करण्यांत येते. कंपनीनें नेमलेल्या ४६ दंतवैद्यांपैकीं कोणाकडेहि जाऊन एडिसन कंपनीच्या कामगारानें आपलें दात काढून घ्यावेत, त्यास पैसे पडत नाहींत. दातांच्या कवळ्याहि फुकट करवून मिळतात. कोणत्याही कामगारास वाटेल तेव्हां आपली प्रकृति कंपनीचे कायम डॉक्टराकडून तपासून घेतां येते. आजारामुळें एकादा कामगार दोन आठवड्यांपेक्षां जास्त दिवस कामावर गेला नाहीं तर त्यानें आपली प्रकृति डॉक्टरास दाखविलीच पाहिजे असा नियम आहे. कामगारांच्या हवापालटासाठीं कंपनीनें शहरापासून दूर अशा ठिकाणीं ८५ रोग्यांची सोय केली आहे, त्यास जोडूनच २७५ एकरांचा मळा आहे. त्यांतील अंडी, दूध; लोणी, फळें, भाज्या, ह्यांचा रोग्यांस पुरवठा होतो. १९४१ सालीं १ हजार रोगी कामगारांनीं मळ्यांत एकूण १८,२६४ दिवस राहून आपलें आरोग्य सुधारलें. त्यासाठीं त्यांना रोजचा खर्च दोन आणेहि पडला नाहीं! अमेरिकन कारखानदार आपल्या कामगारांच्या कार्यक्षमतेसाठीं कुठवर सोई करण्यास तयार असतात, हें वरील वृत्तांतावरून लक्षांत येईल. प्रत्येक कारखानदाराची योजना थोडीफार वेगळी असली, तरी त्याचा उद्देश एकच असतो. कारखानदार आपल्या कामगारांसाठी जें करतात, तें सरकारनें आपल्या नागरिकांसाठी कां करूं नये? असा प्रश्न उपस्थित होतो व त्या दृष्टीनें अमेरिकेंत प्रचार चालू आहे.

## हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

१ आक्टोबर, १९६६ नंतर परंतु आक्टोबर १९६८ पूर्वी परत फेडण्यांत येणार असलेलें ३% व्याजाचें २५ कोटि रुपयांचें कर्ज हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे. प्रत्येक १०० रुपयांच्या रोख्यास ९८ रुपये पडतील. व्याजावर प्राप्तीवरील कराची माफी नाहीं. कर्जावरील व्याज प्रत्येक सहामाहीस, ता. १ एप्रिल व १ आक्टोबर रोजीं दिलें जाईल. २२ आक्टोबर १९४३ रोजीं कर्जाच्या विक्रीस प्रारंभ होऊन ता. २६ रोजीं ती थांबविण्यांत येईल. अर्थात्, २५ कोटि रुपयांचें कर्ज विकलें गेल्यानंतर २६ तारखेपूर्वी केव्हांहि विक्री बंद केली जाईल.

### मुंबई प्रांतांतील वेड्यांचीं इस्पितळें

मुंबई प्रांतांत येरवडा, ठाणें, रत्नागिरी, धारवाड आणि अहमदाबाद येथें मिळून वेड्यांचीं पांच इस्पितळें असून त्यांत २,२५९ व्यथितांची सोय आहे. परंतु, १९४२ सालीं त्यांत २,७३८ व्यथितांची तरतूद करण्यांत आली. त्या वर्षी ३४३ वेडे बरे होऊन इस्पितळांतून त्यांची सुटका झाली. २८ जणांचें वेड कमी झालें म्हणून त्यांस सोडण्यांत आलें. पांच इस्पितळांवर एकूण ११,१३,६९५ रुपये खर्च झाला, त्यांपैकीं ६,४५,५०५ रुपये वसूल होऊन प्रांतिक सरकारावर ४,७४,०७७ रुपयांचा बोजा आला. प्रत्येक रुग्णावर धारवाड येथें दरसाल सरासरीनें १७१ रुपये खर्च झाले; येरवड्याच्या इस्पितळाचा तत्सम आंकडा ३६८ रुपये होता.

---

### उद्योगांतून उत्कर्ष *

सर मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या ह्यांच्या "Prosperity through Industry" ह्या इंग्रजी पुस्तकाचें श्री. य. रा दाते ह्यांनीं मराठींत रुपांतर केलें असून तें महाराष्ट्र कारखानदार संघातर्फे त्याचे अध्यक्ष, श्री. न. गं. आपटे ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीबद्दलची सर विश्वेश्वर अय्या ह्यांची कळकळ व त्याबाबत त्यांचे अविरत प्रयत्न ह्यांचा सर्वांस परिचय आहेच. प्रस्तुत पुस्तकांत त्यांचे विचार व त्यांनीं सुचविलेली प्रगतीची दिशा ह्यांची माहिती त्यांचेच शब्दांत परंतु मराठी भाषेंत देण्यांत आली आहे. सर विश्वेश्वर अय्या ह्यांची योजना अत्यंत व्यापक व पद्धतशीर आहे व त्यावरून औद्योगिक प्रगति किती निश्चयात्मक संघटनेनें करावयास पाहिजे, तें दिसून येतें. औद्योगिक बाबतींतील औदासिन्य नष्ट करून लोकांना विचारप्रवण करण्यास प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग व्हावा, अशा हेतूनेंच हें मराठी रुपांतर प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

*पृ. सं. ६६ किंमत ८ आणे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महेंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## सातारा जिल्ह्यांत अधिक धान्य पिकवण्याच्या मोहिमेस प्रोत्साहन

सातारा जिल्ह्यांत धान्य पिकविण्याच्या मोहिमेस प्रोत्साहन मिळण्याकरितां सर धनजीशहा कूपर यांनीं स्वतः दोन हजार एकशें रुपयांची रकम शेतकऱ्यांस बाक्षिसें देण्यासाठी कलेक्टर, सातारा यांच्याकडे देण्याचें योजिलें आहे व तिचा त्यांनीं स्वीकार केलेला आहे. जे शेतकरी रब्बीच्या हंगामांत एक एकर किंवा अधिक क्षेत्रफळाच्या जिराईत जमिनीमध्यें ज्वारीचें जास्तींत जास्त प्रमाणांत पीक काढतील त्यांना अनुक्रमें हीं बाक्षिसें मिळावयाचीं आहेत. सातारा जिल्ह्याचे तालुके व पेठे मिळून चौदा भाग पाडलेले आहेत ते खालीलप्रमाणें:—

तालुके:—१ सातारा २ वाई ३ जावळी ४ कोरेगांव ५ खटाव ६ खानापूर ७ कऱ्हाड ८ पाटण ९ वाळवा १० तासगांव.

पेठे:—१ महाबळेश्वर २ माण ३ शिराळा ४ खंडाळा.

| | | |
|---|---|---|
| पहिलें बक्षिस | रुपये | ७५ |
| दुसरें " | " | ५० |
| तिसरें " | " | २५ |
| एकूण | | १५० |

या चढाओढीच्या बाबतींत कलेक्टर यांनीं खालीलप्रमाणें सूचना केलेल्या आहेत.

१ बक्षिसांचा निकाल देतेवेळीं ती जमीन बारा आणे पीक देणाऱ्या प्रतीची कमी आहे किंवा प्रतीची आहे ह्याचा विचार करावा. २ एखाद्या वेळीं दोन जमिनीमध्यें सारख्याच प्रमाणांत धान्य आल्यास जें धान्य उत्तम व तेजदार असेल त्याला बक्षीस देण्यांत यावें. ३ जो शेतकरी जमिनीमध्यें स्वतः धान्य पिकवील त्यालाच बक्षिस मिळावें, मग तो जमिनीचा मालक असो अगर कूळ असो. ४ पिकांची तपासणी करण्याकरितां नेमण्यांत येणाऱ्या कमिटींत कोण लोक असावेत याचा विचार सर्वस्वी मामलेदार यांनीं करावयाचा आहे.

या चढाओढीमध्यें ज्या शेतकऱ्यांना भाग घेणें असेल त्यांनीं आपले अर्ज त्या त्या तालुक्याचे मामलेदार अगर महालकरी यांच्याकडे डिसेंबर १९४३ अखेरपर्यंत करावेत.

### अमेरिकन नट-नटींचे पगार

अमेरिकेंत दरसाल ७५ हजार डॉलर्सपेक्षा ज्यास्त पगार मिळविणाऱ्या लोकांची यादी तेथील सरकारनें प्रसिद्ध केली आहे त्यांत सिनेमा नट व नटी ह्यांचा भरणा मोठा दिसतो. जीनेट मॅकडोनल्ड ह्या नटीस सालिना ३ लक्ष डॉलर मिळतात, बिंग क्रॉसबीहि तेवढाच पगार मिळविते. जिंजर रॉजर्स १,४०,००० डॉलर, मर्लिन डीट्रिच २,००,००० गॅरी कूपर २,९९,०००, नॉर्मा शिअरर ३,४९,०००, विल्यम पॉवेल २,४२,०००, मर्ना लॉय १,२५,००० क्लार्क गेबल १,९८,००० जोन क्रॉफर्ड १,९५,०००, रॉनॉल्ड कॉलमन १,००,०००, बार्बरा स्टॅनविक ९०,०००, ह्याप्रमाणे इतर नट-नटींचे पगार आहेत. सिनेमा नट-नटींना सर्वच देशांत मोठाले पगार मिळतात व अमेरिकेंत तर पगारांचा उच्चांक आहे. अमेरिकन फिल्म्स जगांतील सर्व देशांत दाखविल्या जातात व तेथें मिळविलेल्या संदर्णीतूनच हे पगार दिले जातात हें उघड आहे.

### श्रीमहालक्ष्मी को. बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल आतां १५,००० रुपये झालें आहे. तिच्याकडे ७७३ खात्यांवर मिळून १,४०,९७५ रुपयांच्या ठेवी आहेत. रिझर्व्ह व इतर फंड ६,०७१ रुपयांचे आहेत. वर्षअखेर येणें कर्ज ४८,०६५ रुपयांचें आहे. अहवालाचे वर्षी निव्वळ नफा २,८५६ रुपये झाला. बँकेनें सभासदांसाठी सरकारी रोखे व शेअर्स ह्यांची खरेदी विक्री करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें.

### धुळें अर्बन को. बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल ९६,१६५ रुपये झालें असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत १ लक्ष, ४० हजार रुपये आहेत. ठेवींचा आकडा सुमारें ४½ लक्ष रुपये आहे. बँकेनें १½ लक्ष रुपयांचे रोखे घेतलेलें असून सुमारें ३ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. बँकेची थकबाकी सालोसाल कमी होत चालली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा १५,३८८ रुपये झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें.

### सांगली स्टेट सें. को. बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल ६७,५२० रुपये आहे. रिझर्व्ह व व इतर फंड ९०,१७३ रुपयांचे आहेत व ठेवी ५ लक्ष, ११ हजारांच्या आहेत. बँकेनें २ लक्ष, ५ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत; बाकीची रकम रोख, इतर बँकांत व रोख्यांत आहे. सोसायट्यांकडील थकबाकी २६ हजारांनीं वाढली आहे. सोसायट्यांच्या सभासदांचे सोईसाठीं सोसायट्यांतर्फे गांवोगांव काढलेल्या स्वस्त धान्याच्या १३ दुकानांस बँकेनें ८½ हजार रुपये भांडवल पुरविलें. अहवालाचे वर्षी बँकेस ७,५४५ रुपये नफा झाला. भागीदारांस द. सा. द. शे. ५ रु. १० आ. डिव्हिडंड मिळालें.

### नाशिक जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक, लि.

वरील बँकेचें भाग भांडवल २३,०२० रुपये आहे. तिनें प्रांतिक बँकेकडून २ लक्ष, ६६ हजारांचें कर्ज घेतलेलें आहे व तिचें सभासदांकडून येणें कर्ज १ लक्ष, ६५ हजारांचें आहे. गेल्या आठ वर्षांत मिळून बँकेनें ३ लक्ष, ४८ हजार रुपये कर्ज दिलें आहे. १९४२-४३ मध्यें फक्त १३½ हजारांचें कर्ज देण्यांत आलें; हा शेतीच्या मालाच्या किंमतींमधील वाढीचा परिणाम आहे. थकबाकीचें प्रमाण १८% आहे. थकलेल्या व संशयित व्याजासाठी ४,१५९ रुपये रिझर्व्ह ठेवून बँकेस १९४२-४३ अखेरच्या वर्षी १,३४९ रुपये नफा झाला.

### वाई अर्बन को. बँक लि., वाई

वरील बँकेच्या पटावर ३२४ सभासद असून त्यांनीं २०,५७५ रुपयांचे भाग घेतलेले आहेत. रिझर्व्ह व इतर फंड १८½ हजारांचे आहेत. ठेवींचा आकडा सुमारें १½ लक्ष रुपये आहे. बँकेजवळ रोख शिल्लक व इतर बँकांत १ लक्ष, ५ हजार रुपये आहेत, २५ हजारांची इन्व्हेस्टमेंट आहे व ३५½ हजारांचीं कर्जें आहेत. गेले सालीं थकबाकीचें प्रमाण ५७% होतें तें यंदा १२% आहे, हें समाधानकारक आहे. वर्षअखेर बँकेस ३,००८ रुपये नफा झाला व भागीदारांस ४½% डिव्हिडंड मिळालें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २८ आक्टोबर १९४२ अंक ४३

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठीं जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
**ट्रस्ट ऑफ इंडिया**
विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २८ आक्टोबर १९४२ अंक ४३

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनीच्या**

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें १.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

वंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### सुरतमध्यें दुय्यम नाण्यांस मागणी

"सुरत येथील इंपीरिअल बँकेच्या शाखेनें तेथील जनतेस १९४० मध्यें २,९६,३०० रुपयांचीं दुय्यम नाणीं पुरविलीं. १९४१ मध्यें हा आकडा २,५६,००० रुपये झाला व १९४२ मध्यें १५ ऑक्टोबरचे आंतच बँकेनें ३,४१,४०० रुपये किंमतीच्या दुय्यम नाण्यांचा वटवटा केला. ह्यावरून असें दिसून येतें, कीं सध्या दुय्यम नाण्यास असलेली मागणी कृत्रिम स्वरूपाची आहे. गेल्या वर्षीच्या मानानें चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतच ३३% जास्त नाणीं बँकेनें दिलीं आहेत, तेव्हां ह्यापुढें डिसेंबर अखेर बँक दुय्यम नाणीं देणार नाहीं."—इंपीरिअल बँकेच्या सुरत शाखेच्या एजंटानें वरील आशयाची नोटीस लाविली आहे.

### नोबेल प्राइझ

१९४२ सालीं नोबेल प्राइझ देण्यांत येणार नाहीं, असें स्वीडिश सरकारनें जाहीर केलें आहे. डायनामाइटचा संशोधक आल्फ्रेड नोबेल ह्यानें आपल्या मागें २० लक्ष पौंड ठेवले व त्यांचा विनियोग पांच "नोबेल बक्षिसें" देण्याकडे करावा असें ठरविलें. हीं बक्षिसें दरसाल पांच क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीस देण्यांत येतात. डॉ. रवींद्रनाथ टागोर व सर चंद्रशेखर रमण ह्यांस हीं बक्षिसें मिळालेलीं आहेत.

### इंदूर संस्थानचें अंदाजपत्रक

इंदूर सरकारच्या १९४२-४३ च्या अंदाजपत्रकांत १ कोटि, ४० लक्ष रुपयांचें उत्पन्न व १ कोटि ३९½ लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

### ट्रेझरी बिलांवर ९ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत ८ कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ९ आ. ९ पै इतका पडला आहे.

### स्वीडन व जर्मनी ह्यांचेमधील व्यापार

स्वीडन व जर्मनी ह्यांचेमधील व्यापार वाढला आहे, परंतु युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत स्वीडननें जर्मनीकडे कोणत्याहि प्रकारचें युद्धसाहित्य पाठविलेलें नाहीं. लोखंडाची निर्गत तर कमी झाली आहे. ह्याचा अर्थ, जर्मनीला जास्त जवळून लोखंड मिळूं शकतें.

### निकाल रविवारीं जाहीर झाला!

ब्रिटिश कॉमन्स सभेची पोटनिवडणूक नुकतीच झाली, तिचा निकाल रविवार ता. १८ ऑक्टोबर रोजीं जाहीर करण्यांत आला. पार्लमेंटच्या निवडणुकीचा निकाल ह्यापूर्वी केव्हांहि रविवारीं जाहीर झालेला नाहीं.

### बीं वाटण्यासाठीं ग्रँट

अहमदनगर आणि पुणें ह्या जिल्ह्यांत तुरीचें व पूर्व खानदेश जिल्ह्यांत गव्हाचें बीं वाटण्यासाठीं खर्चाची तरतूद करण्याकरितां मुंबई सरकारनें आणखी २० हजार रुपयांची ग्रँट मंजूर केली आहे.

### हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न

| | |
|---|---|
| सप्टेंबर, १९४१ | ३·५३ कोटि रु. |
| ऑगस्ट, १९४२ | २·७४ कोटि रु. |
| सप्टेंबर, १९४२ | ३·१५ कोटि रु. |
| एप्रिल ते सप्टेंबर, १९४१ | २८·२९ कोटि रु. |
| एप्रिल ते सप्टेंबर, १९४२ | २२·९१ कोटि रु. |

### एका अमेरिकन सैनिकास सर्पदंश

हिंदुस्थानांत आलेल्या अमेरिकन सैनिकांपैकीं एकास आतापर्यंत सर्पदंश झालेला आहे. हा साप विषारी नव्हता.

### दारूबंदी

संयुक्त प्रांतांत ज्या ठिकाणीं दारूबंदीचा उपक्रम करण्यांत आला तेथें तो निष्फळ ठरला, असें त्या प्रांताच्या अबकारी खात्याचें म्हणणें आहे. चोरून दारू गाळणें हा एक धंदा होऊन बसला आहे व अबकारी गुन्ह्यांचें प्रमाण खूपच वाढलें आहे; कांहीं ठिकाणीं तर डेअरीच्या दुधाप्रमाणें चोरून गाळलेल्या दारूचा पुरवठा वक्तशीर केला जातो, असें त्या रिपोर्टांत म्हटलें आहे.

### चरखा संघास देणगी

अखिल भारतीय चरखा संघास, त्यांच्या वर्कशॉपसाठीं यंत्रसामुग्री खरीदण्याकरितां २०,२२५ रुपयांची भांडवली स्वरूपाची ग्रँट मद्रास सरकारनें दिली आहे.

### कूपन पद्धति

मद्रास शहरांत १ नोव्हेंबरपासून कूपन पद्धतीनें रॉकेल देण्यांत येईल.

### युद्धविषयक मालाची खरेदी

हिंदुस्थान सरकारनें १९४१-४२ मध्यें लहान प्रमाणावर चालणाऱ्या कारखान्यांकडून ५ कोटि रुपयांची युद्धविषयक मालाची खरेदी केली होती. चालू वर्षी हा आंकडा १० कोटींवर जाईल.

### चीनमधील खास हक्क

शनिवार ता. २४ रोजीं अमेरिकन सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. कॉर्डेल हल, ह्यांनीं चीनमधील खास हक्क सोडण्यासंबंधींच्या कराराचा मसुदा अमेरिकेंतील चिनी सरकारच्या वकिलांचे हवालीं केला.

### मोटार अपघात

मुंबई प्रांतांत १९४०-४१ मध्यें एकूण ७,४५६ मोटार अपघात झाले व त्यांत २९७ लोक मरण पावले. १९३९-४० मधील ७,९०३ अपघातांत २७६ लोकांस मृत्यु आला होता.

### बंद टेलिफोन तीन दिवसांत सुरू

लंडनवरील एका बॉंब-हल्ल्यानंतर २० हजार टेलिफोन बंद पडले, ते तीन दिवसांत सुरू करण्यांत आले.

### अठ्ठावीस केंद्रांत पोहण्याचे ४१ तलाव

हिंदुस्थानांतील २८ केंद्रांत लष्करी सैनिकांसाठीं पोहण्याचे ४१ तलाव बांधण्यासाठीं युद्धखात्यानें ३ लक्ष, २४ हजार रुपये भांडवली खर्च मंजूर केला आहे. तलाव चालू राखण्यासाठीं सालिना १ लक्ष, १२ हजार रुपये खर्च येईल.

### ब्राझीलमधील कॉफीचें उत्पादन

ब्राझील देशांतील कॉफीचें उत्पादन जागतिक उत्पादनाच्या ६९% आहे.

### सिनेमा ट्रेलरची लांबी

चित्रपटाबरोबर जाहिरातवजा लघुपट दाखविण्यांत येतात त्यांची लांबी ४०० फुटांपेक्षां अधिक असतां कामा नये, असें हिंदुस्थान सरकारनें १६ मे १९४१ रोजीं जाहीर केलें होतें. हा नियम त्या तारखेपूर्वी तयार व पास झालेल्या ट्रेलर्सनाच फक्त लागू आहे, अशी समजूत प्रचलित झाली ती चुकीची आहे असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३४० |
| २ अ. भा. चरखा ... संघाचें कार्य | ३४१ |
| ३ हिंदी बँकिंग ... | ३४२ |
| ४ शेड्यूल्ड बँकांची संख्या | ३४२ |
| ५ शेड्यूल्ड बँकांची ... परिस्थिति | ३४२ |
| ६ प्रॉमिसरी नोटेचा दावा कोठें चालतो ! ... | ३४२ |
| ७ स्फुट विचार ... | ३४३ |
| चांदीचें भवितव्य— चांदीचा युद्धावर परिणाम—चिनी चलन आणि जपानचा लुटारूपणा— रहाणीच्या खर्चांत सार्वत्रिक वाढ. | |
| ८ युद्धखर्च आणि युद्धकर्ज | ३४४ |
| ९ निजाम राज्यांत ए. आर. पी. ची व्यवस्था | ३४५ |

अर्थ

बुधवार, ता. २८ आक्टोबर, १९४२

## अखिल भारतीय चरखा संघाचें कार्य

अखिल भारतीय चरखा संघाचा १९४१-४२ चा ताजा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून संघाच्या वाढत्या व्यापाची चांगली कल्पना येते. हातमागावरील कापडास हिंदी बाजारपेठेंत आतां महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे व हातमागाच्या कापडास प्राधान्य देण्यास मुंबई सरकारनें आपल्या सर्व खात्यांस सुचविलें आहे. युद्ध-परिस्थितीमुळें हें घडून आलें असलें तरी खादीप्रसारास स्वाभाविकच मोठा वाव आहे आणि मोठ्या गिरण्यांची स्थापना आणि खादीचा विस्तार ह्यांच्यामध्यें तीव्र विरोध असण्याचें कारण नाहीं, हें आतां स्पष्ट झालें आहे. खेडेगावांतील गरीब लोकांस उद्योगधंदा देण्याच्या आवश्यकतेकडे हिंदी लोकांचें लक्ष वेधलें गेलेलें आहे. गेल्या दीड वर्षांत खादीचें उत्पादन ६०% वाढलें, तरी मागणी पुरी पडणें अशक्य झालें. सूत कातणारे जमा करून, त्यांचेकडून काढून घेतलेल्या सुताचें कापड विणकरांकडून विणून घेण्याची संघटना घडवून आणणें हें सोपें काम नाहीं; कारण गिरणीचें सूत वापरणारांस चरख्याचें सूत विणणें अवघड जातें. चरखा तयार करण्यास लागणारीं साधनेंहि सहजी मिळत नाहींत. भांडवलाच्या पुरवठ्याचा प्रश्नहि सोडवावा लागतो. १९४१-४२ अखेर चरखा संघाच्या कार्यांत ५० लक्ष रुपये गुंतलेले होते व आणखी भांडवल जमविण्याचा प्रयत्न संघानें चालू ठेवला होता. देणग्या मिळविणें, दीर्घ मुदतीचीं कर्जें काढणें, कपाशीच्या साठ्यावर कर्जें घेणें, कामगारांकडून लहान लहान ठेवी घेणें इत्यादि मार्गांनीं पैशाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. सूत कातणारे व विणणारे ह्यांच्या उन्नतीसाठींच संघाचें अस्तित्व असल्याकारणानें, कामगारांच्या लहान-सहान ठेवींचें महत्त्व विशेष आहे, असें संघाच्या रिपोर्टांत नमूद केलेलें आहे. संघास १९४१-४२ मध्यें ७ लक्ष रुपयांच्या देणग्या मिळाल्या, हेंहि लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

खादीचें उत्पादन व विक्री ह्यासंबंधीचे आकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून त्याविषयींची प्रगति दिसून येते.

**खादीचें उत्पादन ( हजार रुपये )**

| प्रांत | १९४० | १९४१ | १-७-१९४१ ते ३०-६-१९४२ | ३०-६-४२ अखेर १८ महिने |
|---|---|---|---|---|
| आंध्र | ४०६ | ५८९ | ६४२ | ८४३ |
| आसाम | ९ | ८ | ९ | १३ |
| बिहार | ७५७ | १०५० | ११४३ | १५२१ |
| बंगाल | ३७३ | ५८७ | ६१३ | ८२१ |
| मध्यप्रांत व महाराष्ट्र | ४४२ | ७४६ | ९९५ | १३०६ |
| गुजरात | १५३ | १७५ | ३०० | ३४० |
| कर्नाटक | २२४ | २९३ | ३३३ | ४५३ |
| काश्मीर | २१५ | ४३४ | ५१७ | ७२३ |
| केरळ | ८५ | १४५ | १६८ | २३५ |
| पंजाब | ३२० | ५२० | ६५० | ८६९ |
| राजस्तान | १८७ | ३८५ | ५५९ | ७०२ |
| सिंध | ११ | १५ | १७ | २३ |
| तामिळनाड | १०,४६ | १४,२१ | १७,८६ | २३,१३ |
| संयुक्त प्रांत | ८,२५ | १०,२२ | १२,८७ | १७,०३ |
| उत्कळ | ८३ | ९० | ९२ | १३० |
| एकूण | ५१,३७ | ७,४८१ | ९१,११ | १,२०,०२ |

चरखा संघाच्या कार्यक्षेत्रांत १५, ११० खेडेगावांचा समावेश होतो. त्यांपैकी ३,५७९ तामीळ नाडमध्यें; ३,४६८ संयुक्त प्रांतांत; २,०३० बिहारमध्यें; १,२५७ पंजाबांत व ६९० मध्यप्रांत-महाराष्ट्रांत आहेत. संघाचे नेतृत्वाखालीं ३,२४,३९१ लोक कातकाम करीत आहेत, त्यांची प्रांतवार वाटणी खेड्यांच्या वाटणीचे प्रमाणांतच साधारणतः आहे. विणकऱ्यांची संख्या २३,७८५ भरते, व इतर कामगारांची संख्या ४,३७७ आहे. तामीळ नाडमध्यें खादी विक्रीचीं ६५ भांडारें आहेत. त्याचे खालोखाल मध्यप्रांत—महाराष्ट्र (३४), संयुक्त प्रांत ( ३३ ), बिहार ( ३२ ), पंजाब ( ३१ ), आंध्र ( ३१ ) असा अनुक्रम येतो. एकूण खादी भांडारांची संख्या ३४६ आहे. वरील संक्षिप्त हकीकतीवरून चरखा संघाच्या कार्यांची कल्पना येईल. संघाचें कार्य पद्धतशीर चालू आहे. संघाच्या ट्रस्टीजच्या मंडळाचे अध्यक्ष महात्मा गांधी हे असून त्यांत आणखी ११ आजीव सभासदांचे प्रतिनिधी व २ वार्षिक सभासदांचे प्रतिनिधी आहेत. संघाचें कार्य सुकर व्हावें ह्यासाठी बजेट, हिशेब, शिक्षण, इत्यादिसाठी तिच्या उपसमित्या नेमलेल्या आहेत. प्रयोग, संशोधन, इत्यादींकडे संघाचें विशेष लक्ष आहे. सध्याची परिस्थिति संघाच्या कार्यांचा विस्तार करण्यास अतिशय अनुकूल आहे व त्यासाठीं संघास भांडवलाची आवश्यकता आहे. कापडाचे बाबतींत खेडेगावांत स्वयंपूर्णता प्राप्त करून देणाऱ्या खादीस आतां मोठा वाव आहे.

## हिंदी बँकिंग

### ठेवींत वाढ, गुंतवणूक कमी

हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या व्यवहारासंबंधीं ताजे तुलनात्मक आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून हिंदी बँकिंगची परिस्थिति लक्षांत येईल. १९४२ च्या दुसऱ्या तिमाहींत शेड्यूल्ड बँकांनीं १५ नव्या शाखा उघडल्या, परंतु ५४ शाखा बंद झाल्या, त्यामुळें एकूण कचेऱ्यांची संख्या १४४४ वरून १४०५ वर आली. बंद झालेल्या शाखा मुख्यत: ब्रह्मदेश व हिंदुस्थानाचा पूर्व किनारा ह्या भागांतीलच आहेत. पांच प्रमुख शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या ३४३ शाखांत २ शाखांची भर घातली, परंतु एक्सचेंज बँकांच्या शाखांत आठाची घट झाली. इंपिरिअल बँकेच्या शाखांची संख्या ४०० ची ३८९ झाली. इतर बँकांच्या ६०७ शाखांऐवजीं ५८५ शाखा चालू राहिल्या.

शेड्यूल्ड बँकांच्या परिस्थितीचे तक्त्यावरून त्यांचेकडील ठेवी कशा वाढत आहेत हें दिसून येतें. एकूण ठेवींतील चालू ठेवींचें प्रमाण एका वर्षाचे अवधींत ५६.७९% चें ७५.८०% झालें व मुदतबंद ठेवींचें प्रमाण ४३.२१% वरून २४.२०% वर उतरलें. बँकांस आपला पैसा गुंतविण्याची पंचाईत पडत आहे ह्यामुळें त्यांनीं आपला शिलकी पैसा रिझर्व्ह बँकेकडे कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा पुष्कळच अधिक प्रमाणांत ठेवला आहे. कर्जाची व हुंड्यांत गुंतविलेल्या रकमेची बेरीज १-९-१९३९ रोजीं १०५ कोटि रुपये होती, ती आतां ७९¼ कोटींवर आली आहे. म्हणजे, ह्या गुंतवणुकीचें एकूण देण्याशीं असणारें प्रमाण ४४.४२% वरून १९.१३% वर आलें आहे. एकीकडे ठेवी वाढत आहेत तर दुसरीकडे आलेला पैसा गुंतविणें कठीण जात आहे. ही प्रवृत्ति हिंदी बँकांतच आढळते, असें नाहीं. ब्रिटिश बँकांसहि हाच अनुभव येत आहे.

**शेड्यूल्ड बँकांची संख्या**

| | ३०-९-४२ | ३१-३-४२ | ३०-९-४१ |
|---|---|---|---|
| एक्सचेंज बँका | १७ | १७ | २० |
| इतर शेड्यूल्ड बँका | ४५ | ४५ | ४४ |

## प्रॉमिसरी नोटेचा दावा कोठें चालतो ?

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

लालभाईनें जिवतलालपासून २२,५०० रुपये कर्ज घेतलें. लालभाई अहमदाबादला व जिवतलाल मुंबईला रहात असे. लालभाईनें अहमदाबाद मुक्कामीं प्रॉमिसरी नोट लिहून दिली. त्या प्रॉमिसरी नोटेवरून जिवतलालनें मुंबईच्या कोर्टांत दावा लावला. त्यांत लालभाईनें अशी हरकत घेतली कीं, दाव्याचें कारण मुंबई कोर्टाच्या अधिकारमर्यादेंत घडलें नसल्यामुळें तो दावा चालविण्याचा अधिकार मुंबईच्या कोर्टास नाहीं. लालभाईची हरकत कोर्टानें मान्य केली व दावा योग्य कोर्टांत दाखल करण्यासाठीं वादीस परत करण्यांत यावा असा हुकूम दिला, म्हणून वादीनें हायकोर्टाकडे अपील केलें.

**हायकोर्टाचा निवाडा**

" वादांतील प्रॉमिसरी नोट अहमदाबाद मुक्कामीं लिहिण्यांत आली आहे ह्याबद्दल मुळींच वाद नाहीं. मुंबई कोर्टाच्या स्थलमर्यादेंत वादांतील दाव्याचें कारण घडलें असें आपल्यास म्हणतां येतें किंवा काय? ज्याअर्थी मुंबई कोर्टाच्या अधिकारमर्यादेंत वादांतील प्रॉमिसरी नोट लिहिण्यांत आली नाहीं अथवा ज्याअर्थी त्या प्रॉमिसरी नोटेची फेड मुंबई कोर्टाच्या अधिकारमर्यादेंत असलेल्या ठिकाणीं करण्यांत यावी असा उल्लेख त्या नोटेंत नाहीं त्याअर्थी मुंबई कोर्टास त्या प्रॉमिसरी नोटेवरून लावलेला दावा चालविण्याचा अधिकार नाहीं. प्रॉमिसरी नोटेचा सावकार मुंबईस रहात असल्यामुळें त्या नोटेची फेड ज्याअर्थी मुंबई मुक्कामीं करतां येत होती त्याअर्थी मुंबईच्या कोर्टास त्या नोटेवरून लावलेला दावा चालविण्याचाहि अधिकार आहे असें समजलें पाहिजे, अशा प्रकारचा युक्तिवाद वादीतर्फे करण्यांत आला आहे. परंतु कुळानें सावकाराचें राहण्याचें ठिकाण शोधून काढावें व तेथें जाऊन कर्जाची फेड करावी असा कायदा प्रॉमिसरी नोटेचे बाबतींत मुळींच लागू पडत नाहीं. वादांतील दाव्याचें कारण प्रॉमिसरी नोटेवरून घडलें असून त्या नोटेच्या भरण्यावरून घडलें नाहीं. सबब त्या नोटेची रकम ज्या ठिकाणीं देण्यांत आली असेल अथवा त्या रकमेची फेड ज्या ठिकाणीं करतां आली असती त्या ठिकाणीं दाव्याचें कारण घडलें असें म्हणतां येत नाहीं. ज्या ठिकाणीं प्रॉमिसरी नोट लिहिण्यांत आली त्याच ठिकाणीं दाव्याचें कारण घडलें असें समजलें पाहिजे. वादांतील प्रॉमिसरी नोट अहमदाबाद मुक्कामीं लिहिण्यांत आली असल्यामुळें त्या नोटेवरून अहमदाबादच्या कोर्टांतच दावा लावला पाहिजे. " वरील कारणास्तव हायकोर्टानें अपील खर्चासुद्धा काढून टाकलें. "न्यायबोध"

## शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

(कोटि रुपये)

| | २५-९-१९४२ | २६-६-१९४२ | २६-९-१९४१ | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|
| हिंदुस्थानांतील एकूण देणें | ४१४.४८ | ३६४.४६ | ३०९.६ | २३६.६० |
| त्यापैकी मागणी येतांक्षणींच देणें | ३१४.१६ | २६७.१५ | २०५.८२ | १३४.३६ |
| एकूण देण्याशी प्रमाण | ७५.८०% | ७३.३०% | ६६.४६% | ५६.७९% |
| मुदतबंद ठेवी | १००.३२ | ९७.३१ | १०३.८४ | १०२.२४ |
| एकूण देण्यांशी प्रमाण | २४.२०% | २६.७०% | ३३.५४% | ४३.२१% |
| रोख व रिझर्व्ह बँकेजवळ ठेव | ७६.३८ | ७५.४५ | ५७.०६ | ३१.८७ |
| एकूण देण्याशीं प्रमाण | १८.४३% | २०.७०% | १८.४३% | १३.४७% |
| दिलेलीं कर्जें व हुंड्यांत गुंतविलेली रकम | ७९.३१ | ९५.७७ | ११३.४६ | १०५.०९ |
| एकूण देण्याशी प्रमाण | १९.१३% | २६.२८% | ३६.६४% | ४४.४२% |
| रिझर्व्ह बँकेकडे कायदेशीर किमान रकमेपेक्षा ज्यास्त ठेवलेली रकम | ४६.३७ | ४५.६२ | ३६.०३ | १६.४१ |

# स्फुट विचार

## चांदीचें भवितव्य

चांदीच्या अलीकडे चढलेल्या किंमतीचें आणि तिचा हिंदी चलनाशीं जो संबंध आहे त्याचें विवेचन आम्हीं आमच्या गेल्या अंकांतील अग्रलेखांत केलें आहे. ह्या धातूच्या संबंधांत आणखी कांहीं सर्वसाधारण स्वरूपाची उद्बोधक माहिती आम्हीं येथें देत आहों. गेल्या कांहीं वर्षांत चांदीचें जागतिक उत्पादन सरासरीनें २६ ते २८ कोटि औंस इतकें झालें आहे असा अंदाज आहे. मेक्सिको व उत्तर अमेरिका ह्यांचा चांदीच्या उत्पन्नांत पहिला नंबर असून त्यांच्या खालीं कॅनडा, पेरू, ऑस्ट्रेलिया, रशिया, जर्मनी, ब्रह्मदेश, बोलीव्हिया, आर्जेंटिना इत्यादि देश येतात. अमेरिकेंत चांदीच्या खाणींचा धंदा करणाऱ्या लोकांनीं आपल्या मालाची किंमत उतरूं नये ह्यासाठी स्वतःचें राजकीय वजन खर्चीं घालून आपल्या सरकारास चलनाच्या उपयोगाकरितां विशिष्ट प्रमाणांत व ठराविक भावानें चांदी खरेदी करण्याचा कायदा करावयास लावलें ह्या गोष्टीस दहा वर्षें झालीं आहेत. १९३४ ते १९४१ ह्या आठ वर्षांच्या अवधींत अमेरिकन तिजोरीनें २५८ कोटि औंस चांदी खरेदी केली आहे. चांदीच्या खरेदीच्या ह्या धोरणाचा आर्थिक परिणाम अनिष्ट होणें अपरिहार्य होतें. तथापि अलीकडे खरेदी होणारी चांदी कारखान्यांत इतर महत्त्वाच्या धातूंच्या ऐवजीं वापरण्याची व्यवस्था अमेरिकन तिजोरीमार्फत होत आहे. ह्या प्रकारचा चांदीचा औद्योगिक उपयोग आणखी वाढला असता हा धातु इतर धातूंच्या खाणींत त्यांस चिकटून निघत असूनहि तिचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर खपून जाईल असा अंदाज आहे. अमेरिकेंत ३२५ कोटि औंस (सुमारें १ लक्ष टन) इतकी चांदी साठ्यांत शिल्लक आहे. तथापि, कोलंबसास १४९२ सालीं अमेरिका खंडाचा शोध लागल्यापासून आज तागायत फक्त ५ लक्ष टन इतकीच चांदी जगाच्या खाणींतून बाहेर निघाली आहे असें आंकडे सांगतात. उद्योगधंद्यांत चांदीचा उपयोग, तिच्या विशिष्ट गुणांमुळें, अपेक्षेप्रमाणें वाढला म्हणजे तिची किंमत जगांत चढेल आणि मागणीच्या मानानें खाणीवाल्यांस तिचा पुरवठा वाढवावा लागेल असा कांहीं तज्ज्ञांचा अंदाज आहे. युद्धोत्तर काळांत चांदीचा उपयोग उद्योगधंद्यांत कोणत्या प्रमाणांत होईल ह्यावर त्या धातूच्या किंमतीचें भवितव्य अवलंबून राहील हें स्पष्ट आहे.

---

## चांदीचा युद्धावर परिणाम

नाणीं पाडणें आणि गरीब लोकांचे दागिने व श्रीमंतांसाठी भांडीं व इतर शोभेचे जिन्नस बनवणें हाच चांदीचा मुख्य उपयोग आतांपर्यंत होत असे. विशेषतः हिंदुस्थानांत चांदीस ह्याच कामासाठी मोठें महत्व प्राप्त झालें होतें. तथापि, वर दर्शवल्याप्रमाणें चालू युद्धांत लढाऊ सामुग्रीच्या बनावटींत इतर धातूंची जागा चांदी घेत आहे ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. कॅनडा व अमेरिका ह्या देशांत चांदीच्या निर्गतीस बंदी करण्यांत आली आहे ह्याचें कारण ह्या धातूचें युद्धाच्या तयारीस होणारें सहाय हें आहे. १९४१ सालीं ८ कोटि औंस चांदीचा ह्या रीतीनें उपयोग करण्यांत आला. तरीहि येथें हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे कीं चांदी अशा प्रकारानें वापरली जाण्याच्या मार्गांत इतर धातूंच्या मानानें तिची महागाई हा अडथळा आहे. सरकारी तिजोरीसाठी चांदी दर औंसास ७१ सेंट्स ह्या भावानें खरेदी करून ती ३५ सेंट्सनीं कारखान्यांस औद्योगिक बनावटींत वापरण्यास पुरविणाऱ्या अमेरिकेंतील योजनेच्या मुळाशीं ही अडचण दूर करण्याचाच हेतु आहे. ह्या तऱ्हेनें घडून येणारी स्वस्ताई आणि कित्येक महत्त्वाच्या धातूंची दुर्मिळता ह्यांचे योगानें चांदीस उद्योगधंद्यांच्या कृतीमध्यें महत्त्वाचें स्थान मिळणार आहे. जगांतील चांदीच्या एकूण उत्पादनाच्या चार-पंचमांश भाग अमेरिका खंडांतून येत असला तरी इतर धातूंच्या मानानें तिचा पुरवठा अत्यंत अल्प आहे हें विसरतां कामा नये. चांदीचें वार्षिक उत्पादन सुमारें २७ कोटी औंस म्हणजे साडेआठ हजार टन इतकें आहे, पण तांब्याचें उत्पादन २१ लक्ष टन आहे. शिसें व जस्त ह्यांचें वार्षिक उत्पादन अशाच प्रमाणांत मोठें आहे. अशा उपयुक्त धातू दुर्मिळ झाल्या आणि युद्ध परिस्थितींत लढाऊ धंद्यांत त्यांस मोठी मागणी आली असतां चांदी त्यांची जागा विशिष्ट मर्यादित प्रमाणांत घेऊन युद्धसहाय देऊं शकते ही गोष्ट मात्र आतां अनुभवानें सिद्ध झाली आहे. अमेरिका व हिंदुस्थान येथील सरकारांजवळ चांदीचा मोठा पुरवठा आहे हें त्या दृष्टीनें समाधानकारक आहे.

---

## चिनी चलन आणि जपानचा लुटारूपणा

अलीकडे जपाननें चिनी प्रदेश पादाक्रांत केले आहेत त्यांमध्यें जित लोकांच्या हातांतील कागदी चलनाच्या उपयोगाचे बाबतींत त्यानें अनिष्ट हातचलाखी चालवली आहे आणि तिचा उघड हेतु त्यांस बुचाडणें हाच आहे. नवीन जपानी राजवटींत त्या प्रदेशांतील पूर्वीच्या चलनाची किंमत काय असावी असा प्रश्न उद्भवला असतां ती जवळजवळ नाहींशी करण्याचें धोरण जपाननें अंगिकारलें आहे. चुंकिंगच्या डॉलर नोटांची अदलाबदल नॅंकिंगच्या नोटांत दोन ते एक ह्या प्रमाणांत करण्यांत आली आहे. हॉंगकॉंगमध्यें प्रचलित असलेल्या डॉलरची किंमत प्रथम ५० टक्के कमी करण्यांत आली आणि पुन्हां दुसऱ्यांदा त्या किंमतींत ५० टक्के घट केली गेली. म्हणजे हॉंगकॉंगच्या डॉलरची किंमत अखेर पूर्वीच्या मानानें एक-चतुर्थांश झाली. त्यानंतर ऑगस्टपासून ह्या डॉलर नोटा रद्द करण्यांत आल्या आहेत. आपल्याजवळच्या जुन्या नोटांचा विनिमय नॅंकिंगच्या किंवा जपानी नोटांशीं करण्याची योग्य संधि हॉंगकॉंगच्या लोकांस देण्यांत आली किंवा नाहीं याची शंका आहे; आणि ही संधि त्यांस मिळाली असली तरी त्यांच्या हातीं आपल्या पैशाचा काय तो चौथा हिस्साच आला आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. चुंकिंगच्या नोटांच्या जागीं नॅंकिंग नोटा प्रचलित करावयाच्या असल्यानें जपाननें ह्या दुसऱ्या कागदी चलनाचा विस्तार केला आहे आणि त्यास आधार म्हणून नॅंकिंगच्या मध्यवर्ती बँकेस दहा कोटि येनचें (जपानी चलन) कर्ज दिलें आहे. ही बँक जपानच्या मध्यवर्ती बँकेच्या पूर्ण वर्चस्वाखालीं चालली आहे हें सांगावयास नको. पादाक्रांत केलेल्या चिनी प्रदेशांतील चलनाचे संबंधांत जपाननें शुद्ध लुटारूपणा चालवला आहे हें स्पष्ट आहे.

---

### रहाणीच्या खर्चांत सार्वत्रिक वाढ

राष्ट्रसंघाच्या जुलै महिन्याच्या मासिकांत जगांतील ३९ प्रमुख देशांतील रहाणीच्या खर्चाविषयींचे आंकडे दिले आहेत, त्यांवरून लोकांचें जीवन सर्वत्र युद्धपरिस्थितीमुळें कसें महागाईचें झालें आहे त्याची कल्पना येते. खाण्याचे जिन्नस, कपडे, घरांचीं भाडीं, जळण, ह्या रहाणींतल्या मुख्य बाबी आहेत. जगांतील ३९ देशांचा विचार करतां त्यांमध्यें घरांच्या भाड्यांत विशेष बदल न होतां त्यांचें मान स्थिर राहिलें आहे असें दिसून येतें. बाकीच्या सर्व बाबींची महागाई स्थानिक परिस्थितीप्रमाणें पण निश्चित झालेली आहे ह्याची साक्ष दिलेल्या आंकड्यांवरून पटते. अमेरिकेंत धान्यें व इतर खाण्याचे जिन्नस सर्वांत अधिक महागले आहेत आणि त्यांच्या खालोखाल कापडाच्या किंमती चढलेल्या आहेत. इतर देशांत महागाईच्या बाबतींत कापडाचा नंबर पहिला आहे. दक्षिण अमेरिका, हिंदुस्थान, जपान, जर्मनी ह्या देशांतहि वाढ सरासरीनें ३० टक्के, हंगेरी व इंग्लंड ह्यांत ९० टक्के, नॉर्वे व स्वित्झर्लंड येथें ८० टक्के व स्वीडनमध्यें ७० टक्के, अशी ह्या महागाईची प्रतवारी आहे. जळणाची व तेलाची महागाई डेन्मार्क, फिन्लंड, आयर्लंड व नॉर्वे ह्या देशांत विशेष तीव्र आहे. महागाई व चलनाचा विस्तार ह्यांच्या परस्पर संबंधाचा विचार करतां असें दिसतें कीं आयर्लंड, इंग्लंड, स्वित्झर्लंड व कांहीं दक्षिण अमेरिकेंतले देश ह्या दोहोंमध्यें सारखी म्हणजे प्रमाणबद्ध वाढ झाली आहे. बाकीच्या देशांत रहाणीच्या मानापेक्षा चलनांत अधिक वाढ आहे असें आंकड्यांवरून दिसतें.

## युद्धखर्च आणि युद्धकर्ज

### (२)

मालपुरवठा व इतर लष्करी बाबी ह्यांचेवर साम्राज्य सरकाराचा हिंदुस्थान सरकारच्या मार्फत ह्या देशांत खर्च होतो त्याचा हिशेब होऊन येथील सरकारचें निघणारें येणें त्यास लंडनमध्यें मिळतें. रिझर्व्ह बँकेच्या लंडनशाखेंत ह्या सरकारचें खातें आहे त्यांत ह्या येण्याच्या रकमा जमा होतात आणि त्याही बँक इंग्लंडमध्यें तात्पुरत्या गुंतवून ठेवते. युद्धाच्या प्रगतीबरोबर हिंदुस्थान सरकारच्या मार्फत होणारा ग्रेट ब्रिटनचा लष्करी खर्च वाढत आहे आणि त्याच्या प्रमाणांत ह्या सरकारच्या लंडनमधील शिलका सहाजिकच वाढत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या मार्फत हा सरकारचा शिलकी पैसा ह्या देशांत परत कसा आणावयाचा आणि त्या येण्याची योग्य विल्हेवाट कशी लावावयाची हा महत्त्वाचा प्रश्न येथें उद्भवतो. ह्या प्रकरणीं आतांपर्यंत यशस्वी रीतीनें व किफायतशीरपणानें अंमलांत आणलेला उपाय येणेंप्रमाणें आहे: हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें ह्यापूर्वी कर्जें काढलेलीं आहेत आणि त्यांची फेड ब्रिटिश-चलनांत व्हावयाची अशी त्यांची व्यवस्था आहे. हिंदुस्थानच्या मालकीचा शिलकी पैसा लंडनमध्यें पडून रहात आहे त्याचा विनियोग ह्या देशाच्या तेथील कर्जाच्या फेडीकडे केल्यास एका दगडानें दोन पक्षी मारल्यासारखें होतें. हिंदुस्थान सरकारचें पौंडांमध्यें फेडलें जावयाचें कर्ज फिटतें आणि त्याच्या लंडनमध्यें साचत असलेल्या शिलकांचा फायदेशीर उपयोग होतो. हा दुहेरी सोयीचा उपाय आतांपर्यंत अवलंबण्यांत आला असून त्या कामीं ब्रिटिश सरकारनें सहकार्य केलें आहे. आपल्या नागरिकांपाशीं असलेले हिंदी कर्जाचे रोखे त्या सरकारनें जमा करून त्यांस स्वतःचे तत्सम कर्जरोखे मोबदल्यांत दिले आहेत आणि लंडनमधील हिंदी शिलकांतून स्वतःचें त्या देशाकडून मिळावयाचें येणें फेडून घेतलें आहे. हिंदुस्थान सरकारनें येथें केलेला जादा युद्धखर्च येथें काढलेल्या कर्जांच्या पैशांतून झाला व होत असल्यानें वरील इंग्लंडमधील कर्जफेडीच्या व्यवहाराचा वास्तविक अर्थ ब्रिटनमधील कर्जाची जागा हिंदुस्थानांतील कर्जानें घेतली आहे असा होतो. परंतु त्यायोगानें ह्या देशाचें बाहेरचें कर्ज नाहींसें होऊन त्यावरील व्याज लंडनला पाठवण्याची आवश्यकता रहात नाहीं. १९३६–३७ अखेर हिंदुस्थानचें इंग्लंडमध्यें काढलेलें कर्ज २७½ कोटि पौंड इतकें होतें, त्यापैकीं गेल्या ऑगस्ट अखेर सुमारें २० कोटी पौंड फेडून टाकण्यांत येऊन त्याचें रूपांतर हिंदुस्थानांतील कर्जांत झालें. आणखी ६ कोटी पौंड कर्ज येत्या जानेवारींत फेडलें जाईल. हिंदी रेलवेजसाठीं निरनिराळ्या स्वरूपांत इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जांचा अंतर्भाव २७½ कोटि पौंडांच्या रकमेंत केलेला नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या लंडनमधील फुगलेल्या शिलकांतून हेंहि कर्ज फेडतां येईल ही गोष्ट सुचण्यासारखी आहे. ब्रिटिश सरकारच्या सहकार्यानें हिंदुस्थान सरकारनें ह्या मार्गाचाहि अवलंब नुकताच आरंभिला आहे. रेल्वे कर्जापैकीं वार्षिक हप्त्यांनीं फेडावयाची उरलेली एकूण रक्कम सुमारें ३½ कोटी पौंड आहे. हिंदुस्थान सरकारनें आज एकदम ३ कोटि पौंड ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन करावयाचे आणि त्या सरकारनें वार्षिक हप्त्यांची फेड योग्य वेळीं येथील सरकारच्या वतीनें करावयाची अशी व्यवस्था निश्चित झाली आहे. हिंदुस्थान सरकारनें आज ३ कोटि पौंड २½ टक्के व्याजानें गुंतवले आणि आपल्या रेल्वे 'ॲन्युइटीज'च्या फेडीची तरतूद केली असें ह्या योजनेचें स्वरूप आहे.

हिंदुस्थानचें इंग्लंडमधील कर्ज फिटलें जाऊन येथील सरकार त्याची जागा हिंदी कर्जानें भरून काढीत आहे त्याचें आर्थिक रहस्य ध्यानांत येणें आवश्यक आहे. रेल्वेज व पाटबंधारे ह्यांसारख्या उत्पादक कार्यांसाठी लागणारा पैसा हिंदुस्थान सरकारास बेताच्या व्याजानें पुरेसा ह्या देशांत मिळण्यास एकाकाळीं अडचण पडत असल्यानें त्यास लंडनच्या बाजारांत कर्जें वर्षानुवर्षे उभारावीं लागत असत. परंतु अलीकडे सरकारचा सर्व भांडवली खर्च भागवतां येईल इतक्या रकमांचीं कर्जें हिंदुस्थान सरकारास ह्या देशांत सहज मिळूं शकतात. देशाच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें ही गोष्ट अभिनंदनीय आहे, हिंदी लोकांच्या बचतीचा पैसा देशांतल्या देशांत व्याजानें वाढत्या प्रमाणांत गुंतवला जाऊन तो बाहेरून घ्यावयाच्या कर्जाची जागा तो प्रत्यक्ष भरून काढीत आहे हा राष्ट्राचा आर्थिक फायदा आहे.

गेल्या कित्येक वर्षांत हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें मुळींच कर्ज उभारलेलें नाहीं, इतकेंच नव्हे तर, पूर्वी काढलेलीं सर्व कर्जें फेडून टाकण्याची व्यवस्था केली आहे. हिंदुस्थान सरकारचा युद्धकालीन खर्च, इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत परिस्थिति आहे तिच्याप्रमाणें करांच्या उत्पन्नांतून अंशतःच भागूं शकतो आणि जरूरीप्रमाणें त्यास ह्या देशांत युद्धकर्जें उभारावीं लागत आहेत हें स्वाभाविक आहे. ह्या कर्जाच्या द्वारें जनतेच्या बचतीमधून लागेल तस तसा पैसा सरकारास मिळत आहे. हिंदुस्थान सरकारनें १९६३-६५ सालांच्या मुदतीचें ३ टक्क्यांचें १५ कोटि रुपयांचें कर्ज नुकतेंच उभारलें आहे. शंभर रुपयांच्या रोख्यास ९९ रुपये किंमत ठेवण्यांत आली आहे. १५ कोटि रुपये मिळतांच किंवा १५ आक्टोबरला कर्जरोख्यांची विक्री बंद व्हावयाची आहे. मुंबई, मद्रास, पंजाब व मध्यप्रांत येथील सरकारांनीं ३ टक्के व्याजाचीं व १९५५ सालच्या परत फेडीचीं कर्जें स्वतःसाठी उभारलीं आहेत. त्यांची एकूण बेरीज ७½ कोटि रुपये भरते. ह्या सबंद रकमेची भरती झाली आहे. हिंदुस्थान सरकारकडून पूर्वी काढलेल्या कर्जांची फेड करण्यासाठी हीं प्रांतिक कर्जें काढण्यांत आलीं आहेत. (समाप्त)

## निजाम राज्यांत ए. आर. पी. ची व्यवस्था

हवाई हल्ल्यामुळें लागणाऱ्या आगी विझविण्याकरितां करण्यांत येत असलेल्या तरतुदींविषयीं बोलतांना मि. अली रझा यांनीं लहान तळ्यांचें बांधकाम व इमारतीस लागलेली आग विझविणारीं आणि उध्वस्त झालेल्या इमारतींत सापडलेल्यांची सोडवणूक करणारीं दलें या बाबतींत केलेल्या कार्याची माहिती नुकतीच दिली. ते म्हणाले कीं, हीं तळीं अशा रीतीनें बांधण्यांत येत आहेत कीं शांततेच्या काळांत त्यांचें रूपांतर पोहण्याच्या तळ्यांत करण्याचें शक्य होईल. त्यांचें बांधकाम शहर-सुधारणा बोर्डाकडे देण्यांत आलें असून तें लवकरच सुरू करण्यांत येईल. मध्यंतरीं सिटी फायर ब्रिगेडच्या सामुग्रींत दोन ट्रेलर पंपांची भर घालण्यांत आली आहे. याशिवाय, बुजलेल्या ३२५ विहिरी मोकळ्या करण्याची व्यवस्था नगरपालिकेच्या कमिशनरच्या मदतीनें ए. आर. पी. अधिकाऱ्यांनीं केली आहे. यांपैकीं १०५ विहिरींतील गाळ आधींच काढण्यांत आला असून आणखी १६१ विहिरींचें काम चालू आहे. शिवाय इमारतीस लागणारी आग विझविण्याबाबतची एक योजना तयार करण्यांत आली असून सरकार तिचें काळजीपूर्वक निरीक्षण करीत आहे. या योजनेतहत प्रत्येक घरांत आग विझविण्यास लागणाऱ्या साधनसामुग्रीची तरतूद करण्यांत आली आहे. तथापि, आवश्यक साहित्य संपादन करण्याचा प्रश्न हा या कार्याचा सर्वांत कठीण भाग आहे. जरुरी असलेल्या एकंदर ९,००० स्टिरप पंपांपैकीं हिंदुस्थान सरकारकडून १,५०० स्टिरप पंप मिळाले असल्याचें त्यांनीं जाहीर केलें.

### इतर उपाय

करण्यांत येत असलेल्या इतर उपायांमध्यें कारखान्याच्या संरक्षण योजनांचा मिस्टर अली रझा यांनीं उल्लेख केला. या संबंधाची व्यवस्था चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज अँड बॉइलर्स यांच्याकडे सोपविण्यांत आली असून त्यांस सध्या कलकत्ता येथें खास शिक्षण घेत असलेले एक पब्लिक वर्क्स खात्याचे ऑफिसर मदत करतील. ते पुढें म्हणाले कीं, रेकॉर्ड्स, मौल्यवान वस्तू आणि अजबखाने ( म्यूझिअम ) या सर्वांचें संरक्षण करण्याच्या प्रश्नावरहि विचार होत आहे आणि हें सर्व सामान दुसरीकडे हलविण्याची व्यवस्था केली जात आहे.

### उध्वस्त झालेल्या इमारतींत सांपडलेल्यांची सोडवणूक

मिस्टर अली रझा नंतर म्हणाले, रेस्क्यू ( उध्वस्त झालेल्या इमारतींत सांपडलेल्यांची सुटका करणारीं ) पथकें उभारण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. इमारतीच्या पडझडीखालीं सांपडलेल्यांची सोडवणूक करणें, सार्वजनिक सुरक्षिततेस धोका होईल असा अपाय झालेल्या इमारती पाडणें व अधिक अपाय न झालेल्या इतर इमारतींची किरकोळ डागडुजी करणें हीं या पथकांनीं करावयाचीं कामें आहेत. अशीं रेस्क्यू पथकें उभारण्यांत आलीं असून आणखी दोन पथकांबाबतची योजना तयार आहे.

### दिव्यांवर आवरण

दिवेबंदीच्या व्यवस्थेसंबंधीं बोलतांना मिस्टर अली रझा म्हणाले कीं, घरगुती दिव्यांवर नियंत्रण घालण्यांत यावयाचें आहे म्हणून प्रथम सार्वजनिक रस्त्यांवरील दिव्यांवर थोडेंसें आवरण घालून त्यांचा उजेड मंद करण्यांत आला आहे. सर्व हिंदुस्थानभर अंतर्भागांतील शहरांसाठी आंखण्यांत आलेल्या धोरणानुसार हैद्राबादेंतहि व्यवस्था करण्यांत आली आहे. घरांतील दिव्यांवर निर्बंध घालण्यासंबंधींचे नियम यापूर्वींच प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. परंतु ते अद्याप अमलांत आणले गेले नाहींत. हे नियम अमलांत आणण्याची तारीख शक्य तितक्या लवकर जाहीर करण्यांत येईल, असें त्यांनीं सांगितलें.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,४९,२५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४०,००,००० |

### डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. मा. म. गुते |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. म. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

म. वि. मोखले

मॅनेजर.

## अर्थशास्त्र

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
६२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ६१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ६२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
'व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १० नोव्हेंबर, १९४३ अंक ४४

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी**: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा**: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा**: अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स**: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स**: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधी नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### कृत्रिम दातांवर नियंत्रण

दात नसल्यामुळेंच केवळ ज्यांचें पचन बिघडलें आहे अशांनाच दंतवैद्यांनीं कृत्रिम दात बसवून द्यावे, असा हुकूम जर्मन सरकारनें काढला आहे. केवळ एक-दोन दात पडले आहेत, त्यामुळें तोंड नीट दिसत नाहीं, एवढ्यासाठी कृत्रिम दात मिळणार नाहींत.

### किती उंच गेल्यानें किती दूर दिसतें ?

एक मैल हवेंत उंच गेलें, तर पृथ्वीचा बाक ९ इंच होतो. जसजसें वर जावें, तसतसा तो बाक वाढत जातो. १ हजार फूट उंचीवरून ४२ मैल दूरवर दिसतें. २ हजार फुटांवरून ५९ मैलांवरचें दिसतें. ५ हजार फूट उंचीवरून ९३ मैलांपर्यंतच्या गोष्टी दिसतात; २० हजार फूट उंचीवरून १८६ मैलांपर्यंत नजर पोचते.

### मध्यवर्ती सरकारचा उत्पन्न खर्च

एप्रिल ते ऑगस्ट, १९४३ ह्या पांच महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें आपल्या उत्पन्नापेक्षां ५० कोटि रुपये खर्च जास्त केला. ह्याच मुदतींत सरकारचें कर्ज ९५ कोटि रुपयांनीं वाढलें.

### ॲबिसीनियांतील सोनें हिंदुस्थानांत येणार ?

ॲबिसीनियांत निघणारें सोनें मुंबईच्या बाजारांत लवकरच विक्रीसाठी येण्याचा संभव आहे, असें समजतें. ॲबिसीनियाच्या स्टेट बँकेचे गव्हर्नर, मि. कॉलिअर, हे सध्या हिंदुस्थानांत आलेले आहेत.

### कंपनी कायद्यांत दुरुस्ती

ऑडिटरांस समाधानकारक वाटेल इतकी तरतूद केलेली बुडीत व संशयित कर्जे ताळेबंदांत वेगळीं दाखविण्याची सक्ती बँकांवर नाहीं, अशा अर्थाचा सध्याचा नियम गैरकायदा आहे असा मुंबई हायकोर्टानें निर्णय दिला आहे. त्यामुळें, आजवर चालत आलेली पद्धत बेकायदा ठरत आहे, तिला कायदेशीरपणा प्राप्त करून देणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या बैठकींत मांडण्यांत येईल.

### स्टँडर्ड क्लॉथ

स्टँडर्ड क्लॉथच्या आतां १०० तऱ्हा तयार होऊं लागल्या आहेत.

### पॉवेल्स लि.

वरील कंपनीस ३० जून, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी १ लक्ष, ३० हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ६% कर-माफ डिव्हिडंड मिळालें.

### आरोग्याची पहाणी

ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांच्या आरोग्याची पहाणी करण्यासाठी सर जोसेफ भोर ह्यांचे अध्यक्षत्वाखाली हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली आहे, तिच्या कामास दिल्ली येथें ता. २६ रोजीं प्रारंभ झाला. युद्धसमाप्तीनंतरच्या सरकारी योजना आखतांना कमिटीच्या पहाणीचा उपयोग होईल, अशी सरकारची अपेक्षा आहे.

### हिंदुस्थान सरकारचें कर्ज

हिंदुस्थान सरकारनें ३% व्याजाचें, १९६६-६८ च्या परत फेडीचें २५ कोटि रुपयांचें कर्ज जाहीर केलें होतें. २० कोटि रुपयांच्या कर्जासाठी अर्ज आले व ५ कोटि रुपयांच्या कर्जाची व्यवस्था रिझर्व्ह बँकेनें केली.

### गिरणी कामगारांना बोनस

मुंबई शहरांतील गिरण्यांतील कामगारांना दोन महिन्यांच्या मजुरीइतका बोनस देण्याचें गिरणी मालक संघानें ठरविलें आहे. बोनसची रक्कम दोन हप्त्यामध्यें देण्यांत येईल. बोनसची एकूण रक्कम सुमारें १½ कोटि रुपये भरेल.

### ब्रिटिश कॉमन्स सभेचें नवें गृह

मे १९४१ मध्यें ब्रिटिश कॉमन्स सभागृहावर जर्मन बॉब पडले व त्याचा नाश झाला. नव्या सभागृहाच्या बांधणीचें काम लवकरच हातीं घेण्यांत येईल, त्याची माहिती मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत नुकतीच सांगितली. सभागृहाच्या बांधकामास १८ महिने लागतील व बांधकामास प्रारंभ युद्ध संपण्यापूर्वीहि कदाचित् होईल. जुन्या पायावरच नवी इमारत उठविली जाईल. तिचा आकार अंडाकृति राहील, अर्धवर्तुळाकृति नाहीं. सर्व सभासद हजर राहिले, तर दाटी होईल ह्या बेतानेंच सभागृहाचें क्षेत्र ठरविलें जाईल. त्याचा हेतु हा कीं, सभागृह सर्व सभासद मावतील एवढें मोठें केलें, तर त्यांतील दहापैकी नऊ बैठकी जवळ जवळ रिकाम्या सभागृहांतच चालवाव्या लागतील !

### श्री. गणेश मोफत वाचनालय, पुणें

सोमवार ता. २५ नोव्हेंबर रोजीं श्रीगणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय या संस्थेतर्फे श्री. म. व्यं. शिंगरे व श्री. रा. गो. दंडवते वकील यांचा सन्मान श्री. सरदार आबासाहेब मुजुमदार सी. आय. ई. यांचे अध्यक्षतेखाली करण्यांत आला. त्यावेळीं संस्थेच्या इमारत निधीस श्री. शिंगरे यांनीं २५१ रु. व श्री. शिंदे पाटील संपादक "मराठा" यांनीं ११-४-० देणगीदाखल दिले.

### व्हाइसरॉय पोलिश नाहींत

हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय व्हायकौंट वॅव्हेल हे पोलिश वंशाचे आहेत, अशी गप्प लंडनमध्यें उठली होती, तिचा पोलंडच्या माहिती खात्याच्या प्रमुखानें इनकार केला आहे.

### बी. बी. सी. कार्यक्रमाचे श्रोते

लंडन शहरांतून ४९ भाषांतून ब्रॉडकास्ट होणारे कार्यक्रम दररोज २० कोटि लोक ऐकतात.

### ४० इंच छाती व ६ फूट उंची

ग्रेट ब्रिटनमध्यें तयार कपड्यांची विक्री फार मोठ्या प्रमाणावर होते व बहुसंख्य लोक तयार कपडेच विकत घेतात. युद्धास प्रारंभ झाल्यापासून लोकांची उंची वाढली का घटली, ते लठ्ठ झाले का काटकुळे झाले, ह्यासंबंधीं आकडे जमा करण्याचें काम तेथील शहरांत व खेडेगांवांत चालू आहे. ह्या पहाणीचा अहवाल कपडे तयार करणारांकडे पाठविण्यांत येईल, त्याचा हेतु तयार कपडे लोकांच्या अंगास शक्य तेवढे नीट बसावे, हा आहे. एकूण पुरुषांपैकी एक पंचमांश लोकांची छाती ४० इंच अथवा त्यापेक्षा ज्यास्त भरते व प्रत्येक १०० लोकांपैकी १४ लोकांची उंची ६ फुटांपेक्षा अधिक आहे असें त्या पहाणींत आढळून आलें.

### पुस्तकांच्या किंमती-दुकानदारांवर निर्बंध

पुस्तक विक्रेत्यांनीं शिलिंगास एक रुपया व डॉलरला पांच रुपये ह्या प्रमाणें अनुक्रमें ब्रिटिश व अमेरिकन पुस्तकांच्या किंमती आकाराव्या, असा हुकूम हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. दुकानदारांनीं पुस्तकांवर त्यांच्या किंमती शाईनें लिहावयाच्या आहेत व त्यांत खाडाखोड करावयाची नाहीं. प्रकाशकानें पुस्तकावर छापलेली किंमत खोडतां अथवा पुसतां कामा नये.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३४६ |
| २ मॉस्कोमधील चर्चेचे निर्णय ... | ३४७ |
| ३ डॉक्टरीच्या धंद्याची गुरुकिल्ली ... | ३४८ |
| ४ कपास – ... | ३४८ |
| ५ स्फुट विचार ... | ३४९ |
| वाढती लोकसंख्या व शेतीचा निकृष्टपणा—मोटारीच्या धंद्यास तेजी येणार—हिंदुस्थानांत उत्पादन सुरू झालें असतें, तर ! | |
| ६ शिवगंगा व्हॅली कंझूमर्स सोसायटी ... | ३५० |
| ७ उसाच्या पिकाचा ताजा अंदाज ... | ३५० |
| ८ कोणत्या कंपन्यांना कच्ची फिल्म मिळेल ! ... | ३५१ |
| ९ शेअर बाजार ... | ३५१ |



# अर्थ

बुधवार, ता. १० नोव्हेंबर, १९४३


## मॉस्कोमधील चर्चेचे निर्णय

इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बरीच गाजलेली मॉस्को येथील बोलणीं पुरीं होऊन त्यांत झालेले महत्त्वाचे निर्णय नुकतेच प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. चालू युद्धाच्या घडामोडी व युद्धोत्तर काळांतील युरोपची पुनर्घटना ह्यांचे संबंधांत उद्भवलेल्या व उद्भवणाऱ्या प्रमुख प्रश्नांची विस्तृत चर्चा मोकळ्या मनानें करून इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांच्या प्रतिनिधींनीं मॉस्को येथें एकवाक्यता संपादली आहे ही अत्यंत समाधानकारक व उत्तेजनदायक गोष्ट आहे. युरोपांतील पूर्व आघाडीवर रशिया, जर्मन सैन्यास मागें रेटींत चालला आहे आणि इटलींत इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या फौजा शत्रूस हळुहळु उत्तरेच्या बाजूस हटवीत आहेत. ह्या दुहेरी चढाईच्या धोरणाची शक्ती एकवटून जर्मनीचा कोंडमारा कसा करावा ह्याचा विचार मॉस्कोच्या वाटाघाटींत झाला असला पाहिजे. इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं युरोपच्या पश्चिमेकडे दुसरी आघाडी चालू करावी आणि पूर्वेकडील स्वतःच्या चढाईस पुष्टी द्यावी अशी रशियाची निकडीची मागणी असल्याची बऱ्याच काळाची मागणी असल्याची बोलवा होती. ह्या बाबतींत मित्रराष्ट्रांमध्यें तीव्र मतभेद उत्पन्न झाल्याविषयीं जर्मनीनें स्वार्थी प्रचारहि चालवला होता. मॉस्को येथें तीन राष्ट्रांचे लष्करी तज्ञ चर्चेत भाग घेत होते आणि त्यांच्या साह्यानें युद्धाचा पुढील कार्यक्रम आखण्यांत आला असल्यानें जर्मनीस व त्यांच्या प्रचारकांस चांगलीच थप्पड बसली आहे. ह्या संबंधांतील निर्णयामुळें जर्मन जनतेंत निराशा पसरून हिटलरनें पादाक्रांत केलेल्या देशांत उत्साहाचें वातावरण पसरणार आहे. पूर्वेकडून रशिया आणि युरोपच्या दुसऱ्या बाजूकडून इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या फौजा जर्मनीस घेरणार हें आतां स्पष्ट दिसूं लागल्यामुळें आणि हें लढाऊ धोरण एकसूत्रीपणानें ह्यापुढें अमलांत येणार हें मॉस्को येथील निर्णयांनीं ठरल्या कारणानें युद्धास ह्यापुढें प्रभावी असें नवें वळण लागणार ही अत्यंत महत्त्वाची घटना झाली आहे ह्यांत संशय नाहीं.

मॉस्कोच्या परिषदेनें केलेल्या ठरावांत जे मुद्दे प्रामुख्यानें प्रस्थापित झाले आहेत, त्यांत इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांनीं जर्मनीचा पाडाव शक्य तितक्या त्वरित रीतीनें घडवून आणावा आणि त्यासाठीं एकत्रित व एकसूत्री प्रयत्न करावे आणि युद्धाच्या समाप्तीनंतरहि मित्र राष्ट्रांनीं एक विचारानें वागून आंतरराष्ट्रीय शांतता दृढ करावी हीं उद्दिष्टें महत्वाचीं आहेत. युरोपांतील लढायांचेविषयीं इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या मुत्सद्यांनीं मा. स्टालिन ह्यांची खातरजमा केली तरी युद्धोत्तर व्यवस्थेच्या धोरणाचे बाबतींत रशियाचें व इतर मित्र राष्ट्रांचें एकमत होणार नाहीं अशी जी एक समजूत होती तिचा आतां निरास झाला आहे हें स्तुत्य आहे. मित्र राष्ट्रांचा सहविचार आणि सहकार्य जर्मनीचा पुरा पराभव होऊन युरोपची नवीन राजकीय घडी बसल्यावरहि चालू रहाणार आहेत हा जागतिक समाधानाचा निर्णय मॉस्को परिषदेनें केला आहे, हा शहाणपणाच्या मुत्सद्देगिरीचा मोठाच विजय होय. शत्रु राष्ट्रांचा पूर्ण बीमोड होईपर्यंत शस्त्र खाली ठेवलें जाणार नाहीं; अर्धवट किंवा एकांगी तहास कोणतेंहि मित्र राष्ट्र मान्यता होणार नाहीं. ऑस्ट्रिया हिटलरनें जर्मन राज्यांत सामील केला आहे त्या राष्ट्रास स्वातंत्र्य देण्यांत येईल. जिंकलेल्या इटलीचें काय करावयाचें हें ठरवण्यासाठीं मित्रराष्ट्रांची एक प्रातिनिधिक समिती नेमण्यांत येणार आहे. युरोपच्या पुनर्घटनेविषयीं वेळोवेळ उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा निकाल लावण्याकरितांहि एक समिती स्थापिली जावयाची आहे. हें सल्लागार मंडळ लंडनमध्यें विचारविनिमय करून जरूर वाटणाऱ्या सूचना करीत राहील. युद्धसमाप्तीनंतर व्हावयाच्या पुनर्घटनेंत इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या बरोबरीनें रशिया भाग घेईल हा निर्णय अत्यंत अर्थपूर्ण आहे आणि त्याचा चालू युद्धावर अनुकूल परिणाम होईल एवढेंच नव्हे तर भविष्य काळाचे संबंधांतहि तो आशाजनक आहे. इंग्लंड व अमेरिका हीं भांडवलशाही प्रधान राष्ट्रें आणि रशियांत आत्यंतिक स्वरुपांतला समाजसत्तावाद स्थापन झालेला. अशा स्थितींत मित्रराष्ट्रें एक दिलानें शेवटपर्यंत लढत रहाणें शक्य नाहीं आणि युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेंत तर त्यांचें सूत मुळींच जमावयाचें नाहीं, ह्या कल्पनेस मॉस्कोच्या परिषदेनें मूठमाती दिली आहे. मि. चर्चिल, प्रेसिडेंट रूझवेल्ट व मार्शल स्टालिन ह्या आजच्या जगांतील प्रमुख पुढाऱ्यांची लढाऊ व शांततामूलक धोरणाच्या बाबतींत एकवाक्यता झाली आहे हा प्रस्तुत युद्धांतला जर्मनीवर मिळवलेला मित्रराष्ट्रांचा मोठा विजय आहे असें मानण्यांत येत आहे तें यथायोग्य आहे ह्यांत मुळींच शंका नाहीं. इटलींत व्हावयाच्या पुनर्घटनेचा पाया फॅसिझमचा समूळ नाश हा असला पाहिजे असें निश्चित झालें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ऑस्ट्रिया स्वतंत्र करण्याचा मॉस्को परिषदेंतील निर्णय लढाऊ हालचालींच्या दृष्टीनें अर्थपूर्ण आहे. त्यावरून युद्धाच्या घडामोडींचा वारा कोणत्या दिशेनें वहात आहे ह्याची कल्पना येते.

### रहाणीच्या खर्चाचें वाढतें मान

मुंबई शहरांतील मजुरांच्या रहाणीच्या खर्चाचें मान जून १९३४ अखेरच्या वर्षी १०० होतें असें मानलें तर सप्टेंबर, १९४३ मध्यें तें २४५ झालें. ऑगस्ट, १९४३ मध्यें त्याचा इंडेक्स नंबर २३८ होता.

## डॉक्टरीच्या धंद्याची गुरुकिल्ली

**अचूक निदान व योग्य उपचार एवढ्यानें भागत नाहीं**

रोगाचें निदान करतां येणें व त्यावर औषध देणें एवढ्यानेंच केवळ डॉक्टर यशस्वी होत नाहीं, त्याला आपला धंदा नीट करतां आला पाहिजे. मि. बॉग्ज नांवाच्या एका यशस्वी चिकेत्यानें याबाबत यशाचीं कांहीं मर्में शोधून काढलीं आहेत. त्यांच्या पद्धतीनें डॉक्टरानें धंदा केला, तर डॉक्टराची प्राप्ती किमान २०% वाढते, असें त्यांचें म्हणणें आहे. डेट्रॉइट येथील कित्येक डॉक्टरांनीं त्यास आपला सल्लागार नेमलें आहे. तो प्रत्येक डॉक्टराकडून त्याच्या मिळकतीच्या मानानें दरमहा २०० ते १,२०० रुपये घेतो. मि. बॉग्जचीं यशाचीं सूत्रें थोडक्यांत खालीलप्रमाणें आहेत:—

( १ ) डॉक्टरानें रोग्याच्या केसचे कागद नीट लिहून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस बिलें पाठवावीं. रोग्याची आर्थिक परिस्थिति, रोगाची मुदत, उपचारांचें यश, रोग्याचें वय, इत्यादि लक्षांत घेऊनच बिलें करावीं. रोग बरा होईपर्यंत कधी कधी बिल न करणें फायदेशीर असतें.

( २ ) डॉक्टराचे कपडे उत्कृष्ट असावेत. त्याचे कपडे परीटघडीचे व बूट चकचकीत असणें आवश्यक आहे. डॉक्टराचा दवाखाना उत्तम तऱ्हेनें प्रकाशित असावा व त्यांत ताजीं मासिकें व फुलें ठेवावींत.

( ३ ) डॉक्टराचा ठावठिकाणा दवाखान्यांत नेहमीं समजला पाहिजे. रोग्याशी बोलतांना डॉक्टरानें रोग्यास समजेल अशी भाषा वापरावी; स्वतःच्या खासगी गोष्टी बोलूं नयेत. रोग्याच्या सर्व शंकांचें निरसन झालें असल्याविषयीं खात्री करून घ्यावी.

( ४ ) प्रत्येक डॉक्टरानें वर्षातून एक महिना तरी सुट्टी घेतली पाहिजे.

( ५ ) डॉक्टर फार घाईत असूं नये; नाहींतर रोग्यांना वाटतें कीं आपल्याला नीट तपासण्यास डॉक्टरला पुरेसा वेळच नाहीं.

( ६ ) डॉक्टरांच्या संस्थांच्या सभांस नेहमी न चुकतां त्यानें हजर रहावें.

( ७ ) डॉक्टरानें आपल्या धंद्यांतच आपलें सर्व लक्ष घालावें. डॉक्टरी धंदा व शेअर बाजारांतील उलाढाली ह्या दोन्हीं एकदम करण्यापेक्षा, नुसती प्रॅक्टिसच केली, तर पैसा जास्त मिळेल.

---

**श्री. बलभीम परस्पर सहाय्यकारी मंडळी अन् लि. कोल्हापूर**

वरील संस्था १९१५ सालीं स्थापन झाली. तिच्या पटावर आतां ५८८ सभासद असून त्यांचें भाग भांडवल ५,४५५ रुपये आहे. रिझर्व्ह व इतर फंड ६६,३७२ रुपयांचे आहेत. ठेवी ६२ हजारांच्या आहेत. मंडळीच्या जिंदगीचे बाजूस ३९ हजार रुपये शिल्लक, ५ हजार रुपये मुदतबंद ठेव, ८५ हजार रुपये येणें कर्ज, १४ हजार रुपये स्थावर खरेदी, अशा रकमा आहेत. थकबाकी ६ हजारांनीं कमी झाली आहे. लायब्ररी व वाचनालय, सभासदांकरितां आजाऱ्यांच्या शुश्रुषेचीं उपकरणें मिळण्याची सोय, भोजनास मांडीं, सभासदांना स्वस्त दरानें धान्यपुरवठा, इत्यादि उपयुक्त कार्ये संस्था करीत आहे. गेल्या वर्षी संस्थेनें कांहीं देणग्या व शिष्यवृत्त्याहि दिल्या.

---

## कपास

हिंदुस्थानांत कपाशीची माहिती व तिचा उपयोग फार प्राचीन काळापासून असलेला आढळतो. येथून इजिप्तमध्यें कपाशीचें बीं गेलें. त्या देशांत ख्रिस्तापूर्वी ६०० वर्षे कपाशीचा उल्लेख आलेला आहे. पाश्चिमात्य देशांत कपाशीचा प्रवेश फार उशीरा झालेला आहे. युरोपांत ९ व्या शतकांत कपाशीच्या लागवडीस प्रारंभ झाला.

कपाशीचें झाड दरवर्षी नवीन लावल्यानें त्याचें कपाशीचें उत्पादन जास्त होतें. कपाशीच्या बोंडांतून कापूस निघतो व मधल्या बियापासून तेल व पेंड हीं मिळतात. कपाशीच्या धाग्याच्या लांबीवर त्याची किंमत अवलंबून असते. कांहीं धाग्यांची लांबी २½ इंच सुद्धा असते. हिंदुस्थानांत आखूड धाग्याची कपासच जास्त आहे.

**उत्पादन करणाऱ्या देशांत हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचें स्थान**

कपाशीचें उत्पादन करणाऱ्या देशांचा त्याच्या महत्त्वाचे प्रमाणांत, खालीलप्रमाणें अनुक्रम लागतो. अमेरिका, हिंदुस्थान, चीन, रशिया, इजिप्त, ब्राझील, तुर्कस्तान, इराण, अर्जेंटिना, पेरू, मेक्सिको, ट्रान्सवाल, सुदान, युगांडा, इ. ब्रिटिश साम्राज्यापुरतें पाहिल्यास युगांडामध्यें हिंदुस्थानाचे खालोखाल लागवड होते. प्रथम उल्लेख केलेल्या सहा देशांचें कपाशीचें एकूण उत्पादन जागतिक उत्पादनाच्या ९०% आहे व त्यांपैकीं एकट्या अमेरिकेचें उत्पादन इतर पांच देशांच्या उत्पादनाइतकें आहे.

अमेरिकेच्या खालोखाल हिंदुस्थानांत कपाशीचें उत्पादन होतें, तथापि अमेरिकन कपाशीचा दर्जा हिंदी कपाशीच्या दर्जापेक्षा पुष्कळच श्रेष्ठ आहे. हिंदी कपास बहुंशीं आखूड धाग्याची असून तिचें दर एकरीं उत्पादन १०० पौंडांपेक्षा अधिक नाहीं. अमेरिकेचें दर एकरी उत्पादन १७० पौंड भरतें. हिंदी कपाशीचा दर्जा हळूहळू सुधारत आहे. पाटाचे पाण्याखालीं कपास चांगली येते व तेथें अमेरिकन कपाशीच्या जातीची लागवड वाढविण्यांत येत आहे.

इजिप्तमधील जमीन कपाशीस फारच अनुकूल आहे व तेथील कपास सर्व जगांतील कपाशींत उत्तम आहे. कांहीं ठिकाणीं दर एकरीं ४०० पौंडांपर्यंत कपास मिळते. इजिप्तची कपास बहुतेक सर्व ग्रेट ब्रिटनकडे रवाना होते. गेल्या कांहीं वर्षांचें कपाशीचें सर्व पीक ग्रेट ब्रिटननें विकत घेऊन ठेवलें आहे व वहातुकीच्या अडचणींचे अभावीं ती कपास इजिप्तमध्येंच साठवून ठेवली आहे.

---

**बेळगांव बँक लि., बेळगांव**

वरील बँकेचें ३०-६-४३ अखेर वसूल भाग भांडवल ९९,८८० रुपये असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड १६,१२७ रुपयांचे आहेत. ठेवींचा आंकडा १४ लक्ष रुपयांवर गेला आहे. बँकेनें २ लक्ष, ८२ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवून आणि २ लक्ष, २१ हजार रुपये रोखे व शेअर्स ह्यांत गुंतवून १० लक्ष, ३६ हजारांचीं कर्जे दिलेलीं आहेत. वर्षअखेर बँकेस ११ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ६¼% डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. बँकेकडील ठेवी वाढत आहेत व तिच्या भागांस मागणीहि चांगली आहे. म्हणून, बँकेचें अधिकृत व वसूल भांडवल वाढविण्याचा डायरेक्टरांचा विचार आहे. बँकेचीं आर्टिकल्स ऑफ असोसिएशन १९३० सालीं करण्यांत आलीं होतीं, तीं नव्या कायद्यानुसार अद्यावत् करण्यांत येणार आहेत.

## स्फुट विचार

### हिंदुस्थानांतील वाढती लोकसंख्या व शेतीचा वाढता निकृष्टपणा

हिंदुस्थानांतील धान्याच्या दुष्काळाचे प्रश्नावर ब्रिटिश कॉमन्स सभेंत नुकतीच चर्चा झाली. हिंदुस्थानांतील लोकसंख्या भरमसाट वाढत आहे, खाद्य पदार्थांची निपज त्यामानानें वाढत नाहीं, गेल्या बारा वर्षांत हिंदी लोकसंख्येंत ६ कोटींची भर पडली, म्हणजे दर महिन्यास ब्रिटिश हिंदुस्थानांत ३ लक्ष नवीं तोंडें खाण्यास मागूं लागतात, हिंदी शेतकऱ्यांचें जीवन त्यांच्या लहान सहान शेतांत पिकणाऱ्या धान्यावर अवलंबून असतें, खंड, कर्जाची परतफेड, किरकोळ गोष्टींची खरेदी, इत्यादींस लागणारी रकम त्यांना कांहीं धान्य (त्यांस तें जरूर असतांहि) बाजूस काढून व विकून उभारावी लागते, ह्या धान्यावरच शहरांतील लोकांचीं पोटें भरावयाचीं असतात, वगैरे माहिती त्या प्रसंगीं भारतमंत्रि मि. अॅमेरी ह्यांनीं सांगून सध्याच्या धान्य-दुर्भिक्षाची पार्श्वभूमि वर्णन केली. हिंदुस्थान हा देश अत्यंत मोठा असून त्याची लोकसंख्याहि प्रचंड आहे, परंतु देशांतील शेती व इतर संपत्ती ह्यांचे मानानें हिंदी लोकसंख्या फाजील मोठी असल्यास तिच्या वाढीस कांहींतरी आळा बसणें आवश्यक ठरतें. संततिनियमनाचें तत्त्व पटून तें सर्वास आचरणांत येण्याजोगी हिंदी समाजाची मानसिक व शैक्षणिक प्रगति झालेली नाहीं. संपत्तीचें उत्पादन वाढविणें, हाच ह्या परिस्थितीवरील खरा उपाय आहे. सध्याच्या तीव्र दुष्काळाचें तात्कालिक कारण तूर्त बाजूस ठेवलें, तर हिंदुस्थानांतील शेतीचें क्षेत्र गेल्या तीस-चाळीस वर्षांत पुष्कळ वाढलें असलें, तरी लोकसंख्याहि वाढत गेल्याकारणानें दर माणशी लागवडीचें पडणारें प्रमाण उतरतच गेलेलें आढळून येतें. ह्या पिकांत कपास वगैरेहि पिकांचा समावेश होतो; म्हणजे धान्याच्या लागवडीचें दरमाणशीं प्रमाण आणखी कमी झाल्याचें दिसून येतें. प्रत्येक मनुष्यास वर्षभर पुरेसें खावयास धान्य पुरवावयाचें, म्हणजे दर माणशीं एक एकर तरी जमीन पाहिजे. त्याचा अर्थ, अधिकाधिक जमिनींत लागवड झाली पाहिजे व उत्पादन वाढलें पाहिजे. तांदळाचा दर एकरी हिंदी उत्पादनाचा आकडा कमी कमी होत चालला आहे! शेतीचें उत्पादन वाढविणें, हा सार्वत्रिक हिंदी दुर्भिक्ष्यावरील पहिला उपाय आहे. त्याबरोबरच, उद्योगधंद्यांची वाढ करून शेतीवरील जनतेचें अवलंबन कमी करीत आणलें पाहिजे. हें प्रचंड कार्य अर्थातच सरकारी प्रेरणेनें, योजनेनें व उपक्रमानें व्यापक प्रमाणावर हातीं घेतलें जाणें आवश्यक आहे. नाहींतर, दुष्काळ, रोगराई, सांथी, इत्यादि प्रकार लोकसंख्या नियंत्रित करून, शिल्लक रहाणाऱ्या जिवंत लोकांना निर्जीव करण्यास तत्पर आहेतच!

---

### मोटारींच्या धंद्यास तेजी येणार

युद्धानंतरची मोटार गाड्यांची मागणी पुरी पाडून त्या धंद्यामध्यें महत्त्वाचें स्थान मिळविण्याचे प्रयत्न कसे करावयाचे, ह्याची चर्चा ग्रेट ब्रिटनमध्यें सुरू झाली आहे. १९४० सालापासून ग्रेट ब्रिटनमधील मोटारींचें उत्पादन बंद आहे, युद्धसमाप्तीनंतर तें सुरू झालें तर मोटारींचा तुटवडा भरून काढण्यांतच २३ वर्षे जातील व जुन्या मोटारींची जागा नव्या मोटारींनीं घ्यावयाची असल्यास, ५ वर्षांचें उत्पादनहि पुरणार नाहीं. अमेरिका व युरोपांतील देश येथेंहि मोटारींचें उत्पादन बंद आहे, त्यामुळें मोटारींस सर्वत्र जगांतच मोठी मागणी निर्माण होईल, हें उघड आहे. १९३८ अखेर मोटारींच्या जागतिक साठ्यांत ४३ कोटि गाड्या होत्या, त्यांपैकी २३ कोटि एकट्या अमेरिकेंतच होत्या. हा साठाहि आतां नाहींसा झाल्या कारणानें, अमेरिकेंतील उत्पादनहि युद्धसमाप्तीनंतर कांहीं वर्षे तरी जागतिक बाजारपेठ काबीज करूं शकणार नाहीं व ग्रेट ब्रिटनला आपला परराष्ट्रीय व्यापार वाढविण्यास ही एक संधी मिळणार आहे. ब्रिटिश मोटार कारखानदारांना पूर्वीपासूनच सरकारी संरक्षण मिळत आलेलें आहे व तें कोणत्याना कोणत्या स्वरूपांत पुढेंहि चालू राहील ह्यांत संशय नाहीं.

---

### हिंदुस्थानांत उत्पादन सुरू झालें असतें, तर?

१९३८ सालीं दिल्ली येथें भरलेल्या प्रांतिक उद्योग मंत्र्यांच्या परिषदेस सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं आपली मोटारींच्या कारखान्यांचे बाबत विस्तृत योजना सादर केली, त्यापूर्वीच कित्येक वर्षे त्यांचे याबाबत प्रयत्न चालू होते. म. जमशेटजी टाटा ह्यांनीं पोलादाचा कारखाना काढून तो यशस्वी करून दाखविला, तोंपर्यंत ह्या धंद्यासंबंधीं लोकांमध्यें अनास्थाच होती, परंतु तो आज हिंदुस्थानाची कोट्यावधि रुपयांची बचत करीत आहे. जपानमध्यें १९३१ सालीं फक्त ४३४ मोटारी तयार झाल्या; १९३६ सालीं त्यांचें उत्पादन १९३१ च्या उत्पादनाच्या २० पट भरलें. हिंदी मोटारींच्या कारखान्यासहि असेंच यश मिळवितां आलें असतें. मुंबई सरकारच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळानें मोटारींच्या कारखान्याच्या १३ कोटि रुपये भांडवलावर तीन अथवा साडेतीन टक्के व्याजाची हमी घेण्याची तत्परता कांहीं अटीवर दर्शविली होती. तथापि युद्ध प्रयत्नास नियोजित कारखाना सहायकारक होणार नाहीं, ह्यामुळें हिंदुस्थान सरकार त्याच्या उभारणीस मदत करूं शकणार नाहीं असें उत्पादकांस कळविण्यांत आलें. सर विश्वेश्वर अय्या व श्री. वालचंद हिराचंद ह्यांचे ह्या संबंधांतील प्रयत्न कसे अयशस्वी झाले, त्याचा इतिहास अगदीं ताजा आहे. हिंदुस्थानांत मोटारींचा कारखाना वेळींच उभारला गेला असता, तर युद्धानंतरच्या काळांत हिंदुस्थान आपली मोटारींची गरज स्वतः भागवूं शकला असता व हा देश अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांच्या मोटारींचें केवळ गिऱ्हाइक म्हणून राहिला नसता. १९३७ सालीं हिंदुस्थानांत २९ हजार मोटारींची आयात होऊन त्यांचे पायी ८ कोटि रुपये परदेशीं गेले व ह्या देशांत चालू असलेल्या मोटारी व बसेस ह्यांचे प्रीत्यर्थ ४४ कोटि रुपये खर्च झाले, ह्यावरून मोटारींच्या उत्पादनाच्या हिंदी कारखान्याचें राष्ट्रीय महत्त्व लक्षांत येईल.

---

### हैद्राबाद संस्थानाचीं ट्रेझरी बिलें.

हैद्राबाद स्टेट बँकेमार्फत ट्रेझरी बिलांची पद्धत हैद्राबाद संस्थानांत लवकरच सुरू होणार आहे. तात्कालिक कर्जे उभारण्यासाठीं हिंदुस्थान सरकार व कधीं कधीं प्रांतिक सरकारें ट्रेझरी बिलांचा अवलंब करितात. साधारणतः ट्रेझरी बिलांची मुदत तीन महिने असते. ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा सध्याचा दर द. सा. द. शे. १३ आ. ८ पै आहे. मोसमाप्रमाणें तो कमी अधिक होतो.

## शिवगंगा व्हॅली कंझूमर्स सोसायटी

खेड–शिवापूर येथील मुख्य केंद्र व त्याच्या पंचक्रोशींतील शिवगंगा खोऱ्यांतील १८—१९ खेडीं ह्या ठिकाणीं डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनतर्फे ग्रामोद्धाराचें कार्य आज बरीच वर्षे चालू आहे.

धान्य पुरवठ्याचेबाबत जेव्हां अडचणी उत्पन्न झाल्या व शिवापूरचे आठवड्याचे बाजारांत धान्य मिळेनासें झालें तेव्हां असोसिएशनच्या सभासदांनीं सुमारें एक हजार रुपये जमवून कलेक्टरकडून परवाना मिळवून एक धान्याचें दुकान चालविलें. हें दुकान सुमारें चार महिने चालल्यावर लोकांजवळ रब्बींचीं पिकें आल्यामुळें धान्य झालें व दुकानचें गिऱ्हाईक कमी झालें. परंतु हा सांठा संपल्यावर पुन्हां धान्याची जरूरी भासूं लागली. चार महिने चालविलेल्या दुकानामुळें जरूर तो अनुभव मिळाला होताच. तेव्हां तेथील गांवकऱ्यांतच स्वावलंबन करून सहकारी दुकान काढण्याचा सल्ला देऊन, सहकारी दुकान काढण्यास जनरल सेक्रेटरींनीं मदत केली. ह्या कामांत गांवकऱ्यांनीं मनापासून सहाय्य केलें. विशेषतः श्री. आण्णाजी पांडुरंग कोंढे देशमुख ह्यांनीं पुढाकार घेऊन इतर गांवकऱ्यांचें सहाय्य मिळविलें. सुमारें ५५ गांवकऱ्यांनीं १००—१०० रुपये देऊन दुकानचा एक एक भाग घेण्याचें ठरवून रोख रक्कम जमा झाली. अशा तऱ्हेच्या सहकारी दुकानास 'शिवगंगा व्हॅली कन्झूमर्स सोसायटी' ह्या नांवाखालीं काम करण्याची मंजुरी ता. १९ जुलै १९४३ रोजींचें हुकुमानें रजिस्ट्रारनीं दिली. तेव्हांपासून आज दोन–अडीच महिने सहकारी दुकानचें काम खेड व शिवापूर येथील गांवकरी लोकांचे मदतीनें चालू आहे. परंतु औपचारिकरीत्या त्या दुकानाचें उद्घाटन व कार्यकारी मंडळींच्या नेमणुका करण्याकरितां गुरुवार ता. ३० सप्टेंबर रोजीं सहकारी दुकानचे भागीदारांची पहिली सर्वसाधारण सभा शिवापूर येथें झाली. अध्यक्ष म्हणून श्री. अण्णासाहेब कोंडे यांचीं एकमतानें नेमणूक झाली व कार्यकारी मंडळ, तपासणी मंडळ व सेक्रेटरी यांच्या नेमणूका झाल्या.

---

## उंसाच्या पिकाचा ताजा अंदाज

जुलै, १९४३ अखेरच्या परिस्थितीवर आधारलेला हिंदुस्थानांतील उंसाच्या पिकांचा ताजा सरकारी अंदाज प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून चालू मोसमांत उंसाखालीं ३६,४२,००० एकर जमीन आहे, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षां पिकांत ७% वाढ झालेली आहे, असें दिसून येतें. खालील तक्त्यांत कांहीं प्रमुख प्रांतांतील पिकांचा तपशील दिला आहे.

| प्रांत | १९४३–४४ मधील लागवड (एकर) | वाढ (एकर) | एकूण हिंदी लागवडीशीं प्रमाण% |
|---|---|---|---|
| संयुक्तप्रांत | २१,१४,००० | १,६८,००० | ५१·७ |
| पंजाब | ४,९३,००० | १८,००० | ११·७ |
| बिहार | ४,२४,००० | २३,००० | २०·६ |
| बंगाल | ३,३४,००० | ३५,००० | ७·९ |
| मुंबई | १,५२,००० | ५,००० | ३·५ |
| मद्रास | ११,८,००० | २०,००० | ३·१ |
| | ३३,३५,००० | २,६९,००० | ८८·५ |
| सबंध हिंदुस्थान | ३८,९२,००० | २,५०,००० | १००·० |

म्हैसूर, हैद्राबाद, सिंध, दिल्ली, मध्यप्रांत, भोपाळ, इत्यादि ठिकाणीं उंसाच्या पिकाचें क्षेत्र कमी झाल्यामुळें एकूण वाढीचा आंकडा २,६९,००० एकरांचा २,५०,००० एकर झालेला आढळतो.


# फणसपोळी, आंबेपोळी

किरकोळ व ठोक मिळेल.

द. ना. हेर्जीब, : : २० शुक्रवार, पुणें २.

# हातपाय चालतात तोंवर

म्हातारपणची तरतूद करणें अवश्य आहे. चांगल्या कंपनींत उतरलेला विमा हा ऐन वेळीं उपयोगी पडतो. या संबंधांत आपणांस कसलीहि माहिती पाहिजे असल्यास आम्हांकडे विचारा. आम्ही सर्व खुलासा करून योग्य मार्ग दाखवूं.

मॅनेजर,

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.**

सातारा शहर.

पुणें शाखा–१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.

# THE FARMER
## HIS WELFARE & WEALTH

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR
SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

"The problems of Population, Land Tenure, Agricultural Indebtedness, Co-operative Movement, Family Budgets, and other village problems have all been dealt with exhustively in this book. A majority of the families covered by the survey is selected from among the members of primary co-operative societies with a view to seeing how the Co-operative Movement can be utilised for the emancipation of the peasants proverbial indebtedness....One of the very interesting Chapters is that of Land Holdings....The Chap. on Agricultural Indebtedness provides food for thought....His study is comprehensive and covers all the points associated with village life. The Chaps. relating to Village Problems and Rural Development scheme offer much food for all those interested in the uplift of the rural people." —*Commerce, 29th May, 1943.*

*Published by:*

**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT**
**9 Bakehouse Lane, Fort, Bombay**

## कोणत्या कंपन्यांना चित्रपटासाठी कच्ची फिल्म मिळेल ?

३१ डिसेंबर, १९४४ अखेर फिल्म कंपन्यांना कोणत्या तत्त्वावर व किती प्रमाणांत हिंदुस्थान सरकार कच्च्या फिल्मचा पुरवठा करणार आहे, ह्याची माहिती "चित्रलेखा" साप्ताहिकानें आपल्या ताज्या अंकांत दिली आहे. त्या प्रमाणें ज्यानें १६ जुलै, १९४३ पूर्वी संपूर्ण लांबीची फिल्म तयार करून ती सेन्सॉर करवून घेतली आहे, असा उत्पादक कच्ची फिल्म मिळण्यास सरकारनें मुख्यतः लायक ठरविला आहे. ह्याचा अर्थ जो उत्पादक वरील अट पाळूं शकलेला नाहीं, त्यास कच्ची फिल्म मिळणार नाहीं. तथापि, ज्याची फिल्म १७ जुलै, १९४३ (कंट्रोल हुकुमाच्या अंमल बजावणीचा प्रारंभ) व १३ ऑक्टोबर, १९४३ (उपरिनिर्दिष्ट धोरण ठरल्याची तारीख) ह्यांचे दरम्यानचे मुदतींत बहुंशीं तयार होत आली असेल, त्यास ती पुरी करूं दिली जाईल. कच्च्या फिल्मचा पुरवठा मर्यादित असल्याकारणानें व आयात केव्हां व कशी होईल हें अनिश्चित असल्याकारणानें, ज्यांस कच्ची फिल्म मिळण्यास लायक ठरविण्यांत आलेलें आहे, अशांचाहि प्राधान्याचे दृष्टीनें पुनः अनुक्रम लावण्यांत आला आहे. १९३९-४० सालापासून आतांपर्यंत ज्यांनीं ओळीनें पुष्कळ फिल्म काढल्या आहेत अशांना आधीं फिल्म मिळणार आहे. बॉंबे टॉकीज लि., मिनर्व्हा, मोहन, प्रभात, प्रकाश, श्रीरणजित, श्रीविष्णु व वाडिया मुव्हिटोन ह्या कंपन्यांचा प्राधान्य मिळावयाच्या कंपन्यांत समावेश झालेला आहे. ह्या कंपन्यांनंतर नवयुग चित्रपट लि., हरिश्चंद्र, हिंद व नॅशनल स्टुडिओज ह्यांचा अनुक्रम येतो. प्राधान्याच्या तिसऱ्या अनुक्रमाचे पंक्तींत अमर, अत्रे, चित्रा, चंद्र आर्ट, फझलि ब्रदर्स, मुरली, न्यू हंस, प्रदीप, सौभाग्य, स्टँडर्ड व व्हीनस ह्या कंपन्या येतात. चवथ्या अनुक्रमाच्या पंक्तींतील कंपन्यांची संख्या ह्याहून पुष्कळच मोठी आहे. स्पेशल केस म्हणून फिल्मिस्तान, ज्युपिटर, प्रभाकर, राजकमल, इत्यादि कंपन्यांस फिल्म मिळेल. पहिल्या व दुसऱ्या पंक्तींतील एक सोडून बाकी सर्व कंपन्यांना त्यांच्या एक-दोन तरी नव्या चित्रपटांसाठी लायसेन्स मिळेल; तिसऱ्या व चवथ्या अनुक्रमाच्या पंक्तींतील कंपन्यांस त्यांच्या उत्पादनाच्या मागील सरासरीचे प्रमाणांत, त्या कंपन्या अद्याप फिल्म काढीत असल्या तर, कच्ची फिल्म मिळेल. चित्रपटाचे धंद्यास वाहून घेतलेल्या जुन्या कंपन्यांस प्राधान्य मिळावें; बाजारांत पैसा स्वस्त मिळूं लागला म्हणून किंवा दुसरीकडे कोठे पैसे गुंतविण्यास साधन नाहीं म्हणून फिल्म काढूं लागणाऱ्या निर्मात्यांचा फिल्म मिळण्याचा हक्क त्यानंतर यावा, हें धोरण कच्च्या फिल्मच्या वरील वाटणीच्या मुळाशी आहे. ज्यांचे स्वतःचे स्टुडिओ नाहींत किंवा ज्यांनीं स्टुडिओ भाड्यानें घेतलेले नाहींत, अशा चवथ्या पंक्तींतील फिल्म कंपन्यांना, त्या सध्या तयार करीत असलेल्या फिल्म पुऱ्या करण्यापुरती फिल्म मिळेल; नव्या चित्रपटांसाठी फिल्म मिळणें त्यांस अशक्यप्राय होईल. ज्या कंपन्यांना ३१ डिसेंबर, १९४४ अखेर नव्या फिल्मसाठी लायसेन्स मिळण्याची आशा नाहीं, अशा बावीस कंपन्यांची यादी "चित्रलेखा" नें "फिल्म इंडस्ट्री" वरून दिली आहे. अर्थात, वरील सर्व माहिती मुंबई प्रांतापुरतीच आहे, व सरकारी हुकुमाचा अर्थ "फिल्म इंडस्ट्री" नें लावला आहे, त्यावरूनच वरील अनुक्रम लाविण्यांत आलेले आहेत.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम., २४ डे. जि. पुणें ४)

मागील सर्व महिना शेअर बाजाराला जितका कंटाळवाणा गेला तितका मागील वर्षांत गेला नव्हता. वर्षभर तेजीची संवय झालेल्या बाजारांतील सटपट्यांना त्यामुळें फारच चुकल्यासारखें वाटत आहे. कापडाच्या विभागणीची व तें कोणत्या भावांत व मुदतींत विकावयाचें त्याची सरकारनें योजना आतां पक्की केली असल्यानें गिरण्यांना १९४४-४५ साल खचित १९४३-१९४४ पेक्षां मंदीचें जाणार अशी हळु हळु खात्री होत चालली आहे. इकडे पूर्व गोलार्धावर लुई माऊंट बॅटन साहेबांची नेमणूक केवळ शोभा म्हणून झालेली नाहीं व पुढील महिन्यांत, दोन महिन्यांत या नेमणुकीचें दृश्य स्वरूप कळून चुकेल हें बाजाराला समजतें. त्यानंतर मॉस्को परिषदेची हकीगत आली आहे त्यामध्यें जर्मनीशी कोणत्या तऱ्हेचा तह करावयाचा त्याच्या वाटाघाटींनाहि प्राधान्य देण्यांत आलें होतें असें समजून आलें व त्यामुळें जणूं लढाई संपलीच असा थोडावेळ आभास निर्माण झाला. या सर्व घटांनमुळें पत्रकें काढणाऱ्या दलाल मंडळींनीं बाजाराला जरा उकळी आली तर विकून मोकळें झालेलें बरें अशी घोषणा करण्यास सुरवात केली आहे. तेव्हां निमित्तास टेकलेले लोक जरा कढ येतोसा दिसला कीं वेचाणीस पुढें येत आहेत. त्यामुळें बाजार तेजींत तूर्तास जाऊ शकत नाहीं असें दिसतें.

बँका, विमा व वीज कंपन्यांच्या शेअर्सच्या भावांकडे दृष्टी टाकतां सर्वांचे भाव ३ टक्यांच्या पातळींत येऊन बसलेले दिसत आहेत. तेव्हां मागील वर्षापासून "अर्थां"त प्रतिपादित आला असलेला व्याजाच्या दरांतील सर्वसाधारण उतार हा आतां नक्कीच घडून आला आहे असें दिसून येईल. त्यामुळें गिरण्या व लोखंड-पोलादाचे भाव जरी वर दाखविलेल्या वातावरणामुळें सुस्त असले तरी व्याजाच्या उतरलेल्या दरांच्या दृढपणामुळें वेढेवांकडे खाली पडतील अशी परिस्थिति दिसत नाहीं. तसेंच बाजाराच्या मंदपांतील देवघेवींनाहि सरकारनें बांधून टाकलें असल्यानें मंदीवाल्यांचे हातपाय जखडले गेले आहेत.


**दत्त कंपनी**

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

**देशाच्या औद्योगीकरणार्थ**

जागतिक व नव्या नव्या धनोत्पादक तीस हजार धंद्यांच्या प्रायोगिक माहितीची मराठी, हिंदी व गुजराथी भाषेंतील ज्ञानमोठीं शेंकडों पुस्तकें प्रकाशित करण्याकरितां त्या त्या भाषेंतील धनिक ग्रंथ-प्रकाशक व मुद्रक पाहिजेत. भेटा अगर लिहा.

घरबसल्या दीड हजार धंदे सप्रयोग शिकविणारी डिरेक्टरी साठ आण्याची तिकिटें पाठवून अवश्य मागवा. व गांवोगांवीं धंदे उभारा.

औद्योगिक ज्ञानप्रसारक मंडळ
४४६ सदाशिव पेठ, पुणें २



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

# संरक्षण — सुरक्षितता — सेवा

हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आताच लिहाः—

मुंबईचे चीफ एजन्टस
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बॅक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
'रामनिवास' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

# विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुपक्षाकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव झाल्यास बिन-लष्करी नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.,
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

गो. रा. अ. सं. ग्रंथालय
पुणे.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १७ नोव्हेंबर, १९४३ अंक ४५

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचें सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

# विविध माहिती

### लाहोर येथें नवीन टांकसाळ

लाहोर येथें उघडण्यांत आलेल्या सरकारी टांकसाळींत नाणीं पाडण्याचें काम जोरानें सुरू झालें आहे, त्यामुळें कलकत्ता व मुंबई येथील टांकसाळींवरील ताण कमी होऊन नाण्यांची टंचाई दूर होईल, अशी अपेक्षा आहे.

### हिंदुस्थानांत दुधाचें दुर्भिक्ष

हिंदुस्थानांत दर माणशीं दुधाचा खप १९३५ सालीं ६.६ औंस होता तो १९४१ सालीं ५.८ औंस झाला. बहुसंख्य लोकांस दूध अजिबात मिळत नाहीं ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे हिंदुस्थानांतील दुधाचें दुर्भिक्ष लक्षांत येतें. हिंदी माणसाची इंग्रजापेक्षा प्राप्ति बरीच कमी आहे; परंतु ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांत दुधाचा बाजारभाव सारखाच आहे.

### प्रोड्यूसर गॅस प्लँट

प्रोड्यूसर गॅस प्लँटच्या हिंदुस्थानांतील ५५ कारखान्यांनीं आतांपर्यंत १ कोटि रुपये खर्चून सुमारें १०,००० प्रोड्यूसर गॅस प्लँट तयार केलीं आहेत. त्यांच्या वापरामुळें १ कोटि, ६० लक्ष गॅलन पेट्रोलची बचत झाली आहे.

### भारत बँक लि.

शेट रामकृष्ण डालमिया ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एका वर्षापूर्वी स्थापन झालेल्या वरील बँकेचें खपलेलें भांडवल १३½ कोटि रुपये व वसूल भांडवल २ कोटि, १ लक्ष रुपये आहे. ३० सप्टेंबर, १९४३ अखेरच्या ताळेबंदांत तिच्याकडील ठेवी ८½ कोटि रुपयांच्या झालेल्या दिसतात. बँकेस निव्वळ नफा २ लक्ष, ५६ हजार रुपये झाला. बँकेनें आतांपर्यंत ठिकठिकाणीं ११० शाखा स्थापन केलेल्या आहेत.

### रशियाच्या वाढदिवसास जपान सरकारचे प्रतिनिधी

टोकियो येथील रशियन वकिलातींत झालेल्या सोव्हिएट युनिअनच्या २६ व्या वार्षिक दिनाच्या समारंभास जपानचे परराष्ट्र मंत्रि व फडनवीस हे हजर होते.

### "राष्ट्रीय युद्ध आघाडी"

वरील योजना ११ मार्च, १९४२ रोजीं सरकारनें अंमलांत आणली व तिचेवर १९४२–४३ मध्यें ३३½ लक्ष रुपये खर्च केले.

### घरभाडें वाढविण्याचा अप्रत्यक्ष प्रकार बेकायदा

घरमालकानें भाडेकऱ्याकडून विजेबद्दल ज्यास्त रकमेची मागणी करणें हें भाडें नियंत्रित करणाऱ्या कायद्याच्या व हुकुमाच्या विरुद्ध आहे, असें आपलें मत मुंबई सरकारनें मुंबईच्या भाडेकऱ्यांच्या संघास कळविलें आहे. ( १ ) पूर्वी विजेबद्दलचा आकार एकूण भाड्यांतच समाविष्ट होता, परंतु आतां विजेबद्दल वेगळी आकारणी करण्यांत येते; ( २ ) विजेबद्दल पूर्वी वेगळा आकार घेण्यांत येत होता, परंतु आतां त्यांत वाढ करण्यांत आली आहे; ( ३ ) समाइक मीटर बसविण्यांत आलेला आहे व विजेचा आकार घरभाड्यांत समाविष्ट आहे, अशा ठिकाणीं आतां रात्रीं लवकर वीज बंद करण्यांत येते; हे तीनहि प्रकार प्रचलित कायद्याचे विरुद्ध आहेत. मूळ भाड्यापेक्षा वरील प्रकारचें ज्यास्त भाडें न दिल्याबद्दल भाडेकऱ्यास बाहेर काढून लावण्यास मालकास हक्क नाहीं.

### वॉररिस्क ( गुड्स ) इं. फंड

मालाच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याचे फंडांत १९४१-४२ अखेर २ कोटि, ४९ लक्ष रुपये शिल्लक होते. व्यवस्थेचा खर्च ३,२५,००० रुपये आला.

### शिरगणतीचा खर्च

गेल्या हिंदी शिरगणतीवर, आतांपर्यंत, २१ लक्ष रुपये खर्ची पडले आहेत.

### किंमतीच्या नियंत्रणास पंजाबचा विरोध

गव्हाची किंमत नियंत्रित करण्याचा कोठलाहि प्रयत्न शेतकऱ्यांत असमाधान निर्माण करण्यास कारणीभूत होईल, हें पंजाब असेंब्लीचें मत हिंदुस्थान सरकारास कळविण्यांत यावें, असा पंजाब असेंब्लीनें एकमतानें ठराव मंजूर केला आहे.

### प्राप्तीवरील कराचें वाढतें उत्पन्न

प्राप्तीवरील कराच्या वसुलीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. युद्धापूर्वीच्या वर्षी १६ कोटि रुपये इनकमटॅक्स जमा झाला होता, गेल्या वर्षी तो आकडा ७८ कोटींवर गेला. चालू वर्षीच्या अंदाजपत्रकांत १०२ कोटि रुपयांची वसुली अपेक्षित आहे.

### मद्रास इंप्रुव्हमेंट ट्रस्ट

मद्रास शहरासाठी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट स्थापन करण्याचें काम मद्रास सरकारनें हातीं घेतलें आहे.

### ७½ लक्ष रुपयांचा हिरा

व्हेनेझुएलांत सांपडलेला, १४५ कॅरट्चा, अंड्याच्या आकाराएवढा हिरा मि. हेन्री विल्सन ह्यांनीं आपल्या कंपनीतर्फें सुमारें ७½ लक्ष रुपयांस नुकताच विकत घेतला.

### सिंधमध्यें कालव्याच्या पाण्यापासून विजेची निर्मिती

सिंधू नदीच्या डाव्या बाजूस तंडो मस्तिखान येथें लवकरच वीज निर्माण करण्याची योजना हातीं घेतली जाईल. सक्करच्या धरणांतून निघणाऱ्या रोहरी कालव्यास ह्या ठिकाणीं एकदम दहा फुटांचा उतार आहे त्याचा फायदा घेऊन २ हजार किलो-वॅट शक्तीचें विद्युतगृह उभारण्यांत यावयाचें आहे, त्यास ३० लक्ष रुपये खर्च येईल.

### अफूस बंदी

ग्रेट ब्रिटन व पूर्वी ब्रिटिश संरक्षणाखालील असलेले परंतु आतां जपानी छत्राखालील देश ह्यांत अफू ओढणें बंद करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे.

### मोटारीच्या टायर्सचें आयुष्य वाढवा

( १ ) वरचेवर टायर्सची पहाणी करून, चिरा पडल्यास त्या व्हल्कनाइज करून घ्या. ( २ ) टायरवर पुन: रबर चढवितां येणार नाहीं, अशी स्थिति येण्याइतकी टायर वापरूं नका. ( ३ ) उत्पादकाच्या सूचनांस अनुसरून, टायर्समध्यें ठराविक दाब कायम राखा ( ४ ) योग्य वेगानें मोटार हाका. जरूर तेव्हां ब्रेक लावाल तो हळु लावा. ( ५ ) वळण घेतांना वेग कमी करा ( ६ ) मोटार उभी करतांना टायर कोठें घासूं देऊं नका. ( ७ ) रस्त्यांवरील खड्डे टाळा ( ८ ) सावलींत मोटार उभी करा; उन्हानें रबरास भेगा पडतात. ( ९ ) वेगवेगळ्या चाकांवर टायर्स आळीपाळीनें बसवा. ( १० ) चारी चाकांचे ब्रेक नीट बसवा. ( ११ ) गाडी निर्दोष चालावी ह्यासाठी चाकें नीट बसलीं आहेत ना, तें पहा. ( १२ ) चाकाची नादुरुस्त रिम चांगल्या टायरची खराबी करील; रिम दुरुस्तींत ठेवा.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ३५४ | हवी—सर जरेमी रेस्मन ह्यांचा खुलासा—दौलतराव शिंदे | |
| २ हिंदी विमा कंपन्यांचें भवितव्य | ३५५ | | |
| ३ चहाच्या मळ्यांतील मजुरांचें वेतन | ३५६ | ६ माढा ता. ख़ु. युनियन | ३५८ |
| ४ विदेशी कंपन्यांचें आक्रमण | ३५६ | ७ पुरंदर ता. ख़ु. युनियन | ३५८ |
| ५ स्फुट विचार मालाच्या पुरवठ्यांत वाढ | ३५७ | ८ १९४१ मधील विमा व्यवसाय | ३५९ |


# अर्थ

बुधवार, ता. १७ नोव्हेंबर, १९४३

## साडेतीन टक्के व्याज व हिंदी विमा कंपन्यांचें भवितव्य

### १९४१ मधील हिंदी आयुर्विम्याचें काम

हिंदी विमा व्यवसायाची माहिती देणारें ताजें, १९४२ चें वार्षिक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यांत १९४१ मधील हिंदी कंपन्यांच्या व्यवहाराची तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे व त्याचे प्रारंभीं सुपरिंटेंडेंटचा त्यावरील रिपोर्ट छापण्यांत आला आहे. विमा कंपन्यांनीं आपल्या हिशेबांचे व व्यवहाराच्या माहितीचे तक्ते सुपरिंटेंडेंटकडे दरसाल ठराविक मुदतींत पाठवावे लागतात, ते त्यांनीं वक्तशीर पाठविले तर हें विमा-वार्षिक प्रतिवर्षी पुष्कळच अधिक लवकर प्रसिद्ध करतां येईल, असें सांगून विमा-वार्षिकांतील आकडे शिळे कां असतात ह्याचें समर्थन सुपरिंटेंडेंटनें आपल्या रिपोर्टांत केलें आहे. १९४१ सालीं सबंद हिंदुस्थानांत एकूण ३९½ कोटि रुपयांच्या २ लक्ष पॉलिसींचें काम पुरें झालें. वर्षअखेर २९१¾ कोटि रुपयांचे १५ लक्ष, ९२ हजार विमे चालू होते. त्यांपैकीं सुमारें ५४¾ कोटि रुपयांचे १ लक्ष, ६९ हजार विमे परदेशी कंपन्यांकडे होते. हिंदी विमा कंपन्यांच्या लाइफ फंडावर मुळींत माझीवरील कर वजा जाऊन द. सा. द. शें. ४·१७% व्याज सुटलें. विमा वार्षिकांत एकूण १५९ हिंदी कंपन्यांच्या मूल्यमापनाचे आकडे दिले आहेत, त्यांपैकीं ८७ कंपन्यांनीं एकूण ३ कोटि, ४९ लक्ष रुपये वाढावा दाखविला असून ७२ कंपन्यांनीं एकूण ७६ लाखांची तूट दर्शविली आहे. त्यांपैकीं ३२ कंपन्यांची तूट त्यांच्या वसूल भांडवलानें भरून येण्याजोगी होती.

वरीलप्रमाणें थोडक्यांत माहिती देऊन सुपरिंटेंडेंटनें विमा कंपन्यांच्या आर्थिक परिस्थितीवर, मूल्यमापनावर, पैशाच्या गुंतवणुकीवर व व्यवस्थेच्या खर्चावर आपले विचार व्यक्त केले आहेत. कंपन्यांनीं आपले हिशेब ३½ व्याजाच्या दरावर आधारूनच ह्यापुढें करावेत, हा त्यांच्या सल्ल्याचा सारांश आहे. पाचदहा पहिल्या दर्जाच्या कंपन्या सोडून बाकी बहुतेक सर्व हिंदी विमा कंपन्यांची सर्वसाधारण आर्थिक परिस्थिति कशी बिकट आहे व त्यांतून मार्ग कोणता, ह्याचा ऊहापोह करण्यापूर्वी मूल्यमापनांत गृहीत धरावयाच्या व्याजाचें महत्त्व कोणतें आहे, हें स्पष्ट करणें आवश्यक आहे.

### मूल्यमापनांत गृहीत धरावयाच्या व्याजाच्या दराचें महत्त्व

प्रत्येक धंदेवाल्यास आपल्या धंद्यांत किती नफा झाला हें पहाते वेळीं, सर्व देणीं विचारांत घ्यावीं लागतात. देण्यांचा प्रत्यक्ष दिवस दूर असला, तरी धंद्याच्या ताळेबंदांत तीं दर्शविलीं जाणें आवश्यक असतें. आयुर्विमा कंपनीच्या धंद्याचें वैशिष्ट्य असें आहे कीं ती जोखीम स्वीकारून ठराविक मुदतीनंतर अथवा मृत्यु किंवा इतर कांहीं गोष्ट घडल्यावर विम्याची रकम देण्याची जबाबदारी घेते; उलट, विमेदारांकडून दरसाल कांहीं रकम हप्त्यांचे स्वरूपांत तिला वसूल करण्याचा अधिकार असतो. विमा कंपनीच्या आर्थिक परिस्थितीची पहाणी करावयाची असल्यास, (१) कंपनीनें विम्याचे स्वरूपांत पुढें केव्हां तरी द्यावयाचें देणें स्वीकारलें आहे, त्याची आजची किंमत किती भरते ? (२) ह्या पॉलिसींचे पोटीं विमा कंपनीस हप्ते मिळावयाचे आहेत, त्यांची आजची किंमत, खर्चाची तजवीज करून, किती येते ? ह्या दोन बाबी निश्चित ठरवाव्या लागतात. ह्या एकूण देण्याची आजची किंमत ११ लक्ष रुपये व येण्याची आजची किंमत १० लक्ष रुपये आहे, असें मानल्यास कंपनीला १ लक्ष रुपयांचे 'निवळ देणें' निघतें असा अर्थ होतो. निवळ देण्यास रिझर्व्ह असें म्हणतात. विमागणिती विमा कंपन्यांचे ठराविक कालांतरानें मूल्यमापन करतात, त्याचा उद्देश, वरील निवळ देण्याची रकम निश्चित करणें, हा असतो. ह्या निवळ देण्याइतकी रकम कंपनीजवळ वेगळी शिल्लक असेल, तर (१) त्या रकमेची व (२) हप्त्यांच्या वसूल होणाऱ्या रकमेची मूल्यमापनांत चक्रवाढ व्याजाच्या गृहीत धरलेल्या दरानें होणारी वाढ, ह्या दोघांची बेरीज कंपनीकडे येणारे क्लेम्स देण्यास पुरेशी पडेल, हें उघड आहे.

सहाजिकच, कंपनीनें चक्रवाढ व्याजाचा कोणता दर निश्चित केलेला आहे, ह्यावरच मूल्यमापन अचुक होणें अवलंबून आहे. व्याजाचा दर ५% धरल्यास कंपनीची तरतूद तिचें देणें भागविण्यास पुरी पडेल असें मानलें, तर ४% व्याजाच्या दरानें तिच्या हिशेबांत, तिच्या कामाचे आकारानुसार, कित्येक हजारांची वा लाखांची तूट येणें अगदीं शक्य होईल. तेव्हां, कंपनीनें व्याजाचा दर गृहीत धरावयाचा तो योग्य असणें अत्यंत आवश्यक आहे. मूल्यमापनाच्या ताळेबंदांत एका बाजूस कंपनीचें ताळेबंदाच्या तारखेचें निवळ देणें मांडलेलें असतें व दुसऱ्या बाजूस तें भागविण्यासाठीं कंपनीजवळ असलेली तरतूद (लाइफ ॲशुअरन्स फंड) हा लिहिलेला असतो. देणें व हा फंड ह्यांतील तफावत वाढावा दाखवील किंवा तूटहि दाखवूं शकेल. गेल्या मूल्यमापनांतून पुढें ओढलेला वाढावा अथवा तूट ह्यांचीहि रकम हिशेबांत घेतली जाते. वाढाव्यांतून कंपनीची मजबुती वाढविण्यासाठीं वेगवेगळे फंड निर्माण करण्यांत येतात व विमेदारांस बोनस आणि भागीदारांस डिव्हिडंड दिले जातें. हिशेबांतील मूळ अपेक्षेपेक्षा विमेदारांचे मृत्यू कमी घडले, हप्ते उगवितांना केलेल्या तरतुदीपेक्षा खर्चाचें प्रमाण कमी आलें, कंपनीनें गुंतविलेल्या रकमांवर अपेक्षेपेक्षा व्याज अधिक सुटलें,

अथवा इतर बाबींत ( उ. रोख्यांची किंवा मालमत्तेची विक्री ) अनपेक्षित नफा झाला, तर कंपनीच्या मूल्यमापनांत वाढावा येण्यास मदत होते.

### ३½% दराचा सरकारी ॲक्चुअरीचा आग्रह

आयुर्विमा कंपन्यांचें मूल्यमापन त्यांच्या आर्थिक परिस्थितीचें निदर्शक कसें असतें, हें सांगितल्यावर आतां हिंदी आयुर्विमा कंपन्यांची त्यासंबंधांतील परिस्थिति १९४२ च्या हिंदी विमा वार्षिकाच्या आधारानें स्पष्ट करणें सोईचें होईल. १९४१ मधील हिंदी विमा व्यवसायावरील सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सचा वृत्तांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत त्यांनीं मूल्यमापनांतील व्याजाच्या दरासंबंधीं विवेचन केलें आहे. ह्या व्याजाच्या दराचें महत्त्व काय आहे, हें वर सांगितलेंच आहे. विम्याच्या देण्याची आजची किंमत जी होईल, तिची तरतूद मूल्यमापनांतील दरानें चक्रवाढ व्याजानें वाढून अखेर ती पुरी पडेल, अशी अपेक्षा कंपनी करीत असते. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सच्या मतें आजची व्याजाच्या दराची परिस्थिति लक्षांत घेतां व्याजाचा दर ४% अथवा ४½% गृहीत धरणें योग्य होणार नाहीं. कित्येक कंपन्या व्याजानें ठेवी स्वीकारतात, त्यामुळें दिलेलें व मिळालेलें व्याज ह्यांचा एकत्र हिशेब करतां, कंपनीच्या मूल्यमापनांत ३% दरहि गृहीत धरणें कठीण जातें, असें त्यांचें म्हणणें आहे. विमा कायद्याच्या २७ व्या कलमाप्रमाणें विमा कंपन्यांना आपले पैसे बहुंशीं सरकारी रोख्यांत गुंतवावे लागतात व त्या रोख्यांवर ३½% पेक्षां ज्यास्त व्याज सुटत नाहीं. इतर ठिकाणीं पैसे गुंतविल्यानें अधिक व्याज मिळालें तरी मुद्दल असुरक्षित होण्याचा संभव असल्यानें विमेदारांच्या हिताचे "विश्वस्त" सुपरिंटेंडेंट ह्यांस तो मार्ग ग्राह्य वाटत नाहीं. मूल्यमापनासाठीं ३½% व्याजाचा दर स्वीकारणें हेंच आज श्रेयस्कर आहे व कांहीं कंपन्यांना ३% व्याजाच्या मूल्यमापनावरच आपली परीक्षा करून घ्यावी लागेल, असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. खर्च कमी करणें व हप्ते वाढविणें हे उपाय त्यांनीं उतरत्या व्याजाच्या दरावर तोडगे म्हणून सुचविले आहेत.

### आसामांतील चहाच्या मळ्यांमधील मजुरांचें वेतन

हिंदुस्थानांतील चहाच्या एकूण उत्पादनापैकीं ५५% उत्पादन एकट्या आसाम प्रांतांत होतें. हिंदुस्थानांतील चहाच्या मळ्यांत ९,१८,३५४ मजूर कामावर आहेत. त्यापैकीं ६०% मजूर आसामांत आहेत. त्यांची प्रत्यक्ष संख्या १९४१-४२ मध्यें ५,७४,६५३ होती. मळ्यांतील मुलांची संख्या ५,७०,७८२ भरली. मजुरांस खालीलप्रमाणें मासिक वेतन मिळालें.

| | रु. आ. पै |
|---|---|
| पुरुष | ८-११-५ |
| स्त्री | ७-२-१० |
| मूल | ५-४-४ |

युद्धजन्य महागाईमुळें उपस्थित झालेली मजुरांची अडचण दूर करण्याकरितां त्यांना महागाई भत्ता देण्यांत आला व तांदूळ सवलतीच्या दरानें विकण्यांत आला. मजुरांनीं मनिऑर्डरीनें १½ लक्ष रुपये घरीं पाठविले. ह्या बचतीचें दरमाणशीं प्रमाण ४ आणे पडतें!

## विदेशी आयुर्विमा कंपन्यांचें आक्रमण

हिंदुस्थानांतील आयुर्विमा व्यवसायांत विदेशी कंपन्यांचा हात किती आहे, हे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

| नवें काम | हिंदी कंपन्या (कोटि रु.) | विदेशी कंपन्या (कोटि रु.) | एकूण (कोटि रु.) |
|---|---|---|---|
| १९३८ | ४३·३ | ८·४ | ५१·७ |
| १९३९ | ४२·५१ | ४·११ | ४६.६२ |
| १९४० | ३२·३२ | ३·७९ | ३६·११ |
| १९४१ | ३४·१४ | ५·३७ | ३९·५१ |

वरील आकड्यांवरून विदेशी कंपन्यांचा व्याप वाढूं लागला आहे, असें स्पष्ट कळतें. १९३९ सालांतील कामापेक्षां १९४१ सालीं हिंदी कंपन्यांनीं १०·३७ कोटि रुपयांचें कमी काम मिळविलेलें आहे. विदेशी कंपन्यांनीं ह्याच मुदतींत आपल्या कामांत बरीच प्रगति केलेली आहे. १९४० व ४१ ह्यांपुरते आंकडे पाहिल्यास, हिंदी कंपन्यांच्या कामाच्या वाढीपेक्षा विदेशी कंपन्यांच्या कामांतच अधिक वाढ झालेली आढळते. युद्धविषयक धोक्यांचा विमा बहुतेक हिंदी कंपन्या स्वीकारीत नाहींत, ह्याचा हा परिणाम असला पाहिजे. विदेशी कंपन्यांकडे एकदा वळण जमलें, म्हणजे त्याचा परिणाम कांहीं काळ चालू रहाणें अपरिहार्य आहे. हिंदी कंपन्या ह्यापुढें मोठें बोनस होऊं शकणार नाहींत, असा गवगवा झाल्याचाहि हा परिणाम असणें शक्य आहे.

### व्याजाचा उतरता दर

हिंदी कंपन्यांस १९२९ सालापासून १९४१ अखेर व्याजाचा दर कोणता पडला हें खालीं दिलें आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, तो १९२३ सर्वांत ज्यास्त (६·२६%) होता. तेथून तो एकसारखा खालीं जात चालला आहे. १९४१ सालीं तो ४·१७% वर आला. ह्यापुढें तो आणखी खालीं जाणार, हें स्पष्ट आहे. तथापि, विमा कंपन्यांचें मूल्यमापन आजवर ५% किंवा ४½% दरानें झालें, तर त्यांत कांहीं चूक नव्हती व आतां तें ३½% दरानें केल्यामुळें त्यांचे हिशेब तुटीचे दिसूं लागणें, तर क्रमप्राप्त आहे; त्याबद्दल कंपन्यांना सरसकट दोष देणें अयोग्य आहे, हें कळून येईल. बदललेल्या परिस्थितीप्रमाणें तात्काळ तरतूद करणें कठीण आहे.

व्याजाचा पडलेला दर

| व्याजाचा दर | वर्षें |
|---|---|
| ५½% पेक्षा ज्यास्त दर | १९२१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, ३०, ३१, ३२ |
| ५% पेक्षा ज्यास्त दर | १९२९, ३३, ३४, ३८ |
| ४½% पेक्षा ज्यास्त दर | १९३५, ३६, ३७, ३९ |
| ४·३७ | १९४० |
| ४·१७ | १९४१ |

### घडीच्या मोटार सायकली

ब्रिटिश छत्रीवाल्या सैनिकांबरोबर विमानांतून घडीच्या मोटार सायकलीहि खालीं सोडण्यांत येतात. ह्या मोटार सायकली खोक्यांत घातलेल्या असतात. लहान मुलाच्या सायकलीच्या चाकांएवढींच त्यांचीं चाकें असतात, परंतु त्या ताशीं ४५ मैल वेगानें व गॅलन पेट्रोलवर १८० मैल जाऊं शकतात.

# स्फुट विचार

## मालाच्या पुरवठ्यांत वाढ हवी

देशांतील मालाचा पुरवठा स्थिर राहून चलनाचा विस्तार झाला असतां बाजारभाव चढून महागाई निर्माण होईल. चलनाच्या पुरवठ्यांत वाढ न होतां मालाच्या पुरवठ्यांत घट झाली तरहि महागाई हा परिणाम घडून येईल. परंतु युद्धपरिस्थितींत एका बाजूनें चलनाचा विस्तार होत राहिला आहे आणि दुसऱ्या बाजूनें सामान्य जनतेच्या उपयोगाच्या वस्तूंचा पुरवठा घटला आहे असा अनुभव हिंदुस्थानांत आला आहे. महागाईचीं दोन्ही कारणें एकवटल्यानें बाजारभावांत बेसुमार वाढ झाली असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. युद्धकाळांत लढाऊ उपयोगाच्या मालाचें उत्पादन आणि पुरवठा ह्यांस प्राधान्य देणें आवश्यक होतें. तथापि बिनलढाऊ किमान गरजा भागवल्या जातील इतका तरी पुरवठा न झाल्यास त्यामुळें उद्भवणाऱ्या महागाईचा प्रतिकूल परिणाम, युद्ध प्रयत्नावरहि होण्याची भीति असते. ह्याकरितां अशा प्रकारच्या मालाचा पुरवठा व वाटणी प्रमाणशीर होण्याची व्यवस्था सरकारास करावी लागते. बिनलढाऊ जरूरीच्या जिनसांचा पुरवठा वाढवला गेल्यास महागाईस आळा बसतो आणि वाढतें चलन कमी परिणामकारक होतें. व्यवहारांत खेळणाऱ्या चलनास मर्यादा बसावी म्हणून हिंदुस्थान सरकारनें कित्येक उपाय योजले आहेत. बाजारभावांचें व नफेबाजीचें नियंत्रण, बचत व सरकारी रोख्यांतील गुंतवण ह्यांस उत्तेजन, जादा नफ्याची त्वरित आकारणी, इत्यादि मार्गांनीं चलनाचा ओघ उलटा फिरविण्याची ही खटपट आहे. पण तिच्याच बरोबर रोजच्या उपयोगाच्या जिनसा जनतेस वाढत्या प्रमाणांत मिळूं शकतील अशी तजवीज झाल्यास सरकारचे प्रयत्न अधिक परिणामकारक रीतीनें फलद्रूप होतील हें उघड आहे. सर्व सरकारी खात्यांनीं (लष्करी खातें धरून) आपल्या गरजांची कडक पहाणी करावी आणि स्वतः मागवीत असलेल्या मालांत शक्य तितकी काटकसर करावी ह्या कल्पनेस मूर्तस्वरूप देण्याचा विचार चालू आहे असें समजतें. नवीन मालाची मागणी करतांना आणि जुन्याचा उपयोग करतांना सामान्य जनतेच्या गरजांची दृष्टी ठेवण्यांत आली असतां अनेक कच्चे व पक्के जिन्नस लोकांस उपलब्ध करून देतां येतील असा अंदाज आहे. लष्करी व इतर सरकारी खात्यांस लागणाऱ्या मालाचें स्वरूप व प्रकार ह्यांत बदल होत असतो आणि तो होत असतांना काटकसर व जनतेच्या गरजा ह्यांकडे लक्ष दिलें गेल्यास महागाईचा प्रश्न सुटण्यास आणि कांहीं वस्तूंचा स्वस्त पुरवठा होण्यास थोडें-बहुत सहाय्य होण्याचा संभव आहे.

## सर जरेमी रेस्मन ह्यांचा खुलासा

वर वर्णिलेला प्रकार स्वागतार्ह आहे ह्यांत शंका नाहीं. पण ह्या उपायांनीं मालाच्या पुरवठ्यांत होणारी वाढ गरजेच्या मानानें अत्यल्प ठरणार हें स्पष्ट आहे. ह्यापेक्षां अधिक विधायक उपाय योजले जाणें याकरितां अगत्याचें आहे. "सरकारच्या चलनविषयक धोरणांत बाजारभावांच्या स्थैर्यास महत्त्वाचें स्थान देण्यांत यावें" ह्या आशयाचा एक ठराव मध्यवर्ती असेंब्लींत नुकताच चर्चिला गेला त्या प्रसंगीं सर जरेमी रेस्मन ह्यांनीं केलेल्या खुलाशानें प्रस्तुत प्रश्नावर थोडा अधिक प्रकाश पडला आहे. युद्धप्रयत्न यशस्वी होण्यासाठी देशांतील बिनलढाऊ गरजा भागवल्या जाणें आवश्यक आहे ह्या तत्वास त्यांनीं मान्यता दिली. देशाच्या उत्पादन शक्तीचा विनियोग अधिक प्रमाणांत ह्या कामीं केला गेला पाहिजे असें त्यांनीं निक्षून सांगितलें. चलन-विस्तार व महागाई ह्यांच्या परस्पर संबंधावरहि त्यांनीं आपले विचार प्रकट केले. त्यांच्या भाषणाचा आशय असाः--लढाऊ माल पुरवून हिंदुस्थाननें मोठी कामगिरी बजावली आहे. पण ह्या मालाचा मोबदला लंडनमध्यें मिळाल्यानें सदरहु पैशाचा येथें कांहीं उपयोग होऊं शकत नाहीं. लोकांस जरूर असलेला माल दुर्मिळ होत आहे आणि चलन मात्र वाढत चाललें आहे असा त्या व्यवहाराचा परिणाम घडत आहे. चलन कर व कर्जें ह्याच मार्गानें कमी करणें आणि मालाचा पुरवठा वाढवणें किंवा त्याच्या किंमती नियंत्रित करणें हे त्यावर सरळ उपाय आहेत. मालाचा पुरवठा व चलन विस्तार हीं एकाच प्रश्नाचीं दोन अंगें आहेत आणि त्या दोहोंचा एकाच वेळीं समाचार घेतला गेला पाहिजे. सध्याच्या अडचणींच्या युद्धपरिस्थितींतहि मालाचें 'उत्पादन वाढवणें आणि त्या पुरवठ्याचा वाढता अंश सामान्य जनतेस उपलब्ध करणें ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. ह्याप्रमाणें सरकारची तात्विक भूमिका विशद करून सर जरेमी रेस्मन ह्यांनीं तिला मूर्तस्वरूप देण्याची खटपट चालली असल्याचें आश्वासन दिलें. मालाची आयात करून त्याचा हिंदुस्थानांतील पुरवठा वाढवण्याचीहि खटपट सरकार करीत आहे, पण तिला यश येणें वहातुकीचीं जहाजें मिळण्यावर अवलंबून आहे. युद्ध व्यवस्थेबाबतचें धोरण मित्रराष्ट्रांचे मुत्सद्दी व लष्करी तज्ञ ठरवतात आणि त्यास अनुसरून हिंदुस्थान सरकारास वागावें लागतें. तरीहि ह्या देशांत धान्य व इतर माल बाहेरून मिळावा ह्याविषयीं सरकार कोशीस करील असें सर जरेमी म्हणाले.

---

## दौलतराव शिंदे—१८०४ ते १८०९

महादजी शिंदे १७९४ सालीं मरण पावले. त्यांनीं आपली मालमत्ता दौलतराव शिंदे ह्यांचे नांवें करून दिली. नाना फडनवीस ह्यांच्या मृत्यूनंतर (मार्च, १८००) यशवंतराव होळकरांनीं १८०२ सालीं पुण्यावर चाल करून शिंद्यांच्या व पेशव्यांच्या फौजेचा पराभव केला. पेशव्यांनीं इंग्रजांकडे संरक्षणाची याचना केली व त्यांच्याशी ३१ डिसेंबर, १८०२ रोजीं "वसईचा तह" केला. सर्व मराठा सरदारांना मराठ्यांचें राज्य इंग्रजांस शरण जावें, हें अत्यंत अपमानास्पद वाटलें. शिंद्यांचें पुण्यांतील वर्चस्व संपुष्टांत आलें व त्यांस इंग्रजांपुढें मान वाकविण्याची पाळी आली. त्यांनीं वऱ्हाडच्या राजाशी सूत जमवून ब्रिटिशास तोंड देण्याची तयारी चालविली. युरोपियन सेनानींच्या नेतृत्वाखाली त्यांचेजवळ मोठें व तयार लष्कर होतें परंतु त्याचा ब्रिटिश लष्करापुढें निभाव लागला नाहीं. शिंद्यांचें वर्चस्व कमी होऊं लागलें (सरजी अंजनगांवचा तह व बऱ्हाणपूरचा तह, १८०४) तेव्हांपासून १८०९ पर्यंतची शिंद्यांची हकीकत देणारें, पुणें रेसिडेन्सीच्या इंग्रजी रेकॉर्डमधील ११ वें पुस्तक मुंबई सरकारनें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. श्री. निगेद्र भूषण रॉय, एम. ए. ह्यांनीं त्याचें संपादन केलें आहे. पुस्तकाची किंमत १५ रुपये ठेवण्यांत आली आहे.

### माढा तालुका सुपरवायझिंग युनियन

श्री. के. आर. कुळकर्णी, असि. रजिस्ट्रार, सोलापूर भाग यांचे अध्यक्षतेसाठीं माढा तालुका सुपरवायझिंग युनियनमधील सोसायटींचे प्रतिनिधींची सभा भरून सोसायट्यांचे चालकांनीं सोसायटीच्यातर्फे बाजरी खरेदी करून सरकारास पुरविण्याबाबत चर्चा केली. माढें तालुक्याचे श्री. घोगळे मामलेदार हजर असून सभेचें उद्दिष्ट स्तुत्य असून, आपण त्यांशीं सहमत आहोंत व आपणासही त्यामुळें मदत होईल असें त्यांनीं सांगितलें. माढा ता. सु. युनियनचे चेअरमन श्री. जी. डी. साठे, व असि. रजिस्ट्रार यांनीं, सोसायट्यांनीं हें काम करणें किती जरूरीचें आहे व त्यामुळें देशांतील उपासमार कमी होणार आहे, व्यापाऱ्यांचे नफेबाजीला आळा बसणार असून, प्रांतिक रुरल डेव्हलपमेंट बोर्डानें मंजुरी दिलेले धोरणाप्रमाणें काम केलें असतां, शेतकरी व सरकार यांचे संबंध निकट येऊन मधले दलालांना वाव राहणार नाहीं; जरूरीपुरतें धान्य ठेवून, सरकारास धान्य विक्री करावी; याचा प्रचार गांवोगांवीं होणें जरूर आहे असें सांगितलें. सभेस युनियनमधील सोसायट्यांचे प्रतिनिधी, सर्व सेक्रेटरी, असि. रुरल डे. सुपरवायझर व इतर प्रमुख शेतकरी असे १००–२५० लोक हजर होते. सभेचे शेवटीं श्री. शाहूराव पाटील यांनीं अध्यक्ष आणि इतर जमलेल्या मंडळींचे आभार मानले.

---

### महाड को. अर्बन बँक लि.

वरील बँकेचें शेअर भांडवल २५,००० रुपये असून गंगाजळींत ४,५६२ रुपये व इतर फंडांत ३,३३९ रुपये आहेत. बँकेकडे १ लक्ष ७६ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेजवळ रोख व इतर बँकांत १ लक्ष, २० हजार रुपये असून तिनें सरकारी रोख्यांत ८२ हजार रुपये गुंतविले आहेत. कर्जें फक्त ८½ हजारांचीं आहेत. बँकेकडील ठेवी वाढत्या आहेत परंतु कर्जांचा व्यवहार मर्यादित दिसतो. बँकेची बरीच रक्कम अल्प व्याजानें व बिनव्याजी शिल्लक दिसते. वर्षअखेर नफा १३४ रुपये झाला. नफा वाटणीसाठी डि. ई. फंडातून ६५० रुपये घेऊन भागीदारांस ३% डिव्हिडंड देण्यांत आलें.

---

### साड्यांची भेट

हिंदुस्थानांतील ब्रिटिश व अमेरिकन सैनिक आपल्या प्रेयसींना नाताळाची भेट म्हणून साड्या पाठवूं लागले आहेत. त्या किंमतीनें बेतांत व नाविन्यपूर्ण असतात. गेल्या कांहीं आठवड्यांत अशा हजारों रेशमी साड्या खपल्या. कित्येक व्यापाऱ्यांनीं साडी नेसण्याची कृति छापून घेतली आहे, ती साडीबरोबर दिली जाते.

### पुरंदर ता. को. ऑ. सुपरवायझिंग युनिअन लिमिटेड

या संस्थेची वा. सा. सभा ता. २-११-४३ रोजीं सासवड येथें भरली होती. या संस्थेची सर्व साधारण परिस्थिति खालीलप्रमाणें आहे.

या युनियनला सामील सोसायट्या २६ असून ऑडिट वर्ग 'ब' आहे. एकूण खेळतें भांडवल रु. २,२७,४८३/– चें आहे. ३०।६।४२ रोजीं मेंबर येणें रु. १,७०,८०९, चे होतें. या वर्ष अखेरचे मुदतींत (म्हणजे ४२।४३ सालीं) मुद्दल वसूल रु. ५२२९४/– व व्याज वसूल रु. १९७५९/– इतका होऊन नवीन कर्जे रु. ३३९१०/– चीं दिलेलीं आहेत. ३०।६।४३ अखेरीस मेंबर येणें रु. १५२४२१/– रु. चें आहे. गुदस्तसालपेक्षा वसुली मुद्दलांत २२२७३/– व व्याजांत रु. ३८७४/– नें जास्त झालेली आहे. प्रामुख्यानें सोसायट्यांचे ताब्यांतील जमिनी विकण्याचे प्रयत्न झालेले असून, स्तब्ध सो. चे व्यवहारास चालना देऊन युनियनक्षेत्रांत स्तब्ध अशी एकही सोसायटी आतां नाहीं. बँककर्जही गुदस्तसालपेक्षा रु. २०३५५/– नें कमी झालें असून वर्षाअखेरीस बँककर्ज रुपये १,१२१७३/– चें आहे. २६ सो. पैकी २३ सो. ट्यांना ४२।४३ सालीं नफा झाला आहे.

---

### अमेरिकेंतील निर्वासित संपत्ति

रोख पैसे, सोनें, दागिने, किंमतवान वस्तु, इत्यादींचे स्वरूपांत अमेरिकेंत ५०० कोटि डॉलर्सच्या किंमतीचें द्रव्य १९३३ नंतर आतांपर्यंत येऊन दाखल झालें आहे. १९३३ साली हिटलर सत्ताधीश झाला, तेव्हांपासून अमेरिकेकडे सुरक्षितपणासाठीं गेलेल्या लोकांनीं नेलेल्या संपत्तीचा हा अंदाज आहे. १९३५ सालीं १४१ कोटि, १९३६ सालीं ११९ कोटि, १९३७ सालीं ८१ कोटि, १९३८ सालीं ४२ कोटि व १९३९ सालीं ११७ कोटि डॉलर किंमतीचें द्रव्य अमेरिकेकडे गेलें.

### पॅलेस्टाइनमध्यें आणखी ३१ हजार ज्यू जाणार

मे १९३९ मध्यें ब्रिटिश श्वेत पत्रिकेंत नमूद केल्याप्रमाणें मार्च १९४४ पूर्वी ७५ हजार ज्यू लोकांना पॅलेस्टाइनमध्यें प्रवेश मिळावयास पाहिजे होता, परंतु आतांपर्यंत फक्त ४३,९२२ ज्यू निर्वासितांस प्रवेश मिळाला आहे. आणखी ३१,०७८ ज्यू लोकांना प्रवेश मिळवून देण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. ३१ मार्च, १९४४ पूर्वी मामुली परिस्थितींत एवढे ज्यू पॅलेस्टाइनमध्यें गेलेच असते, तेव्हां ठराविक वेळ भरली म्हणूनच केवळ त्यांस ह्यापुढें बंदी करणें अयोग्य होईल, असें वसाहत मंत्र्यांनीं कॉमन्स सभेंत जाहीर केलें.


महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## १९४१ मधील हिंदी विमा व्यवसाय

१९४१ सालीं हिंदुस्थानांत उतरलेल्या विम्यावरून असें दिसतें कीं, हिंदी विमा कंपन्यांकडील पॉलिसीची सरासरी किंमत १,८०८ रुपये होती व विदेशी कंपन्यांकडील पॉलिसीची किंमत ४,७८१ रुपये होती.

* * *

हिंदी विमा कंपन्यांस १९३७ सालीं ४·७६% व्याज सुटलें, १९३८ सालीं व्याजाचा दर ५·१५% झाला व तेथून तो खाली जात जाऊन १९४१ सालीं ४·१७% वर आला.

* * *

हिंदी विमा कंपन्यांचा खर्च १९३७ सालीं हप्त्याच्या एकूण उत्पन्नाच्या ३२·२% झाला. १९४१ सालीं तो २७·४% झाला. हप्त्यांचें मोठें उत्पन्न असणाऱ्या सहा कंपन्या सोडल्या, तर खर्चाचें प्रमाण १९३७ सालीं ४२·४% होतें तें १९४१ सालीं ३४·३% वर उतरलेलें दिसतें.

* * *

आग, मरीन, अपघात, इत्यादींच्या १९४१ मधील एकूण कामाच्या हप्त्यांचें उत्पन्न ४ कोटि, १६ लक्ष रुपये भरलें. त्यापैकीं हिंदी कंपन्यांकडे फक्त १ कोटि, ५१ लक्ष रुपयांचे हप्ते जमा झाले.

* * *

आगीच्या विम्याचे हप्त्यांपैकीं ७८ लक्ष रुपयांचे हप्ते हिंदी कंपन्यांकडे आले व १ कोटि १५ लक्ष रुपयांचे हप्ते विदेशी कंपन्यांकडे गेले.

* * *

हिंदी कंपन्यांस आग मरीन, अपघात, इत्यादींचे विमे मिळतात, त्यापैकीं बराच भाग विदेशी कंपन्यांकडे रीइन्शुअर केलेला असतो.

* * *

हिंदी विमा कंपन्यांच्या ८४ कोटि, ३७ लक्ष रुपयांच्या जिंदगीपैकीं ४६ कोटि, १७ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत आहेत; ७ कोटि, २१ लक्ष रुपयांचे हिंदी कंपन्यांचे शेअर्स आहेत; ५ कोटि, ५२ लक्ष रुपये जमीन व इमारती ह्यांत गुंतलेले आहेत व ७ कोटि ६२ लक्ष रुपयांचीं विमा पॉलिसींवर कर्जे दिलेलीं आहेत. मालमत्तेवरील कर्जांत २ कोटि, ११ लक्ष रुपये गुंतलेले आहेत.

* * *

हिंदुस्थानांत काम करणाऱ्या ३६ अॅक्चुअरींपैकीं १३ अॅक्चुअरी इन्स्टिट्यूट ऑफ अॅक्चुअरीजचे अथवा फॅक्टरी ऑफ अॅक्चुअरीजचे फेलो आहेत. बाकीचे २२ अॅक्चुअरी असोसिएट आहेत.

* * *

### युद्ध फंडांस संस्थानांच्या देणग्या

वेगवेगळ्या युद्धफंडांस हिंदी संस्थानिकांनीं देणग्या दिल्या आहेत, त्यांत हैद्राबादचा अनुक्रम पहिला येतो. त्यानें १ कोटि ७ लक्ष रुपये दिले आहे. त्याचे खालोखाल म्हैसूर ( २७ लक्ष ), ग्वालेर ( १८ लक्ष ), त्रावणकोर ( १९ लक्ष ), जोधपूर ( १६ लक्ष ), बडोदें ( ८ लक्ष ) हीं संस्थानें येतात.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

साखरआंबा, मोरआवळा—सफरचंदाचा
गाजराचा, आवळ्याचा, बेलफळाचा, महाळुंगाचा, आल्याचा, हिरड्याचा वगैरे.
भाजणी—थालीपीठ, चकलीकरितां.
द. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें.

दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२०,५०,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही असेर व्याजाची किमान रकम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—एच्. ए. करीमभाई



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

---

# विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुपक्षाकडून हवाई हल्ला अगर तज्जन्य उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

---

# संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

# दि औंध म्युच्युअल

## लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आतांच लिहाः—

मुंबईचे चीफ एजन्टस्
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बँक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
'रामनिवास' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

---

# ॥ दत्त कंपनी ॥

७२५ शुक्रवार पेठ, पुणें २. ठाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

---

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००.

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

---

# देशाच्या औद्योगीकरणार्थ

जागतिक व नव्या नव्या धनोत्पादक तीस हजार धंद्यांच्या प्रायोगिक माहितीची मराठी, हिंदी व गुजराथी भाषेंतील लहानमोठीं शेंकडों पुस्तकें प्रकाशित करण्याकरितां त्या त्या भाषेंतील धनिक ग्रंथ-प्रकाशक व मुद्रक पाहिजेत. भेटा अगर लिहा.

घरबसल्या दीड हजार धंदे सप्रयोग शिकविणारी डिरेक्टरी सात आण्याचीं तिकिटें पाठवून अवश्य मागवा. व गांवोगांवीं धंदे उभारा.

औद्योगिक ज्ञानप्रसारक मंडळ

७७९ सदाशिव पेठ, पुणें २


---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434


जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.


# अर्थ


वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास दोन आणे.


'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र


संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख २४ नोव्हेंबर, १९४३ अंक ४६



## हातपाय चालतात तोंवर

म्हातारपणची तरतूद करणें अवश्य आहे. चांगल्या कंपनींत उतरलेला विमा ह्या ऐन वेळीं उपयोगी पडतो. या संबंधांत आपणांस कसलीहि माहिती पाहिजे असल्यास आम्हांकडे विचारा. आम्ही सर्व खुलासा करून योग्य मार्ग दाखवूं.

मॅनेजर,
वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.
सातारा शहर.

पुणें शाखा—१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.

खारे काजू, मसालेदार काजू

सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काळा खजूर, अंजीर वगैरे मिळतील.

द. ना. हेजीब
(२) १० शुक्रवार, पुणें.

दत्त कंपनी

७३९ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

देशाच्या औद्योगीकरणार्थ

जागतिक व नव्या नव्या धनोत्पादक तीस हजार धंद्यांच्या प्रायोगिक माहितीची मराठी, हिंदी व गुजराथी भाषेंतील लहानमोठीं शेंकडों पुस्तकें प्रकाशित करण्याकरितां त्या त्या भाषेंतील धनिक ग्रंथ-प्रकाशक व मुद्रक पाहिजेत. भेटा अगर लिहा.

घरबसल्या दीड हजार धंदे सप्रयोग शिकविणारी डिरेक्टरी सात आण्याचीं तिकिटें पाठवून अवश्य मागवा. व गांवोगांवीं धंदे उभारा.

औद्योगिक ज्ञानप्रसारक मंडळ
७७९ सदाशिव पेठ, पुणें २

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### जयस्तंभाचे नकाशास ५०० रुपये बक्षीस

उज्जैन येथें विक्रम द्विसहस्र सांवत्सरिक उत्सवाचे निमित्त एक जयस्तंभ उभारण्यांत यावयाचा आहे, त्यासाठी आर्किटेक्टां-कडून स्तंभाच्या रचनेचे नकाशे मागविण्यांत आले आहेत. सर्वो-त्कृष्ट नकाशास ५०० रुपये बक्षीस मिळेल. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टसनें नेमलेले मि. क्लॉड बॅटले व उत्सव समितीनें नेमलेले मि. पिअर्स हे निवाड्याचें काम करतील. त्यांच्यांत मतभेद झाल्यास इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष श्री. एस. एच. पार्लेकर हे लवादाचें काम करतील.

### निर्गत व्यापार वाढविण्याची पराकाष्टा

चालू युद्धाचा खर्च भागविण्यासाठी ग्रेट ब्रिटननें आतांपर्यंत १० अब्ज डॉलर्सचें आपलें परराष्ट्रांतील येणें व सोनें विकून टाकलें आहे. ग्रेट ब्रिटनच्या कित्येक मालवाहू आगबोटींचा नाश झाला आहे व अमेरिकेच्या आगबोटी वाढल्या आहेत. ग्रेट ब्रिटन-च्या परराष्ट्रांतील कर्जांत भर पडत आहे, त्यामुळें युद्धानंतर ग्रेट ब्रिटनची परिस्थिति आणखी बिकट होईल. त्यांतून मार्ग काढ-ण्यासाठी त्या देशाला निर्गत व्यापार वाढविण्याची पराकाष्टा करावी लागेल. युद्धोत्तर परराष्ट्रीय व्यापारासंबंधीं आतांपासूनच तेथें इतकी चर्चा चालू आहे, त्याचें हें इंगित आहे, असें न्यूयॉर्क जर्नल ऑफ कॉमर्सचें म्हणणें आहे.

### मुंबई शहरांत कुत्र्यांवर कर

मुंबई शहरांतील सहा महिन्यांपेक्षा मोठ्या कुत्र्यांवर वार्षिक ५ रुपये कर बसविण्यांत येणार आहे. परवाना नसलेले कुत्रे पकडण्यांत येतील, ते तीन दिवसांचे आंत मालकांनीं न नेल्यास मारून टाकण्यांत येतील. ह्या योजनेचा वार्षिक खर्च २९,२५० रुपये येईल

### आजचा जपान

जपानच्या सत्तेखालीं सध्यां ३१½ लक्ष चौरस मैल प्रदेश व ३० कोटि लोक आहेत. जपानमध्यें टोकिओचे दक्षिणेकडील व पश्चिमेकडील ४०० मैलांच्या टापूंत त्याचे महत्त्वाचे कारखाने केंद्रीभूत आहेत; परंतु ते तेथून हलवून अलग अलग करण्यांत येत आहेत. कारखान्यांचा बॉंब टाकून नाश करणें अवघड जावें, हा त्याचा हेतु आहे.

### निराश्रितांना कपडे वाटण्यासाठी ६० लक्ष रुपये

बंगाल सरकार निराश्रितांना कपडे वाटण्यासाठी ६० लक्ष रुपये खर्च करणार आहे. त्यांपैकीं ४० लक्ष रुपये प्रांतिक तिजो-रींतून खर्च होतील.

### कपाशीचा गिरण्यांत उठाव

हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्यांत ऑगस्ट, १९४३ मध्यें ३,७३,५३५ हिंदी कपाशीच्या गांठी खपल्या. १९४२ च्या ऑगस्टमध्यें ३,०१,०११ गांठींचा उठाव झाला होता. ऑगस्ट १९४३ अखेरच्या बारा महिन्यांतील उठावाचा आंकडा ४२,८०,३१७ गांठी आहे. त्यापूर्वीच्या बारा महिन्यांतील उठा-वापेक्षा हा आंकडा २,५५,४२२ गांठींनीं मोठा आहे.

### ललितकलाकुंज लि., पुणें

वरील नांवाची २० हजार रुपये भांडवलाची खासगी लिमिटेड कंपनी श्री. रा. न. अभ्यंकर ह्यांनीं नोंदविली आहे.

### औषधाच्या किंमतींवर नियंत्रण

कांहीं महत्त्वाच्या औषधांचे बाजारभाव नियंत्रित करणारा हुकूम हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. आयात होणारीं औषधें त्यांत समाविष्ट आहेत; देशी औषधांस हुकूम लागू नाहीं. ठरवि-लेल्या किंमतीपेक्षा ज्यास्त किंमतीस विकणें गुन्हा आहे. युद्धा-पूर्वीच्या किंमतीच्या मानानें नियंत्रित किंमती ३३% ज्यास्त आहेत.

### मद्रास सहकारी कायद्यांत दुरुस्ती

ओरिसा प्रांतांत नोंदण्यांत आलेल्या सहकारी सोसायट्यांना त्यांचें मद्रास प्रांतांतील लोकांकडील येणें वसूल करण्याचा अधि-कार देणारी दुरुस्ती मद्रास सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत नुकतीच करण्यांत आली आहे. मद्रासमधून ओरिसाकडे वर्ग करण्यांत आलेल्या विभागांतील सोसायट्यांचे सभासद मद्रास प्रांतांत आहेत, त्यांचेकडील येण्याच्या वसुलीसंबंधीं तरतूद मद्रा-सच्या कायद्यांत नव्हती, ती आतां करण्यांत आली आहे.

### म्हैसूर संस्थानांतील सहकारी प्रगति

म्हैसूर संस्थानांत २,०९० सहकारी पतपेढ्या असून त्यांचें भाग भांडवल ५५ लक्ष रुपये आहे. त्यांचें एकूण खेळतें भांडवल २ कोटि, ८० लक्ष रुपये आहे. सोसायट्यांकडील ठेवींची रकम १ कोटि ४० लक्ष रुपये आहे. गेल्या वर्षी त्यांना ४½ लक्ष रुपये नफा झाला. म्हैसूरमध्यें ६६ लँड मॉर्गेज सोसायट्या आहेत. लँड मॉर्गेज बँकेनें आतांपर्यंत २२ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. ३१३ सोसायट्यांनीं धान्यपुरवठ्याचें काम सुरू केलें आहे. मार्केटिंग सोसायट्यांची संख्या ३० झाली आहे.

### तीन प्रमुख रेल्वेज सरकारकडे जाणार

हिंदुस्थानांत आतां फक्त तीन रेल्वेजची व्यवस्था कंपन्यांकडे आहे; त्या तीनहि सरकारनें विकत घेण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. येत्या रेल्वे बजेटाचेवेळीं त्यासंबंधीं निर्णय जाहीर होईल, अशी अपेक्षा आहे. बंगाल-नागपूर रेल्वे, साउथ इंडियन रेल्वे व सदर्न मराठा रेल्वे ह्या लवकरच सरकारच्या मालकीच्या होणार, असा त्याचा अर्थ आहे. ईस्ट इंडिया रेल्वे व ग्रेट इंडियन पेनिन-सुला रेल्वे ह्यांच्याशीं सरकारचे झालेले करार संपण्याची वेळ १९२४ व १९२५ मध्यें आली, त्यावेळीं मध्यवर्ती असेंब्लीनें करार संपल्यावर रेल्वेजची व्यवस्था सरकारनें स्वतःकडे घ्यावी, असा ठराव केला व त्यानंतर बहुतेक सर्व रेल्वे फाटे त्यांचे भाडे-पट्टे संपले त्याप्रमाणें सरकारकडे आले. वरील तीन कंपन्यांपैकीं बंगाल नागपूर रेल्वेची स्थापना १८८७ सालीं झाली, साउथ इंडियन रेल्वे १८९१ मध्यें अस्तित्वांत आली. सदर्न मराठा रेल्वे सर्वांत जुनी असून १८५३ सालीं स्थापन झालेली आहे.

### हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न-खर्च

१९४३-४४ च्या पहिल्या सहा महिन्यांत हिंदुस्थान सर-कारनें आपल्या उत्पन्नापेक्षा ५८ कोटि रुपये ज्यास्त खर्च केला आहे. लष्करी खर्च १०४ कोटि रुपये झाला.

### नव्या चलनी नोटा

रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर, श्री. देशमुख, ह्यांच्या सहीच्या चलनी नोटा लवकरच प्रसृत होतील. अर्थात्, पूर्वीच्या नोटा चालू रहातीलच.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... ३६२ |
| २ सहकारी चळवळीचें सिंहावलोकन | ... ३६३ |
| ३ ट्रेझरी बिलांची विक्री | ... ३६४ |
| ४ औद्योगिक संशोधनाचें महत्त्व | ... ३६४ |
| ५ स्फुट विचार | ... ३६५ |
| अन्नपुरवठ्याची असेंब्लींत चर्चा—ब्रिटिश शेतीच्या सुधारणेची योजना—मद्रास प्रांतांतील दारूबंदी उठली—शेतीकर्जे आणि मालविक्री—इं. को. रिव्ह्यू. | |
| ६ खानापूर तालुक्यांतील सहकारी चळवळ | ... ३६६ |
| ७ पुणें सें. बँकेचा सहकार सप्ताह | ... ३६७ |
| ८ सहकारी दिन | ... ३६८ |

## अर्थ

बुधवार, ता. २४ नोव्हेंबर, १९४३

## सहकारी चळवळीचें सिंहावलोकन

### शेतीशी संलग्न असलेल्या संस्था

युद्धपरिस्थितीचे परिणाम ह्या देशांतील सर्व आर्थिक व्यवहारांत कमी-अधिक ठळकपणानें होत आहेत. धान्यादिक खाद्य पदार्थांची टंचाई व विषम वाटणी, नित्य उपयोगाच्या वस्तूंच्या बाजारभावांत चढ, इत्यादि परिणामांचा प्रभाव जनतेच्या रहाणीवर होत असलेला दिसत आहे. शेतकरी वर्ग ह्या घडामोडींपासून अलिप्त रहाणें शक्य नाहीं आणि म्हणून त्यांच्या संघर्षणांत शेतीशीं संलग्न असलेल्या सहकारी संस्थांच्या स्थितीची कल्पना देणें आवश्यक आहे. गेल्या वर्षाची म्हणजे १९४२–४३ साळची त्या संस्थांची माहिती उपलब्ध असती तर ती अधिक उपयुक्त झाली असती. पण ही माहिती संकलित व अधिकृत स्वरूपांत अजून प्रसिद्ध झालेली नाहीं आणि सरकारच्या विद्यमानें १९४१–४२ सालाबाबतचें सहकारी संस्थांचें त्रोटक इतिवृत्त नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे त्यावरच आज समाधान मानून घेणें प्राप्त आहे. शेतीच्या मालास अलीकडे बरे भाव आल्यानें शेतकऱ्यांची स्थिति थोडीशी अनुकूल झाली आहे. तथापि त्यांस जरूर असलेलें कापड, राकेल, लोखंड, खत, बैल इत्यादि जिनसांच्या किंमतींत भरमसाट वाढ झाल्यानें ही अनुकूलता मर्यादित होणें स्वाभाविक आहे. ह्या संबंधांत शेतीच्या हंगामाची स्थितिहि लक्षांत घेणें आवश्यक असतें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. १९४१–४२ सालचा विचार करतां असें दिसून येतें कीं त्या वर्षाचीं पिकें त्यापूर्वीच्या सालाच्या मानानें कमी समाधानकारक होतीं. तथापि, चढलेल्या बाजारभावामुळें शेतकऱ्यांच्या हातीं चार अधिक पैसे येऊन त्यांचें कर्जफेडीचें सामर्थ्य थोडेंबहुत वाढणें अपेक्षित आहे आणि ही अपेक्षा सहकारी अहवालांत दिलेल्या आकड्यांवरून निराधार नाहीं असें दिसून येतें.

चालवतां येणें शक्य नाहीं अशा शेती पतपेढ्या बंद करून नवीन पेढ्या सावधगिरीनें काढावयाच्या, हें दुहेरी धोरण सहकारी खात्यानें वृत्तांताच्या वर्षी चालू ठेवलें होतें. त्यास अनुसरून २२ मंडळ्या बंद करण्यांत आल्या व ७० नवीन नोंदल्या गेल्या. ह्या संस्थांची एकूण संख्या ३८२५ इतकी झाली. त्यांचें एकूण भांडवल २६४ लक्ष रुपये होतें आणि पूर्वीच्या वर्षाचे मानानें तें ५½ लक्ष रुपयांनीं कमी होतें. ही घट होण्याचें मुख्य कारण लिक्विडेशनमध्यें निघालेल्या सोसायट्यांचें भांडवल वजा झालें हें होय. तरीहि ह्या संस्थांची स्थिति समाधानकारक होती असें म्हटलें पाहिजे. याचें एक गमक म्हणजे १ लक्ष, २० हजार रुपये पर्यंतचीं वसूल न होण्यासारखीं कर्जें रिझर्व्ह फंड खातीं खर्ची टाकलीं गेलीं तरी ह्या आणि इतर फंडांत २½ लक्ष रुपयांची वाढ झाली, हें आहे. शेतीसंलग्न संस्था अधिकाधिक स्वावलंबी होऊं लागल्या आहेत ह्याचें दुसरें चिन्ह त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या भांडवलांत होत असलेली वाढ हें होय. हें मालकी भांडवल सोसायट्यांनीं घेतलेलीं कर्जें व ठेवी इत्यादींच्या एकूण रकमेपेक्षां १३½ लक्ष रुपयांनीं वाढलें असून तें एकूण खेळत्या भांडवलाच्या ५२ टक्क्यांइतकें आहे. म्हणजे शेती सोसायट्या आपले व्यवहार निम्में भांडवल स्वतःचें घालून व निम्में बाहेरून घेऊन चालवतात असें झालें.

सोसायट्यांच्या सभासदांकडे कर्जाच्या थकबाकया वाढल्या असल्याचा बोभाटा आज कित्येक वर्षें चालला आहे. शेतीच्या मालाच्या किंमती चढल्या असतां ह्या चढीचा परिणाम अधिक प्रमाणांत कर्जफेड होण्यांत झाला पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां १९४१–४२ सालांत प्रगति झाल्याचें दृष्टीस पडतें. ह्या संबंधांत सरकारी अहवाल म्हणतो:—" प्रांतांतील एकंदर वसुल्या लगत पूर्वीच्या वर्षांतील वसुल्यांपेक्षा जवळ जवळ ११½ लक्ष रुपयांनीं वाढल्या. येणें झालेल्या रकमांशीं वसूल झालेल्या रकमांचें शेकडा प्रमाण ३९·८ आहे, तर तेंच मागील साली ३२·२ इतकें होतें. वर्षाअखेरीस एकूण थकबाकी सुमारें १४½ लक्ष रुपयांनीं कमी होऊन तिची रक्कम १,२६,५४,९६४ रुपये होती ती रुपये १,१२,१०,०३९ इतकी कमी झाली. थकबाक्यांचें एकूण कर्जांशीं शेकडा प्रमाण ५२ पडलें, तर तेंच लगत पूर्वीच्या वर्षी ५७ होतें. येणें झालेल्या रकमांशीं तिचें प्रमाण ५४·२ इतकें पडलें तर तेंच लगत पूर्वीच्या सालीं ५९·१ इतकें होतें. यावरून असें दिसतें कीं, पतीवर कर्जें देण्याच्या शेतकऱ्यांच्या चळवळीशीं जिव्हाळयाचा संबंध असलेल्या या एका भागांत स्पष्ट व महत्त्वाची सुधारणा झाली व तिची व्याप्ति मागील पांच वर्षांपैकीं कोणत्याहि एका वर्षांतील सुधारणेपेक्षां अधिक आहे."

वरील उताऱ्यांत निर्दिष्ट केलेली सांपत्तिक प्रगति स्वागतार्ह आहे, पण ती विशेष ठळक आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. १९४२-४३ सालचे आकडे प्रसिद्ध झाले असतां परिस्थिति गेल्या वर्षी अधिक समाधानकारक झाली होती असें दिसेल अशी अपेक्षा आहे. अहवालाचे सालीं मल्टिपर्पज सोसायट्यांची संख्या ३ नीं वाढून ७३ झाली आणि त्यांच्या व्यवहारांत सर्वांगिण प्रगति घडून आली. ह्या संस्थांनीं शेतीच्या व घरगुती उपयोगासाठी लागणाऱ्या १ लक्ष, २१ हजार रुपये किंमतीच्या वस्तु पुरवल्या आणि ३ लक्ष, ९६ हजार रुपये किंमतीचा शेतीचा माल विकला. त्यांस वर्षाचे काठीं ९,४८० रुपये कमिशनची प्राप्ति झाली. ह्या सर्वच संस्था चांगल्या स्थितींत आहेत असें म्हणतां येत नाहीं. तथापि, स्थानिक परिस्थितीस व अडचणींस त्या तोंड देत आहेत. केवळ कर्जें देण्याचा व्यवहार करणाऱ्या पतपेढ्यांचें क्षेत्र आकुंचित असून सहकारी संस्थांनीं आपल्या सभासदांच्या

एकूण जीविताचा पगमर्द घेतल्यावांचून शेतकऱ्यांचा धंदा व त्यांची रहाणी सुधारणार नाहीं ह्या कल्पनेनें मल्टिपर्पज सोसायट्यांची स्थापना करण्यांत आली आहे. या दृष्टीनें त्यांच्या प्रगतीकडे आशामूलक भावनेनें लोकांनीं पहाणें स्वाभाविक आहे. शेतीविषयक नॉनक्रेडिट संस्थांची प्रगति चांगली होत आहे. त्यांची संख्या ३४ नीं वाढून १९४१-४२ मध्यें ४१३ झाली. त्यांनीं केलेल्या एकूण विक्रीची रक्कम ११४ लक्ष रुपयांची १३० लक्ष रुपयांपर्यंत वर गेली. ह्या संस्थांमध्यें कपास विक्रीच्या सोसायट्यांस महत्त्वाचें स्थान आहे आणि त्यांची संख्या ४५ होती. त्यांनीं ७३ लक्ष, ६९ हजार रुपये किंमतीच्या कापसाची विक्री केली. पूर्व खानदेश जिल्ह्यांत जरीला जातीच्या कापसाच्या बियाण्याची वाढ आणि तयार होणाऱ्या कापसाची सहकारी मंडळ्यांमार्फत विक्रीची व्यवस्था ह्या गोष्टी प्रस्तुत बाबतींत लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. ह्या योजनेंत सुरत नमुन्याच्या १६ विक्रीच्या संस्थांच्या स्थापनेचा समावेश होतो.

## हैद्राबादेंत ट्रेझरी बिलांची विक्री

हैद्राबाद संस्थानांत ट्रेझरी बिलांची पद्धत सुरू होणार आहे, हें प्रसिद्ध झालेंच आहे. ह्या पद्धतीमुळें सरकारला जवळ रोख रक्कम मोठ्या प्रमाणांत बाळगण्याचें कारण उरत नाहीं व त्याला जरूर ते पैसे अल्प व्याजानें तात्पुरते मिळूं शकतात. निजाम सरकार, हिंदुस्थान सरकारप्रमाणेंच, ट्रेझरी बिलांसाठी टेंडरें मागवील. हैद्राबाद स्टेट बँकेंत एक बंद पेटी ठेवण्यांत येईल, त्याची किल्ली बँकेच्या विशिष्ट अधिकाऱ्याजवळ राहील. ठराविक वेळेला पेटी उघडली जाईल. टेंडरच्या अर्जांत अर्जदारानें ट्रेझरी बिलाची मुदत, हव्या असलेल्या बिलांची रक्कम व अर्जदार देण्यास तयार असलेली किंमत, हीं नमूद करावयाचीं असतात. प्रत्येक १०० रुपयांच्या ट्रेझरी बिलास अर्जदार किती रुपये, आणे, पै देणार हें त्यानें स्पष्ट केलें पाहिजे. टेंडरें तपासून त्यांची रक्कम संख्या व देऊं केलेली किंमत ह्यांचा तपशील बँक सरकारच्या फडनविशी खात्याकडे पाठवील. टेंडरें स्वीकारल्यावर त्यांचा निकाल यशस्वी अर्जदारांस कळविण्यांत येईल. इतर अर्जदारांसहि तो पाठविण्यांत येईल. एकाद्या अर्जदारानें ठराविक दिवशीं त्यानें मागितलेलीं ट्रेझरी बिलें घेतलीं नाहींत, तर फडनविशी खातें त्याच्या वरील दराचीं टेंडरें स्वीकारून, मूळ अर्जदाराकडून दोहोंमधील फरक वसूल करील.

## सहकारी शिक्षणाचा वर्ग

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे भरविण्यांत आलेला सहकारी शिक्षणाचा वर्ग १५ नोव्हेंबर रोजीं सुरू झाला. प्रारंभीं दि. ब. काजी ह्यांचें " राष्ट्रीय आर्थिक संसारांत सहकाराचें स्थान " ह्या विषयावर व्याख्यान झालें. ६ डिसेंबर रोजीं इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष सर जनार्दन मदन हे वर्गाचा समारोप करतील. श्री. वैकुंठराय मेहता, श्री. आर. एन. त्रिवेदी, श्री. आर. जी. सरय्या, श्री. एल. के. भागवत, श्री. के. एम. ठाकोर, श्री. एन. पी. भागवत, श्री. ए. आर. कुलकर्णी, श्री. एन. व्ही. नायक, दि. ब. गांधी, डॉ. एम. जी. भगत, श्री. एन. डी. वैद्य, श्री. के. सी. देसाई, रा. ब. दिवाणजी, श्री. आर. एम. तळपदे, प्रो. वा. गो. काळे, रा. ब. कवि इत्यादि सहकारी चळवळींतील तज्ञांचीं भाषणें वर्गामध्यें चालू आहेत.

## औद्योगिक संशोधनाचें महत्त्व

ग्रेटब्रिटनला युद्धोत्तर काळांत आपल्या नागरिकांचें रहाणीचें उच्च मान टिकवावयाचें असेल, तर त्याला आपली निर्गत पुष्कळच वाढवावी लागेल, हें आतां अगदीं स्पष्ट आहे. त्याचा अर्थ, ब्रिटिश कारखाने ज्यास्त कार्यक्षम झाले पाहिजेत व त्यांनीं नवे नवे जिन्नस तयार करून परदेशीं धाडले पाहिजेत. १९ व्या शतकांतील प्रगतीइतकी आतां प्रगति सोपी रहाणार नाहीं व औद्योगिक संशोधनाची शिकस्त करून उत्पादनास शास्त्रीय जोड दिल्याविना भागणार नाहीं, असा इशारा सर हॅरॉल्ड हार्टले ह्यांनीं आपल्या ताज्या पुस्तकांत दिला आहे. संशोधनामुळें औद्योगिक उत्पादनांत एकसारखें चैतन्य येत रहातें, परंतु जर्मनी व अमेरिका ह्यांचे मानानें ग्रेटब्रिटन संशोधनाकडे पुरेसें लक्ष देत नाहीं, अशी त्यांची तक्रार आहे. विश्वविद्यालयांतील संशोधनांत अत्यंत उपयुक्त असा शोध अवचित लागून जातो. लँगमूरनें गॅसनें भरलेल्या विजेच्या दिव्याचा शोध लावला, त्यामुळें एकट्या ग्रेटब्रिटनमधील दिव्यांच्या वार्षिक खर्चांत ५ कोटि पौंडांची बचत होते. लेड एथिलमुळें पेट्रोलच्या एंजनाची कार्यक्षमता वाढून त्यामुळें दरसाल २ अब्ज गॅलन पेट्रोल कमी लागतें. रबराच्या व्हल्कलायझेशनसाठीं द्रव्यें ( ॲक्सिलरेटर्स ) वापरल्यामुळें सांच्यावर कराव्या लागणाऱ्या भांडवली खर्चांत १½ कोटि पौंडांची बचत होते. मोटारीच्या टायरींसंबंधीं संशोधनामुळें, त्या पूर्वी ३ हजार मैल जात असत, त्याऐवजीं २० हजार मैल जाऊं लागल्या आहेत. ह्या सर्व बचतीचा फायदा वरील सुधारणा घडवून आणणारे कारखाने व उद्योगधंदे ह्यांस मिळत आहे. औद्योगिक संशोधनाचेंच हें फळ आहे. त्यावर केलेला खर्च हा पुढील अडचणींतून बाहेर पडण्यासाठीं एक प्रकारें उतरलेल्या विम्याचा हप्ताच समजला पाहिजे. १९४० सालीं अमेरिकेंत २,२०० प्रयोगशाळांतून ७० हजार शास्त्रज्ञ संशोधन करीत होते व त्यावर ६० कोटि पौंड खर्च झाला. ग्रेट ब्रिटनमधील तत्सम खर्चाच्या दसपट ही रकम आहे. अमेरिका व जर्मनी ह्यांची गोष्ट बाजूस ठेवली, तरी ग्रेटब्रिटनसुद्धा हिंदुस्थानच्या मानानें संशोधनाचे क्षेत्रांत कुठल्या कुठें पुढें गेला आहे, हे लक्षांत ठेवलें पाहिजे. विश्वविद्यालयांचें उत्पन्न वाढलें पाहिजे, कारखानदारांना व सरकारला संशोधनाचें महत्त्व पटलें पाहिजे व त्यावर मोठा खर्च करण्याची त्यांची तयारी झाली पाहिजे. सोपे शोध पूर्वीच लागून गेले असल्यामुळें ह्यापुढील संशोधन ज्यास्त मेहनतीचें, खर्चाचें व चिकाटीचें आहे, हें उघड आहे.

## कपाशीच्या सहकारी जिनिंग फॅक्टरीचा उद्घाटन समारंभ

सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि. च्या कपाशीच्या सहकारी जिनिंग फॅक्टरीचा उद्घाटन समारंभ बुधवार ता. २४-११-४३ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां सुमुहूर्तावर फॅक्टरीच्या जागेमध्यें मि. एस. एम. इक्रम, आय. सी. एस., रजिस्ट्रार, को. सो. मुंबईप्रांत, पुणें, यांच्या अध्यक्षतेखालीं होणार आहे.

## हिंदी आर्थिक परिषद

हिंदी आर्थिक परिषदेचें येतें अधिवेशन मद्रास येथें डॉ. बी. व्ही. नारायणस्वामी नायडू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मद्रास विश्वविद्यालयातर्फे ३० आणि ३१ डिसेंबर व १ जानेवारी रोजीं भरणार आहे.

# स्फुट विचार

### अन्नपुरवठ्याची असेंब्लींत चर्चा

बंगालमधील दुःखद दुष्काळी परिस्थितीच्या कारणांसंबंधानें एवढे तीव्र मतभेद व्यक्त झाले आहेत आणि दोषारोप करण्यांत आले आहेत कीं, मध्यवर्ति असेंब्लीच्या अधिवेशनांत त्या प्रश्नावर सडाजंगी होणें अपेक्षितच होतें. अन्नपुरवठ्याच्या चर्चेस सरकारनें खास संधि देऊन सभासदांच्या मनांतील मळमळीस बाहेर पडण्यास वाट करून दिली. ह्या चर्चेत सर्व पक्षांच्या व गटांच्या पन्नासाचे वर सभासदांनीं भाग घेतला आणि बिन सरकारी बाजूकडून कडक टीकेची सरबत्ती सरकारावर झाली. मध्यवर्ति सरकारनें वेळींच सावध राहून बंगालच्या दुष्काळाचा प्रश्न समाधानकारक रीतीनें हाताळावयास हवा होता आणि त्याच्या हलगर्जीपणाची व इतर कारणांची प्रकट चौकशी तावडतोब झाली पाहिजे असें बहुसंख्य सभासदांचें म्हणणें होतें. तथापि, अशा चौकशीच्या स्वरूपाविषयीं असेंब्लीचें एकमत झालें नाहीं आणि त्या बाबतींतल्या सर्व सूचना अमान्य झाल्या. असेंब्लीमधील चर्चेनें अन्नपुरवठ्याच्या प्रश्नावर सर्व अंगांनीं झगझगीत प्रकाश मात्र पाडला आणि तींमधून पुढील धोरणाची स्वच्छ आखणी बाहेर आली हा एक सुपरिणामच समजला पाहिजे. आलेल्या कटु अनुभवानें शहाणे होऊन सर्व देशभर धान्याची योग्य वांटणी कशी करणें आवश्यक आहे यासंबंधानें सर जगदीश प्रसाद श्रीवास्तव, सर ए. रामस्वामी मुदालियार इत्यादि सरकारतर्फेच्या वक्त्यांनीं योजना पुढें मांडल्या त्यांकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. धान्य हिंदुस्थानाबाहेर जाणार नाहीं आणि त्याची शक्य तेवढी आयात केली जाईल; धान्याचे बाजारभाव नियंत्रित होतील आणि रेशनिंगचा शक्य तितका विस्तार केला जाईल. या दोन बाबींस पंजाब व सिंध ह्या फाजील धान्यपुरवठ्याच्या प्रांतांचा विरोध होता. त्यांस सर ए. रामस्वामी ह्यांनीं ठसठशीत उत्तर दिलें. स्वतःस नको असलेलें धान्य इतरांस पुरवण्यांत हे प्रांत कोणताहि उपकार करीत नाहींत आणि त्यांनीं सर्वांबरोबर स्वार्थत्याग केलाच पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. धान्याच्या किंमतीचें नियंत्रण होईल तें शेतकऱ्यांचे हितसंबंध संभाळूनच केलें जाईल असें आश्वासन सरकारतर्फे देण्यांत आलें, तें महत्त्वाचें आहे. रॅशनिंग व भावनियंत्रण मुंबई प्रांतांत अगदी वेळीं चालू करण्यांत आलें ह्याबद्दल त्याचें अभिनंदन करण्यांत आलें ही समाधानाची गोष्ट आहे. इतर राष्ट्रीय महत्त्वाच्या बाबींप्रमाणें अन्नपुरवठ्याचे संबंधांत हिंदुस्थानाचा एक ऐनजिन्सी लोकांचा गट ह्या नात्यानें विचार होण्याचें अगत्य बंगालमधील दुष्काळी परिस्थितीनें स्पष्टपणानें निदर्शनास आणलें आहे.

### ब्रिटिश शेतीच्या सुधारणेची योजना

अन्नाचा, विशेषतः धान्यांचा पुरवठा वाढवून युद्धोत्तर काळांत उत्पन्न होणाऱ्या परिस्थितींत त्यांची वाटणी सर्व जगभर गरजेस अनुसरून कशी करावी ह्याचा विचार आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दृष्टींनीं इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत चालला आहे. इंग्लंडमध्यें कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरच्या स्थायी समितीनें ह्या प्रश्नाची चर्चा करून तींमधून निघणारे निर्णय नमूद केले आहेत. त्यांचा उद्देश इंग्लिश शेतीची सुधारणा करून तिचें उत्पादन सामर्थ्य वाढवणें हा आहे आणि त्यांचा अपेक्षित परिणाम जनतेच्या रहाणीचा दर्जा उच्च करणें हा आहे. इंग्लंडच्या औद्योगिक व आर्थिक घटनेंत शेतीस योग्य स्थान देऊन शेतकरी व इतर जनता ह्यांस समाधानकारक वाटेल अशा रीतीनें पुनर्रचना घडवून आणणें हा आपल्या चर्चेचा हेतु असल्याचें सांगून वरील समितीनें खालील उद्दिष्टें नमूद केलीं आहेत:—(१) शेतांची उत्पादकता वाढवणें आणि जमिनीचा कस अबाधित राखणें, (२) ब्रिटिश जनतेच्या आरोग्यास आवश्यक असलेलीं पिकें पिकवण्यास उत्तेजन देणें, (३) खेडेगांवी लोकांची रहाणी सुधारणें आणि (४) ह्या लोकांचा धंदा आकर्षक करून त्यांची संख्या वाढवणें. शेतकऱ्यांस आपल्या मालाच्या योग्य किंमती मिळण्यावर समितीचा कटाक्ष आहे. जकातीचें संरक्षण आणि आयातीस मर्यादा हे उपाय इंग्लिश शेतीस उपकारक होणार नाहींत असें तिचें मत असल्यानें इंग्लिश शेतकऱ्यांस त्यांच्या मालाचा योग्य भाव मिळण्याचे दुसरे उपाय तिनें सुचवले आहेत. हा उद्देश सफल होण्यास ब्रिटिश सरकारास द्रव्यसहाय द्यावें लागणार असून जनतेनेंहि स्वार्थत्याग केला पाहिजे अशी अपेक्षा आहे. ह्या प्रकारच्या योजनांचा हिंदुस्थानांतहि विचार होणें आवश्यक आहे.

### मद्रास प्रांतांतील दारूबंदी उठली

मद्रास प्रांतांतील ताडीचीं व विलायती दारूचीं दुकानें दारूबंदीमुळें बंद होतीं, तीं १ जानेवारी, १९४४ पासून पुनः सुरू करण्यांत येतील. "दारूबंदी उठल्यामुळें सरकारचें उत्पन्न वाढेल, त्यांतून वाढलेला खर्च अंशतः भरून येईल. ताज्या ताडींत उपयुक्त अन्न द्रव्यें असतात, ती मजूर वर्गास उपलब्ध करून दिल्याचेंहि त्यामुळें श्रेय मिळेल." असें त्यासंबंधींतील पत्रक म्हणतें. दारूबंदीसंबंधीं लोकांचा प्रारंभीचा उत्साह मावळला असून, दारूबंदीचा कायदा सर्रास मोडला जाणें कायद्याच्या इभ्रतीच्या दृष्टीनें अनिष्ट आहे, असेंहि सरकारचें म्हणणें आहे. मद्रास प्रांतांतील चार जिल्ह्यांत दारूबंदी करण्यांत आली होती, ती आतां उठवण्यांत येत आहे. सरकारचा हा निर्णय लोकांना खचित समाधानकारक वाटणार नाहीं, कारण दारूबंदीचे सुपरिणाम सिद्ध झालेले आहेत. प्रांतिक सरकारचा वाढता खर्च भागविण्यासाठीं दारूपानाचें उत्पन्न आवश्यक ठरावें, हें चमत्कारिक आहे. दारूबंदीचें धोरण प्रांतिक सरकारनें आखलें, तेव्हां त्याच्या विरोधकांनीं, दारूवरील करांचें उत्पन्न नाहींसें झाल्यामुळें प्रांतिक सरकारास शिक्षण, आरोग्य, इत्यादि उपयुक्त बाबींवर खर्च करण्यास सवड रहाणार नाहीं, अशी टीका केली होती. ह्या दृष्टीनें दारूबंदी नेहमींच अव्यवहार्य ठरेल व तिचा उपक्रम केव्हांहि अशक्यच होईल. अहमदाबाद शहरांतील दारूबंदीमुळें तेथील मजुरांची स्थिति सुधारली त्याची माहिती मुंबई सरकारनें १९३९ सालीं केलेल्या चौकशीच्या रिपोर्टांत दिलेली आहे. मद्रास प्रांतांतील सेलम जिल्ह्यांतील शेतकरी व मजूर ह्यांची आर्थिक स्थिति दारूबंदीमुळें कशी सुधारली, ह्याची तपशीलवार माहिती त्या उपक्रमाच्या चौकशी रिपोर्टांत त्यावेळीं प्रसिद्ध झालेली आहे. मंदीचे काळांत उत्पन्न पुरेसें येत नाहीं व युद्धकाळांत खर्च वाढतो, ह्या दोन्ही गोष्टी परिणामतः सारख्याच आहेत व मंदीमध्येंहि दारूबंदी सुरू होऊं शकली ती युद्धकाळांत चालू ठेवणें अशक्य नव्हतें, असाच

ग्रह सामान्यतः होईल. दारूबंदीसारखा अत्यंत महत्त्वाचा व लोक-हितकारक उपक्रम बंद पडणें सरकारी धोरणाच्या सातत्यावरील विश्वासाच्या दृष्टीनेंहि अनिष्ट ठरेल.

### शेतीकर्जें आणि मालविक्री ह्यांची सांगड

संयुक्त प्रांताच्या सहकारी नियतकालिकाच्या गेल्या महिन्याच्या अंकांत श्री. वैकुंठराय मेथा ह्यांचा शेती पतपेढ्यांच्या सभासदांनीं घेतलेल्या कर्जाची फेड आणि त्यांच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था ह्या विषयावरील विचारपरिप्लुत लेख प्रसिद्ध झाला आहे. कर्जें देण्याच्या जुन्या सावकारी पद्धतीमुळें शेतकरी वर्गाची पिळवणूक झालेली ठळकपणानें दिसून आल्यानें हिंदुस्थानांत तिच्या जागीं सहकारी तत्त्वावर अधिष्ठित झालेली व्यवस्था उभारण्यांत आली; तथापि, स्वतःच्या सभासदांस दिलेल्या कर्जाची वसुली करण्याची परिणामकारक तरतूद न झाल्यानें ह्या संस्थांस अडचण भासूं लागली. ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून सदरहु अडचण दूर करण्यासाठी योजण्यांत आलेल्या कायदेवजा उपायांचा त्रोटक इतिहास श्री. वैकुंठराय यांनीं दिला आहे. सोसायट्यांनीं दिलेल्या कर्जातून काढलेल्या पिकामधून त्या पैशाची फेड होण्याची सक्ती, ह्या पिकांवर सोसायट्यांस अग्र हक्क देणें, कर्जफेड केल्यावांचून पिकाची वासलात लावणाऱ्या सभासदांस दंड करणें, इत्यादि उपायांचा उपयोग करून पहाण्यांत आला आहे. परंतु ते यशस्वी न ठरल्यानें कर्जें देणाऱ्या संस्थांनींच सभासदांचा माल विकणें आणि त्यांस जरूर असलेला माल पुरवणें इत्यादि कामें करावीं, ह्या प्रकारच्या पद्धतीस महत्त्व देण्यांत आलें. हा घटाव कसा घडून आला आणि त्याचें स्वरूप व उपयुक्तता काय आहे, ह्याचें विवेचन श्री. वैकुंठराय ह्यांनीं मार्मिक रीतीनें केलें आहे. आवश्यक असेल तेवढेंच कर्ज देणें, त्या पैशाचा विनियोग योग्य कार्यासाठी व्हावा ह्याविषयी खबरदारी घेणें, शेतकऱ्यांच्या माल विक्रीचा चोख व्यवहार करणें इत्यादि प्रकारांनीं सभासदांच्या सबंद आर्थिक जीवनाचा सहकारी संस्थांनीं परामर्श घेणें, अशा स्वरूपाच्या योजना अलीकडे अंमलांत आणल्या जात आहेत. मल्टिपर्पज सोसायट्या स्थापन झाल्या आहेत त्यांचा उद्देश तरी हाच आहे. शेतकऱ्यांच्या पैशाच्या व आर्थिक साधनांच्या गरजा वेळच्यावेळीं भागवणें आणि त्यांनीं घेतलेल्या कर्जाची फेड सुलभ करणें ह्या दोन गोष्टी त्यायोगानें साधतात. "सहकारी कर्जें नियंत्रित कर्जें असतात" म्हणजे, पतपेढ्यांच्या सभासदांनीं काढलेल्या कर्जाचा सदुपयोग होण्याची सक्त व्यवस्था असते असें सांगण्यांत येतें. हें तत्त्व कृतींत उतरण्यास श्री. वैकुंठराय ह्यांनीं प्रतिपादल्याप्रमाणें शेती-कर्जें व शेतीमालाची विक्री ह्यांची सहकारी संघटनेनें सांगड घातली जाणें अगत्याचें आहे. ह्यासाठी सरकारनें जादा खर्च करून देखरेखीची वगैरे व्यवस्था केल्यास तो पैशाचा सदुपयोगच होणार आहे. मद्रास प्रांतांत अशी तजवीज झाली आहे, हें येथें लक्षांत घेण्यासारखें आहे.

### "इंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्ह्यू"

ह्या त्रैमासिकाचा जुलै-सप्टेंबरचा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत मुंबई प्रांतिक को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचें ह्या संस्थेच्या रजतोत्सवानिमित्त गौरवपर व अभिनंदनात्मक संपादकीय स्फुट प्रसिद्ध झालें आहे. हिंदुस्थानांतील धान्योत्पादनासंबंधानें विवेचन करणारा एक वाचनीय लेखहि त्यांत आला आहे. हें उत्पादन अपुरें असल्यानें तें वाढवलें जाण्याची आवश्यकता त्या लेखांत प्रतिपादली आहे. सहकारी संस्थांच्या बाबतींत त्या संशोधनाच्या प्रकाशनाचा उपक्रमहि करण्यांत आला आहे. सहकारी संघटनाच्या तत्त्वावर हिंदी शेती उभारण्याचें महत्त्व वाचकांच्या नजरेस संपादकांनीं आणिलें आहे. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतील सहकारी चळवळीची माहिती नेहमीप्रमाणें देण्यांत आली असून इतर ठिकाणीं चाललेल्या सहकारी व शेतीविषयक घडामोडींची हकीकतहि ह्या अंकांत आहे. प्रस्तुत अंक उद्बोधक आणि वाचनीय आहे.

## सातारा जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यामधील सहकारी चळवळ

### थोडक्यांत गोषवारा

या तालुक्यांत एकंदर ३३ सोसायट्या असून त्या सर्व सोसायट्यांमध्यें सुमारें १२०० मेंबर आहेत व सर्व मेंबरांनीं बहुतेक शेतीच्या चालू कामासाठीच कर्जें घेतलेलीं आहेत. दुष्काळी भागांमधील सोसायट्यांतील मेंबरांना 'दुष्काळी' कर्जेंहि देण्यांत आलेलीं आहेत.

या सोसायट्यांना लागणारें भांडवल त्यांनीं आपले शेअर खपवून व मेंबरांच्या ठेवी स्वीकारून व जरूरीप्रमाणें प्रांतिक सहकारी बँकेचें कर्ज घेऊन उभारलेलें आहे. कांहीं सोसायट्या नॉन-मेंबर ठेवीही स्वीकारतात पण त्यांना बँकेचें कर्ज मिळत नाहीं. या सर्व सोसायट्यांनीं आपल्या मेंबरांना सुमारें १। लाख रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. दुष्काळी भागांत असलेल्या सोसायट्यांनी आपल्या मेंबरांकडून वसूल व्हावयाच्या कर्जास तहकुबीहि दिलेली आहे.

या तालुक्यांतील बहुतेक सोसायट्या तालुक्याच्या पूर्व भागांतच जास्त आहेत. येरळा व नांदणी या नद्यांच्या कांठावरील आसपासच्या व तासगांव-सातारा आणि विटे-कराड या मुख्य रहदारीच्या रस्त्यांच्या नजीकच्या गांवींच सहकारी सोसायट्यांचा प्रसार चांगला झाला आहे. या सर्वांच्या केंद्रस्थानीं असलेल्या गांवींच या सर्व सोसायट्यांचें सुपरवायझिंग यूनियनचें ऑफिस आहे. तालुक्याचा पश्चिम भाग बराच डोंगराळ असल्यामुळें व वहातुकीच्या सुलभ साधनांचा तेथें अभाव असलेमुळें तिकडे सहकारी चळवळीचा प्रसार झाला नसावा.

या तालुक्यास रेल्वेचा अजिबात संपर्क नसलेमुळें शेतकऱ्यांना आपला माल विकावयास सोइस्कर पेठ जवळपास नाहीं. त्यांच्या मालाची खरेदी-विक्री करणाऱ्या एकाद्या सहकारी संस्थेची उणीव या भागांत तीव्रतेनें भासत आहे.

तसेंच, या तालुक्याच्या डोंगराळ भागांत मेंढरांच्या लोकरीची पैदास करणाऱ्या व तदनुषंगिक कामें करणाऱ्या सोसायट्यांचा प्रसार होणेची शक्यता आहे. मेंबरांनीं पाळलेल्या मेंढ्यांपासून निर्माण होणारी लोकर अगर त्यासारखे इतर पदार्थ खरेदी करून त्यांची विक्री कसोशीनें करून देणारी एकादी सहकारी संस्था या भागांत अस्तित्वांत येणें अगदींच अशक्य नाहीं.

जनावरांचा विमा उतरणारी सोसायटी या भागांत प्रयोगादाखल सुरू करण्याचे प्रयत्न या भागांतील सहकारी चळवळीचे कार्यकर्ते करणार असल्याचें कळतें.

## पुणें सें. को. बँकेचा सहकार सप्ताह

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेतर्फे तारीख ३०।१०।४३ ते ६।११।४३ पर्यंत सहकार सप्ताह साजरा करण्यांत आला. त्या सप्ताहांत दररोज पुण्यांतील शेती व सहकार यांशीं निकट संबंध असणाऱ्या निराळ्या विषयांवर खालील सद्गृहस्थांचीं व्याख्यानें झालीं.

तारीख ३०।१०।४३ रोजीं श्री. जी. एस. नगरकर यांचें "वाया जाणारें पाणी व शेतीस उपयोगी पाटबंधारे" या विषयावर व्याख्यान झालें. त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य मुद्दा, पावसानें वाया जाणारें पाणी योग्य ठिकाणीं अडवून त्यापासून शेतकऱ्यास कसा उपयोग करून घेतां येईल हा होता.

तारीख ३१।१०।४३ रोजीं श्री. दा. वा. पोतदार यांचें "नागरी सहकारी चळवळ" या विषयावर व्याख्यान झालें. त्यांनीं वेगवेगळ्या नागरी सहकारी संस्थांची तात्त्विक घटना कशी असते तें दर्शवून मग अशा संस्थांच्या कामकाजाची थोडक्यांत कल्पना दिली व त्यायोगें नागरी जीवन अधिक सुखकर कसें करावें तें सांगितलें. तसेंच अधिक कार्यक्षम पंच कमिटीचेंहि महत्त्व त्यांनीं प्रतिपादन करून त्या दृष्टीनें भागीदार वर्गानें आपली जबाबदारी ओळखावी असें सुचविलें.

तारीख १-११-४३ रोजीं प्रि. म. शं. गोडबोले यांचें "शाळा-कॉलेजांतील विद्यार्थी व सहकारी चळवळ" या विषयावर व्याख्यान झालें. त्यांनीं सहकारी तत्त्वावर शाळेंत व कॉलेजांतून मुलांना निरनिराळे उपाय योजून शिक्षण कसें घेतां येईल तें सांगून शाळेबाहेरील शिक्षणांतच मुलांमध्यें सहकार्याचें बीजारोपण अधिक चांगलें होऊं शकेल असें सांगितलें.

तारीख २-११-४३ रोजीं प्रो. शं. रा. भागवत यांचें "जीवनोपयोगी वस्तू निर्माण करणारे व ते घेणारे ग्राहक यांचे परस्पर संबंध कसे असावेत" या विषयावर व्याख्यान झालें. त्यांनीं आपल्या व्याख्यानांत सहकारी चळवळीचा उद्देश शेतकरी व कामकरी यांची आर्थिक सुधारणा करणें हा आहे, उत्पादकास त्याच्या उत्पन्नाचा खराखुरा मोबदला मिळून ग्राहकास जीवनास आवश्यक गोष्टी योग्य किंमतीस पण कमी खर्चांत व कमी वेळांत मिळाल्या पाहिजेत व त्यासाठी उत्पादक व ग्राहक यांनीं सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन कार्य करावयास पाहिजे असें सांगितलें.

तारीख ३-११-४३ रोजीं श्री. के. व्ही. जोशी यांचें "खेड्यांतील सहकारी चळवळीची यापुढील दिशा काय असावी" या विषयावर व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं शेतीव्यतिरिक्त इतर धंदे मशिनरीमुळें कसे बसले व त्याचा शेतीवर बाजवीपेक्षां जास्त बोजा पडल्यानें शेती हल्ली तोट्यांत कशी येते ह्याचें विवरण केलें. शेतीचें उत्पन्न वाढविणेसाठी त्यास जोड धंद्यांची वाढ किती आवश्यक आहे तें सांगून शेती सुधारणा करणेसाठी जमिनीच्या तुकड्यांचें एकीकरण, निवडक बीबियाणें, खतें, आधुनिक उपकरणें व सहकारी संस्थांमार्फत मालाची विक्री, या गोष्टींबद्दल सरकारनें कायद्यानें बंधन घालणें इष्ट आहे असें सुचविलें. तसेंच बँकेनेंहि शेती, सहकार, उद्योगधंदे व बँकिंग अशा विषयांतील तज्ज्ञांची एक कमिटी नेमून तिच्यामार्फत शेती सुधारणेचें कार्य हातीं घ्यावें अशी सूचना केली.

तारीख ४-११-४३ रोजीं श्री. वि. ग. तिखे यांचें "शेतकरी ऋण विमोचन" या विषयावर व्याख्यान झालें. व्याख्यानांत त्यांनीं या कायद्याखालीं येणाऱ्या शेतकऱ्यांचें कर्जनिवारण करतांना सरकारनें या कायद्याखालीं काय धोरण आखलें आहे त्याचें स्पष्टीकरण केलें व या कायद्यानें शेतकी सोसायट्यांवर होणाऱ्या परिणामाकडे नजर ठेवून सोसायट्यांनीं सभासदांस व बँकेनें सोसायट्यांस विशेष काळजीपूर्वक नवीन कर्जें द्यावींत असें सांगितलें.

तारीख ५-११-४३ रोजीं बँकेचे चेअरमन रावसाहेब य. द. खोले यांचें स्त्रियांसाठीं व्याख्यान झालें. त्यांत बँकेनें स्त्रियांसाठी सहकारी संस्था काढणेबद्दल मागें काय काय प्रयत्न केले तें थोडक्यांत निवेदन करून स्त्रियांसाठी सहकारी संस्था कशा धर्तीवर असावी याची बरीच चर्चा केली. आपल्या इकडील स्त्री समाजाच्या दृष्टीनें उपयुक्त ठरेल अशा एकाद्या संस्थेची नियमावली तरी सांप्रतच्या सहकारी खात्याजवळ तयार नसली तरी सांप्रतच्या परिस्थितीला अनुरूप अशी एक योजना व नियमावली तयार करून ती रजिस्टर करून घेण्याचा प्रयत्न करावा. रजिस्टर होऊं न शकल्यास जणूं काय ही संस्था रजिस्टर झालीच आहे अशा समजुतीनें संस्था सुरू करावी असें ते म्हणाले.

त्याच दिवशीं रावबहादूर डॉ. डी. एल. सहस्रबुद्धे यांचें "सहकारी चळवळ व शेती सुधारणा" या विषयावर व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं शेती सुधारण्यासाठी ताली, बंधारे, शेतीचीं उपकरणें, चांगलें बीबियाणें, पीकसंरक्षण, मालाची सहकारी संस्थांमार्फत खरेदी-विक्री, जंगलाचा शेतीसाठी उपयोग, या गोष्टींचा शेती सुधारणेसाठी कसा फायदा होईल तें सांगून या गोष्टी सामुदायिक रीतीनें सहकारी तत्त्वावर केल्यास त्या कशा स्वस्तांत पडतात हें सांगितलें.

तारीख ६-११-४३ रोजीं सहकार सप्ताहाचा समारोप बँकेचे माजी चेअरमन व केसरीचे सहसंपादक श्री. दा. वि. गोखले यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. समारोपाच्या भाषणांत व्याख्यात्यांनीं सहकारी चळवळ राष्ट्रीय चळवळ असून त्यामुळें राष्ट्राची आर्थिक परिस्थिति कशी सुधारते हें दर्शविलें. शेतकऱ्यांच्या सुधारणेबाबत बोलतांना शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण देण्यास कायद्यानेंच बंदी असावी असें त्यांनीं ध्वनित केलें. तसेंच सर्व कार्यकर्त्यांनीं संघटित होऊन तन्मयतेनें कार्य हातीं घेऊन राष्ट्राच्या संपत्तींत भर घालावी असें सुचविलें व शेवटीं बँकेनें शेतकऱ्यांच्या आर्थिक पहाणीचा जो उपक्रम हातीं घेतला आहे तो स्तुत्य असून सर्वांनीं त्यास हातभार लावावा अशी इच्छा प्रदर्शित केली.

या सप्ताहाचे निमित्तानें बँकेनें आपल्या खेड, इंदापूर व दौंड पेट्यांतील शाखांमार्फत अनुक्रमें तारीख २-११-४२ रोजीं खेड येथें, तारीख ३-११-४३रोजीं पळसदेव येथें व तारीख ६-११-४३ रोजीं पिंपळगांव येथें सभा भरविल्या. या सभांसाठी श्री. ओगले, श्री. तुळशीबागवाले, श्री. बापट व श्री. करंदीकर हे डायरेक्टर्स अध्यक्ष म्हणून हजर होते. त्यांचीं प्रसंगोचित भाषणें झालीं.

### गव्हर्नरांचें रुपयांच्या नाण्यांनीं वजन

जगदीशपूरच्या एका गृहस्थानें संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरांचें रुपयाच्या नाण्यांनीं वजन करून ते सर्व रुपये युद्धफंडासाठी गव्हर्नरांच्या स्वाधीन केले.

# सहकारी दिन

### तळवळें

खात्यामार्फत आलेला ठराव श्री. न. के. तेलंग ह्यांनी समजावून सांगितला. श्री. बाबूराव देशपांडे ह्यांचें भाषण झाल्यावर पानसुपारीनंतर समारंभ संपला. तळवळें सोसायटी १९[illegible] सालीं स्थापन झालेली असून मुंबई प्रांतांत तिचा अनुक्रम ६ वा आहे. तिने सभासदांच्या व इतरांच्या सोईसाठीं कापड दुकान सुरू केलें आहे.

### नासिक

अध्यक्षः—श्री. व्हीं. नांजप्पा, आय. सी. एस., कलेक्टर.

कार्यक्रमः—ईशस्तवन, स्वागतपर पदें, नाटिका, पोवाडे, मिसेस नांजप्पा ह्यांचे हस्तें बक्षिस समारंभ इ.

भाषणें:—रा. ब. वंडेकर, मिसेस टिळक, प्रो. पुराणिक, श्री. एम. आर. दळवी, डॉ. देसाई आणि सरदार विंचुरकर. अध्यक्षांनीं आपल्या इंग्रजी भाषणांत ही चळवळ विशेषतः शेतकरी व मध्यमवर्गाच्या आर्थिक उन्नतीकरितां असून तिच्यापासून कोणकोणते फायदे करवून घेतां येतील हें सभेच्या निदर्शनास आणिलें. सहकारी स्टोअर्सची संख्या वाढविण्यांत यावी हें सुचविलें. सहकारी चळवळ म्हणजे केवळ पतपेढ्या, ही आकुंचित कल्पना काढून टाकून आर्थिक व नैतिक उन्नतीकरितां जरूर असणारे सर्व प्रयत्न निरनिराळ्या पद्धतीनें सहकारी चळवळीमार्फत करणें किती आवश्यक आहे हें निवेदन केलें. अध्यक्षीय भाषणाचा रा. रा. ह. देशपांडे यांनीं मराठींत मथितार्थ सांगितला.

### पालघर

शनिवार ता. ६-११-४३ रोजीं पालघर येथें मुं. प्रॉ. को. ऑ. बँक लि., पालघर शाखेच्या ऑफिसांत सहकारी दिन साजरा करण्यांत आला. सभेस सोसायट्यांचे प्रतिनिधी आणि इतर सद्‌गृहस्थ मिळून २५-३० लोक होते. अध्यक्षस्थानीं श्री. केशव लालजी पाटील होते. सभेंत श्री. तुकाराम पाटील, श्री. कमळाकर पाटील, श्री. हिरा पाटील, श्री. नाना पाटील आणि श्री. संढागळे यांचा समयोचित भाषणें झालीं.

### धुळें

असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. धुळें यांचे ऑफिसांत श्री. त्र्यंबक विष्णु दीक्षित वकील, धुळें शहरांतील एक प्रमुख सहकारी कार्यकर्ते, यांच्या अध्यक्षतेखालीं पश्चिम खानदेश डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग युनिअन्स लि. धुळें या संस्थेतर्फे साजरा करण्यांत आला. सदर प्रसंगीं सुमारें ४० स्थानिक सहकारी कार्यकर्ते उपस्थित होते. श्री. आर. डी. भोसेकर, श्री. एम. आर. काळे, श्री. आर. व्ही. शुक्ल, श्री. आर. जी. पाटील, श्री. एस. एस. देशमुख आणि श्री. एस. टी. मोरे बॅरिस्टर यांनीं समयोचित भाषणें केलीं. सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा घेण्यांत येऊन तिच्या विस्तारास आलेल्या अनुकूलतेबद्दल आपापलीं मतें वरील वक्त्यांनीं मुद्देसूद रीतीनें प्रतिपादन केलीं. सहकारी चळवळीवर अढळ श्रद्धा व्यक्त करण्यांत आली व समाजाची आर्थिक पुनर्घटना चिरस्थायी व समतेच्या तत्त्वावर करावयाची तर ती एकट्या सहकारी चळवळीनेंच होणार आहे याबद्दल दृढ विश्वास प्रदर्शित करण्यांत आला.

### सोलापूर

सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँकेमार्फत यंदाचा सहकारी दिन बँकेच्या हॉलमध्यें शनिवार तारीख ६-११-४३ रोजीं मोठ्या थाटानें साजरा झाला. समारंभाचें अध्यक्षस्थान श्री. के. आर. कुळकर्णी, असिस्टंट रजिस्ट्रार को. सोसायटीज्, हे होते.

बँकेचे चेअरमन श्री. एस्. एन्. जामदार यांनीं आरंभीं प्रास्ताविक भाषण केलें. त्यानंतर श्री. कुंभकोणी यांनीं सहकारी दिन साजरा करण्याचें वैशिष्ट्य सांगून सहकारी चळवळीची व्याप्ती यावर माहितीपूर्ण भाषण केलें. त्याचप्रमाणें सहकारी चळवळीचें महत्त्व आजच्या युगांत किती आहे हेंहि स्पष्ट करून सांगितलें. श्री. गव्हाणे यांचें सहकारी तत्त्वावर जीवनोपयोगी वस्तूंची खरेदी-विक्री या विषयावर मनोरंजक व उद्‌बोधक भाषण झालें. सध्याच्या युद्धमान परिस्थितीमुळें निर्माण झालेली आवश्यक वस्तूंची महर्गता व दुर्मिळता यामुळें कंझ्युमर्स स्टोअर्ससारखी सहकारी चळवळ फोफावणें अवश्य व उचित झालें आहे. यानंतर नागरी सहकारी चळवळीसंबंधीं श्री. कोतकुंडे यांचें सुश्राव्य भाषण झालें. कामगार सोसायट्यांच्या मार्गांतील अडचणी श्री. एस. एऊ. द्रवीड यांनीं विशद करून मांडल्या व चालू युद्ध व सहकार याविषयीं श्री. पी. डी. कुलकर्णी यांनीं अल्पसें पण मनोरंजन भाषण केलें. यानंतर अध्यक्षांनीं योग्य त्या शब्दांत समारोप केल्यावर उपस्थित मंडळींना चहापान झाल्यावर सभा विसर्जन पावली.

### नगर येथें सहकारी दिनोत्सव

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को. बँकेचे हॉलमध्यें तेथील डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज श्री. व्ही. बी. राजू आय. सी. एस. यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. सभेस २०० चे वर समाज हजर होता. श्री. दादासाहेब घनेश्वर यांनीं सहकार्याची महती सांगून हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचा आढावा घेतला. डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर श्री. कानडे यांनीं सहकाराची मूलभूत उभारणी समता व विश्वबंधुत्व यांवर झालेली आहे असें सांगून या चळवळीची आवश्यकता प्रतिपादन केली. नंतर श्री. प्र. कों. भापकर यांनीं सहकारी चळवळ हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकारचे अभावीं कशी जोरांत फोफावत नाहीं हें सांगितलें. नंतर श्री. मोतिलालजी फिरोदिया यांनीं सहकार व समाजवाद यांतील फरक सांगून हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रसार झाला नसल्यामुळें चळवळ फोफावत नाहीं असें सांगितलें. मिसेस चंपूताई साठे यांनीं आपण चालवीत असलेल्या महिला सहकारी भांडाराची हकिकत सांगून आर्थिक हलाखी व शिक्षणाचे अभावामुळें असलेला निरुत्साह कसा चळवळीचे आड येतो तें सांगितलें. वडाळा येथील कार्यकर्ते श्री. कमालखान गुलाबखान यांनीं सुशिक्षित कार्यकर्त्यांनीं खेड्यांत येऊन काम करावें व चळवळीचा प्रसार करावा; याशिवाय तरणोपाय नाहीं असें सांगितलें. श्री. काकासाहेब चिंचोरकर यांनीं सर्वांचे आभार मानले व हा समारंभ समाप्त झाला.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434.

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. धा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १ डिसेंबर, १९४३ अंक ४७

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्सिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

## साखरआंबा, मोरआवळा—सफरचंदाचा

गाजराचा, आवळ्याचा, बेलफळाचा, महाळुंगाचा, अल्याचा, हिरड्याचा वगैरे.

द. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

नागपूर शाखा:

गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,१०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

**महागाईची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

गिरगांव मुंबई नं. ४

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### टाटा केमिकल्स लि.

वरील कंपनीचे टर्बो-जनरेटर सेट्स सप्टेंबर, १९४२ अखेर हिंदुस्थानांत दाखल झाले, ते दोन महिन्यांत बसविण्यांत आले. बॉयलर प्लँटच्या कांहीं आनुषंगिक बाबी डिसेंबर १९४२ मध्यें आल्या. पॉवर प्लँटची उभारणी जानेवारी १९४३ मध्यें पुरी झाली, व उत्पादनास प्रारंभ झाला. लिक्विड क्लोरिन, ब्लीचिंग पावडर, हैड्रो-क्लोरिक ॲसिड, ब्रोमाइड्स, कॉस्टिक सोडा, झिंक क्लोराइड, इत्यादींचें उत्पादन झालें. एकूण विक्री ४१½ लक्ष रुपयांची झाली, त्यांतील क्षाराचा मागच मोठा होता. कंपनीनें गेल्या वर्षी, ३ लक्ष ६ हजार रुपये वॉररिस्क विम्याचा हप्ता भरला.

### नाणीं बाळगल्याबद्दल झालेली शिक्षा रद्द

नाशिक येथील सराफ, श्री. टकले, ह्यांनीं २९३ रुपयांच्या दुय्यम नाण्यांचा साठा केला, म्हणून त्यांस सिटी मॅजिस्ट्रेटनें ३०० रुपये दंड केला होता. श्री. टकले ह्यांनीं नाशिकच्या सेशन्स जज्जाकडे अपील केलें, परंतु तें फेटाळण्यांत आलें. म्हणून, हायकोर्टाकडे अर्ज करण्यांत आला. जरूरीपेक्षा ज्यास्त नाणीं मिळवून जमा करणें हा गुन्हा होतो; केवळ जवळ नाणीं असणें बेकायदा ठरविण्याचा डिफेन्स ऑफ इंडिया नियमाचा (नं.९० (२) ड) उद्देश दिसत नाहीं; ज्याचेजवळ रोजच्या व्यवहारांत नाणीं जमतात, तो वरील नियमाखालीं शिक्षेस पात्र होईल असें म्हणतां येत नाहीं, असा हायकोर्टाचा अभिप्राय पडला. १७ एप्रिल, १९४३ रोजीं डिफेन्स ऑफ इंडिया नियमांत दुरुस्ती करणारा नवा नियम (नं. ९० (२) इ) घालण्यांत आला, परंतु त्या पूर्वींच श्री. टकले ह्यांनीं गुन्हा केला, असा त्यांचेवर आरोप असल्याकारणानें, त्यांस झालेली शिक्षा हायकोर्टानें रद्द ठरविली.

### विलायती भाज्यांचें बीं

विलायती भाज्यांचें बरेंच बीं हिंदुस्थानांत आलें आहे, तें लष्करी पुरवठ्यासाठी लागवडीकरितां व नागरिकांची आवश्यक मागणी पार पाडण्याकरितां पुरविण्यांत येत आहे.

### रेल्वेवरील ताण कमी करण्यासाठी गलबतांचा उपयोग

हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर कराची ते कोचीन ह्यांचे दरम्यान गलबतांमधून पुष्कळ वहातूक होते, ती वाढवून रेल्वेवरील ताण कमी कसा करतां येईल हें सुचविण्यासाठी १९४२ मध्यें हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली होती. सध्यां गलबतांतून दर मोसमांत १५ लक्ष टन मालाची वहातुक होते. आणखी ६,८१,००० टन माल त्यांतून वाहून त्या प्रमाणांत रेल्वेवरील ताण कमी करतां येईल, असें कमिटीनें आपलें मत रिपोर्टांत नमूद केलें आहे. २० हजार टनांचीं आणखी गलबतें बांधण्यांत यावीं, असेंहि तिनें सुचविलें आहे.

### गॅसच्या दिव्यांवर नियंत्रण

गॅसच्या उत्पादनासाठी कोळशाचा तुटवडा पडूं लागल्याकारणानें, मुंबई शहरांतील रस्त्यांवरील गॅसचे दिवे रात्रीं १० वाजतां मालविणें भाग पडत आहे. मुंबईच्या रस्त्यांवरील दिव्यांपैकीं शेकडा ८० दिवे गॅसचे आहेत.

### उसाच्या लागवडींत वाढ

गेल्या वर्षीपेक्षा चालू वर्षी मद्रास प्रांतांत उसाची लागवड १८.७% नें वाढून ती १,३८,१५० एकर झाली आहे.

### कोळशाचा तुटवडा

कोळशाची सर्वत्र टंचाई भासूं लागली आहे, त्याचें मूळ कारण वहातुकीची अडचण हें नसून खाणींतील कोळसा बाहेर काढणाऱ्या कामगारांचा तुटवडा हें आहे, असें समजतें. शेतीचा किफायतशीरपणा व आजूबाजूचीं लष्करी कामें ह्यांमुळें खाणींत काम करण्यास येणाऱ्या कामगारांची संख्या घटली आहे.

### लिमिटेड कंपन्यांची भागविक्री

हिंदी कंपनी कायद्याखालीं नवी कंपनी नोंदविण्यास एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूची परवानगी लागत नाहीं, परंतु भाग विकण्यापूर्वीं मध्यवर्ती सरकारची परवानगी घेणें आवश्यक आहे. ३० सप्टेंबर अखेर २५५ कंपन्यांना भाग विकण्यास हिंदुस्थान सरकारची परवानगी मिळाली व १३ कंपन्यांचे अर्ज नामंजूर झाले.

### नांगर, बैलगाड्या इत्यादींसाठीं ७ लक्ष रुपये

शेतीस लागणारीं औतें, बैलगाड्या, इत्यादि तयार करण्यासाठीं नोव्हेंबर १९४३ ते जून १९४४ ह्या मुदतींत खर्चण्याकरितां म्हैसूर सरकारनें ७ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. ४ हजार नांगरांस १ लक्ष रुपये लागतील, बैलांच्या ५ लक्ष नालांस ६० हजार रुपये खर्च येईल व २ हजार गाड्यांसाठीं २½ लक्ष रुपयांची तरतूद आहे.

### सोन्याचें जागतिक उत्पादन

| जानेवारी ते ऑक्टोबर | औंस |
|---|---|
| १९४२ | १,१८,८५,९४३ |
| १९४३ | १,०६,९६,१६३ |

१९४२ सालीं एकूण उत्पादन १,४१,२०,६१७ औंस झालें होतें. १९४३ मध्यें उत्पादनाचा आकडा १ कोटि, ३० लक्ष औंसांवर जाण्याची अपेक्षा नाहीं.

### युरोपांतील युद्धासाठीं पेट्रोलचा पुरवठा

युरोपांतील युद्ध चालू ठेवण्याकरितां पेट्रोलची भरपूर व्यवस्था करण्यांत येत आहे. रशियांतील पेट्रोलचें सर्व उत्पादन त्यास स्वतःसाठींच लागेल व रुमेनिया सोडतांना त्यांतील पेट्रोलच्या खाणींचा नाश जर्मनी बहुधा करील. अमेरिकेंतून पेट्रोल आणणें दूर पडेल व इराण व त्याच्या आसपासचे प्रदेश ह्यांवरच मुख्यतः युरोपियन देशांतील स्वारीसाठीं मित्रराष्ट्रांना पेट्रोलसाठीं अवलंबून रहावें लागेल. ह्या परिस्थितीचा विचार करण्याकरितां ब्रिटिश, अमेरिकन, डच व फ्रेंच तज्ज्ञ ह्यांचीं ग्रेट ब्रिटनमध्यें खलबतें चालू आहेत. हायफा ते ट्रिपोली पेट्रोलचे नळ आहेत, त्यांत वाढ करण्याची खटपट करण्यांत येईल. ह्या योजनेस एक कोटि पौंड खर्च येईल.

### कोळशाचें घटतें उत्पादन

हिंदी कोळशाच्या खाणींचें उत्पादन १९४० सालापासून उतरत चाललें आहे. जून, १९४३ पासून तें बरेंच कमी होऊं लागलें आहे. १९४३ च्या जून, जुलै व ऑगस्ट ह्या तीन महिन्यांत १९४२ च्या तत्सम महिन्यांच्या मानानें उत्पादन दरमहा ३½ लक्ष टन कमी झालें आहे. सप्टेंबरमधील घट ३ लक्ष टनांची आहे. वॅगन्सचा पुरवठा, यंत्रसामुग्री तत्काल उपलब्ध करून देणें, स्त्रियांना खाणींत काम करण्यास बंदी होती ती उठविणें, कामगारांच्या खाण्यापिण्याकडे व हिताकडे अधिक लक्ष देणें, इत्यादि मार्गांनीं परिस्थिति सुधारण्याचा सरकारचा प्रयत्न चालू आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ३७० | हिंदुस्थान–बंगाल दुष्काळ निवारण–सर्व आघाड्यांवर प्रगति–मुंबई प्रांतांतील शिक्षण प्रगति | |
| २ हिंदी विमा कंपन्यांचा व्यवसाय | ... ३७१ | | |
| ३ शेती सुधारणा व सहकार | ३७२ | | |
| ४ घरांचा तुटवडा | ... ३७२ | ६ शेअर बाजार | ... ३७४ |
| ५ स्फुट विचार | ... ३७३ | ७ संमिश्र सत | ... ३७५ |
| युद्धोत्तर हिंदी स्वदेशी धंदे–जागतिक सुस्थिति आणि | | ८ सहकारी दिन | ... ३७५ |


# अर्थ

बुधवार, ता. १ डिसेंबर, १९४३

## हिंदी विमा कंपन्यांचा व्यवसाय

### सरकारची सहानुभूति व व्यवहाराची पुनर्घटना ह्यांची आवश्यकता

हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतच्या पाच-दहा कंपन्या सोडल्या तर ३½% दरानें व्हॅल्युएशन केल्यास उरलेल्या कित्येक कंपन्यांचा व्यवहार तोटयांत चालू असून त्यांचेकडे पुढें येणाऱ्या क्लेम्सची तरतूद होण्याजोगी त्यांची परिस्थिति नाहीं, असा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सच्या म्हणण्याचा सरळ अर्थ आहे. ३½ दराऐवजीं ४% अथवा ४½% दरानें मूल्यमापन करून वाढावा दाखविणें अर्थातच भ्रामक ठरेल; नक्की बुडीत असलेल्या कर्जास शहाजोग म्हणून ताळेबंदांत वाढावा दाखविणें व मिळावयाच्या व्याजापेक्षा जास्त रकम मिळेल असें गृहीत धरून आज कराव्या लागणाऱ्या तरतुदीची रकम पुरेशी आहे असें भासविणें, ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. हिंदी विमा कंपन्यांच्या हिशेबांची तोंडमिळवणी ३½% दराच्या हिशेबानें होण्याजोगी नाहीं; तेव्हां त्यांनीं काय करावे असा प्रश्न सहाजीकच उपस्थित होतो. हिंदी कंपन्यांचें मूल्यमापन गेलीं कित्येक वर्षें ५%, ४½% अशा दरानें करण्यांत आलेलें आहे व त्या हिशेबानें पूर्वी भक्कम ठरलेल्या कंपन्यांचा ३½% दराच्या हिशेबानें वाढावा कमी झालेला दिसेल व कांहीं तर तूट दाखवूं लागतील. व्याजाचे दर पुढें सुधारण्याचा संभव आहे असें मानलें, खर्चाचें प्रमाण पुष्कळ उतरलें व विमा कायद्याचें २७ वें (सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीसंबंधाचें) कलम कालांतरानें बदललें तरच देशी कंपन्यांचा टिकाव लागेल, अशी आजची स्थिति आहे. हप्त्यांचे दर वाढविण्याचा, म्हणजे विमा पॉलिसी महाग करण्याचा, अकराशें रुपये कंपनींत भरून विमेदारास हजार रुपये देण्याचा करार करण्याचा सल्ला विमा कंपन्यांस कितपत मानेल व पचेल, ह्याची शंकाच आहे. आपले लोक पैसे सुरक्षित व किफायतशीर गुंतविण्याचें साधन ह्या दृष्टीनेंच विम्याकडे पहात आलेले आहेत. बोनसकडे त्यांचें नेहमीं लक्ष असतें. अशा परिस्थितींत विमेदारास भारी हप्त्याचा विमा आकर्षक कसा वाटेल ?

### सहानुभूतिपर धोरणाची आवश्यकता

सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें विमा व्यवसायावर बंधनें घालून विमेदारांचें हित पहाणें योग्यच आहे, परंतु विम्याचा धंदा हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितींत कसा सुधारेल व वाढेल ह्या प्रश्नाकडेहि त्यानें सहानुभूतिपूर्वक पाहिलें पाहिजे, हें उघड आहे. मूल्यमापनांतील आजपर्यंतचा रूढ दर–अगदीं योग्य कारणाकरितांहि–४½% वरून ३½% वर आणण्यासाठी कंपन्यांना मोठाल्या रकमांची तरतूद एकदम करावी लागणार आहे, ती त्यांस करण्यास सवड मिळणें आवश्यक आहे. ३½% दराच्या मूल्यमापनांत तूट आढळली व ती भरून काढणें कंपन्यांना ताबडतोब अशक्य झालें, तरी कंपन्यांना दिवाळखोर न ठरवितां त्यांस सुधारण्यास संधी दिली पाहिजे. अर्थात्, किती हिंदी कंपन्या अशी संधि मिळण्यास लायक ठरतील व किती कंपन्यांची तक्रार पोकळ ठरेल, हें कंपन्यांची परिस्थिति व त्यांच्या चालकांची कर्तबगारी ह्यांच्या प्रत्यक्ष परिशीलनानेंच दिसून येणार आहे. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें सुरक्षितपणाच्या दृष्टीनें घालून दिलेल्या मर्यादा अगदी अयोग्य आहेत असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं; परंतु कंपन्यांच्या धंद्याच्या दृष्टीनेंहि त्यांचा विचार केला जाणें अगत्याचें आहे, हें विसरतां कामा नये. विमा–वार्षिकांतील माहितीवरून हिंदी विमा व्यवसायाची आजची बिकट परिस्थिति लक्षांत येते व लहान आकाराच्या कित्येक कंपन्यांच्या प्रगतीबद्दल चिंता वाटूं लागते. विमा कायदा व त्याची अंमलबजावणी ह्यांत हिंदी विमा व्यवसायाबद्दल सहानुभूति दिसून येत नाहीं, असा आक्षेप आहे; तथापि विमा कायदा अमलांत आल्यापासून व्याजासंबंधींची परिस्थिति कंपन्यांचे दृष्टीनें बिकट होत चालली आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. व्याजाचे दर व युद्धपरिस्थिति ह्यांचा प्रतिकूलपणा नसता तर विमाकायदा इतका जाचक वाटला नसता. पालटलेल्या परिस्थितीप्रमाणें विमा व्यवसायाची पुनर्घटना करणें आवश्यक झालें आहे. सध्याच्या अल्प व्याजाच्या दराचे काळांत कांहीं लहान कंपन्यांस चालकांचें योग्य वेतनहि परवडण्याची मारामार झाली आहे. पुरेसा लाइफ फंड निर्माण होऊं शकत नाहीं; खर्च प्रमाणांत रहात नाहीं; व्याजाचा दर ३½% हि सुटत नाहीं; नवीन काम स्वल्प खर्चांत मिळत नाहीं; हप्त्यांचे दर वाढविणें अशक्य आहे, अशा रीतीनें त्रस्त करणाऱ्या परिस्थितीमध्यें चालक भांबावून जाणें अगदीं स्वाभाविक आहे. अशा कारणांमुळें कांहीं चालक मिळेल तेवढें खाऊन घ्या, अशा वृत्तीनें कंपन्यांचा कारभार हाकीत आहेत असें दिसतें. अशी परिस्थिति आतां फार दिवस टिकणार नाहीं. विमा वृत्तांतावरून असें दिसून येतें कीं कित्येक कंपन्यांच्या रिन्युअल खर्चाचें प्रमाण १००% पेक्षा अधिक आहे (कांहीं आदर्श निवडक कंपन्यांचें तें १२% आहे); कित्येक कंपन्यांचा लाइफ फंड पुज्यापेक्षा कमी आहे व कित्येक कंपन्यांस आलेली तूट त्यांच्या वसूल भांडवलापेक्षा ज्यास्त आहे अर्थात्, हीं अत्यंत पराकाष्ठेचीं उदाहरणें झालीं.

### व्यवहाराची पुनर्घटना–खर्च कमी करणें हाच एक उपाय

अशा परिस्थितींत उद्योन्मुख प्रगतिपर कंपन्यांच्या सुज्ञ चालकांनीं आपल्या कंपन्यांच्या व्यवहाराची आमूलाग्र पुनर्घटना करणें योग्य आहे व त्याप्रमाणें कित्येक चालक करीतहि आहेत. मूळ अपेक्षित दरानें कंपनीस कांहीं काळ तरी व्याज सुटणार नाहीं हें ठरल्यावर हप्त्यांत वाढ करणें क्रमप्राप्तच होतें. हप्ते वाढविण्याचा विचार बहुतेक कंपन्या करीत आहेत. अर्थात् नव्या विम्यांवरच हे

नवे हप्ते बसतील आणि त्या कारणानें वाढलेल्या दरांच्या विम्यांची संख्या पुष्कळच होईपर्यंत कंपनीच्या परिस्थितीवर त्यांचा प्रभावी सुपरिणाम घडलेला दिसून येणार नाहीं. खर्चाचें मान कमी करणें कंपन्यांना आतां क्रमप्राप्त झालें आहे, परंतु त्यासहि मर्यादा आहेत. एजंटांचें कमिशन कमी केल्यानें कंपनीस पुरेसें काम मिळत राहील किंवा नाहीं ह्याचा विचार साहजिकच कंपन्या करतील. परंतु, हप्त्यांचे रकमेंत तरतूद केलेली असते, त्यापेक्षा ज्यास्त रकम एजंटांच्या कमिशनवर खर्च करणें युक्त होणार नाहीं, हें उघड आहे. व्याजाच्या बाबतींत कुचंबणा चालू असतांना खर्च प्रमाणाबाहेर चालू ठेवणें केव्हांहि अयोग्यच ठरेल. कमी कमिशनवर एजंट काम करतील का? एजंटांची आजच परिस्थिति अत्यंत बिकट झाली असून, विमा व्यवसाय हा त्यांस जोडधंदा म्हणूनच करावा लागतो. त्यांचें कमिशन कमी केलें म्हणजे साहजिकच त्याचा परिणाम एजंटांच्या कामावर घडून येईल. जोडधंदा म्हणून विम्याची एजन्सी घेणारांवरच कंपन्यांना बहुंशीं अवलंबून रहावें लागेल. कमी दरानें मूल्यमापन केल्यामुळेंच केवळ ज्या कंपन्या मोठी तूट दाखवूं लागतील, परंतु इतर दृष्टींनीं ज्यांची परिस्थिति असमाधानकारक नाहीं, अशांना सरकारकडून विशिष्ट अटींवर सुधारण्यासाठीं कांहीं वर्षांची सवड मिळणें अत्यंत अवश्यक आहे.

## शेती सुधारणा व सहकार

( रा. ब. डॉ. सहस्रबुद्धे ह्यांच्या पुणें सहकारी सप्ताहांतील भाषणाचा सारांश )

सहकार हा अनादिकाळापासून आपलेकडेच नव्हे तर सर्वत्र चालू आहे. परिस्थितिप्रमाणें त्यांत फरक पडत गेला. शेतकऱ्यांच्या परस्पर सहकाराचा विचार करतां त्यास सहकारापासून पुष्कळच फायदा होण्याजोगा आहे. शेतकरी म्हटला, कीं जमीन आली. जमिनींत पिकणारा माल कमी प्रमाणांत, कमी खर्चांत व कमी वेळांत अधिकाधिक कसा उत्पन्न होईल त्याच्या मोबदल्यांत ज्यास्त पैसा कसा मिळेल, हें पाहिलें पाहिजे.

(१) जमिनीचा कस टिकविण्यासाठीं तिचें पावसानें धुवून जाऊं देणें थांबविलें पाहिजे. त्यासाठीं ताली व बंधारे घातले पाहिजेत. ह्या कामीं सर्वांनीं सहकार्य केलें तरच त्याचा उपयोग आहे. कांहींनीं ताली घातल्या व बाकीच्यांनीं नाहीं घातल्या तर तें योग्य नाहीं.

(२) औतें सर्वांनीं सहकारानें विकत घेतलीं तर त्यांचें भाडें कमी पडून कालांतरानें तीं शेतकऱ्यांच्या मालकीचीं होतील.

(३) विहिरी खोदून व तळीं बांधून गावासाठीं पाणीपुरवठा केला पाहिजे.

(४) निरोगी बीं पैदा करून त्याची लागवड केली पाहिजे.

(५) पिकांवरील रोग नाहींसा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

(६) उत्पन्न झालेला माल दलालामार्फत न विकतां शेतकऱ्यांनीं आपल्या स्वतः तर्फेच विकावा. त्यामुळें दलाली-वजनांतील लफ्करी इत्यादींपासून शेतकऱ्यांचें होणारें नुकसान टळेल.

ह्याप्रमाणें गावकऱ्यांनीं वागल्यास त्याचा मोबदला त्यांना खास मिळेल व त्यांची आर्थिक स्थिति सुधारेल. पैशापेक्षा सहकारी वृत्तीचाच हा प्रश्न आहे.

## घरांचा तुटवडा

युद्धोत्तर पुनर्घटनेचें काम किती बिकट आहे, ह्याची कल्पना आज योजना आखण्याचेंच केवळ काम चालू आहे, अशा वेळीं येणें शक्य नाहीं. योजना आखणें व ती पार पाडणें ह्यांत पुष्कळ वेळा भयंकर तफावत पडते. जेथें आंतरराष्ट्रीय सहकार्याचा प्रश्न येईल, तेथें तर अडचणी आणखी वाढतात. ग्रेट ब्रिटनमधील घरें बांधण्याच्या योजनेचाच विचार केला, तर त्यांतील अडचणींची कल्पना येऊन एकंदर प्रश्नाचा अवाढव्यपणा लक्षांत येईल. हिंदुस्थानांतील लोकांच्या रहाणीचें मान वाढविण्याची कल्पना मूर्त स्वरूपांत आणणें कसें कठीण आहे, हेंहि त्यावरून स्पष्ट होईल.

गेल्या महायुद्धाचे अखेर ग्रेट ब्रिटनमध्यें ११ लक्ष घरांचा तुटवडा पडलेला आढळला. जुन्या व टाकाऊ घरांची जागा भरून काढण्यासाठीं दरसाल आणखी १ लक्ष नवीं घरें आवश्यक होतीं, तीं वेगळींच. घरांचा तुटवडा इतका तीव्र होता, तरी युद्धानंतरच्या पहिल्या दोन वर्षांत फक्त ३० हजार घरें बांधून पुरीं झालीं. सरकारनें घरें बांधणारांस मदत करण्याचें धोरण अंगिकारलें. १९३१ नंतर नव्या घरांचे संख्येंत पुष्कळच वाढ होऊं लागली. १९१९–१९३१ ह्या काळांत १४,२०,००० घरें तयार झालीं; १९३१–१९३९ मध्यें २३,००,००० घरांची भर पडली; म्हणजे, १९१९–१९३१ च्या काळाचें मानानें ४०% घरें ज्यास्त बांधून झालीं. १९३९ च्या सप्टेंबरमध्यें घरें बांधण्याचें काम बंद पडलें.

चालू युद्धाचे अखेरीस किती घरांचा तुटवडा आढळून येईल, ह्यासंबंधीं तेथील सरकारनें अंदाज केला आहे. त्यावरून १० वर्षांत ४० लक्ष नवीं घरें बांधून झालीं पाहिजेत असें समजतें. कांहीं घरें बॉंबहल्ल्यामुळें नाश पावलीं आहेत, कांहीं नादुरुस्त झालीं आहेत. विवाहामुळें बिऱ्हाडांची संख्या वाढत आहे. वरील प्रमाणें दरसाल ४ लक्ष घरें बांधून शिवाय आणखी वार्षिक २ लक्ष नवीं घरें जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांची जागा घेण्यासाठीं हवींतच. म्हणजे, प्रतिवर्षी ६ लक्ष नवीं घरें बांधून तयार झालीं पाहिजेत. ग्रेट ब्रिटनमध्यें घरबांधणी कळसास पोंचली त्या वर्षी म्हणजे १९३६ सालीं ३,४६,००० घरें तयार झालीं हें लक्षांत घेतलें म्हणजे दरसाल ६ लक्ष ह्याप्रमाणें १० वर्षांत ६० लक्ष घरें बांधणें कसें कठीण आहे, तें लक्षांत येईल.

हें कठीण काम पार पाडण्यासाठीं घरबांधणीची पद्धत बदलावी लागेल. पाया खोदणें घराच्या जागेवरच केलें पाहिजे, परंतु खिडक्या दारें, जिने, पट्या, इत्यादि कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर तयार करून आवश्यक त्या बाबी घराचें ठिकाणीं नेऊन तेथें फक्त जुळणीचें काम करावयाचें अशी अमेरिकेंतील सध्याची पद्धत ग्रेट ब्रिटनमध्येंहि चालू होईल. ग्रेट ब्रिटनमध्यें लाकडाचा तुटवडा पडेल, त्याची जागा कॉंक्रीट व हलके धातू ह्यांनीं भरून काढावी लागेल.

### पारशी भिकाऱ्याची ५० हजारांची इस्टेट

मुंबई येथें एका पारशी भिकाऱ्याचा गेल्या आठवड्यांत खून झाला, तेव्हां पोलीस चौकशींत, त्याचे जवळ ५० हजार रुपयांची मालमत्ता होती, असें आढळून आलें. कंपन्यांचे शेअर्स, सरकारी रोखे, इत्यादींमध्यें त्यानें पैसे गुंतविलेले होतें व त्याचें बँकेंत खातेंहि होतें.

# स्फुट विचार

## युद्धोत्तर हिंदी स्वदेशी धंदे

युद्धोत्तर काळांत उपस्थित होणाऱ्या अवघड आर्थिक प्रश्नांचा विचार एव्हांपासून केला जावा आणि त्यांची उत्तरें वेळींच तयार करून ठेवावीं असें इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत सरकारास व लोकांस वाटत आहे आणि त्याप्रमाणें तेथें चर्चा व योजना चालू आहेत. त्याच धर्तीवर हिंदुस्थानांतहि भावी परिस्थितीस अनुलक्षून उपायचिंतन होण्याची आवश्यकता भासली आहे आणि त्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें कित्येक अधिकाऱ्यांच्या समित्या व सल्लागार मंडळें नेमलीं आहेत. त्यांपैकीं अर्थशास्त्रज्ञांच्या सल्लागार समितीची तिसरी सभा नुकतीच दिल्ली येथें सर अझीज-उल् हक ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. तीमध्यें झालेल्या चर्चेचा त्रोटक वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असें दिसतें कीं युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार आणि हिंदी धंद्यांची प्रगति ह्यांचे संबंधांतील इष्ट धोरणाच्या प्रश्नांवर अर्थशास्त्रज्ञांनीं अभिप्राय व्यक्त केला. व्यापार आणि जकाती ह्यांचे बाबतींत परराष्ट्रांशीं हिंदुस्थानचे करार व्हावे व त्यांमध्यें स्वदेशीं धंद्यांच्या संरक्षणाची योग्य तरतूद असावी हें त्यांचें मत सर्वमान्य होण्यासारखें आहे. हिंदुस्थानच्या मोठ्या शिलका लंडन येथें स्टर्लिंगमध्यें जमा झाल्या आहेत व होत आहेत, त्यांचा उपयोग स्वदेशी धंद्यांस लागणारी यंत्रसामुग्री आयात करण्याकडे व्हावा आणि धंद्यांचें महत्त्व ध्यानांत घेतलें जाऊन तिची वांटणी केली जावी असेंहि सर्वसाधारण मत पडलें. सर जरेमी रेसमन, हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, ह्यांनीं दिल्लीच्या सभेंत उपस्थित होऊन तिच्या विचारविनिमयांत भाग घेतला. त्यांनीं असा सल्ला दिला कीं, हिंदी कारखानदारांनीं आज स्वतःचे हातांत येणाऱ्या नफ्याचा योग्य अंश गंगाजळींत राखून ठेवावा म्हणजे युद्धोत्तर काळांत अनुकूल परिस्थिति येतांच औद्योगिक प्रगतीकडे त्याचा उपयोग करतां येईल. ह्या गंगाजळयांचा दुसरा फायदा असा होईल कीं, व्यवहारांत फाजील चलन खेळल्यामुळें होणाऱ्या महागाईस आळा बसेल. युद्ध संपल्यानंतर आर्थिक पुनर्घटना होईल आणि राष्ट्रीय आर्थिक घटनेस पोषक वळण यावें लागेल, त्यावेळीं देशी धंद्यांचें संरक्षण, त्यांस भांडवलाचा भरपूर पुरवठा आणि परराष्ट्रीय व्यापाराबाबत सवलतींची व्यवस्था ह्या गोष्टी जिव्हाळ्याच्या ठरतील. ह्यासाठीं त्यांचा राष्ट्रहिताच्या दृष्टीनें निकाल केला जाणें आगत्याचें आहे. युद्धोत्तर पुनर्रचनेंत हिंदी राष्ट्रीय मतास मान व महत्त्व मिळेल त्या मानानें हा परिणाम घडून येईल हें उघड आहे.

## जागतिक सुस्थिति आणि हिंदुस्थान

वरील विचारसरणी ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांनीं युद्धोत्तर पुनर्घटनेच्या मूलभूत तत्त्वांविषयीं केलेल्या घोषणेस विसंगत नाहीं. ह्या पुनर्घटनेंत सर्व राष्ट्रांचें सहकार्य व्हावें लागेल ह्यांत संशय नाहीं, परंतु तीमध्यें हिंदुस्थानासारख्या मागसलेल्या देशाच्या हितसंबंधाचें संरक्षण होण्याची आवश्यकता प्रतिपादणें अनुचित आहे असें मानणें चुकीचें आहे. युद्धामुळें उध्वस्त झालेल्या देशांची दैना दूर करून त्यांची आर्थिक घडी नीट बसवून देणें हें महत्वाचें कार्य युद्ध संपतांच केलें जाणें जागतिक सुस्थितीच्या दृष्टीनें अपरिहार्य व इष्ट आहे. त्यासाठी जगांतील चव्वेचाळीस राष्ट्रांनीं एकमतानें एक योजना आंखली असून तींत हिंदुस्थान सहभागी आहे. ह्या योजनेच्या खर्चाचा अंश प्रत्येक राष्ट्रानें विशिष्ट प्रमाणांत उचलावयाचा आहे. हिंदुस्थानानें द्यावयाची रक्कम निश्चित झाली आहे आणि ती ह्या देशाच्या आर्थिक सामर्थ्याच्या मानानें भारी आहे अशी समजूत झाली होती, तिचें आतां निराकरण केलें जात आहे. बंगालमधील दुष्काळाची भीषण परिस्थिति आपल्या विचाराच्या कक्षेंत येत नाहीं असें चव्वेचाळीस राष्ट्रांच्या सुस्थितिस्थापक समितीनें ठरविल्याच्या बातमीनें वरील गैरसमज तीव्र झाला होता. प्रत्येक राष्ट्रानें आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या एक टक्काइतकी रक्कम वर्गणी म्हणून द्यावी अशी कल्पना सर्वसाधारणपणानें निश्चित झालली आहे आणि ह्या एकूण व्यवस्थेस हिंदुस्थान सरकारनें मान्यता दिली आहे ह्या वृत्ताचा प्रतिकूल परिणाम हिंदी लोकमतावर झाला असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. आतां असें सांगण्यांत येत आहे कीं, वर्गणीच्या बाबतींत हिंदुस्थान सरकारनें कोणत्याहि रकमेस किंवा प्रमाणास स्वतःस बांधून घेतलेलें नाहीं, एवढेंच नव्हे तर चव्वेचाळीस राष्ट्रांनीं पार पाडावयाच्या सुस्थितिस्थापनेच्या योजनेस सशर्त संमति दिली आहे आणि हिंदी मध्यवर्ती कायदेमंडळाच्या मंजुरीच्या अटीवर ही मान्यता अवलंबून ठेवली आहे. प्रस्तुत योजनेंत भाग घेतल्यानें ह्या देशाचा दर्जा वाढणार आहे असें सांगण्यांत येत आहे. त्याबरोबरच, 'शेजारणीनें सरी घातली म्हणून आपण दोरी घालावयाची नाहीं ' ह्या म्हणीची आठवण करून देण्यांत येत आहे. म्हणून ह्या सबंध प्रश्नाची विस्तृत चर्चा मध्यवर्ती कायदेमंडळांत होऊन त्याचा योग्य निर्णय केला जाणें अगत्याचें आहे, इतकें त्याचें महत्त्व आहे ह्यांत संशय नाहीं.

## बंगाल दुष्काळनिवारण

बंगालमधील भीषण दुष्काळी परिस्थिति थोडक्यांत सुधारेल अशी कल्पना करणें केव्हांहि चुकीचें ठरलें असतें. तथापि, हिंदुस्थान सरकार आणि त्याचें लष्करी खातें ह्यांनीं दुष्काळ निवारणाची विशेष जबाबदारी स्वतः उचलल्यामुळें ह्या कामीं बरीच प्रगति होत आहे असें तिकडच्या बातम्यांवरून दिसतें. एक तर कलकत्ता शहर आणि त्याचा परिसर मिळून सुमारें तीस लक्ष लोकसंख्येच्या अन्नपुरवठ्याचें कार्य प्रत्यक्ष मध्यवर्ती सरकार करीत आहे. बंगालच्या निरनिराळ्या जिल्ह्यांत व विशेषतः दुष्काळपीडित भागांत खेडेगांवांतून धान्याची टंचाई भासत आहे, ती दूर करणें अवघड झालें होतें. तें काम लष्करी खातें करीत आहे. लष्करी लॉऱ्यांमधून धान्याची वहातुक होत आहे आणि त्याची वांटणी झपाट्यानें व मोठ्या प्रमाणावर चालली आहे. ह्या वहातुकीविषयीं प्रसिद्ध झालेले आकडे उत्तेजनकारक आहेत. तसेंच, खेडेगांवचे लोकांस कपडे व औषधें पुरवणें ह्यासंबंधांतहि लष्करी खात्याची उत्कृष्ट मदत होत आहे. खेडेगावी आरोग्याचीहि काळजी घेण्यांत येत असून त्यासाठीं लष्करी खातें डॉक्टर व इतर तज्ञ अधिकारी पुरवीत आहे. ह्या सर्वांचें व प्रांतिक सरकारच्या अधिकाऱ्यांचें कार्यक्षम सहकार्य होईल अशी अपेक्षा आहे. असें झाल्यास बंगालमधील दुष्काळनिवारणाच्या कार्यक्रमांत त्वरित प्रगति होईल, असें मानण्यास जागा आहे. बंगालच्या बिन-

सरकारी सहाय निरनिराळ्या मार्गांनीं होत आहे. लहान मुलें व अर्भकें ह्यांस दुधाचा पुरवठा करण्यांत येत आहे आणि निराश्रित व आजारी लोकांच्या औषधपाण्याची व्यवस्था चालू आहे. बंगालच्या अनुभवानें शहाणें होण्याची आवश्यकता देशाच्या इतर भागांत होत आहे हें सुचिन्ह आहे.

## सर्व आघाड्यांवर मित्र राष्ट्रांची प्रगति

हिंवाळ्यांत आपलीं ठाणीं घट्ट धरून बसून रशियन सैन्यांची चाल कुंठित करून टाकावयाची असा जर्मन लष्करी नेत्यांचा इरादा होता आणि ह्या सैन्याची प्रगति विशेष होणार नाहीं अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु ह्या त्यांच्या कल्पना खोट्या ठरून त्यांचे सर्व लष्करी अंदाज चुकले आहेत. सबंद पूर्व आघाडीवर जर्मनीची सारखी पिछेहाट होत असून रशियन फौजांस सैनिक व शस्त्रास्त्रें ह्यांचा यत्किंचितहि तुटवडा भासलेला नाहीं. युरोपांत पश्चिम व दक्षिण बाजूंनीं चालू व्हावयाच्या आघाड्यांबाबत मित्र राष्ट्रांच्या मुत्सद्यांचे कांहींहि बेत निश्चित होवोत, जर्मन शहरांवर चाललेल्या ब्रिटिश व अमेरिकन विमानांच्या बाँब हल्ल्यांनीं जर्मन युद्धयंत्र खिळखिळें करण्यास प्रारंभ केला आहे ह्यांत शंका नाहीं. बर्लिनवर झालेल्या प्रचंड हल्ल्यांनीं केलेल्या भयंकर नाशाची कबुली जर्मनीनेंच दिली असून त्याचें उट्टें आपण इंग्लंडवर विमानांचे हल्ले चढवून काढूं आणि जर्मन जनतेनें भिण्याचें कारण नाहीं असें आश्वासन नात्सी पुढाऱ्यांस द्यावें लागलें आहे. मित्र राष्ट्रांचें वैमानिक बल आतां इतकें वाढलें आहे आणि जर्मनीचें लष्करी सामर्थ्य हळूहळू पण खात्रीनें असें खची होत चाललें आहे कीं ह्या तऱ्हेनें आपल्या लोकांचें सांत्वन करण्यावांचून त्यांस गत्यंतर राहिलेलें नाहीं. पॅसिफिक महासागरांत अमेरिकन वैमानिक व सैन्यें ह्यांची चालू असलेली चढाई समाधानकारक आहे आणि ती जपानला चांगली जाणवत असल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. इटलींत ब्रिटिश-अमेरिकन सैन्यांस जर्मनीचा विरोध जोरानें होत असला तरी त्यांचें पाउल हळूहळू पण निश्चयानें पुढें पडत आहे. ब्रह्मदेशांतील जपानी ठिकाणांवर अविरत हल्ले होत असून तिकडील आघाडीवर युद्धाच्या मोठ्या हालचाली लवकरच चालू होतील असें हिंदुस्थानच्या सेनापतींनीं नुकतेंच बोलून दाखविलें आहे. जपान हा अत्यंत चिकट शत्रू असल्यानें त्याचेवर निश्चयानें व चिकाटीनें चढाई करणें अगत्याचें आहे असें त्यांनीं सांगितलें आहे.

## मुंबई प्रांतांतील शिक्षण प्रगति

१९४२–४३ मध्यें मुंबई प्रांतांतील शिक्षण संस्थांत १८९ संस्थांची घट होऊन त्यांची संख्या २२,५८२ झाली. विद्यार्थ्यांची संख्या १८,०९,७३८ होती. म्हणजे, १९४१–४२ च्या मानानें ४५,५४७ विद्यार्थी कमी होते. एकूण २१,६५७ गावांपैकीं १३,९८२ गांवांत शाळा होत्या. सरासरीनें प्रत्येक ५३ चौरस मैल क्षेत्रांत एक शाळा, असें प्रमाण पडलें. एकूण पुरुष लोकसंख्येशी शाळेंत जाणाऱ्या मुलग्यांचें प्रमाण शेकडा १२·१८ व स्त्री लोकसंख्येशीं मुलींचें प्रमाण शेकडा ४·९० पडलें. शिक्षणावर एकूण खर्च ४ कोटि, ९४३ लक्ष रुपये झाला, त्यांपैकीं ४२·६% खर्च सरकारनें केला; १६·९% बोर्ड फंडांतून भागला व २८·१% खर्चाची तरतूद फीच्या वसुलींतून झाली. केवळ प्राथमिक शिक्षणावर २ कोटि, २७ लक्ष रुपये खर्च झाला. मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिकच्या परीक्षेस १७,८८९ विद्यार्थी बसले, त्यांतले ९,३९० उत्तीर्ण झाले. विश्वविद्यालयाचा एकूण खर्च १७ लक्ष रुपये झाला. सरकारनें चालविलेल्या प्राथमिक शिक्षणाच्या ३६ शाळा असून त्यांत ५,१०३ विद्यार्थी होते. लोकलबोर्डाच्या १०,००८ शाळांत ७,८३,१६९ विद्यार्थ्यांचें शिक्षण चालू होतें. १,८१७ म्युनिसिपल शाळांत ३,८४,५०४ मुलें होतीं. सरकारी मदत मिळणाऱ्या ७,७६० शाळांत ३,५०,८८६ मुलें शिकत होतीं.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम. २४ डे. जि. पुणें ४)

मध्यंतरी एक महिना कंटाळवाणा काढल्यानंतर मागील पंधरवडा शेअर बाजाराला बऱ्या हालचालीचा गेला. बाजाराला स्फुरण येण्याचें कारण गिरण्यांना घसारा टाकण्याच्या प्रमाणांत सवलती मिळण्याची शक्यता, सरकारनें तो प्रश्न पुन्हा विचारांत घेण्याचें ठरविल्यानें, उत्पन्न झाली. तसेंच कांहीं शेअर्स इतरांच्या मानानें वाढले नाहींत मग ते वाढावयास हवेत याच केवळ कारणानें इ. डी. (इंडिया युनायटेड) डिफर्डसारख्या शेअर्सनीं बाजाराला वर खेंचले जाण्यास मदत केली. इंडियन कॉपरचा भाव २-११ पासून ३ रु. पर्यंत एक दिवसांत चढला. टाटा पॉवरनें तर प्रेक्षणीय उडी मारली. शुक्रवारीं १८९० पासून १९९० पर्यंत भाव कडाडला. मुंबईंत गॅस नियंत्रण सुरू होणार असल्यानें वीज कंपन्यांचें उत्पन्न वाढण्याचा संभव आहे व व्याजही जास्त वाढले जाणार आहे या समजुती मुळाशीं होत्या. अजूनही विशेष वाढले नाहींत असे शेअर्स विशेषत: अपोलो, इंडिया युनायटेड ऑर्डिनरी, गोकाक, मॉडेल यांना तेजी यावयास हरकत नाहीं.

रेल्वे शेअर्स नेहमीप्रमाणें तीन टक्क्यांच्या पातळींत स्थिर आहेत. ज्यांना हालचाल नको आहे व ठीक व्याज पाहिजे त्यांनीं दार्जिलिंग हिमालय रेल्वे उचलण्यास हरकत नाहीं, भाव ११० पर्यंत असून साधारण यापुढें ५॥ रु. करमाफ व्याज मिळावें. तसेंच कंपनी सरकार १९४९ सालीं घेणार तेव्हां भागीदारांना त्या वेळच्या किंमतीवर २० टक्के बक्षिशी मिळावयाची आहे.

टाटा ऑर्डिनरी व डिफर्ड यामध्यें जरी थोडी तेजी आली तरी आज सहा महिने हे दोन्ही ३९२-४०० व १९३०-२००० च्या दरम्यान ६ व ६॥ टक्क्यांच्या पातळींत घोटाळत आहेत. प्रमुख दलाल यांना जरी जास्त व्याज सुटत असलें तरी संभाव्य परिस्थितीमुळें गुंतविणारास सुचवत नाहींत. या दृष्टीनें प्रमुख कापड गिरण्यांचे शेअर्स, विशेषत: मुंबईकडच्या, शिफारसले जात आहेत.

एकूण चालू भावांत सर्व धंद्यांच्या अनुकूल–प्रतिकूल बाबी व यौद्धिक परिस्थिति हीं विचारांत घेतलीं गेलेलीं दिसत आहेत व म्हणून भावांत सध्यांतरी विशेष फेरफार होण्याचें कारण दिसत नाहीं.

### ग्रामसुधारणा बक्षीस

ग्रामसुधारणेबद्दलचें १०० रुपयांचें बक्षीस कांस्रूड (हवेली तालुका, पुणें जिल्हा) गावास देण्यांत आलें आहे.

## पानें कुजून झालेल्या मातीचें संमिश्र खत

निजाम सरकारच्या शेतकी प्रचार खात्याच्या प्रयत्नामुळें खाळीच्या जमिनींत भुईमुगाचें खत चोहोंकडे उपयोगांत आणलें जात असून या खताचें महत्त्व शेतकऱ्यांना आतां चांगल्या रीतीनें पटूं लागलें आहे. खाळीसाठी तें फारच योग्य असल्याचें दिसून आलें आहे आणि या खतामुळें शेतकऱ्यांना एरवी होणाऱ्या पिकांत शेंकडा १५ ते २० टक्के वाढ होते असा अजमास आहे.

या खतास दुसरें एक पूरक खत म्हणून पानपाचोळा व शेताच्या आवारांतील केरकचरा यापासून स्वस्त व उपयुक्त शेण-मिश्रित असें सेंद्रिय खत शेतकऱ्यांना तयार करतां येणें शक्य आहे. या खतास 'पानें कुजून झालेल्या मातीचें संमिश्र खत' म्हणतात. हें खत तयार करण्याची कृति खालीलप्रमाणें आहे:—

### खत तयार करण्याची रीत

जमिनीवर अथवा कांहीं अंशीं जमिनींत खड्डा करून व त्यावर देखील केरकचऱ्याचा ढीग सांचवून हें पूरक खत तयार करतां येतें. ३० × १४ × ३ ते ४॥ फूट आकाराचा खड्डा यासाठी सोईस्कर असतो व ढिगाच्या उंचीनुसार त्यामध्यें ६ ते ८ टन खत मावूं शकतें. हें खत खड्ड्यामध्यें कसें तयार होतें त्याची माहिती पुढें दिली आहे—

(१) प्रथम एक फूट जाडीचा मातीचा थर द्यावा आणि त्यावर पानपाचोळ्याचा अथवा शेत-आवारांतील केरकचरा यांचा ६ ते ९ इंच जाडीचा थर टाकावा.

(२) नंतर त्यावर चांगला शेणसडा आणि गटारांतील सांचलेलें पाणी याचा सडा टाकावा. (५०० शेर पाण्यांत २॥ ते ५ शेर शेण कालवावें)

(३) नंतर पुनः पानपाचोळ्याचा थर द्यावा आणि पांच ते सहा फूटपर्यंत उंच ढीग बनेपर्यंत असाच क्रम चालू ठेवावा.

(४) हा ढीग मातीनें लिंपून घ्यावा आणि सर्व ढीग चांगला भिजावा म्हणून त्यावर पुष्कळ पाणी शिंपडावें.

(५) ७ ते १० दिवसांनंतर हा ढीग उकरून दाताळें व दुबेळकें यांच्या साह्यानें खालीवर करावा.

(६) ढिगांतील द्रव्यें कोरडीं असल्याचें दिसून आल्यास त्यावर पुन्हां पाणी शिंपडावें आणि मातीनें तो लिंपून घ्यावा. म्हणजे प्राणवायु-विपाकानें त्यामधील नायट्रोजन बाहेर जाणार नाहीं.

(७) दोन तीन आठवड्यांत हें खत शेतामध्यें टाकण्यास योग्य होतें.

(८) कमी पाणी लागावें व अमोनिया-क्षार उडून जाण्यास कारणीभूत होणाऱ्या उष्ण वायूपासून बचाव व्हावा या दृष्टीनें हें खत खड्ड्यांत तयार करतेवेळीं एका बाजूस थोडीशी मोकळी जागा ठेवण्यांत येते, कारण ढीग खालीवर करतेवेळीं या रिकाम्या जागेचा उपयोग होतो.

नवी दिल्ली येथील कृषिसंशोधन मंडळाच्या डायरेक्टरनें केलेल्या प्रयोगांत शेतामध्यें कुजलेला पानपाचोळा उपलब्ध असलेल्या ठिकाणीं हें संमिश्र खत तयार केलें व त्यासाठी पावसाच्या पाण्याचा उपयोग केला गेला. हें खत तयार करण्यासाठी प्रत्येक हंड्रेडवेटास (११२ पौंड) ३ पै खर्च आला. कर्नाल प्रायोगिक केंद्रांत असेच प्रयोग करण्यांत आल्यावरून खर्चाचें प्रमाण दर मणीं ७ पै आलें, मात्र माल वाहून नेण्यास खर्च लागूं नये म्हणून शेताच्या बाजूसच हें खत तयार करण्याचे प्रयोग करण्यांत आले.

या संमिश्र खताशिवाय अमोनिअम सल्फेट अथवा इतर नायट्रोजनचें मिश्रण घालण्याची आवश्यकता नाहीं. हें संमिश्र खत तयार होतेवेळीं शेवटीं अमोनिअम सल्फेट, पेंड आणि हाडाचें खत मिसळल्यास चालेल. शेतांमधून हें खत घालतेवेळीं अमोनिअम सल्फेट, पेंड व हाडाचें खत मिसळल्यास तें अधिक चांगलें असतें.

जंगलाच्या आसपास वास्तव्य करीत असलेल्या शेतकऱ्यांना जंगल क्षेत्रांतील पानपाचोळा जमा करण्याची व त्यापासून स्वतःसाठी वरील संमिश्र खत तयार करण्याची अधिक चांगली संधि असते. वर दर्शविलेल्या पद्धतीनें तयार करण्यांत आलेल्या खतासंबंधींची टंचाई नाहींशी होईल, येवढेंच नाहींतर तें इतर सुपीक खताच्या मानानें अधिक स्वस्तहि पडेल. कमी किंमतींत जास्त प्रमाणांत खत मिळावें म्हणून आपल्या शेतावर असे खड्डे तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना सल्ला देण्यांत आल्यास बरें होईल.

## सहकारी दिन

### बेलापूर रोड

बेलापूर रोड येथें प्रवरा कॅनॉल व राहुरी तालुका कोऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियनतर्फें सहकारी दिन साजरा करण्यांत आला. समारंभाचे अध्यक्षस्थान रेसिडेंट मॅजिस्ट्रेट श्री. देशपांडे यांनीं स्वीकारलें होतें. ग्रामस्थ मंडळी व आसपासच्या शेतकी पतपेढ्यांचे सभासद मिळून ७५ समुदाय उपस्थित होता. सभेंत श्री. तांबेकर बँकइन्स्पेक्टर व श्री. चितांबर युनियन सुपरवायझर यांची सहकारी चळवळीविषयक भाषणें झालीं.

### अश्वी

अश्वी येथें अश्वी को. के. सोसायटी व तिच्या आसपासच्या ५ सोसायट्यांतर्फें सहकारी दिनसमारंभ श्री. रावसाहेब शिंदे मामलेदार (संगमनेर) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सभेंत एकंदर १२५ ते १५० समुदाय हजर होता. श्री. तांबेकर, बँक इन्स्पेक्टर, यांनीं सोसायटीचा इतिहास थोडक्यांत सांगून या भागांत सोसायट्या कशा कामगिरी करीत आहेत व त्यामुळें शेतकऱ्यांचा किती व कसा फायदा होत आहे. याचें वर्णन केलें. नंतर श्री. चितांबर, युनियन सुपरवायझर, यांनीं चालू शेतीच्या मालाच्या वाढत्या भावाच्या परिस्थितींत सोसायट्यांच्या सभासदांनीं कोणती दक्षता बाळगावी हें सांगून सहकारी तत्त्वाचा खेडेगांवांतून प्रचार करणें किती जरूर आहे हें निवेदन केलें.

### सात्रळ

सात्रळ येथें सहकारी दिन श्री. कुलकर्णी, कंपेन्सेशन ऑफिसर, राहुरी, यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. सभेस एकंदर ७५ ते १०० समुदाय हजर होता. समारंभास युनियन प्रेसिडेंट श्री. मा. ल. पाटील हेहि हजर होते. श्री. चितांबर युनियन सुपरवायझर व श्री. तांबेकर बँक इन्स्पेक्टर ह्यांचीं भाषणें झालीं.

### भिवंडी

भिवंडी येथें सहकारी दिन साजरा करण्याकरितां ता. ६-११-४३ रोजीं सुपरवायझिंग युनिअनचे ऑफिसमध्यें सभा, सेवानिवृत्त डेप्युटी कलेक्टर व सेल परचेस युनिअनचे उत्साही कार्यकर्ते श्री. एम्. बी. सुंठे यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. चेअरमन श्री. शिवराम कृष्णाजी पाटील ह्यांचें भाषणें झालें.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

# संरक्षण — सुरक्षितता — सेवा

हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आतांच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस्, के. डब्ल्यू. फडके, फडके गणपतिवाडी, गिरगांव, बॅंक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस, 'रामनिवास' लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## अर्थशास्त्र

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

# विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यामुळे बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमियम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

## देशाच्या औद्योगीकरणार्थ

जागतिक व नव्या नव्या धनोत्पादक तीस हजार धंद्यांच्या औद्योगिक माहितीची मराठी, हिंदी व गुजराथी भाषेंतील लहानमोठीं शेंकडों पुस्तकें प्रकाशित करण्याकरितां त्या त्या भाषेंतील धनिक ग्रंथ-प्रकाशक व मुद्रक पाहिजेत. भेटा अगर लिहा.

घरबसल्या दीड हजार धंदे सप्रयोग शिकविणारी डिरेक्टरी सात आण्याचीं तिकिटें पाठवून अवश्य मागवा. व गांवोगांवीं धंदे उभारा.

औद्योगिक ज्ञानप्रसारक मंडळ

४४१ सदाशिव पेठ, पुणें २

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख ८ डिसेंबर, १९४३ अंक ४८

## दि बँक ऑफ इंडिया लि:

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२०,५०,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—एच्. ए. करीमभाई

## खारे काजू, मसालेदार काजू

सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काळा खजूर, अंजीर वगैरे मिळतील.

द. ना. हेजीब

(२) १० शुक्रवार, पुणें.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय

## पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७१ गणपति चौक, व्यवस्थापक

नागपूर शाखा:

गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

**भांडवल**

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

**महापुरुषांची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बँकांस सुटी

गुरुवार, ता. ९ डिसेंबर रोजी बकरीदनिमित्त बँका बंद रहातील.

### युद्धोत्तर वैमानिक वहातुक

युद्धोत्तर काळांत कोणत्याहि विदेशी कंपनीस हिंदुस्थानांतील वैमानिक वहातुकीवर ताबा मिळूं दिला जाणार नाहीं, असें आश्वासन सर रामस्वामी मुदलियार, सप्लाय खात्याचे प्रमुख, ह्यांनीं नुकतेंच दिलें.

### बंगालकडे कापड पाठविण्याची सोय

बंगालला वेळेवर कापडाचा पुरवठा व्हावा, ह्याकरितां मुंबईतून व अहमदाबादमधून दररोज प्रत्येकी दोन वॅगन्स बंगालकडे कापड धाडण्यासाठी उपलब्ध करून दिल्या जातील, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### बेलापूर कं. लि.

वरील कंपनीस ३० सप्टेंबर, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी १२ लक्ष, ७३ हजार रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागावर करमाफ ९ रु. डिव्हिडंड मिळणार आहे. प्रत्येक भाग ५० रु. किंमतीचा आहे. उसाच्या क्षेत्रांत मजुरांचा तुटवडा भासला त्यामुळें कारखान्यास वेळेवर ऊंस पोचूं शकला नाहीं; १९४३-४४ च्या मोसमासहि त्याचा परिणाम सोसावा लागेल, असें डायरेक्टरांनीं आपल्या रिपोर्टांत नमूद केलें आहे.

### श्री. के. आर. पी. श्रॉफ

मुंबई स्टॉक एक्सचेंजच्या अध्यक्षाचे जागीं श्री. श्रॉफ ह्यांची पुनः निवडणूक झाली आहे. दर वर्षास ५० हजार रुपये वेतन त्यांस मिळावयाचें आहे व नेमणूक पांच वर्षांकरितां आहे.

### बॉंबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लि.

वरील कंपनीनें ऑर्डिनरी भागावर प्रत्येकी २० रुपये करमाफ व प्रेफरन्स भागावर प्रत्येकी २५ रुपये ( इनकम टॅक्स कापून घ्यावयाचा ) डिव्हिडंड जाहीर केलें आहे. कंपनीचे हिशेब, डायरेक्टरांचा रिपोर्ट, इत्यादींच्या प्रसिद्धीस डिफेन्स ऑफ इंडिया नियमांखाली बंदी आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें २६ नोव्हेंबर, १९४३ अखेर संपलेल्या आठवड्यांत २६ कोटि, २९ लक्ष रुपयांच्या १,३५,३९० चेक्सची देवघेव झाली.

### गॅसच्या दिवाबंदीमुळें कोळशांत बचत

मुंबई शहरांतील रस्त्यांवरील गॅसचे दिवे रात्रीं १० वाजतां बंद करण्यांत येतात, त्यामुळें बॉंबे गॅस कंपनी लि. च्या गॅसच्या उत्पादनांत १६.६७% बचत होते.

### डॉक्टरांची फी दीडपट होणार !

जबलपूर येथील डॉक्टरांनीं सल्ला देण्याच्या व व्हिजिट फीमध्यें ५०% वाढ करण्याचें ठरविलें आहे, असें " महाराष्ट्र " नें प्रसिद्ध केलें आहे.

### कलकत्ता शहरांतील दुष्काळाचें निवारण

कलकत्ता व त्याचीं उपनगरें ह्यांतील लोकांना धान्य पुरविण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारनें स्वतःकडे घेतली आहे व ती पार पाडण्यासाठी तें सरकार १९४४ मध्यें ६,४६,००० टन धान्य बंगालमध्यें पोचतें करणार आहे.

### रेल्वेजवरील वाढती वहातुक

हिंदी रेल्वेजवरील वहातुक कमालीची वाढली आहे. १९३९ च्या मानानें चालू वर्षी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न ७८% वाढलें आहे. रेल्वेजवरील वाढत्या ताणाची कल्पना सदर्न मराठा रेल्वेसंबंधींच्या खालील आकड्यांवरून येईल.

| | १९३८-३९ चे मानानें वाढ. |
|---|---|
| पहिल्या वर्गाचे उतारूंची वहातुक | ६०५% |
| दुसऱ्या वर्गाचे " " | ३३९% |
| इंटर वर्गाचे " " | २२०% |
| तिसऱ्या वर्गाचे " " | ४४% |
| पार्सलें | १५६% |

### कापडावर किंमतीचे छाप

कांहीं विवक्षित जातींचें कापड सोडून बाकी सर्व कापडांवर आतां किंमत छापली पाहिजे. किंमत आकड्यांत व अक्षरांत लिहिली पाहिजे व त्यांची उंची किमान अर्धा इंच तरी असली पाहिजे. ठरवून दिलेली गिरणीची कमाल किंमत व किरकोळ विक्रीची कमाल किंमत ( मूळ किंमतींत २०% मिळवून ) हीं कापडावर छापलेली असणें आवश्यक आहे.

### हिंदी कपाशीची लागवड

| वर्ष | एकर |
|---|---|
| १९४३-४४ | १,४७,०१,००० |
| १९४२-४३ | १,६०,३३,००० |
| घट | ८% |

एकूण लागवडीपैकी २४-६% लागवड मुंबई प्रांतांत, १५.५% मध्यप्रांत वऱ्हाडांत व १५.१% पंजाबांत आहे. हैद्राबाद संस्थानाचे वाट्यास १४.३% लागवड येते.

### एक मोठी मॅनेजिंग एजन्सी मारवाडी गिरणीवाल्यांकडे आली

जेकब मिल्स, रॅचेल मिल्स, ई. डी. मिल्स, ॲलेक्झँड्रा मिल्स, मँचेस्टर मिल्स व टर्की रेड डाय वर्क्स ह्या गिरण्यांच्या गटाची मॅनेजिंग एजन्सी मेसर्स आगरवाल आणि कंपनीनें मेसर्स ई. डी. ससून आणि कं. लि. कडून विकत घेतली व १ डिसेंबर, १९४३ पासून नव्या एजन्सीकडे गिरण्यांची व्यवस्था आली. ह्या गटाचें मूळ नांव ई. डी. ससून युनायटेड मिल्स. लि. असें होतें, तें बदलून इंडिया युनायटेड मिल्स लि. असें ठेवण्यांत आलें. त्या गटांत ६,५२७ माग व २,४६,९८२ चात्या आहेत. मॅनेजिंग एजन्सीच्या खरेदीची किंमत ३ कोटि, ९५ लक्ष रुपये आहे.

### औषधें येणार

हिंदुस्थानांत लवकरच ५५० टन वजनाचीं औषधें दाखल होणार आहेत.

### हिंदी तांदळाची लागवड वाढली

| वर्ष | एकर |
|---|---|
| १९४३-४४ | ७,१७,७४,००० |
| १९४२-४३ | ६,७५,५४,००० |
| वाढ | ६% |

तांदळाच्या लागवडीची प्रांतवार वाटणी खालीलप्रमाणें आहेः– बंगाल, २९%; मद्रास, १३.३%; बिहार, १२.२%; मध्यप्रांत वऱ्हाड १०.२%; मुंबई, ३.२%.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ३७८ | व तेहरान येथील निर्णय | |
| २ हिंदी रेल्वेजची युद्धकालीन कामगिरी | ... ३७९ | ६ इन्कमटॅक्सबाबत निवाडा | ... ३८३ |
| ३ गिल्बर्ट बेटें | ... ३८० | ७ वैमानिक वहातुकीचा अजस्र खर्च | ... ३८३ |
| ४ प्रांतिक बँक व जिल्हा बँक | ३८० | ८ शेती संस्था | ... ३८३ |
| ५ स्फुट विचार | ... ३८१ | ९ युद्धपरिस्थितीचा चित्रपट निर्मितीवर परिणाम | ... ३८३ |
| धान्यपुरवठ्याच्या योजनेची अंमलबजावणी–जंगल खात्याची युद्धकामगिरी–कैरो | | | |



# अर्थ

बुधवार, ता. ८ डिसेंबर, १९४३


## हिंदी रेल्वेजची युद्धकालीन कामगिरी

प्रवासाचें आणि मालाच्या वहातुकीचें रेल्वेज हें आज हिंदुस्थानांत प्रमुख साधन आहे. पेट्रोलची टंचाई आणि मोटारींची दुर्मिळता ह्या योगानें प्रवास व वहातुक ह्यांचे बाबतींत जनतेचें रेल्वेजवरचें अवलंबन अधिकच वाढलें आहे. " अपरिहार्य असेल तेव्हांच प्रवास करा ", " बरोबर थोडें सामान न्या " व "वाफिणी फिरत्या रहातील अशी खबरदारी घ्या " अशा आशयाच्या सूचना रेल्वेजच्या अधिकाऱ्यांनीं सामान्य लोकांस व व्यापाऱ्यांस उद्देशून जाहिरातींच्या द्वारें केल्या आहेत. युद्धपरिस्थितींत लढाऊ साधनांच्या वहातुकीस अग्रस्थान दिलें जातें आणि त्याकरितां जनतेनें आपल्या मामुली मागणीस मर्यादा घालणें ह्या गोष्टी अगत्याच्या आहेत. तथापि, सामान्य जनतेची सोय शक्य तितकी पहाणें रेल्वे अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे ह्याविषयीं दुमत होण्याचें कारण नाहीं. अलीकडे दगडी कोळशाच्या पुरवठ्याचे संबंधांत अडचणी उपस्थित झाल्यामुळें कित्येक उद्योगधंद्यांची कुचंबणा होत असल्याच्या तक्रारी ऐकूं येत आहेत. मुंबई शहरांत कोळशाच्या धुराचे दिवे रस्त्यांमध्यें आहेत त्यांच्या उपयोगावर कोळशाच्या टंचाईमुळें मर्यादा घालण्यांत येत आहे, त्या योगानें होणाऱ्या गैरसोईविरुद्ध स्थानिक कॉर्पोरेशननें तक्रार केली आहे.

वहातुकीच्या व प्रवासाच्या सध्याच्या अडचणी आणि त्या दूर करण्यासाठीं रेल्वेजच्या अधिकाऱ्यांनीं चालवलेले प्रयत्न ह्यांची थोडीशी कल्पना इंडिअन रेल्वे कॉन्फरन्स असोसिएशनच्या दिल्ली येथें नुकत्याच भरलेल्या शेहेचाळीसाव्या अधिवेशनांत झालेल्या कांहीं भाषणांचे त्रोटक उल्लेख वृत्तपत्रांत आले आहेत त्यांवरून येते. ह्या संस्थेच्या वार्षिक परिषदेंत हिंदी रेल्वेजचे एजंट व मॅनेजर उपस्थित होऊन आपल्या कारभारांत येणाऱ्या प्रश्नांची चर्चा करतात आणि ते सोडवले जाण्यासाठीं उपाय सुचवतात. हिंदुस्थान सरकारचे रेल्वेमंत्री व अधिकारी स्वतःच्या धोरणाचें स्पष्टीकरण करतात आणि रेल्वेजची परिस्थिति व तिची सुधारणा ह्यांचेविषयीं माहिती देतात. वर निर्दिष्ट केलेल्या परिषदेचे अध्यक्ष, एम. एस. एम. आर. रेल्वेचे एजंट, मि. कॉर्डन, ह्यांनीं आपल्या भाषणांत वहातुकीचें साधन ह्या नात्यानें युद्धोत्तर काळांत रेल्वेजचें महत्व कायम राहील आणि विमानें, नावा व मोटारी ह्यांच्या स्पर्धेमुळें तें कमी होणार नाहीं असें सांगितलें. रेल्वेजचा उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्यांशीं जिव्हाळ्याचा संबंध असल्यानें वहातुकीचे दर योग्य प्रमाणांत निश्चित करण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली. हिंदी रेल्वेजची वहातुक युद्धकाळांत किती वाढली आहे हें दाखवण्यासाठीं मि. कॉर्डन ह्यांनीं स्वतःच्या रेल्वेचें म्हणजे एम. एस. एम. आर. चें उदाहरण दिलें. उतारूंच्या प्रवासाच्या मैलाचें प्रमाण पहिल्या वर्गाचें बाबतींत ६०५ टक्के, दुसऱ्या वर्गाचें ३३९ टक्के, इंटरक्लासचें २२० टक्के व तिसऱ्या वर्गाचें ४४ टक्के वाढलें आहे. ह्या वर्गवारीच्या वाढीवरून युद्धपरिस्थितीमुळें वरच्या वर्गाचे उतारू अधिक प्रवास करीत आहेत आणि एकूण वाढींत तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचा हिस्सा फारच थोडा आहे हें स्पष्ट दिसून येतें. पार्सलांच्या व मालाच्या इतर प्रकारांच्या वहातुकीचें उत्पन्न, जादा दर हिशेबांत न घेतां, १५६ टक्के वाढलें आहे.

सध्या रेल्वे प्रवासांत सामान्य प्रवाशांची भयंकर खेचाखेच होत आहे आणि लोकांस विलक्षण गैरसोयी सोसाव्या लागत आहेत ह्याची आपणास पूर्ण जाणीव असल्याचें युद्धवहातुक मंत्री, सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. कांहीं ठिकाणीं बसेसचा पुरवठा करून रेल्वेजवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यासारखा असला आणि त्यासंबंधांत दुसरेहि उपाय योजण्याचा प्रयत्न चालू असला तरी इंजनें व कोळसा ह्यांच्या सध्याच्या तुटवड्यामुळें फारशी प्रगति होण्याची आशा नाहीं असा ध्वनी त्यांच्या उद्गारांतून निघाला. मोठीं आणि लहान इंजनें देशांत बाहेरून आयात होत आहेत आणि प्रवाशांच्या अधिक गाड्या सोडण्यास त्यांचें सहाय होईल. तथापि, नादुरुस्त झालेलीं इंजनें चांगलीं होऊन, पुन्हां काम देऊं लागेपर्यंत वाफेच्या शक्तीचा पुरवठा पाहिजे तसा झाला असें म्हणतां येणार नाहीं. प्रस्तुत युद्ध चालू झाल्यापासून सध्याच्या घटकेपर्यंत हिंदी रेल्वेजनीं केलेल्या बहुमोल कामगिरीचें कौतुक मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सल्लागार समितीनें स्वयंस्फूर्तीनें व मनःपूर्वक केलें आहे त्याचा उल्लेख सर एडवर्ड ह्यांनीं केला आणि सर्व दर्जाच्या रेल्वे अधिकाऱ्यांनीं व कामगारांनीं चालवलेल्या एकनिष्ठ कार्याचा गौरव केला.

युद्धामुळें रेल्वे वहातुक किती वाढली आहे हें दर्शविणारे कांहीं आंकडे सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनींहि दिले. एप्रिलच्या प्रारंभापासून २० ऑक्टोबरपर्यंत, बिकानेर व म्हैसूर वगळून पहिल्या प्रतीच्या सर्व रेल्वेजवर मिळून, गेल्या वर्षाच्या ह्या मुदतीच्या मानानें ६ लक्ष, २७ हजार टन इतक्या अधिक वजनाच्या ओझ्याची वहातुक झाली. उतारूंच्या प्रवासांत ३० टक्के वाढ झाली. बंगाल अँड आसाम रेल्वेवर अलीकडे वहातुकीचा ताण इतक्या तीव्रतेनें पडत आहे कीं, तीमध्यें ७८ टक्के विस्तार झाला आहे. एकंदरीनें पहातां ब्रिटिश व अमेरिकन रेल्वेजच्या मानानें हिंदी रेल्वेजच्या कार्यक्षमतेचे निदर्शक आंकडे अत्यंत समाधानकारक असल्याचा निर्वाळा युद्धवहातुक मंत्र्यांनीं दिला. परंतु रेल्वेजच्या खऱ्या परीक्षेची वेळ अजून यावयाची आहे आणि वहातुकीचा आणखी ताण त्यांचेवर येत्या कांहीं महिन्यांत पडावयाचा आहे, त्याची तयारी त्यांनीं केली पाहिजे असें सावधगिरीच्या धोरणानें त्यांनीं सुचवलें. दगडी कोळसा खाणींतून हवा तसा बाहेर येत नाहीं, ह्या पुरवठ्याच्या तुटवड्याची मोठी अडचण तूर्त भासत आहे आणि ती वेळींच दूर न झाल्यास रेल्वे वहातुकीच्या सोयींवर प्रतिकूल परिणाम होईल असें म्हणून कोळशाची काटकसर कसोशीनें केली जाण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं जोर दिला.

## गिल्बर्ट बेटें

पॅसिफिक महासागरांतील गिल्बर्ट आयलंड्स अमेरिकनांनीं काबीज केल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. हीं बेटें कोठें आहेत, त्यांचा आजपर्यंतचा इतिहास काय आहे, ह्याची माहिती खालीं देण्यांत आली आहे.

विषुववृत्त व ज्या दक्षिणोत्तर रेषेवर दिवस बदलतो ती इंटरनॅशनल डेट लाइन ह्या दोघांच्या छेदाचे ठिकाणीं "गिल्बर्ट व एलिस आयलंडस" ही ब्रिटिश वसाहत आहे. फिजी बेटें व ही वसाहत ह्या ब्रिटिश साम्राज्याच्या प्रदेशांस प्रत्येक दिवशीं इतर सर्व प्रदेशांचे अगोदर सूर्यदर्शन होतें. 'गिलबर्ट' बेटें, 'इलिस' बेटें, 'ओशन' बेटें, 'फिनिक्स' बेटें व त्या सर्वांचे अगदीं पूर्वेस हवाई बेटांचेखालीं 'वाशिंगटन', 'फॅनिंग' व 'खिसमस' बेटें ह्या समुच्चयाच्या वसाहतींवर एका हाय कमिशनरची देखरेख असते, ('फिजी' बेटांचा तोच गव्हर्नर असतो.) 'ओशन' बेटांतील स्थानिक कमिशनर त्यांचा प्रत्यक्ष कारभार पहातो. सर्व वसाहतींचें एकूण क्षेत्रफळ ४०० चौरस मैल असून त्यापैकीं एकट्या 'खिसमस' बेटाचेंच क्षेत्रफळ २०० चौरस मैल भरतें. तथापि, बेटांभोवतालचा समुद्र हिशेबांत घेतला, तर क्षेत्रफळ १० लक्ष चौरस मैल होतें! बेटें किती लहान आहेत, हें ह्यावरून लक्षांत येईल.

'ओशन' बेटें सोडलीं, तर बाकी सर्व बेटें मुख्यत: पोवळ्याच्या खडकानें वेष्टलेलीं आहेत. वसाहतीची लोकसंख्या ३६,००० आहे. वसाहतींतील बेटांना निसर्गाची देणगी विपुल नसल्याकारणानें, स्थानिक लोकांना नारळ व मासे ह्यांवरच गुजराण करावी लागते. जमिनीच्या पृष्ठभागावर थोडीशी वाळू असेल त्यापेक्षा माती अशी कोठेंच नाहीं, त्यामुळें धान्याची व इतर लागवड होऊं शकत नाहीं.

गिल्बर्ट बेटांचा ब्रिटिशांस शोध प्रथम लागला, तो १७६४ ते १८२४ ह्यांचे दरम्यान ह्या विभागांत पर्यटण करणाऱ्या नाविक अधिकाऱ्यांचे मार्फत लागला. कॅप्टन गिल्बर्टचें नांव 'गिल्बर्ट' बेटांनीं चिरंजीव झालें व त्यांच्या उत्तरेकडील बेटांस कॅप्टन मार्शलचें नांव मिळालें. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं ह्या वसाहतींतील लोकांच्या पदरीं गुलामगिरी येऊन त्यांना मेक्सिकोसारख्या दूर ठिकाणीं मळ्यांत सक्तीनें काम करण्याची पाळी आली, व गेलेल्यांपैकी क्वचितच कोणी परत येऊं शकला.

'एलिस' बेटांची लोकसंख्या १९ व्या शतकाचे प्रारंभीं २० हजार होती, ती आतां फक्त ४ हजार आहे, ह्यावरून स्थानिक लोकांवर कसें मरण ओढवलें, हें दिसून येईल.

पॅसिफिक महासागरांतील ह्या क्षुद्र बेटांस आजपर्यंत कांहीं महत्व नव्हतें. वैमानिक वहातुक सुरू झाल्यापासून मात्र तें अतिशय वाढलें आहे. पॅसिफिक महासागर ओलांडण्यासाठीं हीं बेटें टप्पे म्हणून महत्त्वाचीं ठरूं लागलीं. १९३५ सालीं हाउलंड व बेकर हीं गिल्बर्ट बेटांजवळील लहानशीं बेटें अमेरिकेनें घेतलीं तरी ग्रेट ब्रिटननें तक्रार केली नाहीं. पुढें, कँटन व एंडरबरी ह्या बेटांवरहि अमेरिका मालकी सांगूं लागली, परंतु त्यांचा ब्रिटिश वसाहतीच्या अधिकाऱ्यांनीं अगोदरच ताबा घेतलेला होता. अखेर, ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं तडजोड करून दोघांनींहि आपलें मूळ म्हणणें न सोडतां कँटन व एंडरबरी ह्यांची व्यवस्था पहाण्यासाठीं एक संयुक्त कमिशन असावें, ५० वर्षे ही व्यवस्था चालावी, असा १९३९ सालीं करार केला.

## प्रांतिक बँक व जिल्हा बँका

[सहकारी खात्याच्या १९४१-४२ सालाबाबतच्या वृत्तांत ह्या बँकांसंबंधानें खालीं दिलेले उद्गार आहेत.]

"प्रॉव्हिन्शियल कोऑपरेटिव्ह बँकेचें काम पूर्वीप्रमाणेंच व्यवस्थित चालू होतें. बँकेच्या आर्थिक साधनांत सुमारें २८ लक्ष रुपयांची वाढ झाली व त्यामुळें एकूण कामचलाऊ भांडवल रु. २,७९,७५,३८१ झालें, यापैकीं बहुतेक भाग निरनिराळ्या व्यक्तींनीं व सोसायट्यांनीं अनामत ठेवलेल्या रकमांचा झाला आहे. दिलेल्या नवीन कर्जाची रक्कम रु. २७,४९,६३४ होती, व परतफेडीनें वसूल झालेली रक्कम रु. २८,७१,५९८ होती. लिक्विडेशनमध्यें गेलेल्या सोसायट्यांच्या बाबतींत परत फेडीनें वसूल झालेली रक्कम रु. १,९६,६९३ इतकी होती, तर तीच मागील सालीं रु. १,४९,२६५ इतकी होती. सालअखेर बँका व सोसायट्या यांच्याकडून येणें असलेली एकूण रक्कम रु.७४,२०,००० इतकी होती, तर मागीलसालीं ती रु. ७५,२८,००० इतकी होती. लिक्विड रिसोर्सेसच्या (रोकड मिळण्याच्या साधनांच्या) दृष्टीनेंहि बँकेची स्थिति अत्यंत समाधानकारक होती. बँकेंत ठेवलेल्या अनामत रकमांबाबतची बँकेची एकूण पात्रता २४० लाख रुपये होती तर बँकेचे लिक्विड रिसोर्सेस १७० लाख रुपये होते. एकूण पात्रतेशीं या रिसोर्सेसचें प्रमाण शेकडा ७० पेक्षां अधिक आहे. सदरहू वर्षांत बँकेनें रु. ६,३०,००० पर्यंतच्या पहिल्या दोन मालिकांतील (सिरीजमधील) डिबेंचरांची फेड केली. या वर्षांतील बँकेच्या कामापासून रु. ९०,७२० फायदा झाला तर मागील सालीं रु. ४६,५४० फायदा झाला होता व बँकेनें या वर्षी ३½ टक्के डिव्हिडंड जाहीर केलें तर तेंच मागील सालीं ३ टक्के जाहीर केलें होतें. डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँकांच्या संख्येंत कोणताहि बदल न होतां ती संख्या ११ च कायम राहिली. रिझर्व फंड व इतर फंड व सभासदांची संख्या यांत समाधानकारक वाढ दिसून आली. युद्धजन्य परिस्थिति चालू असतांहि बँकेकडे ठेवीसाठीं आलेल्या रकमांत वाढ दिसून आली ही गोष्ट समाधानकारक आहे. यावरून पैसे गुंतविणाऱ्या जनतेचा या बँकांवर असलेला विश्वास वाढत आहे हें दिसून येतें. त्यांच्या शेर केलेल्या भांडवलांत वाढ झाल्यामुळें बँकेंतील ठेवीच्या रकमा, रिझर्व फंड व इतर फंड यांत वाढ झाल्यामुळें कामचलाऊ भांडवलांत वाढ होऊन त्याची रक्कम रु. ३०३ लाखांवरून रु. ३३१ लाख झाली. तथापि या बँकांना त्यांच्याजवळ असलेल्या सर्व रकमांचा या चळवळीप्रीत्यर्थ उपयोग करतां आला नाहीं; कारण रु. ३३१ लक्ष कामचलाऊ भांडवलांपैकीं कर्ज म्हणून फक्त ८६,४२,००० रुपयेच देण्यांत आले. सदरहू वर्षांत परतफेडीनें येणें असलेल्या एकूण ११६ लाख रुपयांपैकीं रु. ६७,१५,००० वसूल झाले व अनधिकृत थकबाकींचें परतफेडीनें येणें असलेल्या रकमेशीं शेकडा २२.१ असें प्रमाण पडलें. बँकांच्या मालकीचें भांडवल ५५ लक्ष १४ हजार रु. होतें. या भांडवलाचें एकूण कामचलाऊ भांडवलाशीं शेकडा १६.६ असें प्रमाण पडतें."

## ब्रिटिश युद्धकैदी

जपानच्या ताब्यांत एकूण २,५९२ ब्रिटिश अधिकारी व ३२,२७४ ब्रिटिश सैनिक आहेत. २०१ युद्धकैदी मरण पावले.

# स्फुट विचार

### धान्यपुरवठ्याच्या नव्या योजनेची अंमलबजावणी

सर्व देशभर धान्याची वाटणी योग्य व सुरळीत रीतीनें व्हावी आणि बंगालमधील गोंधळाची पुनरावृत्ति होऊं नये, ह्यासाठी विशिष्ट तत्त्वावर आधारलेली योजना अंमलांत आणणें आवश्यक होतें. ह्या विषयाची इतकी चर्चा झाली आहे आणि हिंदुस्थान-सरकारच्या धोरणास पंजाब व सिंध प्रांतांतील सरकारांनीं एवढा तीव्र विरोध दाखवला आहे कीं ह्या मंथनांतून एखादा विधायक कार्यक्रम बाहेर काढल्यावांचून गत्यंतर नव्हतें. धान्यांच्या कमाल किंमती निश्चित व नियंत्रित करणें, त्यांची वाटणी जिल्ह्याजिल्ह्यांत व प्रांतांप्रांतांत होण्याची व्यवस्था करणें आणि शक्य तेथें शिधा-पद्धति चालू करणें ह्या तत्त्वांवर नवीन योजना उभारण्यांत आल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्या तत्त्वांस अनुसरून व्यवहारांत कार्यक्रम अंमलांत आणण्याचें काम अर्थातच प्रांतिक सरकारांचें आहे. स्थानिक परिस्थिति व गरजा लक्षांत घेऊन धान्यपुरवठ्याची तजवीज त्या सरकारांकडून चालली आहे असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून समजतें. स्थानिक आणि परप्रांतांतील तुटवडा भरून निघण्यास मदत व्हावी आणि किंमतींचें नियंत्रण करतां यावें म्हणून मुंबई सरकार तांदुळाच्या उत्पादनाचा चवथा हिस्सा व इतर धान्यांचा दहावा भाग रेव्हिन्यू खात्याच्या अधिकाऱ्यांमार्फत गोळा करीत आहे. मद्रास प्रांतांत धान्य जमा करण्याच्या कामावर स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत आले आहेत. इतरत्र सरकारच्या देखरेखीखालीं निवडक व्यापारी धान्य खरेदी करीत आहेत. ह्या रीतीनें अंमलांत आलेल्या व येणाऱ्या प्रांतिक व संस्थानी योजनांत कारभाराचे तपशिलाचे फरक असले तरी त्यांतली मूलभूत कल्पना वर सांगितल्याप्रमाणें एकच आहे. संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा, मध्यप्रांत व सिंध ह्या प्रांतांतील सरकारांच्या कार्यक्रमांची त्रोटक माहिती प्रसिद्ध झाली आहे, तीवरून ही गोष्ट उघड होत आहे.

---

### जंगल खात्याची उपयुक्त युद्ध-कामगिरी

मुंबई प्रांताच्या जंगल खात्यास १९४२-४३ मध्यें १ कोटि १४ लक्ष रुपये उत्पन्न होऊन ४५ लक्ष २७ हजार रुपयांचा खर्च वजा जातां, वाढावा उरला. लाकडाच्या वाढलेल्या किंमतीचा हा परिणाम आहे. सप्लाय खात्यास जंगल खात्यानें चांगल्या दर्जाचें पुष्कळ लाकूड पुरवलें. अर्थात्, नेहमीच्या ठराविक मर्यादेबाहेर जंगलतोड झाली आहे. युद्ध संपल्यावर कित्येक वर्षे तोड अत्यंत अल्प प्रमाणांत केली पाहिजे आणि नवी लागवड केली पाहिजे, म्हणजे जंगलाची संपत्ति मूळ ठिकाणावर येईल. कानडा जिल्ह्यांतील टीक लाकडाच्या तोडीचें लाकूड हिंदुस्थानांत इतरत्र नसल्यानें त्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करावा लागला. लाकूड कापूनच हवें असल्यामुळें जंगल खात्यानें त्याचे कित्येक कारखाने सुरू केले. प्लायवुडच्या दोन कंपन्यांनीं लाकूड मिळविण्याचे परवाने घेतले आहेत. प्रोड्यूसर गॅस प्लँटसाठी जंगल खात्यानें ३० हजार टन चांगल्या दर्जाचा कोळसा तयार करविला, तो पुढें पुणें व मुंबई येथें खपणासाठी विकण्यांत आला. विजापूर व मुंबई येथें गवत पुरवण्यांत आलें. क्रिप्टोस्टेजिया रबराच्या झाडाचा चीक गोळा करून तपासणीसाठी डेहराडूनला धाडण्यांत आला.

### कैरो आणि तेहरान येथील निर्णय

ग्रेट ब्रिटनचे मुख्य प्रधान आणि अमेरिकेचे प्रेसिडेंट ह्यांच्या वेळोवेळ होणाऱ्या भेटी आणि त्यांत युद्धधोरणाबाबत केली जाणारी चर्चा हा प्रस्तुत युद्धकार्यक्रमाचा एक महत्त्वाचा विशेष आहे. आपापल्या देशापासून हजारों मैल अंतरावरच्या सोइस्कर ठिकाणीं मि. चर्चिल व प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं अशा प्रकारच्या वाटाघाटी स्वतःच्या लष्करी सल्लागारांसमवेत केल्या आहेत परंतु आतांपर्यंत रशियन राष्ट्राचा नेता मार्शल स्टॅलिन ह्यानें प्रत्यक्ष भाग घेतलेला नव्हता. इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांचे मुत्सद्दी रशियाच्या दखलगिरीनेंच आपलें धोरण आखीत आलेले आहेत आणि सर्व मित्रराष्ट्रांचा एकसूत्री युद्धकार्यक्रम असला पाहिजे हा दंडक ते पाळीत आले आहेत. तथापि, मि. चर्चिल व प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या वाटाघाटींत मार्शल स्टॅलिन ह्यांच्या अनुपस्थितीमुळें गैरसमजास निष्कारण जागा उत्पन्न झाली होती आणि तिचा उपयोग स्वतःच्या प्रचारार्थ जर्मनीनें केला आहे. युरोपांत चालू करावयाची दुसरी आघाडी आणि युद्धोत्तर पुनर्घटनेचीं तत्त्वें व कार्यक्रम ह्यांचेविषयीं तीव्र मतभेद आहेत अशी कल्पना प्रसृत झाली होती. ह्या प्रकारच्या प्रतिकूल टीकेस तेहरानमध्यें नुकत्याच झालेल्या मि. चर्चिल, प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मार्शल स्टॅलिन ह्यांच्या चर्चेनें चोख उत्तर दिलें आहे. युरोपांतील लढाऊ कार्यक्रम आणि पुनर्रचना ह्यांचेसंबंधांत ह्या तीन मित्र राष्ट्रांच्या पुढाऱ्यांचीं मनमोकळेपणाचीं बोलणीं झाल्यानें मित्रराष्ट्रांचा युद्धमार्ग मोकळा झाला आहे. सध्या युद्धास निर्णायक स्वरूप येण्यास प्रारंभ होऊन जर्मनीचा चोहोंकडून कोंडमारा करण्याची वेळ आली आहे. अशा प्रसंगास तेहरान येथें तीन मित्रराष्ट्रांनीं चर्चा करून एकमुखी धोरण निश्चित केलें आहे ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पूर्व एशियांतील युद्धाविषयींचें धोरण ठरवतांना मि. चर्चिल आणि प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं मार्शल चँग-कै-शेक ह्यांना कैरो येथें निमंत्रण देऊन त्यांच्या संमतीनें लढाऊ व पुनर्घटनाविषयक प्रश्नांचा निर्णय केला आहे ही बाबहि तितकीच महत्त्वाची आहे. जपानचा पूर्ण पाडाव करून त्यानें पादाक्रांत केलेल्या सर्व देशांतून त्यास हुसकून लावण्याचा निश्चय कैरो येथील चर्चेत ह्या तीन पुढाऱ्यांनीं जाहीर केला आहे. कैरो आणि तेहरान येथील चर्चेचे निर्णय प्रस्तुत युद्धांत अत्यंत परिणामकारक ठरणार आहेत ह्यांत शंका नाहीं.

---

### युद्धकालीन अंकगणित

शाळांतील अभ्यासक्रमावर युद्धपरिस्थितीचा कसा परिणाम होतो व अंकगणितासारख्याहि विषयांचें स्वरूप कसें पालटतें, हें शाळेच्या विद्यार्थ्यांस घातलेल्या खालील एका प्रश्नावरून लक्षांत येईल. दोन मोटारवाले, अ आणि ब, २०० मैलांच्या प्रवासास निघाले. अ जवळ ३० गॅलन पेट्रोलचीं कुपनें होतीं व त्याची गाडी एक गॅलन पेट्रोलवर २० मैल जात होती. ब च्या मोटारीस प्रोड्यूसर गॅस प्लँट लावलेला होता व ती फक्त पेट्रोलवर चाले तेव्हां गॅलनवर १६ मैल जाई इ.

### रद्दी कागद गोळा करण्याचें महत्त्व

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण ३० लक्ष टन रद्दी कागद जमा करण्यांत आला आहे. एवढ्या कागदाची आयात करण्यास ३५० मालवाहू आगबोटी लागल्या असत्या.

**मध्यवर्ती असेंब्लीचें पेतें अधिवेशन**

मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या अधिवेशनास दिल्ली येथें ७ फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होईल.


**The Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd.**
**Poona 2.**

# NOTICE.

The Ninth Annual General Meeting of the Shareholders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd. Poona 2, will be held on Thursday, the 30th December, 1943 at 3 P. M. (S T.) at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business:—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited statements of Account for the year ended 30th September, 1943.
(2) To sanction the declaration of a Dividend for the above mentioned period.
(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.
(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board of Directors,
C. G. AGASHE & Co.
Managing Agents.

Poona 2,
Dated 5th December, 1943.

*Note*:-The Transfer Books of the Company will be closed from 16th of December 1943 to 7th of January 1944 (both days inclusive)
The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra, Ltd Poona, on and after the 7th of February 1944.


**साउथ इंडियन रेल्वे**

वरील रेल्वे आपल्या ताब्यांत घेण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. रेल्वे कंपनीच्या भागीदारांस करावयाच्या भरपाई संबंधीं कंपनीचे डायरेक्टर व भारतमंत्री ह्यांचेमध्यें वाटाघाटी चालू आहेत. कंपनीशी असलेला करार ३१ मार्च, १९४४ अखेर संपुष्टांत यावा व कंपनीच्या मालमत्तेची किंमत (११ लक्ष, १२३ हजार पौंड) सरकारनें कंपनीस द्यावी, असें तूर्त ठरत आहे.

**बोलिव्हियानें युद्ध पुकारलें**

बोलिव्हियाच्या सरकारनें जर्मनी व जपान ह्यांचेविरुद्ध युद्ध पुकारलें आहे. बोलिव्हिया हा देश दक्षिण अमेरिका खंडांत आहे.

**विजेचे नवे ग्राहक**

कित्येक लोक विजेचा परवाना मिळेल ह्या अपेक्षेनें घरांत विजेचे अगोदरच दिवे बसवून घेतात. नवीन कनेक्शनें ह्यापुढें मिळणें कठीण आहे, हें लक्षांत ठेवून लोकांनीं वागावें, अशी त्यांस सूचना देण्यांत आली आहे.


## हातपाय चालतात तोंवर

म्हातारपणची तरतूद करणें अवश्य आहे. चांगल्या कंपनींत उतरलेला विमा हा ऐन वेळीं उपयोगी पडतो. या संबंधांत आपणांस कसलीहि माहिती पाहिजे असल्यास आम्हांकडे विचारा. आम्ही सर्व खुलासा करून योग्य मार्ग दाखवूं.

मॅनेजर,
**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.**
सातारा शहर.

पुणें शाखा-१७१ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदुस्थानाबाहेरील उत्पन्नावर इनकमटॅक्स कायदेशीर आहे काय ?

मेसर्स वॅलेस ब्रदर्स अँड कं. लि. ची स्थापना इंग्लंडमध्यें झालेली आहे व तिची व्यवस्था व देखरेख तेथूनच होते. मेसर्स वॅलेस अँड कंपनी नावाच्या फर्मचा मुंबई येथें धंदा आहे, तिच्यामध्यें वरील कंपनीची भागी आहे. १९३९–४० मध्यें वॅलेस ब्रदर्स अँड कं. लि. ला ब्रिटिश हिंदुस्थानांत १७,८५,८३१ रुपये नफा झाला. ह्याच मुदतींत बाहेरच्या व्यवहारांत तिला ७,४८,४२७ रुपये मिळाले. इनकमटॅक्स अधिकाऱ्यानें कंपनीवर ह्या दोन्ही प्राप्तींवर कर बसविला. ज्या कंपनीच्या एकूण उत्पन्नापैकी निम्म्यापेक्षा अधिक उत्पन्न ब्रिटिश हिंदुस्थानांतील आहे, तिचें वास्तव्य ब्रिटिश हिंदुस्थानांतील समजावें, असा इनकमटॅक्स कायदा सांगतो. मेसर्स वॅलेस ब्रदर्स अँड कं. लि. च्या उत्पन्नाच्या निम्म्यापेक्षा जास्त उत्पन्न ब्रिटिश हिंदुस्थानांतील असल्याकारणानें, कंपनीच्या सबंध उत्पन्नावर ( २५,२९,७५८ रुपये ) इनकमटॅक्स बसला. कंपनीच्या हिंदुस्थानाबाहेरील उत्पन्नावर इनकमटॅक्स बसविण्याचा इनकमटॅक्स अधिकाऱ्यांस अधिकारच नाहीं, कारण ह्यासंबंधांतील कायद्याचीं कलमें करणें हिंदी विधिमंडळाच्या मर्यादेच्या कक्षेबाहेर आहे, असें कंपनीचें म्हणणें आहे. हिंदी फेडरल कोर्टापुढें कंपनीनें अपील केलें आहे.

### विमानांच्या वहातुकीचा अजस्र खर्च

" विमानांच्या वहातुकीचें वैशिष्ट्य वेग हें आहे आणि वेग ही गोष्ट अत्यंत महाग आहे. मालवाहू आगबोट, मालाची आगगाडी व विमान ह्यांस प्रत्येकीं २½ हजार अश्वशक्तीचीं इंजनें बसविलीं, तर आगबोट ७,००० टन मालाची वहातुक करूं शकेल, आगगाडींतून ८०० टन माल जाईल व विमानांतून फक्त २½ टन माल नेतां येईल ! वेगळ्या शब्दांत सांगावयाचें, म्हणजे विवक्षित माल ठराविक अंतर नेण्यास आगबोटीपेक्षा विमानाची १२० पट शक्ति खर्च होईल आणि आगगाडीपेक्षा ५० पट शक्ति खर्च होईल. कोळसा अगर तेल ह्यांपेक्षा पेट्रोल फार महाग पडतें. एक टन वजन एक मैल नेण्यासाठीं विमानास आगगाडीपेक्षा ६० पट व आगबोटीपेक्षा २५० पट खर्च येतो. घसाऱ्याचा खर्चहि विमानांचे बाबतींत फार मोठा आहे, कामास माणसेंहि जास्त लागतात व त्यांच्या पगाराचा खर्चहि भारी असतो. अमेरिकन रेल्वे सध्या जेवढ्या मालाची वहातुक करतात, तेवढा माल हलवण्यास ६ लक्ष विमानें लागतील; तीं विमानें १२२ अब्ज गॅलन पेट्रोल जाळतील व विमानांच्या वहातुकीसाठी २ कोटि माणसांना काम करावें लागेल ! " मेसर्स टाटा सन्स आणि कं. चे चेअरमन, मि. जे. आर. डी. टाटा, ह्यांचें रोटरी क्लबांतील भाषण.

### जागतिक बँकेची कॅनेडियन योजना

जागतिक बँकेसंबंधीं कल्पना कॅनडानें पुढें मांडली आहे. चलनाचे व हुंडणावळीचे दर नियंत्रित करण्यासाठी ३ अब्ज पौंडांचा फंड, बँक स्थापन होतेवेळीं सभासद देशांनीं उभारावयाचे २ अब्ज पौंड, त्यांपैकी १५% रक्कम सोन्याचे स्वरूपांत द्यावयाची, एका देशांत माल विकल्यावर त्याच्या पैशांतून दुसऱ्या कोणत्याहि देशाचा माल विकत घेण्याची सवलत, वगैरे बाबींचा समावेश ह्या योजनेंत आहे.

### रॉथॅमस्टेड येथील शेती संस्था

इंग्लंडमध्यें रॉथॅमस्टेड येथें शेती विषयक शास्त्रीय संशोधनास वाहिलेली संस्था आहे ती जगप्रसिद्ध झाली आहे. तेथें शंभर वर्षांमागें जॉन लॉज ह्या जमीनदारानें शेणखताच्या बरोबर कृत्रिम खतांचा उपयोग करण्याचा प्रघात चालू केला. तेव्हांपासून शेती विषयक शास्त्रीय संशोधनाचा प्रारंभ झाला. जॉन लॉज ह्यास रसायनशास्त्राची आवड होती आणि त्यानें जोसेफ गिल्बर्ट ह्यास आपल्या मदतीस घेतलें. त्या जोडीनें रॉथॅमस्टेड येथें शेतीच्या सुधारणेच्या दृष्टीनें आवश्यक असलेल्या संशोधनाचा पाया घातला. हा उपक्रम अत्यंत मर्यादित स्वरूपांत होता आणि त्याची वाढ हळुहळू होत गेली. आतां ही संस्था फार मोठ्या आकाराची झाली असून संशोधनाचे सर्व शाखांची तींमध्यें मोठ्या प्रमाणांत तरतूद आहे. निरनिराळ्या देशांतून त्या शास्त्रांत प्रयोग करण्यासाठीं व शिकण्यासाठी अनेक विद्यार्थी येतात. शेतीच्या अनेक शाळा रॉथॅमस्टेडच्या संस्थेस संलग्न करण्यांत आल्या आहेत आणि तिच्या मार्फत ठिकठिकाणच्या क्षेत्रांत प्रयोग चालू आहेत. गव्हाचें पीक व इतर पिकें ह्यांत सुधारणा ह्या संस्थेंतील कार्यामुळें घडून आल्या आहेत आणि त्यांचा फायदा इंग्लंडच्या बाहेरहि जमीनदारांस झाला आहे. रॉथॅमस्टेडच्या संस्थेंत डायरेक्टरच्या जागेवर सर जॉन रसेल गेलीं तीस वर्षें काम करीत आहेत. चालू सालीं सेवानिवृत्त होण्याचें त्यांनीं ठरवलें आहे. कांहीं वर्षांमागें त्यांनीं हिंदुस्थानांत प्रवास करून येथील शेतीची पहाणी केली. पुणें येथील शेतकी कॉलेजमध्यें त्यांनीं दिलेलें व्याख्यान आम्हांस स्मरतें. रॉथॅमस्टेडच्या संस्थेच्या प्रगतीस त्यांचा उत्साह व परिश्रम कारणीभूत झाले आहेत. ह्या संस्थेस शंभर वर्षें यंदा पुरीं झालीं आहेत हें तिच्या स्थैर्याचें व चिवटपणाचें स्पष्ट लक्षण आहे.

### युद्ध परिस्थितीचा चित्रपट निर्मितीवर परिणाम

युद्धजन्य परिस्थितीमुळें तरुण लोक लष्करांत शिरल्याकारणानें अमेरिकन चित्रपट कंपन्यांना चांगले नट मिळणें कठीण जात आहे व पुरेशा साधनांचाहि त्यांस तुटवडा पडत आहे. तथापि, चित्रपटांची निर्मिति अखंड चालू आहे. पैसा व बुद्धि ह्यांच्या जोरावर फिल्म कंपन्या आपलें काम चालू ठेवतील, हें उघड आहे, असें एका इंग्रजी साप्ताहिकानें खालील माहिती देतांना म्हटलें आहे. चांगले नट एकामागून एक लष्करांत दाखल होत आहेत. एका निर्मात्यानें आपल्या आगामी चित्रपटांतील पुरुषांचीं कामें स्त्रियांकडूनच करवून घेण्याचें ठरवलें आहे. दुसऱ्या एका चित्रपटांतील पुरुष नटांत १२ वर्षांवरील परंतु ५० वर्षांखालील नट एकहि नाहीं. टोपांसाठीं लागणारे केस मागें युरोपांतून येत असत; तेथील स्त्रिया आपलें केस विकून पैसे करीत. आतां ह्या केसाचा पुरवठा बंद पडला आहे. चिनी पुरवठा कांहीं दिवस चालू होता. परंतु तेथूनहि आतां केस येत नाहींत. नटांनीं आतां आपले स्वतःचेच केस वाढविणें आवश्यक झालें आहे. रबराच्या तुटवड्यामुळें तर फारच गैरसोय झालेली आहे. मोटारींच्या टक्करी ह्यापुढें चित्रपटांत फारशा दृष्टीस पडणार नाहींत. खिडक्या दारें फोडणारे " स्टंट " बहाद्दर आतां तीं फोडूं शकणार नाहींत, कारण तीं बनविण्यासाठीं लागणारी साखर सरकार देण्यास तयार नाहीं. फिल्ममधील कृत्रिम बर्फाच्या देखाव्यांसहि युद्धपरिस्थितीची झळ लागली आहे. कोणत्याहि एका चित्रपटाचे निर्मितीसाठीं लागणाऱ्या नव्या सामानाची किंमत १५ हजार रुपयांपेक्षा अधिक भरतां कामा नये, असा सरकारी निर्बंध आहे.




# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

# दि औंध म्युच्युअल

## लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहाः—

| | |
|---|---|
| मुंबईचे चीफ एजन्टस्<br>के. डब्ल्यू. फडके,<br>फडके गणपतिवाडी, गिरगांव,<br>बॅक रोड, मुंबई ४. | हेड ऑफिस,<br>'रामनिवास' लक्ष्मी रोड,<br>पुणें शहर |

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुपक्षाकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलष्करी नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

| | |
|---|---|
| ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.,<br>लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए.<br>जनरल मॅनेजर |

## दत्त कंपनी

७२५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

## देशाच्या औद्योगीकरणार्थ

जागतिक व नव्या नव्या धनोत्पादक तीस हजार धंद्यांच्या प्रायोगिक माहितीची मराठी, हिंदी व गुजराथी भाषेंतील लहानमोठीं शेंकडों पुस्तकें प्रकाशित करण्याकरितां त्या त्या भाषेंतील धनिक ग्रंथ–प्रकाशक व मुद्रक पाहिजेत. भेटा अगर लिहा.

घरबसल्या दीड हजार धंदे सप्रयोग शिकविणारी डिरेक्टरी सात आण्यांचीं तिकिटें पाठवून अवश्य मागवा. व ग्रामोद्योगांचे धंदे उभारा.

औद्योगिक ज्ञानप्रसारक मंडळ
७७९ सदाशिव पेठ, पुणें २

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १५ डिसेंबर, १९४३ अंक ४९

## दि डिस्कौंट बँक ऑफ इंडिया लि.

☞ शेड्यूल्ड बँक ☜

हेड ऑफिसः—फिरोजशहा मेहता रोड, मुंबई.
मुंबई शाखाः—१ काळबादेवी रोड.
२ जव्हेरी बाजार.
बाहेरील शाखाः—पुणें शहर.

सेफ डिपॉझिट व्हॉल्ट :
हेड ऑफिस व पुणें शहर
पुण्यांतील इतर शाखा लवकरच उघडण्यांत येतील.

व्याजाचे दरः—चालू खातें : ½%
सेव्हिंग्ज खातें : २%

व्ही. आर. कैंभावी
मॅनेजर, पुणें २.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,२०,५०,०००

मुख्य कचेरीः ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—एच्. ए. करीमभाई

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## सहिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### दि रिटेलर्स फूड-ग्रेन्स डेपो लि., पुणें

रेशन धान्याच्या नियमानुसार वाटप करण्याकरितां वरील कंपनी पुणें येथें स्थापन झाली आहे. या कंपनीमार्फत किरकोळ दुकानदारांना पुरविण्यांत येणाऱ्या रेशन धान्यांच्या किंमतीवर ३½% प्रमाणें कंपनीस कमिशन देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. कंपनीच्या कामास १८ नोव्हेंबर रोजीं प्रारंभ झाला. श्री. का. बा. साळवेकर व श्री. भा. वि. कर्वे हे दोघे व्यापारी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर्स आहेत. कंपनीनें २½ लक्ष रुपयांचे भाग विक्रीस काढले आहेत. प्रत्येक भाग २५० रुपयांचा आहे.

### कागदाची बचत

युद्धजन्य परिस्थितीमुळें कागदाची बचत करणें बँका व विमा कंपन्या ह्यांना भाग पडलें आहे. ह्या संस्थांच्या व्यवहारांना कागद फार लागतो. ग्रेट ब्रिटनमधील एका विमा कंपनीनें कागदामध्यें ७५% बचत केली आहे. वार्षिक अहवाल २४ पृष्ठांऐवजीं ४ पृष्ठांत छापणें; तो पाकिटांतून न धाडणें; पॉलिसीची छपाई पाठपोट करणें; पावत्यांचा आकार कमी करून त्या पाकिटांतून न पाठविणें; रिन्युअल नोटिसांचा आकार लहान करणें; इत्यादि कागदाची बचत करण्याचे मार्ग आहेत.

### व्हिटॅमिनच्या गोळ्या

हिंदुस्थानाच्या पूर्व आघाडीवर लढणाऱ्या ब्रिटिश व हिंदी सैनिकांना ताजें अन्न मिळण्यास अडचण पडली, तरी व्हिटॅमिनच्या गोळ्या खाऊन त्यांना आपली ताकद आतां कायम राखतां येईल. दररोज एक गोळी खाल्ल्यानें सैनिकास ताज्या अन्नाचा अभाव जाणवणार नाहीं. जंगलाच्या अगदीं अंतर्गत भागांतहि त्यामुळें सैनिकांच्या हालचाली सुलभ होतील. एखाद्या औषधाच्या गोळीप्रमाणेंच ही व्हिटॅमिनची गोळी दिसते. इंग्लंडमध्यें तयार झालेल्या ह्या लक्षावधि गोळ्या आतां हिंदुस्थानांत दाखल झाल्या आहेत, त्याचप्रमाणें परदेशांतून आणलेल्या व्हिटॅमिनच्या पुडीचें हिंदी कारखान्यांत गोळ्यांमध्यें रूपांतर होऊं लागलें आहे.

### रबराची बचत व वाढतें हिंदी उत्पादन

हिंदुस्थान सरकारनें रबरावर नियंत्रण बसविलें व त्याच्या वापरांत काटकसर घडवून आणली, त्या योगानें संयुक्त राष्ट्रांस ३,५०० टन रबर उपलब्ध होऊं शकलें. रबराच्या वस्तूंचें उत्पादन हिंदुस्थानांत वाढत आहे. कच्च्या रबराचा पुरवठा वाढविण्याचा सरकारचा प्रयत्न चालू आहे. सरकारनें लावलेल्या क्रिप्टोस्टेजिया मॅडिफ्लोरा झाडापासून मिळणाऱ्या रबराचें उत्पादन १९४४ च्या मध्याचे सुमारास सुरू होईल, अशी अपेक्षा आहे.

### पूर्व बंगालमध्यें ९ व्या शतकांतील वस्तीचा शोध

पूर्व बंगालमध्यें जमीन खणतांना लष्करी खात्याच्या इंजिनिअरांना जुने किल्ले, राजवाडे, मठ, इत्यादींचे अवशेष आढळले आहेत. तज्ञांकडे संशोधनासाठीं ते तूर्त सोपवितां येणार नाहींत, परंतु त्यांचें संरक्षण करण्यांत येत आहे. बुद्धधर्मीय भिक्षूंच्या मठांतील भांडीं, नक्षीदार विटा, लाकडांतील अवशेष, धातूंवरील बुद्धांचीं चित्रें, चांदीचीं नाणीं, इत्यादिहि वस्तू सांपडल्या आहेत. आठव्या किंवा दहाव्या शतकांतील बुद्धांची ती वसाहत असावी. पद्धतशीर रीतीनें खणून संशोधन करणें अर्थातच आज शक्य नाहीं. सांपडलेलीं चांदीचीं नाणीं ७८० ते ९०० सनांतील चंद्रवंशीय राजाचीं असावींत.

### हिंदुस्थानांतील कोयनेलचा पुरवठा

हिंदुस्थानांतील कोयनेलचा सांठा १९४१-१९४२ अखेर २,२०,००० पौंड होता. त्या पूर्वीच्या वर्षअखेर तो २,६८,००० पौंड होता. हिंदुस्थानांतील कोयनेलचा मामुली वार्षिक खप २,१०,००० पौंड आहे. ह्यापैकीं हिंदुस्थानांत युद्धापूर्वी ६०,००० पौंड कोयनेलचें उत्पादन होई. आतां हें उत्पादन ९०,००० पौंडांवर गेलें आहे. एक हजार एकरांत सिंकोनाची नवीन लागवड झाली आहे, त्यांतून १९४६ सालापासून दरसाल ३०,००० पौंड कोयनेल मिळूं लागेल अशी अपेक्षा आहे.

### सर सी. व्ही. रमण ह्यांस चीनमध्यें आमंत्रण

हिंदी शास्त्रीय संशोधनाची चिनी शास्त्रज्ञांस माहिती देण्याकरितां चीनमध्यें सहा महिन्यांचा दौरा काढण्याची विनंति सर सी. व्ही. रमण ह्यांस चिनी सरकारनें केली आहे, त्याप्रमाणें सर रमण मार्च ते मे हे तीन महिने चीनमध्यें काढणार आहेत.

### ग्रेट ब्रिटनमध्यें इन्फ्लुएन्झा

ग्रेट ब्रिटनमध्यें इन्फ्लुएन्झाची साथ पसरत चाललेली दिसते. ४ डिसेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत, इंग्लंड व वेल्समधील १२६ प्रमुख शहरांत मिळून ७०९ लोक इन्फ्लुएन्झाला बळी पडले. त्यापूर्वीच्या आठवड्यांतील मृत्यूचा आकडा ३७५ होता.

### एल्जिन मिल्स लि., कानपूर

वरील कंपनीनें ३०-९-४३ अखेरच्या सहामाहीचें ८०% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. त्या पूर्वीच्या सहामाहीचें डिव्हिडंड ६५% होतें. १९३८ सालीं डिव्हिडंडचा दर ४% होता, तो वाढत वाढत ८०% पर्यंत आला आहे.

### पेन्शनांत वाढ

मासिक २० रुपयांपर्यंतच्या पेन्शनांत ३ रुपये व २१ ते ४० रुपयांपर्यंतच्या पेन्शनांत ४ रुपये वाढ करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

### शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा

युद्धास प्रारंभ झाल्यानंतर व विशेषतः चलनवृद्धीनंतर शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची काय स्थिति आहे, हें समजून घेण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें प्रांतिक सरकारांना तपशीलवार माहिती गोळा करण्यासंबंधीं विनंति केली आहे.

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

| १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट | एकूण गाठी ( १ गाठ ४०० पौंड ) |
|---|---|
| १९३९-४० | ३०,५०,१०६ |
| १९४०-४१ | ३६,१७,१४७ |
| १९४१-४२ | ४०,२५,३९५ |
| १९४२-४३ | ४२,८०,८१७ |

मुंबई बेटांतील गिरण्यांतील कपाशीचा उठाव गेलीं चार वर्षें एक सारखा वाढत आहे; ह्याचा अर्थ त्या गिरण्यांची उत्पादनशक्ति शक्य तेवढी उपयोगांत आणली जात आहे. १९४३-४४ च्या मोसमांतील गाठींच्या उठावाचा आकडा ४६ लक्ष गाठींवर जाण्याचा संभव आहे.

### अमेरिकेची खंड-उसनवार मदत

सप्टेंबर १९४३ अखेर अमेरिकेनें इतर राष्ट्रांस दिलेल्या खंड उसनवार मदतीची किंमत १६३ अब्ज डॉलर्स भरते. ७ डिसेंबर १९४१ रोजीं पर्ल बंदरावर जपाननें हल्ला केला, तेव्हां पासून अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला वरील पद्धतीनें केलेल्या मदतीची किंमत ८३ अब्ज डॉलर्स आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३८६ | लढाऊ सामर्थ्याची गुरुकिल्ली—पंजाब मंत्रिमंडळाचा खुलासा | |
| २ धान्यपुरवठ्याच्या योजना व त्यांची अंमलबजावणी | ३८७ | ५ शेअर बाजार ... | ३९० |
| ३ शेतीचें महत्त्व ... | ३८८ | ६ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. ... | ३९१ |
| ४ स्फुट विचार ... | ३८९ | ७ इटलीच्या शरणागतीचा जर्मनीवर परिणाम ... | ३९१ |
| कैरो येथें तुर्की मुत्सद्यांशीं चर्चा—व्यापारांत अमेरिकेचें स्थान—रशियाच्या | | | |



# अर्थ

बुधवार, ता. १५ डिसेंबर, १९४३


## धान्यपुरवठ्याच्या योजना व त्यांची अंमलबजावणी

धान्यपुरवठा व धान्याची सर्व देशभर रीतसर वांटणी ह्यांचे बाबतींत एकसूत्री अखिल भारतीय धोरण अमलांत येण्याचें अगत्य किती आहे ह्याचें विवेचन करण्याचें आतां वास्तविक प्रयोजन उरलेलें नाहीं. हा देश अफाट आहे आणि त्यांत अनेक लहान मोठे राज्य कारभाराचे घटक आहेत. ह्या कारणानें धान्याचें उत्पादन व त्याची वाटणी ह्यांचा मेळ बसणें अवघड होतें आणि युद्धपरिस्थितींत तर ही अडचण तीव्र होते.वहातुकीच्या साधनांचा योग्य उपयोग केला जाणें असल्या प्रसंगीं आवश्यक असतें. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या आणि बंगालमधील दुष्काळाचा ताजा अनुभव जमेस धरला म्हणजे ज्यांत स्वतःच्या गरजेपेक्षा अधिक धान्य पिकतें आणि ज्यांमध्यें त्याचा तुटवडा असतो अशा प्रांतांत त्याची विभागणी हेतुपुरस्सर व विशिष्ट धोरणानें केली जाणें अगत्याचें ठरतें. धान्याच्या किंमतीचें नियंत्रण व रॅशनिंग हीं चोहोंकडे अंमलांत आल्यावांचून विभागणीची योजना यशस्वी होणें शक्य नाहीं हें उघड आहे. तथापि, सिंध व पंजाब हे फाजील उत्पादनाचे प्रांत असून तेथील सरकारांनीं नियंत्रणाच्या धोरणास विरोध केला होता. आपण बंगाल व इतर प्रांत ह्यांस किती तरी धान्य पुरवलें आहे आणि आपणावर किंमतीचे व रॅशनिंगचे निर्बंध घालणें अनिष्ट आहे असें त्यांचें म्हणणें होतें. देशाच्या दुसऱ्या भागांस धान्य पुरवलें ह्यांत पंजाब व सिंध ह्या प्रांतांनीं उपकार केलेला नसून सबंध हिंदुस्थानच्या गरजेच्या दृष्टीनें पुरवठ्याचा प्रश्न सोडला गेला पाहिजे असें त्यांस निक्षून सांगण्यांत आलें होतें. आपल्या प्रांतावर अखिल भारतीय स्वरूपाचीं नियंत्रणें घातलीं गेल्यास आपण राजीनामा देऊं असें बजावून सांगण्यापर्यंत पंजाबच्या मंत्रिमंडळाची मजल गेली होती. परंतु व्हाइसरॉय त्या प्रांतांत गेले असतां त्यांनीं पंजाब सरकारची समजूत घातली असल्याचें दिसतें. ह्या बाबतींत झालेल्या तडजोडीचा तपशील प्रसिद्ध झालेला आहे आणि गव्हाच्या नव्या पिकाचे बाबतींत किंमतीचें नियंत्रण होईल आणि पंजाबच्या मोठ्या शहरांत रॅशनिंग चालू केलें जाईल असें प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून दिसतें. येत्या मार्च पासून लाहोर, अमृतसर व रावळपिंडी ह्या शहरांत रॅशनिंगला प्रारंभ होईल आणि बाकीच्या चार मोठ्या शहरांत त्याचा विस्तार नंतर केला जावयाचा आहे. रॅशनिंग बरोबर गव्हाचा भाव ठरवला जाईल काय ह्या प्रश्नास मि. वेस ह्या अधिकाऱ्यांनीं गव्हाची किंमत बाजारभावास धरून राहील असें उत्तर दिलें आहे तें पुरेसें अर्थबोधक नाहीं. तूर्त भावनियंत्रण अंमलांत येणार नाहीं आणि नवें पीक बाजारांत येईल तेव्हां त्याची अंमलबजावणी केली जाईल अशी सामान्य कल्पना आहे.

सबंध हिंदुस्थान हें धान्याच्या निर्मितीचें एक क्षेत्र आहे आणि त्या मालाच्या उठावाची सबंद देश ही बाजारपेठ आहे ह्या हिशेबानें खाद्यपदार्थांच्या उत्पादनाची व वाटणीची व्यवस्था होणें आवश्यक आहे. प्रत्येक टापूंत धान्य किती तयार होतें, तेथील प्रत्यक्ष उत्पादकांची व इतर स्थानिक जनतेची किमान योग्य मागणी किती होईल आणि तेथून बाहेर धान्य किती पुरवतां येईल ह्या गोष्टींचा अंदाज अगोदर झाला पाहिजे. त्याबरोबरच उत्पादनखर्च व उत्पादकांची रहाणी ह्यांच्या हिशेबानें धान्याचे भाव ठरवले गेले पाहिजेत. नफेबाजी व साठवणबाजी ह्यांस वाव मिळून जनतेची अडवणूक होऊं नये आणि निश्चित बाजारभाव आटोक्यांत ठेवतां यावे म्हणून सरकारनें कांहीं धान्य स्वतः खरेदी करून तें योग्य वेळीं बाजारास पुरवलें असतां योग्य वाटणीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटण्यास सहाय्य होतें. वरील तत्वांवर योजना आखून निरनिराळ्या प्रांतांत तेथील सरकारें त्यांची अंमलबजावणी करीत आहेत. मुंबई प्रांत धान्याचे बाबतींत तुटीचा प्रांत आहे. त्यास आपली तुट भरून काढण्यासाठी बाहेरून धान्य आणणें प्राप्त आहे. सर्व प्रांतांची मिळून होणारी फाजील तुटीची परिस्थिति लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकारास धान्याच्या वाटणीची व्यवस्था करणें सोपें जाईल. अशा प्रकारची योजना फाजील उत्पादनाच्या प्रांतांत सर्वस्वी पूर्णपणें अंमलांत आणणें आवश्यक नसलें तरी एकूण उत्पादन व धान्याचे भाव ह्यांच्यावर तेथील सरकाराचें नियंत्रण असणें अपरिहार्य आहे; कारण, प्रांतिक जरूरीपेक्षा अधिक असलेलें धान्य योग्य किंमतीनें तुटीच्या प्रांतांत पाठवलें जाण्याची तरतूद त्यांच्या मार्फत झाली पाहिजे. नफेबाजी व भरमसाट किंमती ह्यांस आळा घालण्याकरितां बिनतुटीच्या प्रांतांतील सरकारांसहि कांहीं धान्य खरेदी करून बाजारपेठांवर भावांच्या स्थैर्याच्या दृष्टीनें प्रभुत्व राखतां आलें पाहिजे. पंजाबमध्यें सरकारी नियंत्रणाची आवश्यकता ह्यावरून सिद्ध होत आहे.

लहान-मोठ्या हजारों शेतकऱ्यांकडून विशिष्ट प्रमाणांत सरकारी अधिकाऱ्यांनीं धान्याची खरेदी करावयाची म्हणजे प्रत्यक्ष व्यवहारांत कित्येक अडचणी उपस्थित होणें अपरिहार्य आहे. त्यांच्या कुटुंबांस व बियास लागणारें धान्य शेतकऱ्यांपाशीं ठेवून बाकीचेंच सरकारनें खरेदलें पाहिजे आणि त्यांस मालाचा योग्य मोबदला वेळींच दिला पाहिजे. ज्यांचें उत्पादन विशिष्ट प्रमाणापेक्षा कमी आहे अशांकडे धान्याची मागणी होतां कामा नये. पुणें जिल्ह्यांतल्या सरकारी धान्य खरेदीच्या व्यवस्थेची माहिती नुकतीच देण्यांत आली आहे तीवरून वर नमूद केलेल्या बाबींविषयीं खबरदारी घेण्यांत येत आहे असें दिसतें. तरीहि, धान्याच्या उत्पादनाचे अंदाज स्थूल मानाचे असतात आणि जिल्ह्यांतल्या जिल्ह्यांतहि शेतीची परिस्थिति भिन्न भिन्न असते हें

ध्यानांत ठेवलें पाहिजे. तसेंच, सामान्य शेतकऱ्यांस स्वतःच्या अडचणी वरच्या अधिकाऱ्यांच्या कानांपर्यंत पोंचवणें कठिण पडतें हेंहि विसरतां कामा नये. ह्या गोष्टींची जाणीव पुणें जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांस आहे असें त्यांनीं जाहीर केलें असून त्यांचे संबंधांत विधायक सूचना केल्या गेल्यास त्यांचा विचार करण्याची तयारी त्यांनीं दर्शवली आहे.

## शेतीचें शांततेच्या आणि युद्धकाळांत महत्त्व

मनुष्याच्या चरितार्थाचे दृष्टीनें कॉकेशसमधील तेलाच्या खाणी, उरलमधील लोखंड किंवा दक्षिण आफ्रिकेंतील सोनें ह्यांचेपेक्षा अन्न देणारी जमीन अधिक महत्त्वाची आहे. पृथ्वीतलावरील एकूण जमिनींपैकी फक्त ११% जमीन लागवडीखालीं आहे व तिचेवरच २०० कोटि लोकांचें पोट भरतें, हें उघड आहे. ह्या ११% जमिनीपैकी सर्वच जमीन सुपीक आहे, असें नाहीं. लक्षावधि एकरांचा कस त्यांतील दीर्घकालीन लागवडीमुळें नाहींसा झालेला आहे व कितीतरी जमीन धुपून गेली आहे व जात आहे. प्रत्येकास पुरेसें अन्न मिळण्यास दर माणशीं २½ एकर तरी जमीन पाहिजे, असें अमेरिकेंतलें प्रमाण आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसाचे वाट्यास सरासरीनें १ एकरहि जमीन येत नाहीं व वाटणीचें हें प्रमाण वाढत्या लोकसंख्येबरोबर कमी कमी होत चाललें आहे.

सकस जमिनीचें महत्त्व शांततेच्या काळाइतकेंच युद्धकाळांतहि मोठें आहे. लढाऊ सैनिक व बिनलढाऊ नागरिक ह्या सर्वांस अन्नपुरवठा जमिनींत पिकणाऱ्या धान्यापासूनच होतो. अन्नाबरोबर इतरहि कित्येक युद्धोपयोगी गोष्टींचा उगम जमिनींतच होतो. गोळे उडवितांना लागणारें ग्लिसरिन सोयाबीनच्या तेलापासून मिळतें. इनसेंडिअरि बॉंबच्या बनावटीस एरंडीचें तेल लागतें, पॅरॅशूट कपडासाठी कपाशीचा उपयोग होतो. लोकर, साखर, धान्य, इत्यादि सर्वांचा उपयोग आज युद्धाचे कामीं होत आहे.

इंग्लंडनें शक्यतेवढ्या जमिनींत पिकें काढण्यास प्रारंभ केला असला तरी तो देश अन्नाचे बाबतींत स्वावलंबी झालेला नाहीं. पिकाखालील क्षेत्र अद्याप अपुरें आहे. दीडवर्षांपूर्वीपेक्षा आतां तेथील अन्नपरिस्थिति पुष्कळच सुधारली आहे. अन्नाच्या मुबलक पुरवठ्यावर राष्ट्राचा खंबीरपणा व निर्धार अवलंबून असतो, हें उघड आहे. जर्मनीनें प्रत्यक्ष आपल्या सत्तेखालीं आणलेले व आपल्या राजकीय वर्चस्वाखालीं आणलेले सर्व देश शेतीच्या दृष्टीनें समृद्ध आहेत. जपाननें व्यापलेले प्रदेशहि सुसंपन्न आहेत. मुसोलिनीनेंहि ह्याच दृष्टीनें प्रयत्न केला, तो अयशस्वी ठरला. शेतीच्या सुबत्तेवर राष्ट्राचें वर्चस्व अवलंबून रहातें, असा इतिहासाचा अनुभव आहे. सध्यापुरतें पाहिलें तर संयुक्त राष्ट्रांस उपलब्ध असलेले प्रदेश शत्रूकडील प्रदेशापेक्षा अधिक समृद्ध आहेत. उत्तर व पश्चिम युरोप, पूर्व भूमध्य समुद्राचे कडेचे देश, युक्रेन, आशिया व ऑस्ट्रेलियाचे कांहीं भाग, दक्षिण आफ्रिका, उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिकेचा दक्षिण भाग हे धान्य पिकविणारे प्रमुख प्रदेश आहेत. ह्यांपैकी बहुतेक प्रदेश संयुक्त राष्ट्रांचे हातीं आहेत. बटाट्यांचे पिकाचे बाबतींत मात्र शत्रुपक्षाची स्थिति बरी आहे; बाकी सर्व पिकांचे संबंधांत संयुक्त राष्ट्रांस अनुकूलता आहे. जगांतील शेतीच्या मुलुखापैकी संयुक्त राष्ट्रांचे ताब्यांत जेवढा मुलूख आहे, त्याच्या फक्त निम्मा मुलूख शत्रुराष्ट्रांचे ताब्यांत आहे. शत्रूच्या ताब्यांत ६५,६७,५३,००० एकर शेतजमीन असली, तर संयुक्त राष्ट्रांचे ताब्यांत १,३५,६२,१८,००० एकर शेत जमीन आहे. ब्राझीलमधील २ कोटि, ३० लक्ष एकर जमीन संयुक्त राष्ट्रांसच उपलब्ध आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जमिनींत नव्या नव्या विजयांनीं एकसारखी भर पडत चालली आहे. अमेरिका, रशिया, ब्राझील, इत्यादि देशांतील लक्षावधि एकर जमीन अद्याप लागवडीखालीं आलेली नाहीं, ती अर्थातच हिशेबांत घेतलेली नाहीं.

संयुक्त राष्ट्रांस धान्य पुरविणारे दोन प्रमुख देश म्हणजे अमेरिका व कॅनडा हे होत. रशियाचा स्वतःचा मोठा प्रदेश शत्रूचे ताब्यांत असल्याकारणानें, तो रशियास परत मिळाल्यावरच तेथें लागवड सुरू होणार. सध्याच्या युद्धाच्या पद्धतीमुळें लक्षावधि एकर शेतजमीन नाश पावत आहे व लक्षावधि एकरांची उपयुक्तता नाहींशी होत आहे. ह्यासाठी उपलब्ध सर्व जमिनींचा अधिकाधिक उपयोग करणें अत्यावश्यक झालें आहे. जमिनींतील पिकें वाढतील, परंतु त्याबरोबर जमिनीचा कस कमी होणार नाहीं, अशी काळजी घेतली पाहिजे. ह्या दृष्टीनें अमेरिकेंत प्रयत्न चालू आहेत व इतर उद्योगधंद्यांची युद्धसहाय्यास प्रभावी मदत व्हावी ह्यादृष्टीनें जशी जुळणी केली जाते, तशीच व्यवस्था शेतीचे धंद्यासंबंधीं केली पाहिजे, अशा भावनेनें शेतीकडे तेथें पाहिलें जात आहे. शेतीचें उत्पन्न दरसाल वाढत जावें ह्याकरितां अमेरिकन शेतकऱ्यांस प्रोत्साहन देण्यांत येत आहे व हें उत्पादन अल्पकालिक ठरूं नये, ह्याकरितां शास्त्रीय पद्धतीनें शेतीची आखणी करण्यांत येत आहे. शेतीचें उत्पन्न टिकविण्याचें महत्त्व तेथें पटलेलें आहे. हिंदुस्थानांत मामुली काळांतहि शेतीचें उत्पन्न वाढणें किती आवश्यक आहे, हें लक्षांत घेऊन येथेंहि शेती अधिक फलदायी करण्याचा संघटित प्रयत्न केला जाणें अगत्याचें आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील मोटारींवरील कर

दहा अश्व शक्तीची मोटार ग्रेट ब्रिटनमध्यें एकाद्यानें विकत घेतली तर वाहनाची २०० पौंड किंमत देऊन ती वर्षभर वापरण्यापूर्वीं त्यास आणखी ८० पौंड करांचेपायीं खर्च येतो. ३३⅓% खरेदीवरील कराचे ५६ पौंड होतात, मोटारीच्या प्रत्येक अश्वशक्तीवर २५ शिलिंग ह्या दरानें तो कर १२½ पौंड भरतो व गॅलनवरील ९ पेन्स कराचे १० हजार मैल प्रवासाचे १२ पौंड होतात. म्हणजे सुमारें ३ हजार रुपयांच्या गाडीवर पहिल्या बारा महिन्यांत सुमारें १,२०० रुपये कर भरावा लागतो.

### पार्लमेंटचा विक्रम

सध्या ग्रेट ब्रिटनमध्यें पार्लमेंट चालू आहे, इतकें दीर्घ काळ पार्लमेंट त्या देशांत ह्यापूर्वीं फक्त तीनच प्रसंगीं चालू होतें. (१५७२ ते १५८३, १६४० ते १६५३ व १६६१ ते १६७९.) सध्याच्या चालू पार्लमेंटाचे काळांत ग्रेट ब्रिटनचे तीन राजे झाले; तीन मुख्य प्रधान झाले; एका राजाची रौप्य ज्युबिली व एका राजाचा राज्यत्याग झाला; फर्स्ट लॉर्ड व परराष्ट्रमंत्री ह्यांचे राजीनामे झाले; कॉमन्स सभेच्या अध्यक्षाच्या विवाहाची सुवर्ण ज्युबिली झाली व त्याचा मृत्यु झाला; दुसऱ्या जागतिक युद्धास प्रारंभ झाला; खुद्द पार्लमेंटचें सभागृह शत्रूच्या हल्ल्यामुळें नाश पावलें, मुख्य प्रधानांनीं कामासाठी चार खंडांस भेट दिली. सध्याचे मुख्य प्रधान, ग्रेट ब्रिटनच्या आजपर्यंतच्या सर्व मुख्य प्रधानांत श्रेष्ठ ठरतील असा रंग दिसत आहे.

## स्फुट विचार

### कैरो येथें तुर्की मुत्सद्यांशीं चर्चा

मित्रराष्ट्रांचे पुढारी आणि त्यांचे युद्धसल्लागार ह्यांचेमध्यें कैरो व तेहरान येथें झालेल्या वाटाघाटींस व त्यासंबंधांत प्रसिद्ध झालेल्या अधिकृत पत्रकांस विशेष महत्व देण्यांत येत आहे तें अगदी उचित आहे. ह्या चर्चेत मि. चर्चिल, प्रेसिडेंट रूझव्हेल्ट, मार्शल स्टॅलिन व जनरॅलिसिमो चँग–कै–शेक ह्यांनीं भाग घेतला असल्यानें मित्रराष्ट्रांनीं जर्मनी व जपान ह्यांचेविरुद्ध चालवावयाच्या युद्धाचे संबंधानें एकमतानें योजना आखली आहे हें उघड झालें आहे. मित्रराष्ट्रांत फूट पाडण्याचें किंवा त्यांच्या धोरणाविषयीं गैरसमज पसरवण्याचे शत्रूचे सर्व प्रयत्न सपशेल फसले आहेत. जर्मनींत डॉ. गोबेल्स व जपानमध्यें जनरल टोजो ह्यांनीं मित्रराष्ट्रांच्या वरील चर्चेनंतर व तीस अनुलक्षून काढलेल्या उद्‌गारांवरून युद्धास नवीन व त्यांच्या दृष्टीनें प्रतिकूल वळण लागत आहे ह्याचे विषयींची भीति उघड व्यक्त होत आहे. स्वतःच्या लोकांस धीर देण्याच्या उद्देशानें त्यांनीं जोरदार भाषणें केलीं तरी त्यांतला पोकळपणा झाकला जाण्यासारखा नाहीं. तटस्थ तुर्कस्तानच्या प्रेसिडेंटनें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट आणि मि. चर्चिल ह्यांचें आमंत्रण स्वीकारून त्यांच्याशी कैरो येथें बोलणीं केलीं. ह्या घटनेनें जर्मनींत आणि बाल्कन व इतर जर्मनव्याप्त देशांत अस्वस्थता उत्पन्न झाली असल्यास त्यांत नवल नाहीं. आपल्या परराष्ट्रीय धोरणांत कैरोच्या चर्चेमुळें कांहींच बदल झालेला नाहीं असें तुर्की मुत्सद्यांनीं म्हटलें असलें तरी मित्रराष्ट्रांच्या पुढाऱ्यांशीं त्यांनीं युद्ध परिस्थितीबाबत चर्चा केली ही गोष्ट अर्थपूर्ण आहे ह्यांत संशय नाहीं. अमेरिकेच्या युद्धहेतूंशीं तुर्कस्थान सहमत आहे असें त्या राष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं जाहीर रीतीनें सांगितलें त्यास अपूर्व महत्व आहे. पश्चिमेकडून व दक्षिणेकडून ह्यापुढें जर्मनीवर चढाई करण्याचें मित्रराष्ट्रांनीं निश्चित केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. भावी दक्षिण-आघाडी बाल्कनच्या दिशेनें होण्याचा संभव आहे आणि त्या रणक्षेत्राशीं निकटवर्तित्वामुळें तुर्कस्थानचा संबंध येतो. त्यासाठी रशिया व तुर्कस्थान ह्यांचेमध्यें नीट समजुतीची परिस्थिति हवी आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांसहि तुर्कस्थानची अनुकूलता आवश्यक आहे. तुर्की मुत्सद्यांनीं म्हटल्याप्रमाणें त्यांच्या राष्ट्राचा तटस्थपणा अबाधित राहिला तरी कैरो येथें झालेल्या समाधानकारक व परस्पर विश्वासात्मक चर्चेचा मित्रराष्ट्रांस पुष्कळ उपयोग होईल. त्याच मानानें ही चर्चा जर्मनीच्या हितास प्रतिकूल आहे ह्यांतहि शंका नाहीं. गेलें महायुद्ध जर्मनीशीं चार वर्षे, तीन महिने व एक आठवडा चाललें. प्रस्तुत युद्धांत ही मुदत आतांच संपली आहे. तथापि, ह्याच प्रसंगीं युद्धाच्या अखेरीचा प्रारंभ होत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुढील वर्षाच्या मध्याचे सुमारास युद्धास निर्णायक स्वरूप येईल असें मित्रराष्ट्रांचे पुढारी म्हणत आहेत, त्यांत सावधगिरी, चिकाटी व आत्मविश्वास ह्यांचें योग्य मिश्रण आहे.

---

### युद्धोत्तर व्यापारांत अमेरिकेचें स्थान

खंड आणि उसनवार पद्धतीनें अमेरिका संयुक्त राष्ट्रांना अत्यंत मोठ्या प्रमाणावर माल पुरवीत आहे, त्या कारणानें अमेरिकेची सावकारी फुगत चालली आहे व त्या देशाचा परराष्ट्रीय व्यापार वाढत आहे. युद्ध समाप्तीनंतर अमेरिकेचें धोरण काय राहील व ह्या परिस्थितीचा इतर देशांच्या परराष्ट्रीय व्यापारावर परिणाम काय होईल, हा प्रश्न महत्वाचा असून ग्रेट ब्रिटनसारख्या परराष्ट्रीय व्यापारावर जगणाऱ्या देशांचे दृष्टीनें अमेरिकेचें धोरण फारच जिव्हाळ्याचें आहे. अमेरिकेनें आपलें व्याज व मुद्दल अजिबात सोडून दिलें पाहिजे; नाहींतर अमेरिकेनें आपली इतर देशांतील खरेदी वाढवून विक्री अगदी कमी केली पाहिजे. अमेरिकेनें परराष्ट्रांकडे माल पाठविण्याऐवजी तेथून तो मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यास प्रारंभ केला, तर इतर देशांच्या उद्योगधंद्यांस व व्यापारास त्यामुळें चांगलेंच उत्तेजन मिळेल, हें उघड आहे. असें करण्यानें अमेरिकेच्या कर्जाची थोडीफार वसुली होईल, हें खरें आहे, परंतु परराष्ट्रीय व्यापारांतील अमेरिकेचें पुढारीपण त्यामुळें नाहींसें होईल व अमेरिकेंतील उद्योगधंदे बसून तेथें बेकारी माजेल. अमेरिका कोणतें धोरण स्वीकारणार, ह्यावरच युद्धोत्तर व्यापार, हुंडणावळ, चलनव्यवस्था, इत्यादींचें भवितव्य प्रामुख्यानें अवलंबून रहाणार असल्याकारणानें, अमेरिकेंतील ह्या संबंधांतील विचारप्रवाहाकडे हितसंबंधी देशांचे डोळे लागून रहाणें स्वाभाविक आहे.

---

### रशियाच्या लढाऊ सामर्थ्याची आर्थिक गुरुकिल्ली

युरोपांतील पूर्व आघाडीवर रशियन सैन्यानें जर्मनीस कीव्हपर्यंत मागें हाटवून त्याच्या तावडींतून सोव्हिएट मुलखाचा मोठा व महत्त्वाचा भाग सोडवण्यांत यश मिळवलें आहे. ह्या कामीं सैनिकबळ, लढाऊ सामुग्रीचा पुरवठा व कार्यक्षम लष्करी नेतृत्व ह्यांची उत्कृष्ट जोड जमली आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं रशियास लढाऊ सामान पुरवण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला असून हें सहाय ऐनवेळीं त्यास उपयोगी पडलें आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि, रशियन यशाच्या मुळाशीं सोव्हिएट युनिअनचें योजनात्मक व धडाडीचें आर्थिक धोरण आहे आणि त्यास रशियांतील संपत्तीच्या विविध साधनांच्या विपुलतेनें महत्वाचें सहाय दिलें आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मनुष्यबळासंबंधानें बोलावयाचें तर रशियाची लोकसंख्या जर्मनीच्या लोकसंख्येच्या तिप्पट भरेल; आणि ह्या सर्व लोकांस, मग ते युरोपांतील प्रांतांत रहात असोत किंवा मध्य व पूर्व एशियाचे रहिवासी असोत, सारखेंच लष्करी शिक्षण दिलें जात आहे आणि युद्धांत भाग घेण्याची संधी मिळत आहे. वर्णाचे, रंगाचे व भाषेचे सर्व भेद बाजूस सारून सोव्हिएट रशियाचे सर्व लोक स्वदेश रक्षणासाठी एकदिलानें लढत आहेत व लढण्यास तयार आहेत. दुसरी गोष्ट येथें लक्षांत घेण्यासारखी आहे, ती ही कीं पश्चिम रशिया उद्योगधंद्यांत विशेष पुढारलेला असून प्रथम जर्मनीकडून तोच पादाक्रांत केला गेला; परंतु सोव्हिएट सरकारनें सैबीरिया, मंगोलिया वगैरे अत्यंत मागसलेल्या आपल्या प्रांतांतहि शिक्षणप्रसार व औद्योगीकरण योजनात्मक पद्धतीनें झपाट्यानें घडवून आणल्यामुळें ह्या भागांत लढाऊ सामान बनवण्याचे अनेक मोठमोठाले कारखाने उभारले गेले आणि त्यांत तयार झालेली विपुल युद्धसामुग्री रणांगणावर अव्याहत रीतीनें जोडूं शकली आहे. शस्त्रास्त्रांनीं सुसज्य अशीं सैन्यें एकामागून एक सबंद रशियन आघाडीवर खंड न पडतां येऊन धडकल्यामुळें जर्मन सेनाधिकारीहि हतबल झाले आहेत. सोव्हिएट रशियाच्या परिघांत युरोपापेक्षा आशियाचाच भाग मोठा

आहे आणि त्यांत शकेड, लोखंड इत्यादींचा विपुल पुरवठा आहे. ह्या नैसर्गिक साधनांचा उत्कृष्ट आर्थिक उपयोग रशियन सरकारनें केला आहे आणि एशियाटिक रशियांतील मनुष्यबळ व आर्थिक समृद्धि जर्मनीविरुद्ध युद्धांत कामास येत आहे. अफाट प्रदेश, मोठी लोकसंख्या व विविध संपत्तीचीं नैसर्गिक साधनें हीं रशियांत एकत्रित झालीं आहेत; आणि रशियन लोक एकराष्ट्रीयत्वाची भावना व स्वदेशाभिमान ह्यांनीं प्रेरित होऊन स्वतःच्या संरक्षणासाठी वाटेल तेवढा स्वार्थत्याग करीत आहेत. रशियाच्या एकीकरणास व आर्थिक प्रगतीस त्या देशाच्या पुढाऱ्यांनीं हेतुपुरस्सर उत्तेजन देण्यासाठी संघटनात्मक व अविरत प्रयत्न दोन तपें पर्यंत सारखे केले नसते तर सोव्हिएट युनिअनला जर्मनीच्या भयंकर व निकराच्या चढाईस तोंड देतां आलें नसतें आणि खाद्यपदार्थ, युद्धसामुग्री व मनुष्यबळ ह्यांच्या तुटवड्यामुळें त्यांवर कठिण प्रसंग आला असता. रशियानें जर्मनीसारख्या बलाढ्य लष्करी राष्ट्रावर आज मात केली आहे ह्या गोष्टीचें आर्थिक रहस्य वरीलप्रमाणें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

## पंजाब मंत्रिमंडळाचा खुलासा

आजच्या अमलेखांत धान्याचा पुरवठा व त्याची प्रांतानिहाय योग्य वाटणी हीं कोणत्या मुख्य तत्त्वावर व पद्धतीनें ह्या देशांत घडवून आणलीं पाहिजेत ह्याचें विवेचन आम्हीं केलें आहे, आणि त्यासंबंधांत पंजाबच्या मंत्रिमंडळाच्या भूमिकेचा उल्लेख केला आहे. व्हायकाउंट वेव्हल ह्यांनीं पंजाब सरकारची समजूत घातली असल्याचें आम्हीं तेथें म्हटलें आहे. त्यास आतां त्या सरकारची बाजू स्पष्ट करणारें पत्रक अधिकारीरीत्या प्रसिद्ध झालें आहे त्यानें दुजोरा मिळत आहे. भाव नियंत्रण आणि रॅशनिंग आपणांस अजूनहि मान्य नाहीं; तथापि, त्या बाबतींत मध्यवर्ती सरकारनें आपलें धोरण निश्चित केलें असल्यानें आणि तें सर्व देशभर अंमलांत येणें युद्धप्रयत्नाचे दृष्टीनें अगत्याचें आहे असें सांगण्यांत येत असल्यानें आपण तें अंगिकारण्याचें ठरवलें आहे असें पंजाब मंत्रिमंडळाचें पत्रक म्हणतें. भावनियंत्रण व रॅशनिंग ह्यांचे योगानें कित्येक अडचणी उद्भवतील असें त्यास वाटत असूनहि गव्हर्नर जनरल ह्यांचा सल्ला त्या मंत्रिमंडळानें मानला आहे आणि त्याप्रमाणें व्यवस्था करण्याचें त्यानें ठरवलें आहे. गहूं व इतर मुख्य धान्यें ह्यांच्या कमाल किंमती सर्व हिंदुस्थानभर नियंत्रित होतील. रब्बीचें पीक बाजारांत आलें म्हणजे त्याच्या भावनियंत्रणाची अंमलबजावणी पंजाबमध्यें केली जाईल. हिंदुस्थान सरकारचें धोरण प्रयोगादाखल अमलांत आणतांना पंजाब मंत्रिमंडळानें एक गोष्ट न करण्याचें ठरवलें आहे आणि ती म्हणजे शेतकऱ्यांकडून सक्तीनें धान्य घेण्याविषयींची होय. इतर प्रांतांत ह्या रीतीनें धान्य जमा करण्यांत येत आहे आणि त्याचा उपयोग किंमती स्थिर राखण्यासाठी केला जावयाचा आहे. पंजाब मंत्रिमंडळानें ह्या प्रकारच्या धान्य खरेदीस नकार दिला आहे.

## रॅडन वायूच्या उपचारासाठी देणगी

रेडियमपासून काढलेला रॅडन हा वायु कॅन्सरच्या उपचारास फार उपयुक्त असतो. मिडलसेक्स (इंग्लंड) इस्पितळांत रॅडनचे उपचार चालू ठेवण्याकरितां एका अमेरिकन सोसायटीनें २० हजार रुपये दिले आहेत.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम्., २४ डे. जि. पुणें, ४)

गेल्या पंधरवड्यामध्यें कलकत्त्यावरील बॉम्ब हल्ला सोडला तर शेअर बाजाराच्या दृष्टीनें महत्त्वाचें कांहीं एक घडलेलें नाहीं. हल्ल्याच्या बातमीमुळें टाटा डिफर्ड १९९० वरून १९०५ पर्यं उतरून शुक्रवारीं १९१७-८ पर्यंत बंद झाला. गिरण्यांमध्यें मुळींच हालचाल झाली नाहीं. डाईंग १९३०, कोहिनूर ६१६ वगैरे पूर्वीचेच भाव पडून आहेत. सिमेंट मात्र २२२ वरून २२७ पर्यंत वर चढला. युद्ध व युद्धोत्तर कालाचा म्हणून हा शेअर गणला जातो व व्याज यंदा जरी ६. ७ आलें असलें तरी गुंतविणारे याला मुळींच काढायला तयार दिसत नाहींत. मुंबई ट्रॅम कंपनी मात्र नगरपालिका घेणार या भीतीनें धाडकन कोसळला. वास्तविक या अगोदरच तो पडावयास हवा होता व अजूनही तो १४८ च्या खालीं यावयास पाहिजे. बँकांच्या शेअर्समध्यें चालू असलेली तेजी लोकांना थोडी घोटाळ्यांत टाकणारी ठरली आहे. प्रथमतः तीन टक्के पातळीवर भाव यावयास पाहिजेत म्हणून हे वर चढत असावेत असा अंदाज होता. पण नंतर भुमका उठल्या कीं ज्याअर्थी बँकांच्या ठेवींमध्यें प्रचंड वाढ झालेली आहे त्याअर्थी बँकांचें भांडवल व देणीं यामध्यें विषमता उत्पन्न झाल्यानें बँकाना भांडवल वाढविणें भाग पडेल आणि नवीन शेअर्स अर्थातच बाजारांत चालू असलेल्या भावाच्यापेक्षां जुन्या भागीदारांना स्वस्तांत मिळणार म्हणून लोकांकडून घाईघाईनें सोडतीच्या स्वरूपाची प्रचंड खरेदी झाली. यावर येवढेंच म्हणतां येईल कीं सध्या चलनवाढीमुळें बँकांच्या ठेवी वाढलेल्या असून प्रत्यक्ष मालामध्यें पैसा गुंतविण्याची थोड्या महिन्यापूर्वींची प्रवृत्ति आतां बदलूं लागली असून रोकड कायम ठेवण्याकडचा कल वाढलेला दिसत आहे. चलन संकोच जेव्हां सुरू होईल तेव्हां या मागणीबरोबर परत करावयाच्या ठेवी आपोआप कमी होतील. तेव्हां बँकांना तूर्त तरी भांडवल वाढविण्याची जरूर दिसत नाहीं. म्हणून गुंतविणारांनीं या तेजीच्यामागें सावधपणें गेलें पाहिजे.

तसेंच, सर्वसाधारण गुंतविणारांस आतांच एक महत्त्वाचा इशारा द्यावासा वाटतो कीं, चालू युद्धपरिस्थितीवरून आतां लढाईचा शेवटचा अंक सुरू झालेला दिसतो. अर्ल सेसिलसारख्या माणसानें नुकतेच "आतां लढाई कोठल्याहि क्षणाला थांबूं शकेल" असे उद्गार काढले ते लक्षांत सारखे बाळगावयास हवेत. या खेरीज व्यापारी वर्ग व सरकार यांच्या चालूं असलेल्या अदृश्य युद्धांत सरकारी पाश हळू हळू पण खात्रीनें नफेबाज व भरमसाट किंमती–विशेषतः कापड–यांच्या मानेभोंवती बसत चालले आहेत व पुढील चार महिन्यांत मालाच्या किंमती निःसंशय खालीं आल्याशिवाय राहणार नाहींत. या दृष्टीनें "राष्ट्रीय युद्ध आघाडी"नें चालविलेली "बचत करा" ही घोषणा स्वागतार्ह आहे. म्हणून गुंतविणारांनीं यापुढें रोकड राखण्याकडे प्रवृत्ति ठेवलेली बरी.

## बहामा बेटें

बहामा बेटास युद्ध–परिस्थितीनें चांगला हात दिला असून, त्यांत आज सुबत्ता आहे, असें बहामाचे गव्हर्नर, ड्यूक ऑफ विंडसर, हे नुकतेच म्हणाले. बेटांत पूर्वीप्रमाणें प्रवासी येत नसले, तरी विमान तळांची बांधणी, सैनिकांचे तळ, अमेरिकेंतील मळ्यांवर कामासाठी ५ हजार मजुरांची निर्गत, माशांच्या धंद्याची वाढ व सिसलची अमेरिकेंत विक्री ह्यांमुळें बहामाची परिस्थिति चांगली सुधारली आहे.

## इटलीच्या शरणागतीचा जर्मनीवर परिणाम

इटलीचा पराभव झाल्याकारणानें, जर्मनीमधील कारखाने बाँब हल्ल्यांच्या टप्प्यांत लवकरच येऊन त्यांतील उत्पादनास अडथळा येईल, ह्यापेक्षा त्या पराभवाचें महत्त्व अधिक आहे. १९४० मधील फ्रान्सच्या पराभवामुळें ब्रिटिश जनतेवर व अमेरिकेनें खंड उसनवार पद्धतीनें दोस्त राष्ट्रांस मदत देण्याचें ठरविलें त्यामुळें जर्मनीवर झालेल्या परिणामाची बरोबरी इटलीच्या पराभवानें निर्माण झालेल्या परिस्थितीनें केली आहे.

तथापि, इटलीच्या शरणागतीमुळें आर्थिक दृष्ट्या जर्मनीचें फार नुकसान झालेलें नाहीं; जर्मनीला इटलीकडून कांहीं महत्त्वाचा कच्चा माल मिळत असे, हें खरें असलें तरी त्याच्या मोबदल्यांत जर्मनीस अधिक मूल्यवान गोष्टी द्याव्या लागत, असें ब्रिटिश तज्ज्ञांचें मत आहे. इटली जर्मनीला दरवर्षी २½ लक्ष टन गंधक व २ लक्ष टन पायराइटस देत असे. म्हणजे, जर्मनीस उपलब्ध असलेल्या गंधकाच्या ४०% गंधक व १०% पायराइटस इटलीकडून येत असे. पारा, रेशीम, फळें, बोरॅसिक ॲसिड, इत्यादींचीहि निर्गत इटलींतून जर्मनीकडे होई. जस्त, ताजीं फळें, इत्यादींचाहि पुरवठा इटली करीत असे.

जर्मनी इटलीकडे दरसाल १ कोटि, २० लक्ष टन कोळसा पाठवी. ही निर्गत एकूण जर्मन उत्पादनाच्या ५% इतकीच असली तरी हा कोळसा पाठविण्यासाठी जर्मनीला ३०० इंजनें व १५ हजार वाघिणी त्याप्रीत्यर्थ राखून ठेवाव्या लागत. इटलीचे उद्योगधंदे चालू ठेवण्याकरितां जर्मनी लोखंड, पोलाद, मशीन टूल्स, यंत्रसामुग्री, इत्यादींची मिळून ५ लक्ष टनांची निर्गत करी. निकेल, तांबें, व टिन ह्यासाठी इटली जर्मनीवर पूर्णपणें अवलंबून होता. इटलीमधील जनतेसाठी जर्मनीला दरसाल ३ ते ३½ लक्ष टन गहू त्या देशास द्यावा लागे. जर्मनीनें इटलींतील कारखान्यांचा युद्धोपयोगी उत्पादनाकडे उपयोग न करतां, इटालियन कामगार जर्मनींत आणण्याचें धोरण ठेवलें होतें. २ लक्ष इटालियन कामगार जर्मन व ऑस्ट्रियन कारखान्यांत कामें करीत आहेत. जर्मनीनें आपल्या पश्चिम विभागांतील कारखाने ब्रिटिश व अमेरिकन विमानांच्या हल्ल्यांचे आवाक्यांतून काढून पूर्वेकडे हलविण्याचें काम चालू ठेवलें आहे, त्यास इटलीच्या शरणागतीनें पायबंद बसेल हें उघड आहे. तथापि, ह्या कारखान्यांवर बाँब टाकण्यास विमानें पाठवावीं लागतील त्यासाठी विमानांचे तळ उत्तर इटलींत उपलब्ध व्हावे लागतील. तें होईपर्यंत, इटलीच्या शरणागतीचा आर्थिक फायदा कांहीं काळ तरी, जर्मनीसच मिळाल्यासारखें झालें आहे. जर्मनीच्या आर्थिक शक्तीस आतां इटलीचें ओझें राहिलेलें नाहीं. परंतु, इटलीच्या शरणागतीचा अखेर परिणाम जर्मनीच्या नि:पातांतच होणार हें उघड आहे.

चटण्या तयार मिळतात!
लसूणाची, जवसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मँगो चटणी इ०
द. ना. हेजीब.
(३) १० शुक्रवार, पुणें.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

### सुमारें ६ लक्ष रुपयांचा निवळ नफा

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. ला ३० सप्टेंबर, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ५,९१,८९० रुपये निवळ नफा झाला आहे. गेल्या वर्षीच्या नफ्याचा आकडा ३,७७,००३ रुपये होता. गेल्या वर्षी साखरेच्या विक्रीचे १९ लक्ष, ३६ हजार रुपये मिळाले होते व १,३९१ रुपयांची साखर शिल्लक होती. अहवालाचे वर्षी २० लक्ष, ६८ हजारांची साखरविक्री झाली व वर्षअखेर ६,३६,२८० रुपयांची साखर शिल्लक आहे. किरकोळ उत्पन्नांत अहवालाचे वर्षी १½ लक्ष रुपयांची वाढ झालेली आहे. कंपनीचें वसूल भांडवल ६ लक्ष, ७५ हजार रुपयांवरून ७ लक्ष, ९४ हजारांवर गेलें आहे. ठेवी व इतर देणीं १२ लक्ष, ८७ हजारांचीं १८ लक्ष, ६६ हजार रुपये झालीं आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळें कंपनीचा उत्पादन खर्च वाढणें अपरिहार्य आहे. १९४१-४२ च्या मोसमांत साखरेचा उतारा १०.३६% पडला होता तो अहवालाचे वर्षी ११.६०% झाला व त्याचा परिणाम साखरेचें उत्पादन व नफा वाढण्यांत झाला. डिस्टिलेशन प्लँट बसविण्याचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें असून त्याची पूर्वतयारी झाली आहे. पुढील वर्षी उत्पादनास प्रारंभ होईल. कंपनीच्या मळ्यांत ३० सप्टेंबर रोजीं १९७४ एकरांत ऊंस लागलेला होता. पिकाची परिस्थिति समाधानकारक आहे. कंपनीच्या उंसाचे लागवडीचे संबंधांतील कामगिरीबद्दल व आजूबाजूच्या जमिनी मिळवून देण्यांत यश मिळविल्याबद्दल डायरेक्टर बोर्डानें कंपनीच्या शेतीचे प्रमुख, श्री. एन. जी. आगाशे, ह्यांचें नांव विशेषत्वानें उल्लेखलें आहे. आपल्या नफ्यापैकीं २ लक्ष रुपये डेक्कन एज्युकेशन सोसायटीला तिच्या नव्या कॉमर्स कॉलेजसाठी द्यावेत; अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. ऑर्डिनरी भागांस त्यांच्या भागांवर १०% डिव्हिडंड मिळणार आहे व रिझर्व्ह फंडांत १½ लक्ष रुपये व डि. ई. फंडांत ½ लक्ष रुपये जाणार आहेत.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९३३ ए, सदाशिव, पुणें २.

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा

हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

**लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.**

**महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था**

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस, के. डब्ल्यू. फडके, फडके गणपतिवाडी, गिरगांव, बँक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस, 'रामनिवास' लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,

FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## अर्थशास्त्र

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुपक्षाकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यामुळे बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनीच्या**

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनींतच उतरा.**

अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

## देशाच्या औद्योगीकरणार्थ

जागतिक व नव्या नव्या धनोत्पादक तीस हजार धंद्यांच्या प्रायोगिक माहितीची मराठी, हिंदी व गुजराथी भाषेंतील लहानमोठीं शेंकडों पुस्तकें प्रकाशित करण्याकरितां त्या त्या भाषेंतील धनिक ग्रंथ-प्रकाशक व मुद्रक पाहिजेत. भेटा अगर लिहा.

घरबसल्या दीड हजार धंदे सप्रयोग शिकविणारी डिरेक्टरी सात आण्याचीं तिकिटें पाठवून अवश्य मागवा. व गांवोगांवीं धंदे उभारा.

औद्योगिक ज्ञानप्रसारक मंडळ

४४९ सदाशिव पेठ, पुणें २

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

तालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ | पुणें, बुधवार, तारीख २२ डिसेंबर, १९४३ | अंक ५०

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
772

GUEST HOUSE

TELEGRAM
Guest House
Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

# विविध माहिती

### हैद्राबादमधील लिमिटेड कंपन्या

हैद्राबाद संस्थानांत १०० लिमिटेड कंपन्या असून त्यांचें भांडवल ६१ कोटि रुपये आहे. तेथें आतां एक स्टॉक एक्सचेंज उघडण्यांत आला आहे.

### औषधांच्या किंमतींचें नियंत्रण

औषधांच्या किंमती नियंत्रित करणारी "१९४३ ची ड्रग्ज कंट्रोल ऑर्डर" हिंदी बनावटीच्या औषधांसहि लागू आहे, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें.

### ताली व बंधारे घालण्याची योजना

ताली व बंधारे घालून जमिनीचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत, १९४४–४५ मध्यें अशा रीतीनें ५,३०,००० एकर जमीन सुधारण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे असें प्रांतिक गव्हर्नरांनीं नुकतेंच सांगितलें.

### जर्मन युद्धकैद्यांचा हिटलरवरील अढळ विश्वास

इटलींत पकडलेल्या जर्मन सैनिकांपैकीं शेकडा तीस युद्धकैद्यांना युद्धाच्या प्रगतीबद्दल जिज्ञासा वाटत नाहीं व कोणी युद्ध जिंकावें, ह्याबद्दल त्यांस विशेष मतहि नाहीं, परंतु शेकडा सत्तर युद्धकैद्यांना जर्मनी संयुक्त राष्ट्रांचा निःपात करण्यास अजून समर्थ आहे, असेंच वाटतें. विशेषतः जर्मन वैमानिक अधाप टर्रेबाज व मानी आहेत. आकाशाचें प्रभुत्व त्यांचेकडेच आहे व जर्मन वैमानिक बळ संयुक्त राष्ट्रांचा पराजय करील, असा त्यांस विश्वास वाटतो. इटलींतील जर्मनांस निरुत्साह बिलकूल वाटत नाहीं. वरील माहिती रॉयटरच्या खास बातमीदारानें प्रसिद्ध केली आहे. जर्मन प्रचारानें त्याच्या सैनिकांस व वैमानिकांस किती भारून टाकलें आहे हें त्यावरून सिद्ध होतें.

### बंगालमधील शेतकऱ्यांची नुकसान भरपाई

बंगालमधील दुष्काळामुळें तेथील शेतकऱ्यांवर आपली जमीन अत्यंत नुकसानींत नाइलाजानें विकण्याचा प्रसंग आला. त्यांचे त्यामुळें झालेलें नुकसान भरून काढण्याकरितां बंगाल सरकार कायद्याची योजना करणार आहे. त्या संबंधांत एक ऑर्डिनन्सहि काढण्यांत येणार आहे.

### हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न.

| १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर | कोटि रुपये |
|---|---|
| १९४२ | ९८·४४ |
| १९४३ | ११५·४३ |
| वाढ | १६·९९ |

### घड्याळांचे व्यापाऱ्यांवर निर्बंध

घड्याळांच्या व्यापाऱ्यांनीं विक्रीस ठेवलेल्या सर्व घड्याळांवर विक्रीची किंमत लावली पाहिजे, असें त्यांचेवर बंधन घालणारा एक हुकूम हिंदुस्थान सरकारनें काढला आहे.

### जर्मन कट

तेहरान येथील परिषदेच्या वेळीं मा. स्टालिन, मि. चर्चिल व प्रे. रूझवेल्ट ह्यांस पकडण्याचा कट जर्मनींनें केला होता, त्याचा सुगावा मा. स्टालिन ह्यांस लागून, प्रे. रूझवेल्ट ह्यांस त्यांनीं रशियन वकिलातींतच रहाण्याचा आग्रह केला, अशी माहिती प्रे. रूझवेल्ट ह्यांनीं स्वदेशीं पोचल्यावर सांगितली.

### चीफ कन्सल्टिंग एंजिनियर

श्री. बी. कृष्णराव बी. ए. सी. ई. रिटायर्ड सुपरिंटेंडिंग इंजिनियर म्हैसूर यांस औंध संस्थानांतील पाटबंधाऱ्याच्या योजनेसाठीं चीफ कन्सल्टिंग एंजिनियर म्हणून नेमण्यांत आलें आहे.

### मुस्लिम चेंबर ऑफ कामर्स

मुसलमान व्यापारी व कारखानदार ह्यांची संघटना करण्यासाठीं वरील चेंबरची स्थापना झालेली आहे. ह्या चेंबरचें कार्य यशस्वी करण्यास मुसलमानांनीं हातभार लावावा, अशा अर्थाचीं भाषणें त्यासंबंधांत मुंबई येथें भरविण्यांत आलेल्या एका सभेंत करण्यांत आलीं. इतर चेंबरशीं स्पर्धा करण्याचा मुस्लिम चेंबरचा हेतु नाहीं, असें स्पष्ट सांगण्यांत आलें.

### रिझर्व्ह बँक

रिझर्व्ह बँकेची परिस्थिति दर्शविणाऱ्या १० डिसेंबरच्या तक्त्याप्रमाणें, बँकेच्या बँकिंग खात्यांत ७,८७,६८,००० रुपयांच्या नोटा असून ८,१५,६२,४३,००० रुपयांच्या नोटा खेळत्या आहेत. काढलेल्या नोटांची रकम ८,२३,५०,११,००० रुपये भरते. ह्या नोटांस तारण ४४१/२ कोटि रुपयांचें सोनें, ७०५ कोटि, ८४ लक्ष रुपयांचे स्टर्लिंग रोखे, १५ लक्ष रुपयांचीं नाणीं व ५८१/२ कोटि रुपयांचें हिंदुस्थान सरकारचे रोखे, असें आहे.

### मि चर्चिल ह्यांची प्रकृति

ब्रिटिश मुख्य प्रधान न्युमोनियानें आजारी होते; त्यांची प्रकृति आतां सुधारत आहे. अंगांतील ताप उतरला आहे व न्युमोनियाचीं चिन्हें नाहीशीं होत आहेत.

### जपानचा पुरा पराभव झाला पाहिजे

"जपाननें आक्रमणानें मिळविलेल्या फायद्याचा थोडा सुद्धां भाग त्याच्या पदरांत पडूं देतां कामा नये; जर्मनीचा जसा सपशेल पराभव व्हावयाचा आहे, तितकाच पूर्ण पराभव जपानचेहि वाट्यास आला पाहिजे" असें हिंदुस्थानाचे माजी व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो हे आपल्या भाषणांत नुकतेच म्हणाले.

### बुटांच्या दुरुस्तीचें काम वाढलें

ग्रेटब्रिटनमध्यें चालू युद्धापूर्वी दरसाल २५ कोटि बूट दुरुस्त केले जात असत; आतां त्यांची संख्या ३५ कोटींवर गेली आहे ह्याचें कारण फाटलेले बूट फेकून देणें पूर्वी लोकांना अवघड वाटत नसे व आतांचे बूटहि पूर्वीइतके चांगले टिकत नाहींत.

### युद्धोत्तर युरोपांत ब्रिटिश चित्रपटांचा फैलाव

जर्मनीच्या नियंत्रणांतून मुक्त होणाऱ्या युरोपांतील देशांमधील सिनेमागृहें ब्रिटिश कंपन्यांचे व्यवस्थेखालीं आणण्याच्या योजनेचा विचार ग्रेट ब्रिटनमध्यें आतांपासून सुरू झाला आहे, असें ओडिअन थिएटर्स लि. च्या अध्यक्षांचे भाषणावरून दिसून येतें. युरोपांत ब्रिटिश चित्रपटांचा योग्य फैलाव करण्यासाठीं हा प्रयत्न आहे.

### हिंदी औद्योगिक प्रगतीस चालना

ब्रिटिश साम्राज्याच्या वसाहतींत महत्वाचे उद्योगधंदे स्थापन होत आहेत, परंतु हिंदुस्थानांत त्याबाबत कांहींच प्रगति नाहीं, असें सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं नुकतेंच सांगितलें. हिंदुस्थानांतील ह्यासंबंधांतील निर्बंध दूर होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली.

### अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३९४ |
| २ जर्मनीच्या निःशस्त्रीकरणाची योजना ... | ३९५ |
| ३ कामगारांस कार्यक्षम करण्याचे प्रयत्न ... | ३९७ |
| ४ स्फुट विचार ... हिंदुस्थान सरकारच्या लॉटरीच्या कर्जाची योजना — सामान्य लॉटऱ्या व प्रस्तुत उपक्रम ह्यांतील फरक—सिंध सरकार व हिंदुस्थान सरकार ह्यांचा लढा—युद्धाचें ताजें वृत्त—आयुर्वेद रसशाळा पुणें लि. | ३९७ |
| ५ मजुरांची युद्धकार्यासाठी भरती ... | ३९९ |
| ६ दोघे एकदम मेले, तर पहिला मृत्यु कोणाचा | ३९९ |

अर्थ

बुधवार, ता. २२ डिसेंबर, १९४३

## जर्मनीच्या निःशस्त्रीकरणाची योजना

### जर्मन कामगारांस शेतकरी बनवा

गेल्या महायुद्धांत जर्मनीचा पराभव झाल्यानंतर त्यानें पुनः डोकें वर काढून प्रबळ होऊं नये ह्या दृष्टीनें पुष्कळ दक्षता घेण्यांत आली होती व जर्मनीचें निःशस्त्रीकरण करून त्याचेवर देखरेखहि ठेवण्याचा प्रयत्न झाला होता. तथापि, जर्मनी प्रबळ झाला, त्यानें शस्त्रास्त्रें तयार केलीं व सर्वंद जगास त्यानें हादरून सोडलें. जर्मनीस प्रारंभींचे काळांत मिळालेलें प्रभुत्व कांहीं काळ टिकलें तरी संयुक्त राष्ट्रांचेंहि शस्त्रोत्पादन भराभर वाढत जाऊन आतां जर्मनीस पीछेहाट करावी लागत आहे. चालू युद्धांत संयुक्त राष्ट्रांचा विजय होऊन जर्मनी पुनः पराभूत होईल, हें स्पष्ट आहे. परंतु ज्या चुकीमुळें जर्मनीस पृथ्वी जिंकण्याचें साहस करण्यास संधि मिळाली, ती चूक पुनः होणार नाहीं अशी व्यवस्था करणें संयुक्त राष्ट्रांस आवश्यक आहे. बंदुका, तोफा, रणगाडे, विमानें, ह्यांचें प्रत्यक्ष उत्पादन सुरू झालें म्हणजे शस्त्रीकरणास प्रारंभ होतो, ही कल्पना आतां सोडून दिली पाहिजे; ह्या उत्पादनाचे अगोदरची तयारी मशीन टूल्स व फाउंड्री, फर्नेस, कास्टिंग, फोर्जिंग, ग्रायंडिंग, वेल्डिंग इत्यादींस लागणारीं साधनें निर्माण करण्याचे कारखाने उभारणें ही होय. एक तोफ तयार करण्यासाठीं वेगवेगळ्या प्रकारचीं ७,००० हत्यारें लागतात. त्याचप्रमाणें बॉम्बफेक्या विमानाचे ४५ हजार भाग अथवा रणगाड्याचे ४० हजार भाग बनविण्यासाठीं असंख्य हत्यारांचीं आवश्यकता असते. हीं हत्यारें मोठ्या प्रमाणावर बनविणें म्हणजेच शस्त्रोत्पादनाची खरी सुरवात होय, हें आतां संयुक्त राष्ट्रांनीं लक्षांत बाळगलें पाहिजे. अर्थात् मशीनटूल्सचा उपयोग शांततेच्या काळांत इतर जिनसांच्या उत्पादनाकडे होतो, त्यामुळें जर्मनीनें मशीनटूल्सचे कारखाने भराभर काढले, त्याकडे संयुक्त राष्ट्रांचें दुर्लक्ष्य झालें. व्हर्साईचा तह प्रत्यक्ष मोडण्यापूर्वीं कितीतरी काळ आधीं जर्मनीनें तो मोडण्याची अप्रत्यक्ष तयारी चालविलेली होती! योग्य संधि साधून, जर्मनीनें मशीनटूल्सचा उपयोग शस्त्रनिर्मितीकडे करण्यास प्रारंभ केला व त्याची बरोबरी करणें संयुक्त राष्ट्रांस सहाजीकच दीर्घ काळ शक्य झालें नाहीं. चालू युद्धाचे अखेर जर्मनीचें निःशस्त्रीकरण यशस्वी रीतीनें करावयाचें असल्यास त्याचे कारखाने व त्यांतीं मशीनटूल्स हीं काढून घेऊन जर्मन कामगारांचे हातीं नांगर दिला पाहिजे, असें एका अमेरिकन शास्त्रीय मासिकानें, अनेक कारखानदार व इंजिनिअर ह्यांचा सल्ला घेऊन सुचविलें आहे. जर्मनीच्या कारखान्यांचा प्रत्येक किरकोळ भाग जर्मनीकडून हिसकावून घ्या व जर्मन यंत्रसामुग्री ज्या देशांना जर्मनीनें लुटलें त्यांना वाटून द्या, असें त्या मासिकाचें म्हणणें आहे. संयुक्त राष्ट्रांच्या एक तज्ज्ञ कमिशननें जर्मन कारखान्यांस भेटी देऊन हें काम करावें, असेंहि त्यानें म्हटलें आहे. जर्मनीनें मशीनटूल्स व यंत्रसामुग्री ही बनविताच कामा नये, असें त्याचेवर बंधन घातलें पाहिजे, असा त्याचा आग्रह आहे.

जर्मनीनें हेंच धोरण इतर युरोपियन राष्ट्रांचे बाबतींत अवलंबिलेलें नाहीं काय? झेकोस्लोव्हेकियावरील आक्रमणांतील जर्मनीचा मुख्य हेतु तेथील प्रमुख कारखाने गिळंकृत करणें हाच होता. युरोपांतील इतर देशांतहि जर्मनीनें तेथील कारखाने ताब्यांत घेण्याचें धोरण पार पाडलें व मोठ्या प्रमाणावर शस्त्रांचें उत्पादन सुरू केलें. जर्मनीनें केलेली युक्ती त्याचेवरच उलटवून जर्मनीस शेतीप्रधान राष्ट्र करणें व त्याचें औद्योगीकरण थांबविणें, हा जर्मनीची आक्रमण तृष्णा नियंत्रित करण्याचा एकच उपाय आहे. जर्मनीचे कारखाने नाहींसे झाले व त्यास नवीन कारखाने उभारूं दिले नाहींत, तर तो देश पुनः बलवान होणें अशक्य आहे. सध्याचीं युद्धें हीं यांत्रिक शक्ति व योजना ह्यांवरच मुख्यतः अवलंबून असतात, हें लक्षांत घेतलें, म्हणजे जर्मनीस शेतीप्रधान राष्ट्र करण्याच्या कल्पनेंतील उद्देश स्पष्टपणें दिसून येईल. युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानाचा राजकीय दर्जा वाढून, त्यास स्वतःच्या संरक्षणाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करावी लागेल ह्या दृष्टीनें हिंदुस्थानांत मशीनटूल्स व कारखाने ह्यांची वाढ व्हावयास पाहिजे, हें उघड आहे. जी गोष्ट जर्मनींत होऊं देतां कामा नये, असें सांगण्यांत येतें, तीमध्यें हिंदुस्थानांत प्रोत्साहन देण्यांत येणें आवश्यक आहे. चालू युद्धाचे प्रारंभीं हिंदी कारखाने विविध प्रकारचे व पुष्कळ असतें, तर युद्धोपयोगी वस्तूंच्या उत्पादनास त्यांची अतिशय मोठी मदत झाली असती, हें सर्वमान्य आहे. युद्धांत आलेल्या अनुभवास अनुसरून संयुक्त राष्ट्रें स्वतःच्या भावी संरक्षणासाठी जें औद्योगिक धोरण स्वीकारतील, त्याच प्रकारचें धोरण हिंदी गरजांचे दृष्टीनें येथें अंगिकारलें जाणें अगत्याचें आहे. युद्धोत्तर पुनर्रचनेंत जुन्या चुका टाळल्या जातील, ह्यांत संशय नाहीं, परंतु जागतिक योजनेंत हिंदुस्थानच्या वैयक्तिक गरजांस महत्त्वाचें स्थान मिळालें पाहिजे.

## कामगारांस कार्यक्षम करण्याचे विविध प्रयत्न

कारखान्यांचें उत्पादन फायदेशीरपणें वाढविण्यासाठीं अमेरिकन कारखानदार अत्यंत दक्षतेनें नवीन नवीन योजना आखीत असतात व उपाय अवलंबीत असतात. उत्तम यंत्रसामुग्री बनविल्यानेंच केवळ कारखान्याचें उत्पादन वाढत नाहीं; कामगारांची उत्पादनशक्तीहि वाढवावी लागते. कामगारांकडून जास्तींत जास्त काम कमींत कमी खर्चांत कसें करवून घेतां येईल ह्याकडे सर्वच कारखानदारांचें लक्ष असतें. परंतु विशेषतः अमेरिकेंत कामगारांवर ज्यास्त खर्च करून व त्यांच्या सुखसोयी पाहून जादा खर्चाची

ज्यास्त मजुरी देऊनहि ज्यास्त काम त्यांचेकडून सहज मिळविण्याचें तंत्र अमेरिकेंत पुढें आलें आहे. ह्यांत कारखानदार व कामगार ह्या दोघांचाहि फायदा आहे. कमी तास काम करून कामगारांस वेतन ज्यास्त मिळतें व कारखानदारांहि कामगारांकडून थोड्या वेळांत दुप्पट-दुप्पट काम मिळून त्यांचें उत्पादन थोड्या ज्यास्त खर्चांत पुष्कळ वाढतें व सुधारतें. कामगारांचें हित हा कारखानदारांचा प्रधान हेतु नसतो हें उघड आहे, परंतु तें हित पाहूनच त्यांचें स्वतःचें अंतिम हित साधत असल्याकारणानें कामगारांचें सुख हें त्यांच्या उत्पादनाच्या व्यवस्थेचें एक प्रमुख अंग होऊन बसतें. कामगारांच्या सुखसोयींकडे पहाण्यांत होणारा खर्च हें एक प्रकारचें मोठा नफा देणारें भांडवल ठरतें ! महाराष्ट्रांतील कांहीं कारखान्यांनीं कामगारांस दररोज दुपारीं पोटभर व सकस जेवण देण्याची व्यवस्था केली आहे. किती कारखान्यांत कामगारांस पाळीची वाट पहातांना किंवा विश्रांतीचे वेळीं बसण्यासाठीं सावली तरी असते ? कामगारांस कामावर येण्यास उशीर कां होतो हें कोण पहातें काय ? बँकांतील नोकरवर्गास कामाच्या रगाड्याचे वेळीं गरम चहा मिळाल्यानें त्यांच्या कामावर सुपरिणाम होतो ही नेहमींच्या अनुभवाची गोष्ट आहे. रात्रपाळीचे वेळीं कित्येक कारखानदार स्वतःच्या खर्चानें कामगारांस चहा देतात, परंतु कामगारांची कार्यक्षमता वाढविण्याच्या ह्या प्रत्यक्ष मार्गाबरोबर अप्रत्यक्ष व व्यापक मार्गाचा अवलंब केला तर तो अधिक परिणामकारक ठरण्याचा संभव आहे. हिंदी कामगार व पाश्चिमात्य देशांतील कामगार ह्यांच्या मनोभूमिकेंत फरक आहे; ज्यास्त पगारानें हिंदी कामगार अधिक आळशी बनतो असें सांगण्यांत येतें. अर्थात् त्यांची कार्यक्षमता वाढण्यासाठीं करावयाच्या प्रयत्नांस यश येण्यास वेळ लागेल ह्यापेक्षां वरील मुद्यांतून अधिक अर्थ काढणें श्रेयस्कर नाहीं. अमेरिकेंतील कांहीं प्रयत्नांची माहिती खालीं दिली आहे, तीवरून आपलेकडील परिस्थितीचा व विचारांचा मागसदेपणा दिसून येईल.

•

कारखान्यांतील कामगारांची मधून मधून होणारी गैरहजेरी कमी करण्याचे प्रयत्न अमेरिकेंत जोरानें चालू आहेत. विशेषतः युद्धकार्यांत गुंतलेल्या कारखान्यांतील कामगारांची गैरहजेरी तात्काळ बंद करणें आवश्यक आहे. कारण ह्या गैरहजेरीच्या फैलावाचा परिणाम उत्पादनावर होऊन आगबोटी व विमानें हीं योजनेप्रमाणें तयार होणार नाहींत व त्या मानानें युद्धाचा यशस्वी शेवट लांबणीवर पडेल. ह्या निकडीनें ह्या प्रश्नाकडे पाहून गैरहजेरीस आळा घालण्याचे उपाय तेथें योजण्यांत येत आहेत. हे उपाय योजण्यापूर्वीं अर्थातच, गैरहजेरीचीं कारणें शोधून काढावीं लागतात व तीं वेगवेगळ्या ठिकाणीं व व्यक्तिगत निरनिराळीं आढळतात. एका कारखान्यांत स्त्रीकामगारांसाठीं केशकर्तनगृह उघडलें. त्यामुळें त्यांच्यांतील गैरहजेरी ३% कमी झाली. स्वतःचें किंवा स्वतःच्या कुटुंबियांचें आजारीपण, हें तीन-चतुर्थांश गैरहजेरीचें मूळ कारण असतें. पुरुष कामगारांचें वय वाढूं लागलें म्हणजे ते कमी वेळां आजारी पडतात परंतु प्रत्येक आजाराची मुदत दीर्घ होत जाते. स्त्रीकामगारांचे बाबतींत असा अनुभव येत नाहीं. कामगारांचें आजारीपण दूर करण्याच्या योजनांचें गैरहजेरी नाहींशी करण्याच्या प्रयत्नांत मोठें महत्त्व असणें स्वाभाविक आहे. कित्येक कंपन्या आपल्या पगारी डॉक्टरांकडून आजारी कामगारांस औषध-पाणी देववितात, तर कांहीं कंपन्या कामगारांना कामाचे वेळीं खाण्यासाठीं व्हिटॅमिनच्या गोळ्या देतात ! आरोग्याचे सोपे नियम कामगारांना शिकवून अन्नांत योग्य बदल कसा घडवून आणावयाचा व स्वयंपाक कसा करावयाचा हें स्त्री-कामगारांना सांगण्याची व्यवस्था कांहीं कारखान्यांनीं केली आहे. चांगल्या बिऱ्हाडांचा अभाव, हें आजारीपणाचें एक प्रमुख कारण आहे, हें जाणून कित्येक कारखानदार आपल्या कामगारांना खोल्या शोधून मिळवून देण्यासाठीं स्वतंत्र नोकरवर्गाची नेमणूक करतात. वहातुकीचा प्रश्नहि कमी महत्त्वाचा नाहीं, परंतु तो सोडविण्याचे कामीं अडचणी फार असतात. कामगारांना कामास वेळेवर येण्यासाठीं बसेस मिळत नाहींत, एवढ्याकरितां एका कारखान्यानें बस कंपनीच विकत घेतल्याचें उदाहरण आहे. बस जाण्याचे मार्ग व वेळा बदलून घेण्याचाहि प्रयत्न करण्यांत येतो. केस कापण्याची व पगाराची व्यवस्था कारखान्याचे हद्दींतच केल्यानें कामगारांच्या मोकळ्या वेळेची बरीच बचत होते. कामगारांना अन्नपुरवठा वक्तशीर व्हावा ह्या दृष्टीनें कारखान्यानें कांहींतरी व्यवस्था करणें अत्यंत आवश्यक असतें. कामाच्या जागेवरच जरूरीच्या वस्तू विकत घेण्यांत कामगारांची सोय होते, त्यांचा वेळ वांचतो व कारखान्यांतील गैरहजेरीस आपोआपच आळा बसतो. धान्याचीं व इतर जीवनोपयोगी वस्तूंचीं दुकानें कारखान्यांनीं स्वतः चालविण्यांत त्यांना थोडें नुकसान आलें, तरी तें परिणामीं फायद्याचेंच ठरतें, असा अनुभव आहे. रेशनिंग व मालाचा तुटवडा ह्यांच्या कालांत कामगारांस क्यूमध्यें तासच्या तास उभें रहावें लागण्यापेक्षा त्यांस दोन मिनिटांत हवा तो माल उपलब्ध करून देण्यांत कारखान्याचा निश्चित फायदा असतो. स्त्री-कामगारांची मुलें संभाळण्याची व्यवस्था केल्यामुळें त्यांची कार्यक्षमता पुष्कळच वाढते असा अनुभव आहे व त्या दृष्टीनें मोठ्या प्रमाणावर व्यवस्था केली जात आहे. कामगारांच्या करमणुकीच्या सोयींकडेहि अमेरिकेनें दुर्लक्ष केलेलें नाहीं. आठवड्यांतून एक दिवस सुट्टी देण्यांत व कामाचे तास नियंत्रित करण्यांत अंतर्भूत असलेल्या तत्त्वाचा विस्तार करून सुटीच्या व विश्रांतीच्या वेळांत कामगारांचा उत्साह व शक्ति पूर्वस्थितींत आणण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले पाहिजेत. कांहीं अमेरिकन कारखान्यांनीं आपल्या कामगारांसाठीं बसावयाचे घोडे ठेवले आहेत ! कामगारास त्याच्या विश्रांतीच्या वेळांत करमणुकीच्या सोई उपलब्ध करून दिल्या, तर तो दारूसारख्या व्यसनांकडे प्रवृत्त होत नाहीं, असा अनुभव आहे. कामगाराकडून वक्तशीर कामाची अपेक्षा करतांना कारखान्यांनींहि पद्धतशीरपणा व कार्यक्षमता हीं आचरलीं पाहिजेत. कामगारांना वेळेवर कामास येण्यास लावावयाचें व मालाचे अभावीं कारखाना बंद ठेवण्याची पाळी यावयाची, असा प्रकार उपयोगी नाहीं. कामगारांची काम करण्याची इच्छा व शक्ति हीं दोन्ही कायम टिकतील अशाच दृष्टीनें सर्व व्यवस्था झाली पाहिजे. कांहीं कारखानदार अव्यवस्थित कामगारांना खिजवण्यासाठीं युक्त्या योजतात, त्या अप्रस्तुत ठरतात असा अनुभव आहे. गैरहजर रहाणाऱ्या कामगारांना जर्मन मार्कच्या चलनांत पगार देणें, गैरहजर राहून त्याबाबत कारखान्यांत कांहींच निरोप न पाठविणारांना गोबेल्सचे अभिनंदनपर विद्युत्संदेश धाडणें, इत्यादि मार्ग चांगल्या कामगारांना अपमानास्पद वाटतात. मुलाचें नांव सैन्यांत दाखल करण्यासाठीं बिनपगारी एक दिवस गैरहजर रहाणाऱ्या कामगारास अशा तऱ्हेची बोचणूक केव्हांहि खपणार नाहीं. अर्थात, कामगारांत कर्तव्यबुद्धि जागृत करण्याचा प्रयत्न करणारे हे मार्ग अपवादात्मकच आहेत व त्यांवर अमेरिकन कारखानदारांचा भर नाहीं. गैरहजेरीमुळें शत्रुपक्षास सहाय मिळतें हें कामगारांच्या मनावर बिंबवण्यासाठीं अन्य मार्गांचा अवलंब करणें श्रेयस्कर ठरतें. गैरहजर रहाणाऱ्या कामगारांच्या अडचणी लक्षांत घेऊन त्या दूर केल्या तर कामगार फुकट घरीं कशासाठीं बसेल ?

———

# स्फुट विचार

## हिंदुस्थान सरकारच्या लॉटरीच्या कर्जाची योजना

फाजील चलनवृद्धीस आळा घालण्याचा उपाय म्हणून सरकारी लॉटरीच्या स्वरूपाची एक योजना हिंदुस्थान सरकारनें तयार केली आहे. तिच्या अंमलबजावणीस प्रारंभ १५ जानेवारी १९४४ रोजीं होईल. मध्यम वर्गातील लोकांजवळील क्रयशक्ति कमी करण्याचे कामीं आतांपर्यंतचे झालेले प्रयत्न विशेष फलदायी झाले नाहींत, ह्यासाठीं ही नवी योजना करण्यांत आली आहे. सरकार ५ वर्षे मुदतीचे, बिनव्याजाचे परंतु बक्षिसें असलेले रोखे विक्रीस काढणार आहे व त्यांच्या मुदलाची परतफेड १९४९ मध्यें होईल. कर्जरोखे १०० रुपयांचे व १० रुपयांचे अशा स्वरूपांत विकले जातील. १०० रुपयांचे १ लक्ष रोखे अथवा १० रुपयांचे १ लक्ष रोखे ह्याप्रमाणे १ कोटि रुपयांचा व १० लक्ष रुपयांचा गट समजला जाईल. प्रत्येक गटांतील रोख्यांच्या नंबरांच्या चिठ्या दर १५ जानेवारी व १५ जुलै रोजीं टाकण्यांत येतील. १०० रुपयांच्या रोख्याचे गटाचे वाटणीस दर सहामाहीस १ लक्ष रुपयांचीं व १० रुपयांच्या रोख्यांचे गटास १० हजार रुपयांचीं बक्षिसें येतील. बक्षिसांचा तपशील खालील प्रमाणें आहे:—

१०० रुपयांच्या रोख्यांचा गटः—

| | रुपये |
|---|---|
| १ बक्षीस | ५०,००० |
| २ बक्षिसें × २०,००० रु. | ४०,००० |
| २ बक्षिसें × ५,००० रु. | १०,००० |
| | १,००,००० |

१० रुपयांच्या रोख्यांचा गटः—

| | रुपये |
|---|---|
| १ बक्षीस | २,५०० |
| २ बक्षिसें × १,२५० रु. | २,५०० |
| ५ बक्षिसें × ५०० रु. | २,५०० |
| १० बक्षिसें × २५० रु. | २,५०० |
| | १०,००० |

बक्षिसाच्या रकमेवर इन्कमटॅक्स माफ आहे. १० रुपयांच्या रोख्यांवरील बक्षिसाची रक्कम रोखीनें देण्यांत येईल. १०० रुपयांच्या रोख्यांवरील बक्षिसाच्या रकमेपैकीं निम्मी रक्कम रोख व बाकीची रक्कम डिफेन्स बॉंड अथवा सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें ह्यांचे स्वरूपांत देण्यांत येईल.

## सामान्य लॉटऱ्या व प्रस्तुत उपक्रम ह्यांतील फरक

चलनविस्तारास येनकेनप्रकारेण आळा घालण्याची तातडीची आवश्यकता निर्माण झाली असल्याकारणानें हिंदुस्थान सरकारनें मोठें धाडस करून लॉटरीच्या स्वरूपाच्या रोख्यांच्या विक्रीची योजना तयार केली आहे, तिचें वर्णन वर दिलें आहे. युरोपांतील कांहीं देश, आयर्लंड, ब्रह्मदेश इत्यादींनीं मागें लॉटऱ्यांच्या स्वरूपाच्या योजना केल्या होत्या, ह्याचा दाखला सरकारास घ्यावा लागत आहे; परंतु ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या पुढारलेल्या राष्ट्रांनीं लॉटरीचा अवलंब अजून कधींहि केलेला नाहीं. अपूर्व अशा प्रसंगास तोंड देणें त्यास प्राप्त आहे ह्या न्यायानेंच सरकारच्या उपक्रमाकडे पहाणें आवश्यक आहे. रोख्यांवरील षण्मासिक बक्षिसांवर होणाऱ्या खर्चाचा हिशेब करतां, जमा होणाऱ्या रकमेवर सरकारास २% व्याज पडतें. ही योजना युद्धकाळापुरतीच आहे; सरकारी कर्जउभारणीच्या मामुली पद्धतीशी तिची बरोबरी करणें चुकीचें होईल. योजनेमध्यें लॉटरीचें अंग आहे, तें व्याजाच्या रकमेपुरतेंच आहे व कांहीं झालें तरी मूळ मुद्दल पूर्णपणें परत मिळणार आहे, हें विसरतां कामा नये. लॉटरींत पैसा घालणारे सामान्यतः नुकसान पावतात व लॉटरी चालविणाराचा फायदा ह्या नुकसानीवर आधारलेला असतो. हिंदुस्थान सरकारच्या प्रस्तुत उपक्रमांत लॉटरीचें हें वाईट अंग नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सरकारास लॉटरीच्या रोख्यांपासून कोणत्याहि प्रकारें उत्पन्न मिळणार नसून फक्त कर्जाऊ पैसे मिळावयाचे आहेत. त्यामुळें, सरकारी योजनेंत सोडतीचें स्वरूप फारच थोडें आहे. ज्या मूळ कारणासाठीं सरकारी लॉटऱ्या अनिष्ट गणल्या जातात, तें कारण हिंदुस्थान सरकारच्या योजनेस फारच थोडें लागू आहे. हिंदुस्थान सरकारनें लॉटरीसारख्या प्रस्तुत कर्जउभारणीच्या योजना हातीं घेण्यापूर्वी चलन खेचण्याचे सर्व प्रयत्न पुरे झाले आहेत असें त्यास दाखवितां येणें कठीण जाईल. तथापि परिस्थितीस तोंड देण्याचा एक नाइलाजाचा मार्ग ह्या दृष्टीनें सरकारच्या योजनेस पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा आहे. प्रस्तुत उपक्रमांतील अटी ठरवितांना सरकारला अनुभवाचा फायदा मिळण्याजोगा नसल्या कारणानें, कर्जरोख्यांवर कांहीं थोडें निश्चित व्याज ठेवणें अधिक योग्य झालें असतें किंवा नाहीं हें आजच सांगतां येणें कठीण आहे.

## सिंध सरकार आणि हिंदुस्थान सरकार ह्यांचा लढा

धान्यांच्या किंमतीचें नियंत्रण अखिल भारतीय भूमिकेवर होण्याचें तत्त्व हिंदुस्थान सरकारनें मान्य करून त्यास अनुसरून प्रांतिक सरकारांनीं आपापलें धान्यपुरवठ्याविषयीचें धोरण अंमलांत आणावें असें ठरवलें. पंजाब आणि सिंध येथील मंत्रिमंडळांनीं धान्यांच्या किंमतीचें मध्यवर्ती नियंत्रण होऊं नये आणि त्यांस आपापल्या प्रांतांतील परिस्थितीप्रमाणें गहूं, तांदूळ इत्यादि मालाच्या किंमती ठरवण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे असा आग्रह धरला. पंजाबच्या मंत्रिमंडळाची अलीकडे समजूत घालण्यांत आली असून त्यानें हिंदुस्थान सरकारच्या नियंत्रणाच्या योजनेस कांहीं अटींवर अखेर मान्यता दिली असल्याचें आम्हीं प्रसिद्ध केलेंच आहे. सिंध मंत्रिमंडळाचा ताठरपणा अजूनहि कायम आहे असें दिसतें. तांदुळाचें नवें पीक तयार झालें असून तें आतां बाजारांत आलें आहे. या धान्याचा कायदेशीर ठरलेला भाव चढवण्यांत येऊं नये असा आदेश मध्यवर्ती सरकारनें सिंधला दिला आहे आणि त्याचा निषेध तेथील प्रांतिक सरकारनें नुकताच केला आहे. त्या मंत्रिमंडळाचें म्हणणें असें आहे कीं, सिंधमधील सध्याचा तांदुळाचा नियंत्रित भाव बाजारभावापेक्षा हलका आहे आणि पंजाबचे मानानें तो कमी आहे, ह्या कारणानें सिंधी जमिनदारांचें निष्कारण नुकसान होत आहे. हिंदुस्थान सरकारनें तांदुळाचे भाव ठरवण्याचे बाबतींत आपणावर दडपण आणलें आहे तें अन्यायाचें आहे असें सिंधी मंत्रिमंडळानें म्हटलें असून त्यानें स्वतःचें हें गाऱ्हाणें हिंदुस्थानच्याच नव्हे तर सबंध जगाच्या

वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला आहे. मध्यवर्ती सरकारच्या वतीनें ह्या तक्रारीस उत्तर दिलें गेलें आहे. तांदुळाच्या किंमती सर्व देशाच्या हिताचे दृष्टीनें बेतात रहाणें अगत्याचें आहे आणि त्याचे विशिष्ट मर्यादेत नियंत्रण करणें आवश्यक आहे असें त्या सरकारचें म्हणणें आहे. हें धोरण तांदूळ पिकवणाऱ्या इतर प्रांतांनीं स्वीकारलें आहे आणि त्याचा सर्वांचे मतानें निर्णय ठरवण्यासाठीं पुढच्या महिन्याचे प्रारंभीं प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींची एक परिषद बोलावण्यांत येत असल्याचेंहि सांगण्यांत आलें आहे. भाव-नियंत्रणाचें धोरण राष्ट्रीय स्वरूपाचें असलें पाहिजे आणि तें यशस्वी करण्यासाठीं देशाच्या सर्व घटकांनीं सहकार्य केलें पाहिजे. हें तत्त्व इतकें निरपवाद आहे कीं सिंध सारख्या प्रांतांनीं आपणांस अपेक्षेप्रमाणें फायदा मिळत नाहीं म्हणून त्याच्या विरुद्ध ओरड करावी हें आश्चर्य आहे. भाव नियंत्रण हा युद्धप्रयत्नाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि त्याकडे सर्व प्रांतांनीं ह्याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. सिंध प्रांताच्या ओरडीविषयीं इतरत्र सहानुभूति व्यक्त होईल असें वाटत नाहीं. ज्यांस तें जबाबदार आहे आणि ज्यांच्या हिताचें रक्षण करणें हें त्याचें कर्तव्य आहे त्यांची बाजू उचलून धरण्याचें समाधान सिंधी मंत्रिमंडळास हवें असें त्याच्या उद्गारांवरून दिसतें. पण एकूण हिंदी लोकमताचा मध्यवर्ती सरकारच्या भूमिकेसच पाठिंबा मिळाल्यावांचून रहाणार नाहीं असें मानण्यास जागा आहे.

## युद्धाचें ताजें वृत्त

युरोपांतील पूर्व आघाडीवर निकराच्या लढाया चालू असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत आणि जर्मन फौजांस स्वतःचीं बंदिस्त ठिकाणें आपल्या हातीं टिकवण्यांत अपयश येत आहे. ह्या लांबट आघाडीवर रशियन चढाईस विरोध करून ती थांबवणें आणि शक्य तेथें उलट हल्ले करून गमावलेल्या प्रदेशाचा भाग पुन्हा व्यापून तेथें नवीन फळी उभी करणें हा जर्मनीचा कार्यक्रम सध्या चालू आहे. हिवाळ्यांत रशियन आघाडी भक्कम जागीं स्थिर रासावयाची आणि तेथें रिकामें झालेलें लढाऊ बळ युरोपांत दक्षिण व पश्चिम ह्या दिशांकडे ब्रिटिश व अमेरिकन सेनांच्या चाललेल्या व चालू होणाऱ्या आघातांस तोंड देण्यासाठीं नेऊन ठेवावयाचें हा हिटलरचा मनसुबा दिसत आहे. बाल्कन्समध्यें मोठ्या जर्मन फौजा नेण्यांत आल्याची बातमी मध्यंतरीं आली होती ती ह्यासंबंधांत सूचक आहे. तसेंच, युगोस्लाव्हियामध्यें जर्मनीविरुद्ध स्थानिक लढाया होत आहेत आणि त्यांत मित्रराष्ट्रांचीं विमानें सहाय देत आहेत असेंहि प्रसिद्ध झालें आहे. तेहरान येथील चर्चेच्या निर्णयास अनुसरून मित्र राष्ट्रें आपणावर दक्षिण व पश्चिम ह्या दिशांनीं चालून येणार अशी भीति हिटलरला वाटत आहे. फील्ड मार्शल रॉमेल हा युरोपांतील निरनिराळ्या नवीन संभाव्य आघाड्यांवर हिंडत असून तेथील संरक्षणाच्या व्यवस्थेची पहाणी करीत आहे. इटलीमध्यें ब्रिटिश व अमेरिकन सैन्यांची हळू हळू पण निश्चित प्रगति चाललेली आहे. अशा स्थितींत लाल सेनेनें कीएव्हच्या उत्तरेस जर्मन आघाडींत मोठें खिंडार पाडून शत्रूस मार्गे हटवलें असल्याची ताजी बातमी आली आहे. म्हणजे रशियन आघाडीवर जर्मनीस कोठेंच थोडीसुद्धां विश्रांती मिळण्याची आशा तर नाहींच; उलट, प्रतिहल्ल्यांत आपलें बळ खर्ची टाकावें लागत असून कित्येक ठिकाणीं पिछेहाट करावी लागत आहे. जर्मनीस चोहीं कडून घेरण्याचा कार्यक्रम मित्रराष्ट्रांनीं आखला आहे त्यांत त्यांस चांगलें यश येत आहे असें उघड दिसतें. पॅसिफिक महासागरांत जपान विरुद्ध चाललेल्या लढाईची दिवसानुदिवस समाधानकारक प्रगति होत असल्याचींहि स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. अर्थात् ह्या मोहिमा मोठ्या प्रमाणावर आणि कांहीं काळपर्यंत व्हाव्या लागतील तरच जपानचा पूर्ण पाडाव होईल ह्याची जाणीव मित्रराष्ट्रांस आहे. तथापि, ह्या विस्तृत कार्यक्रमास हात घातला जात आहे हें जनरल मौंटबॅटन यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या हालचालींवरून दिसून येतें आणि हिंदुस्थानच्या सर सेनापतींनीं नुकत्याच दिलेल्या माहितीवरून ह्या तयारीची कल्पना येते. लांब लांब प्रवास, दगदग व शीण ह्यांचे योगानें मि. चर्चिल ह्यांस एकाएकी न्युमोनियाचा विकार झाला, त्यांतून ते आतां बरे होण्याच्या मार्गावर आहेत हें वृत्त आनंददायक व उल्हासकारक आहे.

## दि आयुर्वेद रसशाळा पुणें लि., पुणें ४

३१ मे १९४३ अखेर पुऱ्या झालेल्या ८ व्या वर्षीं देशी औषधांच्या इतर कारखान्यांची स्पर्धा, जागतिक युद्धामुळें झालेली महागाई व वहातुकीच्या अडचणी लक्षांत घेतल्या तर कंपनीच्या विक्रींत झालेली वाढ समाधानकारक आढळून येईल. वृत्तांत वर्षांत ए. आर. ब्रँड नांवाखालीं कंपनीनें नवीन नऊ औषधें विक्रीस काढलीं आणि म्हैसूर येथील प्रदर्शनांत रक्तवर्धक, बालजीवन व रक्तशोधक या औषधांस सुवर्णपदक मिळालें. वृत्तांत वर्षांत कंपनीस रु. ३४,९२५-११-४ निव्वळ नफा झाल्याचें ताळेबंद व नफातोटा पत्रकावरून दिसून येईल. त्यांत गेल्या सालचा शिल्लक नफा रु. ६३८-१०-११ मिळवून रु. ३५,५६४-६-३ एकूण नफा होतो.

रिझर्व्ह फंडांत ३½ हजार रुपये टाकून व प्रेफरन्स शेअरहोल्डरांना ५% डिव्हिडंड देण्यासाठीं ५ हजारांचा विनियोग करून साधारण भागांस ९% (इनकमटॅक्स सहित) डिव्हिडंड देण्यासाठीं २६ हजार रुपये मंजूर करण्यांत आले. ह्या डिव्हिडंडपैकीं निम्मी रक्कम कंपनीच्या आर्टिकल्सप्रमाणें रा. शि. मंडळास देणगी म्हणून जाणार आहे. वृत्तांताचे वर्षीं कंपनीनें २½ लक्ष रुपयांची विक्री केली व वर्षअखेर तिचेजवळ ३ लक्ष ५५ हजारांचीं कच्चीं, पक्कीं व तयार होत असलेलीं औषधें होतीं. कंपनीची वरील प्रगति निःसंशय समाधानकारक आहे. कंपनीच्या औषधांचा लौकिक हेंच तिचें मुख्य भांडवल आहे व ह्या दृष्टीनें तिची होणारी वाढ महत्त्वाची आहे.

## कामगारांची युद्धविषयक इजेपासून होणाऱ्या नुकसानीची भरपाई

कामगारांना युद्धविषयक कारणामुळें इजा झाली, तर त्याची नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी त्याबाबत करण्यांत आलेल्या कायद्यानें कारखानदारांवर टाकण्यांत आलेली आहे. त्यासाठीं कारखानदारानें सरकारकडून विम्याची पॉलिसी घेतली पाहिजे. कारखानदार जेवढी रक्कम मजुरी म्हणून वाटतो, त्या रकमेच्या शेकडा ४ आणे इतका हप्ता तूर्त बसविण्यांत आला आहे.

## मजुरांची युद्धकार्यासाठी वसाहतींत भरती

युद्धकाळांत व कधी कधी शांततेच्या काळांतहि कांहीं देशांत सक्तीनें लष्कर भरती करण्यांत येते. सध्याच्या युद्धपरिस्थितींत मजुरांचीहि भरती त्याचप्रमाणें थोड्या प्रमाणावर करणें कांहीं ठिकाणीं भाग पडलें आहे, त्याची माहिती खालीं दिली आहे.

नायगेरिया, केनिया, टांगानिका, उत्तर ऱ्होडेशिया, मॉरिशस, फिजी, सिचिलीस, इत्यादि ब्रिटिशांचें ताब्यांतील मुलुखांमध्यें युद्धकालीन कामाकरितां कामगारांना सक्तीनें गोळा करण्यांत आलें; त्याची माहिती पार्लमेंटांत वसाहत मंत्र्यांनीं सांगितली. युद्ध चालविण्यासाठीं किंवा नागरिकांचे मामुली व्यवहार चालू ठेवण्यासाठीं सक्तीनें कामें करवून घ्यावीं लागलीं तर तीं तशीं करवून घेण्याकरितां सरकारास अधिकार देण्यांत आले आहेत. नायगेरियांतील खाणींसाठी १४,०९८ कामगारांवर सक्ती करावी लागली. कामासंबंधींची परिस्थिति पूर्णपणें समाधानकारक होती असें म्हणतां आलें नाहीं तरी त्यांत शक्य तेवढी सुधारणा तावडतोब करण्याचे प्रयत्न करण्यांत आले. स्वखुषीनें येणाऱ्या कामगारांच्या मजुरीचे मानानें सक्तीनें आणलेल्या कामगारांचे मजुरीचे दर समाधानकारक होते. चार महिन्यांच्या मुदतीचें काम समाधानकारक करणारांस दरमहा ४ शिलिंग बोनस देण्यांत आला.

केनियामध्यें एकूण कामावर असलेल्या मजुरांपैकी १४,१६१ मजूर सक्तीच्या कामाचे होते. फेब्रुवारीमध्यें सक्तीच्या मजुरांची भरती तहकूब करण्यांत आली. "नेटिव्हां" च्या मुलुखाचे बाहेर त्यांस काम देऊन तेथील अन्न परिस्थिति अधिक बिकट होऊं न देण्याचे दृष्टीनें ही तहकुबी केली गेली. टांगानिकांतील सक्तीच्या भरतींत ३,६२१ मजूर होते. उत्तर ऱ्होडेशियांत सरकारी कामासाठीं ५०० मजुरांची एक पलटण होती. त्यांतील ११५ सक्तीच्या भरतीचे होते. १८ ते ६० वयाच्या कोणत्याहि पुरुषावर जरूरीचें काम करण्यास सक्ती करण्याचा अधिकार फिजी सरकारास आहे. सिचिलिसमध्यें अशाच प्रकारचे अधिकार सरकारास होते, परंतु फक्त ११ च लोकांवर सक्ती करण्यांत आली.

---

## दोघे एकदम मेले, तर पहिला मृत्यू कोणाचा !

डॉ. रॅन्डोल्फ ली ग्रॉसव्हेनॉर व एडवर्ड मॉबर्ले ग्रॉसव्हेनॉर हे दोघे श्रीमंत बंधु लंडन येथें १४ सप्टेंबर, १९४० रोजीं जर्मनीच्या बॉंब हल्ल्यामुळें त्यांच्या रहात्या घराच्या तळघरांत मरण पावले. जेव्हां एकाच कारणामुळें दोघें मरण पावतात तेव्हां थोरला अगोदर मेला असें गृहित धरावयाचें, असा आतांपर्यंतचा कायदा आहे. परंतु, इंग्लंडमधील कोर्ट ऑफ अपीलनें, ते दोघेहि बंधू एकदमच मेले, असा निवाडा केला आहे. ह्या कारणानें त्या दोघांच्या मृत्युपत्रांनीं केलेल्या पैशाच्या व्यवस्थेवर महत्त्वाचा परिणाम झाला आहे. त्यांचेबरोबर त्यांचा घरचा नोकरहि मेला, त्याच्या वारसांस दोघा भावांच्या मृत्युपत्राचा कांहींच उपयोग होणार नाहीं. "ह्या विषयावरील पूर्वीचे निवाडे झाले, त्यावेळीं बॉंब माहीत नव्हते; मृत्यु कोणत्या अनुक्रमानें झाले हें प्रस्तुत प्रकरणांत निश्चयानें सांगणें अशक्य आहे" असें मास्टर ऑफ दि रोलसनें निवाडा करतांना सांगितलें.

---


**हातपाय चालतात तोंवर**

म्हातारपणची तरतूद करणें अवश्य आहे. चांगल्या कंपनींत उतरलेला विमा हा ऐन वेळीं उपयोगी पडतो. या संबंधांत आपणांस कसलीहि माहिती पाहिजे असल्यास आम्हांकडे विचारा. आम्ही सर्व खुलासा करून योग्य मार्ग दाखवूं.

मॅनेजर,

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.**

सातारा शहर.

पुणें शाखा–१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

**फणसपोळी, आंबेपोळी**

**किरकोळ व ठोक मिळेल.**

द. ना. हेजीब, : : २० शुक्रवार, पुणें २.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. वृ. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वंमान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## संरक्षण — सुरक्षितता — सेवा

हेंच आमचें ध्येय.

## दि औंध म्युच्युअल

**लाइफ ॲशुरन्स सोसायटी लि. पुणें.**

महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था

मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.

आताच लिहा:—

मुंबईचे चीफ एजन्टस्
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बँक रोड, मुंबई ४.

हेड ऑफिस,
'रामनिवास' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

## दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्रकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमियम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.,
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे


वर्ष ५ | पुणें, बुधवार, तारीख २९ डिसेंबर, १९४३ | अंक ५१

## The Co-operators' Book Depot.
9, Bakehouse Lane,
Fort, Bombay.
**The Only Book Depot of its Kind in India.**
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## संरक्षण – सुरक्षितता – सेवा
हेंच आमचें ध्येय.
## दि औंध म्युच्युअल
**लाइफ अॅशुरन्स सोसायटी लि. पुणें.**
महाराष्ट्राची पहिली प्रगतिपर विमा संस्था
मेहनती व उत्साही प्रतिनिधि पाहिजेत.
आताच लिहाः—
मुंबईचे चीफ एजन्टस्
के. डब्ल्यू. फडके,
फडके गणपतिवाडी, गिरगांव,
बॅंक रोड, मुंबई ४.
हेड ऑफिस,
'रामनिवास' लक्ष्मी रोड,
पुणें शहर.

## पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 772




TELEGRAM
Guest House
Poona 2.

महापुरुषांची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महेंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### इन्फ्लुएन्झाचा प्रतिकार

ग्रेट ब्रिटनमध्यें इन्फ्लुएन्झाची साथ पसरून १९१८ सालची पुनरावृत्ति होऊं नये, यासाठीं दक्षता बाळगण्यांत येत आहे.

### भडोचमधील धान्यविक्रीची सहकारी योजना

धान्य व इतर जीवनोपयोगी वस्तू योग्य किंमतीस लोकांना मिळाव्या, याकरितां भडोच व पंचमहाल जिल्ह्याच्या भडोच तालुक्यांत स्वस्त धान्याचीं दुकानें उघडण्याची योजना १९४२ मध्येंच आंखण्यांत आली. जिल्ह्याच्या कलेक्टरनें योजना मान्य केली व ऑगस्ट १९४२ मध्यें पांच दुकानें स्थापन झालीं. भडोच शहर व तालुका यांत मिळून आतां अशी पंचवीस दुकानें आहेत. भडोच को. स्टोअर्स सोसायटी हीं दुकानें भडोच सहकारी बँकेच्या सहायानें चालविते. कलेक्टरच्या अध्यक्षतेखालील सरकारी व बिनसरकारी सभासदांची एक समिति देखरेखीचें व सल्ला देण्याचें काम करते. जुलै १९४३ अखेर सोसायटीनें २३½ लक्ष रुपयांची खरेदी व २२½ लक्ष रुपयांची विक्री केली. १८½ लक्ष लोकांनीं या योजनेचा फायदा घेतला. साखर, रॉकेल, स्टँडर्ड क्लॉथ, इत्यादींच्या विक्रीचें काम सोसायटीकडेच आहे.

### कपाशीच्या कमाल व किमान किंमती

हिंदी कपाशीची किंमत दर खंडीस ४०० रुपये ते ५५० रुपये ह्यांचे दरम्यान राखण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. वेगवेगळ्या जातींच्या कपाशींच्या किंमती सरकारनें जाहीर केल्या आहेत.

### कर्जाच्या मर्यादेंत वाढ

कच्च्या मालाच्या किंमतींत वाढ झाल्याकारणानें, कारागिरांना खेळत्या भांडवलासाठीं डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजनें द्याव-याच्या कर्जाची मर्यादा मुंबई सरकारनें २५० रुपयांवरून ५०० रुपयांवर नेली आहे.

### सुपरवायझिंग युनियन्सना सरकारची आर्थिक मदत

युद्धजन्य परिस्थितीमुळें जिल्हा सुपरवायझिंग यूनियन बोर्डांना आपल्या नोकरवर्गास महागाई भत्ता द्यावा लागतो. प्राथमिक सोसायट्यांचा व मध्यवर्ती बँकांचा व्यवहारहि कमी झाला आहे. त्या कारणानें यूनियन्सचें उत्पन्न घटलें आहे. ह्या परिस्थितीस यूनियन्सना तोंड देतां यावें, ह्यासाठीं यूनियन्सना जोडलेल्या शेतकी क्रेडिट व नॉन क्रेडिट सोसायट्यांकडून वसूल होणारी सर्व ऑडिट फी यंदा व पुढील वर्षी यूनियन्सना ग्रँट देण्यासाठीं उपलब्ध होईल, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

### बेळगांव जिल्ह्यांतील सहकारी दुकानें

बेळगांव जिल्ह्यांत १९४२ चे अखेर सहकारी धान्यविक्रीचीं दुकानें सुरू करण्यांत आलीं. ही विक्रीची योजना प्रांत अधिकारी व सहकारी खात्याचे अधिकारी ह्यांचे देखरेखीखालीं आहे. दुकानें चालविण्यासाठीं बेळगांव जिल्हा सरकारी बँकेनें ७५ हजार रुपये सवलतीच्या दरानें कर्जाऊ दिले आहेत.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हौसमध्यें १७ डिसेंबर अखेरच्या आठवड्यांत ३८ कोटि रुपयांच्या १,४१,१२७ चेक्सची देवघेव झाली.


**बॉम्बे को-ऑपरेटीव इन्शुअरन्स सोसायटी लि.**

सहकारी संस्थांच्या सभासदांस विशेष सवलत

| | | |
|---|---|---|
| एकंदर कामकाज | ... | १। कोटीहून अधिक |
| एकूण मालमत्ता | ... | १८ लाखांहून अधिक |
| आयुर्विमा फंड | ... | १६ लाखांहून अधिक |

एजन्सीच्या अटी अगर पॉलिसीच्या विशेष माहितीकरितां चौकशी करा:—

मुख्य ऑफिस:—

**को-ऑपरेटीव इन्शुअरन्स बिल्डिंग,**

सर फिरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

**हिंदुस्थानच्या आघाडीवरील सहकारी विमा संस्था**

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

**टोमॅटो केचप ( गोड ) व टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिस: ९११ अ सदाशिव, पुणें २.

**साखरआंबा, मोरआवळा—** सफरचंदाचा, गाजराचा, आवळ्याचा, बेलफळाचा, महाळुंगाचा, आल्याचा, हिरड्याचा वगैरे.

द. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४०२ |
| २ सहकाराची योजनात्मक पुनर्घटना हवी ... | ४०३ |
| ३ प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचें कार्य ... | ४०४ |
| ४ स्फुट विचार ... उत्पादक कार्यासाठीं पैशाची बचत करा—इंग्लंडमध्यें तरुणांचें सहकारी शिक्षण—चीन राष्ट्राची चिकाटी आणि शौर्य—सर होमी मोदी ह्यांच्या सूचना—के. वा. रा. ब. चिनळे | ४०५ |
| ५ जिनिंग फॅक्टरीचा उद्घाटन समारंभ ... | ४०६ |
| ६ काटकसर व बचतीचा उपयोग ... ... | ४०७ |
| ७ इन्स्टिट्यूटची वार्षिक सभा ... ... | ४०७ |
| ८ "संघटित महाराष्ट्र" | ४०७ |
| ९ पालेमोडी कर्ज ... | ४०८ |
| १० सैनिकांचें खेड्यांत पुनरागमन ... ... | ४०८ |



# अर्थ

बुधवार, ता. २९ डिसेंबर, १९४३


## सहकाराची योजनात्मक पुनर्घटना हवी

जपानचा पाडाव करण्याच्या युद्धास आतां परिणामकारक मूर्तस्वरूप येत आहे हें पॅसिफिक महासागरांत चाललेल्या अमेरिकन व ऑस्ट्रेलियन चढाईच्या लढायांवरून स्पष्ट दिसत आहे. ब्रह्मदेश, मलाया वगैरे शत्रुपादाक्रांत देशांतून जपानची हकालपट्टी करण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे हेंहि अलीकडच्या युद्धवार्तांवरून उघड होत आहे. ह्या लढाऊ कार्यक्रमाचा मुख्य तळ हिंदुस्थान आहे आणि ह्या कारणानें युद्ध-प्रयत्नाची शिकस्त करण्याची जबाबदारी ह्या देशावर आली आहे. हा हिंदुस्थानच्या सुरक्षिततेचा व स्वातंत्र्याचा प्रश्न असल्यानें आणि त्याचें भवितव्य मित्रराष्ट्रांच्या विजयावर अवलंबून असल्यानें हा देश आपलें कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडील ह्यांत शंका नाहीं. कलकत्त्यास असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना व्हाइसरॉय, व्हायकौंट वेव्हल, ह्यांनीं ह्या प्रश्नाची चर्चा करून युद्धोत्तर पुनर्घटनेविषयींहि महत्वाचे उद्गार काढले. युद्धाचा विजयी शेवट जवळ येत चालला आहे अशा परिस्थितींत त्यानंतर राष्ट्रांची आर्थिक व सामाजिक घडी पुन्हां नीट बसावी ह्याकरितां एव्हांपासून विविध योजनांची आखणी सर्वत्र चालू आहे. शिक्षण व आरोग्य ह्यांच्या राष्ट्रीय व्यवस्थेबाबत हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें योजना तयार झाल्या आहेत व होत आहेत. नागपूर येथें नुकत्याच भरलेल्या इंजिनिअरांच्या परिषदेंत हिंदुस्थानांत रस्त्यांची योजना कशी व्हावी ह्याविषयीं चर्चा होऊन चार-पाचशे कोटि रुपये खर्चले जाऊन देशांत व्यवस्थित रस्त्यांचें जाळें पसरलें जावें ह्या अर्थाची सूचना करण्यांत आली. लॉर्ड वेव्हल ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानांत शेती व उद्योगधंदे ह्यांची वाढ एकाचवेळीं होऊन जनतेच्या रहाणीचा दर्जा सुधारेल अशी योजना युद्धोत्तर काळांत अंमलांत आली पाहिजे असें प्रतिपादलें.

देशांत खाद्यपदार्थांची पैदास वाढवा, खर्चांत बचत करा इत्यादि संदेश आज लोकांस देण्यांत येत आहेत. त्यांचा उपयोग युद्ध परिस्थितींत तर आहेच; परंतु युद्धोत्तर काळांतहि त्यांचें महत्व आहे ह्या जाणीवेनें त्याबाबतची तरतूद विचारपूर्वक आज केली जाणें अगत्याचें आहे. "अटलांटिक सनदे" मध्यें जगांतील जनतेची दारिद्र्यांतून सुटका करण्याचें अभिवचन आहे, त्याची पूर्तता सर्व देशांनीं स्वतःचें खाद्यपदार्थांचें उत्पादन वाढवून त्याची न्याय्य वाटणी होण्याची व्यवस्था केल्यावांचून होणार नाहीं. मित्र राष्ट्रांच्या प्रतिनिधींची व्हर्जीनियामध्यें हॉटस्प्रिंग्ज येथें अन्नाचा पुरवठा व शेती ह्या विषयाचा विचार करण्यासाठीं गेल्या मे महिन्यांत एक मोठी परिषद भरली होती तिचे ठराव व शिफारशी पाहिल्या असतां हीच गोष्ट ठळक रीतीनें डोळ्यांत भरते. ह्या परिषदेचा एक घटक ह्या नात्यानें तिच्या कार्यक्रमांत सहकार्य करावयाचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें आहे. आंतरराष्ट्रीय शांततेवाचून समृद्धी होऊं शकत नसल्यानें सर्व राष्ट्रांनी परस्पर सहकार्यानें हें ध्येय गाठलें पाहिजे असें म्हणून प्रत्येक राष्ट्रीय सरकारावर आपल्या लोकांस लागणाऱ्या खाद्यपदार्थांचा पुरवठा वाढवण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी परिषदेनें टाकली आहे. पुरेसें आणि कसदार अन्न प्रत्येक व्यक्तीस मिळेल अशी तजवीज राष्ट्रीय सरकारांनीं करावयाची म्हणजे शेती, व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य इत्यादि संबंधांत योजनात्मक पद्धतीनें कार्यक्रम आखून तो पुरा केला पाहिजे हें उघड आहे. हिंदुस्थानासारख्या अफाट व मागसलेल्या देशांत मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांनीं ह्या प्रकारचे संघटित प्रयत्न किती उत्साहानें व श्रमानें करणें अगत्याचें आहे हें सांगावयास नको.

शेतीचें उत्पन्न वाढवण्याची आणि शेतकरी वर्गाच्या रहाणीचें मान सुधारण्याची आवश्यकता आतां सर्वांस पटली असून बंगालमधील दुष्काळाच्या अनुभवापासून बोध घेण्याची जरूरी निर्विवाद ठरली आहे. शेती सुधारणेसाठीं कोणते उपाय योजले पाहिजेत ह्याविषयीं लिनलिथगो कमिशनच्या चौकशीपासून आजपर्यंत पुष्कळ चर्चा झाली आहे आणि तिच्या अनुरोधानें कांहीं प्रयत्नहि होत आहेत. आमच्या प्रांतांत रूरल डेव्हलपमेंट बोर्ड ह्यासंबंधांतले प्रश्न हाताळीत आहे. परंतु आतां ह्यापुढें जाऊन मध्यवर्ती व प्रांतिक सरकारानें विधायक योजना हातीं घेण्याची वेळ आली आहे. ह्या योजनेमध्यें सहकारी चळवळीचा भाग किती व कोणता असावा हेंहि ठरवणें आवश्यक आहे. शेतीच्या धंद्याप्रमाणेंच सहकारी संस्थांच्या अडचणी व गरजा आणि त्यांचीं वैगुण्यें ह्यांचेसंबंधांत नव्यानें चौकशी करण्याचें कारण नाहीं. तीं सर्वांस माहीत आहेत. त्याचप्रमाणें, कसून प्रयत्न झाल्यास सहकारी संस्था किती महत्वाची कामगिरी करूं शकतील ह्याविषयींहि शंका नाहीं. जनतेस पुरेसें काम मिळवून देणें, तिची प्राप्ती वाढवणें, तिची रहाणी अधिक सुखमय करणें ह्या गोष्टी शेती, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण इत्यादींच्या एक समयावच्छेदेंकरून व्हावयाच्या सुधारणेवर अवलंबून आहेत आणि ह्याकरितांच सरकारनें योजनात्मक धोरण अंगिकारणें आवश्यक आहे. आर्थिक बाबतींत सरकारनें उदासीन रहाण्याचे दिवस आतां राहिले नाहींत हें खास.

अमेरिका, इंग्लंड, हिंदुस्थान, रशिया इत्यादि देशांतील आर्थिक घटना व परिस्थिति हीं भिन्न भिन्न आहेत आणि म्हणून अमूकच एका मार्गानें राष्ट्रांनीं अन्नपुरवठा व शेती सुधारणा घडवून आणावी असा मित्रराष्ट्रांच्या वर उल्लेखिलेल्या परिषदेचा आग्रह असणें शक्य नाहीं. आपापल्या परिस्थितीच्या अनुरोधानें प्रत्येक राष्ट्रीय सरकारनें अन्नपुरवठ्याचा प्रश्न व्यापक स्वरूपांत सोड-

यावा अशी तिची शिफारस आहे. सहकारी चळवळीबद्दल बोलावयाचें म्हणजे सहकारी खातें आणि सहकारी संस्थांचे नेते व कार्यकर्ते ह्यांनीं आपल्या योजनात्मक कार्यक्रमाची आखणी करून ती प्रांतिक सरकारापुढें मांडली पाहिजे. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या असहाय व दुबळ्या व्यक्तींस आपापले पोटापाण्याचे धंदे किफायतशीरपणानें करण्यास संघटनेचें सामर्थ्य देणें हें सहकारी चळवळीचें ध्येय आहे. तेव्हां शेतांच्या तुकड्यांचें एकीकरण, संयुक्त शेती, सुधारलेल्या बियांचा, खताचा व उपकरणांचा पुरवठा, शेत मालाची विक्री, भांडवलाचा जोडधंद्यांस, लहान प्रमाणावरील उद्योगांस व व्यापारास पुरवठा, सामान्य स्थितींतल्या कुटुंबांसाठी जरूरीच्या जिनसांची खरेदी इत्यादि व्यवहार आजहि सहकारी पद्धतीनें केले जात आहेत. पण युद्धोत्तर काळांत ते विस्तृत, संघटित व हेतुपूर्ण रीतीनें व्हावयास हवे आहेत. रशियांत बॉल्शेव्हिक राज्यक्रांती झाल्यावर तेथील सर्व जमिनी सरकारनें आपल्या मालकीच्या करून त्या खेडेगावांच्या गटांतील लोकांस संयुक्त पद्धतीनें वापरावयास दिल्या आहेत. हे खेडेगावी कारखानेच आहेत आणि त्यांत शेती यंत्रसहायानें मोठ्या प्रमाणावर चालते. ह्या पद्धतीपेक्षा सहकारी संघटन नैतिक, सामाजिक व आर्थिक दृष्टीनें अधिक ग्राह्य आहे. दुसऱ्या टोकास इंग्लंडसारखे देश आहेत, त्यांमध्यें वैयक्तिक शेतीस विशेष महत्व दिलें जाईल आणि सरकार तिला किमान सहाय देईल. ह्या दोन्ही पद्धतींचे फायदे सहकारी संघटनांत आहेत. त्यांत वैयक्तिक जबाबदारी, वैयक्तिक हित व सामुदायिक हित ह्यांचा मेळ व लोकशाहीचें तत्त्व ह्यांची उत्कृष्ट सांगड घातलेली असते. ह्या साधनाचा अधिकांत अधिक उपयोग खेडेगावांच्या पुनर्रचनेसाठी कसा करतां येईल ह्याची रूपरेखा आखण्याचें महत्वाचें कार्य विलंब न लावला जातां सहकारी चळवळीच्या पुरस्कर्त्यांनी करणें इष्ट आहे. प्रांतिक इंस्टिट्यूट, बँक्स असोसिएशन ह्यांनीं सहकारी अधिकाऱ्यांच्या सहायानें पुनर्घटनेची योजना तयार केली पाहिजे. प्रांतिक सरकारच्या शेती खात्याचें व इतर खात्यांचेंहि ह्या योजनेंत सहकार्य लागेल हें उघड आहे. तथापि, आपल्या दृष्टीनें योग्य वाटणारी योजना आखण्यांत सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांनीं पुढाकार घेतल्यावांचून प्रस्तुत जिव्हाळ्याच्या प्रश्नास चालना मिळावयाची नाहीं.

---

## प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचें गेल्या वर्षांतील कार्य

### ३० जून, १९४३ च्या अखेरच्या वर्षाचा अहवाल

कांहीं विशिष्ट प्रकारच्या सहकारी संस्थांसच सभासदत्व मर्यादित केल्यामुळें, सभासद सोसायट्यांची संख्या घटून ती ११९ झाली. व्यक्तिशः सभासद ८० होते. इन्स्टिटयूटच्या बदललेल्या घटनेप्रमाणें जिल्हा सुपरवायझिंग यूनिअन्सला जोडलेल्या शिक्षण समित्यांमार्फतच जिल्ह्यांतून शैक्षणिक काम चालविण्याचें आहे. ह्या कामांत त्या त्या जिल्ह्यांत रहाणाऱ्या इन्स्टिट्यूटच्या सर्व सभासदांस भाग घेतां यावा, अशी आतां रजिस्ट्रार व इन्स्टिट्यूट ह्यांचेमध्यें वाटाघाट होऊन व्यवस्था झाली आहे. इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी समितीनें सर जे. ए. मदन ह्यांची चेअरमन व श्री. वैकुंठराय मेहता ह्यांची ऑनररी सेक्रेटरी म्हणून निवडणूक केली. ज्या जिल्ह्यांत सुपरवायझिंग यूनियन बोर्ड आहे तेथील शिक्षणकार्याची योजना इन्स्टिट्यूटच्या नियमांत आहेच परंतु जेथें यूनियन बोर्ड नाहीं, अशा ठिकाणचें काम इन्स्टिट्यूटनें स्वतःकडेच घ्यावें, असें रजिस्ट्रारनें सुचविलें. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांत शिक्षणाचें व प्रचाराचें काम करण्यासाठी समिती स्थापन करण्यांत आली आहे. मुंबई सहकारी शिक्षण कमिटीतर्फे कंझूमर्स सोसायट्यांच्या प्रतिनिधींची एक सभा २० मार्च, १९४३ रोजीं रेशनिंग संबंधींच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी बोलावण्यांत आली. सभेनें पुढें काम चालविण्यासाठी एक उपसमिति नेमली. मुंबई शहरांतील २६ सहकारी स्टोअर्स व १० सोसायट्या ह्यांना रेशनिंगच्या योजनेंतील किरकोळ व्यापारी म्हणून मान्यता मिळाली आहे व मुंबई सहकारी मार्केटिंग सोसायटी घाऊक व्यापारी ह्या नात्यानें १६ सोसायट्यांना रेशनचा माल पुरवीत आहे.

प्रादेशिक भाषांतून इन्स्टिट्यूटचीं मुखपत्रें पुनः सुरू करण्याचें कार्यकारी समितीनें ठरविलें, परंतु नवीन पत्रें काढण्यास त्यासंबंधांतील सरकारी अधिकाऱ्यांची परवानगी मिळूं शकली नाहीं. इन्स्टिट्यूटच्या स्वतःच्या पत्रांचे अभावीं मराठी विभागाकरितां इन्स्टिट्यूटनें "अर्थ" पत्राबरोबर व्यवस्था केली, तशी व्यवस्था गुजराथ व कर्नाटक ह्यांसाठीहि करावी लागेल. जानेवारी-फेब्रुवारी, १९४३ मध्यें अर्बन सेक्रेटरींचा वर्ग भरविण्यांत आला, त्याचा फायदा ३७ विद्यार्थ्यांनी घेतला. ३ मे रोजीं परीक्षा घेण्यांत आली, तिला फक्त ९ विद्यार्थी बसले. त्यांपैकीं २ उत्तीर्ण झाले. आणखी ५ विद्यार्थ्यांना कांहीं विषयांची माफी मिळाली. ठाणा जिल्ह्यांतील शेतकी पतपेढ्यांच्या सेक्रेटरींचा वर्ग भरविण्याचा प्रयत्न करण्यांत आला, परंतु येणाऱ्या विद्यार्थ्यांचा जेवणखर्च देऊं करूनहि पुरेसे विद्यार्थी मिळाले नाहींत व वर्गाचा विचार सोडून द्यावा लागला.

रिझर्व्ह बँकेच्या "१९३८–४० चा सहकारी चळवळीचा परामर्श" ह्या प्रकाशनांत सुचविल्याप्रमाणें संशोधनखात्याचें काम इन्स्टिट्यूट करील काय असें रजिस्ट्रारनें विचारलें. ह्यासंबंधांत विचार करून ४,२०० रुपये वार्षिक खर्चाची एक योजना रजिस्ट्रारकडे पाठविण्यांत आली. युद्धोत्तर पुनर्घटना फंडाच्या विनियोगाच्या योजनेवर रजिस्ट्रारनें इन्स्टिट्यूटचें मत विचारलें. मागसलेल्या जातींच्या सामाजिक व शैक्षणिक दर्जांत सुधारणा घडवून आणण्यांत सहकाराचा कितपत उपयोग होईल ह्यासंबंधीं बॅकवर्ड क्लास कमिटीच्या सेक्रेटरीनें पृच्छा केली. ह्या दोघांसहि तपशीलवार उत्तरें पाठविण्यांत आलीं.

अहवालाचे वर्षी इन्स्टिट्यूटचें उत्पन्न ८,६७७ रुपये झालें व खर्च १२,१९७ रुपये होऊन पडलेली तूट सरकारच्या ७,००० रुपयांच्या ग्रँटमधून भरून काढण्यांत आली. सरकारची ग्रँट प्रत्यक्ष तुटीच्या रकमेनुसार दरसाल कमी–ज्यास्त व्हावयाची आहे.

आंतरराष्ट्रीय सहकारी दिन दरसालप्रमाणें मुंबई, धारवाड, विजापूर पुणें, जळगांव, सुरत, कालोल व बार्शी येथें इन्स्टिट्यूटच्या प्रेरणेनें साजरा झाला. कोपरगांव व कालोल येथें बांधण्यांत यावयाच्या सर ललुभाई सामळदास स्मारक गृहांसाठीं अद्याप योग्य जागा मिळूं शकली नाहीं. २९४ सोसाट्यांच्या ३७,३६९ रुपयांच्या देणग्यांस इन्स्टिट्यूटनें मान्यता दिली.

हा अहवाल इन्स्टिट्यूटच्या २५ व्या वर्षाचा अहवाल आहे. वर्षांतील शेवटच्या सभेंत कार्यकारी समितीनें इन्स्टिट्यूटच्या रौप्य ज्युबिलीसंबंधीं योजना केली, तत्प्रमाणें १३ जुलै १९४३ रोजीं, इन्स्टिट्यूटच्या वाढदिवशीं, ज्युबिली साजरी झाली.

# स्फुट विचार

## उत्पादक कार्यासाठी पैशाची बचत करा

मुंबई प्रांतिक सहकारी इंस्टिटयूटनें पतपेढ्यांस उद्देशून एक पत्रक काढलें आहे तें आजच्या अंकांत दुसरीकडे आम्हीं प्रसिद्ध केलें आहे आणि त्याकडे आम्ही लक्ष वेधीत आहों. गेल्या दोन वर्षांत शेतीच्या मालास बरे भाव आल्यामुळें पतपेढ्यांच्या सभासदांची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास वाव मिळाला असल्याबद्दल इंस्टिटयूटच्या अध्यक्षांनीं ह्या पत्रकांत समाधान व्यक्त केलें आहे, आणि असल्या संधीचा उपयोग कर्जें कमी करण्याकडे केला जात आहे ही गोष्ट योग्य आहे असें म्हटलें आहे. हातांत चार पैसे आले असतां आपल्या देण्याच्या बोजा नाहींसा करून ह्या अनुकूल परिस्थितीचा फायदा पतपेढ्यांच्या सभासदांनीं घ्यावा हें उचित आहे. तथापि, शेतकऱ्यांच्या वाढलेल्या प्राप्तीचा विनियोग शक्य असेल तेथें आणि शक्य होईल त्या प्रमाणांत कायमच्या उत्पादक कार्यासाठी व्हावा असें इन्स्टिटयूटच्या अध्यक्षांचें म्हणणें आहे. सोसायट्यांच्या सभासदांची पत त्यांच्या बचत करण्याच्या प्रवृत्तीवर अवलंबून असते. दुर्दैवानें आर्थिक मंदीच्या कित्येक वर्षांत त्यांस काटकसर व बचत करण्याची संधीच लाभली नाहीं. ही परिस्थिति आतां सुधारली असतां आपल्या बचतीचा पैसा सोसायट्यांत शिल्लक ठेव म्हणून ठेवण्याचें महत्त्व त्यांच्या सभासदांस पटवणें आवश्यक आहे, असें इंस्टिटयूटचें सांगणें आहे. ही सूचना अगदी वेळेवर केली जात आहे आणि तिला अनुसरून कृती होणें आवश्यक आहे. दोन पैसे हातीं आले असतां त्यांचा उत्पादक रीतीनें व दूरदृष्टीनें उपयोग करावयाचा नाहीं, तर बचत करावयाची केव्हां ? एक तर वाढत्या चलनामुळें महागाई वाढत आहे, तिला आळा घालण्यांत बचतीची मदत होईल. दुसरें भलत्या चढीच्या किंमतीनें जमिनी किंवा बैल आज खरेदी केल्यानें शेतकऱ्यांचें अखेर नुकसान होणार आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्या शिवाय हेंहि ध्यानांत घेणें जरूर आहे कीं सोसायटींत सभासदांनीं आपल्या बचतीच्या ठेवी ठेवल्यास त्यांची पत वाढून नडीच्या प्रसंगीं हमखास पैसा मिळण्याची निश्चित व्यवस्था होते आणि उत्पादक कामांसाठी कर्जें देण्याचें पतपेढीचें सामर्थ्य वाढतें. बचतीच्या ह्या दुहेरी फायद्यावर इंस्टिटयूटच्या अध्यक्षांनीं जोर दिला आहे आणि सहकारी संस्थांशीं संबंध असलेल्या सर्व कार्यकर्त्यांस त्यांनीं अशी विनंति केली आहे कीं शेतीच्या मालाच्या किफायतशीर किंमतींचा योग्य व उत्पादक रीतीचा विनियोग सोसायट्यांमध्यें होण्यास त्यांच्या सभासदांचें मन वळवण्याचा प्रयत्न अवश्य करण्यांत यावा. इंस्टिटयूटच्या प्रस्तुत पत्रकाचा अपेक्षित परिणाम होईल अशी आम्हांस आशा आहे.

## इंग्लंडमध्यें तरुणांचें सहकारी शिक्षण

हिंदुस्थानांत सहकारी तत्त्व व कार्यपद्धति ह्यांविषयींचें शिक्षण प्रौढांस मिळण्याची मारामार, तेथें स्त्रिया आणि तरुण ह्यांच्या शिक्षणाची गोष्ट बोलावयासच नको. पाश्चात्य देशांत सहकारी चळवळीच्या कार्यांत स्त्रिया मोठ्या आस्थेनें भाग घेतात आणि त्यांचें उत्कृष्ट सहकारी संघटन असून त्या अनेक संस्था चालवतात. सामान्य जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्यास आणि शेतकरी व कामकरी लोकांची कौटुंबिक व्यवस्था अधिक सोयीची व सुखकारक होण्यास स्त्रियांनीं सहकारी कार्यक्रमांत पुढारीपणानें भाग घेणें अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याहि तत्त्वाची व कार्यपद्धतीची गोडी समाजांत उत्पन्न व्हावयाची असेल तर त्यांचें बाळकडू तरुण पिढीस पाजावें लागतें. ही गोष्ट इंग्लंडमध्यें सहकारी कार्यकर्त्यांस इतकी पटलेली आहे कीं तेथें लहानपणापासून मुलांस व मुलींस सहकाराचें शिक्षण देण्याची खबरदारी घेतात. तेथें दरवर्षी तरुणांसाठी स्वतंत्र शिक्षण-वर्ग भरवण्यांत येतात. ही शिक्षणाची तजवीज अधिक कार्यक्षम व्हावी ह्यासाठी इंग्लंडच्या कोऑपरेटिव्ह यूनिअननें यॉर्कशायर परगण्यांत एक मोठी इमारत खरेदी केली आहे. देशाच्या आठ टापूंमध्यें अशीच व्यवस्था करण्यांत यावयाची आहे आणि यॉर्कशायरमधील टॉंगहॉल ह्या इमारतीची खरेदी हा सदरहु धोरणाचा उपक्रम आहे. तेथें पुढाऱ्यांचीं व्याख्यानें होतील आणि तरुणांस वारंवार एकत्र येऊन शिक्षण घेण्याची सोय करून दिली जाईल. ब्रिटिश सहकारी पुढाऱ्यांचें ध्येयवादित्व व व्यवहारचातुर्य ह्यांची कल्पना ह्या तरुण शिक्षण योजनेवरून येण्यासारखी आहे. अशा मूळभूत स्वरूपाच्या योजना इकडे अंमलांत आल्यावांचून आमच्या सहकारी चळवळीची पायाशुद्ध प्रगति होणें अशक्य आहे. म्हणूनच प्रस्तुत स्फूर्तिदायक उपक्रमाचा उल्लेख आम्हीं येथें केला आहे.

## चिनी राष्ट्राची चिकाटी आणि शौर्य

चीनचा सबंद समुद्र किनारा जपाननें व्यापला आहे आणि ब्रह्मदेशास तो देश जोडणारा हमरस्ता बंद केला आहे. ह्या कारणानें चीनला युद्धसामुग्रीचा पुरवठा होणें अत्यंत कठिण झालें आहे. नव्या रस्त्यानें वहातुक चालू करण्याचे भगीरथ प्रयत्न होत असून मित्रराष्ट्रें चीनला सहाय देण्याची शिकस्त करीत आहेत. युद्धापूर्वीच्या चिनी रेल्वेजपैकी नऊ-दशांश जपानच्या वर्चस्वाखालीं आल्या आहेत, चीनच्या आरमाराचा व जहाजांचा नऊ-दशांश भाग शत्रूनें बुडवला आहे किंवा स्वतःच्या ताब्यांत घेतला आहे. पंचाण्णव टक्के हवेंतील वहातुक आणि पन्नास टक्के टेलिग्राफ व टेलिफोनच्या तारा जपाननें घेतल्या आहेत. अशा परिस्थितींतहि चीन जपानचा प्रतिकार जोरानें करीत आहे इतकेंच नव्हे तर चिनी सैन्यें कित्येक ठिकाणीं शत्रूस मागें रेटीत आहेत. जनरल चँग कायशेक ह्यांच्या नेतृत्वाखालीं चिनी जनता निकरानें युद्धकार्य करीत आहे आणि अडचणींस न जुमानतां शत्रूचा पराजय होऊन आपला सबंद देश स्वतंत्र होईपर्यंत चिकाटीनें लढत रहाण्याचा तिचा दृढनिश्चय आहे. संकटकाळींच कोणत्याहि राष्ट्राची खरी परीक्षा होत असते आणि चिनी राष्ट्र कठिण कसोटीस उतरलें आहे. प्रस्तुत युद्ध चालू होण्यापूर्वीच जपाननें चीनमध्यें आक्रमण आरंभिलें होतें आणि त्यांतला कांहीं भाग व्यापून तेथें नामधारी स्वतंत्र चिनी राज्य स्थापण्याचें त्यानें सोंग केलें आहे. बाकी राहिलेल्या चीनलाहि आपल्या सत्तेच्या जाळ्यांत अडकवण्याचा प्रयत्न जपाननें केला आहे. परंतु चँग कायशेक ह्यांनीं हें धोतांड झुगारून देऊन मित्रराष्ट्रांच्या बरोबरीनें जपानशीं युद्ध चालू ठेवलें आहे. सर सेनापती लॉर्ड लुई मौंटबॅटन ह्यांच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मदेशाच्या बाजूनें जोराच्या चढाईस रंग येईल तेव्हां चीनला तिचें परिणामकारक सहाय होईल आणि मित्रराष्ट्रांस चीनची अधिक कार्यक्षम मदत मिळून ह्या दोहोंच्या रगाड्यांत जपानी सत्तेचा चुगडा उडेल ह्यांत संशय नाहीं.

## सर होमी मोदी ह्यांच्या सूचना

सार्वजनिक जीवनाचें कोणतेंहि क्षेत्र असो, त्याशीं संबंध असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या भाषणांत युद्धोत्तर पुनर्घटनेचें विवेचन येणें अपरिहार्य होऊन बसलें आहे आणि त्यावरून ह्या प्रश्नाचें राष्ट्रीय महत्व सिद्ध होत आहे. हिंदुस्थानांतील धंदेवाल्यांची एंप्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया ह्या नांवाची संस्था आहे. तिच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं सर होमी मोदी ह्यांचें भाषण झालें, त्यांत त्यांनीं ह्या विषयाची चर्चा केली. आर्थिक पुनर्घटनेसंबंधानें योजना सुचवण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें समित्या नेमल्या आहेत, त्यांचें काम अत्यंत संथपणानें व असमाधानकारक रीतीनें चाललें असल्याची त्यांनीं तक्रार केली आणि युद्ध संपलें तरी पुनर्रचनेच्या योजना अर्धवट स्थितींत रहाण्याची भीति व्यक्त केली. युद्धाचे अखेरीस हिंदी धंद्यांचा विस्तार होणें इष्ट आहे ह्याविषयीं दुमत असण्याचें कारण नाहीं आणि युद्धकाळांत आलेला अनुभव व मिळालेला फायदा ह्यांच्या स्फूर्तीनें अशा औद्योगिक वाढीस उत्तेजन मिळेल. तथापि नवीन धंदे काढणें व जुन्यांत अधिक भांडवल घालणें ह्या बाबतींत स्पर्धा व घाई होऊन अपयश व नुकसान पदरीं येण्याचें भय आहे ह्या गोष्टीकडे सर होमी ह्यांनीं लक्ष वेधलें. त्यांची भयसूचना ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ह्यांत संशय नाहीं. अन्नपुरवठ्याचे बाबतींत चालू सालांत बंगालमध्यें आलेल्या अनुभवाची पुनरावृत्ति न होऊं देण्याविषयीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस त्यांच्या जबाबदारीची त्यांनीं आठवण करून दिली. कामकरी लोकांसाठी आजारीपणाचा विमा उतरण्याची योजना अंमलांत आल्यास कारखानदार आपल्या वाट्याचा खर्च सोसतील, पण सरकारनें आपल्या हिश्शाची जबाबदारी उचलली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. घाऊक किंमती स्थिर झाल्या किंवा उतरल्या तरी किरकोळ किंमती अजून खाली जात नसल्याची त्यांनीं तक्रार केली; आणि ह्या परिस्थितीमुळें कामकऱ्यांची मजुरी व महागाई भत्ता सारखा वाढत जाण्याच्या सध्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्याची आवश्यकता सर होमी ह्यांनीं प्रतिपादली.

---

## कै. वा. रावबहादुर चितळे

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या वाढीस ज्या बिनअधिकारी गृहस्थांचें सहाय ठळक रीतीनें उपकारक झालें त्यांमध्यें नगरचे रावबहादुर चितळे ह्यांस स्थान दिलें पाहिजे. नगरच्या डिस्ट्रिक्ट सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेची स्थापना व प्रगति ह्यांस त्यांचे परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. त्यांच्या मृत्यूनें नगर-जिल्ह्या व सबंद मुंबईप्रांत ह्यांची मोठी हानी झाली आहे. रावबहादुर चितळे प्रांतिक कायदेमंडळाचे कित्येक वर्षे सभासद होते; आणि त्यांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारांत महत्वाचें कार्य कष्टाळूपणानें केलें. सामान्य जनतेच्या हितासाठी झटण्यांत त्यांनीं कधींहि कसूर केली नाहीं, एवढेंच नव्हे तर विरोधास न जुमानतां आपल्या सद्सद्विवेक बुद्धीप्रमाणें स्वार्थत्यागपूर्वक सार्वजनिक सेवा केली. सहकारी चळवळ ह्याच दृष्टीनें त्यांच्या कार्यक्रमाच्या कक्षेंत आली आणि तीमध्येंहि त्यांनीं आपलें व्यक्तिमत्व प्रकट केलें. आपल्या उतार वयांतहि सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक आणि विणकरांच्या सहकारी औद्योगिक संस्था ह्यांमध्यें अलीकडे रावबहादुरांनीं चांगलें लक्ष घातलें होतें. सार्वजनिक कार्याची हौस, करारीपणा आणि लोकहितार्थ परिश्रम करण्याचा अढळ निश्चय हे त्यांचे गुण चालू व भावी पिढीनें अनुकरण करण्यासारखे आहेत.

## जिनिंग फॅक्टरीचा उद्घाटन समारंभ

सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि. ( ता. बागलाण, जि. नाशिक ) ह्या संस्थेच्या कपाशीच्या जिनिंग फॅक्टरीचा उद्घाटन समारंभ मि. एस. एम. इकम, आय. सी. एस., रजिस्ट्रार, ह्यांचे अध्यक्षतेखाली २४ नोव्हेंबर, १९४३ रोजीं साजरा झाला. त्यावेळीं सुमारें २ हजार समाज हजर होता. प्रारंभीं श्री. द. अ. पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर, ह्यांनीं संस्थेची प्रारंभापासून आतांपर्यंत निरनिराळ्या व्यवहारांत कशी प्रगति होत गेली, हें सांगून जिनिंगबद्दलची माहिती दिली. संस्थेला अद्याप कोणत्या बाबी हातीं घ्यावयाच्या आहेत, तेंहि त्यांनीं सांगितलें. श्री. पवार, श्री. फाटक, श्री. हिरे, खा. सा. हफीसजी, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांचीं समयोचित भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं फॅक्टरीचें उद्घाटन केलें व सेक्रेटरीस बक्षीस देऊन भाषण केलें. श्री. तिडके वकील, चेअरमन, ह्यांनीं अध्यक्ष व आलेली मंडळी ह्यांचे आभार मानले.

### अध्यक्ष, मि. इकम, सहकारी खात्याचे रजिस्ट्रार,

### ह्यांचें भाषण

समारंभाचे अध्यक्ष, मि. एस. एम. इकम, आय. सी. एस. हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

" महाराष्ट्रांत पूर्वी जिनिंग फॅक्टरी होत्या व आतां त्या नाहींत. या परिस्थितींत महाराष्ट्रांतील पहिल्याच सहकारी जिनिंग फॅक्टरीचें उद्घाटन करतांना मला आनंद होत आहे. मुंबई प्रांतांतील ही आपली सहावी सहकारी जिनिंग फॅक्टरी होय. मुंबई प्रांतांतील इतर भागांत कपाशीच्या बाजारपेठांच्या वाढीबरोबरच उत्तम कपाशीची लागवड व पैदास करणाऱ्या संस्था स्थापन करण्यांत आल्या. त्या भागांतील जिनिंग फॅक्टरीच्या संस्थापकांना खरेदी-विक्री करणाऱ्या संस्था चालविण्याचा अनुभव होता. ह्या भागांत सहकारी तत्त्वानुसार खरेदी-विक्रीचा पूर्णपणें फैलाव होण्यापूर्वीच ही सहकारी जिनिंग फॅक्टरी स्थापन होत आहे. तथापि, ती यशस्वी होण्यास प्रबळ कारणें आहेत. ह्या तालुक्यांत कपाशीचे क्षेत्रांत सहकारी पतपेढ्यांची वाढ व प्रगति चांगल्या रीतीनें होत आहे. येथील कार्यकर्त्यांना सहकाराचें तत्त्व उत्तम प्रकारें पटत चाललें आहे आणि निरनिराळ्या सहकारी संस्थांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्याची जाणीवहि जास्त प्रमाणांत निर्माण झाली आहे. म्हणूनच, प्रस्तुत उपक्रम यशस्वी होईल, अशी उमेद आहे. आपल्या कपाशी विक्री संस्थांनीं दलालांची मिरासदारी कमी केली आहे. ज्या भागांत ह्या संस्थांचा चांगला जम बसला आहे, त्या भागांत त्यांनीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें शेतमालाची योग्य दरानें विक्री करण्याचे कामीं व त्याला येणाऱ्या खर्चाचें प्रमाण कमी करण्याचे कामीं बराचसा हातभार लावलेला आहे. सहकारी संस्था शेतकऱ्यांची कशी सेवा करतात, ह्याचें आपली सोसायटी एक उत्तम प्रतीक आहे. अलीकडील एक-दोन वर्षांत ह्या भागांतील कार्यकर्त्यांनीं जो उत्साह दाखविला आहे, तो उल्लेखनीय आहे. सोसायटीनें एका वर्षांत शेअरभांडवल व मालविक्रीचा आकडा ह्यांत पुष्कळ वाढ केली आहे. गेल्या दोन वर्षांतील कामगिरीबद्दल मी श्री. तिडके, श्री. डी. ए. पाटील व संस्थेचे इतर सभासद ह्यांचें अभिनंदन करतों. संस्थेनें आपलें कामकाज व्यापारी धोरणानुसार चालवावें व कामांत पूर्ण दक्षता बाळगावी, अशी माझी सूचना आहे. जादा शेअर भांडवल गोळा करून जिनिंग फॅक्टरी खरेदी करण्यांत दाखवलेला उत्साह मावळूं न देतां तो आपण जोमांत ठेवाल, अशी मला आशा आहे.

" हातीं घेतलेलें कार्य यशस्वी करून दाखविणें एवढेंच आपलें कर्तव्य नसून, ह्या भागांतील सर्वांची सहकारी तत्त्वावर सर्वांगीण सेवा करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. "

## काटकसर करून उत्पादन वाढविण्याकडे बचतीचा उपयोग करा

**मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षांचें पत्रक**

"गेल्या दोन वर्षांत शेतकीच्या सहकारी पतपेढ्यांचे आर्थिक परिस्थितींत सुधारणा घडून आली, त्याबद्दल इन्स्टिट्यूटला आनंद वाटत आहे. शेतीच्या उत्पादनाचे मालाच्या किंमतींत झालेली वाढ हें ह्या सुधारणेचें मुख्य कारण आहे. ह्यापूर्वीच्या गेल्या दहा-बारा वर्षांत शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे इतके पैसे कधींच मिळाले नव्हते. पतपेढ्यांच्या बहुसंख्य सभासदांनीं आपल्या सुधारलेल्या परिस्थितीस अनुसरून आपलीं देणीं देण्याची जबाबदारीची वृत्ति दाखविली आहे, हें योग्यच आहे. कर्जाचा बोजा कमी करण्याकडे सध्याच्या सुस्थितीचा उपयोग केला जाईल, अशी इन्स्टिट्यूटला आशा आहे. पतपेढ्यांच्या सभासदांची आर्थिक परिस्थितींत कायमची सुधारणाहि घडवून कशी आणतां येईल, ह्याकडेहि पतपेढ्यांनीं आतां लक्ष दिलें पाहिजे.

सध्याच्या भरमसाठ किंमतीनें माल खरेदी करावा लागणार नाहीं, अशा बेतानें सभासदांना जमीन सुधारणेचें कार्य हातीं घेतां आलें तर उत्तमच, नाहींतर त्यांनीं आपली बचत सोसायटीकडे ठेव म्हणून ठेवावी, अशी इन्स्टिट्यूटची सूचना आहे. काटकसर हा पतीचा पाया आहे, हें विशद करून सांगण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि, मंदीच्या काळांत काटकसरीच्या धोरणास नाइलाजानें फारसा वावच मिळाला नव्हता. आतां परिस्थिति सुधारली आहे व वरील बोधवचन पतपेढ्यांच्या सभासदांचे मनावर बिंबविण्यास व सोसायटीकडे बचतीचे पैसे ठेव म्हणून ठेवण्यास त्यांना उद्युक्त करण्यास ही वेळ सोईची आहे. चलनवृद्धीस आळा घालण्याचा एक उपाय, ह्या दृष्टीनेंहि ही गोष्ट महत्त्वाची आहे. सध्याच्या भरमसाठ किंमतीनें जमिनी व बैल विकत घेण्यांतील संभाव्य नुकसानीकडे पतपेढ्यांच्या सभासदांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. पतपेढींत ठेव ठेवल्यामुळें, काटकसरी सभासदास जरूरीच्या वेळीं भांडवलाचा पुरवठा होऊं शकतो व पतपेढीजवळील पैसे शेतकरी व कामगार ह्यांच्या उत्पादक कार्यांत गुंतून उत्पादन वाढण्यास सहाय होतें.

"सहकारी चळवळीचा आर्थिक पाया दृढ करण्याची आताची संधी वाया जाऊं न देण्याबद्दल इन्स्टिट्यूटची तिच्या सभासदांना व सहकारी कार्यकर्त्यांना अत्यंत कळकळीची विनंति आहे. प्राथमिक पतपेढ्यांच्या सभासदांना काटकसर करण्यास प्रवृत्त करण्याचा व जमलेले पैसे पतपेढ्यांत ठेव म्हणून ठेवण्यास लावण्याचा कसून प्रयत्न येत्या शेतीच्या हंगामांत सर्वांनीं करावा."

### खिल्लारी जनावरांचें प्रदर्शन

खिल्लारी जनावरांचें तिसरें वार्षिक प्रदर्शन मद्रुद ( जि. सोलापूर ) येथें भरलें होतें, त्यांत ४०० निवडक खिल्लारी जनावरें दाखल करण्यांत आलीं होतीं.

### जर्मनीवर अग्निवर्षाव

गेल्या सात महिन्यांत जर्मनीवर ब्रिटिश विमानदळानें एक लक्ष टन वजनाच्या बाँबचा वर्षाव केला. युद्ध चालू झाल्यापासून आतांपर्यंत जर्मनीवर ह्याप्रमाणें टाकण्यांत आलेल्या बाँबचें वजन दोन लक्ष टन भरतें.

### प्रांतिक को-ऑपरेटिव्ह इंस्टिट्यूटची वार्षिक सभा

मुंबई प्रांतिक को-ऑपरेटिव्ह इंस्टिट्यूटची वार्षिक सभा गेल्या गुरुवारीं सर जनार्दनराव मद्न ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. जून, १९४३ अखेरच्या वर्षी झालेल्या कामाचा वृत्तांत आणि हिशेब, त्याचप्रमाणें १९४३–४४ सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी, कांहीं नियमांत दुरुस्ती व कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीच्या नवीन तयार केलेल्या नियमांस मंजुरी हीं मुख्य कामें सभेपुढें होतीं. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत इंस्टिट्यूटच्या कार्यासंबंधानें त्रोटक माहिती सांगितली आणि रावबहादुर चितळे व श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर ह्यांच्या निधनाबाबत खेद प्रदर्शित केला. प्रो. काळे ह्यांनीं इंस्टिट्यूटचा वृत्तांत व हिशेब मंजूर व्हावे असा ठराव पुढें मांडला व तो मान्य झाला. श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं अंदाजपत्रक व नियम-दुरुस्त्या समजावून दिल्या आणि त्यांचे सूचनेवरून त्या मान्य झाल्या. निवडणुकीच्या नियमांचा खर्डा दि. ब. काजी ह्यांनीं वाचून दाखविला आणि तो थोडी चर्चा होऊन सभेनें मंजूर केला. ऑडिटर्सची फेरनिवडणूक झाली आणि त्यांच्या कामाबद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले. नवीन घटनेस अनुसरून इंस्टिट्यूटच्या कार्यास नुकताच प्रारंभ झाला आहे आणि त्याचें काम आतांपर्यंत प्रथमावस्थेंत होतें. तथापि, त्यानें अंगीकृत कार्यक्रम उत्साहानें चालवला आहे आणि त्याच्या उद्दिष्टाच्या मर्यादेंत इंस्टिट्यूटच्या हातून योग्य कामगिरी होईल अशी आशा सर जनार्दन, प्रो. काळे व दि. ब. काजी ह्यांनीं आपल्या भाषणांत व्यक्त केली.

### "संघटित महाराष्ट्र"

महाराष्ट्र कारखानदार संघाच्या कामाचा व्याप वाढत चालला, त्यास अनुसरून व संघाची संघटना वाढविण्यासाठीं "संघटित महाराष्ट्र" ह्या नांवाचें मासिक श्री. न. ग. आपटे ह्यांनीं स्वतःचे जबाबदारीवर काढून त्यांत तूर्त फक्त औद्योगिक व त्यांतल्या त्यांत कारखानदारीस पोषक अशाच गोष्टींचा समावेश करण्याचें ठरविलें. तूर्त आठच पानांचें मासिक काढण्यास सरकारी परवानगी मिळाली. या मासिकाचा पहिला अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत संपादकाचें प्रास्ताविक निवेदन, महाराष्ट्र कारखानदार संघाचा मासिक अहवाल, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्सकडून आलेल्या पत्रकांचा सारांश, औद्योगिक खात्याकडील माहिती, इत्यादि मजकूर आला आहे. "आज जरी मासिकाचें ध्येय मर्यादित असलें, तरी संकल्पित ध्येय महाराष्ट्राची सर्वांगीण उन्नति करण्याचा प्रयत्न करण्याचें आहे," असें संपादक म्हणतात. इष्ट कार्यांत त्यांस यश येवो, असें आम्हीं इच्छितों. मासिकाची वार्षिक वर्गणी ३ रुपये आहे.

### सहकारी चळवळीच्या स्त्री प्रचारक

स्त्रियांत सहकारी चळवळीचा प्रचार करण्याकरितां मुंबई सरकारनें खालील स्त्रियांची ऑनररी ऑर्गनायझर म्हणून नेमणूक केली आहे:—( १ ) मिस दिनशा कामा, अहमदाबाद ( २ ) मिसेस गंगाबाई साळुंके, सोलापूर. (३) मिसेस शांताबाई मेहेंदळे, पुणें. (४) मिसेस इंदिराबाई देवधर, पुणें. (५) मिसेस शांताबाई कशाळकर, मुंबई.

## पालेमोडी कर्ज

( लेः— श्री. एस. एन. लाडांरे, सुपरवायझर, भिवंडी-कल्याण ता. को. यूनियन. )

शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा व तो नाहींसा करण्याकरितां आतांपर्यंत योजलेल्या अनेक उपायांपैकीं बिनचूक लागू पडलेला उपाय म्हणजे सहकारी चळवळ आहे व तिच्याच द्वारें शेतकऱ्यांची उन्नती होईल हें आतां अनुभवानें सिद्ध झालें आहे. कर्जबाजारीपणा कमी करण्याचे अगर तो थांबविण्याचे जे मार्ग आहेत त्यांपैकीं प्रामुख्यानें म्हणजे शेतकऱ्यानें आपलें उत्पादन वाढविणें व अनुत्पादन कारणाकरितां होणारा खर्च कमी करणें.

या भागांतील शेती ही येथील शेतकऱ्यास जास्तींत जास्त श्रम करूनही उत्पादनाच्या दृष्टीनें त्याच्या जीवनोपयोगी गरजा भागविण्यास सुद्धां अपुरी पडते. अशा परिस्थीतींतही या भागांतील व्याजाचा दर काय आहे व सामान्य शेतकरी आपलें जीवन कसा जगवूं शकतो याची थोडीशी माहिती खालीं दिली आहे.

या भागांत शेतकऱ्यास लागणारें कर्ज बहुवा पालेमोडीवरच काढावें लागतें. कारण ज्या शेतकऱ्यास स्वतःची मिळकत नाहीं किंवा ती अपुरी असून जमीन खंडानें करावी लागते अशा शेतकऱ्यास सावकार व्याजानें कर्ज देत नाहीं.

" पालेमोडी कर्ज हा शब्द फक्त या भागांतच रूढ आहे व तो दुसरीकडे कोठेंही ऐकण्यांत येत नाहीं. याचा सरळ अर्थ, एकदां असें कर्ज दिलें कीं, त्याच्या पोटीं पाळेंमुळें खोदणें अगर झालेल्या पिकाची सावकारानें पालापाचोळ्यासहित मोड करणें असा लावला तरी तो योग्यच होईल. पालेमोडी कर्ज देतांना कर्जावर व्याजाचा दर ठरत नसून त्या कर्जापोटीं किती मण भात देणार असें ठरविलें जातें व अशा रोख अगर खावटीच्या रूपांत जरी कर्ज घेतलें तरी त्याची परतफेड भाताच्या रूपानेंच करावी लागते. एक खंडीभर भाताच्या मोबदल्यांत जास्तींत जास्त रु. १० ते १५ कर्ज दिलें जातें व असें कर्ज जून, जुलै या महिन्यांत देण्यांत येतें व त्याची फेड परत नवीन भात निघाल्याबरोबर म्हणजे जास्तींत जास्त ४ महिन्यांत होऊं शकते. सध्याचे तेजीचे वेळीं भातास दर मणास रु. ६ भाव आहे व मंदीच्या वेळीं तो कमींतकमी रु. ३ तरी असतो. याप्रमाणें ७ मणाची खंडी प्रमाणें रु. २१ हे ४ महिन्यास व रु. ६३ हे १२ महिन्यास रु. १५ च्या कर्जापोटीं द्यावे लागतात व दरसाल दर शेकडा व्याजाचा दर काढला तर तो ३७५ टक्के निघतो व अशा तऱ्हेनें गरीब व गरजू शेतकऱ्यास आपल्या जमीन लागवडीस, खावटीस व कुटुंबपोषणार्थ लागणाऱ्या कर्जाची फेड अशा तऱ्हेनें करून तो शेवटीं उघडाच राहातो. यावरून पालेमोडी शब्दाचा अर्थ वरील प्रमाणें आहे हे दिसून येईल.

सहकारी चळवळ ही या भागांत १९२८ पासून सुरू झाली, परंतु शेतकऱ्यास फक्त पैशाच्या रूपानेंच कर्ज देणें हेंच एक अंग व तेही ठराविक मर्यादेंत असल्यामुळें, असल्या पालेमोडीसारख्या बाहेरून घेणाऱ्या कर्जास आळा बसेना. यापुढें पैशाच्या गरजेबरोबरच शेतकऱ्याच्या इतर गरजा व त्या मालाच्या रूपांत मागवितां आल्या तरच या पद्धतीस आळा बसेल हें येथील चालकांनीं बँकेच्या अधिकाऱ्यांस व मे. रजिस्ट्रार साहेब व मे. इकन साहेब यांना पटवून, दिल्यानंतर सोसायटीच्या पोटनियमांतच कोठाराच्या पोटनियमाची, मालाच्या खरेदी-विक्रीची तरतूद केली व त्यामुळें असलेल्या कोठारास कायदेशीर महत्त्व आलें व इतर कोठारें काढतां आलीं. २।३ सोसायट्यांचीं गावें प्रयोगादाखल याकरितां निवडलीं होतीं व त्याचा परिणाम असा झाला कीं, असें कर्ज सोसायटीनेंच सभासदांस दिल्यामुळें पूर्वीच्या उत्पन्नाइतक्याच उत्पन्नांत हें कर्ज जाऊन जुनें असलेलें सोसायटीचें कर्जही फिटलें गेलें व सोसायट्यांचा वसूलही चांगला होऊन वरील सारख्या बाहेरील घातुक कर्जास आळा बसला व आपल्या सोसायटीबद्दल सभासदांत आपलेपणाची भावना उत्पन्न झाली. या यूनियनखालील ५६ शेतकी सोसायट्यांपैकीं ३२ सोसायट्यांत ही पद्धत अंमलांत आली असून तीं कोठारें उत्तम रीतीनें चाललीं आहेत. इतर सोसायट्यांतही ही योजना अंमलांत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेंच सोसायट्यांच्या सभासदांस लागणाऱ्या मालाची इन्डेन्ट पद्धतीवर माहिती मागवून तो माल येथील सहकारी खरेदी-विक्री युनियन मार्फत पुरविण्याचें कार्यही सोसायट्यामार्फत सुपरवायझिंग युनियन लौकर सुरू करणार आहे.

वरील सर्व कार्य घडवून आणण्यास येथील लोकप्रिय पुढारी श्री. नानासाहेब ऊर्फ दौलतराव झुंजारराव, डी. एच. ओ. डायरेक्टर बी. पी. सी. बँक, व श्री. लडकू पाटील, चेअरमन सुपरवायझिंग व सेल परचेस युनियन वाडा यांचे परिश्रमाचें फळ आहे. अशा रीतीनें क्रेडिट व्यतिरिक्त नॉन् क्रेडिट व्यवहाराचा भरभक्कम पाया जर या चळवळीस मिळाला तर तो जास्तच पोषक होईल व या चळवळीद्वारेंच शेतकऱ्यांस स्वतांच चालू गरजा भागविणें; आपली उत्पादनशक्ति वाढवून व ती हळूहळूं सुधारणें शक्य होईल. व अशा तऱ्हेनें या भागांतच ही योजना उगम पावून तिच्या विकासांतच पालेमोडी कर्ज हें नांव कोठें ऐकवांत नाहीं व त्याबद्दल हें स्पष्टीकरण करावें लागलें. तो शब्दही व तें नांवही या भागातून आपोआपच कमी होईल असा दृढ विश्वास वाटतो.

---

## युद्धानंतर सैनिकांचें खेडेगांवांत पुनरागमन

" गेल्या युद्धांत भाग घेतलेला हिंदी सैनिक व आतांचा हिंदी सैनिक ह्यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. आतांच्या सैनिकास रेडिओचा परिचय आहे, सिनेमा पहाण्याची त्यास आवड आहे; यंत्रांशीं त्याचा संबंध येतो व मोटारी तर त्यास रोजच्याच संवयीच्या आहेत. बैठे व मैदानी खेळाची त्यास आवड आहे. हा सैनिक युद्धानंतर आपल्या खेडेगांवांत परत आला तर त्याला खेडें अत्यंत मागसलेलें वाटेल. ह्या सैनिकांना जमिनीचें उत्पादन वाढविण्यास शिकविण्यांत येईल. शास्त्रीय शोधांनीं सिद्ध झालेले उपाय योजले, तर हिंदी शेतीचें उत्पादन तिप्पट होऊं शकेल. मला सर्वाधिकारी केलें, तर मी शेतीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करीन, जमीन धुपून जाणें बंद करीन व चांगल्या बियांचा फैलाव करीन. उद्धारासंबंधीं पुष्कळ प्रचार झाला पाहिजे. परतलेल्या सैनिकांनीं बेटर लिव्हिंग सोसायट्या स्थापन कराव्या." इंडियन आर्मी वेल्फेअर अँड एज्युकेशन डिरेक्टोरेटचे कर्नल ब्रेन ह्यांचे उद्गार.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.